# महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास

## खंड २

## १९०१ - १९५० (भाग १)


लेखक

**रमेश नारायण वरखेडे**

सह-लेखक

**नितीन रिंढे**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास खंड २
(इ. स. १९०१ ते १९५०) भाग १

➢ **लेखक :** डॉ. रमेश वरखेडे

➢ **प्रथमावृत्ती :** २०२३

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-९४-०

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ **मुखपृष्ठ :** गांधी हत्येच्या वार्तेचे पडसाद : क्रिशेन खन्ना,
प्रोग्रेसिव्ह आर्ट ग्रुप (१९४८)

➢ **© प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : ३५४.५०**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने 'महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांच्या इतिहासा'चा हा दुसरा खंड वाचकांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. एकोणिसाव्या शतकापासून एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत सुमारे दोनशे वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात झालेल्या स्थित्यंतरांचा कालक्रमबद्ध इतिहास एकत्रितपणे उपलब्ध करून द्यावा या हेतूने मंडळाने हा बृहत्-प्रकल्प हाती घेतला आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास हा एका अर्थाने मराठी अस्मितेचा इतिहास आहे. मराठी माणसाच्या ऐतिहासिक उत्कर्षाचा, वैचारिक घडणीचा आणि मानसिक संघर्षाचा इतिहास आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेचा अन्वयार्थ लावण्याच्या भूमिकेतून गेल्या दोनशे वर्षातील घटनांचे संस्कृतीकेंद्री वाचन हे या प्रकल्पाचे वेगळेपण आहे. हा बृहत् प्रकल्प तीन खंडात प्रकाशित व्हावयाचा आहे. त्यापैकी पहिला खंड प्रसिद्ध झाला असून तो एकोणिसाव्या शतकातील घटना-घडामोडींवर आधारलेला आहे. विसाव्या शतकाचा प्रारंभ ही दुसऱ्या खंडाच्या विवेचनाची पूर्वसीमा असून १९५० ही उत्तरसीमा ठरविण्यात आली आहे.

विसावे शतक हे महाराष्ट्राच्या पुनर्घटनेचे प्रारूप शोधणारे शतक आहे. देशकारण आणि समाजकारण यात मराठी माणसाची सामिलकी वाढविण्यासाठी वैचारिक मशागत व संघटनात्मक बांधणी करणारा हा कालखंड आहे. या कालखंडातील समाजधुरिणांनी लोकशाही मूल्ये आणि जबाबदार राज्यपद्धतीसाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी करण्यावर भर दिला आहे. ब्रिटिश वसाहतवादाविरुद्ध लोकमान्य टिळक आणि म.गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला स्वातंत्र्यलढा, नागरी हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या विविध संस्थानांमध्ये स्थापन झालेल्या प्रजापरिषदा, खादी-ग्रामोद्योगाची चळवळ, अस्पृश्यतानिर्मूलनाचे लढे, राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ; स्त्रिया, कामगारवर्ग आणि वंचितांच्या हक्कप्रस्थापनाच्या चळवळी आणि इतरही अनेक पातळ्यांवर सामजिक पुनर्घटनेचे प्रयोग या कालखंडात सुरू होते. वृत्तपत्रे, नियतकालिके,

नाटकमंडळ्या, कलापथके, शैक्षणिक व सामाजिक संस्था, साहित्य आणि इतर ललितकलांच्या क्षेत्रांतूनही या चळवळींना पोषक अशी नवनिर्मिती या कालखंडात झाली आहे.

केवळ राजकीय घटितांच्या इतिहासातून महाराष्ट्र संस्कृतीच्या विविध अंगोपांगातील बदलांचा अंदाज येत नाही. त्यामुळे या बृहत इतिहासात आधुनिक महाराष्ट्राच्या भौतिक प्रगतीबरोबरच भाषा, साहित्य, कलाकल्पना, मूल्यधारणा, ध्येये आणि आकांक्षा, परस्पर मानवी संबंधांचा पोत यांचा वस्तुनिष्ठ मागोवा घेण्यात आला आहे. मराठी अस्मिता आणि महाराष्ट्र धर्माचा संबोध सुस्पष्ट होण्यासाठी या प्रकारच्या इतिहासाची गरज होती, ती या प्रकल्पातून पूर्ण होईल असा विश्वास आहे. इतिहासलेखनाची प्रक्रिया ही सतत सुरू असते. भूतकाळाचे नवे वाचन करण्याचा नेहमीच प्रयत्न होत असतो. प्रस्तुत प्रकल्पातून असे एक नवे वाचन आपल्यापुढे येत आहे. त्यातून महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील बलस्थाने व कच्चे दुवे स्पष्ट व्हायला मदत होईल.

प्रकल्प समन्वयक श्री. रमेश वरखेडे यांनी प्रस्तुत इतिहासलेखनासाठी भरपूर परिश्रम घेतले. शासकीय दस्तऐवज, आत्मचरित्रे, आठवणी, प्रवासवृत्तांत, दैनंदिनी, पत्रे, गोपनीय अहवाल, न्यायालयीन निवाडे, भाषणे, वृत्तपत्रे व नियतकालिकातील लेख, बातमीपत्रे, वाचकपत्रव्यवहार, वाङ्मयीन संहितांतील निवडके वेचे, चित्रे, व्यंगचित्रे, छायाचित्रे, अभ्यासग्रंथ, सर्वेक्षण अहवाल, संशोधनप्रबंध इत्यादींच्या माध्यमातून संदर्भ शोधले. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक घटना, दंगली, दुष्काळ, आवर्षण, संप, संस्था-संघटनांचे उदयास्त इत्यादींच्या तपशीलवार व कालक्रमानुसार नोंदी करून विसाव्या शतकातील पन्नास वर्षांतील घटना घडामोडींचा वर्णनात्मक कालपटही करून दिला आहे. त्यांच्या या उपक्रमात डॉ. नीतीन रिंढे यांनीही प्रत्यक्ष लेखनसहकार्य करून साथ दिली, यासाठी मी उभयतांचे आभार मानतो.

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष,
साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# अनुक्रम

## (भाग १)

प्रस्तावना ११

**१. राजकीय स्थित्यंतर**

१.१ पूर्वकथन २१
१.२ नेमस्त आणि जहाल गटांचे राजकारण २५
१.३ ना. गोखले यांची नेमस्त राजनीती ३१
१.४ भारत सेवक समाज : स्थापना व वाटचाल ४३
१.५ टिळकपर्व ५६
१.६ म. गांधींचा राजकारणात प्रवेश ११२
१.७ टिळकपर्वाकडून गांधीपर्वाकडे १२७
१.८ राजकीय प्रवाहांची अंतर्वर्तुळे १३८
१.९ गांधीपर्वातील राजकीय घडामोडी १५२
१.१० जातीय समीकरणांचे राजकारण १६०
१.११ कॉंग्रेस संघटनेतील अंत:प्रवाह १७४
१.१२ दुसरे महायुद्ध आणि भारतीय राजकारण १८४
१.१३ भूमिगत चळवळी १९५
१.१४ स्वातंत्र्यप्राप्ती व फाळणीचे राजकारण २१६
१.१५ गांधीजींची हत्या २२२
१.१६ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र २३३
१.१७ भारतीय राज्यघटना २५५
१.१८ इतिकथन २५८

## २. संस्थानांतील राजकीय घडामोडी


२.१ पूर्वकथन २७५
२.२ राष्ट्रीय सभेची संस्थानांकडे पाहण्याची भूमिका २७६
२.३ दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा २७९
२.४ भोर संस्थानातील राजकीय घडामोडी २८२
२.५ औंध संस्थानातील राजकीय जागरण २८७
२.६ फलटण संस्थानातील राजकीय घडामोडी २९३
२.७ अक्कलकोट संस्थानची निष्कर्मता २९४
२.८ सांगली संस्थानातील राजकीय घडामोडी २९५
२.९ मिरज व मिरजमळा संस्थानातील प्रजापरिषद ३०४
२.१० कोल्हापूर संस्थानातील लोकचळवळी ३०६
२.११ इचलकरंजी संस्थानातली प्रजापरिषद ३१६
२.१२ कुरुंदवाड ३१७
२.१३ जंजिरा संस्थानातील राजकीय घडामोडी ३१९
२.१४ सावंतवाडी संस्थानातील राजकीय घडामोडी ३२१
२.१५ जमखंडी संस्थानातील राजकीय घडामोडी ३२१
२.१६ मुधोळ संस्थानातील राजकीय घडामोडी ३२५
२.१७ संस्थानांचे विलीनीकरण ३२६
२.१८ हैद्राबाद संस्थानातील राजकीय घडामोडी ३२९
२.१९ इतिकथन ३५८


## ३. मराठी पत्रकारिता


३.१ पूर्वकथन ३६३
३.२ पुणे शहरातील पत्रकारिता ३६७
३.३ मुंबई शहरातील पत्रकारिता ३८८
३.४ वऱ्हाड-मध्यप्रांतातील पत्रकारिता ४११
३.५ संस्थानी मुलुखातली नियतकालिके ४१६
३.६ करमणुकप्रधान साप्ताहिके ४२८
३.७ मासिकांची परंपरा ४३८
३.८ इतिकथन ४४०

## ४. आर्थिक स्थित्यंतर


४.१ पूर्वकथन ४४३
४.२ आर्थिक पुनर्घटना : विविध अंत:प्रवाह ४४७
४.३ शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था ४५१
४.४ महायुद्धांचा काळ ५०४
४.५ उद्योगधंदे व व्यापार ५०९
४.६ कामगार संघटनांचा उदय ५२४
४.७ साखर उद्योग ५४४
४.८ उद्योग समूहांची कामगिरी ५४७
४.९ संस्कृती उद्योग ५७२
४.१० मराठी माणसाचे आर्थिक वर्तन ५७७
४.११ स्वातंत्र्योत्तर अर्थकारणाची दिशा ५८३
४.१२ इतिकथन ५८४


## ५. शैक्षणिक स्थित्यंतर


५.१ पूर्वकथन ५९१
५.२ वसाहतवादी शिक्षणनीती ५९५
५.३ राष्ट्रीय शिक्षणाची विचारधारा ६०४
५.४ बालशिक्षणाच्या नव्या वाटा ६३८
५.५ स्त्री शिक्षणाची वाटचाल ६४३
५.६ मराठा शिक्षण परिषदेचे कार्य ६५७
५.७ अल्पसंख्यांकांचे शिक्षण ६५९
५.८ गांधीजींची बुनियादी तालीम ६६५
५.९ उच्च शिक्षणाची वाटचाल ६७५
५.१० आचार्यकुल व संशोधन संस्थांचे योगदान ६८१
५.११ संस्थानांतील शिक्षण ६८५
५.१२ विद्यार्थी व शिक्षकांच्या जीवनातील बदल ६९८
५.१३ इतिकथन ७०६

## (भाग २)

**६. सामाजिक – सांस्कृतिक स्थित्यंतरे**

६.१ पूर्वकथन ७०९
६.२ सामाजिक सुधारणेच्या चळवळी ७११
६.३ लिंगभावात्मक विषमता व स्त्रीसुधारणेच्या चळवळी ७१४
६.४ जातिभेदात्मक विषमता ७६०
६.५ अस्पृश्य समाजाची पुनर्घटना ८१४
६.६ धार्मिक पुनर्घटनेचा विचार ८६१
६.७ आदिवासींची पुनर्घटना ८८०
६.८ सांस्कृतिक जीवन ८९३
६.९ इतिकथन ९११

**७. साहित्य आणि समाज**

७.१ पूर्वकथन ९१९
७.२ टिळकयुगाचा प्रभाव ९२०
७.३ साम्यवादाचा प्रभाव ९२५
७.४ गांधीवादाचा प्रभाव ९३९
७.५ हैद्राबाद संस्थानातले वाङ्मयीन प्रवाह ९५३
७.६ सामाजिक वास्तव : स्त्री-पुरुष संबंधांविषयी बदललेले दृष्टिकोण ९५५
७.७ ग्रामीण वास्तवाचे वाङ्मयीन आकलन ९७२
७.८ वैचारिक साहित्यातील अंत:प्रवाह ९८०
७.९ इतिकथन ९८३

**८. वाङ्मयीन संस्कृतीतील स्थित्यंतरे**

८.१ पूर्वकथन ९८९
८.२ मागील शतकाचा वारसा ९९०
८.३ नव्या वाङ्मयीन संस्कृतीचा उदय ९९४
८.४ परिघावरील / बंडखोर साहित्यप्रवाह १०१२
८.५ वाङ्मयीन संस्कृतीचे घटक १०१९
८.६ इतिकथन १०९१

**९. नाट्यकलेतील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| ९.१ पूर्वकथन | १०९३ |
| ९.२ नाटक मंडळ्यांचे युग १९०१ ते १९३५ | ११०३ |
| ९.३ मराठी नाट्याभिरूची आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद | ११२८ |
| ९.४ १९३० पर्यंतचे महत्त्वाचे नाटककार | ११३२ |
| ९.५ मराठी संगीत रंगभूमीची अखेर | ११४५ |
| ९.६ मराठी रंगभूमीचे नवे रूप : १९३३ ते १९५० | ११५२ |

**१०. संगीतविश्वातील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| १०.१ पूर्वकथन | ११५९ |
| १०.२ महाराष्ट्रावरचे संगीत संस्कार | ११६१ |
| १०.३ महाराष्ट्रातील हिंदुस्थानी संगीताच्या परंपरा | ११७६ |
| १०.४ महाराष्ट्रीय मध्यमवर्गातील संगीतकलेचा प्रसार | ११९० |
| १०.५ इतिकथन | १२०२ |

**११. चित्रकलेतील स्थित्यंतरे**

| | |
|---|---|
| ११.१ पूर्वकथन | १२०५ |
| ११.२ औपचारिक शिक्षणक्रम आणि चित्रकलेतील नवे प्रवाह | १२०६ |
| ११.३ आधुनिकवादी चित्रकला | १२१० |
| ११.४ चित्रकलेचे नवे तंत्रज्ञानाधारित आविष्कार | १२१४ |
| ११.५ छापील चित्रांचे विस्तारते जग | १२२१ |
| ११.६ 'ओलेती' चित्राविषयीचा वाद | १२२६ |

**१२. उपसंहार** १२२९

**परिशिष्टे -**

| | |
|---|---|
| ०१. कालपट | १२३९ |
| ०२. संदर्भ सूची | १२८६ |
| ०३. विषय सूची | १३११ |
| ०४. व्यक्तीनाम सूची | १३४६ |


संपादकीय नोंद –

**प्रस्तुत खंडातील ८, ९, १० व ११ या प्रकरणांचे लेखन डॉ. नीतीन रिंढे यांनी केले आहे.**

# प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांच्या त्रिखंडात्मक इतिहासलेखनाच्या प्रकल्पातील दुसरा खंड प्रसिद्ध करताना आनंद होत आहे. १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक स्थित्यंतरांचा मागोवा पहिल्या खंडात घेण्यात आला आहे. विसाव्या शतकाचा प्रारंभ ही या दुसऱ्या खंडाच्या विवेचनाची पूर्वसीमा असून १९५० ही उत्तरसीमा ठरविण्यात आली आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेचे पहिले पर्व १९०१ साली न्या. रानडे यांच्या मृत्यूबरोबर संपले होते. १९०१ साली मुंबईत पहिली मोटारगाडी धावली, ही एका अर्थाने महाराष्ट्राच्या आर्थिक-सामाजिक दळणवळणाला गती देणारी एक प्रतिकात्मक घटना होती. १९०२ साली ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या कायदेमंडळावरील नेमणुकीबरोबर देशाच्या संसदीय राजकारणात महाराष्ट्राचा प्रवेश होऊन राजकीय क्षेत्रात नवे पर्व सुरू झाले होते. १९०२ साली ओरिसा प्रांताच्या निर्मितीच्या अनुषंगाने भाषिक तत्त्वावर प्रादेशिक एकीकरणाची संकल्पना आकार घेऊ लागली होती. भाषिक तत्त्वावर महाराष्ट्र राज्य स्थापन होण्याच्या भविष्यकालीन घटनेचे हे प्रारंभरूप होते. १९०४ साली भारतीय विद्यापीठ कायदा अस्तित्वात आला ही नव्या शतकातील शैक्षणिक पुनर्घटनेची नांदी होती. याच वर्षी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याचा कायदा झाला. सहकारी तत्त्वावर महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची पुनर्घटना साधण्याचा एक मार्ग यातून पुढे येऊ लागला होता. या आणि यासारख्या इतर घटनांमुळे आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय-आर्थिक-सामाजिक पुनर्घटनेचे नवे वळण सुरू झाले होते. यामुळे १९०१ ही या अभ्यासाची पूर्वसीमा ठरविण्यात आली आहे. विसाव्या शतकातल्या पहिल्या पन्नास वर्षांत भारतीय स्वातंत्र्यलढा तीव्रतर होत जाऊन १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत आपण येऊन पोहचलो. २६ जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात येऊन प्रजासत्ताक भारताच्या नव्या पर्वाचा उदय झाला. त्यामुळे १९५० ही या मागोव्याची उत्तरसीमा ठरविण्यात आली आहे. या पन्नास वर्षांतील आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व

कलाक्षेत्रातील पुनर्घटनेचा मागोवा या खंडात घेण्यात आला आहे.

भारतीय आणि जागतिक पातळीवर चालणारा वसाहतवादाविरूद्धचा राजकीय संघर्ष ही या कालखंडातल्या घडामोडींची एक व्यापक संदर्भचौकट आहे. महाराष्ट्राच्या विचारविश्वावर आणि समाजजीवनावर रशियन क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन क्रांती, चीनची सांस्कृतिक क्रांती, पहिले आणि दुसरे महायुद्ध इत्यादी आंतरराष्ट्रीय घटितांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव राहिला आहे; त्यामुळे त्याही संदर्भचौकटीतून महाराष्ट्रातल्या घडामोडींचे आकलन करण्याचा प्रयत्न या लेखनात अभिप्रेत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय विचारविश्वात या काळात पुढे आलेल्या मार्क्सवाद, समाजवाद, अराज्यवाद, फॅसिझम, हिंदुत्ववाद इत्यादी विचारप्रवाहांची संदर्भचौकटही लक्षात घेतली आहे. गांधीवादी तत्त्वज्ञानाचा उदय ही तर या कालखंडाची महत्त्वाची देणगी. त्यामुळे या नव्या विचारदर्शनाची बैठकही लक्षात घेतली आहे. वसाहतवादी सत्ताकारण, पक्षीय राजकारणातल्या अंतर्गत झुंझी, सामाजिक संघटना आणि चळवळींचे गतिशास्त्र, धार्मिक-सांस्कृतिक संप्रदायांचे संघटन, वाङ्मय व ललितकलांचे प्रेरणास्त्रोत आणि अभिरुचिसंक्रमणातील बदलत्या प्रवाहांचाही मागोवा घेण्यात आला आहे. त्यामुळे स्वाभाविकच या लेखनात साम्राज्यवाद, वसाहतवाद, लोकशाही, समाजवाद, भांडवलशाही, नोकरशाही, सत्ता, स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, क्रांती, धुरिणत्व, अहिंसा, सत्याग्रह, असहकार, धर्म, जात, गावगाडा, संस्कृती, सुधारणा,परंपरा, आधुनिकता इत्यादी संज्ञा-संकल्पनांचा (Key concepts) वारंवार प्रयोग करावा लागला आहे. जरूर तेथे या संज्ञा-संकल्पना स्पष्ट करून विवेचन केले आहे.

विसावे शतक हे महाराष्ट्राच्या पुनर्घटनेचे प्रारूप (alternative order) शोधणारे शतक आहे. या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षात नवभारतनिर्माणाच्या आंदोलनात महाराष्ट्रातल्या अभिजन आणि बहुजन वर्गातील बुद्धिवंतांची आणि समाजधुरिणांची फार मोठी गुंतवणूक आहे. देशकारण आणि समाजकारण यात मराठी माणसाची सामिलकी वाढविण्यासाठी वैचारिक मशागत व संघटनात्मक बांधणी करणारा हा कालखंड आहे. नवे मूल्यादर्श प्रस्थापित करण्यासाठी भूतकालीन सांस्कृतिक धारणांची कठोर चिकित्सा आणि त्याचवेळी आधुनिक ज्ञानविज्ञानातील नव्या संकल्पनाव्यूहांचे स्वागत करणारा हा कालखंड आहे. नव्या पर्यायी रचनांची मांडणी करण्यासाठी वैचारिक महामंथनाबरोबरच निरनिराळ्या पातळ्यांवर पुनर्घटनेचे रचनात्मक प्रयोग करणारा हा कालखंड आहे. ब्रिटिश वसाहतवादाविरुद्धचा स्वातंत्र्यलढा, संस्थानांतर्गत नागरी हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या प्रजापरिषदा, अर्थोत्पादनातली स्वायत्तता मिळविण्यासाठी खादी-ग्रामोद्योगाची चळवळ, जातीयतेचे जरठ कवच भेदण्यासाठी अस्पृश्यतानिर्मूलनाचे सामाजिक लढे, सामाजिक श्रेणी उंचावण्यासाठी बहुजनांचा शिक्षणविस्ताराचा कार्यक्रम, देशाभिमान बाळगणारी नवी पिढी घडविण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ, स्त्रियांच्या सबलीकरणासाठी स्थापन

झालेल्या शिक्षणसंस्था आणि महिला मंडळे, कामगारवर्ग आणि सामाजिक वंचितांच्या हक्कप्रस्थापनांच्या चळवळी, नवभारत निर्माणासाठी वैचारिक अधिष्ठानाची प्रारूपे शोधणारे तत्त्वचिंतन अशा अनेक पातळ्यांवर सामजिक पुनर्घटनेचे प्रयोग या कालखंडात सुरु होते. सामाजिक अभिरुचीचे भरण-पोषण करण्यासाठी, नवमूल्यप्रस्थापनेसाठी, चारित्र्यसंपन्न व्यक्तिनिर्माणासाठी, सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी साहित्य आणि इतर ललितकलांच्या क्षेत्रांतही बरेच प्रयोग झाले आहेत. एकंदर जीवनाच्या सर्वच क्षेत्रात चैतन्याचे स्त्रोत पेरणारा हा उद्यमशील कालखंड आहे. या सामाजिक पुनर्घटनेला दिशा देणाऱ्या कर्मवीरांच्या योगदानाची यथायोग्य नोंद करण्याचा प्रयत्न या लेखनात कसोशीने करण्यात आला आहे. तसेच या सर्व घडामोडींचा मराठी माणसाच्या जीवनशैलीवर, समाजधारणांवर, अभिरुची व सौंदर्यकल्पनांवर काय परिणाम झाला याचाही तपास करण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण पुनर्घटनेच्या प्रक्रियेचे स्थूलमानाने चार गटात वर्गीकरण करता येते :

१. भौतिक सुधारणांचा मार्ग (Materialistic approach) : देशोन्नतीसाठी भौतिक साधनस्त्रोतांचा विकास, आर्थिक स्वावलंबन, अर्थोत्पादनाच्या खुल्या संधी, उत्पादनवाढीसाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर आणि उत्पादक कौशल्यांचा विकास, उद्यमशीलता आणि स्पर्धात्मकतेला पोषक राजकीय अर्थनीती व विपणनव्यवहारांचे जाळे ही या आर्थिक पुनर्घटनेची पायाभूत आधारसूत्रे असतात. या आधारसूत्रांना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राच्या आर्थिक व भौतिक पुनर्घटनेचा प्रवास कसा होत गेला याचा मागोवा येथे घ्यावयाचा आहे.

२. क्रांतिकारकांचा रहस्यमय व्यूहरचनांचा मार्ग (Cabalist/ Conspiracy approach) : नंदनवनी समाजनिर्माणासाठी राजकीय दास्यमुक्ती ही पायाभूत अट मानणारा हा गट असतो. राष्ट्रीय अस्मितेचे तत्त्वज्ञान रचणे, क्रांतिकारकांच्या संघटना बांधणे, सांप्रदायिक चळवळींच्या माध्यमातून छुपे राजकारण करणे, ध्येयपूर्तीसाठी डावपेचात्मक व्यूहरचना आखणे, शह-प्रतिशहासाठी कटकारस्थाने, मोहजाल यांचा क्रियाशील वापर करणे हे या प्रकल्पाचे स्वरूप असते. या गटात क्रियाशील असणाऱ्या संस्था व व्यक्तींचे हेतू चांगले असतात; पण त्यांच्या गूढरम्य कार्यपद्धतीमुळे त्यांच्याकडे संशयी किंवा वाईट नजरेने पाहिले जाते. कधी कधी या संस्था-संघटनांची ध्येये आणि त्यासाठी निवडलेले मार्ग यात मुळातच अंतर्गत विसंगती असते आणि त्यामुळे त्यांच्या ध्येयवादाविषयी विपर्यासही निर्माण होतो. भूमिगत चळवळी करणाऱ्या क्रांतिकारकांच्या सत्तांतराच्या व्यूहरचनेतली प्रस्तुतता वा अप्रस्तुतता समजावून घेणे हेही इथे अभिप्रेत आहे.

३. सनदशीर राजकारणाचा मार्ग (Composite approach) : राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाच्या मूल्यांची कदर करणारी जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात असणे ही पूर्वअट मानणारा एक गट असतो. देशाच्या पुनर्घटनेसाठी संसदीय राजकारणाचा व राजकीय-सामाजिक संस्था-संघटनांचा क्रियाशील वापर करण्याकडे या प्रकल्पातील धुरिणांचा प्रयत्न असतो. राज्यकर्ते आणि प्रजाजन, अभिजन आणि बहुजन, भौतिकता आणि आध्यात्मिकता यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी लागणारी संतुलित जीवनदृष्टी हे ह्या गटातील कार्यकर्त्यांचे बलस्थान असते. देशी अस्मिता आणि वसाहतवादी नमुनादर्शातील संघर्ष येथे अटळ असतो. या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक जीवनात जहाल आणि मवाळांचा वैचारिक व संघटनात्मक संघर्ष सातत्याने सुरू होता आणि त्यातूनच मराठी माणसाचा राजकीय स्वभाव घडत गेला आहे. ह्या राजकीय-सामाजिक घडणीचे विविध पैलू शोधण्याचा प्रयत्न या अभ्यासात करण्यात आला आहे.

४. समाजमानस घडविणारी उत्प्रेरकाची भूमिका (Catalytic agent) : निरनिराळ्या धर्म-जाती-लिंगभेदात्मक लोकसमूहाच्या मनोधारणांमध्ये पायाभूत बदल घडवून आणण्यासाठी उत्प्रेरक मध्यस्थाची भूमिका निभावणाऱ्यांचा एक गट असतो. या गटात वृत्तपत्रे, नियतकालिके, नाटकमंडळ्या, कलापथके, शैक्षणिक व सामाजिक संस्था, विशिष्ट परिक्षेत्रात काम करणारी मंडळे, परिषदा, साहित्य व ललितकला या माध्यमांचा समावेश होते.मराठी माणसाची अभिरुची, मूल्यधारणा आणि जीवनादर्शांचा आलेख पुढे यावा यादृष्टीने कला-संस्कृतीच्या क्षेत्रातील पुनर्घटनेचा मागोवा घेण्यात आला आहे.

पूर्वापार व्यवस्थांना भक्कम पर्याय देण्याच्या इच्छाशक्तीतून हे विविध गट कार्य करीत असल्याने त्यांची स्वत:ची वैचारिक निष्ठा या कार्यक्रमांमध्ये गुंतलेली असते. या निष्ठावान कर्मवीरांच्या वैचारिक मुशींचा आणि कृतिकार्यक्रमांचा मागोवा येथे घ्यावयाचा आहे. आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या प्रवासात निर्माण होणारे पेचप्रसंग, कराव्या लागणाऱ्या तडजोडी, नव्या पर्यायांचा शोध, सहप्रवासातल्या भागीदारांबरोबर होणारे मतभेद, फाटाफुटी या सर्वांचा माग काढीत हा तपास करावयाचा आहे. यशापयशाची समीक्षा करण्यापेक्षा या परिवर्तनाच्या लढाईचा वास्तववादी वृत्तांत आरेखित करण्यावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या भौगोलिक, प्रादेशिक व सामाजिक पार्श्वभूमीचा तपशील व इतिहासलेखनासाठी स्वीकारलेल्या पद्धतिशास्त्राची चर्चा पहिल्या खंडात करण्यात आली आहे; त्यामुळे येथे त्याची पुनरावृत्ती केलेली नाही.

प्रस्तुत इतिहासलेखनाची प्रकरणनिहाय विभागणी करताना पहिल्या प्रकरणात राजकीय स्थित्यंतरांचा मागोवा घेण्यात आला आहे. वसाहतवादी सत्तेची राजनीती, भारताच्या बृहत्चौकटीत महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची संघटनाबांधणी, भारतीय

स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्रीयनांचा सहभाग, सत्ताकारणातले डावपेच, राजकीय चळवळीची माध्यमे, राजकीय विचारधारांचे उदयास्त यांचा तपास या प्रकरणात करण्यात आला आहे. धर्मकेंद्री व जातिकेंद्री अस्मितेचे राजकारण, हिंदू-मुस्लीमांतील सामंजस्य व दुहीचे राजकीय पैलू, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची राजकीय-सामाजिक परिमाणे लक्षात घेऊन राजकीय तथ्यांचे अन्वेषण करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय विचारप्रवाहांचा व घटना-घडामोडींचा महाराष्ट्रातील अभिजनांवर पडलेला बौद्धिक प्रभाव व त्यातून पुढे आलेल्या राजकीय- सामाजिक पुनर्घटनेच्या प्रयत्नांचा मागोवा घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात लोकशाहीचे घटनाशास्त्र विकसित होण्याचा व लोकशाहीचे व्याकरण समाजाच्या पचनी पडण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करण्याचा हा कालखंड होता. ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीपूर्वी महाराष्ट्रात गावपातळीवरची स्वायत्त अशी प्रशासकीय व्यवस्था अस्तित्वात होती. पाश्चिमात्य संस्कृतीतील 'राष्ट्र-राज्या'च्या संकल्पनात्मक चौकटीतून, विधिमंडळात कायदे व नियमांची संहिता पारित करून राज्यव्यवहार करण्याचे राजकीय पद्धतिशास्त्र आपल्याला अनोखे होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेने हे पद्धतिशास्त्र एतद्देशीय पुढाऱ्यांमध्ये रूजवले होते. काँग्रेसने जबाबदार राज्यपद्धतीची घटना तयार करण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांवर लोकसंघटनेचा दाब वाढवित नेला होता. तसेच या राजकीय चळवळीतून संस्कारित झालेले लोक स्वकल्याणाचा विचार वंश-कुल-जाती-धर्माच्या परिघाबाहेर जाऊन, जातिनिरपेक्ष वर्गीय हितसंबंधाच्या परिभाषेत करू लागले होते. गावगाड्याच्या व जातिसंस्थेच्या लघुवर्तुळातून 'राष्ट्रीय समाजा'च्या बृहत वर्तुळात पुनर्घटना होण्याची प्रक्रिया विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उत्क्रांत होत गेली. स्वातंत्र्य, समता, राष्ट्रीय अस्मिता, हक्क आणि विशेषाधिकारांची नवी परिभाषा या काळात अंगवळणी पडू लागली. या समग्र बदलाच्या खुणांचा माग काढीत विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय पुनर्घटनेचा वृत्तांत या प्रकरणातून कथन करण्यात आला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी ब्रिटिश मुलुखातील महाराष्ट्र आणि विविध संस्थानांतील मराठी मुलुखातील राजकीय घडामोडींचा तपास स्वतंत्र प्रकरणातून करण्यात आला आहे.

आर्थिक स्थित्यंतरांच्या प्रकरणात औद्योगिक समाजातले अर्थकारण, अर्थोत्पादनाची साधने व तंत्रे यातून उत्पादनपद्धतीत झालेले बदल, अर्थव्यवस्थेतली स्पर्धा, आर्थिक सत्ताकारण व व्यापारवादाचे बदलत जाणारे स्वरूपविशेष; कामगारसंघटनांची तात्त्विक पार्श्वभूमी व कामगारलढ्यांतील ताणेबाणे यांचा तपास करण्यात आला आहे. या काळात महाराष्ट्रात शेती व औद्योगिक क्षेत्रांत उत्पन्नाची पातळी वाढविण्यासाठी प्रयोग झाले व त्याअनुषंगाने नवे कायदे तयार करण्यात आले. यांत्रिक अवजारे, दळणवळणाची आधुनिक साधने व व्यापार-व्यवस्थापनशास्त्राचे क्षितिज विस्तारले; यामुळे कृषी व औद्योगिक

उत्पादनसंबंधांच्या नव्या रचना उदयाला आल्या. मात्र कच्च्या मालाची बाजारपेठ म्हणून भारतीय उत्पादनव्यवस्थेकडे पाहाण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणामुळे शेतीच्या औद्योगिक पुनर्घटनेचा विस्तार मर्यादित राहिला. ही मर्यादा लक्षात घेऊन कृषी क्षेत्रातील बदलांचा मागोवा या प्रकरणात घेण्यात आला आहे. शेतीखेरीज महाराष्ट्रातल्या उद्योगक्षेत्राला गती देणाऱ्या उद्योगसमूहांच्या योगदानाचाही तपशील नोंदवला आहे.

राजकीय-आर्थिक सत्ताकारणाच्या घडामोडींबरोबरच सामाजिक शांतता, सुरक्षा व सौख्याची शाश्वती देण्याची व्यवस्था निर्माण करणाऱ्या संस्था-संघटनांचा मागोवा सामाजिक स्थित्यंतरांच्या प्रकरणात घेण्यात आला आहे. समाजात अस्तित्वात असलेल्या नानाविध जातिसमूहाच्या जीवनशैलींच्या आकृतिबंधांचे बृहत वर्तूळ म्हणजे संस्कृती, अशी व्यापक व्याख्या गृहीत धरून महाराष्ट्रातल्या विविध जाती-धर्माच्या, ग्रामीण-नागर समूहगटांच्या जीवनसरणीतील बदलांच्या खुणा वाचण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात आला आहे. सामाजिक आचारधर्माला विधायक वळण लावण्यासाठी धर्मसुधारक काही नवी मूल्ये समाजमनात बिंबवू पहात होते, काही नवी कर्मकांडेही प्रस्थापित करू पहात होते; महाराष्ट्राच्या समाजजीवनात या धार्मिक पुनर्घटनेचे कोणकोणते प्रयोग झाले याचा तपास येथे करण्यात आला आहे. एकीकडे सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रेरणेतून वा परंपराभिमानातून येणारा धार्मिक मूलतत्त्ववाद आणि दुसरीकडे विज्ञान व पाश्चिमात्य बुद्धिवादाच्या संस्कारातून आलेला विवेकवाद या दोन्ही प्रवृत्तींचा महाराष्ट्राच्या धार्मिक पुनर्घटनेवर कोणता परिणाम झाला याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात आला आहे.

नवसमाज निर्माणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचा वाटा सर्वात मोठा असतो; म्हणून बालशिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत झालेली परिवर्तने, प्रयोग, शासकीय धोरणांचा व स्वयंसेवी संस्थांच्या योगदानाचा तपास 'शैक्षणिक परिवर्तने' या प्रकरणातून करण्यात आला आहे. विशेषत: शिक्षणातून संपादित केलेल्या गुणात्मकतेने व आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमांतून स्त्रियांनी आणि अस्पृश्यांनी समाजातील आपले निम्नस्तरीय स्थान बदलण्याचे जे प्रयत्न या कालखंडात केले, त्यांचा सविस्तर तपास येथे करण्यात आला आहे. सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणासाठी लोकनेत्यांनी कायदेमंडळात संघर्ष केला, ठिकठिकाणी शिक्षण परिषदा घेऊन जनजागृती केली आणि लोकसहभागातून गावपातळीपर्यंत शैक्षणिक संस्थांचे नवे आंतरजाल निर्माण केले, या सर्व प्रयत्नांचा मागोवा या प्रकरणातून घेण्यात आला आहे. राष्ट्रीय शिक्षण आणि पाश्चिमात्य शिक्षण या दोन्ही अंगांनी शिक्षणाचे क्षितिज कसे विस्तारत गेले याचाही तपास करण्यात आला आहे. जातीयता व विवाहादी कर्मकांडातील अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी झालेल्या संघटनात्मक प्रयत्नांचा मागोवा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांचा राजकीय सत्ताकारणात आणि समाजधारणा घडविण्यात महत्त्वाचा वाटा असतो हे लक्षात घेऊन एका स्वतंत्र प्रकरणात महाराष्ट्रातील नियतकालिकांच्या कार्याचा परामर्ष घेण्यात आला आहे. वास्तविक वृत्तपत्रांनी लोकशिक्षणाबरोबरच भाषेचे, शैलीचे, युक्तिवादाचे, खंडनमंडनाचे नाना प्रयोग करून सामाजिक अभिरुची घडविण्यात मोठे योगदान दिलेले असल्याने त्यांच्या कार्याचा स्वतंत्र इतिहासच लिहायला हवा; पण स्वीकृत अवकाशाच्या मर्यादेत या क्षेत्रातील योगदानाचे जास्तीत जास्त पैलू प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

या कालखंडात कला आणि साहित्याच्या क्षेत्रांत राजकीय-सामाजिक बांधिलकीची नवी प्रतिमाने घडविली जात होती. त्यामुळे नाटक, सिनेमा, साहित्य व इतर ललितकांतील विविध प्रवृत्ती-प्रवाहांचा व अभिरुचीतील स्थित्यंतरांचा मागोवा स्वतंत्र प्रकरणातून घेण्यात आला आहे. धर्मग्रंथ, पुराणकथा, तत्त्वज्ञान, साहित्य व कलांनी शोधलेल्या नवा वाटा, भिन्न संस्कृतीच्या संपर्कातून होणारे ऋणग्रहण; नवसांस्कृतिक धारणा, साहित्य व कलांचे नवे घाट आणि त्यातून संस्कारित झालेली महाराष्ट्राच्या अभिरुचीची वाक्वळणे यांचाही मागोवा या खंडात घेण्यात आला आहे. सामाजिक न्याय, मनोरंजन व प्रबोधनाच्या विविध आकृतिबंधातून कलावंत व साहित्यिकांनी केलेल्या सर्जनशील कृतींचा, व अभिरुची संस्कारित करणाऱ्या चळवळींचा धांडोळा घेण्यात आला आहे. लेखक-कलावंतांच्या सहयोगी मंडळांनी घडविलेल्या नव्या वाङ्मयीन संस्कृतीचा अवकाश कसा आकार घेत होता याचाही तपास करण्यात आला आहे.

आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कला-साहित्य व संस्कृती या विविध क्षेत्रातील वाटचालीतली सत्त्वस्थाने शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखनात अभिप्रेत आहे. महाराष्ट्राच्या समाजजीवनात दृश्य स्वरूपात जे गुणात्मक परिवर्तन घडून आले आहे, त्या बदलांच्या प्रक्रियेचे स्वरूप व त्यामागील मानसिक धारणांचा माग काढण्यासाठी ह्या बदलांच्या मागे दडलेल्या अदृश्य खुणा काळजीपूर्वक वाचण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. मराठी माणसाने जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या संस्था-संघटना, आपल्या पारंपरिक चालीरीतीत, शिष्टाचारात केलेल्या गुणात्मक सुधारणा, अर्थोत्पादनात व व्यापार-उदिमांत केलेली प्रगती, स्वतंत्र भारताच्या नवनिर्माणाची पूर्वतयारी म्हणून लोकशाही मूल्यांची पायाभरणी व राष्ट्रीय समाजनिर्माणासाठी केलेली जनजागृती; जातिसंस्था, गावगाडा, औद्योगिक जगतातील मालक-मजूर संबंध यांच्यातील परिवर्तनाच्या चळवळी यांचा मागोवा येथे घेण्यात आला आहे. काळाच्या ओघात कोणत्या गोष्टी टिकून राहिल्या, कोणत्या विस्मृतीत गेल्या, कोणत्या परिवर्तीत होऊन संक्रमित झाल्या, कोणत्या नव्याने सामील झाल्या या बदलांचा एक नकाशा पुढे यावा या दृष्टिकोनातून प्रस्तुत लेखन करण्यात आले आहे.

वसाहतवादविरोधी लढ्यातून आजच्या तिसऱ्या जगाचा उदय झाला आहे. घटनात्मक लोकशाही राजवटीत स्वातंत्र्याचे नवे क्षितिज उदयाला आल्यामुळे गावकुसाबाहेरचे अस्पृश्य लोक, गिरणी कामगार, वेठबिगार, माजघरात पडद्याआडचे जीवन जगणाऱ्या स्त्रिया, सावकाराच्या आणि खोतांच्या दावणीला बांधलेली कुळे, अल्पभूधारक, आपल्या विकासाचे स्वप्न उंबरठ्यापर्यंत येऊन पोहचल्याचे समाधान अनुभवू लागले, ही या कालखंडाची मोठी सामाजिक फलश्रुती म्हणायला हवी. सामाजिक संरचनेत परंपरेने वाट्याला आलेल्या दुय्यम भूमिकेचा अनुभव शब्दबद्ध करणे (Subaltern experience), आपल्या बोलीला प्रतिष्ठा देणे; आपले वीरनायक निर्माण करणे, नवी मिथकसृष्टी निर्माण करणे, नवी मूल्ये, नवे संकेतव्यूह निर्माण करून प्रतिधुरिणत्व निर्माण करणे हे आव्हान सर्जनशील कलावंतांसमोर उभे करणारा टप्पा या कालखंडाने साधला आहे. या पुनर्घटनेनंतर नव्याने स्वतंत्र होणाऱ्या अनुभवक्षेत्रांना ऊर्जा पुरविण्याचे, त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याची जबाबदारी व जोखीमही नव्या पिढीला अंगावर घ्यावी लागणार आहे, याची प्रकर्षाने जाणीव करून देणारा हा इतिहास आहे!

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाचा हा पहिलाच प्रयत्न नाही; यापूर्वी अनेक इतिहासलेखकांनी महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाचे निरनिराळे मानदंड प्रस्थापित केले आहेत. या सर्व इतिहासलेखकांनी आधीच प्रशस्त केलेल्या वाटेमुळे प्रस्तुत इतिहासलेखनाचा प्रवास अधिक सुखकर झाला आहे. आधीच्या इतिहासलेखकांनी परिश्रमपूर्वक जमविलेल्या तपशीलांचा व त्यांनी लावलेल्या अन्वयार्थांचा प्रस्तुत इतिहासलेखनात आवश्यक त्या सर्व ठिकाणी आधार घेतला आहे; त्याविषयीची अपार कृतज्ञता प्रथम नोंदविली पाहिजे. या इतिहासलेखनात विविध वृत्तपत्रे व नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली वार्तापत्रे, स्तंभलेख, अग्रलेख, निबंध, शासकीय अध्यादेश, कायदे, न्यायालयीन खटले, साक्षी, परिषदा व संमेलनांचे वृत्तांत यातून समकालीन वास्तवाचे तपशील व सामाजिक प्रतिसादांच्या चिन्हखुणांचे वाचन करण्यात आले आहे. समकालीन घटनांचे सर्वच वृत्तांत एकसारखे नसतात, कधी ते पुरेसे सविस्तर असतात, कधी उडत्या नोंदींसारखे वरवरची दखल घेणारे असतात, कधी लक्ष्यगटातील वाचकांना चेतवणारे वा बिथरवणारे असतात, कधी मल्लीनाथी टीका करणारे असतात. त्यामुळे अशा साधनांतील आशयघनता आणि सादरीकरणाची संदर्भचौकट लक्षात घेऊन या दस्तांचा प्रस्तुत इतिहासलेखनात यथायोग्य वापर करण्याची दक्षता घेतली आहे. ग्रंथालये आणि दप्तरखान्यातील दस्तांखेरीज सांस्कृतिक इतिहासलेखनाची गरज म्हणून चरित्र-आत्मचरित्रे, आठवणी, रोजनिशा, पत्रसंग्रह या सामाजिक स्मृतिकोशांत साठवलेले 'मानसघटनाशास्त्रीय वृत्तांत'ही लक्षात घेतले आहेत. अशा प्रकारचे अनौपचारिक अनुभवकथन करणारे लोक केवळ समकालीन घडामोडींचे तटस्थ साक्षीदार नसतात, तर

कुटुंबात, व्यवसायात, संस्था-संघटनात, सार्वजनिक विधी-उत्सवात, पर्यटन-तीर्थाटनात, नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीच्या काळात घडणाऱ्या घटनांचे आणि मानवी आंतरक्रियांचे ते साक्षीभोक्ते (participant observers) असतात. अशा अनुभवकथनांतून सामूहिक नेणिवेतील समकालीन वास्तवाचे ठसे वाचता येतात. व्यक्तीला घरापासून कार्यक्षेत्राकडे नेणारा, 'खाजगी' जगातून 'नागरी' जगात आणणारा, लिंगभावाकडून वर्गजाणीवांकडे नेणारा प्रवास अशा संहितांमध्ये शब्दबद्ध झालेला असतो. ह्या व्यक्तिकेंद्री अनुभवांना समकालीन वास्तवाची गर्भित संदर्भचौकट असते. अर्थात आत्मनिवेदनात्मक साहित्यातून प्रक्षेपित होणाऱ्या वास्तवांतील तथ्ये वाचताना वर्ण, जाती, वंश, लिंग यांच्याशी संबंधित अनुभवातली व्यक्तिसंबद्धता टाळून प्रातिनिधिकता तेवढी विचारात घेतली आहे. नाटक, सिनेमा, कला आणि ललित साहित्यातूनही समकालीन वास्तवाची व्यंजना प्रक्षेपित झालेली असते. मात्र संहिताबद्ध होणाऱ्या ललित घटनेवर लेखकाचा संवेदनस्वभाव, निर्मितिप्रेरणा, राजकीय सामाजिक बांधिलकी आणि शैलीवैशिष्ट्यांचा संस्कार असतो. बौद्धिक आणि सांस्कृतिक संदर्भचौकटीतून आविष्कृत झालेला भूतकाळ म्हणून या लेखनप्रकारांना ऐतिहासिक मूल्य असते. ही जाणीव ठेवून ऐतिहासिकच नव्हे तर सांस्कृतिक घटित म्हणून या संहितांचे वाचन करण्याची भूमिका या लेखनात अभिप्रेत आहे.

प्रस्तुत खंडात चित्रपटसृष्टीचा इतिहास हे प्रकरण अंतर्भूत केलेले नाही. मराठी चित्रपटसृष्टीचा उदय या कालखंडाच्या अखेरच्या दशकात जरी झालेला असला तरी मराठी चित्रपटांचा खरा उत्कर्ष १९५० नंतरच पहायला मिळतो. त्यामुळे पुढील तिसऱ्या खंडात मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र आढावा घेण्यात येणार आहे.

विवेचनाच्या सोयीसाठी सर्वत्र सारखेपणा रहावा म्हणून प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी 'पूर्वकथना'त विषयाची पार्श्वभूमी, तपासाची दिशा व साधने विशद करून नंतर कालक्रमानुसारी व आशयानुसारी पोटघटकात वर्गीकरण करून पुढील विवेचन करण्याची पद्धत स्वीकारली आहे. प्रकरणाच्या शेवटी 'इतिकथना'त त्या त्या प्रकरणातल्या निष्कर्षांची साररूप मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथाच्या शेवटी समग्र आढाव्यातून हाती लागलेले सार मांडण्यात आले आहे. संस्था-संघटनांच्या व नेतृत्वाच्या उदयास्तांचे कालक्रमिक पंचांग समोर असावे यासाठी ग्रंथाच्या शेवटी १९०१ ते १९५० या कालखंडातील विविध घटना-घडामोडींचा वर्णनात्मक कालपट देण्यात आला आहे. काळाच्या प्रवाहात घटना कसकशा घडत गेल्या, कालप्रवाहाला वेगळे वळण देणाऱ्या घटनांचे टप्पे नेमके कुठे पडतात याचे सम्यक चित्र डोळ्यांसमोर येण्यासाठी ह्या कालपटाचा उपयोग होईल अशी आशा आहे. प्रत्यक्ष लेखनात विषयानुसार वर्गीकरण व मुद्द्यांनुसार शीर्षके-उपशीर्षके देऊन लेखन केलेले असले तरी त्वरित संदर्भशोधनाची गरज लक्षात

घेऊन ग्रंथाच्या शेवटी विषय व व्यक्तिनामसूचीही देण्यात आली आहे. या मांडणीमुळे ग्रंथ हाताळण्यात सुलभता येईल अशी अपेक्षा आहे. कोणताही इतिहास हा परिपूर्ण असत नाही, निरंतर परिष्करणे करीत राहून त्याची विश्वसनीयता व उपयोजनमूल्य वाढवावे लागत असते. इतिहासलेखनाची तंत्रे आणि शास्त्र दिवसेंदिवस प्रगल्भ होत चालले आहे, त्यामुळे प्रस्तूत इतिहासलेखनाला येणाऱ्या मर्यादांची पूर्ण जाणीव ठेवूनच हा प्रकल्प वाचकांच्या हाती सुपूर्त करीत आहोत.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्रातील विविध ग्रंथालयांची व व्यक्तिगत ग्रंथसंग्रहांची उपलब्धी झाली म्हणूनच प्रस्तुत लेखनप्रपंच पूर्ण होऊ शकला. अशा ग्रंथालयांमध्ये कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथालय व ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, कोल्हापूरचे करवीर नगर वाचनालय व ग्रंथपाल सौ. मनिषा शेणई, औंध संस्थानातला पुरातत्त्व विभाग; सांगलीचे जिल्हा वाचनालय व ग्रंथपाल सतीश सूर्यवंशी व सुरेखा नाईक, मिरजेचे ग. ह. खरे वाचनालय व ग्रंथालयाचे चालक श्रीकांत येडूरकर, व ग्रंथपाल महमद शरीफ पाशा पटेल, कै. वसंतराव आगाशे यांचा ग्रंथसंग्रह व त्यांच्या पत्नी उषा आगाशे, सावंतवाडीचे श्रीराम वाचनालय, मळगावचे उदय खानोलकर ग्रंथालय व ग्रंथालयाचे चालक महेश खानोलकर, कणकवलीचे नगरवाचनालय, वाचनालयाचे अध्यक्ष धाकू पुतळाजी तानवडे व ग्रंथपाल सौ. जान्हवी पराग जोशी, कुडाळचे रा. ब. अनंत शिवाजी देसाई जिल्हा ग्रंथालय व ग्रंथपाल राजन महादेव पांचाळ, अरोंदाचे म. गांधी वाचनमंदिर व ग्रंथपाल अनिल मधुकर पंडित, नागपूरचे पंजाबराव देशमुख महाविद्यालयाचे ग्रंथालय; सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाचे सेवानिवृत्त ग्रंथपाल यशवंत रास्ते, तसेच आपापल्या परीने दुर्मिळ संदर्भग्रंथ शोधून उपलब्ध करून देणारे अविनाश सप्रे, मिरजेचे प्रा. शशिकांत हुक्केरी, सावंतवाडीचे डॉ. जी. ए. बुवा, कोल्हापूरचे डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, देवळ्याचे डॉ. एकनाथ पगार, मुंबई मराठी संशोधन मंडळाचे संचालक डॉ. प्रदीप कर्णिक, नागपूरचे प्राचार्य वसंत उकिनकर, पुण्याचे शिवराम चव्हाण, डॉ. शोभा कारेकर, भालचंद्र जोशी, उदगीरचे डॉ. गंगाधर नामगवळी, सहलेखक डॉ. नीतीन रिंढे इत्यादी सुहृदांची मदत झाली. संदर्भशोधनाच्या प्रवासात निरंतर सोबत करणाऱ्या मंगला वरखेडे, ग्रंथाची मुद्रणप्रत सिद्ध करण्यात हर्षल वरखेडे आणि प्रकल्प मार्गी लावण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष बाबा भांड, सदानंद मोरे, सचिव मनीषा पाटील, प्रपाठक श्री. रोकडे व सुबक ग्रंथछपाई करणारे शासकीय मुद्रणालयाचे अधिकारी या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**- रमेश नारायण वरखेडे**

२४, चेरी हिल, पाइपलाइन रोड, आनंदवल्ली, नाशिक, ४२२०१३

दूरध्वनी : ९०४९४०९३१५, e-mail : warkhederamesh@gmail.com

# १

# राजकीय स्थित्यंतर

## १.१. पूर्वकथन :

यापूर्वीच्या पहिल्या खंडात १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडींचा आपण विस्ताराने परामर्श घेतला आहे; प्रस्तुत दुसऱ्या खंडात १९०१ ते १९५० या पन्नास वर्षांतील महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडींचा तपास करावयाचा आहे. यापूर्वीचे तपासाचे सूत्र कायम ठेवण्यासाठी १९ व्या शतकातील राजकीय घडामोडींची साररूप पार्श्वभूमी नोंदवून नंतर कालक्रमाने पुढील घटना-घडामोडींचा माग काढीत आशयसूत्रानुसार आढावा घेण्याची पद्धती स्वीकारण्यात आली आहे. १९ वे शतक हे मराठेशाहीचा अस्त आणि इंग्रजी वसाहतवादी राजवटीच्या पायाभरणीचे शतक होते. १८१८ साली मराठ्यांचा पाडाव झाल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता आली. कंपनी सरकार अस्तित्वात येण्यापूर्वी हिंदुस्थानात राजेशाही व सरंजामशाहीच्या सत्ताकारणाची राजकीय प्रणाली अस्तित्वात होती. कंपनी सरकारला औद्योगिकीकरणातून उत्क्रांत झालेल्या युरोपियन व्यवस्थापनशास्त्राची पार्श्वभूमी होती. त्यामुळे मुलकी व लष्करी प्रशासनाची सांगड घालून हिंदुस्थानात एक वेगळी प्रशासकीय चौकट निर्माण करण्याचे प्रारंभिक काम कंपनी सरकारने केले; राज्यप्रशासनाच्या दृष्टीने हे एक मोठे स्थित्यंतर घडून आले. पारंपरिक राजेशाही व्यक्तिकेंद्री सत्ताकारणाचा अस्त झाला आणि आधुनिक इंग्रजी व्यवस्थापकीय कार्यसंस्कृतीचा नवा आकृतिबंध उदयाला आला. आपले व्यापारी हित साधण्यासाठी कंपनी सरकारने भारतीय संपत्तिस्रोतांचा तपास करणारे भौगोलिक सर्वेक्षण केले. दूरवरच्या प्रदेशातून व्यापारी मालाचे संकलन करण्यासाठी रेल्वे, सडका इत्यादी दळणवळणाची साधने विकसित केली. प्रशासनाची सर्वदूर पकड बसविण्यासाठी तारायंत्रे व टपालाची व्यवस्था उभी केली. कंपनी सरकारच्या या व्यापारी राजवटीला १८५७ च्या उठावाने मोठा धक्का दिला. कंपनी

राजवट संपुष्टात आली, मात्र वसाहतवादी राजनीतीचा अस्त झाला नाही. १८५८ पासून कंपनी राजवट जाऊन ब्रिटिश बादशहाची साम्राज्यवादी सत्ता प्रस्थापित झाली. हे सत्तासंक्रमण होताना ब्रिटिश सम्राज्ञीकडून हिंदुस्थानच्या जनतेला आश्वासीत करणारा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. आपले सरकार ब्रिटिश प्रजाजनांप्रमाणेच भारतीय प्रजेशी शासन-व्यवहार करेल आणि भारतीय धर्म, परंपरा यांत हस्तक्षेप न करता राज्यशकट चालवील असे अश्वासन देण्यात आले. इंग्लंडमधील ब्रिटिश राजवट ही लोकांचे उत्तरदायित्व निभावणारी व लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत चालणारी राजवट होती. त्यामुळे आता भारतीय प्रजेला लोकशाही मूल्यचौकटीचा अनुभव व राजकीय शिक्षण मिळण्याची संधी प्राप्त होईल, राज्यप्रशासनात एतद्देशीयांचा सहभाग वाढेल,असे वातावरण तयार झाले. सर्वांसाठी समान कायदा, कार्यकारी प्रशासनापासून मुक्त असणारी न्यायव्यवस्था, युरोपीय विद्यांच्या अधिष्ठानावर आधारलेली शिक्षणव्यवस्था आणि नियमांच्या चौकटीत काम करणारी नोकरशाही हे ब्रिटिश राज्यप्रशासनाचे व्याकरण एतद्देशीयांसाठी नवे होते. ब्रिटिश अमदानीत युरोपातील आधुनिक विद्यांनी संस्कारित झालेला नवा सुशिक्षितवर्ग उदयाला आला होता; त्यांना इंग्रजी राजवट ही ईश्वरी प्रसाद असल्यासारखी वाटू लागली. आपल्याही देशात इंग्लंडसारखी प्रातिनिधिक राजसत्ता यावी असे स्वप्न ते पाहू लागले. या नव्या राजकीय जाणिवा पहाटल्यामुळे इंग्लंडप्रमाणे शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक अशा समग्र सुधारणा घडवून आणण्याचा ध्यास ह्या नव्या अभिजनवर्गाने घेतला. या आंग्लशिक्षित वर्गातून उदयाला आलेल्या नेतृत्वाने राजकीय व सामाजिक प्रबोधनासाठी निरनिराळ्या संस्था-संघटना सुरु केल्या. त्यातून महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा एक नवा पैस उत्क्रांत होऊ लागला. अशा प्रकारे विसाव्या शतकाची पहाट होण्यापूर्वीच महाराष्ट्रात राजकीय संस्था-संघटनांचा पाया घातला गेला. न्या. रानडे यांनी स्त्रीशिक्षण, आर्थिक व सामाजिक सुधारणा तसेच राजकीय हक्क प्राप्त करण्यासाठी लोकजागृतीची मोहीम हाती घेतली. महात्मा फुले यांनी ब्राह्मणेतर शेतकरी-कष्टकरी जनतेच्या शोषणमुक्तीसाठी शिक्षणप्रसार व सामाजिक प्रबोधनाची चळवळ सुरू केली. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी स्थापन केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या छत्राखाली एकत्र आलेल्या लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले ह्या तरुण ध्येयवादी मंडळीने लोकांना राज्य करण्यास पात्र बनविण्यासाठी लोकशिक्षणाची मोहीम हाती घेतली. यातून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर समग्र हिंदुस्थानात राजकीय जाणिवांचे नवे भान जागविण्याची प्रक्रिया सुरू झाली. लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, जगन्नाथ शंकर शेठ, फिरोजशहा मेथा, रा. गो. भांडारकर इत्यादी मंडळींनी या राजकीय पोषणासाठी हातभार लावला. १९ व्या शतकातील या राजकीय नांगरणीतून विसाव्या

शतकातील राजकारणाला नवे धुमारे फुटू लागले.

ब्रिटिशांची राजनीती हे विसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या संस्था-संघटनांचे संदर्भक्षेत्र होते. १८५७ च्या बंडापूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांची हिंदुस्थानातील राजकारणाची भूमिका अंशत: का होईना भागीदारीची होती; मात्र बंडानंतर ब्रिटिश नोकरशाहीची भूमिका निरंकुश साम्राज्यवादाकडे झुकू लागली. १८५८ च्या जाहीरनाम्यातील भाषा आणि प्रत्यक्ष राजकीय व्यवहार यात फार अंतर होते. वसाहतवादी नीतीतून इंग्लंडचे आर्थिक हित जपणाऱ्या नोकरशाहीची मानसिकता या जाहीरनाम्यातील आश्वासनांना अनुसरणारी नव्हती. इंग्लंडच्या फायद्याचे अर्थकारण करून भारतीय संपत्तीचे धननि:सारण करण्याचे उद्दिष्ट केंद्रस्थानी ठेवून ब्रिटिशांची प्रशासननीती काम करीत होती. त्यामुळे राज्यकारभारात एतद्देशीयांचा सहभाग वाढविण्यात ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात होती.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वकीयांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी १८५२ साली मुंबईत जगन्नाथ शंकर शेठ यांच्या अध्यक्षतेखाली 'बॉम्बे आसोशिएशन' ही भारतातली पहिली राजकीय संघटना स्थापन झाली. या संघटनेने स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करून प्रशासन लोकाभिमुख करण्याची मागणी केली. न्यायखाते आणि सरकारी कामे करणारे कार्यकारी प्रशासन यांच्यात भेद करण्यासाठी या दोन्ही ठिकाणचे काम एकाच अधिकाऱ्याकडे सोपविण्याची पद्धत बदलण्याचा आग्रह धरला. १८७० साली न्या. रानडे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या 'सार्वजनिक सभे'च्या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा पाया रचण्याचे काम सुरू झाले. इंग्लंडमधील जबाबदार प्रातिनिधिक राज्यसत्तेसारखी लोकसत्ता भारतात आणण्यासाठी स्वराज्याची पात्रता अंगी असणारे सुधारलेले प्रजाजन तयार करण्याचे काम न्या. रानडे, गणेश वासुदेव जोशी, गोपाळ कृष्ण गोखले हे नेमस्त पुढारी करू लागले. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा सर्वांगीण सुधारणांचा कार्यक्रम घेऊन राष्ट्रबांधणीचे व्रत त्यांनी आरंभिले. लोकांच्या मनात विवेकनिष्ठा रुजविण्यावर व प्रत्येक घटनाप्रसंगाकडे डोळस नजरने पहाण्याचे शिक्षण देण्याला त्यांनी अग्रक्रम दिला. कायद्याच्या चौकटीत न्याय मिळेल अशा अपेक्षेने सनदशीर मार्गाने सरकारकडे जनतेची गाऱ्हाणी मांडण्याची एक नवी पद्धत त्यांनी सुरू केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, अवाजवी शेतसारा आकारणी इत्यादी जनतेच्या दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी शासनास अर्ज-विनंत्या-निवेदने-वस्तुस्थितिनिदर्शक अहवाल पाठवून सार्वजनिक प्रश्न मांडण्याची नवी परंपरा या नेमस्त राजनीतीतून उत्क्रांत होत गेली. वृत्तपत्रांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर शासनाने आणलेली नियंत्रणे हटविण्यासाठी लोकमताचा दबाव वाढविण्याचे कामही 'सार्वजनिक सभे'ने सुरू केले. शिवाय ब्रिटिश पार्लमेंटमध्ये

भारतीयांना प्रतिनिधित्व द्यावे अशा राजकीय सामिलकीचीही मागणी या नेमस्त पुढाऱ्यांनी केली. महात्मा फुले यांनी मात्र ब्राह्मणवर्गीय अभिजनांच्या राजकीय चळवळीपेक्षा ब्राह्मणेतर बहुजन, स्त्रिया व अस्पृश्य या वंचित गटांच्या उद्धारासाठी 'सत्यशोधक समाज' स्थापन करून एक वेगळी वाट निवडली. अशा प्रकारे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात नागरी हक्कांसाठी साम्राज्यशाही सत्तेकडे दाद मागणारा व साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे स्वप्न पहाणारा बुद्धिवादी अभिजन वर्ग आणि ब्राह्मणी मूल्यचौकटीतल्या शोषणपरंपरेशी विद्रोह पत्करणारी ब्राह्मणेतर चळवळ अशी महाराष्ट्राच्या राजकारणाची द्वंद्वमूल वाटचाल सुरू झाली होती.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात म्हणजे १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यापासून हिंदुस्थानात भारतीय राजकारणाचे एक नवे व्याकरण रचले गेले. १८८५ ते १८८८ या पहिल्या टप्प्यात 'राष्ट्रीय सभे'चे संस्थापक ह्यूम यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने आपल्या कामाला प्रारंभ केला होता. ह्यूम यांना मुळात 'राजकीय संघटना' म्हणून काँग्रेसची उभारणी करणे अभिप्रेत नव्हते. हिंदुस्थानातल्या सामाजिक विषयांची चर्चा करण्यासाठी एक सर्वमान्य अशी 'राष्ट्रीय सभा' म्हणून काम करण्याची भूमिका होती; मात्र त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांनी केलेल्या सूचनेमुळे काँग्रेसच्या संकल्पनात्मक आराखड्यात बदल झाला. हिंदुस्थानात ब्रिटनसारखा विरोधी पक्ष नसल्यामुळे काँग्रेसने शासकीय योजना व धोरणे यातील उणिवा दाखवून द्याव्यात, त्या दूर करण्यासाठीचे उपाय सुचवावेत व त्यासाठी देशभरातील राजकीय नेत्यांनी राष्ट्रीय सभेच्या छत्राखाली एकत्र यावे असे नवे प्रारूप पुढे आले. केवळ सामाजिक विषयांची चर्चा करण्यापेक्षा काँग्रेसने राष्ट्रीय विचारांची प्रातिनिधिक संस्था म्हणून काम करावे, ही गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरिन यांची सूचना स्वीकारण्यात आल्याने राष्ट्रीय सभेच्या कार्याची व्याप्ती वाढली. लोकांचे प्रश्न सरकारला मांडणारी प्रातिनिधिक संघटना ही भूमिका घेऊन काँग्रेस सक्रिय झाली. १८८६ साली काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनात दादाभाई नौरोजी यांनी अध्यक्षीय भाषणातून "आम्ही राज्यकर्त्यांना आमच्या राजकीय आकांक्षा समजाव्यात यासाठी राजकीय संघटना म्हणून एकत्र आलो आहोत; सामाजिक सुधारणांचा विचार करण्याचा आमचा मुळी हेतूच नाही." अशी भूमिका आग्रहाने मांडली होती. राष्ट्रीय सभा ब्रिटिशांच्या विरोधात नसून ब्रिटिश छत्राखाली काम करणारी संघटना असल्याची ग्वाही त्यांनी दिली होती. [१] ब्रिटिशांकडून मिळालेले शिक्षण व ब्रिटिश संस्कृतीचे तेज यातून मिळालेल्या फायद्यांविषयी दादाभाईंनी आपल्या भाषणातून कृतज्ञताभाव व्यक्त केला होता व ब्रिटिश राजवट चिरकाल टिकून राहो अशी इच्छा व्यक्त केली होती. तेव्हापासूनच या संघटनेला सरकारची अधिमान्यताही मिळाली. राजनिष्ठा कायम ठेवून परतंत्र हिंदुस्थानच्या असंतोषाला वाट करून देणारी 'सुरक्षा-

झडप' (Safety-Valve) म्हणून काम करणारी स्वायत्त संघटना अशी 'राष्ट्रीयसभे'ची प्रतिमा तयार होत गेली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात हिंदुस्थानातल्या स्थानिक आणि प्रांतिक पातळीवरच्या बहुतेक राजकीय संघटना काँग्रेसच्या छत्राखाली एकत्र आल्या होत्या. सर्वसमावेशक राजकारणाची कार्यसंस्कृती घडविण्याची व्यूहनीती काँग्रेसने प्रारंभापासूनच अंगीकारली होती. शेतकरी, कामगार, जमीनदार, व्यापारी, धर्मगुरू, वकील, हिंदू, मुसलमान अशा विविध स्तरांतील संस्था-संघटना काँग्रेसशी जोडल्या गेल्या होत्या. संपूर्ण भारतीय पातळीवर कार्यक्षम राहाण्यासाठी काँग्रेसने जिल्हा, प्रांत व राष्ट्रपातळीवर कमिट्या स्थापन करून एक अंतर्गत साखळी निर्माण केली होती. तसेच सार्वजनिक संस्था-संघटनांना संलग्नता देऊन, एकजिनसी संस्थात्मक व्यवस्था निर्माण केली होती. प्रादेशिक, सामाजिक, भाषिक समूहांच्या आशा आकांक्षांचा सामुहिक आवाज मुखर करणारी प्रातिनिधिक संघटना म्हणून काँग्रेसने आपली प्रतिमा घडवली होती. त्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसची वार्षिक अधिवेशने भारताच्या निरनिराळ्या प्रांतात घेण्याचा व वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष निवडताना विविध धर्मांतील व निरनिराळ्या भाषांतील पंडितांना, प्रतिष्ठित उद्योजकांना प्राधान्य देण्याचा प्रघात सुरू केला होता. काँग्रेसच्या या राजकीय सामिलकीतून भारताच्या भविष्यकालीन राजकारणाचे नवे व्याकरण रचले जाण्याचा शुभारंभ झाला होता. समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारी देशव्यापी संघटना म्हणून काँग्रेसने सर्वसमावेशक राजकारणाचा नवा मार्ग प्रशस्त केल्यामुळे विचारसरणीने जहाल असो वा मवाळ, दोघांनाही काँग्रेसचे छत्र आवश्यक वाटू लागले. ब्रिटिश राजसत्ता उलथून टाकण्याऐवजी *'साम्राज्यांतर्गत स्वराज्य'* हे संघटनेचे व्यापक ध्येय ठरविण्यात आले. सरकार आणि जनता यांच्यालला दुवा प्रस्थापित करण्याचे माध्यम म्हणून काँग्रेस क्रियाशील झाली. स्थानिक प्रश्नांपेक्षा राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांना महत्त्व देऊन एतद्देशीयांच्या प्रातिनिधिक मागण्यांचे बहुतांश प्रस्ताव आता काँग्रेसमार्फत दाखल होऊ लागले. एखाद्या समांतर संसदेसारखे काँग्रेसचे कामकाज होऊ लागले. ब्रिटिशांचे भारतातील वसाहतवादी राजकारण आणि काँग्रेसचे राष्ट्रपातळीवरील संघटनात्मक राजकारण या संदर्भचौकटीतून विसाव्या शतकारंभीच्या राजकीय अवकाशाचा चित्रफलक आता रंगू लागला होता. ह्या चित्रफलकावर दृश्यमान होणाऱ्या प्रातिनिधिक घटितांचा कालक्रमिक मागोवा घेत जाऊन महाराष्ट्रातील राजकीय स्थित्यंतरांच्या वाक्-वळणांचा येथे तपास करावयाचा आहे.

## १.२. नेमस्त आणि जहाल गटांचे राजकारण :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्र पातळीवर काम करणारी 'पुणे सार्वजनिक सभा' आणि भारतीय पातळीवर काम करणारी 'राष्ट्रीय सभा' हे या महाराष्ट्राच्या

सार्वजनिक जीवनाचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ बनले होते. १८८५ साली स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय सभे'पासून काँग्रेसच्या राजकारणात 'आधी राजकीय की आधी सामाजिक' या प्राधान्यक्रमावरून महाराष्ट्रातील वैचारिक संघर्षाला तोंड फुटले होते. काँग्रेसच्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनापासूनच त्याच मंडपात सामाजिक सुधारणांसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी स्वतंत्र सभा घेण्याची प्रथा सुरू झालू होती. परंतु १८९५ साली पुण्यात भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळी लो. टिळकांनी त्याच मंडपात सामाजिक परिषदेचे अधिवेशन भरविण्यास विरोध केला व सामाजिक परिषदेचे कामकाज होऊ दिले नाही. १८९५ सालीच लोकमान्य टिळकांनी रानडे-गोखले यांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या 'सार्वजनिक सभे'वर ताबा मिळविला. न्या. रानडे यांच्या छत्राखाली तयार झालेल्या गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यांच्या उदारमतवादी मित्रपरिवाराने टिळकांना शह देण्यासाठी १८९६ साली पुण्यात 'डेक्कन सभा' स्थापन केली. मुंबईतल्या फिरोजशहा मेथा वगैरेंशी संबंध प्रस्थापित करून त्यांनी 'डेक्कन सभे'ला काँग्रेसची अधिकृत संस्था म्हणून मान्यता मिळविली. त्यामुळे टिळकांच्या नेतृत्वाखालील सार्वजनिक सभेचे काँग्रेसच्या लेखी महत्त्व राहिले नाही. (या स्थित्यंतरांचा समग्र वृत्तांत पहिल्या खंडात देण्यात आला आहे, तो जिज्ञासूंनी जरूर पहावा.) तेव्हापासूनच महाराष्ट्रात टिळक-गोखले वादाला सुरुवात झाली. महाराष्ट्राचे राजकारण 'नेमस्त' विरुद्ध 'जहाल' अशा दोन गटांत विभागले गेले. न्या. रानडे, गोखले, फिरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा या नेमस्तांचा एक गट आणि लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, शि. म. परांजपे, दादासाहेब खापर्डे यांचा दुसरा जहाल गट तयार झाला. हे दोन्ही गट परस्परांवर मात करीत राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आपापला प्रभाव निर्माण करीत राहिले. पहिल्या महायुद्धापर्यंत राष्ट्रीय सभेत या दोन गटांत राजकीय चढाओढ सुरू होती. नेमस्त पुढाऱ्यांचा भर शासनाला वस्तुस्थितीचे निर्भेळ दर्शन घडविण्यावर होता; याउलट टिळकांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या जहाल गटातील पुढाऱ्यांचा भर लोकसंघटन व लोकक्षोभाचे प्रदर्शन करण्यावर होता. नेमस्तांनी निभावलेला 'राजनिष्ठे'चा धर्म जहालांना मुळीच मान्य नव्हता. परकीय सत्ताधाऱ्यांना हुसकावून लावून स्वकीयांची सत्ता प्रस्थापित करण्याला अग्रक्रम देणे यावर जहाल राजकारण्यांचा भर होता. लोकमानसात हिंदुस्थानचा इतिहास, धर्म व परंपरा याविषयी जाज्वल्य अभिमान जागवून व ब्रिटिश सत्तेविषयी द्रोहाची भावना चेतवून नवे राष्ट्रभान निर्माण करणे हा जहाल पक्षाचा कृतिकार्यक्रम होता. इंग्रजी राजवटीविषयी लोकांच्या मनात चीड निर्माण करणे, ब्रिटिश मालावर बहिष्कार घालून स्वदेशी मालाचे उत्पादन व वितरण वाढविणे, लोकशक्तीचा संघटनात्मक आविष्कार करणे, सशस्त्र उठावांना प्रोत्साहन देणे असा सर्वसाधारण कार्यक्रम घेऊन जहालांचे राजकारण आकार घेऊ लागले होते.

'राष्ट्रीय सभे'त म्हणजेच अखिल भारतीय काँग्रेसमध्ये सुरुवातीला १९०५ पर्यंत वीस वर्षे न्या. रानडे, सार्वजनिक काका, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेथा या महाराष्ट्रातील नेमस्तांचाच गट अग्रेसर होता. या गटाने टिळकांना राष्ट्रीय राजकारणापासून बाजूला ठेवून महाराष्ट्रात अडकून ठेवण्याचा घाट घातला होता. काँग्रेसचे मुंबईचे नेते दिनशा वाच्छा यांनी १५ एप्रिल १८९९ रोजी दादाभाई नौरोजी यांना पत्र लिहून टिळकांच्या पत्रकारितेच्या शैलीविषयी तक्रार केली होती. त्यात म्हटले होते की,

".. who should find no place in the Congress camp. He thinks he is the coming saviour of India. When people have got such notions into their head you can understand to what limits they may go. Altogether his conduct is inexcusable, and he is using his talents to most objectionable and mischievous purpose." (Johnson,1973, p.124)

काँग्रेसमधल्या मुंबईच्या पुढाऱ्यांनी अशा प्रकारे टिळकांना राष्ट्रीय काँग्रेसपासून दूर ठेवण्याचे प्रयत्न चालविले होते. अर्थात त्याचा परिणाम काँग्रेसवरही झाला. अनेकांचा काँग्रेसमधील सहभाग त्यामुळे कमी झाला. गोखल्यांना अभिजनांखेरीज सामान्य जनतेकडून फारशी लोकमान्यता मिळवता आली नाही. या संदर्भातली सरकारच्या गोपनीय टिपणातली पुढील नोंद पुरेशी बोलकी आहे -

"Gokhale was reported in 1909 saying that he was of opinion that he had no sympathisers or supporters among the ignorant masses who had no idea of him and his work. In the mofussil he counted 2 percent of the educated classes as his supporters and sympathisers; 15 percent in Poona, and 50 percent in Bombay." (Weekly Report DIC, 20 February,1909, Home Political,13, June,1909,104, NAI; Johnson, 1973, p. 117)

१९०२ साली गोखल्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देऊन पूर्ण वेळ राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला. गोखल्यांच्या मुंबईतल्या मित्रांनी त्याच वर्षी त्यांना व्हॉईसरॉयच्या कायदेमंडळात पाठविले. १९०३ च्या मद्रास अधिवेशनानंतर फिरोजशहा मेथा व त्यांच्या मित्रमंडळाने 'राष्ट्रीय सभे'चे अधिवेशन मुंबईस घेण्याचे निमंत्रण दिले. गोपाळ कृष्ण गोखले यांची काँग्रेसचे संयुक्त सचिव म्हणून निवड झाली. महाराष्ट्रात घ्यावयाच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर गोखले आणि मुंबईकरांनी टिळकांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. दादाभाई नौरोजी यांनी टिळकांकडून सभ्य वर्तनाची हमी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. टिळकांनी ६ डिसेंबर १९०४ रोजी दादाभाईंना पत्र

लिहून कळविले की, आपण कधीही काँग्रेसच्या विरोधात नव्हतो, किंबहुना काँग्रेसला दुषणे देणाऱ्यांमध्ये मी शेवटचा माणूस आहे. "I have never been, nor am I in any way against the Congress, constitutional agitation; I shall be the last person to decry." (Johnson, 1973, p. 177) टिळकांनी राजकीय मुत्सद्देगिरी दाखवून काँग्रेसशी जुळवून घेतले. मात्र 'जहाल' आणि 'मवाळ' गटातील वादाची धग कायम राहिली.

न्या. तेलंग यांनी जहाल आणि नेमस्तांच्या 'आधी राजकीय की आधी सामाजिक' या वादावर भाष्य करताना म्हटले होते की, "आमच्या देशांतील सुधारकांस दोन अवघड किल्ले सर करावयाचे आहेत. एक राजकीय स्वातंत्र्याचा व दुसरा सामाजिक स्वातंत्र्याचा. दिसण्यांत सध्या दोनही अभेद्य दिसत आहेत....पहिला हल्ला राजकीय स्वातंत्र्यगडावर केला असता तो विशेष फायदेशीर होणार आहे...राजकीय प्रकरणी वादात तर्कांचे बरेच प्राबल्य चालते, सामाजिक किंवा धार्मिक वादांत तो अगदी कुंठित होतो. पहिल्या वादांत बुद्धीवर प्रहार होत असतात. दुसऱ्या वादांत मनोविकार दुखविले जातात... सध्याच्या आमच्या देशस्थितीत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे लागला पाहिजे, असा माझा एकंदरीत ग्रह झाला आहे." (लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ४, पृ. ३६-३८)

सुधारणावादी विचारांचे पुरस्कर्ते आगरकर यांच्या मते,"सुधारणेचा आरंभ होणे तो राजकीय सुधारणेपासून झाला पाहिजे... आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुन:प्राप्तीसाठी प्रयत्न करणे होय. ही गोष्ट जितकी आम्हा महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवाश्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महमदीयांस व इतरांस इष्ट असणे स्वाभाविक आहे, म्हणून त्यांचे एकीकरण होणे शक्य आहे, व ते तसे होऊ लागले आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांचे तसे नाही. त्यांच्या योगाने निष्कारण असंतोष व कलह निर्माण होतात... सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयी तंटे उपस्थित केल्यामुळे, राजकीय गोष्टीत एकदिलाने वागणे दुरापास्त झाले आहे." अर्थात, "राजकीय सुधारणा आधी होते किंवा सामाजिक सुधारणा आधी होते, हे जरी निश्चयाने सांगता आले नाही, तरी येवढे म्हणण्यास हरकत नाही की, सामाजिक सुधारणा करण्यास आजमितीस आम्हांस जितकी अनुकूल वेळ आली आहे, तितकी पूर्वी कधीही आली नव्हती... निदान राजकीय विषय सामाजिक व धार्मिक विषयांपासून स्पष्टपणे निराळे झाले असून, त्यांची व्यवस्था आमच्या सरकारने आपल्या शिरावर घेतली आहे, व बाकी राहिलेले दोन भाग आम्हांकडे ठेविले आहेत. (आगरकर, निबंधसंग्रह, भाग १, शिराळकर कंपनी, पृ. १४३-१४६)

जहाल आणि नेमस्त असे राजकीय तट का निर्माण झाले, याची मीमांसा

त्याकाळीही झाली होती. १९०७ साली 'नामदार गोखले यांचा घोटाळा' या 'केसरी'तील अग्रलेखातून मवाळ आणि जहाल हा भेद हा कळकळीच्या कमीजास्तपणामुळे निर्माण झालेला भेद नसून स्वभाव आणि विचारसरणीतून उद्भवलेला भेद आहे, असे स्पष्टीकरण लोकमान्य टिळक यांनी दिले होते. टिळकांनी या वादातले तथ्य उलगडून सांगताना लिहिले होते की,

"गेली एकवीस वर्षे राष्ट्रीय सभेने राजकीय चळवळीची जी दिशा पत्करली ती चुकीची होती. ह्या एकवीस वर्षांतील राष्ट्रीय सभेच्या चळवळीला कांस्टिट्यूशनल उर्फ सनदशीर चळवळ असे नाव प्राप्त झाले आहे... हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीसंबंधाने कांस्टिट्यूशनल किंवा सनदशीर हे शब्द वापरणेच चुकीचे आहे... इंग्लंडात कान्स्टिट्यूशन आहे; म्हणजे राजसत्तेने कबूल केलेले किंबहुना राजसत्ता ज्यामुळे अस्तित्वात आहे असले हक्क इंग्लंडातील प्रजाजनांना असून त्या हक्काच्या सनदेस इंग्लंडच्या इतिहासात कान्स्टिट्यूशन असे म्हणतात. .. राज्यकर्त्यांनी केलेली एखादी गोष्ट जर कोणास नापसंत झाली तर ती रद्द करण्याचा उपाय या सनदेच्या कलमामध्ये दिलेला आहे... अशा रीतीने लोकमतावर इंग्लंडातील राज्यव्यवस्था अवलंबून असल्यामुळे लोकमत जागृत करून लोकांचे मताधिक्य आपल्या बाजूस करून घेतल्याने इंग्लंडात कार्यसिद्धी होते. लोकमत जागृत करणे व मताधिक्य आपल्या बाजूस करून घेणे ह्याला इंग्लंडात कांस्टिट्यूशनल उर्फ सनदशीर चळवळ असे म्हणतात... पण हिंदुस्थानास अशा प्रकारची सनद मिळेतोपर्यंत, सनदेला धरून चळवळ करा, असा उपदेश, मृगजलाप्रमाणे देशाचे मनांत भ्रम उत्पन्न करून लोकांना फसविणारा आहे... कायद्याचे उल्लंघन करू नका एवढे सांगण्यापुरताच जर ह्या शब्दांचा उपयोग करावयाचा असेल तर जहाल पक्षाच्या मताहून ना. गोखले ह्यांचे काहीच भिन्न मत नाही असे म्हटले पाहिजे." (टिळक,१९२६, पृ.१४४-१४५)

'जहाल आणि मवाळ' पक्षातील 'आधी राजकीय की आधी सामाजिक' हा वाद फक्त ध्येयपूर्तीच्या अग्रक्रमांच्या संदर्भातला वाद होता. दोन्ही पक्षांना राजकीय आणि सामाजिक सुधारणा हव्या होत्या हे निर्विवाद! आगरकरांना राष्ट्रीय सभेतील ह्या वादात दोन्ही पक्षात अंतर्विरोध असण्यापेक्षा अंतर्गत सुसंगतीच दिसते. त्यांनी या संदर्भात म्हटले होते की, "राष्ट्रसभा ज्या विद्येचे फळ आहे त्याच विद्येचे फळ सामाजिक परिषद आहे. ज्या ज्ञानामुळे तेलंग आणि रानडे यांस आमची राजकीय सुधारणा व्हावी असे वाटते त्याच ज्ञानामुळे त्यास आमची सामाजिक सुधारणा व्हावी असे वाटते व ज्या कारणामुळे त्यांचे राजकीय विचार आम्हांस मान्य होतात आणि ते व्यक्तिदृष्टीने पूज्य वाटतात, त्याच कारणामुळे त्यांचे सामाजिक विचारही आम्हांस मान्य होऊन व्यक्तिदृष्टीने ते आम्हांस पूज्य झाले पाहिजेत." (आगरकर, कित्ता, पृ. १६२)

टिळक आणि गोखले यांच्या वागण्याबोलण्याच्या शैलीतूनही जहाल आणि मवाळ गटांच्या भूमिकांमधील बदल नजरेत भरत असे. संसदीय राज्यपद्धतीच्या चौकटीत काम करणाऱ्या मेथा-गोखले यांच्या वागण्याबोलण्यात इंग्रजी शिष्टाचार आणि ब्रिटिश कायद्याच्या चौकटीचा प्रभाव स्पष्ट दिसत असे. याउलट कायद्याच्या चौकटीत राहून त्यातील कच्चा दुवा हेरून कायदा मोडण्याचा जाणूनबुजून प्रयत्न करीत राहणे ही टिळकांची खोड होती. टिळकांचा मार्ग आपण कायद्याच्या कचाट्यात न सापडता सरकारवर टीकास्त्र सोडण्याचा होता; तर गोखले सरकारलाच कायद्याच्या कचाट्यात पकडीत. (मोरे सदानंद, २०१७, पृ. ३८) मात्र या राजकीय विचारधारांतील द्वंद्वमूल-एकता लक्षात घेण्याइतका विचार सामान्य कार्यकर्त्यांमध्ये नव्हता. त्यामुळे गोखले व टिळक यांच्या विचारधारांना हळू हळू मराठी माणसाच्या भांडखोर स्वभावधर्माचे रंग चढत गेले व स्वाभाविकच या मतभिन्नतेला राजकीय आखाड्याचे स्वरूप प्राप्त झाले. एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी निमित्त शोधणे आणि वाक्प्रहारांचे बाण सोडीत राहणे असे या राजकीय भूमिकानाट्याला कलगीतुऱ्याचे स्वरूप मिळू लागले. 'भाला'कार भोपटकर यांनी 'भिणार की भिडणार' या लेखातून केलेली टोलेबाजी ही अशा प्रकारच्या राजकीय कलगीतुऱ्याचे नमुनाउदाहरण सांगता येईल. बौद्धिक प्रमाणांचा आधार देत वाद करणाऱ्या नेमस्तांना "भाला'कारांनी आकडेशास्त्राचे तुणतुणे घेऊन कुलदेवतेभोवती फेर धरणाऱ्या यल्लमांच्या भक्तांची उपमा दिली. याउलट जहाल गटाचे समर्थन करताना त्यांनी जहालांच्या पौरुषेय वृत्तीचा गौरव केला. 'ज्याने आपला डोळा फोडला त्याचा आपण डोळा फोडावा, ज्याने आपला दात पाडला त्याचा आपण दात पाडावा', अशी ठोशास ठोसा भूमिका घेणाऱ्या जहालांचा गौरव करताना दुसरीकडे 'नेमस्तांचा मार्ग बुळबुळीत नसून अती गुळगुळीत आहे, त्यांच्या मार्गाचे अवलंब केले असता गुदगुल्या होत होत राष्ट्रोन्नती सहज घडून येते' असा औपरोधिक टोलाही मारला आहे. (गोखले श्री. पु.१९७८, पृ.४७-४८) वैचारिक भूमिकांचे व राजकीय डावपेचांचे लोकपातळीवर होत असलेले हे आकलन जलशाच्या पातळीवर जाऊन अभिव्यक्त होऊ लागले. तत्कालीन महाराष्ट्राच्या जहाल-मवाळ राजकीय विचारधारांच्या मुशी कशा तयार होत होत्या आणि त्यांना महाराष्ट्राच्या स्वभावगुणविशेषांचा रंग कसा चढत होता, याचे दर्शन या वाद-प्रतिवादातून घडते. नेमस्त आणि जहालांच्या राजकारणाचे हे दर्शनी आविष्कार काहीही असले तरी आधुनिक भारताच्या व राष्ट्रीय काँग्रेसच्या राजकारणात १९२० पर्यंत गोखले आणि टिळक या मराठी भाषिकांचेच नेतृत्व प्रभावक्षम होते; आणि पुढे गांधीजींनीही ह्याच राजकीय वारशाला प्रमाण मानून आपल्या राजकारणाचा मार्ग प्रशस्त केला असल्याने ह्या राजकीय वादाला महत्त्व आहे. 'राजकीय सुधारणा आधी की सामाजिक सुधारणा आधी' या प्राधान्यक्रमाच्या प्रश्नातून सुरू झालेल्या जहाल-

मवाळांच्या या राजकीय द्विधृवात्मकतेची परंपरा पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळपर्यंत कशी अस्तित्वात होती, याचे तपशील पुढील तपासातून आपल्याला शोधावयाचे आहेत.

## १.३. ना. गोखले यांची नेमस्त राजनीती

गोपाळकृष्ण गोखले (१८६६-१९१५) टिळकांपेक्षा वयाने दहा वर्षांनी लहान होते, पण राजकीय विचारात ते टिळकांचे समकालीन होते. मात्र गोखले यांनी कॉंग्रेसच्या राजकारणात टिळकांच्या आधी बाजी मारली. १९०३ साली मद्रास अधिवेशनात त्यांची कॉंग्रेसचे संयुक्त सचिव म्हणून निवड झाली आणि दोनच वर्षांनी त्यांना अध्यक्षपदाचाही सन्मान लाभला. गोखले यांच्या १९०५, १९०६ आणि १९०८ च्या इंग्लंड प्रवासासाठी बॉम्बे प्रेसिडेन्सीने निधी उभारला. कॉंग्रेसचे प्रवक्ते म्हणून शासनानेही गोखल्यांना मान्यता दिली. १९०७ ते १९१६ पर्यंत कॉंग्रेसचे नेतृत्व ना. गोखले यांच्याकडेच होते. मध्यवर्ती कायदेमंडळावर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. तसेच ब्रिटिशांकडून हिंदुस्थानवासीयांना दिल्या जाणाऱ्या प्रस्तावित राजकीय सुधारणांच्या मसुदालेखनाचे महत्त्वाचे कामही त्यांना सोपविण्यात आले. लंडनमध्ये कॉंग्रेसच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या 'इंडिया' या मुखपत्राचे पुनरुज्जीवन करण्यातही गोखल्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. त्यामुळे अधिमान्य राजकारणात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले.

गोपाळ कृष्ण गोखले हे हाडाचे शिक्षक होते. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात केली होती. १८९० साली टिळकांनी राजीनामा दिल्यानंतर गोखल्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे वर्ग घेतले; गणिताचे क्रमिक पुस्तकही लिहिले. बारा वर्षे त्यांनी रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता. वैधानिक मार्गांनी वसाहतवादी सत्तेच्या शोषणनीतीचा प्रतिवाद करण्याचे राजकीय धडे त्यांनी रानड्यांच्या मार्गदर्शनाखाली गिरवले होते. रानडे व सार्वजनिक काका यांच्या पुढाकारातून चालविल्या जाणाऱ्या पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या सचिवपदी १८९० सालीच गोखल्यांची निवड झाली होती. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे व साप्ताहिक 'सुधारक'च्या इंग्रजी विभागाचे संपादन करताना त्यांची बौद्धिक व राजकीय मशागत झालेली होती. न्या. रानडे यांचे शिष्यत्व पत्करल्याने सार्वजनिक प्रश्नांची पद्धतशीर मांडणी करण्याचे कौशल्य व भिन्न विचारसरणीच्या लोकांकडे उदारमनस्कतेने पहाण्याची दृष्टी त्यांना प्राप्त झाली होती. ही ज्ञानसाधना त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा पाया भक्कम करण्यासाठी उपयोगी पडली.

१८९२ साली गोपाळकृष्ण गोखले यांची डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग बॉडीच्या चिटणीसपदी निवड झाली. ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीत रूजू झाले त्यावेळी आगरकर आणि टिळक यांच्यातील मतभेदांना नुकतीच सुरुवात झाली होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सभासदांनी अल्प वेतनावर सोसायटीच्या कामाला पूर्ण वेळ

वाहून घ्यावे अशी टिळकांची भूमिका होती; याउलट संसार सांभाळून सोसायटीचे काम करणाऱ्यास 'जेसुइट' लोकांसारखे दारिद्र्यात राहून काम करणे शक्य नाही, सांसारिक जबाबदारी निभावण्यासाठी पुस्तके लिहून, वृत्तपत्रात लेखन करून किंवा तत्सम स्वरूपाची बाहेरची कामे करून गृहस्थाश्रमाच्या जबाबदाऱ्या निभावणे भाग आहे, अशी आगरकरांची भूमिका होती. यातूनच पुढे टिळक-आगरकरांमध्ये दुरावा निर्माण झाला. 'सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी' या विषयालाही तोंड फुटले होते. टिळकांचा सामाजिक सुधारणांना विरोध नव्हता; मात्र त्यात सरकारचा हस्तक्षेप नको यासाठी ते आग्रही होते. स्वराज्याचे राजकारण आधी करावे, सामाजिक सुधारणा हळू हळू होत रहातील अशी टिळकांची भूमिका होती. याउलट लोकजागरण करून लोकांना विवेकनिष्ठ बनविण्यावर रानडे, व आगरकरांचा भर असायचा. टिळकांना आक्रमक राष्ट्रवादाचा मार्ग पसंत होता व त्यांना सनातनी वर्गाचा पाठिंबा होता, तर रानडे-आगरकर यांच्या सुधारणावादाला तत्कालीन नवसुशिक्षितांचा पाठिंबा मिळत होता. गोखले यांचा कल आगरकरांच्या बाजूने झुकायचा. आगरकरांच्या 'सुधारक' या पत्राचे ते सहसंपादकही होते; टिळकपंथीयांची भूमिका त्यांना मान्य नसायची.

पुढे टिळकांनी बहुमताचे राजकारण करून न्या. रानडे यांच्या प्रेरणेने चालणाऱ्या 'सार्वजनिक सभे'वर ताबा मिळविला; त्यावर गोखलेंनी वेगळा पर्याय शोधला. सार्वजनिक सभेला समांतर 'डेक्कन सभा' स्थापन केली. या डेक्कन सभेला राजमान्यता मिळाल्याने दरबारी राजकारणात गोखले अग्रेसर राहिले. टिळकांचे जहाल राजकारण गोखल्यांना मानवत नव्हते. त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देऊन मुंबईच्या फिरोजशहा मेथा व इतर मान्यवर पुढाऱ्यांच्या सोबतीने नवा राजकीय अध्याय रचण्याचा मार्ग निवडला. मुंबईकरांनीही गोखल्यांना यथायोग्य संधी दिली. गोखले आणि टिळक हे दोघे समकालीन असले तरी काँग्रेसने व विशेषत: मुंबईकर पुढाऱ्यांनी टिळकांपेक्षा गोखलेंना जवळ केले. १८८८ साली पुण्यात काँग्रेसचे प्रांतिक अधिवेशन झाले. या अधिवेशनात पुढच्या वर्षी अलाहाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनासाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून गोखले यांची निवड करण्यात आली. गोखल्यांच्या भारतातील राजकीय कारकिर्दीचा हा प्रारंभ होता. मात्र तो काहीसा वादग्रस्त ठरला. १८९७ साली प्लेगच्या साथीत प्लेग कमिटीकडून पुणे शहरात झालेल्या अत्याचारांची चौकशी करण्याकरिता लंडनला वेडरबर्न यांच्या नेतृत्वखाली इंडियन पार्लमेंटरी कमिटी नेमण्यात आली होती; या कमिटीसमोर कैफियत मांडताना गोखल्यांनी भारतातील ब्रिटिश सनदी नोकरशाहीवर कडक टीका केली. ब्रिटिश सोजिरांनी लोकांच्या घरात घुसून अन्न विटाळले, देवघरातल्या मूर्त्यांची विटंबना केली, इतकेच नाही तर सैनिकांनी पुण्यातील दोन स्त्रियांवर बलात्कार केला व त्यापैकी एका स्त्रीने जीव दिला, असा पुण्यातील अत्याचारांचा समग्र वृत्तांत त्यांनी कथन केला. या बैठकीनंतर 'मँचेस्टर गार्डियन'ला मुलाखत देऊन गोखल्यांनी ह्या घटनेचा जाहीर निषेधही नोंदवला. मात्र 'मँचेस्टर गार्डियन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या वृत्तांताला पुरावा नसल्याने गोखल्यांनी नंतर आपले विधान मागे घेतले व

वृत्तपत्राची जाहीर माफी मागितली. त्यांचे हे माफी प्रकरण महाराष्ट्रात टीकेचा विषय बनले. टिळकांनी मोतीलाल घोष यांना लिहिलेल्या पत्रात गोखल्यांची 'कच्चा बोरू' अशा शब्दांत संभावना केली. अर्थात, गोखल्यांची भूमिका नेमस्त असल्याने त्यांनी स्वकीयांकडून झालेल्या टीकेचा मुद्दा लावून धरला नाही. हा माफीनाम्याचा अपवाद सोडला तर गोखल्यांनी अतिशय कणखरपणे ब्रिटिशांकडून होणाऱ्या भारतीयांच्या शोषणाची कैफियत संसदीय कारभाऱ्यांपुढे मांडण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले होते.

२१ डिसेंबर १८९९ रोजी गोखले मुंबई कायदे कौन्सिलात निवडून आले. त्यावेळी सँढहर्स्ट हे गव्हर्नर होते. मुंबई कायदे कौन्सिलात शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्यावर पडणारा करांचा बोजा, दुष्काळ व प्लेगच्या आपत्तीमुळे निर्माण झालेल्या समस्या यांची त्यांनी पद्धतशीर मांडणी केली. सरकारने शेतकऱ्यांच्या सावकाराकडील कर्जाची जबाबदारी घ्यावी, शेतकी बँका सुरू कराव्यात, जमिनीचे हस्तांतरण करण्यास कायद्याने प्रतिबंध घालावा इत्यादी मागण्या केल्या. १९०२ साली वयाच्या ३९ व्या वर्षी गोपाळ कृष्ण गोखले यांची पुणे नगरपालिकेच्या अध्यक्षपदी निवड झाली. चार वर्षे त्यांनी ही जबाबदारी निभावली. आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत त्यांनी पुण्याच्या शिक्षणक्षेत्राचा विस्तार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. स्कूल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक हरि नारायण आपटे यांची त्यांना साथ मिळाली. त्यांच्या कारकिर्दीत नगरपालिकेच्या शाळांची संख्या ३३ पर्यंत वाढली.

१९०२ सालीच गोपाळ कृष्ण गोखले यांची मध्यवर्ती कायदेमंडळाचे सदस्य म्हणून निवड झाली. फेरोजशहा मेथा यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ते निवडून आले. फेरोजशहा मेथा यांच्यापेक्षा गोखले २१ वर्षांनी लहान होते. आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत गोखले मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद राहिले. स्पष्ट व निर्भीड भूमिका घेऊन युक्तिवाद करणारे यशस्वी संसदपटू म्हणून त्यांची राजकीय कारकीर्द गाजली. व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन गोखलेंना 'विरोधीपक्ष नेते' म्हणून संबोधत असत. इंग्रज राज्यकर्त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीवर गोखल्यांचा विश्वास होता. राज्यकर्त्या ब्रिटिशांचे व सनदी नोकरशाहीचे मतपरिवर्तन घडवून आणण्याला ते प्राधान्य देत. राजकीय संघर्षापेक्षा नैतिक संघर्षाला त्यांच्या लेखी अधिक मूल्य होते. राजकारणातली त्यांची भूमिका प्रचारकाची असण्यापेक्षा अभ्यासकाची होती. प्रश्नांचा गुंता सोडविण्यासाठी व योग्य ते लाभ पदरात पाडून घेण्यासाठी दरबारी राजकारणातली पडद्यामागची भूमिका चाणाक्षपणे निभावण्यावर त्यांचा भर होता. याची अनेक उदाहरणे त्यांच्या राजकीय कारकिर्दीत दिसून येतात. हिंदुस्थान सरकारच्या मुलकी व लष्करी खर्चात ब्रिटिश साम्राज्याचा व हिंदुस्थान सरकारचा वाटा काय याविषयी नेमलेल्या वेल्बी कमिशनपुढे गोखल्यांनी डेक्कनसभेच्या वतीने साक्ष दिली. सरकारी प्रकाशनांमधून मिळवलेल्या आकडेवारीचा आधार घेऊन त्यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांवर टीका केली. ब्रिटिशांकडून भारताला मांडलिकत्वाची वागणूक मिळत असल्याने एतद्देशीय उद्यमशीलतेवर त्याचा किती विपरित परिणाम होतो याची सुस्पष्ट मांडणी करताना आपल्या साक्षीत ते म्हणाले,

"सार्वभौम साम्राज्यसत्तेची सेवा करण्याचे जोखड मानेवर ठेवलेल्या मांडलिक

वसाहतीसारखी वागणूक गेली कित्येक वर्षे आम्हाला दिली गेली आहे. जेव्हा जेव्हा गरज पडली तेव्हा तेव्हा आमच्या देशाच्या साधनसंपत्तीचा वापर सार्वभौम सत्तेच्या गरजांची व उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी बिनदिक्कत केला गेला आहे. ज्यामुळे हिंदुस्थानच्या जनतेचे कवडीमोलाचे देखील कल्याण झाले नाही, अशा कितीतरी बाबींवर अब्जावधी रुपये खर्ची पडले आहेत. काही वेळा अशा प्रकारच्या खर्चातून स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या राष्ट्रांना निदानपक्षी, पोकळ का होईना पण, आपण महान, वैभवशाली, जगज्जेते वगैरे आहोत असे वाटून घेण्याचे, आत्मगौरवाचे समाधान तरी मिळते. सांत्वन म्हणून, भरपाई म्हणून ते समाधानही आमच्या वाट्याला येऊ शकत नाही... आयुष्यभर आम्हाला इतकी विषम व कनिष्ठ वागणूक दिली जाते की आम्ही कायम न्यूनगंडाच्या भावनेने पछाडलेले असतो. आमच्यामधील उत्तुंग माणसांनाही पोक काढून आणि कंबरेत वाकून नाइलाजाने चालावे लागते. कारण प्रचलित व्यवस्थेची ती गरज आहे... आमच्या ठायी असलेले युद्धकौशल्य आणि प्रशासननिपुणता यांचा वापर कधीच केला जात नसल्याने या बाबतीतली आमची गुणवत्ता हळूहळू गंजून नष्ट होईल. हरकाम्या आणि सांगकाम्या गड्याची भूमिकाच आमच्या वाट्याला आली आहे." (नंदा,१९८६, पृ. १६२-१६३) वसाहतवादी राजनीतीमुळे एतद्देशीयांची उद्यमशीलता व कार्यक्षमताच कशी समूळ नष्ट होत गेली आहे, याचे प्रखर वास्तव गोखल्यांनी या साक्षीत मांडले. प्रश्नाच्या गाभ्यापर्यंत जाऊन विचार करणे व दूरगामी वर्तनसंस्कृतीच्या प्रभाव-परिणामांचा भविष्यवेध घेण्याची अभ्यासू राजनीतीज्ञाची भूमिका गोखले आरंभापासूनच निभावत होते.

आपल्या संसदीय कारकिर्दीत गोखल्यांनी २६ मार्च १९०२ रोजी वार्षिक अर्थसंकल्पावर केलेले भाषण भारतीयांच्या दारिद्र्याला ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरण कसे कारणीभूत होत आहे, याची परखड मीमांसा करणारे होते. अर्थमंत्री एडवर्ड लॉ यांनी ७० कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला असल्याने अन्य संसदपटूंकडून त्यांची प्रशंसा होत असताना, गोखलेंनी मात्र या अर्थसंकलपावर टीकेची झोड उठवली. दुष्काळ आणि प्लेगच्या आपत्तीने होरपळलेल्या प्रजाजनांवर जमीनमहसूल, आयकर व मीठावरील कर वाढवून सरकारी महसूलात वाढ करणारा अर्थसंकल्प न्यायोचित नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. सरकार मिळणाऱ्या रकमेचा विनियोग शिक्षण, आरोग्य, जलसिंचन अशा लोकोपयोगी प्रकल्पांवर करणार असेल, तर या अर्थसंकल्पाचे स्वागत आणि समर्थन करणे एकवेळ चालले असते; परंतु सरकार जनकल्याणाऐवजी लष्कर, होम चार्जेस आणि रेल्वे कंपन्यांच्या लाभासाठी या रकमेचा विनियोग करणार असल्याने हा अर्थसंकल्प एतद्देशीयांवर दुहेरी अन्याय करणारा असल्याची टीका केली. लष्करावरचा खर्च कमी केला तर करांचे ओझे कमी करता येईल, देशबांधणीच्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध होईल, धंदेशिक्षण व उद्योगउभारणीसाठी तरतूद करता येईल अशी पर्यायी अर्थनीतीही त्यांनी सूचित केली. अर्थसंकल्पावरील या भाषणातून त्यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना थेट आवाहन केले की, "इंग्लिश माणसांना माझे असे सांगणे आहे की, त्यांनी स्वत:ला आमच्या जागी कल्पनेने उभे करावे. तसे त्यांनी केले म्हणजे आमच्या भावना अशा का हे त्यांना उमजेल." संकुचित साम्राज्यवादाऐवजी सर्वांना समभावाची वागणूक देणाऱ्या उदार

साम्राज्यवादी वृत्तीला इंग्रजांनी जागावे,अशा आशयाचे आवाहन त्यांनी आपल्या भाषणातून केले. भारतीय अर्थव्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या ब्रिटिशांच्या या मतलबी अर्थनीतीचे वाभाडे काढल्याबद्दल कलकत्त्याच्या 'अमृतबझार' पत्रिकेने गोखल्यांचे अभिनंदन करून म्हटले होते की, "For the first time in the annals of British rule in India, a native of India has not only succeeded in exposing the fallacies which underlie these Government statements, but has ventured to do it in an uncompromising manner." ( Nanda,1977, p. 138)

'इंडियन डेली न्यूज' या ब्रिटिश मालकीच्या वृत्तपत्रानेही गोखल्यांचे भाषण सभागृहात बॉंबस्फोट व्हावे इतके घणाघाती असल्याची गौरवास्पद नोंद घेतली होती. (नंदा, १९८६, पृ. २२२) समकालीन अर्थतज्ज्ञ रोमेशचंद्र दत्त यांनी गोखल्यांना पत्र लिहून त्यांचे अभिनंदन केले. देशकार्यात उतरलेल्या नामवंत मंडळीत सर्वांत समर्थ, अग्रगण्य पुढारी म्हणून गोखल्यांचे नेतृत्व उदयाला येत असल्याचा विश्वास रोमेशचंद्र दत्त यांनी या पत्रातून व्यक्त केला होता. (नंदा, कित्ता, पृ. २२१) गोखल्यांच्या या सुस्पष्ट भाषणाचा थेट परिणाम १९०३ च्या अंदाजपत्रकात दिसून आला. सरकारने मिठावरील कर कमी केला, आयकराची करपात्र उत्पन्नाची पातळी वाढवली. व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांचा गोखल्यांच्या इंपीरिअल लेजिस्लेट्विह कौन्सिलमधील भूमिकेविषयीचा पुढील अभिप्राय त्यांच्या राजकीय कार्यशैलीवर प्रकाश टाकणारा आहे :

"मला वाटते, पाच-सहा वर्षे, मि. गोखले माझ्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद होते. त्या सर्व काळात ते कायमचे आणि अटळपणे सरकारच्या विरोधात होते असे मी म्हटले तर ते चूक होणार नाही. मी अध्यक्षपद भूषवीत असलेल्या इंपीरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधील ते विरोधी पक्षनेते होते असे त्यांचे वर्णन मी करू शकेन. विरोधी पक्षनेते या नात्याने त्यांच्या टीकेचे घाव मला अनेकवार सहन करावे लागत. या देशात आपण पार्लमेंटच्या सभासदांमध्ये जी गुणसंपदा आवश्यकपणे असावी असे मानतो, ती गोखल्यांच्या ठिकाणी जेवढी मला आढळली तेवढी अन्य कोणत्याही देशाच्या माणसामध्ये मला आढळलेली नाही, असे विधान मी करू इच्छितो. जगातील कोणत्याही पार्लमेंटमध्ये त्यांनी उच्च स्थान प्राप्त केले असते अशी माझी खात्री आहे." (नंदा, कित्ता, पृ. २२५)

१९०३ साली मध्यवर्ती कायदेमंडळात विद्यापीठ आयोगाच्या अहवालावर चर्चा करताना गोखल्यांनी विद्यापीठांची स्वायत्तता नष्ट करण्याच्या भूमिकेवर टीका केली. कुठल्याही परिस्थितीत विद्यापीठांचे सरकारीकरण होता कामा नये, अशी त्यांची ठाम भूमिका होती. अर्थात इंग्रज सरकारने गोखल्यांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून १९०४ साली हे विधेयक मंजूर केले. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक मंजूर व्हावे यासाठी गोखल्यांनी मनापासून प्रयत्न केला, परंतु ब्रिटिशांनी तेही विधेयक मंजूर होऊ दिले नाही. जातिभेद नष्ट व्हावेत व दलितोद्धार व अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नांना भारतीय राजकारणात अग्रस्थान द्यावे यासाठीही गोखल्यांनी पुढाकार घेतला होता. २७ एप्रिल १९०३ रोजी धारवाडला झालेल्या सामाजिक परिषदेत दलितोद्धाराचा ठराव मांडताना त्यांनी या प्रश्नाची मानवी मूल्यांच्या संदर्भात सामाजिक

मीमांसा केली. दलितोद्धार हा आपला राष्ट्रीय स्वार्थ समजून ह्या प्रश्नात आपण सर्वांनी लक्ष घालावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपल्या भूमिकेची मांडणी करताना ते म्हणाले होते, "आपण कुत्रे, मांजरे किंवा दुसरी जनावरे यांना स्पर्श करायला कचरत नाही; परंतु या मानवांचा स्पर्श अपवित्र मानला जातो. आज हा वर्ग वृत्तीने इतका खालावला आहे की, त्यांना अशा वागणुकीची चीड येत नाही.. हा प्रश्न माणुसकीचा आहे. दलितोद्धार हा राष्ट्रीय स्वार्थ आहे. फार मोठी लोकसंख्या असलेल्या दलितांना अज्ञान, अवनती व रानटी स्थितीमध्ये राहू देऊन आपण जगातील दुसऱ्या देशांच्या पंगतीस बसणे निरर्थक होय. दलितांचे नैतिक व बौद्धिक उन्नयन केल्याखेरीज ते राष्ट्रउभारणीच्या कार्यात सहभागी होणार नाहीत. राष्ट्रकार्याला या बांधवांची मदत लाभणे गरजेचे होय." (फाटक,१९६७,पृ.३६०-३६३) दलितोद्धारात सुशिक्षितांची जबाबदारी सर्वात जास्त असल्याचीही गोखल्यांनी जाणीव करून दिली होती.

## लॉर्ड कर्झन आणि ना. गोखले :

१९०१ ते १९०५ या काळात लॉर्ड कर्झन भारताचे व्हाइसरॉय होते. कर्झनची कारकीर्द वादग्रस्त होती. सुरुवातीला कर्झनने तलवारीच्या जोरावर संपादित केलेले राज्य न्यायाच्या बळावर राखण्याची भूमिका घेतली होती. त्यादृष्टीने कर्झनने काही विधायक पावले उचलली होती. त्यांच्या कारकिर्दीत दुष्काळाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी 'फॅमिन कमिशन'ची नियुक्ती करण्यात आली, शेतीउद्योगाचा विस्तार करण्यासाठी 'इरिगेशन कमिशन' नेमले गेले, शेती हस्तांतरविरोधी कायदा करून शेतकऱ्यांना संरक्षण पुरविण्यात आले. दळणवळणाच्या सेवांचा विस्तार करण्यासाठी 'रेल्वे बोर्डा'ची नेमणूक, अर्थव्यवहाराला गती देण्यासाठी व्यापार आणि उद्योग व खाणी अशी दोन स्वतंत्र मंत्रालये स्थापन करण्यात आली. ग्रामीण हस्तोद्योगांना उत्तेजन देणाऱ्या योजना आखण्यात आल्या. देशातील प्राचीन व ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात आली. मात्र असे असूनही कर्झनच्या हडेलहप्पीपणामुळे त्यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली. कॉंग्रेसविषयी कर्झनचे मत नकारात्मक होते. कॉंग्रेसमधील सुशिक्षित मंडळी रयतेपासून तुटलेली आहेत असे त्यांचे मत होते. कॉंग्रेसपासून राज्याला स्वाभाविक धोका असल्याची त्यांची समजूत असल्याने राष्ट्रसभेला निकामी बनवणे हे त्यांचे धोरण राहिले होते. (कर्झन यांचे एम्प्टहिल यांना पत्र, १५ जून १९०३; उद्धृत– नंदा,१९८६, पृ.२७८) कर्झनच्या मते महाराष्ट्रीयन ब्राह्मण ब्रिटिशांशी सामना करणाऱ्यांमध्ये जगात सर्वात अधिक कर्तबगार व धोकेबाज जमात आहे. या समाजाची एकजूट व बळ वाढेल अशा प्रकारची कुठलीही कृती करण्यास आपला सक्त विरोध राहील असा युक्तिवाद कर्झनने केला होता. गोखले केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य होते; परंतु कर्झनला गोखल्यांविषयी प्रेम नव्हते. गोखल्यांनी 'भारत सेवक संघा'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला तेव्हा इंग्रज सरकारचा अकारण रोष ओढवून घेऊ नये या उद्देशाने समाजाच्या स्थापनेमागची भूमिका मुंबईच्या गव्हर्नरच्या खाजगी सचिवांमार्फत गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन यांना कळविली. गव्हर्नरने लॉर्ड कर्झन यांना याबाबतचा सविस्तर वृत्तांत पाठविला. देशासाठी स्वार्थत्याग

करणाऱ्या तरुणांचा भातृसंघ निर्माण करण्याची गोखल्यांची भूमिका असल्याचे स्पष्ट केले. मात्र कर्झन यांनी लॉर्ड लॅमिंग्टनला पाठविलेल्या उत्तरात गोखले अप्रामाणिक असून 'भारत सेवक संघ' नामक भातृसंघ स्थापन करण्याची भूमिका ही निव्वळ ढोंगबाजी असल्याची प्रतिक्रिया दिली. एकीकडे आपण इंग्रजी राज्याला एकनिष्ठ आहोत असे म्हणायचे आणि त्याचवेळी हिंदुस्थानातील लोकांच्या ठिकाणी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी भातृसंघ स्थापन करायचा हा गोखल्यांचा दुटप्पीपणा असल्याचे मत कर्झनने मुंबईच्या गव्हर्नरना कळवले होते. (नंदा, १९८६, पृ. २६८-२६९)

बंगालची फाळणी हा कर्झनच्या कुटील राजनीतीचा भाग होता. बंगालची फाळणी केल्याने तेथील हिंदू भद्रलोक समाजाचे आपोआप विभाजन होईल असा त्यांचा डाव होता. (नंदा, कित्ता, पृ. २९१) बंगालच्या फाळणीपूर्वी प्रशासकीय सोयीसाठी वऱ्हाड मुंबई प्रांतास जोडण्याची सूचना आली होती, तेव्हा कर्झनने त्यास त्यामुळेच विरोध केला होता. बंगालची फाळणी झाली तेव्हा गोखले इंग्लंडला होते. फाळणीच्या निर्णयामुळे बंगालात असंतोष पसरला. इंग्रजी सत्तेवर भारतीय जनतेने बहिष्काराचे अस्त्र परजून लोकचळवळ उभी केली. गोखल्यांनी लंडनमध्ये सार्वजनिक व्यासपीठांवरून व्याख्याने देऊन वंगभंग चळवळीचे जोरदार समर्थन केले. सात आठवड्यात ४५ सभांमध्ये त्यांनी भाषणे दिली. मँचेस्टरला दिलेल्या व्याख्यानात इंग्लंडमधील नागरिकांना आवाहन करताना ते म्हणाले होते,

"ब्रिटिश कापडावरील बहिष्काराचा फटका तुम्हाला बसला आहे याची मला कल्पना आहे. (अर्थात्) हिंदुस्थानसरकार, भारतमंत्री आणि ब्रिटिश पार्लमेंट यांच्याकडे बंगाली लोकांनी दाद मागूनही त्यांचे कोणी ऐकले नाही तर त्यांनी काय करावे? सहा हजार मैलांवरील तुम्हा मतदारांचे लक्ष वेधणे फार अवघड आहे याचा त्यांना अनुभव आहे, तुम्ही संतापला आहात याची मला खंत नाही, ते इष्टच आहे. मात्र तो राग असाहाय्य रयतेकडे न वळता हिंदुस्थानातल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे वळू द्या." (पळशीकर, १९८६, पृ. ५५) हिंदुस्थानातल्या नोकरशाहीवर त्यांनी आपल्या भाषणातून टीका केली. सुशिक्षित वर्गाचा दु:स्वास आणि पोलीस खात्याचा वृत्तांत एवढेच त्यांच्या लेखी लोकशाहीचे आधार आहेत. नोकरशाहीवर कोणाचे नियंत्रण नसल्याने प्रशासनात मनमानीपणा वाढला आहे. त्यामुळे नोकरशाहीला जाब विचारणारी यंत्रणा हिंदुस्थानातच निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी पटवून दिले. नेमस्त शैलीत मुद्द्यांवर बोट ठेवून मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी इंग्लंडात व्याख्याने दिली. स्वातंत्र्यावर अधिष्ठित राज्यघटना असणाऱ्यांनी आपल्या परंपरेशी इमान राखून हिंदुस्थानात राज्यकारभार करावा एवढीच आपली मागणी असल्याचे नम्र आवाहन आपल्या भाषणांतून केले. इंपीरिअल कौन्सिलमधील लोकनियुक्त प्रतिनिधींचे प्रमाण वाढवावे, अंदाजपत्रकात कौन्सिलच्या सभासदांना उपसूचना मांडण्याचा अधिकार द्यावा असे नेमस्त पर्यायही त्यांनी सुचविले.

बंगालच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर देशभर इंग्रजी मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ गोखल्यांना मान्य नव्हती. यामुळे इंग्रजी अर्थकारणावर थेट परिणाम होईल व ब्रिटिशांचा फार

मोठा रोष आपण ओढवून घेऊ अशी त्यांना भीती वाटत होती. बहिष्काराची चळवळ हे आत्मघातकीपणाचे लक्षण आहे, अशी त्यांची समजूत होती. याउलट या चळवळीतून स्वराज्याच्या दिशेने वाटचाल करण्याचा मार्ग प्रशस्त होईल, अशी लो. टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल इत्यादी जहाल नेत्यांची धारणा होती. मात्र हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनी मांडलेल्या कैफियतीकडे दुर्लक्ष करून ब्रिटिशांनी १६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगालची फाळणी केली. संपूर्ण बंगालात सुतक पाळण्यात आले. आता राजकीय मागण्या करण्यापेक्षा खरेखुरे स्वराज्य प्राप्त करण्यासाठीच संघर्ष करावा अशी लोकभावना निर्माण झाली. गोखल्यांनी तर कर्झनला थेट 'औरंगजेबाची'च उपमा दिली.

हिंदुस्थान सरकारने आपल्या राज्यकारभारात कायद्याचा बडगा उगारण्यापेक्षा नैतिकतेला केंद्रस्थानी ठेवून राज्यप्रशासन चालवावे, अशी गोखल्यांची धारणा होती. ४ डिसेंबर १९०३ रोजी गुप्तचर कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयक कायदेमंडळात मांडण्यात आले, तेव्हा ना. गोखल्यांनी या दुरुस्तीला विरोध करणारे मुद्दे मांडले. या विधेयकामुळे नौदल व लष्करी क्षेत्रांखेरीज नागरी क्षेत्रांतही निर्बंध अधिक जाचक केले जाणार होते. त्याचा परिणाम प्रामुख्याने वृत्तपत्रांवर होणार होता. सरकारी कार्यालयात परवानगी न घेता गेल्यास अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याचे अधिकार प्रशासनाला मिळणार होते, वृत्तपत्राच्या संपादकांवर निर्बंध वाढविण्यासाठी नोकरशाहीकडून या विधेयकाचा वापर होण्याचा धोका होता. त्यामुळे ना. गोखले यांनी कायदेमंडळात आपली भूमिका मांडताना म्हटले होते की, "The responsibility of the Government to the people in this country is merely moral; it is not legal, as in the West. There is no machinery here, as in Western Countries, to secure that the interests of the general public will not be sacrificed in favour of a class. The criticism of the Indian Press is the only outward check operating continuously upon the conduct of a bureaucracy, possening absolute and unacontrolled power." वृत्तपत्रे ही शासनाइतकेच लोकहिताचे रक्षक असल्याची भूमिका मांडताना गोखल्यांनी कायदेमंडळाला सांगितले की, "The Press is, in one sense, like the Government, a costodiun of public intrests, and any attempt to hamper its freedom by repressive legislation is bound to affect those intrests, prejudicially, and cannot fail in the end to react upon the position of the Government itself."(लेले,१९८४,पृ.४३४-४३५) अर्थात सरकारने गोखल्यांच्या ह्या निवेदनावर कुठलाच सकारात्मक विचार न करता हे दुरुस्ती विधेयक मंजूर केले.(शासनाच्या ह्या धोरणाचा फटका महाराष्ट्रातल्या वृत्तपत्रसृष्टीला बसलाच, त्याची चर्चा इतरत्र संदर्भान्वये केली आहे.)

१९०५ साली डिसेंबर महिन्यात बनारसला गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. अधिवेशनाला बंगालच्या फाळणीमुळे निर्माण झालेल्या उग्र असंतोषाची पार्श्वभूमी होती. विदर्भ, महाराष्ट्र, पंजाब, सेंट्रल प्रॉव्हिन्सच्या प्रतिनिधींचा

बंगालच्या संतप्त लोकभावनेला पाठिंबा होता. 'स्वदेशी'चा पुरस्कार, ब्रिटिश मालावर बहिष्कार, सविनय कायदेभंग या मुद्द्यांवर जोर दिला जात होता. त्यामुळे काँग्रेसमध्ये सरळ सरळ दोन तट पडले होते. जहाल बंडखोर आणि समन्वयवादी नेमस्त यांच्यात समतोल साधणारी भूमिका गोखल्यांनी मोठ्या कौशल्याने निभावली. जबाबदार प्रातिनिधिक राज्यसत्ता प्रस्थापित केली जावी ह्या मुद्द्यावर राष्ट्रसभा ठाम असल्याची मांडणी गोखल्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केली. ब्रिटिश नोकरशाहीने हिंदी सुशिक्षितांच्या हातात सत्ता सोपविण्याची आता वेळ आली आहे, याचा स्पष्ट निर्देश केला. राजकीय सुधारणा करून कायदेकौन्सिलात लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण वाढवावे असे आवाहनही त्यांनी सरकारला उद्देशून केले. इंग्लंडात लिबरल पक्षाचे सरकार येणार असल्याने या अपेक्षांची पूर्ती होईल असा आशावादही त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. या अधिवेशनात मंजूर झालेल्या ठरावात कायदेकौन्सिलचा विस्तार, लष्करी खर्चात कपात, प्रशासकीय सेवेत एतद्देशीयांना प्राधान्य, पोलीस व जमीनमहसूल खात्यातल्या सुधारणा यांचा समावेश होता.

१९०५ साली इंग्लंडला निवडणूकीत लिबरल पक्ष विजयी झाला. मोर्ले हे भारतमंत्री झाले. मिंटो हे कर्झन यांच्या जागी भारताचे व्हाइसरॉय झाले. ३० जानेवारी १९०६ रोजी गोखल्यांची व व्हाइसरॉय मिंटो यांची भेट झाली. गोखले आणि मिंटो यांचे सूर जुळले. मार्च महिन्यात अंदाजपत्रकीय अधिवेशनात गोखल्यांनी खदखदणाऱ्या राजकीय प्रश्नांना हात घालण्याऐवजी काही विधायक प्रस्ताव सुचविण्याची मुत्सद्देगिरी केली. दुष्काळी भागात जमीन महसूलात व मिठाच्या करात कपात करावी, ग्रामीण भागात पिण्याचे पाणी व सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या सुविधा पुरवाव्यात, प्राथमिक शिक्षणाचा विस्तार व धंदेशिक्षणाच्या शाळा काढाव्यात असे जनकल्याणाचे प्रस्ताव मांडले. करांच्या उत्पनातून या सुविधांसाठी खर्च करावा हेही सुचविले; मात्र त्याचवेळी कराच्या उत्पन्नातला पैसा रेल्वेमार्गाच्या विस्तारासाठी वापरण्याऐवजी त्यासाठी वेगळी कर्जाऊ रक्कम उभारण्याचा सोयीस्कर सल्लाही दिला. समकालीन आंतरराष्ट्रीय संदर्भ नोंदवून हिंदुस्थानातल्या अर्थव्यवस्थेची नवी दिशा काय असावी हे मांडण्याचा गोखल्यांनी प्रयत्न केला. रशियाकडून संभाव्य आक्रमणाचा धोका कल्पून सैन्यावर खर्च करण्याची ब्रिटिश नीती रशियन राज्यक्रांतीनंतर बदलायला हवी असा युक्तिवाद केला. जपानचा दाखला देऊन हिंदुस्थानच्या लष्करातील विसंगतीही त्यांनी दाखवून दिल्या. जपान लष्करावर ६ कोटींपेक्षा कमी खर्च करत असूनही त्यांच्याकडे १,६७,००० खडे सैन्य आहे; याउलट जपानपेक्षा सहा पट लष्करावर खर्च करणाऱ्या हिंदुस्थानकडे केवळ २,३०,००० खडे सैन्य आहे; हिंदी लोकांना लष्करात सन्मानाच्या जागा दिल्या जात नाहीत याविषयीची नापसंतीही त्यांनी व्यक्त केली. आपल्या भाषणात कुठेही कटुता न आणता सौहार्दपूर्ण शब्दांत गोखल्यांनी मांडणी केल्याने, त्यांच्या भाषणाविषयी अनुकूल प्रतिक्रिया उमटल्या.

अंदाजपत्रकीय अधिवेशनानंतर १४ एप्रिल १९०६ रोजी गोखले इंग्लंडला निघाले. ११ जून १९०६रोजी ते इंग्लंडला पोहचले. या दौऱ्यात त्यांनी बर्मींगहॅमच्या शांतता परिषदेत सहभाग घेतला. ११ जून १९०६ रोजी ईस्ट इंडिया असोशिएशनपुढे हिंदुस्थानला स्वराज्याचे

अधिकार का द्यावेत याविषयी सुसंगत मांडणी करणारे भाषण दिले. हिंदुस्थानात स्वराज्याचे अधिकार वापरण्यासाठी लोक अद्याप पात्र नाहीत, हा गैरसमज पुसून टाकण्यावर त्यांचा मुख्य भर होता. देशातल्या ३० कोटी लोकसंख्येपैकी १० लाख लोक इंग्रजी विद्या शिकलेले उच्चविद्याविभूषित असून देशाचा राज्यकारभार सांभाळण्याची पात्रता त्यांच्या अंगी असल्याचा निर्वाळा त्यांनी आपल्या भाषणातून दिला. ही सुशिक्षित मंडळी देशात वृत्तपत्रे चालवीत असून या माध्यमातून जनमत संस्कारित करण्याचे कार्य करीत आहेत, हिंदुस्थानाल स्वराज्याचे अधिकार उपभोगणारी सन्माननीय वसाहत असावी एवढीच एतद्देशीयांची मागणी आहे, व ती ब्रिटिशांनी पुरवावी यासाठी ब्रिटिशांची मनधरणी करण्याचे काम गोखले करीत होते. मोर्ले व मिंटो यांच्याकडे शिष्टाई करून राजकीय सुधारणांचा हप्ता पदरात पाडून घेण्यासाठी गोखले सातत्याने प्रयत्न करीत होते. राजकीय सुधारणांचा कायदा आणावा यासाठी १९०५ ते १९०८ या काळात त्यांनी लंडनला जाऊन ब्रिटनचे १५० संसद सदस्य, भारतमंत्री जॉन मोर्ले, इंग्लंडचे पंतप्रधान, वृत्तपत्रांचे संपादक यांच्या भेटी घेऊन भारतीय जनतेच्या राजकीय अपेक्षांची प्रस्तुतता विशद करण्याचे अवघड काम अंगावर घेतले. त्यामुळे मोर्ले-मिंटो सुधारणांच्या कायद्याचे बहुतांश श्रेय गोखल्यांना जाते. पुणेकरांनी गोखल्यांच्या या पुढाकाराचे उत्स्फुर्त स्वागत केले. इंग्लंडहून परत आल्यावर त्यांची पुण्यात भव्य मिरवणूक काढण्यात आली. गायकवाडवाड्यात टिळकांबरोबर गोखल्यांनी चर्चा केली. १९०६ साली इंग्लंडला लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला होता, त्याचा फायदा घेऊन गोखल्यांनी या विधेयकाच्या मंजुरीसाठी भूमी नांगरण्याचे काम केले. त्याचा परिणाम होऊन रॉयल कमिशन नेमले गेले.

१९०७ साली १८५७ च्या बंडाला ५० वर्षे पूर्ण झाली. त्याचे स्मरण जागविण्यासाठी पंजाबात चळवळ सुरू झाली. लाला लजपतराय, अजितसिंग या पंजाबी नेत्यांवर हद्दपारीचा हुकूम जारी झाला. गोखल्यांनी त्याविरुद्ध सरकारदरबारी आवाज उठविला. सरकारने राजद्रोहात्मक सभांवर दंडात्मक कारवाई करण्याचा वटहुकूम जारी केला व कलकत्त्याच्या विधिमंडळात विषय येण्याआधीच सिमल्याला ऑक्टोबर महिन्यात घाईघाईने त्याचे कायद्यात रूपांतर केले. वैधानिक नियम-परंपरांना बाजूला सारून कायदे करण्याच्या ह्या पद्धतीवर गोखल्यांनी आक्षेप घेतला. १९१० साली या विधेयकाला तीन वर्षे पूर्ण झाल्यावर पुन्हा एकदा मुदतवाढीसाठी हे विधेयक विधिमंडळात ठेवण्यात आले; तेव्हाही गोखल्यांनी आपला निषेधाचा सूर कायम ठेवला. मुद्रण निर्बंधाच्या कायद्याचे विधेयक १९१० साली चर्चेला आल्यावर या विधेयकामुळे वृत्तपत्रस्वातंत्र्याची हानी होणार असल्याने या विधेयकालाही त्यांनी जोरदार विरोध केला. अर्थात, बहुमताच्या जोरावर सरकार विधेयक मंजूर करणार हे माहीत असल्यामुळे विधेयक मंजुरीच्या वेळी सभागृहात अनुपस्थित राहून गोखल्यांनी आपली नापसंती व्यक्त केली. १९१० व १९११ साली त्यांनी स्वत: मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक मांडले. दहा रुपयांपर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण देण्याविषयीचे हे विधेयकही नामंजूर झाले.

**रॉयल कमिशन :**

रॉयल कमिशनवर लॉर्ड इस्लिंग्टन यांची अध्यक्षपदी व एम. एस. डी. बटलर या आय. सी. एस. अधिकाऱ्याची चिटणीसपदी नेमणूक झाली. सदस्य म्हणून लंडन टाइम्सचे संपादक व्हॅलेंटाईन चिरोल, लॉर्ड आयलिंग्टन, मि. मॅकडॉनल्ड, मि. फिशर यांची नेमणूक करण्यात आली. भारतमंत्री मोर्ले यांनी या इंग्रज सभासदांबरोबरच गोपाळ कृष्ण गोखले यांचीही रॉयल कमिशनवर नेमणूक केली. मुस्लीम सभासद म्हणून अब्दुल रहीम यांची नेमणूक झाली. गोखल्यांच्या नेमणुकीविषयी मात्र इंग्रज अधिकाऱ्यांमध्ये विश्वासाची भावना नव्हती. व्हाइसरॉय हार्डिंग यांना गोखले हे इंग्रजांच्या राजनीतीच्या दृष्टीने धोकेबाज ठरण्याची शक्यता वाटत होती. त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर क्लार्क यांना लिहिलेल्या पत्रात हार्डिंग यांनी हा अभिप्राय स्पष्ट शब्दांत नोंदवला होता. इंपिरियल कौन्सिलमध्ये जिल्हा कौन्सिलच्या प्रस्तावावरील चर्चेत बोलताना गोखल्यांनी 'आम्हाला सत्ता हवी, आणि आम्ही ती मिळवू' अशा शब्दांत जो आक्रमक बाणा दाखविला होता, त्याची आठवण करून देत हार्डिंग यांनी गोखल्यांविषयी वाटणाऱ्या अविश्वासाची त्या पत्रात चर्चा केली होती. गोखल्यांची नियुक्ती करण्यास आपला विरोध असल्याचे मत हार्डिंग्ज यांनी भारतमंत्र्यांनाही कळविले होते. हिंदुस्थान सरकारच्या कायदेमंडळात फायनान्स मेंबर म्हणून कार्यरत असलेल्या प्लीटवुड विल्सन यांनी मात्र व्हाइसरॉय हार्डिंग्ज यांना पत्र लिहून रॉयल कमिशनमध्ये गोखल्यांच्या नावाची शिफारस करण्यात यावी, असे सुचविले होते. गोखल्यांना कमिशनच्या कामात गुंतवून ठेवले तर 'गव्हर्नर जनरल इन कौन्सिलची आपली कारकीर्द तेवढीच सुखकर जाईल असेही त्यांनी आपल्या पत्रात लिहिले होते. (नंदा, १९८९,पृ. ५७८-५७९) तत्कालीन उपभारतमंत्री एडविन मॉंटेग्यू यांचे मात्र गोखल्यांविषयी अनुकूल मत होते. इंग्लंडमध्ये त्यांच्या गाठी-भेटी झाल्या होत्या. गोखले यांची रॉयल कमिशनवर नेमणूक होण्यात या सौहार्दपूर्ण संबंधांचाही वाटा होता. गोखल्यांविषयी भारताच्या व्हाइसरॉयच्या वर्तुळात प्रतिकूल मत असले तरी गोखल्यांनी आपल्या नेमस्त स्वभावातून भारतमंत्री मोर्ले आणि त्यांचे उत्तराधिकारी म्हणून त्या पदावर आलेले लॉर्ड क्र्यू यांच्या नित्य गाठी-भेटी घेऊन चर्चा-संवाद साधण्याचे व्रत निभावले व राजकीय सुधारणा पदरात पाडून घेण्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार करण्याचे काम केले. लेडी हार्डिंग यांनी मात्र गोखल्यांच्या इंग्लंडमधील वास्तव्यावर शेरेबाजी करताना म्हटले होते की, "गोखले अगदी ऐटबाज इंग्लिश पोषाख करतात. फ्रॉक कोट, उंच हॅट, पेटंट लेदर बुट आणि सगळे काही. इथे ते एक गोरे साहेबच शोभतात; धनाढ्य पोर्तुगीज पेढीवालेच जणू.. स्वारी इथे चांगलीच धमाल उडवून देत असणार." ( ५ जून १९१२ चे पत्र, उद्धृत, नंदा, कित्ता, पृ. ५८२) याउलट गोखल्यांनी 'नाइट कमांडर ऑफ ब्रिटिश एम्पायर' हा ब्रिटिश सरकारने देऊ केलेला किताब नाकारून साधेपणात समाधान मानण्याची आपली भूमिका स्पष्ट केली होती. सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या आजीव सेवकांनी साधेपणाने जीवन व्यतीत करण्याची शपथ घेतली होती; त्यामुळे 'सर' हा किताब स्वीकारणे या प्रतिज्ञेशी विसंगत ठरेल असे त्यांनी नम्रपणे कळवले होते. मात्र प्रकृती साथ देत नसतानाही गोखले यांनी रॉयल कमिशनच्या कामात

स्वत:ला झोकून दिले होते.

१९१२ साली गोखल्यांची पब्लिक सर्व्हिस कमिशनवर नेमणूक झाली. या नेमणुकीमुळे गोखल्यांना आतल्या प्रशासकीय गोटात काम करण्याची संधी मिळाली. रॉयल कमिशनच्या कामात त्यांना याचा फायदा झाला. रॉयल कमिशनचे सभासद चिरोल, रोनाल्डशे, हिमिक मॅज यांचा दृष्टिकोन सनदी नोकरशाहीला अनुकूल होता. व्हाइसरॉय हार्डिंग यांचा मात्र सनदी प्रशासन सेवेत हिंदी लोकांना सामावून घेण्यास विरोध होता. रॉयल कमिशनचे अध्यक्ष इसलिंग्टन यांना १ सप्टेंबर १९१३ रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांनी सनदी सेवेतील युरोपियनांच्या संख्येत एकानेही घट होणे आपल्याला मंजूर नसल्याचे कळविले होते. (नंदा, १९८६, पृ. ६२४) हिंदी सनदी सेवेत हिंदवासीयांना ३५ ते ४० टक्के वाटा मिळायला हवा अशी गोखल्यांची भूमिका होती. मात्र ब्रिटिश सभासदांची २५ टक्क्याहून अधिक जागा द्यायची तयारी नव्हती. हिंदी व युरोपियनांचे सनदी सेवेतले समान प्रमाण आणि समान वागणूक या तत्त्वाला ब्रिटिशांचा विरोध होता. दरम्यान १९१४ साली पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाल्याने हा विषय मागे पडला. महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनी गोखल्यांना अत्यावश्यक व त्वरित अमलात आणता येतील अशा घटनात्मक सुधारणांचा आराखडा तयार करण्याचे सुचविले. त्याप्रमाणे संविधानक सुधारणांचा प्राथमिक आराखडाही गोखल्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी १७ फेब्रुवारी १९१५ रोजी लिहून काढला. 'गोखल्यांचे राजकीय मृत्यूपत्र' या नावाने या आराखड्याचा उल्लेख होतो. या आराखड्यात गोखल्यांनी सुचविलेल्या राजकीय सुधारणांचा सारांश असा :

१. प्रांतनिहाय भारतीय लोकप्रतिनिधींचा समावेश असलेली विधिमंडळे स्थापन करावीत. प्रांतिक विधिमंडळात ७० ते १०० सभासद असावेत. एकूण सभासदांपैकी ४/५ म्हणजे ८० टक्के सभासद लोकांनी निवडून दिलेले असावेत. मुंबई इलाख्यात प्रत्येक जिल्ह्यातून नगरपरिषदांनी १ व जिल्हा आणि तालुका बोर्डांनी २ उमेदवार निवडावेत; मुंबई शहराने १० प्रतिनिधी निवडावेत; कराची, अहमदाबादच्या गिरणीमालकांनी प्रत्येकी १ प्रतिनिधी निवडावा; दख्खनच्या सरदारांतून १ प्रतिनिधी पाठवावा; मुसलमान, लिंगायत समाजाचा किमान एक प्रतिनिधी असावा. विधिमंडळात कायदे करण्याचे व जमाखर्चास मान्यता देण्याचे काम व्हावे.
२. प्रांताचे कार्यकारी मंडळ असेल. या प्रांतिक सरकारांना अंतर्गत स्वायत्तता असावी. कार्यकारी मंडळ विधानमंडळाला जबाबदार असू नये; मात्र कार्यकारी मंडळाने सभागृहात मांडलेल्या कायद्यांना, त्यातील दुरुस्त्यांना आणि अर्थसंकल्पाला विधानमंडळाची संमती घेणे बंधनकारक असावे.
३. प्रांतिक सरकारांना कर बसविणे, कर्जे काढण्याचे वित्तीय अधिकार असावेत.
४. प्रांतिक गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळात तीन युरोपीय व तीन हिंदी सभासद असावेत. ब्रिटिश गव्हर्नरला जरूर तेथे नकाराधिकार वापरण्याचा अधिकार असेल.
५. केंद्रीय विधिमंडळाने केलेले कायदे प्रांतांना लागू असावेत. प्रांताच्या हितासाठी जरूर

पडल्यास प्रांतिक विधिमंडळाला डावलून केंद्रीय विधिमंडळाने कायदे करावेत.
६.भारतमंत्र्यांना सल्ला देणारे लंडनचे विद्यमान सल्लागार मंडळ बरखास्त करावे.
७. ब्रिटनच्या इतर वसाहतींप्रमाणे हिंदुस्थानच्या वसाहतीचे स्थान राहावे.

गोखल्यांना हा मसुदा फिरोजशहा मेथा व आगाखान यांना दाखवून त्यांच्याशी सल्लामसलत करण्याची इच्छा होती; मात्र आराखडा लिहून झाल्यावर दोन दिवसांनी त्यांचे निधन झाले. गोखल्यांनी मसुद्यात सुचविलेल्या सुधारणा अर्थातच नेमस्त होत्या; पण त्यावेळच्या सुशिक्षितांच्या मनातल्या आकांक्षांचे त्यात प्रतिबिंब पडले होते, असे म्हणता येईल. पुढे मोर्ले-मिंटो सुधारणा या नावाने प्रसिद्ध असलेल्या राजकीय सुधारणांत गोखले यांच्या या प्रस्तावातले बरेच मुद्दे स्वीकारले गेल्याचे दिसते.

## १.४. भारत सेवक समाज : स्थापना व वाटचाल

धर्म, वर्ण, लिंग आणि जातिभेदाच्या भिंती तोडून धर्मनिरपेक्ष मानवी मूल्यांचे जागरण करण्यासाठी गोखल्यांनी १९०५ साली 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी' स्थापन केली. 'भारत सेवक समाज' या नावाने ही संस्था ओळखली जाते. (स्वातंत्र्योत्तर काळात 'भारत सेवक समाज' या नावाची स्वतंत्र संस्था नोंदवली गेल्याने शासकीय नोंदीत 'सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी'चे वर्तमान नाव मात्र 'हिंद सेवक समाज' असे आहे. महाराष्ट्रात 'भारत सेवक समाज हेच नाव रूढ झाले आहे.) हिंदुस्थानात स्वराज्य स्थापन करणे हे सोसायटीचे ध्येय होते. ते साध्य करण्यासाठी वैराग्यशील वृत्तीने देशकार्य करणाऱ्या मिशनरी तरुणांची पिढी घडविण्याचे स्वप्न गोखल्यांनी पाहिले होते. व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनाला आध्यात्मिक मूल्य असावे ('public life must be spiritualised) या भूमिकेतून सोसायटीच्या ब्रीदवाक्यातच 'राष्ट्रीय मिशनरी' हा शब्दप्रयोग करण्यात आला होता. (पाध्ये-टिकेकर,१९३५,पृ.२०५-२०६) स्वार्थत्यागावर अधिष्ठित सामाजिक काम करण्यावर या संघटनेचा भर होता. त्यामुळे शुद्धाचरण, चारित्र्यसंपन्नता, देशभक्ती, सामाजिक सलोखा आणि त्यागाच्या मूल्यांची जोपासना हे व्रत घेऊन काम करणाऱ्या प्रशिक्षित युवकांची संघटना बांधणे हा सोसायटीचा अग्रक्रम ठरविण्यात आला होता. संस्थेच्या कार्यपद्धतीनुसार सोसायटीच्या कामात सहभागी होणाऱ्या तरुणांना आपल्या कामाशी वचनबद्ध रहाण्याकरिता सात प्रतिज्ञा घ्याव्या लागत. सभासदांनी लग्न करण्यास हरकत नव्हती, मात्र कुटुंबासह सोसायटीच्या निवासस्थानी रहाण्यास अनुमती नव्हती. स्वत: गोखल्यांच्या दोन मुली त्यांच्या विधवा आत्याबरोबर सोसायटीच्या बाहेर वेगळ्या घरात रहात. उमेदवारी करणाऱ्या सभासदास निर्वाहासाठी मासिक ३० रुपये व पूर्ण वेळ सेवकास मासिक ५० रुपये निर्वाहवेतन देण्यात येत असे. पाच वर्षांनंतर निर्वाहवेतनात दीडशे रुपयांपर्यंत वाढ केली जाई. सभासदांना निरनिराळ्या कामातून मिळणारी सर्व मिळकत समाजाकडे जमा करण्यात येत असे. स्वत: गोखले विधिमंडळाचे सदस्य या नात्याने त्यांना वेळोवेळी मिळणारे भत्ते खर्च वजा जाता संस्थेकडे वर्ग करीत असत. सोसायटीच्या सभासदांच्या वर्तनव्यवहारावर ज्येष्ठ सभासदांची नजर असे. देवधर आणि पटवर्धन हे संस्थापक सभासदही त्यातून वगळले गेले नव्हते. देवधरांच्या वागण्या-बोलण्यातल्या

अनियमितपणावरून गोखल्यांनी त्यांची कानउघाडणी केल्याचा उल्लेख श्रीनिवासशास्त्रींच्या रोजनिशीत आढळतो. रजा संपल्यावरही जास्त दिवस बाहेर राहिल्याच्या कारणावरून मजली नामक उमेदवार सभासदाची अशीच कानउघाडणी करण्यात आली होती. त्यानंतर महिनाभरातच ते राजीनामा देऊन बाहेर पडले. सय्यद हैदरहुसेन या सभासदालाही गोखल्यांची शिस्त मानवली नाही, म्हणून त्यानेही असाच राजीनामा दिला होता. उमेदवारीच्या काळात सभासदांना व्याख्याने देण्यास अथवा लेख लिहिण्यास परवानगी नव्हती. राजकीय-सामाजिक प्रश्नांची पुरेशी समज येण्यापूर्वीच उथळ विचार व्यक्त करणे अथवा भडक माध्याने तरुणांनी आपली अर्धीकच्ची मते व्यक्त करू नयेत अशी त्यामागची भूमिका होती. तरुण सभासदांची राजकीय-सामाजिक प्रश्नांची समज वाढवावी म्हणून गोखले समाजाच्या मुख्यालयात काही विषयांवर व्याख्याने देत व तत्त्वचर्चा घडवून आणत. तत्त्वचर्चेसाठी निवडलेल्या विषयांत सामान्यत: पुढील विषय असत:

१. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीची राजकीय सिद्धान्तप्रणाली
२. सामाजिक सुधारणेची तत्त्वे
३. वसाहतीच्या स्वराज्याची प्रस्तुतता
४. हिंदुस्थानचा जमाखर्च : विद्यमान स्थिती व आदर्श व्यवस्था
५. ड्रेन थिअरी
६. वंशविद्वेष
७. हिंदी पोलीस खाते
८. एतद्देशीय संस्थाने, इत्यादी.

देशभक्तीचा संस्कार रुजावा म्हणून मोठ्या नेत्यांच्या सहवासाचा लाभ करून देण्याचे प्रसंगही घडवून आणले जात. १९१० साली दादाभाई नौरोजींना भेटण्यासाठी गोखल्यांनी संस्थेच्या सभासदांना मुद्दाम मुंबईजवळ वरसोवा येथे पाठवून दिले होते. (नंदा,१९८३, पृ. ६५८-६५९)

भौतिक शास्त्रांचे शिक्षण व उद्योगधंद्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या मुद्द्यांना भारत सेवक समाजाच्या कार्यक्रमपत्रिकेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले होते. सामाजिक सुधारणा आणि राजकीय चळवळ यांची सांगड घालण्याचा प्रयत्न त्यात अभिप्रेत होता. दैवी योजनेमुळेच हिंदुस्थानच्या हितासाठी ब्रिटिशांचा हिंदुस्थानशी संबंध आला आहे, हे आद्य तत्त्व भारत सेवक समाजाच्या सभासदांनी मानले पाहिजे असे संस्थेच्या उद्देशपत्रिकेतच म्हटले होते. सनदशीर मार्गांनी 'साम्राज्यांतर्गत स्वराज्या'चे ध्येय गाठणे हे भारत सेवक समाजाच्या कार्यक्रमपत्रिकेवरील अग्रक्रमाचे उद्दिष्ट होते. हे ध्येय साध्य करण्यासाठी स्वयंसेवकांनी स्वत:च्या आचारधर्मातून उदाहरण घालून द्यावे, जनतेत उपदेश-प्रबोधनाच्या मार्गाने उत्कट देशभक्ती निर्माण करावी, राजकीय ज्ञानप्रसाराची चळवळ अंगीकारावी, जातीय व धार्मिक सलोखा वाढविण्यासाठी तसेच शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी चळवळ करावी, मागासलेल्यांची उन्नती करण्यासाठी योजना हाती घ्याव्यात अशी ध्येय-उद्दिष्टांची

सर्वसाधारण सूची तयार करण्यात आली होती. विल्यम वेडरबर्न यांना लिहिलेल्या एका पत्रात गोखल्यांनी भारत सेवक समाजाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमपत्रिकेची व्याप्ती सूचित केली होती. आपल्या पत्रात ते लिहितात,

"सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची निकड; तांत्रिक, औद्योगिक व शेती शिक्षणाचे महत्त्व; सार्वजनिक आरोग्यविषयक सुधारणांची आवश्यकता, सहकारी चळवळीची वाढ; शेतकऱ्यांची कर्जबाजारी अवस्थेतून सोडवणूक, आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास या मुद्यांवर लोकमत जागृत व संघटित करण्याच्या कार्यामध्ये आपली सर्व शक्ती यापुढच्या काळात लावावी, असे आम्ही (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीने) ठरविले आहे. हा कार्यक्रम मोठा व महत्त्वाकांक्षी आहे आणि आमच्या सर्व शक्ती त्या कामी आम्हांस पणाला लावाव्या लागणार आहेत. याखेरीज स्त्री वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार, हिंदू-मुसलमान ऐक्य आणि अस्पृश्य वर्गाचा उद्धार या क्षेत्रांमध्ये काही सभासद काम करणार आहेत. पुढील दहा एक वर्षांत देशाच्या राज्यकारभार पद्धतीत मोठ्या स्वरूपाच्या घटनात्मक सुधारणा केल्या जातील, अशी अपेक्षा आम्ही बाळगू शकत नाही.(मात्र) दरम्यानच्या काळात आम्ही हे जे कार्य हाती घेत आहोत, त्याची भरीव फळे आमच्या पदरात पडतील आणि स्वराज्याच्या वाटचालीत पुढचा टप्पा गाठण्याच्या दृष्टीने भूमिका तयार झालेली असेल." (२९ एप्रिल १९१० रोजी वेडरबर्न यांना लिहिलेल्या पत्राचा मराठी अनुवाद, नंदा, १९८३, पृ. ५३१)

सोसायटीच्या कार्यात सहभागी होण्यासाठी सार्वजनिक जीवनात मूल्याधिष्ठित काम करणाऱ्या अनेक मान्यवरांचा समावेश करण्यात आला होता. संस्थापक सभासद म्हणून गोपाळ कृष्ण गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी पुण्यात फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर उगवत्या सूर्याला साक्षी ठेवून सर्वप्रथम शपथ घेतली. आपल्या पाठोपाठ नटेश आप्पाजी द्रविड , गोपाळ कृष्ण देवधर आणि अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन या उमेदवार सभासदांनाही त्याच दिवशी शपथ देण्यात आली. या शपथविधीत घेतलेल्या सात प्रतिज्ञा अशा होत्या :

१. माझ्या मनात नेहमीच देशहिताच्या विचाराला प्राधान्य असेल आणि मी माझ्या सर्व शक्तीनिशी देशाची सेवा करीन.
२. देशसेवा करीत असताना मी त्यातून व्यक्तिगत फायद्याची अभिलाषा बाळगणार नाही.
३. मी सर्व भारतीयांना आपले बंधू मानीन आणि त्यांच्यात जात किंवा वंश या आधारावर कोणताही भेदभाव न करता त्या सर्वांच्या प्रगतीसाठी काम करीन.
४. मी स्वत: आणि माझे कुटुंब यांचे योगक्षेमासाठी ही संस्था देऊ शकेल त्या मुशाहिऱ्यावरच गुजराण करीन.
५. मी माझे वैयक्तिक आचरण शुद्ध ठेवीन.
६. मी कोणत्याही व्यक्तीशी भांडण तंटा करणार नाही.
७. संस्थेची ध्येये मी सतत नजरेसमोर ठेवीन आणि तिच्या हिताचे रक्षण करण्यासाठी काम करीन. संस्थेच्या उद्दिष्टांशी विसंगत असे काहीही मी करणार नाही.

(मूळ इंग्रजी प्रतिज्ञापत्राचा मराठी अनुवाद, चपळगावकर, २०१७, पृ. ४४)

गोखल्यांनी भारत सेवक समाजाची शपथ घेताना 'लीड काइंडली लाईट' ही कार्डिनल न्यूमनने लिहिलेली प्रार्थना म्हटली. समाजाची स्थापना करताना 'सोसायटी ऑफ जीझस' या संस्थेचा नमुनादर्श त्यांच्यासमोर असावा, असे यावरून सूचित होते. (भावे श्री. मा. २०१५, पृ. ११)

१९०५ साली चार सभासदांसह भारत सेवक समाजाच्या कामाला प्रारंभ झाला. ज्येष्ठ सभासदांवर तरुण सभासदांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली द्रविड, देवधर आणि पटवर्धन संस्थेतील कामाची उमेदवारी पूर्ण झाल्यावर १९१० साली नियमाप्रमाणे संस्थेचे हक्कदार सभासद झाले. दरम्यान १९०७ साली श्रीनिवासशास्त्री यांना गोखल्यांनी शपथ दिली त्यावेळी सभासदसंख्या आठ झाली. १९०८ साली सभासदसंख्या १० व १९१५ साली २७ झाली. नंतरच्या काळात पुणे सार्वजनिक सभेचे शिवराम हरी साठे, कामगार नेते ना. म. जोशी, समाजसेवक धोंडो केशव कर्वे, ठक्करबाप्पा, लेखक वा. म. जोशी, इत्यादींनी सोसायटीची दीक्षा घेतली.

१९०५ साली भारत सेवक समाजाची स्थापना झाल्यापासून संस्थेचे मुख्यालय पुण्यातच राहिले. मुख्यालयाचे प्रमुख म्हणून प्रारंभीच्या काळात नटेश आपाजी द्रविड काम पहात. १९१० साली मद्रासला शाखा काढण्यात आली. या शाखेचे प्रमुख म्हणून श्रीनिवासशास्त्री काम पहात. १९११ साली मुंबईत शाखा सुरू झाली, या शाखेचे प्रमुख म्हणून गोपाळ कृष्ण देवधर काम पहात. १९१३ साली अलाहाबादला शाखा सुरू झाली. संस्थेने पुण्यातून 'ज्ञानप्रकाश' हे मुखपत्र सुरू केले. तसेच नागपूरहून 'हितवाद' आणि लखनौहून उर्दू माध्यमातून 'हिंदुस्थानी' ही मुखपत्रे सुरू केली. १९१८ ते १९३९ या काळात 'द सर्व्हंट्स ऑफ इंडिया' नामक पत्रही प्रसिद्ध केले जात असे. संस्थेने पुण्यात स्वत:चे ग्रंथालय व आर्यभुषण मुद्रणालय उभारून आपला कार्यविस्तार केला. (मात्र १९२६ साली लागलेल्या आगीत संस्थेच्या छापखान्याचे व कागदपत्रांचे अपरिमित नुकसान झाले.)१९२९ साली भारत सेवक समाजाचे एक सभासद रा. रावजी रामचंद्र काळे यांनी एक लक्ष वीस हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीतून पुण्याला भारत सेवक समाजाच्या प्रांगणात 'गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था' स्थापन करण्यात आली. इंग्लंडमधील केंब्रीज विद्यापीठातून शिक्षण घेतलेले रावबहादूर काळे यांचे जावई डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची संस्थेच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. शेती, जलसिंचन, दुष्काळ, ग्रामीण व औद्योगिक शहरांची आर्थिक -सामाजिक स्थिती, नागरिकरणाच्या समस्या अशा विविध आर्थिक-सामाजिक प्रश्नांचे सर्वेक्षण-संशोधन प्रकल्प या संस्थेने पूर्ण केले; भारताच्या आर्थिक -सामाजिक नियोजनासाठी पथदर्शक ठरतील असे अहवाल सादर केलेत. या संस्थेला प्रारंभी मुंबई विद्यापीठाची व नंतर पुणे विद्यापीठाची प्रगत संशोधन संस्था म्हणून मान्यता होती व आता एक स्वतंत्र अभिमत विद्यापीठ म्हणून ही संस्था कार्यरत आहे.

अशा प्रकारे नि:स्वार्थी, मेहनती व संघशक्तीने देशकार्यास वाहून घेणाऱ्या मंडळींचा समाज स्थापन करून गोखल्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील संस्थात्मक कार्याचा एक

नमुनादर्श घालून दिला. गोखल्यांनी आजीव सेवकांना साधेपणाने जगण्याची शपथ देवविली होती, ती या सर्व सभासदांनी निष्ठापूर्वक पाळली. स्वत: गोखले यांना 'सर' हा किताब बहाल करण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा त्यांनी समाजाच्या ह्या शपथेशी प्रामाणिक राहून नम्रपणे त्यास नकार दिला. जात,धर्म, वंशभेद न मानता विविध जाती-जमातींमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करावे या हेतूने सर्वांच्या कल्याणासाठी वचनबद्ध होण्याची प्रतिज्ञा घेणारा भातृसंघ निर्माण करण्याची योजना ही खरे तर आधुनिक भारताच्या इतिहासातली नाविन्यपूर्ण घटना होती. मात्र गोखल्यांची ही कल्पना फिरोजशहा मेथा यांच्यासारख्या काँग्रेसमधील काही ज्येष्ठ लोकांना भावली नव्हती. त्यांना ही कल्पना निरर्थक किंबहुना अगोचरपणाची वाटली होती. गोखल्यांच्या तालमीत तयार झालेले हे 'राजकीय मिशनरी' काँग्रेसच्या अन्य ज्येष्ठ सहकाऱ्यांशी आदराने वागतील का याविषयी मेथांना संशय वाटत होता. त्यामुळे 'रानड्यांचा शिष्य भलत्या मार्गाला लागला' आहे, अशी त्यांची समजूत झाली होती. (Sastri Shrinivas, 1945, pp. 58-59) इतकेच नाही तर सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीत काही ब्रिटिशधार्जिण्या लोकांना घुसवून गोखल्यांना राजकीय चळवळींपासून परावृत्त करण्यासाठी या समाजाचा उपयोग करून घेता येईल अशी अफलातून कल्पना आगाखान यांना सुचली होती. (नंदा, १९८३, पृ. ३५१) इतके असूनही राष्ट्रीय काँग्रेसकडे जेव्हा कार्यकर्त्यांची कमतरता होती तेव्हा देशभर संघटनात्मक कार्यासाठी याच 'हिंदसेवकां'कडे कामगिरी सोपविली जात असे. 'इंडिया' नियतकालिकाच्या वर्गणीदारांचा पाया विस्तृत करण्याची मोहीम असो, दुष्काळग्रस्तांना मदत पोहचविण्याची कामगिरी असो, काँग्रेसच्या प्रांतिक वा राष्ट्रीय अधिवेशनाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असो, हे हिंदसेवक अग्रभागी असत. दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदी नागरिकांना सोसाव्या लागणाऱ्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध भारतीय जनमताचा दबाव वाढावा व तेथील नागरी संघर्षाच्या लढाईसाठी आर्थिक मदत उभी करावी या हेतूने गांधीजींनी बॅरिटर पोलक यांना भारतात पाठविले होते; त्यावेळी पोलक यांचा देशव्यापी दौरा आखण्यात व त्यासंबंधीचे सर्व व्यवस्थापन करण्यात भारत सेवक संघाचेच सभासद पुढे होते. पोलक यांच्या दौऱ्यात रतनजी दादाभॉय टाटा यांनी पंचवीस हजारांची देणगी या लढ्यासाठी दिली; शिवाय लाहोर काँग्रेसमध्ये गोखल्यांनी एक लाखांचा निधी संकलित करण्याचे आवाहन केले तेव्हा निधी संकलनाच्या कामात भारत सेवक संघाच्या सभासदांचा पुढाकार राहिला.

## म. गांधी आणि भारत सेवक समाज :

अहिंसेचे पुजारी व गोखल्यांचे शिष्यत्व स्वीकारलेले म. गांधी यांनाही दक्षिण आफ्रिकेतून परत आल्यावर 'भारत सेवक समाजा'चे सभासद व्हावयाचे होते. २७ फेब्रुवारी १९१४ रोजी गोखल्यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी त्यांच्या सहवासात रहाण्याची इच्छा व्यक्त केली होती. पत्रात गांधीजींनी लिहिले होते की, " मी पुण्यात सोसायटीच्या जागेत राहावे अशी तुमची इच्छा असेल का याविषयी माझ्या मनाची खात्री नाही... असो. मी तुमच्या स्वाधीन असेन. तुमच्या पायाशी बसून देशकार्याचा अनुभव घेण्याची माझी इच्छा आहे. .. आजच्या घडीला मी कोणती महत्त्वाकांक्षा बाळगतो याची तुम्हाला कल्पना आहे. तुमच्याजवळ राहून तुमची शुश्रुषा

करावी, तुमचा मदतनीस व सेवक म्हणून काम करावे, ही माझी महत्त्वाकांक्षा आहे. ज्या व्यक्तीवर माझे प्रेम आहे आणि ज्या व्यक्तीविषयी माझ्या मनात भक्तिभाव आहे अशाच्या आज्ञेत राहण्याची खरी शिस्त मला अंगी बाणवून घ्यायची आहे." (कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड १२, पृ. ३६०-६; उद्धृत : नंदा, १९८३, पृ. ६६३)

गोखल्यांनाही भारत सेवक समाजात गांधीजींसारख्या आदर्श मिशनऱ्यांचीच अपेक्षा होती; गांधीजींनीही गोखले हयात असतानाच सभासदत्वासाठी रीतसर अर्ज केला होता; परंतु इतर सभासद गांधीजींना 'भारत सेवक समाजा'त सामावून घेण्यासाठी फारसे उत्सुक नसल्याने त्यावेळी हे शक्य झाले नाही. कदाचित गांधीजींची असहकाराची चळवळ त्यांना समाजाच्या उद्देशपत्रिकेशी सुसंगत वाटली नसावी, म्हणून त्यांनी या अर्जाचा विचार केला नसावा. गोखल्यांच्या मृत्यूनंतरही समाजाच्या सदस्यांमध्ये या विषयावर एकमत होऊ शकले नाही. मात्र या विषयावरचा निर्णय होईपर्यंत मधल्या काळात गांधीजींनी वर्षभर भारतभ्रमण करण्याचा ठराव गोखल्यांच्या इच्छेचा संदर्भ देऊन समाजाच्या बैठकीत पारित करण्यात आला. नंतर समाजाचे अध्यक्ष श्रीनिवासशास्त्री यांनी ६ जानेवारी १९१६ रोजी गांधीजींना पत्र लिहून सोसायटीच्या सदस्यांची सभासद करून घेण्याबाबतची अनिच्छा कळविली. गांधीजींनीही लागलीच १३ जानेवारीला आपला अर्ज मागे घेतला व गोखल्यांच्या शिष्यत्वाचा अतूट धागा कायम ठेवून आपण आपापल्या पद्धतीने गोखल्यांचे कार्य पुढे नेऊ या, म्हणून कळविले. पुण्यात राहून भारत सेवक समाजाचे काम पुढे नेता आले नाही, तरी गांधीजींनी गोखल्यांचा वारसा निष्ठेने पुढे चालवला.

**गोखले पर्वाची अखेर :**

पुण्याहून १४ जानेवारी १९१६ रोजी गांधीजी मुंबईस आले, तेथून ते शांतिनिकेतनला गेले. दरम्यान १९ फेब्रुवारीला पुण्यात गोखलेंचे निधन झाले. २० तारखेला अंत्ययात्रा निघाली. टिळकांनी आपल्या भाषणातून गोखल्यांनी केलेल्या देशसेवेचा गौरव केला व अनुयायांनी त्यांचे कार्य पुढे न्यावे असे आवाहन केले. ना. गोखल्यांच्या मृत्यूनंतर 'केसरी'त टिळकांनी गोखल्यांविषयी लिहिले होते :

"त्यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळे हाती घेतलेले काम सौम्य उपायांनीच पार पाडण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती आणि आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्य उपाय अनाठायी आहेत असे वाटे. पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रतेसंबंधी दोन वैद्यांमध्ये जरी मतभेद झाला, तरी वैद्य या नात्याने गोपाळरावांची जी योग्यता होती, ती आम्हांसही मान्य आहे." (केसरी, २३ फेब्रुवारी १९१६)

गोखल्यांच्या मृत्यूनंतर २२ फेब्रुवारी १९१६ रोजी गांधीजी शांतीनिकेतनहून पुण्याला येऊन पोहचले. पुण्याच्या मुक्कामात त्यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांची भेट घेऊन डिप्रेस्ड क्लास मिशनचे कार्य जाणून घेतले. अस्पृश्यता व भंग्यांच्या प्रश्नांवर शिंद्यांबरोबर व "भारत सेवक समाजा"च्या सदस्यांबरोबर चर्चा केली. २८ तारखेला मुठा नदीच्या पात्रात गोखल्यांचा दशक्रिया विधी पार पडला. ३ मार्चला गव्हर्नर विलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात श्रद्धांजली सभा

झाली. गांधीजींनी श्रद्धांजलीचा ठराव मांडला. गोखल्यांचे निधन ही एक राष्ट्रीय आपत्ती असल्याची आपली भावनाही त्यांनी त्याच दिवशी लंडनला विल्यम वेडरबर्न यांना पत्र लिहून कळविली. अशा प्रकारे पुण्यापुरते गोखले पर्व संपले.

बौद्धिक युक्तिवाद आणि राजकीय शिष्टाई हे गोखल्यांच्या राजकारणाचे पायाभूत तत्त्व होते. स्वराज्यप्राप्तीसाठी शस्त्रबळाचे राजकारण उपयोगाचे नाही, यावर त्यांचा विश्वास होता. मात्र तरीही आपल्या मागण्यांचे सातत्य कायम राहावे यासाठी अर्ज-विनंत्या, निवेदने सादर करणे, सत्ताधारी गोटातील कर्त्या लोकांची मर्जी संपादित करणे, प्रशासकीय कारभारात सहयोग देण्याचे तंत्र नेमस्तांनी पसंत केले होते. सतत युक्तिवादाचा मारा करीत राहिल्याने हळूहळू प्रतिपक्षाचे मतपरिवर्तन होईल, हट्टाग्रह कमी होत जाईल असा विश्वास बाळगून नेमस्तांनी आपले राजकीय सातत्य कायम ठेवले होते. पाण्याची संततधार कठिणातल्या कठीण खडकाचाही भेद करते, तद्वत नेमस्तांच्या सततच्या पाठपुराव्याचा ब्रिटिश राजनीतीवर सकारात्मक परिणाम नक्की होईल असे वेडरबर्न यांना वाटत असे, त्याचा प्रत्यय नेमस्तांच्या राजकीय कार्यशैलीत दिसून येतो. ना. गोखले या नेमस्तांचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधी होते.

ना. गोखले हे एखाद्या राजकीय संन्याशासारखे जगले. व्यक्तिगत स्वास्थ्याची पर्वा न करता अखेरपर्यंत ते एखाद्या व्रतस्थाप्रमाणे काम करीत राहिले. सतरा वर्षे मधुमेह आणि अस्थम्याच्या विकाराने त्रस्त असतानाही त्यांनी अहोरात्र काम केले. रॉयल कमिशनच्या बैठका, राष्ट्रसभेच्या कडवट वातावरणात काम करण्याचा ताण, 'भारत सेवक समाजाच्या स्थैर्याची चिंता अशा अनेक व्यापात राहूनही त्यांनी मृत्यूच्या दोन दिवस आधी घटनात्मक सुधारणांचा आराखडा लिहून आपले कर्तव्य पूर्ण केले. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी आपल्या हिंद सेवकांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनी आपल्या उत्पन्नाचा विश्वस्तनिधी नोंदविण्याची सूचना केली. आध्यात्मिक उंचीवर पोहचलेल्या राजकीय कर्मयोग्याच्या आयुष्याची ही वाटचाल मूल्याधिष्ठित राजकारणाचा एक नमुनादर्श मागे ठेवून संपली.

टिळकांच्या व्यक्तिमत्वाने भारावलेल्या मराठी माणसांनी बऱ्याचदा गोखल्यांची टिंगल टवाळीही केली. 'हिंदू पंच' नामक व्यंगचित्र साप्ताहिकातून काशीनाथ विष्णू फडके नावाच्या मराठी संपादकाने गोखल्यांची बदनामी करणारे लेख छापले. गोखल्यांनी त्यांच्यावर खटला भरून दंड वसूल केला व सार्वजनिक संस्थांना देणगीदाखल देऊन टाकला. पुढे कालांतराने फडक्यांच्या छापखान्यावर सरकारने जप्ती आणली व 'हिंदू पंच' बंद पडले, तेव्हा गोखल्यांनीच उलट फडक्यांना दरमहा मदत पाठवली. 'सन्मित्र समाज' नामक मेळ्यांतून त्यांच्यावर कुचेष्टेची पदे गायली गेली; त्यांच्यावरही गोखल्यांनी फिर्याद दाखल केली होती, पण सुनावणी सुरू होण्यापूर्वीच मेळेवाल्याने माफी मागितली. गोखल्यांसारख्या सज्जन कार्यकर्त्याची बदनामीची मोहीम चालविणारे हे समाजकंटक एका अर्थाने आपल्या अपरिपक्व लोकप्रिय राजकीय संस्कृतीचेच प्रतिनिधी म्हटले पाहिजेत. अगदी गोखल्यांच्या मृत्यूनंतरही हा विखार व्यक्त करताना मराठी माणसाने राजकीय विवेक दाखविला नव्हता. दादासाहेब खापर्डे यांच्यासारख्या वऱ्हाडातल्या नेत्याने आपल्या रोजिनिशीत केलेली नोंद या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्याजोगी

आहे. २० फेब्रुवारी १९१५ रोजी खापर्डे लिहितात, " काल रात्री गोपाळ कृष्ण गोखल्यांचे देहावसान झाल्याचे मी आज बाररूममध्ये ऐकले. स्वत:चा दुटप्पीपणा आणि बदनामी यांचे परिणाम भोगायला लागण्याआधीच ते गेले याचे मला दु:ख झाले." (नंदा, १९८३, पृ. ६७३) खरे म्हणजे स्वराज्याचे ध्येय गाठण्यासाठी घटनात्मक चळवळीचा मार्ग पत्करणाऱ्या गोखल्यांचे राजकीय स्थान मराठी माणसाला उमजले नाही. काँग्रेसमधल्या फाटाफुटीनंतर लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल,अरविंद घोष, लो. टिळक हे जहाल राजकारणी काँग्रेसमधून बाहेर फेकले गेले होते. त्यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र गटाशी चर्चा करायला इंग्रज सरकार राजी नव्हते. अशा वेळी भारतभर अनुयायी असलेले व संसदीय कामकाजाची जाण असलेले ना. गोखले हेच हिंदवासीयांच्या वतीने ब्रिटिशांशी वाटाघाटी करू शकत होते. गोखल्यांच्या मृत्यूपर्यंत ही स्थिती होती. गोखल्यांच्या राजकीय विश्वासार्हतेचा व नेमस्त भूमिकेचा हा परिणाम होता. गोखल्यांच्या निधनाबरोबर हिंदुस्थान व इंग्लंडमध्ये संवाद प्रस्थापित करणारा दुवा निखळला. गोखल्यांच्या मृत्यूनंतर टिळकांचा काँग्रेस प्रवेश झाला व १९२० ला टिळकांच्या मृत्यूपर्यंत काँग्रेसवर टिळकांचे प्रभुत्व कायम राहिले.

## ना. गोखल्यांचा वारसा :

ना. गोखले यांच्या मृत्यूनंतर १९२० पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात टिळकपर्वाचा विस्तार झाला. मात्र असे असले तरी ना. गोखले यांनी स्थापन केलेल्या भारत सेवक समाज संस्थेच्या माध्यमातून त्यांच्या अनुयायांनी गोखल्यांचे काम पुढे चालविले. समाजाच्या स्थापनेपासून गोखल्यांच्या सोबत असणारे श्रीनिवासशास्त्री, गोपाळ कृष्ण देवधर, नारायण मल्हार जोशी, ठक्करबाप्पा, हृदयनाथ कुंझरू या हिंदसेवकांनी पुढल्या काळात आपले सेवाव्रत निष्ठापूर्वक निभावले. कालक्रमानुसार टिळकपर्वातील राजकीय घडामोडींचा आढावा घेण्यापूर्वी या हिंद सेवकांच्या कामगिरीचा एक संक्षिप्त आढावा येथे घेणे योग्य राहील. गोखल्यांच्या निधनानंतर उत्तरकाळात महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक जीवनात त्यांच्या विचारधारेच्या प्रभावक्षेत्राची व्याप्ती किती होती याची कल्पना यावी यादृष्टीने हा मागोवा घ्यावयाचा आहे.

## श्रीनिवास शास्त्री (१८६९-१९४६) :

गोखल्यांनंतर श्रीनिवासशास्त्री यांनी भारत सेवक समाजाच्या प्रमुखपदाची धुरा वाहिली. १९०५ साली ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बनारस काँग्रेसच्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी म्हणून श्रीनिवासशास्त्री आले होते. तेथे त्यांनी आपल्याला भारत सेवक समाजात काम करण्याची संधी द्यावी अशी गोखल्यांना विनंती केली. त्यानंतर गोखल्यांनी त्यांना पुण्यात बोलावून घेतले व आपल्या सहकाऱ्यांचा परिचय करून दिला. १९०६ साली डिसेंबर महिन्यात कलकत्त्याला काँग्रेसच्या अधिवेशनासाठी गोखल्यांनी शास्त्रींना आमंत्रित केले व १५ जानेवारी १९०७ रोजी त्यांना समाजाच्या सभसदत्वाची दीक्षा दिली. त्यावेळी शास्त्री ३७ वर्षांचे होते. १९०७ साली पूर्व बंगालात मुसलमान समाजात 'स्वदेशी' चळवळीच्या विरोधात जनमत तयार केले जात असल्याचे ऐकिवात होते; त्याची सत्यस्थिती पडताळण्याचे काम गोखल्यांनी

श्रीनिवासशास्त्रींवर सोपविले. शास्त्रींनी तिथे जाऊन वस्तुस्थितीचा अभ्यास केला. डाक्क्याच्या नबाबाने भाडोत्री मौलवींच्यामार्फत मुसलमानांमध्ये स्वदेशीविरुद्ध जनमत तयार करण्याचा प्रयत्न चालविला आहे व त्यास इंग्रज पोलिसांची साथ असल्याचे त्यांना आढळून आले. मात्र मुसलमानांमधला विणकर समाज व सुशिक्षित वर्ग यांच्यावर या प्रचाराचा प्रभाव पडलेला नसल्याचा वृत्तांत शास्त्रींनी गोखलेंना कळविला. (टी. एन. जगदीशन संपादित, लेटर्स ऑफ द राइट ऑनरेबल व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, मुंबई, १९६३, पृ. ७; उद्धृत : नंदा बलराम, १९८६, पृ. ४९३) श्रीनिवास शास्त्रींची गोखल्यांना काँग्रेसच्या सरचिटणीसपदाच्या व विधिमंडळाच्या संसदीय कामात मदत झाली. दक्षिण आफ्रिका, केनिया, युगांडा येथील हिंदी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठीही श्रीनिवासशास्त्रींनी काम केले. १९१३ साली शास्त्रींची मद्रास विधिमंडळावर आणि १९१६ साली कौन्सिल ऑफ स्टेट्सच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य म्हणून निवड झाली. पहिल्या महायुद्धानंतर जिन्हिव्हा आणि वॉशिंग्टनच्या शांतता परिषदांत तसेच १९३०, १९३१ व १९३२ च्या गोलमेज परिषदांतही श्रीनिवासशास्त्री यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

**गोपाळ कृष्ण देवधर (१८७१-१९३५) :**

गोपाळ कृष्ण देवधर हे कोकणातले. मुंबईत विल्सन कॉलेजातून बी. ए. आणि मुंबई विद्यापीठातून एम. ए. ची पदवी त्यांनी संपादित केली होती. 'भारत सेवक समाज' स्थापन होण्यापूर्वी त्यांनी जालन्याला प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांना मराठी शिकविण्याचे व न्या. रानडे अध्यक्ष असलेल्या मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत अध्यापनाचे काम केले होते. रानडे यांचे शिष्य गोखले यांनी स्थापन केलेल्या संस्थेत काम करायला मिळेल या प्रेरणेतून त्यांनी भारत सेवक समाजाचे सदस्यत्व स्वीकारले. सुरुवातीला गोखले यांनी त्यांच्यावर 'इंडिया' या नियतकालिकासाठी निधी-संकलन व वर्गणीदार मिळविण्याची कामगिरी सोपविली. हे नियतकालिक लंडनहून राष्ट्रीय काँग्रेससाठी सर विल्यम वेडरबर्न यांच्या पुढाकाराने चालविले जात होते. देवधरांनी संयुक्त प्रांतात (उत्तर भारतात) व ब्रह्मदेशापर्यंत प्रवास करून 'इंडिया'चे वर्गणीदार वाढविले. सहकारी चळवळीचा विकास व्हावा यासाठी देवधरांनी पुढाकार घेतला. १९०९ साली पुण्यात हडपसरजवळ प्रथमच एक सहकारी पतपेढी काढण्यात आली. त्यात प्रामुख्याने शेतकरी, महिला आणि दलितांना सभासद करून घेण्यात आले. शेतकऱ्यांना शेती, मुलांचे शिक्षण व आजारपणात कर्ज उपलब्ध करून दिले जाई. मुंबईतही देवधरांनी वीस सहकारी संस्था स्थापन केल्या. हिंदुस्थान सरकारने देवधरांच्या या कामाची दखल घेऊन डेन्मार्कला सहकारी संस्थांच्या अभ्यासासाठी पाठविले. शेतीसंशोधनासाठी नेमण्यात आलेल्या समितीतही त्यांना आमंत्रित करण्यात आले.

१९११ साली भारत सेवक समाजाची मुंबईत शाखा काढण्यात आली, तेव्हा त्या शाखेची जबाबदारी गोखल्यांनी देवधरांवर सोपविली. मुंबईत होळीच्या सणाला चेष्टा-मस्करीच्या अनिष्ट प्रथांऐवजी खेळ, कीर्तन, गायन असे सामाजिक अभिरुची संवर्धनाचे उपक्रम चालविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यासाठी 'होलिका मंडळ' स्थापन केले. यातूनच पुढे 'सोशल सर्व्हिस

लीग' ही स्वतंत्र सेवा संस्था सुरू झाली. या लीगचे देवधर चिटणीस होते. स्त्रियांच्या उन्नतीसाठी मुंबईत ११ जुलै १९०८ रोजी 'सेवासदन' ही संस्था स्थापन झाली. रमाबाई रानडे सेवासदनच्या अध्यक्ष होत्या; तर देवधर हे सेवासदनला मदत करण्यासाठी संघटित करण्यात आलेल्या पुरुषांच्या कमिटीचे चिटणीस होते. 'सेवासदन' संस्थेमार्फत निराधार स्त्रियांना शिवणकाम, विणकाम, हस्तकला, पाककलेचे शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे रहाण्यासाठी देवधरांनी पुढाकार घेतला. पुण्यात प्रौढ स्त्रियांसाठी शाळा सुरू केली, मुलींसाठी हायस्कूल सुरू केले. नर्सिंगचा कोर्स सुरू करून मराठी स्त्रियांना आरोग्य क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. केरळात १९२१ साली खिलाफत चळवळीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या जातीय दंगलीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी व उपासमारी व रोगराईमुळे त्रस्त झालेल्यांना मदतीचा हात देण्यासाठी देवधरांनी 'मध्यवर्ती मलबार संकट निवारण मंडळ' स्थापन केले. कालिकतचे राजे झामोरिन हे मंडळाचे अध्यक्ष व देवधर उपाध्यक्ष होते. मुंबईत जमशेटजी जिजीभाई यांच्या अध्यक्षतेखाली मंडळ स्थापन करून मलबारवासीयांसाठी मदत मिळविण्याचे काम त्यांनी केले. भारत सेवक समाजाच्या कार्यकक्षेत अराजकीय विषयांना आधी स्थान नव्हते; मात्र देवधरांच्या सूचनेवरून 'सेवाकार्या'चा उद्देशपत्रिकेत समावेश करण्यात आला.(पं. हृदयनाथ कुंझरू यांनी नोंदविलेली आठवण, उद्धृत- चपळगावकर, २०१७, पृ. ८२) गोखल्यांच्या मृत्यूनंतर श्रीनिवासशास्त्री यांच्याकडे अध्यक्षपद आल्यावर पुण्यात राहून संस्थेचे काम पुढे नेण्यासाठी देवधरांनी उपाध्यक्षपदाची जबाबदारीही स्वीकारली होती.

### नारायण मल्हार जोशी : ( १८७९-१९५५)

भारत सेवक समाजाने १९०९ साली 'ज्ञानप्रकाश'च्या अंकात जाहिरात देऊन ध्येयवादी तरुणांना समाजाच्या कामात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून रत्नागिरीच्या हायस्कूलात शिक्षकी पेशा पत्करलेले नारायण मल्हार जोशी यांनी सभासदत्वासाठी अर्ज केला. जोशींचे पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण झाले होते व भारत सेवक समाजाचे देवधर यांचे ते विद्यार्थी होते. जोशींना देवधर यांच्या मार्गदर्शनाखालीच उमेदवार सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सुरुवातीला पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' पत्राचे व्यवस्थापन त्यांच्याकडे सोपविण्यात आले. पुढे 'ज्ञानप्रकाश'ची मुंबई आवृत्ती सुरू झाली तेव्हा त्याचीही जबाबदारी ना. म. जोशी यांच्याकडे सोपविण्यात आली. १९११ च्या गुजरातच्या दुष्काळात पाचशे कार्यकर्त्यांची फळी उभारून मुंबईतून मदत संकलित करून गुजरातेत पोचविण्याच्या कामात जोशींनी पुढाकार घेतला. भारत सेवक समाजाचे सदस्य नटेश आपाजी द्रविड यांच्यामुळे जोशींचा मुंबईतील कामगार क्षेत्राशी संबंध आला. त्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी कामगारांसाठी काम करायला सुरुवात केली. कामगार संघटना बांधणे, कामगारांच्या प्रश्नांबाबत मालक-कामगार यांच्यात वाटाघाटी घडवून आणणे, संपकाळात कामगारांना मदत पुरविणे अशा विविध कामात त्यांनी पुढाकार घेतला. मुंबईच्या कामगार विश्वातले पहिल्या पिढीतले कामगार नेते म्हणून त्यांच्या कार्याची ऐतिहासिक नोंद झाली आहे. १९१९ साली वॉशिंग्टन येथे झालेल्या कामगार परिषदेसाठी हिंदुस्थान सरकारने कामगारांचे

प्रतिनिधी म्हणून ना. म. जोशी यांची निवड केली होती. केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य म्हणून जवळपास २५ वर्षे त्यांनी काम पाहिले. विधिमंडळात कामगारांच्या हिताचे कायदे मंजूर करून घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. १९२१ चा कामगार संघटना नोंदणी कायदा किंवा १९२६ चा कामगार कायदा हे महत्त्वाचे कायदे त्यांनी मंजूर करून घेतले. १९२६ साली त्यांनी भारत सेवक समाजाचे सदस्य रघुनाथ रामचंद्र बखले यांना सोबत घेऊन 'टेक्स्टाइल लेबर युनियन' स्थापन केली. मुंबईच्या कापड गिरणी कामगारांच्या संपात जोशींनी वेळोवेळी मध्यस्ती करून प्रश्न सोडविले. (कामगार संघटनेतील त्यांच्या योगदानाची चर्चा 'आर्थिक स्थित्यंतर' या प्रकरणात विस्ताराने आली आहे, त्यामुळे त्याची इथे पुनरुक्ती टाळली आहे.) १९३० ते १९३२ या काळात झालेल्या गोलमेज परिषदांमध्येही त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर भारतात सर्वसमावेशक राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याच्या मागणीत ना. म. जोशी यांचाही पुढाकार होता.

**गोदावरी व श्यामराव परुळेकर :**

ना. म. जोशी यांच्या शिफरशीवरून गोदावरी परुळेकर व श्यामराव परुळेकर १९२६ साली भारत सेवक समाजाचे सदस्य झाले. या दोघांनी कामगार क्षेत्रात व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात वारल्यांसाठी काम केले. श्यामराव परुळेकर डॉ. आंबेडकर यांच्या मजूर पक्षातर्फे मुंबई विधानसभेवर निवडून आले; तर गोदावरी परुळेकर यांनी वारल्यांची वेठबिगारी संपविण्यासाठी डहाणूच्या जंगलात चळवळ चालवली. मात्र श्यामराव परुळेकर, गोदूताई गोखले-परुळेकर यांची कामगार क्षेत्रातली जहाल भूमिका भारत सेवक समाजाच्या नेमस्त भूमिकेशी सुसंगत नसल्याचा त्यांच्यावर आक्षेप होता. याबाबतीत ना. म. जोशी यांची भूमिका काहीशी उदारमतवादी होती. रघुनाथ रामचंद्र बखले यांना लिहिलेल्या एका पत्रात जोशींनी आपली भूमिका स्पष्ट करताना लिहिले होते की, " बदलत्या काळाबरोबर संस्थेलाही बदलावे लागेल, अन्यथा आपण कालबाह्य होऊ. उत्क्रांतीचे तत्त्व लक्षात ठेवूनच आपण याकडे बघितले पाहिजे. जर आपण (नव्या मंडळीबरोबर) सामंजस्याने काम करू शकलो नाही, तर संस्थेत फूट पडण्याचा संभव आहे, असे झाले तर मला अतिशय वेदना होतील." (कर्णिक व्ही. बी.: एन. एम. जोशी, सर्व्हंटस ऑफ इंडिया, युनायटेड आशिया, मुंबई, १९७२, पृ. २१९-२१, मराठी अनुवाद : चपळगावकर, २०१७, पृ. ९०) पुढे १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटनला युद्धात पाठिंबा देण्यावरून भारत सेवक समाजात मतभेद झाले. समाजाचे अध्यक्ष श्रीनिवासशास्त्री यांनी ब्रिटनच्या बाजूने पाठिंबा दिला. मात्र श्यामराव परुळेकर, गोदूताई गोखले (परुळेकर), दिनकर देसाई इत्यादी समाजाच्या काही सभासदांचा या भूमिकेला विरोध होता. श्यामराव परुळेकरांना या मुद्द्यावरून भारत सेवक समाजातून काढून टाकण्याचा ठरावही मांडण्यात आला होता; मात्र ठरावाच्या बाजूने तीनचतुर्थांश मते न पडल्याने ठराव मंजूर झाला नाही. मात्र परुळेकरांचे राजकीय तत्त्वज्ञान भारत सेवक समाजाच्या तत्त्वांशी विसंगत असल्याचे कारण देऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. ना. म. जोशी यांनीही परुळेकरांना ज्येष्ठ सभासद या नात्याने योग्य सल्ला दिला नाही, म्हणून त्यांच्यावर ठपका

ठेवण्यात आला. इतकेच नाही तर त्यांनी मुंबई सोडून इतरत्र समाजाचे काम करावे अशी सूचना करण्यात आली. जोशींनी ही सूचना पाळण्यास नकार दिल्याने त्यांना शंभर रुपये मासिक निवृत्ती-वेतन देऊन समाजाच्या सेवाकार्यातून निवृत्त करण्यात आले. अर्थात या सेवानिवृत्तीनंतरही जोशींनी कामगार संघटनेत व नागरी हक्कांसाठी झटणाऱ्या संस्थांसाठी सल्ला देण्याचे आपले काम चालूच ठेवले होते.

**ठक्करबाप्पा ( १८६९ - १९५१):**

सौराष्ट्रातील भावनगरचे रहिवासी असलेले अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर उर्फ ठक्करबापा हे भारतात व युगांडात रेल्वेमार्गावर पर्यवेक्षकाचे (ओव्हरसियरचे) काम करीत होते. पुढे सांगली संस्थानचे मुख्य अभियंते म्हणून त्यांची नेमणूक झाली. गोपाळ कृष्ण गोखले सांगलीला आले असताना त्यांनी भारत सेवक समाजात तरुणांनी दाखल होण्याबाबत आवाहन केले होते. मधल्या काळात इंग्रज अधिकाऱ्याबरोबर खटका उडाल्याने अमृतलाल यांची नोकरी गेली व त्यांनी मुंबईत कचरा वाहतुकीवर देखरेख ठेवण्याची नवी नोकरी पत्करली. तेथे ठक्करबाप्पांना दारिद्र्याने गांजलेल्या लोकांचा जवळून परिचय झाला. याच काळात विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केली होती. ठक्करबाप्पांनी त्यातून प्रेरणा घेऊन सफाईकामगारांसाठी शाळा सुरु केली. पूर्ण वेळ समाजसेवा करावी या हेतूने त्यांनी १४ जानेवारी १९१४ रोजी मुंबई नगरपालिकेच्या नोकरीचा राजीनामा देऊन भारत सेवक समाजात प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला. ६ फेब्रुवारी १९१४ रोजी गोखल्यांनी त्यांना भारत सेवक समाजाची दीक्षा दिली. गोपाळ कृष्ण देवधर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना पाच वर्षे मुंबईतच काम करण्यास सांगण्यात आले.

ठक्करबाप्पांनी मुंबईच्या सफाई कामगारांना कर्जमुक्त करण्याचे व त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याचे काम अंगीकारले. गुजरातेत दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी भारत सेवक समाजाच्या वतीने ते जाऊ लागले. दुष्काळ पीडित भिल्लांची स्थिती पालटण्यासाठी १९१९ साली ठक्करबाप्पांनी भिल्ल सेवेचे व्रत आरंभिले. १९२२ साली 'भिल्ल सेवा मंडळ' स्थापन करून त्यांनी भिल्लांच्या मुलांसाठी शाळा व आश्रम सुरु केले. भिल्लांना व्यसनमुक्त करण्याची मोहीम चालवली. भिल्ल सेवा मंडळाचे हे काम भारत सेवक समाजाचेच काम समजले जाई. गांधीजींच्या अध्यक्षतेखाली "भारतीय अस्पृश्यता निवारण संघ" स्थापन झाला तेव्हा गांधीजींच्या सूचनेवरून ठक्करबाप्पांनी या संघाचे चिटणीसपद स्वीकारले. या हरिजन सेवक संघाने देशातील दीडशेहून अधिक मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. वऱ्हाड व मध्यप्रांत सरकारने भंगी समाजाच्या उन्नतीसाठी ठक्करबाप्पांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली, त्यातही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. मुंबई विधानसभेत विठ्ठलभाई पटेल यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक आणले तेव्हा ठक्करबाप्पांनी खेडोपाडी भ्रमण करून परिश्रमपूर्वक प्राथमिक शिक्षणाच्या स्थितिबाबतची आकडेवारी जमा केली. जमशेदपूरला टाटांच्या निमंत्रणावरून त्यांनी कामगारांसाठी ग्राहकभांडार चालविण्याची जबाबदारी पत्करली. त्यांच्या पुढाकाराने जमशेदपूरला कामगारांच्या मुलांसाठी शाळा व क्रीडांगणाच्या सोयी उपलब्ध झाल्या.

१९३९ साली मुंबईत गोवालिया टँकवर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या उपस्थितीत ठक्करबाप्पांचा सत्तरीनिमित्त झालेल्या सत्कारात मुंबईच्या झाडूवाल्यांनी प्रत्येकी एक पैसा वर्गणी जमा करून ठक्करबाप्पांना सातशे एकात्तर रुपयांची थैली अर्पण केली. ठक्करबाप्पांनी वंचितांसाठी केलेल्या कामाची ही पावती होती.

१९४६ साली पूर्व बंगालात जातीय हिंसाचार सुरू झाला. शांतता प्रस्थापित करण्यासाठी गांधीजींच्या बरोबर ठक्करबाप्पाही नौखालीत दाखल झाले व त्यांनी मदतकार्याला सुरुवात केली. १९४८ साली गांधीजींच्या खूनानंतर अस्वस्थ झालेल्या ठक्करबाप्पांनी सेवानिवृत्त न होता वृद्धापकाळातही अधिक जोमाने काम करण्याचा निर्णय घेतला. घटना समितीचे सदस्य या नात्याने दलित व आदिवासींना घटनात्मक संरक्षण मिळण्यासाठी सर्वेक्षण करून आकडेवारी गोळा केली. . आदिवासींच्या २९ जातींचे मेळावे घेणे, आसामच्या भूकंपप्रवण भागात भारत सेवक समाजाचे मदतकार्य सुरू करणे अशी कामे चालूच होती. आयुष्याच्या अखेरपर्यंत ठक्करबाप्पा भारत सेवक समाजाचे काम करीत राहिले. १९ जानेवारी १९५१ रोजी गोखल्यांच्या ह्या निष्ठावान हिंदसेवकाने जगाचा निरोप घेतला.

**पं. हृदयनाथ कुंझरू (१८८७-१९७८) :**

१९३५ साली गोपाळ कृष्ण देवधर यांच्या मृत्यूनंतर पं. हृदयनाथ कुंझरू यांनी भारत सेवक समाजाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. काश्मिरी ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले हृदयनाथ कुंझरू हे लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून अर्थशास्त्रात बीएससी पदवी घेतलेले व्यासंगी अभ्यासक होते. १९०९ साली गोखल्यांनी त्यांना भारत सेवक समाजाची दीक्षा दिली. सभासदत्व स्वीकारल्यानंतर कुंझरूंनी अलाहाबाद शाखेत आपले काम सुरू केले. अलाहाबादच्या कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी त्यांनी सातशे स्वयंसेवकांचा संघ तयार केला होता. शासनाच्या कारभाराचे हिंदीकरण व्हावे व उच्च पदावरच्या सरकारी नोकऱ्यांत भारतीयांना स्थान मिळावे यासाठी त्यांनी अलाहाबादच्या भारत सेवक समाजाच्या शाखेच्या वतीने सरकारला अभ्यासपूर्ण निवेदन सादर केले होते. १९१५ साली संयुक्त प्रांतात स्थानिक स्वराज्य संस्था कायदा पारित व्हावयाचा होता, त्यातील अनिष्ट तरतूदी दूर केल्या जाव्यात यासाठी त्यांनी अन्य देशांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप व अधिकार आणि प्रस्तावित विधेयकाचा तौलनिक अभ्यास करून विधेयकातील त्रुटी दाखवून देण्याचे काम केले. या विषयावर जनमत तयार करण्याकरिता राज्याचा दौरा केला व परिषद घेऊन जनजागृती केली. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या अहवालानंतर ब्रिटनच्या संसदेत 'इंडिया रिफॉर्म बिल' चर्चेला येणार होते; त्यापूर्वी या विधेयकात भारताला अनुकूल तरतूदी असाव्यात या उद्देशाने तेथील संसद सदस्यांचे मन वळविण्याकरिता कुंझरू व श्रीनिवासशास्त्री यांनी १९१९ साली इंग्लंडचा दौरा केला. या सुधारणांच्या प्रस्तावित कायद्याच्या निषेधार्थ काँग्रेसने निवडणुकांवर बहिष्कार टाकल्यावर भारत सेवक समाजातील सभासदांनी मवाळपंथीय मंडळीबरोबर 'नॅशनल लिबरल फेडरेशन' नावाचा पक्ष स्थापन केला. कुंझरू यांनी या पक्षातर्फे संयुक्त प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक लढवून यश संपादन केले. १९२४ साली 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिला'च्या

मसुद्याच्या अनुषंगाने भारताच्या प्रस्तावित घटनेचे प्रारूप ठरविण्यातही कुंझरू, श्रीनिवास शास्त्री, ना. म. जोशी या भारत सेवक समाजाच्या सभासदांनी पुढाकार घेतला. १९२६ साली राज्य विधिमंडळातून कुंझरू केंद्रीय विधिमंडळात निवडून आले. १९३४ साली त्यांनी लिबरल पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. १९३६ साली स्टेट कौन्सिलवर ते निवडून गेले. भारतीयांना प्रशासनात मिळणारी सापत्न वागणूक, रेल्वे अंदाजपत्रकातला अवाजवी खर्चाचा मुद्दा, सैन्यामध्ये भारतीय सैनिकांचे अल्प प्रतिनिधित्व, वैद्यकीय सेवेत भारतीयांना प्रवेश देण्याचा प्रश्न इत्यादी विषयांवर विधिमंडळात व स्टेट कौन्सिलपुढे प्रश्न उपस्थित करण्याचे व त्यासाठी सुसंगत युक्तिवाद करण्याचे काम कुंझरू यांनी सातत्याने केले. १९४६ साली भारताच्या घटना समितीतही त्यांनी योगदान दिले. अशा प्रकारे भारत सेवक समाजाचे राजकीय तत्त्व सिद्धीस नेण्यासाठी ते राजकारणात सक्रिय राहिले.

राजकारणाखेरीज भारतातील स्काऊट चळवळीसाठी कुंझरू यांनी काम केले. हिंदुस्थान स्काऊट आसोशिएशनचे ते राष्ट्रीय अध्यक्ष होते. अलाहाबादला त्यांनी 'एलेमेंटरी एज्युकेशन लीग' नावाची संस्था स्थापन करून आग्र्याला शाळा सुरू केल्या. ऊर्दू भाषेच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या 'अंजुमन तरक्की इ ऊर्दू' या संस्थेच्या अध्यक्षपदाचीही धुरा त्यांनी निभावली. १९४६ साली नौखाली आणि टिपेरा भागात झालेल्या जातीय दंगलीत पीडितांचे प्रश्न समजावून घेण्यासाठीही त्यांनी दौरा केला होता.

## १.५. टिळकपर्व

ना. गोखले यांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात सर्वार्थाने टिळकपर्वाची सुरुवात झाली. अर्थात दोघांच्या विचारपद्धतीत स्वराज्याची आस असली तरी कार्यशैलीत मूलभूत फरक होता. ना. गोखल्यांनी सरकारशी जुळवून घेऊन शिष्टाईचे राजकारण केले. टिळकांनी मात्र लोकमान्यतेचे राजकारण केले. गोखल्यांच्या तुलनेने लोकमान्य टिळकांना जनसामान्यांचा पाठिंबा अधिक मिळाला. गांधीजींच्या आधी अखिल भारतीय पातळीवर लोकमताचा पाठिंबा असलेले सर्वमान्य नेतृत्व फक्त लोकमान्य टिळकांनीच निभावले. अभिजनवर्गाचे वैचारिक नेते म्हणून गोखल्यांची प्रतिमा घडत होती, तर लोकप्रिय नेते म्हणून टिळकांची प्रतिमा घडत गेली. टिळक आणि गोखले यांच्यात राजकीय मतभेद होते. जहाल विचारसरणीच्या टिळकांचा स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कारावर भर होता. गोखल्यांनी मात्र राजकीय सोयीसाठी मध्यममार्गी भूमिका पत्करली होती. दोघांचे अंतिम साध्य एकच होते; फक्त साध्यप्राप्तीचे मार्ग वेगळे होते. गोखल्यांचे राजकारण कायदेमंडळाभोवती केंद्रित झालेले असे; तर टिळकांचे राजकारण सार्वजनिक व्यासपीठाशी संलग्न असायचे. मात्र संघटनाबळावर शक्तिप्रदर्शन करणाऱ्या जहालांनी बऱ्याच वेळा संयम सोडून आततायीपणे गोंधळ घातल्यामुळे टिळकांच्या राजकारणाला कधी कधी अतिरंजिततेचा रंग प्राप्त होत असे.

## टिळक – गोखले वाद:

टिळक आणि गोखले हे दोघे नेते 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' या ध्येयाने प्रेरित झालेले होते. पण 'स्वराज्या'संबंधीच्या धारणा व स्वराज्यप्राप्तीचे मार्ग याबाबत दोघांचे मार्ग भिन्न होते. १९१५ साली टिळकांनी 'केसरी'तून 'हिंदी स्वराज्यसंघ' नावाची लेखमाला लिहिली होती. या लेखमालेतून त्यांची 'स्वराज्या'संबंधीची भूमिका स्पष्ट होते :

"लोकांची राज्यव्यवस्था लोकांच्या खुषीप्रमाणे चालू असणे हा त्यांचा एक नैसर्गिक हक्क आहे. पण आमच्या राजनिष्ठेबद्दल अनेक कुतर्क काढून, आमचा हा नैसर्गिक हक्क आम्हांस न मिळू देण्याबद्दल हिंदुस्थानांतील कांही गोरे लोक उद्योग करून, आपल्या देशबांधवांची मने कलुषित करीत असतात... अर्थात अशा तऱ्हेचे हक्क लोकांनी मागितले म्हणजे ते अधिकारी वर्गाचे शत्रू झाले असे होत नाही.. बडोदा, म्हैसूर वगैरे मोठमोठ्या संस्थानांतून लहानमोठ्या राज्यव्यवस्थेची सर्व कामे देशी अंमलदारांकडूनच जर केली जातात, तर कलकत्ता, मुंबई, मद्रास वगैरे खालसा प्रांतास स्वराज्याचे हक्क मिळून त्यांतील अंतर्व्यवस्था करण्याचा अधिकार लोकांकडे आल्यास लोकनियुक्त पुढाऱ्यांकडून तो नीट चालवला जाणार नाही, अशी शंका घेण्यास काही कारण राहात नाही... लोकांचे खरे समाधान होण्यास त्यांचे व्यवहार त्यांच्याच तंत्राने चालले पाहिजेत, आणि तसे होण्यास राज्याच्या अंतर्व्यवस्थेचा बराच भाग लोकांच्या ताब्यांत पाहिजे..त्यांत ढवळाढवळ करण्याची संधी सरकारी अधिकाऱ्यांस असू नये. .. अशा प्रकारच्या दृष्टीने विचार केला म्हणजे हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचे इंपीरियल आणि प्रॉव्हिन्शियल – बादशाही आणि प्रांतिक – असे स्वभावत:च दोन भाग होतात.. हिंदुस्थानचा परराष्ट्रांशी संबंध येतो ती बादशाही व्यवस्था होय. .. प्रांताप्रांतातील जी अंतर्व्यवस्था आहे ती त्या त्या प्रांतातील लोकमताने चालवल्यास त्यामुळे बादशाही साम्राज्यव्यवस्थेस कोणत्याही प्रकारचा धोका येण्याचा संभव नाही...प्रांतिक व्यवस्था लोकांच्या हातात देणे म्हणजेच स्वराज्याला खरी सुरुवात करणे होय." (टिळक, १९२६, पृ. ३०७-३२०)

गोखले यांचे धोरण ब्रिटिशांना न दुखावता हक्क पदरात पाडून घेण्याचे होते. ब्रिटिशांशी संवाद साधून सरकारशी सहकार्य करूनच आपल्या देशाची प्रगती करता येईल अशी गोखल्यांची धारणा होती. सरकार परके असले तरी सरकारचे अधिकारी राष्ट्रीय वृत्तीचे आहेत व त्यांचे लक्ष हिंदुस्थानच्या हिताकडे आहे, असा गोखल्यांना विश्वास होता. त्यामुळे युरोपियनांना मान्य होईल अशीच तडजोड काढली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. 'हिंदी जनतेच्या अस्तित्वामुळे युरोपियनांच्या राजकीय संस्थांना कसलाही विटाळ होणार नाही, त्यांचा दर्जा कमी होणार नाही, अशीही खात्री हिंदी लोकांकडून युरोपियनांना मिळाली पाहिजे" असे गोखल्यांना वाटत असे. (पाध्ये-टिकेकर, १९३५, पृ. २०३) इंग्लंडचे पार्लमेंट आणि तेथील मतदारांचे मतपरिवर्तन घडवून आणणे, त्यांच्यावर नैतिक दबाव आणणे या सनदशीर व नेमस्त राजनीतीचा मार्ग गोखल्यांना योग्य वाटत होता. हिंदी लोक स्वातंत्र्यास पात्र होतील तसतसे स्वराज्याचे अधिकार इंग्रजांकडून प्राप्त होत जातील असा गोखल्यांचा आशावाद होता. उलट स्वराज्य हा आपला हक्कच आहे व तो मिळविण्यासाठी आपण झटले पाहिजे, संघर्ष

केला पाहिजे असे टिळकांचे मत होते. दोघांचेही उद्दिष्ट एकच असले तरी 'मवाळ' आणि 'जहाल' हे मनोवृत्तीतले फरक होते, आणि त्यामुळेच त्यांचे मार्गही भिन्न राहिले. मात्र लोकप्रिय राजकारणात जनसामान्यांचा सारासार विवेक बाजूला रहातो आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची खिल्ली उडवण्याला सुरुवात होते. टिळक आणि गोखले यांच्या राजकीय भूमिकांचा अन्वयार्थ लावण्याच्या भानगडीत न पडता टिळकांच्या अनुयायांनी गोखल्यांना चेष्टेचा विषय बनविले. राजकारणातला 'कच्चा बोरू' अशा शब्दांत गोखल्यांची संभावना करण्यात आली. गणेशोत्सवी मेळ्यांमधून गोखल्यांची कुचेष्टा करणारी गीते म्हटली जात. नेमस्त म्हणजे कचखाऊ, भित्रे अशी प्रतिमा तयार झाली होती. वसंतराव पळशीकर यांनी मराठी लोकांनी गोखल्यांच्या केलेल्या कुचेष्टेचा निर्देश करून 'नेमस्त' म्हणजे नेमके काय याची यथार्थ व्याख्या केली आहे : "रानडे यांच्या अर्थाने नेमस्तपणा म्हणजे आपल्यातील उणिवा, दोष जाणून ध्येयपूर्तीच्या दिशेने सर्वांगीण बांधणी करीत एक एक टप्पा पूर्ण करीत वाटचाल करीत राहणे. भावनाविवश वा विकारवश होऊन प्रतिसाद न देणे, सरासार विवेकाचे नियंत्रण कधी ढिले पडू न देणे, क्षमाशील व उदार मनोवृत्तीनेच इतरांशी वर्तन करणे. दादाभाई, रानडे व गोखले हे या अर्थाने नेमस्त होते." (पळशीकर, १९८६, पृ. ५२) टिळकांच्या वागण्या-बोलण्यातला देशी बाज त्यांच्यात नव्हता. इंग्रजी शिष्टाचारांचा व कायद्यांचा त्यांच्यावर पगडा होता. अर्थात टिळक हे जहाल नसून भावनाप्रधान व आदर्शवादी होते; त्यांच्यात लढाऊ बाणा असला तरी त्यांना क्रांतिकारक म्हणता येणार नाही, असे अरविंदांचे निरीक्षण होते. कायद्याच्या कचाट्यात न सापडता सरकारवर टीकास्त्र सोडण्याची टिळकांची शैली होती, याउलट सरकारला कायद्याच्या कचाट्यात पकडण्यात गोखले तरबेज होते. टिळकांचा ज्योतिषाच्या भविष्यावर विश्वास नव्हता. 'ग्रहांचे काम ग्रह करतील, मला माझे काम करू द्या अशी त्यांची भूमिका होती. याउलट गोखल्यांचा ग्रह-ज्योतिषावर विश्वास होता. शंकरशास्त्री धारवाड या ज्योतिषाकडून त्यांनी त्यांची सूक्ष्म कुंडली करून घेतली होती. इतकेच नाही तर 'भारत सेवक समाजा'चीही त्यांनी कुंडली करवून घेतली होती, असे म्हणतात. (मोरे, पृ. ६)

गोखल्यांच्या राजकारणाला टिळक 'नेटाची गोडीगुलाबी' म्हणून संबोधत असत. मात्र स्वत: गोखल्यांनी टिळकांच्या व त्यांच्या राजकारणातील भेद नेमकेपणाने स्पष्ट केला आहे :

"सनदशीर उपायांनी साम्राज्यांतर्गत स्वशासन मिळवणे हे उद्दिष्ट टिळकांना कबूल असले, तरी 'शक्य तेथे सरकारशी सहकार्य व आवश्यक तेथे त्याला विरोध' या तत्त्वावर आधारलेल्या काँग्रेसच्या पद्धती त्यांना मान्य नाहीत. या पद्धतींच्या जागी त्यांना सनदशीरपणाच्या सीमा न ओलांडता सरकारला शुद्ध सरळ विरोधाचा मार्ग, दुसऱ्या शब्दांत म्हणजे आयरिश पद्धतीचे अडवणुकीचे धोरण अवलंबावयाचा आहे. देशातील कायद्यांच्या मर्यादा न ओलांडता शक्य त्या सर्व बाबतीत सरकारची अडवणूक संघटित करून शासनयंत्रणा निर्जीव करण्यास व अधिकारी वर्गाला नमायला भाग पाडण्यास आपण समर्थ होऊ अशी त्यांची आशा आहे. .. देशामध्ये परकीयांबाबत व्यक्त आणि अव्यक्त अशी विरोधाची भावना मोठ्या प्रमाणात आहे. तिच्यामुळे टिळकांचे पारडे खूपच जड झालेले आहे. परकीयांच्या सत्तेशी आपण जुळवून घेतले पाहिजे

असे आम्ही देशबांधवांना सांगितलेच पाहिजे... आपल्या प्रचाराचे एक अंग ब्रिटिश लोकशाहीच्या न्यायभावनेवरील अंशमात्र विश्वासावर आधारलेले असणे अटळ आहे. यापैकी दुसऱ्याला 'याचकगिरी' आणि 'राष्ट्राभिमानशून्य लांगूनचालन' असे संबोधून त्याची खिल्ली उडविण्यास टिळकांना प्रयास पडणार नाहीत. भक्कम अशी राजकीय निर्णयशक्ती असलेली मंडळी देशात थोडी आहेत. अशा व्यक्तींच्या पूर्णपणे विरुद्ध असल्याचा विश्वास ज्याच्याबद्दल आपल्या अंत:करणाच्या खोल कप्प्यात वाटेल अशा कोणत्याही सकृद्दर्शनी विश्वसनीय पुढाऱ्याच्या मागे जायला सज्ज असलेले व राष्ट्रोद्धाराच्या प्रामाणिक पण अस्पष्ट जाणिवेने भारून गेलेले विवेकशून्य लोक मात्र प्रचंड संख्येने आहेत." (गोखल्यांनी बेझंट बाईना लिहिलेले पत्र; भाषांतर व अवतरण- पळशीकर, कित्ता, पृ. ५९-६०)

टिळक आणि गोखले यांच्या राजकीय कारकिर्दीविषयी भाष्य करताना आचार्य जावडेकर यांनी म्हटले होते की, "टिळकांना जशी 'राजमान्यता' त्यांच्या हयातीत कधी मिळाली नाही, तशीच जवळ जवळ गोखल्यांना त्यांच्या हयातीत फारशी 'लोकमान्यता' कधी मिळाली नाही. राजमान्यता व लोकमान्यता या दोहोंचा भरपूर उपभोग घेण्याचा लाभ आधुनिक भारताच्या इतिहासात फक्त म. गांधींनाच प्राप्त झाला होता. तथापि आपल्या हयातीत दरबारी राजकारणात ना. गोखले यांनी अग्रस्थान पटकाविले होते आणि १८९७ पासून पुढील वीस वर्षांचा आधुनिक भारताचा इतिहास म्हणजे ना. गोखले आणि लो. टिळक या दोन महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या दोन अखिल भारतीय राजकीय पक्षांचाच इतिहास होय." (जावडेकर, १९३८, पृ. २५४-२५५)

नामदार गोखले वारले तेव्हा लोकमान्य टिळकांचा मुक्काम सिंहगडावर होता. प्रेतयात्रेला यायला लोकमान्यांना बराच वेळ लागला. पुण्यातल्या बुधवार चौकात प्रेतयात्रा आली तेव्हा टिळक तेथे येऊन पोहचले. वाहनातून खाली उतरून ना. गोखले यांच्या शवास वंदन करून लोकमान्य यात्रेबरोबर चालू लागले. या घटनेचे प्रत्यक्षदर्शी श्री. ठकार यांच्याकडून ही हकिगत ऐकल्यावर नाटककार राम गणेश गडकरी यांचे विचारचक्र सुरू झाले. गोखले मवाळ तर टिळक जहाल. गोखल्यांची प्रस्थापित मते खोडून टाकताना लोकमान्यांसारख्या जहाल विद्वतरत्नाला सुद्धा अतिशय श्रम पडत. टिळक-गोखले यांच्या वादाची धुमाळी पुणेकरांना चांगलीच परिचित होती. टिळकांना लाखो लोक मानत तसेच कित्येक लोक गोखल्यांना झिडकारत. या पार्श्वभूमीवर टिळकांनी गोखल्यांना केलेले वंदन यात्रेतल्या हजारो लोकांच्या मनात घोळत असेल, ह्या विचारातून गडकऱ्यांना 'वीरवंदन' या नाटकाचे कथानक सुचले. दोन रजपूत वीर कित्येक वर्षे एकमेकांस जिंकण्याकरिता अनेक डावपेच लढवून लढण्याची पराकाष्ठा करीत. पण दोघांपैकी एकासही विजय मिळेना. तेव्हा एका क्षुल्लक सरदाराने 'आपण आज्ञा केल्यास तीन दिवसात त्या मशक वीरास कैद करून आपल्या पायावर त्याचे मस्तक नमायला लावतो', असे सांगितले. त्यावर प्रतिस्पर्धी रजपूत वीर रागाने लाल झाला व तलवार उपसून सरदाराला म्हणाला, " तोंड एकदम बंद कर. ज्या जिभेने माझ्या शत्रूला तू मशक म्हणालास ती जीभ या क्षणाला मी छाटून टाकीन. .. माझ्या बरोबर शौर्याने व गनिमी काव्याने, कित्येक वर्षे

लढणाऱ्याला जर मी तुच्छ मानीन तर मीही त्याच्यापेक्षा क:पदार्थ आहे असे होईल. तर खरा वीर शत्रूच्या शौर्याला तुच्छ न मानता वंदनच करील." (क्षीरसागर,१९३०, पृ. ३५-३७) लोकमान्य टिळकांनी याच भावनेतून गोखल्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेला वंदन केले होते, हे गडकऱ्यांनी हेरले होते. टिळक-गोखले या विभूतींविषयीचे लोकमानस त्यांनी 'वीरवंदन' नाटकातून नाट्यबद्ध केले. महाराष्ट्रातले नेते राजकीय मतभेदांवरून परस्परांवर तुटून पडत असले, तरी परस्परांविषयीचा आदर त्यांनी कायम राखला. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा नमुनादर्श म्हणून ही घटना अप्रत्यक्षपणे वाङ्मयरूप घेऊन चिरंजीव झाली.

### टिळकांचे राजकीय व्यक्तिमत्व :

टिळकांचे राजकीय व्यक्तिमत्व कसे होते याचा तपास करताना स्वत: टिळकांनीच राजकारणी व्यक्तीच्या गुणविशेषांविषयी व्यक्त केलेला पुढील अभिप्राय लक्षात घ्यायला हवा -

"राजकारणी पुरुषाचे अंगात दोन गुण असावे लागतात: एक तर त्याच्या हृदयात प्रखर आग पेटलेली पाहिजे व दुसरा म्हणजे त्या हृदयाच्या वरच्या बाजूस डोके बर्फासारखे थंड असले पाहिजे. हे दोनही गुण एकसमवयाच्छेदेकरून नेहमी ज्या पुरुषाजवळ उत्कटतेने वास करीत असतील तो पुढारी होण्यास योग्य होय." "आपण जी राजकीय चळवळ करू तीत अपयश आले असता ती सहज क्रमप्राप्त गोष्ट आहे अशी मनाची वृत्ती राहिली पाहिजे. यश येणार नाही असे धरून चालले पाहिजे." (तळवलकर, २००३, पृ. १६)

टिळकांचे राजकीय व्यक्तिमत्व हे त्यांनी नमूद केलेल्या गुणविशेषांप्रमाणे असल्याने त्यांचे राजकारण जहाल परंतु तत्त्वनिष्ठ; मूल्याधिष्ठित डावपेच करणारे आणि लोकाभिमुख होते. जनसामान्यांचे प्रेम संपादित करण्याला ते नेहमीच अग्रक्रम देत असत. सामान्यजनांना कायद्याचा सल्ला देऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमी तत्पर असत. याबाबतीत गोविंद तळवलकर यांनी त्यांची तुलना लेनीनच्या कार्यशैलीशी केली आहे. 'नॉट बाय पॉलिटिक्स अलोन' या लेनीनसंबंधीच्या पुस्तकात तमारा डॉयश्चर हिने लेनीनच्या काही आठवणी दिल्या आहेत, त्यांचा दाखला देत तळवलकरांनी टिळक आणि लेनीन यांच्या राजकीय व्यक्तिमत्वातले साम्य लक्षात आणून दिले आहे. क्रांतीचा ध्यास घेतल्याने लेनीनला कला, संगीत, वाङ्मय या क्षेत्रांत रस घ्यायला सवड मिळत नसे; त्यामुळे त्याने या क्षेत्राकडे पाठ फिरवली होती. टिळकही संगीत-चित्रकलेसाठी वेळ देऊ शकत नव्हते; त्यामुळे लेनीनप्रमाणे टिळकांनीही ललितकलाभिरुची जोपासण्याकडे दुर्लक्षच केले होते. मात्र राजकारण, तत्त्वज्ञान, धर्मविद्या या क्षेत्रातला व्यासंग वाढविण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसतात. राजकारणात सामान्य माणसाच्या सुखदु:खांना अग्रक्रम देण्याचे लेनीनचे धोरण होते. आठवड्यातून एक दिवस तो शेतकऱ्यांना भेटत असे. कामगारांबरोबर खाणावळीत जेवत असे. टिळकांचीही हीच धारणा होती. 'हिंदुस्थानात शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. याच्यावरील मालिन्याचा पडदा जर दूर झाला तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल. याकरिता शेतकरी आपला व आपण शेतकऱ्याचे असे आपणास वाटावयास हवे' असे टिळक म्हणत असत. (तळवलकर, २००३, पृ. ११) या भूमिकेमुळे शेतकरी वर्ग टिळकांच्या प्रेमात होता. निरक्षर शेतकरीही

टिळकांच्या केसरीचा वर्गणीदार असे, व गावातल्या पटवाऱ्याकडून 'केसरी' पत्र वाचून घेत असे. कुठल्याही समस्येचा गुंता सोडवायचा असेल तर शेतकऱ्यांना टिळकांचा आधार मिळत असे. म्हणूनच यवतमाळ जिल्ह्यातल्या कळंबा गावचा धनगर 'हायकोर्टाची अपील यादी लिहून पाठवा' म्हणून टिळकांना हक्काने आणि तेवढ्याच विश्वासाने पत्र पाठवू शकत असे. टिळकांना सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली तेव्हा, सिंहगडाच्या पायथ्याशी कल्याण गावी राहाणाऱ्या गवळ्याने टिळकांची सुटका होईपर्यंत सोमवारचा उपास धरला होता. टिळक कधीही लोकांना निराश करीत नसत. एकदा महाडला टिळक येणार म्हणून जमलेल्या बिरवडीच्या मंडळींसाठी रात्री दीड-दोन वाजता टिळकांनी भाषण केले होते. असे अनेक प्रसंग टिळकांच्या चरित्रात आढळतात. टिळकांचा लोकसंग्रह मोठा होता. पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रापुरताच नव्हे तर वऱ्हाड, मध्यप्रदेश, खानदेश, धारवाड-बेळगावपासून नागपूर-कलकत्त्यापर्यंत संपूर्ण भारतात त्यांचे चाहते होते. गांधीजींपूर्वी राष्ट्रीय पातळीवर लोकमान्यता असलेला राष्ट्रीय नेता म्हणून टिळकांचेच नाव घ्यावे लागते.

टिळकांची लोकप्रियता आणि राजकीय ताकद याविषयी तत्कालीन देशी आणि विदेशी पत्रकारांच्या प्रतिक्रिया लक्षात घेण्याजोग्या आहेत. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांची मंडालेच्या तुरुंगात रवानगी झाली त्यावेळी 'इंदुप्रकाश'ने लिहिले होते की, ही शिक्षा म्हणजे राष्ट्रीय आपत्तीच आहे; कारण टिळक ही एक व्यक्ती नसून स्वतंत्र शक्ती आहे. 'ज्ञानप्रकाश'ने म्हटले होते की, टिळक मुक्त होऊन परत येईपर्यंत त्यांची उणीव दुसरा कोणी भरून काढेल असे आम्हांस वाटत नाही. 'सुधारक' पत्राने म्हटले होते की, एखादा प्रिय आप्त सोडून गेल्यावर जशी शोकाकुलता उत्पन्न होते, तशी महाराष्ट्राची स्थिती झाली आहे. इंग्लंडमधील 'गार्डियन'ने टिळकांना झालेली अटक ही अत्यंत संवेदनशील घटना असल्याचे नमूद करून म्हटले होते की, "He has a personal following larger and more devoted than any other popular leader in India commands." टिळकांच्या अटकेनंतर दंगली उसळल्या, व्यापाऱ्यांनी हरताळ पाळला, यावर 'स्कॉट्समन'ने लिहिले होते, "The closing of the markets is perhaps of graver import than riots, as it serves to show that the feeling of the largest and wealthiest, if not also the most intelligent and enterprising community of Indian merchants and financiers is on the side of Mr. Tilak. The feeling is certainly proof of the supreme popularity of the man." सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी 'लंडन टाईम्स'मध्ये लिहिलेल्या लेखातून 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून टिळकांच्या कामगिरीचा यथार्थ गौरव केला होता. (Chirol, 1910,p. 63)

महाराष्ट्राने तर टिळकांवर अलोट प्रेम केले. टिळकांनी स्वत:च महाराष्ट्राला कामधेनू आणि कल्पवृक्ष म्हटले होते. शेतकरी, गिरणी कामगार, व्यापारी, बुद्धिजीवी सर्वांसाठी टिळक हे लोकमान्य नेते होते. टिळकांच्या दर्शनानेही संतुष्ट होणारे लोक टिळकांची मिरवणूक काढून, जयजयकार व टाळ्यांनी स्वागत करीत असत. मात्र या अफाट लोकप्रियतेची नशा टिळकांना कधी चढली नाही. यासंदर्भातली एक आठवण मुद्दाम उद्धृत करायला हवी. एकदा मुंबईत

काँग्रेस अधिवेशनाच्या निमित्ताने आर्यन सिनेमा थिएटरात एक देशी चित्रपट पहायला टिळकांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यावेळी सिनेमा सुरू होण्यापूर्वी १९१८ च्या काँग्रेस अधिवेशनासाठी आलेल्या पुढाऱ्यांचे मंडपात आगमन होत असल्याची चित्रफित दाखविण्यात येत होती. त्या चित्रफितीत टिळकांच्या आगमनाचे दृश्य पडद्यावर दिसताच थिएटरमधल्या लोकांनी टाळ्यांचा प्रचंड गजर सुरू केला. तेव्हा टिळकांच्या शेजारी बसलेल्या स्नेह्याने टिळकांना उद्देशून म्हटले की, " बळवंतराव, तुमच्या नुसत्या चित्राचे दर्शन घेऊन लोकांनी इतका टाळ्यांचा कडकडाट केला. मग तुम्ही प्रत्यक्षच येथे आला आहात हे त्यास समजले तर लोक टाळ्या वाजवून थिएटर खाली पाडतील की काय कोण जाणे?' हे ऐकून लोकमान्य हळूच म्हणाले, 'लोकांचे मजवर प्रेम असले तरी मी असल्या पोकळ डेमॉनस्ट्रेशनाला (प्रदर्शनाला) फसणारा नाही. याची किंमत किती हे मी जाणून असतो आणि या जाणिवेनेच मी सर्व आयुष्य घालविले आहे. मॅथेमॅटिशियन कधी फसणार नाही हे विसरू नका." (तळवलकर, २००३, पृ. १५) टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे हे पैलू लक्षात घेऊन त्यांच्या राजकीय शैलीचा व कर्तृत्वाचा महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीवर काय परिणाम झाला याचा इथे तपास करावयाचा आहे.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकातील टिळकांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा यापूर्वीच्या पहिल्या खंडात घेण्यात आला होता. त्यात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या प्रेरणेतून त्यांनी शिक्षणक्षेत्रात सुरू केलेल्या कामाची, डेक्कन एज्युकेशन सोसायटीतल्या योगदानाची, 'केसरी' व 'मराठा' पत्रे सुरू करण्यामागच्या भूमिकांची चर्चा आली आहे. कोल्हापूर रियासतीचे चौथे शिवाजी महाराज यांना वेडे ठरवून नगरच्या किल्ल्यात डांबण्यात आले होते व त्यात त्यांचा मृत्यू झाला; या प्रकरणाला टिळकांनी 'मराठा' पत्रातून व आगरकरांनी 'केसरी' पत्रातून वाचा फोडली होती. त्यावर ठोस पुरावा सादर करता न आल्याने टिळक व आगरकर या दोघांना शिक्षा होऊन डोंगरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. टिळकांच्या सार्वजनिक जीवनातील अशा संघर्षमय वाटचालीच्या प्रारंभकालीन घटनांचा मागोवा गेल्या खंडात घेण्यात आला होता. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात विसाव्या शतकातील राजकीय कारकीर्द फक्त लक्षात घेतली आहे.

### टिळकांचे राजकीय चिंतन :

१८९७ साली रँड आणि आयर्स्टर्न यांच्या खुनाचा संबंध टिळकांच्या 'केसरी'तील लेखांशी व सार्वजनिक सभांतील भाषणांशी लावून टिळकांवर राजद्रोहाचा आरोप करण्यात आला होता. या खटल्यात टिळकांना दीड वर्षांची शिक्षा झाली. डोंगरी, येरवडा येथील तुरुंगात शिक्षा भोगल्यानंतर टिळकांनी पुन्हा एकदा आपल्या कामाला नव्याने सुरुवात केली. आपल्या राजकीय कारकिर्दीच्या या नव्या पर्वाची सुरुवात करताना टिळकांनी केसरीत ४ जुलै १८९९ रोजी 'पुनश्च हरि ओम' हा अग्रलेख लिहिला होता. या अग्रलेखातून टिळकांनी १९ व्या शतकातून विसाव्या शतकात पदार्पण करण्याच्या संक्रमणकाळातील घटनांचे सिंहावलोकन करून महाराष्ट्रातील दुहीच्या राजकारणाचे धोके व त्यामुळे होणाऱ्या राजकीय नुकसानीचे मूल्यमापन केले होते. तसेच भविष्यात करावयाच्या वाटचालीची व्यूहनीतीही सूचित केली होती. टिळकांनी लिहिले होते:

"सन १८९७ साली ज्युबिलीच्या दिवशी झालेल्या खुनामुळे सरकारचे डोके ठिकाणावर नव्हते हे तर खरेच, पण बुजऱ्या बैलास किंवा माजलेल्या हत्तीस छू म्हणणारा कोणी तरी एखादा गृहस्थ असल्याखेरीज त्याची मुसंडी एखाद्या विशिष्ट व्यक्तीकडे किंवा पदार्थाकडे वळत नाही, असा सामान्य सिद्धांत आहे. याप्रमाणे सरकारची वक्रदृष्टी १८९७ साली कांही वर्तमानपत्रकर्त्यांकडेसच लागल्यास कोणी तरी मध्यंतरी आगीत तेल ओतणारे गृहस्थ कारणीभूत झाले असावेत असे वाटणे स्वाभाविक आहे असे आम्हांस मोठ्या दु:खाने म्हणावे लागते. पुण्यांत जेव्हा मॉडरेशनचे नवीन पोलिटिकल स्कूल निघाले त्यावेळीच याचे पर्यवसान अशा प्रकारे होईल अशी आम्हांस वाटलेली धास्ती आम्ही प्रदर्शित केलेली होती. .. एका हिंदूने किंवा नेटिव्हाने त्याचा आणि दुसऱ्याचा कांही बाबतीत मतभेद असला म्हणून आपल्या प्रतिपक्षाच्या लेखाचा विपर्यास करून त्यास राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करणे व तो खड्ड्यात पडला म्हणजे आनंद मानणे यासारखे अश्लाघ्यपणाचे दुसरे कृत्य नाही असे आम्ही समजतो. .. सरकारापेक्षा याच मंडळीची आम्हांस जास्त काळजी घेतली पाहिजे. . उघड शत्रू पुरवेल, पण अशा रीतीचे लोक त्याच्यापेक्षाही भयंकर आहेत हे आम्ही सांगावयास नको. .. सरकारने धारण केलेल्या उग्र स्वरूपामुळे आणि प्लेगच्या धामधुमीमुळे आमच्या शहरातील बहुतेक चळवळी स्तिमित झालेल्या आहेत. या थंडावलेल्या संस्थांस पुन्हा उबारा आणून आपले काम अव्याहत चालू ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे; परंतु हे काम हल्ली जी दुही आहे ती मोडल्याखेरीज कधीही तडीस जावयाचे नाही. सुधारक गैर-सुधारक या सामाजिक भेदापासून मॉडरेशन उर्फ नेमस्तपणा आणि एक्स्ट्रॉम अथवा जहाल, हा जो भेद करण्याचा कित्येकांनी प्रयत्न केला होता त्याची गेल्या दोन वर्षांत काय वाट लागली हे दोन्ही पक्षांनी लक्षात आणावे... अमुक लोक आमच्यापेक्षा जरा नेटाने काम करणारे आहेत म्हणून, अथवा त्यांच्या मागण्या सरकारास आवडण्यासारख्या नाहीत म्हणून ते राजद्रोही आहेत, अशा प्रकारचा खोटाच समज करून घेऊन एकमेकांपासून अलिप्त राहण्याची जी तऱ्हा निघालेली आहे, ती मोडून टाकून निदान ज्या प्रकरणी मतैक्य आहे त्या प्रकरणी तरी एकत्र जमून सर्वांनी एकत्र मिळून एक दिशेने उद्योग करणे हे हल्लीच्या स्थितीत पुणेकरांचे पहिले कर्तव्य होय... मतभेद पुष्कळ बाबतीत असू शकेल व खुळचट लोकही सर्व पक्षांत व सर्व ठिकाणी आढळण्यात येतील. एका हाताचीच बोटे घेतली तर ती सारखी नसतात; पण खाणेपिणे वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार करण्याचे वेळी त्या सर्व बोटांचे साहाय्य लागते. हाच न्याय हल्लीच्या प्रसंगीही सर्वांनी लक्षांत ठेवला पाहिजे. सामाजिक सुधारणा वगैरे गोष्टी करताना तुम्ही काही लिहिले किंवा बोलले तर त्याबद्दल सरकारास काही फारशी पर्वा नाही, परंतु राजकीय बाबतीत कोणी काही बोलले की सरकारचे मन तेव्हाच संशयग्रस्त होऊन दृष्टीही कावरीबावरी होऊ लागते. अशा वेळी सर्वांनी एकनिष्ठपणे व एक दिलाने वागून आम्ही आमच्यापैकी कोणीही कोणतीही योग्य मागणी केलेली असल्यास ती बरोबर आहे असेच सरकारांस भासविण्यास झटले पाहिजे. त्यावेळी इतर मतभेद मनांत आणून ती अमक्याने केली म्हणून वाईट, अशा प्रकारे ती हाणून पाडणे कोणासही श्रेयस्कर नाही. राजकीय हक्कच आम्हास नकोत अशी ज्यांची समजूत असेल अथवा सगळ्या सामाजिक

सुधारणा झाल्यावर मग राजकीय हक्कांकडे वळावे असे ज्यांचे मत असेल त्यास कदाचित् अशा प्रकारची कृती योग्य वाटण्याचा संभव आहे. पण हे सत्य जोपर्यंत ग्राह्य ठरलेले नाही, व ठरण्याचाही विशेषसा संभव नाही, तोपर्यंत सर्वांनी मिळून कॉंग्रेससारख्या संस्थेने आमच्या मनांत ज्या आशा निर्माण केल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योगास हरएक प्रकारे लागले पाहिजे." (लो. टिळकांचे केसरीतील लेख, खंड २, १९२४, पृ. ७-११)

सरकारबरोबर चालणारी लढाई कशी चालवावी याबाबतची टिळकांची भूमिकाही याच अग्रलेखात त्यांनी स्पष्ट केली होती. कायद्याच्या चौकटीत राहून अहिंसक मार्गाने राजकीय कर्तव्य पार पाडायला हवे, याची टिळकांना जाणीव होती; मात्र ब्रिटिशांच्या कायद्याच्या खेळात कोणत्या मर्यादेपर्यंत संयम पाळायचा याचाही विचार टिळकांनी केला होता. त्यांच्याच शब्दांत ही भूमिका समजावून घेणे इष्ट राहील. टिळक आपल्या अग्रलेखात म्हणतात,

"आमच्या हातात शस्त्रे नाहीत व ती घेण्याचेही आमचे मनात नाही; परंतु सरकारने जी मोकळीक दिली असेल तिचाच पूर्ण उपयोग करून आमचे सार्वजनिक कर्तव्य बजावण्याचा आमचा इरादा आहे... लोकमत जागृत करण्याचे व सरकारपाशी आम्ही मागत असलेल्या हक्कांचे समर्थन करण्याचे जे काम आम्ही पतकरले आहे ते काम निर्भयपणे चालवणे आम्हांस जरूर आहे." (कित्ता, पृ. ६)

विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळातील महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा या अग्रलेखावरून अंदाज येतो. महाराष्ट्रातील राजकीय दुफळीमागे जहाल आणि मवाळ गटातील राजकीय तत्त्वज्ञान व ब्रिटिशांच्या राजकीय अस्तित्वाविषयीच्या परस्परांच्या समजुती कारणीभूत होत्या हे जितके खरे आहे, तितकेच त्यावेळच्या गटातटाच्या राजकारणातली व्यक्तिगत सुंदोपसुंदीही होती, हे लक्षात येते. या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सत्तेकडून आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी एकमेकांवर कुरघोडीचे राजकारण करण्यापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देऊन एकजुटीने परस्परांना समर्थन द्यावे, अशी रास्त अपेक्षा टिळकांनी व्यक्त केली होती. त्यांच्या हयातीत या अपेक्षांची कितपत पूर्ती झाली व महाराष्ट्राच्या राजकारणाचा ध्रुव व्यक्तिगत हेव्यादाव्यांकडून, तसेच जातिधर्मांच्या भिंती दूर सारून कितपत राष्ट्रकेंद्री झाला याचाही शोध घेता येईल.

दोन शतकांच्या संक्रमणकालातील इ. स. १९०० हे वर्ष महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीच्या नव्या पर्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे वर्ष आहे. रँडच्या खुनानंतर सरकारी दडपशाहीचे वातावरण हळूहळू निवळले होते; परंतु १८९९ साली वासुदेव चापेकरने आपल्या भावाच्या विरोधात पुरावा देणाऱ्या द्रविडबंधूंवर गोळ्या घातल्या. या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर लंडनच्या 'ग्लोब' वृत्तपत्राने व मुंबईच्या 'टाइम्स'ने टिळकांना लक्ष्य केले होते. टिळकांनी या दोघांवर फिर्याद दाखल करण्याची हालचाल केल्यावर या दोन्ही वृत्तपत्रांनी माफी मागितल्याने हे प्रकरण तिथेच थांबले होते. त्यामुळे विसाव्या शतकाची सुरुवात टिळकांना काही नवे संकल्प घेऊन पुढे जाण्यासाठी अनुकूल राहील अशी स्थिती होती. या वर्षी लो. टिळकांनी रायगडावर दुसरा शिवाजी उत्सव साजरा केला. टिळक नुकतेच तुरुंगातून सुटून आले असल्याने या उत्सवास

लोकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला होता. मुंग्यांच्या रांगेप्रमाणे माणसाला माणूस खेटून लोक गडावर चढत होते, असे या लोकसमूहाचे वर्णन न. चिं. केळकरांनी 'टिळकचरित्रा'त केले आहे. पालखी, कीर्तन, भजनी मेळे, गोंधळ्यांचे पोवाडे, नळे, चंद्रज्योती, मशाली असा उत्सवाचा एकूण रंग होता. अर्थात उत्सवावर नजर ठेवण्यासाठी पोलीस आणि सरकारी अधिकारीही हजर होते. (केळकरकृत टिळकचरित्र, खंड १, भाग २९ : फाटक, २०१२, पृ. ११४) इ. स. १९०० हे नाना फडणवीसांचे जन्मशताब्दी वर्ष होते. इंग्रजांना विरोध करणाऱ्या नानांच्या जन्मशताब्दीचे महत्त्व ओळखून टिळकांनी वेळास या फडणीसांच्या गावी नानांची तसबीर व इतर सामग्री आठवणीने पाठवून दिली.

विसाव्या शतकाचा प्रारंभ टिळकांनी वैचारिक व चिंतनपर लेखनाने केला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या श्राद्धतिथीनिमित्त लिहिलेल्या लेखात त्यांनी मराठेशाहीच्या अस्तानंतर इंग्रजी राजवटीत शिकलेल्या नव्या पिढीच्या राष्ट्रीय-सामाजिक धारणांची जडणघडण कशी झाली याचे सिंहावलोकन केले. टिळकांच्या मते चिपळूणकरांच्या निबंधमालेपूर्वी म्हणजे १८७४ पर्यंत इंग्रजी शिकलेल्या तीन पिढ्या झाल्या :

(१) गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी) यांची पिढी.

(२) कृष्णशास्त्री चिपळूणकर व केरूनाना छत्रे यांची दुसरी पिढी.

(३) म. मो. कुंटे व न्या. महादेव गोविंद रानडे यांची तिसरी पिढी

पैकी पहिल्या पिढीत गोपाळराव देशमुख यांचा अपवाद सोडता बाकी सगळे अर्धवट इंग्रजी शिकलेले, चुटपुटत्या ज्ञानाचे धनी होते, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. पहिल्या पिढीच्या इंग्रजी शिक्षणात धर्म व नीतिशिक्षणाला फाटा दिल्याने "स्वल्प ज्ञानाने संतुष्ट, स्वहितापलिकडे लक्ष न देणारे आणि स्वत:सच विद्वान मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असे नवे म्होरके या कारखान्यांतून प्रथम तयार झाले." (लो. टिळक यांचे केसरीतील लेख, भाग ४, १९३०) मात्र त्यावेळच्या राज्यकारभारास इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची गरज असल्याने त्यांना मोठमोठ्या नोकऱ्या मिळाल्या आणि समाजात आपोआप मानाचे स्थानही मिळत गेले. टिळकांनी या बदलाच्या अनुषंगाने पुढे लिहिले आहे की,

" विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिती यांचा एकमेकांशीं जो नित्य संबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज राष्ट्रातील विद्वान् लोक पुढारीपणा घेऊन जोराने राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहीत, तो संबंधच इंग्रजी शिक्षणाने पहिल्याने तोडून टाकला, ही मोठ्या दु:खाची गोष्ट होय.. .पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग याची अधिक जरूर लागत असते, ही या पिढीतील विद्वान मंडळी अगदीच विसरली होती, असे म्हटले तरी चालेल. इंग्रजी शिकल्याने सर्वज्ञता येते असे न मानता, उद्योग, सदाचरण, नियमितपणा, देशाभिमान वगैरे गुण संपादन करण्याचा सुशिक्षितांनी प्रयत्न केला पाहिजे अशी जर आज थोडीबहुत समजूत झाली असली तर तिचे प्रवर्तकत्व शास्त्री बुवांकडेसच येते. गेल्या पाच पंचवीस वर्षांत राष्ट्रीय सभेसारख्या ज्या चळवळी झाल्या, त्यामुळे व इतर अनेक कारणांमुळे लोकांचे डोळे बरेच उघडत चालले आहेत हे खरे आहे; पण इंग्रजी शिक्षणाच्या

पहिल्या घोटाबरोबर जो अव्यवस्थितपणाचा मद आला होता तो शास्त्रीबुवांनी दूर केला हे आपणांस कबूल केले पाहिजे."

टिळकांनी सत्तांतरानंतरच्या परिवर्तनाचा आढावा घेताना इंग्रजी शिक्षणाने झालेले राष्ट्रीय नुकसान आणि चिपळूणकरांची निबंधमाला किंवा राष्ट्रीय सभेचे संघटन यामुळे जागृत झालेले राष्ट्रभान याचे वरीलप्रमाणे वस्तुनिष्ठ मूल्यांकन केले आहे. पुढल्या काळातील राजकीय ध्येयधोरणे ठरविण्यासाठी व लोक चळवळीसाठी कुठली व्यूहरचना करण्याची गरज आहे, याची पूर्वतयारीच या चिंतनपर निबंधांतून दिसून येते. भाषा हे राष्ट्राचे हत्यार असून आपल्या देशातील लहानमोठ्या लोकांस आपले विचार कळवावे अशी ज्यास उत्कट इच्छा असेल त्यास स्वभाषेखेरीज दुसरे साधन नाही, हाही मुद्दा टिळकांनी अधोरेखित केला आहे. आपल्या अग्रलेखातून राजकीय परिवर्तनासाठी भाषेचा हत्यारासारखा वापर करणाऱ्या टिळकांच्या शैलीमागे त्यांचे हे चिंतन असू शकेल, असे म्हणण्यास बराच वाव आहे.

१६ जानेवारी १९०१ रोजी न्या. महादेव गोविंद रानडे यांचे आणि २२ जानेवारीला व्हिक्टोरिया राणीचे इंग्लंड येथे निधन झाले. लोकमान्य टिळकांनी या दोघा मान्यवरांविषयी केसरीतून मृत्यूलेख लिहिले. महाराणींचे खाजगी वर्तन, गृहस्थिती, शुद्ध आचरण,दयाळू स्वभाव यांचा निर्देश करून टिळकांनी त्यांच्या या उदार चरित्राचा परिणाम महाराणी सरकारच्या इंग्रजी राज्यावर कसा झाला होता यावर प्रकाश टाकला होता. राज्यकर्त्या व्यक्तींचे चरित्र हे राष्ट्रीय संस्कारांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे असते, हे सांगताना त्यांनी लिहिले होते की, "महाराणी म्हणजे केवळ राजकीय बाबतीतच राष्ट्राची नियमनकर्ती किंवा पुढाकार घेणारी असते असे नाही तर सामाजिक बाबतीतही तिच्या वर्तनाचा व उदाहरणाचा राष्ट्रावर परिणाम घडून येत असतो." ('केसरी', २९ जानेवारी १९०१ : टिळक, १९२४, पृ. २२१) १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याच्या मसुदालेखनाची एक आठवणही त्यांनी या मृत्यूलेखात आग्रहपूर्वक नोंदवली होती. राणीच्या जाहीरनाम्याच्या पहिल्या मसुद्यात "हिंदुस्थानांतील प्रजेच्या रीतीभातीत किंवा धर्मांत फरक करण्याचा राणीसरकारचा अधिकार आहे" अशा आशयाचे शब्द होते. राणीने या शब्दयोजनेविषयी मुख्य प्रधान लॉर्ड दर्बी यांचेकडे आपली नापसंती व्यक्त करून त्याचे पुनर्लेखन करण्यास सांगितले. आपला जाहीरनामा धर्मोदार्याने, प्रेमळपणाने, आणि परोपकारबुद्धीने भरलेला असला पाहिजे व राणीच्या राज्यापासून पुढे लोकांस काय फायदे होतील तेही त्यात नमूद असले पाहिजे, असे सांगून जाहीरनाम्याच्या शेवटी स्वहस्ताने "रयतेच्या कल्याणाविषयी सर्व शक्तिमान परमेश्वर सामर्थ्य देवो " हे वाक्य लिहून त्यांनी तो जाहीरनामा पूर्ण केला. एतद्देशीयांच्या धर्म, परंपरा व सांस्कृतिक अस्मितांना धक्का न लावता ब्रिटिशांनी प्रशासन करावे, हे राजनीतिसूत्र या घटनेत अंतर्भूत होते, याकडे टिळकांनी आपल्या वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते. मृत्यूलेखातूनही योग्य तो संस्कार वाचकांच्या मनात रुजवावा, वर्तमान घडामोडींवर भाष्य करताना समकालीन सुशिक्षितांचे राजकीय प्रबोधन करावे या टिळकांच्या राजकीय बांधीलकीचा व मूल्यदृष्टीचा प्रत्यय या अग्रलेखातून मिळतो.

न्या. रानडे यांच्यावर लिहिलेल्या मृत्यूलेखातून टिळकांनी १९ व्या शतकातील

सत्तांतरानंतर थंड गोळ्यासारख्या थिजलेल्या महाराष्ट्राला सजीव करण्याचे काम रानड्यांनी कसे केले यावर प्रकाश टाकला. राष्ट्रउभारणीत द्रष्ट्या विचारवंताचा वाटा केवढा मोठा असतो, याची विस्ताराने चर्चा केली. टिळकांनी आपल्या अग्रलेखात लिहिले होते :

"माधवरावजींच्या आंगचा पहिला गुण हा होय की, सर्व बाजूंनी राष्ट्राची उन्नती झाली पाहिजे असे त्यांस वाटत होते... धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतीत आम्ही मागे आहोत व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्राची आपणांस बरोबरी करता यावयाची नाही असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता... एकोणिसाव्या शतकाच्या शेवटली पंचवीस तीस वर्षे माधवरावजींनी राज्यक्रांतीने कांही वेळ स्तब्ध झालेल्या महाराष्ट्रास कसे सजीव करतां येईल या काळजीत घालविली. आणि केवळ महाराष्ट्राकरितांच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाबद्दल अशाच त-हेचे विचार त्यांच्या मनामध्ये सदैव घोळत असत. .. पाश्चिमात्य शिक्षणाबरोबरच एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणावर येऊन पडते ही गोष्ट माधवरावजींनी पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस तीस वर्षांच्या वर्तनक्रमाने लोकांस ती जबाबदारी कशी बजवावी याचे उत्कृष्ट उदाहरण घालून देऊन त्यानी महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखला असे म्हणणे भाग आहे... राष्ट्राची उन्नति होण्यास ज्या हजारो गोष्टी कराव्या लागतात, त्या एकट्याच्या हातून होत नाहीत. त्यास योग्य माणसांची निवड करून त्यांचे साह्य घ्यावे लागते; किंबहुना अशा प्रकारची माणसे तयार करावी लागतात असे म्हटले तरी चालेल. माणसे तयार करण्याचे हे काम किती कठीण आहे हे अनुभवावांचून समजणे अशक्य आहे. मनुष्याची पारख, त्यांच्या हातून चुक्या घडल्या असतां त्यांस शांतपणे संभाळून घेऊन पुन्हा उत्तेजन देण्यास अवश्य लागणारे उत्साह, शांती वगैरे गुण पुढाऱ्यांचे आंगी जरूर असावे लागतात. माधवरावजींच्या आंगी हे गुण पूर्णपणे वसत होते व म्हणूनच त्यांच्या हातून इतकी कामे येथे सिद्धीस गेली. सार्वजनिक सभा, वक्तृत्वसभा,लवादकोर्ट, प्रार्थनासमाज, फीमेलहायस्कूल, औद्योगिक चळवळ वगैरे ज्या अनेक संस्था पुणे शहरांत झाल्या किंवा आहेत त्या सर्वांशी माधवरावजींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने संबंध होता असे आढळून येईल. या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून कायम ठेवणे, निरनिराळ्या संस्थाकरिता निरनिराळी मनुष्ये पाहून त्यांच्या हातून ती ती कामे करून घेणे, स्वदेशांतल्या किंवा परदेशातल्या सर्व प्रकारच्या हालचालींवर नजर ठेवून त्याचा देशाच्या उत्कर्षाशी कसा संबंध पोहचतो याचे अहोरात्र मनन करणे हे माधवरावजीचे व्यसनच होऊन राहिले होते... सारांश, महाराष्ट्रांत जर कांही आजमितीस जोम आढळून येत असला, त्यातील वक्ते व लेखक जर निर्भयपणे सार्वजनिक गोष्टींची चर्चा करीत असले तर ते माधवरावजींच्या २५ वर्षांच्या दीर्घोद्योगाचे फल होय असे म्हणण्यास कोणतीही हरकत नाही, अशा त-हेचा पुरुष देशात निर्माण होणे हे देशाचे एक भाग्यच आहे." (लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ४, १९३०, पृ. २८४-२८८)

भविष्यकालीन महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीसाठी आवश्यक असणाऱ्या मानदंडांचे व नमुनादर्शांचे टिळकांचे चिंतन विसाव्या शतकाच्या पहिल्या वर्षातील या दोन अग्रलेखांतून

व्यक्त झाले आहे. राष्ट्रनिर्माणासाठी कर्तृत्ववान माणसांची फळी उभी करणे, त्यांचा गुणदोषांसह स्वीकार करणे व त्यांना राजकारण-समाजकारणाची वेळीच योग्य दिशा दाखवणे; जागतिक परिप्रेक्ष्यात स्थानिक परिस्थितीचे वारंवार मूल्यमापन करणे; सतत अभ्यास आणि सावधानता ठेवून कर्म करणे व दीर्घकाळ टिकणाऱ्या संस्थात्मक जीवनाचा पाया रचणे ही द्रष्ट्या समाजपुरुषाची लक्षणे आहेत. हे द्रष्टेपण स्वत: टिळकांनी आपल्या लेखनातून आणि कर्तृत्वातून सिद्ध केले होते. १९०२ साली 'केसरी'ची पाने चारवरून आठ करण्यात आली, तेव्हा टिळकांनी 'केसरी'तल्या लेखांविषयीची आपली भूमिका विशद करताना म्हटले होते की, "लोकांत जागृती, कळकळ व संघशक्ती उत्पन्न करणे हे वर्तमानपत्रकार या दृष्टीने आमचे मुख्य कर्तव्य आम्ही समजतो. आम्ही केसरीत जे लेख लिहितो, ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसून आमच्या मनातले विचार, आमच्या मनातली तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढ्याकरिताच आहेत." (लेले रा. के.,१९८४, पृ.३०६)

सतत चिंतन-मनन व विद्याव्यासंग करणाऱ्या टिळकांनी १९०१ साली मे-जून महिन्यात सिंहगडावर राहून "The Arctic Home in the Vedas' या पुस्तकाचे लेखन पूर्ण केले. १९०३ साली हा ग्रंथ मुद्रित स्वरूपात प्रकाशित झाला. पुढे मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी 'गीतारहस्य' ग्रंथाचे लेखन पूर्ण केले. टिळकांच्या व्यक्तिमत्वाला प्रारंभी भारतीय तत्त्वज्ञानाची आणि उत्तरकालात साम्यवादी तत्त्वज्ञानाची डूब प्राप्त झाली होती. टिळकांचा विद्याव्यासंग मोठा होता. त्यांनी प्रयत्नपूर्वक पुस्तके मिळवून स्वत:चा ग्रंथसंग्रह सिद्ध केला होता. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, नीतिशास्त्र, ज्योतिष व खगोलविद्या, तत्त्वज्ञान व संख्याशास्त्र, राजकारण व समाजशास्त्र, इतिहास व धर्मविद्या, व्याकरण व व्युत्पत्तिशास्त्र अशा अनेकविध विषयांवरील ग्रंथांचे परिशीलन केले. 'हिंदू कायदा' या विषयातले त्यांचे पांडित्य सर्वमान्य होते. [२] आपले वाचन निर्दोष व अर्थपूर्ण असले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. एकाच विषयावर भिन्न भिन्न मतप्रदर्शन करणाऱ्या ग्रंथांपैकी कोणत्या ग्रंथातला अभिप्राय प्रमाण मानावा यासाठी ते पूर्वमीमांसेतील सहा नियमांचा वापर करून ग्रंथाचे बलाबल ठरवित. आंतर्ज्ञानशाखीय मर्मदृष्टीतून भिन्न भिन्न शास्त्रांतील सिद्धांत व प्रमेयांचा यथायोग्य आधार घेऊन अर्थ लावण्याची पद्धती त्यांनी आत्मसात केली होती. माहितीचा मूळ संदर्भ तपासून पाहण्यासाठी जमेल तेवढे कष्ट घेण्याची त्यांची तयारी असे. एकदा कर्झनने राणीच्या जाहीरनाम्याचा उल्लेख 'अशक्य सनद' असा केल्याचे त्यांना स्मरत होते; पण केसरीत लेख लिहिण्यापूर्वी त्यांनी या संदर्भाचा कसून शोध घेतला व 'मद्रास स्टॅण्डर्ड'च्या अंकात तो मिळाला तेव्हाच त्यांचे समाधान झाले. (तळवलकर, २००३, पृ.५०) कायद्याच्या अभ्यासात साक्षीपुराव्यांचे महत्त्व जाणणाऱ्या टिळकांनी भावनेच्या आहारी न जाता ताटस्थ्यवृत्तीने वर्तमानाचे व इतिहासाचे परिशीलन करण्याची भूमिका जपली होती, हे वरील उदाहरणांतून लक्षात येते. आपल्यावर झालेल्या निरनिराळ्या खटल्यांना सामोरे जाताना त्यांनी हीच भूमिका कायम ठेवलेली दिसते.

१९०१ साली वाचनात आलेल्या पुढील दोन पुस्तकांवर अग्रलेख लिहून टिळकांनी

हिंदुस्थानची सद्य:स्थिती, इंग्रज सरकारकडून होणारी दिशाभूल आणि एतद्देशीयांनी ब्रिटिशांच्या चकचकीत सुधारणांनी दिपून न जाता त्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची गरज याविषयीचे चिंतन प्रसिद्ध केले. ही दोन पुस्तके अशी होती :

(१) Poverty and British Rule in India: दादाभाई नौरोजी

(२) Prosperous India: मि. डिग्बी

वासाहतिक राजवटीमुळे भारतीय संपत्तीला कशी गळती लागली व त्यामुळे समृद्ध देश दारिद्र्यात कसा लोटला गेला, याचे दादाभाई नौरोजी यांनी सरकारी आकडेवारीच्या आधारे साधारण विश्लेषण केले होते. मि. डिग्बी या इंग्लंडच्या अभ्यासकाने इंग्रजी राजवटीतल्या डोळे दिपवणाऱ्या सुधारणांना खरोखर भरभराट म्हणायचे की शोषणाची माध्यमे म्हणायचे या अनुषंगाने अशीच साधार चर्चा केली होती. ब्रिटिशांच्या वासाहतिक राजकारणातला दुटप्पीपणा उघड करण्याच्या दृष्टीने या दोन्ही बीजग्रंथांची चर्चा एतद्देशीय सुशिक्षित वर्गात व्हावी या हेतूने टिळकांनी या दोन्ही पुस्तकांवरचे भाष्य अग्रलेखांतून मांडले. या लेखांतून टिळकांनी 'राष्ट्र' आणि 'राष्ट्राचे पुढारी' या राजकीय संकल्पना, तसेच 'दारिद्र्य' आणि 'भरभराट' या दोन अर्थ-राजकीय संकल्पनांविषयीच्या त्यांच्या धारणा स्पष्ट केल्या. 'राष्ट्र' ही 'भौगोलिक' संकल्पना नसून अस्मितामूल्यांनी युक्त अशी 'लोक'संकल्पना आहे या मुद्द्याला त्यांनी महत्त्व दिले. यासंदर्भात त्यांनी लिहिले होते की :

"राष्ट्र म्हणजे समुद्र आणि नद्या यांनी मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणी व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या कांही मैल चौरस तुकड्यास राष्ट्र म्हणावयाचे तर सहारा वाळवंटासही राष्ट्र म्हटले पाहिजे किंवा उत्तर ध्रुवाजवळील बर्फाच्छादित प्रदेशासही राष्ट्र म्हटले पाहिजे. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ नाही व त्याचप्रमाणे नुसता लोकसमुदाय म्हणजेही राष्ट्र नव्हे हेही लक्षात ठेविले पाहिजे. ज्या लोकसमुदायांत एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाही, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनी एकत्र बांधलेले नाहीत, अथवा ज्याच्या अंगात इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचे वैशिष्ट्य वास करीत नाही ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधीही राष्ट्र संज्ञेस पात्र होत नाही." (टिळक,१९२४, पृ. २९२-९३)

राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत पुढाऱ्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते, आणि जेथे पुढारी क्रियाशून्य असतात तेथला राष्ट्रसमाज लयास जाणे क्रमप्राप्त असते, अशी आपली धारणाही टिळकांनी या लेखातून व्यक्त केली आहे. यासंदर्भात टिळकांनी लिहिले आहे :

"राष्ट्रांत हजारो लोक असले तरी ते सर्व राष्ट्रीयत्वास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा नेहमी विचार करीत नाहीत. हे काम देशांतील पुढाऱ्यांनीच केले पाहिजे व अशा प्रकारचे पुढारी इंग्रजी राज्यपद्धतीत व इंग्रजी अंमलखाली उत्तरोत्तर दुर्मिळ होत चालले आहेत ही मोठ्या दु:खाची गोष्ट आहे." (कित्ता,पृ.२९५) इंग्रजी राज्यातल्या डोळे दिपवणाऱ्या सुधारणांमुळे आणि सुरक्षिततेमुळे सर्वसामान्य माणूस हुरळून जाणे स्वाभाविक आहे; परंतु दर्शनी वास्तवापलीकडचे सत्य ओळखून लोकांना अवगत करण्याचे काम पुढाऱ्यांनीच करायला हवे. यावर भाष्य करताना

टिळकांनी लिहिले होते की, "शाळाखाते, तारायंत्र, आगगाड्या, आगबोटी, सडका, धर्मशाळा, दवाखाने, तुरुंग वगैरे राज्यव्यवस्थेच्या नवीन शिस्तीने सर्वांचे डोळे दिपून गेले व कांही दिवस तरी सर्वांस असा भ्रम झाला की, या दयाळू इंग्रज सरकारच्या राज्यात भरतभूमीस इंद्रपद खचित प्राप्त होणार; पण हा भ्रम लवकरच नाहीसा झाला. परराष्ट्रीय व्यापाऱ्यांनी व धंदेवाल्यांनी आपला माल हिंदुस्थानच्या बाजारांत आणून अप्रतिबंध व्यापाराच्या तत्त्वावर आमच्या कारागिरांस, धंदेवाल्यांस व व्यापाऱ्यांस भिकेला लावले. आगगाड्या, आगबोटी वगैरे जी देशांतरी जाण्यायेण्याची शीघ्र साधने अस्तित्वात आली त्यांनी या देशांतील धान्य व माल परदेशांत पाठविण्यास चांगली मदत केली, आणि ज्या ठिकाणी पूर्वी दहापाच युरोपियन लोक होते तेथे आता शेकडो होऊन त्यांचे पगार, पेन्शने आणि व्यापाराच्या व व्याजाच्या रूपाने जात असलेला पैसा याने सर्व हिंदुस्थान देश निर्धन करून सोडला." (कित्ता २९३-२९४) अशा स्थितीत इंग्रजी राज्यात शांतता, सुबत्ता आणि सुरक्षितता नांदून देश भरभराटीला आला आहे, असे म्हणत राहणे म्हणजे सती चालली असता मंगलवाद्यांचा गजर चालवण्यासारखे असल्याची टीका टिळकांनी केली. "इंग्रजी राज्यामुळे हिंदुस्थान देशास दारिद्र्य व दुर्बलता ही कशी प्राप्त झाली, देशाचे राष्ट्रीयत्व नाहीसे होऊन त्यांत मुत्सद्दी, योद्धे, विद्वान आणि साहसी पुरुष निपजण्याची अजिबात कशी बंदी झाली, सुशिक्षित राज्यकर्त्यांची सुधारलेली राज्यपद्धती उत्कर्षास कारण न होता तिच्यामुळे राष्ट्राच्या मानसिक व अधिभौतिक संपत्तीचा कसा ऱ्हास होत गेला आणि चोहोंबाजूने आम्ही हिंदुस्थानवासी लोक हतवीर्य आणि उत्साहहीन होऊन अक्काबाईच्या फेऱ्यात कसे पडलो हे विलायतेतील लोकांस व आमच्या राज्यकर्त्यांस स्पष्टपणे कळविणे जरूर होते; आणि हे काम मि. दादाभाई नौरोजी आणि मि. डिग्बी यांनी दोन चांगली पुस्तके प्रसिद्ध करून केले आहे" (कित्ता ,पृ .२९५) म्हणून त्यांचे टिळकांनी मन:पूर्वक आभार मानले.

मि. डिग्बी यांनी दिलेला पुढील इशारा एक राजनीतीज्ञ म्हणून टिळकांना महत्त्वाचा वाटला, "विसाव्या शतकाच्या आरंभी हिंदुस्थान संपत्तीच्या मानाने आणि नैतिक गुणसंबंधाने इतका खालावला आहे आणि त्यांतील लोक नि:सत्व होऊन इतके गुलाम बनले आहेत की, ही स्थिती अशीच राहिल्यास लवकरच तेवीस कोटींपैकी वीस कोट प्रजा अन्नास मोताद होईल! ही भयंकर स्थिती टाळण्यास एकच उपाय आहे आणि तो हा की, देशांतील संपत्ती देशांत राहून तिचा उपयोग देशांतील धंद्यांची अभिवृद्धी करण्याकडे झाला पाहिजे." (कित्ता, पृ. २९६-२९७)

टिळकांना इंग्रजी सत्तेने आलेल्या शांततेपेक्षा एतद्देशीयांच्या अंगचे तेज, वैभव, सामर्थ्य, हुषारी किंवा बुद्धीच्या विकासाला अधिक महत्त्व द्यावेसे वाटते. थोडक्यात अधिभौतिक सुधारणांतून अधिमानसिक दर्जा उंचावला तरच त्याला शाश्वत विकास म्हणायला हवे, अशी टिळकांची राष्ट्राच्या भरभराटीसंबंधीची कल्पना होती. टिळकांच्या राष्ट्रवादासंबंधीच्या चिंतनाची पायाभूत मांडणी १९०१ साली प्रसिद्ध झालेल्या या लेखांतून होत होती. व्यापक राष्ट्रहिताच्या ध्येयाने झपाटलेल्या या द्रष्ट्या राजनीतीज्ञाला पुढे अनेकदा छोट्या-मोठ्या कारणांसाठी मन:स्ताप सहन करीत आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सतत संघर्ष करावा लागला. त्याचा साररूपाने आढावा आता आपल्याला घ्यावयाचा आहे.

**ताईमहाराज प्रकरण :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच ताईमहाराज प्रकरणाने टिळकांना सार्वजनिक जीवनात मनस्ताप सहन करावा लागला, कट-कारस्थानांना तोंड द्यावे लागले, अनुयायांच्या असमंजसपणाचे भोग भोगावे लागले. त्यांच्या राजकीय जीवनात विक्षेप आणाऱ्या या प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी : टिळक बाबामहाराज ट्रस्टचे विश्वस्त होते. विश्वस्त या नात्याने आपले कर्तव्य निभवावे म्हणून टिळकांनी ताईमहाराजांसाठी २८ जानेवारी १९०१ रोजी औरंगाबाद येथे दत्तकपुत्र म्हणून जगन्नाथ महाराज यांची निवड करून रीतसर दत्तविधान करवून घेतले. मात्र काही हितसंबंधियांनी केलेल्या ढवळाढवळीमुळे या प्रकरणाला निराळेच वळण मिळाले. कोल्हापूरच्या बाळामहाराजांना ताईमहाराजांनी दत्तक घेण्याचा घाट घातला गेला व त्यास ताईमहाराज तयार झाल्या. यावर कोल्हापूरच्या छत्रपतींनी तूर्त कोणत्याच दत्तविधानाला मान्यता देऊ नये यासाठी ऑगस्ट महिन्यात टिळकांनी छत्रपतींची भेट घेतली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. टिळकांना डावलून कोल्हापूरला बाळामहाराजांचे दत्तविधान झाले. त्यानंतर ताईमहाराजांनी २९ जुलै १९०१ रोजी टिळकांना बाबामहाराजांकडून मिळालेले अधिकारपत्र रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज कोर्टात दाखल केला; टिळकांनीही २३ सप्टेंबर १९०१ रोजी पुण्याच्या फर्स्टक्लास कोर्टात बाळामहाराजांचे दत्तविधान रद्द करण्याविषयी फिर्याद दाखल केली. दरम्यान औरंगाबादचे दत्तविधान खोटे असल्याचे बनावट पुरावे ताईमहाराजांकडून ॲस्टनसाहेबापुढे ठेवण्यात आले व ते त्यांनी स्वीकारले. हा खटला लांबत रहावा व त्यातून टिळकांचा कालक्षय व वित्तक्षय व्हावा यादृष्टीने चालढकल सुरू होती. हे लक्षात घेऊन टिळकांनी या अर्जाची चौकशी दुसऱ्या कोणाकडून व्हावी म्हणून हायकोर्टाकडे अर्ज केला; पण त्याचा उपयोग झाला नाही. १६ नोव्हेंबर १९०१ पर्यंत अर्जाच्या उलटतपासणीलाही सुरुवात झाली नव्हती. टिळकांविरुद्ध खरा पुरावा उपलब्ध होत नसल्याने ही चालढकल सुरू होती. अखेर ३ एप्रिल १९०२ रोजी ॲस्टनसाहेबाने निकाल दिला. त्यांनी टिळकांचे ट्रस्टीचे अधिकारपत्र रद्द केले व टिळकांकडून फौजदारी गुन्हे झाले असावेत असा शेरा मारून प्रकरण पुण्याच्या सिटी मॅजेस्ट्रेटकडे वर्ग केले. टिळकांनी १७ एप्रिल १९०२ रोजी ॲस्टनच्या निकालाविरुद्ध हायकोर्टात अपील दाखल केले. १९ ऑगस्ट १९०२ ला हायकोर्टाचा निकाल लागला. टिळकांचे ट्रस्टीचे अधिकार कायम राहिले. मात्र दुसरीकडे टिळकांच्या संभाव्य गुन्ह्याच्या संशयापोटी पोलिसांकरवी दोन-तीन महिने गुप्त चौकशी करून टिळकांविरुद्ध फौजदारी खटला भरण्याची तयारी केली जात होती. त्यानुसार ८ सप्टेंबर १९०२ रोजी सिटी मॅजेस्ट्रेटकडून स्पेशल मॅजिस्ट्रेट मि. क्लेमंटस यांच्याकडे कागदपत्रे रवाना झाली व २ ऑक्टोबर १९०२ पासून टिळकांविरूद्धचा फौजदारी खटला सुरू झाला.

टिळकांविरुद्ध फौजदारी खटल्याचे काम सुरू असतानाच पुण्यात प्लेगची साथ सुरू झाली. टिळक कुटुंबियांना घेऊन गावाबाहेर रहायला गेले; टिळकांचा थोरला मुलगा विश्वनाथपंत याचे मात्र या साथीत १ फेब्रुवारी १९०३ रोजी निधन झाले. खट्ल्यात टिळकांच्या वतीने दादासाहेब करंदीकर काम पहात होते. करंदीकरांना टिळकांच्या वतीने डिफेन्सचे भाषण

करावयाचे होते. या भाषणाचा मसुदा स्वत: टिळकांनीच तयार केला. धुळ्याहून शंकर श्रीकृष्ण देव आणि भुसावळहून गोपाळरावजी गोगटे वकील यांना मदतीला घेऊन टिळकांनी हा भाषणाचा मसुदा तयार केला. २० जुलै १९०३ पासून १ ऑगस्ट १९०३ पर्यंत करंदीकरांनी कोर्टात डिफेन्स केला. (करंदीकर, पृ.१२८) २४ ऑगस्ट १९०३ रोजी खटल्याचा निकाल लागला व टिळकांना दीड वर्षे सक्त मजुरी व एक हजाराचा दंड ठोठावण्यात आला. शिक्षा जाहीर झाल्यानंतर लगेचच टिळकांना हातकड्या घालून येरवडा तुरुंगात बंदिवान करण्यात आले. मात्र त्याच दिवशी पुण्याचे सेशन जज्ज मि. ल्युकास यांच्या कोर्टात अपील दाखल केल्याने संध्याकाळी टिळक घरी परत आले. दरम्यान १९०३ च्या सप्टेंबर महिन्यात ताई महाराजांचा मृत्यू झाला. त्यानंतर ल्युकाससाहेबांनी ४ जानेवारी १९०४ रोजी निकाल दिला व टिळकांची शिक्षा दीड वर्षांवरून सहा महिन्यांवर आणली. टिळकांना पुन्हा अटक झाली व नंतर जामीनावर सोडण्यात आले. टिळकांनी मुंबई हायकोर्टात अपील केले. हायकोर्टाने ३ मार्च १९०४ रोजी टिळकांची सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता केली. २२ मार्चला महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली रे मार्केटच्या पटांगणात सभा भरवून टिळकांच्या निर्दोष सुटकेचा सार्वजनिक आनंद व्यक्त करण्यात आला. या दत्तकप्रकरणाने जानेवारी १९०१ ते मार्च १९०४ एवढा कालावधी टिळकांना मनस्तापात घालवावा लागला.

### बापट कमिशन :

सार्वजनिक जीवनात व्यस्त असतानाही व्यक्तिगत मैत्रीसाठी कोर्टात न्यायालयीन लढाई देण्याचा आणखी एक प्रसंग टिळकांच्या आयुष्यात आला. टिळकांचे मित्र वासुदेव सदाशिव बापट हे बडोदे संस्थानात महसूल खात्यात नोकरीला होते. त्यांच्याविरुद्ध कटकारस्थान होऊन काही खऱ्या-खोट्या तक्रारी दाखल झाल्यावर ब्रिटिश सरकारने इनाम कमिशन नेमून तक्रारींची चौकशी सुरू केली. फिरोजशहा मेथा यांनी बापटविरोधी गटाचे वकिलपत्र घेतले होते. मित्रकर्तव्यात कसूर करता कामा नये या भूमिकेतून टिळकांनी बापटांच्या अन्यायाच्या विरोधात खटल्यात बचावाची कैफियत लिहिण्याचे काम अंगावर घेतले. साक्षीदारांच्या उलटतपासणीत त्यांनी खोटी साक्ष देणाऱ्यांचे पितळ उघडे केले. फिरोजशा मेथांनी अखेर या कामातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. टिळकांच्या वकिलीमुळे बापटांवरचे सर्व मुख्य आरोप खोटे ठरले व त्यांचा तुरुंगवास टळला. बापट प्रकरण आणि ताई महाराज खटला यामुळे मैत्रीचे मूल्य जपणारा, नैतिकतेची बूज राखणारा राजकारणी म्हणून टिळकांची एक वेगळी सत्त्वशील प्रतिमा पुढे येते.

कायद्याचा अभ्यास आणि कायद्यावरचे प्रेम हा टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि राजकीय कार्यशैलीचा महत्त्वाचा पैलू होता. ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करताना त्यांनी सतत कायद्याचे मूल्य पणाला लावले होते. सरकारशी भांडण्याकरिता कायद्याचे अस्त्र कसे वापरावे, याचे हिंदी जनतेला शिक्षण दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. केसरीतील लेखांतून त्यांनी ही भूमिका वेळोवेळी विशद केली होती :

"हे दिवस दांडगाईचे नाहीत, कायद्याचे आहेत हे रयत व सरकारी अंमलदार ह्या दोघांनीही

लक्षात ठेविले पाहिजे. अमुक आणे पीक बुडाल्यास साऱ्याची तहकुबी अगर माफी मिळेल असा जर कायदा आहे तर सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांस ती माफी अवश्य दिली पाहिजे; व लोकांनीही ती निश्चयाने पण शांततेने आग्रहपूर्वक मागून घेतली पाहिजे... रयतेस जे हक्क फॅमिन रिलीफ कोडाने दिले आहेत ते सरकारपासून मागून घेणे हे रयतेचे कर्तव्य आहे; व ते करावयास जर रयत चुकेल तर फुकट उपाशी मरेल असे अनेक वेळा आम्ही मागे सांगितले आहे. तेच रयतेच्या मनावर ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनी पुन:पुन: बिंबवून दिले पाहिजे. कायदेशीर रीतीने सरकारशी भांडावयास रयतेस कसे शिकवावे ही विद्या आमच्या पुढारी लोकांस शिकावयाची आहे व ती जेव्हा ते शिकतील तेव्हाच सरकारी अधिकाऱ्यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस काही फायदा होईल... एका हातात फॅमिन रिलीफ कोड, दुसऱ्या हातात अर्ज आणि मनांत त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय अशी जेव्हा रयतेची स्थिती होईल तेव्हाच त्यांची या दुष्काळांत दाद लागेल. नाहीपेक्षा दुष्काळनिवारणार्थ चांगला कायदा केल्याचे श्रेय सरकार घेईल आणि आम्ही मात्र उपाशी मरू. तालुक्यांतील पुढारी लोकांनी या गोष्टी आता लोकांस चांगल्याच समजावून दिल्या पाहिजेत." (केसरी, १५ डिसेंबर १८९६; लो. टिळकांचे केसरीतील लेख खंड १ ला, १९२५, पृ. ५८८-५८९) राजदरबाराचा हक्क संपादण्याच्या रीतीसंबंधी शिक्षण देणारे 'सार्वजनिक शाळामास्तर' अशा शब्दांत प्रभाकर पाध्ये व श्री. रा. टिकेकर या लेखकद्वयींनी टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन केले आहे. (पाध्ये-टिकेकर,१९३५, पृ. १८३)

## सरकारी धोरणाचा निषेध :

१९०१ साली मे महिन्यात मुंबई सरकारने जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती करणाऱ्या विधेयकाचा मसुदा प्रसिद्ध केला. कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी सावकार हडप करतात, त्यास आळा घालण्याकरिता कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत होते. या प्रस्तावित दुरुस्तीविधेयकाचा अभ्यास केल्यावर टिळकांना या विधेयकामागील सरकारच्या छुप्या हेतूचा अंदाज आला. दुष्काळात सारा न दिल्यास शेतकऱ्यांच्या खालसा केलेल्या जमिनी कुळास हस्तांतरित करण्याचा अधिकार या बिलामुळे कलेक्टरला प्राप्त होणार होता. यामुळे जमीनमालकीचे बरेच प्रश्न उपस्थित होणार होते. त्यामुळे टिळकांनी जूनपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत या प्रस्तावित विधेयकावर टीका करणारे लेख लिहून लोकजागृती करण्याची मोहीम हाती घेतली. अर्थात लोकमताकडे दुर्लक्ष करून सरकारने कायदेमंडळात हे दुरुस्ती विधेयक मंजूर केले. फिरोजशहा मेथा, गोपाळकृष्ण गोखले, दाजी आबाजी खरे या लोकप्रतिनिधींनी सरकारचा निषेध करीत सभात्याग केला. केसरीत लेख लिहून टिळकांनी लोकप्रतिनिधींच्या मताला किमत न देणाऱ्या सरकारी धोरणाचा निषेध केला. आपल्या लेखात त्यांनी लिहिले होते की,

"लोकांचे प्रतिनिधी कायदेकौन्सिलांत येऊन जर अशाच तऱ्हेने त्यांचा बोज ठेवायचा असेल तर, यापेक्षा पाचसहा संगमरवरी दगडाचे पुतळे करून त्यांचीच कायदेकौन्सिलांत निरनिराळ्या ठिकाणी स्थापना करावी आणि निरनिराळ्या भागांच्या निवडणुकी झाल्या म्हणजे एका पुतळ्यास नामदार मेथांची टोपी तर दुसऱ्यास प्रो. गोखल्यांचे पागोटे घालून चटावरील

श्राद्धाप्रमाणे कायदे कौन्सिलांतील फार्स उरकून घ्यावा, हे फार चांगले." (केसरी, ३ सप्टेंबर १९०९)

## बंगालची फाळणीचे राजकारण

१२ डिसेंबर १९०३ रोजी राजपत्रातून बंगालच्या फाळणीची अधिसूचना जारी करण्यात आली. याआधी १८७४ साली बृहत बंगालमधून आसाम प्रांत अलग करण्यात आला होता. त्यानंतरच्या बंगालात त्रिपुरा, बिहार, ओरिसा व छोटा नागपूर या भाषिक प्रदेशांचा समावेश होता. नव्या रचनेत बंगालची 'पूर्व बंगाल' व 'पश्चिम बंगाल' अशी फाळणी करण्यात आली. पूर्व बंगालात चितगाव, ढाका, मैमनसिंग हा प्रदेश. त्यात १ कोटी २० लाख हिंदू व १ कोटी ८० लाख मुसलमान रहिवाशांचा अंतर्भाव होता. पश्चिम बंगालात बिहार, ओरिसा, छोटा नागपूर व बंगालचा उर्वरित भाग मोडत होता. त्यात १ कोटी ७० लाख बंगाली भाषा बोलणारे व ३ कोटी ७० लाख ओडिया व हिंदी भाषिक लोक रहात होते. १९ जुलै १९०५ पर्यंत फाळणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दरम्यानच्या काळात फाळणीला विरोध करणारे शेकडो अर्ज, विनंत्या, निदर्शने झाली; पण लॉर्ड कर्झनने त्यांना दाद दिली नाही. बंगालच्या फाळणीमागे कर्झनची भूमिका कॉंग्रेस व स्वराज्यवादी विचारप्रणालीचे बंगालमध्ये केंद्रीकरण होऊ न देता या चळवळीचे अपसरण व्हावे अशी कुटकारस्थानाची होती. १९११ साली डिसेंबरात पंचम जॉर्जने दिल्ली दरबारात बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. त्या आधी लॉर्ड हार्डिंग्ज यांनी एका गोपनीय पत्रातून पंचम जॉर्ज यांना कळविले होते की, " Partition of Bengal had been an intentional, but a grievous mistake and its rectification a welcome step. .. The transfer of capital from Calcutta is a matter of even increasing urgency owing to the undue influence that Bengal is now exercising over politics in India, since the enlargement of the new Supreme Legislative Council during it is a session in Calcutta." (Chopra, 1998, p.137) ब्रिटिशांच्या गोपनीय कागदपत्रांत ह्या कुटील नीतीचे असे संदर्भ पहायला मिळतात.

## 'स्वदेशी' व 'बहिष्कारा'चे राजकीय शस्त्र:

बंगालच्या फाळणीच्या विरोधात देशात वातावरण तापू लागले. गुप्त संघटना व क्लबांचा उदय झाला. दरम्यान लंडनला गोपाळकृष्ण गोखले व लाला लजपतराय यांनी फाळणीच्या विरोधात ब्रिटिश कारभाऱ्यांचे मतपरिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू केले. इकडे महाराष्ट्रात बंगालच्या फाळणीमागचे ब्रिटिशांचे दुहीचे राजकारण लक्षात आल्यावर टिळकांनी राजकीय शस्त्र म्हणून स्वदेशी माल वापरण्याची कल्पना पुढे आणली. याबाबत नेमस्त आणि जहाल गटात मतभिन्नता होती. न्या. रानडे, लोकहितवादी, सार्वजनिक काका, वासुदेव बळवंत फडके, सोलापूरचे गणेश बाबाजी माटे, वसईचे गोविंद बाबाजी जोशी, रामभाऊ मराठे यांनी स्वदेशी तत्त्वाचा आणि आर्थिक राष्ट्रवादाचा यापूर्वीच पुरस्कार केलेला होता. इतकेच नाही तर १९०५ साली गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली बनारस येथे झालेल्या कॉंग्रेस

अधिवेशनात काँग्रेसचे अधिकृत धोरण म्हणून स्वदेशीचा पुरस्कार करण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र ही चळवळ बंगालपुरती मर्यादित ठेवण्याची त्यावेळच्या काँग्रेसची भूमिका होती. टिळकांनी व त्यांच्या जहालपंथी अनुयायांनी ही चळवळ राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा आग्रह धरला होता. नेमस्तांच्या दृष्टीने जोवर देशात पुरेसे उत्पादन होत नाही तोवर परदेशी मालाचा वापर करण्यास हरकत नव्हती. टिळकपंथीय जहाल गटाची भूमिका मात्र आक्रमक होती. जेथे स्वदेशी माल उपलब्धच नसेल तेथे अन्य देशांत तयार झालेल्या मालाचा वापर करायला हरकत नाही; पण इंग्लंडमध्ये तयार झालेला माल मुळीच वापरू नये, त्यावर संपूर्ण बहिष्कृत घालावा, असा जहालपंथीय स्वदेशी आंदोलनाचा पवित्रा होता. मुंबई इलाख्यात लोकमान्य टिळक आणि शि. म. परांजपे यांनी, वऱ्हाड-मध्यप्रांतात दादासाहेब खापर्डे व बा. शि. मुंजे यांनी, पंजाबात भगतसिंगांचे काका अजितसिंग यांनी, व संयुक्त प्रांतात लाला लजपतराय यांनी स्वदेशीचा पुरस्कार व इंग्रजी मालावर बहिष्कार टाकण्याची चळवळ सुरू केली.

१५ ऑगस्ट १९०५ च्या 'केसरी'त टिळकांनी बंगालच्या फाळणीच्या संदर्भात 'आणीबाणीची वेळ' नावाचा अग्रलेख लिहिला व विलायती माल न वापरण्याची शपथ घेण्याविषयी आवाहन केले. २०-२२ ऑगस्ट १९०५ पासून महाराष्ट्रात वंगभंगाची चळवळ वाढत गेली. २७ ऑगस्ट १९०५ रोजी टिळक आणि शि. म. परांजपे यांनी पुण्यात ३००० विद्यार्थ्यांना जहाल राजकारणाची दीक्षा दिली. त्यात फर्ग्युसन कॉलेजातील वि. दा. सावरकर, द. पं. चिंचाळकर व सेन नावाच्या बंगाली विद्यार्थ्याचा समावेश होता. बंगालप्रमाणे महाराष्ट्रात चळवळ संघटित करण्यासाठी पाच विद्यार्थ्यांची कृती-समिती नेमण्यात आली. सावरकर-चिंचाळकर या विद्यार्थ्यांनी ७ ऑक्टोबर १९०५ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर समारंभपूर्वक विदेशी कापडांची होळी पेटवली व वसाहतवादाचे प्रतीक असलेल्या विदेशी कापडाला प्रतिकात्मक स्वरूपात अग्नीडाग दिला. जमलेल्या लोकांनी चितेभोवती प्रदक्षिणा घालून रक्षा कपाळी लावली व टिळकांनी दिलेली विदेशी कापड न वापरण्याची शपथ घेतली. याची प्रतिक्रिया सरकारात उमटली. कलेक्टरच्या आदेशावरून फर्ग्युसनचे प्राचार्य र. पु. परांजपे यांनी सावरकर व त्यांच्या सोबत्यांना वसतिगृहातून काढून टाकले व दंड केला. टिळकांनी 'केसरी'तून याचा निषेध करणारे तीन अग्रलेख लिहिले. विदेशी कपड्यांची होळी पेटविण्याचे हे प्रतिकात्मक आंदोलन महाराष्ट्रभर पसरले. नागपूरला १७ जुलै १९०६ रोजी दादासाहेब खापर्डे यांच्या सभेनंतर विदेशी कापडांची होळी करण्यात आली. नाशिक, नगर अशा अनेक ठिकाणी याचे अनुकरण झाले.

### लोकमान्यांची चतु:सूत्री :

'स्वदेशी'चळवळीची चार उपांगे होती- १. स्वराज्य २. बहिष्कार ३. स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार आणि ४. राष्ट्रीय शिक्षण. टिळकांनी या चतु:सूत्रीवर भर देऊन झंझावाती प्रचार सुरु केला. १९०६ सालच्या कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनातही दादाभाई नौरोजींनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीवर भर दिल्याने स्वदेशी चळवळीला

देशभरातून पाठिंबा वाढला. टिळकांनी आपल्या भाषणांतून आणि लेखनातून लोकांना या चळवळीमागची भूमिका समजावून सांगितली.

१. 'स्वराज्य' संकल्पना : टिळकांनी लोकांना ही भूमिका पुढील शब्दांत स्पष्ट करून सांगितली. " प्रजेस हक्क हवे असल्यास तिने ते स्वपराक्रमाने व स्वावलंबनाने मिळवावे लागतात.. उद्योग करावा. तो नेटाने करावा; होईल तितके अडवावे, नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नाही. हा स्वार्थाचा प्रश्न आहे, धर्माचा किंवा औदार्याचा नाही. ही राजनीती आहे; धर्म नाही. जिंकलेल्या लोकांस जेत्यांनी आपखुषीने स्वातंत्र्य दिल्याचे उदाहरण इतिहासात नाही. .. स्वातंत्र्य हेच प्रत्येक राष्ट्राचे अंतिम ध्येय आहे, भिऊ नका. संकटे आली तरी डगमगू नका. संकटांखेरीज स्वातंत्र्य नाही.. तुमच्यातील भेद हेच सरकारचे कवच. तुमची दुर्बळता हेच त्यांचे बळ." (फाटक, २००६, पृ. २४७) टिळकांच्या या भूमिकेचा विस्तार भा. ल. भोपटकर, शि. म. परांजपे, चिं. वि. वैद्य, बाळासाहेब नातू, दादासाहेब खापर्डे, बा. शि. मुंजे या अनुयायांनी केला व संपूर्ण महाराष्ट्र स्वदेशी चळवळीने ढवळून काढला. टिळकांनी श्रमिकवर्गात राष्ट्रीय अस्मिता जागवावी या हेतूने स्वदेशी आंदोलनात गिरणी कामगार व गिरणी मालकांना सहभागी करून घेण्याची कल्पना आपल्या निबंधांतून पटवून दिली. विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'नॅशनॅलिस्ट लिग ऑफ मराठाज्' ही संघटना स्थापन करून मुंबईच्या कामगारवर्गात स्वराज्य चळवळीचा प्रसार केला.

२. बहिष्कार : सत्ताधीशांना झोपेतून जागे करण्याचे अस्त्र म्हणून बहिष्काराचे ढोल बडवले पाहिजेत अशी भूमिका होती. प्रजाजनांसाठी दुसरा मार्ग उपलब्ध नसल्याने बहिष्कार हेच एक वैधानिक हत्यार वापरणे भाग आहे, असे या भूमिकेचे समर्थन करण्यात आले होते. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना 'बहिष्कार' हा शब्द द्वेषमूलक वाटत होता; त्यामुळे १९०७ च्या बनारसच्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी 'बहिष्कार' हे काँग्रेसचे धोरण नसल्याचे सांगितले होते. विदेशी वस्तूंवर बहिष्कार घातल्याने सरकारची आर्थिक नाकेबंदी होईल व त्यामुळे ब्रिटिश सरकार काँग्रेसलाच नेस्तनाबूत करील अशी गोखल्यांना भीती वाटत होती. बहिष्कार हा शेवटचा उपाय असू शकतो, म्हणून त्याची सध्या घाई नको असे त्यांना वाटत होते. विशेषत: भारतमंत्री जॉन मोर्ले आणि व्हाइसराय मोर्ले मिंटो हे टप्प्याटप्प्याने संविधानिक सुधारणा देण्याच्या तयारीत असताना बहिष्काराची भूमिका घेऊ नये असा गोखल्यांचा आग्रह होता. मात्र गोखल्यांची ही नेमस्त भूमिका टिळकांना आणि बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष या जहाल गटाला मान्य नव्हती. बहिष्कार म्हणजे राष्ट्रीय अस्मितेचा आविष्कार अशी त्यांची भूमिका होती. 'स्वदेशी' ही केवळ स्वदेशी मालाचे उत्पादन व वितरण करण्याची चळवळ नसून ब्रिटिशांवर व त्यांच्या उत्पादनांवर बहिष्कार घालण्याचे हत्यार आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार म्हणजे शासकीय शाळांवर बहिष्कार. 'लवाद' पद्धतीचा पुरस्कार म्हणजे शासनाच्या न्यायसंस्थेवर बहिष्कार. अहिंसक प्रतिकाराचा हा शांततेचा मार्ग असल्याने टिळकांच्या या भूमिकेचे इतर काँग्रेसजनांनीही समर्थन केले. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी तर सर्व मानसेवी सरकारी पदांचा त्याग करून सरकारवरच बहिष्कार घातला. 'काळ' पत्रातून शि. म. परांजपे यांनी 'स्वदेशी व बहिष्कार ही चळवळ आमची

राजकीय आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा उपाय' असल्याचे स्पष्ट केले. (Sourse Material For History of Freedom Movement, Vo. II, p. 324)

३. स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार : स्वदेशी वस्तूंचे उत्पादन व वितरण केल्याने आर्थिक स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त होईल ही भूमिका होती. रोमेशचंद्र दत्त यांनी याच भूमिकेतून आयात कमी करण्याच्या धोरणाचा पुरस्कार करून एतद्देशीयांच्या नव्या बालोद्योगांना संरक्षण देण्याची मागणी केली होती. रतनजी दादाभॉय टाटा, गोवर्धनदास खटाव, किर्लोस्कर, वालचंद हिराचंद इत्यादी उद्योगपतींनी स्वदेशी वस्तूंच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. टिळकांच्या पुढाकाराने मुंबईत माटुंग्याला 'स्वदेशी बाजार' उघडण्यात आला. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांनी नागपूरात स्वदेशी वस्तूंचे दुकान काढले. डॉ. मुंजे यांनीही विदर्भात स्वदेशीची दोन दुकाने उघडली. पुण्यात मुसलमानांनी स्वदेशी टोप्यांचा कारखाना काढून त्याच वापरण्याचा निश्चय केला. सावंतवाडीत कापडदुकानदारांनी विदेशी कापड न विकण्याची प्रतिज्ञा केली. बडोदे, पंढरपूर येथे स्थानिक संस्थानिकांनी देशी कारखान्यातून तयार झालेल्या स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविले. बेळगाव व धारवाडला गंगाधर देशपांडे यांनी देशी उद्योजकांची औद्योगिक परिषद भरवली. कर्नाटकात बेल्लारी येथे स्वातंत्र्यसैनिकांनी नाण्यांची टांकसाळ सुरू केली. लोकहितवादींचे पुत्र नानासाहेब देशमुख यांनी 'स्वदेशवस्तुप्रचारिणी सभा' स्थापन केली. मुंबई इलाख्यात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वदेशी मालाची विक्री करणारी दुकाने निघाली. (Bombay Presidency Police Abstract of Intelligence, Jan. 1907, P. 28) स्वदेशी चळवळीच्या प्रेरणेतून १९०६ साली ३,६७,००,००० रु. भांडवल असलेल्या १५ देशी बँका स्थापन झाल्या. १,२१,००,००० रु भांडवल असलेल्या ५ आगबोट कंपन्या स्थापन झाल्या. १,८०,००,००० रु. भांडवल गुंतवणूक करून २२ नवीन कापडगिरण्या सुरू झाल्या, ७०,००,००० रु. गुंतवून एक काचेचा कारखान सुरू झाला. या स्वदेशी चळवळीचा मँचेस्टर व लँकशायरच्या आर्थिक उलाढालींवर परिणाम झाला व तिथले जवळपास एक लाख कामगार बेकार झाले.

टिळकांनी 'केसरी'तून स्वदेशी चळवळीच्या प्रचाराचा सपाटा चालवला होता. २८ नोव्हेंबर १९०५ चा 'हातघाईवर आले' या अग्रलेखातून व १२ डिसेंबर १९०५ च्या 'स्वदेशीवरील आक्षेप' या लेखातून टिळकांनी स्वदेशी चळवळीला धार आणणारे लेखन केले शि. म. परांजपे यांनी केसरीतल्या या 'स्वदेशी' मंत्रजागराचा वृत्तांत नोंदवला आहे : "स्वदेशीच्या वर्गण्या, देणग्या, शपथा, प्रतिज्ञा, निश्चय, पिकेटिंग, नवीन दुकाने, नवीन भांडवले, नवीन कारखाने, नवीन जिनसा इत्यादी अनेक नवीन प्रकारांना केसरीमध्ये जागा मिळू लागली. सारांश, थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे केसरी वर्तमानपत्र हे स्वदेशी चळवळीची एक एनसायक्लोपिडियाच बनून गेले." (बालशिक्षणमाला, टिळक विशेषांक,१९१६, उद्धृत, फाटक, २०१२, पृ. २४९)

'स्वदेशी'चे व्रत हे राष्ट्रीय अस्मिताभावाचे भावनिक मूल्य आणि राष्ट्रवादाचा आचारधर्म म्हणून रुजविण्यावर टिळकांचा भर होता. लग्नसराईच्या दिवसात 'स्वदेशी'चा प्रचार करताना

टिळकांनी 'केसरी'तून लोकांना केलेल्या आवाहनात म्हटले होते की, "विवाहासारख्या पवित्र व मंगल प्रसंगी जर लोकांनी परदेशी मालाच्याद्वारे होणारी पैशाची अशुभकारक लूट बंद केली नाही तर वधूवरे सुखाने कशी नांदतील?.. स्वदेशीला देशांतील सर्व विचारी लोकांची मान्यता असल्यामुळे ही मान्यता डावलून जर लग्नांतून परदेशी माल वापरला जाईल तर विद्वान, कर्त्या, जबाबदार आणि विचारी सद्वृत्तीच्या व्यक्तींचा स्वत:वर शाप ओढवून घेण्यासारखे ठरेल. तसे करणे म्हणजे मंगळसूत्राला स्वत:च अपशकून उत्पन्न करणे होय. वधूंच्या हातांतल्या बांगड्या जर सदैव टिकाव्या अशी इच्छा असेल तर त्यांचे हात परदेशी मालाने भ्रष्ट होऊ न देणे उचित असून या व्रताची सांगता होण्यासाठी भोजनसमारंभातल्या देणग्या किंवा दक्षिणा पैसाफंडाला द्यावी." (फाटक, कित्ता, पृ. २४८-२४९)

४. राष्ट्रीय शिक्षण : टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला राष्ट्रीय शिक्षणाची जोड दिली. सरकारी मदतीऐवजी लोकाश्रयातून शिक्षणसंस्था चालवाव्यात; तसेच धंदेशिक्षणाची जोड देऊन देशाच्या स्वावलंबनाचा पाया विस्तृत करण्यासाठी शिक्षणप्रसाराची मोहीम हाती घ्यावी, अशी राष्ट्रीय शिक्षणामागची भूमिका होती. अर्थात हे शिक्षण इंग्रज सरकारच्या हस्तक्षेपापासून अलग ठेवले तरच आधुनिक पाश्चात्यविद्या ही मदिरा ठरण्याऐवजी अमृतमय ठरू शकेल अशी टिळकांची भूमिका होती. सरकारी शाळांवर बहिष्कार आणि कृषिशिक्षण, कौशल्यशिक्षण व साक्षरताप्रसारावर भर देणे हे राष्ट्रीय शिक्षणाचे ध्येय होते. कोल्हापूर संस्थानात विष्णू गोविंद विजापूरकर यांनी १ जून १९०६ रोजी 'समर्थ विद्यालय' ही राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा सुरू केली व त्या माध्यमातून स्वातंत्र्याची प्रेरणा घेणाऱ्या तरुणांची पिढी घडविण्याचे काम सुरू केले. विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा प्रारंभ बहिष्कारापासून झाला. राजाराम विद्यालयातील विजापूरकरांच्या विद्यार्थ्यांनी परदेशी कागदाच्या उत्तरपत्रिकांना नकार देऊन स्वदेशी उत्तरपत्रिकांची मागणी करून परीक्षेवर बहिष्कार घातला. प्रशासनाने विजापूरकरांना सेवेतून बडतर्फ केले. त्यानंतर त्यांनी २५ मार्च १९०६ रोजी कोल्हापूरात 'स्वदेशी मंडळ' स्थापन करून व पाठोपाठ एप्रिल महिन्यात 'विश्ववृत्त' मासिक सुरू करून स्वदेशी आंदोलनात उडी घेतली. कोल्हापूरात 'लोकप्रतिनिधी सभा' स्थापन करून राष्ट्रीय चळवळ बांधण्याचे काम केले.

राष्ट्रीय शिक्षण घेतलेल्या युवकांना सरकारी नोकऱ्या मिळणार नाहीत, अशी भीती दाखवली जात असे. त्यावर टिळक म्हणत की, 'स्वत:च्या हिंमतीवर पोट भरण्याचे सामर्थ्य अंगी येणे म्हणजेच राष्ट्रीय शिक्षण.' 'राजकीय सिद्धांतांचे व सामाजिक प्रमेयांचे विद्यार्थ्यास लहानपणापासून बाळकडू देणे हेच राष्ट्रीय शिक्षणाचे बीज होय. प्रजेचे हक्क काय असतात व त्यापैकी आपणांला किती आहेत, हे जसे मुलांना समजले पाहिजे तद्वतच जातिभेद, जातिद्वेष व जातिमत्सर यांच्या योगाने आपला देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेही ज्ञान राष्ट्रीय शाळेतील मुलांना मिळाले पाहिजे. जातिभेद मोडण्याची आवश्यकता किती आहे, हे आमच्या विद्यार्थ्यांस समजले पाहिजे. राष्ट्रीय विद्यालयांत सर्व धर्माच्या विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षणाचीही सोय झाली पाहिजे. .. बाकी इतर

शिक्षणाविषयी कोणताही वाद नाही.. सरकारी शाळांतील शिक्षण गुलामगिरीच्या वळणावर मिळत असते. राष्ट्रीय शाळांतून त्या वळणास फाटा मिळाला पाहिजे व विद्यार्थ्यास स्वाभिमानाचे व तेजस्वीपणाचे बाळसेदार वळण प्रथमपासूनच दिले पाहिजे... आम्हीही इंग्लंडचा इतिहासच शिकवू, पण राजाचा जुलूम तेव्हा इंग्रजांनी कसा टाळला, संपत्ती कशी मिळवली हेही पण शिकविण्यास विसरणार नाही." (फाटक, कित्ता, पृ. २४०-२४१) टिळकांनी 'केसरी'तून २७ नोव्हेंबर, ४ डिसेंबर १९०६ व २९ जानेवारी १९०७ च्या अग्रलेखांतून राष्ट्रीय शिक्षण व खाजगी शाळांची जबाबदारी या विषयी लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला.

स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणाची कार्यक्रमपत्रिका घेऊन स्वदेशीची चळवळ फोफावू लागल्यावर ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या कायद्याचा वापर करून ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पत्रकारांवर खटले भरण्यात आले. भालाकार भोपटकरांना ६ महिन्यांचा कारावास व १ हजारांचा दंड झाला. नागपूरात १९०७ साली माधवराव सप्रे यांनी टिळकांचे केसरीतील लेख हिंदीतून उपलब्ध करून देण्यासाठी हिंदीतून केसरी पत्र सुरू केले होते; सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला व त्यात त्यांना शिक्षा झाली. ११ जुलै१९०८ रोजी 'काळ' मधील लेख राजद्रोही ठरवून शि. म. परांजपे यांना अटक झाली. १२ मे १९०८ च्या केसरीतील 'देशाचे दुर्दैव' या अग्रलेखावर राजद्रोही लेखनाचा शिक्का मारून लो. टिळकांवर खटला भरण्यात आला. या अग्रलेखाने लोकांच्या मनात सरकारबद्दल द्वेष व अपमानबुद्धी निर्माण झाली, असा आरोप ठेवण्यात आला. इ. पि. कोडाच्या १२४ अ व १५३ अ या कलमांखाली हा राजद्रोहाचा खटला चालविण्यात आला. (यासंबंधी अधिक विवेचन 'राजद्रोहाचा खटला' या स्वतंत्र छेदकात पुढे आलेले आहे.) नाटककार खाडिलकर यांनी 'कीचकवध' नाटकात पौराणिक कथेच्या माध्यमातून कर्झनवधाचे राजकीय नाट्य रंगवल्यामुळे 'कीचकवध' नाटकावर बंदी घालण्यात आली. अशा नानाविध मार्गांनी सरकारने स्वदेशी चळवळीला आवर घालण्याचा प्रयत्न केला.

## काँग्रेस दुभंगली :

'स्वदेशी' चळवळीमुळे टिळकांच्या जहाल गटाची काँग्रेसमधली पकड घट्ट होत चालली होती. टिळकांचे वऱ्हाडातील अनुयायी दादासाहेब खापर्डे व बा. शि. मुंजे हे कलकत्त्यानंतरचे काँग्रेसचे अधिवेशन टिळकांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला घ्यावे यासाठी आग्रही होते. टिळकांनाही याची कल्पना होती. कलकत्ता अधिवेशन आटोपल्यावर टिळक नागपूरला आले होते व तेथे यासंदर्भात काही विचारविनिमय झाला होता. मात्र या प्रस्तावाच्या विरोधात काँग्रेस अंतर्गत राजकारण शिजत होते. या प्रस्तावित अधिशेनासाठी स्वागत समितीचे अध्यक्ष म्हणून गंगाधरराव चिटणवीस यांची निवड करण्यात आली होती. मात्र २२ सप्टेंबर १९०७ च्या सभेत जहाल गटाच्या समर्थकांनी गंगाधररावांना सभेचे कामकाज करू दिले नाही, त्यामुळे त्यांनी स्वागताध्यक्षपदाचा राजीनामा दिला. नंतर फिरोजशहा मेथा यांनी टिळकांवर मात करण्यासाठी मुंबईत स्वत:च्या घरी १० नोव्हेंबर १९०७ रोजी काँग्रेस समितीची बैठक आयोजित केली व काँग्रेसचे पुढचे अधिवेशन वऱ्हाड-मध्य प्रांतात नागपूरला घेण्याऐवजी मुंबई इलाख्यात सुरत येथे

घेण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसच्या घटनेनुसार ज्या इलाख्यात अधिवेशन होते तिथला सदस्य अध्यक्षपदाची निवडणूक लढवू शकत नाही, त्या इलाख्याबाहेरच्या सदस्यास अध्यक्षपदाची संधी देण्याचा नियम होता. सुरतेला अधिवेशन नक्की झाल्यावर अध्यक्षपदाच्या शर्यतीतून टिळकांचे नाव आपोआपच बाद झाले. या पार्श्वभूमीवर टिळक-खापर्डे गटाने लाला लजपतराय यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली, पण त्यांनी त्यास नकार दिला. २४ नोव्हेंबर १९०७ रोजी सुरतला स्वागत समितीच्या बैठकीत डॉ. रासबिहारी घोष या नेमस्त गटाच्या पुढाऱ्याची अध्यक्षपदी निवड झाली. अधिवेशनाच्या कार्यक्रमपत्रिकेत स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या विषयांना स्थान देण्यात आले नाही. टिळकांनी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच यावर आक्षेप घेतला.

२६ डिसेंबर १९०७ रोजी सुरतेच्या अधिवेशनाचा एकूण रंग जहाल गटाच्या विरोधात जात असल्याचे पाहून अधिवेशनास सुरुवात झाल्यापासून जहाल गटातील तरुणांनी अधिवेशनात अडथळे आणायला सुरुवात केली. टिळकांचे केसरीतले प्रक्षोभक लेखन वाचून व आयर्लंड, इटली व रशियातल्या बंडखोरांच्या चळवळींच्या प्रभावातून हिंदुस्थानातले अनेक तरुण राजकारणात सक्रिय झाले होते. चापेकर बंधू, सावरकर, लो. टिळक हे त्यांचे आदर्श होते. या उच्च शिक्षित तरुणांना नोकरी- व्यवसायाच्या अपेक्षित संधी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे बॉम्ब तयार करण्याचे शिक्षण घेणे, लालीमबाजी करणे आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षशील होऊन जमेल तेव्हा, जमेल तिथे रस्त्यावर उतरणे यात त्यांची उर्जा खर्ची पडत होती. काँग्रेस अधिवेशनातही या तरुणांना शिरकाव करण्याची खुमखुमी होती. सुरत काँग्रेसच्या अधिवेशनासाठी नाशिकहून 'अभिनव भारत' संघटनेचे गणेश सावरकर शंभर तरुणांना घेऊन सुरतला दाखल झाले होते. अध्यक्षपदासाठी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे नाव पुढे आल्याबरोबर मद्रास, वऱ्हाड-मध्यप्रांत व महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी "टिळक हवेत' अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. अरविंद घोष, बारिंद्र घोष व गणेश सावरकर यांनी उपस्थित तरुणांच्या मदतीने अधिवेशनात खुर्च्या, दगड, चपला फेकून गोंधळ माजवला. अधिवेशन एक दिवसासाठी तहकूब करावे लागले. २७ डिसेंबरला टिळकांनी अधिवेशन तहकूब करण्याची सूचना मांडण्याचा प्रयत्न केल्यावर हुल्लडबाजी झाली व अध्यक्षांनी राष्ट्रीय सभेचे अधिवेशन बेमुदत तहकूब केले.

अधिवेशन तहकूब झाल्यानंतर काँग्रेस दुभंगली. २८ डिसेंबर १९०७ रोजी मवाळ गटाने 'कन्व्हेंशन' स्थापन करून जहालांना वाळीत टाकले. मवाळ गटाने काँग्रेसची ३० कलमांची नवी घटना तयार केली. काँग्रेसचे उद्दिष्ट व ध्येय साध्य करण्याची कार्यपद्धती, अधिवेशनात भाग घेणाऱ्यांसाठी अटी व सभेचे कामकाज चालविण्याचे नियम ठरविण्यात आले व हे सर्व मान्य असण्याचे प्रतिज्ञापत्र लिहून देणाऱ्यांनाच अधिवेशनात प्रवेश करता येईल अशी अट घालण्यात आली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जहालांना प्रवेशास मनाई करण्यात आली. काँग्रेसने घटनेच्या ब्रीदवाक्यात जी दोन कलमे अंतर्भूत केली होती त्यात राष्ट्रकुलातील अन्य वसाहतींप्रमाणे "वासाहतिक स्वातंत्र्य" प्राप्त करण्याचे ध्येय ठेवण्यात आले होते. तसेच

घटनात्मक मार्गांनी प्रशासकीय सुधारणा, राष्ट्रीय एकात्मता व लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकजागृती करण्यावर भर देण्यात आला होता. (१९२१ साली गांधीजींनी या ब्रीदवाक्यात सुधारणा केली व 'संपूर्ण स्वातंत्र्य' हे काँग्रेसचे अंतीम ध्येय निर्धारित केले. )

सुरतेच्या काँग्रेसनंतर मवाळांनी काँग्रेसची घटना नव्याने करून जहाल गटाला काँग्रेसबाहेर काढले. या एकतर्फी निर्णयावर टिळकांनी आपली प्रतिक्रिया नोंदवताना म्हटले होते की, काँग्रेस हे 'स्वराज्याचे राष्ट्रीय मंदिर' असून ती कोणाची जहागिरी किंवा मिरासदारी नाही. त्यामुळे काँग्रेसमध्ये सर्वांना प्रवेशाचा अधिकार असला पाहिजे. काँग्रेसमधली फूट टाळण्याचा बराच प्रयत्न झाला. ही फूट टाळण्यासाठी टिळकांनी हुल्लडबाजीची जबाबदारी स्वत:कडे घ्यावी व तसे जाहीरपणे कबूल करणारे पत्र आपल्याकडे द्यावे असा पर्याय मोतीलाल घोष यांनी सुचवला; संघटना राखण्यासाठी टिळकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला, मात्र फिरोजशहा गटाने समेटाच्या ह्या प्रस्तावास प्रतिसाद न दिल्याने अखेर काँग्रेस दुभंगली.

**दारूबंदी :**

सुरत काँग्रेसचे अधिवेशन तहकूब झाल्यानंतर पुढल्या सहा महिन्यात टिळकांनी 'दारुबंदी'ची मोहीम हाती घेतली. दारुबंदीच्या विषयावर व्याख्याने देणे, लेख लिहिणे, दारु दुकानांसमोर निदर्शने करणे असे या मोहिमेचे स्वरूप होते. 'सरकार, दारू आणि लोक' या १४ एप्रिल १९०८ च्या 'केसरी'तील लेखात टिळकांनी दारुबंदीच्या संदर्भात इंग्रज सरकारचे धोरण भारतीय संस्कृतीशी कसे विसंगत आहे याची चर्चा केली होती. या लेखात ते लिहितात :

"ज्यांच्या हातात सत्ता आहे ते दारूबाज आहेत, निदान पानस्वातंत्र्याचे भोक्ते आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही. पानस्वातंत्र्य म्हणजे ज्याच्या इच्छेस जे प्यावेसे वाटेल ते पिण्याचा त्यास कायद्याने पूर्ण अधिकार असणे हे होय. हिंदू किंवा मुसलमानी धर्मशास्त्र श्रुति, स्मृति किंवा कुराण यांनी हा पानस्वातंत्र्याचा अधिकार हिंदुस्थानांतील लोकांस ठेवलेला नाही.... श्रुतिस्मृति आणि कुराण यांनी जे पाप निषिद्ध मानिले, आणि दोन्ही धर्मांनी आपापल्या आज्ञेने हजारो वर्षेपर्यंत लोकांची अंत:करणे शुद्ध ठेवून ज्या महापातकाचा सदर अंत:करणात प्रवेश करू दिला नाही, तीच पातके इंग्रज सरकाराच्या राज्यांत पानस्वातंत्र्याचे बंड माजल्यामुळे आता आमच्यांत डोकावू लागली आहेत; आणि मद्याकडे कोणत्याही मनुष्याची 'रोगट प्रवृत्ती' असते हे भागवतवचन लक्षांत आणिले म्हणजे हल्ली घडून येत असलेल्या प्रकारांत कोणासही आश्चर्य वाटणार नाही... इंद्राने ज्याप्रमाणे शुक्राचार्यांकडे रंभा पाठविली तद्वतच पानस्वातंत्र्यवादी इंग्रजी अधिकारी आम्हा हिंदी प्रजेपुढे दारूची दुकाने मांडीत आहेत. आणि त्याचा परिणाम असा झाला की, ज्या पुणे शहरात पेशवाईअखेर दारुचा थेंबही खपत नव्हता .. त्या पुण्यनगरांत विसाव्या शतकाच्या प्रारंभी दरसाल सात लक्ष रुपयांची दारू खपत असून दारू पिऊन धिंगामस्ती केल्याबद्दल बाराशेपासून पंधराशे इसमांस दरवर्षी मॅजिस्ट्रेट कोर्टापुढे दंड किंवा शिक्षा होत आहेत." (टिळक, १९२६, पृ. २६७-२६८)

दारुबंदीच्या मोहिमेत स्वयंसेवक दारूगुत्त्यांसमोर उभे राहून शांततेने दारुगुत्त्याकडे जाणाऱ्यास परावृत्त करण्यासाठी विनंती करीत. मात्र रस्ता अडवल्याचे कारण दाखवून सरकारने स्वयंसेवकांना दंड करायला सुरुवात केली. दारूच्या मक्तेदारांचे उत्पन्न बुडू नये यासाठी ॲण्डरसन नावाच्या अधिकाऱ्याने पुण्यातली मद्यपाननिषेध चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. या अविचारीपणाचाही टिळकांनी खरपूस समाचार घेतला. 'गरीबांस दारू कशी मिळेल' याची चिंता करण्यापेक्षा 'गरीबास अन्न कसे मिळेल' याची चिंता सरकारी अधिकाऱ्यांनी करावी, असा सल्ला देऊन सरकारने सरकारी तिजोरीच्या नुकसानीची पर्वा न करता पानस्वातंत्र्याचा आपला हेका व आग्रह सोडून द्यावा, असे आवाहन केले. दारुगुत्त्यांपुढे पहाऱ्याचे काम करणाऱ्या स्वयंसेवकांचे काम सरकारी अधिकाऱ्यांनी बंद पाडल्याच्या निषेधार्थ पुण्यात डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेण्यात आली. सभेला हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती या सर्व धर्मांचे लोक मोठ्या संख्येने हजर होते. दारुबंदी चळवळीतून ब्राह्मण ब्राह्मणेतरांवर जुलूम करतात या ब्रिटिश सरकारच्या मखलाशीचाही टिळकांनी समाचार घेतला. 'दारू आणि सरकारची अडचण' या २८ एप्रिल १९०८ च्या 'केसरी'तील लेखात टिळक लिहितात, "ब्राह्मण आपल्या धार्मिक वजनाचा दुरुपयोग करून इतर जातींवर दारूच्या कामी अन्यायाचा जुलूम करीत आहेत, असे म्हणणे म्हणजे इसापनीतीतील लांडग्याने काहींना काही तरी शक्कल लावून जसे गरीब कोकरास खाऊन टाकले, त्याप्रमाणे निर्लज्जपणाची पाहिजे ती सबब पुढे करून सज्जन स्वयंसेवकांना हाणून पाडण्यासारखे आहे. ह्या कामी ब्राह्मण ब्राह्मणेतरांवर जुलूम करतात, असे म्हणणे साफ खोटे आहे." ( टिळक, १९२६, पृ. २७७) कुठल्याही कारणावरून ब्राह्मण-ब्राह्मणेतरांमध्ये फूट पाडणाऱ्या ब्रिटिशांच्या कुटील राजनीतीचे जसे इथे दर्शन घडते, तसे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला खतपाणी घालण्याचे काम इंग्रज अधिकारी कसे करीत असत याचाही नमुना पहायला मिळतो. या भेदनीतीची दखल घेऊन इंग्रज अधिकाऱ्यांचे पितळ उघडे पाडण्याची संधी टिळक सोडत नसत, हेही या लेखावरून लक्षात येते.

**राजद्रोहाचा खटला :**

बंगालच्या बॉम्बस्फोटापासून बंगाल आणि महाराष्ट्रात क्रांतिकारी संघटनांच्या घातपाताच्या कारवाया सुरू झाल्या होत्या. बंगालच्या बॉम्बस्फोटात दोन ब्रिटिश ठार झाले होते. यापूर्वी 'केसरी'च्या संपादक मंडळातील उपसंपादक न. चिं. केळकर आणि वासुकाका जोशी यांनी इ. स. १९०० च्या सुमारास नेपाळला रायफली व काडतुसे बनविण्याचा कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा बोभाटा होऊ नये म्हणून त्यांनी प्रथम खाटमांडूतल्या राजमहालासाठी मंगलोरी कौले बनविण्याचे काम मिळविले व या कौलांच्या कारखान्यात छुपेपणाने रायफली व काडतुसांचे उत्पादन करण्याची योजना आखली होती. खाडिलकरांनी कोलकत्त्यातील एजंटशी संधान बांधून या शस्त्रास्त्र निर्मितीसाठी जर्मनीतून यंत्रसामुग्री मागविली होती; परंतु जर्मन बोटीचा कप्तान आजारी पडल्याने बोट पोर्ट सईद बंदरात अडकून पडल्याने ही सामुग्री वेळेवर पोहचली नाही. दरम्यान कौलांचे काम संपल्यावर आगपेट्यांचा कारखाना

काढून मधला वेळ काढण्याचाही प्रयत्न केला होता. मात्र हा प्रकल्प अर्धवट सोडून खाडिलकरांना पुण्याला परतावे लागले. ह्या घटनेचा इंग्रज सरकारला सुगावा लागल्याने त्यांच्यावर सरकारची पाळत होती. (देवगिरीकर, १९४८, पृ. ३०९) त्यानंतर बंगालातल्या बॉम्बस्फोटापाठोपाठ ३० एप्रिल १९०८ रोजी मुझफ्फर येथे दोन आणि पुण्यात चार बॉम्बस्फोट झाले. या पार्श्वभूमीवर १२ मे १९०८ रोजी केसरीत 'देशाचे दुर्दैव' या शीर्षकाचा अग्रलेख प्रसिद्ध झाला. या लेखात बॉम्बस्फोटाच्या घटनेवर भाष्य करताना लिहिले होते :

"घरात कोंडलेले मांजर देखील त्वेषाने कोंडणाऱ्याच्या अंगावर धावून जाऊन त्यास मारण्याचा प्रयत्न करते... मोठमोठे गोरे अधिकारी यांचा खून केल्याने इंग्रजी राज्याची इमारत ढासळणे शक्य नाही. एक गेला तर दुसरा येईल; हे न कळण्याइतका कोणीही मुर्ख नाही. पण राजकीय हक्क मिळण्याकरिता केलेली चळवळ निष्फळ होते असे दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर, बचावाचे सर्व मार्ग नाहीसे झाल्यावर हरिण ज्याप्रमाणे पारध्यावर आपल्या प्राणाची मुळीच पर्वा न करता तुटून पडतो, त्याप्रमाणे तरुण पिढीतील काहीकांची मने आततायीपणाकडे वळू लागली आहेत." (केसरी, १२ मे १९०८)

या अग्रलेखाच्या प्रसिद्धीनंतर लगेचच १६ मे १९०८ रोजी पुण्याच्या शनिवारपेठेत बॉम्बस्फोट झाला. या पार्श्वभूमीवर 'केसरी'ने १९ मे १९०८ला 'दुहेरी इषारा' अग्रलेख लिहिला. त्यात लिहिले होते -

"कलकत्त्यास ज्या तरुण गृहस्थांनी बॉम्बगोळे तयार केले किंवा उपयोगात आणिले त्यांची डोकी फिरली होती यात शंका नाहीच. पण माथेफिरुपणाचा रोग इतका संसर्गजन्य आहे की, कलकत्त्याच्या तरुण गृहस्थांनी आपल्या डोक्यातील विष ओकून टाकल्यामुळे त्यांची डोकी जरी थंड झाली, तरी त्यांनी ओकून टाकलेल्या विषाने दुसऱ्या काही गृहस्थांची डोकी आता भणाणून गेली आहेत, किंवा जाऊ लागली आहेत." (केसरी, १९ मे १९०८)

केसरीतले हे लेखन प्रसिद्ध होत असतानाच २ जून १९०८ रोजी पुण्यात पुन्हा एकदा तीन बॉम्बस्फोट झाले. इंग्रज सरकारने ८ जून १९०८ रोजी वृत्तपत्रांनी गुन्हे व खूनखराबा करण्यास चिथावणी देणारा मजकूर प्रसिद्ध केल्यास त्यांच्यावर सक्त कारवाई करण्याचा कायदा (Newspapers -Incitement to offences-and Explosive Substances Act) लागू केला. स्फोट घडवून आणणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा देण्याची तरतूद असलेला कायदा करण्यात आला. अशा संवेदनशील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ९ जून १९०८ च्या केसरीत 'हे उपाय टिकाऊ नाहीत' हा अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यात लिहिले होते, "बॉंबगोळे कायद्याप्रमाणे किंवा अधिकाऱ्यांच्या देखरेखीने अथवा गुप्त पोलिसांच्या सुळसुळाटाने बंद पाडता येणे किंवा नाहिसे करता येणे आता शक्य आहे काय? बॉंबगोळ्याला ज्ञानाचे स्वरूप अधिक आहे. ही एक जादू आहे, हा एक मंत्र आहे, तोडगा आहे .. जो माथेफिरू आहे त्याच्यापासून या मंत्राचे ज्ञान लपवून ठेवण्याचे सामर्थ्य आता सरकारी कायद्याच्या अंगी उरले नाही... बॉम्बगोळे नाहीसे करण्यास खरा व टिकाऊ उपाय म्हणजे स्वराज्याचे महत्त्वाचे हक्क देण्यास आरंभ करणे हा होय." (केसरी ९ जून १९०८) बंगालच्या फाळणीनंतर झालेले उठाव व बॉम्बस्फोट यांच्या

पार्श्वभूमीवर सनदशीर मार्ग सोडून व्यक्त होणाऱ्या लोकक्षोभाचे समर्थन करताना टिळकांनी 'ज्या देशाला सनद नाही, त्या देशाला सनदशीर चळवळीचा आग्रह कसा धरता येईल', अशी भूमिका मांडली; त्यातून कायद्याच्या राज्याविषयी त्यांच्या मनात असलेली विश्वासार्हताच व्यक्त झाली आहे. कायद्याचा गैरवापर करणाऱ्या नोकरशाहीवर त्यांचा राग होता. १९०८ साली मुझफरपूरला खुदिराम बोस व प्रफुल्लचंद्र यांनी केलेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर ह्या स्फोटांचे समर्थन करणारे ८ लेख 'केसरी'तून प्रसिद्ध झाले. (बॉम्बगोळ्यांचा अनर्थ- १२ मे; देशाचे दुर्दैव-१२ मे ; दुहेरी इशारा-१९ मे; बॉम्बगोळ्याचा खरा अर्थ-२६ मे, हे उपाय टिकाऊ नाहीत-९ जून ) राज्यकर्त्या अधिकाऱ्यांचा खून होऊ नये यासाठी प्रजेच्या सहकार्याची अपेक्षा करणाऱ्या सरकारने लोकमताची कदर ठेवून राज्यप्रशासन करण्याचीही खबरदारी घ्यायला हवी असे या लेखांतून 'केसरी'कारांनी सरकारला सुनावले. 'बॉम्बगोळ्याचे रहस्य', 'दुहेरी इशारा' या 'केसरी'तील अग्रलेखांवर आक्षेप घेऊन सरकारने टिळकांना २४ जून १९०८ रोजी मुंबईत सरदारगृहात अटक केली व राजद्रोहाचा खटला भरला. या अग्रलेखांमुळे बॉम्ब स्फोट करणाऱ्यांना चिथावणी देणारे वातावरण निर्माण झाले हा या आरोपातला गाभा होता. खरे तर या ८ लेखांपैकी ४ अग्रलेख व १ स्फुट कृ. प्र. खाडिलकर यांनी व उर्वरित लेख टिळकांनी लिहिले होते. मात्र वृत्तपत्राचे संपादक या नात्याने अग्रलेखांची जबाबदारी टिळकांची होती; आणि अर्थातच टिळकांनी खाडिलकरांच्या नावाचा उच्चारही न करता त्याची संपूर्ण जबाबदारी स्वत:कडे घेतली होती. या आधी ११ जून १९०८ रोजी 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांना १५ मे १९०८ रोजी प्रसिद्ध झालेल्या लेखावरून राजद्रोहाच्या कारणावरून अटक करण्यात आली होती. टिळक परांजपेंना जामीनावर सोडविण्यासाठी मुंबईत आले असतानाच सरदारगृहात त्यांना अटक करण्यात आली.

२९ जून १९०८ पासून टिळकांवरील राजद्रोहाचा खटला मुंबईत प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटसमोर सुरू झाला. लोकांनी न्यायालयाजवळ गर्दी केली होती. प्रक्षुब्ध झालेल्या जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी जमावावर हत्यारबंद घोडे घातले. दगडफेकीत एका युरोपीय अधिकाऱ्याच्या गालाचे हाड बाहेर आले. बेकायदा जमाव केल्याचा आरोप ठेवून सहा जणांना अटक करण्यात आली. दुपारी साडेतीन वाजता खटल्याला सुरुवात झाली. बॅ. दिनशा दावर न्यायाधीश होते. सरकारतर्फे ॲडव्होकेट मि. ब्रॅन्सन काम पहात होते. टिळकांचे वकिलपत्र बॅ. महमद अली जिना आणि बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा यांनी घेतले होते. शिवाय स्वत: टिळकही खटल्याचे काम चालवित होते. टिळकांवर एकूण चार आरोप ठेवण्यात आले होते, त्यातला एक वगळून तीन आरोपांवर एकत्र खटला चालविण्याचे ठरविण्यात आले. टिळकांना जामीन मिळावा यासाठी बॅ. जिना यांनी २ जुलै १९०८ रोजी केलेली विनंती कोर्टाने फेटाळली. ३ जुलैस या खटल्यात ज्यूरी कोण असावेत यावर उहापोह झाला. ९ ज्यूरींमध्ये सहा युरोपियन, एक ज्यू व दोन पारशी होते. आक्षेपार्ह ठरविण्यात आलेले अग्रलेख मराठीत असल्यामुळे मराठी भाषा अवगत असणारे ज्यूरी असावेत ही विनंतीही फेटाळण्यात आली. सरकारी भाषांतरकार श्री. भास्कर विष्णु जोशी यांना टिळकांनी Coercive, Despotic rule,

इत्यादी शब्दांचे भाषांतर विचारले असता त्यास उत्तरे देता आली नाहीत. या उलटतपासणीनंतरही कोर्टात सादर करण्यात आलेली अग्रलेखांची इंग्रजी भाषांतरे चुकलेली आहेत या टिळकांच्या आक्षेपाचीही न्यायमूर्तींनी दखल घेतली नाही.

१३ जुलैस खटल्याचे कामकाज सुरू झाले. दि. १५ ते २२ जुलै १९०८ या काळात टिळकांनी आपल्या बचावाचे भाषण केले. या भाषणात त्यांनी इंग्लंडचा राजद्रोहाचा कायदा, मुद्रणस्वातंत्र्याचा इतिहास, देशाची राजकीय प्रगती घडवून आणण्यात वृत्तपत्रांचे योगदान इत्यादी मुद्द्यांचा परामर्श घेतला. त्यानंतर त्यांनी आपल्या अग्रलेखातील मजकूरामागची भूमिका स्पष्ट केली. आपल्या युक्तिवादात टिळक म्हणाले की, 'या देशात बॉम्बगोळ्यांची वेळ येऊ द्यायची नसेल तर सरकारने राज्यकारभारात लोकसहभाग वाढविला पाहिजे व सरकारी अधिकाऱ्यांनी कारभार सुधारला पाहिजे हेच आपण आपल्या अग्रलेखातून सांगितले आहे; यात सरकार उलथून टाकण्याचा कुठलाही प्रयत्न अभिप्रेत नव्हता.' या युक्तिवादानंतर सातपैकी दोन पारशी ज्यूरींनी टिळक निर्दोष असल्याचा अभिप्राय दिला व उर्वरित सात गोऱ्या ज्यूरींनी टिळकांना दोषी ठरविले. टिळकांनी आपण पूर्णपणे निर्दोष असल्याचे सांगून ज्यूरींच्या अभिप्रायांवर आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, 'माझ्या अंगीकृत कार्याची वृद्धी स्वातंत्र्याच्या योगाने होण्याऐवजी माझ्या बंदिवासाने आणि हालअपेष्टांनीच व्हावी, असा कदाचित ईश्वरी संकेत असावा. कदाचित माणसाच्या व राष्ट्राच्या भवितव्यावर मानवी शक्तीपेक्षा दैवी शक्तीचीच सत्ता अधिक चालत असावी.' [३] टिळकांच्या या उत्तरावर कृ. प्र. खाडिलकर यांनी केसरीत 'टिळक आणि दावर' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला. त्यात त्यांनी लिहिले होते की, " रा. टिळक यांनी यावेळी दिलेले उत्तर दैवी स्फूर्तीचे होते. आपल्या उतारवयाकडे व रोगग्रस्त शरीराकडे त्यांनी न्यायमूर्तींचे लक्ष वेधले नाही. कारण त्या वेळच्या योगारूढ स्थितीत जडदेहाला ते विसरले असून, खटल्याच्या निकालाचा परिणाम त्यांच्या आवडत्या राजकीय चळवळीवर काय होईल, एवढ्या एकाच गोष्टीचा त्यांना निदिध्यास लागून राहिलेला होता." [मोरे सदानंद, २००७, पृ. ५१] न्यायमूर्ती दावर यांनी मात्र टिळकांचे मन रोगट व विकृत असल्याचा शेरा मारला व दोन आरोपांसाठी प्रत्येकी तीन वर्षांची याप्रमाणे एकूण सहा वर्षे सक्तमजुरीची व तिसऱ्या आरोपासाठी एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. टिळकांच्या गुन्ह्याला वास्तविक जन्मठेपेची शिक्षा द्यायला हवी होती, मात्र त्यांच्या वयाचा विचार करून ही शिक्षा कमी केलेली आहे, अशी पुरवणीही जोडण्यात आली. शिवाय टिळकांना १८९८ साली झालेल्या शिक्षेत यापूर्वी देण्यात आलेली सहा महिन्यांची सवलत या शिक्षेत अंतर्भूत करण्यात आली. टिळकांना न्यायालयातून थेट साबरमतीच्या तुरुंगात नेण्यात आले. तो दिवस होता २३ जुलै १९०८, टिळकांचा ५२ वा वाढदिवस! त्यानंतर १३ सप्टेंबर १९०८ रोजी त्यांना तेथून मंडालेच्या तुरुंगात बंदिवान करण्यात आले.

टिळकांच्या शिक्षेचे वर्तमान वेगाने जनमानसात पसरले व लोकक्षोभ उसळला. १७ जुलै १९०८ रोजी मुंबईतल्या २८ कापडगिरण्यातले ३५ हजार कामगार रस्त्यावर उतरले. पाठोपाठ एक लाख कापडगिरणी कामगारांनी सहा दिवसांचा संप केला. सहा वर्षांची शिक्षा ठोठावली

म्हणून हा सहा दिवसांचा प्रतिकात्मक संप करण्यात आला. सर्व बाजारपेठा बंद पडल्या. जमावबंदीचा हुकूम मोडणाऱ्या जमावावर केलेल्या गोळीबारात शासकीय आकडेवारीनुसार १४ जण ठार झाले व ३० जखमी झाले. प्रत्यक्षात हा आकडा दुपटीहून अधिक असल्याचे सांगितले जाते. नागपूरच्या गिरणी कामगारांनीही टिळकांच्या शिक्षेच्या निषेधासाठी संप केला. नंतर गणेशोत्सवात लोकांनी टिळकांचा फोटो ठेवल्यामुळे पोलिसांनी अनेकांना तुरुंगात टाकले. लोकांनी या घटनेचा निषेध म्हणून अडीच महिने गणपती विसर्जन स्थगित ठेवले. ना. गोखले यावेळी विलायतेत होते. त्यांनी भारतमंत्री मोर्ले यांच्याकडे कागाळी केल्यानेच टिळकांना अटक झाली अशी समजूत झाल्याने लोकांनी गोखल्यांवर आगपाखड करण्यास सुरुवात केली. मारेकऱ्यांनी त्यांना ठार मारण्याचाही प्रयत्न केला. (फाटक, न. र., पृ. १३८-१३९) स्वत: मोर्ले टिळकांवर खटला भरू नये अशा मताचे होते; परंतु त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर जॉर्ज क्लार्क उर्फ लॉर्ड सिडनहॅम यांनी स्वत:च्या जबाबदारीवर हा खटला भरला होता.

टिळकांच्या अटकेनंतर अनेक पत्रकार, विचारवंत, लेखकांनी आपापल्या पद्धतीने प्रतिक्रिया व्यक्त केल्या. 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी 'न्यायदेवतेचा मुंबई हायकोर्टात बुधवारी रात्री खून झाला' अशा शब्दात आपली जळजळीत प्रतिक्रिया व्यक्त केली. 'ज्ञानप्रकाश'चे संपादक नटेश अप्पाजी द्रविड यांनी 'न्यायमूर्तींचे भाषण सरकारी वकिलाच्या तोंडीचे झाले' अशा शब्दांत न्या. दावर यांची खिल्ली उडवली. त्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यात आला. प्रार्थना समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुबोध पत्रिके'तून वि. रा. शिंदे यांनी न्यायमूर्तींने आपल्या भाषणातून "त्यांच्या मनातील कालकूट बाहेर फेकले" अशा जळजळीत शब्दांत प्रतिक्रिया नोंदवली. मद्रासच्या 'हिंदू' नेही न्या. दावरांचे भाषण संकुचित व क्षुद्र बुद्धीचे द्योतक असल्याची टीका केली. साताऱ्याच्या 'प्रकाश' पत्राने दावरांचे वर्तन धारातीर्थी पडलेल्या अभिमन्यूला लाथ मारणाऱ्या जयद्रथाच्या पातळीचे असल्याची टीका केली. कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिके'नेही न्यायमूर्तींच्या अहंकारावर टीका केली. ब्रिटिश सरकारने मात्र न्या.दावरांना निकालाचे पारितोषिक म्हणून 'नाइटहुड' किताब बहाल करण्याचा निर्णय घेतला. बॅ. जिना यांनी या घटनेचा निषेध करून मुंबईच्या बार आसोशिएशनला न्या. दावर यांना मेजवानी देताना लाज वाटली पाहिजे, असा शेरा मारला. विलायतेतील 'मँचेस्टर गार्डीयन','टाइम्स या पत्रांनीसुद्धा न्यायाधीशाच्या निर्णयाविषयी नापसंतीची मोहर उठविली. विलायतेतील 'न्यू एज' च्या संपादकाने लिहिले की, 'अटकेपूर्वी टिळक हे एका पक्षाचे नेते होते, आता ते लोकनेते आणि राष्ट्रीय हुतात्मा ठरले आहेत, लेनीननेही टिळकांच्या अटकेनंतर झालेल्या कामगारांच्या संपाची दखल घेतली. टिळकांना झालेल्या जबर शिक्षेच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या संपाचा हा प्रतिसाद पाहता रशियातील झारशाहीप्रमाणे इंग्रजांच्या पद्धती निष्प्रभ ठरल्या आहेत, असेही लेनीनने लिहिले. आफ्रिकेतून गांधीजींनी 'इंडियन ओपिनियन' या त्यांच्या साप्ताहिकाच्या १ ऑगस्टच्या अंकात 'महान टिळकांना शिक्षा' नामक अग्रलेख लिहिला. या अग्रलेखात त्यांनी लिहिले होते : "या क्लेशांमुळे टिळकांनी अमर कीर्ती मिळवलीच, पण भारताच्या स्वातंत्र्याचा पायाही घातला आहे. त्यांची ही शिक्षा पुढे वरदान शाबीत होणार

आहे. म्हणून भारतीयांनी खचून न जाता उलट आनंद मानायला हवा... टिळक आणि टिळकांसारखे महान भारतीय जरी आपल्यापेक्षा वेगळ्या मताचे असले, तरी आपण त्यांचा आदरसन्मान करायला हवा, त्यांच्या देशभक्तीचे अनुकरण करायला हवे... ते वृद्ध आहेत. त्यांच्यापुढे आपल्या हालापेष्टा-क्लेश काहीच नाहीत. तेव्हा त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवा." अर्थात गांधीजींनी या अग्रलेखात सत्याग्रहाच्या मार्गाची शिफारसही केली. टिळकांच्या अटकेनंतर कवी विनायक, गोविंदाग्रज यांनी कवितेच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. गोविंदांनी लिहिले होते :

"आमुचा वसंत कुणी नेला.
त्यावाचुनि जनहृत्कमलांचा बाग म्लान झाला .धृ.
या पुण्योत्सवकालाला
टिळक तुकोबा देशभक्तीच्या का न कीर्तना आला?
-------------------------------------------------------
कधी न्यायदेवते मजला
टिळक विठोबा केव्हा येईल पुण्यपूर पंढरीला?

कवी विनायकांच्या कवितांवर सरकारने जप्तीही आणली. अनेकांनी निरनिराळ्या प्रकारे टिळकांविषयीचा आदर व त्यांच्या तुरुंगवासामुळे झालेल्या दु:खाला वाट करून दिली. श्री. म. माटे यांनी टिळकांची सुटका होऊन ते परत येईपर्यंत नाटक न पाहण्याची प्रतिज्ञा केली. बाबासाहेब परांजप्यांनी पांढऱ्या कोटाच्या डाव्या बाहीवर काळी पट्टी बांधायला सुरुवात केली. टिळकांची सुटका होईपर्यंत कुणी साखर न खाण्याचा, कुणी जोडे न घालण्याचा पण केला. (मोरे सदानंद, २००७, पृ. ५२-५७)

टिळकांच्या अटकेनंतर भारतातली राजकीय आंदोलने थंडावली. अरविंद घोषांनी राजकारण सोडून पाँडेचारीला आश्रम काढला. बिपिनचंद्र पाल यांनी भारत सोडले व इंग्लंडात जाऊन वास्तव्य केले. कॉंग्रेस अधिवेशनात कार्यकर्त्यांची उपस्थिती घटली. १९०८ च्या मद्रास अधिवेशनाला केवळ ६१७; १९०९ च्या लाहोर अधिवेशनाला २४३; १९१० च्या अलाहाबाद अधिवेशनाला ६२६; १९११ च्या कलकत्ता अधिवेशनाला ४४६; १९१२ च्या बांकीपूर अधिवेशनाला २०७ आणि १९१३ च्या कराची अधिवेशनाला ३४९ प्रतिनिधी हजर होते.

मंडालेच्या तुरुंगात असताना टिळकांनी जर्मन व फ्रेंच भाषांचा अभ्यास केला. वेबरचा ग्रंथ वाचला, पाली भाषेतले ग्रंथ वाचले. १९०७ साली 'गीतारहस्य'चे लेखन पूर्ण केले. पुस्तकांची सोबत मिळाली म्हणूनच हा काळ व्यतीत करता आला, अन्यथा सारे शून्य झाले होते, असे टिळकांनीच सांगितले होते. [४] १९१० साली ऑक्टोबर महिन्यात श्री. दादासाहेब खापर्डे टिळकांना भेटण्यासाठी मंडालेला गेले होते. १९११ च्या डिसेंबरात बादशहा पंचम जॉर्ज यांचा दिल्ली दरबार झाला; तेव्हा टिळकांची सुटका होण्याची आशा होती; मात्र मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम यांच्या दुराग्रहामुळे ही संधी हुकली.

**टिळकांच्या सुटकेनंतर :**

१९१४ साली जुलै महिन्यात टिळकांच्या शिक्षेला सहा वर्षे पूर्ण होणार होती; परंतु त्यापूर्वीच ८ जूनला टिळकांना मंडालेहून हलविण्यात आले व १७ जून १९१४ ला ६ वर्षांच्या तुरुंगवासानंतर मध्यरात्री पुण्याला गुप्तपणे गायकवाडवाड्यासमोर सोडून देण्यात आले. त्यानंतर २१ जुलैला गायकवाडवाड्यात महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचा जाहीर सत्कार करण्यात आला. मात्र मधल्या काळात टिळकांच्या सुटकेची वार्ता पसरताच दररोज टिळकांना भेटायला लोकांची रीघ लागली. पुण्या-मुंबईखेरीज मध्यप्रांत-वऱ्हाडातल्या तरुण विद्यार्थ्यांनी जाहीरपणे टिळकांचे अनुयायीत्व स्वीकारले, त्यामुळे टिळकांच्या अनुयायांचा परिघ विस्तारित व्हायला सुरुवात झाली.

टिळकांना भेटायला येणाऱ्यांची गर्दी पाहून टिळकांच्या लोकप्रियतेचा इंग्रज सरकारने धसका घेतला व एका परिपत्रकान्वये टिळकांच्या भेटीला जाणाऱ्या समाजातील प्रतिष्ठित अशा जहागीरदार-इनामदारांना, सरकारी कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना शिक्षा करण्याची तंबी दिली. (मुंबई सरकारचे २६ जून १९१४ चे परिपत्रक; मुंबई ज्युडिशियल डिपार्टमेंट फाईल क्र. १७०३, क्र. एस. डी. १९३७; फडके य. दि. १९८९, पृ. ३०) पुढे गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यासही टिळकांना मनाई करण्यात आली अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर तुरुंगातून सुटून आल्यावर टिळकांना आपली पुढची वाटचाल करायची होती. व्यक्तिश: टिळक शरीर-मनाने थकले होते. तुरुंगवासात असतानाच पत्नी सत्यभामाबाईंचे निधन झाले होते. बंदिवासातल्या शारीर-मानसिक ताणांमुळे टिळकांची प्रकृती खालावली होती. स्वत: टिळकांनीच आपल्या प्रकृती अस्वास्थाविषयी केसरीत लिहिले होते :

"मधुमेहामुळे व वयोमानामुळे माझे पाच-सहा दात पडलेले आहेत; ऐकूही कमी येऊ लागले आहे व दूरचे पदार्थही नीट दिसत नाहीत. कृतान्तकटकामलध्वजजरा अधिक फडकू लागली आहे आणि त्या प्रमादाने पूर्वीची उमेद व शक्ती थोडी मंदावललेली आहे आणि वजनही थोडे कमी झाले आहे" (केसरी २३ जून १९१४) अशाही परिस्थितीत आपल्या सहकाऱ्यांकडून मधल्या काळातल्या घडामोडींची माहिती घेण्याचे काम त्यांनी सुरू ठेवले होते. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आपले प्रभुत्व पुन्हा प्रस्थापित करण्याची गरज होती. त्यामुळे शांत राहून संयमाने पुढची व्यूहरचना करण्यात ते गुंतले होते.

राष्ट्रीय काँग्रेसमध्ये मुंबईचे फिरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा इत्यादी पुढाऱ्यांचे व त्यांच्या पाठबळामुळे गोपाळ कृष्ण गोखले यांचे वर्चस्व होते. त्याला छेद देत काँग्रेसवर आपली पकड बसविण्याचा टिळकांचा प्रयत्न होता. काँग्रेसमधला जहाल गट टिळकांच्या नेतृत्वाने प्रभावित झाला होता. १९०६ साली कलकत्ता काँग्रेसमध्ये टिळकांचे जोरदार स्वागत झाले होते. मात्र १९०७ च्या सुरत काँग्रेसमध्ये जहाल-मवाळ गटातले मतभेद तीव्र होऊन वादंग झाले. अरविंद घोषांमुळे तरुणांनी हुल्लडबाजी केली. अखेर जहाल गट काँग्रेसमधून बाहेर पडला. आता काँग्रेस पूर्णत: मवाळांच्या ताब्यात गेली होती. सुरत काँग्रेसमध्ये मवाळांनी नवे नियम करून जहालांच्या ताब्यात असणाऱ्या सार्वजनिक संस्थांना मान्यता नाकारण्याची व प्रांतिक काँग्रेस समित्या

आपल्या ताब्यात राहतील अशा सोयीच्या दुरुस्त्या केल्या. काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात प्रतिनिधींची निवड करण्याची आतापर्यंतची पद्धत रद्द करण्यात आली होती. यापुढे प्रांतिक काँग्रेस समित्यांनी मान्यता दिलेल्या संस्थांनाच राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात प्रतिनिधी पाठविण्याचा नवा नियम करण्यात आला. पुण्याची 'सार्वजनिक सभा' ही संस्था आता टिळकांच्या ताब्यात होती; परंतु या सभेला राष्ट्रीय काँग्रेसने मान्यता न दिल्याने टिळकांना व त्यांच्या जहाल अनुयायांना काँग्रेसमधून बाहेर काढण्याची मवाळांची खेळी यशस्वी झाली होती.

मधल्या काळात जहाल आणि मवाळांचा हा दुरावा राष्ट्रीय हिताचा नसल्याने त्यांच्यात समझोता घडवून आणण्याचा प्रयत्नही काही पुढाऱ्यांनी सुरू केला होता. स्वत: गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९१० व १९११ च्या अलाहाबाद व कलकत्त्याच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात विषय नियामक समितीत काँग्रेसच्या प्रतिनिधी निवडीची पूर्वीची पद्धत पुनरुज्जीवित करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. १९१४ साली नोव्हेंबरात गोखले लंडनहून परत आल्यावर त्यांनी पुन्हा एकदा समेटाचा प्रयत्न केला; मात्र फिरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा या मुंबईच्या व सुरेंद्र बॅनर्जी, भूपेंद्र बसू या बंगालच्या पुढाऱ्यांच्या विरोधामुळे हा विषय पुढे सरकू शकला नाही. ॲनी बेझंट, न. चिं. केळकर, विठ्ठलराव पाठक इत्यादी पुढाऱ्यांनीही आपापल्या पद्धतीने हा समझोता घडविण्यासाठी प्रयत्न चालविले होते. १९१४ च्या साताऱ्यास झालेल्या प्रांतिक परिषदेतही समेटाचे अयशस्वी प्रयत्न झाले. बॅ. जिना यांनीही समेटाचे प्रयत्न केले. 'ब्रिटिश साम्राज्यांतर्गत हिंद स्वराज्य' हे काँग्रेसचे पहिले कलम टिळकांनी मान्य करावे, अशी अपेक्षा होती, ते आपणास मान्य असल्याचे टिळकांनी जिना यांना पत्र लिहून कळवले होते.

**चिरोल खटला :**

'लंडन टाइम्स'मध्ये परराष्ट्रीय विषयांवर लेखन करणारा व्हॅलंटाईन चिरोल नामक लेखक १९०९ साली भारतातील राजकीय असंतोषाचा अभ्यास करण्यासाठी आला होता. बंगालच्या फाळणीमुळे निर्माण झालेल्या लोकक्षोभाची कारणे व स्वरूप समजावून घेण्यासाठी या पत्रकाराने महाराष्ट्रात भ्रमंती करून, अनेकांच्या मुलाखती घेऊन 'लंडन टाइम्स'मधून लेखमाला लिहिली. या लेखांचे 'इंडियन अनरेस्ट' हे पुस्तकही प्रसिद्ध केले. या लेखमालेतून व पुस्तकातून लोकमान्य टिळकांची नालस्ती करणारा मजकूर प्रसिद्ध झाला होता. टिळकांवर चिरोलसाहेबाने केलेल्या आरोपांचा सारांश थोडक्यात असा सांगता येईल :

१. बंगालच्या फाळणीमुळे देशात उसळलेल्या असंतोषाला टिळक जबाबदार आहेत. टिळकांच्या लेखनामुळे लोकक्षोभ भडकला. ब्रिटिश राजवट उलथवून टाकणे हे या लेखनाचे प्रयोजन होते.
२. नाशिकला कलेक्टर जॅक्सनच्या खूनाच्या कटाशी संबंधित कागदपत्रांवरून या कटात टिळकांचा संबंध होता. पुण्यास प्लेग अधिकारी रँडचा खून झाला, त्यामागेही टिळकांची प्रेरणा होती.
३. टिळकांनी गोरक्षणाची चळवळ सुरु करून मुसलमानांना चिथावल्याने दंगली झाल्या.
४. टिळकांनी लेखणीचा धाक दाखवून लोकांकडून पैसे उकळले. अनेक फंड गोळा केले.

तालमीचे आखाडे स्थापन केले.

५. दत्तक प्रकरणात टिळकांनी ताईमहाराजांची फसवणूक केली.

६. राजद्रोहाच्या प्रसारासाठी टिळकांनी शिवजयंतीचा उत्सव सुरू केला.

टिळकांनी या आरोपांची गांभीर दखल घेऊन १९१५ साली लेखक चिरोल व पुस्तकाचे प्रकाशक मॅकमिलन कंपनी यांच्याविरोधात लंडनच्या कोर्टात अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला. २९ जानेवारी ते १९ फेब्रुवारी १९१९ या काळात खटल्याचे प्रत्यक्ष कामकाज झाले. टिळकांच्या वतीने बॅरिस्टर जॉन सायमन आणि चिरोल यांच्या वतीने एडवर्ड कार्सन यांनी युक्तिवाद केले. न्यायमूर्ती डार्लिंग यांच्या कोर्टात हा खटला चालला. चिरोल साहेबांच्या बाजूने साक्ष देणाऱ्यांत १८९७ साली पुण्यात कलेक्टरपद भूषविलेले लँबसाहेब, न्यायखात्याचे सेक्रेटरी रॉबर्टसन, विद्याखात्याचे प्रमुख जाईल्स, १९०८ साली टिळकांना अटकेत ठेवणारे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम यांचा समावेश होता. इतकेच नाही तर चिरोल साहेबाला उपयोगी पडतील असे पुरावा गोळा करून देण्यासाठी मुंबई सरकारने थेट साहाय्य केले होते. या पुस्तकलेखनाचे पारितोषिक म्हणून चिरोलसाहेबास 'सर' ही पदवीही बहाल केली होती.

चिरोलच्या खटल्याचा निकाल टिळकांच्या विरोधात गेला. लंडनला जाऊन हा खटला लढण्यासाठी त्यांचा दोन लाख रुपये खर्च झाला. या खटल्यासाठी टिळकांनी सुरुवातीला स्वत:चा वाडा गहाण ठेवून रक्कम उभी केली होती. यावर टिळक म्हणाले होते, "इंग्रजांवर व त्यांच्या न्यायावर विश्वास ठेवण्यात हशील नाही एवढी गोष्ट हिंदी लोकांस शिकण्यास आमचे दोन लाख रुपये खर्च झाले तर ते वाया गेले असे मला वाटत नाही." (तळवलकर, २००३, पृ. ३२) पुढे लोकांनीच पुढाकार घेऊन तीन लाखांचा निधी जमा करून या खटल्याच्या खर्चाची जबाबदारी घेतली होती. चिरोल खटल्याचा निकाल विरोधात गेला तरी टिळकांनी या काळात आपल्या लंडनच्या वास्तव्यात आठ-नऊ महिने स्वराज्य संघाचे काम चालू ठेवले होते. तिथे त्यांनी मॉटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी इंग्लंडचे संसद सदस्य व जनतेसमोर हिंदवासीयांची कैफियत मांडण्याचा प्रयत्न केला.

**पहिले महायुद्ध :**

युरोपात २८ जुलै १९१४ ला पहिले महायुद्ध सुरू झाले होते. ऑस्ट्रियाने सर्व्हियाविरुद्ध युद्ध पुकारले आणि पाठोपाठ ४ ऑगस्टपर्यंत जर्मनी रशिया व फ्रान्सविरुद्ध आणि इंग्लंड जर्मनीविरुद्ध युद्धात उतरले. जागतिक राजकारणातल्या घडामोडींनी वेग घेतला. या पार्श्वभूमीवर टिळकांनी आपली भूमिका जाहीर केली व जर्मनीविरुद्ध इंग्लंड युद्धात उतरला असल्याने अशा बिकट प्रसंगात प्रत्येक हिंदी प्रजाजनाने इंग्रज सरकारला पाठबळ दिले पाहिजे, असे जाहीर आवाहन करणारे पत्रक २७ ऑगस्ट १९१४ ला प्रसिद्ध केले. १ सप्टेंबर १९१४ च्या 'केसरी'तही या पत्रकाला प्रसिद्धी देण्यात आली. टिळकांच्या या पत्रकावर उलट-सुलट प्रतिक्रिया उमटल्या. इंग्लंडची अडचण हीच आपली संधी समजून या युद्धजन्य परिस्थितीचा आपण ब्रिटिशांच्या विरोधासाठी फायदा उठवायला हवा होता, याउलट टिळक मवाळ झाले असा सर्वसाधारण सूर होता. शि. म. परांजपे, गंगाधरराव देशपांडे, वासुकाका जोशी या

टिळकपंथीयांचीही हीच प्रतिक्रिया होती.

१८९७ पासून इंग्रज शासनाने टिळकांना दोनदा तुरुंगात पाठविले. मात्र त्यामुळेच 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून सर्व भारतात ते ओळखले जाऊ लागले. एव्हाना संपूर्ण देशात लोकमान्य टिळकांचे राजकीय नेतृत्व सर्वमान्य झाले होते. बुद्धिवाद्यांच्या चर्चांकडे लक्ष न देता त्यांनी राष्ट्रीय मूल्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचे पालकत्व स्वत:कडे घेतले होते. भारतीय इतिहास आणि पुराणांच्या वारशाचा गौरव करीत गोऱ्यांच्या राजकीय सत्तेविरूद्ध जनमत जागविण्याचे काम केले होते. 'केसरी'त लेख लिहून आणि जहाल भाषणे करून टिळकांनी जनमानसात लोकप्रियता संपादित केली होती. पुण्यात अग्रेसर असणाऱ्या 'सार्वजनिक सभा' या संघटनेवरही टिळकांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. शिक्षक, पत्रकार, लेखक, कारकून, सरकारी सेवेतले भारतीय लोक या सर्वांचा टिळकांना पाठिंबा होता. गणपती व शिवजयंतीच्या उत्सवांतून इंग्रज सरकारविरुद्ध सार्वजनिक असंतोष पसरविण्याचे काम ते करीत होते. वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधूंच्या क्रांतिकारी चळवळीलाही टिळकांचीच प्रेरणा होती. बंगाल, पंजाब, मद्रास अशा सर्व प्रांतातून टिळकांना अनुयायी मिळत होते.

टिळकांचे संख्याबळ वाढत आहे, याची गोखल्यांना कल्पना आली होती. परकीयांविरुद्ध लोकभावना तीव्र झाल्यामुळे टिळकांचे संख्याबळ वाढत आहे, असा गोखले यांनी त्यांच्या लोकप्रियतेचा अन्वयार्थ लावला होता. या लोकप्रियतेच्या जोरावर टिळक काँग्रेसवर ताबा मिळवतील व तसे झाले तर सरकार काँग्रेसची चळवळच दडपून टाकेल याची गोखल्यांना भीती वाटत होती. ५ जानेवारी १९१५ ला गोखल्यांनी बेझंटबाईंना लिहिलेल्या पत्रात ही भीती बोलून दाखविली होती. टिळक हे आयरिश पद्धतीच्या चळवळीचे पुरस्कर्ते असून सरकारवर बहिष्कार घालण्याच्या मताचे आहेत, असे त्यांचे आकलन होते. टिळकांनी यावर बेझंटबाईंना पत्र लिहून सरकारवर बहिष्कार घालावा असे आपण कधीच म्हणालो नसल्याचा खुलासाही केला होता. मद्रास काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू यांना १९१५ साली १४/१५ डिसेंबरच्या सुमारास गोखल्यांनी याच आशयाचे एक गोपनीय पत्र लिहिले होते. इतकेच नाही तर स्वत: गायकवाडवाड्यात टिळकांना भेटायला जाऊन 'काँग्रेसवाल्यांशी आपले पटणार नाही, तेव्हा आपण काँग्रेसमध्ये न आलेलेच बरे', असाही गोखल्यांनी टिळकांना सल्ला दिला. त्यावर टिळकांनी 'काँग्रेस सर्वांची आहे, कोणा एका पक्षाला आंदण दिलेली नाही' असे सांगून गोखल्यांचा सल्ला धुडकावून लावला होता. (करंदीकर, १९४४, पृ. २२५) त्यानंतर २२ डिसेंबर १९१४ च्या 'केसरी'त टिळकांनी 'राष्ट्रीय पक्ष व मद्रासची काँग्रेस' हा लेख लिहून हल्लीच्या परिस्थितीत काँग्रेसला ऐक्याची किती गरज आहे, याचे समर्थन केले होते. या लेखात उपरोधाने टिळकांनी आपल्या स्वत:च्या व गोखल्यांच्याही गोवऱ्या ओंकारेश्वरावर गेल्या असल्याचे लिहिले होते; आणि काकतालीय न्यायाप्रमाणे दहा दिवसातच १९ फेब्रुवारी १९१५ रोजी गोखल्यांचे निधन झाले. त्यामुळे या लेखावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. अर्थात, टिळकांनी त्यानंतर गोखल्यांचे यथायोग्य मूल्यमापन करणारा लेख लिहून गोखल्यांच्या कार्याचा

भरभरून गौरव केला होता.

## प्रांतिक परिषदा :

टिळक १९०८ ते १९१४ अशी सहा वर्षे तुरुंगात असताना काँग्रेसचे काम ढेपाळले होते. आता टिळकांनी जहाल गटात संघटनाबांधणी करून मवाळांच्या ताब्यात असलेल्या राष्ट्रीय काँग्रेसवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने व्यूहरचना आखायला सुरुवात केली. ह्या व्यूहरचनेचा भाग म्हणून टिळकांनी पुण्यात काँग्रेसची प्रांतिक परिषद घेण्याचा मनोदय जाहीर केला. त्यानुसार २१ एप्रिल १९१५ रोजी न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर यांनी ८ ते १० मे १९१५ या काळात प्रांतिक परिषद घेण्याचे वेळापत्रक घोषित केले. मुंबईच्या फिरोजशहा मेथा गटाने 'बॉम्बे क्रॉनिकल'मधून मुंबई प्रांतिक काँग्रेसची रीतसर परवानगी न घेता आयोजित केली जाणारी ही परिषद काँग्रेसच्या २० व्या कलमाचा भंग करणारी असल्याचे पत्रक प्रसिद्ध केले. मात्र या टीकेकडे लक्ष न देता पुण्याची प्रांतिक परिषद घेण्यात आली. अध्यक्ष म्हणून जोसेफ बॅप्टिस्टा यांची निवड करण्यात आली. परिषदेला ९५० प्रतिनिधी हजर होते. टिळकांनी विषय नियामक समितीत गोखल्यांच्या मृत्यूबद्दल शोकप्रस्ताव आणि युद्धात सरकारशी सहकार्य करण्याचा ठराव मांडला. अध्यक्षीय भाषणात बॅप्टिस्टा यांनी हिंदुस्थानात 'होमरूल'ची आणि प्रांतिक स्वायत्ततेची मागणी केली. विधिमंडळांत लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढवावी आणि हिंदुस्थान संघराज्य व्हावे अशी मागणी केली. लोकमान्य टिळकांचे १० मे ला जाहीर भाषण झाले, त्यात त्यांनी सर्व सुधारणांचे मूळ राजकीय सुधारणात कसे आहे यावर भर दिला. 'लोकांच्या इच्छेप्रमाणे सर्व सरकारी खात्यांचा कारभार चालणे म्हणजे स्वराज्य' अशी व्याख्या करून नोकरशहांच्या हाती असलेल्या प्रशासनाचा काही भाग लोकनियुक्त प्रतिनिधींकडे सोपविण्याची सरकारकडे मागणी केली.

जहालांच्या या प्रांतिक परिषदेच्या पाठोपाठ पुण्यात मवाळांनी ह. ना. आपटे यांच्या पुढाकाराने व वाडिया यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै १९१५ रोजी वेगळी प्रांतिक परिषद बोलावली. मात्र या परिषदेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. म. गांधींनी या काळात जहाल-मवाळ यांच्यात सलोखा निर्माण करण्यासाठी टिळकांची भेट घेतली; पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही.

पुण्याच्या जहाल गटाच्या प्रांतिक काँग्रेसनंतर टिळकपंथीयांनी मध्यप्रांत-वऱ्हाडात प्रांतिक परिषद घेण्याचा निर्णय घेतला. १९०७ नंतर तिथे अजून प्रांतिक परिषद झालेली नव्हती. डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी तेथील मवाळांचा सहयोग घेऊन ऑक्टोबर १९१५ मध्ये हरिसिंग गौर यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक परिषद घेतली.

५ नोव्हेंबर १९१५ रोजी फिरोजशहा मेथा यांचे निधन झाले. त्यामुळे मवाळ गटाची मोठी हानी झाली. दरम्यान मुंबईच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर चिटणीस दाजीसाहेब खरे यांनी मुंबई प्रांतिक काँग्रेस आणि सर्व जिल्हा काँग्रेस समित्यांनी काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाकरिता प्रतिनिधी निवडण्यासाठी जाहीर सभा घेण्यास अनुकूल असल्याचे टिळकांना कळविले. मात्र काँग्रेस समितीचा सदस्य असेल त्यासच वार्षिक अधिवेशनासाठी

निवडण्यात यावे, अशी अट घालण्यात आली होती. त्यामुळे १९१५ च्या मुंबईच्या राष्ट्रीय अधिवेशनात जहालांचे प्रतिनिधी पाठविण्यातला अडसर कायम होता. या पार्श्वभूमीवर सत्येंद्रप्रसन्न सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात ॲनी बेझंट यांनी राष्ट्रीय अधिवेशनात प्रतिनिधींची निवड करण्यासंदर्भात सुधारित ठराव मांडला :"१९१५ पूर्वी २ वर्षे अस्तित्वात असलेल्या संस्थांना प्रत्येकी १५ प्रतिनिधी स्वतंत्रपणे नोंदविण्याचा अधिकार असेल. नोंदलेल्या संस्थेचे सभासद नसलेल्यांनाही काँग्रेसचे प्रतिनिधी होता येईल." मुंबईच्या राष्ट्रीय अधिवेशनात पारित झालेल्या या ठरावाचा फायदा घेऊन पुण्याची सार्वजनिक सभा, मुंबईचा राष्ट्रीय संघ, सातारा, सोलापूर, बेळगाव, धुळे, नाशिक, नगर, कुलाबा येथे टिळकपंथीयांच्या ताब्यातील सार्वजनिक संस्था यांच्या जोरावर लाहोर काँग्रेसला जहाल गटातले १३५ प्रतिनिधी पाठविण्याची व्यूहरचना करण्यात आली.

२८ एप्रिल १९१६ ते १ मे १९१६ या काळात बेळगाव येथे मुंबई प्रांतिक काँग्रेसची परिषद झाली. या परिषदेला म. गांधी, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, कृ. प्र. खाडिलकर, जोसेफ बॅप्टिस्टा, गंगाधरराव देशपांडे, दादासाहेब करंदीकर, दत्तोपंत बेळवी इत्यादी दोनशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. २८ एप्रिलला बेळगावात लो. टिळक व दादासाहेब खापर्डे यांचे जोरदार स्वागत झाले. घोडागाडीतून मिरवणूक काढण्यात आली, पुष्पवृष्टी करण्यात आली. ३० एप्रिलला गांधीजींनी आपली भूमिका स्पष्ट केली व टिळक देशसेवेचे काम करीत आहेत, त्यामुळे मी त्यांच्यामागे जाईन असे निसंदिग्ध शब्दांत सांगून टाकले. १ मे १९१६ ला जहाल-मवाळ यांच्या समेटाचा ठराव मंजूर करण्यात आला.

**विदर्भातील टिळक संप्रदाय :**

विदर्भात लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारधारेला मुक्त प्रतिसाद मिळत होता. विदर्भाचे नबाब म्हणून गौरविले जाणारे अमरावतीचे दादासाहेब खापर्डे हे टिळकांचे भक्कम पाठीराखे होते. राष्ट्रीय काँग्रेसचे सक्रिय नेते म्हणून खापर्डे यांनी आपले स्थान निर्माण केले होते. १८९३ सालापासूनच त्यांनी अमरावतीस टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू केली होती. रँडचा खून, प्लेग व दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीस १८९७ साली झालेल्या अ. भा. काँग्रेसच्या अधिवेशनात दादासाहेब खापर्डे हे स्वागताध्यक्ष होते. 'इंग्रज सरकारच्या डोळ्यांतले शल्य' असा दादासाहेब खापर्डेंचा लौकिक होता. तशात त्यांनी अधिवेशनस्थळी टिळकांचा फोटो लावण्याचा आग्रह धरला होता. राजनिष्ठ समजल्या जाणाऱ्या काँग्रेसमधील मवाळपंथीयांचा त्याला विरोध होता. मात्र टिळकांचा फोटो लावता आला नाही तरी आपली टिळकनिष्ठा व्यक्त करणारे घणाघाती भाषण त्यांनी केले. येथूनच अमरावतीस विदर्भातील काँग्रेसांतर्गत जहाल गटाचा उदय झाला. १८९८ साली मद्रास काँग्रेसमध्ये दादासाहेब खापर्डे यांना विषय नियामक समितीत स्थान देऊन त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली. सर्वसामान्य लोकांत राजकीय जाणीव-जागृती करावी या हेतूने दादासाहेब खापर्डे यांनी नियोजनबद्ध स्वरूपात लोकमत जागृतीचा कार्यक्रम आखला. १८९८ सालापासून 'बालवक्तृत्वोत्तेजक सभा' स्थापन करून विद्यार्थ्यांमध्ये राजकीय शिक्षणाचे प्राथमिक संस्कार

होतील या दिशेने त्यांनी काम सुरू केले होते. त्याच वर्षी पाटील-पटवारी संमेलन घेऊन बहुजन समाजात राजकीय जाणीव जागृतीचा मार्ग प्रशस्त करण्याची योजना त्यांनी कार्यान्वित केली १९०२ सालापासून दादासाहेबांनी अमरावतीस शिवाजी उत्सवात राजकीय विषयांवर भाषणे आयोजित करण्याची नवी परंपरा सुरू केली. लोकांनी राष्ट्रीय विचार समजावून घेऊन राष्ट्रकार्यात भाग घ्यावा यासाठी त्यांनी अमरावतीस १९०२ साली भगिनी निवेदिता यांची ३ भाषणांची व्याख्यानमाला आयोजित केली. आधुनिक विचारसरणीतून हिंदुत्ववादाची मीमांसा (Hinduism in the light of modern thought), भारतापासून शिकण्यासारखे काय (Message of India), धर्म आणि राजकारणाचा अनुबंध अशा विषयांवर ही भाषणे झाली.

१९०३ साली जानेवारी महिन्यात लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत लंडनचे बादशहा एडवर्ड ७ यांच्या राज्यारोहणानिमित्त दिल्लीला बादशहाचा दरबार भरविण्यात आला होता. त्याचवेळी बादशाच्या सन्मानार्थ देशात ठिकठिकाणी समारंभ आयोजित करण्यात येत होते. अमरावतीसही भव्य पेंडॉल टाकून ब्रिटिश बादशहास शुभेच्छा देण्यासाठी कार्यक्रम करण्यात येणार होता. या कार्यक्रमात फटाक्यांची आतषबाजी करण्यात येणार होती. दादासाहेब खापर्डे व त्यांच्या अनुयायांनी या फटाक्यांच्या साहाय्यानेच पेंडॉल पेटवून देऊन कार्यक्रम उधळून लावण्याची यशस्वी शक्कल लढवली होती. प्रजेच्या मनातील राजनिष्ठा पुसून त्यांच्या मनात स्वातंत्र्याकांक्षेची आग भडकविण्यासाठी असे प्रतिकात्मक उद्योग त्यांनी सुरू केले होते. याखेरीज २८ जून १९०३ रोजी लोकमान्य टिळकांना विद्यार्थ्यांच्या हस्ते मानपत्र देऊन दादासाहेबांनी तरुण पिढीच्या मनात टिळकांविषयीचा आदरभाव आणि राष्ट्रीय कार्यातला सहभाग वाढविण्याची प्रेरणा जागविण्याचा उपक्रम केला. टिळकांची ताईमहाराज खटल्यातून निर्दोष मुक्तता झाल्यावर ५ मार्च १९०४ रोजी त्यांची अभिनंदन सभा आयोजित करण्यात आली. टिळकांना विदर्भातून जास्तीत जास्त समर्थन मिळवावे म्हणून दादासाहेबांनी डॉ. मुंजे, नीळकंठराव उधोजी इत्यादींशी संपर्क वाढवून त्यांना टिळकांचे अनुयायी बनविण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला.१९०५ च्या बनारस काँग्रेसला विदर्भातून दादासाहेब खापर्डे, डॉ. बा. शि. मुंजे, रा. ना. मुधोळकर, गंगाधर चिटणवीस उपस्थित राहिले. ह्या त्यांच्या उपक्रमशीलतेमुळेच विदर्भातले टिळकांचे उजवे हात म्हणून दादासाहेब खापर्डे यांची प्रतिमा तयार होत गेली.

विदर्भाचा विकास हा दादासाहेब खापर्डे यांच्या कार्यक्रमपत्रिकेतला अग्रक्रमाचा विषय असे. १९०५ साली नागपूर येथे दादासाहेबांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस'च्या अधिवेशनात त्यांनी विदर्भाच्या विकासासाठी एक विद्यापीठ आणि एक हायकोर्ट स्थापन करण्याची मागणी केली होती. विदर्भातला पटवारी कर, बिगार पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात त्यांचा पुढाकार होता. १३-१४ एप्रिल १९०६ ला जबलपूर येथे झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपदही दादासाहेबांनी भूषविले होते. या अधिवेशनात त्यांनी 'स्वदेशी'चा ठराव मांडला होता. १९०६ च्या कलकत्ता येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात मध्यप्रांताचे ९० व वऱ्हाडचे ६० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या अधिवेशनात टिळकांच्या स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीच्या

ठरावाचे जोरदार समर्थन करून तो पारित करवून घेण्यासाठी लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, यांच्याइतकेच दादासाहेब खापर्डे यांचेही मोठे योगदान होते. खापर्डे यांनी या चतु:सूत्रीचा प्रचार करण्यासाठी सौराष्ट्र, गुजरात, कोकण व विदर्भाची प्रवासयात्राही काढली होती. "राजकारण ही फुरसतीच्या वेळात करावयाची क्रिया नसून स्वातंत्र्यप्राप्तीकरिता करावयाचा प्रयत्न आहे. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची प्रेरणा हीच जीवननिष्ठा होय." अशा शब्दात त्यांनी आपल्या राजकीय बांधिलकीचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले होते.

१९०७ साली नागपूरात काँग्रेसच्या जहाल गटाशी बांधिलकी असलेल्या लोकांनी एकत्र येऊन 'राष्ट्रीय मंडळ' नावाची संस्था स्थापन केली. नीळकंठ उधोजी हे अध्यक्ष होते व डॉ. बा. शि. मुंजे, अच्युतराव कोल्हटकर, डॉ. परांजपे, रामनारायण राठी, बॅ. चक्रवर्ती, डॉ. गद्रे, नारायणराव उके व रायपूरचे माधवराव सप्रे हे राष्ट्रीय मंडळाचे सदस्य होते. मंडळामार्फत गणेशोत्सव व शिवजयंतीचे उत्सव सुरू करण्यात आले. अच्युतराव कोल्हटकरांचे 'देशसेवक' व माधवराव सप्रे यांचे 'हिंद केसरी' ही पत्रे या गटाच्या विचारधारेचा प्रचार करणारे लेखन प्रकाशित करीत असत. या जहाल विचारसरणीच्या प्रेरणेतून नागपूरच्या तरुण विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जाणीव जागृती होऊ लागली. हे महाविद्यालयीन तरुण लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष या नेत्यांचे चित्रफलक घेऊन व 'वंदे मातरम्'चा नारा देऊन मिरवणुका काढू लागले. मॉरिस कॉलेजातल्या एका युरोपियन प्राध्यापकाचे 'वंदे मातरम्'च्या घोषणेने वर्गात स्वागत झाल्यावर या प्राध्यापकाने या तरुण विद्यार्थ्यांच्या नागपूरातील राजकीय चळवळीवर आक्षेप घेणारी तक्रार पोलीस आयुक्तांकडे केली. पोलिसांनी या विद्यार्थ्यांवर 'दंगेखोरी'चा आरोप ठेवून कारवाई केली. पोलीस कायद्यातील 'दंगेखोर' (riot) या संकल्पनेची व्याप्तीही वाढविण्यात आली. "Students or other who insult or annoy residents and passengers by shouting at them "Bande Mataram" or other provocative or insulting words, or by throwing dirt at them or by threating gestures are behaving in a "riotous" manner and should dealt with by prompt arrest and prosecution." (व्यास, २००१, पृ. ४८) घरांच्या खिडकीतून अशा प्रकारचे प्रदर्शन करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी गणवेश नसलेल्या पोलिसांची पाळत ठेवण्यात आली होती.

'राष्ट्रीय मंडळा'च्या या जहाल गटाला लोकमान्य टिळक यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्षस्थान भुषवावे अशी इच्छा होती. त्यामुळे १९०७ चे काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला घेण्याचा प्रस्तावही गंगाधरराव चिटणवीस यांनी दिला होता. परंतु मवाळ संप्रदायी मुंबईकर फिरोजशहा गटाने ते नागपूरऐवजी सुरतला घेण्याचे राजकारण केले. सुरत अधिवेशनाला जाताना व परत येताना अरविंद घोष यांना राष्ट्रीय मंडळाच्या पुढाऱ्यांनी नागपूरला थांबवून घेऊन त्यांची व्याख्याने आयोजित केली. २२ डिसेंबर १९०७ रोजी रघुवीर थिएटरमध्ये अरविंद घोष यांच्या व्याख्यानाला नागपूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. आपल्या भाषणात अरविंदांनी 'स्वदेशी'चे महत्त्व सांगितले व इंग्रजी राजवटीवर टीका केली. कोल्हटकरांच्या

'देशसेवक' पत्रातून ही पूर्ण भाषणे छापून आली. परिणामत: अच्युतराव कोल्हटकरांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व त्यांना १८ महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

१९०७ साली सुरत अधिवेशनात कॉंग्रेसमध्ये जहाल व मवाळ पंथियांमध्ये उभी फूट पडून कॉंग्रेस दुभंगली. त्यानंतर सरकारने दादासाहेब खापर्डेंचे अमरावती नगरपालिकेचे सदस्यत्व रद्द केले. त्याचा निषेध म्हणून पाठोपाठ १५ नगरसेवकांनी राजीनामे देऊन आपली खापर्डेनिष्ठा सिद्ध केली. खापर्डे यांनी विदर्भात जहाल पंथीयांचे संघटन बांधण्यासाठी २२ जानेवारी १९०८ रोजी जहाल विचारधारेचे समर्थक अरविंद घोष यांचे 'राष्ट्रीयतेची मूलतत्त्वे' यावर विशेष व्याख्यान ठेवले. बिपीनचंद्र पाल यांची तुरुंगातून सुटका झाल्यावर अभिनंदन सभा आयोजित केली. टिळकांनी सुरू केलेल्या शिवाजी उत्सवाची परंपरा विदर्भात रुजविण्यासाठी १९०८ साली लोकमान्य टिळकांचा विदर्भ दौरा आयोजित केला. ४ मे १९०८ ला अकोला येथे लोकमान्य टिळकांच्या सभेला शेगावचे गजानन महाराज उपस्थित राहिल्याने या चळवळीला एक आध्यात्मिक पाठिंबाही मिळाला. टिळक आणि गजाननमहाराजांची भेट ही 'जिवा-शिवाची भेट' म्हणून विदर्भवासीयांच्या मनात घर करून राहिली. इतकेच नाही तर टिळकांना 'लोकमान्य' ही पदवीही सर्वप्रथम विदर्भवासीयांनीच बहाल केली होती. 'हरिकिशोर'चे संपादक पृथ्वीगीर यांनी टिळकांना यवतमाळ येथे आणले होते, त्यावेळी त्यांना 'लोकमान्य' या पदवीने सन्मानीत करण्यात आले होते. (वक्काणी, २००३, पृ. ५०)

२४ जून १९०८ रोजी टिळकांना राजद्रोहाच्या गुन्ह्याखाली अटक करण्यात आली. २२ जुलै १९०८ रोजी ६ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली व एक हजार रुपये दंड करण्यात आला. विदर्भात याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. नागपूर शहरात हरताळ पाळण्यात आला. विद्यार्थ्यांनी सरकारच्या निषेधार्थ मिरवणुका काढल्या. पोलीस व सैन्यदलाने गोळीबार करून जमावाला पांगवले. १९ ऑगस्ट १९०८ रोजी डॉ. मुंजे यांनी व्यंकटेश थिएटरमध्ये सभा घेऊन स्वदेशी व्रताची सामूहिक शपथ घेतली. टिळकांच्या अटकेनंतर सरकारच्या निषेधार्थ निघालेल्या मिरवणुकीत सहभागी झाल्यामुळे शिवराजसिंग या सेवानिवृत्त तहसीलदाराची पेन्शन सरकारने थांबवली. नागपूरजवळच्या मोहगावचे शिक्षक बालाजी नारायण यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. नागपूरच्या शिवाजी विद्यालयातले शिक्षक वामनराव जोशी यांनी गणेशोत्सवात भाषण दिले यावरून त्यांना एक हजारांचा जामीन व ५०० रुपयांचा दंड ठोठावला. जोशींनी या दोन्हीस नकार दिल्यामुळे त्यांना दीड वर्षे कारावासाची शिक्षा झाली. टिळकांच्या अटकेनंतर निरनिराळ्या वृत्तपत्रांत आलेल्या राजकीय लेखांना राजद्रोहाचा गुन्हा ठरविण्यात आले व 'हिंद केसरी'चे संपादक माधवराव सप्रे, 'हरिकिशोर'चे संपादक भावे, 'देशसेवक'चे संपादक अच्युतराव कोल्हटकर, लेखक रामलाल बाजपेयी, शंभुराव गाडगीळ, गोपाळराव ओगले यांच्यावर खटले दाखल करण्यात आले. १९०८ साली नोव्हेंबरात नागपूरला औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याच वेळी महाराजबागेतल्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला काळे फासण्याचा प्रकार घडला. जवळच असलेल्या कृषी महाविद्यालयाच्या

वसतिगृहावर पोलिसांनी छापे घातले. संशयावरून वसतिगृह अधीक्षक नारायणराव परांजपे, दोन पर्यवेक्षक आणि एका विद्यार्थ्यास अटक करण्यात आली. परांजपे यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार मुख्य आयुक्त रेजीनाड क्रेडॉक यांनी या प्रसंगाची आठवण लिहिताना त्यावेळच्या विद्यार्थी वर्गातल्या राष्ट्रभावनेच्या चेतनेसंबंधी म्हटले आहे की, "When I had to visit the hostel attached to the Agricultural College hostel in Nov. (the month of incident) last while enquiring into the outrage of the Queen's Statue, I found the attitude of a number of boys and students was extremely offensive and provocative, and it is a noteworthy coincidence that a little letter I discovered that the hostel was full of nationalist literature in the purveyance and distribution of which the hostel masters had borne an important part."(व्यास,२००१, पृ.५१-५४) संपूर्ण नागपूर शहर राष्ट्रभावनेने कसे भारावलेले होते हे यावरून दिसून येते.

यवतमाळचे लोकनायक बापूजी अणे हे विदर्भातले आणखी एक खंदे नेतृत्व. १९०७ साली वकिलीची सनद प्राप्त झाल्यानंतर त्यांनी राजकारणात भाग घ्यायला प्रारंभ केला. वंग-भंगानंतर विदर्भात ब्रिटिशविरोधी वातावरण तयार झाले होते. बापूजी अणे यांनीही वंग-भंग चळवळीपासून प्रेरणा घेऊन ४ एप्रिल १९०७ रोजी यवतमाळ येथे इंग्रजांचा निषेध करणारे एक जहाल भाषण दिले. ह्या भाषणाला 'हरिकिशोर' साप्ताहिकाने व्यापक प्रसिद्धी दिली. तेव्हापासून विदर्भात अण्यांचा चाहता वर्ग तयार होऊ लागला. २६ फेब्रुवारी १९०८ रोजी दासनवमीच्या धार्मिक उत्सवाचा मुहर्त साधून अणे यांनी मंदिरासमोर पारतंत्र्याची मीमांसा करणारे भाषण दिले. धर्मावनती हेच आपल्या पारतंत्र्याचे आद्य कारण असल्याची मांडणी करून स्वातंत्र्य हेच या आजारावरचे एकमेव औषध असल्याचा विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडला. सभेच्या मंचारून थेट जनतेशी संवाद प्रस्थापित करण्याच्या मार्गाबरोबरच वृत्तपत्रातून लेखमाला लिहून राजकीय विचारांचे सखोल संस्कार करण्याचे माध्यम त्यांनी निवडले. 'हरिकिशोर' साप्ताहिकातून 'स्वराज्यप्राप्तीचे मार्ग' या विषयावर त्यांनी एक दीर्घ लेखमाला चालविली. राजसत्तेकडून होणारे अत्याचार सहन करण्यापेक्षा प्रजेने त्यास विरोध करावा; इष्ट हेतू साध्य करण्यासाठी प्रसंगी राज्यात अशांतता पसरवावी, नि:शस्त्र प्रतियोगाचे कवच टाकून 'प्रक्षोभक प्रतियोगा'चे शस्त्र धारण करावे असे राजकीय डावपेच या लेखमालेच्या माध्यमातून लोकमानसात बिंबविण्यास सुरुवात केली. राष्ट्रोद्धार हा 'राजसूय यज्ञ' असून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही या यज्ञाची मुख्य अंगे असल्याची मांडणी केली. या राजसूय यज्ञात प्रजेने धन-संपत्ती व प्रसंगी प्राणांची आहुती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यावर प्रवचनमाला गुंफून बापूसाहेब अणे यांनी चळवळीसाठी निधी संकलीत करण्याचा उपक्रम केला. एतद्देशीय लोकमानसाच्या बौद्धिक विचार करण्याच्या मुशी ज्या धार्मिक वाङ्मयाच्या परंपरेतून तयार झालेल्या होत्या त्या परंपरेतून उत्क्रांत झालेली परिभाषा राजकीय जाणीवजागृतीसाठी त्यांनी उपयोगात आणली होती. राजकीय संभाषितांची

ही लोकसांस्कृतिक शैली हे अण्यांच्या राजकारणाचे एक लेणे होते. ब्रिटिशांनी मात्र ह्या धार्मिक अवगुंठणाखाली होणाऱ्या राष्ट्रीय संभाषिताला राजद्रोहाची कृती समजून अणे यांच्यावर ठपका ठेवला. १९१० साली हनुमानजयंतीच्या निमित्ताने केलेले त्यांचे भाषण राजद्रोही ठरवून त्यांचे वकिलपत्र काही काळासाठी स्थगित ठेवण्याची कारवाई केली. त्या काळात धर्मपीठे आणि राजकीय प्रचारमंच यातली भेदरेषा पुसली गेली होती. वीर वामनराव जोशी यांनाही गणेशोत्सवात केलेल्या भाषणांमुळे ९ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. १९०८ साली अकोल्याचे मोरोपंत पुरोहित गावोगावी जाऊन राष्ट्रीय आशयसूत्र घेऊन प्रवचने करीत, त्यांच्यावरही राजद्रोहाचा ठपका ठेवून अटक करण्यात आली. वासुदेवराव बल्लाळ यांनी कवितेच्या अध्यापनातून राष्ट्रीय विचारांची पेरणी केली म्हणून त्यांना दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा दिली. माहेगावचे बालाजी नारायण हे शिक्षक राजकीय सभेला उपस्थित राहिले म्हणून त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. इतकेच नाही तर धामणगाव रेल्वे स्टेशनवर एका पटवाऱ्याने दादासाहेब खापर्डे यांना नमस्कार केला एवढ्या कारणावरून त्याचे पटवारीपद रद्द करण्यात आले. (वक्काणी, २००३, पृ. ६०-६१) अशा प्रकारे सरकार भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य आणि आचार स्वातंत्र्य हिरावून घेत होते. विदर्भातील ब्रिटिशांच्या अशा दडपशाहीमुळे तेथील जहाल विचारसरणीचे राजकारण अधिकच तीव्र होऊ लागले.

**होमरूल लीग:**

१६ नोव्हेंबर १९१५ रोजी नागपूर येथे झालेल्या प्रांतिक काँग्रेसच्या अधिवेशनात जहाल-मवाळ पंथीय एकत्र आले व त्यांनी टिळकांच्या होमरूल लीग चळवळीला पाठिंबा देण्याचे ठरविले. त्यानंतर २४ डिसेंबर १९१५ ला पुण्यात दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली २०० जहालांचा मेळावा झाला व त्यात होमरूल लीग स्थापन करण्याबाबत प्राथमिक चर्चा झाली. लोकनायक अणे व रा. वि. महाजनी यांनी स्वराज्याची मागणी केली. बेळगावच्या परिषदेत २८ एप्रिल १९१६ रोजी 'होमरूल लीग' अर्थात 'स्वराज्य पक्ष' स्थापन करण्याचा निर्णय झाला व श्री. बॅप्टिस्टा यांची अध्यक्षपदी, न. चिं. केळकर यांची चिटणीस व दा. वि. गोखले यांची सहचिटणीस म्हणून निवड झाली. प्रांतिक परिषद व स्वराज्य पक्ष या दोन स्वतंत्र संस्था असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. टिळकांनी आपल्या भाषणात 'होमरुल'ची संकल्पना समजावून सांगताना व्यक्त आणि अव्यक्त सरकार या दोन संज्ञांचा प्रयोग केला. 'अव्यक्त सरकार' म्हणजे इंग्रज बादशहाचे सरकार आणि 'व्यक्त सरकार' म्हणजे नोकरशाही. ही नोकरशाही बदलण्यावर टिळकांचा भर होता. स्वराज्याचा अर्थ बादशहाची सत्ता काढून टाकणे असा नसून आम्ही देशवासीय राज्यकारभार चालविण्यास पात्र असल्याने लोकनियुक्त प्रतिनिधींचा सत्तेत सहभाग असेल अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे 'स्वराज्य' अशी टिळकांची धारणा होती. यापूर्वी १९०६ सालीही टिळकांनी 'स्वराज्या'ची मागणी केली होती. त्याआधी दादाभाई नौरोजींनी १९०४ साली 'सेल्फ गव्हर्मेंट'ची व गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९०५ साली ऑस्ट्रेलिया व कॅनडातील 'डोमिनियम स्टेट्स्'च्या धर्तीवर 'वसाहतीच्या स्वराज्या'ची मागणी केली होती. स्वकीयांच्या हातात कारभार गेला तर प्रशासन सुधारेल, यावर

टिळकांचा भर होता. त्यामुळे 'होमरूल'ची मागणी म्हणजे राजद्रोह नाही, हेही त्यांनी आग्रहाने नमूद केले होते.

होमरूलचा प्रचार करण्यासाठी यवतमाळ डिस्ट्रिक्ट आसोशिएशनने १७ मे १९१६ रोजी यवतमाळला विशेष अधिवेशन घेतले; त्यातही जहाल व मवाळपंथीय एकत्र आले. १९१६ साली अमरावती येथे झालेल्या विदर्भाच्या प्रांतिक कॉंग्रेस अधिवेशनात इंग्रज सरकारकडून होमरूलचे राजकीय अधिकार मागणारे ठराव पारित करण्यात आले. त्यात संपूर्ण प्रांतात ग्रामपंचायती स्थापन करण्यात याव्यात, पाच हजारांपेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या गावांना नगरपालिका स्थापन करण्यात याव्यात व नगरपालिकांचे काम चालविण्यासाठीच्या मंडळात ३/४ लोकनियुक्त सभासद असावेत; जिल्हा मंडळांचे अधिकारही जनतेकडे असावेत अशा मागण्या करण्यात आल्या.

विदर्भातील होमरूल लीगच्या चळवळीत नागपूरच्या मध्य प्रांतातले नेते डॉ. हरिसिंग गौर, पंडित रविशंकर शुक्ल, डॉ. इ. राघवेंद्र, एस. बी. तांबे यांनी पुढाकार घेतला. विदर्भातील तरुण विद्यार्थ्यांचाही मोठा सहभाग होता. सरकारने होमरूल आंदोलनात भाग घेऊ नये असा फतवा काढला. तसेच आंदोलनात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हेडमास्तरांना जबाबदार धरले जाईल असेही कलम घालण्यात आले होते. [Circular No. 1038, 6th February 1917, From Director of Public Instruction, C.P. to the Inspector of School, Nagpur] H.S. Staley या शिक्षणाधिकाऱ्याने सर्व शाळांचे हेडमास्तर व संस्थाचालकांची १६ फेब्रुवारी १९१७ रोजी टाऊनहॉलमध्ये सभा बोलावून सार्वजनिक सभांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असता कामा नये, यासाठी घ्यावयाच्या दक्षतांची माहिती दिली. परिपत्रकातील 'पब्लिक मिटिंग' या शब्दप्रयोगात नेमके काय अभिप्रेत आहे अशी विचारणा शिक्षक-पालकांनी केल्यावर शिक्षणाधिकाऱ्यांनी त्याचे मोघम स्पष्टीकरण दिले. "For the present it is not intended to define an exact and legal terms what is meant by a public meeting, the ordinary interpretation in the popular sense will be sufficient for the present and the school authorities are quite competent to judge what kinds of meeting are barred." नागपूरच्या 'स्नातक संघा'ने (Graduate Association)हे परिपत्रक व्यक्तिस्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारे असल्याची टीका केली. अशा परिपत्रकामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठी हेरगिरी करण्याचे काम सरकार सोपवत असल्याचीही टीका करण्यात आली. हे अव्यावहारिक परिपत्रक सरकारने मागे घ्यावे अशी स्नातक संघाच्या वतीने शिक्षणाधिकाऱ्यांना विनंती करण्यात आली. विद्यार्थ्यांना चळवळीपासून परावृत्त करणारे असे परिपत्रक निघाले असतानाही विद्यार्थी या चळवळीपासून दूर राहिले नाहीत. नागपूर, यवतमाळ, वर्धा, अमरावती येथे विद्यार्थ्यांनी सरकारने जप्त केलेले साहित्य वाचण्याचा सपाटा लावला. सावरकरांचे 'मॅझिनी चरित्र' गुप्तपणे वाचले जाई. लोकनायक अणे यांचे भाषण ऐकायला गेलेल्या वसतिगृहातील ३०-४० विद्यार्थ्यांचा सुगावा ब्रिटिश हेरांना लागला; या विद्यार्थ्यांना सभास्थानी अटक करून प्रत्येकाला पाच ते दहा रुपयांचा दंड करण्यात आला. काही विद्यार्थ्यांवर शाळेतून

काढून टाकण्याची कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालणे, हरताळ पाळणे अशा प्रकारचे आंदोलन सुरू केले. 'हितवाद' सारख्या पत्राने शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजात जायला लागावे असे आवाहन केले, पण त्याचा उपयोग झाला नाही. शासनाने हिस्लॉप व मॉरिस कॉलेज बंद करण्याचा निर्णय घेतला. मॉरिस कॉलेजच्या कायदा शाखेच्या विद्यार्थ्यांनी सभा घेऊन सार्वजनिक सभांमध्ये सहभागी होण्याचा आपला निर्धार पुन्हा एकदा आधोरेखीत केला. हिस्लॉप कॉलेजने ९ विद्यार्थ्यांना कॉलेजातून काढून टाकले. विद्यार्थी संघटनेने त्याविरुद्ध आंदोलन केले. अखेर ३ महिन्यांनंतर स्थानिक पुढाऱ्यांच्या मध्यस्थीने शाळा-महाविद्यालये पुन्हा सुरू झाली. (व्यास, ८१-८९)

३१ मे १९१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या भाषणात टिळकांनी 'होमरुल' संकल्पनेची व्याख्या अधिक विस्ताराने विशद केली. "स्वराज्याचा अर्थ बादशाहाची सत्ता काढून टाका असा नसून ऑस्ट्रेलिया, कॅनडा वगैरे देशांप्रमाणे लोकनियुक्त प्रतिनिधींना जबाबदार असलेली प्रधानमंडळे चालवतात तशी व्यवस्था हवी." याच भाषणात त्यांनी असेही सांगितले की, "मी मुसलमानांना परकीय म्हणत नाही.. परकीयपणा गोऱ्या आणि काळ्या कातडीत नाही. परकीयपणा धर्मात नाही. सरकार परकीय आहे." (समग्र लोकमान्य टिळक खंड ६, १९७६, पृ. ४६८-४६९) थोडक्यात, होमरूल लीगची मुख्य मागणी ही देशात प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्याची होती. लोकनियुक्त सभासद असलेल्या विधिमंडळाचे अधिकार वाढवावेत व कार्यकारी मंडळ हे विधिमंडळास जबाबदार असावे ह्यावर टिळकांचा भर होता.

होमरूल चळवळीला पायबंद घालावा म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी वृत्तपत्रांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. काँग्रेसच्या जहाल आणि मवाळ दोन्ही पक्षांनी मुंबई व पुण्यात सभा घेऊन सरकारच्या आविष्कार-स्वातंत्र्यावर निर्बंध आणण्याच्या घटनेचा निषेध केला. २४ जून १९१६ रोजी मुंबईत बी. जी. हार्निमन यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्याला गांधीजी, बॅप्टिस्टा, दाजी आबाजी खरे, गोपाळराव देवधर इत्यादी पुढारी उपस्थित होते. १ जुलै १९१६ रोजी पुण्याच्या सभेत रँ. परांजपे, हरिभाऊ लिमये, शि. म. परांजपे, भोपटकर इत्यादी पुढारी सहभागी झाले होते. सरकारने टिळकांची बेळगाव व अहमदनगरची भाषणे राजद्रोहात्मक असल्याचा ठपका ठेवला.

२० जुलै १९१६ रोजी टिळकांचा साठावा वाढदिवस होता; त्यानिमित्त विदर्भवासीयांनी १ लाखाचा निधी गोळा करून विदर्भात होमरूल चळवळ गतिमान करण्याचा संकल्प सोडला. त्यासाठी न. चिं. केळकर यांची खामगाव, अमरावती, नागपूर इत्यादी ठिकाणे व्याख्याने ठेवण्यात आली. २३ जुलै १९१६ रोजी टिळकांचा षष्ठ्यब्दीपूर्तीचा सोहळा सुरू असतानाच पोलिसांनी त्यांना दहा हजारांचे दोन जामीन व वीस हजारांचा जातमुचलका भरण्याची नोटीस दिली. टिळकांना त्यावेळी त्र्यंबक हरि आवटे आणि गणपत विठोबा या दोन ब्राह्मणेतरांनी जामीन दिले. टिळकांविरुद्धच्या राजद्रोहाच्या खटल्यात महमद अली जिना यांनी वकिलपत्र घेतले. १२ ऑगस्ट १९१६ रोजी न्या. हॅच यांनी टिळकांना दोषी ठरवले. व्यक्त-अव्यक्त सरकार हा टिळकांचा युक्तिवाद फेटाळून लावला व टिळकांचा नोकरशाहीवरच नव्हे तर सर्वच

राज्यपद्धतीवर आक्षेप आहे; म्हणून तो राजद्रोह ठरतो, असा निकाल दिला. त्यानंतर २३ ऑगस्ट १९१६ रोजी टिळकांनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. ९ नोव्हेंबर १९१६ रोजी उच्च न्यायालयात न्यायमूर्ती बॅचलर व न्या. शहा यांच्या खंडपीठाने टिळकांना निर्दोष ठरविले. न्यायमूर्तींनी आपल्या निकालपत्रात टिळकांची 'स्वराज्या'ची मागणी आक्षेपार्ह ठरत नसल्याचा व त्यांच्या भाषणात कोठेही ब्रिटिश राजवटीविरुद्ध द्वेषभावना नव्हती असा निर्वाळा दिला. प्रजेला राजकीय अधिकार द्यावेत ही मागणी करणे म्हणजे राजद्रोह होऊ शकत नाही असे निकालपत्रात नमूद करण्यात आले होते. या निकालामुळे टिळकांच्या 'होमरुल चळवळी'चे बळ वाढले. १९१८ साली टिळकांच्या होमरूल लीगचे ३३८५४ सभासद होते. त्यात ४५ टक्के ब्राह्मण व ५५ टक्के ब्राह्मणेतर होते. त्यांच्या होमरूल लीगच्या पुण्याखेरीज मुंबई, नागपूर येथेही शाखा होत्या.

**ॲनी बेझंटची होमरूल लीग :**

२८ एप्रिल १९१६ रोजी बेळगावला टिळकांनी 'होमरूल' अर्थात स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती. टिळकांपाठोपाठ ॲनी बेझंट यांनीही सप्टेंबर १९१६ मध्ये मद्रासला 'होमरुल लीग' स्थापन केली. 'होमरूल' ही संज्ञा सिनफेन पक्षाच्या चळवळीकडूनच स्वीकारण्यात आली होती. आयर्लंडमधील 'आयरिश रिपब्लिकन ब्रदरहूड' चळवळीचा नमुनादर्श समोर ठेवून लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी हिंदुस्थानात 'होमरूल' चळवळ सुरू केली होती. थिऑसॉफी संप्रदायाच्या प्रवक्त्या म्हणून ॲनी बेझंटचे त्यावेळच्या सुशिक्षित वर्गाला आकर्षण होते. हिंदू धर्म व संस्कृतीचा गौरव करणारी थिऑसॉफिकल सोसायटी एक राजकीय भूमिका घेऊन 'होमरूल लीग'च्या माध्यमातून सक्रिय झाली होती. टिळक व ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेल्या या संघटना काँग्रेसला पूरक असणाऱ्या राजकीय संघटना होत्या. टिळकांच्या होमरुल लीगचे प्रभावक्षेत्र प्रामुख्याने पुणे, दक्षिण महाराष्ट्र, कोकण, बेळगाव, अहमदनगर, नाशिक, खानदेश, वऱ्हाड, नागपूर इत्यादी भागात होते; बेझंट बाईंचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मद्रास व मुंबईत होते. पुढे गुजरात, बिहार व सिंध प्रांतातही बेझंटबाईंच्या होमरुल लीगला अनुयायी लाभले. बेझंटबाईंचा साम्राज्यशाहीला विरोध नव्हता, राजकीय स्वायत्ततेवर व सामाजिक सेवेवर भर होता. टिळकांच्या होमरूलचा साम्राज्यशाहीला कडवा विरोध आणि 'स्वराज्या'च्या मागणीचा पुरस्कार व जबाबदार प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्यावर भर होता. लोकनियुक्त सभासद असलेल्या विधिमंडळाचे अधिकार वाढवावेत, कार्यकारी मंडळ विधिमंडळाला जबाबदार असावे हे मुख्य मुद्दे दोन्ही संघटनांच्या मागण्यांमध्ये अंतर्भूत होते. या दोन्ही संघटनांचे संस्थापक वेगळे असले, प्रभावक्षेत्रे वेगळी असली तरी ध्येये समान होती; त्यामुळे त्यांच्यात आपपरभाव नव्हता, परस्पर सहयोगच होता.

टिळकांच्या होमरुल लीगपेक्षा बेझंटबाईंना मद्रास, संयुक्त प्रांतात अधिक व्यापक पाठिंबा मिळत गेला. म. गांधी, जवाहरलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, इंदुलाल याज्ञिक यांनी बेझंटबाईंच्या होमरुल लीगचे सदस्यत्व स्वीकारले होते. बेझंटबाईंच्या लीगची मुंबई शाखा प्रभावी होती. मात्र ब्रिटिशांनी बेझंटबाईंनाही अटक करून ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न

केला. १९१६ साली जुलै महिन्यात मुंबई सरकारने बेझंटबाईंना मुंबई इलाख्यात प्रवेश करण्यास मनाई करणारा हुकूम काढला. वऱ्हाड-मध्यप्रांत सरकारनेही १९१६ साली नोव्हेंबर महिन्यात असाच मनाईहुकूम जारी करून प्रवेशबंदी केली. बेझंटबाईंना सरकारने अटक केल्यावर मुंबई शाखेचे कार्यकर्ते अधिक क्रियाशील झाले व त्यांनी होमरूलचा वेगाने प्रसार केला. ७ डिसेंबर १९१६ रोजी मुंबईत टिळकांनी जाहीर सभेत बेझंटबाईवर लादलेल्या प्रवेशबंदीचा निषेध केला.

१९१६ साली डिसेंबर महिन्यात लखनौला राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात होमरूल चळवळीचे नेते लो. टिळक व त्यांच्या अनुयायांचे जोरदार स्वागत झाले. तब्बल ९ वर्षांनंतर टिळक काँग्रेसच्या अधिवेशनाला उपस्थित राहिले होते. काही नेमस्तांनी होमरूलचा पुरस्कार करणाऱ्यांना विषयनियामक समितीत निवडू नये असा आग्रह धरला होता, परंतु त्याचा उपयोग झाला नाही. या अधिवेशनात सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 'स्वराज्या'चा ठराव मांडला, टिळक व बेझंटबाईंनी ठरावाला अनुमोदन दिले. टिळकांनी आपल्या भाषणात 'स्वराज्य, 'होमरूल', 'सेल्फ गव्हर्मेंट' या समानार्थी संज्ञा असून एकाच मागणीची तीन नावे असल्याचा खुलासा केला आणि जहाल-मवाळांनी एकजुटीने स्वराज्यासाठी काम करण्याचे आवाहन केले. कॉंग्रेस आणि मुस्लीम यांनीही एकत्र येऊन काम करावे, अशी टिळकांनी सूचना केली.

होमरूलची चळवळ दडपून टाकावी म्हणून १५ जून १९१७ रोजी मद्रास सरकारने बेझंटबाई, अरुंडेल व वाडिया या नेत्यांना स्थानबद्ध केले, १९ जून १९१७ रोजी विष्णूपंत करंदीकर, नारायण सदाशिव मराठे यांना मद्रास सोडून जाण्याचा हुकूम फर्मावला. टिळकांनी सरकारच्या या दडपशाहीविरुद्ध केसरीतून अग्रलेखांद्वारे टीका केली. बेझंटबाईंची मद्रासमधून प्रसिद्ध होणारी 'न्यू इंडिया' व 'कॉमनवील' ही पत्रे बंद पडू नयेत म्हणून टिळकांनी न. चिं. केळकर यांना मद्रासला पाठविण्याची तयारी दर्शविली. 'बॉम्बे क्रॉनिकल'चे संपादक हॉर्मिनन यांनी होमरूलच्या भूमिकेचा पुरस्कार करून सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली. या पत्राच्या मालकांनी सरकारवर केल्या जाणाऱ्या टीकेची धार सौम्य केल्याची सूचना केल्यावर संपादकांनी राजीनामा दिला. १७ सप्टेंबर १९१७ रोजी बेझंटबाईंची मुक्तता करण्यात आली. त्यानंतर ७ ऑक्टोबर १९१७ ला अलाहाबाद काँग्रेसच्या अधिवेशनात काँग्रेस व लीगची संयुक्त परिषद झाली, त्यास टिळक व बेझंट हे दोन्ही नेते हजर होते. २६ डिसेंबर १९१७ ला कलकत्त्याला बेझंटबाईंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात टिळकांनी 'होमरूल'ची आपली व्याख्या पुन्हा एकदा विशद करून सांगितली. 'इंग्रज माणसाला त्याच्या देशात आणि वसाहतीत जे स्थान आहे ते मला माझ्या देशात मिळाले पाहिजे' अशा शब्दांत त्यांनी होमरूलची संकल्पना स्पष्ट केली. ॲनी बेझंट आणि टिळक यांच्या होमरूल चळवळीचा दाब वाढू लागल्यावर व्हाइसरॉय चेम्सफर्ड यास स्वयंशासनाच्या (सेल्फ गव्हर्मेंट) मागणीच्या प्रस्तावावर लवकरात लवकर व्यावहारिक तोडगा काढण्याची निकड भासू लागली. [५]

## मुस्लीम लीग आणि लखनौ काँग्रेस :

मुस्लीम लीग आणि काँग्रेसमध्ये 'लखनौ करार' झाला. त्याची पार्श्वभूमी अशी : १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनात अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनी स्वराज्याच्या मागणीचा पुरस्कार केला होता. त्यापाठोपाठ मुसलमानांनी अलगतावादी धोरण स्वीकारले व राजद्रोहाऐवजी राजनिष्ठेची भूमिका घेऊन ब्रिटिशांना सहकार्य करायचे ठरविले. यातूनच ३० डिसेंबर १९०६ रोजी ढाक्का येथे मुस्लीम लीगची स्थापना झाली होती. सर सय्यद अहमद खान यांचा त्यात पुढाकार होता. इंग्रजी शिकून पुढे गेलेल्या बंगाली हिंदूंच्या तुलनेत मुसलमान मागे पडत आहेत ही सय्यद अहमद खान यांची खंत होती. ब्रिटिशांची सहानुभूती संपादन करून मुसलमानांची प्रगती साधण्याचे मार्ग प्रशस्त करावेत असा ठोक व्यवहारवाद त्यामागे दडलेला होता. मुसलमानांच्या नागरी हक्कांसाठी काम करणारी संघटना म्हणून या पक्षाची निर्मिती झाली होती. मुसलमान हिंदूंच्या तुलनेत अल्पसंख्य असले तरी हिंदूंचे वर्चस्व मानण्यापेक्षा ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहणे त्यांना सोईचे वाटत होते. काँग्रेसला शह देण्यासाठी ब्रिटिशांनाही हेच हवे होते. 'कुराणाच्या विचाराने चालावे' हा इस्लामचा धर्म असल्याने धर्म व राजकारण एकाच चालीने कसे चालवता येईल याचेही उत्तर सय्यद अहमद यांच्याकडे होते. इस्लामी धर्माचरणासाठी इस्लामी राजसत्ता ही जणू पूर्व अटच असल्याची त्यांची समजूत होती. जर इस्लामेतर काफिरांची राजवट असेल तर 'हिजरत' चा मार्ग अवलंबावा; म्हणजेच जिथे शुद्ध धर्माचरण शक्य होत नाही तिथे देशत्याग करावा किंवा अशा काफिरी सत्तेविरुद्ध 'जिहाद' पुकारावा, म्हणजे धर्मयुद्ध छेडावे. कुराणाच्या आधारेच ख्रिश्चन व मुसलमान हे मित्रधर्म असल्याचे व महमदानेच येशू हा प्रेषित असल्याचे सांगितलेले असल्याने हिंदूंपेक्षा ब्रिटिश मुसलमानांना जवळचे ठरतात, असाही युक्तिवाद या निर्णयामागे होता. ब्रिटिशांनी भारतातली सत्ता सोडली तर त्यानंतर अपेक्षित असलेली हिंदू आणि मुसलमान यांची सत्तेतली संभाव्य भागीदारीही सय्यद अहमद यांना मान्य नव्हती. तसा प्रसंग आल्यावर द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करावा, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

मुस्लीम लीगच्या स्थापनेमागे लॉर्ड मिंटो यांचे आश्वासन प्रेरक होते, असे व्ही. पी. मेनन यांचे आकलन आहे. १९०६ साली ऑक्टोबर महिन्यात सिमला येथे आगाखान आणि व्हॉइसरॉय लॉर्ड मिंटो यांची भेट झाली. या भेटीतल्या चर्चेतून मुस्लीम लीगची स्थापना करण्याची कल्पना पुढे आली. १९०६ साली मुस्लीम लीगचे पहिले अधिवेशन झाले. त्यानंतर नागपूर येथे ३ डिसेंबर १९१० रोजी सय्यद नबीब्र उल्ला यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम लीगचे अधिवेशन झाले. नागपूरचे खान बहादूर मलिक हे स्वागताध्यक्ष होते. दिल्लीहून खास अधिवेशनासाठी आलेल्या महमद युसुफखान यांनी संपूर्ण विदर्भात जिल्हानिहाय दौरे काढून मुस्लीम लीगचा प्रचार केला. या अधिवेशनात इंग्रज सरकारविषयी राजनिष्ठा व्यक्त करणारा ठराव पारित करण्यात आला. उर्दू भाषेला प्रोत्साहन मिळावे, लेफ्टनंट गव्हर्नरचे पद पात्र मुसलमानास देण्यात यावे, मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांताला विधानसभा देण्यात यावी व तीत मुस्लीम लीगला योग्य प्रतिनिधित्व देण्यात यावे अशा इतर मागण्या करण्यात आल्या. या अधिवेशनाला

जोडून नागपूरात मुस्लीम शिक्षण परिषदही घेण्यात आली.

नंतर बॅ. जिना मुस्लीम लीगचे अध्यक्ष झाले. १९१६ साली टिळकांबरोबर 'लाहोर करार' करणारे जिना सुरुवातीला काँग्रेसमध्येच होते. अ. भा. काँग्रेस कमिटीच्या कामकाजात भाग घेण्यासाठी मुंबई प्रांताने निवडलेल्या प्रतिनिधींमध्ये लो. टिळक, म. गांधी, रॅ. परांजपे यांच्याबरोबर बॅ. जिनांचा समावेश होता. लखनौ येथे टिळकांनी जिनांशी भागीदारी करून काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांचा संयुक्तरित्या राजकीय सुधारणांचा मसुदा तयार केला. 'लखनौ करार' या नावाने हा मसुदा ओळखला जातो. जिनांनी काँग्रेस अधिवेशनाच्या काळातच लखनौला मुस्लीम लीगचे वार्षिक अधिवेशन घेऊन या कराराच्या मसुद्याला लीगची मान्यता घेतली होती. टिळक आणि जिना यांनी कलकत्ता येथे काँग्रेस व मुस्लीम लीगच्या सुधारणा समितीच्या संयुक्त बैठकीत तयार केलेल्या मसुद्यात सुचविण्यात आलेल्या सुधारणांचा तपशील असा होता -

१. प्रांतिक विधिमंडळात लोकांनी निवडून दिलेले ४/५ सभासद व सरकारनियुक्त १/५ सभासद असे प्रमाण असावे. मुंबई, मद्रास व बंगालच्या विधिमंडळात १२५ सभासद असावेत, मध्यप्रांत-वऱ्हाडसारख्या छोट्या प्रांतांच्या विधिमंडळात ५० ते ७५ सभासद असावेत.
२. मताधिकार शक्य तितक्या व्यापक प्रमाणात दिला जावा व अप्रत्यक्ष मतदानपद्धतीऐवजी प्रत्यक्ष मतदानपद्धतीचा पुरस्कार करावा.
३. मुसलमानांना संयुक्त प्रांतात ३० टक्के, बंगालात ४० टक्के, पंजाबात ५० टक्के, मुंबईत ३३ टक्के, बिहारात २६ टक्के, मद्रास आणि मध्यप्रांत-वऱ्हाडात प्रत्येकी १५ टक्के प्रतिनिधित्व द्यावे.
४. विधानमंडळातील सभासदांना प्रश्न विचारण्याचा, सभापती निवडण्याचा अधिकार असावा.
५. मध्यवर्ती सरकारकडे लष्कर, आरमार व हवाईदल; टांकसाळ; रेल्वे, टपाल व तार खाते; सीमाशुल्क, मीठ व अफुवरील कर ही खाती ठेवावीत, इतर सर्व खाती प्रांतांकडे सोपवावीत.
६. केंद्रात व प्रांतात विधिमंडळातील सदस्य कार्यकारी परिषदेवर पाठवायच्या सदस्यांची निवड करतील; त्यात अर्धे सदस्य भारतीय असावेत. कार्यकारी परिषदेचा कार्यकाल पाच वर्षांचा असेल. कार्यकारी परिषदेच्या मंत्र्यांचे खातेवाटप करण्याचा सर्वाधिकार ब्रिटिशांकडे रहाणार होता.

पहिल्या महायुद्धानंतर भारताला अशा प्रकारच्या काही राजकीय सुधारणा देण्याची कल्पना ब्रिटिशांनाही अभिप्रेत होतीच. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी मृत्यूपूर्वी तीन दिवस आधी एक संकल्पित आराखडा तयार केला होता. मात्र त्यांच्या निधनामुळे या आराखड्यावर रीतसर चर्चा होऊ शकली नव्हती. आता टिळक-जिना यांच्यातल्या लखनौ करारानुसार ब्रिटिश प्रशासनापुढे हा नवा सुधारणा प्रस्ताव दाखल करण्यात आला.

मुसलमानांना डावलून स्वातंत्र्यप्राप्ती शक्य नाही, आणि ब्रिटिशांनी मुसलमानांना वळवण्यापेक्षा आपणच त्यांच्याशी सामिलकी करण्यात राजकीय हित आहे, हे लक्षात घेऊन

टिळकांनी हा करार केला. या कराराच्या माध्यमातून टिळकांनी मुस्लीम लीग आणि काँग्रेस यांच्यात ऐक्य घडवून आणले व ब्रिटिशांना पेचात पकडले. यापूर्वी १९०९ साली मोर्ले-मिंटो सुधारणांच्या प्रस्तावात मुसलमानांना झुकते माप देऊन ब्रिटिशांनी हिंदूपासून मुसलमानांना अलग पाडण्याचा डाव खेळला होता, त्याला या करारामुळे परस्पर शह बसला. लखनौ करारात मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा देण्याची टिळकांची भूमिका होती. मदनमोहन मालवीय, मुंजे, सी. वाय. चिंतामणी या पुढाऱ्यांना ती योग्य वाटली नाही. लोकसंख्येच्या संख्याशास्त्रीय प्रमाणापेक्षा जास्त जागा देणे सावरकरांनाही मान्य नव्हते.

टिळकांनी मुस्लीम लीगबरोबर केलेला 'हिंदू-मुस्लीम करार' विदर्भातल्या एका गटाला मान्य नव्हता. डॉ. मुंजे हे त्यापैकी एक होते. लखनौ करारात मुसलानांना अतिरिक्त सवलती दिल्या गेल्या आहेत असा या मंडळींचा समज होता. मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा देणे त्यांना मान्य नव्हते. याविषयीचा आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी डॉ. मुंजे यांनी डिसेंबर १९१६ मध्ये नागपूरात हिंदू महासभेचे अधिवेशन बोलावून लखनौ कराराचा निषेध केला होता. (हरदास, १९६१, पृ. ३२६ / वक्काणी, २००३, पृ. ७०)

**टिळकांचे लष्करभरतीचे आवाहन :**

लखनौ काँग्रेसमध्ये टिळकांनी हिंदवासीयांना लष्करभरतीचे आवाहन केले. युद्धकाळातली इंग्रजांची अडचण ही आपलीच अडचण समजून हिंदी जनतेने स्वयंसैनिक म्हणून लष्करात भरती व्हावे, अशी टिळकांची भूमिका होती. त्याचबरोबर हिंदी लोकांसाठी सरकारने कमिशन्ड पदे खुली करावी, लष्करी प्रशिक्षण द्यावे व शस्त्रास्त्रबंदीचा कायदा रद्द करावा, अशा मागण्या केल्या. ६ मार्च १९१७ च्या 'केसरी'तील लेखातून त्यांनी आपला मुलगा भारतरक्षक सैन्यासाठी अर्पण केल्याचे जाहीर केले. एकाचवेळी 'स्वराज्या'ची मागणी आणि त्याचवेळी ब्रिटिशांसाठी लष्करात भरती होण्याचे आवाहन असे टिळकांचे दुहेरी राजनीतीतले डावपेच सुरू होते. १७ मे १९१७ रोजी नाशिक येथे झालेल्या मुंबई प्रांतिक काँग्रेस परिषदेत टिळकांनी पुन्हा एकदा स्वराज्याच्या मागणीचे समर्थन केले. १५ मे १९१७ च्या केसरीत त्यांनी यासंदर्भात लिहिले की, "माझ्या घरचा कारभार मी पाहणे याचेच नाव स्वराज्य. आपले नैसर्गिक जन्मसिद्ध हक्क मागवयास तुम्ही भिता हे बरोबर नाही. आमच्या या स्वराज्यात राजा नको, ब्युरॉक्रसी नको असेही आम्ही म्हणत नाही. ब्युरॉक्रसी जो व्यवहार आज स्वतंत्रपणे करीत आहे, तो आमच्या तंत्राने चालावा ही अगदी साधी व सोपी मागणी आहे."

स्वराज्याच्या मागणीमागील टिळकांची ही दुहेरी नीती ओळखून इंग्रज सरकारने त्यांना लष्करभरतीचे आवाहन करण्यासाठी पंजाब-दिल्लीत येण्यास व सभा घेण्यास मनाई करणारे फर्मान काढले. २० मार्च १९१७ रोजी हिंदुस्थान सरकारने परिपत्रक काढून विद्यार्थ्यांना राजकीय सभांना हजर रहाण्यास बंदी घातली व विद्यार्थ्यांना भडकविणाऱ्यांविरुद्ध भारत संरक्षण कायद्याखाली कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला.

**मॉंटेग्यू - चेम्सफर्ड सुधारणा :**

पहिले महायुद्ध चालू असताना बगदादच्या हल्ल्याच्या वेळी हिंदुस्थान सरकारने रसद पुरवण्याची जबाबदारी पार पाडली नाही, असा आरोप झाल्यामुळे त्यावेळचे भारतमंत्री चेंबरलेन यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यांच्या जागेवर १८ जुलै १९१७ रोजी एडविन मॉंटेग्यू यांची भारतमंत्री म्हणून नियुक्ती झाली. २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी ब्रिटनच्या संसदेत हिंदुस्थानला टप्प्याटप्प्याने जबाबदारीचे स्वराज्य (Responsible Government) देण्याची ब्रिटिश शासनाची इच्छा असल्याचे घोषित केले. या सुधारणांचा तपशील व स्वरूप ठरविण्याच्या दृष्टीने भारतीय लोकांशी संवाद साधण्याकरिता मॉंटेग्यू १० नोव्हेंबर १९१७ पासून सहा महिन्यांकरिता हिंदुस्थानात आले. २७ नोव्हेंबर १९१७ रोजी लोकमान्य टिळकांबरोबर त्यांची चर्चा झाली. २२ डिसेंबरला मुंबईत त्यांनी लोकप्रतिनिधींच्या भेटी घेतल्या. मॉंटेग्यू यांना निरनिराळ्या जाती-धर्मांतील ११० शिष्टमंडळे भेटली. त्यापैकी काहींनी आपल्या जातीसाठी राखीव मतदारसंघाची मागणी केली. लखनौ करारात टिळकांशी सहकार्य करणारे जिना आता कॉंग्रेसला शह देण्यासाठी विभाजनवादी भूमिका घेऊन ब्रिटिशांच्या बाजूने बोलू लागले. मुस्लीम लीगने मुसलमानांसाठी स्वतंत्र राज्य मागण्याची भूमिका आळवली. कलकत्त्याला १७-१८ नोव्हेंबरला राजकीय सुधारणांच्या प्रस्तावाचा मसुदा तयार करण्यासाठी कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांची संयुक्त समिती नेमण्यात आली होती. मुसलमानांचे प्रतिनिधित्व किती असावे यावर या संयुक्त समितीत एकमत होऊ शकले नाही. पहिल्या गोलमेज परिषदेतही जिनांची हिंदू किंवा मुसलमान यापैकी कुणाशीही तडजोड होऊ शकली नाही; तेव्हा जिना राजकारणसंन्यास घेऊन लंडनला वकिली सुरू करण्याच्या निर्णयप्रत येऊन ठेपले होते. पुढे १९४० साली त्यांनी या प्रश्नावर हिंदुत्ववादी नेते बॅ. सावरकर यांच्याशी वाटाघाटी करण्याची आपली इच्छा असल्याचे मनोगत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे व्यक्त केले होते, मात्र सावरकर पुढे न आल्याने या वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. बॅ. जिना यांच्या मुस्लीम लीगच्या राजकारणाविषयी विविध मतमतांतरे आहेत. हमीद दलवाई यांच्या मते जिनांना शरियतचे धर्मवादी राष्ट्र नको होते, त्यांना जमातवादी राष्ट्र हवे होते. त्यांना अखंड हिंदुस्थानात पंचाहत्तर टक्के हिंदूंवर पंचवीस टक्के मुसलमानांचे सत्तावर्चस्व प्रस्थापित करण्याची इच्छा होती. त्यामुळेच त्यांनी मुस्लीम बहुसंख्य प्रांतात मुसलमानांचा सत्तेत मोठा वाटा आणि केंद्रात मुसलमानांना पन्नास टक्के प्रतिनिधित्व देणारी कॅबिनेट मिशनची त्रिसूत्री योजना तत्काळ मान्य केली होती. अर्थात कॉंग्रेसने भक्कम विरोध केल्याने ही योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही.

२६ डिसेंबर १९१७ ला कलकत्त्याच्या कॉंग्रेस अधिवेशनात टिळकांनी मॉंटेग्यूच्या 'शक्य तितक्या लवकर जबाबदार शासन देऊ' या आश्वासनावर आक्षेप घेतला व कॉंग्रेसने ठराव पारित करून कालबद्ध मर्यादेत कायदा करून जबाबदार शासन स्थापन करावे अशी सूचना केली. दादासाहेब खापर्डे यांनी जबाबदार शासनाच्या नावाखाली इंग्रज सरकार बिनमहत्त्वाची खाती एतद्देशीयांकडे सोपवून महत्त्वाची खाती आपल्या ताब्यात ठेवतील अशी शंका उपस्थित केली.

त्यानंतर ४ एप्रिल १९१८ रोजी न. चिं. केळकर, बिपिनचंद्र पाल, दादासाहेब करंदीकर, व खापर्डे यांचे होमरूलचे एक शिष्टमंडळ टिळकांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडला निघाले. जर्मनीविरुद्ध युद्ध चालू असल्याने टिळकांसारख्या धोकादायक माणसाला लंडनला येऊ देणे धोक्याचे असल्याचे सरसेनापतींचे मत पुढे करून आयत्यावेळी त्यांची पारपत्रे रद्द करण्यात आली. टिळकांच्या होमरूल लीगला असा अप्रत्यक्ष लगाम घातला गेला.

टिळक-खापर्डे यांची पारपत्रे ऐनवेळी रद्द केल्याबद्दल ३ मे १९१८ ला मुंबईत गांधीजींच्या उपस्थितीत काँग्रेस समितीच्या बैठकीत सरकारचा निषेध करण्यात आला. पारपत्रे रद्द करण्याचा निषेध म्हणून कर देणे थांबवावे, अशी भूमिका सेनापती बापट यांनी गांधीजींपुढे मांडली. तसेच १७ एप्रिल १९१८ ला व्हाइसरायने दिल्लीच्या युद्धपरिषदेत टिळक, बेझंटबाई, नेहरू, टागोर, मोतीलाल घोष या पुढाऱ्यांना वगळल्याबद्दलही निषेध करण्यात आला. गांधीजींनीही टिळक, बेझंट, अलिबंधू यांना परिषदेस बोलावले नाही म्हणून मुख्य ठरावावर भाषण करायचे नाकारले. व्हाइसरॉयनी प्रांतपातळीवर युद्धपरिषदा घेऊन दिल्लीत वगळलेल्या पुढाऱ्यांना प्रांतिक परिषदेत बोलावण्याचा पर्याय सुचवला. त्यानुसार मुंबईचे गव्हर्नर विलिंग्डन यांनी युद्धपरिषद घेतली. टिळकांनी या परिषदेत 'स्वराज्य' आणि 'स्वदेशरक्षण' यांची जोडी फोडता येणार नाही असे भाषणात सांगायला सुरुवात केल्यावर गव्हर्नरने टिळकांना भाषण करण्यास बंदी केली. त्याचा निषेध म्हणून टिळकांनी सभात्याग केला. गांधीजींनीही यामुळे सभेत बोलण्यास नकार दिला. १६ जून १९१८ रोजी गांधीजींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत या घटनेचा निषेध करण्यात आला. या सभेत टिळकांनी सरकारने भारतीय सैनिकांना लष्करी प्रशिक्षण द्यावे व युरोपियनांप्रमाणे समान संधी व समान दर्जा द्यावा अशी मागणी केली; तसेच आपण स्वत: पाच हजार रंगरूटांची भरती करू अशी घोषणाही केली.

### अहवालातील शिफारशी :

४ जुलै १९१८ ला माँटेग्यू-चेम्सफर्ड अहवाल प्रसिद्ध झाला. त्यानंतर भारतमंत्री माँटेग्यू आणि व्हाईसराय लॉर्ड चेम्सफर्ड या दोघांच्या स्वाक्षरीने एक संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. 'साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ब्रिटिश सरकार विश्वस्ताच्या भूमिकेतून हिंदी जनतेला साह्य करेल असे आश्वासन या निवेदनातून देण्यात आले. जबाबदार प्रातिनिधिक राज्यसत्तेची क्रमश: स्थापना करण्याचे आश्वासन देणाऱ्या या अहवालातील शिफारशींचा गोषवारा असा :

१. नगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर लोकनियुक्त प्रतिनिधींचे संपूर्ण नियंत्रण राहील.
२. हिंदुस्थानचा राज्यकारभार पहाण्यासाठी केंद्रीय कायदेमंडळ स्थापन करण्यात येईल. मात्र हिंदुस्थान सरकार या केंद्रीय कायदेमंडळाला जबाबदार न राहता ब्रिटनच्या संसदेला जबाबदार राहील.
३. केंद्रीय कायदेमंडळाची विधिमंडळ (आजच्या परिभाषेत 'लोकसभा') व राज्यसभा अशी दोन सभागृहे असतील. विधिमंडळात १०० सभासद असतील, त्यातील २/३ लोकांनी निवडून

दिलेले व १/३ गव्हर्नर जनरलने नियुक्त केलेले सभासद असतील. राज्यसभेचे ५० सभासद असतील, त्यातील २१ सभासद अप्रत्यक्षरित्या निवडून आलेले, २५ सरकारी अधिकारी व ४ सरकारने नियुक्त केलेले बिनसरकारी सभासद असतील. दोन्ही सदनातील सदस्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार असेल. मात्र लोकहिताच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरू शकतील अशा प्रश्नांना अनुमती नाकारण्याचा गव्हर्नर जनरलना अधिकार असेल. विधिमंडळाला अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा अधिकार असेल, मात्र अर्थसंकल्प फेटाळण्याचा अधिकार नसेल. विधेयकाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी केंद्रीय विधिमंडळाची संमती घेण्याची गरज असणार नाही.

४. प्रांतिक कायदेमंडळांतील बहुसंख्य सभासद हे लोकांमधून निवडून आलेले असतील. मुसलमान व शिखांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असतील.

५. प्रांतिक सरकारच्या कार्यकारी मंडळाला सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वपालनाचे बंधन असणार नाही. गव्हर्नरला कार्यकारी मंडळातील सदस्यांशी स्वतंत्रपणे चर्चा करण्याचा अधिकार राहील. गव्हर्नरला एक किंवा दोन सरकारी अधिकाऱ्यांची बिनखात्याचे मंत्री म्हणून नेमण्याचा व त्यांचा सल्ला घेण्याचा अधिकार राहील.

६. प्रांतिक सरकारच्या खात्यांची 'राखीव' व 'सोपीव' अशी विभागणी असेल.

राखीव खाती:- गृह, अर्थ व सामान्य प्रशासन. सोपीव खाती:- स्थानिक स्वराज्य, शिक्षण, शेती, सार्वजनिक बांधकाम, अबकारी व स्थानिक उद्योग. गव्हर्नर एक युरोपीय व एक हिंदी सभासद यांच्या मदतीने 'राखीव' खात्यांचा कारभार पाहील. राखीव व सोपीव खात्यांचा कारभार पहाण्यासाठी आमदारांची स्थायी समिती असेल. कायदेमंडळाने केलेले ठराव राखीव व सोपीव खात्यांवर बंधनकारक असणार नाहीत.

७. नवी कायदामंडळे अस्तित्वात आल्यानंतर १० वर्षांनी शाही आयोगातर्फे या सुधारणांच्या अंमलबजाणीचा आढावा घेण्यात यावा.

८. हिंदी संस्थानाच्या प्रश्नांबाबत व्हाईसरॉयला सल्ला देण्यासाठी स्थायी स्वरूपाचे नरेंद्रमंडळ असावे.

या सुधारणा नाकाराव्यात असे म्हणणाऱ्यांचा एक प्रवाह होता. त्यात लो. टिळक, बेझंटबाई, मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, विठ्ठलभाई पटेल, व्ही. एम. केळकर, गंगाधरराव चिटणवीस, मोरोपंत जोशी यांचा समावेश होता. टिळकांनी केसरीत 'उजाडले पण सूर्य कोठे?' (९ जुलै १९१८), 'जनाब, देहली तो बहूत दूर है' (१६ जुलै १९१९८), कबूल वा नाकबूल (२३ जुलै १९१८) हे अग्रलेख लिहून आपल्या नापसंतीची मोहोर उठवली. ३१ जुलै १९१८ रोजी सरकारने टिळकांवर भाषणबंदीचा हुकूम बजावला. या सुधारणा स्वीकाराव्यात असे म्हणणाऱ्यांत दिनशा वाच्छा, चंदावरकर, इब्राहिम रहिमतुल्ला, चिमणलाल सेटलवाड, शंकरन नायर, श्रीनिवासशास्त्री, भूपेंद्रनाथ बसू यांचा समावेश होता. गांधीजींनाही या सुधारणा थोड्याफार बदलांसह स्वीकाराव्यात असे वाटत होते. दिनशा वाच्छा यांनी तर अखिल भारतीय परिषद घेऊन सुधारणा स्वीकारल्याचे जाहीर करावे अशी सूचना मांडली. सुरेंद्र बॅनर्जी तटस्थ होते.

डिसेंबर १९१८ मध्ये इंग्लडात सार्वत्रिक निवडणूक होती. हिंदवासीयांविषयी सत्तेवर येणाऱ्या पक्षाची अनुकूल मतधारणा व्हावी यासाठी टिळकांनी मजूर पक्षाच्या निवडणूक निधीला ३००० पौंडांची देणगी दिली. इंग्लंडातल्या सिनफेन पक्षातल्या व मजूर पक्षातल्या नेत्यांशी टिळकांनी मैत्रीचे संबंध जोडले. हिंदुस्थानात ब्रिटिश सरकार मजुरांचे शोषण करीत असल्याच्या आशयाची भाषणेही केली. लंडनचे डाव्या विचारांचे पत्र 'डेली हेरॉल्ड'ने टिळकांच्या भाषणांना व्यापक प्रसिद्धी दिली. २७ नोव्हेंबर १९१९ ला टिळक भारतात परत आले तेव्हा मुंबईत २९ नोव्हेंबर १९१९ ला व मद्रासला १८ डिसेंबर १९१९ रोजी कामगारांनी त्यांचा मानपत्रे देऊन गौरव केला. टिळकांची या काळातली एकूण राजकीय मांडणी रशियातल्या बोल्शेव्हिक क्रांतीच्या प्रभावाची व मजुरांच्या कल्याणाचा विचार करणारी वर्गलढ्याची होती. मुंबई भांडवलवाल्यांची नसून कष्टकऱ्यांची आहे; श्रमजीवी आणि बौद्धिक श्रम करणारे सगळेच कामगार मानले पाहिजेत, हिंदुस्थानात शेतमजुरांच्या संघटना बांधल्या पाहिजेत, इंग्रज सरकार म्हणजे सर्वात मोठा भांडवलदार शत्रू असून त्याविरुद्ध सर्वांनी संघटित होऊन प्रतिकार केला पाहिजे असा त्यांच्या भाषणांचा सर्वसाधारण सूर होता.

मे ते सप्टेंबर १९१९ या काळात अनेक काँग्रेस नेते विलायतेला गेले. लॉर्ड सेलबर्न यांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त समितीसमोर भारतीय शिष्टमंडळाच्या साक्षी झाल्या. त्यात काँग्रेसतर्फे टिळक, खापर्डे, न. चिं. केळकर, विठ्ठलभाई पटेल, डॉ. दिनकर साठ्ये, हॉर्निमन, बिपिनचंद्र पाल यांच्या साक्षी झाल्या. लिबरल पक्षातर्फे सुरेंद्रनाथ बॅनर्जी, श्रीनिवासशास्त्री, नारायण माधव समर्थ ; होमरूल लीगतर्फे बेझंटबाई, सी. पी. रामस्वामी अय्यर; मुस्लीम लीगतर्फे बॅ. जिना, याकूब हसन यांच्या साक्षी झाल्या. गांधीजींनी मात्र सविनय कायदेभंगाची सुरुवात करायचे ठरवून इंग्लंडला जाण्यास नकार दिला. टिळकांना व बेझंटबाईंना सत्याग्रह मान्य नव्हता.

मॉंटेग्यू-चेम्सफर्ड यांनी केलेल्या शिफारशींचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी इंग्लंडच्या संसदेत ३ ते ५ डिसेंबर १९१९ या काळात चर्चा होऊन विधेयक संमत झाले. २३ डिसेंबर १९१९ला 'गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९' हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याने प्रांतिक स्वायत्तता देण्यात आली, द्विदल राज्यपद्धती सुरू झाली. केंद्रात द्विगृही कायदेमंडळाची तरतूद करण्यात आली. वरिष्ठ सभागृहाची (कौन्सिल ऑफ स्टेट) मुदत पाच वर्षे, तर कनिष्ठ सभागृहाची (लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) मुदत तीन वर्षे ठरविण्यात आली. कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार नव्हते. गृह, कायदा, अर्थ ही महत्त्वाची खाती गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलच्या अखत्यारित ठेवण्यात आली. लंडनचे इंडिया कौन्सिल रद्द करून त्या जागी सल्लागार मंडळ नियुक्त करण्यात आले. संस्थानिकांसाठी नरेंद्रमंडळ स्थापन करण्याकरिता प्रिन्स ऑफ वेल्स १९२० च्या हिवाळ्यात भारतात येतील असाही निर्णय झाला. या निर्णयाने टिळक अस्वस्थ असले तरी औपचारिकतेचा भाग म्हणून त्यांनी बादशहांचे आभार मानणारी तार पाठविली व लोकांकडून 'प्रतियोगिता सहकारिता' मिळेल असे आश्वासन दिले.

### प्रतियोगिता सहकारितेची संकल्पना :

प्रतियोगिता सहकारिता (Responsive co-operation) या संकल्पनेचा टिळकांना

अभिप्रेत असलेला अर्थ पुढीलप्रमाणे होता : "आजपर्यंत नोकरशाहीचा विरोध आणि अडथळा होता. ही नोकरशाही जर सहकारिता करावयास कबूल असेल तर त्याला प्रतियोगितेच्या नात्याने म्हणजे जबाबास प्रतिजबाब म्हणून लोकही सहकारिता दाखविण्यास तयार आहेत." माँटेग्यू साहेबाच्या बिलामुळे जे पदरात पडेल ते घेऊन जास्ती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत रहाणे हेच शहाणपणाचे राहील असे टिळकांचे धोरण होते. गांधीजींना टिळकांची ही सशर्त सहकार्याची संकल्पना मान्य नव्हती. Disappointing, unsatisfactory and unacceptable असे सुधारणांचे वर्णन करायचे आणि त्यांचा स्वीकार करून काम करावयाचे हे धोरण त्यांना विसंगत वाटत होते. डिसेंबर १९१९ च्या अमृतसर काँग्रेस अधिवेशनात यावर चर्चाही झाली. चित्तरंजनदास यांनी १९१९चा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक असल्याचा ठराव मांडल्यावर टिळकांनी ठरावाला पाठिंबा दिला; मात्र गांधीजींनी ठरावातला 'निराशाजनक' हा शब्द वगळावा, सरकारशी सहकार्याचा स्पष्ट निर्देश करावा व माँटेग्यूंचे आभार मानावेत अशी दुरुस्ती सुचविली. जिना, मालवीय यांनीही गांधीजींच्या विचारांना दुजोरा दिल्यावर टिळकांनी आपल्या भूमिकेचा आग्रह धरला नाही व ठराव संमत झाला.

**कर्मयोगी टिळक :**

१ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईत लो. टिळकांचे निधन झाले. भारतीयांच्या मनात ब्रिटिश राज्यसत्तेविषयीच्या असंतोषाची बीजे पेरणारे एक झंझावाती पर्व म्हणून टिळकांच्या राजकीय कारकिर्दीची नोंद घेतली जाते. टिळकांच्या मृत्यूनंतर उत्तरकाळात त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य याविषयी निरनिराळी आकलने पुढे आली आहेत; त्या सर्वांचा इथे परामर्ष घेण्याचे प्रयोजन नसले तरी त्यांच्या कर्मयोगी व्यक्तिमत्वाविषयी दुमत नाही. 'ओरायन', 'आर्क्टिक होम इन दि वेदाज', 'गीतारहस्य' अशा ग्रंथातून त्यांच्या बुद्धिसामर्थ्याचा प्रत्यय येतो. "पण टिळकांच्या अपूर्व बुद्धिसामर्थ्याचा उपयोग ग्रंथलेखनाकडे न होता लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागावी म्हणून झगडण्यात झाला.. न्यायमूर्ती रानडयांनी सरकारी नोकरी सांभाळून जनहितार्थ आपल्याला नित्य नेमाने वेळ खर्च करता येतो हे स्वतःच्या उदाहरणाने दाखविले तर टिळकांनी त्याच्याही पुढे आघाडी मारून सरकारी नोकरीचा अभिलाष न धरता अखेरपर्यंत लोककार्यास वाहून घेता येते हे सर्वांना पटेल अशा प्रकारे दर्शविले. टिळकांपूर्वी किंवा त्यांच्या वेळीही सार्वजनिक कार्य म्हणजे दुय्यम मानीत. पण तो नूर बदलला टिळकांनीच. अनेक अडचणी सोसून, सरकारचा राग सहन करून, कोणाची भीडभाड न राखता समाजसेवा करण्यास तरुणांना स्वोदाहरणाने प्रोत्साहन दिले ही टिळकांची अव्वल दर्जाची कामगिरी अद्यापही कुणाला साधली नाही." (पाध्ये-टिकेकर, १९३५, पृ. १९६) सतत कार्यरत रहाणे हा टिळकांचा बाणा होता व टिळकांच्या धार्मिक मनोवृत्तीचा परिणाम त्यांचा आशावाद व कर्मयोग वाढविण्यास कारणीभूत झाला असावा, असेही पाध्ये-टिकेकरांचे आकलन आहे. त्यांच्या समन्वयशीलतेमुळे व व्यापक राजकीय हित डोळ्यांसमोर ठेवून लोकसंग्रह करण्याच्या वृत्तीमुळेच ते 'लोकमान्य' झाले.

टिळक धार्मिक मनोवृत्तीचे असले तरी रिकामे कर्मकांड करून कालक्षय करणे त्यांच्या स्वभावास मान्य नव्हते. लोकांनी अंधश्रद्धा व कर्मकांडाच्या आहारी जाऊ नये यासाठी त्यांना

स्पष्ट शब्दांत आपला रोकडा अभिप्राय सांगण्यासही ते मागे पुढे पहात नसत. गंगाधरराव देशपांडे यांनी टिळकांच्या बेळगाव भेटीतली अशी एक नमुनेदार आठवण नोंदवली आहे. १९०६ साली विष्णुबुवा जोग यांच्या अध्यक्षतेखाली बेळगावात टिळकांची वारकऱ्यांसमोर भाषणे झालीत. त्यात त्यांनी प्रयत्नांची कास धरल्याशिवाय गरिबी दूर होत नसते हे समजावून सांगताना 'नुसते तोंडाने 'विठ्ठल विठ्ठल' म्हणून टाळ कुटल्याने विठ्ठलाची प्राप्ती होत नसते, तशी प्रयत्न न करता गरिबीही दूर होत नसते' असे विधान केले. वारकऱ्यांमध्ये या विधानामुळे थोडीफार गडबड झाली, पण जोग महाराजांनी टिळकांच्या विधानातला मथितार्थ समजावून सांगितल्याने श्रोत्यांचे समाधान झाले व कुठलीही गडबड न होता सभा शांतपणे 'पुंडलिकवरदा हरि विठ्ठल'च्या गजरात समाप्त झाली. (देशपांडे गंगाधर, १९६०, पृ. १२८) अर्थात टिळकांचा कर्मकांडाला विरोध असला तरी लोकांच्या धर्मभावनेचा आदर केला पाहिजे, याचीही ते तेवढीच काळजी घेत. आपल्या कार्यकर्त्यांनाही याची जाणीव करून देत. कर्नाटकात लिंगायत लोकांची वस्ती जास्त आहे, त्यामुळे कर्नाटकातील कार्यकर्त्यांनी लिंगायत धर्माचा अभ्यास करून माहिती घेतली पाहिजे, असे ते कटाक्षाने सांगत. यावर 'लिंगायत धर्माचा व लोकसेवेचा काय संबंध' असा थेट प्रश्न गंगाधरराव देशपांडे यांनी विचारल्यावर टिळक म्हणाले, "ज्या लोकांत आपल्याला काम करावयाचे असते त्यांचेबद्दल, त्यांच्या चालीरीतींबद्दल माहिती असणे जरुर आहे. हिंदुस्थानांत अनेक धर्मपंथ असले, तरी त्यांतील तत्त्वे बहुतेक सारखीच असतात, म्हणून भिन्न लोकांच्या धर्माचा अभ्यास केल्यास त्यांच्याबद्दल आदर वाटून, धर्माधर्मांतील भेद नाहीसे झाले नाहीत तरी परस्परांबद्दल सहानुभूती वाटते. म्हणून लिंगायत लोकांच्या धर्माचा कर्नाटकांत काम करणाऱ्यांनी अभ्यास करावा." (देशपांडे गंगाधरराव, कित्ता, पृ. १२९-१३०) धार्मिक बाबतीत 'विविधतेतील एकते'चा संस्कार रूजवण्याची काळजी टिळक कशी घेत असत याचाही हा उत्तम दाखला आहे. राजकीय जीवनात अली बंधू, बॅ. जिना या मुस्लीम पुढाऱ्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. अलीबंधू तर टिळकांना राजकारणातले आपले गुरू मानीत.

लोकमान्य टिळकांचे चरित्रलेखक न. र. फाटक यांनी टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे मूल्यांकन करण्यासाठी भारतीय साहित्यातील प्रमाणाचा दाखला दिला आहे. "भारतीय साहित्यामध्ये सापडणाऱ्या थोर पुरुषांच्या लक्षणांत शील व यावज्जीव स्वार्थनिरपेक्ष परार्थसाधन ही दोन लक्षणे प्रामुख्याने सांगितलेली आहेत. बारकाईने विचार केल्यास ही लक्षणे अखिल विचारी मानवतेला मान्य असल्याबद्दल खात्री पटेल. शीलाच्या व्याख्येत एकपत्नीव्रत, स्वावलंबन (निर्वाहस्वातंत्र्य), असहाय जनतेविषयी सक्रिय कळवळा, मित्रनिष्ठा, 'विपदि' धैर्य, सत्यप्रीती, परस्वाविषयी नि:स्पृहता, साधी रहाणी, ऐपतीप्रमाणे सत्पात्री सढळ दातृत्व, 'सदसि' वाक्पटुता, विद्येचे व्यसन, इत्यादी गुणांचा अंतर्भाव केला जातो. .. टिळकांमध्ये हे मूलभूत व कमाईचे, याप्रमाणे अनेक गुण प्रकर्षाने वसत होते. यातल्या प्रत्येक गुणाचा कसदारपणा लोकांच्या निदर्शनास आणून देणारे प्रसंग वेळोवेळी उद्‌भवून त्या गुणांचे तेज लोकांत फाकले व टिळक लोकप्रियतेच्या शिखरास चढले." (फाटक, २०१२, पृ. ४९१)

## १.६. गांधीयुगाचा राजकारणात प्रवेश:

१९२० साली टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात गांधीयुग अवतरले. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्वाचे पर्व पार पडले व स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत या लढ्याने मजल गाठली. मात्र भारतीय राजकारणाशी गांधीजींचा अनुबंध फार पूर्वीच जोडला गेला होता. १८९३ साली दक्षिण आफ्रिकेत गेल्यापासूनच त्यांच्या व्यक्तिमत्वात राजकीय जाणिवा पहाटल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेषी गुलामगिरीविरुद्धच्या राजकीय लढ्याला पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय सभेचे तत्कालीन पुढारी फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, लो. टिळक यांच्याशी संपर्क प्रस्थापित केलेला होता. ना. गोखले अणि लो. टिळकांचे राजकारणाचे पर्व त्यांनी जवळून अनुभवले होते. किंबहुना टिळकांच्या मृत्यूपूर्वीच त्यांची भारतातील राजकारणाची पायाभरणी सुरू झाली होती. त्यामुळे गांधीजींच्या भारतीय राजकारणाचे 'टिळकपूर्व' आणि 'टिळकोत्तर' असे दोन टप्प्यात वर्गीकरण करावे लागते. विवेचनाच्या सोयीसाठी पहिल्या टप्प्याचे आपण 'गांधीयुगाची नांदी' असे नामकरण करू या व टिळकांच्या मृत्यूनंतरच्या राजकीय वाटचालीला 'गांधीपर्व' असे म्हणू या. वास्तविक टिळक आणि गांधी यांच्यात वैचारिक द्वंद्व होते असे म्हणता येणार नाही. दोघांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाला आणि राजकीय भूमिकांना भगवद्गीतेचे अधिष्ठान होते. गांधीजी आफ्रिकेतील चळवळीची माहिती देण्याकरिता भारतात आले होते तेव्हा त्यांनी महाराष्ट्रातल्या कर्त्या पुढाऱ्यांची भेट घेतली होती आणि येथील पुढाऱ्यांविषयी त्यांच्या मनात जी प्रतिमा तयार झाली होती, त्याविषयीचे मानसही त्यांनी बोलून दाखविले होते. फिरोजशहा मेथा, टिळक आणि गोखले यांची तुलना गांधीजींनी अनुक्रमे हिमालय, सागर आणि गंगामाईशी केली आहे. त्यांना फिरोजशहा मेथांचे व्यक्तिमत्व शिखरावर चढून जाण्यास कठीणप्राय असलेल्या हिमालयासारखे उत्तुंग वाटले; टिळकांचे व्यक्तिमत्व अथांग सागरासारखे वाटले; पण या सागरात नौका ढकलणे ही सोपी गोष्ट नसल्याचेही त्यांनी सांगून टाकले. गोखले मात्र गांधीजींना मनसोक्त डुंबण्यासाठी आमंत्रित करणाऱ्या गंगामाईसारखे पवित्र वाटले. (सत्याचे प्रयोग, अहमदाबाद, पृ. २२० / नंदा ५८६) गांधीजींच्या या मनोगताला जोडून आचार्य अत्रे यांनी उत्तरकाळात टिळक आणि गोखले या दोन व्यक्तिमत्त्वातील साम्य-भेदांची केलेली तुलना लक्षात घेतल्यास या दोन पुढाऱ्यांच्या भूमिकेतील द्वंद्वमूल एकतेची कल्पना स्पष्ट व्हायला मदत होईल. 'लोकमान्यांचे पुण्यस्मरण' या अग्रलेखात अत्र्यांनी गांधी आणि टिळक यांची तुलना केली होती. त्यांच्या मते टिळक हे बुद्धिप्रधान, तर गांधी हे भावनाप्रधान होते; त्या दोघांना दहशतवादी हिंसेचा मार्ग पसंत नव्हता. काँग्रेस संस्थेबद्दल दोघांचीही अढळ निष्ठा होती. हिंदू-मुसलमानांचे ऐक्य घडवून आणण्यासाठी मुसलमानांना वाटेल त्या सवलती दिल्या पाहिजेत, यावर दोघांचे एकमत होते. टिळकांचे स्वदेशीचे वेड गांधींच्या खादीच्या वेडाइतकेच जबरदस्त होते. मद्यपानबंदी हा दोघांचा आस्थाविषय होता. टिळकांचा 'बहिष्कार' आणि गांधींचा 'असहकार' यात तत्त्वत: काहीच फरक नव्हता. त्यामुळे टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकारणाचे खरे वारसदार महात्मा गांधी आणि काँग्रेसच ठरतात, असे मत अत्र्यांनी या लेखात

मांडले आहे. (मोरे सदानंद, पृ. १०८४-१०८५) मात्र महाराष्ट्रातील राजकारणाच्या या द्वंद्वमूल एकतेचे आकलन त्यांच्या अनुयायांना झाले नाही. त्यामुळे लोकमानसात गांधी टोपी विरुद्ध काळी टोपी असे वादयुद्ध सतत रंगत राहिले. हे राजकीय संभाषित अधूनमधून जलशाच्या मार्गानेच जात राहिलेले दिसते. गांधीजींचा उपरोध करण्यासाठी टिळकपंथीयांकडून

'खजूर आहे परदेशी, गांधी खातात दर दिवशी
परि सांगतात इतरांशी, तुम्ही खादी वापरा (गोखले, श्री. पु. कित्ता, पृ. १६)

अशा प्रकारच्या श्लोकरचना केल्या जात. शेलक्या विशेषणांचा औपरोधिक वापर करणारी राजकीय लोकसंवादाची नवी शैलीही यातून उत्क्रांत झाली.

लोकांना बरोबर घेऊन गांधीजींनी १९०८ ते १९४२ पर्यंत एकूण ७ लढे लढविले. त्यापैकी एक दक्षिण आफ्रिकेत वांशिक पक्षपाताविरुद्ध, तीन हिंदुस्थानात शेतकरी व कामगारांवरील अन्यायाविरुद्ध आणि तीन भारतीय स्वातंत्र्यासाठी. आठवा लढा १९४२ च्या 'चले जाव' चळवळीचा. गांधीजींना या संघर्षात १३ वेळा अटक झाली, ६ वर्षे ९ महिने तुरुंगवास घडला. त्यांनी आपल्या सत्याग्रहाच्या चळवळीत १८ उपोषणे केली, त्यापैकी ३ उपोषणे प्रत्येकी २१ दिवसांची प्राणघातक उपोषणे होती. स्वराज्य ही आत्मशुद्धीची चळवळ आहे, असे ते मानीत. म्हणून १८ पैकी १५ उपवास त्यांनी स्वबांधवांच्या हृदयपरिवर्तनासाठी केले होते. (केळकर श्रीपाद, २०००, पृ. ११८) गोखले-टिळक पर्वानंतर गांधीजींच्या सत्य, अहिंसा, अपरिग्रह, सत्याग्रह, असहकार व सविनय कायदेभंग इत्यादी संकल्पनात्मक पायावर भारतीय स्वातंत्र्यलढा लढला गेला. या संकल्पनात्मक मुशी कशा तयार झाल्यात व राजकीय लढ्यात या तत्त्वप्रणालीचे प्रत्यक्ष उपयोजन कसे झाले, हा जगभरातील राजनीतिशास्त्रज्ञांच्या कुतुहलाचा व अभ्यासाचा विषय राहिला आहे. त्यामुळे भारतीय राजकारणातील गांधीयुगाचा मागोवा घेण्यापूर्वी 'उपास' आणि 'हृदयपरिवर्तन' ही राजकीय लढ्याची अस्त्रे वापरणाऱ्या या शांतियोद्ध्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली हे आधी लक्षात घ्यायला हवे.

### व्यक्तिमत्वाची जडणघडण :

एका सात्त्विक व धार्मिक हिंदू कुटुंबात गांधीजींच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली. वयाच्या आठव्या वर्षी हरिश्चंद्राचे चरित्र वाचताना त्यांना आपला नमुनादर्श सापडला होता. त्या क्षणापासून सत्यनिष्ठेने वागायचे, आपल्याला पटेल त्याच्याशी इमान राखून वागायचे, हे ब्रीद जोपासण्याचा निश्चय त्यांच्या मनात दृढ झाला होता. गांधीजींनी भगवद्गीता, बायबल, कुराण, बुद्धचरित्र वाचले होते. बायबलमधील येशूच्या गिरिप्रवचनांची त्यांच्यावर छाप होती. " सदरा मागेल त्याला कोटही दे, उजव्या गालावर थप्पड मारील त्याच्यासमोर डावा गालही कर" हा संदेश त्यांना लक्षणीय वाटला. गुजराती कवी शामलभट्ट यांचा असाच एक कटाव त्यांना प्रेरणादायी ठरला. "जो पाणी देईल त्याला चांगले जेवण दे, जो आपल्यासमोर मस्तक नमवील त्याला साष्टांग दंडवत घाल. एका पैशाची झीज सोशील त्याचे ऋण मोहरांनी फेड; प्राण वाचवेल त्याच्या दु:खाच्या निवारणाकरिता प्राण दे; एका उपकाराबद्दल दहा उपकार कर. या जगात सर्वश्रेष्ठ तोच की जो अपकारांची फेड उपकाराने करतो." (केळकर श्रीपाद, २०००, पृ. ४४)

१८८८ ते १८९१ या काळात गांधीजी इंग्लंडमध्ये बॅरिस्टर होण्यासाठी गेले तेव्हा इंग्लंड हे आधुनिक संस्कृती व सभ्यतेचे केंद्र असल्याची त्यांची धारणा होती. तत्त्वज्ञ व कवींच्या कर्मभूमीतले जीवन त्यांना तेथे जवळून अनुभवायचे होते.[६] मात्र या इंग्लंडच्या वास्तव्यात औद्योगिक क्रांतीने आलेली भौतिक समृद्धी आणि त्याच्या जोडीने आलेली यंत्र संस्कृतीतली परात्मता, हिंसा, लुबाडणूक या नकारात्मक बाबींचाही त्यांना परिचय झाला. कारखानदारी व औद्योगिक संस्कृतीतले दुष्परिणाम लक्षात आले. या वास्तव्यात त्यांचा 'व्हेजिटेरियन सोसायटी'च्या सभासदांशी, फेबियन समाजवाद्यांशी व थिऑसॉफिस्टांशी परिचय झाला. भगवद्गीता आणि बुद्ध चरित्राचे वाचन-चिंतन याच काळात झाले. १८९३ साली व्यवसायानिमित्त दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर त्यांना तिथे साम्राज्यवादी राजकारणाचे विकृत रूप पहायला मिळाले. नीग्रो व हिंदी लोकांवर या अधुनिक पाश्चात्य संस्कृतीत वाढलेल्या लोकांकडून केल्या जाणाऱ्या निघृण अत्याचारांचे दर्शन झाले. दक्षिण आफ्रिकेत असतानाच त्यांचे मित्र श्री. पोलाक ह्यांनी गांधीजींना रस्किनचे "Unto This Last' हे पुस्तक वाचायला दिले होते. त्यातून त्यांच्यात 'श्रमप्रतिष्ठेचे' मूल्य जोपासण्याची प्रेरणा जागवली गेली. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे; वकील काय किंवा न्हावी काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे, कारण पोटापाण्याचा दोघांनाही समान अधिकार आहे. साधे अंगमेहनतीचे शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन आहे, ह्या रस्किनच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्वावर कायम राहिला. त्यांनी या पुस्तकाचा 'सर्वोदय' नामक अनुवादही केला होता. टॉलस्टॉय यांच्या 'किंगडम ऑफ गॉड विदिन यू' या पुस्तकाचाही संस्कार त्यांच्या मनावर झाला होता. या पुस्तकामुळे त्यांची अहिंसेवरची निष्ठा दृढ झाली. ते स्वत:ला टॉलस्टॉयचा 'नि:सीम निष्ठावंत भक्त' म्हणवून घेत. साध्य व साधन यातला विवेक, तत्त्व व तपशील यातले तारतम्य, युद्ध व हिंसा याकडे बघण्याचा दृष्टिकोण; तसेच संयम, आत्मशुद्धी, श्रमप्रतिष्ठा, शाकाहार, उपोषण, प्रार्थना इत्यादी बाबत टॉलस्टॉय आणि गांधी यांच्या विचारांत कमालीचे साम्य आढळून येते. आफ्रिकेत टॉलस्टॉय फार्म स्थापन करून शेती करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. या टॉलस्टॉय वसाहतीतच त्यांनी आहार, निसर्गोपचार, ग्रामोद्योग, कमवा व शिका योजना, सहशिक्षण, नैतिक संस्कारयुक्त बालशिक्षण, शेती, स्वच्छता, विभिन्न धर्म-देश-जाती-भाषा यांचे सहजीवन यासंबंधीचे आपले प्रयोग केले. टॉलस्टॉय फार्म हा गांधीजींच्या दृष्टीने आत्मशुद्धीचा महान प्रयोग होता. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत वकिली केली, नाही असे नाही. सामान्यत: वकिली, व्यापार आणि राजकारण यात खोटे बोलल्यावाचून चालत नाही, असा लोकसमज आहे; परंतु गांधीजी त्यापासून दूर राहिले. जन्मभर सत्याचा वसा घेऊनच त्यांनी राजकारण केले. त्यांच्या दृष्टीने सत्य म्हणजे त्रिकालाबाधित सत्य; ज्याचा कधीही नाश होत नाही असे शाश्वत, सनातन तत्त्व. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला पटते ते सत्य. या सत्याच्या अधिष्ठानावर राजकारण करण्याचा त्यांनी संकल्प सोडला. साध्य आणि साधने ही दोन्ही शुद्ध असली पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे. 'असत्य मार्गांनी स्वराज्य मिळाले तरी ते मला नको' असे ते म्हणत. गोखल्यांनी म्हटल्याप्रमाणे गांधीजींनी राजकारणाचे आध्यात्मीकरण (spiritualised politics) केले.

१८९३ पासून गांधीजी दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत होते. आफ्रिकेतल्या वर्णलढ्याचे नेतृत्व करीत असतानाच ते महाराष्ट्रातील राजकीय पुढाऱ्यांच्या संपर्कात होते. १८९६ साली त्यांनी फिरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बॉम्बे प्रेसिडेन्सी आसोशिएशनच्या वतीने दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदी लोकांच्या हक्कांसाठी भारतीयांचा पाठिंबा मिळविण्याकरिता जाहीर सभाही घेतली होती. त्याच वर्षी गांधीजींनी पुण्यात लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले आणि डॉ. भांडारकर यांची भेट घेतली, तेव्हा ते सत्तावीस वर्षांचे होते. गोखल्यांच्या भेटीने प्रभावित होऊन गांधीजींनी तेव्हाच त्यांना आपले 'राजकीय गुरू' म्हणून स्वीकारले होते. त्यांच्या आत्मकथेत त्यांनी या भेटीची आठवण तेवढ्याच आस्थेने नोंदवली आहे. :

"गोखल्यांनी माझी कसून तपासणी केली; शाळेत प्रवेश मागायला आलेल्या अनोळखी विद्यार्थ्याची परीक्षा शिक्षक ज्या कसोशीने करील त्याच कसोशीने गोखल्यांनी तपासणी केली. कोणा कोणास मी भेटायला हवे, त्यांची भेट घेताना कोणती काळजी घ्यायला हवी, ते सांगितले. माझ्या भाषणाची टिपणे त्यांनी वाचण्यासाठी मागितली. मला त्यांनी कॉलेज हिंडवून दाखवले, आणि कधीही कोणतेही काम घेऊन तुम्ही माझ्याकडे येऊ शकता असे आश्वासन दिले." ( एम. के.गांधी, ॲन ऑटोबायोग्राफी, २री आ. अहमदाबाद, १९४०, पृ. १२९ / उद्‌धृत नंदा,१९८६, पृ. १११-११२)

१८ ऑक्टोबर १८९६ रोजी गांधीजींनी गोखल्यांना पत्र लिहून दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदी लोकांच्या वर्णविद्वेषाविरुद्धच्या लढ्याच्या प्रश्नात लक्ष घालण्यासाठी हिंदुस्थानात एखादी समिती संघटित करण्याची विनंती केली. या लढ्याला पाठिंबा मिळावा यासाठी भारतातून लोकमताचा दबाव वाढवावा, इंपिरिअल कौन्सिलमध्ये गोखल्यांनी हा प्रश्न उपस्थित करावा व ब्रिटिश सरकारवर हा प्रश्न सोडविण्यासाठी दडपण आणावे अशी गांधीजींची भूमिका होती. या कामात गोखल्यांनी गांधीजींची सर्वार्थाने पाठराखण केली. १९०१ साली राष्ट्रीय सभेच्या खुल्या अधिवेशनात दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांसंबंधीचा ठराव मंजूर करण्यासाठी गोखल्यांची गांधीजींना मदत झाली. या अधिवेशनाच्या निमित्ताने गांधीजी कलकत्त्यास जवळपास महिनाभर गोखल्यांच्या सहवासात राहिले होते. या सहवासातून त्यांच्या मनावर गोखल्यांच्या व्यक्तिमत्वाचा जो संस्कार झाला, त्याविषयी त्यांनी लिहून ठेवले आहे की, "गोखल्यांना काम करत पहाताना अतिशय आनंद वाटे, पुष्कळ शिकायलाही मिळे. एक मिनिट ते वाया घालवीत नसत. त्यांचे खाजगी जीवन व मित्रत्वाचे संबंध, सगळे सार्वजनिक हिताला समर्पित होते. .. हिंदुस्थानचे दारिद्र्य आणि परतंत्रता या गोष्टींविषयी ते सदैव चिंता वहात" (ॲटोबायोग्राफी,१९४०, पृ.१६९/ नंदा, २३३)

गोखल्यांनी सातत्याने गांधीजींची पाठराखण करून हा स्नेह वृद्धिंगत केला. गोखल्यांनी इंग्लंडमध्ये २ नोव्हेंबर १९०५ रोजी लॅबेथ रॅडिकल क्लबमध्ये 'दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांचा प्रश्न' या विषयावर भाषण करून गांधीजींच्या आफ्रिकेतील लढ्याविषयी ब्रिटिशांच्या मनात आस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. १९०९ साली गांधीजींनी बॅरिस्टर पोलक यांना

हिंदुस्थानात लोकमत जागृतीसाठी पाठविले, त्यावेळी गोखल्यांनी पोलक यांच्या भारत दौऱ्यात लक्ष घालून सर्वोतोपरी सहाय्य केले. पोलक यांनी लिहिलेल्या 'इंडियन्स इन साउथ आफ्रिका' या पुस्तिकेचे संपादन करून ती स्थानिक प्रकाशकांकडून प्रकाशित करण्याची व्यवस्था केली. 'सर्व्हंटस ऑफ इंडिया' सोसायटीच्या सभासदांच्या मदतीने पोलक यांच्या सभा देशात निरनिराळ्या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या. ९ सप्टेंबर १९०९ रोजी मुंबईस टाऊन हॉलमध्ये जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. तेथे गोखल्यांनी गांधीजींच्या लढाऊ बाण्याचा हिंदवासीयांना परिचय करून दिला व ब्रिटिश सरकारने दक्षिण आफ्रिकेत पाठविण्यासाठी मजूरांची भरती तत्काळ थांबवावी, अशा अशयाचा ठराव पारित करवून घेतला. गांधीजींच्या निशस्त्र लढ्याची महती त्यांनी एतद्देशीयांना समजावून सांगितली. तोपर्यंत 'अहिंसक सत्याग्रहा'ची संकल्पना आपल्या लोकांना माहीत नव्हती. १९०९ साली डिसेंबर महिन्यात लाहोरला राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात गोखल्यांनी गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा परिचय करून देतांना सत्य, अहिंसा, प्रेम या शाश्वत मूल्यांवर निष्ठा असणाऱ्या, मानवतावादाच्या मूल्यधारणांवर सामाजिक न्यायाचा लढा उभारणाऱ्या या नेत्याविषयी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले होते,

"It is one of the privileges of my life that I know Mr. Gandhi intimately and I can tell you that a purer, a nobler, a braver and more exalted spirit has never moved on this earth. Mr. Gandhi is one of those men who living an austerely simple life themselves and devoted to all the highest principles of love to their fellow beings and to truth and justice, touch the eyes of their weaker brethren as with magic and give a new vision. He is a man who may well be described as a man among men, a hero among heroes, a portrait among portraits, and we may well say that in him, Indian humanity, at the present time, has really reached its high-water mark." (Deogirikar, 1969)

या अधिवेशनात गोखल्यांनी आफ्रिकेतल्या वर्णलढ्यासाठी भारतीयांनी एक लाखाचा निधी संकलित करावा, असे आवाहन केले. रतनजी दादाभॉय टाटा यांनी या आवाहनाला प्रतिसाद देऊन २५००० रुपयांची देणगी दिली. १९१० साली गोखल्यांनी इंपीरिअल कौन्सिलमध्ये बांधकामावरील मजूरांच्या भरतीवर बंदी आणणारा ठराव मंजूर करवून घेतला. १९१२ साली गांधीजींच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी गोखले स्वत: आफ्रिकेत गेले.

**हिंद स्वराज्य :**

भारतातील आपल्या राजकीय चळवळीची पूर्वतयारी गांधीजींनी आफ्रिकेत असल्यापासूनच सुरू केली होती. १९०९ साली इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेला जात असताना जहाजावरच त्यांनी 'हिंद स्वराज्य' नामक पुस्तिका लिहून भविष्यकालीन राजकीय लढ्याचे तत्त्वज्ञान व कार्यपद्धती याचा एक ढाचा तयार केला होता. इंग्लंडमधल्या चार महिन्यांच्या वास्तव्यात त्यांना स्वा. सावरकर व सशस्त्र क्रांतिवादी तरुणांच्या विचारांचा परिचय झाला

होता. १ जुलै १९०९ रोजी मदनलाल धिंग्रा याने कर्झनवायलीचा वध केला होता. या पार्श्वभूमीवर आपल्या विचारांची मांडणी करण्यासाठी त्यांनी जहाल विचारांचा प्रभाव असलेल्या तरुणाचे पात्र निर्माण करून त्याच्या मनातील प्रश्नांना उत्तरे देणारा संपादक अर्थात स्वत: म. गांधी अशी योजना करून प्रश्नोत्तररूपात या 'हिंद स्वराज'ची मांडणी केली. 'राजकारणाचे संस्कृतिकरण' हे खरे तर या पुस्तिकेचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. या पुस्तिकेत त्यांनी भारत व इंग्लंडच्या राजकीय स्थितीची व राजकारणात सहभागी असलेल्या व्यक्ती व संस्थांच्या आचारधर्माची खुली समीक्षा केली आहे. इंग्लंडच्या राजकीय स्थितीवर भाष्य करताना त्यांनी कार्लाईलचा हवाला देऊन इंग्लंडचे पार्लमेंट म्हणजे नुसता 'जगाचा बडबडखाना' (A talking shop of the world) असल्याचे म्हटले होते. 'वांझोटे व वेश्या' अशा शब्दांत त्यांनी इंग्लंडच्या पार्लमेंटचे वर्णन केले होते. पार्लमेंटमध्ये सतत आरडाओरड करणारे किंवा बसल्या बसल्या डुलक्या काढणारे सभासद दांभिक व स्वार्थी असून प्रत्येक जण आपल्या पोळीवर तूप ओढून घेण्यात मग्न असतात, अशी टीका त्यांनी केली होती. पार्लमेंटच्या सभासदांचेच नाही, तर त्यांच्या पंतप्रधानाचेही लक्ष आपल्या पक्षाची जीत कशी होईल एवढ्यावरच असते, अशी या पार्लमेंटची स्थिती होती. त्यामुळे इंग्लंडचे पार्लमेंट म्हणजे लोकांचे एक खेळणे झाले असून हे खेळणे लोकांना फार खर्चात टाकते' अशी टीका गांधीजींनी केली होती. (गांधी, १९९८, पृ. १७-१८)

'हिंद स्वराज' पुस्तिकेत भारताच्या तत्कालीन राजकीय स्थितीगतीचे निरीक्षणही त्यांनी नोंदविले होते. इंग्रजी राजवटीत पेंढाऱ्यांचा उपद्रव संपला, रेल्वेमुळे भारत एकसंध झाला, दवाखाने निघाल्याने रोगराईवर मात करता आली, न्यायालये स्थापन झाल्याने अन्यायाच्या परिमार्जनासाठी दाद मागण्याची सोय झाली, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले, औद्योगिक कारखान्यांमुळे मजुरांना काम मिळाले, यामुळे सुखावलेला वर्ग इंग्रजी सत्तेला ईश्वरी वरदान समजत होता. मात्र गांधीजींनी या सुखद भ्रमातून भारतवासीयांना जागे केले. एतद्देशीयांना संतुष्ट करण्यामागचा इंग्रजांचा व्यापारी कावा गांधीजींनी या पुस्तिकेतून उघड केला. रेल्वे येण्याआधी तीर्थक्षेत्रे आणि मठांच्या माध्यमातून देश एकसंध होताच; रेल्वेमुळे इंग्रजी राजवटीतल्या व्यापाराची तेवढी सोय झाली. औद्योगिक कारखानदारीमुळे हिंदुस्थानातले उद्योगधंदे बुडाले. ब्रिटिशांची न्यायालये स्थापन झाल्यापासून समाजात अस्तित्वात असलेली लोकन्यायालयाची व्यवस्था बाद झाली व स्वत:च्या अधिकारात आपण न्याय करत होतो याचेच समाजाला विस्मरण झाले. ब्रिटिश न्यायालयात वकील वर्ग दिवसेंदिवस खटला चालवितात व लोकांच्या पैशातून भरपूर कमाई करतात; किंबहुना लोकांना अंकित करण्याचे हुकमी साधन म्हणून ब्रिटिशांनी आपल्या न्यायव्यवस्थेची बांधणी केली आहे, याकडे गांधीजी लक्ष वेधतात. डॉक्टरी व्यवसाय व वैद्यकीय संशोधन लोकांना धर्मभ्रष्ट करीत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. मातृभाषेऐवजी इंग्रजी माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा उपयोग राज्यकर्ते आपल्या स्वार्थासाठी करवून घेत आहेत. इंग्रजी शिक्षणपद्धतीतून देशोद्धाराचे व स्वातंत्र्यरक्षणाचे शिक्षण मिळत नाही, चारित्र्यसंपन्न बनविणारे नैतिक शिक्षण किंवा स्वावलंबी बनविणारे कौशल्यशिक्षण

देण्यावर ब्रिटिशांचा भर नाही. त्यामुळे तथाकथित सुधारणा व प्रगतीचे मायाजाल पसरून इंग्रजांनी आपल्याला कसे संतुष्ट केले व स्वखुषीने आपल्याला त्यांचे गुलाम कसे बनविले याची साद्यंत चर्चा 'हिंद स्वराज्य' पुस्तिकेतून गांधीजींनी केली आहे. हा इंग्रजी बनाव लक्षात घेऊन ब्रिटिशांशी असहकार करीत राहण्याचा मार्ग कसा उपयुक्त ठरेल याची दिशा दाखविण्यावर या पुस्तिकेतल्या संवादांचा भर आहे.

काँग्रेसमुळे भारतात एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली असून काँग्रेसनेच भारतीयांना स्वराज्याची गोडी लावली असल्याचा निष्कर्षही त्यांनी या पुस्तिकेत नोंदविला आहे. काँग्रेसची वाटचाल कॅनडाप्रमाणे स्वराज्य मिळविण्याची आकांक्षा ठेवून सुरू असल्याचे आपले आकलनही त्यांनी नोंदविले आहे. दादाभाई नौरोजी, प्रो. गोखले, न्या. बद्रुद्दिन यांच्याप्रमाणेच ह्यूम, वेडरबर्न या इंग्रजांनी काँग्रेससाठी दिलेल्या योगदानाचा गांधीजींनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. काँग्रेसच्या पुढाऱ्यांमध्ये पडलेले जहाल आणि मवाळ हे दोन तट व त्यांच्यातला कडवटपणा, परस्परांना टोमणे मारण्याची रीत ही लक्षणे देशकारणाच्या दृष्टीने चांगली नसल्याचा परखड अभिप्रायही त्यांनी या पुस्तिकेत नोंदवला आहे. बंगालच्या फाळणीमुळे भारतीय लोकमत जागृत झाले असून इंग्रजांच्या जहाजाला भेग पडली आहे व ही फाळणी रद्द करण्याची जनतेकडून होत असणारी मागणी ही एका अर्थाने स्वराज्याचीच मागणी असल्याची भावना गांधीजींनी या पुस्तिकेतून व्यक्त केली आहे.

या पुस्तिकेतून गांधीजींनी आपल्या राजकीय तत्त्वज्ञानातील स्वराज्य, सत्याग्रह, अहिंसा या संकल्पनांची मांडणी केली होती. 'स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य' किंवा 'आपल्यावर आपले राज्य चालविणे म्हणजे स्वराज्य' अशी स्वराज्याची सुटसुटीत व्याख्या त्यांनी दिली आहे. भारतातल्या प्रत्येकाने ते प्रयत्नपूर्वक स्वत:साठी मिळवले पाहिजे असे आवाहनही या पुस्तिकेतून त्यांनी केले. इंग्रज बाडबिस्तरा बांधून निघून गेले तर हिंदुस्थान अनाथ होईल, असे हिंदुस्थानवासीयांनी समजण्याचे काही कारण नाही; प्रसंगी आपण स्वराज्यातली अंदाधुंदी सहन करू, पण परराज्याची सुव्यवस्था नको, असेही त्यांनी स्पष्ट करून सांगितले आहे. स्वराज्य आले तर जहाल आणि मवाळ दोन्ही एकत्र येतील असा आशावादही त्यांनी या पुस्तिकेतून व्यक्त केला होता.

इंग्रजांची गुलामगिरी ही केवळ राजकीय नसून सांस्कृतिक गुलामगिरी असल्याचे त्यांचे मत होते. आपल्याला इंग्रजी सभ्यतेची (सिव्हिलायझेशन) भुरळ पडली आहे. पण ही पाश्चिमात्य सभ्यता केवळ भौतिक सुखवादाची असून तिला नीतीधर्माचे अधिष्ठान नसल्याचे मत त्यांनी नोंदविले आहे. रेल्वे, कारखाने, मोठी शहरे, पोशाखी सजावट म्हणजे प्रगती किंवा सुधारणा नव्हे. सभ्यतेची ही तथाकथित लक्षणे अनीती दृढ करणारी आहेत. पाश्चात्य सभ्यतेचे मूर्त रूप असलेली शहरे सोनेरी टोळ्या आणि वेश्यांच्या वस्त्या उठवणारी, गरिबांना लुबाडणारी केंद्रे झाली आहेत; त्यापेक्षा पारंपरिक खेड्यातले जीवन निर्मळ आणि शुद्ध आहे. म्हणून या सुधारणा नसून कुधारणा असल्याचे मत त्यांनी मांडले आहे. यंत्राचा तडाखा बसल्यानेच हिंदुस्थान जमिनदोस्त झाले आहे; म्हणून यंत्रांकडे आपण 'वर'म्हणून न पाहता 'शाप' म्हणून पाहावे,

असेही त्यांनी हिंदवासीयांना उद्देशून लिहिले आहे. गांधीजींच्या मते पश्चिमेकडील सभ्यता ही निरिश्वरवादी असून हिंदुस्थानची संस्कृती ईश्वरवादी आहे. दोन संस्कृतीतील हा भेद लक्षात घेऊन मूल जसे आपल्या आईला बिलगून राहते, तसे हिंदुस्थानी जनतेने आपल्या संस्कृतीला चिकटून राहावे असा सल्ला त्यांनी या पुस्तिकेच्या माध्यमातून दिला आहे. आपल्या सांस्कृतिक अस्मितेच्या जतन व संवर्धनासाठी नीतीच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे, असा त्यांचा अभिप्राय आहे. केवळ लेखन, वाचन व गणित म्हणजे प्राथमिक शिक्षण नाही; अनासक्तिपूर्वक सयुक्तिक विचार करायला लावणारे, विवेकवादी, निसर्गाशी अनुसंधान बांधणारे प्राथमिक शिक्षण आपल्याला हवे आहे. इंग्रजी शिक्षणाने फक्त दंभ द्वेष, जुलूम वाढविले, करोडो माणसांना गुलामीत टाकले. ही परकी भाषा शिकण्यात आयुष्यातला महत्त्वाचा काळ घालवल्यामुळे आपली उपक्रमशीलता संपली आहे; म्हणून हिंदवासीयांनी देशी भाषांतून शिक्षण घ्यावे, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

हिंदुस्थानने स्वातंत्र्य कसे मिळवावे याचीही चर्चा या पुस्तिकेतून करण्यात आली आहे. इंग्रजांनी तलवारीच्या बळावर हिंदुस्थानवर ताबा मिळवला नाही; आपल्या दुबळेपणामुळे, आपापसातील दुहीमुळे, आणि स्वार्थी वृत्तीमुळे आपण आपल्या हातांनी इंग्रजांच्या हाती राज्य दिले. इंग्रजांची मानसिक गुलामगिरी हा भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीतला सर्वात मोठा अडसर असल्याचे गांधीजींना स्पष्टपणे दिसत होते. इंग्रजांना बाहेर घालवायचे तर शस्त्रबळाचा उपयोग नाही; स्वराज्यनिष्ठेची गरज आहे, हे त्यांना भारतीयांच्या मनावर बिंबवायचे होते. आपली दुर्बलता दूर सारून आत्मबल वाढविण्याकडे आपण प्रथम लक्ष दिले पाहिजे असे गांधीजींना या पुस्तिकेतून सुचवायचे आहे. इंग्रजांना भारतातून घालवून देण्यापेक्षाही स्वराज्याला पात्र बनविण्यासाठी भारतवासीयांची मानसिक धारणा तयार करण्याला अग्रक्रम दिला पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

### 'सत्याग्रहा'ची संकल्पना :

सत्याग्रहाच्या मार्गाने हिंदुस्थानने स्वातंत्र्य प्राप्त करावे, अशी गांधीजींची भूमिका या पुस्तिकेतून सुस्पष्टपणे पुढे आली आहे. सत्याग्रह म्हणजे 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'; युद्धबळाऐवजी आत्मबळाने प्रतिकार करण्याची पद्धती. जबरदस्तीने दुसऱ्याला नमवणे सत्याग्रह संकल्पनेत बसत नाही. कायदा आपल्याला मान्य नसला तर आपण कायदा करणाऱ्यांचे डोळे फोडत नाहीत; तो रद्द करण्यासाठी उपवास करून, स्वत:च्या बलिदानातून कायदा बदलण्यास प्रेरित करतो, त्याला सत्याग्रह म्हणतात. बहुसंख्य माणसांनी केलेला कायदा हा अल्पसंख्यांकांना बंधनकारक असतो ही समजूत म्हणजे अंधश्रद्धा असल्याचेही गांधीजी स्पष्ट करतात. सत्याग्रह ही दुधारी तलवार असून ज्याच्यावर ती वापरली तो आणि ती वापरणारा स्वत:ही लाभाचा धनी बनतो. अर्थात सत्याग्रहासाठी हिंमत आणि शौर्य लागते. ते आत्मबळाने प्राप्त होत असते. (गांधी, १९९८, पृ. ६०-१०४) ) सत्याग्रह हा माझा कल्पद्रुम आहे, असे ते म्हणत. असहकार आणि सविनय कायदेभंग या एकाच सत्याग्रहवृक्षाच्या शाखा आहेत, असे त्यांनी १९२४ च्या बेळगाव काँग्रेसच्या अधिवेशात म्हटले होते. स्वराज्याप्रमाणे सत्याग्रह हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे,

तो आपण ओळखला पाहिजे, हे सांगताना त्यांनी सत्याग्रहाची व्यापक संकल्पना विशद केली होती. "सत्याग्रह म्हणजे सत्याचा शोध आणि सत्य हाच ईश्वर. त्या सत्याचा मला सक्षात्कार होतो, तो अहिंसेच्या प्रकाशात. स्वराज्य हे त्या सत्याचे एक अंग होय. .. सत्याग्रहात हिंसा किंवा द्वेष वर्ज्य आहे. म्हणून मी इंग्रजांचा द्वेष करू शकत नाही- करणार नाही. पण त्याबरोबच मी त्यांचे जू वाहणार नाही. भारतामध्ये ब्रिटिश संस्था व ब्रिटिश पद्धती स्थापन करण्याचा जो अपवित्र प्रयत्न चालू आहे, त्याच्याशी मी प्राणपणाने झुंजले पाहिजे. पण ही झुंझ अहिंसात्मक असेल." (शिखरे दा. न. पृ. २८-२९)

सत्याग्रहाचे प्रकार : सत्याग्रहाचे ३ प्रकार गांधीजींना अभिप्रेत होते :

१. **विधायक :** विधायक कार्य हे सत्याग्रहाचे स्वरूप. प्रेमाला स्वार्थरहित सेवा आणि त्याग यांचे स्वरूप प्राप्त होते.

२. **आत्मशुद्धी :** हरताळ, उपवास, प्रार्थना आणि अशाच दुसऱ्या त्यागपूर्ण स्वरूपांचा परिणाम आत्मशुद्धीत होतो. अन्यायाशी आपण होऊन सहकार करण्याचे बंद करणे ही देखील एक आत्मशुद्धीच आहे.

३. **आक्रमक आविष्कार :** ज्या वेळी सत्याग्रही बुद्धिपुरस्सर एखादा कायदा मोडण्यासाठी प्रत्यक्ष कृत्याने अन्यायावर हल्ला चढविण्यास सुरुवात करतो त्या वेळी त्याला सत्याग्रहाचे आक्रमक स्वरूप असे म्हणतात. त्या योगाने तो दडपशाही व क्लेश ओढवून घेतो. येवढेच नाही तर अन्याय नाहीसा करण्याच्या प्रयत्नात तो मरण्यास देखील तयार असतो. (रंगनाथ दिवाकर, १९४५, पृ. ७०)

सत्याग्रहाचे इतरही प्रकार गांधीजींनी सुचविले होते :

१. हरताळ : सामान्यत: २४ तासपर्यंत सारे व्यवहार बंद ठेवणे किंवा संप करणे.

२. उपवास : आत्मशुद्धीस्तव २४ तास आत्मनिरीक्षण आणि चिंतन यात घालवणे.

३. प्रार्थना : आत्मशुद्धी आणि बलिदान यासाठी उच्च आध्यात्मिक शक्तींचा केलेला धावा.

४. प्रतिज्ञा : विशिष्ट गोष्ट करण्यासाठी ईश्वर किंवा सत्य यास साक्ष ठेवून केलेली गंभीर घोषणा.

५. असहकार : अन्यायाशी आपण होऊन सहकार न करणे. कोठलाही शारीरिक
नैतिक पाठिंबा न देणे. अन्यायपूर्ण कृत्यात सरकारला मदत न करणे.

६. करबंदी : असहकारातली शेवटची पायरी. सरकारी वसूल भरण्यास नकार.

७. निरोधन : एखादी गोष्ट करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल केलेली शांततामय व
सविनय विनंती. उदा. दारूगुत्त्यावरील निरोधन.

८. सविनय कायदेभंग : एखाद्या विशिष्ट कायद्याची उघड व अहिंसक अवज्ञा.

९. मोर्चा : आक्रमक सविनय प्रतिकाराचा प्रकार.

१०. हिजरत : स्वखुषीने सर्व हितसंबंधांचा त्याग करून सरकारी हद्दीतून निघून जाणे.

११. प्राणांतिक उपास : मृत्यू येईपर्यंत स्वखुषीने अन्न वर्ज्य करणे. जबरदस्तीने दुसऱ्याची मते बदलण्यासाठी किंवा आपली स्वत:ची मते दुसऱ्यावर लादण्यासाठी त्याचा कधीही उपयोग करता कामा नये. (रंगनाथ दिवाकर, १९४५, पृ. ७१-७२)

सत्याग्रहाच्या बाबतीत गांधीजींचे जर कोणते महत्त्वाचे कार्य असेल तर ते त्यांचे संघटन... सत्याग्रह संघटित करता येतो. शिस्तबद्ध आणि विशुद्ध अंत:करणाच्या कार्यकर्त्यांचे दल निर्माण करणे ही सत्याग्रहाची पहिली पायरी म्हटली तरी चालेल. .. जनतेत विधायक कार्य करणे ही सत्याग्रहाची सर्वोत्तम तयारी होय. गांधीजी म्हणतात, "अखंडपणे चालविलेल्या विधायक कार्यक्रमांतून संपादन केलेला विश्वास आणीबाणीच्या प्रसंगी अत्यंत उपयुक्त ठरतो." (यंग इंडिया ९-१-३०/ रंगनाथ दिवाकर, १९४५, पृ. ८४, ८७)

विनोबा भावे यांनी गांधीजींच्या 'सत्याग्रह' संकल्पनेचे विविध पैलू स्पष्ट केले आहेत. सत्य आणि आग्रह हे दोन शब्द एकत्र झाल्याने सत्य हे पवित्र आणि आग्रह दूषित अशी समजूत होऊन अर्थाचा जो गुंता होत होता, तो विनोबांनी सोडवला आहे. विनोबांच्या मते सत्याग्रह हा एक मध्यमपदलोपी समास आहे. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी अहिंसापूर्वक आग्रह; किंबहुना आपले जीवनच सत्याग्रही निष्ठेवर उभारणे हा सत्याग्रहाचा अर्थ. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी प्रेमद्वारा आग्रह. सत्याग्रहात प्रतिपक्षाबद्दल प्रेम असले पाहिजे. सत्य आणि प्रेम एकत्र केले तर समस्या सुटेल, समाज पुढे जाईल. सत्याग्रहात मुख्य गोष्ट विचारपरिवर्तनाची असते. समजावून सांगण्याची क्रिया हेच सत्याग्रहाचे सर्वोत्तम, शुद्ध स्वरूप आहे. हा जो ज्ञान-शक्तीवर विश्वास आहे, विचार-शक्तीवर विश्वास आहे त्याचे नाव सत्याग्रह आहे." थोडक्यात सांगायचे तर सम्यक आचरणाने, सम्यक वाणीने लोकांच्या हृदयाला आणि बुद्धीला समजावणे म्हणजे सत्याग्रह. . [७] गांधीजींनी सत्याग्रहात उपवासाचाही आसरा घेतला होता. आपल्या हृदयातील व्याकुळता प्रकट करण्यासाठी त्यांनी उपवासाचे प्रयोग केले होते. उपवास जेव्हा प्रेम, करुणा, समत्व यांची खूण म्हणून असेल तेव्हा त्याचा परिणाम होईल, यावर गांधीजींचा विश्वास होता. (बापट भ. ग. २००२, पृ. २२२-२२५) परिवर्तनाच्या लढाईतले आध्यात्मिक शस्त्र/साधन म्हणून गांधीजी उपवासाच्या संकल्पनेचा विचार करीत होते.

**अहिंसा :**

गांधीजींनी सत्याप्रमाणेच 'अहिंसा' हे तत्त्व प्रमाण मानले. सर्व प्राणिमात्रांमध्ये 'आत्मा' हे शाश्वत सत्य असल्याने, त्यांतील 'आत्म्या'ला म्हणजेच 'सत्या'ला दुखविणे त्यांना मान्य नव्हते. सत्य आणि अहिंसा ही आपल्या राजकारणाची पायाभूत मूल्ये आहेत, अशी त्यांची धारणा होती. गांधीजी हरिजनमध्ये (७-१-१९३९) लिहितात, "अहिंसा हा केवळ वैयक्तिक सद्गुण नाही. तर इतर गुणांप्रमाणे जोपासना करण्यासारखा तो एक सार्वजनिक गुणही आहे. परस्परांशी वागताना वस्तुत: याच गुणांमुळे समाजाचे नियमन होत असते. माझी अपेक्षा इतकीच आहे की, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणावर तो लागू करण्यात यावा." (रंगराव दिवाकर, १९४५, पृ. ५८)इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग सशस्त्र क्रांतीच्या नव्हे तर सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून साध्य होईल असा त्यांचा विश्वास होता. यापूर्वीही गांधीजींनी अहिंसा, प्रेम या तत्त्वनिष्ठेतून १८९९ साली बोअर युद्धात स्वयंसेवकांचे शुश्रुषा पथक आणि १९०६ साली झुलूंच्या बंडाच्या वेळी प्रेत वाहकाचे पथक उभे केले होते. दक्षिण आफ्रिकेतील या

मानवतावादी कार्याबद्दल लॉर्ड हार्डिंग्ज यांनी गांधीजींचा 'कैसर -इ- हिंद' पदक देऊन गौरव केला होता. १९१४ साली इंग्लंड व जर्मनीत महायुद्ध पेटले तेव्हा त्यांनी लंडन येथे स्वयंसेवकांचे सुश्रुषा पथक उभे केले होते. पहिल्या महायुद्धाच्या तणावपूर्ण परिस्थितीत जेरीला आलेल्या इंग्लंडला हिंदवासीयांकडून सैन्यभरतीत व अन्य आर्थिक सहकार्याची गरज भासू लागली होती. १९१८ साली दिल्ली येथे भरलेल्या युद्ध परिषदेत, लॉर्ड चेम्सफर्ड यांनी जेव्हा सैनिकांच्या भरतीसाठी खास आवाहन केले, तेव्हा गांधीजींनी स्वत:ची प्रकृती धोक्यात घालून खेडा जिल्ह्यात सैनिक दल उभे करण्यासाठी खटपट केली होती. (शिखरे दा. न. पृ. १९)

राजकारणाचे संस्कृतीकरण करण्याची कार्यपद्धती ही गांधीजींची महत्त्वाची देणगी आहे. दक्षिण आफ्रिकेतून परत आल्यावर याच मार्गाने इंग्रजांचे हृदयपरिवर्तन करून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अहिंसक लढा देण्याची त्यांनी आपली मानसिक तयारी केली होती. गांधीजींनी या चिंतनातून राज्यक्रांतीसाठी 'सत्याग्रहा'चे एक नवे अहिंसक शस्त्र जगाला दिले. सत्याग्रहाची असहकार, सविनय कायदेभंग, करबंदी, उपास अशी अनेक परिमाणे होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी या सर्वांचा वापर केला.असहकारातून संघर्ष उत्पन्न झाला तरी हिंसेचा गुणाकार थांबतो, हिंसा निष्प्रभ बनते यावर त्यांचा विश्वास होता. सत्याग्रहाच्या चळवळीला जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, मद्यपानबंदी, खादी, ग्रामोद्योग, साक्षरताप्रसार, आदिवासींची सेवा इ. विधायक कार्यक्रमांची जोड दिल्याने गांधीजींचे आंदोलन केवळ ब्रिटिश सत्तेला घालवून देण्यापुरते मर्यादित राहिले नाही; देशाच्या समग्र मन्वंतराचा नकाशा घेऊन जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करीत ह्या आंदोलनाची वाटचाल झाली.

**राजकीय पर्वाचा प्रारंभ :**

१९१५ साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या मानवी हक्कांच्या लढ्याचे यशस्वी नेतृत्व करून गांधीजी भारतात परत आले. आफ्रिकेतून भारतात परत आल्यावर गांधीजींनी भारतातील राजकीय जीवनाची सुरुवात महाराष्ट्रातूनच केली. आपले राजकीय गुरू गोपाळकृष्ण गोखले यांच्या सूचनेनुसार वर्षभर भारतभ्रमण करून त्यांनी देशातील प्रश्नांचा आणि लोकमानसाचा अभ्यास केला. या दौऱ्यात त्यांनी कुठलीच राजकीय भूमिका न घेता राजकारणेतर विषयांवर लोकांशी संवाद साधला व राजकीय विषयावर मौन पाळले. शांतिनिकेतनात शिक्षक-विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. या भारत दौऱ्यात गांधीजींना हिंदू-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, सर्वमान्य राष्ट्रभाषा या प्रश्नांवर काम करायला हवे, याचा अंदाज आला. पुण्याला 'सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी'च्या छत्राखाली हे काम करण्याची त्यांची इच्छा होती; पण ते शक्य नसल्याचे कळल्यावर त्यांनी गोखल्यांवरची निष्ठा कायम ठेवून अहमदाबादला साबरमती आश्रम स्थापन करून आपल्या कामाला प्रारंभ केला. १९१५ नंतर काँग्रेसच्या अधिवेशनांनाही ते हजर राहू लागले. मात्र ॲनी बेझंट आणि लो. टिळक यांच्या होमरुल चळवळीबाबत त्यांनी ताटस्थ्याची भूमिका स्वीकारली.

भारतभ्रमणाच्या चिंतनयात्रेत त्यांनी इंग्रजांच्या वासाहतिक सत्तेविषयीही चिंतन केले. त्यावरून त्यांनी असे निदान केले की, इंग्लंड हे जगातील एक प्रबळ राष्ट्र असून त्याची सत्ता

निरनिराळ्या प्रदेशात इतकी पसरली आहे की, 'इंग्रजी साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही' अशी जनमानसात धारणा तयार झाली आहे. शेकडो वर्षे स्वातंत्र्याचा उपभोग घेणारे इंग्रज शस्त्रांचा वापर करण्यात जितके तरबेज होते, तेवढे युद्धकौशल्य भारतीय लोकांकडे नव्हते. इंग्रजांचे सैन्यदल, आरमार, आधुनिक शस्त्रास्त्रे इतकी सज्ज होती की नि:शस्त्र भारताने बाहेरून शस्त्रास्त्रे मिळवून इंग्रजांशी लढायचे ठरवले तरी भारताला इंग्रजांना पराभूत करणे शक्य होणार नाही; तसेच एतद्देशियांच्या अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळांनाही ब्रिटिश शासन किंमत देत नव्हते. ब्रिटिशांच्या या वसाहतवादी राजनीतीमुळे आर्थिक दृष्ट्या भारत आतून पोखरला गेला होता. जातिधर्माच्या बंदिस्त चौकटी व रूढी आणि अंधश्रद्धांच्या पगड्यामुळे सामाजिकदृष्ट्याही भारताची स्थिती चांगली नव्हती. अशा परिस्थितीतून मार्ग कसा काढावा हा पेच गांधीजींना सोडवायचा होता.

**बनारसचे भाषण :**

६ फेब्रुवारी १९१६ रोजी पं. मदनमोहन मालवीय यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी गांधीजींनी पहिले जाहीर भाषण केले. ॲनी बेझंट सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या. "भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रज लोकांनी येथून निघून गेले पाहिजे, त्यांना हाकलले पाहिजे. त्यांना 'चले जाव' म्हणण्यास मी कचरणार नाही. त्यासाठी मरण पत्करण्यासही मी तयार होईन" असा आपला पुढच्या राजकीय वाटचालीचा संकल्प त्यांनी या सभेत जाहीरपणे बोलून दाखविला. (शिखरे दा. ना. २०००, पृ. ८) या उद्घाटन समारंभास देशभरातले श्रीमंत संस्थानिक हजर होते. गांधीजींनी या सभेत वसाहतवादी राजनीती आणि हिंदुस्थानची अंतर्गत स्थिती यावर परखड भाष्य केले. भारतभ्रमणातील अनुभवांवर आधारित आपल्या निरीक्षणांची मांडणी केली. गांधीजींच्या भारतीय राजकारणाची नांदी म्हणून या भाषणाचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. त्याचा गोषवारा असा:

१. इंग्रजांच्या वसाहतवादी शिक्षणनीतीमुळे देश जोडला जाण्याची प्रक्रिया खुंटली. सुशिक्षित माणसांचा आपल्या देशबांधवांशी असलेला संवाद संपला. स्वदेशात राहून ते आपल्या लोकांशी परक्याप्रमाणे वागू लागले. गरीब लोकांबरोबर काम करायला सुशिक्षित वर्ग पुढे आला नाही. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीची प्रक्रियाच खुंटली. जर आपल्याला इंग्रजीऐवजी देशी भाषांतून शिक्षण मिळते तर आज आपला देश स्वतंत्र झाला असता.

२. आपला राष्ट्रीय अभिमान आणि प्रत्यक्ष वास्तव यात तफावत आहे. आध्यात्मामुळे आपला जगात लौकिक आहे आणि त्या बाबतीत या राष्ट्राशी कोणी बरोबरी करू शकणार नाही, हे खरे असले तरी प्रत्यक्षात आपली मंदिरे प्रशस्तही नसतात आणि स्वच्छही नसतात. इंग्रज गेल्याने आपोआप आपली मंदिरे पवित्रता, स्वच्छता व शांतता यांचे आगर बनणार नाहीत. स्वराज्याला आपण पात्र व्हायचे असेल तर अंतर्मुख होऊन आपण आपला आचारधर्म बदलला पाहिजे. (यासंदर्भात त्यांनी काशी विश्वनाथ मंदिर परिसरातील अस्वच्छतेचा अनुभव कथन केला होता, तो मुळातून वाचून पहावा. पहा टिप [८] )

३. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांनी स्वराज्याविषयी केलेल्या ठरावांपेक्षा, किंवा

क्रांतिकारकांच्या बंडापेक्षा येथील जनता आणि विद्यार्थिवर्ग काय ठरवतो हे महत्त्वाचे आहे. अराजकवाद हा स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग नसून परस्परांवरचे प्रेम आणि विश्वास यावर साम्राज्याची उभारणी केली पाहिजे.

अहिंसक मूल्यांची कास धरून सत्याग्रहाच्या मार्गाने स्वराज्यप्राप्तीसाठी संघर्ष करण्याच्या गांधीजींच्या भविष्यातील वाटचालीची ही नांदी होती.

### चंपारण्यचा सत्याग्रह :

बनारसच्या ह्या भाषणानंतर १९१७ साली बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या जाणण्याकरिता गांधीजी गेले होते. खेडुतांच्या तक्रारी, त्यांच्यावर मळेवाल्यांकडून होणारे अन्याय व मळेवाल्यांवर केले जाणारे आरोप यांची सत्यता जाणून घेण्यासाठी ते चंपारण्यला गेले होते. मात्र जिल्हा मॅजिस्ट्रेटने त्यांच्यावर प्रवेश बंदीचा हुकूम बजावला. गांधीजींनी तो मानण्यास ठामपणे नकार दिला. त्यानंतर गुजरातेत खेडा जिल्ह्यात दुष्काळग्रस्तांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी ते गेले. दुष्काळामुळे शेतात पीक आले नाही, त्यामुळे शेतसारा भरणे ऐपतीत बसत नव्हते. वास्तविक रेव्हेन्यू कोडमधील आणेवारीनुसार चार आण्यांपेक्षा कमी पीक आले असेल तर सरकारने सारा तहकूब करायला हवा होता. परंतु प्रत्यक्षात काहीच कारवाई होत नव्हती. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी 'आपल्या हक्कांसाठी झगडत नाहीत ती माणसे केवळ गुलाम होत' अशा शब्दांत शेतकऱ्यांना आपल्यातला पुरुषार्थ जागविण्याचे आवाहन केले व सारा तहकुबीच्या मागणीसाठी सामुहिक सत्याग्रहाच्या मैदानात उतरविले. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला, त्यांच्यातला आत्मविश्वास जागवला गेला आणि सामुदायिक प्रयत्नांनी आपण आपले हक्क मिळवू शकतो याचे भान आले. या अनुभवाच्या बाबतीत गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, "आपले दास्यविमोचन आपल्या स्वत:वरच आणि कष्ट व त्याग सहन करण्याच्या आपल्या शक्तीवरच अवलंबून आहे, ही गोष्ट जनमतावर पक्की कोरली गेली." त्यानंतर १९१८ साली अहमदाबादच्या कापडगिरणी कामगारांच्या प्रश्नात लक्ष घालून गांधीजींनी त्यांच्या लढ्याचे नेतृत्व केले. मजुरांचे मनोधैर्य टिकविण्यासाठी त्यांनी उपवास सुरू केला. गांधीजींच्या हिंदुस्थानातील चळवळीतला हा पहिला उपवास होता. या चंपारण्य सत्याग्रहात शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे, पुंडलिकजी कातगडे, विष्णू सीताराम रणदिवे इत्यादी मराठी भाषकांचा सक्रिय सहभाग होता; महाराष्ट्रात गांधीजींना मिळालेल्या अनुयायांची ही पहिली पिढी होती.

### रौलट सत्याग्रह :

१९१४ साली सुरू झालेले पहिले महायुद्ध १९१९ साली संपले. युद्ध संपल्यावर ब्रिटिशांकडून हिंदुस्थानला वसाहतीच्या स्वराज्याचे (डोमिनियन स्टेटस्) अधिकार दिले जातील अशी अपेक्षा होती. मात्र हे अधिकार देण्याऐवजी हिंदुस्थानातील राजद्रोहाच्या चळवळी निपटून काढण्यासाठी इंग्रज शासनाने न्या. रौलट यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून प्रतिबंधात्मक कायदे करण्याची मोहीम हाती घेतली. मार्च १९१९ मध्ये हिंदुस्थानातील केंद्रीय

मंत्रिमंडळाने लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी विधेयके संमत केली. या विधेयकांचा निषेध करून बॅ. जिना, बी. डी. शुक्ल यांनी कायदेमंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. 'अनार्किकल ॲण्ड रिव्होलेशनरी क्राईम्स ॲक्ट' (रौलट ॲक्ट) या कायद्याने कुणालाही केवळ आरोप ठेवून कुठल्याही चौकशीविना तुरुंगात टाकता येत होते. त्यांच्यावरील खटले खास न्यायालयात 'समरी ट्रायल' पद्धतीने चालवण्याची योजना आखण्यात आली, तसेच त्याविरुद्ध अपील करण्याची परवानगीही नाकारण्यात आली. म. गांधींना हा मोठा धक्का होता. यावेळी लो. टिळक व आणखी काही राष्ट्रीय पुढारी चिरोल खटल्याच्या संदर्भात इंग्लंडला गेले होते. अशा स्थितीत या विधेयकांचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वीच देशवासीयांकडून कसून विरोध करण्याचे गांधीजींनी ठरविले. दक्षिण आफ्रिकेतल्या लढ्याला अनुसरून सत्याग्रह व कायदेभंग करण्याची व्यूहनीती आखण्यात आली. सत्याग्रह समिती स्थापन करण्यात आली. या विधेयकांचे कायद्यात रूपांतर केले तर ते कायदे आम्ही पाळणार नाही, अशा आशयाची प्रतिज्ञापत्रे भरून घेतली जाऊ लागली. ६ एप्रिल १९१९ रोजी रौलटविरोधी देशव्यापी हरताळ, उपास आणि सामुदायिक प्रार्थनांचे आयोजन करून 'राष्ट्रीय सुतकदिन' पाळून सरकारचा निषेध करण्याचा कार्यक्रम नक्की करण्यात आला. जप्त केलेल्या राजद्रोही वाङ्मयाची उघड विक्री करणे हे या सत्याग्रहाचे स्वरूप होते. देशभरातून या सत्याग्रहाला उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. गांधीजींच्या 'हिंद स्वराज्य' व 'सर्वोदय' या बंदी घातलेल्या पुस्तकांची जाहीर विक्री करून कायदेभंग करण्यात आला. लो. टिळक यांनी लंडनहून 'केसरी'चे संपादक कृ. प्र. खाडिलकर, 'मराठा'चे संपादक बाबूराव गोखले आणि होमरूल लीगच्या मुंबई शाखेचे सेक्रेटरी डॉ. दिनकर धोंडो साठ्ये यांना गांधीजींच्या या रौलटविरोधी सत्याग्रहास पूर्ण पाठिंबा द्यावा, असा संदेश पाठविला. (पर्वते, १९८५,पृ. १०)

हा रौलटविरोधातला सत्याग्रह सुरू झाल्यावर मुंबई व अहमदाबाद शहरात गांधीजींच्या अटकेची अफवा पसरली. मुंबई, अहमदाबाद, नडियाद, दिल्ली व पंजाबमध्ये दंगली उसळल्या. पाठोपाठ १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरला जालियनवालाबाग हत्याकांड झाले. जनरल डायरने घडवून आणलेल्या या हत्याकांडात सरकारी आकड्यानुसार ३७९ लोक मारले गेले व १२०० जखमी झाले; प्रत्यक्षात मृतांचा आकडा कितीतरी अधिक होता. 'बॉम्बे क्रॉनिकल'ने या हत्याकांडाचे वृत्त छापले म्हणून संपादक बेंजामिन हॉर्निमन यांना हिंदुस्थानातून हद्दपार करण्यात आले. दिल्ली, पंजाबमधील दंगलींची माहिती घ्यायला निघालेल्या गांधींवर त्यांच्या पंजाबप्रवेशामुळे शांतताभंग होईल असे कारण देऊन मनाईहुकूम बजावण्यात आला. गांधीजींनी हा हुकूम नाकारल्यावर त्यांना अटक करून मुंबईला आणून सोडून दिले. मुंबईतही पायधुणी भागात सुरू असलेल्या दंगलीत घुसून लोकांना शांत करण्यासाठी गांधीजी पोहचले. अधिक हिंसाचार होऊ नये म्हणून गांधीजींनी सत्याग्रह मागे घेतला. मात्र या सत्याग्रहातून ब्रिटिश सरकारविरुद्ध सर्व देश एकमुखाने संघर्षशील होऊ शकतो, हे लोकांना कळून आले. रौलट सत्याग्रह मागे घेतल्यानंतर डिसेंबर १९१९ च्या अमृतसरच्या कॉंग्रेस अधिवेशनात गांधीजींनी काहीशी सौम्य भूमिका घेऊन मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचे स्वागत केले. मात्र या

अधिवेशनानंतर ब्रिटिशांनी हाऊस ऑफ लॉर्डसमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड घडवून आणणाऱ्या जनरल डायरचा गौरव केला. या हत्याकांडाची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या हंटर समितीनेही लष्करी कारवाईचे समर्थन केले. हे सर्व पाहिल्यावर गांधीजींनी ब्रिटिश सरकारशी असहकार करण्याचा आपला निर्धार कायम केला.

## खिलाफत चळवळ :

पहिल्या महायुद्धाच्या काळात तुर्कस्थानच्या पराभवामुळे तिथल्या खलिफाने इंग्लंडच्या विरोधात पवित्रा घेतला होता.१४ नोव्हेंबर १९१४ पासून इंग्रजांनी कॉन्स्टॅंटिनोपल येथे सैन्य घुसवून खलिफाची सत्ता संपुष्टात आणण्यासाठी युद्ध सुरू केले होते. मुसलमानांचे श्रद्धास्थान असणाऱ्या मक्का-मदिनाच्या देशातला खलिफा जगातील सर्व मुसलमानांचा धर्मप्रमुख समजला जात असे. त्यामुळे भारतीय मुसलमानांमध्ये ब्रिटिशांविषयी असंतोष नांदत होता. इथल्या मुसलमानांनी धर्मकर्तव्य म्हणून या खिलाफतीचे रक्षण करण्यासाठी आंदोलन सुरू केले. 'खिलाफत चळवळ' असे या आंदोलनाचे नामकरण झाले. ह्या आंदोलनाला हिंदूंचे साह्य असावे म्हणून महंमद अली व शौकत अली ह्या अली बंधूंनी गांधीजींना साकडे घातले. गांधीजींनी हिंदू-मुस्लीम ऐक्य दृढ करण्याच्या हेतूने पुढाकार घेऊन नोव्हेंबर १९१९ मध्ये खिलाफत परिषद घेतली. खिलाफत परिषदेत गांधीजींनी आपल्या असहकार तत्त्वाचा प्रथमच उच्चार केला व हिंदू-मुसलमान या दोघांना एकत्रितपणे राष्ट्रलढ्यात उतरवण्याचा निर्णय केला. या घटनेनंतर भारताच्या व्हाइसरॉयने हिंदी पुढाऱ्यांची दिल्लीत युद्धपरिषद बोलावली. मात्र लो. टिळक, ॲनी बेझंट, बॅ. जिना या महत्त्वाच्या नेत्यांना डावलले. या परिषदेला हजर राहिलेल्या गांधीजींनी याविषयीची आपली नापसंती व्हाइसरॉयकडे स्पष्ट शब्दांत नोंदवली होती.मात्र ब्रिटिशांची गरज लक्षात घेऊन सैन्यभरतीला पाठिंबा दिला व वसाहतीचे स्वराज्य तत्काळ देण्याचा निर्णय करावा असे नि:संदिग्ध आवाहन केले.

खिलाफत चळवळीपासूनच हिंदुस्थानच्या राजकारणात धर्म आणि राजकारण यांची सांधेजोड व्हायला सुरुवात झाली. तुर्कस्थानचा खलिफा हा इस्लाम धर्माच्या पवित्र स्थळांचा रक्षक आहे, त्यामुळे त्याला पाठिंबा देणे याचा अर्थ इस्लामला पाठिंबा देणे असा होतो, असे स्पष्टीकरण याच चळवळीचे पुढारी मौलाना अब्दुल कलाम आझाद यांनी दिले होते. त्यांच्या मते धर्मरक्षणासाठी 'जिहाद' (धर्मयुद्ध) पुकारणे, इस्लामच्या राज्यात (दारुल इस्लाम) स्थलांतर करणे इत्यादी कृत्ये हा मुसलमानांच्या धर्मकर्तव्याचा अंगभूत भाग आहे. महमद अली आणि शौकत अली या अलीबंधूंनीही याच भूमिकेतून इंग्लंडवर टीका केली. त्याची दखल घेऊन इंग्रज सरकारने महमद अलींच्या 'कॉम्रेड', शौकत अलींच्या 'हमदर्द' व मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या 'अलहिलाल' या वृत्तपत्रांवर टाच आणली, त्यांची अनामत रक्कम जप्त करून वृत्तपत्र प्रसारण बंद पाडले. मुस्लीम लीगनेही इंग्रजविरोधी भूमिका घेतली. मात्र थोड्याच कालावधीनंतर केमाल पाशाने तुर्कस्तानात धर्मनिरपेक्ष राजवट स्थापन केल्यामुळे खिलाफत आंदोलन थंडावले.

दरम्यान मलबारमधील मोपल्यांच्या बंडामुळे हिंदु-मुसलमान संबंध दुरावले. १९२३ साली

देशात अमृतसर, मुलतान व पंजाबच्या काही भागात दंगे झाले. विदर्भातही काही ठिकाणी दंगे झाले. नागपूरात ११ नोव्हेंबर १९२३ रोजी हिंदूंच्या दिंडीवर मुसलमानांनी दगड-विटा व जोडे फेकून मारल्याने दंगा झाला. त्याचा निषेध म्हणून गळ्यात ढोल, वीणा आणि काहींनी विटा बांधून दिंडी सत्याग्रह केला. (जोशी ल. रा. १९४३, पृ. ७५-७६)१९२४ आणि १९२७ साली नागपूरात पुन्हा एकदा हिंदू-मुसलमानात दंगे झाले. ४ सप्टेंबर १९२७ ला महालक्ष्म्यांच्या जेवणाच्या वेळी मुसलमानांनी वाईकर गल्लीत मारपिटीला सुरुवात केली. त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सैनिक प्रतिकारासाठी पुढे आले. १९२७ साली स्वामी श्रद्धानंद यांची अब्दुल रशीद याने हत्या केली. १९३० मध्ये लोणार येथे गंगा धारेवर दंगा झाला. या दंग्यांचे मूळ खिलाफत आंदोलनात असल्याची तत्कालीन राजकीय विश्लेषकांची समजूत होती. भाई परमानंद यांनी त्यांच्या आत्मकथेत हे निरीक्षण नोंदविले आहे. (वक्काणी, २००३, पृ. ११५-११७) तसेच महात्मा गांधींच्या सत्याग्रह तंत्रामुळे असंतुष्ट झालेला मुसलमान समाज महंमद अली जिना यांच्या मुस्लिम लीगकडे आकृष्ट झाला.

### १.७. टिळकपर्वाकडून गांधीपर्वाकडे :

१ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे मुंबईत निधन झाले आणि त्याच दिवशी गांधीजींनी मुंबईतूनच असहकार आंदोलनाला सुरुवात केली. येथून खऱ्या अर्थाने भारतीय राजकारणातील 'गांधीपर्वा'ला सुरूवात झाली. गांधीजींनी टिळकांच्या मृत्यूच्या दिवशीच आपल्या नव्या राजकीय लढ्याच्या पर्वाला सुरुवात करावी हा केवळ योगायोगाचा भाग नव्हता. गांधीजींच्या मनात टिळकांविषयी आदराची भावना होती. टिळकांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्या शवाला खांदा देण्यासाठी गांधीजी सर्वप्रथम पुढे झाले. टिळकांच्या मृत्यूनंतर असहकार आंदोलनासाठी एक कोटींचा 'टिळक स्वराज्य फंड' उभा करण्यासाठी गांधीजींनी देशयात्रा सुरू केली. ३१ मार्च १९२१ च्या बेझवाडा काँग्रेसमध्ये गांधीजींनी हा फंड उभा करण्यासंबंधी ठराव मांडून ३ जून १९२१ पर्यंत एक कोटी रुपयांचा निधी संकलित करण्याचा संकल्प सोडला. गांधीजींच्या या मोहिमेस देशभरातून उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. बालगंधर्व नाटकमंडळी व ललितकलादर्श नाटक मंडळीने खाडिलकरांच्या 'मानापमान' नाटकाचा मुंबईत प्रयोग करून १६,६०० रुपयांचा निधी या फंडासाठी मिळवला. लोकमान्य टिळकांवरची महाराष्ट्रीयनांची भक्ती आणि गांधीजींच्या नेतृत्वाला प्रतिसाद या दोन्ही अंगांनी या घटनेचे महत्त्व आहे. १९२२ साली गांधीजींवर अहमदाबादच्या कोर्टात राजद्रोहाचा खटला चालू होता, तेव्हा न्यायाधीशांनी लोकमान्य टिळकांच्या राजद्रोहाच्या खटल्याचे स्मरण करून देऊन गांधीजींना सहा वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली होती. याप्रसंगी न्यायाधीशांना उद्देशून केलेल्या भाषणात गांधीजींनी म्हटले होते की, "कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे स्मरण करून देऊन आपण माझा सन्मान केला आहे. म्हणून मी एवढेच सांगू इच्छितो की, त्यांच्या नावाशी माझे नाव निगडित होणे हे मी माझे मोठे भाग्य व अभिमानास्पद सन्मान समजतो." (शिखरे दा. न., पृ. २५) टिळक आणि गांधी या दोघांच्या जीवनकार्याला भगवद्गीतेचे अधिष्ठान होते, हेही लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे भारतीय असंतोषाचे जनक असलेल्या टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्याचे उत्तरपर्व गांधीजींच्या नेतृत्वाखाली

महाराष्ट्रातूनच सुरू व्हावे ही एक अर्थपूर्ण घटना म्हणावी लागेल.

गांधीजींचे गोखले व टिळक या दोघांशी अनुबंध होते. ब्रिटिशांशी सहकार्य करून राजकीय सुधारणा पदरी पाडून घेण्याचा गोखल्यांचा नेमस्त मार्ग सुरुवातीला गांधीजींना मान्यच होता; परंतु राजकीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी थेट संघर्ष करण्याची भूमिका टिळकांच्या प्रेरणेतून घेतली होती, असे म्हणायला बराच वाव आहे. गोखल्यांना अभिप्रेत असलेल्या राजकीय सुधारणा पुढे मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या स्वरूपात मान्य होऊन १९२१ सालापासून नवी राज्यव्यवस्था सुरू होणार होती. मात्र त्याआधी डिसेंबर १९१९ च्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात मॉंटेग्यू सुधारणा या 'अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक' असल्याचे टिळकांनी व त्यांच्या अनुयायांनी स्पष्ट केले होते. १९ जानेवारी १९२० च्या 'केसरी' तील 'कॉंग्रेसचा तिहेरी लढा' या लेखातून प्रस्तावित द्विदल राज्यपद्धतीतील 'राखीव' व 'सोपीव' खात्यातील भेदभाव मिटवून ब्रिटिश व एतद्देशीय प्रतिनिधींच्या समान अधिकारांची प्रस्थापना व्हावी, हा आपला उद्देश टिळकांनी स्पष्ट केला होता. गांधीजींना त्यावेळी हा सशर्त सहकार मान्य नव्हता; सरकारशी हातचे राखून न ठेवता प्रामाणिकपणे सहकार्य करायला हवे, असे त्यावेळी गांधीजींचे मत होते. मात्र पुढे पंजाबातील जालियनवाला बाग हत्याकांड व खिलाफतचा प्रश्न सोडविण्यास ब्रिटिश नोकरशाहीकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादामुळे गांधीजींचे मत बदलले. टिळकविचारातील मथितार्थ त्यांच्या लक्षात आला. त्यानंतर त्यांनी थोरोच्या तत्त्वज्ञानावर आधारित सरकारशी असहकार व सविनय कायदेभंगाचा मार्ग चोखाळण्याचा निर्णय घेतला. गांधीजी व टिळक यांची प्रत्यक्ष भेटीत असहकार आंदोलनाच्या कल्पनेवर चर्चाही झाली होती. टिळकांना असहकाराची संकल्पना तत्त्वत: मान्य होती; मात्र हे आंदोलन लोकांना कितपत झेपेल याविषयी त्यांना शंका होती. (पर्वते,१९८५, पृ. १८) टिळकांनी अवंतिकाबाई गोखले यांनी लिहिलेल्या गांधीजींच्या चरित्राला प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्यांनी 'असहकारा'च्या संकल्पनेला 'अडवणुकीचा मार्ग' किंवा Passive Resistance म्हटले होते. याचा अर्थ तत्त्वत: टिळकांनाही गांधीजींची असहकार संकल्पना मान्य होती.२७ मे १९२० ला बनारसला कॉंग्रेस कमिटीच्या सभेत खिलाफत व पंजाबच्या प्रश्नावरच चर्चा केंद्रित झाल्याने असहकारितेचा कार्यक्रम ठरविण्याचा विषय मागे पडला होता. अ. भा. खिलाफत कमिटीने गांधीजींच्या असहकार चळवळीला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. असहकारितेची चळवळ करून मुसलमानांना साहाय्य करायचे गांधींनी ठरवले होते. टिळकांचा अंत झाला त्याच दिवशी गांधीजींनी असहकार चळवळीची वाटचाल सुरू केली. याबाबत टिळकांची भूमिका काय राहिली असती याविषयी टिळकांच्या अनुयायांमध्ये संभ्रम झाला होता. म्हणून टिळकांच्या देहावसानानंतर लगेचच टिळकपक्षातील दहा लोकांची समिती नेमून योग्य ते धोरण ठरविण्याचा निर्णय झाला. या समितीत दादासाहेब खापर्डे, बा. शि. मुंजे, न. चिं. केळकर, गंगाधरराव देशपांडे, करंदीकर, बॅप्टिस्टा यांचा समावेश होता. गांधीजी टिळकांच्याच मार्गाने पुढे जात असल्याचे या सर्वांचे मत झाले. त्यामुळे गांधीजींच्या असहकार आंदोलनाला टिळकपंथीयांचा पाठिंबा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

राजकीय लढ्यासाठी 'असहकार' तत्त्वाचे उपयोजन करण्यासाठी गांधीजींनी २० सप्टेंबर १९२० च्या कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या विशेष अधिवेशनात ठराव मांडून राष्ट्रीय सभेची मान्यता मिळवली. तसेच या असहकारितेच्या कार्यक्रमाला पुरेसा पाठिंबा मिळाला तर वर्षभरात आपण स्वराज्य संपादन करू अशी ग्वाही दिली. या असहकाराच्या ठरावाला लाला लजपतराय, बिपीनचंद्र पॉल, ॲनी बेझंट, बॅ. जिना, पं. मदन मोहन मालवीय, सी. आर. दास, नरसिंह चिंतामण केळकर, दादासाहेब खापर्डे, बा. शि. मुंजे, बॅ. दादासाहेब करंदीकर, बॅप्टिस्टा यांनी विरोध केला. त्यामुळे मद्रास, मध्य प्रांत व वऱ्हाडच्या प्रतिनिधींनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. मात्र खिलाफतीच्या प्रचारामुळे बंगाल, पंजाब, संयुक्त प्रांत व बिहारच्या प्रतिनिधींचा गांधीजींना पाठिंबा मिळाला. अखेर १८२६ विरुद्ध ८८४ मतांनी हा ठराव पारित झाला. या मतदानात मुंबई प्रांताच्या ३३६ मतदारांपैकी २४३ मतदारांनी ठरावाच्या बाजूने, तर ९६ मतदारांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. वऱ्हाडच्या ३३ पैकी फक्त ५ मतदारांनी ठरावाच्या बाजूने व २८ मतदारांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. मध्यप्रांताच्या ६३ पैकी ३० मतदारांनी ठरावाच्या बाजूने व ३३ मतदारांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. (पर्वते, पृ. २४).

**कायदेमंडळाच्या निवडणुका :**

२० सप्टेंबर १९२० च्या कलकत्त्याच्या विशेष अधिवेशनातील असहकाराचा ठराव डिसेंबरात नागपूर येथे होणाऱ्या वार्षिक अधिवेशनात अंतिम मान्यतेसाठी ठेवला जाणार होता. परंतु तत्पूर्वीच १९२० च्या नोव्हेंबरात प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाला आणि डिसेंबरातील नागपूरच्या अधिवेशनापूर्वीच निवडणुका पार पडल्या. कलकत्ता कॉंग्रेसच्या असहकाराच्या ठरावामुळे कौन्सिलची निवडणूक लढवणे म्हणजे कॉंग्रेसची आज्ञा मोडणे होईल, म्हणून बऱ्याच कॉंग्रेसजनांनी आपली उमेदवारी मागे घेतली. महाराष्ट्रातील न. चिं. केळकर, गंगाधरराव देशपांडे, दादासाहेब करंदीकर, बापूजी अणे, डॉ. बा. शि. मुंजे, नारायणराव आळेकर, मनोहर रामचंद्र बोबडे यांनी उमेदवारी मागे घेतली. नव्या कौन्सिलात जाऊन स्वराज्यासाठी संघर्ष करण्याचा मार्ग रास्त असल्याची समजूत असणाऱ्यांनी मात्र निवडणुक लढविण्याचे ठरविले. बेझंट बाईंचे नेतृत्व मानणारे जमनालाल द्वारकादास धरमसी हे दिल्लीच्या केंद्रीय कायदेमंडळात व भारत सेवक समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास शास्त्री हे प्रांतिक कायदेमंडळात निवडून गेले. दादासाहेब खापर्डे, अण्णासाहेब जतकर दिल्लीच्या वरिष्ठ कायदेमंडळात व दादासाहेब काणे मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात निवडून गेले. (हरदास वीणा, १९८१,पृ. १५) मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात एस. एम. चिटणवीस, मोरोपंत जोशी मंत्री झाले.

निवडणुकांच्या माध्यमातून सुरु झालेल्या लोकशाहीच्या या पहिल्यावहिल्या प्रयोगापासूनच महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात जातीय समीकरणांचे गणित घुसले. ब्रिटिशांनी सरळ निवडणुकीतून जनतेला आपले लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी देण्याऐवजी निरनिराळ्या धार्मिक, जातीय, आर्थिक गटातून लोकप्रतिनिधी निवडता येतील असे भेदमूलक

धोरण अवलंबिले. मुंबई प्रांताच्या कायदेमंडळातल्या १११ जागांपैकी २५ सभासद सरकारनियुक्त होते आणि उरलेल्या ८६ जागांपैकी २७ जागा मुसलमानांसाठी व २ जागा युरोपियनांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळातही ४% मुस्लीम लोकसंख्या असताना १५% जागा मुसलमानांसाठी राखीव होत्या. ब्रिटिशांची राजनीती काहीही असली तरी सामाजिक ऐक्य टिकविण्याची जबाबदारी एतद्देशीय पुढाऱ्यांना निभवावयाची होती. राष्ट्रनिर्माणात एकराष्ट्रीयत्वाची वा सामाजिक ऐक्यभावाची मुळे खोलवर रुजलेली असण्याची गरज असते, याची प्रखर जाणीव लोकमान्य टिळक, विठ्ठल रामजी शिंदे या मराठी पुढाऱ्यांना होती. अल्पसंख्येने का होईना जातिनिरपेक्ष राजकीय धारणा घडविण्यासाठी भूमी नांगरण्याचा प्रयोग विठ्ठल रामजी शिंदेसारखे विद्याव्यासंगी नेते करू पहात होते. राष्ट्रीय कॉंग्रेसमधील जहाल-नेमस्त गट, ब्राह्मणेतर पक्ष यांनी आपापल्या उमेदवारांची नावे घोषित करण्यास सुरुवात केली. ब्राह्मणेतर पक्षाने मराठ्यांसाठी राखीव असलेल्या ७ जागांपैकी एका जागेवर विठ्ठल रामजी शिंदे यांनी उभे राहावे, असा प्रस्ताव ठेवला. मात्र शिंद्यांनी त्या प्रस्तावास नकार देऊन "त्या राखीव जागेसाठी मी उभा राहणार नाही. त्यातील जातीवाचक तत्त्वाच्या मी विरुद्ध आहे" अशी आपली भूमिका स्पष्ट केली व खुल्या प्रवर्गातून सर्व पक्षांचे साह्य घेऊन निवडणूक लढविण्याचे जाहीर केले. यासंबंधी केलेल्या जाहीर निवेदनात त्यांनी म्हटले होते की, "हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येचे केवळ राजकीयदृष्ट्या दोन मुख्य भाग पडत आहेत. ते हे :

(१) विद्याबल, द्रव्यबल किंवा अधिकारबल ह्याने पुढारलेला वर्ग;आणि

(२) ह्यांतील कोणतेच बल अंगी नसलेला व नाइलाजाने मागास राहिलेला वर्ग किंवा बहुजनसमाज.

ह्या दुसऱ्या वर्गातच अत्यंत तिरस्कृत अशा अस्पृश्यांचा अंतर्भाव होतो. हल्लीच्या राजकीय सुधारणेचा नुसता अरुणोदय होतो न होतो तोच ह्या दोन भागांत मोठा विरोध भासू लागला, आणि ह्या विरोधानुसार बहुजनसमाजाचा अथवा मागासलेल्या वर्गाचा एक नवीन पक्षच होऊन चुकला आहे. ह्यालाच 'ब्राह्मणेतर पक्ष' असे नाव दिले जाते. पण नाइलाज व बलहीनता ही जी मागासलेल्या वर्गाची मुख्य लक्षणे ती ह्या वर्गाच्या पक्षास 'ब्राह्मणेतर पक्ष' असे जातिविशिष्ट नाव दिल्याने अगदी कांटेकोर रीतीने सार्थ होत नाहीत; म्हणूनच या पक्षास 'बहुजन पक्ष' अथवा 'जनपद पक्ष' असे अगदी सार्थ व निर्विकल्प नाव दिल्याने त्यावर कसलाही आक्षेप आणण्यास जागा नाही." ( मोटे ह. वि.पृ. ४१४-४१६,);

राष्ट्रीय सभेने या निवडणुकीवर बहिष्कार घातल्याचे जाहीर करण्यापूर्वी न. चिं. केळकर यांनी निवडणुक लढवायचे ठरवले होते. त्यावेळी केळकरांनी आपले वाडवडिल शेतकरी होते व आपण 'मराठा' पत्राचे संपादक आहोत, त्या अर्थाने आपणही मराठाच आहोत अशा आशयाचा युक्तिवाद केला होता. निवडणुकीत असल्या शाब्दिक कोलांटउड्या मारून जनतेला भुरळ पाडणाऱ्या भाषणांचा सुळसुळाट तेव्हापासून पहायला मिळतो. यावर कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी विठ्ठल रामजी शिंदे यांना २९ ऑगस्ट १९२० रोजी पाठिंब्यासाठी पाठविलेल्या पत्रात केळकरांच्या असल्या भाषिक चाटुक्तीचा समाचार घेऊन लिहिले होते की,"त्यांनी

(केळकरांनी) शिंद्यांची बरोबरी कशी करावी? मी म्हणे 'मराठा' वर्तमानपत्र चालविले, त्यावर मी म्हणतो की, माझ्या बैलाचे नाव मी 'ब्रिटानिया' ठेवले, माझ्या आवडत्या घोड्याचे नाव 'टर्किश फल्याग' ठेवले, माझ्या गाईचे नाव 'जपान' ठेवले म्हणून मी जपानी अगर तुर्की लोकांचा पुढारी होणे योग्य होईल? किंवा ते मला कबूल करतील का? अर्थातच नाही. वि. रा. शिंदे मराठा वर्गातील आहेत. जपानांतील लोकांप्रमाणे व त्यांतील सामुराई वर्गाने आपले उच्चस्थान सोडून सर्व लोकांना आपल्या बरोबरीचे केले व देशोन्नती केली त्याप्रमाणे आलंबन केले आहे. एन. सी. केळकर रोटीबेटी व्यवहार करण्यास कबूल नाहीत इतकेच नव्हे तर स्पर्शास्पर्श करून गरीब लोकांशी बोलण्यातही त्यांना कमीपणा वाटतो, अशा स्थितीत मी 'मराठा' वर्तमानपत्र चालवितो म्हणून लोकांना फसविण्यात प्रवृत्त होणे किती शरमेचे आहे. 'ज्याचे त्याला व गाढव ओझ्याला' ह्या नियमाप्रमाणे 'मराठा' हे नाव वर्तमानपत्राला देऊन मराठा व ब्राह्मणेतर ह्या वर्गाचे काय कल्याण केले? मुळीच नाही. मग कशाला मराठा ह्या पत्राचे नावाखाली दडावयाचे?" (मोटे ह. वि; पृ. ४१७) वास्तविक 'मराठा' हे पत्र सुरू करतानाही संस्थापकांना इतकी संकुचित भूमिका अभिप्रेत नव्हती. पण निवडणुकीच्या राजकारणात इतिहासाचे संदर्भ पुसले जाऊन सोयीचे नवार्थ भरले जातात, त्याचा नमुना केळकरांच्या भाषणात दिसून येतो. शाहू महाराजांनी याच पत्रात म्हटले होते की, 'जात नसावी, पण वर्ग जरूर पाहिजेत व वर्ग जरूर राहणारच. सर्व पाश्चिमात्य देशांतही ते आहेत." (कित्ता, पृ. ४१६) मात्र या पाश्चिमात्य संस्कृतीला सोईने बाजूला ठेवून ब्रिटिशांनी जातीनिहाय मतदारसंघ व राखीव जागांचे बीज पेरून ठेवल्याने जातकेंद्री राजकारणाची विषवल्ली आपोआप वाढत गेली, त्याचे पूर्वरूप शिंदे-केळकर निवडणुकीच्या प्रसंगातून पहायला मिळते.

धर्म-जात-भाषा व प्रदेशकेंद्री राजकारणाची पूर्वपीठिका म्हणून या चर्चांचे संदर्भ लक्षात घ्यायला हवेत. ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीत या भेदमूलकतेला खतपाणीच मिळत गेले. हिंदू-मुसलमानांचे ऐक्य होऊ न देणे हे राज्यकर्त्यांचे प्रमुख धोरण बनले होते. अलिगढच्या मुस्लीम कॉलेजच्या प्रिन्सिपॉलांनी तर मुसलमानांनी राष्ट्रीय सभेत सामील होऊ नये व हिंदू लोकांविरुद्ध सरकारास साहाय्य करावे असा सल्ला दिला होता. मुसलमानांनी युरोपियन लोकांच्या साहाय्याने आपल्या हक्कांची पूर्तता करून घ्यावी, असे त्यांनी आपल्या समाजबांधवांना सुचविले होते. (पारीख,२०११, पृ. ४७) राष्ट्रनिर्माणात एकराष्ट्रीयत्वाची वा सामाजिक ऐक्यभावाची मुळे खोलवर रुजलेली असण्याची गरज असते, याची प्रखर जाणीव लोकमान्य टिळक, विठ्ठल रामजी शिंदे या मराठी पुढाऱ्यांना होती. या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय एकात्मतेसंबंधीची मतेही लक्षात घ्यायला हवीत. सर्वांचे सामाईक हित महत्त्वाचे असून त्या पार्श्वभूमीवर धर्माला दुय्यम स्थान असले पाहिजे, अशी टिळकांची धारणा होती.

'केसरी'तील एका लेखात आपली ही भूमिका स्पष्ट करताना टिळकांनी लिहिले होते की, "धर्मसंबंधी अथवा सामाजिक दुराग्रहास आम्ही बळकट धरून बसलो व आम्हांस हितकर असणाऱ्या ज्ञानाचा आमच्या मनामध्ये आग्रहाने प्रवेश करू दिला नाही तर आम्हांस

उन्नतावस्था येणार नाही. जपानी लोकांसारखा आम्ही दुराग्रह सोडला, सावधपणाने वागलो व जेथे सांपडेल तेथे ज्ञानामृतपान केले तर आमचे सर्व दोष नष्ट होऊन एका जुटीने वागण्याची, अधिकारास मानण्याची, मनास इष्ट असेल तेथे अवलंबन केल्यास आमचा तरणोपाय आहे, असे प्रत्यक्ष नाही तरी परंपरेने जपानी लोकांनी आम्हांस दाखविले आहे." (लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग १, पृ. ४५६-४५७) "हिंदू-मुसलमान लोकांनी ज्या नात्याने एकत्र रहावयाचे ते काही अंशी अमेरिकेत निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र रहातात तशा प्रकारचेच असले पाहिजे" असे टिळकांचे मत होते. (लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग १, पृ. २३४-२३५) मुसलमानांपेक्षा हिंदू संख्येने अधिक असल्याने निवडणुकांत मुसलमानांना निवडून येण्यासाठी पुरेशी मते मिळू शकत नाहीत, याचे वस्तुनिष्ठ भानही टिळकांना होते. त्यामुळेच त्यांनी म्हटले होते की, "स्थानिक कमिट्यांतून मुसलमान लोक हिंदू लोकांकडून निवडून येत नाहीत ही गोष्ट खरी आहे. पण त्यास खरा उपाय म्हणजे मुसलमान लोकांची जेथे बरीच वस्ती आहे तेथे संख्येच्या मानाने त्यास आपला मेंबर निवडून देण्याचा हक्क देणे हाच होय," (लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग २, पृ. २०) एका अर्थाने मुसलमानांच्या वा विभक्त मतदारसंघाच्या मागणीला टिळकांची तत्त्वत: संमतीच होती. याच विचारसरणीतून पुढे लखनौ करार झाला. टिळकांच्या भूमिकेचा सार न. चिं. केळकर यांनी यथार्थपणे नोंदवला आहे : "सर्वच लोकांना आता हे निश्चित कळू लागले आहे की, हिंदी लोकांपैकी कोणत्याही वर्गाच्या हाती सत्ता आल्यास ती एका दृष्टीने आपल्याच हाती आल्यासारखी आहे. अधिकाराच्या जागा वाटेल तर हिंदूंना द्या, वाटेल तर मुसलमानांना द्या, पण आमच्यापैकी कोणाला तरी द्या."(लो. टिळकचरित्र, खंड ३, भाग२, न. चिं. केळकर, पृ. ६७-६८) प्रत्यक्ष निवडणुकांच्या राजकारणात मात्र जातिधर्मनिरपेक्षतेचे तत्त्व पाळले गेले नाही.

**असहकार आंदोलन :**

कायदेमंडळाच्या निवडणुका पार पडल्यावर लगोलग १९२० च्या डिसेंबरात नागपूर येथे काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन झाले. आतापर्यंतच्या अधिवेशनात या अधिवेशनाला मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता. या अधिवेशनात १६,००० प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला होता. राष्ट्रसेवेचे प्रतीक समजली जाणारी गांधी टोपी याच अधिवेशनापासून लोकप्रिय झाली. अधिवेशनस्थळाला 'काँग्रेस नगर' असे नाव देण्यात आले होते. अधिवेशनाची सुरुवात 'होमरुल'चे झेंडे फडकवित निघालेल्या खूप मोठ्या मिरवणुकीने झाली. तमिळनाडूचे सी. विनय राघवा चारियार यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाचे कामकाज झाले. महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू, पं. मदन मोहन मालवीय, लाला लजपतराय, सी. आर. दास, मौलाना आझाद, अली बंधू इत्यादी मान्यवर अधिवेशनासाठी आले होते. आतापर्यंतच्या काँग्रेस अधिवेशनात साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी करणारे ठराव पारित झाले होते; पण या अधिवेशनात घटनात्मक स्वराज्याची मागणी करण्यात आली. राष्ट्राच्या आत्मसन्मानासाठी यापुढे कुठलीही तडजोड करावयाची नाही असे गांधीजींनी सभेला आवाहन केले. आपण

कायदेकौन्सिलसारख्या मोहजालापासून दूर राहिले पाहिजे. स्वराज्य हे सुखासुखी मिळत नसते, त्यासाठी त्याग करावा लागतो, हा मंत्र जनतेत पोहचविला पाहिजे; या असहकारातून ब्रिटिशांना त्यांच्या वचनभंगाची व त्यांनी केलेल्या अन्यायाची जाणीव करून द्यावी हे गांधीजींना अभिप्रेत होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी असहकाराचा मार्ग निवडताना गांधीजींनी इंग्रजांच्या लष्करी व प्रशासकीय शक्तीचा विचार केला होता. त्यावेळी भारताची लोकसंख्या सुमारे ३३ कोटी होती, आणि त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांची संख्या फक्त एक लाख होती. प्रत्येक जिल्ह्याला एक इंग्रज कलेक्टर आणि एक डी. एस. पी किंवा पोलीस सुपरिंटेंडंट असायचा. बाकी इंग्रज प्रशासनात हिंदी लोकच होते. त्यामुळे हिंदी लोकांनी इंग्रज सरकारशी सहकार्य करायचे नाकारले तर इंग्रजी राज्याचा कारभार बंद पडेल. गांधीजींनी याच्याही पुढे जाऊन सांगितले की, "I repeat the promise that I made, that, if we can only do that, we do not require one year, we do not even require nine months to attain our goal." (The Collected Works of Mahatma Gandhi / वक्काणी, २००३, पृ. ९९) या आत्मविश्वासातून गांधीजींनी नागपूर अधिवेशनात २० सप्टेंबर १९२० च्या कलकत्त्याच्या विशेष अधिवेशनातील असहकाराचा ठराव अंतिम मान्यतेसाठी ठेवला. महमद अली जिना यांचा अपवाद वगळता काँग्रेसने गांधीजींच्या भूमिकेला एकमुखी पाठिंबा व्यक्त केला. टिळकपंथीयांचेही काँग्रेसला विरोध न करण्याचेच धोरण राहिल्याने सर्वसंमतीने या असहकार आंदोलनाला पाठिंबा घोषित करण्यात आला. काँग्रेसने केलेल्या ठरावात असेही म्हटले होते की, "ज्या परिस्थितीत ही कायदेमंडळे अस्तित्वात आणिली आहेत, ती परिस्थिती लक्षात घेता ती देशाचे प्रतिनिधित्व करीत नाहीत, आणि असा विश्वास बाळगते की, बहुसंख्य मतदारांनी मतदानावर बहिष्कार घातला असता देखील जे लोक निवडून गेले आहेत असे समजले जाते त्यांनी आपल्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा. जर तसे त्यांनी केले नाही व आपल्या बहुसंख्य मतदारांच्या म्हणण्याचा धिक्कार केला व लोकशाहीचे तत्त्व इतक्या उघडपणे धाब्यावर बसविले तर त्यांच्या मतदारांनी त्यांच्याकडून कुठलीही सेवा घेण्याचे जाणून सवरून नाकारावे." (पर्वते, १९९५, पृ. ३१-३२)

या ठरावानुसार गांधीजींच्या असहकार आंदोलनाचे सर्वसाधारण स्वरूप व कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली, त्याचा गोषवारा असा :

१. सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार.सरकारी पदव्या, किताब, मानसन्मानाचा त्याग. शक्य तितका स्वार्थत्याग करून असहकाराची चळवळ यशस्वी करावी.
२. सरकारी शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार, पालकांनी १६ वर्षांच्या खालील मुलांना सरकारी, निमसरकारी आणि सरकारच्या साहाय्याने चालणाऱ्या शाळांमधून काढून घ्यावे व त्यांना राष्ट्रीय शाळांत पाठवावे किंवा त्यांच्या स्वतंत्र शिक्षणाची सोय करावी. १६ वर्षांवरील मुलांनी सरकारशी संबंधित शाळा-महाविद्यालये सोडून राष्ट्रीय शिक्षण संस्थातून शिक्षण घ्यावे व असहकाराच्या चळवळीला वाहून घ्यावे. सरकारी मदतीने चालणाऱ्या शाळांच्या

विश्वस्तांनी म्युनिसिपालिट्या लोकल बोर्डाच्या शाळांचे राष्ट्रीय शाळांत रूपांतर करावे.

३. कायदेमंडळावर व कोर्टकचेऱ्यांवर बहिष्कार. वकिलांनी वकिली व्यवसाय बंद करून कोर्टावर बहिष्कार घालावा आणि लवादामार्फत भांडण-तंटे सोडवावेत व स्वत:ला राष्ट्रकार्यात समर्पित करावे.

४. विदेशी मालावर बहिष्कार. हिंदुस्थान आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावा म्हणून व्यापाऱ्यांनी परकीय संबंध तोडावेत व सूतकताई व हातमाग उद्योगास उत्तेजन द्यावे.

५. सैनिकी कामांवर बहिष्कार.

६. निवडणुकांवर बहिष्कार, कौन्सिलांवर बहिष्कार.

७. असहकार हा पूर्ण अनत्याचारी असावा.

८. चळवळ चालविण्याकरिता ग्राम समित्या, शहर समित्या, प्रांतिक समित्या व काँग्रेस शाखा स्थापन कराव्यात. 'इंडियन नॅशनल सर्व्हिस' नामक राष्ट्र सेवकांची संघटना स्थापन करावी.

९. राष्ट्रकार्य व असहकाराच्या चळवळीसाठी अखिल भारतीय टिळक स्वराज्य निधी गोळा करावा. (पर्वते,१९८५, पृ. ३०-३१)

असहकारिता हा गांधीजींच्या दृष्टीने लोकशिक्षणाचाही एक मार्ग होता. या भूमिकेतून त्यांनी असहकारिता आंदोलनात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांसाठी एक पात्रता सूची तयार केली होती. त्यात म्हटले होते की, "केवळ शांततापूर्ण साधनांनीच स्वातंत्र्य मिळेल, असे ज्यांना वाटत नाही, अस्पृश्यतेची रूढी सोडण्यास जे हिंदू तयार नाहीत, ज्यांना सूत चांगले कातता येत नाही, ज्यांनी परदेशी कापडाचा संपूर्ण त्याग केलेला नाही आणि हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिस्ती व यहुदी यांच्या ऐक्याची गरज ज्यांना वाटत नाही अशा लोकांनी तुरुंगात जाण्याचे मनातही आणू नये आणि आपली नावे स्वयंसेवक म्हणून नोंदविण्याची कल्पना टाकून द्यावी. जे निर्व्यसनी बनले नाहीत किंवा ज्यांनी मद्यपान सोडले नाही, त्यांनी या पवित्र लढ्यापासून दूर राहावे, तीही त्यांची देशसेवा होईल. कारण तसे केल्याने आपल्याला आपल्या मर्यादा कळतात, असे ते दाखवतील. जे लोक स्वयंसेवक म्हणून नावे नोंदवतील, त्यांना आपल्या चरितार्थाची सोय स्वत: करावी लागेल. ती सोय काँग्रेस कमिटी करील, अशी अपेक्षा त्यांनी धरू नये. ज्याला देशसेवा करण्याची इच्छा आहे, पण अशा आणीबाणीच्या वेळी आपल्या गरजा भागविण्यासाठी पैसे देणारा एकही मित्र मिळत नाही, तो राष्ट्रसेवेला पात्र नाही, असे माझे मत आहे. ... अशा प्रकारे आपण स्वत:ची सिद्धता केली आणि हजारो लोक तुरुंगात जाण्यास तयार असले, म्हणजे आपली शांतता व संयम समर्थनीय ठरतील, आणि खऱ्या धैर्याचा पुरावा म्हणून तो मानला जाईल." (म. गांधी यांचे संकलीत वाङ्मय, खंड २२, पृ. ५०-५१) स्वातंत्र्य आंदोलनातून एक दीर्घकाल टिकणारी शाश्वत राजकीय लोकसंस्कृती घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न गांधीजी करू पहात होते, हे या पात्रतासूचीवरून लक्षात येते.

१० डिसेंबर १९२० च्या नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात ठरल्याप्रमाणे असहकाराचा कार्यक्रम क्रमाक्रमाने अमलात आणावा असे ठरले होते. त्यानुसार १ जानेवारी १९२१पासून शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराला प्रारंभ झाला. पटवर्धन हायस्कूलच्या २५ टक्के व नील सिटी

हास्कूलच्या ७२ टक्के विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या. वऱ्हाडात मात्र फक्त १४ टक्के विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या. लोकनायक अणे यांना शाळांवर बहिष्कार हा कार्यक्रम मान्य नव्हता; मात्र सरकारी शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मध्यप्रांतात राष्ट्रीय शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याकरिता ३ जानेवारी १९२१ ला नागपूरला टिळक विद्यालय सुरू करण्यात आले. विदर्भात खामगाव, अकोला, अकोट, या शहरातही राष्ट्रीय शाळा सुरू करण्यात आल्या. तसेच सरकारी कॉलेज सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. बा. शि. मुंजे, दत्तोपंत ठेंगडी, नियोगी, विश्वनाथराव केळकर यांच्या पुढाकाराने 'नागपूर राष्ट्रीय शिक्षण मंडळ' स्थापन करण्यात आले. निळकंठराव उधोजी हे या मंडळाचे अध्यक्ष होते. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजातून ३२.५ टक्के, मॉरिस कॉलेजातून २७.५ टक्के, मेडिकल कॉलेजातून २७.२ टक्के, अभियांत्रिकी महाविद्यालयातून २४.६ टक्के, शेतकी महाविद्यालयातून ४.३ टक्के विद्यार्थ्यांनी असहकार आंदोलनाला प्रतिसाद म्हणून कॉलेज सोडले. या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'नॅशनल कॉलेजा'त प्रवेश घेतला. असहकार आंदोलनात सामील होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'असहकारिता प्रचारवर्ग' सुरू करण्यात आले व स्वराज्याची कल्पना खेड्यापाड्यात पोहचविण्यासाठी त्यांचा संघ तयार केला जाऊ लागला. (हरदास वीणा, १९५, पृ. १८-२०) २२ जानेवारी १९२१ रोजी कामगार पुढारी रुईकर यांनी डॉ. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली 'नागपूर मजूर संघा'ची स्थापना केली.

फेब्रुवारी १९२१ मध्ये डॉ. मुंजे यांनी मध्यप्रांतात मद्यपानबंदीची चळवळ सुरू केली. दारूबंदीसाठी पिकेटिंग करणाऱ्यांना पोलीस अटक करू लागले. सरकारने पुकारलेल्या दारूच्या लिलावात बोली लावण्यासाठी एकही ठेकेदार हजर रहात नव्हता. परिणामत: सरकारचे उत्पादनशुल्क घटले. त्यामुळे दारूबंदीची चळवळ ही सरकारी महसूल बुडविण्याच्या हेतूने केली जात आहे, असा आरोप ठेवून मद्यपानबंदी चळवळीतील डॉ. परांजपे, डॉ. चोळकर या कार्यकर्त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. मद्यपानबंदीच्या चळवळीत सरकारने पकडलेल्या मुसलमान स्वयंसेवकांच्या सुटकेसाठी लोक कोर्टाच्या आवारात जमले, तेव्हा त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला, घोड्यांच्या टापांखाली चिरडण्याचा प्रयत्न झाला व गोळीबाराची धमकी देण्यात आली.नागपूर शहरात सभाबंदी लागू करण्यात आली. प्रचारसभेत भाषण करणाऱ्या वीर वामनराव जोशी, भगवानदीन यांना अटक करण्यात आली. २ मार्च १९२१ रोजी होळीच्या दिवशी दारूची दुकाने फोडणाऱ्यांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात नऊ लोक ठार झाले. गोळीबार करणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकारने अर्धा महिन्याचा पगार बक्षीस दिला. डॉ. हेडगेवार यांनी केलेले भाषण राजद्रोही असल्याचा ठपका ठेवून ३१ मे १९२१ रोजी त्यांच्यावर खटला भरण्यात आला व १९ ऑगस्ट १९२१ रोजी त्यांना एक वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. तपस्वी परांजपे यांना राजद्रोही भाषण केल्याबद्दल सव्वा वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. विदर्भातल्या पुढाऱ्यांनी असहकार आंदोलनाला गती देण्यासाठी जिल्हावार अधिवेशने घेतली. डॉ. हेडगेवार व डॉ. मुंजे यांनी भंडारा, खापा, देवळी, वर्धा इथे परगणा अधिवेशने घेतली. पाटील-पटवारी वर्ग जागृत झाला. चंद्रपूर येथे

बळवंतराव देशमुख व डॉ. शंकरराव वैद्य यांनी बाजार बंदचा सत्याग्रह करून असहकार आंदोलनाला एक नवे परिमाण दिले. 'सैन्यात शिरू नका' असा प्रचार करणाऱ्या मौ. महमद अली व शौकत अली या अलीबंधूंना १४ व १६ सप्टेंबर १९२१ रोजी अटक करण्यात आली.

नोव्हेंबर १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या भारत भेटीच्या वेळी युवराजांच्या आगमनावर बहिष्कार घालण्यासाठी देशभर हरताळ पाळले गेले. १७ नोव्हेंबर १९२१ रोजी मुंबईत युवराजांच्या आगमनप्रसंगी पारशी, ज्यू व युरोपियन लोकांवर हल्ला करण्याच्या घटना घडल्या. मालेगावला हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला, मलबारला मोपल्यांचे बंड झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने असहकाराची चळवळ दडपून टाकायचे ठरवले. जहाल भाषणांच्या वाढत्या संख्येला व स्वयंसेवक संघटनांच्या कृतींना आळा घालण्यासाठी प्रांतिक सरकारांना 'राजद्रोही सभांचा कायदा' लागू करण्यास सांगितले गेले. सभा-मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली. १९२१ च्या डिसेंबरात आणि १९२२ च्या जानेवारी महिन्यात तीस हजारांहून अधिक लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. खिलाफत व कमिट्यांच्या कार्यालयांवर धाडी टाकण्यात आल्या. राजकीय कैद्यांचा छळ करण्यात आला. असहकार आंदोलनाच्या पहिल्या पर्वात एक कोटीचा टिळक स्वराज्य फंड उभारण्याचा व काँग्रेसचे एक कोटी सभासद करण्याचा संकल्प होता. पैकी पहिल्या दोन महिन्यातच सव्वा कोटी रुपयांचा फंड उभा राहिला. 'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' ह्या साप्ताहिकांतून गांधीजींनी 'सत्य', अहिंसे'वर लिहिलेल्या लेखांनी तरुणांना वेड लावले. हजारोंनी अंकांचा खप वाढला. प्रत्येक जिल्ह्यात काँग्रेस संघटना स्थापन झाली. लोक प्रभातफेऱ्या काढू लागले. स्वातंत्र्याला प्रेरक पदे तालासुरात गाऊ लागले. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वारे संचारले. हिंदुस्थानच्या सर्व जिल्ह्यांमध्ये काँग्रेसचे चार आणे वर्गणी देणारे पाचपन्नास लाख सभासद नोंदवले गेले. निवडणुकांच्या पद्धतीने खालपासून वरपर्यंत काँग्रेस प्रतिनिधी निवडले गेले. काँग्रेस महासमिती व वर्किंग कमिटीच्या रूपाने एक स्वदेशी पार्लमेंट व मंत्रिमंडळ, आणि देशभर पसरलेले कार्यकर्त्यांचे जाळे अशा समांतर निमशासकीय यंत्रणा अस्तित्वात आल्या.

५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील चौरीचौरा येथे आंदोलकांनी २२ पोलिसांना चौकीत डांबून जाळल्याची घटना झाली. असहकार आंदोलनाला लागलेल्या या हिंसक वळणामुळे गांधीजींनी आंदोलन स्थगित केल्याचे जाहीर केले. सरकारने गांधीजींना अटक केली व सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. गांधीजींनी अचानक शिगेला पोहचलेले असहकाराचे आंदोलन मागे घेतल्याने खिलाफत चळवळीतले मुसलमान कार्यकर्ते आणि काँग्रेसमधील तरुण पुढारी नाराज झाले.

भारताच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या राजकारणात १९२१ च्या 'असहकार आंदोलना'ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या आंदोलनामुळे भारतीय राजकारणाला नवे वळण लागले. राजकारणाची पूर्वीची साधने नष्ट होऊन नवी चाकोरी, नवी साधने वापरली जाऊ लागली. देशात खूप लोकजागृती झाली. अनेकांनी वकिली सोडली. अलाहाबाद उच्च न्यायालयात वकिली करणारे पंडित मोतीलाल नेहरू आणि कलकत्ता उच्च न्यायालयात

बॅरिस्टरी करणारे चित्तरंजनदास मुन्शी, मुंबईचे बॅ.जयकर, नागपूरचे बॅरिस्टर अभ्यंकर, नीळकंठराव उधोजी, भुसावळचे अण्णासाहेब दास्ताने, मध्य प्रदेशात दादाभाई नायक, तसेच वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, राजगोपालाचारी, सी. आर. दास, समीउल्लाखां या नामवंतांनी वकिली सोडली. धुळ्याच्या बाळुभाई मेहता या नव्यानेच एल. एल. बी. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्याने गांधीजींच्या आंदोलनासाठी उर्वरित आयुष्य वेचायचा निर्णय घेतला. रवींद्रनाथ टागोर आणि डॉ. राधाकृष्णन यांनी ब्रिटिश सरकारने दिलेल्या 'सर' पदवीचा त्याग करीत असल्याची पत्रे सरकारला पाठविली. गांधीजींनी 'कैसर हिंद' पदक परत केले. त्यामुळे सरकारची प्रतिष्ठा कमी झाली. अनेक तरुणांनी कॉलेजे सोडली.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुखचे श्री. वैद्य नामक वकील खादीची टोपी (गांधी टोपी) घालून कोर्टात आले म्हणून न्यायाधीशाने ही कोर्टाची बेअदबी करणे होय, असे समजून त्यांना कोर्टातून ताबडतोब बाहेर काढले. शिवाय वकिलांनी पागोटे किंवा पगडी याशिवाय दुसरे काहीही डोक्यावर घालून येऊ नये, असा आदेश काढला. यावर गांधीजींनी आपली प्रतिक्रिया नोंदवताना म्हटले होते की, "खादी-टोपीशी पुकारलेल्या या युद्धाच्या बुडाशी जे तत्त्व आहे, ते फार महत्त्वाचे आहे. खरे तर, आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर पडून, सरन्यायाधीशांना या शिरोभूषणास आक्षेप घेता येणार नाही... जे वकील ही राष्ट्रीय टोपी धारण करतात, ते कोर्टाची कोणत्याही प्रकारे बेअदबी करीत नाहीत. स्वत:चा व आपल्या राष्ट्राचा अभिमान राखण्यासाठी ते ती टोपी घालतात. खादी टोपी वापरणे हा कोणाला आपला धर्म वाटत असेल, तर कोणाला ते राजकारण वाटत असेल. पण ते लपविण्याची त्यांची इच्छा नसल्यामुळे ते ती टोपी धारण करतात. जो माणूस स्वत:चा अभिमान बाळगत नाही, तो भाडोत्री वकील होय. वकील हे भाडोत्री आहेत का हायकोर्टाचे अधिकारी आहेत? जनतेच्या स्वातंत्र्याचे आपण रखवालदार आहो, असे ते म्हणतात, मग त्यांनी आपल्या स्वत:च्या स्वातंत्र्याचे अपहरण मान्य करावे का?" (म. गांधी यांचे संकलीत वाङ्मय खंड २२, पृ. १८) या प्रकरणानंतर इतर वकिलांनीही खादीची टोपी घालूनच कोर्टात जाण्याचा निर्धार केला. 'पोलादाच्या तलवारीपेक्षा स्वार्थत्यागाची तलवार वापरण्याचा प्रयत्न असहकारितावादी करीत आहेत. ब्रिटिशांच्या पोलादाशी भारताचा आत्मा टक्कर देत आहे" अशा शब्दांत गांधीजींनी असहकार आंदोलनात उतरलेल्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या कृतीचे समर्थन केले होते. (म. गांधी, कित्ता, पृ. २२) या असहकार आंदोलनात महिलांनीही हिरिरीने भाग घेतला. पार्वतीबाई ठकार, चंद्राताई शेवडे या महिलावर्गात जागृती करण्यासाठी पुढे सरसावल्या होत्या.

**झेंडा सत्याग्रह :**

१३ एप्रिल १९२३ रोजी नागपूरला राष्ट्रीय झेंडा घेऊन निघालेली मिरवणूक अडवून ब्रिटिशांनी जमनालाल बजाज यांना अटक केली. यावेळी काँग्रेसचे महासचिव जवाहरलाल नेहरू नागपूरात होते, त्यांनी देशभरातल्या कार्यकर्त्यांना नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात सामील व्हायचे आवाहन केले. वर्ध्याहून, मध्यप्रांतातून स्वयंसेवकांच्या तुकड्या येऊन दाखल होऊ लागल्या. स्वयंसेवक शिबिराची व्यवस्था पाहण्यासाठी नागपूरात आलेल्या विनोबा भावेंचे १ जून १९२३

रोजी सभेत जळजळीत भाषण झाले. परिणामत: ब्रिटिश पोलिसांनी धरपकड सुरू केली. शे-दीडशे कार्यकर्त्यांना अटक झाली, विनोबांचाही त्यात समावेश होता. विनोबांना वर्षभराची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. अकोला तुरुंगात त्यांना सुरुवातीला चक्की पिसणे, आठ फूट खडी फोडणे अशी कामे देण्यात आली. नंतर एकांतवासाच्या कोठडीत डांबले. विनोबांचा हा पहिलाच तुरुंगवास होता. विनोबांच्या तुरुंगवासाविषयी राजगोपालाचारींनी लिहिले होते, "देवदूतासारखा त्यांचा पवित्र आत्मा, विद्वत्ता, तत्त्वज्ञान आणि धर्म यांच्या उंच शिखरावर विहार करीत आहे. एवढे असूनही त्यांनी जी नम्रता धारण केली आहे ती इतकी परिपूर्ण आहे आणि हृदयाचा सरळपणा इतका सहज आहे की जो अधिकारी त्यांना ओळखत नसेल त्याला त्यांच्या महानतेचा पत्ताच लागणार नाही. त्यांना ज्या श्रेणीमध्ये ठेवण्यात आले आहे त्या श्रेणीची मजुरी घेऊन ते सारखे दगड फोडीत राहतात. हा मनुष्य किती यातना सहन करीत आहे याचा कोणास अंदाजच येणार नाही." (बापट भ. ग. २००२, पृ. ११९) एकीकडे ब्रिटिशांकडून स्वातंत्र्यसैनिकांची छळवणूक आणि दुसरीकडे गांधी तत्त्वज्ञानाने भारावलेल्या सत्याग्रहींची नम्रता यातला अंतर्विरोध अशा घटनांतून प्रकर्षाने अधोरेखित होत होता.

**शस्त्र - सत्याग्रह :**

शस्त्र न बाळगण्याचा सरकारी कायदा होता, हा कायदा न पाळून असहकार आंदोलन करण्याचा एक आगळा वेगळा सत्याग्रह १९२८ साली विदर्भात झाला. माणसाला आत्मसंरक्षणासाठी शस्त्र बाळगण्याचा अधिकार असला पाहिजे, अशी भूमिका घेऊन श्री. आवारी यांनी हा शस्त्र-सत्याग्रह घडवून आणला. आपल्या अन्य स्वयंसेवकांसोबत तलवारी हातात घेऊन रस्त्यावर चालत त्यांनी संचलन केले. पोलिसांनी ४ मे १९२८ रोजी आवारींना अटक केली; त्यांना ४ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. आवारींचा सत्याग्रह पुढे चालू ठेवण्यासाठी रामभाऊ रुईकर, ढवळे, तिजारे यांनी पुढाकार घेतला व तलवारी घेऊन ते रस्त्यावर उतरले. पोलिसांनी तलवारी जप्त करून सत्याग्रहींना अटक केली. डॉ.हेडगेवार यांनी या सत्याग्रह पद्धतीत एक महत्त्वाची सुधारणा केली. पोलिसांकडून सत्याग्रहींकडच्या तलवारी जप्त झाल्याने लोकांजवळचा शस्त्रसाठा आपोआप कमी होत होता व ते सरकारच्या पथ्यावरच पडत होते. ही चूक दुरुस्त करण्यासाठी सत्याग्रहींनी नकली शस्त्रे घेऊन सत्याग्रह करण्याचा पर्याय निवडण्यात आला. गांधीजींना ही कल्पना मान्य न झाल्याने १ जुलै १९२८ रोजी हा शस्त्र-सत्याग्रह मागे घेण्यात आला. (वक्काणी, २००३, पृ. ११३-११४)

## १.८. राजकीय प्रवाहांची अंतर्वतुळे :

देशभरात असहकार आंदोलन, राष्ट्रीय भावनेतून निघणाऱ्या मिरवणुका असे वातावरण तापलेले असतानाच भारतीय राजकारणात निरनिराळ्या विचारधारांचे अंतर्गत प्रवाह उफाळून येत होते. १९२० ते १९४७ या कालखंडातील राजकीय घटनाक्रमात गांधीजींच्या नेतृत्वाला अनुसरून लोकलढा संघटित झाला असला तरी या मध्यवर्ती प्रवाहाच्या आजुबाजूला खळाळत

असलेल्या अन्य राजकीय प्रवाहांनीही भारताच्या राजकीय पुनर्घटना निर्माणात आपापल्या परीने भूमिका निभावली आहे. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी केलेल्या पाहणीनुसार १९२६ साली देशात प्रागतिक पक्ष, स्वराज्य पक्ष, गांधी पक्ष, ब्राह्मणेतर पक्ष, मुसलमान पक्ष आणि हिंदु महासभा असे ६ ठळक पक्ष क्रियाशील होते. याखेरीज क्रांतिकारकांचा एक सातवा गटही क्रियाशील होता. शिवाय डॉ. केतकरांना स्वयंनिर्णयी पक्षाचा आठवा पर्यायही आणावयाचा होता, मात्र केतकरांकडून त्याची प्रत्यक्षात कार्यवाही झाली नाही; त्यामुळे तो संकल्पनात्मक पातळीवरचा एक आभासी पक्ष ठरला! या विविध पक्षांची व राजकीय गटांची भूमिका आणि त्यांचे कार्य यांचा थोडक्यात मागोवा इथे घ्यावयाचा आहे.

**फेरवादी अर्थात 'स्वराज्य' पक्ष :**

गांधीजींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय काँग्रेसमध्येही राजकीय उपपंथांची लघुवर्तुळे तयार होऊ लागली होती. एक मतप्रवाह काँग्रेसच्या विचारांत आणि धोरणांत बदल करण्याची गरज आहे असे म्हणणाऱ्यांचा होता. हा गट 'फेरवादी' म्हणून ओळखला जाई. अहिंसक व शांततामय मार्गाने चालणाऱ्या अंदोलनाला चिरडून टाकण्यासाठी लाठीमार, गोळीबार करण्यात येऊ लागल्यावर आपण स्वसंरक्षणासाठीसुद्धा प्रत्याघात करावयाचा नाही, हे गांधीजींचे तत्त्व या गटाला मान्य नव्हते. त्यामुळे राष्ट्रीय सभेच्या ध्येयात शांततामय मार्गाचा उल्लेख अप्रस्तुत असून तो काढून टाकावा, अशी मागणी या गटातून पुढे येत होती. ही मागणी करणाऱ्या गटाला 'फेरवादी'गट म्हणून संबोधले जाऊ लागले. असहकार आंदोलनातील कौन्सिल व न्यायालयावरील बहिष्काराची कल्पना या गटाला मान्य नव्हती. त्यापेक्षा कायदेमंडळाची निवडणूक लढवून आपले बहुमत प्रस्थापित करून सरकारला जाब विचारावा, असे त्यांचे मत होते. या गटात महाराष्ट्रातील न. चिं. केळकर, डॉ. बा. सी. मुंजे, बापूजी अणे, बॅ. दादासाहेब जयकर, अकोल्याचे एस. व्ही. केळकर, दादा धर्माधिकारी, मा. ज. कानिटकर इत्यादी पुढाऱ्यांचा समावेश होता. बंगाल व आंध्र प्रांतातूनही या गटाचे समर्थन करणारे लोक होते. बंगालच्या अमृतबझारपत्रिकेने लेख लिहून व आंध्रातील रंगास्वामी अय्यर, विजय राघवाचरिअर यांनी पत्रे लिहून फेरवादी गटाच्या भूमिकेचे समर्थन केले होते.

गांधीजींच्या असहकार आंदोलनात महाराष्ट्र, विदर्भ आणि मध्यप्रांतातील फेरवादी गटातल्या पुढाऱ्यांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पूर्ण सहयोग दिला होता; मात्र असहकार आंदोलनाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर फेरवादी गटाने १ जानेवारी १९२३ रोजी चित्तरंजन दास यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस अंतर्गत 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला. मोतीलाल नेहरू यांनी सचिवपदाची जबाबदारी स्वीकारली. गांधीजी तुरुंगात गेल्यानंतर १९२३ साली कायदेमंडळाच्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वराज्य पक्षाने आपले उमेदवार उभे केले;पक्षाचा निवडणुक जाहीरनामाही प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात आपला पक्ष काँग्रेस अंतर्गतच काम करेल, अहिंसा व असहकार या तत्त्वावर पक्षाचा विश्वास आहे, असे घोषित करण्यात आले. निवडून गेलेले लोकप्रतिनिधी कौन्सिलातून काँग्रेसचे ध्येय व पक्षाचा कार्यक्रम घेऊनच काम करतील अशी या पक्षाची राजनीती होती. निवडणुकीत प्रागतिक पक्षावर मात करून स्वराज्य

पक्षाने ४८ जागा मिळविल्या. या पक्षाने कायदेमंडळातही आपला ठसा उमटविला. ८ फेब्रुवारी १९२४ ला पक्षाने स्वयंशासीत वसाहतीचे स्वराज्य व प्रांतिक स्वायत्ततेची मागणी करणारा ठराव मांडला, अर्थात हा ठराव पारित होऊ शकला नाही. १७ मार्च १९२४ ला मोतीलाल नेहरूनी यांनी मांडलेला भारत कायद्यात सुधारणा करण्याचा ठराव मात्र पारित झाला.

लोकनायक अणे, डॉ. मुंजे, नरकेसरी अभ्यंकर , श्रीपाद तांबे, या स्वराज्य दलातल्या पुढाऱ्यांमुळे विदर्भ हा स्वराज्य दलाचा बालेकिल्ला बनला होता. १९२३ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जिंकलेल्या प्रतिनिधीत स्वराज्य दलाचे प्रतिनिधी अधिक होते. केंद्रातही बापूजी अणे, अभ्यंकर हे स्वराज्य दलाचे पुढारी निवडून गेले होते. (वक्काणी, २००३, पृ. १०६-१०७) वालचंद कोठारी हे आधी ब्राह्मणेतर पक्षात होते, परंतु स्वराज्य पक्षात दाखल झाल्यावर ते मुंबई प्रांतिक कायदेमंडळावर निवडून आले होते. १६ जून १९२५ रोजी चित्तरंजन दास यांचा मृत्यू झाला, त्यानंतर या पक्षात फूट पडली. लोकमान्य टिळकांच्या राजकारणावर श्रद्धा असणाऱ्यांनी 'प्रतियोगिता सहकार पक्ष' स्थापन केला.

१९२४ साली गांधीजींची अनपेक्षितपणे तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर १९२५ पर्यंत गांधीजींनी स्वराज्य पक्षाचे मन वळविण्याचे काम केले व काँग्रेसमधील फूट टाळली. काँग्रेस कार्यकर्त्यांना रचनात्मक कार्यात गुंतवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**नाफेर पक्ष अर्थात गांधी पक्ष :**

काँग्रेसच्या विचारांत आणि धोरणांत कोणताच बदल न करता गांधीजींच्या विचारानुसार पुढे जावे असे म्हणणाऱ्यांचा गट 'नाफेरवादी' म्हणून ओळखला जाई. या गटात महाराष्ट्रातील गंगाधरराव देशपांडे, शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, जमनालाल बजाज यांचा,तसेच महाराष्ट्राबाहेरील पं. सुंदरलाल, पं. माखनलाल चतुर्वेदी इत्यादींचा समावेश होता. प्रागतिक पक्षाला कौन्सिलमध्ये सहभाग घेऊनही द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग यशस्वी करण्यात यश लाभले नसल्याने कायदेकौन्सिलबाहेर लोकमानसात जागृती करून दबावगटाचे राजकारण करण्यात नाफेर पक्षाला रस होता. सरकारशी असहकार आणि अहिंसक प्रतिकाराच्या मार्गाने लोकलढा उभारणे ही या पक्षाच्या कामाची दिशा होती. डॉ. अन्सारी, राजगोपालाचारी, एस. कस्तुरीरंगा, अय्यंगार हे नेते नाफेर पक्षात सक्रिय होते.

**प्रागतिक पक्ष :**

कायदेकौन्सिलात अधिकारारूढ असलेला ह्या पक्षाचे मुंबई इलाख्यात फारसे काम नव्हते. मध्यप्रांत व मद्रास इलाख्यात या पक्षाला यश मिळाले होते. लोकांचे राजकीय शिक्षण करण्यासाठी या पक्षाकडे वेळ नव्हता.

**ब्राह्मणेतर पक्ष :**

महाराष्ट्रात व दक्षिण हिंदुस्थानात मद्रास इलाख्यात या पक्षाचे अस्तित्व होते. जातिविशिष्ट आकांक्षा असलेला पक्ष, असे केतकरांनी या पक्षाचे वर्णन केले होते. प्राप्तीच्या जागा असतील त्या विशिष्ट जातीस मिळविण्याची खटपट करणे यावर या पक्षाचा भर असे. ब्राह्मणेतरांत

सुशिक्षित वर्ग कमी असल्यामुळे कायदे मंडळांत किंवा सरकारी नोकऱ्यांत त्यांना पुरेशा जागा पटकावता येत नसत. हा अनुशेष भरून काढणे हे या पक्षाचे स्वाभाविक ध्येय होते. महाराष्ट्राच्या संदर्भात केतकरांनी नोंदवलेले निरीक्षण असे की, 'मराठ्यांमध्ये शिक्षण वाढून त्यांचा शासनयंत्रात शिरकाव जितका अधिक होईल तितका त्यांच्यामध्ये स्वराज्यवाद अधिक बळावत जाईल. मग त्यांच्या भिन्न आकांक्षा जर राहिल्या तर एवढ्याच राहतील की स्वराज्य तर प्राप्त करून घ्यावयाचेच, पण हाती अधिकार आला असता त्याचा फायदा ब्राह्मणांपेक्षा ब्राह्मणेतरांस, विशेषेकरून मराठा जातीला अधिक मिळवून द्यावयाचा. पण ही केवळ स्वजातीस आश्रय देण्याची इच्छाही अंगावर जबाबदारी पडली असता राहणार नाही. जबाबदारी पडली म्हणजे माणसांच्या लायकीप्रमाणे त्यास जागा मिळाव्या या धोरणाचाच ते पुरस्कार करतील." (केतकर, १९२६ पृ. २८) आज एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकातही या राजकीय वास्तवाचा तिढा कायम असल्याचे आपण पाहतो आहोत.

**मध्यप्रांत-वऱ्हाडातील ब्राह्मणेतर पक्ष :** मध्यप्रांत-वऱ्हाडातील ब्राह्मणेतर पक्षाची मुख्य कचेरी वर्धा येथे होती. "शेतकरी, मजूर व अस्पृश्य दीनबांधवांची धार्मिक, सामाजिक, राजकीय व औद्योगिक उन्नती" हेच ब्राह्मणेतर पक्षाचे ब्रीद असल्याचे २५ मे १९२६ च्या पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हटले होते. या जाहीरनाम्यात राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, स्वराज्य पक्ष, प्रतिसहकारवादी पक्ष, स्वतंत्र पक्ष यांचा उल्लेख 'ब्राह्मणी पक्ष' म्हणून करण्यात आला होता. ब्राह्मणी पक्षाच्या वर्णजातिवादी धेयधोरणांना विरोध करण्याची ब्राह्मणेतर पक्षाची भूमिका जाहीरनाम्यात स्पष्ट करण्यात आली होती. शांतता व सनदशीर मार्गाने साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वराज्य मागण्याची ब्राह्मणेतर पक्षाची भूमिका जाहीर करण्यात आली होती. कायदे कौन्सिलच्या निवडणुकीत तसेच जिल्हा लोकल बोर्ड, नगरपरिषदा, ग्रामपंचायतीत ब्राह्मणेतर सभासद निवडून आणून लोकप्रातिनिधिक संस्था ताब्यात घेणे हे राजकीय धोरण या जाहीरनाम्यातून स्पष्टपणे मांडण्यात आले होते. ब्राह्मणेतरांना लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळवून देण्यासाठी खटपट करण्याचा मानसही या जाहीरनाम्यातून व्यक्त करण्यात आला होता.खेडोपाडी ग्रामपंचायती स्थापन करणे, शाळा काढून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे, कायमधारा पद्धत अंमलात आणणे, शेतकरी व मजुरांचे औद्योगिक संघटन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. याखेरीज सत्यशोधक चळवळीतील ध्येयांप्रमाणे धर्माच्या नावाखाली दाने करू नयेत, ब्राह्मणांच्या पायाचे तीर्थ घेऊ नये, स्वत:चे विधी स्वत: करावे, अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा करावा, गोरक्षण व देवस्थाने हस्तगत करून त्यांचा निधी शिक्षणाकडे वळवावा, लग्नकार्यातला फाजील खर्च टाळावा,बालविवाह बंद करावेत, हुंड्याची चाल बंद करावी इत्यादी जनहिताची कलमेही या जाहीरनाम्यात घातलेली होती. शेवटी ब्राह्मणी काव्याला व भूलथापांना न फसता चौकस बुद्धीने विचार करून ब्राह्मणेतर पक्षाला मते द्या असे आवाहन करण्यात आले होते. ब्राह्मणेतर पक्षाची भूमिका व ध्येयवादाची सर्व कल्पना या जाहीरनाम्यातून मिळते.

ब्राह्मणेतर पक्षाप्रमाणेच अस्पृश्य वर्गातील राजकीय मानसिकतेची केतकरांनी नोंद घेतली

आहे. अस्पृश्य वर्ग हा अशिक्षित व संपत्तीने कनिष्ठ असल्यामुळे राजकीयदृष्ट्या या वर्गाला महत्त्व दिले जात नसे. मात्र या वर्गातील थोड्याशा सुशिक्षित लोकांच्या मनात स्वराज्य झाले तर आपली उन्नती फारशी होणार नाही अशी समजूत असल्याने कदाचित हा वर्ग स्वराज्य देऊ नका असेही सांगेल, अशी शंका केतकरांनी उपस्थित केली आहे. (केतकर, कित्ता, पृ. २८) स्पृश्य वर्गातील लोकांविषयी अस्पृश्यांच्या मनात असलेला अविश्वास हे तत्कालीन राजकीय-सामाजिक वास्तव केतकरांनी आधोरेखित केले आहे.

### मुसलमान पक्ष :

मुसलमान व ब्राह्मणेतर पक्ष हे वस्तुत: राजकीय पक्ष नसून देशातल्या देशात वाटणी जाती-विषयक व्हावी एवढ्याच संबंधाने विचार करणारे होते. खिलाफतीची जोपासना करणे आणि अल्पसंख्यांकांना संख्याबलापेक्षा अधिक फायदा व मान्यता मिळावी एवढीच त्यांची आकांक्षा होती. या पक्षाच्या खिलाफत चळवळीला गांधीजींचा पाठिंबा होता.

### हिंदू महासभा :

'हिंदू महासभा' या नावाने एक राजकीय गट या काळात उदयाला येत होता. १९१५ साली प्रयाग येथे पं. मदनमोहन मालवीय यांच्या नेतृत्वाखाली या संघटनेची स्थापना झाली होती. हिंदू वंश, संस्कृती आणि सभ्यतेची देखभाल, संरक्षण व प्रगतीसाठी आणि हिंदू राष्ट्राच्या गौरवासाठी हिंदू महासभा स्थापन करण्यात येत असल्याचे हिंदू महासभेच्या उद्देशपत्रिकेत म्हटले होते. ("The aim of the Hindu-Mahasabha is the maintenance, protection and promotion of Hindu race, Hindu culture and Hindu civilization for advancement and glory of Hindu Rashtra.") तसेच हिंदू महासभेच्या उद्देशसूचीत १० ठळक उद्दिष्टांची यादीही नमूद करण्यात आली होती. हिंदू हितसंबंधांचे रक्षण, अस्पृश्यतानिवारण, दलित समाजाचे पुनरुत्थान, हिंदू महिलांचे आदर्श, गो-रक्षण, सैनिक शाळा, स्वयंसेवकमंडळ, धर्मांतरीत हिंदूंना पुनश्च हिंदुधर्मात घेणे, हिंदूंचे धार्मिक, सामाईक, आर्थिक, शैक्षणिक हित जोपासणे, हिंदूमध्ये परस्पर स्नेहभाव वाढविणे इत्यादी उद्दिष्टांचा या उपक्रमसूचीत समावेश होता. लखनौला कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांच्यात झालेल्या कराराला हिंदू महासभेचा विरोध होता. १९१७ साली हरिद्वारच्या सभेत हिंदू महासभेने लखनौ कराराचा व मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांचा जाहीरपणे विरोध केला होता.

विदर्भात १९२३ साली हिंदुमहासभेची शाखा स्थापन झाली. १९२५ साली कलकत्ता येथे लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनास विदर्भातले पुढारी बॅ. मुकुंदराव जयकर उपस्थित होते. त्यानंतर फेब्रुवारी १९२६ मध्ये अकोल्यास हिंदूमहासभेचे अधिवेशन झाले. त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात अमरावती येथे बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाड हिंदू सामाजिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेच्या आयोजनात डॉ. मुंजे, राजा लक्ष्मणराव भोसले यांचा पुढाकार होता. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथेही १९२६ सालात अशाच प्रकारचे एक अधिवेशन घेण्यात

आले होते. त्यात क्रांतिकारक रामचंद्र कानिटकर यांनी हिंदूंच्या संघटनेचे महत्त्व सांगणारे बीजभाषण दिले होते. १९२७ साली अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे लाला लजपतराय, दादासाहेब खापर्डे व डॉ. मुंजे यांच्या उपस्थितीत हिंदू महासभेचे अधिवेशन झाले. अधिवेशनात लाला लजपतराय यांचे अस्पृश्योद्धारावर भाषण झाले. त्यांनी हिंदू धर्म हा राष्ट्रीय धर्म असून मानवता व राष्ट्रहित लक्षात घेऊन हिंदूंनी अस्पृश्यता नष्ट करण्याचे व्रत घेतले पाहिजे, असे आवाहन केले होते. (सावरकर-सूर्यकर,१९६४,पृ.१७७)१९२६ साली झालेल्या कायदेमंडळाच्या निवडणुकांत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा दिल्याचाही हिंदू महासभेकडून निषेध करण्यात आला होता. रौलट ॲक्ट, सायमन कमिशन, मुंबईपासून सिंध प्रांत वेगळा करणे या सर्वांना हिंदू महासभेने विरोध केला होता.

१९२७ साली हिंदूमहासभेचे अध्यक्ष या नात्याने डॉ. बा. शि. मुंजे यांनी गुजरात, पंजाब, बंगाल, संयुक्त प्रांतात दौरा करून हिंदुत्ववादी विचारसरणीचा प्रचार केला. आपल्या भाषणांतून त्यांनी हिंदूंच्या दुर्बलतेची मीमांसा करताना मांसाहाराचा अभाव हे एक कारण असल्याचे नमूद केले. इंग्लंडला दुसऱ्या गोलमेज परिषदेत त्यांनी हिंदू हित रक्षणाच्या मुद्द्यावर भर दिला. लोकशाही व राष्ट्रीयतेच्या मूल्यांच्या संवर्धनासाठी जातीय-धार्मिक तेढ बाजूला ठेवली पाहिजे व थोरला भाऊ या नात्याने हिंदूंना या प्रश्नावरून आपल्या धाकट्या मुस्लीम भावांचा कान पिळण्याचा अधिकार असल्याचे सौहार्दपूर्ण भाषण डॉ. मुंजे यांनी गोलमेज परिषदेत केले. (एम. आर. जयकर पेपर्स, धारिका ४३६, पृ.१५८/ वक्काणी २००३, पृ. १२४-१२५) या काळात हिंदू महासभा आपल्या विचारपीठांवरून हिंदू-मुस्लीम समरसता, जातीय ऐक्य या विषयांवर भर देत होती. यवतमाळ येथे गणेशोत्सवात बॅ. गोविंदराव देशमुख यांनी केवळ संख्याबळापेक्षा परस्पर सहकार्याच्या मूल्यावर अधिष्ठित असलेले जातींचे संघटन महत्त्वाचे कसे आहे, याविषयी विवेचन केले होते. मेंढ्यांचा कळप कितीही मोठा असला तरी एखादा लांडगा त्यांचा फडशा पाडू शकतो, अशा शब्दात त्यांनी फुटीरतेच्या धोक्याचा निर्देश केला होता.

हिंदू महासभेचे प्रारंभीचे आविष्कार हे सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे होते. हिंदू महासभेचे कार्यकर्ते कॉंग्रेसचेही कार्यकर्ते होते. मात्र १९३४ साली कॉंग्रेसच्या उच्चाधिकार मंडळाने कॉंग्रेस सदस्याने हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा संस्थांशी संबंध ठेवू नये, त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहू नये असा फतवा काढला. याचा परिणाम कॉंग्रेस व हिंदू महासभा यांच्या संबंधांवर पडणे स्वाभाविक होते.

१९३७ साली स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या उपस्थितीत अकोला येथे हिंदू महासभेचे अधिवेशन झाले. सावरकरांनी आपल्या भाषणातून 'स्वराज्य' संकल्पनेची व्याख्या केली. "जेथे सत्व शिल्लक आहे, त्याला मी स्वराज्य मानतो" अशी स्वराज्याची अस्मितामूल्यावर भर देणारी व्याख्या त्यांनी केली. सावरकारांची पुसद, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, अकोला , उमरेड, चंद्रपूर इत्यादी ठिकाणी भाषणे झाली. ११ डिसेंबर १९३८ रोजी नागपूरात सर्व पक्षांनी मिळून सावरकरांचे स्वागत केले. नागपूरच्या भाषणात हिंसा-अहिंसेतली भेदरेषा स्पष्ट करताना ते म्हणाले होते की, सत्कार्यासाठी केलेली हिंसा, अत्याचाराविरुद्ध लढताना झालेली हिंसा ही

अहिंसाच समजली पाहिजे. इंग्रजांचे रक्त सांडले तर हिंसा होते आणि हिंदूंचे रक्त सांडले तर मात्र ती अहिंसा होते का? असा प्रतिप्रश्न करून त्यांनी आपल्या मताचे समर्थन केले. २० मे १९३८ च्या अजमेरच्या भाषणात सावरकरांनी हिंदू महासभा मुस्लीम विरोधी नसल्याची स्पष्ट मांडणी केली होती :

"हिंदूंना जास्त अधिकार मिळावेत असं हिंदुमहासभा कधीच म्हणत नाही. स्वराज्य प्राप्त झाल्यावर हिंदुस्थानची जी संसद बनेल त्यात हिंदू, मुस्लीम, ईसाई, पारशी अथवा हिंदुस्थानवर प्रेम करणारा कोणताही मनुष्य असो त्या सर्वांना यथायोग्य अधिकार मिळायला हवेत अशी आमची इच्छा आहे. आमच्या संसदेचे स्वरूप अशा प्रकारचे असेल की त्या संसदेत पाय ठेवताच हिंदु-मुस्लिम-पारशी या भेदांचं अस्तित्वच राहणार नाही. सर्वच्या सर्व भारतीय या नावाने संबोधित होतील." (वक्काणी, २००३, पृ. १२७-१२८)

हिंदू महासभेचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये पं. मदनमोहन मालवीय, पुरीचे शंकराचार्य, स्वामी श्रद्धानंद सरस्वती, लाला लजपतराय, बा. शि. मुंजे, बॅ. वि. दा. सावरकर, न. चिं. केळकर, कुर्तकोटी शंकराचार्य, श्यामाप्रसाद मुखर्जी, ल. ब. भोपटकर इत्यादी मान्यवरांचा समावेश होता.

**क्रांतिकारकांचा गट :**

डॉ. केतकर यांनी सांगितलेल्या वरील ६ गटांखेरीज हिंदुस्थानच्या राजकारणात सशस्त्र व जहाल विचारधारेला अनुसरणारा क्रांतिकारकांचा एक सातवा गट अधूनमधून डोके वर काढीत होता. नाशिक परिसरात विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच क्रांतिकारकांचे एक गुप्त वर्तूळ नांदत होते. १८९९ साली वि. दा. सावरकर, म्हस्कर, पागे यांनी 'राष्ट्रभक्त समूह' नामक संघटना स्थापन केली होती व 'राम-हरी' या सांकेतिक नावाने ही संघटना आपल्या राजकीय उलाढाली करण्यावर भर देत होती. या गटातूनच १ जानेवारी १९०० रोजी 'मित्रमेळा' अर्थात 'अभिनव भारत' नावाची संघटना स्थापन झाली. मॅझिनीच्या 'यंग इटली'च्या सदृश 'अभिनव भारत' असे या संघटनेचे नामकरण करण्यात आले होते. वि. दा. सावरकर व त्यांचे बंधू बाबाराव सावरकर, दत्तोपंत केतकर, श्रीधर रघुनाथ वर्तक, कृष्णाजी बळवंत महाबळ, कवी गोविंद इत्यादी मंडळी या संघटनेत सामील होती. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने भारलेल्या या संघटनेने 'स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय' हा आपला मंत्र बनविला होता. शिवजयंती, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सभांचे आयोजन, पोवाडे, कवने, तालमी, वक्तृत्वकला असले उपक्रम करून राष्ट्रभावना जागृतीचे उपक्रम चालत. १९०४ साली वऱ्हाड, नागपूर, नाशिकच्या गुप्त संस्थांच्या प्रतिनिधींची एक बैठक होऊन क्रांतिकार्याची दिशा ठरविण्यात आली होती. संघटनेने टिळकांचा पन्नासावा वाढदिवस धडाक्याने साजरा केला होता. १९०६ साली वि. दा. सावरकर लंडनला गेल्यावर या संघटनेचे चालकत्व बाबाराव सावरकर यांनी स्वीकारले.

विदर्भाच्या राजकारणात क्रांतिकारी व जहाल विचारधारेला अनुसरणारा एक वर्ग अग्रेसर होता. १९०५ साली बुलढाण्याचे पं. कानडे शास्त्री हे पुण्याच्या राष्ट्रीय शाळेत शिकत असताना वासुदेव बळवंत फडके व चापेकरांसोबत शस्त्र चालविण्याचे शिक्षण घेत होते. १९०५-०६ साली 'आर्यबांधव समाजा'चे भाऊजी कावरे यांच्या नेतृत्वाखाली नागपूरात एक क्रांतिकारकांचा

गट कार्यरत होता. ब्रिटिशांना हाकलून लावण्यासाठी सशस्त्र उठाव करण्याकरिता एक गुप्त मोहिम चालविण्याच्या उद्देशाने ही संघटना स्थापन करण्यात आली होती. या संघटनेत डॉ.पांडुरंग खानखोजे, दे. गो. लांडगे, अंबादास लांडगे, उमरेडकर नारायणराव सोनटक्के, गजानन बक्षी, विठ्ठल बक्षी, गोविंदराव वेळेकर, विठ्ठल बाळकृष्ण, दत्तात्रेय वैद्य, केशव हेडगेवार, पं. रामलाल, सदाशिवराव केळकर, सरदार मोहिते, बाजीराव कुंभारे, इत्यादींचा समावेश होता. लाठ्याकाठ्यांचे शिक्षण हा या गटाचा एक प्राथमिक उपक्रम होता. या गटाने बॉम्ब बनविण्याचे तंत्र शिकण्याकरिता गोविंदराव वेळेकर यांना पोर्तुगीज हद्दीतील गोव्याला पाठवविले होते. वर्ध्याचे हरिकृष्ण जोशी हे केशव हेडगेवार यांचे सहकारी बनून क्रांतिकार्य करीत. लोकमान्य टिळकांचे एके काळचे सहकारी दादासाहेब खापर्डे यांनी आर्य बांधव समाजाच्या स्वयंसेवकांना बंदुकी तयार करण्याचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली होती. पोलिसांनाही खापर्डेंचा क्रांतिकारकांचा संबंध असल्याचा संशय होता. विशेषत: बंगालच्या गुप्त षडयंत्रातील रंगनाथ तिखे हे खापर्डे यांच्या अधिक जवळचे समजले जात. (वक्काणी, २००३, पृ. ८४) १९०५ साली नागपूरात आर्य बांधव समाजाने क्रांतिकारकांचा मेळा आयोजित केला होता, त्यात महाराष्ट्रातील तसेच बंगाल आणि पंजाबमधील गुप्तचर संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या मेळाव्यात देशांतर्गत लष्करी प्रशिक्षण केंद्रे सुरू करणे आणि लष्करी शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्यांना साहाय्य करण्याचा संकल्प करण्यात आला होता.त्यानुसार बॉम्ब तयार करण्याचे शिक्षण घेण्याकरिता हेमंत नायडू यांना जपानला व पांडुरंग खानखोजे यांना अमेरिकेला पाठविण्याचे ठरविण्यात आले. पुढे पांडुरंग खानखोजे यांनी अमेरिकेत गद्दार पार्टी स्थापन करून क्रांतिकार्य सुरू केले. पांडुरंग खानखोजे अमेरिकेत गेल्यावर रामलाल बजाज यांनी मध्य प्रांत वऱ्हाडात आणि उत्तर भारतात क्रांतिकार्याचा प्रसार केला. राष्ट्रीय सर्कस कंपनी स्थापन करून त्यामार्फत मल्लविद्या, कसरतीचे खेळ, घोडदौडीचे शिक्षण दिले जाऊ लागले. पुढे ही कंपनी कर्जाच्या विळख्यात सापडून बंद पडली. कलकत्त्याहून पिस्तुल आणि शस्त्रास्त्रे जमा करण्याची एक योजनाही त्यांनी आखली होती. मात्र त्यानंतर लवकरच रामलाल बाजपेयी यांना कानपूर कटात सहभागी झाल्याबद्दल अटक करण्यात आली. (Sharma, 1998, p. 9-10)

वंग-भंगानंतर विदर्भात जहाल विचारधारेच्या कार्यकर्त्यांनी 'वंदे मातरम्' आंदोलन छेडले. गव्हर्नर फुलर याने सार्वजनिक स्थळी 'वंदे मातरम' म्हणणे हा दखलपात्र गुन्हा असेल असे जाहीर पत्रक प्रसिद्ध केले. दादासाहेब खापर्डे यांचे निष्ठावंत भक्त श्यामराव देशपांडे व जयराम पाटील यांनी २८ जून १९०७ रोजी सार्वजनिक ठिकाणी 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्याच्या कारणावरून अटक करण्यात आली व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल करण्यात आला. दादासाहेब खापर्डेनी या दोघांचे वकिलपत्र घेऊन न्यायालयात ह्या देशभक्तांचे समर्थन केले. विद्यार्थ्यांनी सभा-प्रदर्शनात सहभागी होता कामा नये अशा आशयाचे एक परिपत्रक भारत सरकारचे गृहसचिव सर एच् रिस्ले यांनी १९०७ साली प्रांतीय सरकारांना व विभागप्रमुखांना पाठविले होते. 'रिस्ले सर्क्युलर' या नावाने या आदेशाचा उल्लेख केला जातो. ह्या रिस्ले

सर्क्युलरचा निषेध करण्यासाठी दादासाहेब खापर्डे यांनी अमरावतीस ११ ऑक्टोबर १९०७ रोजी जाहीर सभेचे आयोजन केले. या सभेत दादासाहेबांसह वीर वामनराव जोशी, य. गो. देशपांडे, मोरोपंत जोशी यांची निषेधाची भाषणे झाली. नागपूरचे नीलसिटी हायस्कूल हे विद्यार्थ्यांवर जहाल विचारांचे संस्कार करणारे केंद्र बनले होते. या हायस्कूलमध्ये रिस्ले सर्क्युलरची अंमलबजावणी होत आहे काय याचा तपास करण्याच्या मिषाने आलेल्या अधिकाऱ्याचे आगमन होताच तेथील विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्'चा जयघोष सुरू केला. त्यावेळी या शाळेतील केशवराव हेडगेवार व इतर विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकण्याची कारवाई करण्यात आली. याच कारणावरून नागपूरच्या मॉरिस कॉलेजातील ३० विद्यार्थ्यांना तुरुंगात डांबण्यात आले होते. नागपूरात राजकीय जाणीव जागृतीसाठी डॉ. मुंजे यांनी भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'विद्यार्थी समाजा'चा व नीळकंठराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली १९०६ साली स्थापन केलेल्या 'राष्ट्रीय मंडळा'चा तरुण विद्यार्थ्यांना ब्रिटिशविरोधी चळवळीत सक्रिय करण्यात मोठा वाटा होता.

४ नोव्हेंबर १९०८ रोजी नागपुरात महाराज बागेतील व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला काही क्रांतिकारकांनी डांबर फासले. त्यात नारायणराव परांजपे, अंबादास लांडगे गणू जोशी यांचा सहभाग होता. पोलिसांनी नारायणराव परांजपे यांना अटक करून गुन्हा दाखल केला होता. बुटी बोरीचे दुर्गादास महादेव खंगार गुरुजी हे ब्रिटिशांच्या बंगल्यावर असलेल्या गवती छतांवर गुप्तपणे फॉस्फरस टाकून छते पेटवून देण्याच्या कामात निष्णात होते. वीर वामनराव जोशी यांनी अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक शाळेतील ३०० विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रांतिकार्याचे शिक्षण दिले होते. क्रांतिवीर राजगुरू याची हनुमान व्यायामशाळा ही मातृसंस्था होती. तेथे त्याने तीन वर्षे शिक्षण घेतले होते.

### स्वयंनिर्णयी पक्ष :

सशस्त्र चळवळ करून हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळणे अशक्य असल्याने ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी वरील ७ पक्षांपेक्षा वेगळा असा 'स्वयंनिर्णयी पक्षा'चा नवा पर्याय सुचविला होता. ज्ञानकोशाचे काम आटोपल्यावर पूर्ण वेळ देशकार्यासाठी वाहून घेण्याचा संकल्पही त्यांनी जाहीर केला होता. ब्रिटिशांकडून राज्यकारभार ताब्यात घेतल्यानंतर देशाचा संपूर्ण कारभार चालविणाऱ्या कर्तृत्ववान लोकांचा जो वर्ग तयार होईल तोच स्वयंनिर्णयी संघ होय, अशी संकल्पनात्मक मांडणी डॉ. केतकर यांनी 'निःशस्त्रांचे राजकारण' या पुस्तकातून केली होती. ब्रिटिश राजवटीपूर्वी एतद्देशीय समाजास प्रातिनिधिक सत्तेचा परिचय नव्हता; राजेशाही म्हणजेच एकतंत्री राज्यपद्धतीतून आलेले पारंपरिक राजकीय संचित तेवढे जमेला होते. भारतीयांच्या राजकीय संस्कृतीतले हे अभावक्षेत्र आधुनिक राजकीय विचारांच्या लोकशिक्षणातून भरून काढणे हे आव्हान होते. यासाठी लोकशिक्षणाची चळवळ करणारा पूर्ण वेळ पगारी 'स्वयंनिर्णयी संघ' संघटित करण्याचा उपाय त्यांनी सुचविला होता. स्वराज्यप्राप्ती ही क्रांतिकारी चळवळ न राहता अंतस्थ सुधारणेची चळवळ असावी हे या योजनेमागचे मुख्य आशयसूत्र होते. स्वराज्य म्हणजे देशी नोकरांचा दर्जा वाढविणे, सदसद्विवेकबुद्धीला स्मरून

निर्भयपणे काम करण्याची सवय वाढविणे; हुजरेपणाच्या ऐवजी लोककल्याणाला महत्त्व देऊन कर्तव्यपरायण होणे, यासाठी पगारवाढीच्या पलीकडे जाऊन राष्ट्रहिताचा विचार करणारा संघ निर्माण करण्याचे आव्हान आपल्याला पेलायचे आहे, याची जाणीव केतकर करून देतात. थोडक्यात सांगायचे तर "या चळवळीचा अंतिम हेतू भिन्न राज्यसंस्था हा नसून देशांतील लोकांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा वाढविणे हा आहे.. देशातील लोकांनी आपला कारभार आपण चालविणे म्हणजे आपली पात्रता वाढविणे ही होय." (केतकर १९२६, पृ. ८३)

स्वराज्याची अपेक्षित व्याख्याही त्यांनी या पुस्तकात दिलेली आहे. "स्वराज्य म्हणजे प्रातिनिधिक संस्था (डोमोनियन स्टेट) असलेले लोकांचे राज्य". या व्याख्येतून केतकरांना 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' ही संकल्पना अभिप्रेत असल्याचे दिसते. "देशामध्ये उद्योगधंदा वाढावा, समाजातील शिक्षण चांगले वाढून प्रजा सुशिक्षित बनावी, रोगांचे नियंत्रण व्हावे, धंदा सुरळीत चालविण्यास लायक असे मोठे कार्यकारी निपजावेत, प्रत्येक व्यक्तीस आपल्या हिताहिताची जाणीव व्हावी यासारख्या सर्व सुधारणा करण्यास लागणारे स्वातंत्र्य मिळविणे हा नि:शस्त्र राजकारणाचा महत्त्वाचा भाग होय" अशी केतकरांची स्वराज्यासंबंधीची प्राथमिक धारणा होती. (केतकर, १९२६, पृ. ११-१२)

१९२९ साली ब्रिटिश मंत्रिमंडळ हिंदुस्थानातील जनतेला स्वराज्याचा नवीन हप्ता देईल असे जाहीर झाले होते, त्यामुळे येणाऱ्या चार वर्षांत आपण काय पूर्वतयारी केली पाहिजे, याचे चिंतन केतकरांनी केले आहे. प्रथम लोकांमध्ये बंधुत्व वाढविण्यासाठी, स्पृश्य-अस्पृश्यातले अंतर कमी करण्यासाठी सोवळेपणाची व विटाळाची भावना कमी करण्यासाठी, परमतसहिष्णुता वाढविण्यासाठी चळवळ करावी. त्यासाठी सार्वजनिक प्रार्थना, उपास यावर श्रद्धा असलेल्या गांधीजींच्या पुढारपणाचा निश्चित उपयोग होईल, असा विश्वास केतकरांनी व्यक्त केला आहे. त्यानंतरचा टप्पा म्हणजे हिंदुस्थानला डॉमिनियन स्टेटचा दर्जा मिळाला नाही तर इथल्या इंग्रज सरकारने काढलेल्या कर्जास हिंदुस्थानातील जनता जबाबदार असणार नाही, व या सरकारला कर्ज देताना इंग्रजी जनतेने विचार करावा, याची ब्रिटिशांना जाणीव करून द्यावी. त्यानंतर गांधीजींच्या कायदेभंग व असहकार चळवळीच्या तत्त्वानुसार करबंदीची चळवळ सुरू करावी. असे केल्याने सरकार कर चुकविणाऱ्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करेल, जप्त मालमत्तेचे लिलाव करेल. ही संभाव्य कारवाई लक्षात घेऊन स्वयंसेवी संघाने सर्व राष्ट्राकडून त्याआधीच सत्याग्रहींची इस्टेट विकत न घेण्याचे अभिवचन मिळविण्याचे काम पूर्ण करावे; त्यामुळे सरकार अडचणीत येईल. १९२३-२४ साली सरकारचा वसूल १३ कोट पौंड होता आणि कर्ज ८९ कोट पौंड होते. म्हणजे वार्षिक वसुलाच्या सात पट कर्ज होते. अशा स्थितीत करबंदीमुळे आणखी कर्ज काढून सरकार चालविणे कठीण होईल अशी परिस्थिती निर्माण होईल, व ब्रिटिशांना हिंदुस्थानातील जनतेला स्वराज्य देण्याचा विचार करावाच लागेल. या चळवळीत शाळा, कोर्टे, कौन्सिले यावर बहिष्कार घालण्याचा राजकीय कार्यक्रम, किंवा यंत्राने केलेला माल न वापरता खादी वापरण्याचा गांधीजींचा स्वदेशीचा विचार मध्ये आणू नये, असाही सल्ला

केतकर देऊ इच्छितात. या कामात देशांतर्गत सर्व राजकीय पक्षांचा सहभाग मिळवावा व कुठल्याही परिस्थितीत या चळवळीस जातिविद्वेषी स्वरूप येऊ न देता ती शुद्ध राजकीय चळवळ राहील याची दक्षता घेण्याचा इशाराही केतकरांनी दिला आहे. अशी लोकचळवळ करणारा वर्ग कायदेकौन्सिलांपासून अलिप्त राहावा अशी गांधीजींचीही कल्पना होती. कॉंग्रेसमधून पुढे आलेली "सेवादला"ची संकल्पना या प्रकारच्या राजकीय लोकशिक्षणाच्या विचारांशी मिळतीजुळती आहे.

समाजशास्त्रीय मूल्यदृष्टीतून हा मुद्दा स्पष्ट करताना केतकरांनी आपल्या मानसिकतेत व सामाजिक मूल्यादर्शांमध्ये नेमका कोणता बदल व्हायला हवा यावर अचूक बोट ठेवले आहे. उदाहरणार्थ, अस्पृश्य वर्गाने आपली स्थिती सुधारावी म्हणून खटपट केली तर ती हिंदुत्वाविरोधी होणार नाही; जे लोक स्वतंत्र समाजाचे नागरिक व्हावयाचे त्यांनी आपल्या धार्मिक किंवा नैतिक समजुती आपण दुसऱ्यावर लादाव्या आणि दुसऱ्याने त्या स्वीकारल्या नाहीत तर त्याचा छळ करावा ही बुद्धी उपयोगाची नाही, त्यांची अंत:करणे स्वतंत्र असली पाहिजेत. सामान्यत: स्वराज्याच्या चळवळीत मधमवर्गीय पुढे असतात; शेतकरी किंवा मजूर वर्ग बराचसा अनभिज्ञ असतो.. त्यामुळे सामान्यजनांचा इंग्रज लोकांपेक्षा मध्यमवर्गावर अधिक विश्वास उत्पन्न होईल, अशी स्थिती येऊ लागली म्हणजे स्वराज्याचा जन्म झाला असे मी समजेल, असे केतकरांनी म्हटले होते. (केतकर, १९२६, पृ. १२१-१२२) पुढे घटनाकारांनीही या सामाजिक समतोलाच्या मुद्द्याला केंद्रस्थानी आणलेले आहे. लोकशाही मूल्यचौकटीची पूर्वतयारी या प्रकारच्या विचारमंथनातून होत होती. अर्थात या राजकीय विचारदर्शनाला केतकरांना कृतिकार्यक्रमाची जोड देता न आल्याने भारताच्या राजकीय पुनर्घटनेचे एक संकल्पचित्र इतकेच या मांडणीचे मर्यादित महत्त्व आहे.

डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी १९२३ पर्यंत भारतात अस्तित्वात असलेल्या वरील विविध राजकीय प्रवाहांखेरीज पुढे आणखी काही नवे राजकीय पंथ-संघटना अस्तित्वात आल्या, त्यांचीही साररूपाने इथे नोंद घ्यावयाची आहे.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (स्थापना १९२५) :

खिलाफत चळवळ फसल्यानंतर तरुण पिढीत आलेले नैराश्य आणि १९२३ च्या सांप्रदायिक दंगलींमुळे नागपूर परिसरात तणावाचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर तरुण पिढीतली राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्यासाठी व त्यांच्यात नवे चैतन्य निर्माण करण्यासाठी १९२५ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर डॉ.केशव बळीराम हेडगेवार (१८८९-१९४०) यांनी नागपूरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन केला. 'बॉईज् स्कॉऊट' प्रमाणे तरुणांना शारीरिक शिक्षण देणारी संघटना असे या संघटनेचे प्रारंभीचे स्वरुप होते. या संघटनेची लिखित घटना नाही, सभासद नोंदणीची लिखित नोंदपद्धती नाही. मात्र या संघटनेने हिंदुत्ववादी संघटना म्हणून आपली पुढची वाटचाल सुरू केली. बॅ. सावरकर यांची हिंदू राष्ट्राची संकल्पना हाच या संघटनेचा वैचारिक आधार होता. हिंदू हेच भारतीय उपखंडातील मूळ निवासी असून त्यांचा एकात्म राष्ट्रीय जनसमुदाय म्हणजे हिंदू राष्ट्र, या संकल्पनेला प्रमाण मानून संघाची वाटचाल

सुरू होती. संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार हे लोकमान्य टिळकांच्या विचारांना अनुसरणारे व राष्ट्रीय काँग्रेसचे १९३१ पर्यंत क्रियाशील सदस्य होते. त्याचवेळी १९२६ ते १९३१ या काळात ते हिंदू महासभेचे चिटणीसही होते. १९३२ च्या काँग्रेसच्या असहकार चळवळीत त्यांना तुरुंगवासही झाला होता. स्थापनेपासून १५ वर्षे ते सरसंघचालक होते. डॉ. बा. शि. मुंजे यांचे संघाच्या जडघडणीत महत्त्वाचे योगदान होते. १९२७ साली महाराष्ट्र व मध्य प्रांतात संघाचा प्रचार व विस्तार करण्याची जबाबदारी डॉ. मुंजे यांनी स्वत:कडे घेतली होती. त्यांनी आपल्या रोजनिशीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना 'बालिल्ला' आणि 'अवांतगार्दे' या संघटनांसारखीच असल्याचे म्हटले आहे. (वाणी, २००५, पृ. १५) यावरून राष्ट्रीय स्वयंसेवक संघासमोर मुसोलिनी आणि हिटलर यांच्या फॅसिझम आणि नाझीझमचा आदर्श होता या समजुतीला दुजोरा मिळतो. स्वत: मुंजे यांनी मार्च १९३१ मध्ये इटलीत मुसोलिनीची भेट घेतली होती. तिथल्या 'फॅसिस्ट अकादेमी ऑफ फिजिकल एज्युकेशन', 'बालिल्ला', व 'अवांतगार्दे' या फॅसिस्ट विचारसरणीच्या तरुणांच्या संघटनांना त्यांनी भेटी दिल्या होत्या. फॅसिझमच्या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक माणूस हा भिन्न भिन्न व्यक्ती नसून तो समाजाचा अवयव वा घटक आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, खाजगी मालकी यापेक्षा देशभक्ती, स्वार्थत्याग, कर्तव्यनिष्ठा यांना फॅसिझम अधिक महत्त्व देतो. स्वातंत्र्य व कर्तव्य अलग करता येत नाही, असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे वैयक्तिक स्वार्थाची फिकीर न करता समाजहितासाठी झटणे व त्यासाठी स्वार्थत्याग, देशभक्ती व समाज-व्यवहाराचे ज्ञान अंगी बाणवून घेण्याचे बंधन व्यक्तिमात्रावर आहे, असे मानणारे हे तत्त्वज्ञान होते. स्वाभाविकच माणसाचे व्यक्तित्व, शील व श्रद्धा यांचा विकास करणे हे फॅसिझमचे कार्य असल्याची समजूत होती. मात्र हे साध्य करण्यासाठी प्रबोधनापेक्षा राज्यसत्ताबलाने शिस्तीची अंमलबजावणी करावी, अशी फॅसिस्टांची धारणा होती. (गाडगीळ पां. वा.१९३९, पृ. २०-२८) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एकूण कार्यपद्धतीत एकचालकानुवर्तीत्व, सैनिकीकरण, वंश-जाती श्रेष्ठत्वाचा अहंकार, पौराणिक-ऐतिहासिक प्रतीकांचे उदात्तीकरण, राष्ट्रीय ऐक्यावर भर, वांशिक अल्पसंख्यांकांना राष्ट्रीयतेच्या संकल्पनेतून वगळणे यावर भर असल्याने त्याचा चेहरा-मोहरा फॅसिस्ट संघटनेला जवळ जाणारा असल्याची भावना दृढ होऊ लागली होती. १९३४ पासून संघाने हिंदूंच्या लष्करीकरणाच्या मुद्द्यावर भर द्यायला सुरुवात केली. १९३९ साली गोळवलकर गुरुजींनी 'आम्ही आमच्या राष्ट्रीयत्वाची व्याख्या' या त्यांच्या पुस्तकात हिटलरच्या राष्ट्रवादाचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता, यावरूनही संघाच्या विचारधारेवर फॅसिझमचा प्रभाव असल्याचे लक्षात येते. १९३९ साली पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर हिटलरच्या अत्याचारांच्या हकिगती पुढे येऊ लागल्यावर मात्र २९ एप्रिल १९४३ रोजी संघाने एक परिपत्रक प्रसिद्ध करून संघाचा सैनिकी विभाग बंद केल्याचे जाहीर केले. त्यामागचे स्पष्टीकरण देताना या परिपत्रकात म्हटले होते की, "सैनिकी शिक्षण आणि संचलन, त्याचप्रमाणे गणवेश याविषयी शासनाच्या आधीच्या हुकुमानुसार आणि संघाच्या संघटनेने कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करणे उचित असल्यामुळे संघाचा सैनिकी विभाग बंद करण्यात आला आहे." (वाणी, २००५, पृ. २४)

१९३६ साली संघाने महिलांसाठी 'राष्ट्र सेविका समिती' नावाने एक समांतर संघटना सुरू केली. हिंदू राष्ट्राच्या उभारणीत महिलांचा सक्रिय सहभाग ही यामागची भूमिका होती. महिलांनाही लष्करी शिक्षण देणे, पुरुषी अत्याचारांचा सामना करण्यासाठी त्यांचे सबलीकरण करणे, हुंड्यासारख्या प्रथांचा प्रतिवाद करण्यासाठी संघटनात्मक ताकद वाढविणे इत्यादी उद्दिष्टांनी समितीचे काम सुरू झाले. संघाच्या कार्यपद्धतीप्रमाणे समितीच्या महिलाही शाखा लावणे, शिबिरे घेणे हे उपक्रम करीत आल्या आहेत. (Kohali, 2014 :"Hindutva's Other Half", Hinustan Times, 29 April 2014))

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ब्रिटिश वसाहतवादाचा उघड उघड विरोध करण्याचे टाळले. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनातही संघाने भाग घेतला नाही, असे मुंबई राज्याच्या गृहखात्याच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. (वाणी, २००५, पृ. २५). हेडगेवारानंतर संघाचे सरसंघचालकत्व निभावणारे गोळवलकर गुरुजी यांनी १९४७ साली दिल्लीत संघ कार्यकर्त्यांसमोर दिलेल्या भाषणात म्हटले होते की, "ब्रिटिशांना हाकलून लावण्याच्या तीव्र इच्छेने अनेकांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. पण आपण हे विसरतो की आपल्या प्रतिज्ञेत आपण जेव्हा स्वातंत्र्य हा शब्द उच्चारतो, त्याचा संबंध हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी असतो. आपल्या प्रतिज्ञेत ब्रिटिशांना हाकलून लावले पाहिजे, असे कोठेच म्हटलेले नाही." (श्री गुरुजी समग्र दर्शन, खंड ४, पृ. २; उद्धृत : वाणी,२००५, पृ. २७) त्यामुळे ब्रिटिश सत्तेला घालवून देण्यापेक्षा हिंदूंची राष्ट्रीय संघटना बांधणे हाच संघाचा अग्रक्रम राहिला. ज्यांची पुण्यभूमी आणि मातृभूमी हिंदुस्थान, ते सारे हिंदू; पण ज्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारला ते परके या सावरकरप्रणीत हिंदुत्वाच्या व्याख्येवर संघाचा हिंदुत्ववाद उभा राहिल्याने मुसलमान व ख्रिश्चन लोकांना संघाने आपल्या परिवारात सामावून घेण्याला महत्त्व दिले नाही. संघाच्या या एकारलेल्या भूमिकेमुळे त्यास सार्वत्रिक पाठिंबा मिळू शकला नाही.

राष्ट्रजीवनातली दुही वाढू नये यासाठी भारतातील अल्पसंख्यांकांनी आपला वेगळेपणा न मांडता राष्ट्रजीवनाशी समरस झाले पाहिजे, अशी भूमिका स्वातंत्र्योत्तर काळात गोळवलकर गुरुजी मांडत होते. मुसलमानांचे पूर्वज हिंदूच होते, त्यामुळे त्यांनी हिंदू धर्मात परत यावे, असे आवाहनही त्यांनी केले होते. बिगर हिंदूंनी हिंदू धर्मात परत येण्याच्या प्रक्रियेला 'शुद्धीकरण' असे न म्हणता 'परावर्तन' किंवा 'स्वगृही येणे' (आजच्या परिभाषेत *'घरवापसी'*) असा शब्दप्रयोग त्यांनी जाणीवपूर्वक वापरला होता. अर्थात हिंदु धर्मात आपण परत आलो आहोत याची भावना जागविण्यासाठी 'शुद्धीकरण विधी' मात्र त्यांना हवा होता. (गोळवलकर, १९६९, पृ. ५)

### कम्युनिस्ट पक्ष (स्थापना १९२५):

१९२५ साली कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला होता, त्याची नोंद केतकरांनी घेतलेली नाही. अर्थात ब्रिटिशांनी त्याचवेळी हा पक्ष बेकायदेशीर ठरवला होता, हे अलाहिदा! अर्थात, त्यापूर्वी १९१७ साली बोल्शेव्हिक क्रांती झाल्यानंतर रशियात ऑक्टोबर १९२० मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्याचा प्रारंभिक प्रयत्न झाला होता. मुंबईतल्या गिरणी कामगारांच्या लढ्यातून कम्युनिस्ट पक्षाची वाटचाल सुरू झाली होती. (आर्थिक स्थित्यंतरांच्या

इतिहासात विसाव्या शतकातील कामगार संघटना व या काळात झालेल्या संपांचा विस्ताराने वृत्तांत कथन केला आहे, तो पहावा.) १९०८ साली लोकमान्य टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली, तेव्हा त्याचा निषेध म्हणून दहा हजार गिरणी कामगारांनी उत्स्फूर्तपणे संप केला होता. लेनिनने ह्या लढ्याचे वर्णन 'वर्गीय व राजकीय स्वरूपाचा लढा' असे केले होते. लेनिनने टिळकांचा 'शोषितांचे पुढारी' म्हणून गौरव केला होता. (लेनिन, १९७२/ आराडकर-मेनन, २००४, पृ. ७६-८०) या लढ्यात २०० कामगारांची आहुती पडली होती. टिळक हयात असतानाच 'आयटक' या कामगार संघटनेची स्थापना करण्याचे प्रस्तावित होते; मात्र १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाल्यामुळे ३१ ऑक्टोबरपर्यंत ही स्थापना लांबली. या स्थापना समारंभाला लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू, अवंतिकाबाई गोखले, न. चिं. केळकर, विठ्ठलभाई पटेल. ॲनी बेझंट, बॅ. जिना इत्यादी नेते उपस्थित होते. त्यानंतर ना. म. जोशी यांनी १९२५ साली 'बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन' स्थापन केली. मुंबईला 'शेतकरी कामगार पक्ष' या नावाखाली कम्युनिस्टांचा एक गट क्रियाशील होता. या शेतकरी कामगार पक्षाने १ मे १९२७ रोजी पहिला मे दिन (कामगार दिन) साजरा केला.

१९२८ साली श्रीपाद अमृत डांगे यांनी 'लाल बावटा युनियन' स्थापन केली व ६ महिन्यांचा संप केला. १९२५ ते १९४० या काळात डांग्यांच्या लाल बावटा युनियनचे गिरणी कामगारांत वर्चस्व होते. १९२९ साली भारताचे साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्याचा कट रचण्यात आला, असा आरोप ठेवून ३३ कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अटक केली व डांगे, शौकत उस्मानी, नलिनी गुप्ता आणि मुझफ्फर अहमद यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांना चार वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली.

**नागपूरातील कम्युनिस्ट पक्ष :**

१९२८ च्या मिरत खटल्यात धुंडिराजपंत ठेंगडी यांना अटक झाल्यानंतर १९३३ साली कॉ. एम. एल. जयवंत, पी. डी. म्हात्रे, एम. वाय कोल्हटकर यांनी नागपूरात कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. कामगार पुढारी एस. ए. छोटुमल, मारुती मेश्राम इत्यादींनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. १९३४ ते १९४२ पर्यंत या पक्षावर बंदी घालण्यात आल्याने कामगार संघटना व अन्य उपक्रमांतून हे कार्यकर्ते आपल्या कार्यक्षेत्रात क्रियाशील राहण्याचा प्रयत्न करीत होते. मगनलाल बागडी, श्यामनारायण काश्मिरी आणि बी. एन्. मुखर्जी यांनी *'मार्क्सिस्ट क्लब'* स्थापन करून मार्क्स-एंगल्सच्या साहित्याचे वाचन करण्याचा उपक्रम सुरु केला. (Sharma, 1998, p. 36)

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी कम्युनिस्टांनी युद्धविरोधी भूमिका घेतली होती व २ ऑक्टोबर १९३९ रोजी मुंबईत ९० हजार गिरणी कामगारांनी युद्धविरोधी संप केला होता. मात्र १९४१ साली हिटलरने सोव्हिएत रशियावर हल्ला केल्यानंतर कॉ. डांगे, रणदिवे व बाटलीवाला यांनी युद्धाला पाठिंबा देण्याची ऐतिहासिक गरज असल्याची नवी भूमिका मांडली. या भूमिकेची मांडणी करणारे विवेचन *'देवळी प्रबंध'* नावाने ओळखले जाते. या बदललेल्या धोरणानुसार कामगारांनी उत्पन्न वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा व मालकांशी संघर्ष टाळावा अशी उफराटी

भूमिका मांडण्यात आली; संप करणे म्हणजे विश्वासघात असे नवे समीकरण पुढे आले. यामुळे कामगार वर्गात कम्युनिस्टांची पत घसरली व त्यांच्या अनुयायांचीही संख्या रोडावत गेली. काँग्रेसमधल्या समाजवादी गटाने या भूमिकेचा तीव्र विरोध केला.

१९४६ सालच्या नाविक बंडातही मुंबईच्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालच्या गिरणी कामगारांची साथ होती. १९४६ साली कम्युनिस्ट पक्षाने प्रचारासाठी पहिले कलापथक काढले, 'लोकनाट्य' ह्या मंचीय कलाप्रकारातून प्रचाराचे कार्य सुरू केले. शाहीर अमरशेख, अण्णाभाऊ साठे, आणि शाहीर गव्हाणकर यांनी पोवाडे व लोकनाट्याच्या माध्यमातून वैचारिक जागरणाचे नवे पर्व सुरू केले. अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, पां. वा. गाडगीळ, पु. य. देशपांडे यांनी कम्युनिस्ट विचारधारा रूजविणारे लेखन केले. कम्युनिस्ट पक्षाची वाढ प्रामुख्याने मुंबईत झाली. कामगार लढ्याखेरीज 'कसेल त्याची जमीन' या प्रश्नावरूनही कम्युनिस्टांनी शेतकऱ्यांसाठी लढा उभा केला होता. कम्युनिस्टांनी काँग्रेसमध्ये राहूनही आपल्या विचारधारेला साजेसे काम चालू ठेवले होते. राष्ट्रीय काँग्रेस कमिटीत २० सभासद कम्युनिस्ट होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातल्या कम्युनिस्ट पक्षाच्या अस्तित्वाचे एक स्मृतिचित्र वसंत भोर या कामगार कार्यकर्त्याने रेखाटले आहे; कम्युनिस्टांच्या लोककेंद्री कामाच्या स्वरूपाची कल्पना यावी, यासाठी इथे उद्‌धृत करीत आहोत :

"त्यावेळी पार्टी तशी लहान होती. वेलनिट होती. खेतवाडीत असलेल्या राजभवन बिल्डिंगमध्ये पार्टीचं कम्यून होतं. एकत्र जेवण्याची व्यवस्था असायची. स्वत:ची भांडी, स्वत:चे कपडे स्वत: धुवायचे. इव्हन बलराज सहानींसारखे लोक होते. कैफी आझमी होते. एका रूममध्ये दोनदोन, तीनतीन माणसं. फॅमिली म्हणजे नवरा बायको असली तर त्यांना एक रूम द्यायचे. सर्व विदाऊट रेन्ट. त्यावेळचे जे वातावरण होतं ना, त्यात एक अटॅचमेंट होती." (आडारकर-मेनन, २००७, पृ. ६३) विशिष्ट विचारसरणीने भारावलेले तरुण महाराष्ट्राच्या राजकीय पक्षबांधणीच्या कामात कसे झोकून देत होते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. राजकीय संघर्षासाठी कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर आधारलेल्या नवविचारांची बांधिलकी घेऊन काम करणारी शिस्तबद्ध संघटना अशी या पक्षाची ओळख होती.

## १.९. गांधीपर्वातील राजकीय घडामोडी

१९२० ते १९३० या दशकातील भारताच्या व पर्यायाने महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांच्या वैचारिक व संघटनात्मक बांधणीची स्थूल पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास ७-८ राजकीय पक्ष आपापल्या परीने राजकीय संघटना बांधणीचे कार्य करीत होते. असे असले तरी प्रामुख्याने राष्ट्रीय काँग्रेस आणि म. गांधीजींचे नेतृत्व यांनी विसाव्या शतकातील भारतीय व पर्यायाने महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाची जडणघडण करण्याचे काम केले होते, असे स्थूलमानाने म्हणता येईल. आता या नंतरच्या काळातील राजकीय घटितांचा मागोवा घेऊ या.

**सायमन कमिशन :**

८ नोव्हेंबर १९२७ रोजी ब्रिटिश सरकारने माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या कार्यवाहीचा अभ्यास करण्यासाठी सायमन कमिशन नेमल्याची घोषणा केली. घटनात्मक सुधारणांचा पुढचा

हल्ला या कमिशनच्या शिफारशींवर अवलंबून होता. मात्र या कमिशनवर एकही भारतीय सदस्याची नेमणूक न केल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याची भूमिका घेतली. स्वत:च्या देशाची घटना कशी असावी हे ठरविण्याचा अधिकार देखील ब्रिटिशांनी भारतीयांना दिला नाही म्हणून तेजबहाद्दूर सप्रू यांनी सायमन कमिशनवर टीका केली. मुस्लीम लीगमध्ये मात्र या मुद्यावरून दुफळी माजली. पंजाबातील मुस्लीम लीग नेते महम्मद शफी यांनी सायमन आयोगाला सहकार्य करण्याचे ठरविले. बॅ. जिना यांच्या नेतृत्वाखालील मुस्लीम लीगने मात्र आयोगावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. ३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन आयोग मुंबईत दाखल झाला तेव्हा मुंबईचे महापौर युसुफ मेहेरअली व 'बॉम्बे युथ लीग' संघटनेच्या तरुण कार्यकर्त्यांनी 'सायमन गो बॅक'च्या घोषणा दिल्या. जिना, त्यांचे सहकारी बॅ. महम्मद करीम छगला यांनी काँग्रेस, उदारमतवादी पक्ष व हिंदुमहासभा यांच्या बरोबर हरताळ पाळून निदर्शने करण्यात सहकार्य केले. सायमन कमिशनवर हिंदुस्तानातील राजकीय पक्षांनी बहिष्कार घातल्यामुळे भारतातील पुढाऱ्यांनीच सर्वसंमतीने एक घटना बनवावी, असे हुजूर पक्षाकडून आवाहन करण्यात आले; ते स्वीकारण्यात येऊन दिल्लीत १२ फेब्रुवारी १९२८ रोजी काँग्रेस अध्यक्ष डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षांची परिषद झाली. या परिषदेला म. गांधी हजर नव्हते; मात्र मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, लाला लजपतराय, मदनमोहन मालवीय; महाराष्ट्रातून बॅ. जयकर, बॅ. जिना हजर होते. या परिषदेत 'वसाहतीचे स्वराज्य' की 'संपूर्ण स्वातंत्र्य' यावर एकमत होऊ शकले नाही.(फडके य. दि., १९८६, पृ. ४८-४९)

१४ मार्च १९२८ रोजी सायमन नागपूरला आले तेव्हा दहा हजार लोकांनी 'सायमन चले जाव'च्या घोषणा देत निदर्शने केली. डॉ. केदार यांनी 'मध्यप्रांत-वऱ्हाड' विधानसभेत "गोलमेज परिषदेची मागणी होईपर्यंत हे विधिमंडळ सायमन कमिशनला कोणतेही सहकार्य करणार नाही" असा ठराव मांडला. विदर्भ प्रांत हिंदू महासभा, नागपूरातील यूथ लीग आणि महाराष्ट्रातील सर्व भागातून सायमन कमिशनविरोधी निदर्शने करण्यात आली.

बॅ. जिना विलायतेत गेल्यानंतर १ मे १९२८ रोजी डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेत पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटनेचा आराखडा तयार करण्याकरिता एक सर्वपक्षीय समिती नेमली. या समितीत ९ सभासद होते, त्यात सर अली इमाम व शोएब कुरेशी हे मुसलमानांचे प्रतिनिधी होते. सर्वपक्षीय परिषदेने नेमलेल्या समितीचा अहवाल २१ ऑगस्ट १९२८ रोजी प्रसिद्ध झाला. 'नेहरू रिपोर्ट' म्हणून तो प्रसिद्ध आहे. या अहवालात वसाहतीच्या स्वराज्याच्या धर्तीवर 'ब्रिटिश हिंदुस्थान'ची घटना सुचविण्यात आली. या समितीने स्वतंत्र जातीय मतदारसंघ नष्ट करण्याची तसेच अल्पसंख्यांकांना प्रमाणापेक्षा जास्त जागा देऊ नयेत अशी शिफारस केली. अल्पसंख्याकांसाठी मूलभूत हक्कांची योजनाही करण्यात आली; मुंबई इलाख्यात अंतर्भूत असलेला सिंध व वायव्य सरहद्दीचा प्रदेश यांना स्वतंत्र प्रांताचा दर्जा देण्याची मागणी मान्य करण्यात आली. यानंतर ३० मार्च १९२९ रोजी दिल्लीत आगाखान यांच्या नेतृत्वाखाली

अखिल भारतीय मुसलमान परिषद भरली व जिना यांनी मांडलेल्या चौदा मागण्यांना मुसलमानांचा एकमुखी पाठिंबा जाहीर करण्यात आला. मुस्लीम समाजाला कायदेमंडळात आपल्या संख्येच्या प्रमाणापेक्षा जास्ती जागा हव्या होत्या, त्यामुळे मुसलमानांसाठी विभक्त मतदारसंघांची मागणी कायम राहिली; शिवाय ज्या प्रदेशात ते अल्पसंख्य असतील तेथे त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक जागा पाहिजेत हा आग्रह कायम राहिला.

काँग्रेसच्या एकात्म राष्ट्रीय बांधणीला सुरुंग लावणारे जातिकेंद्री राजकारण उसळी मारून वर आल्यामुळे निर्माण झालेला गुंता सोडविण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस व जवाहरलाल नेहरू या पुढाऱ्यांनी महात्मा गांधींच्या विचारांशी सहमत न होता स्वतंत्र पवित्रा घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी घटनात्मक सुधारणांचा हप्ता मागण्याऐवजी संपूर्ण स्वराज्याचीच मागणी करावी यासाठी काँग्रेसमध्ये दबावगट निर्माण केला. अखेर या गटाशी गांधीजींनी तडजोड केली व १९२८ पर्यंत ब्रिटनने वसाहतीच्या स्वराज्याची मागणी पूर्ण केली नाही, तर 'संपूर्ण स्वराज्य' हेच काँग्रेसचे धोरण राहील असे जाहीर करण्यात आले. १९२८ च्या काँग्रेस अधिवेशनातून सरकारला हा निर्वाणीचा इशारा देण्यात आला. दरम्यान इंग्लंडमध्ये १९२९ मध्ये मजूर पक्षाचे मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले. भारतीय राजकारणातले सर्व अंत:प्रवाह लक्षात घेऊन ३१ ऑक्टोबर १९२९ रोजी व्हाइसरॉय आयर्विन यांनी घटनात्मक सुधारणांचा मसुदा तयार करण्यासाठी हिंदुस्थानातल्या सर्व राजकीय-सामाजिक गटांचा सहभाग असणारी गोलमेज परिषद भरविण्याचे घोषित केले. या घोषणेला पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे ३१ डिसेंबर १९२९ रोजी भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात 'संपूर्ण स्वातंत्र्या'च्या ठरावाच्या मागणीच्या रूपाने उत्तर देण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात जवाहरलाल नेहरू यांनी संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली व २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून स्वातंत्र्याचे घोषणापत्र वाचून साजरा करण्याचे ठरविण्यात आले. तसेच २ जानेवारी १९३० च्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत प्रांतिक विधिमंडळातील काँग्रेसच्या सर्व सभासदांनी राजीनामे द्यावेत असा आदेशही निर्गमित करण्यात आला. त्यानुसार फेब्रुवारी महिन्यात मध्यवर्ती कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या २१ सभासदांनी, कनिष्ठ सभागृहाच्या ९ सभासदांनी, मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळातील २० आमदारांनी व मुंबईच्या कायदेमंडळातील ६ आमदारांनी राजीनामे दिले. त्यानंतर नजीकच्या काळात विठ्ठलभाई पटेल, बापूजी अणे, पं. मदनमोहन मालवीय, न. चिं. केळकर यांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिले. यामुळे राष्ट्रीय राजकारणाला वेगळे वळण मिळाले. नेहरू अहवाल रद्द करून संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लोकांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करावी, असा काँग्रेसने आदेश दिला.

### मिठाचा सत्याग्रह :

१९३० च्या वर्षारंभीच मिठाच्या सत्याग्रहाची पूर्वतयारी सुरू झाली होती. २६ जानेवारी १९३० रोजी प्रभातफेऱ्या काढून व स्वातंत्र्याचा जाहीरनामा चौकाचौकातून वाचून दाखविण्याचा कार्यक्रम देशभर मोठ्या उत्साहात पार पडला. २६ जानेवारी १९३० या पहिल्या स्वातंत्र्यदिनी भारतात सर्व प्रांतातील लोकांनी स्वातंत्र्याची शपथ घेतली. पुण्यात मात्र फारसा

प्रतिसाद मिळाला नाही. काकासाहेब गाडगीळ यांनी जेमतेम शेसव्वाशे लोकांच्या साक्षीने प्रतिज्ञावाचन केले. (फडके य. दि. १९९३, पृ. ५४) मात्र पुढे प्रभात फेऱ्यांना प्रचंड गर्दी लोटू लागली आणि सरकारला त्यावर बंदी घालावी लागली. सकाळी पाच वाजेपासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सारे शहर या वचननाम्याने दुमदुमून टाकले.(देवगिरीकर,१९६१, पृ.३३)

१६ फेब्रुवारी १९३० रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने स्वातंत्र्याकरिता कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा ठराव पारित केला. ब्रिटिश राजवटीचे अस्तित्व मान्य करून आम्ही स्वतंत्र आहोत हे दाखवून देण्यासाठी गांधीजींनी मिठाच्या सार्वत्रिक सत्याग्रहाचा देशव्यापी लढा सुरू करण्याचा निर्णय घेतला. समुद्राकाठी तयार होणारे मीठ ही निसर्गापासून प्राप्त होणारी उपलब्धी असूनही सरकारने त्यावर जबर कर आकारला होता. मीठ ही देशातल्या सामान्यातल्या सामान्य माणसाची दैनंदिन गरज असल्याने या करवाढीचा फटका देशातल्या प्रत्येक नागरिकाला बसला होता. त्यामुळे पदयात्रा करून सत्याग्रहींनी सरकारी निर्बंध बाजूला ठेवून खुलेपणाने मीठ गोळा करून कायदेभंगाची कृती करावी व सरकारच्या सार्वभौमत्वाला खुले आव्हान द्यावे, अशी योजना आखण्यात आली. १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी दांडीयात्रा सुरू केली. या यात्रेसाठी पहिली तुकडी ७९ सत्याग्रहींची होती; त्यात महाराष्ट्रातील विनायकराव आपटे, हरिभाऊ मोहनी, पंडित खरे, गणपतराव गोडसे, गोविंद हरकारे, केशव चित्रे इत्यादी १३ सत्याग्रहींचा समावेश होता. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र सत्याग्रह मंडळ' स्थापन करण्यात आले. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली केळकरप्रणीत राष्ट्रीय पक्षाची वेगळी सत्याग्रह समिती स्थापन झाली; त्यात अण्णासाहेब भोपटकर, दा. वि. गोखले, दि. वा. दिवेकर, पांडुअण्णा शिरोळकर, गोपाळराव पळसुले यांचा समावेश होता. (केळकर न. चिं. १९३९, पृ. ७४०-७४१) ६ एप्रिल १९३० रोजी गांधीजींनी दांडी येथे समुद्राच्या पाण्याचे मीठ तयार करून मिठाचा कायदा मोडला.

हा कायदेभंग म्हणजे एकप्रकारे सरकारशी अहिंसात्मक युद्धच होते; म्हणून काँग्रेस समित्यांनी 'युद्धमंडळे' स्थापन केली. महाराष्ट्राच्या युद्धमंडळाची छावणी मुंबईस विलेपार्ले येथे होती. पुणे जिल्ह्याच्या युद्धमंडळात शंकरराव देव, दास्ताने, अप्पासाहेब पटवर्धन, सातारचे डॉ. आठल्ये व ग. वि. केतकर यांची निवड झाली होती. महाराष्ट्राने मिठाच्या सत्याग्रहासाठी शिरोडा या समुद्राकाठच्या गावाची निवड केली होती व त्याचे नेतृत्व त्र्यं. र. देवगिरीकर यांच्याकडे सोपविले होते. मालवणच्या बापूसाहेब सामंत यांच्या बंगल्यात सत्याग्रहींची छावणी होती. शिरोड्याला अप्पासाहेब पटवर्धन आणि भाऊसाहेब रानडे यांना तत्काळ अटक झाली. शंभरहून अधिक स्वयंसेवक सत्याग्रहासाठी सज्ज होते. मिठागरांतील मिठाच्या राशी लुटणे, गोव्याच्या हद्दीतून कर न देता मीठ आणणे, समुद्राकाठचे मीठ गोळा करणे, मिठागरे तयार करणे व समुद्राच्या पाण्याचे घरोघर मीठ तयार करणे असा हा सत्याग्रहाचा कार्यक्रम ठरविण्यात आला होता. मिठाच्या सत्याग्रहाबरोबरच या आंदोलनात सरकारी शाळा व विदेशी मालावर बहिष्कार, दारू-अफूच्या दुकानांवर पिकेटिंग, परदेशी मालाची होळी, कर भरणा करण्यास नकार असे इतरही कार्यक्रम अंतर्भूत होते.

शिरोड्याच्या सत्याग्रहासाठी बेळगावहून १५० स्वयंसेवक दाखल झाले होते. हळू हळू तिथल्या छावणीत ५०० स्वयंसेवक जमा झाले. पुढे काही दिवसांनी एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांची नवी तुकडी दाखल झाली. सत्याग्रहींची संख्या ८०० च्या घरात गेली. मुंबईहून जहाजाने येणाऱ्या स्वयंसेवकांना पोलीस त्याच जहाजातून परत पाठवू लागले. दीड हजार वस्तीच्या छोट्याशा गावाने युद्धछावणीतील सत्याग्रहींना घराघरातून भाजी-भाकऱ्यांचे जेवण दिले. त्या लहानशा गावात शंभराहून अधिक सशस्त्र पोलिस गस्त घालू लागले. लहान मुले पोलिसांना आडून दगड मारू लागले. कोल्हापूराहून आणखी एक पोलिसांची तुकडी आली. त्यांना रहायला जागा मिळत नव्हती. गावात त्यांना कोणी पाणी देत नव्हते. दूरच्या नदीवरून पाण्याचे मडके भरून आणावे लागे, त्यावरही मुले दगड मारीत. पोलिसात या प्रकारांमुळे असंतोष निर्माण झाला. ११ दिवस शिरोड्याला लोकराज्य होते. सत्याग्रहासाठी दोन मिठागरे तयार करण्यात आली होती. त्यात खाडीचे पाणी सोडले होते. या मिठागरांना गांधी व जवाहर अशी नावे देण्यात आली होती. ४०० स्वयंसेवक मिठागाराचे रक्षण करीत होते. कलेक्टर, डी. एस. पी. व सशस्त्र पोलिसांची तुकडी आली. त्यांनी गोळीबाराचा इशारा दिला. तेव्हा रामभाऊ गावडा नावाचा रहिवासी पुढे आला व "ही जागा माझ्या मालकीची असून मला मिठागर तयार करण्याचा हक्क आहे" असे ठासून सांगू लागला. मामलेदाराने रामभाऊ गावड्याचे म्हणणे खरे असल्याचा दुजारा दिल्यावर सशस्त्र पोलीस तुकडी मागे घेण्यात आली. सत्याग्रहींनी गांधी-जवाहरच्या घोषणा दिल्या. मिरवणुकीने दरोग्याच्या घरावर जाऊन त्याला राजीनामा द्यायला लावला. नंतर पोलिसांनी देवगिरीकर, राऊत, राजाध्यक्ष यांना अटक केली व बैलगाडीतून वेंगुर्ल्याला नेले. सोबत ८० हत्यारी पोलीस होते आणि हजार-पाचशे देशभक्त होते. वेंगुर्ल्याला डचांच्या किल्ल्यात तुरुंग होता, तिथे सत्याग्रहींना ठेवण्यात आले. त्यानंतर बोटीने रत्नागिरीच्या तुरुंगात सत्याग्रहींना हलविण्यात आले. रत्नागिरीच्या तुरुंगात इतर ठिकाणचेही सत्याग्रही बंदिवान होते. त्यात बेळगावचे गंगाधरराव देशपांडे, अप्पासाहेब पटवर्धन, आचार्य जावडेकर, भाऊसाहेब रानडे, दास्ताने, डॉ. आठल्ये इत्यादींचा समावेश होता. (देवगिरीकर, १९६१, पृ. ३२-४५)

वऱ्हाडात वीर वामनराव जोशी व नाग-विदर्भात नरकेसरी अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली युद्धमंडळे स्थापन झाली. वीर वामनराव जोशी यांना सरकारने तुरुंगात टाकल्यावर बापूसाहेब अणे वऱ्हाड युद्ध मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यासाठी त्यांनी असेंब्ली सदस्यत्वाचा राजीनामा दिला. अकोला जिल्ह्यातील दहीहंडा गावात खाऱ्या पाण्याची विहीर होती; त्या विहिरीतले पाणी काढून मीठ बनवायचे व सत्याग्रह करावयाचा उपक्रम १३ एप्रिल १९३० पासून सुरू झाला. दररोज वऱ्हाड व नागविदर्भातून सत्याग्रहींचे जथे दहीहंडा गावी येऊन मिठाचा सत्याग्रह करू लागले. त्यात अमरावतीचे डॉ. शिवाजी पटवर्धन, पार्वतीबाई पटवर्धन; अकोल्याच्या दुर्गाताई जोशी, यशोदाबाई आगरकर, विजयालक्ष्मी मश्रुवाला, काशीताई लिमये; यवतमाळच्या आनंदीबाई दामले; बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी कृष्णराव गारगाडगावकर, अमरावती जिल्ह्यातले आदिवासी यांचा सहभाग होता. दहिहंडा गावच्या विहिरीतल्या खाऱ्या पाण्यापासून

बनवलेल्या मिठाच्या पुड्या गावोगावी पाठविण्यात आल्या. ह्या पुड्यांपासून मीठ तयार करून व सभा घेऊन सत्याग्रह केले गेले.

खिलाफत चळवळ संपल्यामुळे व अलीबंधू कॉंग्रेसपासून दुरावल्यामुळे मुसलमान या चळवळीत कितपत भाग घेतील याविषयी कॉंग्रेस नेते साशंक होते. त्यामुळे मुंबईत मुस्लीम मोहल्ल्यातून सत्याग्रहींची मिरवणूक गेल्यास दंगल उसळेल या भीतीने मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीचे नेते बॅ. खुर्शेद नरीमन यांनी मिठाचा कायदा मोडण्यासाठी मिरवणूक हिंदू वस्तीतून महालक्ष्मी मैदानावर नेण्याचा निर्णय घेतला. मात्र मुंबई सेंट्रलजवळ सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी मुसलमान सत्याग्रहींची मिरवणूक येऊन मिळाली. गांधीजींच्या नेतृत्वामुळे मुंबई प्रांतात हिंदू-मुस्लीम जातीभेदाचा मुद्दा मागे पडला होता, हे मोठे यश होते. या सत्याग्रहात सामील झालेल्या आबिदाली, युसुफ मेहेराली, सादिक अली इत्यादींना अटक करण्यात आली. (फडके य. दि; १९८६, पृ.५३)

मिठाच्या सार्वत्रिक सत्याग्रहाला देशभरातून फार मोठा प्रतिसाद मिळाला. हा लढा चिरडून टाकण्यासाठी सरकारने जुलुमाचा व दडपशाही मार्गाचा अवलंब केला. ७ एप्रिलपासून गुजरातमध्ये व मुंबईत मिठाची विक्री करणाऱ्या कित्येक सत्याग्रहींना व जमनालाल बजाज, बाळासाहेब खेर, स. का. पाटील, नारायण दामोदर सावरकर, के. एफ. नरिमन, किशोरलाल मश्रूवाला, युसूफ मेहेरअली, सादिक अहमद इत्यादी कॉंग्रेस नेत्यांना तुरुंगात टाकले. परंतु लोकांनी सत्याग्रहातून माघार घेतली नाही; ते अधिकाधिक अग्रेसर होऊ लागले. कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, हंसा मेहता, लीलावती मुन्शी, कोळ्यांच्या नेत्या गंगाबाई पोशा नाखवा, दादाभाई नौरोजींची नात पेरीन कॅप्टन या स्त्रियांनी सत्याग्रहात भाग घेतला. ४ मे १९३० रोजी म. गांधी यांनाही अटक करून येरवड्याच्या तुरुंगात टाकण्यात आले. (फडके य. दि. १९९३, पृ. ५९)

गांधीजींच्या अटकेनंतर देशभर सरकारच्या निषेधाची लाट उसळली. मिरवणुका व जाहीर सभांचा धडाका सुरू झाला. मुंबई इलाख्यात पुणे, सोलापूर, शिरोडा, वडाळा, ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव, डहाणू तालुक्यातील चिंचणी, बोर्डी, डहाणू; कुलाबा जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेलजवळील चिरनेर येथे; मध्यप्रांत वऱ्हाडात नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला इत्यादी अनेक ठिकाणी मिठाचा कायदेभंग करण्यात आला. मिठाच्या सत्याग्रहाप्रमाणेच ठिकठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. नगर जिल्ह्यात अकोल्याजवळ पट्टा किल्ल्यावर लाख-दोन लाख लोक जमा झाले व त्यांनी राष्ट्रीय निशाण लावून जंगल सत्याग्रह केला. अच्युतराव पटवर्धन, केशवराव गरुड, टिकेकर इत्यादींनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. नाशिक जिल्ह्यात बागलाणातील सटाणा, भिलवाड, कळवण, डांग, समशेरपूर; सातारा जिल्ह्यात नाना पाटलांच्या बिळाशी येथे; पूर्व व पश्चिम खानदेशात जंगल सत्याग्रह झाले. ७ मे ला सोलापुरात गिरणी कामगारांनी संप केला व जाळपोळ सुरू केली. ८ मेला गोळीबारात ९ जण ठार झाले. कुलाबा जिल्ह्यात चिरनेरला ७ सत्याग्रहींचे बलिदान झाले. एकूण २९०५४ लोकांना अटक झाली, त्यात मुंबई प्रांतातल्या ४११४ व मध्यप्रांत-वऱ्हाडातला २५६३ कैद्यांचा समावेश होता. सरकारी

आकडेवारीनुसार फेब्रुवारी १९३१ पर्यंत साठ हजार लोकांनी तुरुंगवास भोगला होता.

यवतमाळ जिल्हा काँग्रेसने २६ एप्रिल १९३० च्या सभेत जंगलचा कायदा भंग करण्याचे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. बापूजी अणे यांनी जंगल सत्याग्रहाची संकल्पना समजावून सांगितली. १० जुलै १९३० रोजी यवतमाळ जिल्ह्यातील गहुली गावी बापूजी अणे यांनी जंगलचे गवत कापून आणून सत्याग्रह केला. सरकारने सत्याग्रहींना प्रत्येकी ६ महिन्यांची शिक्षा ठोठावली. बुलडाणा जिल्ह्यातील जनुना येथे डॉ. पारसनीस यांच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रह झाला. त्यांनाही ६ महिन्यांची शिक्षा झाली. अकोले जिल्ह्यातील लोणी इथे सेठ श्रीरामजी सूरजमल यांच्या नेतृत्वाखाली आठवडाभर जंगल-सत्याग्रह सुरू होता.

मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह याप्रमाणे जप्त साहित्याचे वाचन करण्याचाही सत्याग्रह झाला. २१ मे १९३० रोजी नागपूरात १३ सभांमध्ये सरकारने जप्त केलेल्या साहित्याचे खुले वाचन करण्याचा सत्याग्रह झाला. मद्यपानबंदीचा सत्याग्रह तर साऱ्या महाराष्ट्रात झाला.

**गोलमेज परिषद :**

१९३० च्या सत्याग्रहाची चळवळ जोरात सुरू असतानाच ७ जून १९३० रोजी सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालातून भारताची घटना संघराज्यात्मक असावी, प्रांतांना पूर्ण स्वायत्तता देण्यात यावी इत्यादी शिफारशी करण्यात आल्या होत्या. १५ ऑगस्ट १९३० रोजी तुरुंगात असलेल्या काँग्रेस नेत्यांनी यावर विचारविनिमय केला. दरम्यान जनभावनेचा राष्ट्रीय उद्रेक पाहून व्हाइसरॉय आयर्विन यांनी काँग्रेस नेत्यांची तुरुंगातून सुटका केली. गोलमेज परिषदेचे पहिले अधिवेशन १९३० सालच्या अखेरीस भरले. १९ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१ या काळात लंडनमध्ये झालेल्या या गोलमेज परिषदेत राष्ट्रसभा सहभागी झाली नाही. पुढे तेजबहादुर सप्रू व मुकुंदराव जयकर यांच्या मध्यस्थीमुळे १७ फेब्रुवारी १९३१ पासून गांधीजी व व्हाइसरॉय आयर्विन यांच्यात बोलणी सुरू झाली. त्यानंतर गांधी-आयर्विन करार झाला व गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ थांबविण्याचे मान्य केले. सरकारने राजबंद्यांना मुक्त करण्याचे मान्य केले; तर ब्रिटिश मालावरील बहिष्कार उठवण्यास काँग्रेसने मान्यता दिली. मिठागारातून घरगुती लोकांचा मीठ तयार करण्याचा हक्क सरकारने मान्य केला. १९३१ साली लंडन येथे होणाऱ्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत सहभागी होण्याचे गांधीजींना आमंत्रण देण्यात आले. गांधीजींनी सामोपचाराची भूमिका घेऊन ब्रिटिशांच्या ह्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला. ब्रिटिशांचे आपण हृदयपरिवर्तन करू शकू, असा त्यांना विश्वास होता.

गोलमेज परिषदेत सहभागी होऊ नये अशा विचारांचा एक गट काँग्रेसमध्ये होता. विदर्भातील बॅ. नरकेसरी अभ्यंकर यांनी नागप्रदेश काँग्रेस कमिटीत तशा आशयाचा एक ठरावही पारित करवून घेतला होता. अभ्यंकरांच्या मते "राजकीय स्वातंत्र्य हे कुणाच्या दिल्याने मिळत नसते; ते विदेशी शासनाकडून जबरदस्तीने हिसकावून घ्यावे लागते. .. सरकार जर बार्डोली येथील शेतकऱ्यांना न्याय द्यायला तयार नाही, तर ते भारताच्या स्वातंत्र्याची मागणी मंजूर करेल ही कल्पना कशी काय केली जाऊ शकते?" (वक्काणी, २००३, पृ. १४२) गोलमेज

परिषदेपूर्वीच सरकारने २७ एप्रिल १९३१ रोजी वृत्तपत्र-स्वातंत्र्याचा संकोच करणारा व सरकारी आदेशाचे पालन करण्याची हमी मागणारा अध्यादेश काढला. या अध्यादेशाचा निषेध करीत अमरावतीच्या 'उदय', 'कर्मवीर', 'स्वतंत्र हिंदुस्थान' या पत्रांनी; नागपूरच्या 'तरुण भारत'ने आपली प्रकाशने बंद केली. १ जानेवारी १९३२ ला काँग्रेस वर्किंग कमिटीला पुन्हा एकदा कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा ठराव करावा लागला. ब्रिटिश सरकारने काँग्रेस ही बेकायदेशीर संघटना असल्याचे घोषित करून ४ जानेवारीला महात्मा गांधींसह काँग्रेस वर्किंग कमिटीच्या काही सभासदांना अटक केली. त्याच दिवशी अनेक वटहुकूम निघाले व अनेक संस्थांवर बंदी घालण्यात आली. एका दिवसात ७,००० लोकांना पकडण्यात आले. पुण्यात तीन दिवस कडकडीत हरताळ पाळण्यात आला. कायदेशीर बंदी आल्यानंतर काँग्रेस कमिट्या 'युद्ध-मंडळ' हे नाव धारण करून काम करू लागल्या. सरकारने सत्याग्रह व पिकेटिंग करणाऱ्यांना अटक करण्याचे सत्र चालवले. जानेवारी १९३१ या एका महिन्यात १४,८०० सत्याग्रहींना व फेब्रुवारी महिन्यात १७,८०० सत्याग्रहींना अशा एकूण ३२,६०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. २६ जानेवारी १९३२ रोजी विदर्भात व मुंबई प्रांतात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. नरकेसरी अभ्यंकरांनी तुरुंगात झेंडा फडकवून स्वातंत्र्यदिन साजरा केला. स्वातंत्र्यदिन साजरा करणाऱ्या विदर्भातील ९७ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. सरकार वृत्तपत्रांवर निर्बंध आणि पिकेटिंगवर बंदी घालणारे एकामागून एक अध्यादेश काढू लागल्यावर सत्याग्रहींनी आपल्या सत्याग्रहाचे नामकरण 'अध्यादेश सत्याग्रह' असे केले. १८ मे १९३४ पर्यंत हे अध्यादेश सत्याग्रहाचे आंदोलन चालले होते. त्यानंतर ६ जून १९३४ रोजी सरकारने काँग्रेसवर घातलेली बंदी उठविली. (वक्काणी, २००३, पृ. १४३-१४४)

काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून गांधीजी गोलमेज परिषदेला हजर राहिले. गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी गांधीजींनी सुभाषचंद्र बोस यांना 'स्वराज्यात मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवायला काय हरकत आहे?' असे विचारले होते. त्यावर सुभाषचंद्रांनी अशा प्रकारच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या अटीवर स्वराज्य मिळणार असले तर ते आपल्याला नको आहे असे मत दिले होते. त्यानंतर गांधीजींनी मुसलमानांचा स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह आपल्याला मान्य नसल्याचे एका पत्रकान्वये जाहीर केले. (फडके य. दि, १९८६, पृ. ५७)

गोलमेज परिषदेत १५ सप्टेंबर १९३१ च्या भाषणात गांधीजींनी काँग्रेस ही सर्वात जुनी, हिंदू, मुसलमान, अस्पृश्य, शहरी व ग्रामीण भागात पसरलेली राष्ट्रीय स्वरूपाची प्रातिनिधिक राजकीय संस्था कशी आहे व चरखा व सूतकताईच्या माध्यमातून ती भारतातल्या सात लाख खेड्यांपर्यंत कशी पोहचलेली आहे, हे स्पष्ट करून सांगितले. या परिषदेत गांधीजींनी संपूर्ण स्वराज्याची मागणी केली. परिषदेत सामील झालेले इतर पक्ष हे केवळ एकेका विभागाचे प्रतिनिधित्व करीत होते, याउलट गांधीजी काँग्रेसच्या माध्यमातून संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने त्यांच्या मागणीला वजन प्राप्त झाले होते. वयाच्या ६२ व्या वर्षी गोलमेज परिषदेत ३० नोव्हेंबर १९३१ रोजी हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करताना ते म्हणाले होते, "भारताला खरे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे - त्याला तुम्ही नाव काहीही द्या.

गुलाबाला कोणतेही नाव दिले तरी त्याचा सुगंध तोच राहील. पण मला स्वातंत्र्याचा गुलाब पाहिजे आहे - कागदी गुलाब नको. मला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे – इंग्रज लोक उपभोगतात तसेच – आणि ते केवळ भारताच्या किंवा इंग्लंडच्या हितासाठी नव्हे तर समस्त जगाच्या हितासाठी. त्यासाठी भारतातील ३५ कोटी लोकांनी भाले-तलवारी उपसण्याची गरज नाही किंवा गोळ्या झाडण्याची जरूरी नाही. फक्त 'नाही' म्हणण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असले पाहिजे. ते आता भारताच्या अंगी येत आहे." (शिखरे दा. न. पृ. ३३)

अर्थात, या दुसऱ्या गोलमेज परिषदेत भारतीय प्रतिनिधींचे सहजासहजी एकमत होणार नाही, या दृष्टीने ब्रिटिशांनी व्यूहरचना केली होती. काँग्रेसच्या राजकारणापासून अलिप्त असलेल्या संस्थानिकांचा मोठा गट होता, आणि त्यांना एकात्मिक राष्ट्रीय प्रवाहापासून अलग राहून स्वतंत्र सत्तास्थाने जोपासण्यात रस होता. संस्थानिकांची ही सत्ताभिलाषा लक्षात घेऊन गोलमेज परिषदेसाठी त्यांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. तसेच सत्तेत वाटा मिळावा म्हणून निरनिराळ्या जातिसमूहांचे जे राजकीय अलगतावादाचे राजकारण सुरू झाले होते, ते लक्षात घेऊन या विविध जातिसमूहाच्या प्रतिनिधींनाही गोलमेज परिषदेसाठी निमंत्रित केले गेले होते. काँग्रेस ही सर्व देशाची मिळून एक प्रातिनिधिक संघटना आहे, असे मानायला ब्रिटिश सरकारची तयारी नव्हती. त्यामुळे संस्थानिक, मुसलमान, शिख, ख्रिश्चन, पारशी, युरोपीयन्स, अस्पृश्य, कामगार अशा सर्व अल्पसंख्याकांचे समाधान होईल अशी संघराज्याची योजना करण्यात येईल, असा ब्रिटिश सरकारने पवित्रा घेतला होता.

या पार्श्वभूमीवर गांधीजींनी इंग्लंडला जाऊन ब्रिटिश समाजातील विविध घटकांशी खुला संवाद साधण्याची भूमिका घेतली. ब्रिटिश लोकांच्या मनातील भारतीयांविषयीच्या गैरसमजुती व पूर्वग्रह दूर करण्यासाठी त्यांनी संवादसत्रे घेतली. पण त्याने तिढा सुटला नाही. भारतात परत आल्यावर व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांच्याशीही संवाद होऊ शकला नाही. उलट सरकारने काँग्रेसचे राजकीय बल खच्ची करण्यासाठी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी आणि कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली. सप्टेंबर १९३२ पर्यंत ६१,५५१ लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. महात्मा गांधींनाही अटकेत ठेवले. (पळशीकर, १९८५-८६ पृ.९४) जळगावजवळच्या पिंपराळे आश्रमातून विनोबा भावे यांना पकडून ६ महिन्यांचा तुरुंगवास आणि पन्नास रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुंगात रोज ३५ पौंड धान्य दळण्याची सक्ती करण्यात येई. इंग्रजांच्या असल्या दडपशाही वातावरणातही तुरुंगाचे आश्रमात रूपांतर करण्याची किमया साधून या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या लढ्याचे आध्यात्मिक व अहिंसक अधिष्ठान कायम ठेवले. विनोबांनी धुळ्याच्या तुरुंगात गीता प्रवचने दिली. (बापट भ. ग., २००२, पृ. १२१)

### १.१०. जातीय समीकरणांचे राजकारण :

माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा प्रस्ताव पुढे आल्यानंतर भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रातही आपापल्या जातिसमूहाला सत्तेत पुरेसा वाटा मिळावा म्हणून मोर्चेबांधणी सुरू झाली. लोकशाही मूल्यांना अनुसरणारी राज्यप्रणाली आणायची तर घटनात्मक सुधारणांमध्ये इंग्लंडच्या धर्तीवर प्रादेशिक मतदारसंघांची रचना करणे हा स्वाभाविक पर्याय खुला होता. मात्र

हा पर्याय स्वीकारायला येथील पुढाऱ्यांची तयारी नव्हती. बहुसंख्यांकांच्या संख्याबळापुढे अल्पसंख्यांकांचा आवाज दबला जाऊ नये म्हणून हिंदूस्थानातील जातिसमूह ही एका अर्थाने उप-राष्ट्रीक समूह आहेत असा युक्तिवाद करून जातिसंघटनांनी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी पुढे केली. कायदेकौन्सिलात व शासकीय नोकऱ्यांमध्ये वेगवेगळ्या जातींचा वाटा किती प्रमाणात असावा या मुद्यांवरून राजकीय चर्चाविश्व ढवळून निघाले. कॉंग्रेसच्या एकात्म राष्ट्रबांधणीच्या राजकारणाला छेद देणारे अंतर्गत दुफळीचे प्रवाह वर आले. सर्व जातिधर्मांची प्रातिनिधिक संघटना म्हणून आतापर्यंत कार्यरत असणारी कॉंग्रेस ही केवळ हिंदूंची प्रातिनिधिक संघटना असल्याचा आरोप मुस्लीम समाजाच्या पुढाऱ्यांकडून केला जाऊ लागला. हिंदू-मुसलानांतला परस्परविश्वास संपल्याने काही भागात जातीय दंगलीही झाल्या.

**डॉ. आंबेडकरांची भूमिका :**

डॉ. आंबेडकरांनी विदेशात शिक्षण घेत असल्यापासून अस्पृश्यांची अस्मिता जागवण्याची व त्यासाठी स्पृश्यांशी संघर्ष करण्याची भूमिका घेतली होती. १९१६ साली लाला लजपतराय यांनी त्यांना गदर या क्रांतिकारी चळवळीत ओढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा याच कारणावरून आंबेडकरांनी त्यांना ठाम नकार दिला होता. सप्टेंबर १९१६ ला अमेरिकेत भरलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या परिषदेला न जाण्यामागेही हेच कारण होते. ज्या स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांना कायम गुलामगिरीत ठेवले त्यांच्याबरोबर स्वातंत्र्य चळवळीत अस्पृश्य सामील होणार नाहीत, असे त्यांनी लाला लजपतरायांना सुस्पष्ट शब्दांत सांगितले होते. (गोखले द. न. २०१७, पृ. १५) जातीय समीकरणांच्या राजकारणात कॉंग्रेस, मुस्लीम लीग यांच्यापेक्षा डॉ. आंबेडकरांची वेगळी मते होती. त्यांच्या मते दलितांचा प्रश्न हा मुख्यत: राजकीय प्रश्न आहे; आणि तो तसाच हाताळला पाहिजे. जोपर्यंत दलितांच्या स्वत:च्या हातात सत्ता येत नाही तोपर्यंत दलितांचा प्रश्न सुटणे शक्य नाही, असे त्यांचे ठाम मत होते. दलित वर्गाला कोणी मित्र नसून इंग्रज सरकारनेही नेहमीच स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी एक सबब म्हणून त्यांचा उपयोग केला आहे असे त्यांचे मत होते. जेव्हा जेव्हा ब्रिटिश सरकारने प्रातिनिधिक सरकारची व्याप्ती वाढविली तेव्हा तेव्हा दलित वर्गाला पद्धशीरपणे वगळण्यात आले. सरकारने अवहेलना केलेले, हिंदूंनी दडपलेले आणि मुसलमानांनी उपेक्षा केलेले अशा असह्य परिस्थितीत दलितवर्ग सापडला आहे. त्यामुळे दलितवर्गाला आपल्या सुरक्षेसाठी आणि संरक्षणासाठी राजकीय यंत्रणेत दुरुस्ती करण्याला प्राधान्य द्यावे लागणार आहे. १९३० साली गोलमेज परिषदेच्या वेळी आंबेडकरांनी ही भूमिका मांडताना म्हटले होते की, "आम्हाला जरी जबाबदार सरकार हवे असले तरी केवळ मालक बदलल्यासारखे वाटेल अशा स्वरूपाचे सरकार आम्हाला नको.' सरकार जर खरोखरच संपूर्णपणे जबाबदार होणार असेल तर कायदेमंडळही संपूर्णपणे प्रातिनिधिक झाले पाहिजे व त्यात अस्पृश्यांना न्यायोचित वाटा मिळाला पाहिजे, अशी त्यांची मागणी होती.

साऊथबरो कमिटी (१९१८-१९),महाड सत्याग्रहातले भाषण (२५ डिसेंबर १९२७) सायमन कमिशन (१९२८-२९), नागपूरची डिप्रेस्ड क्लास परिषद (१९३०), लंडनची गोलमेज परिषद व त्यानंतरचा जातीय निवाडा (१९३०-३२) नागपूरच्या अ. भा. शेड्युल्ड कास्ट

फेडरेशच्या अधिवेशनातले ठराव (जुलै १९४२) या टप्प्याने त्यांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या मागणीचे समर्थन केले होते. १९१७ साली मॉटेग्यु -चेम्सफर्ड यांनी भारतीयांना राजकीय अधिकार देण्याच्या हेतूने केलेल्या भारत दौऱ्यानंतर लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखाली मताधिकार समिती नेमली होती; या समितीपुढे २७ जानेवारी १९१९ रोजी सादर केलेल्या निवेदनात डॉ. आंबेडकरांनी राज्यशासनात 'जातवार प्रतिनिधित्व असावे की नसावे' या विषयावर आपले विचार मांडले होते. हिंदुस्थानातील समाजरचना जातिकेंद्री असल्यामुळे इतर देशांपेक्षा इथे राजकीय सत्ताकारणाचा वेगळा आकृतिबंध निर्माण करण्याची गरज त्यांनी आपल्या निवेदनातून स्पष्ट केली होती. हिंदुस्थानात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी आणि ज्यू असे भिन्न धर्मीय लोक राहात असले तरी हिंदूमध्ये ब्राह्मण, ब्राह्मणेतर आणि अस्पृश्य अशी तीन अंतर्गत भिन्न लोककुले असल्याने एकूण ७ प्रकारच्या लोककुलांचे हे वसतिस्थान आहे. त्यातही अस्पृश्यांना खाजगी मिळकतीचा, नोकरीचा, शासनातील प्रतिनिधित्वाचा, मतस्वातंत्र्याचा असा कुठलाही नागरी अधिकार नसल्याने जातीय उतरंडीत सर्वार्थाने ते निम्न स्थानी आहेत. स्पृश्य वर्गात परस्पर दळणवळण आहे, पण स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात परस्पर दळणवळण नाही, अस्पृश्यांना तुच्छ लेखण्याची भावना स्पृश्यात आहे. या पार्श्वभूमीवर लोकशाही मूल्यांवर अधिष्ठित राज्यशासनात "अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणुकीत उभे राहता यावे, त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत, अस्पृश्यांचे प्रतिनिधी अस्पृश्य मतदारांनीच निवडले पाहिजेत आणि अस्पृश्यांच्या मतदारसंघात अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा द्याव्यात, अशी डॉ. आंबेडकर यांनी साऊथबरो कमिटीपुढे साक्ष दिली."(खरात, २०१३, पृ. ३१)

उत्पन्न किंवा शिक्षण यांवर मताधिकाराचे निकष न ठरवता जातवार प्रतिनिधित्वाचा निकष लावावा अशी आंबेडकरांची भूमिका होती. साऊथबरो कमिटीपुढे दिलेल्या लेखी निवेदनात त्यांनी म्हटले होते की, 'दर हजार लोकसंख्येत अस्पृश्य लोकसंख्या सुमारे ७० इतकी आहे. त्यामुळे सर्वसाधारण मतदारसंघात अस्पृश्य प्रतिनिधी निवडून येण्याची सुतराम शक्यता नाही.' उत्पन्नाच्या निकषावर मताधिकार दिल्यास कमी लोकसंख्येच्या ब्राह्मणांना जास्त प्रतिनिधित्व मिळेल, आणि जास्त लोकसंख्या असणाऱ्या अस्पृश्यांना कमी प्रतिनिधित्व मिळेल. त्यामुळे उत्पन्नाची अट व मताधिकार यांची सांगड घालू नये असे त्यांचे मत होते. जातवार प्रतिनिधित्वाबाबत कॉंग्रेसच्या मतापेक्षा डॉ. आंबेडकरांचे मत वेगळे होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'नेही अस्पृश्यांच्या प्रतिनिधित्वासाठी एक योजना सादर केली होती. त्यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी अस्पृश्यांनीच निवडण्याऐवजी विधिमंडळात निवडून आलेल्या प्रतिनिधींनी अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशित (nominate) करून सहभागी (co-option) करून घेण्याची तरतूद सुचविण्यात आली होती. बहुसंख्य स्पृश्य सदस्यांनी अस्पृश्य वर्गातील सदस्यांची नावे नामनिर्देशित केल्यावर ह्या सदस्यांना 'प्रातिनिधिक' कसे म्हणता येईल? असा प्रश्न उपस्थित करून डॉ. आंबेडकरांनी ह्या योजनेची 'a silly scheme'म्हणून खिल्ली उडवली होती. या योजनेमुळे

अस्पृश्यांना न्याय मिळण्याऐवजी त्यांची स्थिती आश्रितासारखी होईल, असे त्यांनी साऊथबरो कमिटीपुढे दिलेल्या निवेदनात म्हटले होते. मार्च १९२० मध्ये डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली माणगावला झालेल्या दक्षिण महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या परिषदेत या मुद्द्यावरून महर्षी शिंदे यांच्या निषेधाचा ठरावही पारित करण्यात आला होता. (गोखले द. न. २०१७, पृ. ४९) अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, असा डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता. मुंबई इलाख्यात बहिष्कृतांसाठी फक्त एका जागेची शिफारस करण्यात आली होती; मात्र लोकसंख्येच्या प्रमाणात जागा निर्धारित केल्यास बहिष्कृतांच्या वाट्याला किमान नऊ जागा येतील, असा त्यांचा युक्तिवाद होता.

१९२१ सालापासून स्वराज्याच्या कोंदणात बसविलेली जबाबदार राज्यपद्धतीची घटना अस्तित्वात आली. ह्या राज्यपद्धतीत स्थलवाचक, जातिवाचक व वर्गवाचक असे ३ प्रकारचे मतदारसंघ अस्तित्वात होते. सर्व जातीच्या मतदारांच्या संमिश्र मतदारसंघात मागासलेल्या हिंदुंकरिता काही राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. मुसलमानांकरिता मात्र स्वतंत्र जातिवाचक मतदारसंघ अस्तित्वात होता. व्यापारी, इनामदार, कारखानदार यांच्याकरिता वर्गवाचक संघ अस्तित्वात होता. तसेच १९१९ साली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार सर्व प्रौढांना मताधिकार न देता मतदारसंघात किमान सहा महिने वास्तव्य असणाऱ्या मिळकतदारासच मताधिकार देण्यात आला होता. मतदारसंघांची 'निर्वाचित' व 'नामनिर्देशीत' अशा दोन गटात विभागणी करण्यात आली होती. निर्वाचितांमध्ये मराठे, जमीनदार, व्यापारी-कारखानदार, मुसलमान, युरोपियन व सर्वसाधारण अशा मतदारसंघातून प्रतिनिधी निवडण्याची प्रक्रिया केली जात असे. नामनिर्देशितांमध्ये सरकारी नोकर, कामगार, कापूस व्यापारी, अँग्लो इंडियन, हिंदी ख्रिश्चन, पददलित यांचे नामनिर्देशन केले जात असे. १९१७ सालच्या लखनौ करारानुसार मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणाहून अधिक प्रतिनिधित्व देण्यात आले होते. मतदारसंघांची ही रचना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मान्य नव्हती. त्यांच्या मते "या देशाच्या राजकारणात बेजबाबदारी व बेबंदशाही माजली असेल तर त्याला मुख्य कारण म्हणजे मुसलमानांकरिता स्वतंत्र स्थापन केलेला जातिवाचक मतदारसंघ होय. वर्गवाचक संघालाही कमी जास्त प्रमाणाने तोच आक्षेप लागू पडतो. या मतदारसंघामुळे एखाद्या अल्पशा व विशिष्ट प्रकारच्या हितसंबंधाने बद्ध झालेल्या मतदारांतर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधीस सार्वजनिक हितसंबंधाच्या प्रश्नावर मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. असला हा मतदारसंघ नाहीसा होणे आवश्यक आहे." (बहिष्कृतभारत,१८जाने,१९२९/ पानतावणे,१९९८, पृ. ६१ / नरके-कासारे, २००५, पृ. १४)

महाड सत्याग्रहातले डॉ. आंबेडकर यांचे भाषण (२५ डिसेंबर १९२७) हिंदू समाजाच्या पुनर्घटनेविषयी त्यांचे तत्कालीन चिंतन विशद करणारे होते. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते की, "आजची ही सभा हिंदू समाजाचे संघटन करण्यास्तव बोलविण्यात आलेली आहे. बेटीबंदीपासून भेटीबंदीपर्यंत वर्णाश्रमाच्या चौकटीचे खिळे उडवून हिंदू समाजाचा एक वर्ण केला पाहिजे. त्याशिवाय अस्पृश्यता जाणार नाही व समताही प्रस्थापित होणार नाही... यास्तव हिंदू

समाज समर्थ करावयाचा असेल तर चातुर्वर्ण्य व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर केली पाहिजे. अस्पृश्यतानिवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही. म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वहिताचे आहे तितकेच ते राष्ट्रहिताचे आहे, यात काही किंतू नाही." (पळशीकर, १९८५-८६, पृ. १९८-१९९)

सायमन कमिशनला २३ ऑक्टोबर १९२८ रोजी दिलेल्या साक्षीत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना जादा राजकीय हक्क देण्याची मागणी केली. त्यांनी कमिशनला यामागची आपली भूमिका विशद करताना सांगितले की, "आम्हा अस्पृश्यांना हिंदुपासून वेगळा असा स्वतंत्र अल्पसंख्याक गट म्हणून मानले जावे, अशी आमची हक्काची पहिली मागणी आहे. ब्रिटिश भारतातील कोणत्याही अल्पसंख्याकांपेक्षा 'डिप्रेस्ड क्लास' (अस्पृश्य) अल्पसंख्यांकांना अधिक राजकीय संरक्षणाची आवश्यकता आहे. या मागणीचे साधे कारण असे की, हा अस्पृश्य वर्ग शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला असून, आर्थिक दृष्ट्या अत्यंत दरिद्री आहे. आणि सामाजिक दृष्ट्या त्यांना गुलामी अवस्थेत डांबून ठेवलेले असल्याने ते इतर अल्पसंख्यांकांपेक्षा तीव्र स्वरूपाचे राजकीय अन्यायाचे दु:ख भोगीत आहेत." कमिशनपुढे डिप्रेस्ड क्लासची व्याख्या त्यांनी 'विटाळ झाला' असे मानले जाते तो समाज अशी केली होती.(खरात, २०१३, पृ. ८५-८६) सायमन कमिशनपुढे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या आपल्या मताचे समर्थन करताना त्यांनी महाडच्या सभेत घेतलेली हिंदू समाजाच्या पुनर्घटनेची भूमिका बाजूला ठेवली होती. आपल्या निवेदनात त्यांनी म्हटले होते की, "हिंदू समाजातच आमचा समावेश केला गेल्याने आम्ही एक पृथक अल्पसंख्यांक जमात आहोत या वास्तवावर आजपावेतो पांघरुण घातले गेले. वास्तविक पाहता, पददलित वर्ग (डिप्रेस्ड क्लासेस) आणि हिंदू जमात यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने कोणताच दुवा नाही. म्हणून आम्ही एक पृथगात्म व स्वायत्त अल्पसंख्यांक जमात आहोत ही गोष्ट स्वीकृत झाली पाहिजे हा पहिला व प्राथमिक मुद्दा मला आयोगासमोर जोर देऊन मांडावयाचा आहे." (१९८) मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, ज्यू या जमाती जशा व जेवढ्या एकमेकांपासून पृथक आहेत व त्याच प्रकारचे पृथकपण (आणि अंतर व दुरावा) सवर्ण व हिंदू यांच्यात आढळते. म्हणून हिंदू या नात्याने ते एकच होत असे न धरता, वेगळे समाज म्हणून त्यांची दखल घेतली पाहिजे व अँग्लो इंडियन, मुसलमान यांच्याप्रमाणेच अस्पृश्यांनाही लोकसंख्येतील प्रमाणानुसार प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असा डॉ. आंबेडकरांचा युक्तिवाद होता. (पळशीकर, १९८५-८६; पृ. १९३, १९८)

### नेहरू रिपोर्ट :

भारतातील सर्व पक्षीयांना एकमताने मान्य असलेली घटना सिद्ध केल्यास आपण ती ब्रिटिश पार्लमेंटला सादर करू अशा प्रकारचे आव्हान भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी भारतीय पुढाऱ्यांसमोर ठेवले होते. या पार्श्वभूमीवर १९२८ साली काँग्रेससह सर्वपक्षीय परिषदेने मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठी समिती नेमली होती. समितीत सुभाषचंद्र बोस, तेजबहादूर सप्रू, बापूजी अणे, जी. आर. प्रधान, सर

अली इमाम हे सदस्य होते. या समितीने तयार केलेला आराखडा 'नेहरू रिपोर्ट' म्हणून ओळखला जातो. नेहरू समितीने रिपोर्ट सादर करताना ब्रिटिशांनी साम्राज्यांतर्गत स्वराज्य त्वरित द्यावे व त्यानंतर संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात यावे, अशी मागणी केली होती. या समितीने घटनेचा मसुदा तयार करताना मागासलेल्या हिंदुंकरिता व व्यापारी आणि इनामदार वर्गाकरिता अस्तित्वात असलेले संघ काढून टाकले व त्यांच्याऐवजी सर्वत्र स्थलवाचक संघ स्थापन करण्याची योजना पुढे आणली होती. या आराखड्यात मुसलमानांच्या स्वतंत्र मताधिकारांची दखल घेतली होती; मात्र अस्पृश्यांच्या मताधिकारांचा फारसा विचार केलेला नव्हता. मुसलमान हे पूर्वी राज्यकर्ते होते, म्हणून त्यांना जास्त जागा देण्याचा समितीचा युक्तिवाद डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हता. कारण मुसलमान भारतात येण्यापूर्वी शेकडो वर्षे हिंदुस्थानात हिंदूंची राजवट होती, हे कसे नाकारता येईल? तसेच धार्मिक बाब वगळता मुसलमानांचे प्रश्न आणि इतरांचे प्रश्न समान आहेत; उलट मुसलमानांपेक्षा अस्पृश्यांचे प्रश्न वेगळे आहेत; त्यांना अस्पृश्यतेमुळे मुक्त संचार करता येत नाही, इतरांच्या बरोबरीने शिक्षणात संधी नाहीत, व्यापारधंदा करण्याची मोकळीक नाही, चांगले कपडेलत्ते घालून सुबत्ता दाखविता येत नाही. त्यामुळे अस्पृश्य समाजाला मुसलमानांच्या सहस्त्रपट राजकीय संरक्षणाची आवश्यकता असून समाजात बरोबरीचे स्थान मिळण्यासाठीचा राजकीय मार्ग म्हणून अस्पृश्यांना विधिमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व देण्याचा मुद्दा विचारात घ्यायला हवा, असा आंबेडकरांचा दावा होता. (पानतावणे, १९९८, पृ. ६३) केवळ धार्मिक अल्पसंख्य या मुद्यावर मुसलमानांनी जादा प्रतिनिधित्वाची मागणी करणे आंबेडकरांना सयुक्तिक वाटले नाही. ग्रीस, रुमानीया, अल्बानीया, बल्गेरिया या देशांतले मुसलमान अल्पसंख्यच आहेत, पण त्यांनी तिथे जादा प्रतिनिधित्वाची मागणी केली नसल्याचा दाखलाही; त्यांनी आपल्या मताच्या समर्थनार्थ दिला होता.

नेहरू समितीच्या अहवालावर ब्राह्मणी राजकारणाचा ठसा उमटला असल्याचे डॉ. आंबेडकरांचे मत होते. 'बहिष्कृत भारत'मध्ये यासंदर्भात त्यांनी लिहिले होते की, "हिंदू समाजाच्या उतरंडीला धक्का न लावता वरच्यांना वर व खालच्यांना खाली ठेवून स्वराज्यसत्ता संपादन करण्याचा हा ब्राह्मणी कावा आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. .. ब्राह्मणांचे धार्मिक वर्चस्व जे आजवर टिकून राहिले आहे, याचे मुख्य कारण म्हणजे ब्राह्मणेतरांच्या हातची राजकीय सत्ता धार्मिक सत्ता हाती असलेल्या ब्राह्मणांकडे गेली हे होय. राजकीय सत्तेची जोड मिळाल्यामुळेच त्यांची धार्मिक सत्ता टिकून राहिली आहे. .. जेथे धार्मिक सत्तेला राजकीय सत्तेची जोड मिळाली नाही तेथे ब्राह्मण वर्ग पाणक्या किंवा स्वयंपाकी होऊन राहिला आहे व जेथे धार्मिक सत्तेला राजकीय सत्तेची जोड मिळाली तेथे ब्राह्मण राज्यावर बसले आहेत. याची साक्ष पेशवाई देत आहे. ज्या दिवशी ही जोडी फुटेल आणि ब्राह्मणांच्या हातची राजकीय सत्ता ब्राह्मणेतरांच्या हाती जाईल त्या दिवशी हा ब्राह्मण्याचा घडा भरणार आहे. मागासलेल्या हिंदूंना अगर अस्पृश्यांना राखीव जागा दिल्या गेल्या तर त्या प्रमाणात ब्राह्मणांची राजकारणातील मिरास कमी होणार आहे." (बहिष्कृत भारत, १ जाने, १९२९/ पानतावणे,१९९८, पृ. ६४)

विभक्त मतदारसंघ की संयुक्त मतदारसंघ असा एक वादाचा मुद्दा यावेळी चर्चेत होता. सायमन आयोगाला सादर केलेल्या निवेदनात डॉ. आंबेडकरांनी संयुक्त मतदारसंघाचे समर्थ केले होते. विभक्त मतदारसंघातील मतदार हे त्या विशिष्ट लोककुलातीलच असल्याने इतर लोककुलातील मतदारांना त्यांच्या निवडप्रक्रियेत सहभागी होता येणार नाही; संयुक्त मतदारसंघात मात्र सर्वच लोककुलातील मतदारांना निवडप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी होती. बहुसंख्यांचा पाठिंबा मिळाल्याने अल्पसंख्य जमातींचेही कल्याण होईल, असे त्यांना वाटत होते. मुसलमानांना मात्र असा संयुक्त मतदारसंघ नको होता. मुसलमानांनी मुसलमान प्रतिनिधी निवडण्याची सोय असणारा विभक्त मतदारसंघ त्यांना हवा होता. मुसलमानांच्या या विशेषाधिकाराबाबत डॉ. आंबेडकरांचे मत प्रतिकूल होते. सायमन कमिशनने वंचित गटांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरी प्रतिनिधित्व द्यायला हवे होते, परंतु तसे झाले नाही. लखनौ करारानुसार मुसलमान अल्पसंख्यांकांना दिले गेलेले जादा प्रतिनिधित्व अयोग्य असल्याचे डॉ. आंबेडकरांचे मत होते. निवडप्रक्रियेत ज्यांचा हात नाही अशा बहुसंख्यांवर राज्य करण्याचा अल्पसंख्यांकांना मिळणारा अधिकार हा लोकशाही मूल्यांना धरून होणार नाही; त्यामुळे विभक्त मतदारसंघ आणि संयुक्त मतदारसंघ यांचा सुवर्णमध्य साधणारा तोडगा त्यांनी सुचविला. संयुक्त मतदारसंघातच अल्पसंख्य लोककुलांना राखीव जागा त्यांचा मागासलेपणा घालविता यावा या उद्देशाने द्याव्यात. तसेच अस्पृश्यांचे सामाजिक वंचितत्व लक्षात घेता त्यांना समग्र हिंदूंमध्ये समाविष्ट न करता स्वतंत्र स्थान द्यावे, असे आंबेडकरांचे मत होते. जादा प्रतिनिधित्व हा अल्पसंख्यांकांचा अधिकार होऊ नये, तो तात्पुरता उपाय असून बहुसंख्यांकांच्या वृत्तिबदलानुसार त्याचा फेरविचार करता येईल असेही त्यांनी सुचविले होते. (गोखले द. न. २०१७, पृ. ११७) [Though I insist upon them (= constitutional safeguards, concessions, provisions) I admit them to be provisions of a transitory character. I do contemplate and do desire the time when India shall be one.. but all that would depend upon the attitude of the majority towards the minority." – Ambedkar, 1982, p. 479] सरदार, इनामदार, कारखानदार, व्यापारी हे दुर्बल नसल्याने त्यांना अर्थातच वेगळे प्रतिनिधित्व देण्याची गरज नाही, हेही डॉ. आंबेडकर यांनी नमूद केले होते.

### गांधी-आंबेडकर मतभिन्नता :

गांधीजी हे मूलतः राजकारणी असण्यापेक्षा त्यांचा पिंड समाजसुधारकाचा होता. अस्पृश्यतानिवारण हे त्यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय मानले होते. वयाच्या १२ व्या वर्षापासूनच हा प्रश्न त्यांना सतावत होता याचा उल्लेख त्यांच्या आत्मकथेत त्यांनी केला होता. दक्षिण आफ्रिकेत दलित पाहुण्याचा कमोड स्वच्छ करण्यास नकार देणाऱ्या कस्तुरबांबरोबर याच मुद्द्यावरून त्यांचे भांडणही झाले होते. आपल्या व्यक्तिगत जीवनात ते अस्पृश्यता मानीत नव्हते. प्रश्न सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यतेचा होता. ब्रिटिशांनी कायद्यासमोर सर्व समान ही भूमिका घेतली होती, तेव्हापासूनच खरे तर भारतात अस्पृश्यतानिर्मूलनाच्या प्रश्नाला वाचा

फुटली होती. सर्व गुन्हेगारांना सारखीच शिक्षा या तत्त्वात त्यांनी ब्राह्मणांचा अपवाद केला नव्हता. यापूर्वी ब्राह्मण खुनी असला तरी त्याला फाशी दिले जात नसे; परंतु कायद्यापुढे सर्व समान ही भूमिका असल्याने ती प्रथा बंद पडली होती. अस्पृश्यतानिर्मूलनासाठी मात्र ब्रिटिशांनी कायदेशीर समतेपेक्षा अधिक व्यापक पातळीवर काही केले नव्हते. त्यामुळे गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतून परतल्यावर कायदेशीर समतेचे मूल्य रूजविण्यासाठी अस्पृश्यतानिर्मूलनाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. भारतीय अस्पृश्यांना त्यांनी 'हरिजन' म्हणून संबोधायला सुरुवात केली. हरिजनांना सर्वार्थांनी देशाचे प्रथम दर्जाचे नागरिक बनवायचे त्यांचे स्वप्न होते. अस्पृश्यतेची सैतानी रूढी हिंदू धर्मतत्त्वांशी विसंगतच नव्हे तर ते अधर्माचे लक्षण आहे, असे त्यांचे ठाम मत होते. 'अस्पृश्यता' हे हिंदूंचे पाप आहे, त्यामुळे अस्पृश्यतानिवारणासाठी हिंदूंनीच प्रथम पुढाकार घेतला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.अस्पृश्यांच्या शुद्धीकरणापेक्षा स्पृश्यांच्याच मन:शुद्धीची गरज असल्याचे ते म्हणत. 'यंग इंडिया'मध्ये त्यांनी लिहिले होते, "Untouchability is the sin of the Hindus. They must suffer for it, they must purify themselves, they pay the debt they owe to their supressed brothers and sisters." (Yong India, 1 May 1924) ही लज्जास्पद प्रथा दूर करण्यासाठी आपणच पुढे आले पाहिजे, हे लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी त्यांनी स्वत:पासूनच सुरुवात केली. ते स्वत: भंग्यांच्या वस्तीत जाऊन राहिले, स्वत: संडास साफ केले. आंतरजातीय विवाह हा अस्पृश्यतानिवारणाचा वा बंधुभाव वाढविण्याचा एकमेव मार्ग नाही असे त्यांचे मत होते. हरिजनांच्या मंदिरप्रवेशाविषयीही त्यांचे असेच मत होते. हरिजनांना मंदिरात जायचे असेल-नसेल; पण त्यांना प्रवेशासाठी बंदी करता कामा नये, असे त्यांचे मत होते. (हरिजन, २९ एप्रिल १९३३)

सार्वजनिक जीवनव्यवहारात अस्पृश्यांना सर्व प्रकारचे राजकीय, आर्थिक व सामाजिक-सांस्कृतिक हक्क मिळाले पाहिजेत अशीच गांधीजींची भूमिका होती. मात्र अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघ अथवा वेगळे प्रतिनिधित्व देण्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. तसे केल्याने हिंदू धर्मात फूट पडेल, अशी त्यांना भीती वाटत होती. मतपरिवर्तनावर गांधींचा भर असल्याने समाजसुधारकांनी चालविलेल्या प्रयत्नांमुळे परिस्थिती बदलेल असा त्यांना विश्वास वाटत होता. डॉ. आंबेडकर यांना मात्र स्पृश्य उदार होतील याची खात्री वाटत नसल्याने अस्पृश्यांनी अलग होणेच योग्य राहील असे वाटत होते. गांधीजींना आपली भूमिका स्पष्ट करून सांगावी या हेतूने गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी त्यांनी १४ ऑगस्ट १९३१ रोजी मुंबईला मणिभवनात गांधीजींची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी गांधीजींना सांगितले की,"आपल्या आग्रहामुळेच कॉंग्रेसने अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला थारा दिला, ही गोष्ट मी दृष्टिआड करू इच्छित नाही. पण औपचारिक मान्यता देण्यापलीकडे आपल्या कॉंग्रेसने याबाबतीत काही केलेले नाही अशी माझी तक्रार आहे... आपण म्हणता त्याप्रमाणे कॉंग्रेसला हा प्रश्न जर महत्त्वाचा अगर जिव्हाळ्याचा वाटत असता तर कॉंग्रेसचा सभासद होण्यास खादीची वगैरे अट आपण घातली आहे तशी अस्पृश्यतेसंबंधीचीही एखादी अट आपण घालावयास हवी होती.

अस्पृश्याच्या मुलाला आपल्या घरी विद्यार्थी म्हणून जो कोणी ठेवील, अगर त्याला आठवड्यातून एक दिवस तरी आपल्या घरी जेवायला बोलवील, अथवा घरी कामकाजाकरिता अस्पृश्याची गरीब बाई जो कोणी ठेवील, त्यालाच काँग्रेसचा सभासद होता येईल; वगैरे भरीव स्वरूपाची कसोटी काँग्रेसने ठेवायला पाहिजे होती. .. आम्ही स्वानुभवाच्या जोरावर असे म्हणू शकतो की, अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत अजून काँग्रेसचीही चित्तशुद्धी झाली नाही. काँग्रेसने अस्पृश्यांसाठी अमुक शाळा काढल्या, अमुक विहिरी पाण्यासाठी मोकळ्या केल्या, त्यांना इतक्या वेळा मोफत औषधे पाजली व त्यांचे प्रीत्यर्थ इतके लाख रुपये खर्च केले, या सर्व गोष्टी जरी गृहीत धरल्या, तरी जोपर्यंत ही चित्तशुद्धी घडली नाही, तोपर्यंत अस्पृश्यांनी काँग्रेसवर विश्वास ठेवून अगर आपल्यासारख्या महात्म्यावरही विसंबून राहू नये. स्पष्ट बोलतो, याबद्दल महात्माजी, आपण मला क्षमा करावी." (खरात, २०१३, पृ. १३३-१३४) अशा राजकीय पार्श्वभूमीवर गोलमेज परिषदेत अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकरांना विचारविनिमयासाठी पाचारण करण्यात आले ही घटना अस्पृश्यांच्या दृष्टीने ऐतिहासिक होती. भारताची घटना घडविण्याच्या कामी सल्ला घेण्यात हिंदूंबरोबर अस्पृश्यांचाही हक्क आहे हेही तत्त्व यामुळे मान्य केले गेले होते.

१९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेतही मताधिकारांच्या प्रश्नावरून डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदारसंघाऐवजी थेट विभक्त मतदारसंघांचीच मागणी केली. अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष एम. सी. राजा यांनीही सुरुवातीला अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघाचाच पुरस्कार केला होता; मात्र १९३२ साली झालेल्या राजे-मुंजे करारानंतर त्यांनी आपली भूमिका बदलली व संयुक्त मतदारसंघाचा पुरस्कार केला. हिंदू महासभेचे पुढारी डॉ. मुंजे यांनी राजा यांना संयुक्त मतदारसंघाचे महत्त्व पटवून दिले होते.

### जातीय निवाडा व पुणे करार :

लंडनमध्ये गोलमेज परिषदेत जातीय प्रश्नावर तडजोड होऊ शकली नव्हती. मात्र त्यानंतर १९३२ साली गांधीजी येरवडा तुरुंगात असताना पंतप्रधान मॅकडोनल यांनी १७ ऑगस्ट १९३२ रोजी अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ देण्याचा 'जातीय निवाडा' (Communal Award) जाहीर केला. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या मागणीप्रमाणे मुसलमान समाजाप्रमाणे अनुसूचित जातींसाठीही स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले. ब्रिटिश हिंदुस्थानात एकंदर १४६३ जागांपैकी अस्पृश्य समाजाला स्वतंत्र मतदारसंघामध्ये ७१ जागा मिळाल्या. शिवाय सर्व मतदारसंघात त्यांना मताचा अधिकार देण्यात आला. जातीय निवाड्यातील अस्पृश्यांसंबंधीच्या अधिकारांचा तपशील असा होता :

"अस्पृश्य वर्गातील लायक मतदार सामान्य मतदार संघातूनही मते देतील. परंतु या एकाच उपायाने अस्पृश्य समाजास कायदेमंडळामध्ये बराच कालपावेतो पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे शक्य नसल्यामुळे त्यांना (पॅरा २४ मध्ये नमूद केल्यानुसार) सामान्य मतदारसंघातही काही खास जागा देण्यात येतील. या जागांवर अस्पृश्य वर्गीय मतदारच आपला प्रतिनिधी निवडून

देतील आणि या मतदारांना साधारण प्रतिनिधी मतदार संघामध्येही मते देण्याचा अधिकार राहील. अस्पृश्य समाजाची संख्या जास्त असेल अशा ठरावीक जागीच हे मतदारसंघ निर्माण करण्यात येतील आणि मद्रासप्रांत खेरीजकरून इतर सर्वत्र अशा प्रकारचे मतदारसंघ निर्माण करण्यात येणार नाहीत."(खरात,२०१३, पृ. १६८)

म. गांधींनी या जातीय निवाड्याला आक्षेप घेतला. "हिंदुस्थानात अनुसूचित वर्ग असता कामा नयेत व कायद्याच्या दृष्टीने कोणताही जातिभेद असता कामा नये. सारे हिंदू एक आहेत – ना कोणी उच्च, ना कोणी नीच. अनुसूचित वर्गासारखे तथाकथित आदिवासींसारखे, जे जे वर्ग उपेक्षित असतील त्या सर्वांची खास सोय शिक्षण, घरे इत्यादी बाबतीत करावी. मात्र मतदारांच्या यादीत ते सर्व एक राहातील." अशी गांधीजींची भूमिका होती. (गांधी, १९९५, पृ. ११५-११७) स्वाभाविकच जातीय निवाड्याला त्यांचा विरोध होता. १८ ऑगस्ट १९३२ रोजी गांधीजींनी ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांना पत्र लिहून आपली प्रतिक्रिया कळविली आणि तुरुंगात प्राणांतिक उपोषणही सुरू केले. यापूर्वी अल्पसंख्य असलेल्या मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे घोषित झाले होते; परंतु तोच न्याय हरिजनांना लागू करता कामा नये, अशी गांधीजींची भूमिका होती. यासंदर्भात गांधीजींचा युक्तिवाद असा होता की, हरिजन हे हिंदू आहेत; त्यामुळे त्यांना हिंदू म्हणूनच वागविले पाहिजे. अस्पृश्यतेचा प्रश्न हा राजकीय प्रश्न नसून हिंदू समाजांतर्गत सामाजिक प्रश्न आहे, मुसलमानांसारखे त्यांना स्वतंत्र राष्ट्र नको आहे. त्यामुळे हरिजनांसाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केल्यास अंतर्गत कलह सुरू करण्याची संधी दिल्यासारखे होईल. पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी ८ सप्टेंबर १९३२ ला गांधीजींच्या पत्राला दिलेल्या उत्तरात हा निर्णय आपण काळजीपूर्वक विचार करून व कर्तव्यबुद्धीने घेतला असल्याचे सांगून आपल्या निर्णयाचे समर्थन केले. अस्पृश्य वर्ग हिंदू समाजापासून तोडला जाऊ नये अशीच आपलीही भूमिका असल्याचे सांगून हिंदू समाजात एकी राखली जाईल असाच हा निर्णय असल्याचे म्हटले होते. हिंदू जनरल मतदारसंघातील अस्पृश्यांचा मताधिकार काढून घेतला जाणार नाही, शिवाय हिंदू समाजाला धोका होऊ नये म्हणून त्यांना दोन मतांचा अधिकार राहील. निवडणूकीत स्पृश्यांनी अस्पृश्यांची मते मागावीत व अस्पृश्यांनी स्पृश्यांची मते मागावीत, यामुळे हिंदू समाजात एकी राखली जाईल असा आशावादही त्यांनी या पत्रातून व्यक्त केला होता. मात्र गांधीजींचे या उत्तराने समाधान झाले नाही व त्यांनी उपोषणाचा निर्णय कायम केला.

गांधीजींच्या उपोषणावर आपली प्रतिक्रिया देणारे पत्रक डॉ. आंबेडकरांनी प्रसिद्ध केले. त्यातील निवडक अंश असा :

१. "हिंदुस्थानातील जातिविषयक प्रश्न म्हणजे हिंदी स्वराज्याच्या ग्रंथाचे एक परिशिष्ट होय. तो प्रश्न एकंदरीने गौण स्वरूपाचा आहे; असे राउंड टेबल कॉन्फरन्समध्ये प्रतिपादणाऱ्या महात्माजींनी अशा गौण प्रश्नावर अन्नत्यागाला तयार व्हावे याचे मला आश्चर्य वाटते.
२. मुसलमान, शीख, युरोपियन, हिंदी, ख्रिश्चन, अँग्लो- इंडियन,जमीनदार, कामगार व व्यापारी या सर्वांना स्वतंत्र मतदारसंघ दिलेले असता, म. गांधींनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघालाच तेवढा विरोध करावा ही अत्यंत दु:खाची व विस्मयाची गोष्ट आहे.

अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाविषयी म. गांधींनी व्यक्त केलेली भीती माझ्या मते शुद्ध काल्पनिक आहे. मुसलमान व शीख यांना स्वतंत्र मतदारसंघ दिल्याने जर हिंदी राष्ट्रात तडे (तुकडे) पडत नाहीत, तर अस्पृश्यांनाच स्वतंत्र मतदारसंघ दिल्याने हिंदू समाज कसा काय दुभंग पावेल हे मला समजत नाही.

३. बहुसंख्यांकांचा जुलूम, धार्मिक बाबतीत महारोग्याप्रमाणे त्यांना दिली जाणारी वागणूक, आर्थिक परावलंबन, सामाजिक बाबतीत नाकेबंदी, खेडेगावात सर्व वर्गाकडून अस्पृश्यांचा निर्दयपणे केला जाणारा छळ या सर्व गोष्टींचा विचार केल्यास जादा राजकीय हक्कांखेरीज अस्पृश्यांना संघटित जुलमाला तोंड देता येणार नाही, असेच म्हणावे लागेल.

४. म. गांधी म्हणतात की, स्वतंत्र मतदारसंघामुळे अस्पृश्य हिंदू समाजापासून फोडले जात आहेत. पण या उलट डॉ. मुंजे हे कट्टर हिंदुपक्षाचे पुढारी लंडनहून परत आल्यावर आपल्या वक्तव्यात मत मांडताना म्हणतात की, 'जातीय निवाड्यामुळे अस्पृश्य हे हिंदुपासून मुळीच अलग होणार नाहीत आणि हे डॉ. मुंजे यांचे मत माझ्या मते बरोबर आहे.अशा परिस्थितीत म. गांधींसारख्या स्वत:स राष्ट्रीय म्हणविणाऱ्या व्यक्तीने या जातीय निवाड्याचा असा अस्पृश्यांच्या विरोधी अर्थ करावा, हे आश्चर्य होय.

५. 'अस्पृश्यांनी इतर उमेदवारांप्रमाणे निवडणुकीला उभे राहावे. अस्पृश्य उमेदवाराचा पराभव झाल्यास त्याने निवडणुकीविरुद्ध अर्ज करावा. केवळ अस्पृश्य म्हणून त्याचा पराभव झाला असे ठरले तर दुसऱ्या उमेदवारास सांगून त्याला त्या जागेचा राजीनामा द्यावयास सांगावे व पुन्हा ती निवडणूक लढवावी; आणि तेव्हाही तसाच प्रकार झाल्यास पुन्हा निवडणूक करावी' अशा तऱ्हेची महात्माजींची काही तरी योजना होती. त्यामुळे म. गांधी व काँग्रेस हे आमचे संरक्षण करतील या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही.

६. प्राणांतिक उपोषण करण्याचा मार्ग त्यांनी हिंदू-मुसलमान व हिंदू-अस्पृश्य यांचे दंगे मिटविण्यासाठी किंवा इतर राष्ट्रीय कार्यासाठी उपयोगात आणावा, पण या मार्गाने अस्पृश्यांचा मुळीच फायदा होणार नाही. (खरात, २०१३, पृ. १७१-१७३)

पुढे २४ सप्टेंबर १९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधी यांच्यामध्ये 'पुणे करार' करण्यात आला व अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवण्याऐवजी संयुक्त मतदारसंघात राखीव जागांची तडजोड करण्यात आली. या करारातून हरिजनांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली. मतदारसंघातील सर्व मतदार खुल्या व राखीव जागांसाठी मतदान करतील, असेही ठरविण्यात आले. हरिजनांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे लोकसभा व राज्यसभेतले प्रतिनिधित्व अबाधित ठेवणे हा राखीव जागांचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. जर असे आरक्षण ठेवले नसते तर गरीब व अल्पशिक्षित हरिजन निवडून येण्याची शक्यता नव्हती. अर्थात 'राखीव जागा' हा तात्पुरता पर्याय असून योग्य परिस्थिती निर्माण झाल्यावर आरक्षण रद्द केले जाऊ शकते. दरम्यानच्या काळात समता प्रस्थापित करण्याची प्रक्रिया उत्क्रांत होत जाईल, अशी अपेक्षा ठेवण्यात आली. स्वराज्य खऱ्या अर्थाने पाहिजे असेल तर संपूर्ण देशातून अस्पृश्यता निर्मूलन झाले पाहिजे, अशी आपली भूमिकाही

गांधीजींनी जाहीर केली व हरिजनसेवेकरिता शिक्षेची मुदत संपेपर्यंत सविनय कायदेभंग न करण्याची प्रतिज्ञा केली.

१९३२ च्या जातीय निवाड्यात केवळ ७१ जागा राखीव होत्या; मात्र पुणे करारानुसार भारतातील विविध प्रांतांच्या प्रांतिक कायदेमंडळातील एकूण ७८७ जागांपैकी १४८ जागा अस्पृश्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या; त्यापैकी मुंबई प्रांतात १५ आणि मध्य प्रांत वऱ्हाडात २० जागा राखीव ठेवण्याचे ठरविण्यात आले. मध्यवर्ती कायदेमंडळात १८ टक्के जागा अस्पृश्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. तसेच प्रत्येक प्रांतात अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाकरिता ठराविक रक्कम राखीव ठेवण्याचाही निर्णय करण्यात आला. मुंबई सरकारने हा कराराचा मसुदा हिंदुस्थान सरकारमार्फत इंग्लंडच्या बादशहाकडे पाठवून दिला.

पुणे करारानंतर म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही नेत्यांची मनोगते प्रसिद्ध झाली आहेत, त्यावरून या दोघांचे विचार परस्परपूरक होते, हे लक्षात येते. डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते की, "दोन दिवसांपूर्वी माझ्या मनावर विलक्षण ताण पडलेला होता, तसा क्वचितच यापूर्वी कोणावर पडला असेल. एका बाजूला हिंदुस्थानातील सर्वात मोठ्या माणसाचे (Greatest man in India) प्राण वाचविण्याची उत्कंठा आणि दुसऱ्या बाजूला माझ्या समाजाच्या हितसंबंधांची जपणूक करण्याची जबाबदारी, अशा पेचात मी सापडलो होतो. त्यातून मी सही सलामत बाहेर पडू शकलो, याचे बरेचसे श्रेय महात्मा गांधी यांना दिले पाहिजे. येरवडा तुरुंगात मी जेव्हा त्यांना प्रथम भेटलो तेव्हा त्यांच्यात आणि माझ्यात जे साधर्म्य मला दिसून आले, ते पाहून मी अगदी चकित होऊन गेलो."(गांधी आणि आंबेडकर - गं. बा. सरदार) महात्मा गांधींनी 'हिंदू' दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. "सवर्ण हिंदूंनी अनेक पिढ्या जी पापे केली त्याबद्दल त्यांना शिक्षा व्हावी म्हणून आंबेडकर हटवादी आणि तडजोड नाकारणारी भूमिका घेऊ शकले असते. त्यांनी तसे केले असते तर मी तरी त्यांच्या भूमिकेचा धि:कार केला नसता. माझे मरण म्हणजे हिंदुधर्माने ज्यांच्या अगणित पिढ्या बहिष्कृत केल्या आहेत अशांच्या यातनांचे अल्पसे परिमार्जन ठरले असते. पण आंबेडकरांनी अधिक उदात्त मार्ग स्वीकारला. सर्व धर्मांनी दाखविलेला दयेचा मार्ग त्यांनी चोखाळला. या दयेला आपण पात्र आहोत हे हिंदू समाज सिद्ध करील अशी आशा मी करतो." (डॉ. आंबेडकर : एक चिंतन, मधु लिमये, पृ. ४८-४९) नंतरच्या काळात डॉ. आंबेडकर यांनीच स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहावी असा आग्रह गांधीजींनी धरला होता, ही त्या दोघांच्या विचारातील निर्द्वंद्वाचीच खूण म्हणायला हरकत नाही.

**स्वतंत्र मजूर पक्ष :**

काँग्रेसची एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होऊ नये यासाठी विरोधी पक्ष असणे गरजेचे असल्याचे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. विशेषत: अस्पृश्य व वंचित गटसमूहाचे प्रतिनिधित्व योग्य पद्धतीने व्हावे यासाठी विरोधी पक्ष आवश्यक होता. हे लक्षात घेऊन त्यांनी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या नावात 'दलित' किंवा 'बहिष्कृत वर्ग' असा शब्दप्रयोग करण्याऐवजी 'मजूर' शब्द जाणिवपूर्वक योजला होता. 'मजूर वर्गा'त 'दलित वर्गा'चाही

समावेश होत असल्याने 'मजूर पक्ष' अशी व्यापक शब्दयोजना करण्यात आली. या स्वतंत्र मजूर पक्षाची राजकीय भूमिका व उद्देश पत्रिका जाहीर करताना त्यांनी पुढील मुद्यांचा प्रामुख्याने उलेख केला होता:

१. घटनाबद्ध राज्यकारभारावर आपल्या पक्षाचा विश्वास असून गव्हर्नरचे जादा, राखीव अधिकार जबाबदार राज्यपद्धतीला धोकादायक ठरणार नाहीत, अशी खबरदारी आमचा पक्ष घेईल.
२. शेती उत्पादन वाढीसाठी लँड मॉर्गेज बँका, शेतकरी उत्पादक सहकारी संघ , व्यापारी सोसायट्या स्थापन करण्यात येतील. ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा संपविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. खोती पद्धती व तालुकदारी पद्धती याविरुद्ध विशेष प्रयत्न करण्यात येतील.
३. शेती अधिक उत्पादनक्षम व्हावी व शेतकऱ्यांना लहान तुकड्यांची शेती परवडत नाही यासाठी शेतीला पूरक म्हणून दुसरे चरितार्थाचे साधन मिळावे यादृष्टीने औद्योगिकरण व ग्रामोद्योगांचे पुनरूज्जीवन करून नैसर्गिक संपत्तीला अनुसरून नवे उद्योगधंदे कढण्याचा आमचा पक्ष प्रयत्न करील.
४. औद्योगिक कामगारांसाठी बढती, योग्य वेतन, पगारी रजा, जीवनावश्यक सोयी, बोनस, पेन्शन, आजारपण वा अपघाताच्या काळात संरक्षण देणारी सामाजिक विमा योजना, कामगारांसाठी घरे इत्यादी तरतूदी करण्याचे प्रयत्न पक्ष करील.
५. लँड सेटलमेंट व सार्वजनिक बांधकामाच्या योजनांतून बेकार व भूमिहीन मजुरांना कामाचा पुरवठा करण्यात येईल. (खरात, २०१३, पृ. २२४-२२६)

१९३६ साली मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणुकाही स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने लढविण्यात आल्या. एकूण १३ राखीव व ४ खुल्या जागांसाठी उमेदवार उभे करण्यात आले होते, त्यापैकी ११ राखीव व ३ खुल्या जागांवर घसघशीत विजय संपादन करण्यात मजूर पक्षाला यश मिळाले. निवडून आलेल्या १४ आमदारांमध्ये स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याखेरीज दादासाहेब भा. कृ. गायकवाड, आर. आर. भोळे, बी. एच्. वैराळे, के. एस. सावंत, पी. जे. रोहम, डी. जी. जाधव यांचा समावेश होता. निवडणुकीतील यशानंतर स्वतंत्र मजूर पक्षाने खोती नष्ट करणारे बिल कायदे मंडळात दाखल केले. पाठोपाठ सावकारशाहीस आळा घालणाऱ्या दुसऱ्या बिलाचीही तयारी करण्यात आली. निवडणुकीत उभे केलेले सर्व १४ उमेदवार महार असल्यामुळे स्वतंत्र मजूर पक्ष हा महारांचा पक्ष असल्याची टीका काही लोक करीत; त्याची दखल घेऊन डॉ. आंबेडकर यांनी त्यास उत्तर देताना म्हटले होते की, "स्वतंत्र मजूर पक्षात महार-महारेतर असा भेद नाही. स्वतंत्र मजूर पक्ष जात नाही, गुण पाहतो..जात, शिक्षण, शील या तिन्ही गोष्टी पाहून कौन्सिलचे उमेदवार ठरवितो. अस्पृश्यांचे भांडण भांडण्याकरिता स्वतंत्र मजूर पक्ष उभा केला आहे, त्यात एखाद्या मांगाला जागा मिळाली नसेल, यावरून स्वतंत्र मजूर पक्ष मांगांच्या व चांभारांच्या विरुद्ध आहे, असे म्हणण्यात काही अर्थ नाही.. स्वतंत्र मजूर पक्ष महारांचा असला तरी तो महारांकरता भांडत नाही, तो भांडतो साऱ्या

अस्पृश्यांकरिता." (आंबेडकर २००५ ख, पृ. ३४५-२४६)

## शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशन :

दलित-अस्पृश्य समाजाची देशव्यापी संघटना असावी असा विचार डॉ. आंबेडकर १९३० पासूनच करीत होते. प्रत्यक्षात १९४२ साली दलितांच्या हक्क-संरक्षणासाठी राष्ट्रीय पातळीवरची 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' ही संघटना स्थापन करण्यात आली. नागपूरला १७ ते २० जुलै १९४२ या काळात अखिल भारतीय अस्पृश्य समाजाचे अधिवेशन भरले होते, त्यात हे फेडरेशन स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. फेडरेशनचे पहिले अध्यक्ष म्हणून मद्रासचे एन. शिवराज यांची निवड करण्यात आली, तर सरचिटणीसपदाची जबाबदारी मुंबई प्रांतातील पी. एन्. राजभोज यांच्याकडे सोपविण्यात आली. अनुसूचीत जातीसमूहाला नागरी हक्क मिळवून देण्यासाठी काम करणारी अखिल भारतीय पातळीवरची राजकीय संस्था अशी या फेडरेशनने आपली स्वत:ची ओळख निर्माण केली. नागपूरच्या अधिवेशनात काही महत्त्वाचे ठराव करण्यात आले. त्यात "घटनात्मक तरतुदींद्वारा दलितांची वेगळी खेडी वसविली जावीत व त्यासाठी शासनाने दरवर्षी ५ कोटी रुपये काढून ठेवावेत; घटनेतील तरतुदींद्वारा अस्पृश्यांच्या प्राथमिक व उच्च शिक्षणासाठी ठराविक रक्कम अग्रक्रमाने खर्च करण्याचे बंधन घातले जावे; प्रांतिक व केंद्रीय सरकारांमध्ये अस्पृश्यांची संख्या, गरज व महत्त्व यांच्या प्रमाणात त्यांना मंत्रिपदे देणे बंधनकारक असावे; सरकारी नोकऱ्यांमध्ये याच कसोटीवर त्यांना प्रमाणशीर जागा दिल्या जाव्यात. न्यायखाते, पोलिस व महसूल खात्यांमध्ये त्यांना ज्या प्रमाणात जागा देण्याचे निश्चित होईल तेवढ्या प्रमाणात दहा वर्षांच्या आत जागा भरल्या जाव्यात; याच कसोटीवर स्थानिक स्वराज्य संस्था व विधिमंडळे यांच्यात अस्पृश्यांना प्रतिनिधित्व राखीव असावे. या प्रतिनिधींची निवड विभक्त मतदारसंघाच्या पद्धतीने व्हावी, आणि लोकसेवा आयोगांवर (प्रांतिक व केंद्रीय) त्यांना प्रतिनिधित्व असावे. (पळशीकर, १९८५-८६, पृ. २१४)

मुंबई इलाखा व मध्यप्रांत-वऱ्हाडबरोबरच प्रत्येक प्रांतात शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या शाखा निघाल्या. कानपूर येथे २९-३० जानेवारी १९४४ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे दुसरे अधिवेशन झाले. २३ सप्टेंबर १९४४ रोजी मद्रास येथे फेडरेशनच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत भारताच्या राजकीय जीवनात शेड्यूल्ड कास्टचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे, भारतीय राज्यघटनेला अस्पृश्य वर्गाची संमती असल्याशिवाय ती संमत करण्यात येऊ नये, मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकात अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी निश्चित रकमेची तरतूद केली पाहिजे, लोकसंख्येच्या प्रमाणात अस्पृश्यांना कायदेमंडळात, मंत्रिमंडळात, स्थानिक स्वराज्य संस्थांत, सरकारी नोकरीत प्रतिनिधित्वाची सोय केली जावी, सेटलमेंट कमिशनमार्फत अस्पृश्य वर्गासाठी सरकारी पडीक जमिनी राखून ठेवण्याची घटनेत तरतूद असावी, अस्पृश्य वर्गाच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी योग्य रीतीने होत आहे का याची पाहणी करणारी यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदारसंघाऐवजी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करावेत इत्यादी ठराव संमत करण्यात आलेत व अस्पृश्यांच्या वतीने राजकीय पक्षांशी वाटाघाटी करण्याचे अधिकार डॉ. आंबेडकरांना देण्यात आले. शेड्यूल्ड

कास्ट फेडरेशनच्या राजकीय मागण्यांसाठी पुणे येथे १५ ऑगस्ट १९४६ रोजी सत्याग्रह करण्यात आला. सत्याग्रहात १२८ महिलांसह १९५० सत्याग्रही सहभागी झाले होते.

१९४२ ते १९४६ या काळात डॉ. आंबेडकर व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूर मंत्री होते. त्या काळात त्यांनी कॉलेज शिक्षण घेणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६० रुपयांच्या शिष्यवृत्त्या मंजूर करवून घेतल्या. ३० विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विलायतेस पाठविण्याची योजना मंजूर करून घेतली. सरकारी नोकऱ्यांत दलितांसाठी साडे आठ टक्के जागा मिळवल्या. १९४६-४७ च्या निवडणुकीत मात्र शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशनचा पराजय झाला. असे असले तरी २४ ऑगस्ट १९४६ रोजी स्थापन झालेल्या हिंदुस्थानच्या हंगामी सरकारात बाबू जगजीवनराम व जे. एन. मंडल या दोन अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधींना मंत्रिमंडळात स्थान मिळाले. घटनासमितीत व मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांचा समावेश असावा यासाठी मुंबई प्रांतिक असेंब्लीतील काँग्रेसने बॅ. जयकरांच्या राजीनाम्याने रिकाम्या झालेल्या जागी आंबेडकरांना बिनविरोध निवडून दिले.

डॉ. आंबेडकर यांच्या जातीय समीकरणाच्या राजकारणाची नेमकी फलश्रुती काय, याचे उत्तर स्वत: आंबेडकरांनीच १९४१ साली 'जनता' पत्रातील एका लेखाद्वारे देऊन ठेवले आहे ते असे, "१९२७ सालापासून तर आतापर्यंतचा हिंदुस्थानातील राजकारणाचा इतिहास तपासून पाहिला असताना त्यात एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते, ती गोष्ट ही की ज्या अस्पृश्य समाजाला 'हिंदू समाजांतर्गत समाज' समजला जात असे त्याची *'स्वतंत्र समाज'* अशी गणना होऊ लागली, ही होय... हिंदूपासून अस्पृश्य लोक राजकीयदृष्ट्या तरी भिन्न आहेत, स्वतंत्र आहेत ही गोष्ट इतकी सर्वमान्य झाली होती की, गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टच्याखाली कार्यकारी मंडळात मुसलमानांप्रमाणे अस्पृश्यांचे मंत्री असावेत, असे बंधनही घालण्यात आले होते. काँग्रेसच्या अरेरावीपणामुळे त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात अस्पृश्यांचा प्रतिनिधी घेतला नाही, ही गोष्ट अलाहिदा." (आंबेडकर २००५, ख, पृ. ३५६) भारतीय राजकारणात अस्पृश्यांना आपले स्थान निर्माण करता यावे, यासाठी डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नांना आलेल्या यशाचा हा पुरावा आहे; मात्र त्याचबरोबर काँग्रेससारख्या देशव्यापी पक्षाच्या नेतेगणांनी आपल्या पक्षीय राजकारणात अस्पृश्यांना अद्याप स्थान दिले नसल्याची खंतही यातून अधोरेखित झालेली आहे.

## १.११. काँग्रेस संघटनेतील अंत:प्रवाह

काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीत व निर्णयप्रक्रियेत म. गांधींचे स्थान पालकत्वासारखे होते. कार्यकर्त्यांची व जनसामान्यांची अढळ श्रद्धा असलेले हे एकखांबी नेतृत्व होते. अर्थात काँग्रेसवर गांधीजींच्या नेतृत्वाची पकड कायम असली तरी काही वेळा काँग्रेस कार्यकर्ते आणि गांधीजी यांच्यात मतभिन्नतेमुळे पेच निर्माण होत असत. उदाहरणार्थ, लाहोर काँग्रेसपूर्वी क्रांतिकारकांच्या एका गटाने व्हॉइसरॉयची गाडी उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला होता; गांधीजींनी काँग्रेसच्या विषयनियामक समितीत या क्रांतिकारकांचा निषेध करण्याचा ठराव मांडला. विदर्भातील काँग्रेस नेते डॉ. ना. भा. खरे गांधीजींच्या प्रस्तावाशी सहमत नव्हते. खरे

यांनी उर्दूतून भाषण करून गांधीजींच्या प्रस्तावाचा प्रतिवाद केला. त्यानंतर ठरावावर मतदान घ्यावे लागले. ठरावाला समसमान म्हणजे दोन्ही बाजूला प्रत्येकी ११४ मते पडली. हा पेच निर्माण झाल्यावर सभा तहकूब करण्यात आली व दुपारी पुन्हा सभा झाली, त्यात डॉ. सत्यपाल यांनी गांधीजींच्या बाजूने मतदान केले व ११५ विरुद्ध ११४ अशा मतांनी गांधीजींचा ठराव पारित झाला. १९२८ च्या कलकत्ता कॉंग्रेसमध्येही गांधीजींनी स्वराज्याचा ठराव मांडल्यावर असाच एक पेच निर्माण झाला होता. सुभाषचंद्र बोस यांनी या ठरावाला एक उपसूचना जोडली. ब्रिटिश साम्राज्याशी संबंध तोडून संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय कॉंग्रेसचे समाधान होणार नाही, अशा आशयाची ती उपसूचना होती. यावर गांधीजींनी ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत जर वसाहतीचे स्वातंत्र्य मिळाले नाही तर आपण 'संपूर्ण स्वातंत्र्या'चे जरूर समर्थन करू अशी भूमिका घेतली व सुभाषचंद्रांची उपसूचना फेटाळली गेली. मात्र ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत वसाहतीचे स्वातंत्र्य न मिळाल्याने पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात ३१ डिसेंबर १९२९ रोजी 'संपूर्ण स्वातंत्र्या'चा ठराव पारित करण्यात आला.

कॉंग्रेसमधल्या जहाल मतवादी तरुणांना सविनय कायदेभंगाचा लढा मागे घेण्याची गांधीजींची ही कार्यपद्धती मान्य नव्हती. सुभाषचंद्र बोस व विठ्ठलभाई पटेल यांनी १९३४ साली कॉंग्रेसची पुनर्घटना करण्यासाठी पर्यायी नेतृत्वाची गरज असल्याची भूमिका जाहीरपणे मांडली. शेतकरी-कामगारांना संघटित करून स्वातंत्र्यलढ्याला आर्थिक-सामाजिक क्रांतीचे परिमाण द्यावे असे मानणाऱ्या कॉंग्रेस अंतर्गत समाजवादी विचाराच्या गटाने सुभाषचंद्रांच्या या भूमिकेला पाठिंबा दिला. १९३४ नंतर कॉंग्रेसमधला हा गट सक्रिय झाला व त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्यामुळे कॉंग्रेसमधल्या गांधीजींच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली. गांधीजींची इच्छा नसतानाही समाजवादी गटाने सुभाषचंद्रांना दोनदा कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवडून आणले. १९३३ साली व्हाईसरॉयने इंग्लंडच्या भारतमंत्र्यांना या बदलत्या प्रवाहांची कल्पना देणाऱ्या पत्रात लिहिले होते, "गांधींच्या नेतृत्वावर डाव्या आणि उजव्या ह्या दोन्ही बाजूंकडून उघड हल्ला करण्यात येत आहे. चौदा वर्षे सतत चाललेल्या लढ्यात कॉंग्रेसचे नेतृत्व करून तिला अपयशाच्या अगदी समीप नेऊन ठेवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात येत आहे. कॉंग्रेसच्या अनुयायांत कोणते धोरण स्वीकारावे ह्याविषयी मतभेद उद्भवले आहेत आणि सर्वसाधारण वातावरण निराशाग्रस्त आहे." (पळशीकर, कित्ता, पृ. ९५)

१९३३ साली नाशिकच्या तुरुंगात असताना अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नाराण, मिनू मसानी, अशोक मेहता यांनी कॉंग्रेसअंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करण्यासंबंधी विचारविनिमय केला होता. नाशिक तुरुंगातून सुटल्यावर मिनू मसानी यांनी जवाहरलाल नेहरू यांच्याशी चर्चा केली व त्यांचा पाठिंबा घेऊन २५ फेब्रुवारी १९३४ रोजी मुंबईत बोलावलेल्या सभेत मुंबई इलाखा कॉंग्रेस समाजवादी गटाची स्थापना केली. मसानी व युसूफ मेहेरअली यांनी समाजवादी पक्षाचे चिटणीस म्हणून जाबदारी स्वीकारली. (फडके य. दि. १९८६, पृ. ६३)

दरम्यान गोलमेज परिषदेचे तिसरे अधिवेशनही झाले. ब्रिटिश पार्लमेंटच्या संयुक्त चिकित्सा

समितीच्या अहवालानुसार एक विधेयक मांडण्यात आले आणि ते मंजूर झाल्यावर भारतीय शासनाचा १९३५ चा कायदा जाहीर झाला. या कायद्याने ब्रह्मदेश भारतापासून अलग करण्यात आला. प्रांतांमधील राज्यकारभार जबाबदार राज्यपद्धतीचा करण्यात आला. या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता मिळाली. या कायद्यातील संघराज्यविषयक तरतूदी बहुतेक राजकीय पक्षांना मान्य नसल्याने अमलात आल्या नाहीत; मात्र प्रांतिक स्वायत्ततेच्या मुद्दयावर सर्व पक्षांचे एकमत झाले. त्यानंतर प्रांतिक निवडणुका झाल्या व त्यात काँग्रेसने यश मिळवले. मुंबई प्रांतात काँग्रेसचा एकही मुसलमान उमेदवार निवडून आला नाही. मुंबई विधानमंडळात एकूण ३० मुसलमान आमदार होते; त्यापैकी २० मुस्लीम लीगचे व १० स्वतंत्र उमेदवार होते. या स्वतंत्र उमेदवारांपैकी मोहम्मद यासीन नूरी याने काँग्रेस प्रवेश करून मंत्रीपद पटकावले. इतर ९ उमेदवार मुस्लीम लीगमध्ये दाखल झाले. मध्यप्रांत वऱ्हाडात युसूफ शरीफ या मुस्लीम लीगतर्फे निवडून आलेल्या आमदारास काँग्रेस पक्षाने आपल्या पक्षात घेऊन कायदेमंत्री केले. पक्षांतराचा पायंडा किती जुना आहे, हे यावरून लक्षात येते.

मध्यवर्ती कायदेमंडळात महाराष्ट्रात दोन सभासदांचा मतदारसंघ होता. हा मतदारसंघ प्राप्तीकर व ३० रुपयांवर शेतसारा भरणारांचा होता. काँग्रेसतर्फे केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ हे उमेदवार होते. प्रतिस्पर्धी उमेदवारात वालचंद हिराचंद हे उद्योगपती होते. केसरीचे न. चिं. केळकर यांचा त्यांना पाठिंबा होता. तरीही काँग्रेसचे जेधे व गाडगीळ निवडून आले. मात्र पुढे गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाचा कार्यक्रम घोषित केल्यावर गाडगीळ व जेधे या दोघांनी एकाच दिवशी सत्याग्रह केला व त्यांना प्रत्येकी दीड वर्षांची शिक्षा झाली. एक वर्षापेक्षा अधिक काळाची शिक्षा झाल्याने त्या दोघांचे मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासदत्व रद्द झाले. पोटनिवडणुका जाहीर झाल्या. काँग्रेसतर्फे देवगिरीकर व सखारामबापू जेधे यांची उमेदवारी जाहीर झाली. राजमल लखीचंद व जमनालाल मेहता हे इतर प्रतिस्पर्धी होते. देवगिरीकर व राजमल लखीचंद निवडून आले. सखारामबापू जेध्यांचा पराभव काँग्रेसच्या जिव्हारी लागला होता.

**काँग्रेसचे फैजपूर अधिवेशन :**

१८८५ साली स्थापन झालेल्या काँग्रेसचे एकही अधिवेशन खेड्यात झाले नव्हते. १९३४ साली ग्रामोद्योगसंघाची स्थापना करताना हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात जागृती घडविण्यासाठी काँग्रेसची अधिवेशने खेड्यात भरविली पाहिजेत, असा विचार गांधीजींनी मांडला. त्यानुसार १४ एप्रिल १९३६ च्या लखनौ काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत काँग्रेसचे ५० वे सुवर्णमहोत्सवी अधिवेशन खेड्यात घ्यावे, असा ठराव करण्यात आला. कमीत कमी खर्चात, खेड्याला साजेल असे उत्तम अधिवेशन भरविण्याची कामगिरी महाराष्ट्रातील चरखा संघाचे व इतर कार्यकर्ते यशस्वीपणे पार पाडतील असा गांधीजींना विश्वास होता; त्यामुळे हे अधिवेशन महाराष्ट्रात घेण्याचे ठरविण्यात आले. काँग्रेसची चळवळ खेड्यांत रुजवावी, व अधिवेशनाला ग्रामसंस्कृतीचा रंग चढावा या हेतूने अधिवेशनाची आखणी करण्यात आली. महाराष्ट्र काँग्रेसचे शंकरराव देव यांनी अधिवेशनासाठी खानदेशातील फैजपूर हे स्थळ नक्की

केले. फैजपूरला धनाजी नाना चौधरी हे चरखा संघ व हरिजन सेवेला वाहून घेतलेले सक्रिय पुढारी होते व उत्तम संघटन कौशल्यही होते. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी त्यांच्याकडे स्वागत समितीच्या सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली. सावदा आणि फैजपूर गावांच्या मध्ये ८५ एकर क्षेत्र अधिवेशनासाठी संपादित करण्यात आले. अधिवेशन स्थळाला 'टिळकनगर' हे नाव देण्यात आले. या अधिवेशनाचे महत्त्व सांगताना त्यावेळच्या 'नवाकाळ'च्या अग्रलेखात म्हटले होते की, "फैजपूर खेड्यात येणारी काँग्रेस ही लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्या चळवळीचा संगम आहे. लोकमान्यांचा स्वराज्यावरील कटाक्ष आणि हे स्वराज्य स्वदेशीनेच मिळवून देण्याचा महात्माजींचा दीर्घ खटाटोप, ह्यांचा मेळ काँग्रेसच्या धोरणात स्पष्ट दिसून येतो." (बापट २००२, पृ. ११०) टिळकनगरच्या मुख्य प्रवेशद्वाराला शिवाजी महाराजांचे व इतर प्रवेशद्वारांना झाशीवाली, न्या. रानडे, ना. गोखले यांची नावे देण्यात आली. वर्धा आश्रमातील रामदासभाई गुलाटी यांनी काटकसरीने ८५ एकर क्षेत्रातला अधिवेशनस्थळाचा रचनात्मक आराखडा तयार केला. बंगालचे चित्रकार नंदलाल बोस यांनी ग्रामीण व स्वदेशी वस्तूंचा वापर करून प्रदर्शनस्थळाची सजावट केली. शंकर विनायक ठकार यांनी गावोगाव फिरून सामग्री जमा केली व तट्ट्याच्या झोपड्यांची निवासस्थाने उभारली. स्वयंपाकासाठी शेतकरी कुटुंबातील स्त्रियांनी घरगुती जात्यांवर गव्हाचे पीठ दळून दिले. स्वदेशी व स्वावलंबनाचा वस्तुपाठ या स्त्रियांनी घालून दिला. महिला स्वयंसेविकांचे प्रशिक्षण करण्यासाठी पुण्याहून प्रेमाबाई कंटक, धुळ्याच्या पार्वतीबाई ठकार, शिरपूरच्या कमलाबाई जोशी यांनी पुढाकार घेतला. चरखा संघ व ग्रामोद्योग संघाने मिळून खादी व ग्रामोद्योगाचे प्रदर्शन भरविले. वैकुंठभाई मेहता यांनी त्याचे उद्घाटन केले. अधिवेशनाला जोडून भारतीय किसान परिषदेचे अधिवेशन भरविले होते. विनोबा भावे यांनी संपूर्ण अधिवेशनाच्या पूर्वतयारीची व जनसंपर्काची जबाबदारी स्वीकारली होती. अधिवेशनाच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने विनोबा नित्य नेमाने खानदेशातील खेड्यांत प्रवचन करीत फिरले व त्यातून शेतकऱ्यांना राष्ट्रीय चळवळीचे महत्त्व समजावून सांगण्याचे काम केले."काँग्रेस तुमची आहे. काँग्रेस राष्ट्राला सन्मार्ग दाखवत आहे. तुमच्या दारापाशी सूर्याच्या किरणांसारखी आली आहे. आपली दारे, खिडक्या बंद ठेवू नका. सर्व राष्ट्राचे दर्शन तुम्हाला फैजपूरमध्ये होणार आहे" असा उपदेश करीत विनोबांनी ही प्रचार-यात्रा चालविली होती. (बापट, २००२, पृ. ११०-११) परिणामत: पूर्व खानदेशातून काँग्रेसच्या दहा हजार सभासदांची नोंदणी झाली. बैलगाड्या व पदयात्रा करीत ग्रामजनांनी अधिवेनाला गर्दी केली. मुंबईहून १७ डिसेंबरला मुंबई प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. नरिमन यांनी पेटविलेली ध्वजज्योत घेऊन निघलेला स्वयंसेवकांचा जथा गावोगाव मिरवत २७ डिसेंबरला फैजपूरला पोहचला. स्वागताध्यक्ष शंकरराव देव यांनी ती ज्योत फैजपूर काँग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हाती सोपविली. पन्नास बैलांच्या रथातून मिरणुकीने नेहरूंना अधिवेशनस्थळी आणण्यात आले. या अधिवेशनात गाडगेबाबांचे कीर्तन झाले; शिवाय त्यांनी स्वच्छतेचीही जबाबदारी घेतली होती. या अधिवेशनाला दोन लाखांचा जनसमुदाय असूनही कुठेही साफसफाईसाठी स्वतंत्रपणे झाडूवाला वा मेहतर नेमलेले नव्हते. गांधीजींच्या भंगीमुक्त

विचाराचे मोल लक्षात घेऊन शिष्ट समाजातील तरुण स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे ह्या कामात सहयोग दिला होता.भिल्ल समाजाचे नेते गुला महाराज पदयात्रा करीत अधिवेशनाला आले. या अधिवेशनाला महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू,खान अब्दुल गफार खान, मानवेंद्रनाथ रॉय, डॉ. राजेंद्रप्रसाद, नाटककार कृ. प्र. खडिलकर अशी दिग्गज मंडळी उपस्थित होती. अशा उत्सवात पार पडलेल्या या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा झाल्या व महाराष्ट्रातला ग्रामीण भागातला बहुजन समाज कॉंग्रेसशी जोडला गेला, ही या अधिवेशनाची सर्वात मोठी फलश्रुती म्हटली पाहिजे.

फैजपूर अधिवेशनाची सांगता झाल्यावर गांधीजींनी कार्यकर्त्यांना व स्वयंसेकांना उद्देशून भाषण केले, त्यात त्यांनी मराठी माणसाच्या राजकीय स्वभावावर केलेले भाष्य महत्त्वाचे होते. ते म्हणाले होते : "तुम्ही सारे (स्वयंसेवक) मूक सेवक आहात. जो जो माणूस येथे आला, तो तो तुमची प्रशंसा करून गेला. हुकूम सोडण्यापेक्षा त्याची अंमबजावणी करण्यात तुम्ही तत्पर होता. सर्वात हलकी समजली जाणारी कामे करण्यास तुम्ही कधी कांकू केले नाही; तो तर महाराष्ट्राचा मोठा गुण आहे. नेते होण्यापेक्षा सेवक होण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवणारे निःस्वार्थी कार्यकर्ते महाराष्ट्रात पुष्कळ आहेत. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', ही शिकवण टिळक महाराजांनी जशी आपल्याला दिली तशीच 'ते स्वराज्य मिळविण्याची किल्ली निरिच्छ सेवा ही आहे' अशीही दीक्षा त्यांनी दिली." (बापट, २००२, पृ. ११२) नेते होण्यापेक्षा सेवक होण्यात मराठी माणूस संतुष्ट असतो, हे गांधीजींचे निरीक्षण देशाच्या राजकारणात महाराष्ट्र अग्रस्थानी न राहता अनुयायांची निष्ठा निभावण्यातच आपली थोरवी कशी मिरवत राहिला याकडे सूचक निर्देश करणारे आहे.

**कॉंग्रेस समाजवादी पक्ष :**

१९३३ साली नाशिकच्या तुरुंगात बंदिवान असताना जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, युसुफ मेहेरअली, मिनू मसानी यांनी राष्ट्रीय कॉंग्रेस अंतर्गत 'समाजवादी गट' स्थापन करण्यासंबंधी विचारविनिमय केला होता. १९३४ साली मे महिन्यात उत्तर प्रदेशातील कॉंग्रेसचे नेते डॉ. संपूर्णानंद यांनी समाजवादी गटाच्या कृती-कार्यक्रमाचा एक कच्चा आराखडा तयार केला होता.त्यानंतर पटणा येथे आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली 'कॉंग्रेस समाजवादी पक्षा'ची स्थापना करण्यात आली. अर्थात या गटातील नेतेमंडळीत अद्याप राजकीय सुस्पष्टता आली नसल्याने काही मंडळींना कम्युनिस्ट विचारधारेच्या मार्क्स-एंगल्सच्या वर्गलढ्याचे आकर्षण होते, तर काहींचा गांधीवादी कॉंग्रेसकडे ओढा होता. कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या घटनेत जातिधर्मनिरपेक्ष व लिंगभेदरहित समतेच्या तत्त्वावर अधिष्ठित समाजवादी समाजरचना आणण्याचे व्यापक ध्येय्य ठरविण्यात आले होते. पक्षाच्या कार्यक्रमपत्रिकेत सत्तेचे विकेंद्रीकरण; राज्याच्या नियंत्रणाखाली देशाचा नियोजनबद्ध विकास; पोलाद, कापड,रेल्वे, जहाज उद्योग, खाणी, बँका यांचे राष्ट्रीयीकरण,शेत जमिनींचे पुनर्वाटप, सहकारी शेतीला प्रोत्साहन; सहकारी तत्त्वावर उत्पादन, वितरण व कर्जपुरवठा; शोषणमुक्त समाजानिर्मितीसाठी संस्थानिक व जमीनदारांच्या संपत्तीचे राष्ट्रीयीकरण, शेतकरी-कामगार

वर्गाला कर्जमुक्त करणे व सामान्य जनतेला रोजगारहमी देणे या मुद्द्यांचा समावेश होता. काँग्रेसपक्षांतर्गत दबावगट म्हणून आपल्या उद्देशपत्रिकेतले विषय पुढे आणण्यावर समाजवाद्यांचा भर होता. १९३६ साली जवाहरलाल नेहरूंनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर काँग्रेस कार्यकारिणीत आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण आणि अच्युतराव पटवर्धन यांचा समावेश करून या गटाची पक्षात योग्य ती दखल घेतली व पक्षांतर्गत संघर्षाची मात्रा कमी करण्याचा मार्ग निवडला.

नागपूरात काँग्रेस समाजवादी पक्षाची शाखा स्थापन करण्यासाठी सुरुवातीला रामभाऊ रुईकर , पु. य देशपांडे, डॉ. काशीकर यांनी पुढाकार घेतला होता. मात्र तेथे कामगार संघटना व अन्य तत्सम कामांखेरीज फारसे काम झाले नाही. १९३६ साली मिनू मसानी यांनी नागपूरात येऊन काँग्रेस समाजवादी पक्षाची शाखा कार्यान्वित करण्यासाठी समविचारी लोकांशी चर्चा केली. यावेळी आचार्य दांडेकर यांनी मध्यप्रांत-वऱ्हाडच्या प्रांत सचिवपदाची जबाबदारी स्वीकारून पक्षाची धुरा अंगावर घेतली. फैजपूर काँग्रेस नंतर समाजवादी काँग्रेस पक्षाने 'किसान सभा' स्थापन केली होती. त्यानंतर शेतकऱ्यांसाठी काम करण्याकरिता स्वामी सहजानंद यांना विदर्भात पाठविण्यात आले व समाजवादी काँग्रेसने आपल्या उद्देशपत्रिकेनुसार काम करण्यास सुरुवात केली. मगनलाल बागडी, श्यामनारायण काश्मिरी हेही पक्षात दाखल झाले व त्यांनी शेतकरी व कामगारवर्गासाठी काम सुरू केले.

विदर्भात वेळेवर पीक न आल्याने शेतकऱ्यांच्या जीवनात बरेच प्रश्न निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सरकारने जमीन महसूलात सूट द्यावी, तगाई कर्ज माफ करावे, शेतकऱ्यांना कामे द्यावीत ह्या मागण्यांसाठी सत्याग्रह करण्यात आले. २२ मे १९३९ रोजी २०० शेतकऱ्यांचा मोर्चा उमरेड तहसील कार्यालयावर नेण्यात आला. दर पंधरवाड्याला सोमवार व गुरुवारी सत्याग्रह करण्याचे चक्र सुरू ठेवण्यात आले. २५ मेला महिला सत्याग्रहींसह निघालेल्या मोर्चाने पोलिसांचे कडे तोडून तहसील कचेरित प्रवेश केला; सत्याग्रहींना अटक करण्यात आली. २९ मेच्या सत्याग्रहात मगनलाल बागडी, नारायण लोहकरे व इतर तिघा सत्याग्रहींना अटक झाली. उमरेडचे कोष्टीही सत्याग्रहात उतरले. २० सत्याग्रहींना अटक झाली. ११ जून १९३९ पर्यंत हे सत्याग्रहाचे चक्र चालू होते. १७ जून १९३९ रोजी काँग्रेस समाजवादी पक्ष आणि किसान सभेने हिंदुस्थानी लाल सेनेचे आचार्य दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला संयुक्त सभा घेतली. या सभेत उमरेड सत्याग्रहींच्या अटकेच्या निषेधाचा ठराव पारित करण्यात आला. दरम्यानच्या काळात शेतकऱ्यांच्या काही मागण्या मान्य केल्याबद्दल सरकारचे आभारही मानले. मात्र राष्ट्रीय काँग्रेसने प्रांतिक काँग्रेसला विश्वासात न घेता उमरेड सत्याग्रह अनधिकृत ठरवल्याने स्वामी सहजानंद यांनी त्यावर उघड टीका केली. एका अर्थाने काँग्रेस शेतकरी-कामगारांच्या डाव्या गटाच्या कार्यकर्त्यांना संपवू पहात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### १९३६ च्या प्रांतिक निवडणुका :

१९३५ साली भारतीयांना राजकीय सुधारणा देणारा कायदा पारित झाला. या कायद्याला अनुसरून १९३६ साली प्रांतिक निवडणुका घोषित झाल्या. १९३५ च्या कायद्यान्वये

मुसलमानांना व संस्थानिकांना प्रत्येकी १/३ जागांची हमी देण्यात आली होती. मुसलमानांना बंगालमध्ये ४८.६ टक्के व पंजाबमध्ये ५१.४ टक्के जागा देऊन व इतर प्रांतात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक जागा देण्याची घटनात्मक तरतूद करण्यात आली होती. यामुळे जिनांच्या मुस्लीम लीगचे प्रभुत्व वाढले होते. त्यांच्या दृष्टीने या निवडणुका पथ्यावर पडल्या होत्या. काँग्रेसमधला समाजवादी गट मात्र या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याच्या विचाराकडे झुकला होता; याउलट १९२३ साली स्थापन झालेल्या स्वराज्य पक्षाच्या गटाला ब्रिटिशांसमोर काँग्रेसचे सत्ताप्रदर्शन करण्याची ही चांगली संधी आहे, म्हणून निवडणुका लढवाव्यात असे वाटत होते. गांधीजींनी दंडुकेशाहीच्या जागी लोकमताचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न म्हणून या दुसऱ्या मताचे समर्थन केले. तीन कोटी स्त्री-पुरुष मतदार निर्माण करून त्यांच्या हाती सत्ता देण्याच्या या निर्णयाचे स्वागत करून काँग्रेसने निवडणुका लढवल्या. मुंबई, मध्यप्रांत-वऱ्हाड, मद्रास, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, ओरिसा या सात प्रांतांत राष्ट्रीय सभेला निर्विवाद बहुमत मिळाले.

मुंबई प्रांताला विधानसभेच्या १७५ जागा होत्या. त्यात ८२ जागा राखीव होत्या : मुसलमानांसाठी २९, हरिजन १५, मराठा ७, अँग्लोइंडियन्स ८, उद्योगधंद्यांचे प्रतिनिधी ७, जमीनदार २, कामगार ७, विद्यापीठ १, स्त्रिया ६ (त्यात १ मुसलमान). काँग्रेसला ८६ जागांवर विजय मिळाला, त्यात हरिजनांची कुलाबा जिल्ह्यातली एक जागा मिळाली; मात्र राखीव मराठा व मुसलमान जागांपैकी एकही जागा मिळाली नाही. निवडणुकीच्या आधी दोन दिवस पुण्यात नेहरूंचे भाषण झाले; पुण्याच्या दोन्ही जागा काँग्रेसला मिळाल्या. विदर्भात ११२ पैकी काँग्रेसला ७२ जागांवर विजय मिळाला. १९३७ साली मुंबई प्रांतात बाळासाहेब खेर व मध्यप्रांत-वऱ्हाडात डॉ. नारायण भास्कर खरे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन मंत्रिमंडळे स्थापन केली. मुंबईला काँग्रेसच्या वर्तुळात श्री. नरीमन यांचे स्थान मोठे होते. त्यांचा उल्लेख काँग्रेसचा 'सिंह' असा केला जाई. स. का. पाटील त्यांचे पाठीराखे होते. पुण्यात निवडून आलेल्या १७ आमदारांची बैठक होऊन त्यांनी नरीमन यांना मुंबई इलाख्याचे पंतप्रधान करावे अशी एकमताने शिफारस केली व तसे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले. मात्र सरदार पटेल यांना त्यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी मान्य नव्हते. नरीमन यांनी काँग्रेस वर्किंग कमिटीपुढे आपली कैफियत मांडली; परंतु जवाहरलाल नेहरू यांनी नरीमन यांचा अर्ज फेटाळून लावला. अखेर त्यांनी गांधीजींकडे धाव घेतली व गांधीजी देतील तो निर्णय मान्य करू अशी भूमिका घेतली. गांधीजींनी नरीमन प्रकरणाची नि:पक्षपाती चौकशी करण्याचे निर्देश सरदार पटेल यांना दिले. परंतु नरीमन पारशी आहेत, एवढ्या कारणावरून त्यांना वगळले हे सिद्ध करणे अवघड होते. निराश झालेल्या नरीमन यांचे सार्वजनिक जीवन या घटनेनंतर संपुष्टात आले. ब्राह्मणेतर नरिमन यांना डावलून बाळासाहेब खेर यांना पंतप्रधान केले गेले. नरीमन पारशी व खेर ब्राह्मण यामुळे या प्रकरणाला जातीय रंग चढला. "असल्या आरोपात तथ्य नसले तरी तो खोडून काढणे फार कठीण असते" हे मौलाना अबुल कलम आझाद यांचे या प्रकरणावरचे भाष्यही तितकेच महत्त्वाचे आहे. (आझाद, १९६१, पृ. १५)

प्रांतिक मंत्रिमंडळांच्या निर्णयप्रक्रियेत गव्हर्नरच्या खास अधिकारांचा वापर होणार नाही, असे आश्वासन राष्ट्रीय सभेने सरकारकडे मागितले. दीर्घ काळ चाललेल्या वाटाघाटींनंतर जुलै १९३७ मध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. हाती आलेल्या सत्तेचा वापर करून १८ कलमी रचनात्मक कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी, असा गांधीजींनी काँग्रेस मंत्रिमंडळांना सल्ला दिला. एकीकडे घटनात्मक सुधारणांचा पोकळपणा उघड करायचा आणि दुसरीकडे रचनात्मक कार्यक्रमांचा पाठपुरावा करायचा, अशी दुहेरी नीती अमलात आणावी असे गांधीजींनी सुचविले. मात्र सत्ताग्रहणानंतर काँग्रेसमध्ये भ्रष्टाचार, वशिलेबाजी, गटबाजी बोकाळली व सत्तास्पर्धेला ऊत आला. विदर्भातील खेर यांच्या मंत्रिमंडळातील पं. रविशंकर शुक्ला व पं. द्वारकादास मिश्र यांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उकरून काढल्याने डॉ. खरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. रविशंकर शुक्ल यांनी २९ जुलै १९३८ रोजी नवीन मंत्रिमंडळ स्थापन केले. डॉ. ना. भा. खरे यांच्या विरोधात झालेल्या या राजकीय नाट्यावर ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'मुखवटे' ही कादंबरी लिहिली. ह्या राजकीय सत्तास्पर्धेत मानवी स्वभावांचा व कुटील राजकारणाचा कसा प्रभाव पडतो यादृष्टीने या कादंबरीची राजकीय इतिहासात दखल घ्यावी लागते. निवडणुकीतील अशा प्रकारांमुळे उद्विग्न होऊन गांधीजींनी काँग्रेस विसर्जित का करू नये, असा टोकाचा विचार मांडायला सुरुवात केली. असे असले तरी या मंत्रिमंडळांनी आपल्या कारकिर्दीत लोककल्याणाचे काही चांगले निर्णय घेतले. शुक्ल मंत्रिमंडळाने आदिवासी मुलांसाठी पाठशाळा काढण्याचा, प्रांताच्या आर्थिक सर्वेक्षणाचा, शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात साडेबारा टक्के सूट देण्याचा, कर्जनिवारण्यासाठी न्यायालय स्थापण्याचा, स्वराज्य संस्था कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेऊन नव्या आशा पल्लवित केल्या.

मुस्लीम लीगकडून मात्र काँग्रेसचा आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेचा कार्यक्रम हिंदुकेंद्री असल्याचा प्रचार करण्यात आला. १९३७ साली लखनौ येथे झालेल्या मुस्लीम लीगच्या वार्षिक अधिवेशनात काँग्रेस ही हिंदूंची संघटना असून काँग्रेसच्या राजवटीत मुसलमानांना न्यायाने वागविले जाण्याची अपेक्षा करणे चुकीचे असल्याचे जिना यांनी जाहीरपणे सांगितले. काँग्रेस राजवटीत मुसलमानांना असुरक्षित वाटते असेही जिना म्हणाले. मुस्लीम राष्ट्रवाद्यांनी वेगळ्या राष्ट्राची मागणी पुढे केली. मुस्लीमांच्या या रोषाच्या पार्श्वभूमीवर गांधीजी व बॅ. जिना यांच्यात या काळात पत्रव्यवहार झाला. २८ एप्रिल १९३८ रोजी गांधीजींनी मुंबईत जिनांची भेट घेतली; पण या प्रयत्नांना जिनांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. मुस्लीम लीगने फाळणीचा आग्रह काम ठेवला.

## समाजवादी गट सक्रिय :

१९३७ साली १ व २ फेब्रुवारीस गुजरातच्या हरिपुरा गावी काँग्रेसचे ५१ वे वार्षिक अधिवेशन झाले. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर जानेवारी महिन्यात झालेल्या काँग्रेसच्या बैठकीत समाजवादी गट सक्रिय झाला व या गटाने अध्यक्षपदी सुभाषचंद्र बोस यांचे नाव सुचविले. त्यावेळी सुभाषचंद्र बोस इंग्लंडात होते. हरिपुरा अधिवेशनात सुभाषचंद्र बोस यांनी

आपल्या अध्यक्षीय भाषणात आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आढावा घेऊन युरोपात कोणत्याही क्षणी युद्धाचा भडका उडू शकतो व अशा युद्धजन्य पार्श्वभूमीवर काँग्रेसची ठोस व्यूहनीती ठरविण्याची गरज स्पष्ट केली. १९३५ च्या कायद्यानुसार संघराज्याची पुनर्रचना करायची झाल्यास संस्थानी मुलुख व खालसा मुलुख ही कृत्रिम विभागणी नाकारून एकात्म भारताचे संघराज्य निर्माण व्हावे, व स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वातंत्र्योत्तर भारताची वाटचाल समाजवादाच्या वाटेने करावी अशा आशयाचे विचार त्यांनी अध्यक्षीय भाषणातून मांडले. त्यानंतर हरिपुरा काँग्रेसने साम्राज्यवाद्यांनी युद्ध केल्यास हिंदुस्थान त्यात सामील होणार नाही व एतद्देशीय जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय हिंदुस्थानला युद्धात ओढता येणार नाही, असा स्पष्ट ठराव केला.

हरिपुरा काँग्रेसनंतर २२ मे १९३८ रोजी काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन जबलपूरजवळच्या त्रिपुरा या खेड्यात घेण्याचे ठरले. या अधिवेशनासाठी सुभाषचंद्र बोस यांनाच अध्यक्ष करावे, असा एक मतप्रवाह होता. गांधीजी, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद या नेत्यांचा मात्र सुभाषचंद्रांना विरोध होता. यापूर्वी १९२९ च्या लाहोर अधिवेशनातही कार्यकारिणी सदस्यांच्या यादीतून गांधीजींनी सुभाषचंद्र बोस व श्रीनिवास अय्यंगार यांना वगळले होते. आता त्रिपुरा काँग्रेसच्या वेळी सुभाषचंद्रांऐवजी मौलाना आझादांना काँग्रेसचे अध्यक्षपद देण्याच्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या. मौलाना आझाद यांनी या प्रस्तावास संमती दिली होती, परंतु ऐनवेळी माघार घेतली. दरम्यान रुग्णशय्येवर असलेल्या सुभाषचंद्र बोस यांनी हे आव्हान स्वीकारून अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचे घोषित केले. गांधीजी, वल्लभभाई पटेल यांनी पट्टाभी सीतारामय्या यांचे नाव पुढे करून त्यांना जाहीर पाठिंबा दिला. मात्र आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, मानवेंद्रनाथ रॉय, बापूजी अणे इत्यादींनी सुभाषचंद्रांना पाठिंबा जाहीर केला. अखेर २ जानेवारी १९३९ रोजी मतदान होऊन सुभाषचंद्र बोस दोनशेहून अधिक मताधिक्याने काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडून आले. गांधीजींनी डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांचा पराभव हा आपला स्वत:चा पराभव असून या पराभवातही मी आनंद मानतो अशा आशयाचा लेख ४ फेब्रुवारी १९३९ च्या 'हरिजन'मध्ये लिहून आपली खंत व्यक्त केली. मात्र सुभाषबाबू हे काही देशाचे शत्रू नाहीत, त्यांनी देशासाठी बरेच सोसले आहे; काँग्रेसमधल्या अल्पसंख्य गटास त्यांच्या बाजूने जाणे शक्य नसल्यास त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडावे, असाही सल्ला त्यांनी या लेखातून काँग्रेसजनांना दिला. ८ फेब्रुवारीस काँग्रेस कार्यकारिणीतील गांधीजींच्या १२ निष्ठावंतांनी राजीनामे देऊन आपली प्रतिक्रिया नोंदविली. या पार्श्वभूमीवर सुभाषचंद्र बोस तातडीने १५ फेब्रुवारीस वर्ध्याला गेले व गांधीजींची भेट घेतली. त्रिपुरा अधिवेशनात चर्चेला घ्यावयाच्या विषयांबाबत पूर्वतयारी करण्यासाठी २२ फेब्रुवारीला वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक घेण्याचा प्रस्ताव त्यांनी गांधीजींसमोर ठेवला. मात्र तापाने फणफणल्यामुळे सुभाषचंद्र २२ फेब्रुवारीला वर्ध्याला जाऊ शकले नाही.

कार्यकारिणीच्या १२ सदस्यांनी तारेने आपले राजीनामे सुभाषचंद्रांना पाठविले. गांधीजींनी राजकोटच्या ठाकूरसाहेबांनी सरदार पटेल यांच्याशी केलेल्या कराराचा भंग केला म्हणून त्रिपुरा

अधिवेशनाच्या आधीच राजकोटला ३ मार्च १९३९ पासून उपोषण सुरू केले. अंथरुणाला खिळलेले सुभाषबाबू ८ मार्चच्या अधिवेशनासाठी त्रिपुरा येथे पोहचले व चाकाच्या खुर्चीवर बसून व्यासपीठावर आले. या शारीरिक दुर्बलतेमुळे त्यांना खुल्या अधिवेशनाचे कामकाज चालवता आले नाही; मौलाना आझाद यांनी ती जाबदारी स्वीकारली. सुभाषचंद्रांचे भाषण त्यांचे बंधू शरच्चंद्र बोस यांनी वाचून दाखविले. नवी कार्यकारिणी नेमताना गांधीजींच्या इच्छेनुसार सभासदांची नेमणूक करावी, हा गोविंद वल्लभ पंत यांचा मुळात घटनाबाह्य असलेला ठराव सभेतल्या गोंधळात मंजूर करण्यात आला. यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला. अखेर २९ एप्रिल १९३९ रोजी कलकत्ता येथे झालेल्या काँग्रेस समितीच्या बैठकीत सुभाषचंद्र बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व ३ मे १९३९ रोजी काँग्रेसअंतर्गत अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची स्थापना केली व आपल्या पद्धतीने ब्रिटिश सरकारविरोधी काम करण्यास सुरुवात केली. मधल्या काळात सुभाषचंद्र बोस यांच्या जागी गांधीजींच्या सल्ल्याने राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्षपदी निवड झाली. नवनियुक्त कार्यकारिणीची मुंबईत २१ ते २७ जून १९३९ या काळात बैठक झाली. प्रांतिक काँग्रेसच्या परवानगीशिवाय वैयक्तिक सत्याग्रह करता येणार नाही, हा वल्लभभाई पटेल यांचा ठरावही या बैठकीत मंजूर झाला. या ठरावावर महाराष्ट्रातील साने गुरुजी, सेनापती बापट, विनायकराव भुस्कटे यांनी टीका केली. सुभाषचंद्र बोस यांनी ९ जुलै हा निषेध दिन म्हणून पाळण्याचे आवाहन केले. त्यावर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली व सुभाषबाबूंना बंगाल प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून हटवण्यात आले; शिवाय तीन वर्षांसाठी काँग्रेस समितीची निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरविण्यात आले. अशा प्रकारे गांधीजींच्या प्रभावाने काँग्रेसअंतर्गत पर्यायी नेतृत्वाच्या वाटा बंद झाल्या.

### हिंदुस्थानी लाल सेना (स्थापना १९३९) :

विदर्भात 'मार्क्सिस्ट क्लब' चे सदस्य असलेल्या बी. एन. मुखर्जी, मगनलाल बागडी आणि पं. श्याम नारायण काश्मिरी यांच्यावर स्नो एडगर यांच्या 'Red Star Over China' या पुस्तकाचा प्रभाव होता. त्यातून त्यांनी चीनमधील माओत्सेतुंगच्या लाल सेनेच्या धर्तीवर १३ एप्रिल १९३९ रोजी जालियनवाला बाग हत्याकांडाच्या २८ व्या स्मृतिदिनी 'हिंदुस्थानी लाल सेना' स्थापन केली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील शोषणापासून मुक्त असणारी समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी झटणे हे सेनेचे ध्येय्य होते. पक्षीय गटा-तटांच्या व संसदीय राजकारणापासून अलिप्त राहून शेतकरी-कामगार वर्गाच्या हितासाठी काम करण्याचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. सेनेच्या लिखित घटनेनुसार 'लष्करी परिषद' (Militari Council) स्थापन करण्यात आली. समाजवादी विचारधारेचा प्रसार करणे, लष्करी शिस्तीतून क्रांतीच्या दिशेने वाटचाल करणे व संघटनात्मक कामात लोकशाही मूल्यांचे पालन करणे ही लाल सेनेच्या घटनेची मूलतत्त्वे होती. निर्णयप्रक्रियेत लोकशाही मूल्यांचे भान ठेवणे आवश्यक असले तरी निर्णयांची कार्यवाही मात्र लष्करी शिस्तीनेच झाली पाहिजे यावर सेनेचा कटाक्ष होता. लष्करी परिषदेवर श्यामनारायण काश्मिरी (सेनापती), पं. श्यामलाल (उपसेनापती), मगनलाल बागडी (वित्त सचिव), आचार्य विनायक सखाराम दांडेकर (राजकीय सचिव), महादेवराव पवार

(सरचिटणीस), भास्करराव चावरे (गुप्तचर सचिव), किसनलाल चौधरी (प्रसिद्धी सचिव) यांची निवड करण्यात आली होती. हिंदुस्थानी लाल सेनेची संकल्पना जरी चीनच्या लाल सेनेवरून घेतलेली असली तरी काँग्रेस समाजवादी पक्षाची सहयोगी शाखा म्हणूनच सेनेचे अस्तित्व ठेवण्याचे ठरविण्यात आले होते. त्यामुळे राष्ट्रीय काँग्रेसचे चार आणे वर्गणी भरून झालेल्या सभासदासच हिंदुस्थानी लाल सेनेचे सदस्यत्व दिले जात असे. सेनेचे अधिकृत ध्वजही दोन प्रकारचे होते. तिरंग्यावर चरख्याचे चित्र असलेला मोठा ध्वज आणि लाल रंगाच्या ध्वजावर विळा-हातोड्याचे चिन्ह असलेला लहान ध्वज अशी दुहेरी योजना स्वीकारण्यात आली होती. अन्य क्रांतिकारी संघटनांप्रमाणे ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करण्याची कल्पना हिंदुस्थानी लाल सेनेला मान्य नव्हती. जरूर तेथे हिंसेचा मार्ग पत्करायचा मात्र इतर वेळी गांधीजींच्या नेतृत्वाचा आदर करायचा अशी लाल सेनेची भूमिका होती. कम्युनिस्टांप्रमाणे आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांची एकजूट करण्याचे स्वप्नही ते पहात नव्हते. त्याऐवजी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न आणि स्वातंत्र्यानंतर नि:स्वार्थ व शिस्तबद्ध प्रशासनासाठी कार्यक्षम लोकांची फळी तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवून सेनेने आपला कृतिकार्यक्रम चालविण्याचा संकल्प केला होता. ११ सैनिकांचे एक मंडल, तीन मंडलांची पलटण आणि सर्व पलटणींची मिळून सेना असा आकृतिबंध होता. लाल अर्धी चड्डी, खाकी सदरा, कातडी पट्टा व काळे बुट असा गणवेश होता. दररोज कवायत आणि कवायतीनंतर मुरमुरे-फुटाण्यांचा नाश्ता असा कार्यक्रम चालत असे. सेनेत दाखल होणाऱ्या तरुणांना काटेरी व लोखंडी तारांच्या कुंपणातून मार्गक्रमण करणे, दोरीवरून चालणे, बंदूक चालविणे, पूल ओलांडणे, रस्ता बांधणे इत्यादी कौशल्ये शिकविली जात. शिस्त मोडणाऱ्यांवर 'कोर्ट मार्शल' प्रमाणे खटला चालवला जाई. पं. श्यामलालजी बौद्धिक वर्ग चालवीत. नागपूर शहरात लाल सेनेची १७-१८ मंडळे कार्यरत होती. शारीर सुदृढता, बौद्धिक जाण आणि त्यागी वृत्ती असणाऱ्या तरुणांची संघटना अशी हिंदुस्थानी लाल सेनेने आपली ओळख निर्माण केली होती. (Sharma, 1998, p. 40)

राजकीय कार्यक्रमपत्रिकेखेरीज सामाजिक कार्यातही लाल सैनिक पुढे होते. १९३९ साली नागपूरजवळ खापा गावाला कान्हा नदीच्या पुराने वेढा दिला होता, त्यावेळी पूरग्रस्तांच्या मदतीला हिंदुस्थानी लाल सेनेचे सैनिक धावून गेले. बाबूलाल गुप्ता, केशवराव भगत यांच्या चमूने पूरात वाहून जाणारी माणसे व जनावरांचे प्राण वाचविण्याची शर्थ केली. मगनलाल बागडी अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचा ट्रक घेऊन हजर झाले. पूर ओसरल्यावर सलग चार दिवस लाल सेनेचे सैनिक गाळ आणि घाणीचे ढिगारे साफ करण्याचे काम करीत होते. (Sharma, 1998, p. 47-48)

## १.१२. दुसरे महायुद्ध आणि भारतीय राजकारण

१९३९ साली सप्टेंबर महिन्यात दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले. व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी स्वत:च्या अधिकारात हिंदुस्थान जर्मनीविरुद्ध ब्रिटनच्या बाजूने युद्धात सहभागी होत असल्याचे घोषित केले. १९३५ च्या कायद्यात दुरुस्ती करून युद्धकाळात सर्व अथवा कोणत्याही विशिष्ट प्रांताचा कारभार हाती घेण्याचा अधिकार व्हाइसरॉयला देण्यात आला. या

पार्श्वभूमीवर ब्रिटिशांना युद्धात सहकार्य करावे की नाही, या मुद्यावरून एतद्देशीय कार्यकर्त्यांत दोन भिन्न मतप्रवाह निर्माण झाले. युद्धात ब्रिटनचा पराभव झाला तर भारताला स्वातंत्र्य मिळण्याचा मार्ग सोपा होईल, म्हणून ब्रिटिशांना युद्धात सहकार्य करू नये असे मानणारा एक मतप्रवाह होता; तर भारताला स्वातंत्र्य देण्याचे आश्वासन घेऊन ब्रिटिशांना युद्धसहकार्य करावे, असे मानणारा दुसरा मतप्रवाह होता. कॉंग्रेसने युद्धविरोधी प्रचार करून ब्रिटिशांविरुद्ध जनमत तयार करण्याची मोहीम सुरू केली.

सुभाषचंद्र बोस यांची मुंबईत १ व १७ सप्टेंबर १९३९ रोजी युद्धविरोधी भाषणे झाली. नागपूरात ८-९ ऑक्टोबर १९३९ ला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या उपस्थितीत ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधात एक परिषद आयोजित करण्यात आली होती. हिंदुस्थानी लाल सेनेने सुभाषबाबूंना 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन सन्मानीत केले. स्वागत समितीचे अध्यक्ष हिंदुस्थानी लाल सेनेचे नेते आचार्य विनायक सखाराम दांडेकर यांनी परिषदेला संबोधित करताना "सध्याचे युद्ध हे लोकशाहीच्या रक्षणापेक्षा साम्राज्याच्या संरक्षणासाठी सुरू आहे." अशी टीका केली. बी. टी. रणदिवे यांनी ब्रिटिशांची राजनीती बेभरवशाची असल्याचे उदाहरण दिले : "पहिल्या महायुद्धात भारतीयांनी ब्रिटिशांना साथ दिली, पण त्याची परतफेड त्यांनी जालियनवाला बाग हत्याकांडाने आणि रौलट ॲक्ट आणून केली." सुभाषबाबूंनी आपल्या भाषणात या युद्धामुळे ब्रिटिश साम्राज्यशाहीचा पाया भक्कम होऊ पहात असल्याचे म्हटले. युद्धकाळात ब्रिटिशांनी भारतीयांची प्रांतिक स्वायत्तताही काढून घेतली व सर्व अधिकार व्हॉईसरॉयकडे केंद्रित केले, ह्या साम्राज्यवादी धोरणावर त्यांनी टीका केली. जोपर्यंत ब्रिटिशांकडून आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होत नाही तोपर्यंत सत्याग्रहाचे चक्र चालू ठेवण्याचे आवाहनही नेताजींनी केले. देशाबाहेरून स्वातंत्र्याची लढाई लढण्याची सुभाषचंद्रांची योजना तयार असल्याची कल्पना श्यामनारायण काश्मिरी यांनी परिषदेला दिली. (Sharma. 1998, P. 49)

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थानी लाल सेनेने आंतरराष्ट्रीय राजकारणाची लोकांना माहिती व्हावी यासाठी गावोगावी जाऊन व्याख्याने देण्याची मोहीम चालवली. आचार्य दांडेकर यांनी त्यासाठी प्रशिक्षित व्याख्यात्यांचा एक गट तयार केला होता. या भाषणांचा आशय सर्वसाधारणपणे असा असायचा :

"हे युद्ध आपल्या विरोधात नसून ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधात सुरू आहे. आपण भारतवासीयांनी या संधीचा पुरेपूर फायदा घेतला पाहिजे. आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने ब्रिटिश राजवटीचा सूड घेण्याची हीच ती वेळ आहे. ब्रिटिशांनी केवळ त्यांची राजवट वाचविण्यासाठी भारतीयांची सैन्यभरती करून त्यांना हजारो मैल दूर इटली, जर्मनी आणि जपानच्या विरोधात पाठविले आहे. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या हुकूमानुसार आपले भारतीय सैनिक तिथे कूच करीत आहेत. परिणामत: हजारो भारतीय सैनिक या युद्धात बळी जात आहेत. तिथल्या रणांगणावर भारतीय सैनिकांच्या रक्ताचा पाण्यासारखा सडा पडत आहे. आपल्या जन्मभूमीच्या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडण्याऐवजी इतरांचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आपल्या सैनिकांना रक्त सांडावे लागत आहे. तेव्हा आपल्या सैनिकांनी आता परत फिरावे आणि

आपल्या बंदुका इंग्रज सैनिकांवर रोखाव्यात. ब्रिटिशांचा पराभव आता निश्चित आहे; त्यामुळे जनतेने आता ब्रिटिश प्रशासनावर विश्वास ठेवू नये. शंभराच्या आणि हजाराच्या चलनी नोटांची आता काही किंमत राहिली नाही, त्यामुळे जनतेने या नोटा स्वीकारू नयेत" असे आवाहनही या भाषणांतून करण्यात येत होते.

हिंदुस्थानी लाल सेनेने युद्धकाळात काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर पाळत ठेवण्याचे काम केले. ७ ऑगस्ट १९४० रोजी उमरेड येथे बिगुल वाजवीत हिंदुस्थानी लाल सेनेने संचलन केले. पाठोपाठ २७ ऑगस्टला काटोल येथे ब्रिटिश शासन व युद्धविरोधी घोषणा देत मिरवणूक काढली व चलनी नोटा न स्वीकारण्याचे जनतेला आवाहन केले.१७ ऑक्टोबर १९४० पर्यंत युद्धविरोधी प्रचार करणाऱ्या १५० लाल सैनिकांना अटक करण्यात आली. चिथावणीखोर भाषण दिल्याबद्दल महादेवराव पवार,झुलालराव सातपुते, आचार्य दांडेकर, पं. श्यामलाल, डॉ. रामसिंग गौर, मगनलाल बागडी, एम्. वाय. कुलकर्णी, यांना अटक करण्यात आली व ९ महिन्यांपासून १८ महिन्यांपर्यंत कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. डिसेंबर १९४० पर्यंत हिंदुस्थानी लाल सेनेतल्या आणखी ३२ जणांवर खटले दाखल करण्यात आले. (Sharma, 1998, Pp. 52-53)

कम्युनिस्टांनीही युद्धविरोधी प्रचाराला प्रारंभ केला. राष्ट्रीय सभेने या युद्धाचे हेतू काय, हे ब्रिटिश सरकारला जाहीर करण्याचे आवाहन केले. व्हाइसरॉयनी युद्धकार्यासाठी भारतीय प्रतिनिधींचे एक सल्लागार मंडळ स्थापण्याचा मनोदय जाहीर केला; पण त्यामुळे काँग्रेसचे समाधान झाले नाही. भारतीय जनतेची संमती घेऊनच हिंदुस्थानातील युद्धसामग्रीचा वापर केला पाहिजे, अशा आशयाचा ठराव काँग्रेसने १४ सप्टेंबर १९३९ च्या कार्यकारिणीच्या बैठकीत पारित केला. स्वातंत्र्यसंपादनासाठी निवडलेला अहिंसेचा मार्ग परचक्रापासून संरक्षण करण्याकरिताही उपयोगात आणावा, अशी गांधीजींची भूमिका होती. मात्र हिटलरच्या आव्हानांचा अहिंसक मार्गांनी कसा प्रतिवाद करावा हे सर्वसामान्य कार्यकर्त्यांना उमजणे शक्य नव्हते. अखेर काँग्रेसने गांधीविचारांशी फारकत घेऊन युद्धकार्यात बरोबरीच्या नात्याने वागविले जाण्याच्या अटीवर सहकार्य देऊ केले. तसेच महायुद्धाच्या समाप्तीनंतर हिंदुस्थाला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचे वचन ब्रिटिश सरकारने द्यावे, अशी अपेक्षाही ठेवली होती. मात्र त्याबाबत सरकारकडून कुठलेही ठोस आश्वासन न मिळाल्याने काँग्रेस वर्किंग कमिटीने २२ ऑक्टोबर १९३९ रोजी नवा ठराव करून ३१ ऑक्टोबरपर्यंत काँग्रेस मंत्रिमंडळांना राजीनामे देण्याचा आदेश दिला. डिसेंबर १९३९ मध्ये काँग्रेसची राजवट संपली. याबद्दल मुस्लिम लीगने २२ डिसेंबर १९३९ हा 'मुक्तिदिन' साजरा करण्याचे ठरविले. भारतीय दलित संघटनेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मद्रास जस्टिस पक्षाचे पेरियार हेही या आनंदोत्सवात सामील झाले. (फडके य. दि. १९८६, पृ. ७२) ज्या प्रांतात काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले, तेथे ९३ कलमाखाली सल्लागाराच्या साहाय्याने गव्हर्नरची राजवट सुरू राहिली.

युद्ध सुरू असताना स्वराज्यासाठी सविनय कायदेभंगाची अहिंसक लढ्याची मोहीम सुरू करण्याचा विचार गांधीजी करीत होते. काँग्रेस कार्यकारिणीने गांधीजींना त्याबाबतचे सर्व

अधिकार दिले होते. तरीही याबाबत ११ नोव्हेंबर १९३९ च्या 'हरिजन'च्या अंकात लेख लिहून गांधीजींनी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपापली मते काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांना कळविण्याचे आवाहन केले. युद्धामुळे ब्रिटन अडचणीत आले असताना, ही संधी समजून आपण जन-आंदोलन सुरू करावे असे सुभाषचंद्र बोस यांचे मत होते; मात्र आंदोलन अहिंसकच असावे असा आग्रह धरण्याचे काही कारण नाही, असे त्यांचे मत होते. मानवेंद्रनाथ रॉय यांनाही गांधीजींचा निरपवाद अहिंसेचा आग्रह सयुक्तिक वाटत नव्हता; तसे त्यांनी गांधीजींना पत्र लिहून कळवले होते. (हरिजन १८ नोव्हेंबर १९३९)

पुढे काँग्रेसतर्फे घटनासमितीच्या मागणीवर भर देऊन तात्कालिक व्यवस्थेबाबत ब्रिटिश सरकारकडून लोकांना विश्वासार्ह वाटेल अशा कृतीची मागणी करण्यात आली. इंग्रज सरकारने काँग्रेसच्या कुठल्याच भूमिकेला प्रतिसाद दिला नाही. दुसरे महायुद्ध संपेपर्यंत हा पेचप्रसंग कायम राहिला. उलट ८ ऑगस्ट १९४० रोजी एक विशेष निवेदन प्रसिद्ध करून काँग्रेसच्या हाती सत्ता सोपवण्यास आपण तयार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्या निवेदनात म्हटले होते की, "(the British Government) could not contemplate transfer of their present responsibilities for the peace and welfare of India to any system of government whose authority is directly denied by large and powerful elements in India's national life. Nor could they be parties to the coercion of such elements to such a government." (पळशीकर, १९८५-८६, पृ. १०१) थोडक्यात, ब्रिटिश सरकार काँग्रेसला भारताची एकमुखी प्रातिनिधिक राजकीय संघटना मानण्यास तयार नव्हते. इथे देशातल्या नेतृत्वाची जातिकेंद्री विभागणी ब्रिटिशांच्या पथ्यावर पडली होती.

### वैयक्तिक सत्याग्रह :

सरकारच्या उपरिनिर्दिष्ट निवेदनाची प्रतिक्रिया म्हणून काँग्रेस कदाचित कायदेभंगाची चळवळ सुरू करील हे लक्षात घेऊन सरकारने भाषणस्वातंत्र्याचा व मुद्रणस्वातंत्र्याचा संकोच करणारे आदेश निर्गमित केले. २७ व ३० सप्टेंबर १९४० रोजी गांधीजींनी व्हॉइसरॉयची भेट घेऊन भाषणस्वातंत्र्याचा हक्क मान्य करण्याची विनंती केली. सर्व युद्धे स्वरूपत: अन्याय व विनाशी असल्यामुळे युद्धप्रयत्नांत मदत न करण्याची शिकवण जनतेला देण्याची मुभा गांधीजी मागत होते. पण ही विनंती मान्य झाली नाही. त्यामुळे सामूहिक सत्याग्रहाची चळवळ सुरू करण्याचा गांधीजीच विचार करीत होते; मात्र जातीय ऐक्याशिवाय कायदेभंगाचा सामूहिक लढा सुरू करण्यातली जोखीम गांधीजींना ठाऊक होती; त्यामुळे त्यांनी सार्वत्रिक व सामुहिक कायदेभंगाऐवजी व्यक्तिगत कायदेभंगाची कल्पना मांडली. वैयक्तिक जबाबदारीवर सत्याग्रहाचे प्रत्येक कृत्य करणे अपेक्षित असल्याने या सत्याग्रहास *'वैयक्तिक सत्याग्रह'* असे संबोधण्यात आले. या सत्याग्रहासाठी संख्याबलापेक्षा उच्चतम गुणावर भर देऊन विशिष्ट गुण असलेल्या निवडक लोकांचीच निवड करण्यात आली; त्यामुळे त्यास *'गुणविशिष्ट सत्याग्रह'* असेही म्हटले

जात असे. तसेच कायदे मंडळ, स्थानिक संस्था वा कॉंग्रेस कमिटीतील प्रतिनिधींना सत्याग्रह करण्यास सांगितले गेल्याने *'प्रातिनिधिक सत्याग्रह'* असेही त्याचे वर्णन करता येईल. (रंगराव दिवाकर, १९४५, पृ. २४३)

गुणविशिष्टतेच्या निकषावर पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची व दुसऱ्या क्रमांकाचे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरूंची निवड झाली. एकेका व्यक्तीने सरकारला पूर्वसूचना देऊन भाषणबंदीचा हुकूम मोडून कायदेभंग करावा अशी पद्धती ठरविण्यात आली. व्यक्तिगत सत्याग्रहाच्या माध्यमातून युद्धकार्यात अडथळा आणण्याचा कोणताही उद्देश नसल्याचे स्पष्टीकरणही गांधीजींकडून देण्यात आले. २० ऑक्टोबर १९४० च्या 'हरिजन'मध्ये 'Civil Disobedience' नावाचा इंग्रजी लेख लिहून गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहामागची आपली भूमिका स्पष्ट केली व कॉंग्रेस पक्षाचे सभासदही नसलेल्या विनोबांची पहिले सत्याग्रही म्हणून का निवड केली हे स्पष्ट करून विनोबांची ओळख करून दिली. राजकीय व्यासपीठावर कधीही न झळकता मूकपणे विधायक कार्य करीत राहाणाऱ्या विनोबांनी यापूर्वीच्या सत्याग्रह आंदोलनात सक्रिय सहभाग दिला होता. अस्पृश्यतेचे उच्चाटन, हस्तव्यवसायातून शिक्षण, महारोग्यांची सेवा, इतिहासाचे अभ्यासक आणि संपूर्णपणे युद्धविरोधी भूमिका यामुळे 'शुद्ध सत्याग्रही' म्हणून आपण विनोबांना 'प्रथम सत्याग्रही' म्हणून निवडले असल्याची भूमिका गांधीजींनी या लेखात स्पष्ट केली. १० ऑक्टोबर १९४० रोजी पवनारला विनोबांचा पहिला व्यक्तिगत सत्याग्रह झाला. पवनार, सुरगाव, देवळी आणि सेलू या चार ठिकाणी युद्धविरोधी भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावण्याची भाषणे झाली. शेवटी देवळीहून रोहिणी खेड्याकडे निघताना २१ ऑक्टोबर १९४० रोजी विनोबांना अटक करण्यात आली. वर्धा जेलमध्ये खटला चालला, विनोबांना तीन महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. १५ जानेवारी १९४१ रोजी तुरुंगातून सुटका झाल्यानंतरही विनोबांनी लगेचच दोन दिवसांनी सेवाग्रामला सत्याग्रह केला. पाठोपाठ नागझरी, सोनेगाव, आगरगाव येथे सत्याग्रह केला. २३ जानेवारी १९४१ ला लोणी येथे सत्याग्रह केल्यानंतर विनोबांना अटक झाली व ६ महिन्यांची शिक्षा भोगण्यासाठी त्यांना नागपूर तुरुंगात हलविण्यात आले. १२ जुलै १९४१ रोजी तुरुंगातून सुटका झाल्यावर लगेचच १४ जुलैला विनोबांनी नालवडी येथे युद्धविरोधी भाषण करून सत्याग्रह केला. पुन्हा विनोबांना अटक झाली व १ वर्षाची शिक्षा सुनाण्यात आली.(बापट भ. ग. २००२, पृ.१२२-१२४) गांधीजींनी पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची केलेली निवड किती सार्थ होती, हे यावरून लक्षात येते. या प्रकारचे व्यक्तिगत सत्याग्रह कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी देशभर सुरू ठेवून आपली यूद्धविरोधी भूमिका ठाशीवपणे मांडण्याचे कार्य केले.

नागपूरातल्या हिंदुस्थानी लाल सेनेच्या स्वयंसेवी सैनिकांना त्यांच्या गणवेशात (म्हणजे लाल अर्धी चड्डी व खाकी सदरा) वैयक्तिक सत्याग्रह करण्यास गांधीजींनी अनुमती दिली होती. श्यामनारायण काश्मिरी यांनी लाल सेनेच्या पहिल्या तुकडीत सत्याग्रह केला. १९४१ पर्यंत १४ महिने हे सत्याग्रह सुरू होते; त्यात हिंदुस्थानी लाल सेनेच्या १५० सैनिकांनी वैयक्तिक सत्याग्रहात स्वत:ला अटक करवून घेतली. जागतिक महायुद्धात पैशाची वा

मनुष्यबळाची मदत करण्यापेक्षा अहिंसा हाच युद्धाचा प्रतिकार करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे, ही एतद्देशीयांची समजूत ब्रिटिशांपर्यंत पोहचविण्यासाठी उघडलेल्या या वैयक्तिक सत्याग्रहात प्रांतिक विधिमंडळाचे ४०० सभासद, मध्यवर्ती विधिमंडळाचे २२ सभासद, २९ माजी मंत्री, अ. भा. काँग्रेस कामिटीचे १७६ सभासद व काँग्रेस वर्किंग कमिटीचे ११ सभासद यासह एकूण तीस हजार लोकांनी तुरुंगवास पत्करला, सहा लाख रुपयांचा दंड सरकारच्या तिजोरीत जमा झाला. पुढे ४ डिसेंबर १९४१ रोजी ह्या सर्व सत्याग्रहींची सरकारने सुटका केली. (रंगनाथ दिवाकर, १९४५, पृ. २४८-२४९)

## आझाद हिंद सेना :

बंगालमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी फॉरवर्ड ब्लॉक पक्ष स्थापन करून सरकारविरुद्ध कारवाया सुरू केल्या होत्या. त्यामुळे सरकारने जुलै १९४० मध्ये सुभाषचंद्र बोस यांना तुरुंगात टाकले. १७ जानेवारी १९४१ ला नजरकैदेत असाना सुभाषबाबूंनी नाट्यमयरित्या पलायन केले व झियाउद्दीन हे नाव धारण करून ते पेशावरला आले. तेथून बर्लिनला पोहचले व ऑरलँडो मँझोटा या इटालियन नावाने वावरू लागले. आझाद हिंद फौजेचे काम तिथून सुरू ठेवले. १९ फेब्रुवारी १९४२ रोजी बर्लिन रेडिओवरून भाषण केले. या भाषणानंतर सुभाषचंद्र बोस २ जुलै १९४३ रोजी सिंगापूरला प्रकट झाले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी स्वतंत्र हिंदुस्थानचे हंगामी सरकार स्थापन केले. महाराष्ट्रातील जगन्नाथराव भोसले यांना या मंत्रिमंडळात स्थान मिळाले होते. अमरावती जिल्ह्यातील पापळचे ज्ञानेश्वर देशपांडे यांनी आझाद हिंद सरकारमध्ये माहिती विभाग प्रमुखाची जबाबदारी सांभाळली होती. 'आझाद हिंद फौजे'त नागपूरचे नीलकंठ रामचंद्र फुले, डॉ. श्री. श. जोशी भरती झाले होते, त्यांच्यापैकी डॉ. जोशी हे मेजर होते. १८ मार्च १९४४ रोजी आझाद हिंद सेना भारताच्या सीमा ओलांडून कोहिमा-मणिपूर भागात शिरली. 'चलो दिल्ली'चा नारा देत ही सेना आगेकूच करीत असतानाच १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने महायुद्धात शरणागती पत्करली. त्यानंतर सुभाषचंद्रांचे १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात निधन झाले.

अमेरिकेतून भारतीय स्वातंत्र्यासाठी 'गदर चळवळ' चालविणाऱ्या संस्थापकांमध्ये डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे या मराठी माणसाचे महत्त्वपूर्ण योगदान होते. राष्ट्रकार्यासाठी अविवाहित राहून त्यांनी ह्या चळवळीसाठी आपले जीवन समर्पित केले. जपान, तुर्कस्थान, इराण, मेक्सिको व अमेरिकेत जाऊन त्यांनी लष्करी शिक्षण घेतले. ब्रिटिश हेरांपासून बचाव करण्यासाठी निरनिराळी टोपण नावे धारण केली. सर्कशीच्या व चलतचित्रांच्या माध्यमांतून ब्रिटिशांनी भारताला कसे नागवले याचा प्रचार केला. लाला हरदयाल यांना सोबत घेऊन 'गदरकी गुंज' नामक वृत्तपत्र मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, गुरुबाणी, उर्दू व इंग्रजी अशा सात भाषांतून प्रसिद्ध केले. पंजाबचे कांशीराम यांना सोबत घेऊन अमेरिकेत 'भारतीय स्वातंत्र्य संघ' ही संस्था स्थापन केली. तुमसरचे डॉ. बिसनदास कोचर हेही गदर पार्टीचे सभासद होते.

## क्रिप्सची शिष्टाई :

दरम्यान १९४१ च्या डिसेंबरमध्ये दोस्त राष्ट्रांविरुद्ध जपान लढाईत उतरले होते.

जपानने ७ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकन बंदर पर्ल हार्बरवर हल्ला केला, १५ फेब्रुवारी १९४२ रोजी सिंगापूरचा पाडाव केला व त्यापाठोपाठ ब्रह्मदेशही सर केला. महायुद्ध भारताच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले. जपानच्या आक्रमणापुढे हिंदुस्थानचा बचाव करणे सोपे नाही, याची ब्रिटिश प्रशासनाला कल्पना आली. हिंदी सैन्यातूनही बंडखोरी होऊ शकते याचा अंदाज घेऊन ब्रिटिश मंत्रिमंडळाने भारतीयांशी वाटाघाटी करण्याकरिता स्टॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले. त्यांनी भारतीय पुढाऱ्यांशी बोलणी केली. हिंदू महासभेचे डॉ. बा. शि. मुंजे, मुस्लीम लीगचे बॅ. जिना यांच्याशी चर्चा केली. गांधीजींना वर्ध्याला तार पाठवून दिल्लीला भेटायला येण्याचे निमंत्रण दिले. ब्रिटिश सरकारने देऊ केलेल्या देणग्यांचा मसुदा गांधीजींना दाखवण्यात आला. 'क्रिप्स योजना' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या प्रस्तावातले मुख्य मुद्दे असे होते :

१. युद्धानंतर भारताचे स्थान इतर वसाहतींसारखे राहील.
२. ब्रिटिश सरकार हिंदी जनतेचा स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य करील व ब्रिटिश राष्ट्रकुलातून फुटून निघण्याचे स्वातंत्र्य भारताला असेल.
३. युद्ध संपल्याबरोबर विधिमंडळाच्या सभासदांकडून संविधानसमिती निवडून भावी संविधान करण्याचे काम सुरू करता येईल. हे संविधान एखाद्या प्रांतास मान्य नसल्यास त्याला भारतीय संघराज्यातून फुटून स्वतंत्रपणे ब्रिटनबरोबर संबंध ठेवता येतील.
४. मुस्लीम समुदाय व संस्थानिकांना एकात्म भारतापासून वेगळे राहता येईल.
५. कार्यकारी मंडळावर व्हाइसरॉयचे नियंत्रण राहील.

गांधीजींनी क्रिप्सला स्पष्ट शब्दांत सांगितले की, "हिंदुस्थानला देऊ केलेल्या देणग्यांचं स्वरूप जर एवढंच असेल तर मिळेल ते पहिलं विमान घेऊन तुम्ही परत आपल्या घरी पोहोचलेलं बरं." (लुई फिशर,१९४५, पृ. १०) याच काळात अमेरिकन पत्रपंडित लुई फिशर गांधीजींना वर्ध्याला भेटायला आले होते. लुई फिशरने गांधीजींना विचारले होते की, क्रिप्सच्या प्रस्तावात स्वायत्त स्वराज्य देण्याचे वचन होते, तसेच ब्रिटिश साम्राज्यातून फुटून निघण्याचा अधिकारही देऊ केला होता, तरीही आपण हा प्रस्ताव का नाकारला? यावर गांधीजींचे उत्तर असे होते :

"आमचे ब्रिटनशी असलेले हितसंबंध हे इतर साम्राज्यांतर्गत स्वायत्त राष्ट्रांच्यासारखे नाहीत. तेथे गोऱ्यांची वसाहत असून त्यांतले बहुतेक लोक ब्रिटनचे निर्वासित आहेत किंवा त्यांचे वंशज तरी आहेत. आम्हांला कसल्याही प्रकारची स्वायत्तता नको आहे. आम्ही ती मागतही नाही. आम्हांला जर कोणतीही स्वायत्तता दान म्हणून बहाल केली तर आम्ही स्वतंत्र रहाणार नाही. आता फुटून स्वतंत्र होण्याविषयीची गोष्ट निघाली तर त्यामध्ये नाना तऱ्हेचे गुंतागुंतीचे बिकट प्रश्न उत्पन्न होतील. क्रिप्स योजनेतील मुख्य दोष म्हणजे राजे महाराजांना देण्यात येणाऱ्या हक्कांसंबंधीचा होय. ब्रिटिशांचा असा आग्रह आहे की राजे महाराजे यांना संरक्षण देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे आणि ते त्यांना सांभाळायलाच हवे. कारण ब्रिटच्या फायद्यासाठी जे तह त्यांच्यावर लादण्यांत आले त्यातच ही अट अंतर्भूत आहे... त्यांतील दुसरा दोष म्हणजे पाकिस्तानला दिलेली मंजुरी होय. हिंदू आणि मुसलमान यांच्यातील झगडे हे ब्रिटिश राजसत्तेने

पेटविलेले अणि प्रज्वलित केलेले झगडे आहेत. त्यांना या क्रिप्स योजनेत अगदी पूर्ण मुभा देण्यात आलेली आहे. लॉर्ड मिंटो हे व्हॉइसरॉय असताना (१९०९) त्यांनी हे दोन अलग धर्मीय मतदार संघ निर्माण करून या वितुष्टाला ठिणगी लावली, आणि तेव्हापासून आम्हांमध्ये वितुष्ट कसे अधिक वाढत जाईल इकडे ब्रिटिशांनी विशेष लक्ष पुरविले आहे... कर्झनने घडवून आणलेली बंगालची फाळणी ही अगदी आवश्यक सुधारणा होती. ती अगदी योग्य उपाययोजना होती. पण त्यामुळे धर्माच्या पायावर उभारलेली ती इलाख्याची फाळणी होत होती. क्रिप्सनेसुद्धा अगदी हेच तत्त्व आपल्या योजनेत अंतर्भूत केले होते; आणि ही अत्यंत मोठी दुसरी घोडचूक होती. म्हणून जोपर्यंत ब्रिटिशांचं राज्य हिंदुस्थानात आहे तोपर्यंत हिंदुस्थानात एकी होणं शक्य नाही." (लुई फिशर, १९४५, पृ. ११-१२)

क्रिप्सची शिष्टाई असफल राहिली. सर्वच पक्षांनी क्रिप्सची योजना नाकारली. क्रिप्सच्या योजनेत भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याचा व स्वतःची घटना बनविण्याचा प्रांतांना अधिकार दिला होता; पर्यायाने पाकिस्तान निर्मितीला या योजनेत मान्यता देण्याचा मार्ग मोकळा केलेला असल्याने हिंदू महासभेला हा प्रस्ताव मान्य नव्हता. (हरदास, १९८१, पृ. ३४६) काँग्रेसची मागणी तात्कालिक अंतरिम राष्ट्रीय सरकार स्थापण्याची होती. इंग्रजांनी राज्याची सूत्रे भारतीयांच्या हाती सोपवून बाजूला व्हावे; जपानच्या आक्रमणाचा मुकाबला कसा करायचा हे हिंदुस्थानचे लोक ठरवतील असा पवित्रा घेतला. ब्रिटिश सरकार मात्र युद्ध संपेपर्यंत कोणताही घटनात्मक बदल करायला तयार नव्हते. अखेर वाटाघाटी फिसकटल्या.

### 'छोडो भारत' आंदोलन :

१४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत 'भारत छोडो' चा ठराव पारित झाला. इंग्रजांनी हे केवळ भारताच्या हितासाठीच नव्हे तर जग नाझीवाद, फॅसिझम, लष्करवाद व साम्राज्यवादापासून मुक्त होण्यासाठी, एका देशाने दुसऱ्या देशावर सत्ता गाजविणारे सत्ताकारण संपुष्टात आणण्यासाठी तातडीने भारत सोडावा, असे या ठरावात म्हटले होते. त्यानंतर जवाहरलाल नेहरू यांनी ७ व ८ ऑगस्टला अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीच्या मुंबईच्या खास अधिवेशनात 'छोडो भारत' आंदोलनाचा ठराव मांडला. हा ठराव मांडताना नेहरूंनी इंग्रजांविषयी कुठलीही द्वेषभावना व्यक्त न करता 'भारत छोडो' ही धमकी नसून इंग्रजांना सहकाराचं आमंत्रण आहे, हे स्पष्ट केलं होतं. ठरावात म्हटले होते की, "स्वातंत्र्य हा हिंदुस्थानचा जन्मसिद्ध हक्क आहे. .. त्याचप्रमाणे अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेले व्यापक लोकयुद्ध सुरू करण्यालाही ही समिती मंजुरी देत आहे... अशा तऱ्हेच्या लढ्याचे नेतृत्व हे निर्विवादपणे गांधीजींनीच स्वीकारले पाहिजे आणि ही समिती गांधीजींना नेतृत्व करण्याबद्दल व पुढे चोखाळाव्या लागणाऱ्या मार्गाचे दिग्दर्शन करण्याबद्दल विनंती करीत आहे." (साधना प्रकाशन, २०१८, पृ. १९) या ठरावाला सरदार वल्लभभाई पटेल यांनी अनुमोदन दिले व भावी लढ्याचे स्वरूप कसे असेल याची कल्पना दिली. केवळ तुरुंग भरणे हे या लढ्याचे स्वरूप असणार नाही; प्रसंगी सर्वनाश पत्करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढायचे आहे. येत्या लढ्यात आपल्याला प्रत्येक मार्ग चोखाळावा लागेल, प्रत्येकाला शस्त्र चालवावे लागेल.

आगामी लढ्याचे स्वरूप आपत्कालीन, पण विद्युतवेगी राहाणार आहे. (साधना प्रकाशन, कित्ता, पृ. ३४-३७) स्वतः महात्मा गांधींनी इंग्रज भारतात राज्यकर्ते म्हणून नव्हे तर मित्र म्हणून राहू शकतात; मात्र त्यांनी आताच्या आता सत्ता सोडली पाहिजे, ही आपली भूमिका स्पष्ट शब्दात मांडली. सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद यांनी या ठरावाचे मर्म विशद करताना म्हटले होते की, "हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची सनद आपल्याला आधी मिळाली पाहिजे; आणि ती मिळाली की,क्षणाचाही विलंब न लावता आम्ही दोस्त राष्ट्रांबरोबर दोस्तीचा तह करू आणि चालू युद्ध जिंकण्यासाठी त्यांना अवश्य ते सहकार्य करू." (साधना प्रकाशन,कित्ता, पृ. १०) यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात या घटनेचे वर्णन *'हिंदुस्थानच्या राजकारणातील एक सौंदर्यस्थळ'* अशा शब्दांत केले आहे. ८ ऑगस्ट १९४२ रोजी ठराव मंजूर झाल्यावर गांधीजी म्हणाले,

"हिंदुमुसलमान बांधवहो, जर मनात कसलीही अढी न ठेवता आपल्याला एक व्हायचे असेल तर, साम्राज्यशाहीचे जे साखळदंड अपल्याभोवती करकचून आवळलेले आहेत, ते तोडून टाकण्याच्या कामात आपण प्रथम एकत्र आले पाहिजे. पाकिस्तान हा जर हिंदुस्थानचाच एक तुकडा आहे, तर मग हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी करावयाच्या या लढ्यात सामील व्हायला मुसलमानांना काय हरकत आहे? म्हणून स्वातंत्र्याच्या या लढ्यांत हिंदु-मुसलमानांनी प्रथमत: एक व्हावे... सत्याग्रहात दगलबाजी, लबाडी किंवा कोणत्याही प्रकारचा खोटेपणा यांना स्थान नाही... साम्राज्यशाहीने कितीही राक्षसी तयारी केलेली असो, आपण तिच्या पकडीतून बाहेर पडलेच पाहिजे... मी तुम्हाला एक मंत्र सांगतो. तो तुम्ही तुमच्या हृदयात ठसवा आणि तुमच्या प्रत्येक निश्वासाबरोबर तो व्यक्त होऊ द्या. "करेंगे या मरेंगे" हाच तो मंत्र. आम्ही देशाला स्वतंत्र तरी करू नाही तर त्या प्रयत्नात प्राणार्पण तरी करू; पण आजची गुलामगिरी पहायला आम्ही जिवंत राहणार नाही.. असा दृढ निश्चय करून येत्या लढ्यात सामील व्हावे." (शिखरे दा. न. पृ. ४०-४२) गांधीजींच्या भाषणाने कार्यकर्त्यांच्या मनात स्वातंत्र्याचे वारे संचारले. म. गांधीच्या नेतृत्वाखाली 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा करून छोडो भारत आंदोलनास प्रारंभ झाला.

रातोरात गांधीजींसकट सर्वच पुढाऱ्यांची धरपकड झाली. जवाहरलाल नेहरूंना व वर्किंग कमिटीच्या सभासदांना अहमदनगर किल्ल्यात स्थानबद्ध करण्यात आले. या अटकसत्राचा निषेध करण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत गवालिया टँक व शिवाजी पार्क येथे जमलेल्या जमावावर अश्रूधूर सोडण्यात आला व नंतर गोळीबार करण्यात आला; त्यात ८ जण शहीद झाले व १६९ लोक जखमी झाले. अश्रूधुरापासून बचाव करण्यासाठी डोळ्यांवर भिजलेले कापड ठेवण्याचा उपाय कुणी तरी सुचवला, तेव्हा गोवालिया टँक भागातील गुजराती भगिनींनी आपले वॉर्ड रोब उघडून हाती लागतील त्या साड्या बाहेर काढल्या, पाण्यात भिजवल्या व बेभानपणे खाली भिरकावल्या. क्षणार्धात त्याचे तुकडे फाडून लोकांमध्ये वाटण्यात आले. या प्रसंगाची तुलना मधु लिमये यांनी कृष्णाची जखम बांधण्यासाठी द्रौपदीने भरजरी शालू फाडला त्या पौराणिक कथेशी केली होती. (लिमये मधु, १९९६, पृ. २९६) या आंदोलनामुळे

दोन आठवडे शाळा-कॉलेजे बंद राहिली. १० ऑगस्टनंतर आंदोलन चिघळले. टेलिफोनच्या तारा तोडणे, रस्त्यांवरची वाहतूक थांबवणे, रेल्वेवहातूक अडवण्याचे प्रकार सुरू झाले. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत सरकारी इमारतींवर बॉम्ब फेकण्यात आला. मुंबईत एक समांतर गुप्त रेडिओ स्टेशन चालवून आंदोलकांना वार्ता-संदेश पोहचविले जाऊ लागले. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, अहमदनगर अशा सर्व ठिकाणी परिस्थिती तणावपूर्ण होती. पुण्यात तर चार दिवस लष्करी अंमल होता. रत्नागिरी जिल्ह्यात सर्व शासकीय कार्यालयांवर बहिष्कार टाकण्यात आला. भाजीबाजारसुद्धा बंद राहिला. ठाणे जिल्ह्यात वाडे जवळ १५०० शेतकऱ्यांनी पोलिसचौकीला घेराव घालून अधिकाऱ्यांना कोंडीत पकडले. खानदेशात अमळनेरला साने गुरुजींनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन १५ ऑगस्टला गुरुजींचे शिष्य उत्तमराव पाटील यांनी विद्यार्थी, कामगार व नागरिकांना घेऊन मामलेदार कचेरीवर मोर्चा नेला. जमावाने पोस्ट ऑफीस, रेल्वे स्टेशन, कोर्टाच्या इमारती जाळल्या. पोलिसांनी जमावर गोळीबार केला. लीला पाटील व अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली. उत्तमराव पाटील मात्र फरार झाले. खानदेशात एरंडोल तालुक्यातील आडगावला जंगल सत्याग्रहींवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात सत्याग्रहींचा नेता भगवान भुसारी व त्याचे दोन साथीदार मारले गेले. नंदुरबारला विद्यार्थी व तरुणांनी तालुका कचेरीवर मोर्चा नेला. त्यात शिरीषकुमार मेहता, धनसुखलाल, घनश्यामदास वाणी, लालदास व शशिधर केतकर या १६-१७ वर्षांच्या मुलांचा गोळीबारात मृत्यू झाला. पूर्व खानदेशात रावेर, यावल, भुसावळ तालुके ही तर ऑगस्ट चळवळीची केंद्रे बनली होती. जुन्या जळगावात रामदास पाटलांचे किल्ल्यासारखे घर भूमिगतांचे आश्रयस्थान बनले होते. महाडच्या गोळीबारात वसंत दाते, कर्जत तालुक्यात भाई कोतवाल व हिराजी यांचे बळी गेले.

मुंबईहून परतलेल्या विदर्भातील पुढाऱ्यांना मलकापूर स्टेशनवर अटक करण्यात आली. विदर्भात सर्वत्र काँग्रेस कार्यकर्त्यांना अटक करण्याचे सत्र सुरू झाले. १२ ऑगस्ट १९४२ रोजी पोलिसांनी नागपूर शहरात सकाळी दूध आणायला बाहेर पडलेले लोक, तारायंत्रांची दुरुस्ती करणारे वायरमन, महिला व मुले यांच्यावर गोळीबार केला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोस्ट ऑफीस व रेल्वे स्टेशनच्या गोदामाला आग लावली. सरकारने शहरात संचारबंदी लागू केली. फौजेला पाचारण करण्यात आले. रामटेकला पोलिसांनी स्थानिक पुढाऱ्यांची धरपकड केली. त्यामुळे लोकांनी रेल्वे स्टेशनवर हल्ला चढवला, गार्ड व स्टेशनमास्तरांचे गणवेश काढून घेऊन त्यांना खादीचे पोषाख चढवले. पोलीस स्टेशनवर हल्ला चढवून तेथील शस्त्रे ताब्यात घेतली. नगरपालिका व पोस्ट ऑफिसचे फर्निचर जाळले. दूरध्वनी व तारायंत्रांचे खांब कापले, आणि तालुका कार्यालयावर तिरंगा फडकावला. या सर्व प्रकारानंतर दुसऱ्या दिवशी बाहेरून पोलिसांची कुमक आली व शंभराहून अधिक लोकांना अटक करण्यात आली. शिवलाल तेली, सूरजमल गुप्ता, बाजीराव बिसन, हरि शिवराम आवारी इत्यादींना आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. पैकी शिवलाल तेलीचा तुरुंगातच मृत्यू झाला. अमरावती जिल्ह्यातल्या यावली गावात भारत छोडो आंदोलनाने उग्र रूप धारण केले.

गावकऱ्यांनी पोलीस ऑफीस, शाळा, पोस्ट -ऑफीसचे दप्तर ताब्यात घेतले. अमरावतीहून पोलीसदल बोलावण्यात आले. पोलिसांच्या गोळीबारात १० लोक ठार झाले, ४२ लोक जबर जखमी झाले. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावात व पोलिसात चकमक झाली. त्यात पुन्हा ५ जणांचा मृत्यू झाला व ३२ लोक जखमी झाले. मेहकरचा सरकारी दप्तरखाना लोकांनी रॉकेलचे बोळे फेकून जाळला. भंडारा जिल्ह्यातल्या तुमसरचे ६ लोक पोलीस गोळाबारात बळी गेले. दीडशे लोकांना अटक झाली. श्रद्धानंद छात्रालयातल्या ६० विद्यार्थ्यांना तुरुंगात जावे लागले. छात्रालयाचे प्रमुख फरकाडे यांना ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली. अमरावतीच्या बिसनलालजी अग्रवाल यांना १५ महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली. अकोल्याचे आबासाहेब खेडकर यांना अटक झाली.

**चिमूर-आष्टी कांड :**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर आणि वर्धा जिल्ह्यातील आष्टी येथे १९४२ च्या संग्रामात फार मोठे हत्याकांड झाले. तिरंगा फडकावीत मिरवणुक काढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांवर झालेल्या गोळीबारात आष्टीला ९ लोक शहीद झाले. (वर्धा जिल्ह्याचे गॅझेटियर, पृ. १११) चिमूरला यापेक्षा भयंकर घटना घडली. चिमूरला बालाजी रायपूरकर ह्या १५ वर्षाच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकाने १४ ऑगस्ट १९४२ ला प्रभातफेरी काढली. रात्री संत तुकडोजी महाराजांचे भजन गात मिरवणूक काढली. ते भजन होते :

"चार गडुले शस्त्र जमविले, भक्त बनेगी सेना<br>
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारे<br>
खाते है लाथ हमारे"

या भजनाचा आशय होता, "माणसाची मनं भडकली तर कुणाच्यानेही आवरली जाऊ शकत नाहीत. अशा वेळी लोक दगडांचा बॉम्बसारखा उपयोग करतील, झाडांचा तलवारींसारखा उपयोग करू लागतील." असे स्फोटक भजन गात स्वयंसेवकांनी १५ ऑगस्टला पुन्हा प्रभातफेरी काढली. पोलिसांनी यावेळी प्रभातफेरी अडवली. मात्र संत तुकडोजी महाराजांच्या मध्यस्थीने पेच सुटला. १६ तारखेच्या प्रभातफेरीच्या वेळी मात्र मुलांवर लाठीहल्ला झाला व सर्कल इन्स्पेक्टर जरासंध या पोलिसाने मुलांच्या हातातला झेंडा हिसकावून पायदळी तुडवला. प्रभातफेरीचा म्होरक्या गोपाळा कोरेकार याला अटक करण्यात आली. त्याला सोडविण्यासाठी मुलं पोलीस स्टेशनवर गेली, तेव्हा त्यांच्यावर लाठी हल्ला करण्यात आला. सर्कल इन्स्पेक्टर जरासंधाने गोळीबाराची आज्ञा दिली. त्यावेळी पिस्तुल आणायला आतल्या खोलीत गेलेल्या एस. डी. ओ. डुंगाजी व सोनवणे तहसीलदार यांना शास्त्रकार नावाच्या तरुणाने पकडून बाहेर आणले. संतप्त लोकांनी या दोघा अधिकाऱ्यांना ठार करून डाकबंगल्याला आग लावली. सशस्त्र पोलीस व दीड हजारांच्या जमावात चकमक उडाली. 'करेंगे या मरेंगे' अशा घोषणा देत जमावाने तुफान दगडफेक सुरू केली. पोलीस वर्दी फेकून पळू लागले. मात्र गोळीबारात बाबूलाल झिरे, बालाजी राघोबा रायपूरकर शहीद झाले. जरासंधला लोकांनी ठार केले. इतर पोलिस अधिकारी जनतेला शरण गेले. मात्र त्यानंतर वरोरा

ते चिमूरपर्यंत ३२ मैल फौजेचा कडक पहारा बसविण्यात आला. सरकारी आज्ञेने चिमूरच्या १२० लोकांना अटक करण्यात आली. तुकडोजी महाराजांचे "पत्थर बनेंगे बम और झडुले बनेंगे शस्त्र' हे पद मिरवणुकीत गायले गेले होते म्हणून तुकडोजी महाराजांनाही अटक करण्यात आली. पोलिसांनी घरे लुटली, फौजी जवानांनी महिलांवर अत्याचार केले. चिमूर गावाला १ लाखाचा दंड बसविण्यात आला. या सगळ्या दहशतीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर बार आसोशिएशनने चिमूर हत्याकांडाची न्यायालयीन चौकशीची मागणी करण्याचा ठराव पारित केला. मात्र शासनाने बार असोशिएशनला गैरकायदेशीर संस्था ठरविण्याची धमकी दिली. चिमूरच्या अटक केलेल्या लोकांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात येईल याचा अंदाज आल्याने डॉ. ना. भा. खरे यांनी 'फाशी निवारक समिती' स्थापन केली. डॉ खरे व्हॉईसरॉय यांची कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त झाल्याने ते दिल्लीस गेल्यावर या समितीच्या अध्यक्षपदाची धुरा अनुसयाबाई काळे या महिलेने सांभाळली. कायदेशीर सल्ला घेऊन १९ लोकांची फाशीपासून मुक्ती करण्याला समितीला यश लाभले. तरीही ७ जणांना फाशीची शिक्षा झालीच. तेव्हा अनुसयाबाई काळे यांनी न्या. भवानीशंकर नियोगी, रामभाऊ मनोहर, बी. जी. घाटे, डॉ. केदार या कायदेपंडितांची मदत घेऊन उर्वरित ७ जणांची फाशी रद्द करण्यात यश मिळवले. (वक्काणी, २००३, पृ. १५२-१५८) डॉ. ना. भा. खरे व श्री. केदार यांनी मध्य प्रांताचे राज्यपाल सर हेनरी यांची वारंवार भेट घेऊन तुकडोजी महाराज हे राजकारणी नसून धर्मकारणी आहेत हे पटवून दिल्यावर त्यांची शासनाने ८-१० दिवसानंतर सुटका केली. (खरे, १९९५, पृ. ८२)

महाराष्ट्रातल्या आंदोलनाची ही काही प्रातिनिधिक उदाहरणे झाली. समग्र ४२ च्या आंदोलनाचा इतिहास लिहिणे हा स्वतंत्र ग्रंथाचाच विषय होईल. भारतातल्या अन्य प्रांतातही अशीच परिस्थिती होती. सरदार वल्लभभाई पटेल यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाविषयी लिहिले होते की,

"Never before had such widespread uprising happened in India in the history of the British Raj, as they did during the last three years. We are proud of the spirit in which the people reacted. The leaders were all of a sudden kidnapped from the midst of the people acted on the spur of the moment. Gandhiji may not be there to guide the next struggle. Non-violence had taken no doubt deep roots, but one had to face the reality that violence was the order of the day in the whole world. It will be like the Devil quoting the scriptures, if the world outside criticized India, if she switched over from non-violence to violent attempt to regain independence." (Desai, 1985, p. viii-xiv)

### १.१३. भूमिगत चळवळी :

भारत छोडो आंदोलनाला प्रारंभ झाल्यानंतर देशभर लोकांनी हरताळ पाळला. ब्रिटिशांनी 'राष्ट्रीय सभे'ला बेकायदेशीर ठरवून 'छोडो भारत' आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो कॉंग्रेस

पुढाऱ्यांना तुरुंगात डांबले. संस्थानी मुलुखातही आंदोलकांना अटक करण्यात आली. १९४२ च्या आंदोलनात इतका मोठा लोकसमूह सहभागी झाला होता की, त्यांच्या नावांची यादी संकलित करण्यासाठी अनेक खंड लागतील. पुण्यातून ग. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, साने गुरुजी, मोहन धारिया, शिरूभाऊ व अनुताई लिमये, वसंत बापट, बंडू गोरे, सिंधूताई देशपांडे; मुंबईच्या अरुणा असफअली, शांती पटेल, गोवर्धन पारिख अशी कितीतरी नावे सांगता येतील. ठाणे, येरवडा, नाशिक, धुळ्याचे तुरुंग भरले. या तुरुंगातही सत्याग्रहींच्या राजकीय शिक्षणाचे बौद्धिक वर्ग चालत. आचार्य भागवत बुद्धिझम, ख्रिश्चॅनिटी, इस्लाम अशा धार्मिक तत्त्वज्ञानावर व्याख्याने देत; काकासाहेब गाडगीळ 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' सांगत; जावडेकरांचे राजकीय चिंतन चाले; अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचे वाचन व त्यावर चर्चा चालत. स्वराज्याच्या चळवळीने भारावलेल्या सत्याग्रहींनी तुरुंगाचे लोकशिक्षणाच्या 'शाळे'त रूपांतर करण्याची किमया साध्य केली.

आंदोलनाला प्रारंभ झाल्यानंतर दोन आठवड्यांनी मुंबईत इंग्रजी सत्तेविरुद्ध भूमिगत चळवळ चालविण्यासाठी अच्युतराव पटवर्धन, डॉ. राम मनोहर लोहिया, अरुणा असफ अली यांची समिती स्थापन करण्यात आली. शांततापूर्ण मोर्चे, निदर्शने, सरकारी कचेरीवर तिरंगा फडकाविणे, रेल्वे रूळ उखडणे इत्यादी मार्गांनी सरकार अस्थिर करण्याची व्यूहनीती आखण्यात आली. मुंबईच्या कॅपिटल स्ट्रीटच्या इमारतीत गुप्त चळवळीचे कार्यालय सुरू झाले. प्रत्येक जिल्ह्यात चक्रमुद्रित पत्रके, वार्तापत्रे पाठविली जाऊ लागली. ठाणे जेलमध्ये जेवणाच्या डब्यातून चपात्यांच्या खाली पत्रके ठेवून पाठवली जाऊ लागली. (दत्ताजी ताम्हाणे यांची आठवण, गवाणकर, २००९, पृ. ४१) पुण्याहून शिरूभाऊ लिमये, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे गुप्त माहिती पुरवू लागले. पुण्यात रास्ता पेठेत भूमिगत चळवळ कशी चालवायची याकरिता शिबिर घेण्यात आले. मेहेर अली यांनी या शिबिरात जर्मनीत हिटलरविरोधी भूमिगत चळवळ कशी चालवली जात होती याची माहिती दिली. त्याचपद्धतीने आपण साम्राज्यवादाविरुद्ध ही चळवळ का आणि कशी चालवायची याची मार्गदर्शक सूत्रे सांगितली गेली. वेषांतर, नामांतर, सांकेतिक शब्दांचा वापर ही तंत्रे सांगितली गेली. उदाहरणार्थ, गुप्त पोलिसांचा उल्लेख कुत्रा छाप 'भोभो' असा करीत. बॉम्बे सेंट्रलजवळच्या फ्लॅटमध्ये कार्यकर्ते उतरत, त्या हॉलचा उल्लेख 'मूषक हॉल' या नावाने, तर नळ बाजारात चक्रमुद्रित पत्रके छापली जात त्या फ्लॅटचा उल्लेख 'हडळ हाऊस' असा करीत. खेतवाडीत साने गुरुजी रहात त्या जागेचा उल्लेख 'संतवाडी' असा करीत. सांकेतिक भाषेत चर्चा चालायच्या. उदाहरणार्थ, *'दुकानाच्या शाखा'* काढाव्यात म्हणजे पक्षशाखा काढाव्यात; *मुख्य पेढी*नेच सर्व व्यवहार करावा म्हणजे सर्वसमावेशक भूमिगत संघटनेमार्फतच काम करावे; *स्वतंत्र कंपनी*ची भाषाही काढू नये म्हणजे कॉंग्रेस समाजवादी पक्षाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करू नये. (लिमये मधु, १९९६, पृ. ३३०, ३६४) निरोप देताना नावं बदलली जायची. शिरूभाऊ लिमये यांच्यासाठी दादा मराठे या पर्यायी नावाचा उपयोग करीत. एस. एम. जोशींनी दाढी वाढवून, डोक्यावर काश्मिरी टोपी, अंगात पायजमा व डोळ्यांवर काळा चष्मा असा मुसलमानी वेष परिधान केला होता; त्यांचा उल्लेख कधी

'इमामसाहेब' तर कधी 'पंत' नावाने करीत. जयप्रकाश नारायण पंजाबी पठाणाप्रमाणे भारी सूट, झुपकेदार मिशा, डोक्यावरचे केस उलटे फिरवलेले अशा वेशात वावरायचे. साने गुरुजी धोतर नेसायचे, पण भूमिगत चळवळीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करायला जाताना पायजमा घालून जात. स्वयंसेवकांना कामाची वाटणी करताना वेगेगळ्या लोकांची स्क्वाड्स करीत. 'बी स्क्वाड' म्हणजे बुलेटिन स्क्वाड, 'डी स्क्वाड म्हणजे डिस्ट्रिब्यूशन स्क्वाड, 'पी स्क्वाड' म्हणजे प्रोपोगंडा स्क्वाड. संशय येऊ नये म्हणून मुलांनी स्काऊटचा गणवेश वापरून कामे करायची अशी एक गोपनीय कार्यपद्धती विकसित करण्यात आली. पकडले गेल्यावर पोलिसांनी सहकाऱ्यांची नावे विचारल्यास वेड्याचे सोंग घेऊन स्टॅलीन, चर्चिल, मुसोलिनी रुझवेल्ट, द गॉल असली नावे सांगून संभ्रम निर्माण केला जाई. पुण्यात अनुताई लिमये रोज संध्याकाळी विद्यार्थ्यांना जमवून मार्गदर्शन करू लागल्या. संदेशवितरण आणि लोकजागरणासाठी मुंबईत उषा मेहतांनी गुप्त आकाशवाणी केंद्र सुरू केले, पुण्यातही 'कॉंग्रेस रेडिओ' सुरू झाला होता. वसंत बापट यांनी प्रक्षेपणाची जबाबदारी घेतली होती.

सर्वत्र घातपाताच्या कारवाया सुरू झाल्या. पुण्यात शिरूभाऊ लिमये हे बॉम्ब-पिस्तुलांच्या कार्याचे केंद्रबिंदू होते. कॅपिटल बॉम्ब प्रकरणाचे ते सूत्रधार होते. पुण्याच्या ॲम्युनिएशन फॅक्टरीतून कचऱ्याच्या ट्रकमधून स्फोटके बाहेर आणण्याचे काम एका गटाकडे सोपवले गेले. ही कामगिरी करणाऱ्या गटाचा प्रमुख भास्कर कर्णिक याने पकडले गेल्यावर आपल्याकडून जबरीने गोपनीय माहिती काढून घेतली जाऊ नये म्हणून साइनाइड घेऊन आत्महत्या केली. (गवाणकर रोहिणी, २००९, पृ. ७५-७६) भाई कोतवाल यांनी मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे प्रति सरकार स्थापन केले व कोतवालांकडून सत्ता थेट आदिवासींच्या हातात दिली. त्या भागातील सावकारशाही नष्ट केली. पुढे पोलिसांशी समोरासमोर लढताना त्यांना हौतात्म्य आलं. (गवाणकर, उनि.पृ. ६८-६९)

सैनिकांची ने-आण करणे, कोळसा-लोखंड या कच्च्या मालाचा पुरवठा करणे, दारुगोळा व युद्धसाहित्य पुरविणे या कामांसाठी इंग्रज सरकार रेल्वेचा फार मोठा वापर करीत असे. हे रेल्वेचे जाळे विस्कळीत करण्याची मोहीम चालविण्यात आली. खानदेशात गुजरातला जोडणारा तापी व्हॅली रेल्वे मार्ग, नागपूर-कलकत्ता-दिल्लीला जोडणारा मध्य रेल्वेचा मार्ग उध्वस्त करण्याची गुप्त योजना आखण्यात आली. चाळीसगाव भागात ३ ऑक्टोबर १९४२ रोजी राजा तासे, देवराम पाटील या तरुणांच्या टोळीने 'डिरेलमेंट'घडवून आणली. मात्र चुकून मालगाडीऐवजी मुंबईहून वायव्य सरहद्द प्रांतात जाणारी 'पेशावर एक्स्प्रेस' ही उतारू गाडी या प्रयोगात रुळावरून घसरली. त्यात अनेक लोक जागच्या जागी ठार झाले. अमळनेरच्या रामभाऊ भोगेंच्या पुढाकाराने २७ ऑक्टोबरला पंजाब मेलला डिरेलमेंट झाली; मात्र यात माणसे दगावली नाहीत. तापी व्हॅली मार्गावरही घातपाताचे यशस्वी प्रयत्न झाले. त्यामुळे खानदेशात पोलिसांचा ससेमिरा वाढला.

सांगलीत गोविंद शोभाराम यांच्या माडीवर आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित होणारे संदेश ऐकण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गांधीजींच्या बंदी घातलेल्या 'हरिजन' साप्ताहिकाची

हस्तलिखिते सांगलीच्या रतन शहा यांच्या छापखान्यात आणून छपाई केली जाऊ लागली. पुढे हा छापखानाच जप्त करण्यात आला. तेव्हा नाना जोशींनी सायक्लोस्टाईल मशिन घेऊन हरिपूर येथून 'हरिजन' व स्वातंत्र्यचळवळीची वार्तापत्रे चक्रमुद्रित करण्याची सोय केली. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत भूमिगतांना आश्रय दिला जाऊ लागला (पवार बा. ग. पृ. ५५) इंग्रजीत 'नाइन्थ ऑगस्ट' नावाचे भूमिगत साप्ताहिक निघे. त्या धर्तीवर मुंबईतून 'क्रांतिकारी' नावाचे गुप्त मराठी मासिक चालविण्यासाठी छुप्या जागेत छापखाना सुरू करण्यात आला व त्याची जबाबदारी मधु लिमये यांच्याकडे सोपविण्यात आली. या गुप्त छापखान्यातून अनेक पत्रके, घडिपत्रिका छापल्या जात. कडक सेन्सॉरमुळे सामान्य वृत्तपत्रे जे काम करू शकत नव्हती ते काम या छापखान्यातून केले जात होते. अर्थात पोलिसांना पुढे या जागेचा सुगावा लागला व एसेम जोशी, नाना डेंगळे, मधु लिमये हे कार्यकर्ते पकडले गेले. (लिमये मधु, १९९, पृ. ३३४-३३९)

१९४२ च्या लढ्यात सर्वत्र मंत्रभारले वातावरण होते. कुसुमाग्रजांचे 'क्रांतीचा जयजजयकार' हे गीत गायले जायचे. वसंत बापट पोवाडे रचून म्हणत. खानदेशात पोलिसांच्या गोळीबारात शिरीषकुमार या कोवळ्या तरुणाचा बळी गेल्यावर बापटांनी त्यावर लिहिलेला पोवाडा ऐकून क्रांतिवीरांचे रक्त सळसळायचे. वरळीच्या तुरुंगात नजरबंद असलेला रामकुंवरने १९४२ च्या लढ्याला होळीच्या जल्लोषाचे रूपक देऊन रचलेले कवन नमुन्यादाखल येथे देत आहोत, त्यावरून त्यावेळच्या बेहोशीची कल्पना येईल :

" सन बेचालीस का लगा जमाना, भारत खेले होली!
पुलीस चलावे गोली, तो जन करे हृदय की झोली!!
कैदखाने डगमग डोले, टूटे जेल के ताले!
कोर्ट कचहरी डाकखाने सबकी हो गयी लंका;
सन बेचालीस का लगा जमाना, भारत खेले होली!!"

भूमिगत चळवळीत काही नकली लोकही होते. ते जनतेच्या भावनांचा व सहानुभूतीचा गैरफायदा घेऊन वेषांतराच्या नावाखाली सुंदर कपडे घालीत, छान छोकीने राहत आणि बनवाबनवी करीत. पण अशा लोकांची संख्या थोडी होती. (लिमये मधु, पृ. ३१७)

### 'प्रतिसरकार' चळवळ :

१९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीचे जोरदार पडसाद औंध संस्थानात पडले. त्यावेळी औंध संस्थानात लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून बॅ. अप्पासाहेब पंत यांची कारकीर्द सुरू होती. त्यांनी इंग्लंडमध्ये शिक्षण घेऊन कायद्याची पदवी संपादित केली होती, त्यामुळे त्यांच्यावर लोकशाही समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. औंध संस्थानाकडे 'लोकशाहीची प्रयोगशाळा' म्हणून त्या काळात पाहिले जात असे. स्वत: बाळासाहेब व अप्पासाहेब पंतप्रधिनी हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्याने ब्रिटिश सत्तेविरुद्ध सुरू झालेल्या लोकलढ्याला औंध संस्थानाचा उघड पाठिंबा होता. ब्रिटिशांना न जुमानता औंधचा राजा वर्ध्याला जाऊन महात्मा गांधींची भेट घेतो, हे राजकीय धाडस तेथील जनतेने पाहिलेले होते. इतर संस्थानांच्या तुलनेत औंध संस्थानातल्या जनतेत उदारमतवादी व राष्ट्रीय स्वातंत्र्याविषयीच्या विचारधारांचे संस्कार अधिक होते.

स्वाभाविकच १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात औंध संस्थानातील कुंडल व आटपाडी तालुक्यातील बहुतांश ग्रामजन सक्रिय झाले होते. कुंडल हे क्रांतिसिंह नाना पाटील (१९००-१९७६) यांच्या 'प्रतिसरकार' चळवळीचे केंद्र होते. लोकभाषेत 'पत्री-सरकार' असा त्याचा अपभ्रंश रूढ होता. या चळवळीचे कार्यकर्ते समाजकंटकांना पायावर फटके मारीत यावरूनही हा अपभ्रंश रूढ झाला असावा. मात्र समांतर सरकार या अर्थाने 'प्रतिसरकार' ही संज्ञा उपयोजिली गेली होती.'पत्री'चा एक अन्वयार्थ असाही सांगितला गेला आहे : "पत्री म्हणजे स्वातंत्र्याचा शत्रू, जनतेचा गुन्हेगार. जनता कोर्टात त्याचेवर आरोप शाबीत झाले तर त्याला पाठीवर निजवायचे. त्याचे दोन्ही पाय घोट्यात दोरीने बांधून त्याच्या गुन्ह्याप्रमाणे दहा, पंधरा, वीस काठ्या त्याच्या पाय-तळव्यांवर मारायच्या. याला म्हणतात पत्री. हे पत्री-तंत्र इंग्रजांनीच शिकवले होते. राजकीय गुन्हेगार म्हणून पकडलेल्या कार्यकर्त्यांनी गुन्हा कबूल करावा म्हणून ब्रिटिशांनी हे जालीम अस्त्र वापरले होते." इंग्रज सत्ताधार्जिणे सावकार, वतनदार, जमीनदार हे इंग्रजांची मर्जी सांभाळण्याकरिता जबरदस्तीने तरुण मुलांची लष्करभरती करीत, लेव्हीमार्फत घरात घुसून धान्य वसुली करीत, भूमिगत कार्यकर्त्यांच्या बातम्या सरकारला पुरवण्याचे काम करीत, असे लोक हे पत्री सरकारच्या लेखी शत्रूस्थानी असत. (पवार बा. ग. २००८, पृ. १२०-१२१) भारतीय स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासात 'प्रतिसरकार' या चळवळीचे एक वेगळे स्थान आहे. ग्रामराज्य स्थापन व्हावे या प्रेरणेतूनच नाना पाटील यांनी प्रतिसरकार चळवळ संघटित केली होती. ग्रामराज्यात प्रत्येक खेडे स्वतंत्र विचाराने काम करणारे, राजकीयदृष्ट्या स्वायत्त, खेड्याचा वसूल खेड्यातच खर्च करणारे असावे, असे उद्दिष्ट होते. कोर्ट-कचेरी, शाळा, दवाखाने अशा सर्व बाबतीत खेड्यांची स्वायत्तता हे नाना पाटील यांच्या ग्रामराज्याचे स्वप्न होते. 'ग्रामराज्याची' ही संकल्पना औंध संस्थानच्या घटनेला अनुसरणारी होती. गावात एकोपा राखून गावाचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्तेदुरुस्ती, ग्रामोद्योगाची कामे करावयाची हे ध्येय होते. गावात शांतता व सुव्यवस्था नांदावी, आपापसातील तंटे बखेडे अहिंसक मार्गाने व परस्पर समजुतीतून सोडवण्यासाठी गावपातळीवर न्यायदान कमिटी स्थापन करण्याची योजना होती. प्रौढ मतदानातून या कमिटीच्या सदस्यांची निवड केली जात असे. न्यायदान मंडळ जमिनीसंबंधीचे वाद, चोऱ्या, मारामाऱ्या, बलात्काराचे गुन्हे, दारूचे गुत्ते, व्यभिचार, भ्रष्टाचार, सावकारी अत्याचाराच्या घटनांवर निवाडे करत, गुन्हेगारांना शासन देत. ग्रामराज्याकडे दाद मागणाऱ्या इसमास प्रत्येक अर्जाला आठ आणे फी द्यावी लागे. तडजोड कमिटी, गट कमिटीच्या बैठकीसाठी दोन तृतीयांश सभासदांची हजेरी आवश्यक असायची. गाव कमिटी मालमत्तेची खरेदीपत्रे, मृत्यूपत्रे, बक्षीसपत्रे, वारसाहक्क यांच्या खटल्यांचे निकाल देई. या अर्थाने 'पत्री सरकार' हे समांतर सरकार म्हणून काम करीत होते.

**क्रांतिसिंह नाना पाटील :**

'प्रतिसरकार'ची चळवळ करणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील (१९००-१९७६) यांची राजकीय पार्श्वभूमी थोडक्यात सांगायला हवी. नाना पाटील हे सांगली जिल्ह्यातल्या वाळवा तालुक्यातील येडेमच्छिंद्र गावचे रहिवासी. १९१८ साली ७ वी पास झाल्यावर १९२० साली

त्यांना कऱ्हाडला तलाठ्याची नोकरी लागली. १९३० साली वसुलीची रक्कम दोन आठवडे उशिरा भरल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला व जिल्हाधिकाऱ्यास माफिनामा लिहून देण्यास नकार दिल्याने त्यांना अटक करण्यात आली. या कारणावरून त्यांना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा व १०० रु. दंड ठोठावण्यात आला. १९३० साली म. गांधींनी कायदेभंग चळवळ सुरू केली होती. दक्षिण महाराष्ट्रात केशवराव जेधे यांनी ब्राह्मणेतर पक्षातील बहुजनसमाजाने कॉंग्रेसमध्ये येऊन राष्ट्रीय प्रवाहात यावे, असे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देऊन नाना पाटलांनी कॉंग्रेस चळवळीत उडी घेतली. 'रेठरे धरण' येथील जंगल सत्याग्रहात नाना पाटलांनी चांदीच्या विळ्याने गवत कापले. त्यांच्यासोबत सहभागी झालेल्या हजारो लोकांनी गवत कापून कायदेभंग केला. बिळशीच्या गणपराव पाटील व इतर ४ पोलीस पाटलांनी पाटिलकीचे राजीनामे देऊन इंग्रजी सत्ता झुगारून दिली. १ जुलै १९३० रोजी बिळशीच्या जंगल सत्याग्रहात नाना पाटलांसह असंख्य सत्याग्रहींनी ४० फूट सागवानी सोट उभारून तिरंगा फडकावला. बंकटसिंग फौजदाराच्या पोलिसदलाने झेंडा फडकविण्यास मनाई केली; परंतु राजुबाई कदम, धोंडूबाई म्हस्कर, मैनाबाई धनकर या महिलांनी कडे करून पोलिसांना अडवले. पोलिसांनी लाठीमार व गोळीबाराचे अस्त्र चालवले. त्यात २ मुलांचे बलिदान गेले. नाना पाटलांनी गनिमी काव्याने पोलिसांना तुरी दिली. त्यांच्यावर पकड वॉरंट निघाले. ४० लोकांवर खटले भरण्यात आले. पुण्याच्या दादासाहेब करंदीकरांनी सत्याग्रहींचे वकिलपत्र घेतले. (पवार बा. ग. २००८, पृ. ३५-३९)

गांधीजी गोलमेज परिषदेहून परत आल्यावर ३ जानेवारी १९३२ पासून पुन्हा कायदेभंग चळवळ सुरू झाली. त्यात नाना पाटील सहभागी झाले व त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर पॅरोलवर सोडण्यात येऊन इस्लामपूर कचेरीत हजेरी देण्याचा हुकूम झाला. नाना पाटलांनी हा हुकूम मोडला. पर्यायाने ३ महिने शिक्षा व १०० रु. दंड झाला. दंड भरला नाही म्हणून पुन्हा ३ महिन्यांचा तुरुंगवास वाढला. तुरुंगातून सुटल्यावर आर्थिकदृष्ट्या नागावलेल्या नानांनी इस्लामपूर कॉंग्रेस कमिटीकडे मदत मागितली; परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी इस्लामपूर बाजारपेठेत हमाली केली. पोत्याचा सदरा-चड्डी घालून हमाली करणाऱ्या नाना पाटलांना लोक *'पोतेबुवा'* म्हणू लागले. यावेळी गाडगेबाबांचे शिष्य तुकारामबुवा यांनी इस्लामपुरात एका घरी नानांना पिठले-भाकरीचे जेवण मिळण्याची व्यवस्था करून दिली. (पवार बा. ग. २००, पृ. ३९)

१९३४ साली मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या, त्यावेळी नाना पाटलांनी सातारा जिल्हा मतदारसंघात केशवराव जेधेंसाठी गावोगावी जाऊन प्रचार केला. १९३७ साली फैजपूरला ग्रामीण भागात कॉंग्रेस अधिवेशन घ्यायचे ठरल्यावर नानांनी खेड्यापाड्यात जाऊन कॉंग्रेसचे सभासद नोंदवण्याची मोहीम हाती घेतली. लोकलबोर्डाच्या निवडणुका लागल्यावर नाना पाटलांना त्यांच्या सातारा जिल्ह्यातल्या उत्तर भागाऐवजी दक्षिण भागातून उमेदवारी मिळाली आणि त्यात ते पराभूत झाले. निवडणूक हरल्यावर नाना पाटील आत्मचिंतनासाठी महिनाभर एका साधू महाराजांच्या सोबतीने शुक्राचार्यांच्या डोंगरात जाऊन राहिले.

१९४० साली ऑक्टोबर महिन्यात महात्मा गांधींनी सामुदायिक सत्याग्रहाऐवजी वैयक्तिक सत्याग्रह करून सविनय कायदेभंग करण्याची चळवळ सुरू केली. सत्याग्रह करण्यापूर्वी सत्याग्रहीने पोलिस प्रशासनास पूर्वकल्पना देऊन कायदेभंग करावा व स्वत:स अटक करवून घ्यावी अशी पद्धत ठरविण्यात आली होती. वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातून पहिला सत्याग्रही म्हणून विनोबा भावे आणि दुसरा सत्याग्रही नाना पाटील यांची गांधीजींनी निवड केली होती. नाना पाटलांनी सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातील बहे गावी सत्याग्रह केला. त्यांना ६ महिने तुरुंगवास व १०० रु. दंड व दंड न भरल्यास ३ महिने जादा तुरुंगवासाची शिक्षा झाली. एकूण ९ महिने ते येरवडा तुरुंगात बंदिवान होते. येरवडा तुरुंगातून बाहेर आल्यावर युद्धविरोधी भाषण करून कायदेभंग केला म्हणून पुन्हा ३ महिने कारावास व २५ रु. दंड अथवा दंड न भरल्यास एक महिना कारावास अशी ४ महिने त्यांची तुरुंगात रवानगी झाली. त्यानंतर अर्जुनवाडे परिषदेसाठी संस्थानी हद्दीत प्रवेश केला म्हणून १५ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

नि:शस्त्र चळवळ करण्यापेक्षा भूमिगत पद्धतीने सशस्त्र चळवळ करण्याचा संकल्प क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सोडला होता. प्रतिसरकारच्या चळवळीचे एकूण ९ गट होते; त्यात कुंडल गट सर्वात अग्रेसर होता.कुंडल तालुक्यातील ४२ गावे या भूमिगत चळवळीचे बालेकिल्ले होते. या गटात नाथाजी लाड, जी. डी. लाड, रामचंद्र पवार, चांद पटवेगार हे म्होरके होते. शोभेची दारू बनविणारे कुंडलचे लक्ष्मणराव तांबट हे प्रतिसरकारच्या हेरगिरी पथकाचे प्रमुख होते. त्यांनी क्रांतिकारकांच्या बॉम्बसाठी आपला कारखाना खुला केला होता. या बॉम्बच्या साहाय्याने क्रांतिकारकांनी रेल्वे डबे पेटवले, पोलिसांच्या मोटारगाड्या पेटवल्या, बॉम्बचा धाक दाखवून पोलिसांची शस्त्रे पळवली. (पाटील दिनकर, २००८) औंध संस्थानात गावात रात्रीच्या गस्तीसाठी ग्रामसंरक्षक दले होती. पत्री सरकारचे भूमिगत कार्यकर्ते या गस्तपथकात शिरून ब्रिटिश पोलिसांना चकवा देत.

कुंडल गावाला लागून असलेली किर्लोस्करवाडीही प्रतिसरकारच्या चळवळीतल्या भूमिगतांचे आश्रयस्थान बनली होती. प्रतिसरकारच्या ९ गटांपैकी एक गट 'किर्लोस्कर गट' म्हणूनच ओळखला जाई. भूमिगतांना किर्लोस्करवाडीतून हत्यारे पुरविली जातात, असा ब्रिटिशांना संशय होता. साताराच्या कलेक्टरने पोलिसफौज आणून किर्लोस्करवाडीतील कारखान्यांची झडतीही घेतली होती. राष्ट्रीय चळवळीतही हे कामगार अग्रेसर होते. मुंबईच्या राष्ट्रीय सभेच्या 'भारत छोडो' घोषणेनंतर कारखान्यातील कामगारांनी महात्मा गांधींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन १० ऑगस्ट १९४२ ला तत्काळ हरताळ पाळला होता. पाठोपाठ ३ सप्टेंबर १९४२ व २६ सप्टेंबर १९४२ रोजीही कामगारांनी हरताळ पाळला होता. दक्षिणी संस्थानात अशा प्रकारचा हरताळ करणारे किर्लोस्करवाडीतले कामगार हे पहिलेच होते. (शिंदे आबासाहेब, पृ. ३२२)

संस्थानचे पंतप्रधान बॅ. अप्पासाहेब पंत यांचा प्रतिसरकारच्या क्रांतिकारी चळवळीला संपूर्ण पाठिंबा होता. संस्थानातली शस्त्रे क्रांतिकारकांच्या हवाली करण्यासही त्यांनी मागेपुढे

पाहिले नाही. धुळ्याच्या खजिन्याच्या लुटीतले एक लाख रुपये धोंडीराम माळी यांनी अप्पासाहेब पंतप्रतिनिधी यांचेकडे सुपूर्त केले होते, त्यातून क्रांतिकारकांना मदत पुरवली जात होती. औंधची जेल हे भूमिगत कार्यकर्त्यांना विसाव्याचे ठिकाण वाटत असे. या जेलमध्ये नजरकैदेत ठेवलेल्या कैद्यांना रोज उत्तम खायला-प्यायला मिळत असे. नवरात्रांत नऊ दिवस पुरणपोळ्या, लाडू, जिलेबीचे जेवण असे. (पवार बा. ग. पृ. १५४) ब्रिटिशांना पंतप्रतिनिधींकडून क्रांतिकारकांना होत असलेल्या अशा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीची माहिती होती. मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर रॉजर लमले यांनी २४ सप्टेंबर १९४२ रोजी दिल्लीस पाठवविलेल्या अहवालात म्हटले होते की, "उपद्व्यापी चळवळी या संस्थानचा उपयोग आपला मुख्य तळ म्हणून करतात याबद्दल मला तिळमात्र शंका नाही आणि त्या उपद्व्यापी लोकांना या संस्थानचे दिवाण सक्रिय प्रोत्साहन देतात." (पंत अप्पा, १९७५, पृ. २२) इतर दक्षिणी संस्थानांतून काँग्रेसच्या सभा, मिरवणुकांना जसा विरोध केला जातो, तसा औंध संस्थानातून होत नसल्याची तक्रार रॉजर लमले यांनी केली होती. किंबहुना औंध संस्थानचे प्रशासन हे काँग्रेसचे प्रशासन असून व्हाईसरॉयने औंधच्या दिवाणांना पदच्यूत करून संस्थानाबाहेर हद्दपार करावे, अशी विनंतीवजा सूचना केली होती. (महाराष्ट्र गॅझेटिअर, सातारा जिल्हा, पृ. १९२)

औंध संस्थानातील संस्थानिकांची उदारमतवादी व राष्ट्रवादी भूमिका, प्रजापरिषदेने राजकीयदृष्ट्या नांगरलेली भूमी, व त्यातून प्रतिसरकारच्या चळवळीला मिळालेला लोकांचा पाठिंबा लक्षात घेता दक्षिणी संस्थानांमध्ये औंध संस्थानातल्या प्रजेचे राजकीय भरण-पोषण किती ताकदीचे होते, याची कल्पना येते.

**जी. डी. बापू लाड यांचे तुफान दल :**

भूमिगत चळवळीचे भूमिगत दल, आघात दल आणि तुफान दल अशी त्रिमिती संघटनात्मक रचना करण्यात आली. सामान्य जनांना त्रास देणारे गावगुंड, अत्याचारी सावकार, ब्रिटिशांना माहिती पुरविणारे खबरे; जमिनी बळकावणारे व स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या उपद्रवमूल्य असणाऱ्या लोकांची 'काळी यादी' तयार करण्याचे काम भूमिगत दलाकडे सोपविण्यात आले होते. परिसरातील आठ-दहा गावांचे मिळून एक लोकन्यायालय ('जनता कोर्ट') भरवले जाई; त्यात या काळ्या यादीतल्या लोकांवर असलेल्या आरोपांची शहानिशा करून सुनावणी व्हायची. जनता कोर्टाने दिलेला निवाडा, शिक्षा, दंड लोक ग्राह्य मानीत. भूमिगत दलात काम करण्यासाठी युवकांचा सहभाग मिळवण्याचे काम 'आघात दल' करीत असे. नाना पाटील यांचे अत्यंत विश्वासू सहकारी जी. डी. बापू लाड (१९२२- २०११) यांनी भूमिगतांच्या चळवळीत युवकांना संघटित करण्याची कामगिरी मोठ्या कौशल्याने निभावली होती. युवकांना भूमिगत सेनेत भरती करून घेण्यापूर्वी त्यांच्या आत्मनिर्धाराची व सहनशक्तीची कसोटी पाहाण्याकरिता भरती परेडच्यावेळी त्यांच्या हातावर काठीचा जोरदार सपकारा मारला जाई. तो आघात सहन करून जर तो युवक *'मी तुफान आहे'* असे म्हणाला तर त्याला तुफान सेनेत प्रवेश मिळत असे. कुंडलच्या डोंगरात ही सैन्यभरतीची परेड होत असे. १९४४ पर्यंत २०० गावात तुफानदलाच्या शाखा सुरू झाल्या होत्या. जी. डी. बापू लाड हे तुफानदलाचे

फिल्डमार्शल होते. तुफान दलाच्या वतीने व्यायामशाळा चालविल्या जात. तिरंगा ध्वज लावून त्याच्यासमोर कवायती, मर्दानी खेळ होत असत. कवायतीचे शिक्षण देण्याचे काम शंकरराव लुपणे व आकाराम पवार यांच्याकडे होते. राम लाड व आनंदराव पांडुरंगराव जाधव हे तलवारबाजी, भालाफेक, दांडपट्टा चालविण्याचे शिक्षण देत. लष्करातून फरार होऊन आलेले कॅ. महिपतराव जाधव हे नेमबाजीचे व बंदूक, रिव्हॉल्वर चाविण्याचे शिक्षण देत. प्रशिक्षण वर्गात दोन तास बौद्धिक होत असे. बौद्धिक वर्गात स्वत: नाना पाटील, जी. डी. बापू लाड,आप्पासाहेब लाड, साने गुरुजी, उत्तमराव पाटील, प्रभाकर पाध्ये, ग. दि. माडगूळकर उद्बोधन करीत. इंग्रजी सत्तेचा वसाहतवाद, भारतीयांचे ब्रिटिश सत्तेकडून व सावकार-गुंडांकडून होणारे शोषण हे उद्बोधनाचे विषय असत. हे तुफानदल गावपंचायत कमिट्या व फिरती न्यायालये स्थापन करून स्थानिक प्रश्न सोडविण्याचे व लोकजागरणाचे काम करीत असे. व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धानिर्मूलन, ग्रामस्वच्छता, श्रमदान, हुंडाबंदी, काटकसरीचे गांधी-विवाह अशा विषयांवर लोकप्रबोधन करण्याचे काम तुफानसेनेचे सैनिक करीत असत. तुफानदल, आघातदल आणि भूमिगत दल यांच्यासाठी आचारसंहिता होती. चमचमीत जेवायचे नाही, मटण खायचे नाही इत्यादी बाबींचा त्यात समावेश होता. १९४५ साली नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात सांगलवाडीत या प्रतिसंघटनांच्या कार्यकर्त्यांचे एक सामायिक शिबिरही घेण्यात आले होते. प्रतिसरकारची चळवळ महाराष्ट्रभर नेण्याची पूर्वतयारी या शिबिरात करण्यात आली. त्यानंतर कोल्हापूर, नाशिक, धुळे, येथे 'तालीम संघ' स्थापन झाले. बेळगाव, निपाणी, जळगाव जिल्ह्यातील बोदवड येथे युवक संघ स्थापन झाले. या चळवळीने ३२ कोटी रुपयांची सावकारी नष्ट करण्यात यश मिळवले. (पोवार, २०१७, पृ. ६०-७०) रामोशांचा बंदोबस्त करण्याची एक तक्रार या जनता कोर्टात दाखल झाली होती. त्याचा न्यायनिवाडा करताना म्हाताऱ्या रामोशीने 'आपल्याला जमीन नाही, त्यामुळे शेती करता येत नाही, कामधंदा नसल्याने रोजच्या रोज मजुरी मिळत नाही, दारू, पाडू नये, चोऱ्या करू नये असे म्हटल्यावर आम्ही जगावं कसं?'असा थेट प्रतिप्रश्न केला. रामोशाच्या या कैफियतीची जी. डी. बापू लाड यांनी गंभीरपणे दखल घेतली. मिरज बुधगाव संस्थानची कवठे गावात ६० एकर शेती होती, ती जमीन रामोशांना द्यावी असा निवाडा घोषित करण्यात आला आणि त्यानुसार रामोशांना उदरनिर्वाहासाठी शेती पिकवण्याची संधी उपलब्ध झाली. (पवार बा. ग. २००८, पृ. १३१) या उदाहरणावरून प्रतिसरकार चळवळीच्या कार्यातील सामाजिक बांधिलकीचे परिमाण लक्षात येते.

त्या काळात सांगली-सातारा भागात वारणा, कृष्णा आणि येरळा नद्यांच्या काठाने गुन्हेगार फरारांच्या बनावट देशभक्तांच्या टोळ्या सक्रिय होत्या. कृष्णा-वारणाच्या काठी 'कामेरी कोर्ट' नावाची टोळी होती तशी राजापूरचे नाईक आण्णा बाळा आणि हिंवताडचे दत्तू पाटील यांची टोळी होती. हे लोक जमिनीचा कब्जा सोडविणे, दत्तकाच्या हक्काचा प्रश्न निकाली काढणे अशा सामाजिक तंट्यांचा निकाल लावण्यासाठी सुपाऱ्या घेत. न्याय-अन्यायाचा विवेक न बाळगता ज्याची सुपारी आधी मिळाली त्याच्या बाजूने निवाडा करायचा एवढीच बांधिलकी होती. ह्या गुन्हेगार टोळ्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी तयार करण्याची जबाबदारी क्रांतिवीर नाना पाटील

यांनी जी. डी. बापू लाड यांच्यावर सोपविली. त्यांनी युक्ती-प्रयुक्तीने गुन्हेगारांशी जवळीक करून देशाकरिता लढणाऱ्या भूमिगत टोळ्या आणि पोटासाठी लढणाऱ्या फरार टोळ्या यांचा अंतिम शत्रू इंग्रजच असल्याचे मनावर बिंबवले. देशभक्तीचे धडे देऊन या टोळ्यांना स्वातंत्र्यलढ्यात खेचले. (पवार बा.ग. पृ. ७२-७३)

पत्री सरकारच्या कार्यकर्त्यांनी चळवळीला पैसा मिळवावा म्हणून धुळे जिल्ह्यात उत्तमराव पाटील व अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने खजिना लुटला होता, याचा उल्लेख यापूर्वी आला आहे. या मोहिमेतले एक सदस्य नागनाथ नाईकवडी यांनी धुळ्याचा खजिना लुटल्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सांगली-सातारा भागात भूमिगत कार्यकर्त्यांची एक सशस्त्र सेना उभी केली. पंजाबातल्या एका लष्करी अधिकाऱ्याला या सेनेला लष्करी शिक्षण देण्याची कामगिरी सोपविण्यात आली. प्रतिसरकारचा ढाण्या वाघ म्हणून नागनाथ नाईकांची कीर्ती होती. रामू गोटखिंडीकर या नागनाथ अण्णांच्या साथीदाराने फितूर होऊन इंग्रजांना माहिती पुरवल्यामुळे सातारा पोलिसांनी त्यांना अटक केली होती. मात्र १० सप्टेंबर १९४४ रोजी नागनाथ अण्णा पोलिस पहारा चुकवून तुरुंगातून फरार झाले. (पवार बा. ग.२००८, पृ. १४०-१४१) १९४५ साली नागनाथ अण्णांची क्रांतिकारी चळवळ दडपून टाकण्यासाठी इंग्रजी लष्कर २५ फेब्रुवारी १९४६ ला कणदूर-मणदूरच्या डोंगरात आले होते. त्यावेळी नागनाथ नाईकवाडी यांच्या भूमिगत दलाचा इंग्रज सरकारच्या सैनिकांबरोबर संघर्ष झाला, त्यात झालेल्या गोळीबारात नागनाथ अण्णांचे सहकारी किसन अहिर व नानक सिंग बळी गेले. या हुतात्म्यांचे स्मारक म्हणून पुढे नागनाथ अण्णांनी वाळवा येथील विद्यालयास किसन अहिर यांचे व वसतिगृहास नानक सिंग यांचे नाव दिले. वाळव्याचा 'किसन अहिर साखर कारखाना' हाही या भूमिगतांच्या चळवळीचे स्मारक म्हणून आज आपल्याला पहायला मिळतो.

## वसंतदादा पाटील :

औंधच्या पाठोपाठ सांगली संस्थान स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवर होते. भूमिगत चळवळीत वसंतदादा पाटील यांनी महत्त्वाची भूमिका निभावली होती. कृष्णाकाठच्या मळ्यांमध्ये त्यांचे गुप्त ठाणे असे. वसंतदादांच्या गटात निवृत्तिकाका पाटील, रंगरावदादा, गणपतराव पाटील, के. डी. पाटील इत्यादी क्रांतिवीरांचा संच होता. चळवळीकरिता पैसा लागतो व तो कसा मिळवायचा हे या गटाला चांगले ठाऊक होते. निवृत्तिकाकांनी कुपवाड येथील जिनिंग फॅक्टरी लुटली होती. या गटाने गोव्याहून बॉम्ब, रिव्हॉल्वर, काडतुसे अशी शस्त्रसामुग्री मिळवली होती. त्याचा उपयोग करून त्यांनी नांद्रे-कर्नाळ येथे रेल्वे पाडल्या; आरग, बेडग, बेळंकी, सलगर, धुळगाव, विश्रामबाग रेल्वे स्टेशने जाळली. बुधगावच्या टेलिफोनच्या तारा तोडल्या. भिलवडी-तासगाव रस्त्यावर पोस्टाच्या रनरची बॅग हिसकावून नगद रक्कम हस्तगत केली. ब्रिटिशांनी वसंतदादा पाटील व त्यांचे साथीदार हिंदुराव पाटील, वसंतराव गणपत सावंत, जयराम बेळवलकर, मारुतीराव आगलावे यांना २२ जून १९४३ रोजी अटक केली. त्यांच्याकडे २ रिव्हॉल्वर, बंदूक, काडतुसे, दारुगोळा व रेल्वे रूळ उखडण्यासाठीची इतर हत्यारे मिळाली. २४ जुलै १९४३ रोजी पोलिसांचा पहारा चुकवून वसंतदादा आणि १४ कैदी सांगलीच्या तुरुंगातून फरार

झाले व सोबत १८ बंदुका व १९२ काडतुसे पळवली. तुरुंग फोडून पलायन केल्यावर पाठलाग करणाऱ्या पोलिसांवर त्यांनी उंबराच्या झाडाजवळील खड्ड्यात बसून गोळीबार सुरू केला. मात्र त्यांचा उजवा खांदा पोलिसांच्या नजरेला पडला व त्यांनी खांद्याच्या आरपार गोळी झाडली. जखमी वसंतदादांना पुन्हा अटक झाली. बेकायदेशीर हत्यारे बाळगल्याबद्दल २ वर्षे सक्त मजुरी व ५०० रुपये दंड आणि तुरुंग फोडल्याबद्दल ६ वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंड झाला. तुरुंगातून पुन्हा पळून जाण्याचा प्रत्न करू नये म्हणून पायात दंडाबेडी घालण्यात आली. या कारावासात दादांनी तुरुंगातल्या बेचव व निकस जेवणाविषयी तक्रार करून ७ दिवस उपोषणही केले. (पाटणे, पृ. ५१) ८ ऑगस्ट १९४३ रोजी या मंडळींचा नांद्रे पुलाजवळ रेल्वे उडवण्याचा कट होता. पोलिसांनी पळून जाणाऱ्या कैद्यांचा पाठलाग केला व गोळीबारही केला. पळून जाणाऱ्या कैद्यांनीही गोळीबार केला. या चकमकीत अण्णा पत्रावर गोळी लागून ठार झाला. वसंतदादांसह १४ कैद्यांना वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणूनही वसंतदादा पाटील तेवढेच सक्रिय होते. १९३८ साली सांगलीपासून ५ कि. मी. अंतरावरील पद्माळे गावी काँग्रेस कमिटी स्थापन करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घ्यायला सुरुवात केली होती. २४ मार्च १९४१ रोजी त्यांनी पद्माळ्याजवळ बिसूर गावात वैयक्तिक सत्याग्रह केला. त्यासाठी त्यांना ३ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली. ९ सप्टेंबर १९४२ च्या इस्लामपूर मोर्चात ते अग्रभागी होते. मामलेदारांच्या डोक्यावर गांधी टोपी चढवून व तिरंगा फडकवून त्यांनी आपल्या देशभक्तीचे दर्शन घडविले. मात्र भूमिगत राहून ब्रिटिश सत्तेविरुद्ध कारवाया करणेच त्यांना अधिक पसंत होते.

**सातारा जिल्ह्यातील घडामोडी :**

सातारा जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीची बीजे विसाव्या शतकाच्या आरंभापासूनच पेरली गेली होती. इ. स. १९०० मध्ये साताऱ्याचे दादासाहेब करंदीकर, रावसाहेब लिमये, वाईचे नानासाहेब वैद्य यांच्या पुढाकाराने सातारला प्रांतिक काँग्रेसची परिषद झाली होती. 'स्वदेशी चळवळी'चा प्रसार करण्यासाठी १९०६ साली साताऱ्यास स्वदेशी कंपनी स्थापन करण्यात आली व जिल्हाभर स्वदेशी दुकाने उघडण्यात आली होती. वाईच्या गोविंदराव संतांना विदेशी कापडाची होळी केली म्हणून २०० रु. दंड अथवा ४ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. १९२१ साली सातारा जिल्ह्यात असहकाराचे आंदोलन छेडले गेले. सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलुमाविरुद्ध वाई, कोरेगाव, पाटण, खंडाळा तालुक्यात चळवळ झाली. त्यात अनेक आंदोलकांना ६ महिन्यांपासून दीड वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा व दंड झाला. सातारचे वि. वा. हडप यांनी बहिष्कार चळवळीत भाग घेतला व मुंबईच्या *'लोकशाही'* पत्रात ब्रिटिशांविरुद्ध जनमतास चिथावणारा लेख लिहिला म्हणून त्यांना ९ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. खंडाळा तालुक्यात शिरवळचे नरहर दत्तात्रय वाळिंबे यांनी शाळा- कॉलेजांवर बहिष्कार टाकला व असहकार चळवळीत भाग घेतला; त्यासाठी त्यांना ३ आठवडे सक्त मजुरी व ३५ रुपये दंड झाला.

१९३० साली १२ मार्चला गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी दांडीयात्रेला प्रारंभ

केल्यावर वाई, सातारा, कराडच्या विद्यार्थ्यांनी हायस्कूलच्या इमारतींवर तिरंगी झेंडे फडकावले. बाबुराव भिडे, पंडित कुलकर्णी यांनी बेकायदेशीर मीठ विकून सत्याग्रह केला. पाडळी, करंजखोपा, कडोव, निगडी तांबवे, बेलमाची, किकली, कवठे गावांत जंगल सत्याग्रह झाले. किकलीची जनावरे जबरदस्तीने सोडून दिल्याकारणाने किसन वीर यांना ११ महिने सक्त मजुरी व २५ रुपये दंड झाला. कवठ्याच्या जंगल सत्याग्रहातील ६ जणांना ४ महिने सक्त मजुरी व २५ रुपये दंड झाला. बिळाशीच्या लोकांनी इंग्रजी सत्ता झुगारून दिल्याचे घोषित केल्यावर पोलिसांनी गावाला वेढा दिला, गावकऱ्यांना कोंडीत पकडून झोडपून काढले. गोळीबारात २ मुले ठार झाली.

१९३१ साली २६ जानेवारीस यशवंतराव चव्हाण यांनी शाळेच्या पटांगणात तिरंगी झेंडे लावले म्हणून त्यांना अटक करण्यात आली व ११ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९३१ साली सातारा जिल्ह्यातील मसूर-कराड येथे काँग्रेसची जिल्हा राजकीय परिषद झाली. या परिषदेला काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष माधवराव अणे, कोल्हापूरचे माधवराव बागल, वाईचे किसन वीर, आत्माराम पाटील, पांडुरंग मास्तर इत्यादी नेते उपस्थित होते. या परिषदेत काँग्रेसच्या राजकीय चळवळीला सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीचे परिमाण देण्याच्या दृष्टीने माधवराव बागल यांनी काही नवा विचार देण्याचा प्रयत्न केला. कुळांना शेती कसण्याचा हक्क असावा, किंवा सावकारांनी कर्जावर ९ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज आकारू नये यासारख्या उपसूचना मांडण्यात आल्या. मात्र परिषदेच्या अध्यक्षांनी त्या नियमात बसत नसल्याने बाजूला ठेवल्या. (पाटणे संभाजीराव, १९९२, पृ. १९-२३)

५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार झाला. सरकारने काही नव्या सुधारणा जाहीर केल्या. दलितांसाठी वेगळा मतदारसंघ दिला जाईल, अशी घोषणा करण्यात आली. महात्मा गांधींनी त्यास विरोध करून संयुक्त मतदारसंघाचा आग्रह धरला. या पार्श्वभूमीवर 'धर्मात अस्पृश्यताआहे काय?' या विषयावर चर्चा कण्यासाठी वाई आणि सातारा येथे शास्त्री-पंडितांना निमंत्रित करण्यात आले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९३६-३७ साली सातारा जिल्ह्यात अस्पृश्यता निवारण व ब्राह्म धर्माच्या प्रचारार्थ दौरा केला. या दौऱ्यात कर्मवीर भाऊराव पाटील, किसन वीर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सहभागी झाले होते. (पाटणे, १९९२, पृ. २४-२५)

### किसन वीर :

सातारा जिल्ह्यात काँग्रेस चळवळीत किसन वीर यांचे मोठे योगदान आहे. १९२७ साली कवठे येथे विदेशी कपड्यांची होळी करून त्यांनी 'स्वदेशी' आंदोलनात आपला सहभाग नोंदवला. त्यानंतर १९२९ साली वाई व कवठे तालुक्यात काँग्रेसच्या सभासद नोंदणीची मोहीम चालवली. काँग्रेसने २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आवाहन केल्यावर किसन वीर यांनी कवठे येथे पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला. १२ जुलै १९३० रोजी मुंबईचे गव्हर्नर फ्रेड्रिक्स हे सातारला आले असताना त्यांना काळी निशाणे दाखवून निषेध केला. १९३७ सालात वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, मणिबेन पटेल यांनी मुद्दाम कवठ्यास भेट देऊन किसन वीर यांच्या कार्याची दखल घेतली. १९४० साली सातारा जिल्ह्यात काँग्रेस

कार्यकर्त्यांची बौद्धिक शिबिरे यशस्वी करण्यासाठी किसन वीर यांनी मेहनत घेतली. १८ सप्टेंबर १९४२ ला त्यांना अटक झाली; ३१ ऑक्टोबर १९४२ रोजी येरवडा तुरुंगातून पलायन करण्याचा त्यांनी विक्रम केला. तुरुंगातून बाहेर आल्यावर भूमिगत चळवळीत आक्रमक भूमिका घेऊन ते काम करू लागले. २६ जानेवारी १९४३ रोजी वाई तालुक्यातील उडतारेजवळचा पूल उडवला व सरकारी बंगला पेटवला. वाई-वाठार मेलगाडी शिरगावजळ थांबवून टपालाच्या थैलीतले पैसे लुटले. भूमिगत होऊन १६ दिवस भिलार गावात मुक्काम ठोकला. भूमिगत झालेल्या किसन वीरांना पकडण्यासाठी सरकारने हजार रुपयांचे बक्षिस जाहीर केले. तरीही ते न सापडल्याने त्यांची पत्नी राधाबाई, मुले विठ्ठल व पुरुषोत्तम आणि सासुबाई या कुटुंबियांना अटक करण्यात आली. ६ महिने १७ दिवस त्यांना स्थानबद्ध करून ठेवले.

**यशवंतराव चव्हाण :**

८ ऑगस्ट १९४२ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनासाठी कराडहून यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे काही निवडक कार्यकर्ते मुंबईस गेले होते. कराडला परत आल्यावर त्यांनी सातारा जिल्ह्यात भारत छोडो आंदोलन पुढे नेण्यासाठी भूमिगत चळवळ निर्माण करण्याची योजना आखली. ब्रिटिशांविरुद्ध लढताना भोळेपणाने तुरुंगात जाण्यापेक्षा लोकांना ब्रिटिश सत्तेच्या प्रतिकात्मक सत्तास्थानांविरुद्ध उठाव करण्यास प्रवृत्त करण्याची योजना आखली. प्रत्येक तालुक्याच्या गावी जनमोर्चा नेऊन मामलेदार कचेरीवर तिरंगा झेंडा फडकावण्याचा संकल्प सोडला. कराडला बाळासाहेब पाटील उंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली २४ ऑगस्ट १९४२ रोजी हजारोंच्या संख्येने मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात माधवराव जाधव या तरुणाच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणावर युवावर्ग सामील झाला होता. मोर्चाचे नेतृत्व करणारे बाळासाहेब उंडाळकर यांना पोलिसांनी अटक केली.

कराडच्या मोर्चानंतर औंध व सांगली संस्थानात, तसेच सातारा जिल्ह्यात इंग्रजी सत्तास्थानांवर तिरंगा फडकवून स्वातंत्र्य घोषित करावयाचे अशी योजना किर्लोस्करवाडीत ठरविण्यात आली. ही योजना आखण्यात यशवंतराव चव्हाण यांचा पुढाकार होता व त्यात अमणापूरचे गोविंदराव खोत,पलुसचे कृष्णाजी कुराडे यांचा सहभाग होता. (चव्हाण यशवंतराव, २०१२, पृ. २५२-२५३) या योजनेनुसार २ सप्टेंबर १९४२ रोजी साली मोर्चा पर्व सुरू झाले. नाना पाटील व कृष्णाजी कुराडे यांच्या नेतृत्वाखाली तासगावच्या मामलेदार कचेरीवर मोर्चा नेण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी तहसीलदारांना गांधी टोपी घातली, युनियन जॅक उतरवून तिरंगा झेंडा फडकवला. तहसीलदारास 'आजपासून आम्ही स्वतंत्र भारताचे नोकर आहोत' अशी प्रतिज्ञा घ्यायला लावली व तासगाव तालुका स्वतंत्र झाल्याची घोषणा करण्यात आली. याच पद्धतीने इस्लामपूरला पांडुरंग मास्तर येडेकर यांच्या नेतृत्वाखाली, वडूजला शेतकऱ्यांचे नेते परशुराम घार्गे पहिलवान यांच्या नेतृत्वाखाली मोर्चे निघाले. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी लाठीमार व गोळीबार केला. इस्लामपूरला शंकर पंड्या व बारबाटे हे २ तरुण व वडूजला घार्गे पहिलवानांसह ९ लोक हुतात्मे झाले. पोलिसांच्या गोळीबारात किर्लोस्करवाडीचे इंजिनियर

पाड्या व आणखी एकाचा बळी गेला. .

मोर्चा पर्यंत गोळीबारात नाहक बळी गेलेल्या कार्यकर्त्यांची संख्या पाहिल्यावर यशवंतराव चव्हाणांनी गनिमी काव्याने भूमिगत चळवळ चालवावी असा विचार केला. ५ नोव्हेंबर १९४२ रोजी सातारा- सांगली भागात भूमिगत चळवळीची पुढची दिशा ठरविण्यासाठी कुंभारगाव येथील आप्पासाहेब लाड यांच्या जोंधळ्याच्या शेतात यशवंतराव चव्हाण व प्रतिसरकार चळवळीचे नेते नाना पाटील यांची बैठक झाली. [९] यशवंतराव चव्हाण यांना भूमिगत चळवळीचे पहिले डिक्टेटर म्हणून संबोधले जाऊ लागले. या बैठकीत गुन्हेगारांमुळे स्वातंत्र्य चळवळ बदनाम होऊ नये म्हणून त्यांचे मन वळविण्याचे ठरविण्यात आले व त्याची जबाबदारी जी. डी. लाड बापू व ज्ञानोबा जाधव यांच्यावर सोपविण्यात आली. (पवार बा. ग. २००८, पृ. ७८-७९) मार्च १९४३ मध्ये भूमिगत चळवळीच्या कार्यकर्त्यांची पुन्हा एक बैठक झाली व गनिमीकाव्याचे तंत्र वापरून सशस्त्र लढ्याचे पर्व पुढे न्यायचा निर्णय झाला. इंग्रजी सत्तेचा प्रतिवाद करण्यासाठी भूमिगत राहून रेल्वे रूळ उखडणे, दळणवळण तोडणे, गाड्या लुटणे, सरकारी बंगले जाळणे, सरकारी खजिना लुटणे असा कार्यक्रम ठरविण्यात आला. जी. डी. लाड बापू व नागनाथ नाईकवडी यांनी हत्यारे मिळवण्याची जबाबदारी अंगावर घेतली. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातल्या एअरगन्स चोरल्या, किर्लोस्करवाडीजवळच्या सावंतपूरच्या मिलिटरी पेन्शनरकडून, बुर्ली गावच्या पोलीस पाटलाकडून बंदुकी मिळवल्या. सागाव पोलीस ठाण्यातल्या बेसावध पोलिसांवर हल्ला चढवून पाच बंदुका हस्तगत केल्या. चांगल्या दर्जाची हत्यारे मिळवण्यासाठी औंध संस्थानची कुंडलगाव बँक लुटली.(पवार बा. ग. कित्ता, पृ. ८५-८६) हत्यारांची जमवाजमव झाल्यावर डिसेंबर १९४२ रोजी शिणवले रेल्वेस्टेशन, ११ डिसेंबरला शिरवडे रेल्वे स्टेशन जाळण्यात आले. ७ जून १९४३ रोजी मिरजेहून कोरेगावकडे जाणारी आगगाडी बिचूद शेणोली मार्गावर अडवून खजिना लुटण्यात आला. (पाटणे, १९९२, पृ. ४७-४८) ३ महिन्यात ६ रेल्वेस्टेशनवर हल्ले झाले ३ मालगाड्या पाडल्या, ७७ तारायंत्रांचे खांब उखडले, ५ पूल पाडण्यात आले, पोस्टाच्या ६ व्हॅन्स लुटल्या, ६ नोव्हेंबर १९४२ रोजी वाईच्या कोर्टाची इमारत पेटवली. भूमिगतांना पकडण्यासाठी सातारा पोलिस प्रमुखांनी प्रत्येकी ५ हजार, ३ हजार, १ हजारांची बक्षिसे लावली. या भूमिगतांमध्ये नाना पाटील, बाबुराव चरणकर, नागनाथ लाड; गणपतराव पाटील, लक्ष्मणराव कासेगावकर, अनंतराव बर्डे मास्तर, धोंडीराम माळी; नागनाथ नाईकवाडी, रंगराव पाटील, शेख काका, मारुती हवालदार इत्यादी क्रांतिवीरांचा समावेश होता. भूमिगतांनी गनिमी काव्याने पोलिसांना चकवे देऊन जेरीस आणले. नावे बदलून, वेष बदलून भूमिगत आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावत होते. बुधच्या बापू कचरे यांनी वेड्याचे सोंग घेऊन, नग्न होऊन पोलिसांना चकवले. उंब्रजला कासेगावकर वैद्य एका घरात जेवत असताना पोलिस आल्याचा मुलांनी गलका केल्याचे कानावर येताच घरातली म्हातारी कासेगावकरांना घरातच ठेवून बाहेरून कुलूप लावून रानात निघून गेली. अटक झाल्यावरही तुरुंग फोडून क्रांतिवीर बाहेर पडले. १९४२ साली किसन वीर यांनी येरवडा जेलमधून, १९४३ साली वसंतदादा पाटील यांनी सांगलीच्या तुरुंगातून, १९४४ साली माधवराव जाधव यांनी

कराडच्या सबजेलमधून आणि नागनाथ नायकवाडी यांनी सातारचा तुरुंग फोडून पलायन केले. (पवार, कित्ता, पृ. ६०-६६)

यशवंतराव चव्हाण हे भूमिगत राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. पोलीस त्यांच्या मागावर असल्याने त्यांना सतत जागा बदलत फिरत रहावे लागत असे. मसुरच्या दत्तोबा काटकर यांच्या जोंधळ्याच्या शेतात छोट्या झोपडीत काही दिवस राहिले. किर्लोस्करवाडीत सदाशिव पेंढारकरांकडे रहात. पोलिसांनी यशवंतराव चव्हाण सापडत नाहीत म्हणून शोधून देणाऱ्यास एक हजारांचे बक्षिस घोषित केले. बंधू गणपतरावांना व पत्नी वेणूबाई यांनाही अटकेत ठेवले. अखेरीस फलटणला वेणूबाईच्या माहेरी चव्हाण साहेबांना दोनदा अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले. भूमिगत चळवळीत पुढे चव्हाण साहेबांना फार काही काम करता आले नाही, मात्र नाना पाटलांच्या 'पत्री सरकार'च्या कामाबाबत त्यांना विश्वास होता.(चव्हाण यशवंतराव, २०१२, पृ. २९२)

१९४५ साली म. गांधी पाचगणीला आले होते, त्यावेळी गांधीजींनी भूमिगतांच्या चळवळीच्या पद्धती जरी अहिंसक चळवळीच्या पद्धतीत बसणाऱ्या नसल्या तरी हे सर्व देशभक्त असल्याचा निर्वाळा दिला होता. अर्थात प्रति-सरकारची भाषा करणाऱ्या चळवळी गांधीजींच्या तत्त्वविचारात बसत नव्हत्या. आयरिश लोकांप्रमाणे एकाच वेळी दुसरे प्रतिस्पर्धी सरकार चालविणे व्यवहारत: शक्य नाही असे त्यांचे मत होते. अत्यंत मर्यादित क्षेत्रापलिकडे प्रतिस्पर्धी व सुप्रतिष्ठित संस्थांची यंत्रणा आपण उभी करू शकणार नाही; आणि अहिंसेच्या आधारे आपण फक्त असहकारिता अथवा सविनय कायदेभंग येवढेच काम करू शकतो, अशी गांधीजींची समजूत होती. (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड २२, पृ. १८४) जवाहरलाल नेहरू यांनीही हिंसे-अहिंसेचे प्रश्न हे तांत्रिक असून जेव्हा राष्ट्र दडपशाहीखाली दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जात होता, तेव्हा अशा चळवळी स्वाभाविक असल्याचे मत व्यक्त केले होते. (चव्हाण यशवंतराव, २०१२, पृ. २९६-९७)

### विदर्भातील भूमिगत चळवळी :

विदर्भात हिंदुस्थानी लाल सेना भूमिगत चळवळीत अग्रेसर होती. ७ ऑगस्ट १९४२ ला गांधीजींनी 'भारत छोडो'ची घोषणा करण्यापूर्वीच हिंदुस्थानी लाल सेनेची भूमिगत चळवळीची पूर्वतयारी सुरू होती. ५ जुलै १९४२ रोजी आचार्य नरेंद्र देव यांच्या उपस्थितीत सेनेच्या लष्करी परिषदेची बैठक होऊन मगनलाल बागडी यांच्या नेतृत्वाखाली 'वॉर कौन्सिल' स्थापन करण्यात आली होती. या युद्ध समितीत आचार्य दांडेकर, श्यामनारायण काश्मिरी, श्यामलाल श्रीवास्तव, महादेवराव पवार, बाबूलाल गुप्ता, रामसिंग गौर यांचा समावेश होता. त्यानंतर लाल सेनेने सरकारी खजिने आणि पोलीस स्टेशन्स लुटण्यासाठी गुप्तपणे सरकारी नकाशे मिळवले.

८ ऑगस्ट १९४२ रोजी 'जिंकू किंवा मरू' अशा घोषणा देत ३०० देशवासीयांच्या 'नागपूर संरक्षक दला'ची मिरवणूक काढण्यात आली. शहरात हरताळ पाळण्यात आला. चिटणवीस पार्कमध्ये हिंदू महासभेचे नेते डॉ. एम. एन. चोळकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय सभा आयोजित करण्यात आली. *फॉर्वर्ड ब्लॉक* पक्षाचे नेते रामभाऊ रुईकर यांचे

प्रक्षोभक भाषण झाले. ९ ऑगस्टला सरकारने मध्यप्रांत-वऱ्हाडच्या ६१ संघटना बेकायदेशीर ठरविण्यात आल्याचे जाहीर केले. हिंदुस्थानी लाल सेनेच्या कार्यालयाची झडती घेण्यात आली होती, मात्र सेनेने आधीच सगळी गोपनीय कागदपत्रे इतरत्र हलवली असल्याने सरकारच्या हाती काही लागले नाही; कार्यालयाला मात्र टाळे ठोकण्यात आले. १० ऑगस्टला विद्यार्थी आणि गिरणी कामगारांनी हरताळ चालूच ठेवला. दुसरे महायुद्ध हे लोकयुद्ध असल्याचे घोषित करून ए. बी. वर्धन, हरिकिसन व्यास यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्टही या आंदोलनात उतरले. ११ ऑगस्टला नरेंद्र तिडके यांच्या नेतृत्वाखाली *राष्ट्रीय युवा संघ* आंदोलनात उतरला. तेलनखेडीच्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या घरावर व जिल्हा न्यायाधीशाच्या बंगल्यावर बॉम्ब टाकण्याचाही कट रचण्यात आला होता.

१२ ऑगस्टला लाल सेना व काँग्रेस नेत्यांच्या पुढाकाराखाली जमावाने इटवारा पोस्ट ऑफीस लुटले; मात्र आता इंग्रजी चलन चालणार नसल्याने पोस्टाच्या पैशांना हात लावला नाही. त्याच दिवशी लाल सेनेच्या सैनिकांनी बुधवारी पोलीस नाक्यावर हल्ला चढवून २ बंदुका हस्तगत केल्या. सात पोलीस चौक्या जाळल्या. इटवारी रेल्वे स्टेशनचे गोदाम जाळले. तारेचे खांब उखडले, पोलीस व लष्कराने केलेल्या प्रतिहल्ल्यात ४ लोक ठार झाले. १२ ऑगस्टलाच रामटेक येथे काँग्रेस नेत्यांनी आयोजित केलेल्या सभेत हिंदुस्थानी लाल सेनेचे सुरजलाल गुप्ता, बकाराम तेली आणि हरी कुणबी यांची प्रक्षोभक भाषणे झाली. पोलिसांनी त्यांना अटक केली व १३ तारखेला सकाळी नागपूरला घेऊन जाण्यासाठी रेल्वेत बसविले. तेव्हा दोनशे लोकांच्या जमावाने पोलिसांना घेराव घालून त्यांची सुटका केली. त्यानंतर रेल्वे स्टेशन जाळण्यात आले. जमावाने नंतर तहसील कचेरीवर हल्ला चढवला. पोस्ट ऑफिसातला साडे तीन लाखांचा खजिना लुटला. या प्रकरणात ८८ लोकांना शिक्षा झाली. बकाराम तेली, शिवराम कुणबी आणि सूरजमल गुप्ता यांना जन्मठेप झाली.

१३ ऑगस्टला हिंदुस्थानी लाल सेनेचे कृष्णराव काकडे यांनी शनिचारा पूल पोस्ट ऑफिस जाळले व पोस्ट ऑफिसातला खजिन्यातल्या नोटांची होळी केली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कृष्णराव काकडे शहीद झाले. पूर्ण दिवस जाळपोळ, तारा तोडणे, लुटालूट सुरू होती. पाचपाऊली व गणेशपेठ पोलीस लाईनवर हल्ला करण्यात आला. सहा पोलीस चौक्या जाळण्यात आल्या. लष्कराच्या धान्य वाहून नेणाऱ्या लॉरीवर हल्ला करण्यात आला. महादेव भट, शंकर महल्ले, यशवंत ठाकरे, बाबू बडवे, गणपत पठाडे यांनी नवाबपुरा पोलीस स्टेशनवर हल्ला करून ३ बंदुका हस्तगत केल्या. जमावाने केलेल्या चढाईत हेड कॉन्स्टेबल बालगोविंद मारला गेला. बाकीचे पोलीस पळून गेले. बालगोविंदच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या ९ जणांवर खटला दाखल झाला. शंकर महल्लेला फाशी आणि चौघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. १९ जानेवारी १९४३ रोजी शंकर महल्लेला फासावर चढवण्यात आले.

१५ ऑगस्ट १९४२ रोजी सावनेरला जमावाने पोस्ट ऑफिस, केरोसीन तेल डेपो, रेल्वे स्टेशन, विश्रामगृह उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. खापा येथेही असाच प्रकार घडला. सावनेरच्या ७ आंदोलकांना प्रत्येकी पाच वर्षांची शिक्षा झाली, इतर ८ जणांना ८ वर्षांची शिक्षा

ठोठावण्यात आली. १५ ऑगस्टला मगनलाल बागडीने रामटेकला जाऊन झालेल्या जाळपोळीची पाहाणी केली. रामटेकच्या ट्रेझरीत लुटलेली रक्कम सुरजलालने मगनलाल बागडी यांच्या हवाली केली. त्यांनी ती लाल सेनेच्या सैनिकांमध्ये वाटून टाकली. ब्रिटिशांनी हिंदुस्थानी लाल सेनेच्या म्होरक्यांना पकडण्यासाठी नाना प्रकारचे प्रयत्न केले. पण वेषांतर करून, आडमार्गाने कूच करणाऱ्या या म्होरक्यांना पकडण्यात यश मिळत नव्हते. अखेर २० ऑगस्ट १९४२ रोजी सरकारने मगनलाल बागडी (रु.१,०००), श्यामनारायण काश्मिरी, श्यामलाल नाई आणि विनायक सखाराम दांडेकर (प्रत्येकी रु. ५००) या बंडखोरांना पकडून देणाऱ्यांना इनाम घोषित केले. तसेच मगनाल बागडीच्या सेनेतील कुणाही एकाला पकडून देणाऱ्यास २०० रुपयांचे इनाम घोषित करण्यात आले. [१०]

मगनलाल बागडी यांच्या *'हिंदुस्थानी लाल फौजे'*ने १४०० प्रशिक्षित स्वयंसेवकांच्या मदतीने विदर्भात ग्रामीण भागातही भूमिगत आंदोलन छेडले. झाडे तोडून रस्ते आणि पूल बंद करण्यात आले. पोलीस स्टेशनवर हल्ला करून तेथील शस्त्रे पळविण्याला अग्रक्रम दिला गेला. त्यानंतर पोस्ट ऑफिसांवर हल्ला चढवला जाई. पोलीस आणि लष्कराच्या गोळीबारात १५ ऑगस्ट १९४२ पर्यंत चार दिवसात हिंदुस्थानी लाल सेनेचे ५२ सैनिक शहीद झाले. १५ ऑगस्ट १९४२ ला रात्री जर्मनी आणि जपानच्या रेडिओवरून हिंदुस्थानी लाल सेनेच्या विदर्भातील मौदा गावावर केलेल्या चढाईचा सविस्तर वृत्तांत व राष्ट्रध्वज फडकावून हिंदुस्थानी स्वातंत्र्याची उद्घोषणा केल्याची वार्ता प्रसारित झाली. त्यानंतर १७ तारखेपासून लाल सेनेच्या सैनिकांनी आंदोलन थांबवून मिळेल त्या मार्गाने वेषांतरे करून आपापल्या घरी परतण्यास सुरुवात केली. यापैकी काही आंदोलकांना पकडण्यात पोलिसांना यश मिळाले नाही. मात्र १९४३ च्या जुलैत मुंबई येथे या आंदोलकांना पकडण्यात आले. राजद्रोहाच्या गुन्ह्याखाली मगनलाल बागडी यांना आजन्म कारावासाची शिक्षा झाली. (Sharma, 1998, Pp. 69-80)

विदर्भातल्या 'फॉरवर्ड ब्लॉक' पक्षाचे सचिव भंडाऱ्याचे प्रल्हाद गोपाळ शेंदूर्णीकर, अनुसयाबाई काळे यांचा मुलगा काशीनाथ काळे, हिंगणघाटचे नीलकंठ मुरलीधर घटवाई हे भूमिगत आंदोलन चालवीत होते. घटवाई हे तर भिकाऱ्याचा वेष परिधान करून चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, तुमसर भागात भूमिगत राहून कार्य करीत होते. मध्य भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील नोंदींनुसार १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात पोलीस व फौजी शिपायांनी ५३८ वेळा गोळीबार केला. ९४० लोक ठार झाले, १६३० लोक जखमी झाले. ६० हजार लोक तुरुंगात गेले. (वक्काणी, २००३, पृ. १५९-१६०)

विदर्भातील भूमिगतांच्या चळवळीत नाना प्रकारचे धोके पत्करून जनसैनिक स्वातंत्र्याच्या प्रेरणेने ब्रिटिशांशी झुंजत होते. या संघर्षाच्या विविध रोमांचकारी हकिगतींतून स्वातंत्र्यलढ्याचे काही सांस्कृतिक पैलूही पुढे आले आहेत. काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्यापासून दूर असलेल्या मुसलमानांनी हिंदुस्थानी लाल सेनेच्या सैनिकांना संरक्षक कवच पुरवले होते. मगनलाल बागडी यांनी मुस्लिम खाकसार चळवळीचे नेते शेख महमूद याकूब यांच्या सासऱ्याच्या घरी व्याहाड गावी आश्रय घेतला होता. मुस्लीम पेहराव व लांब दाढी असे वेषांतर करून मगनलाल

त्यांच्याकडे रहात असे. एकदा एका गुप्त खलबतांच्या बैठकीसाठी मदनलाल यांना नागपूरला जायचे होते तेव्हा बैलगाडीतून प्रवास करताना शेख याकूब यांची नववधू कुलसुंबी हिने आपण मदनलालची पत्नी असल्याचा बहाणा करून त्यांची पोलिसांपासून सुटका केली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ डाव्या विचारधारेशी नाते सांगणाऱ्या लाल सेनेपासून दूर असला तरी हिंदुस्थानी लाल सेनेच्या बंदुका आणि काडतुसे सुरक्षित लपवून ठेवण्याची जोखीम संघाचे स्वयंसेवक मार्तंडराव जोग यांनी स्वीकारली होती. एकदा पैशांची चणचण भासत होती म्हणून मध्यरात्री मगनलाल नागपूरचे महसूल आयुक्त पी. एस. राऊ यांच्या बंगल्यात शिरले. चौकीदारने मगनलालला ओळखले आणि बंगल्यात सोडले. त्यावेळी क्रांतिकारकांची नड भागविण्यासाठी कमिशनरच्या बायकोने आपले दागिने आणि पैसे देऊ केले. मगनलालने दागिने घेतले नाही, पण पैसे स्वीकारले आणि महसूल आयुक्ताने मगनलालच्या धाडसाचे कौतुक करून त्यास तेथून परागंदा होऊ दिले. म. गांधींच्या वर्ध्याच्या सेवाग्राम आश्रमातून नागपूरच्या क्रांतिकारकांशी संपर्क ठेवण्यासाठी अण्णाजी सहस्त्रबुद्धे यांनी लीला मंगलदास या महिलेस नागपूरला पाठविले होते. लीलाताईंनी मातृसेवासंघात पारिचारिकेचे काम पत्करून हिंदूस्थानी लाल सेनेच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख भास्करराव चौरे यांच्याशी संपर्क ठेवला होता. सूतिकागृहात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या कमलाताई होस्पेट यांनी लष्करी गणवेशातल्या मगनालाल बागडींना अच्युतराव पटवर्धनांचे पुतणे कॅ. पटवर्धन यांच्याबरोबर रेल्वेने नाशिकला नेले व तेथून एका रुग्णवाहिनीतून मगनलाल यांना डॉक्टर, नर्स कमलाताई यांच्यासह मुंबईस नेऊन एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मुंबईत एकदा काळबादेवी भागात हिंडत असलेल्या मगनलाल बागडींना खाजगी वेषातले पोलीस तुलसीदास तिवारी आणि काशिराव देशमुख यांनी गुप्तचरांची तुमच्यावर पाळत असल्याचा इशारा देऊन सावध केले. हिंदुस्थानी लाल सेनेचे सैनिक अशा प्रकारे वेषांतरे करून मुंबई, दिल्ली, अलाहाबाद, कलकत्ता असा संचार करीत ब्रिटिशांविरुद्ध भूमिगत कारवाया करीत होते आणि जनतेची त्यांना साथ होती. मात्र एका गद्दाराने हिरव्या शाईत गुप्त सहकाऱ्यांना पत्रसंदेश पाठविण्याची पद्धत हेरून ग्वाल्हेरहून नुकत्याच परतलेल्या मगनलाल बागडीचा मुंबईतला पत्ता पोलिसांना दिला व २८ जुलै १९४३ रोजी त्यास अटक झाली. (Sharma, 1998, p. 83-99)

मुंबई इलाख्यात काँग्रेसचे सरकार आल्यावर १९४६ साली मे महिन्यात भूमिगतांचे वॉरंटस रद्द झाले. ७ मे १९४६ हा भूमिगतांचा प्रकटदिन म्हणून साजरा झाला. कराडजवळील कोरेगाव येथे नाना पाटील यांनी भूमिगत प्रतिसरकार आता काँग्रेसमध्ये विलीन झाल्याचे जाहीर केले. या प्रकटदिनासाठी जमलेल्या हजारो लोकांनी क्रांतिवीरांचा जयजयकार केला. आचार्य अत्रे यांनी नाना पाटील यांना 'क्रांतिसिंह' अशी उपाधी देऊन त्यांचा अर्थपूर्ण गौरव केला. महाराष्ट्राच्या राजधानीत मुंबईच्या चौपाटीवर २६ मे १९४६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटलांचा जाहीर सत्कार करण्यात आला. आतापर्यंत भूमिगत असलेल्या नाना पाटील यांचे पुणे, मुंबई, खानदेश, विदर्भ, हैद्राबाद संस्थानातील मध्यप्रांत, मराठवाडा अशा सर्व भागातून सत्काराचे कार्यक्रम झाले. नाशिकला १९४७ साली मे महिन्यात मराठा समाजाची शिक्षण परिषद होती.

या परिषदेस केशवराव जेधे, पंजाबराव देशमुख, काकासाहेब वाघ, तुळशीदास जाधव यांच्याबरोबर क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. लाड बापू यांनाही आमंत्रित केले होते. या परिषदेत जी. डी. बापूंनी निझाम राजवटीतील रझाकारांविरुद्ध लढा उभारण्याचे आवाहन केले, आणि तेथेच या लढ्याकरिता 'शेतकरी संघ' स्थापन झाला. पाठोपाठ कुंडल येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन 'निझाम रझाकार विरोधी लढ्याची तयारी सुरू झाली. सांगली साताऱ्याचे भूमिगत सैनिक आता मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी हैदाबादकडे वळले. प्रतिसरकारची हत्यारे हैद्राबाद संस्थानाविद्धच्या लढ्यासाठी वापरली गेली. त्याचा वृत्तांत मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या प्रकरणात आलेला आहे. मात्र प्रतिसरकारच्या लढ्याचे कुशल संघटक जी. डी. बापू लाड यांना पूर्वग्रहदूषित राजकारणातून १९४८ च्या वर्ष अखेरीस वाई तालुक्यातील शेंदूरजनी येथे अटक करून त्यांची नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. १९५० सालापर्यंत ते या तुरुंगात होते. ग्रामस्वराज्याच्या ध्येयवादाने भारावून आपले तारुण्य देशसेवेत अर्पण करणाऱ्या क्रांतिवीराच्या वाट्याला देश स्वतंत्र झाल्यानंतर अकारण तुरुंगवास भोगावा लागावा, याची मीमांसा कशी करावी हा प्रश्नच आहे!

भूमिगतांच्या चळवळीतून शिवकालापासून चालत आलेली मराठ्यांची गनिमी काव्याची युद्धशैली लोकसंस्कृतीत कशी मुरली होती, याचा प्रत्यय येतो. पत्री सरकारच्या चळवळीतील क्रांतिवीर झटपट वेषांतर करून पुरुषरूपातून स्त्रीरूपात जातात, बाळंतिणीच्या खाटेवर जाऊन बाळालाही सुगावा लागणार नाही इतक्या लिलयेने माऊलीची जागा घेतात आणि पोलिसांच्या नजरेत आणि मनात संभ्रम निर्माण होईल असा चकवा देतात. एस. एम. जोशींसारख्या पुणेरी पुढाऱ्यानेही काश्मिरी मुसलमानाचा वेष परिधान करून पोलिसांना चकवा दिला. पोलिसांचा फेरा आल्यावर हजामतीला बसलेला क्रांतिवीर झटपट न्हाव्याची जागा घेऊन न्हाव्याचीच हजामत करू लागतो आणि या स्थानबदलाच्या चकव्यातून पोलिसांना हुबेहुब फसवतो. 'चोर सोडून संन्याशाला फाशी द्यावे' या न्यायाने क्रांतिवीराच्या जागी न्हाव्याचीही स्वत:ला अटक करून घेण्याची तयारी असते, हे विशेष!. सारांश, भातीय स्वातंत्र्यसंग्रामात मराठ्यांच्या गनिमीकाव्याच्या लोकलढ्याचा स्थानिक संस्कृतीचा वारसा कामाला आला हे खरे!

## स्वातंत्र्य-संग्रामातले राजकीय अनुभवविश्व :

स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असणाऱ्या कार्यकर्त्यांवर ब्रिटिश सरकारची पाळत असायची. पोलिसांकडून संशयित कार्यकर्त्यांच्या, वृत्तपत्रलेखकांच्या घरावर अधूनमधून धाडी पडत व झडत्या घेतल्या जात. बऱ्याचदा आपले घरभेदे लोक पोलिसांचे खबरे असत. त्र्यं. र. देवगिरीकर हे पुण्याच्या *'चित्रमय जगत'*च्या संपादकीय कचेरीत काम करीत. त्यांच्या नजीकच्या सहवासातल्या काही व्यक्ती देवगिरीकरांना सुगावा लागू न देता पोलिसांना बातम्या पोहचवीत असत. यासंबंधीचे काही अनुभव देवगिरीकरांनी त्यांच्या *'राजकीय आठवणी'* या पुस्तकात नोंदून ठेवल्या आहेत. पुण्याच्या नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या कट्ट्यावर बसून भालाकार भोपटकर आणि इतर मंडळी राजकारणावर चर्चा करीत बसलेले असताना त्या अड्ड्यावर हे सरकारी हेर (इन्फॉर्मर वर्ग) त्यांच्यातलेच एक होऊन गप्पांमध्ये सामील होत, आपल्याला

ज्योतिष येते वगैरे बहाणा करून उपस्थितांशी जवळीक साधत व बातम्या काढून घेत. पुण्याचे कर्वे नावाचे गृहस्थ हे अशा खबऱ्यांपैकी एक होते. बातम्या काढून घेण्यासाठी ते कधी हॅट घालून साहेब होत, कधी भिक्षुकाचा वेष परिधान करीत, कधी रूमाल पगडी घालत, तर कधी स्त्रीवेष धारण करीत. एकदा हे कर्वे देवगिरीकरांसमोर स्त्रीवेषात सामोरे आले. "नऊ वारी भरजरी लुगडे, नाकात नथ, कानात बुगड्या, हातात बांगड्या, डोक्यावर कृत्रिम केशकलाप. फुलांची वेणी. चारचौघा स्त्रियांत खुलून दिसतील इतके बेमालून नटले होते." (देवगिरीकर, पृ. ६) या कर्व्यांचे पितळ कसे उघडे पडले, याची एक हकिगत देवगिरीकरांनी सांगितली आहे : १९२५ साली मुळशी सत्याग्रहात सेनापती बापट यांनी ज्या पिस्तुलाचा वापर केला होता ते पिस्तुल मुळात वासुकाका जोशी यांचे पुतणे विष्णु नरहर जोशी यांचे होते. १९१३ साली त्यांनी ते जर्मनीतून आणले होते. त्यानंतर त्यांनी ते कानडेशास्त्रींना दिले होते. कानडे शास्त्रींनी ते बापटांना दिले होते. बापटांनी मुळशी सत्याग्रहात ते पिस्तुल वापरल्यामुळे त्यांना ७ वर्षांची शिक्षा झाली. बापटांना हे पिस्तुल आपण दिल्याचे समजले तर आज ना उद्या पोलीस आपल्याला पकडतील या धास्तीने कानडेशास्त्री घराबाहेर पडत नव्हते. कानडेशास्त्रींना येणारा संशय कितपत खरा आहे, याचा सोक्षमोक्ष लावावा म्हणून त्यांनी आपले मित्र कर्वे यांची मदत घ्यायचे ठरविले. मात्र कर्व्यांना पोलिसांकडून अटकेबाबतची संभाव्यता जाणून घेण्यास सांगितल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पोलीस देवगिरीकरांच्यासमोर हजर झाले व कानडेशास्त्रींचा ठावठिकाणा विचारू लागले. तेव्हा देवगिरीकरांना कळून चुकले की, कर्वे हे क्रांतिकारकांना मदत करणारे नसून पोलिसांचे हेर आहेत!

**तुरुंगातले दिवस :**

निरनिराळ्या राजकीय आंदोलनात भाग घेणाऱ्या देशभक्तांना कुठल्या ना कुठल्या ना कारणाने तुरुंगाची हवा खावी लागत असे. तुरुंगातले जीवन हलाखीचे असले तरी या नकोशा वास्तव्यात राजबंदींचे नाना उद्योग चालत. अहमदनगर तुरुंग अगदी रुक्ष होता. या जागेत बगीचा लावून सुशोभित करण्याची कल्पना जवाहरला नेहरुंनी सुचविली. तुरुंग अधिक्षकाला विनंती करून पुण्याहून बिया मागविण्यात आल्या व तीस-चाळीस प्रकारच्या फुलझाडांची लागवड केली. वाफे घालून दररोज पाणी दिले जाऊ लागले. फुले उमलू लागल्यावर तुरुंगातले हे अंगण सौंदर्याचे व प्रसन्नतेचे आगर भासू लागले. (आझाद, १९६१, पृ. ८७) देवगिरीकरांनी त्यांच्या 'राजकीय आठवणी'त तुरुंगातले दिवस कसे जात याविषयीची टिपणे दिली आहेत. तुरुंगातल्या जीवनाला सभा, चर्चा, भांडणे, सुतकताई, गप्पा असे निरनिराळे पैलू असत. येरवड्याच्या तुरुंगात देवगिरीकरांनी फिलिपाईन्स, कोरिया आणि आयर्लंडच्या स्वातंत्र्यासंबंधी व्याख्याने दिली. डी. व्हॅलेराने आपल्या दोस्तांना मदत करून त्यांना तुरुंगातून कसे पळून जावयास लावले याचा इतिहास सांगितला. देवगिरीकरांचे हे व्याख्यान संपल्यानंतर अलार्म बेल वाजू लागली आणि जेलच्या शिपायांचे जथेच्या जथे आत घुसले. संध्याकाळच्या अंधारात सोलापूरचे छन्नूसिंग व विभूते, साताराचे किसन वीर व पुण्याचे बलदेवप्रसाद हे चौघेजण शिड्या लावून तुरुंगाच्या भिंतीवरून पसार झाले होते.(देवगिरीकर, १९६५, पृ. १३२-१३३)

व्याख्यानांखेरीज तुरुंगात नवी भाषा शिकण्याचाही उपक्रम चालत असे. आचार्य भागवत तुरुंगात बंगाली भाषा व वाङ्मयाचे वर्ग घेत. बंगालीचे मराठीत व मराठीचे बंगालीत भाषांतर करण्याचेही काम चाले. देवगिरीकरांनी मूळ बंगालीतल्या 'गीतांजली'चे मराठीत भाषांतर केले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९४१ साली निजामाबाद तुरुंगात राजबंदी असताना उपनिषदे वाचली. आध्यात्म साधनेबरोबरच 'अलिफ बे' पासून आरंभ करुन उर्दू शिकण्याचा संकल्प पूर्ण केला. (तीर्थ रामानंद, १९७६, पृ.१२१ )

कुलाबा जिल्ह्यातल्या भाऊसाहेब राऊतांनी येरवड्याच्या तुरुंगात गणपती बसवला, रोज आरती करीत , शेवटच्या दिवशी बाहेर गणेशशास्त्री होते, त्यांच्या मदतीने बुंदीचे लाडू करवून आले व तुरुंगातील कैद्यांना लाडवांचे जेवण दिले. (देवगिरीकर, कित्ता, पृ. ३३) नाशिकच्या तुरुंगात तीन पाकगृहे होती. एक महाराष्ट्राचे, एक गुजरातचे व एक सर्वांचे. तिसऱ्या पाकगृहाची व्यवस्था पुण्याचे तात्यासाहेब देशपांडे, वांदऱ्याचे माधवराव देशपांडे व मंत्री शांतिलाल शाह यांच्याकडे असे. तुरुंगातले ४०/४५ जण तरी सूपशास्त्रात तज्ज्ञ होते. बाळासाहेब खेर, दिनकरभाई देसाई हे पुढारी आपण सूपशास्त्रात प्रवीण असल्याचे सिद्ध करण्याकरिता रविवारी कढी-खिचडी करीत. मुंबईचे शर्मा चिंच-गूळ मसाला बरोबर पडला की नाही हे पाहत. ते गुजराती पद्धतीचे खमण व पात्रा (अळूवड्या) करीत. साने गुरुजींना सूपशास्त्रात गती होती. ते कडबू उत्तम तळत. देवगिरीकरांना केशरी भात उत्तम करता येत असे. (देवगिरीकर, १९६५, पृ. १४०-१४१)

नाशिकचा तुरुंग हा काळ्या टोपीवाल्यांचा म्हणजे सतत गुन्हे करणाऱ्यांचा तुरुंग होता. मात्र या तुरुंगात बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, ज. स. करंदीकर, अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे इत्यादी राजकीय पुढारीही स्थानबद्ध झाले होते. नाशिक जेलमध्ये समाजवादी पक्षाच्या स्थापनेची पूर्वतयारी झाली.

रत्नागिरीचा तुरुंग ही एक हत्तीची पागा होती. त्या लहानशा जागेत १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात ४०० कैदी ठेवण्यात आले होते. तेथे मोरी, शौचकूप नव्हते. पावसाळ्यात जमिनीखालून पाण्याचे उबळ येत व तुरुंगात पाण्याचे पाट वहात. ते टाळण्याकरिता रात्री बिछाने हलवावे लागत. अशा तुरुंगात हे राजबंदी वेताच्या खुर्च्या विणीत, इलेस्ट्रेड विकलीतली शब्दकोडी सोडवीत, जागतिक इतिहासावर व्याख्याने होत. (देवगिरीकर, १९६१, पृ. ४५-४६) कऱ्हाडच्या तुरुंगात ढेकणांचा उपद्रव होता. देवगिरीकरांनी कऱ्हाडच्या कच्च्या कैदखान्यातला त्यांचा अनुभव कथन करताना लिहिले आहे की, "इंजेक्शनच्या नळीत डॉक्टर जशी लस खेचून घेतात, तसे ते ढेकूण शीर्षासन करुन माझ्यातील रक्त शोषून घेऊ लागले. मला अंथरुणावर पडणे अशक्य झाले. मी गजाजवळ येऊन उभा राहिलो. पण तेथेही ढेकूण मला सोडीनात. पायावर, अंगावर, डोक्यावर चढून ते आपली रक्तपिपासा शमवीत होते.. पोलिसांना न भिणाऱ्या मला ढेकणांनी मात्र धाबरविले. सकाळी प्रातर्विधीला नेण्याची कऱ्हाड तुरुंगात वेगळीच पद्धत होती. तिथल्या पोलिसाने सांगितले की, "आम्ही साऱ्या कैद्यांच्या दंडाला दोर बांधतो व त्यांना एकदमच शौचाला घेऊन रानात जात असतो." मानवतेची विटंबना असेच या प्रकाराचे वर्णन

करावे लागेल. (देवगिरीकर, १९६१, पृ. ७७-७९) खंडव्याला कैद्यांना शौचालयात एका मिनिटापेक्षा अधिक वेळ बसू दिले जात नव्हते. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास वॉर्डर कैद्यास शौचालयातून बाहेर खेचून काढत असे. नागपूरच्या तुरुंगात बंदीजनांना जमिनीवर गोणपाटावर झोपावे लागे. दळणावर बसल्यावर घाम येई, पण तो पुसण्यासाठी रूमाल वा फडके दिले जात नसे. (व्यास, २००१, पृ. ५६)

निझाम राजवटीत हैद्राबाद संस्थानातल्या तुरुंगात हिंदूंचे जानवे काढून टाकत. जानवे मिळेपर्यंत सत्याग्रही अन्नत्याग करीत, त्यामुळे तुरुंगाधिकाऱ्यांसमोर समस्या उभी राही. नवे जानवे घालण्यासाठी धार्मिक विधी करावा लागे. अशा वेळी उपाध्यायाची भूमिका तुरुंगातले राजबंदी रामानंद तीर्थ यांच्याकडे दिली जायची. सत्याग्रही गायत्री मंत्र म्हणताना मध्येच काही शब्द घालून बाहेरच्या घटनांची माहिती स्वामीजींना पुरवीत. सत्याग्रही तुरुंगात वंदे मातरम म्हणत; त्यावेळी त्यांना 'टिकाटिकी'ची शिक्षा म्हणजे शरीरातून रक्त वाहेपर्यंत छड्यांचा मार देण्याची शिक्षा दिली जात असे. (तीर्थ, १९७६, पृ. १००-१०१)

## १.१४. स्वातंत्र्यप्राप्ती व फाळणीचे राजकारण :

दुसरे महायुद्ध चालू असतानाच हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याच्या प्रश्नावरून व भारत-पाकिस्तान फाळणी टाळण्यासाठी म. गांधी व बॅ. जिना यांच्यात पत्रव्यवहार सुरु होता. १० जुलै १९४३ ला राजाजी यांनी हे ऐक्य घडून यावे यासाठी या दोन नेत्यांच्या विचारासाठी एक योजना सादर केली होती. या योजनेनुसार युद्धसमाप्तीनंतर मुसलमानांचे निर्विवाद बहुमत आहे, तिथे सलग प्रांतांची आखणी करण्याकरिता कमिशन नेमावे व अशा आखणी केलेल्या विभागात प्रौढ मतदान घेऊन मगच हिंदुस्थानच्या फाळणीचा निर्णय घ्यावा, असे सुचविण्यात आले होते. जर फाळणीचा निर्णय झाला तर लोकसंख्येची आदलाबदल स्वेच्छेने व्हावी; संरक्षण, दळणवळण, व्यापारधंदे याबाबत परस्परांत करारनामे करण्यात यावेत, असे राजाजींनी सुचविले होते. गांधी-जिना पत्रव्यवहारात राजाजींच्या तोडग्यावरही विचार झाला. या पत्रव्यवहारातून गांधीजी जिनांची मदत घेऊन प्रथम स्वातंत्र्यप्राप्ती करून घेऊ इच्छित होते. मुसलमानांचा हिंदू जमातीबद्दलचा अविश्वास काढून टाकण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. पाकिस्तानची कल्पना अव्यवहार्य असून त्यात देशाचा अध:पात आहे हे जिनांना समजावून सांगण्याचा प्रयत्न होता; आणि काहीही करून मुसलानांचे समाधन झालेच नाही, तर देशाची विभागणी करण्यास गांधीजी तयार होते; मात्र एका कुटुंबातील भावांप्रमाणे ही वाटणी सामंजस्याने व्हावी अशी गांधीजींची भूमिका होती. ११ सप्टेंबर १९४४ च्या पत्रात गांधीजींनी कायदेआझम जिना यांना लिहिले होते की, "हिंदुमुसलमानांची एकी हे माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे व तेच मला पाहिजे आहे. परंतु देशातील परकी सत्ता हाकून काढल्याखेरीज ती एकी होणे अशक्य आहे". मात्र जिना कुठल्याच तडजोडीला तयार नव्हते. इतकेच नाही तर जिनांनी १७ सप्टेंबर १९४४ च्या पत्राद्वारे गांधीजींना कळविले की, "आपण हिंदुंखेरीज इतर कोणाचेही प्रतिनिधी नाही. परंतु जोपर्यंत आपणांस आपल्या परिस्थितीची खरी जाणीव नाही, तोपर्यंत आपल्याबरोबर युक्तिवाद करणे व त्याहीपेक्षा आपले मतपरिवर्तन करणे कठीण आहे." अशा प्रकारे हा संवाद खुंटला.(दामले

माधव, १९४४)

इंग्रज सरकारने जवळजवळ युद्ध संपेपर्यंत काँग्रेसला बेकायदेशीर ठरविले. युद्ध संपल्यावर व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी १५ जून १९४५ रोजी राजबंद्यांची तुरुंगातून सुटका केली व काँग्रेस नेत्यांबरोबर चर्चा सुरू केल्या. जुलै १९४५ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीत मजूर पक्ष विजयी झाला आणि भारतातील स्वातंत्र्यासंबंधीच्या हालचालींचा वेग वाढला. शक्य तितक्या लवकर जबाबदार सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून भारतात सार्वत्रिक निवडणुका होतील, असे जाहीर करण्यात आले. डिसेंबर १९४५ मध्ये या निवडणुका झाल्या. सर्वसामान्य मतदारसंघांतल्या बहुतेक जागा काँग्रेसने जिंकल्या व ९० टक्क्यांहून अधिक मते मिळवली; तर मुसलमान मतदारसंघांतील सर्व ३० राखीव जागा मुस्लिम लीगने ८९ टक्के मते मिळवून जिंकल्या. मुंबई प्रांतात काँग्रेसने उभे केलेले सर्व ७१ उमेदवार निवडून आले. हरिजनांसाठी राखीव असलेल्या सर्व जागाही काँग्रेसने जिंकल्या. मध्यवर्ती कायदेमंडळावर काकासाहेब गाडगीळ व भाऊसाहेब हिरे निवडून गेले. 'मध्यप्रांत-वऱ्हाडा'त ११२ पैकी ९४ जागा काँग्रेसला मिळाल्या. २७ एप्रिल १९४६ रोजी पं. रविशंकर शुक्ल यांनी आपले मंत्रिमंडळ बनवले. पं. द्वारकाप्रसाद मिश्र, डी. के. मेहता, संभाजीराव गोखले, आर. के. पाटील, पी. के. देशमुख, डॉ. बारलिंगे व डॉ. एम. हसन यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले. विदर्भातल्या मंत्रिमंडळाने आपल्या प्रांतातील सर्व राजबंद्यांची मुक्तता करण्याचा पहिला निर्णय घेऊन कामाची सुरुवात केली. (वक्काणी, २००३, पृ. १६०)

दरम्यान १९ ते २२ फेब्रुवारी १९४६ या काळात मुंबई व कराची येथील नौदलातील सैनिकांनी बंड केले. सेनादल इंग्रजांशी एकनिष्ठ राहू शकत नसल्याचे सरकारच्या लक्षात आले. त्यानंतर १७ मार्च १९४६ रोजी लंडनच्या पार्लमेंटमध्ये पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी भारतीयांचा स्वयंनिर्णयाचा व स्वतःची घटना बनविण्याचा हक्क आम्हाला मान्य असल्याचे निवेदन केले व तीन मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात पाठविण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए. व्ही. अलेक्झांडर या तीन मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यांनी भारतातील निरनिराळ्या पक्षाच्या पुढाऱ्यांशी चर्चा केल्या. मौलाना आझाद यांनी १५ एप्रिल १९४६ रोजी एका जाहीर निवेदनाद्वारे पाकिस्तानची निर्मिती मुसलमानांच्या हिताची नसल्याचे मत व्यक्त केले. शिष्टमंडळाने सिमला येथे काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या पुढाऱ्यांबरोबर दीर्घ चर्चा केली. मात्र कुठलेही मतैक्य होत नाही, असे दिसून आल्यावर १६ मे १९४६ रोजी या त्रिमंत्रिमंडळाने आपली योजना जाहीर केली. या योजनेनुसार,

१. ब्रिटिश हिंदुस्थान आणि हिंदी संस्थाने यांचे मिळून एक संघराज्य भारतामध्ये निर्माण करण्यात यावे. या संघराज्याकडे परराष्ट्रव्यवहार, संरक्षण, दळणवळण ही खाती राहतील; व अन्य सर्व विषय प्रांतांकडे राहतील.
२. प्रांतांना स्वतःची मंत्रिमंडळे व कायदेमंडळे निर्माण करता येतील. प्रांतांचे कोणते अधिकार कोणत्या गटाकडे असावेत, हे ठरविण्याचे त्यांना स्वातंत्र्य असेल.

३. संघराज्यातील प्रांतरचनेचे ३ गट असतील :

अ गट : मद्रास, मुंबई, संयुक्त प्रांत, बिहार, मध्य प्रांत व ओरिसा.

ब गट : पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध

क गट : बंगाल व आसाम

घटनासमितीवरील प्रांतांचे प्रतिनिधी त्या त्या प्रांतांचे वा गटांचे संविधान ठरवतील

४. हे प्रतिनिधी गट समित्यांकडून भारतीय घटनासमितीमध्ये राष्ट्रीय संविधान करण्यासाठी येतील.

जून १९४६ अखेर काँग्रेस व मुस्लिम लीग यांनी ही योजना स्वीकारली व जुलै अखेर घटनासमितीची निवड करण्याची कारवाई पूर्ण झाली. मात्र मुस्लिम लीगने अचानक घटनासमितीवर बहिष्कार टाकला. १६ ऑगस्ट १९४६ हा 'प्रत्यक्ष कृती दिवस' म्हणून जाहीर करण्यात आला. या दिवशी बंगालमध्ये जातीय दंगली झाल्या. पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत, बंगाल, बिहार, दिल्ली व आसाम या भागांत कमीजास्त प्रमाणात हीच परिस्थिती होती.

## अंतरिम सरकार व स्वातंत्र्यप्राप्ती :

२ सप्टेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. तेव्हा मुंबईत दंगल सुरू होती. १० सप्टेंबरपर्यंत मुंबई दंगलीत २०० लोक ठार झाले होते. तशात मुस्लिम लीगने सरकारात सामील होण्यास आधी नकार दिला व मात्र नंतर फेरविचार करून अंतरिम सरकारमध्ये सामील होण्यास संमती दिली. ९ डिसेंबर १९४६ रोजी घटनासमितीची पहिली बैठक झाली, त्यात मुस्लिम लीगचे प्रतिनिधी गैरहजर राहिले. मुस्लीम लीगचा बहिष्कार चालू असतानाच १३ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषदेने स्वतंत्र सार्वभौम भारतीय गणराज्य स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला. ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी हिंदुस्थानातील बहुसंख्य लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीत घटनासमितीने तयार केलेले संविधान देशातील नाखूष भागावर लादले जाणार नाही असा खुलासा केला. भविष्यात अनेक तुकड्यांमध्ये देशाची विभागणी होण्याची शक्यता त्यात सुचविण्यात आली होती. यामुळे मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींना अनुपस्थित रहाण्यास अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहनच मिळाले.

२० फेब्रुवारी १९४७ रोजी ब्रिटिश सरकारने घोषणा केली की, 'जून १९४८ पूर्वी आपण आपली भारतातील सत्ता जबाबदार हिंदी लोकांच्या स्वाधीन करू'. त्यानंतर लगेचच मार्च महिन्यात लॉर्ड वेव्हेल यांच्याजागी लॉर्ड माउंटबॅटन यांची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांच्यावर ह्या सत्तांतराची जबाबदारी सोपविण्यात आली. माउंटबॅटन यांनी भारतात येताच काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या प्रतिनिधींमध्ये तडजोड होऊ शकते का, याची चाचपणी केली व मे महिन्यात लंडनला जाऊन ब्रिटिश सरकारशी सल्लामसलत करून ३ जून १९४७ रोजी एक योजना जाहीर केली. या योजनेनुसार ब्रिटिश सरकार भारतामध्ये एक किंवा दोन सरकारांकडे सत्तांतर करील व त्यासाठी जुलैमध्येच ब्रिटिश पार्लमेंटमध्ये विधेयक मांडणार असल्याचे जाहीर करण्यात आले. ह्या नव्या सरकारांचा दर्जा वसाहतीच्या स्वराज्याचा राहील आणि त्यांना आपापसांतील व ब्रिटिश राष्ट्रकुलातील इतर सभासदांबरोबरचे संबंध ठरविण्याचे

पूर्ण स्वातंत्र्य राहील. दरम्यान घटनासमितीचे काम चालू राहील व या समितीने केलेले संविधान देशातील ज्या भागांना अमान्य असेल, त्यांना त्यांची स्वतंत्र घटनासमिती बनविण्याचा हक्क राहील.

माउंटबॅटन योजना जाहीर झाल्यानंतर राजकीय प्रक्रियांना वेग आला व एक महिन्यात देशाची फाळणी करण्याचे ठरले. पंजाब व बंगाल या प्रांतांची फाळणी करून आसामातील सिल्हेट जिल्हा पूर्व बंगालला जोडण्याचे निश्चित झाले. त्यातून भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्याच्या योजनेला अंतिम रूप दिले गेले. ब्रिटिश सरकारने जुलै १९४७ मध्ये हिंदी स्वातंत्र्याचे विधेयक मांडून त्यांच्या संसदेत ते मंजूरही करवून घेतले. फाळणीच्या विधेयकाच्या वार्ता जनमानसात पोहचल्यावर त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटू लागली. अशा प्रतिक्रियांबाबतची एक प्रातिनिधिक नोंद प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दीनानाथ कामत यांनी कथन केली आहे: "फाळणीनंतर मुंबईत जे दंगे सुरू झाले ते कुणी सुरू केले असं सांगता येणार नाही. पण एकीकडे जिनांनी १६ ऑगस्ट १९४५ला 'ब्लॅक डे'चा आदेश दिला, त्याचा प्रतिरोध म्हणून हिंदुमहासभा म्हणजे त्यांचे थत्ते आणि बडवे वगैरे जे पुढारी होते, ते लोकांना तापवत असत. म्हणजे दंगलीत हिंदू मारले गेले आहेत, बायकांवर बलात्कार होत आहेत, अमुक नि तमुक होत आहे असं सांगितल्यामुळे वातावरण तापत जाई. मग दंगेधोपे सुरू झाले. ४६च्या ऑगस्ट महिन्यापासून ते सत्तेचाळीसच्या जूनपर्यंत मुंबईमध्ये सर्व पक्षांनी म्हणजे काँग्रेस, कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचं आवाहन केलं. अगदी दंगे चालू असत तिथे जाऊन आवाहन करत. प्रभातफेऱ्या काढल्या. त्याच वेळी गांधीजींच्या उपोषणाच्या बातम्या यायला लागल्या. त्यांनी केलेली आवाहनं, या सगळ्यांचा परिणाम होऊन हळूहळू सगळं थांबत आलं. तेवढ्यात स्वातंत्र्याचा दिवस जवळ आला. लोकांमध्ये नवा हुरूप आला. चौदा ऑगस्टला रात्री सगळ्यांनी रेडिओवर भाषणं ऐकली. जवाहरलालजी आणि इतर सगळ्या राष्ट्रीय नेत्यांची. मग आम्ही ट्रॅमच्या टपावर नाचत नाचत कुलाब्यापर्यंत गेलो. सगळीकडे तेच चाललं होतं. दोन दिवस सगळे रस्त्यावर नाचगाणी करत, राष्ट्रीय गाणी म्हणत फिरत होते. हिंदू, मुस्लिम असं जे होतं ते सगळं नाहीसं झालं, स्वातंत्र्याच्या त्या एका माहोलमुळे." (आडारकर-मेनन, २००७, पृ. ७५)

१४ ऑगस्ट १९४७च्या मध्यरात्री व १५ ऑगस्टच्या उदयाला भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली. जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. महाराष्ट्रात स्वातंत्र्यदिन साजरा करताना लोकांच्या मनात कुठली भावना जागवली जात होती, याचा एक नमुना अहिल्या रांगणेकर यांच्या भगिनी कुसुम रणदिवे यांच्या मनोगतातून वाचता येतो : "१९४७ साली स्वातंत्र्यदिन साजरा झाला तेव्हा मी मुंबईत होते. रस्त्यारस्त्यांवर अमाप गर्दी लोटली होती. त्यात मुली होत्या, बायका होत्या. पण कुणी धक्के मारले नाही की वेडंवाकडं वागलं नाही. लोकांमध्ये उत्साह इतका होता की, ते अक्षरश: थरथरत होते. जोरजोरात घोषणा देत होते. 'वंदेमातरम्' गात होते. प्रत्येकाला असं वाटत होतं की, जणू आपलं शरीरच स्वतंत्र झालंय. पहाटेपर्यंत माणसं अशी गात, ओरडत फिरत होती. आपण ज्यासाठी लढलो ते प्रत्यक्ष

बघायला मिळालं आहे हे मोठं भाग्य वाटत होतं. आता हे मिळालेलं स्वातंत्र्य टिकवायचं तर पुढं काय करायला हवं याचाही विचार एकीकडे करत होतो. स्वतंत्र भारताबद्दल आमची खूप स्वप्नं होती, खूप अपेक्षा होत्या. स्त्रियांना त्यांचे हक्क मिळायला हवेत, मुलांसाठी शिक्षणाची सोय व्हायला हवी. अशा तऱ्हेचे प्रश्न स्वतंत्र देशात आपल्याला घ्यावे लागतील. त्यासाठी वाचन वाढवावं लागेल, साक्षरतेचं प्रमाण वाढवावं लागेल असं सगळं मनात होतं. आम्हाला असंही वाटत होतं की इथे कदाचित समाजवादी पद्धत येईल." (आडारकर-मेनन, २००७, पृ. ७४)

स्वातंत्र्य मिळाले त्याबरोबर देशातली सर्व संस्थानेही स्वतंत्र झाली. १९४५ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार हिंदी संस्थानांना त्यांचे भवितव्य ठरविण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते; त्यामुळे ते आपापली संस्थानातली राजेशाही पुढे चालवायला मोकळे होते. परंतु घटनासमितीचे काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुत्सद्देगिरी दाखवून जुनागढ, काश्मीर व हैदराबाद वगळता बहुसंख्य संस्थानांना भारतात विलीन करून घेतले. हिंदू बहुसंख्य असलेल्या जुनागढच्या नवाबाने पाकिस्तानमध्ये सामील होण्याचे ठरविले; परंतु स्थानिक जनतेने उठाव करून नवाबाला देशांतर करण्यास भाग पाडले. सरहद्दीपलीकडच्या टोळीवाल्यांनी काश्मीरवर हल्ला केल्याने राजा हरिसिंग याने भारताकडे मदतीची याचना केली व भारतात सामील होण्याचे ठरविले. हैदराबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याची निजामाची महत्त्वाकांक्षा होती; परंतु १९४८ च्या सप्टेंबरमध्ये पोलीस कारवाई करून हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

## फाळणीनंतरच्या घडामोडी :

भारत -पाक फाळणीला गांधीजींचे मुसलमानधार्जिणे धोरण जबाबदार होते, असा एक मतप्रवाह स्वातंत्र्योत्तर काळात पुढे येत होता. मात्र भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहता ह्या समजूतीत तथ्य नसल्याचे लक्षात येते. हिंदू-मुसलमान ऐक्यासाठीच आपल्या लोकनेत्यांनी प्रयत्न केल्याचे इतिहास सांगतो. न्या. रानडे यांनी अकबराच्या मार्गाने जाऊन हिंदू-मुस्लीम सलोखा निर्माण करण्यातच देशाचे हित असल्याचे सांगितले होते. औरंगजेबने केलेल्या चुका आपण टाळल्या पाहिजेत, असे रानड्यांचे मत होते. ना. गोखले यांनी मृत्यूपूर्वी सरकारला राजकीय सुधाणा सुचविणारे जे टिपण तयार केले होते, त्यातही हिंदू-मुस्लीम ऐक्याची योजना होती. लखनौ कराराच्या वेळी टिळकांनी परक्या सत्तेशी भांडण करताना आपण जातिभेद, धर्मभेद व इतर सर्व मतभेद मिटवून एक झाले पाहिजे, असे जाहीर आवाहन केले होते. इतकेच नाही तर मुसलमानांना अधिक हक्क मिळाले तरी आपली हरकत नसल्याचे टिळकांनी जाहीरपणे संगितले होते. हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या लोकमान्य टिळकांच्या विचारांना गांधीजींनी व्यापक पाया मिळवून दिला होता. अखंड भारत टिकविण्यासाठी वाटेल ते मोल देण्याची गांधीजींची तयारी होती. उलट फाळणीची बीजे ब्रिटिशांनीच भारतीयांच्या मनात रुजवली होती. १८८८ मध्ये लॉर्ड डफरीनने भारतात दोन राष्ट्रे आहेत; एक हिंदूंचे आणि दुसरे मुसलमानांचे असे सांगून एतद्देशीयांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. कर्झनने बंगालची फाळणी करताना हेच धोरण ठेवले होते. १९०९ साली राजकीय सुधारणांचा हप्ता देताना विभक्त

मतारसंघ स्थापन करण्याची ब्रिटिशांची नीती फाळणीच्या विचारांना पोषकच होती. जिनांची सुरुवातीची भूमिका व्यक्तिगत धर्म टिकवून समान नागरिकत्व वाढीला लावण्याची होती; परंतु १९४० साली मुस्लीम लीगने लाहोर अधिवेशात पाकिस्तानचा ठराव केला आणि फाळणीची बीजे घट्ट रोवली गेली.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली. ह्या फाळणीमुळे भारतात हिंदू-मुसलमानांत जातीय दंगली झाल्या. बंगालातले दंगे थांबावेत म्हणून गांधीजी नौखालीत दाखल झाले. तिथले वातावरण निवळल्यावर गांधीजी दिल्लीला आले. दिल्लीतही दंगल उसळली. दंगली थांबाव्यात व शहरात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून गांधीजींनी १३ जानेवारी १९४८ रोजी बेमुदत उपोषण सुरू केले. या उपोषणकाळात वल्लभभाई पटेल यांनी त्यांचे चिटणीस व्ही. शंकर यांच्या मार्फत गांधीजींना निरोप पाठवविला की, 'मी काय करू शकतो?' त्यावर गांधीजींनी पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्या, असे उत्तर दिले. फाळणी झाली तेव्हा रिझर्व्ह बँकेत ३७५ कोटी रुपये शिल्लक होते; त्यातले ७५ कोटी रुपये पाकिस्तानच्या वाट्याला आले होते. त्याचा पहिला हप्ता २० कोटी रुपयांचा तात्काळ दिला गेला होता. उरलेले ५५ कोटी भारत पाकिस्तानला देणे लागत होता. ६ जानेवारी १९४८ रोजी पाकिस्तान सरकारने हे ५५ कोटी रुपये त्वरित देण्याची मागणी केली. दरम्यान पाकिस्तानने टोळीवाल्यांमार्फत काश्मीरवर आक्रमण केल्याने काश्मिरचा प्रश्न सुटेपर्यंत पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यायचे नाहीत, अशी वल्लभभाई पटेल यांची भूमिका होती. उलट हे पैसे निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी वापरावेत, असा वल्लभभाईचा आग्रह होता. जवाहरलाल नेहरू यांनी २ जानेवारी १९४८ रोजी पत्रकार परिषदेत पाकिस्तानला ५ कोटी रुपये देण्याचे तूर्तास स्थगित केल्याचे जाहीर केले. करारप्रमाणे हे देणे देऊन व्यवहार पूर्ण करावा म्हणून गांधीजींनी वल्लभभाईंना पाकिस्तानचे ५५ कोटी रुपये देऊन टाका, असा निरोप पाठवला होता. ३० जानेवारी १९४८ रोजी झालेल्या गांधीहत्येमागे पाकिस्तानविषयी गांधीजींनी घेतलेल्या या झुकत्या भूमिकेविषयीचा राग असल्याचे म्हटले जाते; मात्र त्यात तथ्य नसल्याचे अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे.

दरम्यान दिल्लीतल्या जातीय दंगली शमाव्यात व सर्व जमातींनी शांतताभंग होणार नाही, असे आश्वासन द्यावे म्हणून गांधीजींनी १३ जानेवारी १९४८ रोजी उपोषण सुरू केले होते. गांधीजींनी उपोषण सोडावे म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली सर्व धर्मातील प्रमुखांचा समावेश असलेल्या १३० जणांची शांतता समिती संघटित करण्यात आली. गांधीजींनी उपोषण सोडण्यासाठी ७ अटी घातल्या होत्या त्या अशा :

१. हिंदू, मुस्लिम, शीख व इतर धर्मीयांनी दिल्लीत भावाभावाप्रमाणे व सौहार्दाने राहण्याची हमी द्यावी. मुसलमानांच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करण्याची प्रतिज्ञा घ्यावी व असे प्रकार दिल्लीत पुन्हा होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.

२. सालाबादाप्रमाणे याही वर्षी ख्वाजा कुतुबुद्दीन मझरा उरुस साजरा केला जावा.

३. सब्जीमंडी,करोलबाग,पहाडगंज व शहराच्या अन्य भागांत मुसलमानांना नित्याप्रमाणे

आपले दैनंदिन व्यवहार पार पाडता यावेत.

४. ज्या मशिदींचा हिंदू व शिखांनी ताबा घेतला आहे, त्या त्वरित मुसलमानांच्या स्वाधीन कराव्यात.

५. दिल्ली सोडून गेलेल्या स्थलांतरित मुसलमानांना परत दिल्लीत येऊन व्यवसाय व रोजगार करण्यास प्रतिबंध केला जाऊ नये.

६. शांतता प्रस्थापनेचे काम लोकांनी करावे, पोलीस वा लष्कराची मदत घेऊ नये.

७. परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करावे.

या सातही अटी मान्य करून समितीने आपल्यावर विश्वास ठेवावा व उपोषण मागे घ्यावे अशी विनंती केल्यानंतर गांधीजींनी १८ जानेवारीस उपोषण सोडले. या सात अटीत कुठेही पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याची अट घातलेली नव्हती. (जगन फडणीस, १९९४, पृ. ३४-३५)

## १.१५. गांधीजींची हत्या :

गांधीजींच्या हत्येपूर्वी त्यांना मारण्याचे चार वेळा प्रयत्न झाले होते,तेही महाराष्ट्रातूनच. गांधीजींच्या नेतृत्वामुळे सर्व धर्म, जाती, पंथांची सत्ता येईल व सत्ताकारणातील ब्राह्मणांचा वाटा घसरेल या भीतीने पछाडलेल्या मुठभर ब्राह्मणांच्या अविवेकी, उताळेपणातून हत्येचा मार्ग निवडला गेला असावा, अशी एक सर्वसाधारण समजूत आहे. २५ जून १९३४ रोजी गांधीजींना त्यांच्या हरिजन उद्धाराच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पुण्याच्या नगरपालिकेच्या सभागृहात मानपत्र देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गांधीजी या कार्यक्रमास निघाले असता त्यांच्या गाडीवर बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न झाला. मात्र गांधीजी पाठीमागच्या मोटारीत बसले होते, त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. या हल्ल्यात ल. ब. भोपटकर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, दोन पोलीस मिळून सात जण जखमी झाले. या हल्ल्यावर आपली प्रतिक्रिया देताना गांधीजी म्हणाले होते, "हरिजन कार्याकरिता आलो असता ही घटना घडावी हे दुर्दैवी आहे. हुतात्मा बनण्याची माझी इच्छा नाही, पण तशी वेळ आलीच तर त्यालाही माझी तयारी आहे." गांधीजी या हल्ल्यातून बचावले म्हणून देशवासीयांनी ईश्वराची प्रार्थना करावी, असे आवाहन जमनालाल बजाज यांनी केले. १५ जुलै १९३४ रोजी ठिकठिकाणी प्रार्थना सभा झाल्या. या घटनेनंतर १९४४ साली पाचगणी येथे नथुराम गोडसेने सुरा घेऊन गांधीजींच्या अंगावर जाण्याचा प्रयत्न केला. पुण्याचे मणिशंकर पुरोहित यांनी त्यावेळी गोडसेला पकडल्याचे स्वत: मणिशंकरांनीच न्या. कपूर आयोगापुढे साक्ष देताना सांगितले होते. २९ जून १९४६ रोजी गांधीजी मुंबईहून पुण्यास रेल्वेने येत असताना रेल्वेमार्गावर दरडी टाकून अपघात घडविण्याचा प्रयत्न झाला; मात्र इंजीन ड्राव्हरच्या प्रसंगावधानाने अपघात टळला. २० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींच्या प्रार्थना सभेत बॉम्बस्फोट करून गांधीजींना ठार मारण्याचा प्रयत्न झाला होता. (फडणीस जगन, १९९४,पृ.६२-७४)

३० जानेवारी १९४८ रोजी म.गांधींची हत्या झाली. या हत्येमागे असलेला नथूराम गोडसे हा मराठी माणूस होता. नथूराम गोडसे यांनी गांधीजींच्या हत्येचे समर्थन करताना

विश्वकल्याणासाठी श्रीकृष्णाने शिशुपालाचा, श्रीरामाने रावणाचा व शिवाजी महाराजांनी जसा अफझलखानाचा वध केला तसा आपण गांधीजींचा वध केला असल्याने हे पापकृत्य नाही असे म्हटले होते. गांधीजींच्या हत्येनंतर अनेकांनी पेढे वाटून आसुरी आनंदही व्यक्त केला होता. नेहरूंनी 'गांधीजींचा खून हे एकट्यादुकट्याचे काम नसून तो मुख्यत: रा. स्व. संघाने आयोजित केलेल्या व्यापक मोहिमेचा भाग आहे" असा निष्कर्ष काढला होता. (फडके, २००७, पृ. ६९, ७६)

या भीषण हत्येने जवाहरलालांना फार धक्का बसला.'आपल्या जीवनातील प्रकाश हरपला' असे करुण उद्‌गार त्यांनी काढले. ३० जानेवारी १९४८ ला गांधीजींची हत्या झाल्यानंतर रात्री ८ वाजता जवाहरलाल नेहरू यांचे राष्ट्राला उद्देशून भाषण झाले. त्यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. त्र्यं. र. देवगिरीकर ह्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्यात काय घडले याचा प्रत्यक्षदर्शी वृत्तांत त्यांच्या 'राजकीय आठवणी'त नोंदवला आहे :

"आता ब्राह्मणांची घरे जाळली तर आम्ही ती आग थांबवणार नाही, असे काही जण बोलू लागले. .. मला कळले की, रातोरात कोणती घरे जाळावी याची यादीही तयार झाली होती. सकाळ होताच पुण्यात ट्रक्स हिंडू लागल्या व जाळपोळ सुरू झाली. मी तसाच एकटा कलेक्टर कचेरीत गेलो. एस. जी. बर्वे त्या वेळी पुण्याचे कलेक्टर होते. त्यांनी आपल्यासमोर पुण्याचा पेठवार नकाशा पसरला होता व जळत असलेल्या विभागावर तांबड्या पिन्स लावण्याचे काम चालू केले होते. .. ते कर्फ्यू लावण्याच्या विचारात होते व मुंबईहून हुकूम येण्याची वाट पहात होते. त्यांच्याकडे मिनिटा मिनिटाला आगीच्या बातम्या येत होत्या. .. मी भिकारदास मारुतीच्या पिछाडीला राहत होतो. माझ्या समोर आर. एस. एस. ची मुख्य कचेरी होती. ती पेटविली होती. ज्वाळा निघत होत्या. आगीचे बंब येऊच देत नसत. पोलिसही त्या आगीत काही हालचाल करीत नव्हते. हजारो लोकांचा जमाव तेथे जमला. पलीकडे गोडसेच्या भावाचा एक कारखाना होता, तो जळून खाक झाला. अनाथ विद्यार्थी गृहाचा काही भाग जाळला. लोकांची गर्दी हटविण्यासाठी भिकारदास मारुती रस्त्यावर पोलीस तुकडी आली... काँग्रेसचे पुढारी पारावर उभे राहून लोकांना पांगण्यास सांगत होते, पण त्याचा उपयोग झाला नाही. .. मोटर ट्रक्स आगी पेटवीत चालल्याच होत्या. त्या आगी हिंदुसभा, आर. एस. एस. यांच्या घरांना त्यांना लावायच्या होत्या. केसरी कचेरीवरही त्यांचा मोर्चा गेला होता. पण श्रीमती डॉ. निंबकर या मद्रासकडील एका काँग्रेस सेविकेच्या प्रयत्नाने ती आग थांबली. लहानमोठ्या पाचपन्नास तरी आगी त्या चार-सहा तासांत लावल्या गेल्या... अखेरीस कर्फ्यु लावण्याचे ठरले... पुण्याच्या रस्त्यांवर भीषण शांतता पसरली. लष्कर व पोलीस रस्त्यातून गस्त घालीत होते.. दुसऱ्या दिवशी शहराच्या पूर्व भागातली कर्फ्यू उठवली होती.. लवकरच तेथील ब्राह्मणांच्या घरावर लोकांचे लोंढे लोटू लागले व आगी लागू लागल्या. .. त्याही भागात कर्फ्यू लावली गेली. सारे पुणे शहर भर दुपारी निर्मनुष्य झाले. रस्त्यांतून गाईगुरे हिंडत होती व कुत्री भुंकत होती. बरेच दिवस पुण्यात कर्फ्यू होता." (देवगिरीकर, १९६५, पृ. १५२-१५४)

मुंबईत हिंदुमहासभेचे सदस्य रहात असलेल्या चाळीत जाळपोळ करण्यात आली,

प्रार्थनासमाजाजवळच्या ब्राह्मणसभेचे दरवाजे तोडून तेथील घड्याळे दगड घालून फोडण्यात आली. कोल्हापूरला रा. स्व. संघाचे कार्यालय आणि मंगळवार पेठेतील हिंदुसभेचे कार्यालय उद्ध्वस्त करण्यात आले. भालजी पेंढरकरांचा प्रभाकर स्टुडिओ आणि लीलाबाई पेंढरकरांचा बंगला जाळण्यात आला. अहमदनगरला हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांची घरे पेटवण्यासाठी जमाव सरसावला, त्यात नानासाहेब सप्तर्षी वकिलांचा वाडा जाळायला आलेल्या जमावासमोर सेनापती बापटांनी "वाडा जाळण्यापूर्वी तुम्हाला माझे प्रेत ओलांडून जावे लागेल" असे सांगितल्याने संपप्त जमाव परत गेला. जाळपोळीच्या या घटनांमध्ये झुंडीच्या मानसशास्त्राप्रमाणे जमावाने विवेक गमावला होता. गांधीवादी असूनही केवळ ब्राह्मण असल्याने नागपूरात दादा धर्माधिकाऱ्यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. नाना पाटलांच्या प्रतिसरकार चळवळीत सक्रिय असलेले तासगाव तालुक्यातील चिखलगोटण गावचे गंगाधरराव चिटणवीस केवळ ब्राह्मण असल्याने जमावाने त्यांचाही वाडा जाळला. आजरे तालुक्यातील ४० खेड्यांपैकी आजरे गाव वगळता एकाही खेड्यात ब्राह्मणाचे घर शिल्लक राहिले नाही. बेळगाव जिल्ह्यातील तेरदाळ येथे ६ ब्राह्मणांना जाळून ठार मारण्यात आले. सातारा जिल्ह्यात आणि औंध संस्थानात वाई, कोरेगाव, खानापूर, खटाव, तासगाव, वाळवे, पाटण, कऱ्हाड इत्यादी ३२० गावात जाळपोळ, लुटालुटीच्या घटना घडल्या. ९३९ घरे पेटवून देण्यात आली. कोल्हापूर संस्थानात ४३७ गावात ९९८ घरे आणि बेळगाव जिल्ह्यात १२५ गावात ५५२ जाळली अथवा लुटली गेली. विदर्भात नागपूरला 'तरुण भारत' चे कार्यालय व ग. त्र्यं. माडखोलकरांचे निवासस्थान जाळण्यात आले. या जाळपोळीत व लुटालुटीत ब्राह्मणांना वाचविण्यासाठी ब्राह्मणेतर पुढारी पुढे सरसावले. नाना पाटील यांनी आपल्या गावरान शैलीत खेड्यातल्या लोकांची कानउघाडणी करताना सांगितलं होतं की, "(औंधच्या) महाराजांनी आम्हाला फरारी असताना लपवलं. त्याचं पांग फेडताय काय भडव्यानू? आता घरं जाळून बघा. मला नाना पातील म्हणत्यात. इंग्रजांना घाबरलो न्हाई. तुमच्यासारख्यांची काय कथा? बऱ्या बोलानं लुटलेला माल चावडीवर आणून टाका." नानांच्या धाकाने अनेकांनी लुटलेला माल चावडीवर आणून टाकला.कर्मवीर भाऊराव पाटलांनी साताऱ्च्या सभेत केलेल्या भाषणातून 'महाराष्ट्रातील ब्राह्मणांचे रक्षण करणारा खरा बहुजनसमाजच असल्याचे' जाहीरपणे सांगितले. साररूपाने सांगायचे तर "जसा प्रत्येक ब्राह्मण नथुरामाप्रमाणे खुनी नव्हता तसाच ब्राह्मणांची घरे जाळणारा किंवा लुटणारा प्रत्येक मराठा गुन्हेगार नव्हता." (फडके, २००७, पृ. ७८-८९)

"ब्राह्मणांचे रक्त सांडून गांधीहत्येचे तर्पण होणार असेल तर धर्माधिकारींचे रक्त सांडून त्याचा शुभारंभ करावा, अशी प्रतिक्रिया दादा धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. दादांनी व विमलाबाई देशपांडे यांनी आमदारकीचे राजीनामे दिले. मध्यप्रांताचे मंत्री रा. कृ. पाटील यांनीही मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता; पण मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांनी त्यांची समजूत काढून राजीनामा स्वीकारण्यास नकार दिला. गांधीहत्येच्या कटात सहभागी असलेल्या नथुराम गोडसे, गोपाळ गोडसे, आपटे, करकरे, परचुरे, मदनलाल पाहवा, शंकर किस्तय्या आणि स्वा. सावरकर या आठ जणांवर खटला दाखल झाला. १० फेब्रुवारी १९४९ रोजी न्या. आत्माचरण यांनी

खटल्याचा निकाल दिला, त्यात नथूराम गोडसे व आपटे यांना फाशीची शिक्षा झाली. करकरे, गोपाळ गोडसे, मदनलाल पाहवा, डॉ. परचुरे आणि शंकर किस्तय्या यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. स्वा. सावरकर यांना निर्दोष घोषित करण्यात आले. पुढे अपिलात गेल्यावर डॉ. परचुरे व शंकर किस्तय्या यांनाही दोषमुक्त ठरविण्यात आले. गांधीहत्येची ही प्रतिक्रिया पुढे बऱ्याच दिवसांनी थंडावली. गांधीहत्येनंतर ठिकठिकाणी झालेल्या जाळपोळीच्या प्रकरणातील संशयितांवरही खटले भरण्यात आले होते; परंतु मुंबई प्रांताच्या विधानपरिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण यांच्या सल्ल्यानुसार खेर मंत्रिमंडळाने जाळपोळ प्रकरणांतील पश्चाताप झालेल्यांना माफी देण्याचा निर्णय घेतला. गांधीहत्येनंतर निर्माण झालेले जातिद्वेषाचे वातावरण निवळण्यासाठी महाराष्ट्रातील जवळपास ८० पुढाऱ्यांच्या सहीने जनतेला शांततेचे आवाहन करण्यात आले. "महाराष्ट्रात बुद्धिभेद करण्याचे प्रयत्न चालू आहेत त्यापासून जनतेने सावध राहिले पाहिजे. आपल्या प्रांतात कोणी अराजक माजविण्याचा, बेशिस्त वर्तन करण्याचा, जातिद्वेष अगर वर्गद्वेष फुलविण्याचा प्रयत्न केला तर त्याला उघडपणे विरोध करण्याची वेळ आता आली आहे .." अशा आशयाचे हे पत्रक सर्वत्र पोहचविण्यात आले. गांधीजींच्या हत्येनंतर दिल्लीहून गांधी स्मारकाकरिता निधी गोळा करण्यासाठी देशभरात स्मारक कमिट्या स्थापन झाल्या. महाराष्ट्रात शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. समितीने महाराष्ट्रातून ३५ लाखांचा निधी जमा केला. सरदार पटेल यांनी कारखानदारांकडून निधीच्या रकमा घेऊ नका असे सांगितले होते; तरीही महाराष्ट्रातील कारखानदारांनी २५ लाख रुपये जमवले. असा एकूण ६० लाख रुपयांचा निधी महाराष्ट्रातून जमा झाला. (देवगिरीकर, १९६५, पृ. १५)

**गांधीजींचे राष्ट्रीय योगदान :**

गांधीजी हे सत्याचा शोध घेणारे एक प्रयोगशील व्यक्तिमत्व होते. राजकारण हा त्यांच्या लेखी सत्यापर्यंत पोहचण्याचा एक मार्ग होता. त्यामुळे 'गांधीवाद' नावाचा संप्रदाय घडविण्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. याबाबत त्यांनी 'हरिजन'च्या २८ मार्च १९३६ च्या अंकात लिहिले होते, "गांधीवाद नावाची कुठलीही गोष्ट अस्तित्वात नाही. मला माझा संप्रदाय होऊ द्यायचा नाही. .. मी शाश्वत सत्याचे मार्ग दैनंदिन जीवनात अवलंबू इच्छितो. दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी सत्याचे प्रयोग करू इच्छितो. त्यामुळे कुठला संप्रदाय निर्माण करण्याची माझी कल्पना नाही. माझी जी मतं तयार झाली आहेत किंवा ज्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे, ते अंतिम आहे, असे मी मानीत नाही. उद्या ते कदाचित बदलू शकतील. मला जगाला नवे असे काहीच शिकवायचे नाही. जे काही मी करतो आहे, ते सत्याचे प्रयोग आहेत आणि अहिंसेवर माझा विश्वास आहे."[११]

गांधीजींनी भारतीय राजकारणाला अहिंसा व सत्याग्रहाचे राजकीय तत्त्वज्ञान दिले. हिंसेच्या मार्गाने मिळवलेले स्वराज्य हे खरे स्वराज्य असणार नाही, हे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना बजावून सांगितले होते. महासत्तेशी लढताना आपल्या सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी लोकमानसातली भीती घालवली; त्यांना निर्भय बनवले. सत्याग्रह हे केवळ राजकीय दबावाचे वा अडवणुकीचे तंत्र नाही; शह-काटशहाची राजकीय खेळी करण्याचे ते साधन नाही याचे भान

जागवण्याचे काम त्यांनी केले. सत्याग्रह हा परिवर्तनाचा उत्तम मार्ग आहे, हे त्यांच्या राजकीय लढ्यामागचे मुख्य सूत्र होते. सत्याग्रहीने संवादासाठी तत्पर असले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. उभय पक्षांचे उन्नयन आणि मुक्ती हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट गांधीजींना अभिप्रेत होते. आत्मशुद्धीसाठी उपोषणाचा वापर त्यांनी केलाच, परंतु प्रतिपक्षाच्या हृदयपरिवर्तनावरही या अस्त्राचा प्रभाव पडत असे. हृदयपरिवर्तनासाठी 'conversion' हा अचूक शब्दप्रयोग ते करीत. इंग्रजांचे हृदयपरिवर्तन घडवून आणू असा त्यांचा विश्वास होता; आणि म्हणूनच 'मला माझ्या लोकांची सेवा करायची आहे, तशी ब्रिटिशांचीही करायची आहे' असे त्यांनी व्हाइसरॉय आयर्विन यांना लिहिलेल्या एका पत्रात म्हटले होते. 'साधनशुचिता'हा त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानातला कळीचा शब्द होता. राजकीय मतलब साधण्यासाठी साध्यसाधनविवेक बाजूला ठेवण्यास त्यांचा सक्त विरोध असे. अहिंसक प्रतिकाराची धार त्यामुळेच कायम राहिली.

सविनय कायदेभंग हा प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे, अशी लोकधारणा घडविण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी लोकांचे राजकीय शिक्षण व्हावे म्हणून गांधीजींनी सविनय कायदेभंगाची संकल्पना आणि कार्यपद्धती सुस्पष्ट केली होती. "सविनय कायदेभंग दडपून टाकणे म्हणजे विवेकाला बंदीत घालण्याचा प्रयत्न करणे होय. सविनय कायदेभंगाचा परिणाम शक्ती शुचिता वाढणे हाच होतो. सविनय प्रतिकारशस्त्रे कधीच वापरत नाही. म्हणून लोकमताला मान देण्यास राजी असणाऱ्या कोणत्याही सरकारला त्याचा उपद्रव नसतो. सुलतानी सरकारला मात्र त्याचे भय वाटते. कारण ज्या गोष्टीसाठी तो सरकारला विरोध करतो, त्यावर लोकमत केंद्रित करून तो त्या सरकारचा नाश घडवून आणतो. म्हणून जेव्हा एखादे सरकार बेकायदा वागते – याचाच अर्थ भ्रष्ट होते – तेव्हा सविनय कायदेभंग करणे हे पवित्र कार्य ठरते." (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड २२, पृ. १६८) गांधीजींच्या लेखी 'कायदेभंगा'पेक्षा 'सविनय' या विशेषणाला अधिक महत्त्व होते. सविनय कायदेभंग हा विनाशकारी विसंवाद नसून हे विकासाचे सुंदर लक्षण आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. विनय, शिस्त, विवेक, अहिंसा या मूल्यांवर अधिष्ठित कायदेभंग त्यांना अभिप्रेत होता. म्हणूनच कायदेभंग हा जीवनाचा जिवंत झरा असल्याचे त्यांनी म्हटले होते. (म. गांधींचे संकलित वाङ्मय खंड २२, पृ. १६२)

हिंदू तत्त्वज्ञानावर त्यांची श्रद्धा असली, तरी काँग्रेस ही केवळ हिंदूंची संघटना नसून सर्वजातीधर्मीय लोकांची राष्ट्रीय लोकसंघटना आहे, हे बिंबवण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. हिंदू-मुसलमान ऐक्याच्या प्रश्नात ब्रिटिशांची लुडबूड त्यांना नको होती. किंबहुना मुस्लीम लीगला सत्तेत सहभागी करून घेऊन अखंड भारताचे स्वातंत्र्याचे स्वप्नही त्यांनी पाहिले होते. त्यांना फाळणी मान्य नव्हती. राज्यसत्ता दुभंगली तरी हिंदू-मुसलमानांचे ऐक्य कायम राहिले पाहिजे असा ध्यास त्यांनी घेतला होता. केवळ सत्तापरिवर्तनासाठी राजकारण एवढेच त्यांच्या राजकारणाचे मर्यादित वर्तूळ नव्हते. "स्वराज्य म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटची उदार देणगी नव्हे; भारताच्या पूर्ण आत्माविष्काराची ती घोषणा असेल", (म. गांधींचे संकलित वाङ्मय खंड २२, पृ. १६६) असे त्यांनी जे म्हटले होते, त्यात त्यांना अभिप्रेत असलेल्या समग्र स्वराज्याची कल्पना अनुस्यूत होती. म्हणूनच स्वातंत्र्यलढ्यात सामाजिक मूल्यांची पेरणी करण्याला त्यांनी

अग्रस्थान दिले. स्त्रियांना राजकारणात स्थान देणे, अस्पृश्यानिवारण, दारूबंदी, ग्रामस्वच्छता, आर्थिक स्वावलंबन, साक्षरता, आहारशुद्धी ही समांतर कामे हा स्वराज्यसंपादनाच्या चळवळीचाच एक भाग आहे, अशी त्यांची धारणा होती. रचनात्मक कार्यक्रमांतून स्वराज्याची बांधणी करणे हे त्यांचे अंतिम राजकीय उद्दिष्ट होते. त्यामुळे आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचे सामाजिकीकरण करण्यासाठी त्यांनी थेट तळागाळातल्या जनतेशी संवाद साधला. भंग्यांच्या वस्तीत जाऊन राहिले. स्वत: पायखाने साफ केले. आश्रमात राहून संन्याशाचा आचारधर्म निभावला.

गांधीजींनी स्वराज्य प्राप्तीच्या राजकीय चळवळीला आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. धर्माशी राजकारण जोडल्याने राजकारणाचे उन्नयन करता येईल यावर त्यांचा विश्वास होता. माणसाच्या नैतिक व आध्यात्मिक प्रेरणांमुळे राजकारणातील स्वार्थ व संकुचित वृत्तीला पायबंद बसेल म्हणून राजकारणाच्या पाठीमागे आध्यात्मिक प्रेरणांचा मूलस्रोत उभा करण्यावर त्यांनी सातत्याने भर दिला. आत्मविश्वास, स्वत्वस्थापन व बंधुप्रेमाच्या आचारधर्मातून परस्परांविषयीचा विश्वास वाढविणे, स्वत:च्या व इतरांच्या हक्कांसाठी जागृती निर्माण करणे, परधर्मीयांविषयी प्रेमभावना जागविणे अशा प्रकारचा आचारधर्म रुजविण्यावर त्यांचा भर होता.

लोकचळवळीसाठी लागणारी ही आयुधे 'तपस्या' व आत्मत्यागा'च्या संकल्पनेचीच नवी रूपे असल्याचे सांगून त्यांनी या नव्या आयुधांशी असलेले आपले सांस्कृतिक नातेही लोकमनावर ठसविले. आत्मत्याग याचा अर्थ 'जुलूम करणाऱ्याला भिऊन त्याच्यापुढे गुढघे टेकणे नव्हे, तर जुलूम करणाऱ्याच्या इच्छेच्या विरोधात संपूर्ण आत्मिक बल पणाला लावणे अशी 'आत्मत्यागा'ची कर्मवादी व्याख्या त्यांनी केली. त्यांच्या राजकीय विचारात 'सत्ते'ला न्यूनतम स्थान होते; सत्तेचा विलय हीच त्यांची स्वराज्याची व सुराज्याची संकल्पना असल्याने जहाल व मवाळ राजकारणापेक्षा गांधीजींच्या राजकारणाचा विचारव्यूह पूर्णपणे स्वतंत्र होता, हे लक्षात घ्यावे लागते. राजाची सत्ता प्रजेत वाटली जाणे हा स्वातंत्र्याचा एक अर्थ होताच; परंतु केवळ राजकीय सत्तांतर होऊन एतद्देशीयांच्या हाती सत्तेचे सुकाणू येणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. स्वराज्याचा अर्थ आम्हाला सभ्य बनविणे अणि आमच्या सभ्यतेला अधिक शुद्ध व शक्तिशाली बनविणे या त्यांच्या विचारधारेमुळे 'स्वातंत्र्या'च्या संकल्पनेचा अधिक व्यापक विचार होऊ लागला.

गांधीजींनी 'माझ्या स्वप्नांचा भारत' या पुस्तिकेतून त्यांना अभिप्रेत असलेल्या भारताच्या राजकीय, सामाजिक, नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या पुनर्घटनेचे स्वप्नचित्र रेखाटले होते. गरिबातल्या गरीबालासुद्धा आपला वाटावा आणि ज्याच्या निर्मितीत त्याच्या मताला महत्त्व राहील असा भारत गांधीजींना निर्माण करावयाचा होता. जेथे उच्च आणि नीच असा वर्गभेद राहणार नाही, जेथे निरनिराळ्या पंथांमध्ये पूर्णपणे सामंजस्य राहील, जिथे अस्पृश्यता किंवा दारू वा इतर नशेच्या वस्तूंना स्थान राहणार नाही, स्त्री-पुरुषांना समान हक्क असतील, कुणी कोणाचे शोषण करणार नाही आणि कोणाकडून शोषण होऊही देणार नाही असा नवा भारत त्यांना निर्माण करावयाचा होता. अहिंसेच्या दैवी संपत्तीच्या साहाय्यानेच भारतवासी जनता हे

ध्येय साध्य करू शकेल असा विश्वासही त्यांनी या निरुपणातून व्यक्त केला होता. गांधीजींच्या नजरेत भारत ही भोगभूमी नसून कर्मभूमी आहे. पाश्चिमात्य संस्कृतीतील भोगसाधनांच्या कांचनमृगाकडे धावण्याऐवजी 'साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी' या जीवनसूत्राचा उद्घोष करण्यावर त्यांनी भर दिला. या विचारसरणीतून भारताची पुनर्घटना झाल्यास भारत जागतिक नकाशावर शांतिदूताची भूमिका निभावण्याइतका सक्षम होईल अशी गांधीजींची धारणा होती. मात्र त्यासाठी भारतवासीयांनी अंधविश्वास व भ्रमाची धूळ झटकून, विवेकशून्य विचारांचा संपूर्ण त्याग करून, तितिक्षा आणि तपस्येचे अग्निदिव्य करण्यासाठी सरसावले पाहिजे, असा संदेश त्यांनी या पुस्तिकेतून दिला आहे. अशा नवभारत निर्माणासाठी अहिंसा, सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग' ही चळवळीची अस्त्रे त्यांनी भारतवासीयांना पुरविली. खादी आणि ग्रामोद्योगाच्या जनचळवळीतून, बुनियादी शिक्षणप्रणालीतून ग्रामीण पुनर्रचनेचे नवे आयाम रचले. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्वच्छता, दारूबंदी, अंधश्रद्धानिर्मूलन या कृतिकार्यक्रमांतून सुशिक्षितांमध्ये बौद्धिक आणि आत्मिक जागरणाचे नवे पर्व सुरू झाले. भारताला शांतिमय मार्गानेच स्वातंत्र्यही मिळेल आणि शांतिमय मार्गानेच स्वत:चे शोषणही थांबवता येईल अशी धारणा रूजविण्याचे काम गांधीजींनी केले. रोमप्रमाणे भारताचे नवनिर्माण करण्यासाठी सुशिक्षितांमध्ये 'परिवर्तनवादी संप्रदाया'ची गुरुकुले निर्माण होऊ लागली. महाराष्ट्रात विनोबा भावे, संत तुकडोजी महाराज, साने गुरुजी यांची गुरूकुले आपापल्या पद्धतीने गांधीविचारधारा जनमानसात रूजविण्यासाठी लोकप्रबोधनाचा कृतिकार्यक्रम हाती घेऊन क्रियाशील झाली होती, ही या परिवर्तनवादी चळवळीचीच फलश्रुती होती. 'स्वराज्य'प्राप्तीचे ध्येय साध्य करतानाच 'सुराज्या'ची पायाभरणी करण्यावर भर देऊन संपूर्ण क्रांतीचा मार्ग प्रशस्त करणारी राजनीती गांधीजींनी भारतवासीयांना शिकविली, हे त्यांचे फार मोठे योगदान राहिले आहे.

पारंपरिक संज्ञांमध्ये नवा राजकीय आशय भरण्याची किमया गांधीजींना साध्य झाली होती. आत्मबळ आणि स्नायूबळ किंवा शस्त्रबळ यातला भेदही गांधीजींनी याच धारणेतून केला होता. त्यांनी म्हटले होते की, "आम्ही स्वत:ला निव्वळ शरीर मानतो आणि म्हणून आम्हाला शस्त्रास्त्रांची गरज वाटते; परंतु आपण शरीरे नसून आत्मा आहोत' हे लक्षात घेतले तर सर्व प्रकारच्या शारीरिक दुर्बलतेला ओलांडून आपण जगातील शारीरिक बेरजेला आव्हान देऊ शकतो"(माझ्या स्वप्नांचा भारत,२०१२,पृ.७). स्वराज्य म्हणजे आत्मशासन व आत्मसंयम अशी व्याख्या करून त्यांनी स्वराज्य हे आपल्या आंतरिक सामर्थ्याने मोठमोठ्या संकटांशी झुंजण्याच्या शक्तीवर अवलंबून असते हा विचार त्यांनी पुढे आणला. राजकारण लोकभाषेत मांडण्याची किमया गांधीजींना साध्य झाली होती. 'असहकार', 'सत्याग्रह', 'बहिष्कार', 'छोडो भारत', 'करेंगे या मरेंगे' अशा साध्या षडाक्षरी मंत्राप्रमाणे जनतेला संदेश देऊन कृतिप्रवण करण्याची किमया त्यांना साध्य झाली होती. उपास, सुतकताई, मिठाचा कायदेभंग, दुकाने बंद करणे, बंदी घातलेल्या वाङ्मयाची खुली विक्री करणे यासारख्या कार्यक्रमांतून सरकारविरोधी अहिंसक चळवळ करण्याचे हत्यार त्यांनी सामान्यजनांना उपलब्ध करून दिले. साध्या भूमिपुत्राला राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले, हे त्यांचे सर्वात मोठे योगदान आहे.

## गांधीजी आणि महाराष्ट्र :

महाराष्ट्राची भूमी ही गांधीजींच्या कर्तृत्वाला पोषक आणि प्रेरक होती. टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात म. गांधींचा उदय झाला. टिळकांच्या मृत्यूपूर्वी, म्हणजेच १९२० पूर्वी म. गांधींची ओळख दक्षिण आफ्रिकेचा पुढारी, शेतकरी व मळेवाल्या मजुरांविषयी सहानुभूती बाळगणारा सदाचरणी साधुपुरुष अशीच होती. १९१९ च्या अमृतसर काँग्रेसपर्यंत त्यांना बराचसा आदर मिळाला होता, पण अनुयायी मिळाले नव्हते. टिळकांच्या मृत्यूनंतर कलकत्ता काँग्रेसपासून त्यांना महत्त्व प्राप्त झाले. टिळकांनंतर त्यांचे अनुयायी स्वतःच्या जबाबदारीवर कोणतेही कार्य पुढे नेण्यास समर्थ नव्हते. केतकरांनी म्हटल्याप्रमाणे "लोकमान्यांचे अगदी निकटचे अनुयायी जन्मभर परतंत्र असल्यामुळे, जो कोणी पुढे येईल त्याचे उपहस्तक बनणे.. एवढ्यापुरतीच त्यांची तयारी असल्यामुळे म. गांधींना त्यांच्याकडून प्रतिकार झाला नाही, व नाखुषीने त्यांना गांधींचे अनुयायी व्हावे लागले." (केतकर,१९२६, पृ. ३४) १ डिसेंबर १९२१ रोजी अकोल्यास झालेल्या परिषदेत महाराष्ट्रातील बऱ्याचशा राजकारणी मंडळींचा म. गांधींना विरोध झाला. तथापि त्या विरोध करणाऱ्या मंडळीत.. आपला निराळा मार्ग निश्चयात्मक करण्याची धमक नव्हती. केतकरांचे यासंदर्भातले आणखी एक निरीक्षण बरेच बोलके आहे. अहमदाबाद काँग्रेसच्या अगोदर गांधीजींनी महाराष्ट्रीयांच्याविषयी स्तुतीपर भाषण केले. शिवाय अहमदाबादच्या व्यापाऱ्यांकडून नरसोपंत केळकरांना मानपत्र मिळवून दिले. तेव्हापासून महाराष्ट्रातल्या राजकारणी मंडळींचा गांधीविरोध वितळला. (केतकर, १९२६, पृ. ३८)

महाराष्ट्रातले नेमस्तांचे पुढारी गोपाळ कृष्ण गोखले यांना ते गुरू मानीत होते आणि गोखल्यांच्या सूचनेवरूनच त्यांनी भारतभ्रमण करून येथील परिस्थितीचा व लोकजीवनाचा जवळून अभ्यास केला. गोखल्यांच्या भारत सेवक समाजाच्या नैतिक व चारित्र्यसंपन्न अधिष्ठाचे तत्त्व आपल्या आश्रमात व राजकीय जीवनातही त्यांनी अनुसरले होते. त्यांच्या असहकाराच्या आंदोलनाचा प्रारंभ १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईतूनच झाला. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकांच्या नावाने स्वराज्यफंड उभारण्याची जबाबदारी स्वीकारून टिळकांचे राष्ट्रीय कार्य पुढे नेण्याचा संकल्पही त्यांनी पूर्ण केला होता. राष्ट्रीय सभेचे अधिवेशन खेड्यात व्हावे हे त्यांचे स्वप्नही १९३३ साली खानदेशात फैजपूरला अधिवेशन घेऊन महाराष्ट्राने पूर्ण केले होते. वर्ध्याला सेवाग्राम आश्रम ही त्यांची कर्मभूमी बनली होती. खादी-ग्रामोद्योगाचे व मूलोद्योग शिक्षणाचे प्रयोग वर्ध्यापासूनच सुरू झाले होते. विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, साने गुरुजी असा गांधीजींच्या अनुयायांचा मोठा वर्ग महाराष्ट्रात तयार झाला होता. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्याचा अखेरचा टप्पाही गांधीजींच्याच नेतृत्वाखाली मुंबईच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावापासून सुरू झाला होता.

महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीत लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांचा सर्वात मोठा वाटा राहिला आहे. टिळकांनी व गांधीजींनी परस्परविग्रहाचे राजकारण कधीच केले नाही; उलट चांगल्या कामाचे श्रेय देऊन एकमेकांची प्रशंसाच केली. गांधीजींच्या आफ्रिकेतल्या

ट्रान्सवाल चळवळीची टिळकांनी सुरत येथील कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी २३ डिसेंबर १९०७ रोजी झालेल्या जाहीर सभेत मुक्त कंठाने प्रशंसा केली. तर टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आल्यावर म. गांधींनी त्यांच्या 'यंग इंडिया'च्या १ ऑगस्टच्या अंकात 'महान टिळकांना शिक्षा' या शीर्षकाचा अग्रलेख लिहून त्यांच्या देशभक्तीची व त्यागाची प्रशंसा केली. गांधींनी या अग्रलेखात टिळकांपेक्षा आपली भूमिका काही बाबतीत वेगळी असली तरी टिळकांच्या कार्याचे मोल किती मोठे आहे हे आग्रहाने नमूद केले होते. टिळकांविषयी त्यांनी लिहिले होते की, "टिळकांचा मोठेपणा मान्य करणे याचा अर्थ त्यांचा मार्ग आंधळेपणाने स्वीकारणे नव्हे. त्यांचे लिखाण कडवट, टोकदार, झोंबणारे आहे आणि त्यातच त्यांचे सामर्थ्य आहे. ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध लोकांना उठवणारे आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांनी जे केले, ते त्यांच्या दृष्टीने योग्यच केले, असे म्हणायला हवे. त्यांच्या जागी आपण असतो, तरी हेच केले असते. तरीही टिळक अभिनंदनास पात्र आहेत. या क्लेशांमुळे टिळकांनी अमर कीर्ती तर मिळवलीच, पण भारताच्या स्वातंत्र्याचा पायाही घातला आहे. त्यांची ही शिक्षा पुढे वरदान शाबीत होणार आहे. म्हणून भारतीयांनी खचून न जाता उलट आनंद मानायला हवा." (मोरे सदानंद, २००७, पृ. ५२)

'लोकमान्य ते महात्मा' या द्विखंडात्मक ग्रंथात सदानंद मोरे यांनी टिळकांकडून गांधींकडे झालेल्या नेतृत्वांतराचा प्रवास महाराष्ट्राच्या भूमीत कसा झाला याचा साद्यंत वृत्तांत लिहिला आहे. त्यात त्यांना अमरावतीचे दादासाहेब खापर्डे आणि पुण्याचे न. चिं. केळकर यांचा अपवाद वगळता इतर बहुतांशी टिळक संप्रदायाच्या अनुयायांना टिळकांच्या राजकारणात आणि गांधींच्या राजकारणात व्यत्यास आढळला नाही. त्यामुळे टिळकांनंतर महाराष्ट्राने गांधींचे नेतृत्व निर्विवादपणे स्वीकारून व्यक्तिकेंद्री, जातिकेंद्री अथवा घराणेशाहीच्या राजकारणापेक्षा व्यापक राष्ट्रहिताच्या राजकारणाचा पुरस्कार करून महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची व्यापकताच सिद्ध केली. वि. वा. शिरवाडकर यांनी म्हटल्याप्रमाणे "राजकीयदृष्ट्या पुण्याचे 'नेटिव' राज्य संपुष्टात आलेले होते आणि साबरमतीच्या सुभेदारांचा अंमल सर्वत्र सुरू झालेला होता." (शिरवाडकर, २०००, पृ. ४४)

आचार्य अत्रे यांनी गांधीजी आणि टिळक या दोन विभूतींमधल्या साम्यभेदांची अचूक मीमांसा केली आहे. 'लोकमान्यांचे पुण्यस्मरण' या 'नवयुग' मधील अग्रलेखात अत्रे लिहितात, (२८ जुलै १९४६) "टिळक हे बुद्धिप्रधान, तर गांधी हे भावनाप्रधान! टिळक हे कर्कश आणि कठोर तर्कपंडित, तर गांधी हे श्रद्धेचा कान *'आतल्या आवाजा'*कडे देऊन बसलेले! ब्रिटिशांच्या न्यायावर व कायद्यांवर टिळकांचा पूर्ण विश्वास, तर गांधींचा त्यांच्यावर यत्किंचितही विश्वास नाही. इंग्रजांशी भांडून आणि झगडून जनतेने आपले हक्क त्यांच्याकडून हिसकावून घेतले पाहिजेत, हे टिळकांचे राजकारण, तर सैतानी सरकारशी असहकार करून त्याला शरण आणले पाहिजे हे गांधींचे राजकारण. 'शठं प्रतिशाठ्यं' या मार्गाचा राजकारणात अवलंब केला पाहिजे, असे टिळक म्हणतात, आणि सत्य व अहिंसा यांवरच राजकारणाचे अधिष्ठान असले पाहिजे असे गांधी म्हणतात. पण याचा अर्थ असा मुळीच नव्हे की, कसल्याही असत्याच्या किंवा

हिंसेच्या साधनाने आपले साध्य हस्तगत करणे ही गोष्ट टिळकांना पसंत होती. दहशतवादी हिंसेचा मार्ग टिळकांना मुळीच पसंत नव्हता, नि गांधीप्रमाणेच टिळकांच्या राजकारणाचे अधिष्ठानही शंभर टक्के सत्यावर होते... काँग्रेस या संस्थेबद्दल दोघांचीही निष्ठा जबरदस्त होती. हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य घडवून आणण्यासाठी मुसलमानांना वाटेल त्या सवलती दिल्या पाहिजेत, असे गांधींप्रमाणे टिळकांचेही मत होते. टिळकांचे स्वदेशीचे वेड गांधीजींच्या खादीच्या वेडाइतकेच जबरदस्त होते आणि मद्यपानबंदीबद्दल दोघांनाही मनातून विलक्षण आस्था होती. ..मिळेल ते खिशात टाकायचे आणि पुढच्यासाठी भांडायचे, ही टिळकांच्या 'प्रतियोगी सहकारिते'ची व्याख्या होती. याचा अर्थ असा नाही की, टिळकांना असहकार मान्य नव्हता. टिळकांचा 'बहिष्कार' आणि गांधींचा 'असहकार' यात मूलत: काहीच फरक नाही. सरकारवर बहिष्कार घातल्यावाचून किंवा सरकारशी काही बाबतीत असहकार केल्यावाचून जनतेच्या पदरात काहीही पडणार नाही, हे टिळक ओळखून होते. .. म्हणून टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकारणाचे खरे वारसदार महात्मा गांधी आणि काँग्रेस हीच ठरतात." (मोरे सदानंद,२००७, पृ. १०८४-१०८५)]

महाराष्ट्राच्या राजकारणाविषयी गांधीजींना आदर वाटत असे. दारूच्या दुकानांसमोर सत्याग्रह करण्यास सरकारने बंदी आणल्यावर पुण्यात न. चिं. केळकर यांनी हा बंदीहुकूम मोडून सत्याग्रह केला, या निर्धाराचे गांधीजींनी मुक्त शब्दांत कौतुक केले होते. बंदीहुकूम मोडून स्वत: केळकर, त्यांचा मुलगा, सर्वश्री भोपटकर, गोखले, परांजपे आणि इतर १६ जणांच्या तुकडीने सत्याग्रह केला. त्यांना अटक झाली.पण स्वयंसेवकांनी बचाव केला नाही. या अटकसत्राला न जुमानता नव्या नव्या तुकड्या नियमितपणे जात राहिल्या. याबाबत गांधीजींनी आपल्या टिपणांत लिहिले आहे की, "हाल भोगण्याचे बाबतीत महाराष्ट्र मागे कधीच पडणार नाही. भारतातील अत्यंत कणखर कार्यकर्त्यांचा संच महाराष्ट्रात आहे... पहिल्या दर्जाचे पुढारी अत्यंत मोठा धोका कसा पत्करीत आहेत, हे पाहण्यासारखे आहे." (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड २२, पृ. ८२) नवजीवनच्या अंकात त्यांनी पुणेकरांविषयी लिहिले होते, "पुण्यावर मी लुब्ध आहे. मी जेव्हा इंग्लंडहून परत आलो, तेव्हा १९१५ सालापासून मी त्यांचा गौरव करीत आलो आहे. पुण्याने केलेले स्वार्थत्याग ज्ञानमय असतात. विद्वत्तेच्या बाबतीत दुसऱ्या कोणत्याही शहराला पुण्याची सर येणार नाही. दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी पुण्याचा साधेपणा आणि पुण्याने स्वेच्छेने पत्करलेले दारिद्र्य आढळणार नाही... स्वार्थत्याग करण्याचे बाबतीत पुणे सर्वांवर ताण करील असे मला वाटते. श्री. नरसोपंत चिंतामण केळकर हे आपले कार्य दक्षतेने चालवीत आहेत. सरकारही त्यांची कसोटी चाणाक्षपणे पाहत आहे. दारू दुकानावरील निरोधनासाठी श्री. केळकरांनी आपले सर्व कुटुंब या कार्यासाठी बाहेर काढले आहे... आता महिला निरोधनासाठी पाठविल्या जात आहेत, खरोखर याचा मला हेवा वाटतो. या बाबतीत गुजराती महिला आघाडीवर राहतील, अशी मला आशा होती.. पुण्यातील महिलांनी आपल्या कृतीने अशी परिस्थिती निर्माण केल्याचे दिसते की, त्यामुळे सरकारने एक तर त्यांना पकडावे किंवा आपला कायदा रद्द करावा. सौ. केळकर, सौ. गोखले, श्री. गोखल्यांच्या भगिनी सौ. इंदुमती नाईक, सौ.

यशोदाबाई फडके आणि इतर चार महिला गुत्त्यांवर निरोधनास निघाल्या. त्यांना पोलिस ठाण्यावर नेण्यात आले आणि तेथे सोडण्यात आले. या निरोधामध्ये सक्तीची सावलीसुद्धा नव्हती, हे स्पष्ट आहे. त्याच्या परिणामामुळे गुत्ते बंद पडणार, हे निश्चित. पुण्याच्या स्त्रिया बुद्धिमान व दृढनिश्चयी आहेत. त्यांनी आरंभिलेल्या आंदोलनाचे फळ मिळेल, याविषयी मला शंका नाही... महाराष्ट्रातील योद्ध्यांनी अहिंसा मार्गाचा स्वीकार, एक व्यावहारिक धोरण म्हणून केला आहे... आणि जेथे अहिंसा, त्याग व ज्ञान यांचा संगम झाला असेल, तेथे विजयाशिवाय दुसरे फल पदरात पडणार नाही. आता पुण्याच्या महिलांशी चढाओढ करण्याचे काम गुजराती महिलांचे आहे. गुजरातचा पुरुषवर्ग पुण्याच्या त्यागाशी बरोबरी केव्हा करणार? त्याने त्यांच्या पावलावर पाऊल ठेवले, तरी मला संतोष होईल." (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड २२, पृ. २४३-२४४)

गांधीजींच्या व्यक्तिमत्वाने भारलेला हा कालखंड होता. संपूर्ण भारतावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक मंत्रभारीत प्रभाव होता. जनसामान्यांविषयीचे प्रेम व त्यांच्या जीवनोद्धारासाठी सातत्याने रचनात्मक कार्यक्रम रुजविण्याचा त्यांना ध्यास होता. ते केवळ ब्रिटिशांपासून भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्त मिळावे इतक्या मर्यादित अवकाशात काम करीत नव्हते. दरिद्री माणसाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटावा म्हणून खादी-ग्रामोद्यागाचा प्रकल्प, नैसर्गिक शेतीच्या प्रयोगांचा ध्यास, वंचित जनसमूहाला प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे म्हणून अस्पृश्यता निर्मूलन, ग्रामसफाईचे उपक्रम, प्रौढ व निरंतर शिक्षणाचे प्रयोग करणारा व्रती म्हणून लोकांमध्ये गांधीजींची एक पवित्र महात्मा म्हणून ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे महाराष्ट्रीय मनात जे स्थान निर्माण झाले होते, त्याचे मर्म विशद करताना ना. ग. गोरे यांनी त्यांच्या कारागृहाच्या दैनंदिनीत लिहिले होते की, गांधीजींजवळ प्रेमाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही साधन नव्हते. जनकल्याणाची अहर्निश तळमळ असणारा तो जनात्मा होता. "त्यांच्या बाबतीत 'स्वार्थ' हा शब्द देखील पार्थिव आहे, जड आहे, अशुद्ध व हिणकस आहे. त्याऐवजी 'कल्याण', 'मंगल' असा शब्द वापरावयास हवा. लोकांशी एकरूप झालेल्या या व्यक्तिमत्वाची वाणी ही 'अशरीरिणी वाणी' होती. 'उपनिषत्कालापासून अव्याहत चालत आलेल्या भारतीय संस्कृती-वेलीचे अत्यंत मधुर आणि पक्व फळ' अशा समर्पक शब्दात त्यांनी गांधीजींचे महात्म्य वर्णन केले होते. (गोरे,१९४५, पृ. २०८) महाराष्ट्राच्या संवेदनशील स्वभावात रुजलेल्या गांधीजींविषयीच्या श्रद्धाभावाचे हे प्रातिनिधिक उद्गार आहेत! मराठी संवेदनस्वभावावर गांधीजींच्या व्यक्तित्वाची व तत्त्वज्ञानाची छाप इतकी खोलवर रुजली होती की, महाराष्ट्रातल्या प्रतिभावान लेखकांच्या लेखनातून त्याचे पडसाद स्वाभाविकपणे उमटत होते. भा. वि. वरेरकर, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, वामनराव चोरघडे, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, बा. भ. बोरकर इत्यादी कितीतरी साहित्यिकांनी गांधीजींच्या तत्त्वांना व कार्याला वाङ्मयरूप दिले.

मात्र असे असले तरी गांधीजींचे नेतृत्व नि:संदिग्धपणे न स्वीकरणाराही एक वर्ग महाराष्ट्रात क्रियाशील होता. मुस्लीम लीगचे नेते बॅ. जिना, हिंदू महासभेचे नेते स्वा. सावरकर,

वंचित समाजाचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साम्यवादी पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे, रणदिवे यांचा त्यात समावेश होता. मात्र तरीही राष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतीत सहमतीची तडजोड करण्यास महाराष्ट्रातून गांधीजींना कडवा विरोध झाला नाही. दुर्दैवाने गांधीजींच्या जीवनाची अखेर मात्र एका मराठी माणसाच्याच हातून झाली.

गांधीजींच्या विभूतिमत्त्वाने भारलेली पिढी आणि गांधीजींच्या चळवळीचे विकृत आकलन करणारी पिढी असे दोन्ही प्रकार महाराष्ट्राच्या समाजजीवनात पहायला मिळतात. न. वि. गाडगीळ यांनी याबाबतचे निरीक्षण पुढील शब्दांत नोंदवले आहे : "१९ व्या शतकातील (महाराष्ट्रातील) नेतृत्व विद्वत्तेवर आधारलेले होते. विसाव्या शतकातील पहिल्या २०वर्षांत नेतृत्व कमाल स्वार्थत्यागावर आधारलेले होते. गांधीयुगात राजकारण जनतेत पसरले व नेतृत्व व्यापारी वृत्तीचे बनले. प्रत्येक 'त्यागा'ची किंमत ठरवून व पटवून व्यक्ती वागताना दिसू लागल्या. स्वदेशी व्रताने व्यापारी वर्गाचे फावले; गिऱ्हाईक नागवले. पोशाखाने पराक्रम मापण्यात येऊ लागला. टकली फिरवता आली की राजकारण चालविण्याची पात्रता आली. चरख्याचे शास्त्र गीताशास्त्रालाही मागे टाकू लागले. बावळट पोशाख व कष्टी मुद्रा ही कार्यकर्त्यांची लक्षणे ठरली. आधुनिकता प्रगती न ठरता स्वातंत्र्याच्या मार्गातील धोंड वाटू लागली. गरजा कमी करणे हे अर्थशास्त्र नामवंत झाले. या वातावरणात खरी तळमळ व प्रामाणिक बुद्धी निर्वासित झाली." (गाडगीळ, १९५५, पृ. ५८)

## १.१६. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; त्याआधी १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळाच्या निवडणुका होऊन महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे सरकार अस्तित्वात आले होते. काँग्रेसचे सर्व ७१ उमेदवार या निवडणुकीत विजयी झाले होते. केशवराव जेधे काँग्रेसचे प्रांताध्यक्ष होते. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापन झाले होते. मोरारजी देसाई यांनी गृहमंत्रीपद स्वीकारले. काँग्रेस पक्षातले अण्णासाहेब लठ्ठे, नानासाहेब कुंटे, स. का. पाटील इत्यादींना सत्तास्थानापासून दूर ठेवण्यात आले. ब्राह्मणेतरांमधून अण्णासाहेब वर्तक, एम. पी. पाटील, ल. मा. पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान दिले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस पक्षात फाटाफूट सुरू झाली. ३ ऑगस्ट १९४७ च्या 'हरिजन' च्या अंकातून म. गांधींनी काँग्रेसचे कार्य संपले असून राष्ट्रीय सभेचे विसर्जन करण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर फेब्रुवारी १९४७ मध्ये कानपूरच्या अधिवेशनात 'काँग्रेस समाजवादी पक्षा'ने 'काँग्रेस' शब्द वगळून आपले वेगळे अस्तित्व ठेवण्याचा ठराव पारित केला होता. नाशिकला ११ ते २१ मार्च १९४८ या काळात झालेल्या समाजवादी पक्षाच्या सहाव्या अधिवेशनात जयप्रकाश नारायण यांनी समाजवाद्यांनी काँग्रेसबाहेर पडण्याचा ठराव मांडला, त्यास डॉ. राम मनोहर लोहिया यांनी अनुमोदन दिले व हा ठराव मंजूर झाला. समाजवादी पक्षात कामगार संघटना, किसान पंचायत इत्यादींना संलग्नता देण्याचे धोरणही ठरविण्यात आले. कम्युनिस्ट पक्षानेही काँग्रेसची सत्ता ही बुरखा पांघरलेली ब्रिटिशांचीच सत्ता असल्याचे मत मांडून काँग्रेसच्या सत्ताकारणाविरुद्ध नकारात्मक सूर लावला होता. काँग्रेसमधून फुटून नव्याने

स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षानेही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसची सत्ता वासाहतिक राजवटीचेच अर्थकारण पुढे चालवत असून जवाहरलाल नेहरू हे साम्राज्यवाद्यांचे हस्तक असल्याचा आरोप केला होता. २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आलेले भारतीय संविधान फॅसिस्ट व हिंदी भांडवलदारांचे हितसंबंध जोपासणारे असल्याचा आरोप दाभाडी प्रबंधात करण्यात आला होता.

काँग्रेस सत्तेला असा विरोध सुरू असतानाच १९४८ साली खेर मंत्रिमंडळाने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यात दुरुस्ती करून पोलिसांचे अधिकार वाढविले व सत्ताधाऱ्यांविषयी विरोधी मत असणाऱ्यांवर या कायद्याचा उपयोग सुरू केला. समाजवादी पक्षाचे डॉ. उत्तमराव पाटील यांच्यावर भाषणबंदी, लेखनबंदीचा हुकूम जारी केला व हा हुकूम मोडल्याचे कारण दाखवून एक वर्षाची शिक्षाही ठोठावली. नाशिक जिल्ह्यातील नरेंद्र मालुसरे, विश्वनाथ सागळे, इंदापूरचे नारायण कुलकर्णी यांनाही तुरुंगात टाकले. नगर जिल्ह्यातील अण्णासाहेब शिंदे, डी. बी. कुलकर्णी या कम्युनिस्ट विचाराच्या पुढाऱ्यांना अटकेत ठेवण्यात आले. इतकेच नाही तर काँग्रेस पक्षाचेच आमदार दत्ता देशमुख यांनाही या कायद्याखाली अटक करून ५ ऑगस्ट १९५० पर्यंत तुरुंगवास भोगावा लागला होता. १९४७ ते १९५० या कालावधीत संपूर्ण देशातही हेच वातावरण होते. जवळपास ५० हजार राजकीय विरोधकांना काँग्रेस सरकारने खटला न भरता तुरुंगात टाकले होते. (फडके, २००७, पृ. २०४-२०७)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुंबई प्रांतात असंतोषाचे वारे वहात होते. अन्नधान्याचा तुटवडा भासत असल्याने सामान्य जनता असंतुष्ट होती. कम्युनिस्ट पक्षाने धान्य गोदामांवर मोर्चे नेऊन गोदामाची कुलुपे तोडून गरिबांना धान्य वाटण्याचा आक्रमक कृतिकार्यक्रम सुरू केला. शेवगाव तालुक्यातील एरंडगावला कॉ. एकनाथ भागवत यांच्या मोर्चाने गुदाम फोडून धान्य वाटप सुरू केल्यावर पोलिसांनी गोळीबार केला, त्यात ९ लोक ठार झाले. कम्युनिस्टांनी ९ मार्च १९४८ रोजी रेल्वे कामगारांना देशव्यापी संपाचे आवाहन केले; मात्र हा संप बारगळला. २६ मार्च १९४८ रोजी सरकारने कम्युनिस्ट पक्षावर बंदी आणली. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना अटक करण्याचे सत्र सुरू केले. कॉ. डांगे यांनाही अटक झाली. श्यामराव परुळेकर, गोदावरी परुळेकर इत्यादींनी भूमिगत राहून पक्षाचे काम सुरू ठेवले. नाशिक तुरुंगात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी ११ दिवस अन्नसत्याग्रह केला. कलापथकाद्वारे जनजागरण करणाऱ्या अण्णाभाऊ साठे, अमरशेख, दत्ता गव्हाणकर यांना नाशिक तुरुंगात आणले तेव्हा राजबंदी बाहेर पडून सत्याग्रह करू लागले, त्यात कॉ. गणू नाईक गोळीबारात हुतात्मा झाले. (फडके, २००७, २०८)

**शेतकरी-कामगार पक्षाची स्थापना :**

स्वातंत्र्योत्तर काळातली महाराष्ट्रातली एक मोठी राजकीय घटना म्हणजे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना. सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर पक्षातील राजकीय गट व कम्युनिस्ट विचारसरणीचे आकर्षण असलेले समाजवादी तरुण यांचा शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेत पुढाकार होता. ह्या पक्षस्थापनेची पूर्वपीठिका लक्षात घ्यायला हवी. १९२७ साली भाई माधवराव बागल यांनी 'सत्यशोधकांस इशारा' या पुस्तकांतून 'सत्यशोधकांनी आता

समाजवादी झाले पाहिजे' असे सूचित केले होते. जेधेबंधूंनी २५ जुलै १९२९ रोजी सारावाढ व तुकडेबिलास विरोध करण्यासाठी पुण्यास शेतकरी परिषद आयोजित केली होती. या प्रश्नांची तड लावण्यासाठी 'मुंबई इलाखा लँड लीग' स्थापन झाली होती. मात्र १९३० पासून गांधीजींचे ग्रामकेंद्री राजकीय बांधिलकीचे नवे पर्व सुरू झाल्यावर सत्यशोधक कार्यक्रमांना फारसा प्रतिसाद मिळेनासा झाला. १९३२ साली जेध्यांनी गोखल्यांच्या 'भारत समाज सेवक' संस्थेच्या धर्तीवर मराठा तरुणांची 'श्री शाहू सेवक सोसायटी' स्थापन करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्यांना फारसे यश लाभले नाही. १० जानेवारी १९३२ रोजी त्यांनी ब्राह्मणेतर लीग पक्षाची बैठक बोलावली, परंतु पुरेसे सभासद न आल्याने त्यांनी लीग बरखास्त केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या बहुजन समाजातील बहुतांश पुढाऱ्यांनी काँग्रेसमध्ये सामील होणे पसंत केले. फैजपूर काँग्रेसमध्ये या गटाची सामिलकी प्रत्ययाला येत होती.

१९३७ च्या निवडणुकांत काँग्रेस पक्षात ब्राह्मणेतरांना प्राधान्य मिळाले. केशवराव जेधे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षही झाले. मात्र प्रत्यक्ष सत्ताकारणात बाळासाहेब खेरांकडे मुंबई राज्याचे पंतप्रधानपद गेले. भांडवलदारांचे काँग्रेस पक्षात वर्चस्व वाढले. १९४५ च्या निवडणुकीत समाजवादी गटातल्या उमेदवारांना व शंकरराव मोरे, घोरपडे यासारख्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना डावलण्यात आले. १९४६ साली ब्राह्मणेतर ४० आमदारांनी काँग्रेस मंत्रिमंडळात कोणाला स्थान द्यावे यासंबंधी केलेल्या शिफारशींकडे कानाडोळा करण्यात आला; इतकेच नाही तर वृत्तपत्रांतून 'ब्राह्मणेतरांची गटबाजी' या शीर्षकाखाली या ४० आमदारांच्या बैठकीच्या वृत्तास प्रसिद्धी देण्यात आली. खेर मंत्रिमंडळाने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष जेधे यांच्या सल्ल्याची निर्णयप्रक्रियेत कुठलीच दखल न घेण्याचे धोरण अवलंबिले. ठाणे जिल्ह्यातील वारल्यांची स्थानबद्धतेतून सुटका करावी, अमळनेरच्या संपकरी कामगारांवर झालेल्या गोळीबाराची चौकशी करावी, शेतकऱ्यांच्या हिताचे नसलेले तुकडेबंदी-तुकडेजोड विधेयक मागे घ्यावे अशा मागण्यांचीही दखल घेतली गेली नाही. (भोळे, २०१०, पृ. १०-१३) स्वाभाविकच काँग्रेसमधल्या ब्राह्मणेतर व समाजवादी विचाराच्या कार्यकर्त्यांची कुचंबणा होऊ लागली व हा गट काँग्रेसपासून दुरावण्याची प्रक्रिया सुरू झाली.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोल्हापूर संस्थानात भाई माधवराव बागल व समाजवादी विचारसरणीला अनुसरणाऱ्या पुढाऱ्यांना शेतकरी-कामगार राज्याचा प्रयोग करून पाहण्याची महत्त्वाकांक्षा होती. मात्र आता काँग्रेसच्या राजवटीत हे शक्य होईल याची खात्री वाटत नव्हती. भाई माधवराव बागल यांनी त्यांच्या 'जीवनप्रवाह' या आत्मचरित्रात त्यावेळच्या आपल्या राजकीय अस्वस्थतेविषयी लिहिताना म्हटले होते की, "काँग्रेसमध्ये देशाला धडाडीने समाजवादाकडे नेईल असे जराही लक्षण दिसेना. राजेशाही नष्ट केली ती मुख्यत: भांडवलवाल्यांच्या स्वार्थासाठी आणि आपल्या हाती सत्ता केंद्रित करण्यासाठी असेच दिसू लागले. संयुक्त महाराष्ट्र पुढे ढकलण्यात जी वृत्ती आहे, तीच संस्थाने नष्ट करण्यात आहे. कारण राजसत्ता नष्ट केली, पण भरमसाठ उत्पन्ने शाबूत ठेवलीच आहेत. वल्लभभाई तर भांडवलवाल्यांचे रक्षण आणि कम्युनिझमचे तर उघड उघड शत्रू. गरिबांची पिळवणूक चालूच

आहे. थोडक्यात, काँग्रेसमध्ये राहून श्रमजीवी वर्गाची संघटना करणे शक्य नव्हते, म्हणून पूर्ण विचारांती शेतकरी कामगार पक्षात जाण्याचे ठरविले." (माळी मा. गो. १९९८, पृ. ९३)

२ व ३ ऑगस्ट १९४७ रोजी देवाची आळंदी येथे शंकरराव मोरे, जी. डी. लाड, कृष्णराव धुळूप, बाबूराव जेधे, नाथाजी लाड वगैरे कार्यकर्त्यांची सभा झाली व काँग्रेसअंतर्गत शेतकरी कामगारांची वर्गनिष्ठ संघटना उभारण्याचा संकल्प सोडण्यात आला. शेतकरी कामगार पक्षाची घटना तयार करण्यासाठी शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली ९ जणांची समिती नेमण्यात आली. १२ सप्टेंबर १९४७ला घटनेच्या मसुद्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. अशा प्रकारे शेतकरी-कामगार संघ स्थापन झाला. ९ नोव्हेंबर १९४७ ला अहमदनगरला ५०० कार्यकर्त्यांची सभा झाली. या सभेत शेतकरी-कामगार संघाच्या घटनेला व कार्यक्रमाला मान्यता मिळाली. ९ जणांच्या घटना समितीचे कार्यकारी मंडळात रूपांतर झाले. नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या कृतिकार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी एक समितीही नेमण्यात आली. (भोळे, कित्ता, पृ. १७) अशा प्रकारे काँग्रेसमधील समाजवादी व सत्यशोधक विचारसरणीला मानणाऱ्या ब्राह्मणेतरांनी बंड केले. १९ मार्च १९४८ रोजी समाजवादी गट आणि १३ मे १९४८ रोजी शेतकरी कामगार गट काँग्रेसमधून बाहेर पडला व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. 'नवजीवन संघटने'तलेही काही लोक शेतकरी कामगार पक्षाला येऊन मिळाले. काँग्रेसमधल्या शंकरराव देव, बाळासाहेब खेर, देवगिरीकर ह्या नेत्यांबरोबर सूर न जमलेले शंकरराव मोरे, केशवराव जेधे , नाना पाटील, तुळशीदास जाधव हे शेतकरीवर्गातले व मराठा बहुजन समाजातले नेते या पक्षात आले.

सोलापूर येथे ५-६ सप्टेबर १९४८ रोजी पक्षाचे पहिले वार्षिक अधिवेशन झाले. भाई माधवराव बागल अध्यक्ष होते. दुसरे वार्षिक अधिवेशन नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील दाभाडी येथे झाले. केशवराव जेधे अध्यक्ष होते. याच अधिवेशनात पक्षाची राजकीय भूमिका विशद करणारा 'दाभाडी प्रबंध' प्रकाशित झाला. 'दाभाडी प्रबंध' हा मार्क्सवादी-लेनिनवादी विचारधारेतल्या समाजवादी विचारांना अनुसरणारा होता. माओच्या किसान क्रांतीचा नमुनादर्श ठेवून आपल्याकडे कृषिक्रांती घडवता येईल अशी धारणा होती. यानंतर ९ सप्टेबर १९५० ला कराडजवळील वाठार येथे तुळशीदास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रांतिकचे पहिले अधिवेशन झाले. मराठवाडा प्रांतिक अधिवेशन २४-२५ सप्टेंबरला दत्ता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली तुळजापूर येथे झाले. १९५० सालीच १९-२० ऑक्टोबरला पक्षाच्या राजकारण समितीची बैठक होऊन संघटनात्मक प्रश्नांवर तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर व्यापक विचारविनिमय करण्यात आला. प्रस्तुत विवेचनाची मर्यादा १९५० पर्यंत असल्याने या कालक्रमिक संदर्भचौकटीत 'शेकाप' च्या स्थापनेनंतर केवळ दोनच वर्षांची वाटचाल येत असल्याने या पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात कोणते योगदान दिले व एकूण राजकीय पर्यावरणात या पक्षाचे नेमके स्थान काय राहिले, याविषयी भाष्य करणे शक्य नसल्याने या पक्षाच्या स्थापनेची घटना नोंदवणे एवढ्यापुरतीच या विवेचनाचा परिघ मर्यादित ठेवला आहे.

## भाषावार प्रांतरचनेचे राजकारण :

ब्रिटिश अमदानीच्या प्रारंभापासून राष्ट्राच्या 'भाषिक नियोजना'चा प्रश्न विविध अंगांनी हाताळला गेला होता, याची चर्चा यापूर्वी १९ व्या शतकातील स्थित्यंतरांचा मागोवा घेताना संदर्भपरत्वे करण्यात आली होती. शासनव्यवहाराची भाषा, शिक्षणाची भाषा, नोकरभरती करताना भारतीय भाषांच्या परिचयाची परीक्षा घेण्याचे धोरण, पत्रव्यवहाराची व परिपत्रकांची भाषा, न्यायालयीन कामकाजाची भाषा अशा अनेक संदर्भात ब्रिटिश प्रशासनाला वेळोवेळी आपले धोरण ठरवून निर्णय घ्यावे लागले होते. विसाव्या शतकातही भाषेसंबंधीचे सहमतीचे राष्ट्रीय धोरण ठरविताना हा प्रश्न कायम चर्चेत राहिलेला आहे. त्यातून जे भाषिक राजकारण झाले त्याचा महाराष्ट्रापुरता येथे तपास करावयाचा आहे.

महाराष्ट्रातील पुढाऱ्यांपैकी लो. टिळकांनी १८८१ साली सर्वप्रथम भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा उपस्थित केला होता. भाषावार प्रांतरचना झाली तर त्या त्या प्रांतातील भाषांचा आणि लोकांचा विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल, अशी टिळकांची समजूत होती. (केसरी, १७ नोव्हेंबर १८८१) यानंतर १९०२ साली भाषिक तत्त्वावर ओरिसाच्या प्रादेशिक एकीकरणाची मागणी पुढे आलेली दिसते. १९०५ साली आसाम, बिहार, सिंध आणि दक्षिण भारताचे भाषावार प्रांत स्थापण्यासाठी संघटनात्मक चळवळी झाल्या. बंगालची फाळणी झाल्यावर जे वंग भंग विरोधी आंदोलन झाले, त्यात भाषिक अस्मितेचा मुद्दा अग्रस्थानी होता. १९०७ साली मुंबई प्रेसिडेन्सीतून 'सिंध' आणि मद्रास प्रेसिडेन्सीतून 'आंध्र' अशी प्रांतीय काँग्रेसची स्थापना करताना राष्ट्रीय काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेच्या भूमिकेचा जाहीर पुरस्कार केला होता. १९०८ साली भाषिक तत्त्वावर बिहार प्रांतिक काँग्रेसची स्थापना करून काँग्रेसने संघटनात्मक कार्यासाठी भाषावार क्षेत्रीय कार्यक्षेत्रांच्या आखणीचे संकेत दिले होते. १९२० च्या नागपूर अधिवेशनानंतर काँग्रेसने भाषिक तत्त्वावरच प्रदेश काँग्रेस कमिट्यांची रचना केली होती. महाराष्ट्रातील भाषिक राजकारणाचा हा प्रारंभिक टप्पा म्हणता येईल. १९२१ साली काँग्रेस कार्यसमितीच्या सभेत सर्व प्रांतांचे कामकाज व प्रकाशन त्या त्या प्रांतांच्या स्थानिक भाषेतून करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

## नेहरू रिपोर्ट :

१९२८ साली भरलेल्या सर्वपक्षीय संमेलनात एकभाषिक प्रांतांच्या पुनर्रचनेचा व प्रांतीय भाषेतून शिक्षण, रोजगार व कार्यालयीन कामकाज व्हावे, असा ठराव संमत झाला. पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आधारलेली संपूर्ण जबाबदार 'स्वराज्याची घटना' तयार करण्याकरिता समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीत सर तेजबहादूर सप्रू, सर अली इमाम यांच्याबरोबर श्री. ना. म. जोशी व श्री. अणे हे मराठी सदस्यही होते. 'नेहरू रिपोर्ट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या समितीच्या अहवालात 'भाषावार प्रांतरचना' यावर स्वतंत्र प्रकरण असून 'लोकमत' आणि 'भाषिक एकात्मता' या दोन तत्त्वांवर राज्यांची पुनर्रचना करण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली. या रिपोर्टचा गोषवारा असा :

"सध्याची प्रांतरचना ब्रिटिश सत्ता स्थापित होऊन जसजशी वाढत गेली, त्याप्रमाणे झाली आहे. या प्रांतविभागणीशी कोणत्याही भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक वा भाषिक तत्त्वाचा संबंध नाही. ही पुनर्विभागणी त्या त्या भागातील लोकमत आणि त्या विभागाची भाषिक एकात्मता या दोन मौलिक तत्त्वांवर करण्यात यावी. भाषा हे एखाद्या विभागातील शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती शीघ्र घडवून आणण्याचे साधन आहे. शिक्षणाचे माध्यम जर परकी भाषा असेल तर त्या देशाचा सर्व व्यवहार-व्यापार, त्याचे सर्व जीवनच खुरटून जाणार. जेथे परकीय भाषेतून हे व्यवहार होतात, तेथे लोकशाही नांदणे शक्यच नाही. प्रांताचे शिक्षण आणि दैनंदिन कारभार त्या प्रांताच्या बहुजनसमाजाच्या भाषेतूनच व्हावयाचा तर तो प्रांत भाषावारच असला पाहिजे. सामान्यत: त्या त्या भाषिकांची एक विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट परंपरा असते, त्यांचे विशिष्ट वाङ्मय असते. भाषावार प्रांतरचना झाल्यास, या गोष्टी त्या प्रांताची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास साहाय्यभूत होतील. हिंदुस्थानच्या नकाशाकडे या दृष्टीने पाहिल्यास आमच्या डोळ्यांसमोर निरनिराळे भाषावार विभाग निश्चित उभे राहतात. पंजाबमधील पंजाबी भाषेच्या रूपाने, हिंदुस्थानीत थोडा फरक असला तरी उत्तर हिंदुस्थानभर हिंदुस्थानी भाषिकांचा सलग भाग आहे असे म्हणता येईल. त्यानंतर बंगाली, आसामी, ओरिया, तेलुगु, तामीळ, कानडी, मराठी, गुजराती, सिंधी अशी भाषा बोलणारे भाग आहेत." [वरखेडे रमेश, २०१४, पृ. XXXii]

सारांश, लोकशाही नांदण्यासाठी भाषावार प्रांतरचना आवश्यक असल्याचा सूर नेहरू रिपोर्टमध्ये आळविण्यात आला होता. भारतीय भाषा प्रशासनव्यवहार आणि शिक्षणव्यवहार पेलण्यास पुरेशा सक्षम असल्याची जाणीव तत्कालीन नेत्यांना होती. मोतीलाल नेहरूंप्रमाणे जवाहरलाल नेहरू यांनीही या विचाराला दुजारा दिलेला दिसतो. नेहरूंनी हा विचार पुढील शब्दांत मांडला आहे :

".. a living language is a throbbing, vital thing, ever changing, ever growing and mirroring the people who speak and write it... and our great provincial languages are no dialects or vernaculars, as the ignorant sometimes call them. They are ancient languages with a rich inheritance, each spoke by millions of people, each tied up inextricably with the life and culture through the medium of their own language." (Nehru, 1937)

भाषाभिन्नतेमुळे भारताच्या सांस्कृतिक एकजिनसीपणाला बाधा येईल, भाषेच्या प्रश्नावरून फूट पडेल अशी भीती काहींनी व्यक्त केली होती. म. गांधी यांनी मात्र भाषावार प्रांतरचनेमुळेच ह्या भीतीचा निरास होईल, असे आपल्या एका सहकाऱ्याला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते :

"I do believe that we should hurry up with the reorganization of linguistic provinces... there may be an illusion for the time being that different languages stand for different cultures, but there is also the possibility [that with the creation] of linguistic provinces it may disappear." (10 October,

1947; Ghua, 189-90)

भाषा हे एक लोकतत्त्व आहे व तिचे शक्तिकेंद्र लोकधारणेतच असते. त्यामुळे विकासाच्या आणि परिपूर्तीच्या गर्भखुणा म्हणून भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोण भाषावार प्रांतरचनेमागे अनुस्यूत होता. अर्थात भाषा ही सांघिक ओळख देणारी घटना असल्याने स्वाभाविकच भाषेचा संबंध अपरिहार्यपणे अस्मितेशी येतो. प्रादेशिक, जातीय, वर्गीय अस्मिता भाषिक अस्मितेशी जोडल्या जाऊ लागल्या तर राजकीय जीवनात वेगळे पेचप्रसंग निर्माण होऊ लागतात. भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रातही भाषावार प्रांतरचनेच्या निमित्ताने भाषिक अस्मितेचे हे विविध पैलू कमीअधिक प्रमाणात डोकावताना दिसतात.

## मराठी भाषकांचा संयुक्त महाराष्ट्र :

ब्रिटिश सत्तेचा अंमल असलेला मुंबई प्रांत, मध्यभारत-वऱ्हाड प्रांत, निजाम राजवटीतला मराठवाडा, बडोदे, सांगली, कोल्हापूर इत्यादी मराठी संस्थानांतला मुलुख, पोर्तुगीजांच्या सत्तेखाली असलेला गोमंतक अशा ९० लाखांहून अधिक मराठी भाषकांच्या विखुरलेल्या प्रांतांचे सलगीकरण करून भाषा तत्त्वावर मराठी भाषकांचे एकात्मिक राज्य निर्माण व्हावे या आकांक्षेतून विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकाअखेरीस संघटनात्मक प्रयत्न सुरू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रस्तावित संयुक्त महाराष्ट्राची क्षेत्रव्याप्ती पुढीलप्रमाणे दर्शविली होती :

| प्रदेश व जिल्हे | क्षेत्रफळ चौ. मैल | लोकसंख्या | मराठी भाषकांची संख्या | मराठी भाषकांचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|
| मुंबई इलाखा १२ जिल्हे | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| मध्य प्रांत वऱ्हाड ८ जिल्हे | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| मुंबई शहर [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| हैद्राबाद संस्थान | २२,७६६ | ४२,४९,२७२ | ३२,९९,३०० | ७७.६ |
| गोवा | [illegible] | [illegible] | [illegible] | ८९.६ |
| [illegible] | ७०१ | ६,३३,८८८ | २,१२,३०० | ३३.५ |
| एकूण | १,३३,४६६ | २,८१,१७,६०५ | २,१५,८५,७०० | |

१९११ साली बंगालची फाळणी रद्द झाल्यावर न. चिं. केळकर यांनी महाराष्ट्रीय लोकांनी आपल्या एकीसाठी चळवळ करायला हवी, असे सूचित करणारा लेख 'केसरी'त लिहिला होता. मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी, असे मत त्यांनी व्यक्त केले होते. (केळकर, [illegible]) [illegible] साली बेळगावच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात मराठी आणि कन्नड भाषिकांमध्ये वाद निर्माण झाला होता, त्यावेळी शि. म. परांजपे यांनी या वादाकडे [illegible] करताना म्हटले होते की, "आम्ही एखाद्या भाषेचा फाजील अभिमान न धरता हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत एकच देश आहे असे मानतो. तेव्हा [illegible] महाराष्ट्रात आहे का [illegible] आहे असले [illegible] न [illegible] देशाच्या लढ्यात सर्वांच्या बरोबरीने भाग घ्यावा" (फडके य. दि. १९९७, पृ. ३५४) परांजप्यांची ही भूमिका त्यांच्या एकराष्ट्रवादाशी सुसंगत असली तरी भाषावार प्रांतरचनेचा पक्ष उचलून धरणाऱ्यांची अस्मिता अधिक टोकदार होत गेल्याचे पुढच्या काळात दिसून येते.

## महाविदर्भाचे राजकारण

*संदर्भ : आंबेडकर (१९४८)*

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मध्यप्रांत-वऱ्हाडची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. त्याला काही ऐतिहासिक पार्श्वभूमीही कारणीभूत होती. १८५३ ला हैद्राबादच्या निजामाने वऱ्हाडचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती दिला होता. त्यानंतर ५ नोव्हेंबर १९०२ च्या सुधारित

व्यक्त केले होते. (केळकर न. चिं. १९४८, पृ. ३५-६४) १९२९ साली बेळगावच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात मराठी आणि कन्नड भाषिकांमध्ये वाद निर्माण झाला होता, त्यावेळी शि. म. परांजपे यांनी या वादावर भाष्य करताना म्हटले होते की, "आम्ही एखाद्या भाषेचा फाजील अभिमान न धरता हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत एकच देश आहे असे मानतो. तेव्हा आपणही बेळगाव महाराष्ट्रात आहे का कर्नाटकात आहे असले वाद उकरून न काढता देशाच्या लढ्यात सर्वांच्या बरोबरीने भाग घ्यावा". (फडके य. दि. १९९७, पृ. ३५४) परांजप्यांची ही भूमिका त्यांच्या एकराष्ट्रवादाशी सुसंगत असली तरी भाषावार प्रांतरचनेचा पक्ष उचलून धरणाऱ्यांची अस्मिता अधिक टोकदार होत गेल्याचे पुढच्या काळात दिसून येते.

**महा-विदर्भाचे राजकारण :**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मध्यप्रांत-वऱ्हाडची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. त्याला काही ऐतिहासिक पार्श्वभूमीही कारणीभूत होती. १८५३ ला हैद्राबादच्या निजामाने वऱ्हाडचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती दिला होता. त्यानंतर ५ नोव्हेंबर १९०२ च्या सुधारित तहानुसार वऱ्हाड भाडेपट्टाच्या तत्त्वावर इंग्रज राज्यकर्त्यांकडे सोपविला गेला. मोबदल्यात मालकी हक्कापोटी निजामला सालीना २५ लाखांची खंडणी मिळाली. कर्झनने वऱ्हाडचे स्वतंत्र अस्तित्व न ठेवता तो १ ऑक्टोबर १९०३ पासून मध्यप्रांताला जोडला. तेव्हापासून विदर्भाचे हे क्षेत्र वऱ्हाड व नागप्रदेश मिळून *'मध्यप्रांत-वऱ्हाड'* (Central Province & Berar) या नावाने संबोधले जाऊ लागले. वऱ्हाड मध्यप्रांताला जोडण्याच्या कर्झनच्या निर्णयामुळे वऱ्हाडचे नुकसान झाले, अशी टीका दादासाहेब खापर्डे यांनी केली होती. [एस. एम. अणे : मेमोरॅंडम सबमिटेड तू द स्टेटस् रिऑर्गनायझेशन कमिशन, १९५४, पृ. ५६; फडके, २००७, पृ. ७४] वऱ्हाड हा मध्यप्रांताऐवजी मुंबई प्रांताला जोडला असता तर वऱ्हाडची अधिक प्रगती झाली असती, अशी त्यांची धारणा होती. (तत्कालीन राजकीय नकाशात मध्यप्रांत-वऱ्हाडची विधानसभा आणि मुंबई प्रांताची विधानसभा अशा वेगवेगळ्या विधानसभा अस्तित्वात होत्या.) त्याचे दुसरेही एक कारण असे होते की, वऱ्हाडकडून ज्या प्रमाणात महसूल जमा होई त्या प्रमाणात तो वऱ्हाडवर खर्च होत नसे; उलट मध्यप्रांताच्या महसूलाच्या तुलनेत त्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण अधिक होते. उत्पन्न व खर्चातील ही व्यस्तता दर्शविणारी पुढील आकडेवारी वऱ्हाडच्या समर्थनार्थ दर्शविली जात असे :

| वर्ष | प्रदेश | उत्पन्न रु. | खर्च रु. |
|---|---|---|---|
| १९०३-०४ | मध्यप्रांत | १,६९,१४,०१८ | १,४०,६७,११३ |
| | वऱ्हाड | १,२८,५७,९८२ | ६६,१३,८१६ |
| १९०९-१० | मध्यप्रांत | २,११,२८,७८० | २,४३,९५,८२६ |
| | वऱ्हाड | १,४०,५३,१८९ | ५१,७५,०७६ |

(वक्काणी, २००३, पृ. २८२)

दादासाहेब खापर्डे यांनी वऱ्हाड मुंबई प्रांताला जोडावा या मागणीसाठी १९०३ साली फेब्रुवारी व मार्चमध्ये वऱ्हाडवासीयांच्या सभा घेऊन सभेतल्या मागणीचे ठराव व्हाईसरॉयकडे पाठविले. ५ नोव्हेंबर १९१५ रोजी डॉ. हरिसिंह गौर यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती येथे 'मध्यप्रांत-वऱ्हाड' प्रांत काँग्रेसच्या अधिवेशनात वऱ्हाडच्या समस्येवर चर्चा झाली. सर मोरोपंत जोशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून वऱ्हाड मध्यप्रांताला जोडला गेल्यापासून मागासलेलाच राहिला आहे, तो मुंबईला जोडला गेला असता तर वर्तमान स्थिती वेगळी राहिली असती, असाही दावा त्यांनी आपल्या भाषणातून केला. १९१३ पर्यंत वऱ्हाड-मध्यप्रांताला विधानसभा नव्हती. १९११ साली राष्ट्रीय काँग्रेसने 'मध्यप्रांत-वऱ्हाड' प्रांताला विधानसभा मिळावी असा ठराव पारित केला. त्यानंतर ब्रिटिश शासनाने १९१३ साली या प्रांताची विधानसभा स्थापन केली होती. ८ नोव्हेंबर १९१३ रोजी लॉर्ड आणि लेडी हार्डिंग्ज यांनी नागपूर विधानसभेचे उद्‌घाटन व विधानभवनाचा शिलान्यास केला. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या या विधानसभेत सुरुवातीला २६ सदस्य होते. त्यातील ७ नगरपरिषदा व जिल्हा बोर्डातून निवडून आलेले, ७ सरकारनियुक्त, २ जमीनदार व मालगुजारांचे प्रतिनिधी आणि १० सरकारी अधिकारी अशी संरचना होती. पहिल्या विधानसभेत मोरोपंत दीक्षित, रा. रघुजीराव भोसले, सर बिपीन कृष्ण बोस, कस्तुरचंद डागा आणि गंगाधरराव चिटणवीस, आर. एन. मुधोळकर,सर मोरोपंत जोशी हे ७ आमदार होते. मोरोपंत जोशी यांना मात्र वऱ्हाडला 'औपनिवेशक स्वराज्य' हवे होते. वऱ्हाडातून मिळणाऱ्या महसूलाच्या उत्पन्नाचा खर्च वऱ्हाडवरच व्हायला हवा, ही वऱ्हाडवासीयांची धारणाही त्यांनी आपल्या भाषणातून पुन्हा एकदा बोलून दाखविली.

वऱ्हाडच्या नेत्यांनी वऱ्हाडच्या राजकीय स्थाननिश्चितीसाठी ब्रिटिश शासनाशी वारंवार पत्रव्यवहार केला, निवेदने सादर केली. मॉंटेग्यू साहेबाने वऱ्हाडवासीयांची मागणी लक्षात घेऊन वऱ्हाडला उपप्रांताचा दर्जा देण्याची सूचना केली. वऱ्हाडवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी सरकारने 'सिम समिती' नेमली होती. या समितीने मध्यप्रांत व वऱ्हाडच्या खर्चाचे प्रमाण ६०:४० असे असावे, अशी शिफारस केली. अर्थातच ही शिफारस वऱ्हाडवासीयांवर अन्याय करणारी असल्याची प्रतिक्रिया उमटली.

वऱ्हाडवर होणारा अन्याय दूर व्हावा म्हणून लोकनायक बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली 'वऱ्हाड सर्वपक्षीय समिती' संघटित करण्यात आली. बुलढाण्याचे रामचंद्र कानिटकर व अकोल्याचे ब्रिजलाल बियाणी हे या समितीचे सचिव होते. या समितीने गोलमेज परिषदेत वऱ्हाडची समस्या मांडण्यासाठी रामचंद्र कानिटकर यांना पाठविले होते. ४ नोव्हेंबर १९३२ रोजी गोलमेज परिषदेत वऱ्हाड सर्वपक्षीय समितीने सादर केलेल्या निवेदनात म्हटले होते की, "जरी तांत्रिकदृष्ट्या ब्रिटिश भारताचा प्रदेश नसला तरी १८५३ पासून इथे ब्रिटिश शासन कार्यरत आहे. त्यामुळे वऱ्हाडला ब्रिटिशांनी स्वतंत्र घटक राज्य म्हणून मान्यता द्यावी व मध्यप्रांतापासून वऱ्हाडला स्वतंत्र करण्यात यावे. वऱ्हाडचे कायदेमंडळ अस्तित्वात आणावे व त्यावर कार्यकारिणी सरकारची जबाबदारी सोपविण्यात यावी." जानेवारी १९३३ मध्ये 'मध्यप्रांत-वऱ्हाड कौन्सिल'मध्येही वऱ्हाड मध्यप्रांतापासून वेगळा काढण्यात यावा, याविषयीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

१९२० च्या नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात भाषिक तत्त्वावर प्रांतिक काँग्रेस कमिट्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार मध्यप्रांत-वऱ्हाडच्या प्रांतिक काँग्रेसचे विभाजन करण्यात येऊन वऱ्हाड (बेरार), महाकौशल (हिंदी मध्यप्रांत) आणि मराठी मध्यप्रांत (नागपूर, भंडारा, चंद्रपूर जिल्हे) अशा तीन प्रांतिक कमिट्या स्थापन करण्यात आल्या. काँग्रेसच्या भाषावार प्रांतरचनेची नांदी म्हणून नागपूर काँग्रेसच्या या निर्णयाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. तसेच जमनालाल बजाज यांनी मांडलेल्या हिंदुस्थानी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून व देवनागरी लिपीला राष्ट्रलिपी म्हणून स्वीकारण्यात यावे, याही प्रस्तावाला नागपूर अधिवेशनात मान्यता मिळाली. नागपूर अधिवेशनाची आणखी एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे काँग्रेस सेवादलाची स्थापना. एकाच राज्यघटनेखाली समान राज्ययंत्रणा चालविण्यासाठी लोकशाही राजवटीचे शिक्षण लोकांना देण्यासाठी सेवाव्रतींची संघटना बांधण्याचा मार्ग या ठरावामुळे प्रशस्त झाला व पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस सेवादलाची संघटना अस्तित्वात आली.

त्यानंतर १ ऑक्टोबर १९३८ रोजी पुन्हा एकदा मध्यप्रांत-वऱ्हाडच्या विधानसभेत मराठी भाषक वऱ्हाडच्या सर्व ८ मराठी भाषक जिल्ह्यांचा 'महाविदर्भ' नावाचा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याची मागणी करणारा बॅ. रामराव देशमुख यांनी मांडलेला ठराव संमत झाला होता. लोकनायक अणे यांचाही कल संयुक्त महाराष्ट्रापेक्षा महाविदर्भाकडेच झुकलेला होता. संयुक्त महाराष्ट्र झाला तर महाविदर्भाला गौण स्थान मिळेल अशी भीती या विचारधारेमागे असावी. महाविदर्भ ह्या वेगळ्या राज्याच्या मागणीत त्र्यं. गो. देशमुख (ब्राह्मण), ब्रिजलाल बियाणी (शेठजी), मा. सां. कन्नमवार, गोपाळराव खेडकर, जांबुवंतराव धोटे (बहुजनसमाज) यांचा पुढाकार होता.

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू केदार हे मात्र महाविदर्भापेक्षा संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेचे समर्थक होते. २४ मे १९४० रोजी पुण्यात महाराष्ट्र एकीकरण परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात बोलताना ते म्हणाले होते की, "ब्रिटिशांचा हिंदुस्थानात शिरकाव होण्याच्या अगोदर आपण राजकीय सत्तावैभवाच्या शिखरावर बसलो होतो ही गोष्ट महाराष्ट्रीय लोक कधीही विसरू शकणार नाहीत आणि म्हणूनच राजकीय, भाषाविषयक, आर्थिक व इतर अनेक दृष्ट्या आपले पाय खाली ओढण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांना कधीच सहन होणार नाही. महाराष्ट्रात जो जन्मला व ज्याचे महाराष्ट्रात कायमचे वास्तव्य आहे त्याला महाराष्ट्रीय म्हणण्यात यावे.. महाराष्ट्रीय शब्दाची दुसरी कोणतीही व्याख्या मला मान्य होणार नाही" (फडके य. दि. कित्ता, पृ. ३५७) काँग्रेसश्रेष्ठी महाराष्ट्रीयनांना गुजरात, कर्नाटक आणि महाकोशल अर्थात विदर्भापेक्षा कमी लेखतात, असेही कुलगुरू केदार यांनी जनमानसांच्या लक्षात आणून दिले. संयुक्त महाराष्ट्र निर्माणाच्या राजकारणाला येथून खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला.

१८ ऑगस्ट १९४० रोजी वर्धा येथे बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेची स्थापना झाली. महाविदर्भाच्या मागणीसाठी लोकचळवळ उभारण्याचा संकल्प सोडण्यात आला. ३ ऑक्टोबर १९४३ रोजी बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली

अमरावती येथे महाविदर्भ समितीचे दुसरे अधिवेशन झाले. या अधिवेशनात वऱ्हाडच्या मागणीच्या संदर्भात एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. या पुस्तिकेतून विदर्भाचे विभाजन झाल्यास शेती व उद्योग क्षेत्रात वऱ्हाडचा विकास कसा होईल हे पटवून देण्याचा प्रयत्न झाला. (वक्काणी, २००३, पृ. २८१-२८६) भाषिक प्रांतरचनेच्या राजकीय मागणीसाठी विदर्भातल्या लोकमत जागृतीच्या कार्यक्रमाला येथून सुरुवात झाली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी महाविदर्भवाद्यांना संयुक्त महाराष्ट्र झाल्यास आपल्याला गौण स्थान मिळेल ही जी भीती वाटत होती तिचे खंडन करताना भविष्यात पश्चिम महाराष्ट्राच्या वर्चस्वाला पायबंद घालणाऱ्या शक्ती पुढे येतील असे भाकीत वर्तवले होते. (फडके, कित्ता, पृ. ३५८) एकजिनसी महाराष्ट्राची भावना निर्माण होण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आवश्यक असल्याचा सूर असा अधूनमधून उमटत होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या राजकारणात विदर्भातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचीही एक छटा होती. नाग-विदर्भाच्या राजकारणात १९३८ नंतर भटजींना निष्प्रभ करून मारवाडी शेटजींची पकड झाली. वर्ध्याचे शेठ जमनालाल बजाज, नागपूरचे पूनमचंद राका, कामटीचे खुशालचंद खजांची, अकोल्याचे ब्रिजलाल बियाणी ह्यांनी आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. मराठी भाषकांच्या प्रदेशातून निवडून आलेल्या सदस्यांचा हे शेठजी-मारवाडी त्यांच्या राजकारणासाठी उपयोग करून घेतात; त्यांच्या लेखी आमची किंमत शून्य आहे, हे वास्तव मध्यप्रांताच्या विधानसभेतील भाषणात तु. ज. केदार यांनी बोलून दाखविले होते. (पी. एल. जोशी (संपा.) पोलिटिकल आयडियाज अण्ड लीडरशिप इन विदर्भ, १९८८, पृ.२५७/ फडके, २००७, पृ. ७५) दार आयोगासमोर नागपूर प्रांतिक काँग्रेस समितीच्या वतीने साक्ष देताना मारोतराव कन्नमवार, मदनगोपाळ अग्रवाल, मु. ल. वैद्य व कल्याणराव आंबेवाडीकर यांनीही आपण पाच मराठीभाषी मंत्री असूनही मराठी जनतेचे हितसंरक्षण करू शकत नसल्याची खंत व्यक्त केली होती. [तरुण भारत, २३ सप्टें. १९४८]

विदर्भातील नेते बापूजी अणे यांनी गांधीहत्येनंतर महाराष्ट्रात घडलेल्या जाळपोळीच्या घटनांनंतर ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याकडे आपल्या मनातले गुह्य व्यक्त करताना म्हटले होते की, " महाराष्ट्रातील बुद्धिवादी लोकांना नष्ट करण्याचा हा जुनाच प्रकार आहे. ऐन राष्ट्र निर्माण करण्याच्या वेळी बुद्धिवादी लोक नष्ट करण्याच्या योगाने महाराष्ट्राचे नुकसान होणार आहे. .. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याच्या मी विरुद्ध नाही. पण तो बनत असताना महाराष्ट्रात जी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे तिचा संसर्ग आमच्या भागाकडे पोचू नये अशी माझी इच्छा आहे." (फडके, २००७, पृ. ७२) ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या मते वऱ्हाडातील ब्राह्मणेतर चळवळीचा मुखवटा आणि व्यवहार यात दुटप्पीपणा होता. प्रचारापुरता वऱ्हाडातील ब्राह्मणेतर चळवळ शेटजींच्याविरुद्ध असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात ब्राह्मणांचे पुढारीपण हाणून पाडण्यासाठी शेटजींचे सहकार्य घ्यावयाला त्यांना संकोच वाटत नाही. किंबहुना ब्राह्मणेतर पक्षाच्या नेत्यांना गुजराती, मारवाडी, कनौजी, बंगाली किंवा काश्मिरी ब्राह्मण चालत असत तसेच शेटजीही चालतात, असा टोमणा माडखोलकरांनी आपल्या एका लेखातून मारला होता.

(ग. त्र्यं. माडखोलकर, व्यक्तिरेखा, दु. आ. १९६६; / फडके, २००७, पृ. ७३)

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजाम वऱ्हाडवर आपला हक्क सांगेल अशी भीती होती. आणि निजामने तसा दावाही केला होता. वऱ्हाडच्या जनतेला मात्र हे मान्य नव्हते. त्यामुळे वऱ्हाडवासीयांनी २० एप्रिल १९४७ रोजी अकोला येथे एक सर्वपक्षीय परिषदेचे आयोजन करून त्यात पुढील ठराव पारित केले : 'वऱ्हाड निजामच्या राज्यात राहू इच्छित नाही. नवीन भारताचा घटक प्रदेश म्हणून वऱ्हाडचे स्थान निश्चित केले जावे. वऱ्हाडच्या भावी व्यवहारासाठी 'मुक्त वऱ्हाड समिती' स्थापन करण्यात येत आहे. वऱ्हाडच्या नियोजित दौऱ्यावर येत असलेल्या सर मिर्झा इस्माईल या निजामच्या पंतप्रधानाबरोबर वऱ्हाडवासीयांनी कुठल्याही वाटाघाटी करू नये.' एकमताने पारित झालेल्या या ठरावाच्या प्रती सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे पाठविण्यात आल्या. 'मध्यप्रांत-वऱ्हाड'चे मंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांनीही सरदार पटेल यांना १२ मे १९४७ रोजी पत्र पाठवून वऱ्हाड निजामच्या राज्यात सामील केला जाऊ नये, असा आपला अभिप्राय कळवला. 'इंडिया इंडिपेंडन्स बील'मध्ये वऱ्हाडच्या स्थितीबाबत कुठलाही स्पष्ट निर्देश नसल्याचे पाहून 'स्वतंत्र वऱ्हाड समिती'चे अध्यक्ष ब्रिजलाल बियाणी यांनीही सरदार पटेल यांना तार करून वऱ्हाडला निजामच्या राज्यात वर्ग करण्याऐवजी स्वतंत्र भारताच्या घटकप्रदेशात स्थान देण्याची विनंती केली. इतकेच नाही तर १५ ऑगस्ट १९४७ रोजी निजामचा झेंडा वऱ्हाडवर फडकल्यास ब्रिजलाल बियाणी हे स्वातंत्र्यदिन समारंभावर बहिष्कार घालणार व 'स्वतंत्र वऱ्हाड'ची घोषणा करणार आहेत अशी तार ९ ऑगस्ट १९४७ रोजी रविशंकर शुक्ला यांच्याकडून सरदार पटेलांना पाठविण्यात आली. अर्थात १५ ऑगस्टला निझामचा झेंडा वऱ्हाडात फडकला नाही. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीनंतर ५ मिनिटांनी मंगलदास पक्वासा यांनी 'मध्यप्रांत-वऱ्हाड'च्या राज्यपालपदाची शपथ घेतली व १५ ऑगस्टच्या सकाळी सीताबर्डी किल्ल्यावर मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांनी स्वतंत्र मध्यप्रांत-वऱ्हाडचा तिरंगा फडकाविला. (वक्काणी, २००३, पृ. १६१-१६२)

त्यानंतर ८ ऑगस्ट १९४७ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे शंकरराव देव व महाविदर्भ समितीचे ब्रिजलाल बियाणी यांच्यात अकोला येथे करार झाला. त्यात वऱ्हाडसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस पाठिंबादर्शक ठरावही पारित झाला. तसेच कोणत्याही परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्र झाला नाही तर स्वतंत्र महाविदर्भ निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे या करारात परस्पर-सामंजस्याने ठरविण्यात आले. 'अकोला करार' या नावाने हा करार ओळखला जातो.

११डिसेंबर १९४८ रोजी केंद्रीय मंत्री न. वि. गाडगीळ यांचे नागपूर काँग्रेस समितीपुढे भाषण झाले. त्यात त्यांनी महाविदर्भाची मागणी सरदार वल्लभभाईंना बिलकूल मान्य नसल्याचे सांगितले व या प्रांतात शुक्ल-मिश्र-दुबे यांच्या जागी खेडकर-कन्नमवार यावेत अशी जर आपली इच्छा असेल तर मध्यप्रांत -वऱ्हाडातील मराठी भाषा बोलणारा सारा विभाग मुंबई प्रांताला जोडण्यास आपण संमती द्या, असे आवाहन केले. (शंकरराव देव : खासगी पत्रव्यवहार : ग. त्र्यं. माडखोलकरांचे शंकररावांना पत्र : ८ जानेवारी १९४९; फडके, २००७, पृ. ७७) यानंतर

महाविदर्भाची मागणी मागे पडून विदर्भासह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला अधिक पाठिंबा मिळू लागला.

## संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :

विदर्भात जेव्हा महाविदर्भाची मागणी जोर धरत होती, त्याच वेळी दुसरीकडे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे प्रस्ताव पुढे येते होते. १९३८ साली १५ ऑक्टोबरला स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात विदर्भासह एकछत्री सलग मराठी राज्य निर्माण करण्याच्या मागणीचा ठराव संमत करण्यात आला. ज्योत्स्ना मासिकाने या विषयावर चर्चा घडवून आणली होती. अशाच आशयाचे विचार ग. त्र्यं. माडखोलकर यांनीही ६ जानेवारी १९४० रोजी उज्जैन मराठी वाङ्मयमंडळाच्या संमेलनात अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले होते. त्यात माडखोलकर म्हणाले होते, "नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेला सारा मराठी मुलुख एका राजकीय सत्तेच्या, एका मध्यवर्ती विद्यापीठाच्या आणि एका सर्वव्यापी राष्ट्रसंस्थेच्या छत्राखाली आणावयाचा, महाराष्ट्रातील एका रक्ताच्या आणि एका भाषेच्या लोकांचे मुलताईपासून मडगावपर्यंत एकसंध राष्ट्र निर्माण करावयाचे हे ध्येय आपण ईर्ष्येने वाढीला लावले पाहिजे." (फडके य. दि. १९९७, पृ. ३५५) यानंतर २८ जानेवारी १९४० रोजी मुंबईत दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना झाली.

१९४१साली धनंजयराव गाडगीळ यांनी 'संयुक्त महाराष्ट्र हा एक प्रांत असावा का?' या विषयाची चर्चा करणारा लेख लिहिला (केसरी, ३ जानेवारी १९४१). त्यात त्यांनी हिंदुस्थान हे इंग्लंड, जर्मनी, फ्रान्ससारखे एकभाषी राष्ट्र नसल्याने या बहुभाषिक राष्ट्रात भाषेमुळे येणारे एकराष्ट्रीत्व आढळत नाही, ही वस्तुस्थिती मान्य केली होती. मात्र महाराष्ट्रातील लोकसमुहास इतिहास, भाषा, धार्मिक परंपरा, लोकाचार, ग्रामरचना, समाजघटना यामुळे आपण एका समाजाचे आहोत असे वाटते. महाराष्ट्रात जरी मराठे, महार व ब्राह्मण ह्या त्रैवर्णिकात सलोख्याचे संबंध नसले; वैश्य परंपरेचा अभाव असल्याने व्यापार-उद्योग इथल्या भूमिपुत्रांच्या ताब्यात नसला तरी ही अभावस्थिती एकभाषी महाराष्ट्र अस्तित्वात आल्यास बदलेल, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद संपुष्टात येईल असा आशावाद त्यांना वाटत होता; आणि त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

अडीच कोटींच्या महाराष्ट्रात मराठा व तत्सम जातींचे प्रमाण निम्म्याहून अधिक असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र झाला तर महाराष्ट्रात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण होईल अशी भीती काही जणांना वाटत होती; त्याची दखल घेऊन विदर्भातील लेखक ग. त्र्यं. माडखोलकर यांनी ५ जून १९४६ च्या 'तरुण भारत'च्या अग्रलेखात यावर खुलेपणाने भाष्य केले होते. मध्यप्रांत-वऱ्हाडात पावणेदोन कोटी लोकसंख्येपैकी मराठे फक्त ४० लाख आहेत; मग तिथे बहुजन समाजाच्या पुढाऱ्यांनी महाराष्ट्र एकीकरणासाठी सर्वप्रथम पुढे सरसावले पाहिजे, असा सल्लाही माडखोलकरांनी दिला होता. ना. रा. शेंडे यांनी १९४६ च्या जुलै महिन्यात नागपूर 'तरुण भारत' मध्ये संयुक्त महाराष्ट्र झाल्यास अस्पृश्य जातींना संख्येच्या मानाने प्रतिनिधित्व

दिले जाईल का, त्यांना समभावाने आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक सवलती दिल्या जातील का, असा प्रश्न उपस्थित केला होता. मध्यप्रांत-वऱ्हाडात मराठी भाषक अस्पृश्यांची संख्या साडेचोवीस लाख होती याचा निर्देशही त्यांनी या लेखात केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भाषावार प्रांतरचनेमुळे ऐक्यभावना वाढीस लागण्याऐवजी हिंदुस्थानचे अधिक तुकडे पडतील असे वाटत होते. संयुक्त महाराष्ट्र झाल्यास त्यात मुंबईचा समावेश करावा व उपप्रांत निर्माण न करता एकभाषी एकच प्रांत निर्माण करावा, अशी सूचना त्यांनी केली होती. (फडके य. दि. १९९७, पृ. ३६१-३६२)

बेळगावच्या मराठी साहित्य संमेलनात १२ मे १९४६ रोजी संमेलनाध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्र राज्याचा ठराव मांडून तो संमत करून घेतला. याच अधिवेशनात प्र. के. अत्रे यांनी महाराष्ट्राच्या एकीकरणासाठी 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन करण्यात यावी असा ठराव मांडला व तो सर्वसंमतीने मंजूर झाला. या ठरावांना बॅ. जयकर, विनोबा भावे, शंकरराव देव, काकासाहेब न. वि. गाडगीळ या नेत्यांनी पाठिंबा दिला. (आडारकर-मेनन. २००७, पृ.१५१) त्यानंतर २८ जुलै १९४६ रोजी मुंबईत शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरली. या परिषदेत "भारतातील सर्व मराठी प्रदेशाचे म्हणजे मुंबई प्रांत, मध्यप्रदेश व हैद्राबाद यातील सलग मराठी भाषी प्रदेश व गोमंतक मिळून एक राज्य निर्माण करण्याचा" ठराव पारित करण्यात आला. या सभेत केशवराव जेधे यांनी 'मराठा' ही संज्ञा जातिवाचक अर्थाने न वापरता सर्वसमावेशक अर्थाने वापरली जावी, हे सूचित केले. तसेच संयुक्त महाराष्ट्राची राजधानी मुंबई असावी अशी उपसूचना 'नवाकाळ'चे संपादक य. कृ. खाडिलकर यांनी मांडली; तिला प्रभाकर पाध्ये, पां. वा. गाडगीळ, भा. वि. वरेरकर, अनंत काणेकर इत्यादींनी पाठिंबा दिला. मात्र ही उपसूचना कदाचित वादग्रस्त ठरेल म्हणून अध्यक्षांनी ती पटलावर घेतली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात स. का. पाटील यांच्यासारख्या काही मुंबईकरांमध्ये वेगळा मतप्रवाह होता, हे यातून दिसून येते.

यानंतर संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय गाठण्यासाठी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' ही सर्वपक्षीय संघटना स्थापन करण्यात आली. १ रुपया वर्गणी देऊन ३१ ऑक्टोबर १९४६ पर्यंत १३८०३ सदस्यांची नोंदणी झाली. नोंदणीकृत सभासदांनी निवडून दिलेल्या ४४ प्रतिनिधींच्या मंडळाची१३ व १४ जानेवारी १९४७ रोजी जळगाव येथे सभा झाली. तिकडे गोमंतकात १८ जून १९४६ रोजी राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखाली गोवा मुक्ती आंदोलनालाही सुरुवात झाली होती. मात्र १८ डिसेंबर १९४७ रोजी मुंबईत झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेत अच्युतराव पटवर्धन यांच्या सूचनेनुसार पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा मुक्त होईपर्यंत गोवा महाराष्ट्रात सामील करून घेण्याचा मुद्दा बाजूला ठेवण्यात आला. (फडके, १९९७, पृ. ३७६)

### केंद्रीय नेतृत्वाची चालढकल :

काँग्रेसने १९२१ पासून इंग्रजी राजवटीतील कृत्रिम प्रांतरचना पुढे चालू ठेवण्याऐवजी एकजिनसी सांस्कृतिक घटकराज्ये निर्माण व्हावीत या भूमिकेतून भाषावार प्रांतरचनेचा

पुरस्कार केला होता. मात्र १९४७ साली फाळणीचा प्रश्न ऐरणीवर आल्यावर जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद व राजगोपालाचारी यांना हा प्रश्न तूर्तास मागे टाकावा असे वाटत होते. राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंबंधी असे भिन्न मतप्रवाह असतानाच संविधानसभेचे सदस्य पट्टाभी सीतारामय्या यांनी ऑगस्ट १९४६ मध्ये भाषावार प्रांतरचनेस अग्रक्रम देण्याची मागणी केल्यानंतर संविधानसभेने पट्टाभी सीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नियुक्त केली. या उपसमितीने १२ जून १९४७ रोजी सादर केलेल्या अहवालात, आंध्र, केरळ आणि महाराष्ट्र या वेगवेगळ्या प्रांतांची निर्मिती करण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतंत्र आयोग नेमण्यात यावा अशी शिफारस केली. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न केंद्रीय नेतृत्वाने असाच भिजत ठेवला होता. २७ नोव्हेंबर १९४७ रोजी आंध्रचे नेते एन. जी. रंगा यांनी ह्या प्रश्नाला चालना दिली. रंगा यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नेहरूंनी सध्या भारताच्या सुरक्षिततेचा व स्थैर्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्याने भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाला अग्रक्रम देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्र व कर्नाटक वेगळे केल्याने अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचाही अभ्यास करायला हवा, अशी नेहरूंची भूमिका होती. यावर महाराष्ट्रातील हरिभाऊ पाटसकर, केशवराव जेधे आणि कर्नाटकातील रंगराव दिवाकर व एस. निजलिंगप्पा यांनी पत्रक काढून तुकड्या तुकड्यांनी भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न सोडविण्याची केंद्राची भूमिका योग्य नसल्याचे आपले मत जाहीर केले.

## मुंबई विधानसभेचा ठराव :

काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न पुढे ढकलण्याच्या मुद्द्यावर ठाम असतानाच इकडे मुंबई इलाख्यात हा प्रश्न ऐरणीवर आला होता. फेब्रुवारी १९४८ च्या मुंबई प्रांताच्या विधानसभा अधिवेशनात व्यंकटराव पवार यांनी मुंबईसह महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरात राज्यांची निर्मिती त्वरित करावी व या नवनिर्मित प्रांतांचा समावेश भारतीय संविधानात करण्यात यावा, असा ठराव मांडला. या ठरावावर झालेल्या चर्चेत मतभेदाचे नवे मुद्दे पुढे आले.

गुजराती लोकांनी आपण मुंबई प्रांतातून बाहेर पडतो असे म्हटलेले नसताना वेगळ्या गुजरात राज्याची निर्मितीची मागणी योग्य नसल्याचे शि. ल. करंदीकर म्हणाले. गुजरातमधून निवडून आलेले आमदार बाबुभाई पटेल यांनीही व्यंकटराव पवार यांच्या प्रस्तावावर आपण कोठलेच मत व्यक्त करू इच्छित नसल्याचे म्हटले. मिर्झा अख्तर हुसेन यांनी भाषावार प्रांतरचनेत मुंबई शहर वेगळे ठेवावे असे मत मांडले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी सत्ताधारी काँग्रेसच्या आमदारांनी सदसद्विवेकबुद्धीवर निर्णय करावा; या प्रश्नावर मंत्रिमंडळातील सदस्य तटस्थ राहतील अशी भूमिका घेतली. विधानसभेचे अध्यक्ष फिरोदिया यांनी व्यंकटराव पवारांच्या प्रस्तावाचे दोन भाग करून मतदान घेतले. पहिल्या भागात महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात अशा भाषावार प्रांतांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव होता; तो सर्वसंमतीने मंजूर झाला. दुसऱ्या भागात मुंबई शहराचा समावेश प्रस्तावित महाराष्ट्र राज्यात करावा यावर ११सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने ६७ विरुद्ध ११ मतांनी हाही ठराव मंजूर झाला. विरोध करणाऱ्या सदस्यांत कर्नाटकातल्या ८ आमदारांचा समावेश होता.

**दार आयोग:**

भाषावार प्रांतरचनेसाठी केंद्र सरकारने १७ जून १९४८ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय आयोग नेमला. संविधान सभेचे सदस्य जगन्नारायण लाल आणि निवृत्त आय. सी. एस. अधिकारी पन्नालाल हे आयोगाचे इतर दोन सदस्य होते. आयोगाच्या चौकशीच्या कामात साक्षीदारांना प्रश्न विचारणे व इतर मदत करण्यासाठी मुंबई प्रांताचे हरिभाऊ पाटसकर, वऱ्हाड-मध्यप्रांताचे टी. एल. शेवडे, गुजरातचे कन्हयालाल मुनशी, महाकोसलचे गोपीलाल श्रीवास्तव यांचा समावेश करण्यात आला; मात्र त्यांना मत देण्याचा अधिकार नव्हता. १९ जुलै १९४८ रोजी दार आयोगाची पहिली बैठक झाली. त्यानंतर आयोगाने ज्ञापने स्वीकारण्याचे व साक्षीपुरावे नोंदविण्याचे काम सुरू केले. आंध्र, तामिळनाड, केरळ, कर्नाटक, मुंबई इलाखा, मध्यभारत व वऱ्हाड प्रांतात दौरा काढून ७०० साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या; पु. मं. लाड, स. गो. बर्वे, इत्यादींनी साक्षी दिल्या. मुंबई महापालिकेच्या वतीने स. का. पाटील व एम. यु. मस्कारेन्हस यांनी साक्षी दिल्या. आयोगाने एक हजाराहून अधिक निवेदने स्वीकारली. २१ ऑगस्ट १९४८ रोजी मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न किमान १० वर्षे पुढे ढकलण्याची आयोगाला शिफारस केली. दार आयोगाने पाठवविलेल्या प्रश्नास काय उत्तर द्यावे याची चर्चा करण्यासाठी २६ ऑगस्ट १९४८ रोजी मुंबईत पुरुषोत्तमदास ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व्यापाऱ्यांची व उद्योगपतींची सभा झाली. इंडियन मर्चंटस असोशिएशनच्या या सभेत मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करू नये असे मत पुढे आले; त्यामुळे यासंदर्भात अभ्यास करून योग्य ते धोरण ठरविण्यासाठी ६९ उद्योगपतींची समिती संघटित करण्यात आली. १४ ऑक्टोबर १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस पाठिंबा देणारे निवेदन दिले, त्यात मुंबईला महाराष्ट्राच्या राजधानीचा दर्जा देण्याचीही मागणी करण्यात आली होती. प्रशासकीय भाषेबाबत केंद्राच्या राज्यकारभाराची भाषा आणि प्रांताच्या राज्यकारभाराची भाषा एकच असावी, अशीही एक सूचनाही त्यांनी आपल्या निवेदनातून केली होती. गुजरातेतील के. के. मुन्शी यांनी मात्र भाषावार प्रांतरचनेची संकल्पनाच योग्य नसल्याचे मत व्यक्त केले होते; तसेच मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करायला आपला विरोध असल्याचेही म्हटले होते. 'भाषावार प्रांतरचना आणि मुंबईचे भवितव्य' (थि लिंग्विस्टिक प्रॉव्हिन्सिस ॲण्ड फ्यूचर ऑफ बॉम्बे) अशा शीर्षकाची एक पुस्तिका त्यांनी प्रकाशित केली होती. (मोरमकर, १९५७, पृ. २४-२५)

१३ डिसेंबर १९४८ रोजी दार आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. आयोगाने आपल्या अहवालात सध्याच्या संरक्षण, निर्वासितांचे पुनर्वसन, अन्नटंचाई, चलनवाढ इत्यादी समस्यांच्या पार्श्वभूमीवर भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लगेच हाती घेण्याची गरज नसल्याचे नमूद केले होते. तसेच राज्यपुनर्रचनेसाठी भाषा हा प्रधान निकष मानण्याची आवश्यकता नसल्याचेही म्हटले होते. भाषिक राजकारणापासून बहुभाषी मुंबईस अलग ठेवले पाहिजे, असेही मत नोंदवले होते. महाराष्ट्रीयन लोक सरंजामवादी, आक्रमक वृत्तीचे असल्याची शेरेबाजीही केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भरघोस मतैक्य नसल्यामुळे विदर्भासह महाराष्ट्राची निर्मिती

करणे शक्य होणार नसल्याचा अभिप्राय आयोगाने दिला होता.

महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी दार आयोगाच्या अहवालाचा निषेध केला. मुकुंदराव जयकर यांनी अहवाल हास्यास्पद असल्याचे म्हटले (द टाइम्स ऑफ इंडिया, १४ डिसेंबर १९४८) शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांनी महाराष्ट्रातील जनतेने 'संयुक्त महाराष्ट्रासाठी लढण्याची तयारी करा असे आवाहन केले. कायदेमंडळातील मराठी भाषक आमदारांनी, मंत्र्यांनी व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांनी राजीनामे देऊन ताबडतोब अधिकारत्याग करावा व संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर नव्या निवडणुका लढवाव्यात; तसेच जनतेने संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होईपर्यंत कुठल्याही प्रकारचे सरकारचे कर भरू नयेत, मुंबईसह मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व भागातून एक दिवस हरताळ पाळण्यात यावा, असेही आवाहन करण्यात आले. या परिपत्रकातूनच शंकरराव देव, गोपाळराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ या पुढाऱ्यांनी एकत्र येऊन पुढच्या लढ्याचा कृतिकार्यक्रम तयार करावा अशी विनंती करण्यात आली. (मौज, २ फेब्रुवारी १९४९/ फडके, २००७, पृ. ६६)

**'जवप' समितीचा अहवाल:**

१५ डिसेंबर १९४८ रोजी काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात काकासाहेब न. वि. गाडगीळ यांनी दार आयोगाच्या अहवालावर जोरदार टीकास्त्र सोडले. काँग्रेसजनांचा हा नाराजीचा व निषेधाचा सूर लक्षात घेऊन भाषावार प्रांतरचनेचा तिढा सोडविण्यासाठी जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सीतारामय्या यांची *('जवप')* उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली. पट्टाभी सीतारामय्या यांच्याकडे समितीचे अध्यक्षपद सोपविण्यात आले. समितीने कुणाचीही साक्ष न नोंदवता ५ एप्रिल १९४९ रोजी आपला अहवाल प्रसिद्ध केला. नुकत्याच मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचे रक्षण करण्याला अग्रक्रम देणे आवश्यक असल्याने भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न बाजूला ठेवणे भाग असल्याचे समितीने अहवालात म्हटले होते. या प्रकारच्या राज्य पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू झाल्यावर जातीयवाद, प्रांतवाद अशा फुटीर प्रवृत्तींना उत्तेजन मिळण्याची भीती आहे, असे समितीला वाटत होते. मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करता येणार नसल्याचेही समितीने आपले मत स्पष्टपणे नोंदविले होते. (फडके, २००७, पृ. ६४-६५)

जवप समितीच्या या अहवालावर भाऊसाहेब हिरे यांनी सडकून टीका केली. ९ एप्रिल १९४९ रोजी पुण्याच्या जाहीर सभेत भाषण करताना भाऊसाहेब हिरे म्हणाले की, "काँग्रेस श्रेष्ठींनी दिलेला हा निर्णय म्हणजे महाराष्ट्राचा उघड उघड अपमान आहे. हा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही. परकीय राज्यकर्त्यांनी जे विच्छेदीकरण केले नाही ते काँग्रेस श्रेष्ठींच्या निर्णयामुळे झाले आहे. यावेळी जर आपण जागरूक राहिलो नाही तर पुढच्या पिढीच्या शापास आपण कारणीभूत होऊ. मुंबईसह महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्र कालत्रयी सोडणार नाही. (विविधवृत्त, १७ एप्रिल १९४९/ फडके, २००७, पृ. ६५)

आचार्य प्र. के. अत्रे यांनी १९४६ च्या बेळगावच्या साहित्यसंमेलनापासून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोरदार पुरस्कार केला होता. १९४९ साली भायखळा-परळ मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांच्या उमेदवारीला

पाठिंबा देताना संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा देण्याचे वचन त्यांच्याकडून घेतले व १७ एप्रिल १९४९ च्या साप्ताहिक 'नवयुग'मध्ये 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा मथळ्याचे पत्रक प्रसिद्ध केले. हा लेख संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरील 'अत्र्यांची सिंहगर्जना' म्हणून ओळखला जातो.

'जवप' समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर मुंबई महापालिकेतील नगरसेवक डॉ. व्ही. एस. मठकर यांनी १८ एप्रिल १९४९ रोजी महापालिकेच्या सभेत मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती करण्यात यावी, असा ठराव मांडला. काँग्रेस पक्षाचे महापालिकेतील नेते डाह्याभाई पटेल यांनी 'जवप' समितीच्या शिफारशी स्वीकाराव्यात अशी ठरावाला दुरुस्ती सुचविली, तिला महापालिका सदस्यांकडून पाठिंबा मिळाला नाही. मात्र राष्ट्रहिताच्या मुद्यावरून या ठरावावरील चर्चा बेमुदत तहकूब करण्याची डॉ. एम. यू. मस्कारेन्स यांची दुरुस्ती-सूचना पारित झाली. सप्टेंबर १९४९ च्या पोटनिवडणुकीमुळे प्र. के. अत्रे मुंबई महापालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यांनीही महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव मांडला; परंतु काँग्रेसने दुरुस्ती सूचना पारित करून हाही ठराव बेमुदत तहकूब करण्यात बाजी मारली. (फडके, २००७, पृ. ६८-६९) सेनापती बापट यांनी जुलै १९४९ मध्ये 'संयुक्त महाराष्ट्रासाठी सत्याग्रहाची हाक' या नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली व संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे नेते शंकरराव देव यांनी कुठलीच ठोस भूमिका न घेतल्याने स्वतंत्रपणे 'संयुक्त महाराष्ट्र मंडळ' स्थापन करून दर रविवारी मुंबईत जनजागृतीसाठी फेऱ्या काढण्याचे सत्र सुरू केले. (आडारकर-मेनन,२०७,१५४)

'जवप' समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर २० ऑक्टोबर १९४९ ला भाऊसाहेब हिरे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या कार्यकारिणीची मुंबईत सभा झाली. त्यात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या ध्येयाचा पुनरुच्चार करण्यात आला. महाराष्ट्र काँग्रेसच्या या भूमिकेमुळे शंकरराव देव यांच्यासमोर पेच निर्माण झाला. ते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस होते; त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या मताला सहमती दर्शविल्यास राष्ट्रीय काँग्रेसच्या बांधिलकीशी ती प्रतारणा होईल असे वाटल्याने आपल्या या दुहेरी निष्ठेची त्यांनी सभेत जाहीर कबुली दिली. अर्थात पुढे २० व २१ सप्टेंबर १९५० रोजी नाशिकला काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात पंतप्रधान नेहरू व उपपंतप्रधान वल्लभभाई पटेल व्यासपीठावर उपस्थित असताना स्वागताध्यक्षाच्या भाषणात भाऊसाहेब हिऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मौन पाळले. या दुहेरी निष्ठांमुळे काँग्रेसच्या वर्तुळात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची धग काहीशी कमी झाली.

१९५० साली स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात आली. घटनेच्या २९ व्या कलमानुसार भारताच्या कोणत्याही भूभागावर राहणाऱ्या नागरिकांना त्यांची भाषा, लिपी व संस्कृती या गोष्टींचे स्वातंत्र्य असून त्यांचा आपली भाषा जतन करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. घटना अस्तित्वात आल्यादिवसापासून मध्य प्रदेश सरकारने घटनेतील कलम ३४५ अन्वये राज्यकारभार व न्यायिक कारभाराची भाषा म्हणून हिंदी व मराठी भाषांना

मान्यता देऊन, या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी सुरू केली. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न न सुटल्याने प्रजासत्ताक भारताच्या निर्माणानंतर महाराष्ट्राचे भविष्य मात्र अनिश्चिततेच्या चक्रात अडकून पडले होते.

## संयुक्त महाराष्ट्र आणि जातिवाद :

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्ताने वेळोवेळी ज्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत, त्या पाहता महाराष्ट्राची वैचारिक मूस जाती-वर्गभेदांच्या मानसिकतेने दुभंगलेलीच होती असे सर्वसाधारण चित्र नजरेसमोर येते. मराठी माणसाच्या वैचारिक गोंधळाच्या निदर्शक अशा काही निवडक प्रतिक्रिया येथे नमूद करीत आहोत :

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे मुंबईत प्रांतीय भावना वाढीला लागून मजुरा-मजुरांत तंटे होतील. किर्लोस्कर, डहाणूकर वगैरे मोजक्या मराठी भांडवलदारांनी महाराष्ट्राच्या अर्थकारणावर वर्चस्व गाजविणाऱ्या परप्रांतीय भांडवलदारांना हाकलून लावण्यासाठी ही चळवळ चालवली आहे. "इकडे परकीय भांडवलदार आम्हाला पिळतात म्हणून जिवाचा संताप होतो. तर तिकडे संयुक्त महाराष्ट्र झाला तर बहुजन समाज आपणास खाऊन टाकील की काय ही भीती वाटते. त्यातल्या त्यात कोकणच्या मनात देशाबद्दल अढी, विदर्भींबंधूंच्या मनात पुण्याबद्दल शंका हे प्रकार आहेतच." (भागवत वि. पु.१९४९ पृ.३)

संयुक्त महाराष्ट्र चळवळीने समाजवादी भूमिकेवर एकत्र यावे व महाराष्ट्रनिर्मितीसाठी शुद्ध सनदशीर लढा उभा करावा असे आवाहन ना. ग. गोरे यांनी केले होते. ना. ग. गोरे यांच्या लेखावर आचार्य जावडेकर यांनी आपली प्रतिक्रिया देताना लिहिले होते की, "महाराष्ट्राने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून भांडवलशाहीविरोधी समाजवादी क्रांतिशक्ती निर्माण केली पाहिजे. महाराष्ट्रातील महार, मराठे, व ब्राह्मण लोकशाही समाजवादाच्या भूमिकेवर एक होतील तर संयुक्त महाराष्ट्राचे राजकारणही यशस्वी होईल आणि महाराष्ट्र अ. भा. राजकारणात पुन्हा आघाडीवर येईल." (भागवत वि. पु. १९४९, पृ. ५-६)

काका कालेलकर यांनी लिहिले होते की, "महाराष्ट्रातून जातिभेद आणि उच्चनीच भाव यांचे विष अजून गेलेले नाही. म्हणूनच गुजरात-महाराष्ट्राच्या एकीकरणाची कल्पना महाराष्ट्राच्या अजून डोक्यात शिरत नाही. रूढी आणि आत्मप्रौढी यांचे दास बनलेल्या ब्राह्मणांना व्यापक एकीकरणाची कल्पना जर पटणार नाही तर त्याचे आश्चर्य वाटावयास नको." (भागवत वि. पु. १९४९,पृ. ५८)

लक्ष्मणशास्त्री जोशी : महाराष्ट्र समाज तीन प्रकारांनी भंगलेला आहे. "ब्राह्मणादी पांढरपेशा हा निराळा महाराष्ट्र आहे. मराठे, माळी,कुणबी, सुतार, तांबट, लोहार इत्यादी सदृश्य मागासलेला महाराष्ट्र निराळा आहे; आणि महार, मांग, चांभार इत्यादी बहिष्कृत जाती हा निराळा महाराष्ट्र एकत्र आणून संयुक्त महाराष्ट्र कसा बनेल हाच मूलगामी प्रश्न आहे." (भागवत वि. पु. १९४९, पृ. ६२-६३)

वा. दा. गाडगीळ यांनी लिहिले होते : "आरएसएसच्या योगाने ब्राह्मणांनी व गांधीवधानंतर ब्राह्मणेतरांनी आपली नालायकी सिद्ध केल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र होण्यास थोडी दिरंगाई

झाल्यास अथवा मुंबई महाराष्ट्रापासून काही काळ वेगळी राहिल्यास असे काय ब्रह्मपातक होणार आहे की ज्यासाठी *'महाराष्ट्र लढेल पण मरणार नाही'* असे निर्वाणीचे उद्गार केसरीकारांनी काढावेत? लढायचेच असेल तर तो प्रसंग संयुक्त महाराष्ट्र होताच मनमुराद घडून येईल." (भागवत वि. पु.१९४९,पृ. ५३)

ना. गो. चापेकर यांच्या मते "आमच्यामधील काही व्यक्ती गांधी तत्त्वज्ञान पटवून घेऊन काँग्रेसमध्ये सामील झाल्या हे खरे; पण त्यांच्यातही 'महाराष्ट्र' मधून मधून डोकावतोच... दुर्दैवाने अखंड एकजिनसी देशाचे ध्येय फारच थोड्या लोकांपुढे आहे. भाषा अखंड देशाची आणि कृती संयुक्त महाराष्ट्राची! संयुक्त महाराष्ट्राचा अभिमान धरला की त्याच्या मागोमाग भगवा झेंडा, जरीपटका, मराठी भाषा यांचा गौरव आलाच. अखंड देशात आपणास स्थान कदाचित लाभणार नाही ही अंत:स्थ भीती आपणामध्ये असतेच." (भागवत वि. पु. १९४९, पृ. १७)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात अल्पसंख्यांकांच्या हितासाठी छोट्या राज्यांची शिफारस केली होती. आपल्या युक्तिवादाचे समर्थन करताना त्यांनी म्हटले होते की, "A small stone of a consolidated majority placed on the chest of minority may be borne. But weight of a huge mountain it cannot bear. It will crush minorities. Therefore creation of smaller states is a safeguard to the minorities." (Government of Maharashtra, 1979, p. 169)

अर्थात, जातिवादामुळे चिरफळ्या झालेल्या महाराष्ट्रात भाषेच्या आधारे ऐक्यभावना जोपासता येईल, असा आशावाद असणाऱ्यांचाही एक गट होता. रामराव देशमुख यांनी म्हटले होते की, "प्रांत हा भौगोलिक घटक असून प्रांतीयता ही एक मनोवृत्ती आहे. धर्मवेड आणि प्रांतवाद यांच्या आहारी मराठे कधीच गेले नाहीत.. ज्यांना उज्ज्वल इतिहास आहे, तेच त्याचा योग्य अभिमान वाहतात; व ज्यांची परंपरा आणि इतिहास ही दोन्ही राष्ट्ररक्षणाची आहेत, तेच पुन्हा राष्ट्ररक्षणार्थ ईर्ष्येने उभे ठाकतील. महाराष्ट्राच्या ठिकाणी या दोन्ही गोष्टी आहेत म्हणून राष्ट्रनिर्मितीच्या गुणात तो मागे पडणार नाही. किंबहुना धर्मनिरपेक्ष लोकराज्याला महाराष्ट्राचा पाठिंबा हा अधिक कळकळीचा राहील. कारण महाराष्ट्र हा बुद्धिवादी आहे." (संयुक्त महाराष्ट्र परिषद, मुंबई, अध्यक्षीय भाषण, १६ ऑक्टोबर १९४८, पृ. १३; / फडके, २००७, पृ. ५८)

### सीमावाद :

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नात सीमावादाचे काही कळीचे प्रश्न होते, तेही या काळात ऐरणीवर आलेले दिसतात. गुजरात व महाराष्ट्र सीमारेषा आणि क्षेत्रमर्यादेच्या संदर्भात 'महागुजरात सीमा समिती' संघटित झाली होती. कस्तुरभाई लालभाई, दिवाणबहादूर जव्हेरी, हर्षदभाई दिवेटिया हे समितीचे संघटक म्हणून क्रियाशील होते. समितीला अभिप्रेत असलेल्या संकल्पित गुजरातच्या नकाशात राजस्थानचा अबू पहाडचा प्रदेश, महाराष्ट्रातील तळोदा, शहादा, नंदुरबार, पिंपळनेर, बागलाण, दिंडोरी, नाशिक, ठाणे. खानदेशपासून ठाण्यापर्यंतचा ईशान्येचा आदिवासी वस्तीचा प्रदेश. दरमपूर, बासंदा संस्थानी मुलुख अभिप्रेत होता. गुजरात-महाराष्ट्र सीमा व गुजरातची

क्षेत्रमर्यादा ठरविण्यासाठी १९४८ नंतर चर्चा-संवादाच्या बऱ्याच फेऱ्या झाल्या. ३ ऑक्टोबर १९४८ रोजी संजाण येथे भरलेल्या ठाणे जिल्हा गुजराती परिषदेने 'संयुक्त महाराष्ट्र नको; झाल्यास त्यात ठाणे जिल्हा नको' अशा आशयाचा ठराव पारित केला. (फडके,२००७,पृ.१२६) त्यानंतर २५ फेब्रुवारी १९४९- शिरगाव (भिलाड) येथे बॅ. रघुनाथ पिपुटकर यांच्या अध्यक्षतेखाली, १८ मार्च १९४९ रोजी पालघर येथे भाऊसाहेब हिरे यांच्या अध्यक्षतेखाली, २८ मे १९४९ रोजी कल्याण येथे, ५ व ६ नोव्हेंबर १९४९ रोजी तारापूर येथे ठाणे जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदेची अधिवेशने झाली. या विविध अधिवेशनांतून पुढे आलेल्या सूचनांपैकी रंगनाथ ग. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र व गुजरात सरहद्दीवरील १० लाख आदिवासी वस्तीच्या सलग तालुक्यांचा एक नवा ठाणे जिल्हा बनवावा व त्यात ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव, डहाणू, पालघर, जव्हार, मोखाडा, वाडा, शहापूर तालुके; नाशिक जिल्ह्यातील चांदवड, कळवण, बागलाण, सुरगाणा, पेठ, दिंडोरी तालुके; डांग जिल्हा; पश्चिम खानदेशातील नेवासा, तळोदे, अक्राणी, शहादे, सिंदखेड, नंदुरबार, नवापूर, साक्री तालुके; नगर जिल्ह्यातील नेवासा, अकोला, संगमनेर तालुके यांचा समावेश केला जावा यावर बराच विचार झाला.

**डांगचा प्रश्न :**

डांग जिल्ह्याचा प्रश्न हा सर्वात वादग्रस्त प्रश्न होता. डांग जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६६० चौ. मैल; लोकसंख्या ४७२२८; प्रामुख्याने भिल्ल, कोकणे, वारली, काठोडी या आदिवासींची वस्ती. क्षेत्रीय सीमा : पश्चिमेस सुरत जिल्हा, आग्नेय व पूर्वेस खानदेश व नाशिक जिल्ह्याच्या हद्दी; दक्षिणेला नाशिक जिल्हा अशा होत्या. ब्रिटिश अमदानीत मागासलेल्या भागांचा स्वतंत्रपणे विकास करावा म्हणून डांग हा गव्हर्नरच्या ताब्यात होता. डांगचे प्रशासकीय नियंत्रण पूर्वी खानदेशच्या जिल्हाधिकाऱ्याकडे होते.१९०३ सालापासून ते सुरतच्या जिल्हाधिकाऱ्याकडे गेले आणि १९३३ ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत हिंदुस्थान सरकारच्या वतीने बडोदे संस्थानातील पोलिटिकल एजंटकडे होते. स्वातंत्र्यानंतर तो गव्हर्नरच्या ताब्यातून मुक्त झाला व प्रांतिक राज्याच्या कक्षेत आला. हिंदुस्थान सरकारने एका जाहीरनाम्याद्वारा हा जिल्हा कायमचा स्वतंत्र राहिला पाहिजे असा ठराव केला होता. बडोदे संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाल्यानंतर डांगसाठी वेगळा जिल्हाधिकारी नेमण्यात आला. भाऊसाहेब हिरे यांनी सरकारकडे शिल्लक असलेल्या ६०-७० लाख रुपयांतून डांग भागात रस्ते बांधले, तेथील आदिवासींना घरे बांधून दिली, शाळा काढल्या. डांग जिल्ह्यात उत्कृष्ट लाकूड होते. ईस्ट इंडिया कंपनीने जहाज बांधणीसाठी ह्या लाकडांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला होता. बिलिमोरापासून समुद्र जवळ होता, त्यामुळे कंपनीने वेस्टर्न रेल्वेच्या बिलीमोरा स्टेशनपासून वघईपर्यंत ४० मैलांचा रेल्वे फाटाही नेला होता. गुजरातेतील लाकडाचे ठेकेदार हे लाभार्थी होते. त्यांना डांग गुजरातेत हवा होता.

डांग मुंबई राज्यात आल्यानंतर डांगची भाषा कोणती असा प्रश्न निर्माण झाला. जुलै ते ऑक्टोबर १९४८ या काळात नाशिक जिल्ह्यात दत्तोपंत बिडकर, नानू दीक्षित, अनंता लहानू

जाधव यांनी 'डांग सेवा मंडळ' नावाची संस्था काढली होती. त्यांचे म्हणणे होते डांगी लोकांची भाषा मराठी आहे. गुजरातचेही आदिवासी सेवा मंडळ होते. नायक हे त्याचे संचालक होते. हे मंडळ गुजराती ही डांगची भाषा आहे, असा दावा करीत होते. १९४६-४७ साली मंत्रिमंडळ सत्तारूढ झाल्यावर बाळासाहेब खेर यांनी मोरारजी देसाई यांना बरोबर घेऊन डांगचा दौरा केला. खेर मराठीत व मोरारजीभाई गुजरातीत भाषण करायचे; व भाषणाच्या शेवटी तुम्हाला मराठी समजले की गुजराती? असा प्रश्न विचारीत. सर्व सभांतून मराठी समजले असा हात वर आला. तेव्हा मुंबई सरकारने २ मे १९४९ रोजी एका ठरावान्वये मराठी ही डांगची भाषा असल्याचे जाहीर केले. १९५० च्या खानेसुमारीतही ९५ टक्के लोकांनी मराठी ही आपली भाषा असल्याचे मत दिले.

डांग महाराष्ट्राचा की गुजरातचा असा प्रश्न निवडणुकीपूर्वी निर्माण झाला. दिल्लीच्या संसदेने डॉ. बक्षी टेकचंद, एच. सी. मुकर्जी, व रे. फादर डिसुझा ही त्रिसदस्य समिती नेमली. समितीपुढे गुजरातच्या वतीने के. एम. मुनशी व महाराष्ट्राच्या वतीने काकासाहेब गाडगीळ यांनी बाजू मांडली. मुनशी यांनी डांगचा एक नकाशा सादर केला व त्यात सुरतेच्या बाजूने डांगकडे सपाट जमीन व नाशिककडून डांगकडे येताना मोठमोठे डोंगर दाखविले होते. सुरत व डांग सपाटीवर असल्याने डांग गुजरातला जोडावा असा युक्तिवाद केला. देवगिरीकर यांनी लष्करी नकाशे मिळवले होते, ते गाडगीळांनी समितीपुढे मांडले. त्यात सुरतेकडूनही डोंगर असल्याचे दाखविलेले होते. स्वाभाविकच मुनशी यांनी सादर केलेले नकाशे परत घेतले. मुनशी यांनी ग्रिअर्सनच्या भाषा सर्वेक्षणाचा निर्देश केला; मात्र तो गुजरातच्या उपयोगी आला नाही. अखेर निवडणुकीपुरता डांग नाशिकला जोडावा असा निकाल देण्यात आला. (देवगिरीकर, १९६५, पृ. १७६-१८३)

१९५० साली स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई राज्यातल्या मतदारसंघांच्या सीमानिश्चितीसाठी समिती संघटित करण्यात आली. तेव्हा समिती सदस्य भाऊसाहेब हिरे यांनी केलेल्या सूचनेवर मतदान होऊन डांग जिल्हा नाशिक जिल्ह्यास जोडण्याची शिफारस मान्य झाली. १४ सप्टेंबर १९५० च्या राजपत्रात नाशिक जिल्ह्यास डांगसकट विधानसभेच्या २ जागा देण्याची शिफारस करण्यात आली. (मात्र १९५१ साली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर भाषेचा मुद्दा महत्त्वाचा की प्रशासनाचा यावरून मतभेद झाले. याविषयीची चर्चा पुढील खंडात येणार आहे.)

**बेळगावचा प्रश्न :**

मराठी भाषकांची संख्या बेळगाव जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात ९४ टक्के, खानापूर तालुक्यात ५७ टक्के व बेळगाव तालुक्यात ४६ टक्के होती. मुंबई राज्यातील नॉर्थ कॅनरा नावाच्या जिल्ह्यात ८ तालुके आणि ३ पेठा मिळून हा प्रदेश समाविष्ट होता. कारवार, हळियाळ व सुपा पेठेत मराठी भाषकांचे प्रमाण ५५ टक्क्यांहून अधिक असल्याने हा भाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा अशी महाराष्ट्र एकीकरण समितीची मागणी होती. सुपा तालुक्यात १२ टक्के मराठी व ७८ टक्के कोकणी भाषक; कारवारमध्ये ३ टक्के मराठी व ७० टक्के कोकणी भाषक,

हळियाळमध्ये ५३ टक्के कोकणी भाषक होते. मात्र कर्नाटक काँग्रेस कमिटी 'कोकणी' ही मराठीची बोली असल्याचे मान्य करीत नव्हती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्रश्न निर्माण झाले होते. (फडके, २००७, पृ. १३०)

भाऊसाहेब हिरे यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल १९४९ व ७-८ जानेवारी १९५० अशी कारवारमध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेची दक्षिण भागातील दोन अधिवेशने झाली होती. यानंतर कर्नाटक एकीकरण महासमिती विसर्जित करण्यात आली. (१९५० नंतर संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या संदर्भात झालेल्या हालचालींचा वृत्तांत पुढील तिसऱ्या खंडात दिला जाईल.)

## १.१७. भारतीय राज्यघटना :

१९४७ ते १९५० या काळात मुंबई प्रांतात असंतोषाचे वारे वहात होते; मात्र राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र भारताच्या घटना समितीचे काम सुरू होते. घटना समितीने नवी राज्यघटना तयार करण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर टाकली. राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याची पार्श्वभूमी राष्ट्रीय काँग्रेसने आधीच करून ठेवली होती. भारतातल्या या राष्ट्रीय संघटनेने अमेरिकन काँग्रेसच्या धर्तीवर आपल्या संस्थेचेही नामकरण 'काँग्रेस' असे केले होते; त्यामुळे अमेरिकेची राज्यघटना हा भारतीय काँग्रेससमोर नमुनादर्श असावा असे मानायला वाव आहे. अमेरिकेप्रमाणेच अनेक राज्यांचे मिळून एक संघराज्य असे हिंदुस्थानचे भविष्य एतद्देशीय राजनीतीज्ञांच्या समोर असावे. १९१६ च्या लखनौ करारात काँग्रेसने स्वायत्ततेची मागणी करताना *'प्रातिनिधिक सरकार'*ची संकल्पना गृहित धरली होती. भारतमंत्री माँटेग्यू यांनी १९१७ मध्ये काढलेल्या घटनात्मक सुधारणेच्या जाहीरनाम्यात भारताला *'जबाबदार सरकार'* देण्याचे आश्वासन दिले होते. घटना समितीने चर्चेला घेतलेला मसुदाही जबाबदार राज्यपद्धतीचाच होता. ही घटना समिती सर्वपक्षीय होती, आणि या घटना समितीलाच हंगामी संसदेचा दर्जा देऊन स्वतंत्र भारताचे पहिले मंत्रिमंडळ बनविण्यात आले होते. काँग्रेस समाजवादी पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष यांनी मात्र घटनासमितीत सहभागी व्हावयाचे नाकारले होते. घटना परिषदेत महाराष्ट्राचे ७ सभासद होते. शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, बापुसाहेब गुप्ते, हरिभाऊ पाटसकर, केशवराव जेधे, बाळासाहेब खेर, हरिजनांतर्फे रा. म. नलावडे हे महाराष्ट्रातील सदस्य होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना परिषदेने घटनेचे तिसरे वाचन मंजूर केले. २६ जानेवारी १९५० रोजी नव्या घटनेचा अंमल सुरू होणार होता. देवगिरीकरांनी तातडीने या घटनेचा मसुदा मिळवून त्याचे मराठीत भाषांतर केले व २६ जानेवारीलाच ते पुस्तकरूपात प्रकाशित केले.

कुठल्याही देशाचा राज्यकारभार चालविण्याचे तत्त्व आणि कार्यपद्धती याविषयीच्या सूत्रांचा संच राज्यघटनेच्या माध्यमातून उपलब्ध होत असतो. इंग्लंडची राज्यघटना अलिखित असली तरी संसदीय राज्यपद्धतीची मूलतत्त्वे लक्षात घेऊनच तिथे कायदे केले जातात. १६८८ साली इंग्लंडमध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा कायदा झाला. जगातल्या बहुतेक लोकशाहीवादी राज्यघटनांनी संसदीय राज्यपद्धती आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे तत्त्व प्रमाण मानलेले आहे. अमेरिकेन राज्यघटना लोकनियुक्त प्रजासत्ताक गणराज्य व अध्यक्षीय

शासनपद्धतीच्या तत्त्वावर आधारलेली आहे. संघराज्यपद्धती, लोकनियुक्त वरिष्ठ सभा, सत्ताविभाजनाचा सिद्धांत, न्यायपालिकेची स्वायत्तता ही अमेरिकन राज्यघट्नेची मूलतत्त्वे आहेत. स्वित्झर्लंडच्या घटनेत जनमताचा आदर करण्यावर भर असून जनतेला कायदा सुचविण्याचा व प्रतिनिधी परत बोलावण्याचा अधिकार देण्यात आला आहे. पहिल्या महायुद्धानंतर व हिटलरच्या अतिरेकी हस्तक्षेपापूर्वीची जर्मनीची 'वायमार राज्यघटना' नागरिकांचे मूलभूत हक्क जपणारी, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, या मूल्यांना प्राधान्य देणारी राज्यघटना होती. या घटनेने दरडोई मताधिकार, गुप्त मतदानपद्धती, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा अधिकार, धर्मसत्ता व राज्यसत्ता अलग ठेवण्याचे तत्त्व, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, कामगारांच्या हक्कसंरक्षणासाठी कामगार मंडळे स्थापन करण्याची पद्धत इत्यादी लोकल्याणकारी तरतूदी असणारी राज्यघटना अस्तित्वात आणली होती. अशा विविध राज्यघटनांचे नमुनादर्श घटनासमितीसमोर होते. नवी राज्यघटना रचताना जनतेने पाहिलेल्या स्वतंत्र राष्ट्राच्या स्वप्नांच्या पूर्ततेला पोषक अशी राज्यकारभाराची सूत्रे देण्याबरोबरच प्रचलित समाजपद्धतीतील दोषांचे, विकासाच्या संधींच्या अभावाचे जे नकारात्मक पैलू असतील ते दूर करणाऱ्या तरतूदी राज्यघटनेत करावयाच्या होत्या. भारतीय समाजावर पुरुषसत्ताक मूल्यदृष्टींचा प्रभाव असल्याने स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळत असे, किंवा धर्म वा जातीय उतरंडीतील श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या पारंपरिक धारणांमुळे सर्वांना समान सन्मानाची वागणूक मिळत नव्हती, विकासाच्या संधी कुंठित होत होत्या, हे अवगुण दूर सारण्यासाठी भारतीय घटनेत नव्या बदलांच्या दिशा दर्शविणारी पायाभूत सूत्रे अंतर्भूत करावयाची होती.

राजकीय व सामाजिक लढ्याच्या या सर्व वाक्-वळणातून वाटचाल करीत १९५० साली स्वतंत्र भारताची 'सेक्युलर' राज्यघटना निर्माण झाली व समताधिष्ठित राष्ट्रवादाची आणि सर्वधर्मसमभावाची सम्यक वाट प्रशस्त करणारी राजनीती रूजविण्यापर्यंत आपण मजल मारली. समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मूल्यांवर अधिष्ठित, सर्वधर्मसमभावाचे मूल्य प्रमाण मानणारी, समाजातील स्पृश्यास्पृश्यभाव वा पुरुषसत्ताक वर्चस्ववाद मिटविण्याचा मार्ग प्रशस्त करणारी, मताधिकाराचा विस्तार करून राज्यकारभारात सर्व प्रौढांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहयोग अपेक्षिणारी राज्यघटना ही स्वातंत्र्याचे सुराज्यात रूपांतर करण्याची नवी संधी निर्माण करणारी घटना होती. शिक्षण, रोजगार आणि राजकीय सत्तेत वंचित गटांना योग्य प्रतिनिधित्व देऊन पारंपरिक विषमतेच्या बंदिस्त वर्तुळांतून प्रजाजनांना मुक्त करणारी ही राज्यघटना स्वातंत्र्योत्तर भारतीयांच्या स्वप्नपूर्तीचा मार्ग प्रशस्त करणारी आहे, याविषयी कुणाचे दुमत नाही.

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर अधिष्ठित धर्मनिरपेक्ष गणराज्य ही स्वतंत्र भारताची नवी ओळख नमूद केली आहे. प्रौढ मताधिकार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, संघराज्याच्या कुठल्याही भागात निवासाचे स्वातंत्र्य हे नागरिकांचे मूलभूत हक्क व नागरिकांची कर्तव्ये , व

अन्य मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेच्या सरनाम्यात करण्यात आला आहे. ( मालमत्ता धारण करण्याचा मूलभूत हक्क मात्र १९७८ सालच्या ४४ व्या घटनादुरुस्तीनंतर वगळण्यात आला.) नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारा कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध करण्यात आला असून, असा कायदा केल्यास तो रद्द ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षतेचे (Secularism) तत्त्व स्वीकारले व देशातील लोकांना जातिधर्मनिरपेक्ष नागरिकत्व बहाल केले. प्रत्येक नागरिकाला आपापल्या धर्माप्रमाणे उपासना करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आणि धार्मिक तत्त्वावर हक्क-कर्तव्यात भेदभाव होणार नाही याची हमीही मिळाली. अस्पृश्यता नष्ट करण्यात आल्याचे घटनेतच नमूद करण्यात आले. सार्वजनिक पाणवठे, उपहारगृहे, करमणुकीची ठिकाणे, तलाव, घाट यांच्या वापरात पक्षपात केला जाणार नाही, वेठबिगारीस व १४ वर्षाखालील मुलास बालमजूर ठेवण्यास मनाई करण्यात आली. प्रादेशिक मंडळे स्थापन करून विकासाचा अनुशेष भरून काढण्याचीही व्यवस्था घटनेत अंतर्भूत करण्यात आली. धार्मिक-भाषिक अल्पसंख्यांकांना शिक्षणसंस्था चालविण्याचा अधिकार देण्यात आला; मात्र सरकारी अनुदान घेऊन चलविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेत धर्मशिक्षण देता येणार नाही, असे बंधनही घालण्यात आले. घटनेने प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा हक्क प्रदान केल्यामुळे स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, मालक-मजूर अशा समाजातील सर्व घटकांना आपल्या पसंतीचे सरकार निवडण्याचा हक्क प्राप्त झाला. राज्याचे धोरण ठरविण्यात, राज्यकारभारातील निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा जनतेला दिलेला अधिकार ही भारतीय राज्यघटनेची फार मोठी जमेची बाजू होती. यापूर्वी राजेशाहीमुळे, जमीनदार-सुभेदारांच्या सत्तास्थानांमुळे किंवा आपल्या संस्कृतीबाहेरच्या वासाहतिक राजवटीतल्या परात्मतेमुळे राज्यव्यवहारापासून निरंतर दूर राहिलेल्या जनतेत एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला, ही सर्वात मोठी फलश्रुती म्हणायला हवी. राज्यघटनाशास्त्राप्रमाणे नवा राजकीय समाज घडविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या अभावांवर मात करण्याचे मार्गदर्शन पुरविणारी आदर्श संहिता म्हणून भारतीयांनी नव्या राज्यघटनेचा स्वीकार केला.

भारतीय संविधान अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक-आर्थिक जीवनात कोणते बदल झाले,भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा महाराष्ट्राच्या संदर्भात कसा विचार झाला. राष्ट्रीय पातळीवरील आर्थिक-राजकीय धोरणांचा महाराष्ट्राच्या विकासावर काय परिणाम झाला याचा तपास पुढच्या तिसऱ्या खंडात करावयाचा आहे. विशेषत: नव्या राज्यघटनेच्या चौकटीत समाजाची पुनर्घटना होताना महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्य-अस्पृश्यभाव, जातीय अस्मिता, हिंदू-मुसलमानांतील दुरावा, ग्रामीण, आदिवासी आणि नागर समूहातील अंतर संपेल का याचा बारकाईने तपास करावा लागणार आहे. भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आल्यानंतर राष्ट्रीय ऐक्यभावनेने सर्व प्रांतांचा एकराष्ट्रसमुदाय म्हणून स्वातंत्र्योत्तर भारताची वाटचाल कशी होत गेली याचा मागोवा घ्यावा लागणार आहे.लोकशाही

मूल्यांना अनुसरणाऱ्या समाजात विज्ञाननिष्ठा रूजविण्याचे आव्हान आपण कितपत पेलू शकू हेही एक आव्हान होतेच; त्यामुळे धर्म, भाषा, संस्कृतीच्या अस्मितेच्या राजकारणापलीकडे जाऊन नवा विज्ञाननिष्ठा जोपासणारा विवेकवादी समाज घडविणाऱ्या राजकारणाचा प्रवास कसा असेल याचा तपास करावयाचा आहे. स्वातंत्र्यलढ्यानंतरच्या राजकीय नेतृत्वातील बदल, नव्या नेतृत्वाचे आगमन, राजकीय शिक्षणाच्या व्यवस्था उभ्या करण्यासाठीचे प्रयत्न इत्यादी अंगांनी पुढील तपास अभिप्रेत आहे; त्यादृष्टीने हा पन्नास वर्षांचा मागोवा आपल्याला पार्श्वभूमीसाठी उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

## १.१८. इतिकथन :

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या पन्नास वर्षांच्या राजकीय वाटचालीचा मागोवा घेताना भारतीय राजकीय विचारांची पायाभूत बैठक प्रामुख्याने महाराष्ट्रातूनच झाली असल्याचे लक्षात येते. गोपाळ कृष्ण गोखल्यांची संसदीय राजकारणातली नेमस्त भूमिका, लोकमान्य टिळकांची ब्रिटिश सत्तेचा प्रतिवाद करणारी जहाल राष्ट्रवादी भूमिका, गांधीजींचा अ-राज्यवादी व सत्तानिरपेक्ष राजकीय विचारव्यूह, हिंदूमहासभेचा व मुस्लीम लीगचा धर्मकेंद्री राष्ट्रवाद, मार्क्सवाद व रशियन क्रांतीच्या प्रभावातून आलेली समाजवादी भूमिका, काँग्रेसच्या भूमिकेत होत गेलेले वैचारिक स्थित्यंतर यांतून महाराष्ट्राच्या राजकीय विचारांतील विविध अंत:प्रवाहांचा व प्रभावक्षेत्रांचा एक नकाशा समोर येतो.

या कालखंडातील भारतीय राजकारणावर आंतरराष्ट्रीय राजकीय घटनाघडामोडींचा गडद प्रभाव होता. आयरिश चळवळीतला सिनफेनवाद, इंग्लंडमधील फेबिअन समाजवाद आणि रशियन मार्क्सवादी तत्त्वज्ञान एतद्देशीय युवकांना भुरळ पाडीत होते. टिळक आणि ॲनी बेझंट आयरिश सिनफेनवादाचे चाहते होते; टिळकांवर रशियन साम्यवादाचाही प्रभाव होता; सुभाषचंद्र बोस, सयाजीराव गायकवाड हे जपानी सामुराईवादाचे चाहते होते, तर जवाहरलाल नेहरू लंडनच्या फेबियन समाजवादाचे चाहते होते. गांधीजींवरही थोरो, टॉलस्टॉय यांचा प्रभाव होता; तसा तो हिंदू व ख्रिश्चन धार्मिक तत्त्वज्ञानाचाही होता. पण त्यांनी पारंपरिक मूल्ये आणि आधुनिक मूल्ये यापैकी कुठलीही एक टोकाची भूमिका न घेता त्यातला गुरुत्वमध्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राजकारणाला आध्यात्मिकतेची जोड होती; पण त्यात भाबडेपणा वा कर्मपठपणाला जागा नव्हती. सत्याच्या प्रयोगांवर त्यांची भिस्त होती. सेनापती बापट, मानवेंद्रनाथ रॉय, हेमचंद्रदास कानुनगो, श्रीपाद अमृत डांगे हे कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचे चाहते होते.

### काँग्रेसच्या वाटचालीतील स्थित्यंतरे :

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीय काँग्रेसच्या भूमिकेत व कार्यपद्धतीतही अंतर्गत स्थित्यंतराचे टप्पे पहायला मिळतात. काँग्रेसच्या स्थापनेच्या पहिल्या काही वर्षांतली वाटचाल ही गव्हर्नरच्या कृपाछत्राखाली आणि राजनिष्ठेशी बांधिलकी राखून होत होती. नंतरचा दुसरा टप्पा सरकार आणि जनता यांच्यात सुरक्षा झडप म्हणून भूमिका घेऊन काम करणाऱ्या

नेमस्तांचा होता. बंगालच्या फाळणीनंतर देशातले वातावरण बदलले. टिळक व काँग्रेसमधला जहाल गट आक्रमक झाला. त्याची परिणती १९०७ साली सुरत अधिवेशनात काँग्रेसमध्ये दुफळी माजण्यात झाला. त्यानंतर जहाल गटाला वगळून काँग्रेसमधल्या नेमस्तांनी पक्षाची नवी घटना व नियमावली तयार केली व 'नेमस्तांची परिषद' अशा मर्यादित चौकटीत काम चालवले. १९०६ साली मुस्लीम लीगची स्थापना झाल्यानंतर बरेचसे मुस्लीम नेते काँग्रेस आणि मुस्लीम लीग या दोन्ही संघटनांमध्ये विभागले गेले. १९१५ साली गोखल्यांचे निधन झाले आणि महाराष्ट्राच्या राजकारणात गोखले पर्व संपून टिळकपर्व सुरू झाले. होमरूल लीग चळवळीतून जहाल आणि मवाळ गट एकत्र आले. १९१६ साली म. गांधी दक्षिण आफ्रिकेतून परत आल्यानंतर त्यांनी काँग्रेसच्या छत्राखाली आपल्या सार्वजनिक जीवनाची वाटचाल सुरू केली. १९१६ ला लखनौ काँग्रेसपासून जहाल-मवाळ दुफळी संपली व १९२० ला टिळकांच्या मृत्यूपर्यंत काँग्रेस टिळकांच्या मंत्रभारल्या नेतृत्वाखाली जनचळवळीचे व्यापक स्वरूप घेऊन देशभर पसरू लागली होती. टिळकांच्या निधनानंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने पुन्हा नवे वळण घेतले. मध्यंतरी १९२३ च्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, चित्तरंजन दास यांनी 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला होता; तसेच १९३६ च्या सुमारास नेताजी सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू व समाजवादी विचारधारेच्या गटाने आपली वेगळी वाट शोधण्याचा प्रयत्न केला होता. याशिवाय ब्राह्मणेतरांची शेतकरीकेंद्री चळवळ, कम्युनिस्टांची कामगार चळवळ अशा वेगवेगळ्या संघटनांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर प्रभाव टाकायला सुरुवात केली. शिवाय महाराष्ट्राच्या राजकारणात मुंबई इलाख्यातले राजकारण, वऱ्हाड-मध्यप्रांतातले राजकारण, संस्थानांतले राजकारण, काँग्रेस अंतर्गत जहाल-मवाळांचे राजकारण, हिंदुत्ववाद्यांचे राजकारण, गांधीवाद्यांचे राजकारण, नंतर उदयाला आलेल्या कम्युनिस्ट व समाजवाद्यांचे राजकारण, ब्राह्मणेतर बहुजनांचे व दलित-वंचित गटांचे राजकारण अशी अनेक अंतवर्तुळे निर्माण झाली. ही सर्व अंतवर्तुळे काँग्रेसच्या बहिवर्तुळात राहून ब्रिटिश राजकीय सत्तेच्या व्यूहरचनेशी संवाद-संघर्ष करीत मार्गक्रमणा करीत होती. निरनिराळ्या गटांनी राजकीय भूमिका घेऊन काँग्रेसअंतर्गत वेगळा प्रवाह स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. साधारणत: १९३७ ते १९४५ आणि १९४५ ते १९४७ या काळात काँग्रेसच्या राजकारणात गांधीजींचा करिष्मा कमी झालेला दिसतो. त्यामुळे गोलमेज परिषदांतही काँग्रेसला संपूर्ण राष्ट्राचे एकजिनसी नेतृत्व करता आले नाही. मात्र काँग्रेसची संरचना काहीही असली, तरी नेत्यांच्या शब्दालाच जास्त महत्त्व दिले जात असे. त्यामुळे गांधीजींचे नेतृत्व स्वीकारूनच काँग्रेसची पुढची वाटचाल सुरू होती. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीपर्यंत काँग्रेसवर गांधीजींचा एकछत्री अंमल होता.

एकीकडे राष्ट्रीय संसदेचा पर्याय म्हणून काँग्रेस आपली भूमिका निभावत होती; पण त्याच वेळी काँग्रेसला मुस्लिम, अनुसूचित जाती, शिख यांचे हितसंबंध जपता आले नाहीत. त्यामुळे त्यांनी आपापल्या स्वतंत्र संघटना बांधल्या. कम्युनिस्टांनाही काँग्रेसने 'राष्ट्रविरोधी' ठरवले. काँग्रेसच्या या कार्यपद्धतीमुळे महमद अली जिना यांनी काँग्रेसशी फारकत घेऊन मुस्लीम

लीगच्या माध्यमातून फाळणीचे राजकारण केले. मुसलमानांसाठी राखीव मतदारसंघ मागण्यापासून या फुटीच्या राजकारणाला प्रारंभ झाला व त्याची परिणती भारताच्या फाळणीत झाली. या काळात मौलाना अब्दुल कलाम आझाद, खान अब्दुल गफार मात्र काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले. काँग्रेसमध्ये मुसलमानांचा गट सक्रिय झाला, तसा हिंदुत्ववाद्यांचाही गट सक्रिय झाला. हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटना उदयाला आल्या. डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी स्वतंत्रपणे आपली भूमिका रेटली; दलितांसाठीही राखीव मतदारसंघ हवेत ही मागणी घेऊन आंबेडकरांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची वेगळी चळवळ सुरू केली. संस्थानिकांना संघराज्य नको होते म्हणून त्यांनीही आपला वेगळा पवित्रा घेतला. या राजकीय फाटाफुटीमुळे देशाची फाळणी टाळता आली नाही. मात्र वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकारामुळे संस्थानांचे विलीनीकरण होऊन एकात्म भारत निर्माणाची दिशा प्रशस्त झाली.

काँग्रेसने महाराष्ट्रात राज्यपातळीवरच नव्हे तर जिल्हा व तालुकापातळीपर्यंत संघटनेचे जाळे विस्तारल्यामुळे इंग्रज सरकारविरुद्धच्या असंतोषाला वाट मिळण्यास व गावपातळीपर्यंत सुधारणा व विकासाच्या कार्यक्रमांविषयी जनजागृती व्हायला प्रेरणा मिळाली. उदाहरणार्थ, १९२७ सालापासून मोर्ले-मिंटो सुधारणांचे व त्यातून हिंदु-.मुसलमान अशा फुटीच्या राजकारणाची बीजे पेरली जाऊ लागली, तेव्हा सातारा जिल्हा काँग्रेसने राष्ट्रीय सभेने फाळणीचा प्रस्ताव स्वीकारू नये अशा आशयाचा ठराव करून आपली प्रतिक्रिया राष्ट्रीय नेतृत्वापर्यंत पोहचविली. या जिल्हा काँग्रेसने वेळोवेळी ठराव करून ग्रामीण भागातील समस्यांची राष्ट्रीय काँग्रेसला जाणीव करून दिली. शेतसाऱ्यात सूट मिळविण्यासाठी अर्ज, थकबाकीमुळे जमीन खालसा करण्याच्या बाबतीतली तक्रार, शेतीच्या उपयोगी पडणाऱ्या जनावरास गायराने व जंगलाच्या सवलती मिळविण्यासाठी आवाहन, कृष्णा पाणी वाटपाच्या सोयी, ऊस लागवड व गुऱ्हाळ सुधारणा, गोरक्षण, सशक्त बैलांच्या उत्पत्तीसाठी पशुवैद्यक दवाखान्यागणिक किमान वळू, शेतकरी कर्जमुक्त व्हावा म्हणून विविध योजना सुचविण्याचे काम केले. १९२७ साली दारूचे उच्चाटन करण्यासाठी सातारा जिल्ह्यातून ८००० सह्यांचा अर्ज करण्यात आला, शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करण्यासाठी १९२८ साली वाळवे, कऱ्हाड, वाई, इस्लामपूर कोरेगाव, अशा तालुकानिहाय परिषदा घेण्यात आल्या. तुकडेपट्टी बिलाविरुद्ध १९२८ सालात शेतकऱ्यांची सातारा जिल्हा परिषद व संपूर्ण इलाख्याची पुणे परिषद भरविण्यात आली. जे सातारा जिल्ह्यात झाले ते साऱ्या महाराष्ट्रात घडले. त्यामुळे वसाहतवादी राजवटीतल्या दडपलेल्या एतद्देशीय जनतेला भयमुक्त करण्याचे, सरंजामदारी समाजरचना व जातिप्रधानतेचा पगडा यामुळे सत्तास्थानापासून कायम दूर राहणाऱ्या मराठी माणसाला सत्ताकारणात खेचण्याचे काम काँग्रेसने केले. राजकीय स्वातंत्र्यासाठी गावपातळीपासून संघटना बांधण्याचे राजकीय शिक्षण काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रीयनांना दिले ही विसाव्या शतकातील राजकीय संस्कृतीच्या जडणघडणीतली महत्त्वाची प्रक्रिया होती. या राजकीय नांगरणीमुळे नागरी राजकारणाचा ध्रुव ग्रामीण संघटना बांधण्याकडे वळला व राजकारणाचे सामाजिकीकरण करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान झाली.

मोठा राज्यकारभार चालविण्यासाठी ग्रामसंस्था या शेतकऱ्यांच्या राजकीय शिक्षणाच्या प्राथमिक शाळा आहेत, असे मत भाई माधवराव बागल यांनी 'स्वराज्याचा पुनरुद्धार' या लेखात मांडले आहे. (माळी मा. गो., १९९८, पृ.२७४-२७५) त्याचा प्रत्यय क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या 'प्रतिसरकार' चळवळीच्या कार्यपद्धतीत मिळतो. खेड्यातल्या सुधारणांसाठी राज्याच्या वा देशाच्या कायदे कौन्सिलातील ठरावांची वाट बघत बसण्यापेक्षा स्थानिक ग्रामसंस्था क्रियाशील बनविण्यावर भर दिला पाहिजे, हे राजकीय शहाणपण प्रतिसरकार चळवळीने दाखविले होते. 'पैशाचा फास आणि दारूचा ध्यास' यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया असलेला शेतकरी कर्जबाजारी झाला होता. माधवराव बागल यांनी शेतकऱ्याच्या या हलाखीचे वर्णन करताना म्हटले होते की, "सावकाराचा पैसा हातउसनवार जरी घेतला तरी तो शेतकऱ्याचा हात मोडल्याखेरीज रहात नाही. लग्नाच्या मंगलकार्यासाठी काढलेला पैसा त्या आनंदी जोडप्याचे जन्माचे अमंगळ केल्याखेरीज रहात नाही." (माळी मा. गो. कित्ता,पृ.३४१) सार्वजनिक पतसंस्था नसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या नाड्या सावकारांच्या हातात गेल्या होत्या; या सावकारांवर जनचळवळीचे नियंत्रण आल्यावर शेतकऱ्यांच्या शोषणाला आळा बसतो, हे प्रतिसरकार चळवळीने सिद्ध केले. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या आर्थिक पुनर्घटनेसाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या नाड्या मुठभर सावकार-श्रीमंतांकडून काढून घेऊन त्या लोककेंद्री संस्था-संघटनांकडे वळवल्या पाहिजेत ही भविष्यकालीन दिशाही या आंदोलनातून पुढे यायला मदत झाली.

तुरुंग ही या काळात राजकीय शिक्षणाची शाळा बनली होती. तुरुंगात असताना जी. डी. बापू लाड यांनी कार्ल मार्क्स, लेनीन यांचे वाङ्मय वाचले. शास्त्रीय समाजवाद समजावून घेण्याचा प्रयत्न केला. (पोवार, पृ. १०५) भाऊसाहेब जाजूंनी त्यांची एक आठवण नोंदवली आहे : "जेल म्हणजे मोठी शाळा होती शिकण्याची. आळतेकर होते ते रामायण सांगायचे. नंतर एक रामानंद भारती होते, ते ब्रह्मसूत्र सांगायचे." (पाटणे, पृ. ७८) जी. डी. लाड यांच्या तुफान सेनेतही २ तास बौद्धिके चालत. सांगली-सातारा भागातल्या या लोकचळवळीत शिवकालीन गनिमी काव्याचा वारसा पुन्हा एकदा उफाळून वर आलेला दिसतो. पुरुषांनी लुगडे नेसून वेषांतर करणे, बाळंतिणीच्या खाटेवर निजून आईची भूमिका करणे, न्हाव्याचीच हजामत करायला घेऊन आपल्याऐवजी न्हाव्याला पोलिसांच्या हवाली करून चकवा देणे अशा अनेक हकिगती भूमिगतांच्या चळवळी अभ्यासताना समोर येतात. लोकशाहीचे व्याकरण अंगळणी पडण्यासाठी ह्या चळवळींचे हे अनगड योगदानही लक्षात घ्यायला हवे. त्याचबरोबर विशिष्ट ध्येयवादाने झपाटलेल्या क्रांतिवीरांना देश स्वतंत्र झाल्यावरही पूर्वग्रहदूषित राजकारणाने तुरुंगवास पत्करावा लागला, हे चिन्ह अजून राजकीय विवेकाची पुरेशी नांगरणी झाली नसल्याचे दाखवून देते. ब्रिटिश सत्तेविरुद्धचा लढा संपला असला तरी परिपक्व लोकशाहीसाठी अंतर्गत हेव्यादाव्यांपलीकडे राष्ट्रहित जपणारा राष्ट्रीय चारित्र्यनिर्माणाचा लढा अद्याप बाकी आहे, हेही या आढाव्यातून सूचित होते.

**राजकारणाचे सामाजिकीकरण :**

समाजकारण आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत याचे भान १९ व्या शतकात रानडे, गोखले, लोकहितवादी, चिपळूणकर, आगरकर, टिळक, फुले, सार्वजनिक काका या नेत्यांना होते. अर्थात १९ व्या शतकात राजकारणाचा लंबक सुधारणावादाकडे अधिक झुकल्याने समाजकारण हे राजकारणाचे प्रथमांग बनले होते. विसाव्या शतकात मात्र समाजकारणापेक्षा राजकारणाला अधिक प्राधान्य मिळालेले दिसते. राष्ट्रीय राजकारण आणि समाजकेंद्री राजकारण असे राजकारणातले द्वंद्व निर्माण करण्यात ब्रिटिशांच्या वसाहतवादी भेदनीतीचाही थेट संबंध होता. उदाहरणार्थ, १८५७ च्या बंडानंतर ब्रिटिशांनी एतद्देशीय समाजाचे लढाऊ आणि बिनलढाऊ जातीत वर्गीकरण करून ब्राह्मण व अस्पृश्यांना लष्करी सेवेची संधी नाकारली. लष्करी सेवेत ब्रिटिशांची शौर्यबलाची कसोटी 'व्यक्तिगत स्नायुबला'ऐवजी 'जन्मजाती'वरून ठरविण्याची नीती कुठल्याच अर्थाने न्यायपूर्ण नव्हती. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी स्वाभाविकपणे जातिकेंद्री राजकीय संघटना बांधण्याची गरज निर्माण झाली. विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९०३ साली सासवडला महारांची सभा घेऊन हा प्रश्न सरकारपुढे मांडला. गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे यांनी काँग्रेसने या प्रश्नात लक्ष घालावे, म्हणून आपली कैफियत मांडली. १९१६ साली काँग्रेसनेही लखनौ अधिवेशनात या प्रश्नाला हात घातला. अर्थात या दबावामुळे २१ फेब्रुवारी १९१७ पासून महारांसाठी स्वतंत्र रेजिमेंट सुरू करून महारांना लष्करी सेवा खुली करण्यात आली. मुसलमानांसाठी संख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक जागा असलेले राखीव मतदारसंघ देण्याऱ्या ब्रिटिशांच्या भेदनीतीमुळे अखेर भारताची फाळणी झाली. राजकारणाची धर्म व जातीय संख्याबलाशी सांगड घालणारी ही वाटचाल स्वातंत्र्योत्तर काळातही जातिधर्मनिरपेक्ष राजकारणातला एक अडसर बनून राहिली. इंग्रज सरकारविरुद्धचा स्वातंत्र्यलढा आणि अंतर्गत स्वराज्यामुळे पुढे आलेले निवडणुकांचे राजकारण यांना प्राधान्यक्रम मिळत गेला तसे दारूबंदी, अस्पृश्यतानिवारण, ग्रामस्वच्छता, साक्षरताप्रसार हे विषय राजकीय लढ्याचे पूरक अंग म्हणून दुसऱ्या स्थानावर राहिले. 'आधी राजकीय की आधी सामाजिक' या वादात 'सारेच काही राजकीय' म्हणून पाहाण्याची दृष्टी तयार होत गेली. त्यामुळे राजकारणाचे सामाजिकीकरण होण्याची प्रक्रिया गतिमान होण्याऐवजी समाजाचे राजकीय ध्रुवीकरण होण्याची प्रक्रिया अधिक अधिक वेगाने झाली. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात अभिजन-बहुजन, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मालक-कामगार, स्पृश्य-अस्पृश्य, हिंदू-मुसलमान अशा राजकारणाच्या फळ्या तयार झाल्या. एक मत–एक पत हे लोकशाही मूल्य रूजविण्यासाठी विचारस्वातंत्र्य आणि आर्थिक स्वावलंबनाच्या मूल्यांवर अधिष्ठित घटनात्मक व्यवस्था निर्माण करण्याऐवजी जातीय-धार्मिक मतदारसंघांचे व भाषिक-प्रादेशिक अस्मितेचे राजकारण करण्यावर अधिक शक्ती खर्च झाली. परिणामतः आर्थिक स्वावलंबनापेक्षा आर्थिक संरक्षणाच्या विचारांना अग्रक्रम मिळत गेला; श्रममूल्य व मानवी भांडवलविकासाच्या व्यूहरचनांपेक्षा संप आणि टाळेबंदीच्या राजनीतीला प्राधान्य मिळू लागले, परस्परसंवाद व परस्पर विश्वासावर आधारलेल्या लवादाच्या वा पंचकमिट्यांच्या स्वरूपातील सामाजिक

रचनांपेक्षा रस्त्यावर येऊन प्रश्न सोडविण्याकडे कल झुकू लागला. टिळकांना काँग्रेसचे अध्यक्षपद मिळू नये म्हणून मुंबईच्या फिरोजशहा गटाने भेदनीतीचे राजकारण करावे आणि टिळकप्रेमी तरुणांनी कलकत्ता आणि सुरतच्या कॉंग्रेसमध्ये हिंसक धुडघूस घालून हडेलहप्पी मार्गाने आपल्या नेत्याला अध्यक्षपदी बसविण्यासाठी खटाटोप करावा या घटना याच्याच निदर्शक आहेत. राजकीय मूल्यसंस्कारांच्या मशागतीत सर्वच विचारधारांचे पक्ष मागे राहिलेले दिसून येतात. अपवादाने गांधीजींनी एकला चलो पद्धतीने या मूल्यसंस्कारांचा वसा चालवला. राजकीय शक्ती आणि समाजसुधारकांची शक्ती एकत्रित आल्या पाहिजेत यावर गांधीजींचा भर होता. त्यामुळे शासनसंस्थेला पर्यायी व पूरक ठरणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे जाळे उभारण्याला त्यांनी अग्रक्रम दिला. हरिजन सेवक संघ, चरखा संघ, विनोबांची सर्वोदय चळवळ ही काही उदाहरणे या विचारसरणीतूनच पुढे आलेली आहेत.

### भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल :

राजकारण आणि समाजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात येते. विसाव्या शतकात हा लंबक कधी राजकारणाकडे तर कधी समाजकारणाकडे झुकताना दिसतो. एकोणिसाव्या शतकातही भारतीय राजकीय विचारांची मांडणी करणारे आद्य विचारवंत न्या. रानडे यांच्यासमोर संतांच्या सांस्कृतिक ऐक्याचा वारसा आणि छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय संघटना बांधणीची पूर्वपीठिका ही संदर्भचौकट होती. शिवाय युरोपातल्या प्रबोधनपर्वातून घडलेली पाश्चिमात्य संस्कृती आणि ब्रिटिश वसाहतवादातली शोषणनीती यातले द्वंद्वही त्यांना स्पष्ट दिसत होते. 'प्रार्थना समाजा'ची चळवळ आणि 'सार्वजनिक सभा' या कृतिकार्यक्रमांतून आधुनिक भारतीय राजकारणाची पायाभरणी करणारी वैचारिक मूल्यचौकट रानडे देऊ पहात होते. सांस्कृतिक व राजकीय परिवर्तनाची एकात्म सांगड घालणाऱ्या व्यापक राष्ट्रवादाची पायाभरणी रानड्यांनी केली. भारतीय राष्ट्रवादाची मांडणी करताना रानडे यांनी एकांगी धर्मकेंद्री भूमिका टाळली होती. निखळ हिंदुत्ववादी राष्ट्रवाद न स्वीकारता हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार करणाऱ्या संमिश्र राष्ट्रवादाचा पुरस्कार करण्याची भूमिका घेतली होती. मुसलमानांचे सूफी तत्त्वज्ञान आणि हिंदूंचे वेदांतातील तत्त्वज्ञान यांतल्या साम्यस्थळांवर अधिष्ठित भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना त्यांना अभिप्रेत होती. हिंदू-मुसलमानांतील दुहीचे बीज पेरणारा औरंगजेबाचा मार्ग टाळून हिंदू-मुस्लीम धार्मिक सलोख्याचा अकबराने घालून दिलेला नमुनादर्श आपण प्रशस्त केला पाहिजे, अशी रानड्यांच्या राष्ट्रवादाची मांडणी होती. १८५७ च्या बंडात हिंदू-मुस्लीम एकजिनसीपणाने इंग्रजांविरूद्ध लढले होते, त्यात धार्मिक भेद असूनही समान अस्मितेचे मूल्य पायाभूत होते. ह्या समरसतेतून भारतीय राष्ट्रवादाचा पाया रचला जावा अशी विचारधारा न्या. रानड्यांच्या मांडणीत अभिप्रेत होती.

त्याच काळात म. फुले यांनी सामाजिक समतेच्या मूल्याला केंद्रस्थानी ठेवून नवभारताच्या निर्माणासाठी आवश्यक असणारा उदारमतवाद 'सत्यशोधक चळवळी'तून पुढे आणला. जातिवर्णव्यवस्थेतल्या सामाजिक समता प्रस्थापनेतला पायाभूत अडसर दूर

करण्यासाठी त्यांनी आक्रमक पवित्रा घेऊन तिखट शब्दांत ब्राह्मणी कावा उघड करणारे विद्रोही लेखन केले. तसेच सामाजिक प्रभुत्व असणाऱ्या अभिजनांच्या शोषणनीतीचा प्रतिकार करण्यासाठी वसाहतवादी राजवटीचा अनुकूल उपयोग करून घेण्याचा व्यवहारवादही अनुसरला. एकोणिसाव्या शतकात राष्ट्रवादाचे रानडे आणि फुले विचारधारेचे हे दोन प्रवाह प्रामुख्याने पुढे येते होते.

## द्विध्रुवात्मक राष्ट्रवाद :

विसाव्या शतकाच्या प्रारंभीही सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि राजकीय राष्ट्रवाद ही राष्ट्रवादाची द्विध्रुवात्मक मांडणी कायम राहिलेली दिसते. गोखले आणि टिळक यांच्यातली मवाळ आणि जहाल पक्षाची द्वंद्वात्मक राजनीती ही एका अर्थाने राष्ट्रवादाची परस्परांना आव्हान देणारी मांडणी होती. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी पाश्चिमात्य उदारमतवादाचा अनुग्रह घेऊन राजकारणाचे आध्यात्मिकरण (Spiritualization of politics) करण्याचा आग्रह धरला. याउलट श्रीगणेश आणि छत्रपती शिवाजी महाराज या सांस्कृतिक-ऐतिहासिक प्रतीकांच्या माध्यमातून अध्यात्माचे राजकारण करून वसाहतवादी राजवटीला शह देणारा जहाल राष्ट्रवाद लोकमान्य टिळकांनी पुढे आणला. या राजकारणात टिळकांकडून सामाजिक सुधारणावादाची बरीच उपेक्षा झाली. अर्थात टिळकांची हिंदू-मुस्लीम ऐक्याची भूमिका व औद्योगिक कामारवर्गाविषयीची आस्था लक्षात घेता या देशात 'संमिलीत संस्कृती' (Composite culture) नांदावी, असेच त्यांना अभिप्रेत असावे. राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून पुढे आलेल्या राजकीय मंचानेही हिंदू-मुसलमानांच्या अलगतावादाला बाजूला ठेवूनच एकराष्ट्रीयत्वाचे मूल्य जोपासण्याचा प्रयत्न केला. १९१६ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत हिंदू-मुसलमानांचा एकत्रित सहभाग जुळवून आणण्याचा करार हा या संमिश्र राष्ट्रवादाच्या संकल्पनेला अनुसरणाराच होता.

## धार्मिक राष्ट्रवाद :

ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मात्र या एकात्म राष्ट्रवादाला छेद देणारी कारस्थाने केली. लॉर्ड डफरिन यांनी हिंदू आणि मुसलमानात धर्म, संस्कृती, समाजघटना, इतिहास आणि स्वभाववैशिष्ट्ये यांत सर्व बाजूंनी परस्परविरोध असल्याने त्यांच्यात कधीही ऐक्य निर्माण होणार नाही, व ते मिळून एकराष्ट्र स्थापन करू शकणार नाहीत, असे भविष्य वर्तवविले होते. संमिश्र राष्ट्रवादाला खतपाणी मिळू नये यासाठी भेदनीतीचा वापर करून इंग्रजांकडून अशा प्रकारची मांडणी होत असे; परंतु हिंदूत्ववादी वा मुसलमान धर्मीय संघटनांनी या कपटनीतीचे वसाहतवादी राजकारण लक्षात न घेता धर्मविशिष्ट राष्ट्रवादाची आग्रही मांडणी केली. हिंदू महासभा 'हिंदू राष्ट्रवादा'चा पुरस्कार करीत होती. त्यांच्या दृष्टीने हिंदूंचे संख्याबळ हा हिंदू राष्ट्रवादाचा पायाभूत आधार होता. त्यामुळे धर्मांतरितांना परत हिंदू धर्मात आणणे हा हिंदूत्ववादी राष्ट्रवाद्यांचा एक कलमी कार्यक्रम बनला होता. बा. शि. मुंजे यांनी तर या आक्रमक हिंदुत्ववादाचा पुरस्कार करताना हिंदूंमधला नेभळटपणा जाऊन त्यांच्यात मुसलमानांप्रमाणे

आक्रमकता यावी यासाठी हिंदूंनी मांसभक्षण करावे, अशी आततायी मंडणी करण्यापर्यंत मजल मारली होती. ही भूमिका घेण्यामागेही त्यांची धर्मविशिष्ट राष्ट्रवादाची प्रेरणा होती.

### सावरकरांचा राष्ट्रवाद :

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी राजकीय एकात्मतेवर भर देऊन हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता. केवळ प्रादेशिक एकता हे राष्ट्रवादाचे आधारतत्त्व असू शकत नाही, त्यासाठी सांस्कृतिक समरसता व समान राजकीय आकांक्षा असाव्या लागतात. एकराष्ट्रत्व निर्माण होण्यासाठी परंपरा, हित व ध्येयवाद या तीन गोष्टी आवश्यक असतात. पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाच्या पुरस्कारातून बलशाली भारत निर्माण व्हावा व त्यासाठी भारतीयांमध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना जोपासली जावी, अशा आशयाची मांडणी सावरकर करत असत. (भोळे, २००४, पृ. ६७२) देशभक्ती हाच त्यांच्या लेखी धर्म होता; त्यामुळे हिंदुत्वाची निधर्मी मीमांसा करताना बुद्धिप्रामाण्यवाद ते प्रमाण मानताना दिसतात. (केळकर भा. कृ. १९५२, पृ. ५-६) हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व असून हिंदू समाज हाच राष्ट्रीय समाज आहे, हे सूत्र त्यांना आपल्या राष्ट्रवादाच्या मांडणीत अभिप्रेत होते. त्यांच्या मते हिंदुत्व ही संकल्पना धार्मिक नसून राष्ट्रीय, वांशिक व सांस्कृतिक आहे. प्रारंभीच्या काळात त्यांनी हिंदू-मुसलमान ऐक्याचे प्रयत्नही केले; आपल्या 'हिंदी' राष्ट्रवादाच्या आड त्यांनी 'हिंदू' राष्ट्रवाद येऊ दिला नाही. संयुक्त हिंदी राष्ट्र न्यायाच्या आणि समानतेच्या पायावरच उभारले पाहिजे. हिंदुस्थानातील सर्व अल्पसंख्य समजांना विधिमंडळे, नोकऱ्या, सामाजिक आणि राजकीय अधिकार इत्यादी संबंधात लोकसंख्या आणि गुणानुसारी योग्यता यांच्या प्रमाणात मताधिकार व प्रतिनिधित्व देण्यास हिंदू राष्ट्र केव्हाही सिद्ध असेल, अशी त्यांची भूमिका होती. हिंदू समाज देशात प्रचंड प्रमाणात बहुसंख्य असताही स्वत:साठी कोणतेही विशेष अधिकार अथवा स्वतंत्र सवलत मागण्याचा आपला अधिकार सोडून देईल. .. अल्पसंख्यांकांना इतरांच्या धर्म-भाषा-संस्कृतीवर अतिक्रमण न करता आपापले धर्म, भाषा व संस्कृती आचरण्याचे स्वातंत्र्य असेल हे विचार त्यांनी सुस्पष्टपणे मांडले होते. (केळकर भा. कृ. १९५२, , पृ. १९२) सावरकरांच्या 'हिंदी राष्ट्रवादा'ची अशी सुस्पष्ट व धर्मसुसंवादी मांडणी होती. परंतु पुढे भारतीय हिंदू-मुसलमानांत ही सांस्कृतिक समरसता किंवा समान राजकीय आकांक्षा नांदत नसल्याने दोन राष्ट्रवादी भावना असलेले हे समाज एकराष्ट्रीयत्वाच्या छत्राखाली नांदू शकणार नाहीत, हे जसजसे स्पष्ट होत गेले तसे हे संमिश्र राष्ट्रवादाचे त्यांचे स्वप्न भंग पावले. (केळकर भा. कृ., १९५२, पृ. १६८-१६९)

### मुस्लीम राष्ट्रवाद :

महमद अली जिना यांनी लखनौ करारापर्यंत हिंदू-मुस्लीम ऐक्यावर आधारित संमिश्र राष्ट्रवादाची भूमिका खिलाफत चळवळीतही कायम ठेवली. खिलाफत चळवळ हे कृतक धार्मिक राजकारण असल्याने त्यापासून आपण दूर राहू इच्छितो अशी भूमिका त्यांनी घेतली होती. मात्र पुढे ही धर्मनिरपेक्ष एकात्म राष्ट्रवादाची भूमिका सोडून त्यांनी धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचे राजकारण

केले व हिंदुस्थान-पाकिस्तान फाळणीचा आग्रह धरला. (झकेरिया, २००२, पृ. २४, पृ. ६३)

## म. गांधींचा राष्ट्रवाद :

१९२० नंतरच्या गांधीयुगात मात्र राजकारणाच्या अध्यात्मिकरणाच्या प्रयोगाचे नवे पर्व सुरू झाले. गांधीजींच्या विचारप्रक्रियेत धार्मिक मुशींचे अधिष्ठान असल्याचे सर्वसाधारण चित्र दिसते. ते स्वत:ला सनातन हिंदू म्हणवून घेत असत; मात्र तरीही त्यांची विचारप्रक्रिया व आचारधर्म पारंपरिक अर्थाने सनातनी नव्हती. सनातनी हिंदूंप्रमाणे त्यांनी वेद प्रामाण्य मानले नाही. त्यांची विचारपद्धती आणि कार्यशैली बरीचशी श्रमण परंपरेला जवळ जाणारी होती. ते चातुर्वर्ण्य मानीत असले, तरी अस्पृश्यांना 'हरिजन' संबोधणे, भंग्यांच्या वस्तीत जाऊन राहणे, स्वत:च्या स्वयंपाकघरात मुसलमान आचाऱ्याला मुक्त प्रवेश देणे, आदिवासींप्रमाणे गुढघ्याच्यावर अर्धनग्न कपडे परिधान करणे, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करणे, सेवाग्रामच्या आश्रमात मंदिर बांधण्यास मनाई करणे अशा वैयक्तिक आचारणातून त्यांनी हिंदूत्वातल्या सनातनी कर्मठपणाचा प्रतिवादच केला होता. हिंदू धर्मातील अस्पृश्यतेच्या निर्मूलनाचे तर त्यांनी व्रतच घेतले होते. प्रेम, मानुषता, अहिंसा, कर्मनिष्ठा या निखळ मानवी मूल्यांना प्रमाण मानणारा हिंदुत्ववाद त्यांना अभिप्रेत होता. गांधीजींना अभिप्रेत असलेला 'राष्ट्रवाद'ही अशाच व्यापक भारतीय मूल्यदृष्टीतून साकार झाला होता. पाश्चिमात्य साम्राज्यवादाच्या विरोधातून भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला असा सर्वसाधारण समज असला, तरी गांधीजींची भारतीय राष्ट्रवादाची धारणा यापेक्षा वेगळी होती. शंकराचार्यांनी भारताच्या चार टोकांवर चार तीर्थक्षेत्रे निर्माण करून व चार धाम यात्रेच्या माध्यमातून एकराष्ट्रीयत्वाची भावना जोपासण्याचा वारसा हजारो वर्षांपासून भारतीयांना दिला आहे. भारतीय राष्ट्रवादाची बीजे या सुसंवादी सहजीवनाच्या व विविधतेतील एकतेच्या राष्ट्रीय वारशात दडली आहेत, अशी गांधीजींची धारणा होती. अर्थात 'हिंदू राष्ट्रवाद' ही धर्मकेंद्री राष्ट्रवादाची पारंपरिक संकल्पना त्यांना मान्य नव्हती. हिंदू-मुसलमान सलोख्यावर त्यांनी कायमच भर दिला होता. किंबहुना भारतात हिंदू, मुसलमान,पारशी, ख्रिश्चन असे सर्व धर्मीय लोक सहभावाने नांदत आले आहेत, त्यामुळे एकराष्ट्र व एकधर्म ही राष्ट्रवादाची मांडणी त्यांना मान्य नव्हती. सर्वधर्मसमभावावर आधारलेला समंजस राष्ट्रवाद त्यांना अभिप्रेत होता. प्रांतवादी अस्मितेचे भेदमूलक राजकारण करण्यापेक्षा एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचे पोषण करण्यावर भर दिला पाहिजे, असे त्यांना वाटत असे. गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला शह देऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील ग्रामीण आणि नागर समाजाला एकत्र आणले; धनिक आणि श्रीमंत, हिंदू आणि मुसलमान या सर्वांना एका छत्राखाली आणले. धर्मविहीन राष्ट्रवादाऐवजी 'सर्वधर्मसमभावाची' नीती पुरस्काणारा राष्ट्रवाद पुढे आणला. सामाजिक समरसतेचे मूल्य प्रमाण मानून, जातीय, प्रादेशिक व राष्ट्रीय ऐक्याला केंद्रस्थानी ठेवून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोक एकत्रितपणे संघर्ष करतील अशी नीती अवलंबिली. गांधीजींच्या या राष्ट्रवादाला धर्माचे अधिष्ठान होते; मात्र तो हिंदुत्वादी राष्ट्रवाद नव्हता. सर्वधर्मसमभावाचे पायाभूत मूल्य प्रमाण मानणारा तो संमिलीत राष्ट्रवाद होता.

## मौलाना आझाद यांचा राष्ट्रवाद :

गांधीजींप्रमाणेच मौलाना अब्दुल कलाम आझाद हेही धार्मिक पिंड असलेले राष्ट्रीय नेते होते. कुराणाचे सटीक भाषांतर त्यांनी मोठ्या श्रद्धेने केले होते. माणसाची राष्ट्रनिष्ठा ही त्याच्या धर्मनिष्ठेतून उद्‌भवते अशी त्यांची समजूत होती; मात्र तरीही त्यांचा राष्ट्रवाद इस्लामकेंद्री नव्हता. सर्वच जुलुमांविरुद्ध बंड करून राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे धर्मकार्यच आहे असे ते मानीत. (भोळे, २००३, पृ. ६६७) त्यामुळे राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीपुरता राष्ट्रवादाचा अर्थ मर्यादित करणे मौलाना आझाद यांना मान्य नव्हते. तसेच धर्मविशिष्ट राष्ट्रवादाची कल्पनाही त्यांच्या विचारात बसत नव्हती; त्यामुळे हिंदू-मुसलमानांचे संयुक्त राष्ट्राचे स्वप्न साकार करणाऱ्या संमिश्र राष्ट्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला होता.

## डॉ. आंबेडकर यांचा राष्ट्रवाद :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मात्र राष्ट्रवादाने धर्म वा प्रादेशिक देशभक्तीच्या सरहद्दीवर थांबू नये, अशा शब्दांत आपल्या धर्मनिरपेक्ष व बुद्धिप्रामाण्यवादी राष्ट्रवादाची दिशा सूचित केली होती. (भोळे, २००३,पृ. ८३०/ Jatawa,1966, p. 79 ) हिंदू राष्ट्रवाद वा मुस्लीम राष्ट्रवाद या संज्ञा विपर्यस्त असून धर्माशी राष्ट्रवादाची गाठ घालू नये असे त्यांचे स्पष्ट मत होते. आर्थिक आणि सामाजिक समता लवकरात लवकर प्रस्थापित करणे हाच राजकीय लोकशाही टिकविण्याचा एकमेव मार्ग असल्याचे त्यांचे मत होते.

विसाव्या शतकातील भारतीय राजकारणाचे वैचारिक भरण-पोषण युरोपातल्या प्रबोधनचळवळीतून आलेला उदारमतवाद, फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, चीनमधील माओची सांस्कृतिक क्रांती, अमेरिकेची राजकीय क्रांती, दोन महायुद्धातले राजकीय अनुभव, हिटलरचा वांशिक नाझीवाद या वैश्विक घटनांच्या अनुभवांतून भारतीय राष्ट्रवादाने आपली स्वत:ची वाट धुंडाळण्याचा प्रयत्न केला. कधी एकांगी, तर कधी संतुलीत वळणे घेत ही वाटचाल सुरु होती. टिळकांचा भर पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी ब्रिटिशांशी संघर्ष करण्यावर होता; गोखल्यांना सनदी राजकारणाच्या माध्यमातून ब्रिटिशांकडून स्वायत्त राज्यकारभाराचे हक्क मिळवण्यात रस होता. आंबेडकरांना सत्तांतराच्या आधी सामाजिक हक्कांच्या लढाईला अग्रक्रम द्यावयाचा होता. हिंदुमहासभा, मुस्लीम लीगच्या नेत्यांचा कल धार्मिक राष्ट्रवादाचा पाया रचण्याकडे होता. महात्मा गांधींना मात्र स्वातंत्र्य आणि सामाजिक समरसता या दोन्ही ध्रुवांना सांधणारा सम्यक राष्ट्रवाद रूजवायचा होता. किंबहुना अनंत मूर्ती यांनी म्हटल्याप्रमाणे 'हा माणूस बलवान राष्ट्र उभे करण्यापेक्षा नागरी समाजाच्या निर्मितीसाठी झटत होता.' गांधीजींचा अग्रक्रम अस्पृश्यतानिवारण, हिंदु-मुस्लीम ऐक्य, चरखा आणि खादीच्या प्रसारातून विकेंद्रित अर्थव्यवस्था निर्माण करून खालच्या जातीच्या लोकांना ताकद देण्याकडे होता. राजकीय स्वातंत्र्याच्या लढाईबरोबरच त्यांनी लोकसमाजाच्या सांस्कृतिक बांधणीला आणि औद्योगिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दाबाला छेद देणाऱ्या विकेंद्रित अर्थनीतीच्या विकासाचे पर्यायी प्रारूप घडविण्याला महत्त्व दिले. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात मराठी समाजाने या राजकीय संहितेचा गाभा लक्षात घेऊन नवभारताच्या निर्माणात नेमके काय

योगदान दिले याचा तपास पुढल्या खंडातील विवेचनातून आपल्याला करावयाचा आहे. विशेषत: वासाहतिक राजसत्तेचा पगडा दूर सारून निर्वसाहतीकरणाची नवी राजकीय पुनर्घटना साधण्यात आपल्याला कितपत यश आले, हे सूत्र मध्यवर्ती ठेवून आपल्याला हा तपास करावयाचा आहे.

## टिपा :

[१] दादाभाई नौरोजी यांनी १८८६ च्या राष्ट्रसभेच्या दुसऱ्या अधिवेशनात आपल्या अध्यक्षीय भाषणात काँग्रेस आणि ब्रिटिश राजसत्ता यांच्या परस्परसंबंधांविषयी पुढीलप्रमाणे खुलासा केला होता : "Let us speak out like men and proclaim that we are loyal to the backbone; that we understand the benefits English rule has conferred on us; that we thoroughly appreciate the education that has been given to us.. teaching us that kings are made for the people, not people for the kings; and this new lesson we have learned amidst the darkness of Asiatic despotism only by the light of the free English civilization. But the question is, do the Government believe us? Do they believe that we are really loyal to them; that we do truly appreciate and rely on British rule; that we veritably desire its permanent continuance; that our reason is satisfied and our sentimental feelings gratified as well as our self-interest?" (पळशीकर, १९८७-८६, पृ. २०)

[२] टिळकांच्या वाचनातील पुढील काही निवडक ग्रंथांची यादी पाहिल्यास त्यांच्या विद्याव्यासंगाचा आवाका किती मोठा होता, याची कल्पना येते.

१. बेंटलेचे "भारतीय ज्योतिषशास्त्र २. आर्थर बेरी यांचा ज्योतिषशास्त्राचा इतिहास, ३. डॉक्टर थिको यांचा ज्योतिषशास्त्रावरचा निबंध. ४. मधुसुदन सरस्वती यांचे 'प्रस्थानभेद'. ५. शंकर दर्शन ६. हेगेलचे जवळपास सर्व ग्रंथ ७. रूसोचे 'सोशल कॉन्ट्रॅक्ट' ८. लॉकचे 'ऑन सिव्हिल गव्हर्मेंट' ९. डार्विनिझम ॲण्ड पॉलिटिक्स १०. फंडामेंटल प्रिन्सिपल ऑफ पॉझिटिव्हिझम ११. आयडियल कॉमनवेल्थ १२. सिलेक्ट वर्क्स बाय ई. जे. पेन १३. कॉर्नवॉल ल्युईसचे 'गव्हर्मेंट ऑफ डिपेन्डन्सीज १४. हॅरिसनचे 'ऑर्डर ऑफ प्रोग्रेस १५. मोर्ले यांचे राज्यकारभारावरील निबंध १६. हिस्टोरियन्स हिस्टरी ऑफ द वर्ल्ड १७. स्टोरी ऑफ द नेशन्स मालेतील जर्मनी, टर्की, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, इटली , सॅरासन व बायंझटाईन साम्राज्य १८. जर्मन ज्ञानकोश १९. गटेचे फाऊस्ट २०. वेबरचे ग्रंथ इत्यादी.

[३] "All I wish to say is that in spite of the verdict of the Jury, I maintain that I am Innocent. There are higher Powers that rule the destinies of things; and it may be the will of Providence that the cause which I represent may prosper more by my sufferings than by my remaining free."

[४] मंडालेच्या तुरुंगातल्या ग्रंथवाचनाच्या संदर्भातली टिळकांनी सांगितलेली हकिकत-

"मला ग्रंथ बाळगण्याची परवानगी मिळाली नसती तर हे दिवस जाणे अत्यंत दुर्घट होते, कारण,.. बाहेरील जग आम्हांस शून्य झाले होते.. ग्रंथासंबंधीही तीनदा हुकूम झाले. पहिल्याने मी जितकी बुके मागितली तेवढी, त्यांतील विषय काय आहे हे तपासून माझ्या ताब्यांत दिली. वर्तमानकालीन (current) पॉलिटिक्स या विषयावरील कोणतेही बुक ठेवण्याची परवानगी नव्हती व ते मिळतही नसे. तसेच वर्तमानपत्रे व मासिक पुस्तके .. सर्व बंद केलेली होती.. ही पुस्तके सर्व माझ्याजवळ ठेवण्याचे कांही दिवसांनी बंद होऊन, फक्त चार पुस्तकेंच मजजवळ एका वेळी ठेवावी, असा हुकूम झाला. त्यावर बर्मा सरकारकडे मी अर्ज केल्यानंतर, ग्रंथलेखनासाठी म्हणून सर्व पुस्तकें पुन: मजजवळ ठेवावी, असा हुकूम झाला. तथापि, प्रत्येक पुस्तकांत पाने किती आहेत ती तपासून व त्यांची संख्या मुखपृष्ठावर लिहून त्याच्याखाली सुपरिटेंडटची सही होऊन ती पास व्हावी लागत. .. पुस्तकांची संख्या मी तेथून निघालो तेव्हा सुमारे साडेतीनशे पासून चारशेपर्यंत झालेली होती. ग्रंथलेखनासाठी जे कागद देत तेही सुटे न देता बांधलेली बुके- आतील पाने मोजून- देत असत व लिहिण्याकरिता शाई न देता फक्त शिस्पेन्सलीच- व त्याही करून (तासून)- देत असत. कारण जेलच्या नियमाप्रमाणे चाकू बाळगण्याची कैद्यास परवानगी नाही. फक्त घरी दर महिन्यास जे पत्र मी लिहीत असे तेवढ्यापुरता मात्र सुटा कागद, शाई व पेन मिळत असे." (करंदीकर, १९४४, पृ. २१०)

[५] १ फेब्रुवारी १९१७ ची चेम्सफर्ड यांची नोंद :

"As we stand, it seems to me impossible on paper to draw a distinction between the self-government which we advocate as the ultimate goal of British rule in India and Home Rule as advocated by Mrs. Besant and Tilak, though we know in fact that the two policies are poles apart. I would suggest then that our obvious course is to announce our policy which as little delay as possible and set it against a visionary Home Rule scheme our sane and practical proposal." (पळशीकर वसंत, नवभारत, डिसें.1985-जाने. १९८६, पृ. ८०)

[६] "I thought to myself if I go to England, not only shall I become a barrister.. but I shall be able to see England, the land of philospphers and poets, the very centre of civilization" – M. K. Gandhi.

[७] : सत्याग्रहातील व्रते :

"अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये" - विनोबा भावे.

सत्य : देशाच्या हितासाठी देखील कसल्याही प्रकारची फसवणूक करता कामा नये.

अहिंसा : अन्यायी असणाऱ्यांना देखील इजा करता कामा नये. त्यांच्यावर न रागावता प्रेम केले पाहिजे.

ब्रह्मचर्य : पाशवी विकारांवर असा ताबा मिळवला पाहिजे की त्याचा वैचारिक देखील अध:पात होणार नाही.

अस्वाद : जिभेवर ताबा. अनावश्यक अन्न वर्ज्य करावे, आहार नियमित व शुद्ध असावा.

अस्तेय : दुसऱ्याच्या मालमत्तेचा अपहार न करणे.

अपरिग्रह : अनावश्यक वस्तू जवळ न ठेवणे, ती जास्त प्रमाणात ठेवून न घेणे

स्वदेशी : विदेशी व गुंतागुंतीच्या यंत्रसामुग्रीने तयार केलेल्या वस्तू वर्ज्य. स्वत:च्या हातमागावर विणलेले कापड वापरणे.

निर्भयता: सत्यशक्ती आणि आत्मशक्ती या जोरावर स्वत:चा बचाव करू शकण्याचा आत्मविश्वास.

[८] गांधीजींच्या बनारस विद्यापीठाच्या उद्‌घाटन-कार्यक्रमातील भाषणाचे काही अंश :

१. "या विद्यापीठात जे तरुण येतील, त्यांना आपल्या मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण मिळेल अशी व्यवस्था हे विद्यापीठ करील अशी मी आशा बाळगतो. आपली भाषा म्हणजे आपले प्रतिबिंब. पण जर तुम्ही मला असे सांगू लागला की उत्तम विचार प्रकट करण्याला आमच्या भाषा असमर्थ आहेत, तर मी म्हणेन, जितके लवकर आपले अस्तित्व संपेल तितके आम्हाला चांगले. इंग्रजी ही हिंदुस्थानची राष्ट्रभाषा कधी काळी होईल असे स्वप्न पाहणारा एक तरी मनुष्य असेल काय? राष्ट्राच्या गळ्यात हे लोढणे कशाला? आपल्याला फक्त इंग्रजी शिक्षण मिळते. त्याच्याऐवजी दुसरा काही पर्याय आपण दाखवला पाहिजे. गेली ५० वर्षे आपल्याला देशी भाषांतून शिक्षण मिळत असते तर आपल्याला आज काय मिळाले असते? आज आपला भारत स्वतंत्र झाला असता, आपली सुशिक्षित माणसे, स्वदेशात परक्याप्रमाणे न वागता, राष्ट्राच्या आत्म्याशी बोलली असती, गरिबांतल्या गरीब लोकांबरोबर त्यांनी काम केले असते,आणि गेल्या ५० वर्षांत त्यांनी जे जे संपादन केले ते ते या राष्ट्राचा वारसा ठरले असते.

२. कॉंग्रेसने स्वराज्याविषयी एक ठराव केला आहे. त्यासंबंधी काही भरीव सूचना अखिल भारतीय कॉंग्रेस व मुस्लीम लीग पुढे मांडतील व आपले कर्तव्य बजावतील यात शंका नाही. पण माझ्या बाबतीत म्हणाल तर विद्यार्थीवर्ग काय निर्माण करतो किंवा जनता काय निर्माण करते, याचे महत्त्व मला जितके आहे, तितके या दोन संस्था काय निर्माण करतात याचे नाही, हे मी मोकळेपणाने कबूल करतो. कागदावर कितीही भाषणे केली तरी आपण स्वराज्याला पात्र होणार नाही. केवळ आपल्या आचारानेच आपण पात्र होऊ.

३. "काल संध्याकाळी मी विश्वनाथाच्या मंदिरात गेलो होतो. त्या गल्ली-बोळांतून जात

असताना मनात पुढील विचार आले – एखादा नवखा माणूस आकाशातून या महान मंदिरावर उतरला आणि आपण हिंदू लोक काय आहोत याचा विचार करू लागला तर तो आपला धिक्कार करणार नाही का? हे विशाल मंदिर आपल्या चारित्र्याचे प्रतिबिंब नाही काय? एक हिंदू या भावनेने मी बोलत आहे. आपल्या पवित्र मंदिराकडे जाणाऱ्या गल्ल्या इतक्या गलिच्छ असणे योग्य आहे काय? त्याच्या भोवतालची घरे कशीतरी बांधलेली आहेत. बोळ वाकडेतिकडे व अरुंद आहेत. आपली देवळेसुद्धा जर प्रशस्तपणाचे व स्वच्छतेचे आदर्श नसतील, तर आपले स्वराज्य तरी कसे असेल? भारतातून इंग्रज लोक, स्वेच्छेने किंवा सक्तीने आपला बाडबिस्तारा गुंडाळून निघून जाताच आपली मंदिरे पवित्रता, स्वच्छता व शांतता यांचे आगर बनतील काय?

४. आता मी आपल्याला दुसरे एक दृश्य दाखवतो. आपल्या चर्चेचे अध्यक्षस्थान काल ज्यांच्याकडे होते, त्या महाराजांनी भारताच्या दारिद्र्याविषयी काही विचार मांडले. त्यावर इतर वक्त्यांनी मोठा भर दिला. पण व्हॉइसरॉयांनी ज्याचा कोनशिला समारंभ केला, त्या या विशाल मंडपामध्ये आपल्याला काय दिसले? अर्थात एक अत्यंत भपकेबाज दृश्य अणि जडजवाहिरांचे एक सुंदर प्रदर्शन की, पॅरिसहून येणाऱ्या बड्या जवाहिऱ्यांच्या नेत्रांनाही खाशी मेजवानी मिळावी. ऐश्वर्याने नटलेल्या या लक्ष्मीपुत्रांशी मी कोट्यवधी हिंदी बांधवांची तुलना करतो. ती केली म्हणजे मला असे म्हणावेसे वाटते की या जवाहिऱ्यांचा व दागदागिन्यांचा त्याग करून भारतातील आपल्या देशबांधवांसाठी त्याचे विश्वस्त तुम्ही बनल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही.

५. आता एक महत्त्वाची गोष्ट. गेल्या दोन-तीन दिवसांत ज्या गोष्टींमुळे आपल्या मनात खळबळ माजली आहे, तिचा उल्लेख करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. जेव्हा व्हॉइसरॉय काशीच्या रस्त्यावरून जात होते, तेव्हा पुष्कळ काळ आपल्याला चिंता वाटत होती. अनेक ठिकाणी गुप्त पोलीस ठेवले होते. आपण भयभीत झालो होतो आणि स्वत:ला विचारित होतो, "हा अविश्वास का? असा जिवंतपणी मृत्यू भोगण्यापेक्षा लॉर्ड हार्डिंग्ज मृत्यू पावणे अधिक चांगले नाही काय? पण एवढया बलाढ्य सम्राटाचा प्रतिनिधी तसे करणार नाही. जिवंतपणी मृत्यूही पत्करणे त्याला अवश्य वाटेल. पण आपल्यावर हे गुप्त पोलीस का ठेवले आहेत? आपण धुमसू, आपण रागाने पेटू, आपण संतापू, पण आजच्या भारतात क्रांतिकारकांची अधीर सेना निर्माण झालेली आहे हे आपण विसरता कामा नये. मीही एक क्रांतिवादी आहे, पण निराळ्या प्रकारचा. पण आपल्यामध्ये अराजकवाद्यांचा दुसरा एक वर्ग आहे. त्यांच्यापर्यंत माझा आवाज जर पोचत असेल, तर मी त्यांना सांगेन की, 'भारत जर जेत्याला जिंकू पाहत असेल, तर भारतात अराजकवादाला स्थान नाही. ते भयाचे चिन्ह आहे.' .. अराजकवाद्याला मी त्याच्या देशप्रेमाबद्दल मान देतो. स्वदेशासाठी मरण्यास तयार होण्याचे धैर्य दाखवतो म्हणून मी त्याला मान देतो. पण मी त्याला विचारतो, 'हत्या सन्माननीय आहे काय? सन्माननीय मृत्यूचे योग्य साधन खुनी माणसाचे खंजीर होऊ शकतो काय? मी त्याचा

इन्कार करतो. अशा मार्गांना कोणत्याही धर्मग्रंथात आधार नाही. मला जर असे आढळून आले की, भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांनी इथून निघून गेले पाहिजे, त्यांना इथून हाकलले पाहिजे, तर त्यांना 'चले जाव' म्हणण्यास मी कचरणार नाही आणि त्यासाठी मरण पत्करण्यासही मी तयार राहीन अशी मला आशा आहे.

६. आपल्याला जर स्वराज्य मिळवायचे असेल तर ते मिळवून घेतले पाहिजे. दान म्हणून ते कोणी देणार नाही. ब्रिटिश साम्राज्याचा व ब्रिटिश राष्ट्राचा इतिहास पाहा. ते स्वातंत्र्यप्रेमी आहेत. जे लोक स्वत: स्वातंत्र्य मिळवणार नाहीत, त्यांना स्वातंत्र्य देण्यास ते राष्ट्र हातभार लावणार नाही. इच्छा असेल तर तुम्ही बोअर युद्धापासून धडा घ्या. काही दिवसांपूर्वी जे लोक त्या साम्राज्याचे शत्रू होते, ते आता मित्र बनले आहेत."(बापट भ. ग. २००२, पृ. ४१-४४)

[९] नाना पाटील व यशवंतराव चव्हाण यांच्या ५ नोव्हेंबरच्या भेटीबाबत प्रश्नचिन्ह आहे. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात यशवंतरावांनी स्वत:च असे लिहिले आहे की, "भूमिगत चळवळीची ही दुसरी अवस्था निर्माण झाल्यामुळे तिच्याशी सुसंगत अशी आमची संघटना उभी करण्याचे काम आम्हांला अधिक काळजीपूर्वक करावे लागले. क्रांतिवीर नाना पाटील यांची या बाबतीतील संघटना अतिशय चोख आणि जबरदस्त होती. त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांना निरोप पाठवून भेटणे किंवा काही निरोप पाठवविणे सोपे होते. पण प्रत्यक्षात नाना पाटलांना भेटणे कधीच सोपे गेले नाही. माझ्या भूमिगत जीवनाच्या काळात त्यांना भेटून त्यांच्याशी विचारविनिमय करावा, अशी माझी फार इच्छा होती, परंतु ते मला कधीच करता आले नाही. त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा जो ससेमिरा होता, या दृष्टीने ते काळजी घेत होते, ते युक्तच असले पाहिजे, असा विचार करून हा विषय मी तेथेच सोडला. (चव्हाण यशवंतराव, २०१२, पृ. २५९)

[१०] मगनलाल बागडी व लाल सैनिकांना पकडून देणाऱ्यांसाठी नागपूरच्या जिल्हा पोलीस अधीक्षकाने २० ऑगस्ट १९४२ रोजी जाहीर केलेल्या इनामाच्या घोषणापत्रातला मजकूर :

"The experience of the last weeks leaves no doubt that the organised destruction of Government property and communication has been organised and done by HINDUSTANI RED ARMY. The nature of the destruction proves conclusively that the gang worked on a well thought out and long pre-arranged plan. At Mouda it is known that the gang fired at two Head Constables. (who were wounded) in their attack on the Station-House building. Subsequently they stole muskets, bayonets, ammunition, uniforms and great-coats from the building. It is vitally important that the members of this dangerous gang should be brought to book without delay and there should be hesitation in

employing whatever measure that is necessary in effecting that arrests. This following awards are offered :-

1.Maganlal Bagdi : Age 35, height 5 feet 8 inches, sallow complexion, long face, strong build, big eyes, low forehead – Rs. 1,000.

2.Shyamnarayan Kashmiri: Age 35, height 5 feet 5 inches, fair complexion, sunken cheeks, strong build, big eyes, pointed nose, Rs. 5,00.

3. Shyamlal Nai : Age 35, height 5 feet 9 inches, dark complexion, sunken cheeks, thin build, big eyes, pointed nose, – Rs. 5,00.

4. Vinayak Sakharam Dandekar: Age 34, height 5 feet 5 inches, wheat complexion, stout build, ovel face, prominent eyes, pointed nose. Rs.1,000.

5. Rs. 200 each for any member of the gang who was known to be actively employed with Bagdi in their recent attack on Government servants or property.

Nagpur : Sd/- E. L. TREGENZA

The 20th Aug. 1942 District Supdt. Of Police

[११] "There is no such thing as 'Gandhism' and I do not want to have any sect after me. I do not claim to have originated any new principle or doctrine. I have simply tried in my own way to apply the eternal truths to our daily life and problems. There is therefore, no question of my leaving any code.. The opinions I have formed and the conclusions I have arrived at are not final. I may change them tomorrow. I have nothing to teach the world. .. All I have done is to try experiments in truth and non-violence on as vast as scale as I could." (Harijan, 2 March 1936)

❑❑❑

# संयुक्त महाराष्ट्रापूर्वीचा मराठी भाषक प्रदेश



दक्षिण महाराष्ट्रातील संस्थाने : भोर, औंध, फलटण, अक्कलकोट, सांगली, मीरज व मीरजमळा, कोल्हापूर, इचलकरंजी, कुरुंदवाड, जंजिरा, सावंतवाडी, जमखंडी, मुधोळ

मुंबई प्रांत (१९५० नंतरचे कर्नाटक) : १४. विजापूर, १५. बेळगाव, १६. धारवाड, १७. उत्तर कन्नड

मुंबई प्रांतातील इतर जिल्हे : मुंबई, कुलाबा, रत्नागिरी, ठाणे, नाशिक, डांग, खानदेश, अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूर

हैदराबाद संस्थान (मराठवाडा) : औरंगाबाद, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद

# २

# संस्थानांतील राजकीय घडामोडी

## २.१. पूर्वकथन :

ब्रिटिश अमदानीत खालसा मुलुखाबाहेर मांडलिक संस्थानिकांच्या राजवटी होत्या. संपूर्ण हिंदुस्थानात छोटी मोठी ५६२ संस्थाने होती. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार संस्थानिकांना संस्थानांतर्गत राज्यकारभाराचे स्वातंत्र्य होते; मात्र ब्रिटिश सत्तेच्या प्रतिनिधीची त्यावर नजर असे. ब्रिटिशांना न दुखावता संस्थानिकांना कारभार चालवावा लागत असे. बऱ्याच संस्थानांतील प्रजाजनांना नागरी हक्क नव्हते. न्यायव्यवस्थाही पुरेशी नव्हती. शेतसाऱ्याचे दर अवाजवी होते. संस्थानिकांना आपल्या संस्थानातील रयतेच्या कल्याणापेक्षा स्वत:चा खाजगी संपत्तिसंचय, शिकार, घोड्याच्या शर्यती अशा स्वरसरंजनात अधिक रस होता. न. चिं. केळकर यांनी 'केसरी'च्या एका लेखात वर्णन केल्याप्रमाणे, "धनगर व मेंढ्यांचा कळप यांच्यामध्ये जो संबंध तोच आपण व संस्थानी प्रजा यांच्या दरम्यान आहे असा बहाणा संस्थानिक करितात. पण तोही खरा नाही, कारण धनगर फार तर लोकर जराशी अंगाबरोबर कापील, पण स्वत:चे बकरे जिवानिशी खाणार नाही. आमचे कित्येक संस्थानिक नुसते मेंढपाळ असते तरी पुरवते; कारण त्यातील कित्येक वाघासारखे क्रूरकर्मे आहेत. कोणी अजून आपण खरोखरच ईश्वरांश आहो अशा धुंदीत आहेत; कोणी संस्थाने ही आपली चरावयाची कुरणे समजतात; आपली छळण्याची हौस भाविण्याकरिता प्रजा ही सामुग्री म्हणून आपल्याला ईश्वराने दिली आहे असे कित्येकांना वाटते; कोणाला हिंदुस्थानांतून अजून गुलामगिरीची जुनी पद्धती नष्ट झालीच नाही असे वाटते. तात्पर्य, कांही थोड्या समंजस, विनयशील, न्यायप्रिय व कनवाळू व्यक्ती सोडून दिल्या तर आमचा संस्थानिक वर्ग हे एक जुनाट राजकीय कल्पनांचे प्रदर्शनच ठरेल." (केसरी, १५ नोव्हेंबर १९२१; केळकर, १९३२, पृ. २२९)

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात संस्थानांच्या बाहेर खालसा मुलुखात गोपाळकृष्ण गोखले - फिरोजशहा मेहता यांचे नेमस्त राजकारण; लोकमान्य टिळक यांचे जहाल राजकारण; म. गांधीजींची अहिंसात्मक सत्याग्रहाची चळवळ यामुळे राजकीय जनजागृतीला वेग आला होता. संस्थानांतही त्याचे पडसाद उमटल्याशिवाय राहिले नाहीत. तेथील सुशिक्षित प्रजाजन आणि काही संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात राजकीय-सामाजिक पुनर्घटनेचे काम सुरू केले होते. मात्र बऱ्याच संस्थानांत खालसा मुलुखातील स्वातंत्र्यवादी चळवळीत भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांवर दंडात्मक कारवाई केली जात असे. राजकीय जाणीव-जागृतीसाठी खालसा मुलुखातून संस्थानात येणाऱ्या कार्यकर्त्यांना सभा घेण्यास मनाई करण्यात येत असे. मुद्रणस्वातंत्र्यावरही बंदी असे. इंग्रज सरकार संस्थानिकांशी असलेल्या दोस्तीचा अथवा तहाचा बहाणा करून संस्थानांच्या अंतर्व्यवस्थेत हात घालू इच्छित नसल्याने त्यांच्याकडूनही संस्थानी प्रजेला मदत होण्याचा संभव नव्हता. खालसा मुलुखातील काँग्रेसजनांनाही संस्थानी प्रजेचे प्रश्न अग्रक्रमाने हाती घ्यावेसे वाटत नव्हते.

अशा नकारात्मक परिस्थितीत संस्थानी प्रजेच्या प्रश्नांची तड लावण्याकरिता महाराष्ट्रातील न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन, गणपतराव अभ्यंकर यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांचे व ब्रिटिश अधिकाऱ्यांचे मन वळविण्याकरिता पुढाकार घेतला. पुण्यात 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा' स्थापन केली. दक्षिण महाराष्ट्रातील सर्व संस्थानांमध्ये राजकीय जाणीवजागृती करण्यासाठी प्रजापरिषदा स्थापन करण्याची चळवळ सुरू केली. या परिषदांतून आपल्या हक्क व कर्तव्याविषयी अनभिज्ञ असलेल्या जनतेचे राजकीय शिक्षण करण्याचे अभियान चालवले. संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात जबाबदार राज्यपद्धतीचा अवलंब करून लोकहिताचे निर्णय घ्यावेत; नागरी हक्कांची पुन:स्थापना, राज्यप्रशासनात जनतेची सामिलकी, आणि करांचा बोजा सुसह्य करणे या मागण्यांची पूर्तता करावी यासाठी स्थानिक लोकमताचा दबाव वाढविण्याचे तंत्र अमलात आणले. या चळवळींमुळे संस्थानी प्रजेचा खालसा मुलुखातील राजकारणाशी थेट अनुबंध जोडला गेला. संस्थानांतल्या या प्रजापरिषदांच्या चळवळींचे नेमके योगदान काय राहिले, याचा येथे तपास करावयाचा आहे. ब्रिटिश सरकार, राष्ट्रीय काँग्रेस आणि संस्थानिकांचे नरेंद्र मंडळ या तिहेरी संदर्भचौकटीतून हा तपास करावयाचा आहे. या चळवळीतून संस्थानी मुलुखातल्या राजकीय संस्कृतीची जडणघडण कशी झाली याचा प्रामुख्याने मागोवा घ्यावयाचा आहे.

## २.२. राष्ट्रीय सभेची संस्थानांकडे पाहण्याची भूमिका :

१८८५ साली राष्ट्रीय सभा स्थापन झाल्यापासून १९२० पर्यंत संस्थानातल्या प्रजेला राष्ट्रीय चळवळीत सहभागी करून घेण्याविषयी अथवा तेथील प्रजाजनांचे प्रश्न

धसास लावण्यासाठी कोठलेही ठोस प्रयत्न झाले नव्हते. कॉंग्रेसच्या घटनेतच संस्थानांच्या अंतर्गत कारभाराचे प्रश्न चर्चेला घेण्याची तरतूद नव्हती. संस्थानिकांनी प्रजेचे विश्वस्त समजून स्वत:साठी उत्पन्नाच्या प्रमाणात थोडा पैसा घ्यावा व आपल्या प्रजेला राज्यकारभारात पूर्ण स्वायत्तता द्यावी असे महात्मा गांधींचे मत होते. त्यांच्या मते ब्रिटिश कायद्यानुसार संस्थाने ह्या स्वतंत्र सत्ता असून कॉंग्रेसने संस्थानांच्या बाबतीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केल्यास संस्थानी प्रजेच्या हितसंबंधांना धोका पोहचू शकतो. त्यामुळे संस्थानी मुलुखातल्या चळवळीत राष्ट्रीय कॉंग्रेसने अधिकृतपणे पुढाकार घेण्यास त्यांचा आक्षेप होता. भौगोलिक हिंदुस्थानचा संस्थाने हा एक भाग असला तरी राजकीयदृष्ट्या पोर्तुगीज (गोवा) व फ्रेंच (पॉंडेचरी) हिंदुस्थानच्या बाबतीत जसे आपण काहीच करू शकत नाही, तसे संस्थानांच्या बाबतीतही आपली असहायता आपण लक्षात घ्यायला हवी, असे गांधीजींचे सुरुवातीला मत होते. १९३४ साली न. चिं. केळकर यांना लिहिलेल्या पत्रातून गांधीजींनी ही भूमिका स्पष्ट केली होती. (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. १०६-१०८) एका प्रसंगात कोल्हापूरच्या छत्रपतींच्या कारभारासंबंधी अभिप्राय व्यक्त करताना पत्रकार या नात्याने न. चिं. केळकर यांनीही गांधीजींच्या या भूमिकेशी मिळतेजुळतेच मत व्यक्त केले होते, ते असे : "महाराजांची (कोल्हापूरचे छत्रपति) कारकीर्द सुराज्यव्यवस्थापूर्ण नाही हे जरी आम्हांस माहीत आहे तरी तो प्रश्न मुख्यत: त्यांच्या प्रजाजनांचा असून कॉंग्रेसच्या आजवरच्या धोरणाप्रमाणेच आम्हा वर्तमानपत्रकारांचेही धोरण संस्थानच्या अंतर्गत कारभारांत फारसे लक्ष द्यावयाचे नाही असेच चालत आलेले आहे. आम्हाला सुराज्यव्यवस्थेची चाड असली तरी संस्थानिक आपल्या कारभारापुरते प्राय: स्वतंत्र आहेत, अथवा असावे असेच आम्हांस वाटते. त्यांच्या अंतर्गत कारभारावर टीका करणे हे न्यायाचे असले तरीही स्वकीय संस्थानांविरुद्ध परकीय इंग्रज सरकारकडे एक प्रकारे चहाडी केल्यासारखेच होते. असल्या सूक्ष्म भावनेने आम्ही आपली लेखणी पुष्कळ वेळा पुष्कळशी आवरून धरली आहे." (अभ्यंकर ग. र. १९३२, पृ. २३०)

संस्थानी प्रजेस सक्रिय मदत करावयाची नाही, हे कॉंग्रेसचे धोरण होते. त्यानुसार हिंदी संस्थानांतील लढा कॉंग्रेसच्या नावावर चालवू नये, तेथे कॉंग्रेस कमिट्या स्थापन करू नयेत असे आदेशही काढण्यात आले होते. या नकारात्मक पार्श्वभूमीवर अ. भा. संस्थानी लोकपरिषदेने ११ ऑगस्ट १९३५ रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून कॉंग्रेसने आपले धोरण बदलावे असे आवाहन केले. 'ज्यावेळी कॉन्स्टिट्युअन्ट असेंब्लीची घटना होईल, त्यावेळी खालसामधील प्रजेला ज्या नियमाबरहुकूम प्रतिनिधित्व मिळेल, त्याप्रमाणे संस्थानी प्रजेलाही मिळेल' याविषयी राष्ट्रीय सभेने धोरण निश्चित करण्याचे आवाहन या पत्रकातून करण्यात आले होते. त्यानंतर १९३६ च्या फैजपूर कॉंग्रेसमध्ये

संस्थानातील नागरी हक्क संपादनाच्या लढ्यात काँग्रेस सहभागी होईल, अशा आशयाचा ठराव पारित झाला. १९३८ च्या हरिपुरा काँग्रेसने संस्थाने ही हिंदुस्थानचा अविभाज्य भाग असून ती पृथक करण्यात येऊ नयेत व संपूर्ण स्वराज्य हे राष्ट्रीय सभेचे ध्येय संस्थानांनासुद्धा लागू असल्याचे जाहीर केले. मात्र काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षावर बोजा न टाकता व्यक्तिश: संस्थानी प्रजेच्या चळवळीला साहाय्य करावे, असेही नमूद करण्यात आले. सुभाषचंद्र बोस यांनी त्रिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणातून मात्र याउलट मतप्रदर्शन केले. संस्थानी प्रजेच्या नागरिकत्वाच्या हक्कासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीने लढा सुरू करणे इष्ट आहे, असा स्पष्ट अभिप्राय त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. काँग्रेसच्या अशा धरसोडीच्या धोरणामुळे संस्थानातल्या प्रजेला स्वत:च्या हिंमतीवर आपला स्वातंत्र्यलढा पुढे नेणे भाग होते.

राष्ट्रीय सभेच्या प्रयत्नांमुळे १९०९ साली खालसा मुलुखात मोर्ले-मिंटो सुधारणांचा लाभ झाला होता; संस्थानी प्रजेला मात्र हे लाभ मिळाले नाहीत. १९१७ साली लंडनच्या हाऊस ऑफ कॉमन्सने हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची चौकशी करण्याकरिता भारतमंत्री मॉंटेग्यूटेग्यु व व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड यांच्यावर कामगिरी सोपविली होती. त्यांच्या शिफारशींनुसार खालसा मुलुखात शिक्षण, आरोग्य व आविष्कारस्वातंत्र्याविषयीच्या काही तरतूदी झाल्या होत्या. संस्थानांनाही असा लाभ मिळावा म्हणून त्यावेळी महाराष्ट्रातील गणपतराव अभ्यंकर व काठेवाडातील संस्थानी प्रजेकडून मॉंटेग्यू यांचेकडे कैफियत मांडण्यात आली. हिंदुस्थानच्या नव्या घटनेत संस्थानी प्रजेच्या हिताची दखल घेतली पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली. या कैफियतीची दखल घेतली जाऊन मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड अहवालात संस्थानांतील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी 'नरेंद्र मंडळ' स्थापन करण्याची योजना पुढे आली. या शिफारशीनुसार ८ फेब्रुवारी १९२१ रोजी हिंदुस्थानातील संस्थानिकांचे प्रातिनिधिक नरेंद्रमंडळ स्थापन झाले. देशातल्या एकूण ५६२ संस्थानांपैकी पहिल्या दर्जाच्या १०८ संस्थानांना नरेंद्रमंडळात स्थान मिळाले. दुसऱ्या दर्जाच्या १२७ संस्थानांतून १२ प्रतिनिधींना नरेंद्रमंडळात पाठविण्याची तरतूद करण्यात आली. उर्वरित ३२७ छोट्या संस्थानांना मात्र नरेंद्र मंडळात स्थान नव्हते. अर्थात, हे नरेंद्रमंडळ हा एक फार्सच असल्याचे तत्कालीन जाणकारांचे मत होते. न. चिं. केळकर यांच्या मते "नरेंद्रमंडळ म्हणजे राजकारणाच्या कोरड्या बिड्या फुंकीत बसण्याकरिता रंगवून सजवून तयार केलेला एक दिवाणखाना, याहून त्याला अधिक महत्त्व नव्हते." (केळकर, १९३२, पृ. २४०) नरेंद्रमंडळात राजकीय सुधारणांचा कुठलाही ठोस पर्याय चर्चिला जात नव्हता. ब्रिटिश शासनाकडून मात्र संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात कायदेमंडळ स्थापन करावे, अशी सूचना नरेंद्रमंडळाला करण्यात आली होती. राष्ट्रीय सभेनेही यापूर्वीच १९२० च्या

नागपूर अधिवेशनात संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात जबाबदार राज्यपद्धती स्थापन करावी अशा आशयाचा ठराव पारित केला होता.

१९२७ च्या मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनासाठी माणिकलाल कोठारी यांच्या नेतृत्वाखाली अ. भा. संस्थानी लोकपरिषदेचे एक शिष्टमंडळ पाठविण्यात आले. या शिष्टमंडळाची मद्रास अधिवेशनात दखल घेतली गेली व 'संस्थानिकांनी प्रातिनिधिक संस्था स्थापन करून राज्यकारभारात लोकसहभाग वाढवावा' अशा आशयाचा ठरावही संमत करण्यात आला. १९२८ च्या कलकत्ता अधिवेशनात पं. जवाहरलाल नेहरू यांनी संस्थानांच्या अंतर्गत राज्यकारभारासंबंधीचे विषय कॉंग्रेसने विचारात न घेण्याचे कलम काढून टाकण्याची सूचना केली. या दुरुस्तीनंतर कॉंग्रेसने संस्थानी प्रजेच्या जबाबदार राज्यपद्धती स्थापन करण्याच्या लढ्याला पूर्ण पाठिंबा देण्याचा ठरविले. तसेच संस्थानिकांनी प्रजेला भाषण स्वातंत्र्य, वृत्तपत्रीय अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संस्था-संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, आणि वित्त व जीविताची हमी हे नागरिक स्वातंत्र्याचे हक्क द्यावेत, अशी शिफारस करण्यात आली. संस्थानातल्या प्रजेच्या स्वातंत्र्यलढ्यांची कॉंग्रेस पाठराखण करेल असेही ठरावात स्पष्टपणे नमूद करण्यात आले. [1] १९२९ च्या लाहोरच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातही संस्थानिकांनी आपापल्या संस्थानांत भाषणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, मालमत्तेची सुरक्षितता दिल्याचे जाहीर करावे, असा ठराव पारित करण्यात आला. (पटवर्धन अ. वि. १९४०, पृ. १०४)

## २.३. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा :

संस्थानी प्रजेच्या प्रश्नांबाबत कॉंग्रेसकडून ठोस कृतिकार्यक्रम घेतला जाण्याची कुठलीच चिन्हे दिसत नसल्याने विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे पुढारी न. चिं. केळकर, अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन यांनी पुढाकार घेऊन पुणे शहराच्या दक्षिणेला अडीचशे मैलांच्या भूक्षेत्रांत पसरलेल्या दक्षिणी संस्थानांच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र लोकमंच स्थापन केला. दक्षिण महाराष्ट्रीय संस्थानांमध्ये जबाबदार राज्यपद्धतीची मुहूर्तमेढ करण्याच्या हेतूने संस्थानी मुलुखात राजकीय जागृतीची व्यापक मोहीम हाती घेतली. संस्थानी मुलुखात राजकीय चळवळीचा प्रारंभ करण्यासाठी २४-२५ मे १९२१ रोजी पुणे येथे दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन घेण्याचे जाहीर केले. रा. शंकर भालचंद्र बापट यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत ही परिषद झाली. बापटांना फलटण व जमखिंडी येथील दिवाणपदाचा अनुभव असल्याने संस्थानी प्रश्नांची उत्तम जाण होती. दक्षिणेतील विविध संस्थानांतून पुण्याच्या परिषदेत २५० प्रतिनिधी सहभागी झाले. या परिषदेचे काम पुढे चालू ठेवण्यासाठी *'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा'* नावाची संस्था

स्थापन करण्यात आली. सभेचे चिटणीस म्हणून अनुक्रमे न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन आणि बा. वि. शिखरे यांनी काम पाहिले. तात्यासाहेब न. चिं. केळकर यांनी संस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीची संकल्पना रुजविण्यासाठी करावयाच्या लोकचळवळची पथ्ये व संस्थानिकांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन याविषयी काही मार्गदर्शक तत्त्वे सुचविली : " अवश्य असेल त्या ठिकाणी निर्भीडपणाने परंतु शिष्टाचार न सोडता संस्थानिकांवर टीका केली पाहिजे; सौम्य शब्दांनी जेथे उपयोग होण्यासारखा आहे अशा प्रसंगी बेजबाबदार टीका करणे हेही गैरशिस्त आहे. परंतु कित्येक प्रसंगी अपरिहार्य कारण घडल्यानंतर किंवा अक्षम्य असे दुर्वर्तन झाल्यानंतर संस्थानिकांचा मुलाहिजा ठेवणे किंवा भिडेने त्यांचा पाठपुरावा करणे हे हल्लीच्या परिस्थितीत केव्हाही योग्य आहे, असे म्हणता येणार नाही." (अभ्यंकर ग. र. १९३२, पृ. २२२९)

पुण्याच्या 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभे'ने संस्थानिकांसाठी एक कृतिकार्यक्रम सुचविला होता, तो असा ;

१. संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात 'प्रजाप्रतिनिधी संस्था' स्थापन करून त्यांना कायदे करण्याचा अधिकार द्यावा.
२. संस्थानिकांच्या खाजगी खर्चाव्यतिरिक्त संस्थानचे सर्व अंदाजपत्रक चर्चेसाठी या कायदेमंडळापुढे ठेवावे.
३. जुलमी आणि नागरी स्वातंत्र्यावर घाला घालणारे कायदे रद्द करावेत.
४. लहान संस्थानांचे उत्पन्न थोडे असल्याने निरनिराळ्या संस्थानांनी फेडरेशन करून सामाईक खर्चाने मोठ्या पगाराचे सुशिक्षित व स्वतंत्र अधिकारी नेमावेत व संस्थानातल्या प्रशासनाची गुणवत्ता वाढवावी.

'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभे'ची एकूण ११ अधिवेशने झाली. त्यानंतर '*दक्षिण संस्थान लोकपरिषद*' या नव्या नावाने या परिषदेचे पुन:संघटन झाल्यावर जी अधिवेशने झाली ती येणेप्रमाणे:

१. २४-२५ मे १९२१, पुणे : अध्यक्ष : राव. शं. भा. बापट
२. १८-१९ मे १९२२, पुणे : अध्यक्ष : वा. रा. गुप्ते
३. २९-३० मे १९२३, बेळगांव : अध्यक्ष : ग. भा. साने.
४. २८-२९ मे १९२४, कुपवाड : अध्यक्ष : बॅ. मु. रा. जयकर
५. २४-२५ मे १९२५, पुणे : अध्यक्ष : बा. सी. कामत
६. २२-२३ मे १९२६, पुणे : अध्यक्ष : ग. र. अभ्यंकर
७. १७-१८ डिसेंबर १९२७, मुंबई : अध्यक्ष : दा. वि. गोखले
८. ३१मे व १जून १९२९, पुणे : अध्यक्ष : ग. र. अभ्यंकर
९. २१-२२ मार्च १९३१, पुणे : अध्यक्ष : श्री. ग. वझे

१०. २३-२४ डिसेंबर १९३३, पुणे : अध्यक्ष : अ. बा. लठ्ठे

११. ५-६ जून १९३७, कुडची : अध्यक्ष : श्री. नरिमन

दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या अकराव्या परिषदेनंतर ही सभा विसर्जित करण्यात आली; मात्र *'दक्षिण संस्थान लोकपरिषद'* या नव्या नावाने हे काम पुढे चालू राहिले. २२-२३ मे १९३८ रोजी परिषदेचे १२ वे अधिवेशन सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सांगली येथे झाले; त्याला जोडून संस्थानी कायदेमंडळाच्या आजी-माजी सभासदांचे संमेलन झाले. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या पुढाकाराने दक्षिणी संस्थानांत १०२ सभा झाल्या. राष्ट्रीय सभेने संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्यलढ्याबाबत कोणते धोरण स्वीकारावे यासाठी ६८०६ प्रजाजनांच्या सह्यांचे निवेदन पाठविण्यात आले; त्यासाठी १२५ गावांत सभा घेण्यात आल्या व १० ते १६ ऑक्टोबर १९३४ या काळात प्रजासप्ताह साजरा करण्यात आला. १९३६ साली डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांची ३० गावात व्याख्याने ठेवली. काँग्रेस अध्यक्षांपासून गोलमेज परिषदेपर्यंत सर्वांना संस्थानी प्रजेच्या लेखी कैफियती पाठविल्या. वामनराव पटवर्धन यांनी १९२६ पासून दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या वतीने *'संस्थानी स्वराज्य'* नावाचे वर्तमानपत्र चालवून राजकीय जाणीव-जागृतीचे काम केले. या वर्तमानपत्राद्वारे संस्थानातील प्रजेचे प्रश्न, संस्थानिकांचे गैरव्यवहार, लोकमताचे प्रदर्शन, राजकीय हक्क व कर्तव्याविषयीचे प्रबोधन होऊ लागले. पुढे सांगलीहून *'दक्षिण महाराष्ट्र'* व *'विजय'*; सावंतवाडी संस्थानातून *'वैनतेय'* आणि कोल्हापुरातील *'विद्याविलास'* या पत्रांनी संस्थानी मुलुखातील लोकजागृतीचे काम अंगावर घेतले.

## भारतीय पातळीवरची लोकपरिषद :

केवळ दक्षिण महाराष्ट्रातल्या संस्थानांपुरताच ही लोकचळवळ मर्यादित राहू नये यासाठी न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन यांनी 'अखिल भारतीय संस्थान लोकपरिषद' स्थापन करण्याची योजना आखली. ५ मार्च १९२२ रोजी मुंबईत देशातील निरनिराळ्या भागांतील संस्थानांच्या प्रतिनिधींची एक सभा सर्व्हंट्स ऑफ इंडियाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली. राजकोटचे बॅ. शुक्ल याच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत निरनिराळ्या संस्थानातील लोकहितवर्धक संस्थांचा परस्परांशी संबंध कसा असावा, लोकमत संस्कारित करण्यासाठी या संस्थांनी काय करावे इत्यादी मुद्यांवर चर्चा झाली. त्यातून अखिल भारतीय पातळीवर प्रजापरिषद संघटित करण्याचा निर्णय झाला व त्यासाठी एक हंगामी समिती गठित करण्यात आली. पुढे चार वर्षांनी १७-१८ डिसेंबर १९२७ रोजी मुंबईस दिवाण बहादूर एम. रामचंद्र राव यांच्या अध्यक्षतेखाली या भारतीय पातळीवरील लोकपरिषदेचे पहिले अधिवेशन घेण्यात आले. या परिषदेस १५०० संस्थानी कार्यकर्ते उपस्थित होते. संस्थाने व खालसा मुलुख यांचे फेडरेशन

करण्याची व या दोन्ही मुलुखांना जोडणारी राज्यघटना तयार करण्याची कल्पना याच अधिवेशनातून पुढे आली. संस्थानिकांच्या अधिपत्याखाली जबाबदार राज्यपद्धती स्थापन करणे हे परिषदेचे ध्येय नक्की करण्यात आले. पुढे या परिषदेच्या पंजाब, राजपुताना, मध्य हिंदुस्थान, मद्रास इत्यादी भागांत परिषदा झाल्यात. अखिल भारतीय पातळीवर संस्थानांच्या प्रश्नांसाठी संघटना बांधण्याचे श्रेय मात्र महाराष्ट्राकडे व विशेषत: दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेचे प्रवर्तक न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन या पुढाऱ्यांकडे जाते. भारतीय पातळीवरची संघटना स्थापन केल्याने सर्वच संस्थानिकांवर लोककल्याणासाठी राष्ट्रीय पातळीवर दबावतंत्राचा वापर करता आला. दक्षिणी प्रांतातल्या संस्थानांतील या लोकचळवळींचा मागोवा येथे घ्यावयाचा आहे.

## २.४. भोर संस्थानातील राजकीय घडामोडी :

भोर संस्थान हे पुण्यापासून अवघ्या ३४ मैलांवर होते; त्यामुळे राजे पंतसचिव यांना पुण्यात राहून संस्थानचा कारभार पाहता येत असे. या संस्थानातला बहुतांश प्रदेश डोंगराळ भागाने व्यापलेला होता. लोकसंख्या जेमतेम १,४१,००० इतकी होती. मावळ्यांची वस्ती असल्याने शेती आणि जनावरे राखणे हीच उपजीविकेची साधने होती. दळणवळणाची साधने नसल्याने व्यापार-विनिमयाला मर्यादा होत्या. भोर, शिरवळ ही त्यातल्या त्यात मोठी गावे होती. पण पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे तिथेही उद्योगधंद्यांच्या वाढीला फारशी अनुकूलता नव्हती. संस्थानाधिपतींनाही रयतेच्या कल्याणापेक्षा त्यांच्याकडून करवसुली कशी अधिकाधिक करता येईल यातच रस होता. " निरनिराळ्या तऱ्हेच्या करांनी तेथील प्रजा अगदी गांजली होती. म्हैस बाळगली तर तिच्यासाठी दरसाल सव्वा रुपया म्हैस-पट्टी द्यावी लागे. लग्नावर कर होता. पाट किंवा म्होतूर लावल्यास कर द्यावा लागे. कुंडापट्टी म्हणून तपकिरीवर कर होता. घाण्यावर, पेंडीवर, शेंदूरावर, गंधक व बंदरीमाल आणि सुकी मासळी यावर कर होता. अशा नमुन्याचे बारा कर होते म्हणून सांगतात. याशिवाय बाळाचा खाऊ, नजराणा, दसरा-दिवाळीच्या सणाच्या वेळचे देकार, असे अनेक प्रकारचे कर लोकांवर असत." (अभ्यंकर ग. र.,१९३२, पृ. २२७) संस्थानतल्या नोकरशाहीला लाचलुचपतीने ग्रासलेले होते. येथील प्रजेच्या वाट्याला राजाकडून सवलती मिळण्यापेक्षा जाचच अधिक होता.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत पुण्यात राजकीय व सामाजिक सुधारणांविषयी लोकजागृतीचे पर्व सुरू होते. राजकीय सुधारणांसाठी राष्ट्रीय सभा ब्रिटिश सत्ताधीशांचे मन वळविण्यासाठी प्रयत्नशील होती. या वातावरणाचा परिणाम होऊन मुंबईत राहणाऱ्या सुधागडच्या दादासाहेब साने, बापूसाहेब लिमये, आबासाहेब आठवले या भूमिपुत्रांनी १९२० साली मुंबईत *'सुधागड तालुका सभा'* स्थापन केली होती. (फडके य. दि. १९९१, पृ. २०७) शिरवळला पिण्याच्या पाण्याची सर्वात मोठी

समस्या होती. हा प्रश्न सोडविण्याच्या निमित्ताने लोकचळवळ संघटित करण्याचा पहिला प्रयत्न तेथे झाला. इथले स्थानिक कार्यकर्ते भाऊसाहेब शेटे, दत्तोपंत वाळिंबे यांच्या पुढाकाराने बापूसाहेब निगडे देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १९२० साली गावसभा स्थापन करण्यात आली. पाण्याचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत सारा भरावयाचा नाही, असा ठराव करून गावसभेने संघर्षाची भूमिका जाहीर केली. २ जानेवारी १९२१ रोजी शिरवळच्या गावकऱ्यांचे शिष्टमंडळ पुण्यास जाऊन पंतसाहेबांना भेटले; त्यांनी पिण्याच्या पाण्याविषयी जनतेचे गाऱ्हाणे राजाच्या कानावर घातले. परंतु संस्थानाकडून त्यांना कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही.

पंतसचिवांकडून अनुकूल प्रतिसाद न मिळाल्याने शिरवळकरांनी आपला लोकलढा अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेतला. ६ फेब्रुवारी १९२१ रोजी त्यांनी *'विचित्रगड तालुका सभा'* स्थापन केली, आणि २७-२८ मार्चला शिरवळला अधिवेशन घेण्याचे जाहीर केले. नियोजित जागी अधिवेशन घ्यायला संस्थानाकडून परवानगी न मिळाल्याने नदीकाठच्या वाळवंटात अधिवेशन झाले. पुणे नगरपालिकेचे तत्कालीन अध्यक्ष रावबहादूर ल. ज. आपटे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने श्रीमंतांची भेट घेऊन अधिवेशनातील मागण्यांचा प्रस्ताव द्यावा असे ठरविण्यात आले. मात्र श्रीमंतांनी या शिष्टमंडळास भेट नाकारली. उलट लोकचळवळींना प्रतिबंध बसावा म्हणून १ मे १९२१ पासून संस्थानात सभाबंदीचा कायदा लागू करण्यात आला. (आपटे ज. श.,१९९८, पृ.५४-५५)

भोर संस्थानात सभाबंदीचा कायदा लागू झाला, त्याच सुमारास २४-२५ मे १९२१ रोजी पुण्यात संस्थानांमधील प्रजाजनांत राजकीय हक्कांसबंधी लोकजागृती करण्यासाठी 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा' नावाचा एक प्रातिनिधिक लोकमंच स्थापन झाला. टिळक संप्रदायातले न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या या लोकमंचाच्या कार्यारिणीत शिरवळच्या भाऊसाहेब शेटे यांची निवड झाली. या लोकमंचाच्या मार्गदर्शनाखाली शिरवळच्या लोकांनी कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. कायदेभंगाच्या या चळवळीला पुण्यातून वामनराव पटवर्धन, श्री. वालचंद कोठारी, डॉ. शिरोडकर, सौ. इंदुमती नाईक यांनी सक्रिय पाठिंबा दिला. १२ ऑक्टोबर १९२१ रोजी शिरवळला झालेल्या सभेला हे सर्व जण हजर होते. कार्यकर्त्यांनी सभाबंदीचा आदेश मोडून जाहीर सभा घेतली. तात्यासाहेब केळकर, वामराव पटवर्धन यांची भाषणे झाली. संस्थानी कायद्याचे उल्लंघन केल्याच्या कारणावरून संबंधितांवर खटले भरण्यात आले. (फडके य. दि., १९९१, पृ. २०७)

संस्थानाने केलेल्या कारवाईमुळे चळवळ थंड न होता, ती अधिक संघर्षशील करण्याच्या दृष्टीने डावपेच आखले जाऊ लागले. १३ नोव्हेंबर १९२१ रोजी वामनराव

पटवर्धन यांच्या पुढाकाराने भोर संस्थान प्रजा परिषदेची स्थापना करण्यात आली. २५-२६ जानेवारी १९२२ ला भोर येथे न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रजापरिषदेचे पहिले अधिशन घेण्यात आले. या अधिवेशनापूर्वी केळकरांना सभाबंदीचा हुकूम मोडल्याच्या कारणावरून अटक झाली होती, परंतु त्या खटल्याचा निकाल लागून केळकरांची नुकतीच सुटका झाल्याने त्यांना या परिषदेत सहभागी होता आले. संस्थानाच्या पोलिस पहाऱ्यात अधिवेशन झाले. अधिवेशनाला दहा हजार मावळ्यांची उपस्थिती होती. जनतेच्या अडचणी राजासमोर मांडणे हे, परिषदेचे उद्दिष्ट असल्याचे स्वागताध्यक्ष डॉ. वि. दा. फाटक यांनी प्रारंभीच स्पष्ट केले. या उद्दिष्टपूर्तीसाठी जुलमी कर रद्द होईपर्यंत स्वस्थ बसायचे नाही, असा निर्णय झाला. सामुदायिक प्रतिकाराच्या राजकीय डावपेचांची आखणी करण्यात आली. त्यानुसार सारा न भरणे, सभाबंदीचा कायदा भंग करणे, प्रजापरिषदेची व्याप्ती गावपातळीपर्यंत वाढविणे अशा प्रकारची व्यूहनीती आखण्यात आली. संस्थानातील सनदशीर चळवळीचा हा पहिला विजय होता, व त्याचा प्रारंभ कायदेभंगापासून झाला. संस्थानांतील सविनय कायदेभंगाचे हे श्रेय न. चिं. केळकर यांच्याकडे जाते. (अभ्यंकर गणपतराव, १९३२, पृ. २२८) दरम्यान १७ जुलै १९२२ रोजी पंतसचिवांचे निधन झाले व त्यांचे उत्तराधिकारी बाबासाहेब गादीवर आले. प्रजापरिषदेच्या यशामुळे बाबासाहेबांना नमते घ्यावे लागले. त्यांनी लग्न टक्का, पाटदान, म्हैसपट्टी इत्यादी कर रद्द केले. सभाबंदीचा कायदा मागे घेतला. लोकांनी मागण्या पूर्ण होताच आपला लढा थांबविला व बाबासाहेबांना मानपत्र देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

प्रजापरिषदेच्या लोकचळवळीचा पहिला टप्पा १९२२ साली यशस्वीपणे पार पडला. मात्र त्यानंतरही लोकहक्कांची पायमल्ली करणाऱ्या काही घटना घडल्या. भाटघर धरणाच्या बांधकामासाठी लागणारे दगड वेळखंड खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून विनामोबदला व विनापरवानगी काढून नेण्याचा सपाटा चालला होता. या प्रश्नाची तड लावण्यासाठी शेतकरी संघटित झाले व त्यांनी 'वेळखंड खोरे हक्क संरक्षण मंडळ' स्थापन करून संघटित लोकचळवळ सुरू केली. 'मोबदला मिळेपर्यंत दगड नाहीत' हा एककलमी कार्यक्रम जाहीर करण्यात आला. अखेर या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबई सरकारने गोविंदराव पोतनीस यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केली. कमिटीच्या शिफारशीवरून शेतकऱ्यांना १२,००० रुपये नुकसानभरपाई देण्याचे मान्य करण्यात आले व त्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला वाटण्यात आला.

सविनय कायदेभंगाच्या माध्यमातून आपल्या न्याय्य हक्कांची तड लावता येते, याचा अनुभव आल्यानंतर प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना प्रत्येक अन्यायकारी निर्णयाविरुद्ध लोकलढा उभा करून मागण्या पदरात पाडून घेण्याची नवी शैली अवगत

झाली. हिरड्याचे उत्पादन संस्थानाबाहेर ब्रिटिश हद्दीत विक्रीला पाठवताना 'निर्गत कर' लादला जात असे. शिवाय मुंबईच्या पुरुषोत्तमदास मथुरदास या एकाच कंपनीस हिरडा विकण्याची सक्ती होती. शेतकऱ्यांनी याविरुद्ध फेब्रुवारी १९२५ मध्ये 'हिरडा सत्याग्रह' करून दाद मागितली. ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळही राजेसाहेबांकडे पाठविण्यात आले. त्यानंतर वामनराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कमिटी नेमण्यात आली. कमिटीच्या शिफारशी लक्षात घेऊन अखेर 'निर्गत कर' न घेता रॉयल्टीबद्दल दीड रुपया घेण्याची तडजोड मान्य झाली. याच पद्धतीने सरदार नातू यांनी विकत घेतलेल्या जमिनी नियमित जमीन कसणाऱ्यांना न देता दुसऱ्यांनाच दिल्या, या अन्यायाविरुद्ध १९२६ चा कादवे सत्याग्रह झाला. कुठल्याही मोबदल्याशिवाय राखीव जंगलासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या, त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी १९३४ ते १९३८ या काळात जंगल सत्याग्रह झाला. दरबाराने अंजनगावकर समिती नेमली, परंतु लोकांनी त्यावर बहिष्कार टाकला. १९३८ साली रा. ब. कुमठेकर यांच्या कार्यकाळात प्रजासभेच्या मागण्या मंजूर झाल्या व ही लोकचळवळ यशस्वी झाली. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीतही भोर संस्थानच्या प्रजाजनांनी हिरीरीने भाग घेतला. दारू दुकानांवर निरोध करणारे सत्याग्रह झाले. संस्थानातल्या स्थानिक चळवळींना अशा प्रकारे राष्ट्रीय चळवळीचे परिमाण प्राप्त झाले. (पटवर्धन वि. अ. १९४०,पृ. २६७-२९९)

भोर संस्थान प्रजापरिषदेने १९२२ ते १९४७ या काळात एकापाठोपाठ एकूण १५ अधिवेशने घेतली.(अधिवेशनांचे वर्ष व स्थळ यांची सूची तळटिपेत दिली आहे.) [२] या अधिवेशनांतून पुढील ठराव पारित झालेत :

१.जबाबदार राज्यपद्धतीच्या संकल्पनेस अनुसरून संस्थानात 'रयत सभा' स्थापन करावी.

२.संस्थानांत ग्रामपंचायती स्थापन कराव्यात.

३.सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे.

४.अन्यायी कर रद्द करावेत.

५.संस्थानात दवाखाने काढावेत.

६.संस्थानाच्या उत्पन्नातील ९०% रक्कम जनकल्याणासाठी खर्च करावी.

७.विधवांना वारसा हक्क द्यावा.

८.सावकारी धंद्यास आळा घालण्यात यावा.

९.लहान संस्थानांनी सहकारितेच्या तत्वावर एकत्र येऊन कारभार करावा.

१०.संस्थानांचे संघराज्य अस्तित्वात आणावे.

या विविध मागण्यांचा विचार होऊन १९२८ साली भोर संस्थानात कायदेमंडळाची

स्थापना झाली. त्यात सरकारी व बिनसरकारी सभासदांचे प्रमाण समसमान ठेवण्याचा निर्णय झाला. १९३२ साली म्युनिसिपालिटीतून एक सभासद कायदेमंडळावर घेण्याचा निर्णय झाला; व १९३३ साली तालुका बोर्डातून तालुकानिहाय एकेक सभासद निवडण्याचा हक्क देण्यात आला. भोरच्या कायदेमंडळात जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी वामनराव पटवर्धन, दामुअण्णा पोतनीस, वाग्भट देशपांडे, बापूसाहेब लिमये, हरिभाऊ देशपांडे, नानासाहेब शिंदकर इत्यादी कार्यकर्त्यांना प्राप्त झाली.

भोर संस्थानात १९३० साली प्रजापरिषदेत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उत्पन्न झाला. सावकार वर्गातले लोक ब्राह्मण होते व ते कुळांना बुडवतात म्हणून त्यांच्यावर ब्राह्मणेतरांचा रोष होता. १९३० साली विचित्रगड तालुक्यातील कारी गावच्या सावकाराने जप्ती आणल्याच्या कारणावरून ब्राह्मणेतरांनी त्यास मारहाण केली. यावरून वाद चिघळला. वामनराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली २७ सप्टेंबर १९३० रोजी भोरला सभा झाली. तेथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर गटांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले. न. चिं. केळकर यांनी 'केसरी'त लेख लिहून या प्रकाराचा निषेध केला. आपल्या लेखात त्यांनी म्हटले होते की, "चळवळीच्या पुढाऱ्यांनी केलेला हा प्रकार सर्वस्वी गैरशिस्तीचा होता. प्रजा बेताल होऊन अन्याय करू लागेल तर तिचा निषेध कठोरपणाने केल्याशिवाय राहणार नाही. प्रजेने कायदा हाती घेणे अनिष्ट आहे. यामुळे चळवळीला वेगळे वळण लागेल." (जोशी ना. वा. १९३९, पृ. ५४५) दरबाराने या पार्श्वभूमीवर राजाराम शेटे, अप्पाराव मुकादम, धोंडो शेटे, गोपीनाथपंत पोतनीस, सोनार, अंबिके यांना अटक केली व खटले भरले. दरम्यान ७ मे १९३१ रोजी प्रजा परिषदेचे अधिवेशन पाथरशेत येथे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात भोरची राजेशाही बेबंदशाही झाली, अशा आशयाची टीका केली. ब्राह्मणेतरांची जात विचारू नका, प्रकृती विचारा; ती स्वराज्यशील असल्याचे कर्मवीरांनी आपल्या भाषणात ठणकावून सांगितले. पुढल्या काळात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या दोन्ही समाजांतील कार्यकर्त्यांनी प्रजापरिषदेची लोकचळवळ संघटित केली व पुढे नेली. भोर संस्थानच्या प्रजापरिषदेच्या यशाविषयी विठ्ठल रामजी शिंदे यांचा अभिप्राय पुरेसा बोलका आहे :

"ह्या संस्थानातील गेल्या १० वर्षांच्या चळवळीचे मी जेव्हा कारणापुरते अध्ययन केले, तेव्हा मला असे आढळून आले की, ह्या परिषदरूपी दर्शनी पडद्यामागे एक चित्तवेधक आणि आदर्शपूर्ण दिव्य घडत आहे. शेट्ये पाटील, पोतनीस बंधू, गुप्ते, वाळिंबे, साने आदिकरून संस्थानवाशी सद्गृहस्थांनी हाती कंकण बांधून जो हा प्रजापक्षाचा राजसूय यज्ञ आरंभला आहे, त्याला आता १० वर्षांनी चांगले दृश्य रूप प्राप्त झाले आहे. इतर पुष्कळ परिषदांप्रमाणे आगीवाचून नुसता धुराचा डोंबाळा नसून ही परिषद म्हणजे

सह्याद्रीतील एक ज्वालामुखी आहे, आणि तिच्या १० वर्षांच्या भूतकाळाहूनही भविष्यकाल नुसत्या भोर संस्थानालाच काय तर महाराष्ट्रालाही चांगला हलवून जागे करील असे चिन्ह मला दिसत आहे."

(महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य, <virashinde.com>)

## २.५. औंध संस्थानातील राजकीय जागरण :

औंध संस्थानात सातारा आणि विजापूर जिल्ह्यांतील आटपाडी, कुंडल, गुणदाळ हे तालुके; औंध, व किन्हई ही ठाणी मिळून ७३ गावांचा समावेश होता. संस्थानाचा सलग भूप्रदेश नव्हता. विसाव्या शतकात १९०१ ते १९०५ या काळात दादासाहेब परशुराम श्रीनिवास पंतप्रतिनिधी; १९०५ ते १९०९ नानासाहेब गोपाळकृष्णराव परशुराम पंतप्रतिनिधी व १९०९ ते १९४७ या काळात श्रीमंत बाळासाहेब भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी (१८६८-१९५१) हे संस्थानाधिपती होते. पैकी बाळासाहेब भवानराव पंतप्रतिनिधी हे उदारमतवादी संस्थानिक होते. जनतेला विश्वासात घेऊन राज्यकारभार करण्याची त्यांची रीत होती. सत्तेचे विकेंद्रीकरण ही संकल्पना त्यांना मान्य होती. त्यांच्या कारकिर्दीत संस्थानातल्या ग्रामपंचायतींसाठी १९१९ साली कायदा करण्यात आला होता. मात्र ग्रामपंचायतींचे काम पहाण्यासाठी साक्षर व चलाख माणसे मिळत नव्हती, याची त्यांना खंत होती. लोकांनी आपल्या मागण्या राजापुढे मांडाव्यात यासाठी त्यांनी स्वत:च *'रयत परिषद'* भरविण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणली होती. ३१ ऑक्टोबर १९१७ रोजी रयत परिषदेची पहिली सभा भरविण्यात आली होती. (Rothermund Indira, 193, p.8) पुढे पंतप्रतिनिधी दरवर्षी जमाबंदीसाठी तालुक्याला जात, त्यावेळी ही परिषद भरे. लोक श्रीमंतांपुढे सारा सूट द्या, तगाई मंजूर करा, गावासाठी रस्ता, देऊळ, धर्मशाळा द्या अशा प्रकारच्या मागण्या ठेवीत व तेथेच पंत रयतेला उत्तरे देत. जनतेला राज्याची स्थिती-गती समजली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. रयतेकडून राजाला मिळणारा कर हा राजाच्या चैनीसाठी नसून जनकल्याणाच्या सोयी पुरविण्यासाठी आहे, अशी त्यांची धारणा होती. या धारणेतूनच त्यांनी १९२१ पासून औंध संस्थानच्या अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी व सरकारला जरूर तो सल्ला देण्याकरिता वकील, डॉक्टर, कारखानदार व व्यापारी यांना निमंत्रित करण्याची प्रथा सुरू केली होती. याच वर्षापासून राज्यकारभाराची सात खात्यात वर्गवारी करण्यात आली व प्रत्येक खात्यासाठी सेक्रेटरी नियुक्त करण्यात आला.

या छोट्या राज्यातही राज्यकारभार अधिकाधिक लोककेंद्री व लोकशाही मूल्यचौकटीतून व्हावा यासाठी आग्रह धरणारे प्रजाजनही होते. उदाहरणार्थ, २४ डिसेंबर १९२४ रोजी पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी झालेल्या सभेत लोकप्रतिनिधींनी आपल्या राजाकडे काही धाडसी मागण्या केल्या :

१. राज्याच्या कायदेकानूसंबंधी ठराव मांडण्याचा या सभेला अधिकार असावा.
२. न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत करण्यात यावी.
३. सेक्रेटरींची पदे कमी करावीत.
४. अबकारी कर रद्द करावा
५. नोकरांच्या पगाराचे टाइमस्केल ठरवावे.
६. अंदाजपत्रकीय तरतूदीबाहेर जास्त खर्च होऊ देता कामा नये.
७. कर्जफेडीसाठी विहित केलेली रक्कम कर्जफेडीसाठीच वापरावी.

या सात मागण्यांपैकी पहिली सूचना मंजूर झाली नाही. इतर मागण्यांबाबत मात्र चर्चा करून निर्णय घेण्यात आले. संस्थानाच्या डोक्यावरचे कर्ज फिटेपर्यंत संस्थानातल्या खर्चाची तपासणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली व दर महिन्याच्या २० तारखेला या समितीस संस्थानाच्या मासिक खर्चाची तपासणी करण्याचा अधिकार देण्यात आला. शिवाय अंदाजपत्रकावर नियंत्रण ठेवण्यासाठी १९२५ साली पं. सातवळेकर, लक्ष्मण गणेश पटवर्धन व एक सरकारी अधिकारी यांची नियंत्रक समिती नेमण्यात आली. विणकरांच्या मागांवर असलेला कर माफ केल्याने येणारी तूट भरून काढण्याकरिता कापडाच्या ताग्यांवर लावलेला छाप्याचा कर माफ करण्यात आला. प्रातिनिधिक सभेला कायदे करण्याचे व राज्यकारभारासंबंधी सर्वसाधारण ठराव मांडण्याचे व उपप्रश्न विचारण्याचेही अधिकार प्रदान करण्यात आले. १९२६ सालापासून प्रातिनिधिक सभेत लोकनियुक्त सभासदांचे बहुमत राहील अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली. लोकनियुक्त सभासद २० आणि सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त सभासद १६ अशी संख्या ठरविण्यात आली. १९२८ पासून प्रातिनिधिक सभेसाठी लोकनियुक्त अध्यक्ष नेमण्याची प्रथा सुरू झाली. रावबहादूर काळे हे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष झाले. १९२६ सालीच ग्रामपंचायतीच्या कायद्यात सुधारणा करून ग्रामपंचायतींचे अधिकार वाढविण्यात आले.

१९२६ साली नेमलेल्या औद्योगिक कमिशनच्या व १९२७ साली नेमलेल्या शेतकी कमिशनच्या अहवालावर श्रीमंतांकडून काहीच कारवाई झाली नाही, म्हणून लोकप्रतिनिधींमध्ये असंतोष होता. औंध संस्थानचा कारभार इतर संस्थानांच्या तुलनेत अधिक लोककेंद्री व पारदर्शी होता; तरीही जेथे जेथे उणिवा दिसत तेथे तेथे लोकप्रतिनिधींनी संस्थानच्या कारभारावर उघड टीका करण्याची संधी सोडली नाही. कधी कधी पैशाच्या अभावी योजनांची अंमलबजावणी व्हायला विलंब लागे; कधी राजाकडूनच खुली चर्चा व्हायला वाव दिला जायचा नाही, अशा वेळी या संस्थानातील जागृत लोकप्रतिनिधींनी राजावर उघड टीका करण्यासाठी भाषणस्वातंत्र्याचा व खुल्या चर्चेचा प्रस्ताव मांडला. संस्थानात भाषणस्वातंत्र्य आहेच, त्यामुळे त्यासाठी वेगळ्या

ठरावाची गरज नसल्याचा खुलासा राजाने केला. त्यामुळे संकोच न बाळगता राजकीय प्रश्नांवर मुक्त चर्चा करण्याचा मार्ग खुला झाला.

**प्रजापरिषदेची स्थापना :**

प्रजेची गाऱ्हाणी मांडण्यासाठी १९३१ सालापासून औंध संस्थानात *'प्रजापरिषद'* ही एक स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात आली. लक्ष्मणराव किर्लोस्कर, पंडित सातवळेकर यांचा त्यात पुढाकार होता. प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन १९३१ साली आटपाडी येथे अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झाले. पंडित सातवळेकर हे स्वागताध्यक्ष होते. या अधिवेशनापूर्वीच पंतप्रतिनिधींनी १८ जून १९३० रोजी स्वराज्याचा कायदा मंजूर करून पाच वर्षांनंतर संपूर्ण स्वराज्य प्रदान करण्याचे अभिवचन दिले. त्यामुळे या परिषदेचे श्रीमंतांनी स्वागतच केले व तसा संदेशही पाठविला. आपल्या संदेशात त्यांनी प्रजापरिषदेच्या माध्यमातून 'स्वराज्या'ची खरी कामगिरी करण्याची पात्रता आपल्या प्रजेत निर्माण होवो अशी अपेक्षा व्यक्त केली. केवळ मागण्या मागून काम होत नसते, त्यासाठी प्रत्येक स्त्री-पुरुषाने कर्तव्यदक्ष झाले पाहिजे, उद्योगपरायण होऊन स्वावलंबी झाले पाहिजे, याचे भान परिषदेने लोकांमध्ये जागवावे असे आवाहनही त्यांनी प्रजा परिषदेच्या संघटकांना केले. (सातवळेकर, १९३१, पृ. १) प्रजा परिषदेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात औंध संस्थानातल्या प्रजेला स्वराज्याची सनद मिळाली असल्याने या स्वराज्याचे हक्क वापरण्यासाठी गावांची पूर्वतयारी करणे, प्रजेला कोणते हक्क द्यावेत याची चर्चा करणे, हे या अधिवेशनाचे उद्दिष्ट असल्याचे जाहीर केले होते. (सातवळेकर, १९३१, पृ. १०१) आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात सातवळेकरांनी संस्थानी राज्यकारभाराकडून जनतेच्या किमान अपेक्षा काय आहेत याची मांडणी केली. लाचलुचपतीशिवाय सामान्यजनांना न्याय मिळावा, अधिकाऱ्यांच्या लहरीवर आपली सुरक्षितता अवंबून राहू नये यादृष्टीने सुप्रशासनाची हमी लोकांना मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. वामनराव पटवर्धन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या लोककल्याणकारी भूमिकेची प्रशंसा केली.

या अधिवेशनात पुढील ठराव पारित झालेत :

१. ग्रामसभा स्थापन करून त्यांना स्थानिक स्वराज्याचे अधिकार द्यावेत,

२. फेडरल घटनेत नागरिकांच्या मूलभूत हक्कांना अग्रक्रमाने स्थान दिले जावे,

३. प्रजेवर कराचा बोजा वाढवू नये.

४. बेकारांना काम द्यावे. बेकारी दूर करण्यासाठी परदेशी सूत व कापड विकण्यास कायद्याने बंदी करावी.

५. संस्थानातून दारू, भांग, अफू, गांजा यांची दुकाने ताबडतोब बंद करावीत

६. पाच हजारापर्यंतचा शेतसारा हात सुतामध्ये घ्यावा. बागायत नसलेल्या जमिनीवर

बागायतीच्या दराने शेतसारा आकारू नये, ज्या प्रमाणात धारण स्वस्त असेल त्या प्रमाणात शेतसाऱ्यात सूट जाहीर करावी.

७. सर्व संस्थानांना खर्चिक व्यवस्था परवडत नसल्याने सामाईक प्रशासनव्यवस्था निर्माण कराव्यात; त्याचा प्रारंभ न्यायखात्यापासून करावा.

या परिषदेच्या यशाविषयी २५ मे १९३१ रोजी दैनिक केसरी, दै. समर्थ, दै. ऐक्य या पत्रांनी प्रशंसापर मतप्रदर्शन केले. मागण्या मांडण्याआधीच त्या आपल्या प्रजेला देण्यासाठी पुढे सरसावलेल्या संस्थानिकाचा गौरव या पत्रांनी केला. या पार्श्वभूमीमुळे आटपाडीच्या अधिवेशनात संस्थानिकांविरुद्ध एकही नकारात्मक ठराव मांडण्यात आला नाही.

१९३२ साली कुंडल येथे प्रजापरिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष बाबुराव पाटील होते. अध्यक्ष कायदेपंडित प्रो. गणेश रघुनाथ अभ्यंकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "संस्थानचा कारभार सहानुभूतीचा आहे, मात्र जबाबदार नाही" असा आक्षेप नोंदवला व काही सूचनाही केल्या. श्रीमंतांच्या खाजगी खात्याचा खर्च रु.१,७१,००० हा संस्थानच्या मानाने जास्त असल्याचाही आक्षेप नोंदवून या खर्चाचे प्रमाण संस्थानाच्या एकूण उत्पन्नाच्या प्रमाणानुसार ठरविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. श्रीमंतांच्या सद्हेतूचा फायदा घेऊन काही लोक कांगावा करून कोर्टाचा निर्णय झाल्यावरही दयेचा अर्ज करतात व श्रीमंत आपल्या वैयक्तिक अधिकारात त्यात सवलत देतात; याविषयी सुद्धा परिषदेत नापसंती व्यक्त करण्यात आली. श्रीमंतांनी कोर्टाच्या निर्णयात ढवळाढवळ करू नये अशी विनंती करण्यात आली. कुंडल प्रजापरिषदेत पास झालेले काही ठराव असे :

१. सारावाढ नियंत्रित करावी.

२. ग्रामपंचायतीस स्टॅम्प माफ करावा; कोर्ट फी स्टॅम्प कमी करावा.

३. संस्थानचे न्यायालय स्थापन करावे व राजकीय हस्तक्षेपाशिवाय योग्य व्यक्तीची न्यायाधीश पदावर निवड करावी.

४. नोकर लोकांच्या वेतनश्रेणी ठरवाव्यात.

५. संस्थानाने फेडरेशनमध्ये सामील व्हावे व मूलभूत हक्क जाहीर करावेत.

(पटवर्धन १९४०, पृ. ९८-१००)

१९३३ साली औंध येथे मुंबई कायदेमंडाचे सदस्य आ. गोपाळ कृष्ण चितळे यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन झाले. आपल्या भाषणात चितळे यांनी दक्षिणी संस्थानांनी सामाईक न्यायव्यवस्था उभारणे का आवश्यक आहे, याविषयी उहापोह केला. सर्व संस्थानांत ग्रामसभा स्थापण्याची आवश्यकता विशद केली व शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, पशुवैद्यक सुविधा यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. औंधच्या या प्रजापरिषदेत मंजूर झालेले ठराव असे :

१. शेतकऱ्यांना ऋणमुक्त करावे. शेतकऱ्यांच्या स्थावर मालमत्तेचे लिलाव व जप्त्या थांबवाव्यात.
२. गुणदाळ तालुक्याची मातृभाषा कानडी असावी.
३. किरकोळ अर्जाने सरकारांनी कोणताही निकाल करू नये .

या परिषदेची दखल घेताना 'दै. ऐक्य'ने लिहिले होते की, "औंधच्या प्रजा परिषदेने पास केलेल्या ठरावांचा मुख्य भर संस्थानिकाने किंवा दरबाराने काय द्यावे यापेक्षा संस्थानाची प्रगती होण्यासाठी रयतेने काय करावे यावरच आहे... संपूर्ण जबाबदारीच्या स्वराज्याचे शेवटचे शिखर गाठण्याची जबाबदारीही रयतेवरच टाकली आहे." (दै. ऐक्य, २७ मे १९३३)

चौथी परिषद २१ एप्रिल १९३४ रोजी विजापूर जिल्ह्यातील गुणदाळ तालुक्यातील गलगले गावी झाली. स्थानिक वकील गोविंद लक्ष्मण कणबूर हे स्वागताध्यक्ष होते. विशेष म्हणजे या परिषदेला दीडशे महिला उपस्थित होत्या. गलगले परिषदेत पास झालेल्या ठरावांमधून या तालुक्यात कापसाचे उत्पादन जास्त असल्याने कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू करण्याची मागणी करण्यात आली. शिवाय लोकांची मातृभाषा कन्नड असल्याने कन्नड भाषेतूनच प्राथमिक शिक्षण देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. अस्पृश्यतानिर्मूलनाचाही मुद्दा परिषदेत चर्चिला गेला. नदीकाठावरील ज्यांची शेती वाहून गेली आहे, त्यांच्याकडून सारा वसूल करू नये असाही ठराव करण्यात आला. १९३७ साली दिघंची येथे केसरीचे संपादक जनार्दन सखाराम करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रजापरिषदेच्या अधिवेशनात संस्थानातल्या पोलिस खात्यात व एकूणच सार्वत्रिक सुधारणा कशा कराव्यात याविषयी चर्चा झाली. १९३७ हे दुष्काळाचे वर्ष असल्याने सारा सूट मिळण्यासाठी चळवळ झाली. शंकरराव देव व बा. वि. शिखरे यांचे चळवळीला मार्गदर्शन मिळाले. १९ ऑगस्ट १९३८ रोजी दोन हजार शेतकऱ्यांचा मोर्चा औंधच्या कचेरीवर गेला. श्रीमंतांनी मागण्या समजावून घेतल्या व शेतकऱ्यांना आश्वासित केले.

**स्वराज्याची राज्यघटना :**

औंध संस्थानातील प्रजापरिषदांचा हा वृत्तांत लक्षात घेतल्यानंतर या संस्थानात जबाबदार राज्यपद्धती आणण्याच्या दृष्टीने कोणत्या हालचाली झाल्या, ते पाहू या. १९२९ साली मार्च महिन्यात औंध संस्थानात उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. त्याच वर्षी औंध राज्याची नवी राज्यघटना तयार करण्याकरिता न. चिं. केळकर, ग. र. अभ्यंकर, वामनराव पटवर्धन, दादासाहेब करंदीकर, रा. रा. काळे इत्यादी मान्यवरांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने तयार केलेला राज्यघटनेचा कच्चा मसुदा म. गांधींना दाखविण्यात आला व त्यांच्या सूचना विचारात घेतल्या गेल्या.

दरम्यान १९३४ साली प्रातिनिधिक सभेची निवडणूक होऊन लोकनियुक्त सभासदात लक्ष्मणराव किर्लोस्कर, शंकरराव ओगले, पंडित सातवळेकर, गो. ल. कनबूर व रामचंद्र इंगळे यांची निवड झाली. सरकारनियुक्त सभासदात अ. वि. उर्फ वामनराव पटवर्धन, वाग्भट देशपांडे, रा. ब. काळे, अप्पामहाराज पंडित व स्त्री सभासद मनोरमाबाई ठकार यांची निवड झाली. १९३४ साली प्रातिनिधिक सभेने न्याय खाते व अंमलबजावणी खात्यांची फारकत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यानंतर २९ जानेवारी १९३९ रोजी औंधच्या प्रातिनिधिक सभेत 'स्वराज्याचा कायदा'पारित करण्यात आला. खेड्यांचे संघराज्य (federation of village republics) अशा स्वरूपाची ही राज्यघटना असल्याचे वर्णन पं. जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. ११२) अशा प्रकारे राज्यघटना तयार करून प्रजेला स्वातंत्र्य देणारे भारतातले हे पहिले लोकाभिमुख संस्थान राहिले.

औंध संस्थानाने संस्थानाची वाटचाल एककेंद्री सत्तेकडून लोककेंद्री सत्तेकडे नेण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. प्रजापरिषदेच्या अधिवेशनातील ठरावांचा या निर्णयप्रक्रियेवर सकारात्मक प्रभाव पडलेला दिसून येतो. या प्रागतिक निर्णयांचा गोषवारा असा :

१. राज्यकारभार चालविण्यासाठी व राजाला सल्ला देण्यासाठी लोकनियुक्त प्रतिनिधींचे बहुमत असलेली प्रातिनिधिक सभा अस्तित्वात आली.
२. संस्थानाच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी व संस्थानचे हिशेब तपासण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती नेमण्यात आली.
३. औंध बँक संस्थानापासून स्वतंत्र करून तिचे लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्यात आले.
४. संस्थानात दारू-अफू वगैरे मादक पदार्थांना बंदी घालण्यात आली.
५. बालविवाह व जरठकुमारी विवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला.
६. विवाहाची वयोमर्यादा पुरुषांसाठी १६ वर्षे व मुलींसाठी १४ वर्षे ठरविण्याचा कायदा झाला.
७. १९३४ पासून राज्यप्रशासनात न्यायखाते व अंमलबजावणी खाते वेगळे करण्यात आले.
८. नागरिकांना औंध सरकारविरुद्ध कोर्टात दावा लावण्याचा अधिकार देण्यात आला.
९. कारखानदारीसाठी स्वतंत्र कायदा तयार करण्यात आला.
१०. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्यासारख्या उद्योगपतीला दरबार मंत्री नेमून संस्थानातील तज्ज्ञ व्यक्तींची राज्यकारभारात थेट मदत घेण्याचा पायंडा पाडला.
११. स्वराज्याचा कायदा पारित करून नागरी स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले.

## २.६. फलटण संस्थानातील राजकीय घडामोडी :

सातारा जिल्ह्याच्या ईशान्येस नीरा नदीच्या खोऱ्यात ७३ गावांचा समावेश असलेले ३७९ चौ. मैल क्षेत्रफळाचे फलटन संस्थान होते. बाणगंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले फलटण ही या राज्याची राजधानी होती. १८६८ पासूनच फलटणला म्युनिसिपालिटीही होती. १९ व्या शतकाच्या अखेरच्या पर्वात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर हे फलटणचे राजे होते. १७ ऑक्टोबर १९१६ पर्यंत त्यांनी राजेपद भूषविले होते. इंग्रज सरकारने १८९७ साली श्रीमंत मुधोजीरावांची मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती केली होती. राजगादीला वारस हवा म्हणून मुधोजीरावांनी १८९९ साली श्रीमंत नानासाहेब यांना दत्तक घेतले. १८ ऑक्टोबर १९१६ रोजी मुधोजीराव निंबाळकर यांचे उत्तराधिकारी म्हणून श्रीमंत नानासाहेब नाईक निंबाळकर यांना रितसर राज्याभिषेक करून गादीवर बसविण्यात आले; मात्र राज्यकारभाराचे अधिकार नानासाहेब सज्ञान झाल्यावर १५ नोव्हेंबर १९१७ रोजी प्रदान करण्यात आले.

श्रीमंत नानासाहेब नाईक निंबाळकर हे प्रागतिक विचाराचे राजे होते. राज्यप्रशासनाला जनतेच्या आकांक्षांची पूर्तता करता यावी यासाठी त्यांनी १९२७ साली संस्थानातले अधिकारी आणि प्रजेचे प्रतिनिधी यांचे संयुक्त सल्लागार मंडळ संघटित केले होते. ७ सप्टेंबर १९२९ रोजी त्यांनी आपल्या संस्थानात कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ असलेल्या विधिमंडळाची स्थापना केली व लोकपक्षीय मंत्री नेमून जनकेंद्री प्रशासनाचा पाया घातला. अनियंत्रित अगर एकसत्ताक राज्यपद्धती कितीही सद्बुद्धी प्रेरित असली तरी तिचे युग आता संपले आहे, हे त्यांनी ओळखले होते. राजकीय सुधारणांचा हा पहिला हप्ता देताना त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध करून आपल्या संस्थानाचा कारभार लोकानुवर्ती व लोकप्रतिनिधीस जबाबदार असा असेल, याची ग्वाही दिली होती. (१७-९-१९२८चा जाहीरनामा, पटवर्धन, १९४०, पृ. ३०५) १९३१ साली लोकल बोर्डाची स्थापना करण्यात आली. न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करून प्रशासनात पारदर्शीपणा आणला. १९३३ साली विलायतेस जाऊन आल्यावर त्यांनी शेती व औद्योगिक क्षेत्रांत सुधारणा घडवून आणता याव्यात यासाठी या दोन्ही क्षेत्रांकरिता प्रत्येकी २०,००० रुपयांचा स्थायी निधी स्थापन केला. १९३६ सालापासून फलटण राज्यातील स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला व महिलांना कादेमंडळाचे सदस्य होता येईल याची तरतूद करण्यात आली.१९३९ साली राजकीय सुधारणांच्या दशकपूर्ती निमित्त कायदेमंडातील दोन तृतीयांश सभासद लोकनियुक्त राहातील अशी तरतूद करून लोककेंद्री प्रशासनाचा पाया अधिकच विस्तृत केला. शिवाय कायदेमंडळाचे अधिकारही वाढविण्यात आले. कायदेमंडळात एक हरिजन सभासदही नेमण्यात येई. म्युनिसिपालिटीतही १९३९ पासून लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्याची पद्धत अंगिकारली गेली.

फलटण संस्थानात वामनराव पटवर्धन यांच्या पुढाकाराने २४ एप्रिल १९३८ रोजी ब्रिटिश हिंदुस्थानातील दक्षिणी संस्थान लोकसभेची संलग्न संस्था स्थापन करण्यात आली होती. मात्र वर्षभरातच ही संलग्नता रद्द करून केवळ 'फलटण संस्था लोकसभा' नामक संस्थेचे

अस्तित्व ठेवण्यात आले. या संस्थेच्या सल्ल्याने संस्थानात सुधारणेसंबंधी काही निर्णयही घेतले गेले. जनावरांची वनचराई-फी माफी, ब्रिटिश हद्दीतील शेतसाऱ्याशी सुसंगत शेतसाऱ्याची आकारणी अशा काही निर्णयांचा त्यात समावेश होता. याखेरीज सुधारणावादी स्वतंत्र पक्ष व १९४० साली 'शेतकरी संघ' नामक राजकीय पक्षाचीही स्थापना झाली होती. या तीनही राजकीय संघटनांमध्ये परस्पसमन्वय होता. संस्थानाच्या विधिमंडळात व राजकीय अधिकारपदावर पुण्याच्या भारत सेवक समाजाचे संस्थापक अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन, सेवानिवृत्त मामलेदार शंकर भालचंद्र बापट, डॉ. रामकृष्ण हरी भड्कमकर, मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश बाळकृष्ण गोविंद फाटक, दिवाण के. वि. गोडबोले या विद्याविभुषितांचा सहयोग होता. लंडनच्या गोलमेज परिषदांध्येही संस्थानचे दिवाण के. वि. गोडबोले यांना पाठविण्यात आले होते. जॉइंट पार्लमेंट कमिटपुढेही गोडबोले यांची महत्त्वपूर्ण साक्ष झाली होती.

## २.७. अक्कलकोट संस्थानची निष्कर्मता :

सोलापूर जिल्ह्यालगत असलेल्या ४८० चौ. मैल क्षेत्रफळाच्या अक्कलकोट संस्थानात प्रजापरिषदेला फारसे यश लाभले नाही. १९२३ साली फत्तेसिंह महाराज (तिसरे) यांच्या निधनानंतर १९३६ पर्यंत अज्ञानी वारस असल्यामुळे राणीसाहेबांना रिजंट नेमून सोलापूरचे कलेक्टरच प्रशासक म्हणून काम पहात होते. या काळात संस्थानात कुठलीही राजकीय चळवळ झाली नाही. १९२३ साली *'अक्कलकोट हितेच्छु मंडळा'*ने अक्कलकोट येथे प्रजापरिषद घेण्याचे ठरविले होते, मात्र सरकारने परवानगी नाकारली. त्यामुळे संस्थानाबाहेर सोलापूर शहरात १६ ऑगस्ट १९२३ रोजी ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद झाली. त्यानंतर दुसरी परिषदही सोलापूरातच १६-१७ ऑगस्ट १९२४ रोजी दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यानंतर १९२९ साली अक्कलकोट येथे न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन झाले. या तिन्ही परिषदांमध्ये जबाबदार राज्यपद्धतीची व शेतसारा कपात करण्याची मागणी करण्यात आली. अर्थात संस्थानाकडून कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. पुढील काळात संस्थानात प्रजापरिषद घेण्यासही परवानगी मिळाली नाही. उलट राजद्रोहाच्या आरोपावरून प्रजापरिषदेचे कार्यकर्ते रंगनाथ पुजारी यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली.

१९३६ साली विजयसिंहराव भोसले गादीवर आल्यानंतरही परिस्थितीत कुठलाच बदल झाला नाही. प्रजापरिषदेच्या कामासाठी अक्कलकोटला निघालेल्या बा. वि. शिखरे यांना तर संस्थानच्या हद्दीत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. विनाकराव देशमुख, रंगनाथ पुजारी यांच्यावर खोटे आरोपपत्र ठेवून अटक करण्यात आली. विजयसिंहराव भोसले यांनी जबाबदार राज्यपद्धतीचे तोंडदेखले आश्वासन दिले होते; मात्र प्रत्यक्षात त्या दिशेने कुठलीच हालचाल झाली नाही.

## २.८. सांगली संस्थानातील राजकीय घडामोडी :

भीमा आणि तुंगभद्रा नद्यांच्या दुआबात सांगली संस्थान अस्तित्वात होते. मिरज प्रांत (३५ खेडी),कुची/ कवठे महांकाळ (३० खेडी), मंगळवेढे (३२ खेडी), तेरदळ (१७ खेडी), शहापूर (७७ खेडी), शिरहट्टी (७३ खेडी) या सहा तालुक्यांतील ११३६ चौ. मैलांचे क्षेत्र या संस्थानात समाविष्ट होते. सांगलीपासून २५ मैलांवर कवठेमहांकाळ, ७५ मैलांवर मंगळवेढा, तर १५५ मैलांवर शिरहट्टी, तर शहापूर बेळगावपासून केवळ १ मैलांच्या अंतरावरचा विखुरलेला प्रदेश या संस्थानात मोडत होता. मिरज, कवठे महांकाळ, मंगळवेढ्याचा परिसर डोंगर-टेकड्यांचा, खडकाळ, खुरट्या झाडा-झुडपांचा आणि लाल मातीचा; तेरदळ, शिरहट्टी, शहापूरचा प्रदेश काळ्या मातीचा सुपीक प्रदेश. संस्थानात सरासरी पर्जन्यमान २५.४७ इंच; त्यात शहापूरला सर्वात जास्त पावसाचे प्रमाण. १८८२-८३ सालच्या नोंदीनुसार तिथे ७०.१८ इंच पाऊस पडला होता , तर सांगलीत केवळ १३.८८ इंच. या संस्थानातून कृष्णा, भीमा, घटप्रभा, तुंगभद्रा, मार्कंडी या नद्या प्रवाहित होत्या. गूळ, हळद, तंबाखू, कापूस, मिरचीचे उत्पादन होते. तेरदळ भागात तांब्यापितळ्याची भांडी घडवण्याचा उद्योग, शिरहट्टी, शहापूर तालुक्यात काचेच्या बांगड्यांचे कारखाने, कांबळी विणणे, कवठे महांकाळला लोकरीचे गालीचे बनविण्याचा उद्योग-व्यवसाय चालत असे. शिरहट्टी भागातल्या मातीत सोने आणि पोलादाचे अंश होते, इतरत्र बेसॉल्ट खडक असला तरी इमारत बांधकामाच्या दगडासाठी वापर केला जात असे. पाथरवट दगडी मूर्ती घडविण्याचा उद्योग करीत. सांगलीच्या प्रसिद्ध गणेश मंदिराचे दगडी बांधकाम इ. स. १८११ सालीच पूर्ण झाले होते. संस्थानात १७५ शाळा व १७ ग्रंथालये होती. १९११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २,२७,२८० होती. ११५-१६ सालची जमाबंदी ६,८५,३३४ होती. (Parasnis, 1917, p. 12-13)

१८०७ साली मिरज व सांगली संस्थान विभक्त झाल्यावर पहिले चिंतामणराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१७८३-१८५१) सांगलीचा राज्यकारभार पहात होते. १८१८ साली मराठी सत्तेच्या पाडावानंतर १५ मे १८१९ रोजी ईस्ट इंडिया कंपनी आणि सांगली संस्थानचे अप्पासाहेब पटवर्धन यांच्यात स्वतंत्र तह झाला होता. परिणामत: संस्थानास ब्रिटिशांनी अभय दिले, तसे संस्थानाकडूनही ब्रिटिशांविरोधी कुठलीही हालचाल झाली नाही. आप्पासाहेब पटवर्धन यांनी आपल्या कारकिर्दीत सतीबंदीचा कायदा लागू केला, ही त्यांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हटली पाहिजे. १५ जुलै १८५१ रोजी चिंतामणराव पटवर्धन (पहिले) यांचे निधन झाले. १८२६ साली त्यांचा मुलगा गणपतरावही निवर्तला व १८३४ साली चिंतामणरावांच्या सुनेने दत्तक घेतला, त्यास १८३८ साली धुंडिराव तात्यासाहेब हा मुलगा झाला व तोच १८५१ साली चिंतामणरावांच्या मागून संस्थानिक झाला. १८५७ साली धुंडिराव तात्यासाहेब वयात आल्यावर त्यांना राज्यकारभाराची सूत्रे देण्यात आली. इ. स. १८५७ च्या बंडाच्या वेळी धुंडिराव तात्यासाहेबांनी ब्रिटिश सरकारला कोल्हापूरचे बंड शमविण्यासाठी सैन्याची मदत केली. ४० वर्षे राज्य केल्यावर १२ डिसेंबर १९०१ रोजी धुंडिराव तात्यासाहेबांचे निधन झाले. ते निपुत्रिक असल्यामुळे संस्थानचा कारभार ब्रिटिश सरकारने ताब्यांत घेतला व

चिंतामणरावांचा दत्तक मुलगा विनायकराव यांचा पणतू विनायकराव भाऊसाहेब यास चिंतामणराव आप्पासाहेब असे नाव देऊन, १५ जून १९०३ रोजी श्रीमंत चिंतामणराव धुंडिराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१८९०- १९६५) यांचा राज्याभिषेक झाला; २ जून १९१० रोजी सज्ञान झाल्यावर त्यास राज्यकारभाराची सूत्रे सोपविली. (केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड २०)

## राज्याधिकारी अ. भा. देसाई यांची कारकीर्द :

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात संस्थानाला सज्ञान वारस नसल्यामुळे ब्रिटिशांच्या राजकीय विभागाने नियुक्त केलेल्या प्रशासकांची कारकीर्द होती. १९०१ ते १९०५ या पहिल्या पाच वर्षांत रावबहादूर अच्युत भास्कर देसाई यांना राज्याधिकारी म्हणून नामनियुक्त करण्यात आले होते. (The India List and India Office List for 1905, page 98) त्यांनी आपल्या कारकिर्दीत रेल्वे आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांचे काम सुरू केले. १२ मार्च १९०२ रोजी त्यांनी पोलिस प्रशासनाची पुनर्घटना करून नवी संरचना अस्तित्वात आणली. सशस्त्र पोलिसदल आणि नि:शस्त्र पोलिसदल अशी दुपदरी रचना करण्यात आली. खजिना आणि तुरुंगाची जबाबदारी सशस्त्र दलाकडे व राज्यातील इतर शांतता व सुव्यवस्थेची जबाबदारी नि:शस्त्र दलाकडे सोपविण्यात आली. मंगळवेढा व शहापूर तालुक्यात कैकाडी व बेरड लोकांपासून उपद्रव होत असे म्हणून तेथे सशस्त्र पोलिस तैनात करण्यात आले; तसेच शहापूर तालुक्यात चोऱ्या व दरोडे पडण्याच्या घटना वारंवार होत, त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी त्या भागात पोलिस चौक्या उभारण्यात आल्या होत्या. ७ रुपयांपासून २०० रुपये मासिक वेतनाच्या विविध पदश्रेणी व नाईक, हवालदार, जमादार, उपनिरीक्षक, निरीक्षक अशी पदे निर्माण करण्यात आली होती. पोलिसांची कवायत व शिस्त यास सांगलीच्या पोलिस उपनिरिक्षकास जबाबदार धरले जाई. गावपातळीवर पोलिस पाटलाच्या नियंत्रणाखाली ग्राम पोलिसदलाचीही योजना कार्यान्वित करण्यात आली होती. गुन्ह्यांचे पद्धतशीर दप्तर ठेवण्याचे नमुने तयार करण्यात आले होते. (Order No. 1137/ 12-03-1902/ Burke, 1909, p. 212-214) रा. देसाई यांच्या कारकिर्दीत वित्त विभागाचीही पुनर्रचना करण्यात आली. १८७६ पासून चालत आलेली संस्थानाच्या अर्थव्यवस्थेतली पाठक-फडणवीस पद्धतीच्या जागी १९०३ साली स्वतंत्रपणे 'कोषागार व लेखा विभाग' (ट्रेझरी व ऑडिट ऑफिस) या नावाने नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली. लेखाधिकारी (Audit officer) हा राज्याच्या समग्र वित्तव्यवहाराचे संचालन करीत असे. या विभागांतर्गत अनुदाने, कर्ज आणि तालुका कोषागारांकडून प्राप्त होणाऱ्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांची नोंद ठेवली जात असे. दर महिन्याच्या २५ तारखेला त्या त्या महिन्यातील हिशेब पूर्ण करण्याची पद्धत रूढ करण्यात आली. (Burke R. C. 1909, p. 413)

## कॅ.बर्क यांची कारकीर्द :

१९०५ ते १९१० या पाच वर्षांसाठी सांगली संस्थानचे राज्याधिकारी म्हणून कॅ.आर.

सी. बर्क यांनी पदभार सांभाळला. कॅ. बर्क यांचा सत्तेच्या विकेंद्रीकरणावर व लोककेंद्री प्रशासननीतीवर भर होता. त्यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत सांगली नगरपालिकेतील शासननियुक्त सभासदांची संख्या कमी करून लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढवली. १९०५ साली म्युनिसिपालिटीच्या घटनेत बदल केले व १८७६ पासून चालत आलेली सदस्यसंख्या ८ वरून १८ वर नेली. १५ ऑक्टोबर १९०५ रोजी त्यांनी सांगली म्युनिसिलापिटीच्या निवडणुका घेतल्या. त्यात लोकांनी ७ सदस्य निवडून द्यावयाचे होते आणि ११ सदस्य सरकार नेमणार होते. पैकी ७ शासकीय व ४ बिगर सरकारी असे एकूण ११ सदस्य शासननियुक्त असणार होते. (Huzur Order No. 2265/ dt. 10-08-1905) १९०७ सालापासून म्युनिसिपालिटीचा अध्यक्षही लोकनियुक्त प्रतिनिधींमधून निवडण्याची तरतूद करण्यात आली. (Sangli gaztte, 24-0-1907) कॅ. बर्क यांनी राज्यकारभारात प्रजेच्या आकांक्षांची दखल घेतली जावी यासाठी १९०८ साली 'रयत सभे'ची स्थापना केली होती. दिवाणाच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक तालुक्याचा मामलेदार व दोन लोकप्रतिनिधी आणि सांगली शहराचा एक प्रतिनिधी अशी 'रयतसभे'ची संरचना होती. १५ जून १९०८ रोजी या रयत सभेची पहिली बैठक झाली होती.

१९०६ साली कॅ. बर्क यांनी पोलिस प्रशिक्षणासाठी स्वतंत्र विद्यालय स्थापन केले. (Selection of Standing oedres of the Sangli State, Huzur Order No. 2195/24-05-1906) शेती आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सांगली हायस्कूलमधून मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन शिष्यवृत्त्या देण्याची योजना कार्यान्वित केली. (Huzur Order No. 19093/ 1-04-1908)

**आप्पासाहेब पटवर्धन यांची कारकीर्द :**

कॅ. बर्क यांच्यानंतर श्रीमंत चिंतामणराव धुंडिराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१८९०-१९६५) सज्ञान झाल्यावर सांगलीचा कारभार पाहू लागले. २ जून १९१० पासून १९ फेब्रुवारी १९४८ रोजी संस्थान स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत त्यांची कारकीर्द अखंड होती. श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी कॅ. बर्क यांची लोकतंत्री राज्यकारभाराला प्राधान्य देणारी राजनीती पुढे चालू ठेवली. ब्रिटिशांशी सलोख्याचे संबंध राखून मुत्सद्दी राजकारण करणारा संस्थानिक असा त्यांचा लौकिक होता. १९१४ च्या पहिल्या जागतिक महायुद्धात सांगली संस्थानचे ब्रिटिशांना सहकार्य होते. पुढे गोलमेज परिषदेतही छोट्या संस्थानांचे प्रतिनिधी म्हणून श्रीमंत चिंतामणराव पटवर्धनांना संधी मिळाली होती. १९३० साली 'सांगली स्टेट रयत असेंब्ली रेग्युलेशन १९३०' अन्वये त्यांनी जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता म्हणून रयतसभेला जादा अधिकार प्रदान केले. त्यात कायदे करणे, ठराव मांडणे, अंदाजपत्रकावर प्रश्न उपस्थित करणे इत्यादी अधिकारांचा समावेश होता. या नव्या घटनेप्रमाणे असेंब्लीचे पहिले अधिवेशन २२ जुलै १९३० रोजी सांगलीचे दिवाण रामचंद्र सदाशिव आठवले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यात ७ सरकारी सभासद, १० सरकारने नियुक्त केलेले बिनसरकारी सभासद आणि लोकनियुक्त प्रतिनिधींच्या गटातून एका वर्षासाठी तात्पुरते नामनियुक्त केलेले २० सभासद

असे अध्यक्षांखेरीज ३७ सभासद होते. (रयत असेंब्ली अधिवेशन १९३० अहवाल, पृ. १) राजेसाहेबांनी ब्रिटिश मुलुखातील १९३५ च्या कायद्याला अनुसरून १९३८ साली *'रयतसभा'* ('सांगली स्टेट एक्झिक्युटिव्ह कौन्सिल') स्थापन केली व निवृत्त आय. सी. एस. अधिकारी बी. एन. डे यांची अध्यक्षपदी नियुक्ती केली. प्रिन्सिपॉल कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या घटनेनुसार राज्य विधिमंडळात तालुकानिहाय लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी १९४० साली संस्थानात निवडणुका घेण्यात आल्या. प्रत्येक तालुक्यात हरिजनांसाठी राखीव जागांची तरतूद ही एक विशेष बाब होती. या निवडणुकीत कुठलीही जातीय समीकरणे आड आली नाहीत. ब्राह्मण, मराठे, लिंगायत, मुसलमान, हरिजन अशा सर्व समाजगटांना प्रतिनिधित्व मिळाले. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीतून एकाची मंत्रीपदी निवड करण्यासाठी १९४१ साली मार्च महिन्यात निवडणूक घेण्याचे जाहीर करण्यात आले. मंत्रीपदाच्या निवडणुकीसाठी कवठे महांकाळचे तरुण वकील बळवंत शिवलिंगप्पा कोरे व गणपतराव गोडबोले वकील यांच्यात चुरस होती. १० मार्च १९४१ रोजी बळवंत शिवलिंगप्पा कोरे निवडून आले व त्याच दिवशी त्यांचा लोकनियुक्त मंत्री म्हणून शपथविधी झाला. त्यांच्याकडे शिक्षण, आरोग्य, वैद्यक, शेती, लोकप्रशासन, सार्वजनिक उद्योग, ग्रामोद्धार , सहकार ही खाती सोपविण्यात आली. (कोरे बाळासाहेब, पृ. १४-१५)

आप्पासाहेब पटवर्धन हे लोकशाही विचारप्रणालीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपल्या संस्थानात सत्तेच्या विकेंद्रीकरणाला, लोककेंद्री प्रशासनाला आणि पारदर्शी प्रशासनपद्धतीला प्राधान्य दिले. म्हैसूर, बडोदा, ग्वाल्हेर या प्रागतिक संस्थानातल्या सुधारणा, कायदा व न्यायव्यवस्थेचा अभ्यास करून सांगली संस्थानात नव्या सुधारणा करता याव्यात या उद्देशाने महाराजांनी मुख्य कारभाऱ्याच्या अध्यक्षतेखाली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, बार आसोशिएशनचे सदस्य व शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेले एक अभ्यासमंडळ नेमले होते. (Sangali Gazette, 07-07-1919) राज्य प्रशासनासाठी हुजूर ऑफिस, हुजूर दिवाणी कोर्ट आणि राज्याचा कारभारी व जिल्हा दंडाधिकारी अशी त्रिस्तरीय अधिकारमंडळे स्थापन करण्यात आली. (हुजूर ऑफिस, आदेश क्र. ७२/ २५-०३-१९१९) सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला अनुसरून संस्थानात सांगली, मंगळवेढा, तेरदळ, रबकानी, शहापूर व शिरहट्टी अशा ६ नगपालिका स्थापन करण्यात आल्या. नगरपालिकांत ३/४ सदस्य लोकनियुक्त व नगराध्यक्षही लोकप्रतिनिधींनी निवडण्याची पद्धत सुरू केली. सांगली नगरपालिकेचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे मुंबई नगरपालिका कायद्याप्रमाणे सांगली नगरपालिकेसाठी शासन नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्याचीही तरतूद करण्यात आली होती. (Annual Administrative Report of the Sangli State,1924-25, p. 119 & 1942-43, p. 111) नगरपालिकांना संस्थानाधिपतींकडून विकासकामांसाठी अनुदान दिले जाई; पण त्याचबरोबर नगरपालिकांना उत्पन्नाचे आवर्ती स्रोत असावेत या हेतूने घरपट्टी, सध्याच्या 'आयकर' प्रणालीसदृश व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नावर 'ऐपतपट्टी', शहरात येणाऱ्या वाहनांवर प्रवेश शुल्क (आजच्या भाषेत 'टोल'), बाजारात आणल्या जाणाऱ्या गुरांवर 'जनावर पट्टी' अशी करप्रणाली लागू

करण्यात आली होती. (Annual Administrative Report of Sangali State, 1990-10, p. 15 & 1915-16, p. 16) १९ व्या शतकात या संस्थानात वेश्या व्यवसाय व डान्सबार चालवणाऱ्या मुलींसाठी *'कसबीण पट्टी'* नामक कर होता, तो नंतर रद्द करण्यात आला. १९३१ साली आप्पासाहेब पटवर्धन यांनी सांगली शहरासाठी ५ सदस्यीय 'शहर सुधारणा मंडळा'ची (Town Improvement Board) स्थापना केली. या समितीने सर्वेक्षण करून शहराचा पाणी पुरवठा, बाजारक्षेत्र, धर्मशाळा व अन्य बाबतीत सुधारणा सुचविण्याचे काम करणे अपेक्षित होते. शहरांप्रमाणेच ग्रामविकासाठीही मामलेदारांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या गावांना ग्रामसमित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. नगरपालिका क्षेत्रातील दावे निकालात काढण्यासाठी त्यांनी 'लोकन्यायालया'ची संकल्पना (An Honary Bench Magistrate Court) आणली. १९१९ साली संस्थानात गोवधबंदी कायदा लागू करण्यात आला. (Sangali Gazetee, 07-04-1919) १९०८ पासून ब्रिटिश भारतातल्या कायद्याला अनुसरून सांगली संस्थानाकरिता नागरी संहिता (Civil Procedure Code) लागू करण्यात आली (Sangali Gazette, 07-12-1908). १९१८ साली दंडसंहिता (क्रिमिनल प्रोसिजर कोड) लागू करण्यात आली. महसूल अधिकारी, मामलेदार, अव्वल कारकून, गणपती मंदिर व्यवस्थापक यांना न्यायदंडाधिकाऱ्यांचे अधिकार प्रदान करण्यात आले. (Sangali Gazette, 07-07-1922) मुंबई उच्च न्यायालयाप्रमाणे सांगलीतही उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले. (Sangali Gazette, 07-03-1925)

सांगली संस्थानात कायदा व सुव्यवस्था नांदावी यासाठी आप्पासाहेब पटवर्धनांनी नागरिकांना पोलिस संरक्षण पुरविणाऱ्या योजना कार्यान्वित केल्या. गावपातळीवर चोऱ्या-दरोड्यांना आळा बसावा म्हणून ग्रामपोलिसदल व ग्रामसंरक्षक समित्या स्थापन केल्या. प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात गुप्तहेरांचे जाळे निर्माण केले. खून, दरोडे, बलात्कार अशा फौजदारी गुन्हे करणाऱ्यांना कडक शिक्षा करण्याची व्यवस्था निर्माण केली. उच्च जातीतल्या लोकांनी दारू प्याल्यास शिक्षा होई. व्यभिचारी स्त्रियांना दंड केला जाई. प्रसंगोपात्त नाक-स्तन कापण्याचीही शिक्षा दिली जाई. सरकारी परवानगीशिवाय 'पाट लावता' (दुसरे लग्न) येत नसे. आत्महत्येचा प्रयत्न हा गुन्हा समजला जाई. अर्थात शिक्षेच्या तरतूदीत माणुसकीचा धर्म पाळण्याचीही कायदेशीर तरतूद होती. उदाहरणार्थ, तुरुंगात असणाऱ्या गुन्हेगाराची पेरणी किंवा तत्सम महत्त्वाची शेतीची कामे खोळंबून नुकसान होणार असेल तर त्या हंगामापुरता कैद्यास दंड भरून अथवा जामिनावर सोडण्यात येत असे. (Burke,1909, p.183) सारांश, सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबरच राज्याचे चारित्र्य व सुव्यवस्था यांची काळजी घेणारा संस्थानिक म्हणून आप्पासाहेब पटवर्धन यांनी आपली प्रतिमा निर्माण केली होती.

### राष्ट्रीय जनजागृती :

स्वातंत्र्यपूर्वकाळात ज्ञानप्रसार आणि राजकीय जाणीव-जागृतीत सांगली संस्थान अग्रेसर होते. त्या काळात तेथे वसंत व्याख्यानमालेसारखे उपक्रम चालत. संस्थानिक मुलुखात काँग्रेसचे कार्यकर्ते चळवळ करीत नव्हते, परंतु सांगली संस्थान त्याला अपवाद होते. १८८५

साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर १८८९ च्या सुमारास पुण्याचे नामजोशी यांचे सांगलीस 'राष्ट्रीय सभेची माहिती देणारे व्याख्यान झाले होते; या व्याख्यानाने प्रभावित होऊन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सभेसाठी वर्गणी गोळा करण्याची मोहीम काढली होती. शहापूरहून वर्तमानपत्रही प्रसिद्ध होत होते. संस्थानी चळवळीचे प्रणेते सांगलीचे वामनराव पटवर्धन पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासोबत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. ना. गोखल्यांनी १२ जून १९०५ रोजी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी स्थापन केली, या सोसायटीच्या स्थापनेसंबंधीची पहिली बैठक १९०३ साली सांगलीतच झाली होती. या बैठकीत सांगलीच्या वामनराव पटवर्धनांखेरीज गणपतराव अभ्यंकर व विनायकराव माईणकर यांचाही सहभाग होता. १९०५ साली सोसायटीचे आजीव सदस्य म्हणून शपथ घेणाऱ्या पहिल्या तीन तरुणांत अ. वि. उर्फ वामनराव पटवर्धन यांचा समावेश होता. भारत सेवक समाजाला आर्थिक आधार पुरविणाऱ्या आर्यभुषण छापखान्याची जबाबदारी गोखल्यांनी वामनराव पटवर्धनांवर टाकली होती. 'सुधारक' पत्राचेही काही काळ ते संपादक होते.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्याप्रमाणेच लो. टिळकांच्या नेतृत्वाचाही सांगलीकरांवर प्रभाव होता. टिळकांच्या स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, दारूबंदी या चळवळींना सांगलीतून मनुष्यबळ व द्रव्यबळाचे फार मोठे पाठबळ मिळत होते. पैसा फंड जमविण्यातही सांगलीकर पुढे होते. १९०५ च्या वंगभंग चळवळीने सांगलीत राजकीय संघटनेचा विचार प्रबळ व्हायला मदत झाली. १९१६ साली 'युनियन क्लब'सारखा विचारमंच या संस्थानात क्रियाशील होता. गो. श. बिनिवाले यांनी स्थापन केलेला हा मंच त्यावेळी सार्वजनिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या विचारविनिमयाचे केंद्र बनला होता. १५ फेब्रुवारी १९२० रोजी सांगलीत युनियन क्लबच्या पुढाकाराने ज्योतिष संमेलन झाले, त्यानिमित्ताने लोकमान्य टिळकांनी सांगलीला भेट दिली होती. संमेलनाचे स्वागताध्यक्ष केशवराव छापखाने व कार्यकर्ते वैद्य बिनिवाले यांनी ज्योतिष संमेलनाच्या निमित्ताने टिळकांना सांगलीत पाचारण करून राजकीय जागृतीसाठी टिळकभेटीचा उपयोग करून घेण्याची योजना आखली होती. १४ फेब्रुवारीला संमेलनाध्यक्ष श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्यासोबत टिळक सांगलीत दाखल झाले. त्या दिवशी मिरजेला त्यांचे 'स्वराज्य' या विषयावर व्याख्यान झाले. दुसऱ्या दिवशी १५ फेब्रुवारीस डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचे संमेलनस्थळी व्याख्यान झाले. टिळकांच्या नेतृत्वाचा सांगली संस्थानातील राजकीय जनजागृतीवर प्रभाव कायम राहिला. टिळकांच्या मृत्यूनंतर सांगलीकरांनी 'लोकमान्य टिळक स्मारक मंदिर' ही संस्था स्थापन करून त्यांच्या राजकीय विचारांचा वारसा पुढे नेणारे उपक्रम केले. १९२१ साली स्थापन करण्यात आलेल्या पुण्याच्या टिळक विद्यापीठाच्या उभारणीतही सांगलीचे आचार्य लिमये, डॉ. लागू यांचा पुढाकार होता.(पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. १५६-१५८) १९२०-२१ च्या असहकार आंदोलनातही सांगलीकरांचा सहभाग होता. महात्मा गांधी यांनीही सांगलीला भेट दिली होती. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीवर सांगलीचे केशवरावजी छापखाने व विठ्ठलराव जोशी निवडून गेले होते. लोकशाही स्वराज्य पक्ष, हिंदू महासभा यांच्या राजकीय कार्यातही सांगलीकरांचा सहभाग होता.

**प्रजापरिषदेची स्थापना :**

संस्थानी राजकारणाला नवे वळण देण्याकरिता पुण्यात न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन यांनी स्थापन केलेल्या 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या कामाला पुढे नेण्यातही सांगलीकर अग्रेसर राहिले. इतकेच नाही तर १९१७ सालच्या ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्सच्या घोषणेनुसार मॉटेंग्यू हिंदुस्थानच्या राजकारणाची भविष्यकालीन दिशा ठरविण्यासाठी येत असल्याचे कळल्यावर सांगलीच्या गणपतराव अभ्यंकरांनी *'नेटिव्ह स्टेटस् आणि पोस्ट वॉर रिफॉर्म्स'* हे पुस्तक लिहून संस्थानी राजकारणाची दिशा स्पष्ट करण्याचे काम केले. १९२१ पर्यंत संस्थानी प्रजेचे प्रश्न सोडविण्यासाठी सार्वजनिक लोकमंच अस्तित्वात नव्हता. मात्र दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या चळवळीतून सांगली संस्थानात 'प्रजापरिषद' स्थापन करण्यात आली. १९२२ ते १९३९ या काळात सांगली संस्थानात प्रजापरिषदेची १४ अधिवेशने झाली. यापूर्वी कॅ. बर्क यांच्या कारकिर्दीत 'रयत सभा' स्थापन झाली होती; तरीही सांगलीच्या कार्यकर्त्यांनी प्रजापरिषदेमार्फत नव्या सुधारणांसाठी जनमताचा रेटा कायम ठेवण्याची कामगिरी बजावली.

**प्रजापरिषदेची अधिवेशने :**

सांगलीकरांनी प्रजापरिषदेची अधिवेशने केवळ सांगलीतच न भरवता तालुक्याच्या गावी व मागडी, उगार, हनगंडी अशा खेड्यात भरवून ग्रामीण व शेतकरी वर्गाचा राजकीय जाणीव-जागृतीच्या चळवळीसाठी व्यापक सहभाग मिळविला. सांगलीत पूर्वस्थापित *'रयतसभा'* असली तरी संस्थानात सभाबंदीसारखा लोकमताच्या आविष्कारस्वातंत्र्यावर मर्यादा घालणारा कायदा अस्तित्वात होता. कीर्तनासारख्या धार्मिक संमेलनांनासुद्धा हा सभाबंदीचा कायदा लागू होता. या पार्श्वभूमीवर प्रजापरिषदेची १४ अधिवेशने घेतली गेली, ही फार अर्थपूर्ण घटना म्हटली पाहिजे. या १४ अधिवेशनांचे वर्ष, स्थळ, स्वागताध्यक्ष व अध्यक्ष या क्रमवारीनुसार गोषवारा असा :

१. १९२२ : सांगली : स्वागताध्यक्ष – केशव रामचंद्र छापखाने, अध्यक्ष : रामचंद्र शंकर उर्फ आडव्याप्पा मंगसुळी.

२. १९२३ : शहापूर : स्वागताध्यक्ष – नरसिंगा गणोसा शालगार, अध्यक्ष : गणेश रघुनाथ अभ्यंकर

३. १९२४ : शिरहट्टी : स्वागताध्यक्ष - शिवजोगय्या भोरशेट्टी, अध्यक्ष : विनायक कृष्ण माईणकर

४. १९२५ : सांगली : स्वागताध्यक्ष -विनायक गोविंद करमरकर, अध्यक्ष : केशव रामचंद्र छापखाने

५. १९२७ : सांगली : स्वागताध्यक्ष - महादेव केशव आठवले, अध्यक्ष : ल. ब. भोपटकर , पुणे

६. १९२८ : तेरदाळ : स्वागताध्यक्ष - कृष्णाजी गोविंद देशपांडे, अध्यक्ष : पंडिताप्पा रायप्पा, चिकोडी

७. १९२९ : मंगळवेढे : स्वागताध्यक्ष - गुरुनाथ कुलकर्णी, अध्यक्ष : दादासाहेब करंदीकर, सातारा

८. १९३० : कवठेमहांकाळ : स्वागताध्यक्ष- दादासाहेब ग. ना. गाडगीळ, अध्यक्ष : अश्वत्थराव महिषी

९. १९३१ : उगार : स्वागताध्यक्ष : महादेव वासुदेव दिवेकर, अध्यक्ष : बाबुराव गोखले, पुणे

१०. १९३३ : सांगली : स्वागताध्यक्ष - जंबुअण्णा बाबाजी अरवाडे, अध्यक्ष : श्रीधर गणेश वझे, पुणे

११.१९३४ : रबकवी : स्वागताध्यक्ष - मुरगया स्वामी बागोजी मठ, अध्यक्ष : पी. जी. हलकट्टी, विजापूर

१२. १९३७ मागडी : स्वागताध्यक्ष - श्रीनिवास मागडी, अध्यक्ष : विष्णू अनंत देशपांडे मरळीकर

१३. १९३८ : उगार खुर्द : स्वागताध्यक्ष : काशिनाथ हरि खाडिलकर, अध्यक्ष : शंकरराव देव

१४. १९३९ : हनगंडी : स्वागताध्यक्ष : केशव गोविंद कुलकर्णी, अध्यक्ष : पंडिताप्पा चिकोडी, बेळगाव

१९२३ साली शहापूर येथे झालेल्या प्रजापरिषदेच्या अधिवेशनात गणपतराव अभ्यंकरांनी रयत सभेस खाजगीखेरीज इतर सर्व बाबींवर धोरण ठरविण्याचा व निर्णय करण्याचा अधिकार असला पाहिजे, राज्याच्या अंदाजपत्रकार रयतसभेचे नियंत्रण असले पाहिजे आणि कायदे करण्याचाही रयत सभेला अधिकार असला पाहिजे अशी भूमिका मांडली. प्रजा परिषदेच्या निरनिराळ्या अधिवेशनातून जबाबदार राज्यपद्धतीचा आग्रह धरण्यात आला. या अधिवेशनातून पारित झालेल्या ठरावांतून ज्या मागण्या पुढे आल्या त्यांचा गोषारा असा :

१. गावकारभाराच्या स्वायत्ततेसाठी ग्रामपंचायतींची स्थापना कण्यात यावी.

२. सभाबंदीचा कायदा मागे घ्यावा.

३.श्रीमंतांना राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी जनतेच्या प्रतिनिधींचा सहभाग असणारे सल्लागार मंडळ स्थापन करण्यात यावे.

४. राज्यप्रशासनात न्याय व अंमलबजावणी खात्यात फारकत करण्यात यावी.

५. खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करावा; शिक्षणप्रसारात मागास जातींना सवलती द्याव्यात; संस्थानाच्या नोकरीत जातिभेद न मानता सर्वांना संधी देणारे धोरण राबवावे.

६. मद्यपानबंदी, अस्पृश्यतानिवारण, औद्योगिक पाहणी, आर्यवैद्यकाचा प्रसार, जंगलांच्या हक्कांचे संरक्षण या विषयांना अग्रक्रम देणारे कृतिकार्यक्रम राबवावेत.

७. कानडी भाषेला राज्यकारभारात स्थान द्यावे व कानडी दप्तराची तरतूद करावी.

प्रजापरिषदेच्या या चळवळीची संस्थानाधिपतींनी दखल घेतली व राजेसाहेबांनी १९३० साली रामनवमीच्या मुहूर्तावर १९०८ साली स्थापन झालेल्या रयतसभेच्या कायद्यात सुधारणा करून जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता प्रदान केला. 'सांगली स्टेट रयत असेंब्ली रेग्युलेशन १/१९३०' या कायद्यात रयत असेंब्लीला कायदे करण्याचा, ठराव मांडण्याचा, काही

विशिष्ट बाबी सोडून अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा, व लोकहिताच्या मुद्यांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यात आला. या सुधारणांनी प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांच्या सर्वच मागण्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत; मात्र गणपतराव अभ्यंकर यांनी राजकीय तडजोड म्हणून सुधारणांचा हा पहिला हप्ता पदरात पाडून घेण्यात शहाणपण असल्याचा कार्यकर्त्यांना सल्ला दिला. नंतरच्या प्रजापरिषदांतून उर्वरित मागण्यांचे सत्र पुढे चालू ठेवण्यात आले.

१९३० नंतर रयत असेंब्लीत लोकहिताचे काही चांगले निर्णय झालेत. उदाहरणार्थ, हिंदू विधवेच्या दत्तकाचा हक्क विस्तृत करणारा कायदा संमत झाला. विधवांना अविभक्त कुटुंबात इतरांबरोबर हक्क देण्याचा कायदा झाला. अल्पवयीन मुलामुलींच्या विवाहाला प्रतिबंध करणारा कायदा संमत झाला. शेतकरी संरक्षण कायदा झाला. गणपतराव अभ्यंकरांवर टिळकांच्या राजनीतीचा प्रभाव असावा; त्यामुळे राजकीय चळवळी किती ताणायच्या आणि कुठे तडजोडी करून लोकहित साधायचे याचे भान कदाचित या स्थानिक पुढाऱ्यांमध्ये निर्माण झाले असावे. त्यामुळे १९३० ची राजकीय तडजोड कारणी लागली व काहीना काही प्रमाणात नवे लोकहिताचे कायदे झाले. रयत असेंब्लीत लोकप्रतिनिधींचा गुणात्मक सहभाग वाढला. लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांचा प्रश्न जरी तोपर्यंत राजकीय चर्चाविश्वात फार चर्चिला गेला नसला तरी, सांगली संस्थानात १९३० च्या सुधारणांनुसार समाजातल्या कोणत्या घटकाला किती प्रतिनिधित्व मिळाले याविषयीचे एक विश्लेषण त्यावेळच्या 'राष्ट्रवीर'पत्राने

(१५ जुलै १९३०) केले होते. या विश्लेषणानुसार एकूण ४० प्रतिनिधींपैकी निम्म्याहून अधिक जागा दहा हजारापेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या ब्राह्मण समाजाच्या वाट्याला गेल्या होत्या. त्यामुळे सांगली स्टेट असेंब्ली म्हणजे 'पेशवाईचा देखावा' अशी टीका करण्यात आली होती. इतर जवळपास निम्म्या जागा कुठल्या समाजघटकांना किती प्रमाणात मिळाल्या हे या माहितीवरून स्पष्ट होत नाही. मात्र अठ्ठावीस हजाराहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या अस्पृश्य वर्गाला एकही जागा मिळाली नव्हती, हे निरीक्षण लक्षात घेण्याजोगे आहे. (फडके य. दि., १९९३, पृ. २४४)

देशभरातल्या काँग्रेसच्या लोकचळवळीशी संबंध कायम ठेवून सांगलीचे कार्यकर्ते आपल्या संस्थानात काम करीत होते. पुण्यात स्थापन झालेल्या 'दक्षिणी संस्थान लोकपरिषदे'शी संलग्न राहून राजकीय विचारांच्या पेरणी-प्रसाराचा कार्यक्रम राबवीत होते. त्यामुळे १९३८ साली सांगलीच्या कार्यकर्त्यांनी दक्षिणी संस्थान लोकपरिषदेच्या १२ व्या अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारून आपल्या संस्थानातील राजकीय सुधारणांचा दुसरा हप्ता पदरात पाडून घेण्यासाठी योग्य ती वातावरण निर्मिती केली. हे अधिवेशन वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अधिवेशनाला शंकरराव देव, गंगाधरराव देशांडे, डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांसारखे राष्ट्रीय पुढारी सांगलीत आले होते. मे महिन्यात झालेल्या या अधिवेशनापाठोपाठ जुलै महिन्यात प्रजापरिषदेचे अधिवेशन घेऊन राजकीय सुधाणांच्या मागण्यांचा मसुदा पारित करण्यात आला. त्यानंतर २२ डिसेंबर १९३८ रोजी रयत असेंब्लीत श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी राजकीय सुधारणेच्या मागण्या मान्य केल्याचे जाहीर केले. राजकीय सुधारणांच्या या दुसऱ्या

हप्त्यात रयत असेंब्लीतील सभासद संख्या ४० वरून ४५ करण्यात आली व त्यापैकी २/३ सदस्य म्हणजे ३० सदस्य हे लोकनियुक्त असतील अशी तरतूद करण्यात आली. लोकनियुक्त सभासदांनी निवडलेल्या एका सभासदाची मंत्री म्हणून नेमणूक करून त्यांच्याकडे शिक्षण, आरोग्य, सहकार, स्थानिक स्वराज्य व ग्रामोद्धाराची खाती सोपविण्यात आली. या सुधारित कायद्यानुसार श्री अश्वत्थराव महिषी यांना पहिले लोकनियुक्त मंत्री म्हणून निवडण्यात आले. अशा प्रकारे अंशत: द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग सांगली संस्थानाने स्वीकारला, हे प्रजापरिषदेच्या लोकचळवळीचे मोठे यश म्हटले पाहिजे.

## २.९. मिरज व मिरजमळा संस्थानातील प्रजापरिषद :

मिरज संस्थान (मोठी पाती) हे दक्षिण महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातले छोटेसे संस्थान. मिरज, पंढरपूरजवळील मोडनिंब आणि धारवाड जिल्ह्यातील लक्ष्मेश्वर असे जेमतेम तीन तालुक्यांचे हे संस्थान. वस्ती त्यावेळी नव्वद हजारापर्यंत. पटवर्धनांचे संस्थान ही त्याची ओळख. महाराष्ट्रातील काँग्रेस चळवळीचा कमीअधिक प्रभाव याही संस्थानात पडलेला होता. १९२१ साली पुण्यात स्थापन झालेल्या *'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा'* या संस्थेच्या प्रेरणेतून मिरजेत प्रजापरिषद संघटित झाली. १९२२ साली भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली मिरजेत प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन झाले. राज्य म्हणजे खाजगी मिळकत ही कल्पना संस्थानिकांनी सोडून द्यावी व लोकप्रतिनिधींच्या सहभागाने राज्यकारभार चालवावा, अशी स्पष्ट राजकीय भूमिका या अधिवेशनातून मांडली गेली. राज्यकारभार चालविण्यासाठी संस्थानाधिपतींनी लोकनियुक्त सभासदांचे मंडळ स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. चळवळीचे हे बीजसूत्र घेऊन जवळपास वीस वर्षे हा लोकमंच क्रियाशील होता. या दोन दशकात प्रजापरिषदेची सहा अधिवेशने झाली, ती अशी :

१. ११-१२ मे १९२२, मिरज : अध्यक्ष -भारताचार्य चिंतामणराव वैद्य

२. २६ मे १९२४, मिरज : अध्यक्ष : गणपतरावजी अभ्यंकर वकील, सांगली

३. २९ मे १९२७, मिरज : अध्यक्ष : बाबूराव गोखले, संपादक 'मराठा', पुणे.

४. ९ सप्टेंबर १९२८, मिरज : अध्यक्ष : गो. म. रानडे वकील

५. २५ मे १९३१, मालगाव (ता. मिरज) : अध्यक्ष : नरसिंह चिंतामण केळकर, पुणे.

६. २८-२९ मे १९३२, लक्ष्मेश्वर : अध्यक्ष : अण्णासाहेब लठ्ठे

१९२८ साली मोडलिंब व लक्ष्मेश्वर तालुक्यात अनुक्रमे ५० व ६० टक्के सारावाढ करण्यात आली, त्याचा निषेध चौथ्या अधिवेशनात करण्यात आला. या अधिवेशनांखेरीज 'दक्षिणी संस्थान लोकपरिषदे'चे १२ वे अधिवेशन सांगली येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. तेथेही 'लक्ष्मेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांना सारा भरण्यापासून सूट द्यावी असा ठराव पारित करण्यात आला. शिवाय योग्य ती तडजोड घडवून आणण्यासाठी गंगाधरराव देशपांडे, पुंडलिकजी कातगडे, हणमंतराव गाडगोळी, आर. एस. हुक्केरीकर व गो. ल. कणबूरकर वकील यांची कमिटीही नेमण्यात आली. शेवटी २५ टक्के सारावाढीवर तडजोड

मान्य करण्यात आली.

सर बाळासाहेब पटवर्धन (१८६६-१९३९) हे या काळात संस्थानाधिपती होते. १८८७ साली त्यांना मिरज संस्थानची मुखत्यारी मिळाली होती. मिरज (मोठी पाती) आणि मिरज (धाकटी पाती) अशी मूळ संस्थानाची दोन संस्थानांत वाटणी झाली होती; या दोन्ही संस्थानांच्या राज्यकारभारासाठी एक फेडरेशन करण्यात यावे, अशी सूचना मिरज प्रजापरिषदेमार्फत करण्यात आली. सर बाळासाहेब पटवर्धन यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्याने तडजोड घडून आली व मिरज संस्थानात प्रजापरिषदेने सुचविलेल्या सुधारणा स्वीकारल्या गेल्या. मिरज संस्थान प्रजापरिषदेने केलेल्या लोकचळवळीची फलश्रुती अशी :

१. संस्थानाने जबाबदार राज्यपद्धतीचे धोरण मान्य केले व त्यानुसार कायदेमंडळ स्थापन केले.
२. स्थानिक कारभारासाठी मिरज, मालगाव, कवठेपिरान, लक्ष्मेश्वर, शिगली व मोडनिंब म्युनिसिपालिट्यांत लोकनियुक्त सभासद व अध्यक्ष निवडण्याची पद्धत मंजूर झाली. शिवाय जिल्हा लोकलबोर्ड स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.
३. हायकोर्ट स्थापन झाले.
४. स्टेट बँक व तिच्या शाखा उघडल्या.
५. दोन वेळा सारावाढ कमी करण्यात आली.
६. शेतकऱ्यांसाठी ७० हजार रुपयांचा विश्वस्तनिधी निर्माण करण्यात आला.
७. स्त्रीशिक्षणात सुधारणा झाल्या.
८. लक्ष्मेश्वर तालुक्यात कानडी भाषेचे तत्त्व मान्य करण्यात आले.
९. काँग्रेस कमिटीवरची बंदी आणि सभाबंदी उठविण्यात आली.

## मिरजमळा (बुधगाव) :

मिरजेपासून जवळच सहा मैलांवर मिरजमळा (धाकटी पाती) हे १९६ चौ. मैल क्षेत्रफळाचे संस्थान होते. इथे मात्र प्रजापरिषदेचे काहीच कार्य नव्हते. याचे कारण संस्थानचे अधिपती सर बाबासाहेब पटवर्धन यांचा कारभार लोकाभिमुख असल्याने रयतेत असंतोष नव्हता. १७ मार्च १९३५ रोजी त्यांनी स्वतःच आपल्या संस्थानात रयतसभा स्थापन केली होती. त्यांनी स्थापन केलेल्या विधिमंडळात ८ लोकनियुक्त सभासद, २ बिनसरकारी सभासद, ६ सरकारी अधिकारी आणि चिंतामणराव बापट व वामनराव पटवर्धन हे दोन तज्ज्ञ सभासद होते. १ व २ नोव्हेंबर १९३६ ला या विधिमंडळाचे पहिले अधिवेशन झाले. १९३८ साली कर्नाटकातील पुढारी रंगराव दिवाकर व वीरनौडा पाटील यांनी जनतेच्या वतीने राजाशी वाटाघाटी केल्यानंतर या रयतसभेत लोकनियुक्त सभासदांची संख्या १० करण्यात आली. ग्रामपंचायत कायदा लागू करण्यात आला. तालुकानिहाय सारासूट देण्याचे प्रमाण ठरविण्यात आले, आणेवारी पद्धत लागू करण्यात आली व गुडगेरी तालुक्यातील कोर्टकचेरीची कामे कानडी भाषेत चालविण्यास संमती देण्यात आली. या लोकानुवर्ती निर्णयामुळे मिरज धाकटी पाती संस्थानात राजकीय सुव्यवस्था

व शांतता नांदत होती.

१९४५ साली देशभरात चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यामुळे व आजुबाजूच्या संस्थानातील जागृतीमुळे मिरजमळा संस्थानातही प्रजापरिषद सक्रिय करण्याचे घाटत होते. त्यानुसार १९४५ साली काँग्रेसचे पुढारी न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन बुधगाव येथे झाले. गाडगीळांनी आपल्या भाषणातून भारतीय स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या जातीयवाद, साम्राज्यशाही राजवट आणि संस्थानी राज्ये या तीन प्रवृत्तींचा उहापोह केला. आपल्या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर संस्थाने नष्ट केली पाहिजेत हे त्यांनी आवर्जुन सांगितले. या परिषदेत पारित झालेल्या ठरावांत राजेसाहेबांनी जबाबदार राज्यपद्धतीनुसार कारभार करावा, त्यासाठी लोकनियुक्त सभासदांचे कायदेमंडळ अस्तित्वात आणावे, राजाने मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यकारभार करावा व संस्थानाचे उत्पन्न कमी असल्याने पोलिसदल, न्यायालय ह्याबाबत अन्य संस्थानांबरोबर करार करून सामाईक संसाधनांचा वापर करावा या मुद्यांवर भर देण्यात आला होता. (दै. पुढारी, ८ मे १९४५) १९४६ साली बुधगाव येथे प्रजापरिषदेचे दुसरे अधिवेशन वीरूगौंडा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अधिवेशनात जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीचा पुनरुच्चार करण्यात आला. पुढे १९४८ साली अन्य संस्थानांबरोबर याही संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले.

## २.१०. कोल्हापूर संस्थानातील लोकचळवळी

२ एप्रिल १८९४ रोजी कागलकर घाटगे जहागीरदारांचे ज्येष्ठ पुत्र श्रीमंत यशवंतराव उर्फ शाहू छत्रपती ( २६ जून १८७४-६ मे १९२२) यांनी राज्यारोहण समारंभानंतर कोल्हापूर संस्थानची सूत्रे हाती घेतली. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांनी श्री शाहू महाराज यांना राज्याधिकार प्रदान केले. यावेळी महाराजांनी जाहीरनामा प्रसिद्ध करून सर्व स्तरांतील प्रजाजनांनी लोकहिताच्या कामासाठी राजाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. ६ मे १९२२ पर्यंत २८ वर्षे श्री. शाहू छत्रपतींची राजवट होती. जातिभेद, धर्मभेद, वर्गभेद मिटवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी झटणारा राजा म्हणून श्री. शाहू छत्रपतींची कारकीर्द ओळखली जाते.

### लोकप्रतिनिधीसभा :

संस्थानी राजकारणाचे वळण ब्रिटिश प्रशासनाच्या कार्यपद्धतीपेक्षा वेगळे होते. लोककेंद्री प्रशासन आणि राजकेंद्री प्रशासनातला भेद कोल्हापूर संस्थानातही प्रत्ययाला येत होता. संस्थानाबाहेरच्या ब्रिटिश महाराष्ट्रातील राजकीय-सामाजिक सुधारणावादाचे वारे कोल्हापूरातील सुशिक्षित अभिजनांपर्यंत पोहचले होते. संस्थानाचा कारभार लोकाभिमुख व्हावा व लोकमताला विश्वासात घेऊन राज्यप्रशासनाने निर्णय घ्यावेत, अशा विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्यांचा एक गट कोल्हापूर संस्थानात तयार होत होता. १८८५-८६ सालातच त्याचे बीजारोपण झाले होते. कोल्हापूर संस्थानाने बांधलेल्या कळंबे तलावाचा खर्च मुनिसिपालिटीने

जनतेकडून पाणीपट्टीच्या स्वरूपात वसूल करावा अशी सूचना संस्थानाकडून करण्यात आली होती. हा बोजा नगरवासीयांवर लादू नये यासाठी कोल्हापूरच्या वकील मंडळींनी पुढाकार घेऊन लोकचळवळ संघटित केली. यातूनच पुढे १९०६ साली करवीर नगरवासीयांची *'लोकप्रतिनिधी सभा'* नामक प्रातिनिधिक संघटना स्थापन करण्यात आली. ब्राह्मण, मराठे, मुसलमान, जैन,लिंगायत, सोनार अशा विविध जातिधर्मांचे १०१ प्रतिनिधी या लोकसभेत सहभागी झाले होते. डॉ. वामन बाजी रुईकर हे संस्थेचे अध्यक्ष होते. कार्यकारी मंडळात कोल्हापूरचे नाणावलेले वकील विष्णू कृष्ण राशिंगकर, प्रो. विष्णू गोविंद विजापूरकर, डॉ. दामोदर काशिनाथ काळे, डॉ. आत्माराम गोपाळ परांडेकर, डॉ. अनंत कृष्ण गुणे, कागलचे आप्पाजी विष्णू कुलकर्णी, शिरोळचे राघवेंद्र दत्तवाडकर, पन्हाळ्याचे सीताराम बळवंत गोलिवडेकर इत्यादी मान्यवर सभासद होते. २ ऑक्टोबर १९०६ रोजी या लोकप्रतिनिधी सभेचे पहिले अधिवेशन कोल्हापूर येथे झाले. या पहिल्या सभेत अध्यक्ष, स्वागताध्यक्ष व इतर मान्यवरांची जी भाषणे झालीत, त्यातून 'लोकप्रतिनिधी सभे'ची राजकीय भूमिका जाहीरपणे पुढे आली.

राजा आणि प्रजा यांच्यातले संबंध कसे असावेत हा या राजकीय भूमिकेतला सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. विष्णू कृष्ण राशिंगकर यांनी आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणातून राजाविषयीची पारंपरिक समजूत आणि बदललेला आधुनिक दृष्टिकोण यातला भेद स्पष्ट केला. राजा हा विष्णूचा अंश असून प्रजेच्या सुखासाठी त्याचे अस्तित्व आहे, ही सनातन कल्पना आता बाद झाली असल्याचे त्यांनी नि:संदिग्ध शब्दांत सांगितले. याउलट प्रजेने स्वत:च्या सुखासाठी आपले काही हक्क राजाला समर्पित करून 'राजा'ही एक राज्यसंस्था निर्माण केली आहे, त्यामुळे प्रजेचे मत जाणून घेऊन राज्य करणारा राजा ही नवी संकल्पना आता रूढ केली पाहिजे, अशा आशयाची मांडणी त्यांनी केली व नव्याने स्थापन झालेल्या लोकप्रतिनिधी सभेला कोल्हापूरच्या राजदरबाराने मान्यता द्यावी, असा प्रस्ताव मांडला. सभेचे अध्यक्ष डॉ. वामन बाजी रुईकर यांनी हाच मुद्दा पुढे नेऊन म्हटले की, "राजा म्हणजे एक व्यक्ती. तेव्हा राजाजवळ सर्व सत्ता केंद्रित होणे हे समाजाला आणि राष्ट्राला हितावह होत नाही असे इतिहास स्पष्ट बजावतो आहे. म्हणून ही सत्ता राजा व प्रजाप्रतिनिधी यांच्यात वाटून जाणे हे इष्ट व आवश्यक आहे." (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. २१) 'सरकार म्हणजे सार्वजनिक हितार्थ कारभार करणारी संस्था' अशी व्याख्या करून रायबागचे आदिराज देवेंद्र उपाध्ये यांनी सरकारने केलेल्या अन्यायाविरुद्ध न्यायमंदिरात जाऊन दाद मागण्याचा मार्ग व्यक्तीला मोकळा असला पाहिजे, अशी भूमिका मांडली. कोल्हापूर संस्थानात सरकारवर दावे लावता येत नाहीत; कारण तशी वहिवाट नसल्याचे दरबाराकडून सांगण्यात येते, याविषयीचा नापसंतीचा सूर त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. जनतेची कैफियत मांडताना आदिराज उपाध्ये म्हणाले की, "आमच्या या कोल्हापूर इलाख्यांत खासगीखाते व दौलतखाते ही दोन मुख्य खाती आहेत आणि दौलतीसंबंधी कोणते हक्क आहेत, त्यांची कांही फोड करण्यात आलेली नाही. या दोन्हींपैकी कोणत्याही निमित्ताने सरकारने रयतेची जमीन लुबाडली, तरी त्या चोरीची दाद लागत नाही व त्याबद्दल फिर्यादही चालत नाही." (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. २९-३०)

१८९९ साली म्युनिसिपालिटीचे हक्क सरकारने नागरिकांस दिले होते; मात्र १९०४ साली श्री. शाहू छत्रपतींनी कोल्हापूर म्युनिसिपालिटी आपल्या ताब्यात घेतली; त्याविषयीचा असंतोषही या लोकप्रतिनिधी सभेत उमटला. रामचंद्र मोरेश्वर आपटे वकील यांनी या असंतोषाला वाचा फोडली. आपल्या भाषणात ते म्हणाले, " छत्रपति सरकारला नागरिकांचे हक्क कोणत्याही कारणाने काढून घेता येणार नाहीत. सार्वजनिक संस्था चालविण्याचे आमचे हक्क आजचे नसून पूर्वापारचे आहेत, हे ग्रामसंस्थेचा इतिहास स्वच्छ सांगतो." (पटवर्धन, कित्ता, पृ. ३१) ही लोकप्रतिनिधी सभा राजाच्या विरोधात असल्याचा गैरसमज पसरवला जात होता; त्या पार्श्वभूमीवर रुईकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची राज्यपद्धती जवळ जवळ लोकसत्ताकच होती असे सांगून लोकप्रतिनिधी सभेची भूमिका राज्यकारभारास पूरक असल्याचा खुलासा केला. यानिमित्ताने 'खरी राजनिष्ठा' आणि 'पोटार्थी राजनिष्ठा' या विषयावरही चर्चा झाली. रुईचे कृष्णाजी दादाजी कुलकर्णी यांनी या वादावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "सगळे लोक उघडपणे, खुल्या मनाने, कायदेशीरपणे, सूर्यासमक्ष, सत्यास व ईश्वरास स्मरून, राजरोस विचार करीत आहेत, खरी *राजनिष्ठा* हीच आहे. जो मनुष्य मनात एक ठेवून भलतेच बोलतो, व पोटात स्वार्थ ठेवून तोंडाने मात्र 'हां जी, जी हुजूर' म्हणून मानभावीपाने राजाची प्रीती संपादतो, तो खरा राजनिष्ठ प्रजाजन अगर राजसेवक नव्हे. असली ढोंगी, पोटार्थी राजनिष्ठा आमच्याजवळ नाही., आमची राजनिष्ठा उजळ माथ्याची, डोळस व स्वाभिमानी पाहिजे. राज्यकारभारांत प्रजेने राजास हातभार लावून त्याचा बोजा हलका करणे व आपले हे कर्तव्य जाणून राजाकडे आपले हक्क मागणे, हीच खरी राजनिष्ठा होय. ब्रॅडलसाहेबांनी पाचव्या राष्ट्रीय सभेच्या वेळी एका भाषणांत म्हटले आहे की, 'Real loyalty means that the claim of right is made with the consciousness of duty" राजनिष्ठेची ही व्याख्या लक्षात घेऊन प्रजेने निर्भीडपणे राज्यव्यवस्थेतले दोष दाखवावेत व राज्यकारभाराचा बोजा हळू हळू आपल्या शिरावर घेण्यास तयार व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. (कित्ता, पृ. ३३)

लोकप्रतिनिधीसभेच्या मंचावरून जे ठराव पारित झालेत, त्यावरून त्यावेळच्या लोकमानसातील वैचारिक स्थित्यंतराचे ठळक दर्शन घडते. या सभेने सार्वत्रिक शिक्षण व प्रौढांसाठी रात्रशाळा सुरू करण्याची मागणी केली. पुस्तकी शिक्षणाबरोबरच धंदेशिक्षणाची मागणी केली. म्युनिसिपालिटीचे हक्क, सरकारच्या निर्णाविरुद्ध दाद मागण्याचा हक्क मागितला. प्रजेला राजसत्तेत सहभागी करून घेण्याचा आग्रह धरला. येथील लोकांच्या राजकीय समजुतीमध्ये केवढे मोठे स्थित्यंतर घडून येते होते, याचा अंदाज या घटनांवरून येतो. एकूण राष्ट्रीय कॉंग्रेसच्या विचारप्रवाहांचे लोण संस्थानी मुलुखात पोहचले होते व लोककेंद्री राजकारणाचा विचार जनमानसात चांगलाच रुजू लागला होता, हे कोल्हापूरच्या लोकप्रतिनिधी सभेच्या अधिवेशनातील विचारमंथनावरून स्पष्ट होते. कोल्हापूर दरबाराने मात्र या लोकप्रतिनिधी सभेस मान्यता दिली नाही; एवढेच नाही तर संस्थानातल्या कोणाही नोकराने या लोकसभेशी संपर्क ठेवू नये, त्यांच्याशी कुठलाही पत्रव्यवहार करू नये, अशा आशयाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. [३]

**प्रजापरिषदेची स्थापना :**

१९०६ च्या 'लोकप्रतिनिधी सभे'च्या प्रयोगानंतर १९३८ पर्यंत कोल्हापूर संस्थानात लोकचळवळ अशी झालीच नाही. राजर्षी शाहू छत्रपतींनंतर गादीवर आलेल्या छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत त्यांच्या भगिनी अक्कासाहेब महाराज यांचाच राज्यकारभारावर पगडा होता. राजाराम महाराजांना राज्यकारभारापेक्षा घोड्यांच्या शर्यतीत अधिक रस होता. दिवाण अण्णासाहेब लट्ठे यांना राजकीय सुधारणा करण्याची इच्छा होती; पण त्यांच्या प्रयत्नांना यश लाभले नाही. मर्यादित अधिकाराच्या कायदेमंडळाची स्थापना करण्याची लट्ठे यांची शिफारस त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांनी फेटाळून लावली होती. अखेर ७ मार्च १९३१ ला दिवाणपदाचा राजीनामा देऊन अण्णाहेब लट्ठे मुक्त झाले. त्यांच्या जागी दिवाणपदी विराजमान झालेल्या दादासाहेब सुर्वे यांनी संस्थानातल्या लोकचळवळी दडपून टाकण्यालाच अग्रक्रम दिला.

संस्थानात सभाबंदीचा कायदा होता. भाषणस्वातंत्र्य हा प्रजेचा मूलभूत हक्क असल्याने माधवराव बागल यांनी सभा स्वातंत्र्य मिळण्यासाठी राजदरबाराकडे विनंती अर्ज पाठविले; परंतु दरबाराने त्यांची दखल घेतली नाही. २६ ऑगस्ट १९३८ रोजी या मागणीसाठी त्यांनी एक शिष्टमंडळही नेले. पण दिवाण सुर्वे यांनी शिष्टमंडळाची मागणी धुडकावून लावली. वास्तविक "भाषणबंदी म्हणजे मानवी प्रगतीला, विचार विनिमयाला, संस्कृतीला खीळ, मानवतेची पिछेहाट. एकमेकांच्या अनुभवातून जगाचे पाऊल पुढे पडत असते. अनुभव परस्परांना सांगून, त्यावर चर्चा झाल्याखेरीज सुधारणा कशी करता येणार?" हा माधवराव बागलांचा विचार संस्थानाच्या पचनी पडला नाही. (माळी मा. गो. १९९८, पृ. ५५) डोईजड झालेल्या शेतसाऱ्यामुळे संस्थानातले शेतकरीही हैराण झाले होते. अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर १९३८साली भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली *'प्रजापरिषद'* स्थापन करण्याची चळवळ झाली. रत्नाप्पा कुंभार, नानासाहेब जगदाळे, दिनकरराव देसाई इत्यादी पुढाऱ्यांचा या चळवळीत सहभाग होता. शेतसारा कमी व्हावा, प्रजेला नागरी हक्क बहाल करण्यात यावेत व जबाबदार राज्यपद्धती निर्माण करण्यात यावी या मागण्यांना केंद्रस्थानी ठेवून ही चळवळ सुरू झाली. ११ ऑगस्ट १९३८ रोजी कोल्हापूरात भाई माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली शंकरराव देव यांची सभा झाली. त्यात माधवराव बागलांचे स्फोटक भाषण झाले- "आपल्या मागण्यांच्या परिपूर्तीस्तव मरणास सज्ज व्हा. मी तुमच्याबरोबर प्राणाहुतीस तयार आहे. शिवछत्रपतींच्या नामोच्चाराने आम्हांला स्फूर्ती येते. पण सध्याच्या महाराजांच्या नामोच्चाराने अंगावर काटा उभा राहतो. चित्त विषण्ण होते." (पुराभिलेखागार, कोल्हापूर, जनरल फाईल क्र. ३४८, २३ऑगस्ट १९३८चे गोपनीय पत्र ) रागाच्या आवेशात माधवरावांनी काही अपशब्द उच्चारले होते : "आम्ही तक्रारी करतो ते काही महाराजांचा सूड घ्यावा म्हणून नव्हे. पण त्यांना बदसल्ला देणारे, नीच हरामखोर सल्लागार आमचे रडगाणे त्यांना ऐकू जाऊ देत नाहीत." (माळी मा. गो. १९९८, पृ. ५०) कोल्हापूर दरबाराकडून माधवराव बागलांना नोटीस पाठविण्यात आली व ३२ तासात माफी न मागितल्यास राजद्रोहाचा आरोप ठेवला जाईल असा

इशारा देण्यात आला. निव्वळ त्या अपशब्दाच्या प्रमादासाठी तुरुंगात जाणे माधवरावांना योग्य वाटेना. प्रसंगावधान ठेवून माधवराव बागलांनी माफी मागितल्याने त्यांची अटक टळली. (कोल्हापूर पुराभिलेखागार, फाईल क्र. ४८०) दरबाराकडून होणारा संभाव्य विरोध लक्षात घेऊन प्रजापरिषदेच्या सभा संस्थानाच्या सीमेपार घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार प्रजापरिषदेची पहिली सभा १४ नोव्हेंबर १९३८ रोजी सातारा जिल्ह्यातील धामणी गावी बा. वि. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली; दुसरी सभा २० नोव्हेंबर १९३८ रोजी बेळगाव जिल्ह्यातील बोरगाव येथे, तिसरी सभा २७ नोव्हेंबर १९३८ रोजी उदगाव अंकली पुलाजवळच्या झाडाखाली घेण्यात आली.

या लोकचळवळीची कोल्हापूर दरबारने दखल घेतली व ३० नोव्हेंबर १९३८ रोजी शिरोळ पेटयाचा शेतसारा सव्वा सहा टक्के कमी केल्याचे जाहीर केले. मात्र शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. ४ डिसेंबर १९३८ रोजी दिनकरराव देसाई यांच्या अध्यक्षतेखाली अंकली येथे पाच हजार लोकांची सभा झाली. सभेत शेतसारा कमी केल्याबद्दल संस्थानचे आभार मानण्यात आले व इतर मागण्यांसाठी रणनीती ठरविण्यात आली. दुसरीकडे संस्थानच्या कारभाऱ्यांनी सिदलिंगप्पा हविरे, दिनकरराव देसाई, उदगावचे दादा देसाई, शिरोळचे विष्णू देशिंगकर या पुढाऱ्यांना अटक केली. जयसिंगपूर शिराळ्याच्या लोकांनी या अटकसत्राच्या निषेधार्थ हरताळ पाळला. (दै. नवाकाळ, १३ डिसेंबर १९३८) पाठोपाठ १६ डिसेंबर १९३८ रोजी अंकली येथे १५ हजारांच्या जनसमुदायासमोर कॉंग्रेसचे पुढारी श्री. शंकरराव देव यांच्या उपस्थितीत जाहीर सभा झाली व मागण्यांचे निवेदन तयार करून २५ डिसेंबर १९३८ रोजी कोल्हापूरला भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली राजधानीत महाराजांकडे मोर्चा नेण्याचे ठरविण्यात आले. करवीर हद्दीत ठरल्याप्रमाणे मोर्चा निघाला, भाषणबंदीचा हुकूम मोडून सभा झाली. सभाबंदीचा हुकूम मोडल्यामुळे भाई माधवराव बागल, दिनकरराव देसाई, सिदलिंगप्पा हविरे, दत्तोपंत देशिंगकर यांना अटक झाली, त्यांच्यावर खटला भरण्यात आला. १५ जानेवारी १९३९ रोजी चार हजार शेतकऱ्यांचा दुसरा मोर्चा निघाला. नानासाहेब जगदाळे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. चार हजार शेतकऱ्यांनी रेल्वे स्टेशनच्या हद्दीत तळ ठोकला. अखेर वाटाघाटी होऊन महाराजांनी शेतसारा ब्रिटिश हद्दीइतका करण्याचे जाहीर केले. भाषणस्वातंत्र्यावरचे निर्बंध उठविण्यात आले. जबाबदार राज्यपद्धती आणण्याचेही वचन दिले. २३ जानेवारी १९३९ रोजी भाई माधवराव बागल व इतर राजबंद्यांची सुटका झाली.

मात्र नंतरच्या काळात दरबाराने दिलेली बरीच आश्वासने पूर्ण केली नाहीत. चळवळीतल्या काही कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे भाई माधवराव बागल यांनी ६ फेब्रुवारी १९३९ रोजी छत्रपतींना त्यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्याकरिता '*कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद*' भरविण्याचे घोषित केले. जयसिंगपूरला श्रीरामचंद्र ऑईल मिलमध्ये रात्री साडेनऊच्या सुमारास माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. संस्थानच्या अधिकाऱ्यांनी त्याच वेळी भाई माधवराव बागल यांना वॉरंट बजावून राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. (माळी मा. गो. १९९८, पृ. ६७) सभा बरखास्त न करता राहिलेल्या

लोकांनी ती पुढे चालू ठेवली. २७ मार्च १९३९ ला खटल्याचा निकाल लागला. माधवरावांना २ वर्षांची सक्तमजुरी व एक हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पायात लोखंडाच्या बेड्या चढवण्यात आल्या. माधवराव बागल यांनी आपल्या आत्मचरित्रात या घटनेविषयी लिहिताना म्हटले आहे की, " राजकीय गुन्हेगारांना खालसा मुलुखातील कोणत्याही तुरुंगात असले साखळदंड घातल्याचे कोणी बोलले नाही. पण हा खास मान करवीर राजबंद्यांना दरबारने राखून ठेवला होता.. राजकीय गुन्हेगार, खुनी, दरोडेखोर अट्टल चोर, बदमाश यांना एकाच मापात मोजण्यात येत असे." माळी मा. गो. कित्ता पृ. ७१) यानंतर संस्थानाने प्रजापरिषदेवर बंदी आणली; परंतु चळवळ थांबली नाही. यानंतर होणाऱ्या प्रजापरिषदेच्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी २५ फेब्रुवारी १९३९ रोजी जयसिंगपूर येथे झालेल्या स्वागत समितीच्या सभेत काँग्रेसचे नेते श्री. शंकरराव देव यांनी संस्थानच्या दडपशाहीचा निषेध केला. स्वराज्याची व्याख्या व जबाबदार राज्यपद्धतीची संकल्पना स्पष्ट केली. "जो कर देतो व कायदा पाळतो त्याला त्या कराचा विनियोग कसा करावा हे ठरविण्याचा अधिकार असावा ही आमची मागणी आहे; आणि यालाच 'स्वराज्य' म्हणतात." अशी स्वराज्याची व्याख्या करून शंकरराव देवांनी या चळवळीत ब्राह्मण-मराठा वादाला मूठमाती देण्याचे आवाहन केले. छत्रपतींच्या गादीपुढे ब्राह्मण व मराठा हे भेद असू शकत नाहीत, हेही त्यांनी आवर्जुन सांगितले. मात्र या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. उलट करवीरच्या छत्रपतींनी प्रजापक्षीय नेतेमंडळीवर खटले दाखल करून चळवळ बंद पाडण्यासाठी पुढाकार घेतला. २५ मार्च १९३९ रोजी कोल्हापूर दरबारने राजपत्र प्रसिद्ध करून प्रजापरिषद बेकायदेशीर असल्याचे जाहीर केले. तरीही शंकरराव देव यांचे आवाहन व परिषदेचे चिटणीस रत्नाप्पा कुंभार यांच्या प्रयत्नांमुळे १५ एप्रिल १९३९ रोजी करवीर संस्थानच्या हद्दीबाहेर कूपवाडला काँग्रेसचे पुढारी डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली *'कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदे'*चे अधिवेशन झाले. अधिवेशनाला दहा हजार लोक उपस्थित होते. अधिवेशनात शंकरराव देव, ना. ग. गोरे, दा. वि. गोखले, गंगाधरराव देशपांडे, बा. वि. शिखरे यांची भाषणे झाली. अधिवेशनात पारित झालेल्या ठरावातून जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात आली. शिवाय डोईजड शेतसारा कमी करावा, प्रजा परिषदेवर आणलेली बंदी उठवावी, छत्रपतींच्या शिकारीसाठी निर्माण करण्यात आलेल्या पार्कसाठी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी परत कराव्यात इत्यादी मागण्या करण्यात आल्या.

मनाईहुकूम मोडून यशस्वी झालेल्या प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना दरबाराकडून अटक करण्याचे सत्र सुरू झाले. रत्नाप्पा कुंभार, दिनकर देसाई यांना कोर्टात हजर राहाण्याचे वॉरंट काढण्यात आले. रत्नाप्पा कुंभार यांना २ वर्षे सक्तमजुरी १ हजार रुपये दंडाची शिक्षा झाली. दिनकर देसाई यांना २ वर्षे सक्त मजुरी व ५०० रु. दंड झाला. (कुंभार रामलिंग, पृ. ३७-३८) स्त्री स्वंसेविका किसनबाई शेटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. परिषदेत भाग घेतला म्हणून मोरे व सनगर या दोन शिक्षकांना नोकरीतून काढून टाकले. (कोल्हापूर पुराभिलेखागार, गोपनीय धारिका क्र. ४१२, पृ. २) इतकेच नाही तर छत्रपती धार्जिण्या मंडळींनी १६ मार्च १९३९ रोजी चिखली येथे प्रजापरिषदेच्या विरोधात *'रयत सभा'* नावाची

समांतर संघटना स्थापन केली. अर्थात या सभेचा फारसा प्रभाव पडला नाही.

### दलित प्रजापरिषद :

३० डिसेंबर १९३९ रोजी दादासाहेब शिर्के यांच्या पुढाकाराने कोल्हापूरात दलित समाजाच्या सर्वांगीण सुधारणांसाठी 'दलित प्रजापरिषद' स्थापन करण्यात आली. आपल्या सुधारणांसाठी कोणत्या सवलती हव्यात याचा विचार करण्यासाठी व मागण्यांसाठी संघटित कृतिकार्यक्रम ठरविण्यासाठी ही परिषद बोलविण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित प्रजापरिषदेच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना छत्रपतींनी आपला कारभार नोकरशाहीच्या हाती देण्याऐवजी स्वत:च्या हाती घ्यावा व जनतेची नोकशाहीपासून सुटका करावी असे आवाहन केले. खरे तर छत्रपतींनी प्रजेला अधिकार देऊन लोकशाहीच स्थापन करावी, असेही डॉ. आंबेडकर यांनी आपल्या भाषणातून सूचित केले.

### मराठा लीगचे राजकारण :

२६ नोव्हेंबर १९४० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचे निधन झाले. संस्थानाचा कारभार चालविण्यासाठी दादासाहेब सुर्वे, एस. ए. इंदुलकर, दत्तोबा भोसले व आर. पी. सावंत या चार सदस्यांचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले. पंतप्रधान दादासाहेब सुर्वे निवृत्त झाल्यानंतर अनुक्रमे डब्ल्यू एच्. पेरी, मिचेल व थॉमस ऑस्टीन यांच्याकडे हा पदभार सोपविण्यात आला. पेरी यांनी मंत्रीमंडळात पां. चिं. पाटील, व केळवळकर यांना स्थान दिले होते. महाराणी ताराबाई यांनी १८ डिसेंबर १९४० रोजी भाई माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार या प्रजापरिषदेच्या नेत्यांची कारावासातून सुटका केली. सुटकेनंतर पुन्हा एकदा प्रजापरिषद संघटित करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रजापरिषदेला नवी संजीवनी देण्याचा प्रस्ताव पुढे आला. त्यानुसार बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांनी बेळगावला जाऊन अण्णासाहेब लठ्ठे यांना पाचारण केले. कोल्हापूरच्या दरबारी राजकारणाचे समर्थन करण्यासाठी यापूर्वी १९४० साली स्थापन झालेल्या 'मराठा लीग' संघटनेच्या कार्यकर्त्यांचा अण्णासाहेब लठ्ठयांच्या नावाला विरोध होता. ते जैन समाजाचे व बेळगावनिवासी असल्याने बऱ्याच लोकांना त्यांचे नेतृत्व मान्य नव्हते. त्यामुळे 'मराठा लीग'च्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष दत्ताजीराव माने व दासराम उर्फ रा. बा. जाधव, बी. टी सरनाईक या पुढाऱ्यांनी जाहीर पत्रक प्रसिद्ध करून अण्णासाहेब लठ्ठयांना प्रजापरिषदेत सहभागी करून घेण्यास आपला विरोध असल्याचे घोषित केले. या पार्श्वभूमीवर ९ जानेवारी १९४१ रोजी माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली व अण्णासाहेब लठ्ठे यांच्या उपस्थितीत प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांची कोल्हापूरात अनौपचारिक बैठक झाली. बैठकीला सर्वश्री रत्नाप्पा कुंभार, बाबुराव रुईकर, माधवराव शेटे उपस्थित होते. मराठा लीगचे कार्यकर्ते दासराम यांच्या नेतृत्वाखाली चारपाच हजारांचा मोर्चा नियोजित बैठकीच्या स्थानी गेला व त्यांनी निदर्शने केली. माधवराव बागल यांच्या घराला वेढा घालून अण्णासाहेब लठ्ठे यांचा त्यांनी निषेध केला. यामुळे प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांमध्ये मराठा व मराठेतर असे दुहीचे वातावरण निर्माण झाले. बहुजन समाज म्हणजे मराठा समाज हे मराठा लीगचे संघटनात्मक सूत्र होते.'पुढारी'कर्ते गणपतराव

जाधव यांचा मराठा लीगला पाठिंबा होता. सरदार भीमराव पाटणकर, सरदार थोरात, वतनदार देशमुख-देसाई यांच्याकडे मराठा लीगचे नेतृत्व होते. ९ जानेवारी १९४१ च्या वरील घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी नानासाहेब जगदाळेंनी प्रजापरिषदेचे संस्थापक माधवराव बागल यांच्याशी असलेले संबंध तोडल्याचे दै. 'पुढारी'मधून जाहीर केले. पाठोपाठ फेब्रुवारी महिन्यात श्रीपतराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्य प्रजासंघ' नामक समांतर संस्था स्थापन करण्यात आली. रा. बा. जाधव यांनी नव्या संस्थेचे सरचिटणीसपद स्वत:कडे ठेवले. (फडके य. दि. १९९७, पृ.२८८- २९१)

दरम्यान कोल्हापूर नगरपालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या. प्रजापरिषदेची मान्यता रद्द झाल्याने पर्याय म्हणून बागल गटाने १९ फेब्रुवारी १९४१ रोजी *स्थानिक स्वराज्य संघा*ची स्थापना केली. ८ मार्च १९४१ रोजी झालेल्या नगपालिकेच्या निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संघाने २५ पैकी २२ जागा जिंकल्या. या यशानंतर महाराणी ताराबाई यांच्या इच्छेनुसार पेरी मंत्रिमंडळाने प्रजापरिषदेवरची बंदी उठवली. पंतप्रधान पेरी यांनी घटनात्मक सुधारणा जाहीर केल्या. ५० सदस्यांच्या कायदेमंडळात २५ सदस्य लोकनियुक्त असतील अशी तरतूद केली. लोकनियुक्त प्रतिनिधिंपैकी निम्मे सदस्य अप्रत्यक्ष पद्धतीने निवडण्याची योजना होती. त्यासाठी सरदार व इनामदार; पदवीधर; व्यापारी व उद्योगपती; इलाखा पंचायत; नगरपरिषदा आणि सहकारी पतपेढ्या असे ६ मतदारसंघ ठरविण्यात आले. पंतप्रधान हा कायदेमंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असणार होता; मात्र तो कायदे मंडळाला जबाबदार रहाणार नव्हता. त्यानंतर २-३ जून १९४२ रोजी कोल्हापूर शहरात बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली प्रजा परिषदेचे दुसरे अधिवेश घेण्यात आले. या अधिवेशनाला पन्नास हजारांची उपस्थिती लाभली. परिषदेने जबाबदार राज्यपद्धती त्वरित आणण्याचा ठराव केला व पेरी साहेबांची घटना नाकारली. लोकप्रतिनिधींनी घटनेचा मसुदा केला पाहिजे अशी भूमिका घेतली व बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची घटना समिती नेमली. अर्थात या समितीचे काम पुढे जाऊ शकले नाही. निधीच्या हिशेबावरून काही काळ प्रजापरिषदेत संशयाचे व दुहीचे वातावरणही निर्माण झाले. केशवराव जेधे यांनी प्रजापरिषद व्यापारी वर्गाच्या वर्चस्वाखाली काम करीत असल्याचा आरोप केला व परिषदेत शेतकऱ्यांच्या मतांना महत्त्व दिले गेले पाहिजे, असे आवाहन केले. (फडके य. दि. १९९७, पृ. २९६)

## राष्ट्रीय सभेला अनुसरण्याचा निर्णय :

१२ ऑगस्ट १९४२ ला प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीची सभा होऊन राष्ट्रीय सभेच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेचे समर्थन करण्यात आले. तसेच कोल्हापूर संस्थानातली संस्थानाधिपतींची सत्ता संपुष्टात आणून राष्ट्रीय प्रवाहात संस्थानाने सहभागी व्हावे अशा आशयाचा ठराव पारित करण्यात आला. जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात येईपर्यंत कोल्हापूरात तात्पुरते मंत्रिमंडळ स्थापन करावे अशी शिफारस करण्यात आली. संस्थानाने याप्रमाणे तत्पर कार्यवाही केली नाही तर अहिंसक मार्गाने संघर्ष करून सध्याची राज्यपद्धती संपविण्यासाठी प्रजापरिषदेला पावले उचलावी लागतील असा इशाराही देण्यात आला.

त्यानंतर प्रजापरिषदेने शेतकरी, शेतमजूर व कामगारसंघटनांची बांधणी करून आपला कार्यविस्तार सुरू केला. परिणामत: प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना लगाम घालण्यासाठी संस्थानाने या कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्याची मोहीम सुरू केली.

१९४२ च्या चलेजाव आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरात लोकचळवळींनी वेग घेतला. सभा घेणे, मिरवणुका काढणे, सरकारी खजिना लुटणे, चावड्या, रेल्वे स्टेशन व सार्वजनिक मालकीच्या इमारतींची नासधूस करणे ह्या प्रकारे सार्वजनिक लोकक्षोभ प्रकट होऊ लागला. रुकडी आणि हातकणंगले स्टेशन जमावाने लावलेल्या आगीत खाक झाली. (फडके य. दि.१९९७.पृ.२९७) १३ ऑगस्ट १९४२ रोजी माधवराव बागल यांना पन्हाळगडावर स्थानबद्ध करण्यात आले. १६ क्रांतिकारक शहीद झाले. हजाराहून अधिक स्वयंसेवकांना अटक झाली. रत्नाप्पा कुंभार यांनी परिस्थिती लक्षात घेऊन भूमिगत राहून चळवळ पुढे चालविण्याचा खटाटोप सुरू ठेवला. १४ ऑक्टोबर १९४२ रोजी त्यांनी प्रकट होऊन कोल्हापूरात सभा घेतली. यावेळी दरबाराने केलेल्या लाठीहल्ल्यात बिंदू कुलकर्णी हा १६ वर्षांचा तरुण विद्यार्थी ठार झाला. (पुढे या बलिदानाचे स्मारक म्हणून बिंदू चौक असे त्या जागेचे नामकरण करण्यात आले.)

१८ नोव्हेंबर १९४२ रोजी महाराणी ताराबाईंनी एक महिना वयाचे प्रतापसिंह भोसले यांना दत्तक घेतले व त्यांचे सहावे शिवाजी महाराज असे नामकरण केले. त्यानंतर १९४४ साली पेरी यांच्या जागेवर मिचेल साहेब पंतप्रधानपदी विराजमान झाले. त्यांनी चलेजाव चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ना. सी. फडके यांची 'शाकुंतल' कादंबरी जप्त केली व कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातून त्यांना बडतर्फ केले. (फडके य. दि. १९९७, पृ. २९८) अशा वातावरणात ९ डिसेंबर १९४४ रोजी काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन झाले.

फेब्रुवारी १९४६ च्या प्रारंभी थॉमस ऑस्टीन यांनी मिचेल साहेबांकडून पंतप्रधानपदाची सूत्रे घेतली. त्यांनी पंतप्रधानपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच १ मार्च १९४६ रोजी ११ सदस्यांची घटनात्मक सुधारणा समिती नेमली व या समितीच्या सचिवपदाची जबाबारी नाना धर्माधिकारी यांच्याकडे सोपविली. दरम्यानच्या काळात २ सप्टेंबर १९४६ रोजी वयाच्या पाचव्या वर्षी बालछत्रपतींचे अकाली निधन झाले. त्यानंतर ३१ मार्च १९४७ रोजी विक्रमसिंह पवार यांना दत्तक घेऊन त्यांना दुसरे शहाजी छत्रपती या नावाने गादीचा वारस ठरविण्यात आले. १९४७ साली मे महिन्यात थॉमस ऑस्टीन निवृत्त झाल्यावर दादासाहेब सुर्वे पंतप्रधानपदी विराजमान झाले व १५ मे १९४७ रोजी अण्णासाहेब लठ्ठे यांनी छत्रपतींचे घटनाविषयक सल्लागार म्हणून जबाबादारी स्वीकारली. त्यानंतर १ जून १९४७ रोजी दुसऱ्या शहाजी छत्रपतींचा राज्यारोहण समारंभ झाला. त्याचवेळी कोल्हापूरची नवी राज्यघटना जाहीर करण्यात आली. त्यात २३ सदस्यांचे राजमंडळ (वरिष्ठ सभागृह) व ५१ सदस्यांची प्रतिनिधी सभा (कनिष्ठ सभागृह) असा द्विसदनी विधिमंडळाचा आकृतिबंध ठरविण्यात आला. राजमंडळात ९ जहागीरदार, ४ इनामदार व इतर १० सदस्य असतील. प्रतिनिधीसभेत ५

रुपयांवर शेतसारा भरणाऱ्यांनी निवडून द्यावयाचे २४ सदस्य, ५ रुपये शेतसाऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या कुळांनी निवडून द्यावयाचे १२ सदस्य, स्थावर मिळकतवाल्यांनी निवडून द्यावयाचे ४ सदस्य व बिगर शेती व्यावसायिकांनी निवडून द्यावयाचे ४ सदस्य असे एकूण ४४ लोकनियुक्त सदस्य; आणि उर्वरित ७ सरकारनियुक्त सदस्य असतील. या ७ सदस्यांपैकी २ सरकारी अधिकारी व ५ अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी असतील अशी संरचना ठरविण्यात आली होती. प्रतिनिधी सभेचे विधेयक राजमंडळास मान्य झाले तरच त्याचे कायद्यात रूपांत होईल अशीही तरतूद करण्यात आली होती. शिवाय छत्रपतींना काही विशेषाधिकारही ठेवण्यात आले होते. मंत्रिमंडळाच्या खातेवाटपात गृह, महसूल, अबकारी, जंगल अशी महत्त्वाची खाती सरकारनियुक्त मंत्र्यांसाठी राखीव ठेवण्याचीही तरतूद होती. १ जानेवारी १९४८ पासून नवी राज्यघटना अस्तित्वात येईल व हंगामी मंत्रिमंडळाकडे कारभार सोपविला जाईल असेही जाहीर करण्यात आले.

१५ ऑगस्ट १९४७ भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर २ नोव्हेंबर १९४७ रोजी छत्रपतींबरोबर माधवराव बागल यांची बैठक झाली व तीत प्रजापरिषदेच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापण्याच्या प्रस्तावास छत्रपतींनी अनुकूलता दर्शविली. प्रजापरिषदेकडे अर्थ, न्याय, महसूल व पुरवठा खात्याचे मंत्रीपद देण्याचेही मान्य करण्यात आले. ११ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत माधवराव बागल यांनी मंत्रिमंडळ बनविण्याचा ठराव झाला. १५ नोव्हेंबरला हंगामी मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. माधवराव बागलांकडे गृह, डी. एस. खांडेकरांकडे महसूल खाते सोपविण्यात आले. (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. २९३) रत्नाप्पा कुंभार यांनी पुरवठा खाते व म. दुं. श्रेष्ठी यांनी अर्थखाते स्वीकारण्यास नकार दिल्याने पेचप्रसंग निर्माण झाला. १७ नोव्हेंबरच्या प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीत या विषयावर चर्चा होऊन मतदान झाले, त्यात बागल गटाचा पराभव झाला. प्रजापरिषदेत मराठा विरुद्ध लिंगायत अशी दुफळी माजली. कार्यकारिणीच्या १५ पैकी काही जणांनी राजीनामे दिले. दोन गटात समेट घडविण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले.

प्रजापरिषदेच्या या दुफळीनंतर १ जानेवारी १९४८ पासून नवी राज्यघटना अमलात आणून छत्रपतींनी हंगामी सरकार स्थापन केले. पूर्वीचे दिवाण सुर्वे यांना पंतप्रधान म्हणून घोषित केले. पण प्रजापरिषदेने मंत्रिमंडळात सामील होण्यास नकार दिला व नवी घटना मान्य नसल्याचेही जाहीर केले. पुढे ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधी यांची हत्या झाल्याने कोल्हापूरात त्याची मोठी प्रतिक्रिया उमटली. संस्थान स्वतंत्र न ठेवता भारतात विलीन करावे का यावर उलटसुलट चर्चा सुरू झाल्या. माधवराव बागल गटाला संस्थान स्वतंत्र राहावे असे वाटत होते, तर रत्नाप्पा कुंभार गटाचे संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण व्हावे असे मत होते. कोल्हापूरच्या महाराजांचा खाजगी खर्च भरमसाठ असल्याने संस्थान विलीन होणे योग्य राहील असे म्हणणारा एक गट होता, तर विरोधी गटाने छत्रपतींचा खर्च कमी करता येईल, तेवढ्यासाठी विलीनीकरण थांबवू नये, असे मतप्रदर्शन केले होते. सप्टेंबर१९४८ रोजी प्रांतिक काँग्रेस बैठकीतही कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाचा ठराव मंजूर करण्यात आला. अर्थात १

मार्च १९४९ रोजी कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्याने राजकारणाचे सर्व संदर्भ बदलले. रत्नाप्पा कुंभार गट कॉंग्रेस पक्षात सामील झाला व माधवराव बागल गटाने शेतकरी कामगार पक्षात जाणे पसंत केले.

## २.११. इचलकरंजी संस्थानातली प्रजापरिषद :

कोल्हापूर संस्थानांतर्गत येणाऱ्या ९ जहागिऱ्यांपैकी इचलकरंजी संस्थानात बाबासाहेब देशमुख यांची जाहागिरी होती. 'महाराष्ट्राचे मँचेस्टर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजीने कापड उद्योगात नावलौकिक संपादित केला होता. मात्र या जहागिरीत मोडणारा ७० खेड्यांचा 'आजरा' तालुका हा आर्थिकदृष्ट्या गांजलेला होता. भात आणि नाचणीखेरीज कुठलीही नगदी पिके घेता येत नसल्याने या भागातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती जेमतेम उदरनिर्वाहापुरतीच होती. मात्र संस्थानचे जहागीरदार आजऱ्याच्या शेतकऱ्यांकडून अवाजवी शेतसारा वसूल करीत असत. कोल्हापूर संस्थानाशी इचलकरंजी संस्थानाचा सुसंवाद नव्हता; शिवाय शेतसारा कसा आणि किती वसूल करावा यावर कोल्हापूर संस्थानचे कराराप्रमाणे कुठलेच नियंत्रण नव्हते. अशा परिस्थितीत १९ फेब्रुवारी १९३० रोजी इचलकरंजी संस्थानातून आजऱ्याच्या शेतकऱ्यांवर २१.५ % शेतसारा वाढीचा आदेश निर्गमित झाला. या काळात जागतिक मंदीचा फटका बसल्याने भात आणि नाचणीचे बाजारभावही पडले होते. अशा स्थितीत सारावाढीच्या घोषणेने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. याच काळात सारावाढीच्या प्रश्नावरून मुंबई इलाख्यात बागलाण, पालघर, वसईच्या शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते व या आंदोलकांनी २३ जुलै १९२९ रोजी 'मुंबई इलाखा शेती संघ' स्थापन केला होता. या संघाच्या चळवळीमुळे मुंबई सरकारने सारावाढ तहकूब करून नव्याने सर्वेक्षण करून साऱ्याचे दर ठरविण्यात येतील असे जाहीर केले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन आजरा तालुक्यातील रामचंद्र सखाराम जोशी यांनी संस्थानाधिपतीकडे शेतसाऱ्याची वाढ मागे घेण्यासाठी विनंती अर्ज करण्याची तयारी सुरू केली. त्यांनी २०० असंतुष्ट शेतकऱ्यांच्या सह्यांचा अर्ज जहागीरदार बाळासाहेब घोरपडे यांच्याकडे पाठविला. तसेच 'बेळगुंदी' येथे शेतकरी मेळावा घेऊन मुंबईप्रमाणे आजऱ्याचीही सारावाढ मागे घ्यावी अशी मागणी करणारा ठराव केला.

इचलकरंजीच्या जहागीरदारांनी ही चळवळ चिरडून टाकण्याचा सर्व बाजूंनी प्रयत्न केला. सारा न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरांवर जप्त्या आणून घरात मिळेल तो माल उचलून नेण्याचा सपाटा चालवला. सभाबंदीचा हुकूम काढला; लोक एकत्र येऊ नयेत म्हणून गावांची नाकेबंदी करण्यात आली. अशाही परिस्थितीत प्रजापरिषद भरविण्याचा अर्ज करण्यात आला. संस्थानाने परिषद घेता येऊ नये अशा जाचक अटी घालून परिषदेला परवानगी दिली. शेतकऱ्यांत असंतोष पसरेल अशी भाषणे करता येणार नाहीत, परिषदेला बाहेरचा अध्यक्ष चालणार नाही अशा अटी घालण्यात आल्या. 'संस्थानी स्वराज्य' पत्राने २ फेब्रुवारी १९३० च्या अंकात जहागिरदारांच्या या फतव्यावर मार्मिक टीका करणारा लेख लिहिला. "संस्थानच्या हक्कांची भांडणे भांडण्याकरिता श्रीमंतांना हजारो रुपये फी भरून संस्थानाबाहेरील अनेक काळ्या-गोऱ्या लोकांची मदत घ्यावी लागत आहे, असे असता इचलकरंजी संस्थानात

प्रजापरिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारून मोफत मार्गदर्शन करणारा दयार्द्र अंत:करणाचा परस्थ गृहस्थ संस्थानच्या प्रजेस मिळाल्यास त्याची मदत घेऊ नये, अशी अट अधिकाराच्या जोरावर गरीब प्रजेवर लादणे हे बाबासाहेब यांना किंवा विलायतेची सफर करून आलेल्या तरण्याबांड 'परस्थ' डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटास कसे शोभते हे आम्हांस समजत नाही." (पटवर्धन अ. वि. १९४०, पृ. २२८)

अशा नकारात्मक परिस्थितीतही आजरे येथे १९ एप्रिल १९३० रोजी रामचंद्र सखाराम जोशी यांच्या घरी सभा होऊन *'आजरे तालुका प्रजा सभा'* स्थापन झाली. प्रजा परिषदेने बा. वि. शिखरे यांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी २६ एप्रिल १९३० रोजी आजऱ्यास येण्याचे आमंत्रण पाठविले; परंतु संस्थानाकडून या व्याख्यानावर बंदी घालण्यात आली. शिखरे यांना भेटण्यास कुणीही जाऊ नये अशी तंबी देण्यात आली. सामान्य शेतकऱ्यांनी थेट श्रीमंतांना भेटून कैफियत सादर करण्याचे ठरविले; परंतु त्यासही मज्जाव करण्यात आला. उलट १५ डिसेंबर १९३० रोजी महसूलाचा हप्ता त्वरित भरण्याविषयी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला . सारा न भरणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनीवर उभे असणारे पीक कापण्यास अथवा कापलेल्या पिकाची मळणी करण्यास मनाई करण्याचा हुकूम या जाहीरनाम्यातून दिला गेला. प्रजापरिषदेचे पुढारी रा. स. जोशी, केशवराव परुळेकर व अनेक शेतकऱ्यांची धरपकड करून पोलिसांनी त्यांना जबर मारहाण केली व पोलिस कोठडीत बंदिवान केले. प्रजापरिषदेचे आंदोलन मान्य नसल्याच्या खोट्या सह्या जमा करण्याची मोहिमही अधिकाऱ्यांनी उघडली. शिवरात्रीच्या मुहूर्तावर देवळाच्या प्रांगणात जमणाऱ्या लोकांपुढे प्रजापरिषदेचे लोक भाषण करतील असे कळल्यावरून अधिकाऱ्यांनी भाडोत्री माणसे जमवून आपली जाहीर असहमती वदवून घेण्याची तयारी केली. परंतु रा. स. जोशी तेथे पोहचल्यावर त्यांचे भाषण ऐकल्यावर भाडोत्री माणसेही फिरली व अधिकारी तोंडघशी पडले.

एवढा त्रास सहन करूनही प्रजा परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन नेटाने पुढे नेले. अखेर श्रीमंतांनी २१ टक्के सारावाढ कमी करून साडेदहा टक्के करण्याचा निर्णय घोषित केला. मात्र त्यावेळचे बाजारभाव, शेतमालाचा उतारा हे लक्षात घेता साडेदहा टक्के सारा देणेही शक्य नव्हते. त्यामुळे आंदोलन पुढे चालूच राहिले. अखेर ३० सप्टेंबर १९३८ रोजी रामचंद्र जोशी यांच्या घरी प्रजा परिषद घेऊन शिखरे व पुंडलिकजी कातगडे यांना संस्थानच्या अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करण्यासाठी पाठविण्यात आले. जनमताचा दीर्घ काळ चाललेला लढा लक्षात घेऊन श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनी १९३८ साली साडेदहा टक्के सारावाढ मागे घेतली. प्रजापरिषदेचा लढा यशस्वी झाला. (पटवर्धन अ. वि. १९४०, पृ. २१८-२४५)

## २.१२. कुरुंदवाड (थोरली पाती) व कुरुंदवाड (धाकटी पाती) :

कुरुंदवाड संस्थानचे १८५४ साली विभाजन होऊन थोरली पाती व धाकटी पाती अशी दोन संस्थाने अस्तित्वात आली होती. थोरल्या पतीचे अधिपती अण्णासाहेब पटवर्धन यांचे १९२७ साली निधन झाल्यानंतर त्यांचे पुत्र बाळासाहेब हे अजून सज्ञान नसल्याने या संस्थानाचा राज्यकारभार ब्रिटिश सरकारचे पोलिटिकल एजंट लँग यांचेकडे होता. त्यांनी

संस्थानात लोकलबोर्ड कायदा लागू केल्याने प्रजेत असंतोष नव्हता. मात्र त्यांच्या कारकिर्दीत सभाबंदीचा कायदा अस्तित्वात होता. तरीही काही अटींवर प्रजापरिषद घेण्यास रेसिडेंटनी परवानगी दिली. २ जून १९३१ रोजी अण्णासाहेब लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली कुरुंदवाडला पहिली प्रजापरिषद झाली. या परिषदेत सभाबंदीचा कायदा रद्द करण्याची, न्यायदानातील लाचलुचपतीला प्रतिबंध करण्याची व जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात आली. न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी, मुलींच्या शाळेत चांगले शिक्षक नेमण्यात यावेत, सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्यात अशाही मागण्या करण्यात आल्या. ३१ मे १९३२ रोजी मुंबईच्या 'प्राविण्य' मासिकाचे संपादक का. म. ताम्हणकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रजापरिषदेचे दुसरे अधिवेशन झाले, त्यातही याच मागण्या करण्यात आल्या. ताम्हणकरांनी ब्रिटिश मुलुखातील व कुरुंदवाड संस्थानातील शेतसाऱ्यातील फरक लक्षात आणून दिला व शेतसारा कमी करण्याची मागणी केली. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून, मोफत व सक्तीचे असावे असाही ठराव पारित करण्यात आला. भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या मागणीची दखल घेऊन रेसिडेंटने सी. आय. डी अधिकाऱ्यामार्फत लाचलुचपतीच्या तक्रारींची चौकशी केली. जवळपास एक हजार नागरिकांनी पुरावे सादर करणाऱ्या साक्षी दिल्या. लोकांच्या तक्रारीत तथ्य आढळून आल्यावर रेसिडेंट मि. गार्डन यांनी जिल्हा न्यायाधीश वाकनीस, मामलेदार अष्टेकर, पोलिस प्रमुख महादेवकर यांचेसह दहा-पंधरा नोकरांना बडतर्फ केले. प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन २६ फेब्रुवारी १९३९ ओजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या परिषदेतील मागण्या रेसिडेंटने मान्य केल्या व शेतसाऱ्यात सूट दिली. आणेवारी पद्धत लागू केली, स्थानिक लोकांना नोकरीत प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. सभाबंदीचा कायदाही रद्द करण्यात आला.चौथे अधिवेशन बुबनाळ येथे काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी माधवराव बागल उद्घाटक होते. या अधिवेशनात जबाबदार राज्यपद्धतीखेरीज धान्यवाटपाची व्यवस्था कार्यक्षम करावी व संस्थान कोल्हापूर संस्थानात विलीन करावे असे ठराव करण्यात आले. पुढे आपले संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करावे असे संस्थानाधिपतींनी कळविले व त्यानुसार १९ फेब्रुवारी १९४८ रोजी या संस्थानाची विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली.

कुरुंदवाड (धाकटी पाती) या संस्थानाचा कारभार १९०२ ते १९११ या काळात हरिहरराव उर्फ दाजीसाहेब यांचेकडे होता. त्यांच्या मृत्यूनंतर १९११ ते १९३० या काळात दाजीसाहेबांचे चुलत बंधू माधवराव उर्फ भाऊसाहेब यांचेकडे संस्थानाधिपतीची जबाबदारी होती. १९३० पासून दोन वर्षे पोलिटकल एजंटकडे व १९३३ ला बापूसाहेब यांना राजेपद प्राप्त होईपर्यंत संस्थानाधिपतीच्या नेमणूकीबाबत अस्थिरताच होती.

१९३७ साली *यळूर शेतकरी* संघ नामक संस्था स्थापन झाली. या संस्थेने जबाबदार राज्यपद्धतीसह ११ मागण्यांचे निवेदन श्रीमंत बापूसाहेब यांच्याकडे दिले. त्यांनी त्यापैकी काही मागण्या मान्य केल्या. लोकलबोर्डात ३/४ सभासद लोकनियुक्त असण्याला संमती देण्यात आली. शेतकरी संघाने त्यानंतर संस्थानात विधिमंडळ स्थापन करण्याचीही मागणी केली होती. यापेक्षा या संस्थानात लोकचळवळीचे वेगळे काम झाले नाही.

## २.१३. जंजिरा संस्थानातील राजकीय घडामोडी :

दक्षिण महाराष्ट्रातील ८३९ चौ. कि. मी. क्षेत्रफळ असलेल्या या संस्थानात आफ्रिकेतील हबशी लोकांचे राज्य होते. पुढे सिद्दी वंशाच्या सुन्नी पंथीय मुसलमानांची सत्ता होती. हा भौगोलिक प्रदेश स्वातंत्र्योत्तर भारतातल्या रायगड जिल्ह्यात मोडतो. खुष्कीच्या मार्गाने ते तेव्हाच्या कुलाबा जिल्ह्याला जोडलेले नव्हते. विसाव्या शतकात मरहूम नबाबसाहेब हे जंजिऱ्याचे संस्थानाधिपती होते. मुरुड व श्रीवर्धन ही या संस्थानातील दोन मुख्य गावे होती. मुरुड ही संस्थानची राजधानी होती. राजकीयदृष्ट्या या संस्थानात १८९५-९६ सालापासून असंतोष होता. प्रजेस कोणतेही राजकीय हक्क नव्हते. नबाबाला शिकारीचा शौक असल्याने शेतीचे नुकसान करणारी जंगली जनावरे मारण्यास बंदी होती. शेजारच्या कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांच्या तुलनेने नबाबाने सारा आकारणीचे दर सव्वापट जास्तीचे ठेवल्याने इथे लोकचळवळ संघटित करण्याचा पहिला प्रयत्न झाला. सखारामपंत घैसास यांनी श्रीवर्धन तालुक्यात *'लोकसभा'* नामक संस्था स्थापन केली. भिकाजी अनंत प्रधान यांनी चिटणीसपद स्वीकारले. सभेने साऱ्याचे दर कमी करण्याचा ठराव पारित करून तसा अर्ज दरबारात दाखल केला; परंतु दरबाराने त्या अर्जाची मुळीच दखल घेतली नाही. त्यामुळे ही चळवळ तेथेच थांबली. पुढे १९१८ च्या सुमारास मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांची चाहूल लागल्यावर आणि आजुबाजूच्या संस्थानातील प्रजापरिषदांचे काम पाहून मुंबईत राहणाऱ्या भूमिपुत्रांनी मुंबईत *'जंजिरा रयत सभा'* स्थापन केली. भास्कर यादव पेंडसे हे या सभेचे सेक्रेटरी होते. त्यांनी स्वत: व केशव महादेव दांडेकर यांनी मुंबईच्या 'इंदुप्रकाश' पत्रातून जंजिरा संस्थानच्या कारभारावर टीका करणारे लेख प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. त्यावेळी 'इंदुप्रकाश'चे संपादक न. र. फाटक होते. त्यांनी या लेखांना ठळक प्रसिद्धी दिली. संस्थानातल्या सत्ताकेंद्रात स्वाभाविकच याविरूद्ध प्रतिक्रिया उमटली. दरबारातल्या अधिकाऱ्यांनी मुंबईत स्थापन झालेली सभा स्थानिक जनतेला मान्य नसल्याच्या सह्यांची मोहीम चालवली. अर्थात त्याचा काही परिणाम झाला नाही. अखेर दरबाराने रयतेच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डांच्या निम्म्या सदस्यांचा समवेश असणारी *'जमीनदार सभा'* स्थापन केली. दर महिन्याला 'जंजिरा गॅझेट' प्रसिद्ध करून दरबारच्या निर्णयांची माहिती प्रसिद्ध करण्यात येऊ लागली.

नंतर पुन्हा संस्थानाचा मूळ प्रकृतिधर्म जागा झाला. त्यांनी परस्पर खोतांची जंगले विकायला सुरुवात केली. जंजिरा रयत सभेचे सेक्रेटरी भास्कर यादव पेंडसे यांच्या मालकीच्या जंगलाचाही परस्पर लिलाव करण्यात आला. त्यामुळे पेंडसे यांनी जंगल तोडणाऱ्यांविरूद्ध सत्याग्रह सुरू केला. झाड तोडण्यासाठी उचललेल्या कुऱ्हाडीचा वार स्वत: झेलण्यासाठी पुढे यायचे असे सत्याग्रहाचे स्वरूप होते. यावर सरकारी कामात अडथळा आणण्याचे कारण देऊन पोलिस कारवाई करण्यात आली. शिवाय जंगलातली झाडे तोडून चोरी केल्याचा उफराटा आरोप ठेवून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. या प्रकारामुळे पेंडसे यांना जनतेची सहानुभूती प्राप्त झाली. त्यांचे बंधू निष्णात वकील होते; त्यांनी खटल्याचे वकिलपत्र घेतले. तरीही पेंडसे यांना २५ रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. मात्र या प्रकरणामुळे लोकांमध्ये जागृतीचे

वारे वाहू लागले.

१९२० साली श्रीवर्धन येथे मे. अलिमियासाहेब घणसार यांच्या अध्यक्षतेखाली तालुका सभा स्थापन करण्यात आली. सभेने लोकनियुक्त कौन्सिल स्थापण्याच्या मागणीचा ठराव पारित केला. त्यानंतर १९२२ साली मुरुड तालुका सभा स्थापन झाली. जिराईत व बागाईत पिकांवर केलेली सारावाढ मागे घेण्याचा ठराव पारित करण्यात आला. या मुद्यावर तिन्ही तालुक्यातील लोक एकत्र आले. अखेर तत्कालीन दिवाण कापडिया यांनी सारावाढ तहकूब केली. त्यानंतर जंजिरा मुरुड येथे सर्वसमावेशक मध्यवर्ती स्वरूपाची *'जंजिरा लोकसभा'* स्थापन करण्यात आली. १९२६ व १९२७ साली लागोपाठ दोन अधिवेशने झाली. म्हशेळे येथील पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष रा. गो. ह. साठ्ये यांनी व दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद जोशी वकिलांनी स्वीकारले. या अधिवेशनांत कायदेकौन्सिलची स्थापना करावी व जबाबदार राज्यपद्धती आणावी; खोती हक्क, जंगल हक्क, मालकी नंबरातील झाडोऱ्यावरील हक्क इत्यादी मागण्या करण्यात आल्या. दरबाराकडून मात्र सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. उलट १ जुलै १९२७ रोजी प्रेस ॲक्ट व संस्था नोंदणी कायदा जारी करून या संघटनांवर बंदी आली. परिणामत: पुन्हा एकदा लोकचळवळ थंडावली.

पुढे मुंबईकरांनी पुढाकार घेऊन २७ मे १९२८ रोजी जमनादास मेथा यांच्या अध्यक्षतेखाली जंजिरा संस्थान प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन घेतले. मात्र दरबारच्या लोकांनी तेथेही हिंदू-मुसलमानांत फूट पाडण्याचे राजकारण केले. श्रीवर्धनच्या मुसलमानांच्या कबरस्थानास तार मारण्याची परवानगी दिल्याने हिंदूंचा वहिवाटीचा रस्ता बंद पडला. त्यामुळे हिंदूंना शिमग्याच्या होळीची हळकुंडे आणता आली नाहीत व होळ्या पेटल्या नाहीत. हिंदूंनी मुसलमानांवर बहिष्कार घातला व तारा तोडून टाकल्या. दरबाराने पुढाऱ्यांना व ७०-७५ लोकांना अटक करून खटले भरले. या प्रकरणी बॅ. बाबासाहेब आंबेडकर, ॲड. जोशी यांनी हिंदूंची बाजू गव्हर्नरपुढे मांडली. गव्हर्नरने जंजिरा संस्थानास हिंदूंना सोडून देण्याची सूचना पाठविल्यावर हे प्रकरण निकालात निघाले. जंजिऱ्याचे दिवाण कापडिया यांनी जनतेची कामे करण्यापेक्षा उपद्रव निर्माण करण्याचेच काम केल्याने त्यांच्याविषयी सतत असंतोष होता. अखेर १९३२ साली बेगमसाहेबांनी कापडिया यांना दिवाणपदावरून दूर केले व रावबहादूर कोटक यांना नवे दिवाण नेमले. पुढे १९३९ साली सदार सिद्दी महमूद यांच्या अध्यक्षतेखाली 'जंजिरा संस्थान प्रजा मंडळ' पुनर्घटित झाले. तोपर्यंत लोकचळवळ अशी झालीच नाही.

१९४६ साली नाना कुंटे यांनी मुंबईत जंजिरेकरांची प्रजापरिषद संघटित केली. परिषदेच्या ३ सभा झाल्या. या नवसंघटित प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन दिवेआगर येथे काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली व दुसरे अधिवेशन मुरुड येथे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रजापरिषदेने प्रजेच्या संमतीने राज्यकारभार करण्यात यावा, शेतीसंरक्षणासाठी शिकारी जनावरांना मारण्याची परवानगी मिळावी, १९२८ च्या श्रीवर्धनच्या दंगलीनंतर लावलेली सभाबंदी मागे घ्यावी इत्यादी मागण्या केल्या. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर संस्थान भारतात विलीन झाले. (कुंटे, १९८५, पृ. ७७-७९)

## २.१४. सावंतवाडी संस्थानातील राजकीय घडामोडी :

सावंतवाडी संस्थानात राजकीय असंतोषाचे वारे वहाण्याला फारसा वाव नव्हता. याचे कारण सावंतवाडीचे राजे खेमसावंत बापूसाहेब महाराज हे स्वत:च काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीच्या बाजूने विचार करणारे व त्याअनुषंगाने आपल्या संस्थानांत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्यात पुढाकार घेण्यात अग्रभागी होते. 'वैनतेय' पत्रातून प्रजेची गाऱ्हाणी मुक्तपणे मांडता येत होती. १९२७ साली आजारपणात आपली प्रकृती सुधारण्यासाठी गांधीजी महिनाभर बापूसाहेब महाराज यांच्या आंबोलीच्या वाड्यात राहिले होते. या काळात संस्थानाने गांधीजींच्या तब्येतीची काळजी घेऊन आतिथ्य तर केलेच, शिवाय त्यांच्या कार्यासाठी एक हजारांची देणगीही दिली. गांधीजींच्या खादीग्रामोद्योगाच्या चळवळीच्या प्रसारसाठीही संस्थानाकडून पुढाकार घेण्यात आला. आप्पासाहेब पटवर्धनांना पाचारण करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली चरखालय सुरू करण्यात आले. शाळांतून चरखा चालवणे व सुतकताईच्या शिक्षणास प्राधान्य दिले गेले. चरखालयासाठी वार्षिक ९०० रु. अनुदानाची तरतूद करण्यात आली. १९३० च्या शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहात सावंतवाडीच्या प्रजाजनांचा उत्स्फुर्त सहभाग होता. १९३२ साली गांधी तत्त्वज्ञानानुसार खादीभांडार चालविण्यासाठी व निसर्गोपचार केंद्र सुरू करण्यासाठी डॉ. आ. कृ. भागवत यांना संस्थानाकडून सरकारी इमारत, लागवडीसाठी जमीन उपलब्ध करून देण्यात आली. सावंतवाडीत महाराजांनी म्युनिसिपालिटी स्थापन करून स्थानिक कारभारात जनतेचा सहभाग वाढविण्याचे पाऊल उचलले होते. शिक्षणप्रसारातही संस्थान आघाडीवर होते. त्यामुळे या संस्थानात प्रजापरिषदेसारखी संघर्षशील चळवळ संघटीत करण्याची गरज नव्हती.

असे असले तरी संस्थानाबाहेरच्या राजकीय जागृतीचे पडसाद कुठल्या ना कुठल्या स्वरूपात याही संस्थानात उमटलेले दिसतात. लोकांची गाऱ्हाणी सार्वजनिक रित्या मांडण्यासाठी 'सावंतवाडी संस्थान हितवर्धक सभा' स्थापन झाली होती. येथील बऱ्याच कुटुंबातले सदस्य मुंबईत असल्याने त्यांनी ना. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली १९२८ साली मुंबईतच एक प्रजापरिषद घेतली होती. मात्र या परिषदेच्या कामाचा विस्तार होऊ शकला नाही. १९३४ साली सावंतवाडी संस्थानात शेतकऱ्यांची एक परिषद आमदार सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झाली, परंतु याही परिषदेने पुढे काही काम केले नाही. १९३७ साली राजे बापूसाहेब खेमसावंत यांचे निधन झाले. त्यानंतर दहा वर्षे वयाचे शिवराम राजे गादीवर आले, परंतु ते सज्ञान होईपर्यंत महाराणी रिजंट साहेबांचा कारभार सुरू राहिला. त्यावेळी लोकप्रतिनिधींचे सल्लागारमंडळ स्थापन करण्याची व जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात आली होती. एवढ्या गोष्टी सोडल्या तर सावंतवाडी संस्थानात सारे काही सुरळीत चालले होते.

## २.१५. जमखंडी संस्थानातील राजकीय घडामोडी :

दक्षिण महाराष्ट्रातील जामखंडी संस्थानची हद्द बेळगाव, धारवाड, सोलापूर, सातारा व अहमदनगर जिल्ह्यात विखुरलेली होती. संस्थानचे क्षेत्रफळ ५२४ चौ. मैलांचे होते, त्यात

बेळगाव जिल्ह्यातले जमखंडी, धारवाड जिल्ह्यातले कुंदगोळ, सातारा जिल्ह्यातील वाठार, सोलापूर जिल्ह्यातील पाठखळ व नगर जिल्ह्यातील ढवळपुरी यांचा समावेश होता. १९०१ साली संस्थानची लोकसंख्या १,०५,३५७ होती. १८५७ च्या बंडात सहभागी असल्याच्या संशयावरून इंग्रजांनी ज्यांना अटकेत ठेवले होते त्या रामचंद्रराव गोपाळराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धनांचे १८९७ साली निधन झाल्यानंतर दत्तकपुत्र परशुरामभाऊ रामचंद्रराव उर्फ भाऊसाहेब पटवर्धन (१८८३-१९२४) यांना वयाच्या विसाव्या वर्षी ४ जून १९०३ रोजी संस्थानच्या राज्यकारभाराची मुखत्यारी मिळाली. १९२४ पर्यंत त्यांची कारकीर्द होती. त्यांच्या कारकिर्दीत प्रजेची गाऱ्हाणी ऐकून घेण्याकरिता राजदरबार भरविण्याची प्रथा सुरू झाली होती. इतकेच नाही तर लोकसभेची स्थापना करून जनतेला राज्यकारभारावर टीका करण्याचाही अधिकार देण्यात आला होता. या राजाने जनहितासाठी अनेक उपक्रम सुरू केले होते. शेती-संवर्धनासाठी दरवर्षी जनावरांचे प्रदर्शन भरविणे, विनामोबदला पाण्याच्या सोई उपलब्ध करून देणे, गरीब विद्यार्थ्यांना माधुकरी देणे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे, वाचनालय चालविणे, मोठ्या शहरात दवाखाने काढणे, तरुणांसाठी ज्ञानसत्रे चालविणे, दुष्काळात सडका व तलावांची कामे काढून लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे इत्यादी उपक्रमांमुळे जनमानसात राजाची प्रतिमा उंचावलेली होती. राजाने त्यांच्या अमदानीत म्युनिसिपालिट्यांची स्थापना केली. त्यातून प्रजेला स्वराज्याचे धडे गिरवण्याची संधी प्राप्त झाली. २५ फेब्रुवारी १९२४ रोजी एका हत्तीला प्रशिक्षण देत असता त्या हत्तीने चिडून महाराजांवर हल्ला केला, त्यात ते मृत्यूमुखी पडले.

परशुराम भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर शंकरराव उर्फ अप्पासाहेब पटवर्धन यांनी १९ फेब्रुवारी १९४८ रोजी हे संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंत संस्थानाधिपती म्हणून राज्यकारभार पाहिला. 'प्रजेचे हित तेच आपले हित' हे राजनीतीचे सूत्र ठेवून त्यांनी काम केले. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर कण्याकरिता स्थायी स्वरूपाची उपाययोजना केली. पुण्याच्या 'न्यू कॉलेजास'एक लाखांचा निधी व वीस वर्षे दरसाल ५००० रुपये अनुदान देऊन 'सर परशुरामभाऊ कॉलेज असे नामांतर करून त्यांचे स्मारक निर्माण केले. या कॉलेजात संस्थानातल्या ५० विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

जमखंडी संस्थानांतील सुशिक्षितांनी 'वाचनवाटिका', 'विद्याभिरुचिवर्धक मंडळी' 'वक्तृत्वोत्तेजक सभा', 'वाचनमंदिर' यासारख्या सार्वजनिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला होता. या नवसुसिक्षितांमधूनच संस्थानात लोकचळवळ संघटित करण्यासाठी कार्यकर्त्यांची फळी तयार झाली. त्यात कलकत्त्याहून वैद्यकीय शिक्षणक्रम पूर्ण करून आलेले डॉ. दामोदर रामचंद्र हुल्याळकर, विठ्ठलराव फाटक, लक्ष्मण विष्णु परांजपे, यशवंत गणेश वाटवे, श्रीनिवास अनीखिंडी इत्यादी मंडळींचा समावेश होता. या मंडळीच्या पुढाकारातून १९१७ साली राजकीय लोकजागृतीसाठी 'लोकसभा' स्थापन झाली व पहिले अध्यक्ष म्हणून श्रीनिवास अनीखिंडी यांची निवड झाली. प्रतिवर्षी जून महिन्यात भरणाऱ्या दरबारात या लोकसभेतर्फे लोकांची गाऱ्हाणी मांडण्यात येत. गोवधबंदी, दारूबंदी, सरकारी कामात कानडीचा वापर, ब्रिटिश हद्दीच्या सापेक्ष

सारा आकारणे, अशा काही मागण्या या लोकसभेमार्फत करण्यात आल्या.

१९१८ पासून जमखंडी म्युनिसिपालिटीत निवडणुका घेण्यास संस्थानाधिपतींनी अनुमती दिली. २१ पैकी ११ सभासद लोकनियुक्त असण्याची तरतूद करण्यात आली. संस्थानातल्या सहाही म्युनिसिपालिट्यांत निवडणुका घेण्याचे तत्त्व लागू झाल्याने लोकशाही मूल्यचौकटीत काम करण्याची नवी संस्कृती आकार घेऊ लागली. संस्थानातल्या दहा मोठ्या खेड्यांत 'व्हिलेज सॅनिटरी कमिट्या' स्थापन करण्यात आल्या व स्वच्छता अभियान चालविण्यात आले. १९२० पासून खालसा मुलुखात गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलन सुरू होते, भाषावार प्रांतरचनेच्या चर्चा झडत होत्या, टिळकांच्या स्वराज्य फंडनिधी संकलनाची मोहिम सुरू होती. संस्थानातही ह्या राजकीय चळवळीचे वारे पोहचले होते. खालसा मुलखातील पुढारी, वक्ते, प्रवचनकार यांची संस्थानांतही वर्दळ सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर परवानगीशिवाय सार्वजनिक सभा घेण्यास संस्थानाकडून बंदिहुकूम जारी झाला. हा बंदिहुकूम मोडणाऱ्यास सहा महिने कैद अथवा दोनशे रुपये दंडाची शिक्षा होईल असे फर्मान निघाले. हे फर्मान रद्द करण्याची लोकसभेने मागणी केली. सार्वजनिक शांततेस धक्का पोहचेल अशा सभांसाठी केवळ हा बंदिहुकूम असल्याचा संस्थानातर्फे खुलासा करण्यात आल्याने सुतकताईसारख्या कॉंग्रेसच्या प्रचारास अडसर आला नाही.

पुण्याच्या दक्षिणी हितवर्धक सभेच्या सूचनेनुसार संस्थानात लोकसभेने १९२७ पासून 'प्रजापरिषद' स्थापन केली व तिची अधिवेशने होऊ लागली. ८-९ ऑगस्ट १९२७ रोजी न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले अधिवेशन जामखिंडी येथे झाले. राजा व प्रजा यांच्यात परस्पर सहाय्यक मनोवृत्ती वाढविण्यासाठी प्रजापरिषद आहे, ही भूमिका स्पष्ट करण्यात आली. प्रजेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रातिनिधिक सभा स्थापन करण्याची व जबाबदार राज्यपद्धती आणण्याची मागणी या परिषदेत करण्यात आली. प्रजापरिषदेची एकूण सात अधिवेशने झाली, ती अशी :

१. जमखिंडी : ८-९ ऑगस्ट १९२७ , अध्यक्ष : न. चिं. केळकर, पुणे.
२. चिकोडी : १३-१४ फेब्रुवारी १९२९ : अध्यक्ष : पंडिलापा रायपा, चिकोडी.
३. हुन्नूर : ८ फेब्रुवारी १९२९ : अध्यक्ष : श्रीनिवास कौजलगी, कर्नाटक
४. कुंदगोळ : २८-२९ जानेवारी १९३३ : अध्यक्ष : आ. विश्वनाथराव जोग, धारवाड.
५. सावळगी : २०-२१ मार्च १९३५ : अध्यक्ष : नारायणराव जोशी, बेळगाव.
६. सावशी (ता. कुंदगोळ):३०-३१मे १९३८: अध्यक्ष : अंदानेप्पा दोड्डमेट्टी, कर्नाटक.
७. जमखंडी : ३-४ जून १९३९ : अध्यक्ष : अंदानेप्पा दोड्डमेट्टी, कर्नाटक.

या सात अधिवेशनांत प्रामुख्याने पुढील विषयांवर चर्चा होऊन मागण्यांचे ठराव झाले :

१. म्युनिसिपालिट्यांत लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण वाढवावे.
२. सारावसुली करण्यापूर्वी पंचांमार्फत आणेवारी नक्की करावी
३. सारावाढ करू नये
४. मराठी, तेलुगू, उर्दू, गुजराती अशा कुठल्याही मातृभाषेतून येणाऱ्या अर्जांची दखल घेऊन

निवाडे करावेत
५. शेतकऱ्यांच्या शारीरिक, औद्योगिक व सांपत्तिक स्थितीची पहाणी करण्यासाठी समिती नेमावी. उद्योगधंद्याचे शिक्षण देणाऱ्या शाळा काढाव्यात.
६. स्वतंत्र हायकोर्ट स्थापन करावे.

संस्थानाने 'जबाबदार राज्यपद्धती'ची मागणी पूर्ण केली. स्वतंत्र हायकोर्ट बेंच स्थापन केले. १९३२ साली प्रातिनिधिक कायदेमंडळाचा कायदा केला व १९३३ साली निवडणुका होऊन १९३४ पासून विधिमंडळाचे कामकाज प्रत्यक्ष सुरू झाले. अर्थात विधिमंडळ स्थापन झाले तरी लोकप्रतिनिधी स्वतंत्र विचारदर्शन करून, दबावगट स्थापन करून, जनहिताची कामे करण्यास अद्याप सक्षम झालेले नव्हते; त्यामुळे संस्थानाधिपतींच्या कलानुसारच बरेच कामकाज होई. जनतेच्या मागण्या दरबाराकडून मान्य झाल्या नाहीत तर काय करावे, असा पेच लोकांना पडला होता. १९३८ साली सांवशी येथे अंदानेप्पा दोडमेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रजापरिषदेच्या ७ व्या अधिवेशनात याच्या प्रतिक्रिया उमटल्या. याच वर्षी सांगलीला सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दक्षिणी संस्थान लोकपरिषदेच्या अधिवेशनात रामदुर्ग व लक्ष्मेश्वर तालुक्यातील सत्याग्रह चळवळीची चर्चा झाली होती. स्वाभाविकच जमखिंड संस्थानातल्या शेतकऱ्यांना आपले प्रश्न धसास लाण्यासाठी प्रजापरिषदेच्या दबावाचा वापर होऊ शकतो याची जाणीव झाली. त्यामुळे सांवशीच्या सातव्या प्रजापरिषदेत सात आठ हजार लोक उपस्थित राहिले. या अधिवेशनात राज्यप्रशासनाविषयीच्या असंतोषाला वाचा फुटली. एकूण ४५ ठराव पारित करण्यात आले. त्यात ५० टक्के सारासूट देण्यात यावी, पिकांची आणेवारी पद्धत लागू करावी, संस्थानातल्या नोकरशाहीला लगाम घालणारी नियमव्यवस्था आणावी, सारावसुलीत शेतकऱ्यांची दुभती जनावरे घेऊन जाणे यासारख्या मनमानीला आळा घालावा, संस्थानच्या दप्तरी कामाजात कानडीला स्थान द्यावे इत्यादी मुद्यांचा समावेश होता. कायदेमंडळाची घटना लोकोपयोगी कामांच्या दृष्टीने निरुपयोगी असल्याने स्वाभिमानी लोकप्रतिनिधींनी कायदेमंडळाचे राजीनामे द्यावेत असे सभेत आवाहन करण्यात आले. त्यावर आठ सभासदांनी तेथल्या तेथे आपले राजीनामे सादर केले. या परिषदेची सकारात्मक दखल घेऊन राजेसाहेबांनी नंतरच्या राज्यारोहणदरबारात शेतसारा २५ टक्के कमी करण्याची व वनचराई माफ करण्याची घोषणा केली. काही गावातील सारावसुलीस तहकुबी देण्याचा निर्णय घेतला. मुंबई इलाख्याप्रमाणे आणेवारीची पद्धत लागू करण्याचे घोषित केले. सर्व म्युनिसिपालिटीत लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण ३/४ करण्यात आले. शिवाय पुढील सुधारणा कोणत्या असाव्यात यासाठी सरकारी व प्रजेचे प्रतिनिधी असलेली संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. लोकमताचा दबाव व लोकमताचा आदर करणारा राजा असल्यास परस्परसहमतीने प्रश्न सोडवता येतात याचा वस्तुपाठ या संस्थानातील राजकीय चळवळीने घालून दिला.

## २.१६. मुधोळ संस्थानातील राजकीय घडामोडी :

३६९ चौ. मैल क्षेत्रफळ असलेले मुधोळ संस्थान दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमेवर वसलेले होते. मुधोळ हे गाव कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यात आहे. १९०४ साली श्रीमंत मालोजीराव घोरपडे महाराज संस्थानाधिपती म्हणून गादीवर आले. १४ नोव्हेंबर १९३७ रोजी त्यांचा मृत्यू होईपर्यंत ३३ वर्षे त्यांची कारकीर्द राहिली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर राजा भैरवसिंहराव मालोजीराव घोरपडे (द्वितीय) यांनी ८ मार्च १९४८ रोजी मुधोळ संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले. श्रीमंत मालोजीराव महाराज यांना लोकशाही मूल्यांविषयी आस्था नव्हती; त्यांच्या एकूण कामकाजाच्या शैलीत दडपशाही वृत्ती प्रबळ असे. त्यामुळे मुधोळ संस्थानात अगदी कीर्तन-प्रवचनांपासून राजद्रोही सभांना बंदी असायची. १९२४ च्या बेळगाव काँग्रेसला गेलेल्या संस्थानातील काही नोकरांची त्यांनी नोकरीवरून हाकालपट्टी केली होती. वेदोक्त कबूल नसलेल्या ब्राह्मणांवर राजद्रोहाचा खटला भरला होता. खादीप्रसाराचे काम करीत असलेल्या हणमंतराव कौजलगी यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. १९३२ पासून 'संस्थानी स्वराज्य' या पत्रातून संस्थानातल्या दडपशाहीचा बुरखा फाडणारी निनावी लेखमाला प्रसिद्ध करीत असल्याच्या संशयावरून श्री. मसुरकर व श्री. विठ्ठलचंद यांच्यावर खटला भरण्यात आला व दोन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

अशा दडपशाहीच्या वातावरणात जबाबदार राज्यप्रशासनाचा आग्रह धरणाऱ्या प्रजापरिषदेच्या कार्यास अनुकूलता नव्हती. मालोजीराव महाराजांच्या मृत्यूनंतर १८ एप्रिल १९४० ला प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन तेथे होऊ शकले. इतर संस्थानांप्रमाणे मुधोळ संस्थानानेही १९३० साली प्रातिनिधिक सभा स्थापन करण्याचा उपचार केला होता; मात्र महाराजांनी या सभेला काम करायला काही अवसर दिला नाही. मुधोळ नगरपालिकेत लोकनियुक्त अध्यक्ष श्री. मसुरकर यांनी जनहिताचे निर्णय घ्यायला सुरुवात केली होती. गरिबांना लागणाऱ्या दैनंदिन जीवनातील वस्तूंवरील कर कमी करून चैनीच्या वस्तूंवरचा करभार वाढवून नगरपालिकेच्या उत्पनात वाढ केली. ड्रेनेज, रस्ते यांची कामे काढली. मात्र महाराजांनी पुन्हा नगरपालिका दिवाणांच्या हुकमतीखाली चालविण्याचा निर्णय घेतला व लोककेंद्री राज्यकारभाराच्या दिशेने जाऊ पाहणारा मुधोळच्या नागरिकांचा प्रवास रोखला.

संस्थानाबाहेर सुरू असलेल्या काँग्रेस चळवळीकरिता मुधोळ संस्थानातील काही कार्यकर्त्यांनी मुष्टीफंड, पैसा फंड जमा करण्यासाठी पुढाकार घेतला होता. १९१६ साली *'यंग मेन्स आसोशिएशन'* स्थापन झाली, पण या तरुण मंडळीने सुट्टीच्या काळात नाटके बसवण्यावर समाधान मानले. *'मराठा ब्रदरहुड'* स्थापन झाली. त्यांनी रात्रशाळा चालवून प्रौढ शिक्षणाचे काम काही काळ केले. हणमंतराव कौजलगी यांनी वकिली सोडून खादीच्या प्रसाराला वाहून घेतले. मात्र हणमंतरावांना त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. विजापूर कोर्टाने सांगूनही त्यांनी दोन वेळा कोर्टात गांधी टोपी काढण्यास नकार दिल्याने प्रत्येक वेळेस २०० रुपयांप्रमाणे ४०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या घटनेमुळे काही तरुण वकिलांनी गांधी टोपी घालून जाण्याचे सत्र पुढे चालू ठेवले व स्वेच्छेने तुरुंगवास पत्करला. १९३० साली महाराजांनी थोडी

अनुकूलता दाखविल्यावर कौजलगी व मसुरकरांनी राजास सूत व खादीच्या प्रसारासाठी एक विधायक योजना सुचविली, त्यास राजाने मान्यता दिली. या कामासाठी कुठलेही भाडे न आकारता एक इमारत उपलब्ध करून दिली, बिनव्याजी ४ हजार रुपयांचे भांडवल व प्रत्येकी १० रुपयांचे १२५ समभाग खरेदी करून खादीउद्योगात भागीदारी पत्करली, शिवाय वर्षभराकरिता मासिक ७५ रुपये मेहनतान्यावर एका तज्ज्ञ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद केली. या संधीचा फायदा घेऊन चरखासंघ व खादीसंघाने आपले काम सुरू केले. मुधोळखेरीज महालिंगपूर येथेही एक शाखा उघडली. बायकांना सूतकताईचे काम मिळाले, शिवाय बेकारांना खादी विणणे, रंगविणे, छापविणे अशी कामे मिळू लागली. १९३७ साली ९ सप्टेंबरला श्रीमंत मालोजीराव महाराजांनी अचानक साक्षात्कार झाल्यासारखा आपला राजसंन्यासाचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर पाचच दिवसांनी १४ नोव्हेंबर १९३७ रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. सज्ञान वारस नसल्यामुळे संस्थानात प्रशासकीय राजवट सुरू झाली.

श्रीमंत मालोजीराव महाराजांच्या मृत्यूनंतर मसुरकरांनी खादीग्रामोद्योगाच्या कार्याचे पुनरुज्जीवन केले. शेतकऱ्यांनी अवाजवी सारा भरू नये म्हणून संघटना बांधली. रेसिडेंटने सारा न भरणाऱ्या शेतकऱ्यांवर जप्त्या आणल्या, तरी चळवळ थंडावली नाही. अखेर लोकमताचा दबाव लक्षात घेऊन रेसिडेंटने जप्त्या थांबवल्या. १ ऑगस्ट १९३८ रोजी साराकपातीचा निर्णय जाहीर केला व पाठोपाठ पिकांच्या आणेवारीच्या तत्त्वासही मान्यता दिली. याचवेळी दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे सांगलीला वल्लभभाई पटेल यांचे अधिवेशन जाहीर झाले, त्या वातावरणाचा फायदा घेऊन मुधोळ संस्थानात *'लोकसभा'* स्थापन करण्यात आली व खेडोपाडी त्याच्या शाखा उघडण्यात आल्या. पूर्वस्थापित रयत असेंब्लीचे अध्यक्ष श्री. गदगद वकील यांच्याविरोधात अविश्वासाचा ठराव आणून लोकांना मान्य असणाऱ्या श्री. सोन्नद यांची नवे अध्यक्ष म्हणून नेमणूक घडवून आणली. काही मंडळींनी या लोकसंघटनेला विरोध करण्यासाठी 'शेतकरी संघ' स्थापून पर्याय उभा करण्याचा प्रयत्न केला. पण धुरंधर नेत्यांनी विरोधकांचे मन वळवून शेतकरी संघ विसर्जित करायला लावला आणि लोकसभा व शेतकरी संघ मिळून १९३८ साली नवीन 'प्रजासंघ' स्थापन केला. १८ एप्रिल १९४० रोजी मुधोळ संस्थानच्या प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशनही घेण्यात आले. डॉ. देसाई यांच्या पुढाकाराने टिळक पुण्यतिथी, गांधी सप्ताह, स्वातंत्र्यदिन अशा प्रकारचे कार्यक्रम होत राहिले व काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीला अनुरूप अशा लोकधारणा जागविण्याच्या कामाला गती मिळाली.

## २.१७. संस्थानांचे विलीनीकरण :

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनानंतर भारतीय स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात येऊ लागल्यावर संस्थानांच्या राजकीय भविष्याच्या चर्चा सुरू झाल्या. भविष्यकालीन राजकीय पटलावर लहान संस्थानांना स्वबळावर आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवण्याबाबत शंका निर्माण झाल्याने छोट्या संस्थानांचा संघ स्थापन करण्याचा पर्याय पुढे आला. न. चिं. केळकर यांनीही संस्थानांचा संघ

स्थापन करण्याच्या पर्यायाचा पुरस्कार केला होता; मात्र संस्थानांच्या संघराज्याने प्रजास्वातंत्र्य दिले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. 'केसरी'तील 'दक्षिणी संस्थानांचा संघ?' या लेखात त्यांनी म्हटले होते की, "प्रजेला पूर्ण स्वराज्य दिल्याशिवाय जर त्यांनी नुसता संघ बनविला तर प्रजापक्ष त्याकडे साशंक वृत्तीनेच पाहणार. शंका ही की, संस्थानिक संघ करणार तो स्वत: बलसंपन्न होण्याकरिता करणार! आधी संघ करू व मग पूर्ण स्वराज्य देऊ, या म्हणण्यात प्रजेला कपट दिसते. म्हणून मला असे वाटते की, संघराज्याची जी योजना तयार होईल तीतच संपूर्ण स्वराज्याचे स्पष्ट कलम घालावे, व दोन्ही एकदमच प्रकट करावी." (केसरी, २४ सप्टेंबर १९४६, केळकर १९५०, पृ.२५२-२५३) ह्या पार्श्वभूमीवर प्रजापरिषदा व संस्थानिक यांच्यात काय घडामोडी झाल्या त्याचा साररूपाने आढावा घेऊ.

१९४२च्या डिसेंबर महिन्यात सांगलीस दक्षिणी संस्थानातील कार्यकर्त्यांचे अनंतराव साबडे यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन झाले. दक्षिणी संस्थानातील लोकपक्षीय मंत्र्यांनाही या संमेलनासाठी आमंत्रित केले होते. संमेलनात प्रामुख्याने राजकीय सुधारणांच्या स्वरूपावर चर्चा झाल्या. संस्थानांतील उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्यामुळे जबाबदार राज्यपद्धतीचे शिवधनुष्य सर्वच संस्थानांना किलपत पेलवेल याविषयी शंका असल्याने दक्षिणी संस्थानांचा संघ (फेडरेशन) स्थापन करण्याचा पर्याय पुढे आला. या प्रस्तावित संघाचे स्वरूप व कार्यपद्धती ठरविण्याकरिता अनंत वासुदेव साबडे, दादासाहेब खाडिलकर, ए. जी. गानू, एच. जी. टिळक, वि. अ. पटवर्धन यांची समिती नेमण्यात आली. या समितीची ३० मे१९४३ रोजी बैठक होऊन दक्षिणी संस्थानच्या संघराज्याची योजना व फेडरेशनचा पहिला प्रयोग म्हणून सामाईक उच्च न्यायालय स्थापन करण्याचाही ठराव पारित करण्यात आला. (पटवर्धन, वि. अ. १९४३)

३ मे १९४३ रोजी जमखंडी येथे अनंत वासुदेव साबडे यांच्या नेतृत्वाखाली 'दक्षिण संस्थान लोकपरिषदे'चे १३ वे अधिवेशन झाले. या अधिवेशनास १५ संस्थानांतून एक हजाराहून अधिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. औंधचे अप्पासाहेब पंत, फलटणचे ना. भोसले, सांगलीचे ना. कोरे, कोल्हापूरचे आप्पा महाराज पंडित, इचलकरंजीचे साठ्ये, कुरुंदवाडचे गानू, ग्वाल्हेरचे मसुरकर, इत्यादी अनेक मान्यवर सहभागी झाले होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर बदललेल्या राजकीय पार्श्वभूमीवर संस्थानातल्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने आंदोलनात पुढे राहिले पाहिजे, यावर सर्वांचे एकमत झाले. संस्थानांचे संघराज्य स्थापन करण्याविषयीही अनुकूल वातावरण तयार झाले. कोल्हापूर, जत, औंध, फलटण, मिरज, सावंतवाडी, कुरुंदवाड व भोर या ९ संस्थानांचे सामाईक उच्च न्यायालय कोल्हापूर येथे स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व १ मार्च १९४६ रोजी कोल्हापूरचे सामाईक उच्च न्यायालय अस्तित्वात आले. (पटवर्धन १९६६, पृ. ५८)

१९४५ ला दुसरे महायुद्ध संपल्यावर भारताला लवकरच स्वातंत्र्य मिळेल अशी चिन्हे दिसू लागल्यावर संस्थानातील राजकीय वारे बदलू लागले. संस्थानांचे संघराज्य स्थापन करण्याऐवजी संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन करावीत यासाठी अनंतराव साबडे यांनी स्वत:च पुढाकार घेऊन विलीनीकरणासाठी जनजागृतीची चळवळ सुरू केली. २६ डिसेंबर

१९४५ रोजी सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या अधिवेशात सांगली संस्थान खालसा मुलुखात विलीन करण्यात यावे अशा आशयाचा ठराव पारित करण्यात आला. पाठोपाठ मुधोळच्या प्रजापरिषदेनेही असाच ठराव पारित केला. (पटवर्धन, वि. अ. १९६६)

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व त्याच दिवशी ब्रिटिश सरकारने संस्थानांना त्यांचे सार्वभौमत्व प्रदान केले. त्यानंतर १७ ऑक्टोबर १९४७ रोजी औंध, भोर, फलटण, मिरज, मिरजमळा, सांगली, कुरुंदवाड व रामदुर्ग या आठ संस्थानांचे संघराज्य स्थापन झाले. आठही संस्थानांच्या संस्थानाधिपतींनी करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करून औंधचे भवानराव पंतप्रतिनिधी यांची दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याचे राज्यप्रमुख म्हणून निवड केली. २० ऑक्टोबर १९४७ रोजी मिरज येथे दक्षिणी संस्थान संघराज्याच्या घटना समितीची बैठक झाली. कमलनयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ झाला. घटनासमितीचे अध्यक्ष म्हणून बॅ. आप्पासाहेब पंत यांची निवड झाली. तसेच संघराज्याच्या मुख्यमंत्रीपदी श्री. बाळासाहेब कोरे यांची निवड करण्यात आली.

संस्थानांच्या संघराज्याची कल्पना मात्र बऱ्याच जणांना पसंत नव्हती. त्याऐवजी भारतीय संघराज्यात संस्थानांचे विलीनीकरण व्हावे, या मताचा पुरस्कार करणाऱ्यांची संख्या अधिक होती. जमखिंडीच्या राजेसाहेबांनी तर स्वतंत्र भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना पत्र लिहून आपण आपले संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्यास तयार असल्याचे कळवून टाकले. दक्षिणी संस्थान संघराज्याच्या नव्या मंत्रिमंडळासही जनमताचा आदर करून आपणही आपले संघराज्य भारतीय संघराज्यात विलीन करावे असे वाटले. त्यामुळे २१ डिसेंबर १९४७ रोजी राजमंडळाच्या बैठकीत तशा आशयाचा ठराव पारित करण्यात आला व संघराज्याची घटना करीत बसण्यापेक्षा मुंबई प्रांतात विलीन होण्यास आपण अनुकूल असल्याचे जाहीर करण्यात आले. या निर्णयानंतर लगेच २१ डिसेंबर १९४७ ला रात्री ९ वाजता श्री. कमलनयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची सभा झाली. या सभेत राजमंडळाने आठ संस्थानांना मुंबई राज्यात विलीन होण्यास संमती दिल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारित झाला व विलीनीकरणाच्या ठरावाची कार्यवाही श्री. बाळासाहेब कोरे यांनी करावी असा ठराव करण्यात आला. (पटवर्धन, १९६६, पृ. ९१-९२)

त्यानंतर १९ फेब्रुवारी १९४८ रोजी अक्कलकोट, जत, फलटण, कुरुंदवाड (थोरली पाती, धाकटी पाती), सांगली, रामदुर्ग, मिरज, मिरज मळा, मुधोळ, सावनूर वाडी, औंध, भोर व जमखंडी या १५ संस्थानांच्या संस्थानाधिपतींनी मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांच्यासोबत विलीनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या केल्या. अशा प्रकारे दक्षिणी संस्थानांपैकी कोल्हापूर वगळता इतर सर्व संस्थाने मुंबई प्रांतात विलीन झाली. विलीन झालेल्या संस्थानांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यात भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकविण्यात येऊन संस्थानांच्या विलीनीकरणाची माहिती देण्यात आली. संस्थानिकांना १९४५-४६ या आर्थिक वर्षातील त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के तनखा खाजगी खर्चासाठी देण्याचेही करारात नमूद करण्यात आले.

### संस्थानांच्या विलीनीकरणाचा तपशील :

संस्थानांच्या विलीकरणाचे स्वरूप लक्षात यावे म्हणून येथे प्रातिनिधिक स्वरूपात सांगली संस्थानाच्या विलीनीकरणाचे ठळक तपशील नमूद करीत आहोत. १९ फेब्रुवारी १९४८ ला सांगलीचे राजे चिंतामणराव पटवर्धन (दुसरे) व भारत सरकारचे सचिव व्ही. पी. मेनन यांच्या स्वाक्षरीने मुंबईत पाच कलमी करार झाला. या करारनाम्यानुसार संस्थानाधिपतींना २ लाख ६२ हजार ६३९ रुपयांचा वार्षिक तनखा देण्याचे व राजा, राणी, राजमाता, युवराज, युवराज्ञींचे विलीनीकरणापूर्वीचे वैयक्तिक अधिकार, वारसाचे अधिकार संरक्षित राहातील असे मान्य करण्यात आले. संस्थानिकास खाजगी खर्चासाठी संस्थानाच्या उत्पन्नातून दरवर्षी विशिष्ट रक्कम देण्यात येईल व त्यावर कर आकारला जाणार नाही. खाजगी मालमत्तेचे अधिकारही संरक्षित असतील. या करारनाम्यानंतर ८ मार्च १९४८ रोजी मुंबई सरकारने व्ही ईश्वरन यांची सांगली प्रांताचे प्रशासक म्हणून नियुक्ती केली. चिंतामणराव पटवर्धन यांनी विलीनीकरणाच्या वेळी मुंबई प्रांताच्या विधानसभेवर मुसलमान समाजातील सय्यद अहमद अमीन व जैन समाजातील महिला सांगली शहर काँग्रेसच्या अध्यक्ष श्रीमती कळंत्रे यांची विधानसभेवर नियुक्ती केली. सांगली किल्ल्यात १९ ऑगस्ट १९४९ रोजी या दोन्ही आमदारांचा नागरी सत्कार सातारा जिल्हा काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

## २.१८. हैद्राबाद संस्थानातील राजकीय घडामोडी :

हैद्राबाद हे भारताच्या नाभीस्थानी असलेले आकाराने दुसरे व लोकसंख्येत पहिल्या क्रमांकाचे संस्थान होते. भौगोलिकदृष्ट्या हैद्राबाद संस्थानाच्या एका बाजूस मुंबई प्रांत, दुसऱ्या बाजूस मद्रास प्रांत आणि उत्तरेस मध्यप्रदेश अशी या संस्थानाची सीमा होती. एकूण क्षेत्रफळ ८२,३१३ चौ.मैल होते. लोकसंख्या १९४१ च्या जनगणनेनुसार १,६३,३८,५३४ होती. संस्थानांतर्गत हैद्राबाद, मेडक, बागत, महबूबनगर, निजामाबाद, नलगोंडा, वरंगल, करीमनगर व अलिदाबाद हे प्रदेश तेलुगू भाषक होते; क्षेत्रफळ ४१५०२ चौ.मैल व लोकसंख्या ८६,३५,१३१ होती. बिदर, रायचूर, गुलबर्गा ह्या कानडी भाषक प्रदेशाचे क्षेत्रफळ १३६०५ चौ.मैल व लोकसंख्या २३,३९,६५४ होती. औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, परभणी आणि नांदेड ह्या मराठी भाषक जिल्ह्यांचे क्षेत्रफळ २७,५९१ चौ.मैल व लोकसंख्या ५२,१९,५२८ होती. मराठी भाषक प्रदेशाचा निर्देश 'मराठवाडा' असा केला जातो. [४] हैद्राबाद संस्थानात १९०१ साली हिंदूंची लोकसंख्या ८८.६ टक्के व मुसलमानांची लोकसंख्या १०.४ टक्के होती; १९४१ साली हे प्रमाण हिंदू ८१.४ टक्के व मुसलमान १२.८ टक्के होते. शिक्षणाच्या दृष्टीने पाहिल्यास १९११ च्या आकडेवारीनुसार शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण हिंदूचे ३.८ टक्के व मुसलमानांचे १२.५ टक्के होते; १९४०-४१ मध्ये हे प्रमाण हिंदूचे १७.१ टक्के व मुसलमानांचे ७७.१ टक्के होते. संस्थानातील सरकारी नोकऱ्यांत १९४१ च्या आकडेवारीनुसार २३,३६८ हिंदू व १,१२,७३७ मुसलमान होते. या आकडेवारीवरून हिंदुबहूल लोकसंख्येच्या या संस्थानात राजकीय व आर्थिक लाभ मात्र मुसलमानांच्याच पदरात

अधिक पडत होते हे दिसून येते. (भालेराव, १९८७, पृ. ९-११)

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात १८६९ ते १९११ या कालखंडात ६ वा निझाम उस्मान अली खान याची राजवट होती. त्याच्या कारकिर्दीत १९०१ साली महाराजा किशनप्रसाद हे दिवाण होते. त्यानंतर १९११-१९४८ या कालखंडात ७ वा निझाम मीर उस्मान अली खान राजा होता; तो कट्टर मुस्लीम धर्माभिमानी होता. त्याने गादीवर येताच हिंदू दिवाण महाराजा किशनप्रसाद यांना हटवून तिसरा सालरजंग याची दिवाणपदी नेमणूक केली. इंग्रजांना पहिल्या महायुद्धात या निझामाने लष्करी व अर्थसाहाय्य पुरवले होते. निझामच्या फौजा इंग्रजांच्या वतीने तुर्कस्थानच्या मुसलमानांविरूद्ध लढल्या होत्या. या त्याच्या सहकार्यामुळे १९१८ साली बादशहा पंचम जॉर्जने उस्मान अली खानला 'हिज एक्झॉल्टेड हायनेस' किताब देऊन गौरव केला होता. १९१९ ते १९२२ या काळात निझामाने सर अली इमाम यास आणि १९२२ ते १९२५ या काळासाठी नबाब सर फरिदुनमुल्क व नबाब वली उद्दौला यांना दिवाणपदी बसविले. १९२५ ते १९३७ पर्यंत पुन्हा एकदा महाराजा किशनप्रसाद यांनी पंतप्रधानपदाची म्हणजेच दिवाणपदाची धुरा सांभाळली. १९३७ साली सर अकबर हैदरी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. समग्र भारताच्या राजकीय क्षेत्रविस्तारात लष्करी व्यूहरचनेच्या दृष्टिकोनातून हैद्राबाद संस्थान हे इंग्रजी साम्राज्याच्या लेखी 'गुरुत्वाकर्षणाचे मध्यवर्ती केंद्र' होते. हिंदुबहुल दाक्षिणात्य प्रदेश व मुस्लिम प्रभावक्षेत्रातील उत्तरेचा मुलुख यांना दुभागणारा प्रदेश म्हणून ब्रिटिश शासन हैद्राबाद संस्थानकडे पहात असे. १९२६ साली विलियम वार्टन या हैद्राबदच्या रेसिडेंटने स्वत:च हैद्राबादच्या राजकीय स्थानाविषयीचा हा दृष्टिकोन नोंदवलेला आहे. [५]

हैद्राबाद संस्थान आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच हैद्राबाद संस्थानात रेल्वेमार्ग टाकण्यात आले होते. १८६८ साली मुंबई-मद्रास मार्ग गुलबर्गा- वाडीपर्यंत सुरू झाला होता; १९०० साली 'गोदावरी व्हॅली रेल्वे' हा मनमाड-हैद्राबाद मीटरगेज मार्ग अस्तित्वात होता. १९२७ साली काझीपेठ-बल्लारशहा रेल्वेमार्ग बिदरला जोडण्यात आला. १९३१ साली मुदखेड-अलिदाबाद रेल्वे मार्ग सुरू झाला. हैद्राबाद संस्थानचे स्वत:चे चलन होते. १८५५ साली हैद्राबाद स्टेट बँक सुरू झाली होती. शिवाय संस्थानात खाजगी सावकारीही चालत होती. संस्थानांतर्गत मराठवाड्यात २,५८१ मुसलमान सावकार आणि १४२९ मारवाडी सावकार होते. हैद्राबाद संस्थानची इराण, द. आफ्रिका, स्वित्झर्लंडला ५० कोटींची भांडवल गुंतवणूक होती. (नरवडे, १९८५, पृ.३) हैद्राबाद संस्थानच्या एकूण भूप्रदेशापैकी ४२ टक्के भूप्रदेश जहागिरदारांच्या अखत्यारित होता. लहान-मोठ्या जाहागिरदारांची संख्या ११६७ होती. त्यात १९ जहागिरदारांचे वार्षिक उत्पन्न एक लाखाहून अधिक होते; ५० हजारांच्यावर उत्पन्न असलेले १५ जहागीरदार होते; २५ हजाराहून अधिक उत्पन्न असलेले ४४; १० हजाराहून अधिक उत्पन्न असलेले १०९ व इतर १००० जहागीरदार होते. हे सर्व जहागीरदार राजनिष्ठ होते. (भालेराव, १९८७, पृ. १२)

**धार्मिक-राजकीय गुंता :**

हैद्राबाद संस्थानात हिंदूंची लोकसंख्या ८८.६ टक्के असली तरी राजसत्ता मुसलमानांची असल्याने संस्थानातील समग्र लोकजीवनावर मुस्लीम धर्मसत्तेचा पगडा होता. शासनाधिकाराच्या जागांवर मुसलमानांचाच भरणा होता. लोकजीवनाच्या सर्व नाड्या अल्पसंख्यांक मुस्लीम राजसत्तेच्या हाती गेल्या होत्या. शिवाय मुसलमान सर्रास हत्यारे बाळगू शकत असे व त्यांचा उपयोगही करू शकत असत. स्वामी रामानंद तीर्थ (१९०३-१९७२) यांनी त्यांच्या हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या आठवणी लिहिताना ही पार्श्वभूमी विशद केली आहे. निजाम राजवटीत मुसलमान असणे हेच विशेषाधिकाराचे द्योतक होते. मुस्लीमेतर म्हणजे कुणीतरी पददलित! मुसलमान हा धनी तर हिंदु हा गुलाम! सामाजिक जीवनावरही याच भावनेची छाया पसरलेली होती. हिंदूंचे प्रत्येक सार्वजनिक कार्य संशयास्पदच समजले जाई. साहित्यिक कार्यही राजकीय समजले जाई. कोणताही कार्यक्रम करावयाचा झाल्यास सरकारची परवानगी घेणे आवश्यक होते. हिंदूंच्या विरुद्ध कायद्याचा अंमल होई, पण मुसलमान मात्र सरकारच्या खास मर्जीतले अशी परिस्थिती होती. एखाद्या धार्मिक मिरवणुकीवर सरकारने बंदी घातली की, लोक प्रतिकार करीत अन् त्यातून जातीय दंगली होत. त्यात हिंदूंनाच त्रास व्हायचा. पुढे या सरकारी जुलुमाच्या प्रतिकाराला धार्मिक स्वरूप प्राप्त झाले. त्यातून जनतेचा पक्ष घेऊन लढणाऱ्यांत आर्य समाज आघाडीवर होता. प्रत्यक्षात सरकारने चोहोबाजूकडून चालविलेल्या जुलुमाची ती प्रतिक्रिया होती, तरी ती सर्व धार्मिक जागृतीच होती. (तीर्थ रामानंद, १९७६, पृ. ६४-६५)

**सोशल सर्व्हिस लीग:**

राजकीय चळवळीला फारसा वाव नसल्याने हैद्राबाद संस्थानात सुरुवातीला सामाजिक सुधारणेच्या चळवळी सुरू झाल्या. १९१३ साली रायबाल मुकुंद यांनी 'ह्युमॅनिटेरियन लीग' स्थापन केली. भाग्य रेड्डी यांच्या पुढाकारातून दलितोद्धाराचे कार्य सुरु केले. या कार्यात न्या. केशवराव कोरटकर, वामनराव नाईक सहभागी झाले. १९१५ साली हैद्राबादला सोशल लीग सर्व्हिस स्थापन झाली. या संस्थेच्या वतीने विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात सामाजिक सुधारणा अधिवेशने झाली. पहिले अधिवेशन सदानंद महाराज यांच्या अध्यक्षतेखाली १९१८ साली कवाना, ता. हदगाव, जि. नांदेड येथे झाले; दुसरे अधिवेशन १९१९ साली न्या. केशवराव कोरटकर यांच्या अध्यक्षतेखाली हदगाव येथे झाले; १९२० साली तिसरे अधिवेशन नांदेड येथे वामनराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अहिताग्नी राजवाडेही या अधिवेशनाला उपस्थित होते. १९२१ साली चौथे अधिवेशन हैद्राबाद येथे महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. पाचवे अधिवेशन गुलबर्ग्याला बॅ. मुकुंदराव जयकर व सहावे अधिवेशन १९२३ साली हैद्राबाद येथे श्रीमती सरलाबाई चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनात अहिल्याबाई मल्लण्णा यांनी भारतीय महिला विद्यापीठाच्या धर्तीवर कन्या विद्यालय स्थापन करण्याचा ठराव मांडला व या ठरावास पार्वतीबाई आठवले, काशीबाई किर्लोस्कर यांनी अनुमोदन दिले होते. अधिवेशनातले चर्चाविषय

सामान्यत: असे असत :

१. निजाम सरकारने जाहीर केलेल्या सुधारणांचे स्वागत

२. हुंडाबंदी, मुलींचा विक्रय करण्यावर बंदी, विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह

३. स्त्रीशिक्षण

४. मद्यपान निषेध

५. सक्तीचे व मोफत शिक्षण

६. धर्मांतरापासून परावृत्त करणे.

**राजकीय संघर्षाची पार्श्वभूमी :**

विसाव्या शतकातील हैद्राबाद संस्थानातील मुक्तिसंग्रामाचा परामर्श घेण्यापूर्वी १९ व्या शतकातील हैद्राबाद संस्थानातल्या काही ठळक राजकीय घटना लक्षात घेणे आवश्यक आहे. १९ व्या शतकात निजाम शासनाच्या विरोधात जे सशस्त्र उठाव झाले त्याची संक्षिप्त नोंद अशी : १८१८ साली मराठवाड्यात बंड झाले. नांदेडच्या बंडात ४३९ बंडखोरांना वीरमरण आले. बंडाचे पुढारी हाटकर नायक व नौसाजी नाईक यांचाही त्यात समावेश होता. याच वर्षी बीडला धर्माजी प्रतापराव यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाला.निजामच्या सैनिकांनी बंडवाल्यांवर शस्त्र उचलण्यास नकार दिला. १८२२ साली औरंगाबादच्या भिल्लांनी चील नाईक व कोनार रावच्या नेतृत्वाखाली बंड केले. बंडखोर चील नाईकला फाशी देण्यात आले. १८५७ साली अजिंठा, वसमत, लातूर येथे इंग्रज फौजा व बंडखोरात संघर्ष झाला. जमादार छेडान, मीर फीदाअली, तुरेबाजखान, हे बंडाचे पुढारी होते. १८९८ साली बीड जिल्ह्यात मांग व कैकाडींनी बंड केले. बंडात सहभागी झालेल्या चुडिया धेड, मागीया मांग, येशा धेड यांना शिक्षा झाल्या. १९ व्या शतकाच्या अखेरीस हैद्राबाद संस्थानात लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने हैद्राबाद, व औरंगाबाद येथे गणेशोत्सव सुरू झाला.

विसाव्या शतकात १९११ साली मीर उस्मान अली गादीवर आला. त्याचे राजकारण मुस्लीमधार्जिणे होते. हिंदूंची सांस्कृतिक कोंडी करण्याची कोणतीच संधी तो सोडत नसे. आपल्या अर्थसंकल्पाची आखणी करतानाही हा विचार त्याने कायम ठेवला होता. हिंदूंना धर्मांतराच्या कार्यक्रमांद्वारे मुसलमान होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्याने आपल्या अर्थसंकल्पात वार्षिक २० लाख रुपयांची तरतूद केली होती. हिंदू लोकांच्या सामाजिक-धार्मिक कार्यक्रमांना वाव मिळू नये यासाठी त्याने भाषणे, मिरवणुका व भजनी मंडळांवर बंदी आणली होती. राजकीय संघटना स्थापन करण्यावरही बंदी होती. दरम्यानच्या काळात खिलाफत कमिटी स्थापना झाली, तीवरही बंदी आणली. १९२१ साली निजाम सरकारने 'गश्ती निशान ५२' व १९२९ साली 'गश्ती निशान ५३' नामक वटहुकूम काढून संस्थानातील जनतेच्या प्राथमिक नागरी हक्कांवर बंधने आणली. नवी मंदिरे बांधण्यावर व जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यावर बंदी आणली. विद्यार्थी-शिक्षकांच्या हालचालींवर नजर ठेवण्यात येऊ लागली. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली. १९२३ साली राघवेंद्रराव शर्मा यांनी कर्नाटकातील एका परिषदेत हैद्राबाद सरकारवर टीका केली म्हणून त्यांची वकिलीची सनद रद्द

केली. आर्य समाजाने व हिंदू महासभेने सरकारच्या धर्मांध व जातीय आक्रमणाचा जोरदार प्रतिकार केला. आर्य समाजाच्या १२,००० लोकांना अटक झाली.

**आर्य समाजाची कामगिरी :**

निझाम राजवटीतल्या धर्मांधतेविरुद्ध निकराचा लढा सर्वप्रथम आर्य समाजाने सुरू केला. हैद्राबाद संस्थानात १९ व्या शतकाच्याअखेरीस धारूर व हैद्राबाद येथे आर्य समाजाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात संस्थानाच्या विविध भागात आर्य समाजाच्या शाखा उघडण्यात आल्या. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून हैद्राबाद संस्थानात निरनिराळ्या गावात गणेश संघ स्थापन करून गणेशोत्सव साजरे केले जाऊ लागले. गणेशोत्सवात व्याख्याने, प्रवचने होऊ लागली. या व्याख्यानातल्या राजकीय आशयावर आक्षेप येऊन अनेकांना आपली वकिलीची सनद गमवावी लागली व राजद्रोहाच्या खटल्यांना सामोरे जावे लागले. निजाम राजवटीतील कायदेशीर बंधनांवर मात करून आर्य समाजाने गणेशोत्सवाखेरीज व्यायामशाळा, मंदिरे, वाचनालये असे वेगळे उपक्रम सुरू केले. अघोरनाथ चट्टोपाध्याय, केशवराव कोरटकर व श्रीपाद सातवळेकर यांच्या नेतृत्वाखाली ही वाटचाल सुरू होती.१९३१ साली आर्य समाजाच्या संस्थानात २५/३० शाखा होत्या, १९४१ पर्यंत त्यांची संख्या २४१ पर्यंत पोहचली होती. विशेषत: मराठवाड्यातील नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्यात आर्य समाजाच्या संघटनात्मक कार्याची घनता अधिक होती.

आर्य समाजाने नागरी हक्कांपेक्षा हिंदूंच्या धार्मिक हक्क रक्षणासाठी भरपूर काम केले. या धार्मिक संघर्षासाठी 'वीर दला'ची स्थापना करण्यात आली होती. १९३२ च्या सुमारास हैद्राबाद संस्थानात हिंदूंना बळजबरीने मुसलमान बनविणाऱ्या धर्मांतर चळवळीला जोर चढला होता. उस्मानाबादच्या गुंजोटी गावच्या वेदप्रकाशवर धर्मांतराची सक्ती करण्यात आली व त्याच्यापुढे धर्मांतर किंवा मृत्यू यापैकी एक पर्याय निवडण्याचे बंधन घातले. वेदप्रकाशने मृत्यूच्या पर्यायाला संमती दिल्यावर त्याचा खून करण्यात आला. कल्याणी नामक गावातील नागप्पाचाही अशाच पद्धतीने बळी गेला. उद्गीरला माणिकराव व भीमराव या आर्यसमाजी मित्रांवर खूनी हल्ला झाला व त्या दोघांना ठार करण्यात आले. आर्य समाजाकडून या धर्मांतर चळवळीचा व क्रौर्याचा निषेध करण्यात आला. आर्य समाजींकडून झालेल्या प्रतिकारात अनेक कार्यकर्त्यांना प्राणही गमवावे लागले.

२ डिसेंबर १९३४ रोजी हैद्राबादला निझाम सरकारच्या दडपशाहीविरुद्ध सत्याग्रह करण्यात आला. हैद्राबादच्या 'रहबरे दक्कन' या नियतकालिकातून हिंदूंना डिवचणारे व मुस्लीम संप्रदायाची भलावण करणारे लेख आक्रमकपणे प्रसिद्ध केले जात असत. मुस्लीम संप्रदायाच्या या प्रचार मोहिमेचा प्रतिवाद करण्यासाठी ७ डिसेंबर १९३४ रोजी हैद्राबादहून पं. नरेंद्रजी यांच्या संपादकत्वाखाली 'वैदिक आदर्श' हे साप्ताहिक सुरू करण्यात आले. या प्रतिवादामुळे निझाम सरकारने 'वैदिक आदर्श'वर बंदी आणली. ही बंदी आल्यानंतर संस्थानाबाहेर सोलापूरहून हे नियतकालिक सुरू ठेवण्यात आले. 'सत्यार्थ प्रकाश' हा आर्य समाजाचा धर्मग्रंथ जवळ बाळगणे हा गुन्हा ठरविण्यात आला. ११ ऑक्टोबर १९३६ रोजी पं. रामचंद्रसिंह

यांच्याकडील सत्यार्थ प्रकाशची प्रत सब इन्स्पेक्टर मोहमद मस्तान यांनी जप्त केली. आर्य समाजाच्या धर्मोपदेशकांना अटक करण्याचे सत्र सुरू झाले. जालना आर्य समाजाचे मंत्री श्री. मांगीलाल यांनी विनापरवानगी गोपीनाथ मंदिरात धर्मोपदेश केला यासाठी त्यांना तीन महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. निलंगा आर्य समाजात पं. नरेंद्रजी यांनी 'कुराण मे तजल्ली ए वेद' या विषयावर भाषण दिले, त्यामुळे मुसलमानांच्या भावना दुखावल्या गेल्याचे कारण देऊन त्यांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. १९३७ साली उस्मानाबाद जिल्ह्यातील उजनीच्या ३२, मुरूमच्या ३४, तुळजापूरच्या ३५ गुंजोटीच्या २१ आणि कासार शिसवीच्या ९ आर्यसमाजींवर खोटे खटले दाखल करण्यात आले. आर्य समाजी कार्यकर्त्यांचे खून करण्याचेही सत्र सुरू झाले. २४ जून १९३८ रोजी कल्याणीचे धर्म प्रकाश यांचा, १७ जून १९३८ रोजी अंबुला येथे महादेवजी यांचा, १६ डिसेंबर १९३८ ला बिदरच्या कारागृहात पं. श्यामलालजींचा, २ ऑगस्ट १९३९ ला राधाकृष्ण मारवाडी यांचा खून करण्यात आला. इत्तेहादुल मुस्लिमीन संघटनेने जातीय दंगली घडवून आणल्या. (पं. नरदेवजी स्नेही/ काळे भगवान, १९८६, पृ. २९०-२९५)

बीदरचे कलेक्टर मिर्झा महमद यांनी १९३५ साली मराठवाड्यातील निलंगा येथील आर्यसमाज मंदिर व हवनकुंड पाडून टाकले. त्याची तीव्र प्रतिक्रिया संस्थानातील कानाकोपऱ्यातून उमटू लागली. लोकांमधील ही संतापाची लाट थोपवण्यासाठी गृहखात्याचे सचिव नबाब झूल कुदर यांनी हे मंदिर व हवनकुंड आपल्या पैशातून बांधून देण्याचा आदेश स्थानिक तालुकदाराला दिला. मात्र त्याच्या जोडीने २६ जानेवारी १९३८ रोजी निजाम शासनाच्या गृहखात्याने परवानगीशिवाय आर्यसमाजमंदिरे व हवनकुंड बांधण्यास मनाई करणारा हुकूम काढला. (परिपत्रक क्र. ३७६/१९३८) या प्रकारांमुळे जेरीस आलेल्या आर्य समाजाने १९३८ साली सत्याग्रहाचे पर्व सुरू केले. २७ ऑक्टोबर १९३८ रोजी आर्यन डिफेन्स लीगच्या वतीने देवीलाल व त्यांच्या पाच सहकाऱ्यांनी सत्याग्रह केला, त्यात या सर्वांना अटक झाली व जबर शिक्षा ठोठावण्यात आली. दरम्यान सोलापूरला लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा.आर्यन काँग्रेसचे अधिवेशन झाले, तेथे २२,००० लोकांनी सत्याग्रहासाठी नावे नोंदवली. बापूसाहेब अणे यांनी हैद्राबादचे तत्कालीन पंतप्रधान सर अकबर हैदरी यांना १४ मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यात आर्य समाजाचा निजाम सरकारशी राजकीय तंटा नसून धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याच्या हक्कासाठी आग्रह असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. सोलापूरच्या अधिवेशनात तसा सुस्पष्ट ठरावही करण्यात आला होता. त्या ठरावात म्हटले होते की, "there is a clear and unequivocal declaration that the present of Arya Samaj in Hyderabad is neither political nor communal; but is simply confined to the attainment of religious and cultural liberty." (M.R. Joshi files, Swami Ramanand Tirth Research Institute, Aurangabad / भालेराव १९८७, पृ. १४९)

आर्य समाजाच्या मागण्यांचा गोषवारा असा :

१.धार्मिक विधी व समारंभ करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

२.धार्मिक प्रवचने, कथा-कीर्तने, निरुपणे, व्याख्याने, मिरवणुका, वैदिक धर्म व संस्कृतीविषयक वाङ्मय प्रसिद्ध करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

३.आर्यसमाज मंदिरे, यज्ञशाळा, हवनकुंड बांधणे, ओमचा ध्वज उभारण्याचे स्वातंत्र्य असावे.

४.शासनाने धर्मांतराला प्रोत्साहन देऊ नये. शालेय विद्यार्थी व तुरुंगातील बंदी यांचे धर्मांतर करण्यास परवानगी देऊ नये.

५.धर्मखाते बंद करावे अथवा या खात्यापुढे हिंदू व आर्य समाजींचे प्रश्न आणू नयेत.

६.आर्य मिशनरी संस्थांवर घातलेली बंदी उठवावी. आर्य मिशनरींना संस्थानात प्रवेश करण्यास बंदी घालू नये.

७.वृत्तपत्रे व अन्य प्रकाशनांच्या संदर्भात हिंदू-मुसलमान असा भेदभाव करू नये.

८.शालेय व माध्यमिक शिक्षणात उर्दूची सक्ती असू नये. मातृभाषेतून शिक्षण द्यावे.

९.खाजगी शाळा, वाचनालये, व्यायाम-शाळा , आखाडे काढण्यास बंदी असू नये. (भालेराव, १९८७, पृ. १५२-१५३)

पण या निवेदनाची दखल घेतली गेली नाही. त्यानंतर मात्र आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी सत्याग्रहाचे पर्व सुरू केले. मनमाड, अहमदनगर, सोलापूर, बार्शी, पुसद, चंद्रपूर, विजयवाडा येथे सत्याग्रहींची केंद्रे उघडण्यात आली. सत्याग्रहींची पहिली तुकडी नारायणस्वामी यांच्या नेतृत्वाखाली ३१ जानेवारी १९३९ रोजी हैद्राबादेस पाठविण्यात आली. या सत्याग्रहींना अटक करून सोलापूरला परत पाठविण्यात आले. त्यानंतर लगेचच नारायणस्वामींनी २० सहकाऱ्यांसह ४ फेब्रुवारी १९३९ रोजी गुलबर्गा येथे सत्याग्रह केला. यावेळी मात्र सर्व सत्याग्रहींची तुरुंगात रवानगी करण्यात आली. त्यानंतर ५ मार्चपासून अनुक्रमे चांदकरण सारडा, खुशालचंद उर्फ आनंद स्वामी, राजगुरू धुरेंद्र शास्त्री उर्फ स्वामी ध्रुवानंद, वेदव्रत उर्फ स्वामी अभेदानंद आणि महाशय कृष्ण यांच्या नेतृत्वाखाली सहा तुकड्यांनी सत्याग्रह केले. या सत्याग्रहींमध्ये मराठवाड्यातील शेषराव वाघमारे (निलंगा), दिगंबरराव शिवणगीकर (लातूर), शंकरराव पाटील (अघोरी), निवृत्ती रेड्डी , दिगंबरराव लाटकर (अहमदपूर), गणपतराव कथले (कळंब) यांनी स्थानिक तुकड्यांचे नेतृत्व केले. हैद्राबादखेरीज औरंगाबाद, नांदेड, येथेही सत्याग्रह झाले. ५ मे १९३९ रोजी पं. वेदव्रत यांनी ५१३ जणांसह व १४ मे १९३९ रोजी स्वामी सुंदरानंद यांनी ४६ सहकाऱ्यांसह नांदेडला सत्याग्रह केला. औरंगाबाद येथे झालेल्या सत्याग्रहांमध्ये ५ जून १९३९ रोजी पंजाबचे नारायणसेन व इतर ९ सहकाऱ्यांनी आणि चांद्याच्या ६१ आर्यसमाजींनी; २५ जून १९३९ रोजी पं.बुद्धदेव यांच्या नेतृत्वाखाली ५०० सत्याग्रहींनी; २६ जून १९३९ रोजी गुरू महंत जगन्नाथ दास यांच्या नेतृत्वाखाली ७० सत्याग्रहींनी या अंदोलनात सहभाग दिला. ७ ऑगस्ट १९३९ पर्यंत हे सत्याग्रह पर्व सुरू होते. निजाम सरकारने आर्य समाजाविरुद्ध कडक धोरण स्वीकारले व ही चळवळ दडपून टाकण्यासाठी सर्व प्रकारची राजकीय व लष्करी हत्यारे वापरली. पंडित बाळकृष्ण शर्मा, नित्यानंद ब्रह्मचारी यांना सरकारने हद्दपारीच्या शिक्षा ठोठावल्या. १७ जणांना अटक करण्यात आली व बीदरच्या तुरुंगात डांबण्यात आले. तेथे त्यांचा १७ डिसेंबर १९३८ ला अंत झाला.

आर्य समाजाच्या आंदोलनाची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी हैद्राबादचे पंतप्रधान अकबर हैदरी यांना पत्र लिहून राजकीय सुधारणा आणण्याचे आवाहन केले. सेनापती बापट यांनी पाच सहकाऱ्यांसह हैद्राबादेत येऊन २४ सप्टेंबर १९३८ रोजी सत्याग्रह केला. त्यांना अटक करण्यात आली व रेल्वेने पुण्यास परत पाठविण्यात आले. पुण्याला परतल्यावर त्यांनी हैद्राबाद संस्थानातील पीडितांच्या मदतीसाठी महाराष्ट्रीयांनी पुढे यावे अशा आशयाचे एक पत्रक २७ सप्टेंबर १९३८ रोजी प्रसिद्ध केले. सत्याग्रह मंडळे स्थापन करण्याची भूमिका घेतली. २९ ऑक्टोबर १९३८ रोजी पुण्यात शनिवारवाड्यासमोर व मुंबईसही सभा घेतली. मात्र गांधीजींनी स्टेट काँग्रेसला सत्याग्रह थांबविण्याचा आदेश दिलेला असल्याने महाराष्ट्रातून सेनापती बापटांच्या आवाहनाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. सत्याग्रहींची नोंदणी झाली नाही तरीही १ नोव्हेंबर १९३८ रोजी पुन्हा एकदा पाच सत्याग्रहींसह त्यांनी हैद्राबादेत येऊन सत्याग्रह केला. पुन्हा त्यांना अटक करून पुण्यास परत पाठविण्यात आले. मात्र त्यानंतरही १ डिसेंबरला १९ सत्याग्रहींना सोबत घेऊन सेनापती बापटांनी गुलबर्गा मार्गे संस्थानात प्रवेश केला. यावेळी या सर्व सत्याग्रहींना २ वर्षांची सजा व बाराशे रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. दरम्यान गांधीजी व हैद्राबादच्या पंतप्रधानांमध्ये सत्याग्रहींच्या मुक्ततेच्या संदर्भात पत्रव्यवहार सुरू होता; कदाचित त्यामुळेच ८ जानेवारी १९३९ रोजी सेनापती बापटांची तुरुंगातून सुटका झाली. एप्रिल महिन्यात सर्व सत्याग्रहींची सुटका झाल्याने पुन्हा एकदा सत्याग्रह करण्याचा मनोदय सेनापती बापटांना सोडून द्यावा लागला. (भालेराव, १९८७, पृ. १३४-१३६)

अशा प्रकारे १९३९ साली आर्य समाजाच्या सत्याग्रह चळवळीपुढे निझाम सरकारला नमते घ्यावे लागले. १९४८ साली पोलिस कारवाईनंतर निझाम शासन बरखास्त झाले त्यावेळी वल्लभभाई पटेल यांनी आर्य समाजाच्या आंदोलनाची यथोचित दखल घेऊन म्हटले होते की, "आर्य समाजने यदि पहलेसे भूमिका तैयार न की होती तो तीन दिनमे हैद्राबाद राज्य मे पोलिस एक्शन सफल नही हो सकता." (काळे भगवान, १९८६, पृ. २९४)

### हिंदू महासभेचे नि:शस्त्र प्रतिकारपर्व :

आर्य समाजाच्या बरोबरीने हिंदू महासभाही निजामच्या धार्मिक उच्छादवादाच्या विरोधात उभी राहिली. हैद्राबादेत स्थापन झालेल्या 'हिंदू नागरी स्वातंत्र्य संघा'ने (Hindu Civil Liberties Union) या संघर्षाची मुहर्तमेढ केली. २१ ऑक्टोबर १९३८ रोजी धर्मवीर वामनराव नाईक यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने संघाने शहरात मिरवणुक काढण्यास व सार्वजनिक सभा घेण्यास निजाम सरकारकडे परवानगी मागितली. अशी परवानगी मिळवण्यात संघाला प्रथमदर्शनी यश मिळाले. यावेळी वाय. डी. जोशी यांच्या नेतृत्वाखाली पाच जणांच्या तुकडीने नागरी हक्कांसाठी कायदेभंग केला. या पाचही जणांना निजाम सरकारने अटक केली. वाय. डी. जोशींना २ वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली. लागोपाठ ६ तुकड्यांनी अनुक्रमे २१ ऑक्टोबर, २८ ऑक्टोबर, ४ नोव्हेंबर, ११ नोव्हेंबर आणि १८ नोव्हेंबरला नागरी प्रतिकार अर्थात कायदाभंग करणारे आंदोलन केले. बालय्या नायडू, बाबा देसाई, हनुमंतराव खेडकर,

केशवराव देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली हा कायदेभंगाचा उपक्रम करण्यात आला. या सर्व प्रतिकारकांना अटक झाली.

हिंदू महासभेने हैद्राबादचे मुसलमानी संस्थान नष्ट करण्यासाठी देशातल्या सर्व हिंदूंनी एकत्र येण्याचे आवाहन केले. स्वा. सावरकर यांनी निजामविरोधी हिंदुत्ववाद्यांनी एकत्र येऊन लढा उभारण्याच्या आपल्या भूमिकेचे समर्थन करताना म्हटले होते की, "Wherever a community is singled out to be tyrannizes over by another community; all efforts to defend and liberate the victims must have reference to the singled-out community alone and this struggle cannot be communal in that respect." [Date S. R., P. 235 / भालेराव, १९८७, पृ. १४०] बॅ. अकबर अलीखान या मुसलमानी नेत्याने हिंदू संघटनेच्या चळवळीवर जातीयवादाचा आरोप केला होता, त्याला उत्तर म्हणून सावरकरांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात हे स्पष्टीकरण देण्यात आले होते. हिंदू महासभेने आपल्या आंदोलनाचे स्वरूप 'नि:शस्त्र प्रतिकारा'चे ठेवले व या कायदेभंगात सक्रिय भाग घेणाऱ्या आंदोलन कर्त्यास 'प्रतिकारक' असे म्हणण्याची नवी परिभाषा रूढ केली.

हिंदू महासभेने हैद्राबाद संस्थानाबाहेर 'प्रतिकारकां'च्या तुकड्या संघटीत करण्याचा प्रयत्न केला. ११ ऑक्टोबर १९३८ रोजी पुणे येथे 'मराठा'चे संपादक ग. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली 'भाभानगर नि:शस्त्र प्रतिकार मंडळ' स्थापन करण्यात आले. नथुराम विनायक गोडसे हे या मंडळाचे सरचिटणीस होते. सभासदांमध्ये सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, मसूरकर महाराज, शि. ल. करंदीकर, एस. आर. दाते, जी. एम. नलावडे व व्ही. बी. डावखरे यांचा समावेश होता. या नि:शस्त्र प्रतिकार मंडळाने ७ नोव्हेंबर १९३८ ला १२ प्रतिकारकांची तुकडी हैद्राबादला पाठविली. नथुराम गोडसे यांनी या तुकडीचे नेतृत्व केले. नाशिकचे कळवणकर शास्त्री, जळगावचे धारपुरे वकील हेही या तुकडीत सामील होते. या बाराही प्रतिकारकांना निजाम सरकारने अटक केली. २१ नोव्हेंबर १९३८ ला खडीवाले वैद्य यांच्या नेतृत्वाखाली ११ जणांच्या दुसऱ्या तुकडीने औरंगाबादेत कायदेभंग केला व सर्व प्रतिकारक जेलबंद झाले. तिसऱ्या तुकडीने २५ डिसेंबर १९३८ रोजी हैद्राबादेत कायदेभंग करून अटक करवून घेतली.

२८-२९ डिसेंबर १९३८ रोजी स्वा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात भाभानगर नि:शस्त्र प्रतिकारमंडळ विसर्जित करण्यात आले व १ जानेवारी १९३९ पासून कायदेभंदाची चळवळ थेट हिंदू महासभेच्या वतीने चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या ठरावात म्हटले होते की, 'हैद्राबाद संस्थानातील हिंदूंना धार्मिक, नागरी, राजकीय व अन्य अधिकार नसून त्यांच्या न्याय्य मागण्यांची पूर्ती करण्याबाबत संस्थान उदासीन आहे. त्यामुळे हिंदूंना लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे हक्क मिळेपर्यंत हिंदू महासभा संस्थानात नागरी प्रतिकाराचे कायदेभंग करीत राहील. राष्ट्रीय काँग्रेसने हैद्राबादच्या स्टेट काँग्रेसला सत्याग्रह स्थगित करण्याचा आदेश दिला होता, या घटनेचा हिंदू महासभेने निषेध केला. हिंदू महासभेच्या वतीने संस्थानाबाहेर पुणे, मुंबई, नागपूर इत्यादी ठिकाणी प्रतिकारकांची नोंदणी करण्याकरिता केंद्रे उघडण्यात आली. गुलबर्गा,

बीदर, औरंगाबाद,पैठण, वैजापूर, जालना, परभणी, नांदेड, हदगाव, तुळापूर, मुरुम, कन्हेरगाव इत्यादी ठिकाणी कायदेभंग करण्यात आला. १ ऑगस्ट १९३९ पर्यंत सुरू असलेल्या या कायदेभंग चळवळीत हैद्राबाद सरकारने ४,००० प्रतिकारकांना अटक केली. त्यातील १३ स्वयंसेवकांना तुरुंगातच मरण पत्करावे लागले. हरसूल जेलमध्ये कैद्यांवर अत्याचार करण्यात आले. ही वार्ता समजताच न. चिं. केळकर, लोकनायक अणे, जमनादास मेहता यांनी तुरुंगातील राजबंद्यांची भेट घेतली व कैद्यांवर केल्या गेलेल्या अत्याचारांविषयीचे एक निवेदन न. चिं. केळकर यांनी प्रसिद्ध करून वास्तव सत्य लोकांच्या व ब्रिटिश शासनाच्या नजरेस आणून दिले. यशवंतराव जोशी यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवण्यात आला. या प्रतिकारकांमध्ये महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागातून लोकांनी सहभाग दिला होता.पुण्याहून नथूराम गोडसे, गो. नी. दांडेकर, शं. रा. दाते, केशवराव केळकर, ल. ब. भोपटकर; मुंबईहून कवी (विंदा) गो. वि. करंदीकर, अनंत हरि गद्रे, डी. डी. देवधर, साताऱ्याचे भडकमकर, पंढरपूरचे गजाननराव आराध्ये, बार्शीचे बाबूराव काळे, धुळ्याचे पुरोहित, चोपड्याचे जोगळेकर, नाशिकचे गणपतराव गद्रे, विष्णूशास्त्री केळकर, नागपूरचे बाळशास्त्री हरदास, डॉ. परांजपे, प्रा. व्ही. जी. देशपांडे, भंडाऱ्याचे जोशी, उमरेडचे भय्यासाहेब दाणी इत्यादींचा या प्रतिकारकांमध्ये समावेश होता.

**'वंदे मातरम्'चळवळ :**

१९३८ साली औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' चळवळ सुरू केली. औरंगाबादला मदरसे फोकनिया हे सरकारी हायस्कूल व इंटरमिजिएट कॉलेज होते. या कॉलेजातले शिक्षक गोविंदभाई श्रॉफ यांना निजाम शासनाने ९ नोव्हेंबर १९३८ रोजी सरकारविरोधी कारवाया केल्याच्या कारणावरून नोकरीतून काढून टाकले होते. अशा वातावरणातच हे 'वंदे मातरम्' आंदोलन सुरू झाले. त्याची पार्श्वभूमी अशी : या कॉलेजच्या वसतिगृहात मुसलमान विद्यार्थी दररोज नमाज पढत. १४ नोव्हेंबर १९३८ रोजी हिंदू विद्यार्थ्यांनी आपणही आपली प्रार्थना म्हणावी या हेतूने वसतिगृहात 'वंदे मातरम्' म्हणायला सुरुवात केली. प्राचार्य सय्यद मोहयोद्दीन यांनी विद्यार्थ्यांना 'वंदे मातरम्' म्हणण्यास बंदी केली. विद्यार्थ्यांनी १६ नोव्हेंबरपासून सत्याग्रह सुरू केला. गुप्तहेरखात्याचे अधिकारी अंडरसन यांनी गोविंदभाईंच्या चिथावणीमुळे विद्यार्थ्यांनी अन्न सत्याग्रह सुरू केल्याचा अहवाल दिला. त्यानंतर शिक्षणमंत्र्यांनी उस्मानिया विद्यापीठ व अन्य शिक्षणसंस्थात 'वंदे मातरम्' म्हणण्याला बंदी करण्यात घातली. २९ नोव्हेंबर १९३८ रोजी उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी बंदीहुकूम मोडून वंदे मातरम गायिले; त्यावरून निजाम सरकारने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वसतिगृहातून काढून टाकले. आर्य समाज, नागरी स्वातंत्र्य समिती, हिंदुमहासभा व संस्थानी काँग्रेसने सरकारच्या या दडपशाहीचा निषेध केला. हैद्राबाद संस्थानातील गुलबर्गा, नांदेड, परभणी, बीदर, महमूदनगर, औरंगाबाद येथील शाळा-महाविद्यालयात हरताळ पाळण्यात आला. सरकारी हुकूमान्वये १२०० विद्यार्थ्यांना काढून टाकण्यात आले. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू श्री. टी. जे. केदार यांनी या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठात प्रवेश देऊन त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था लावली. माध्यमिक शाळेतून काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांची सोय खामगावचे राष्ट्रीय विद्यालय, येवल्याचे आपटे गुरुजींचे विनय

मंदिर व अहमदनगरच्या शाळेत करण्यात आली. ह्या आंदोलनातल्या विद्यार्थ्यांनी पुढील काळात हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सक्रिय सहभाग दिला. ११ मार्च १९३९ रोजी त्रिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनस्थळी हारून अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली 'वंदे मातरम्'च्या आंदोलनातील विद्यार्थ्यांचा एक मेळावाही झाला होता. गांधीजी व सुभाषचंद्र बोस यांचा 'वंदे मातरम्' चळवळीला पाठिंबा होता. गांधीजींनी हैद्राबादचे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांना पत्र लिहून "विद्यार्थ्यांना वंदे मातरम गाण्याचा व म्हणण्याचा संपूर्ण अधिकार असल्याचे आपले मत आहे" असे स्पष्ट शब्दांत कळविले होते. या प्रकरणी निझाम सरकारने कुणाचीच मध्यस्थी मान्य केली नाही व २५ जून १९३९ रोजी विद्यापीठात अगर सरकारी कार्यालयात वंदे मातरम म्हणण्यास बंदी करणारा हुकूम निर्गमित केला.

**हैद्राबाद स्टेट काँग्रेस :**

आर्य समाज व हिंदू महासभेप्रमाणे राष्ट्रीय काँग्रेसनेही निझामच्या नागरी हक्कांच्या गळचेपीविरुद्ध आवाज उठवला. १९१८ साली वामनराव नाईक यांच्या पुढाकाराने हैद्राबाद येथे अखिल भारतीय काँग्रेसची शाखा स्थापन झाली.१९२० साली लक्ष्मणराव फाटक यांनी 'निजाम विजय' नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले व त्यातून राजकीय जाणीवजागृती होईल असे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. 'निजाम विजय'मधील दिगंबरराव बिंदू यांचे लेखन आक्षेपार्ह ठरवून त्यांची सनद रद्द का करू नये अशी प्रशासनाने त्यांना नोटीस पाठविली. त्यानंतर १९२१ साली 'हैद्राबाद राजकीय सुधारणा संघ' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. मराठवाड्यात नांदेड, परभणी, औरंगाबाद येथे या संस्थेच्या शाखा उघडण्यात आल्या. दरम्यान १९२३ साली काकीनाडा येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले, त्यात हैद्राबाद संस्थानची राजकीय परिषद घेण्याची सूचना पुढे आली. लगोलग १९२३ साली हैद्राबाद येथे बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली राजकीय परिषद झाली. या परिषदेत जबाबदार राज्यपद्धतीचा ठराव मांडण्यात आला; पण तो पारित झाला नाही. १९२६ साली मुंबईत या. मा. काळे यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबादलाच दुसरी हैद्राबाद राजकीय परिषद भरली. या परिषदेचे स्वागताध्यक्ष-अप्पाजी तुळजापूरकर होते. १९२८ साली पुण्यात न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरी हैद्राबाद राजकीय परिषद झाली. तिचे स्वागताध्यक्ष लक्ष्मण बळवंत भोपटकर होते. भोपटकरांनी हैद्राबादच्या पक्षपाती, धर्मांध व जातीय राज्यकारभारावर टीका केली. १९३१ साली विदर्भातील अकोला येथे बॅ. राम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय परिषद झाली. त्यात जबाबदार राज्यपद्धतीचा ठराव पारित करण्यात आला. १९३२ साली वामनराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 'हिंदू स्टँडिंग कमिटी' स्थापन करण्यात आली. या संस्थेमार्फत सर्वेक्षण करून आकडेवारीच्या आधारे सरकारी नोकऱ्यांत हिंदू-मुसलमानांमधला भेदभाव दूर करण्याची मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले. या परिषदेत जबादार राज्यपद्धतीची मागणी करणारा ठराव पारित झाला. १९३४ साली म. गांधी यांनी हैद्राबादला व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबादला भेट दिली. गांधीजींनी कार्यकर्त्यांना राजकीय आंदोलन करण्याऐवजी बालविवाहप्रतिबंध, विधवापुनर्विवाह, स्त्रीशिक्षण या विषयांवर कार्य करण्याचा

सल्ला दिला. डॉ. आंबेडकरांनीही केवळ राजा मुस्लीम आहे म्हणून मुस्लीम लीगने हैद्राबादवर अधिकार सांगू नये, असा सल्ला दिला. १९३८ साली हरिपुरा येथे झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात संस्थानी प्रजेच्या प्रश्नात काँग्रेसने हस्तक्षेप करू नये असा ठराव पारित करण्यात आला. या ठरावामागे संस्थानातल्या प्रजेने स्वबळावर आपली स्वातंत्र्यचळवळ उभी करावी, अशी गांधीजींची भूमिका होती. स्वाभाविकच हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या संघटनात्मक चळवळीवर याचा परिणाम झाला.

दरम्यान पंतप्रधान सर अली इमाम यांनी राय बालमुकुंद कमिटी नेमली होती, या कमिटीने सुचविल्याप्रमाणे सुधारणांचा दुसरा हप्ता जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर १९३५ साली 'Nizam's Subjects League' नावाची प्रजापरिषद स्थापन करण्यात आली. या प्रजापरिषदेत हिंदू व मुसलमानांतील प्रतिष्ठित लोक सहभागी झाले होते. या प्रजापरिषदेने उर्दू व हिंदी या दोन्ही भाषांना जवळची हिंदुस्थानी भाषा राजभाषा म्हणून स्वीकारण्याची शिफारस केली. कायद्यासमोर सर्व समान असतील, अभिव्यक्तीचे व धर्माचे स्वातंत्र्य असले पाहिजे अशीही मागणी करण्यात आली. अखेर १२ नोव्हेंबर १९३७ ला 'हैद्राबाद पीपल्स कन्व्हेन्शन' नावाची संघटना स्थापन करून जबाबदार राज्यपद्धती व हिंदु-मुसलमान यांचे स्थान या विषयांवर संवाद प्रस्थापित करण्यासाठी व्यापक राजकीय परिषद आयोजित करण्यात यावी, असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार १९३८ साली मौलवी अबुल हसन सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय परिषद झाली. मात्र हिंदू-मुसलमानांना सरकारी नोकऱ्यात, कायदेमंडळात व स्थानिक स्वराज्य संस्थात समसमान म्हणजे ५० टक्के प्रतिनिधित्व द्यावे या मुद्यावरून ही परिषद फुटली. इतेहादुल मुस्लिमीन नावाच्या मुसलमानांच्या संघटनेचा जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीला कडवा विरोध होता. हिंदू सभासद २० टक्क्यांपर्यंत प्रतिनिधित्वाला तयार होऊनही परिषद उधळली गेली. (भालेराव, १९८७, पृ. ७०-७४; १०५ )

## महाराष्ट्र परिषद :

१९३७ पासून हैद्राबाद संस्थानात जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीसाठी संघर्ष उभा करण्यासाठी लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. स्वामी रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे यांनी लोकजागृतीच्या कामात पुढाकार घेतलेला होता. याच वेळी 'मराठवाडा' साप्ताहिकाचे संपादक आनंदराव वाघमारे व अनंतराव कुलकर्णी यांनी 'महाराष्ट्र संघ' नावाची संघटना बांधण्याला प्रारंभ केला होता. त्यातून 'महाराष्ट्र परिषद' ही संघटना बांधली गेली. स्टेट काँग्रेसवर निझाम सरकारने बंदी आणल्यावर आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र अशा तीन प्रांतिक परिषदांच्या समन्वयाचे सूत्र घेऊन महाराष्ट्र परिषदेने पर्यायी भूमिका निभावली. परिषदेने मुंबई राज्याप्रमाणे ग्रेडेड लेव्ही पद्धत सुरू करण्याच्या पर्यायाचा पाठपुरावा करण्यासाठी पाचही जिल्ह्यातून हैद्राबादला पाच हजार शेतकऱ्यांचा मोर्चा नेला. परभणी, नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील विणकरांना सुताचा पुरेसा पुरवठा होत नव्हता यासाठीही विणकरांचा मोर्चा काढून जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यात लक्ष घातले. निझाम सरकारची मात्र महाराष्ट्र परिषदेकडे पहाण्याची दृष्टी संशयाची होती.

परतूरला १ जानेवारी १९३७ रोजी महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन गोविंदराव उर्फ दाजीसाहेब नानल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनाला वाघमारे, कुलकर्णी यांचा सोबतीला औरंगाबादचे गोविंदभाई श्रॉफही होते. हिप्परग्याहून स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, विनोबांचे शिष्य अच्युतराव देशपांडे , दामोदरदास मुंदडा इत्यादी मान्यवर सहभागी झाले होते. या अधिवेशनात श्यामराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाच्या प्रश्नाची समग्र बाजू मांडली. अध्यक्ष दाजीसाहेब नानल यांनी जमिनीचा पोत, मशागत, सेंद्रिय खतांचे महत्त्व, सकस बियाणे, गुरांना आंबोण घालण्याची पद्धती यावर भाष्य केले. शेतकरी वर्ग हा संख्येने मोठा असूनही दुर्लक्षीत राहतो, कष्टाने पिके काढूनही कर्जात बुडतो याविषयीचे वास्तव विशद करून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी सावकारशाही नष्ट करून सहकाराचा मार्ग चोखाळण्याचा सल्ला त्यांनी आपल्या भाषणातून दिला.

दरम्यानच्या काळात १९३८ साली हैद्राबादच्या धूळपेठ भागात हिंदू-मुसलमानात मोठी दंगल झाली. या दंगलीत इत्तेदुल मुस्लिमीनचे अध्यक्ष नबाब बहादूर यारजंग यांचे दोन पुतणे मारले गेले. त्यामुळे संतप्त झालेल्या २५ हजारांचा मुसलमानांनी मिरवणूक काढून या घटनेचा निषेध केला. शासनाने मुसलमानांना एकतर्फी पाठीशी घालून असंख्य हिंदूंना अटक केली. या दंगलीचे लोण सर्व राज्यात पसरले. गुलबर्गा, गुंजोटी, निजामाबाद, मराठवाड्यातील परभणी, उदगीर, हळीखेड भागात दंगली झाल्या. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनावरही या दंगलींचे सावट पडले.

१९३८ साली महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन लातूरला झाले. या अधिवेशनाला परवानगी देताना निजाम शासनाने संस्थानाबाहेरचा अध्यक्ष नेमता येणार नाही अशी अट घातली. त्यामुळे हैद्राबादच्या बॅ. श्रीनिवास शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन झाले. ब्रिटिश हिंदुस्थानात नुकत्याच निवडणुका होऊन कॉंग्रेसला भरघोस विजय मिळाला होता; या पार्श्वभूमीवर अध्यक्ष शर्मा यांच्या भाषणाचा सूरही जहाल लागला होता. अधिवेशनात होणाऱ्या अध्यक्ष व स्वागताध्यक्षांची भाषणे व ठरावांचे मसुदे आधी कलेक्टरला दाखविण्यात यावेत असेही बंधन घालण्यात आले होते. कलेक्टरने या भाषणाच्या संहिताततला काही भाग आक्षेपार्ह ठरवून गाळला. हीच गोष्ट काही ठरावांच्या बाबतीतही झाली. त्यामुळे उपस्थित प्रतिनिधींमध्ये संतापाची लाट उसळली. तरीही या अधिवेशनात धूळपेट दंगलीची नि:पक्षपाती चौकशी व्हावी यासाठी चौकशी समिती नेमण्याची मागणी करणारा ठराव आणि नागरी हक्क व स्वातंत्र्यासंबंधीचा ठराव वाचून दाखविण्यात आले. कलेक्टरने त्यावर आक्षेप घेतल्यामुळे निषेध म्हणून हे अधिवेशन स्थगित करण्याचा ठराव १३३ विरुद्ध ११ मतांनी पारित झाला. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची पार्श्वभूमी तयार होण्यात या अधिवेशनाचा फार मोठा वाटा होता. लातूरच्या अधिवेशानाला जोडून तेथेचे काशीबाई किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली महिलांचेही संमेलन झाले. तसेच अधिवेशन अर्धवट राहिल्याने पुढील वाटचाल ठरविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू आणि वैद्य यांची एक समिती नियुक्त करण्यात आली. स्वामीजींनी हैद्राबादला राहून नागरी हक्क मिळविण्याकरिता कायदेभंग करून संघर्ष उभा

करण्याची तयारी सुरू केली. उस्मानिया विद्यापीठात 'श्रीकृष्णाचा संदेश' अशा पौराणिक विषयावर भाषण देऊन विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय चेतना निर्माण केली. विद्यार्थ्यांजवळ 'स्फोटक द्रव्य' होते, त्याला आकार देण्याचा व दिशा दाखविण्याचा मार्ग स्वामींनी प्रशस्त केला.

स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबादच्या स्वातंत्र्यलढ्याला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. त्यांच्या मते हैद्राबादची समस्या ही मूलत: हिंदू-मुस्लीम समस्या नव्हती. हा दुहेरी प्रश्न होता. एक तर सरंजामशाही, एकतंत्री राजवटीविरुद्ध लढा व दुसरा ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध. मुस्लीम जमात निजामाच्या सरंजामशाही एकतंत्री राजवटीच्या पाठीशी असल्यामुळे या प्रश्नाला राजकीय रंग चढला होता. ब्रिटिश सत्ता मुसलमानांचा आपल्या खेळातील प्याद्यासारखा उपयोग करीत होती. म्हणून जातीयतेविरुद्ध राष्ट्रवाद हाच एकमेव तोडगा होय, याची स्पष्ट जाणीव स्वामीजींना झाली होती. राजकीय स्वातंत्र्याच्या अभावी सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इत्यादी सर्व प्रकारचा विकास साधणे अशक्य होते. नागरी हक्कांसाठी झगडून ते प्राप्त करून घ्यायला हवे होते." (तीर्थ रामानंद, १९७६, पृ. ६५-६७) त्यामुळे महाराष्ट्र परिषदेच्या माध्यमातून जबाबदार राज्यपद्धती व नागरी हक्क संरक्षणाची चळवळ संघटित करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांनी व्यूहरचना आखायला सुरुवात केली.

महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन मात्र लगेच झाले नाही. मधल्या काळात २९ जून १९३८ रोजी हैद्राबाद येथे स्वामी रामानंद तीर्थ यांना वगळून झालेल्या एका अनौपचारिक बैठकीत स्टेट काँग्रेसची स्थापना झाली. राजकीय वातावरणात झालेल्या या बदलांमुळे महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन लांबले. स्टेट काँग्रेसवर स्थापनेपूर्वीच निजामने बंदी आणल्याने गांधीजींच्या आदेशाने सत्याग्रह करण्यात आले. अनेक लोक तुरुंगात गेले. महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीस स्वामी रामानंद तीर्थ,गोविंदभाई श्रॉफ, वाघमारे हे बिनीचे कार्यकर्तेही तुरुंगात होते. त्यामुळे लांबलेले हे अधिवेशन १९४१ साली २९ ते ३१ मे रोजी उमरी येथे घेण्यात आले. त्यानंतर डॉ. श्रीधर नाईक यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे अधिवेशन झाले. १९४५ साली दिगंबरराव बिंदू यांच्या अध्यक्षतेखाली सेलू येथे व १९४६ साली लातूरला आनंद कृष्ण वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र परिषदेची शेवटची अधिवेशने झाली. लातूर अधिवेशनाला संस्थानाबाहेरून भगवी वस्त्रे व विणाधारी संन्याशी आले होते, ते गुप्त शस्त्रास्त्रे घेऊन आले असावेत, असा नबाब दीनयार जंग या निझाम सरकारच्या पोलिस कमिशनरने संशय घेतला होता. औरंगाबाद अधिवेशनाला जोडून झालेल्या महिला संमेलनाचे अध्यक्षस्थान अहमदनगरच्या पानकुंवर कोटेचा यांनी व लातूरच्या महिला संमेलनाचे अध्यक्षपद सुशीलाबाई दिवाण यांनी भुषविले होते. राजकारण आणि समाजकारण या दोन्ही अंगांनी मराठवाड्यातील राजकारण आकार घेत होते हे महाराष्ट्र परिषदेच्या वाटचालीवरून दिसून येते. शेतीच्या प्रश्नांचा उहापोह जवळपास सर्वच अधिवेशनातून केला गेला. औरंगाबाद अधिवेशनात स्वस्त धान्याची दुकाने काढावीत व सबसिडी देऊन धान्य आणि कापडावर ग्राहकांना स्वस्त दरात उपलब्ध करून द्यावे, अशा आशयाचा ठराव पारित झाला. सेलू आणि लातूरच्या अधिवेशनात सरकारने सावकारशाहीला प्रोत्साहन देऊ नये, शेतसारा कमी करावा, शेतकऱ्यांना जोडधंदे काढून

संपत्तीचा वापर वाढवावा इत्यादी सूचना करण्यात आल्या. १९४६ च्या लातूर अधिवेशनात आनंदराव वाघमारे यांनी हैद्राबाद संस्थानाची तीन भाषिक विभागात प्रशासकीय वाटणी करण्याचे संकेत दिले होते. परिषदेने आपल्या कार्यपद्धतीत आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र अशा तिन्ही प्रांतिक परिषदांच्या संयुक्त बैठका घेऊन पिढील काळात स्थापन व्हावयाच्या मध्यवर्ती राजकीय संघटनेचा पाया रचला.

महाराष्ट्र परिषदेने गावपातळीपर्यंत सभासद नोंदणी करून शाखाविस्तार केला. प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे ४३ पूर्ण वेळ संघटक-कार्यकर्ते नेमून हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे कार्य सुरू ठेवले होते. परभणी जिल्ह्यात श्रीनिवास बोरीकर व मुकुंदराव पेडगावकर; नांदेड जिल्ह्यात श्यामराव बोधनकर, गोपाळशास्त्री देव व भगवानराव वांजवे; बीड जिल्ह्यात हिरालाल कोटेचा व पुरुषोत्तम चपळगावकर; उस्मानाबाद जिल्ह्यात कॅ. व्यंकटेश जोशी, विश्वंभरराव हराळकर, औरंगाबाद जिल्ह्यात वाघमारे व गोविंदभाई श्रॉफ, लक्ष्मणराव वाळुंजकर, माणिकचंद्र पहाडे, अनंत भालेराव इत्यादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र परिषदेचे काम तळापर्यंत नेले.

१९३७ साली भारतात काँग्रेसची मंत्रिमंडळे अस्तित्वात आली; त्यामुळे राजकीय उत्साह वाढला व हैद्राबादात निजाम राजवटीच्या विरोधात जोरदार संघर्ष सुरू झाला. पंतप्रधान अकबर हैदरी याने आपल्या सहीने संस्थानाबहेरून प्रकाशित होणाऱ्या १५ वृत्तपत्रांवर संस्थानात बंदी घालण्यात आल्याचा आदेश काढला. हे आव्हान स्वीकारून आनंद कृष्ण वाघमारे यांनी १० फेब्रुवारी १९३८ पासून पुण्याहून 'मराठवाडा' नावाचे स्फोटक मजकूर प्रसिद्ध करणारे साप्ताहिक सुरू केले. अर्थातच त्यावरही बंदी आली. वाघमारे यांनी या बंदीहुकूमांना भीक न घालता ११ वेगवेगळ्या नावांनी अंक छापणे सुरूच ठेवले. अखेर वाघमारे यांची सर्व संपत्ती निजामाने जप्त केली व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल केला. दीड वर्षाचा तुरुंगवास ठोठावण्यात आला. (भालेराव, १९८७, पृ. १०६-१०७)

१९३८ साली २९ जूनला हैद्राबादला स्थापन झालेल्या स्टेट काँग्रेसचे संयोजकत्व रामकिशन धूत यांच्याकडे सोपविण्यात आले होते. स्टेट काँग्रेसच्या सभासद नोंदणीसाठी व इतर उपक्रमांच्या कार्यवाहीसाठी एक अस्थायी समितीही नेमण्यात आली. या समितीत बी. रामकृष्णराव, सय्यद सिराजुल, हसन तिरमिजी, माडपाटी हनुमंतराव, पांडुरंगराव जोशी, आणि जी. रामाचारी यांचा समावेश होता. ह्या अस्थायी समितीने नंतर श्रीधर वामन नाईक, हरिलाल वाघरे, रविनारायण रेड्डी, गोविंदराव नानल, हरिश्चंद्र हेडा, व जनार्दनराव देसाई यांना समितीत सहभागी करवून घेतले. समिती सदस्यांनी संपूर्ण राज्यात सभासद नोंदणीची मोहीम काढून १२०० सभासद नोंदवले. जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीला अग्रक्रम देऊन काँग्रेस काम करणार असल्याचे मुसलमान लोकांच्या मनावर बिंबवून त्यांना काँग्रेसचे सदस्य करून घेण्याचाही जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आला. ९ सप्टेंबर १९३८ ला आमसभा घेऊन कार्यकारी मंडळाची निवड करण्याचा कार्यक्रम ठरविण्यात आला. मात्र ८ सप्टेंबर १९३८ ला सरकारने वृत्तपत्रात जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून स्टेट काँग्रेसवर जातीयतेचा आरोप ठेवून बंदी घातल्याचा हुकूम प्रसारित केला. घातपाताच्या कारवाया करण्यासाठी 'काँग्रेस'च्या नावाचा

बुरखा चढवून जनतेची फसवणूक करण्याचा हा डाव असल्याचे सांगून ही बंदी घालण्यात आली. त्यामुळे स्वाभाविकच जन्माला येण्यापूर्वीच स्टेट कॉंग्रेसची ९ सप्टेंबरची आमसभा स्थगित करावी लागली.

स्टेट कॉंग्रेसवर बंदी घातल्याची दखल घेऊन डॉ. आंबेडकर यांच्या 'जनता' पत्राने केलेले भाष्य यासंदर्भात पुरेसे बोलके आहे :

"ह्या संस्थानात सभा भरविणे, चळवळी करणे, जनतेच्या तक्रारींसाठी झगडा उभा करणे अशक्य झाले आहे. हल्लीच्या निजधामांनी काही दिखाऊ गोष्टी करण्याचा आव आणला तरी संस्थानातील एकंदर घटनाच इतकी चमत्कारिक आहे की, कोणासही डोके वर काढण्यास वाव नाही. लोकांच्या चळवळी मारून टाकण्यासाठी जातीयतेचा मोठा बाऊ पुढे करण्यात येतो. संस्थानचे मुख्य प्रधान सर अकबर हैदरी ह्यांनी जातीयतेबद्दल काही दिवसांपूर्वी मोठे भाषण करून हैद्राबाद संस्थानात जातीय प्रश्नांना थारा नाही व थारा मिळणार नाही, म्हणून मोठे अवडंबर माजविले, परंतु ज्यांना ह्या संस्थानची माहिती आहे, त्यांना सर अकबर ह्यांचे भाषण म्हणजे केवळ शब्दांचे फवारेच होत असे वाटल्यावाचून राहणार नाही. संस्थानात वाटेल त्या संस्थांना जन्मापूर्वीच कसे नख लावले जाते हे पाहवयाचे असल्यास तेथे निघणाऱ्या स्टेट कॉंग्रेसला कसे बेकायदेशीर ठरविण्यात आले ह्यावरून दिसून येईल. कॉंग्रेसमध्ये जातीय लोकांचा भरणा असल्यामुळे ती जातीय लढ्यांना कारणीभूत होईल असे जाहीर केले. कंसाला देवकीचा मुलगा आपल्या उरावर बसेल ही भीती असल्यामुळे त्याने मूल जन्मत:च मारण्याचा सपाटा चालविला; परंतु हैद्राबाद संस्थान सरकारने जन्माअगोदरच त्याचा गर्भपात केला असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होणार नाही. संस्थानने हे जुलूम जबरदस्तीचे धोरण आखले ह्याचा परिणाम जातीय झगड्यापेक्षा वाईट होईल हे निराळे सांगण्याची काही जरूरी नाही." (जनता १७-९-१९३८) यापूर्वी १९३७-३८ साली औरंगाबाद येथे भरलेल्या दलित परिषदेच्या अधिवेशनातही डॉ. आंबेडकरांनी निजाम सरकारवर टीका केली होती.

२५ सप्टेंबर १९३८ रोजी दिल्लीत झालेल्या अ. भा. कॉंग्रेस कमिटीने हैद्राबादच्या या घटनेची दखल घेऊन चर्चा केली. गांधीजींनीही हैद्राबादेत राजकीय आंदोलन संघटित केले पाहिजे, अशी भूमिका घेतली. हैद्राबादच्या जनतेच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'संस्थानी प्रजा परिषद' स्थापन करण्यात आली. कॉंग्रेसने निजाम सरकारविरोधात सत्याग्रह करण्यासाठी कृती समिती स्थापन केली. स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेच्या वेळी नेमस्त पुढाऱ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांना बाजूला ठेवले होते, परंतु आता त्यांच्याच नेतृत्वाखाली सत्याग्रहाची व्यूहरचना आखण्यात आली. स्वामीजींनी गोविंदराव नानल यांना स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करून या संघटनेच्या पुढील वाटचालीचा मार्ग प्रशस्त केला. गोविंदरावजी नानल यांनी एक कार्यकारिणी व कृतिसमिती नेमली. त्यात परभणीचे दाजीसाहेब नानल (अध्यक्ष), हैद्राबादचे रामकिशन धूत (सरचिटणीस), कर्नाटकचे जनार्दनराव देसाई, तेलंगणचे रवि नारायण रेड्डी, मराठवाड्याचे श्रीनिवास बोरीकर यांचा समावेश होता. या समितीने जनतेच्या राजकीय संघटना-स्वातंत्र्याच्या हक्काचा पुरस्कार करण्यासाठी सत्याग्रह करण्यात येत असल्याची

घोषणा केली. त्यानंतर २४ ऑक्टोबर १९३८ रोजी स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष गोविंदराव नानल यांनी उस्मानाबदचे के. जोशी, लातूरचे राघवेंद्र दिवाण, तेलंगणचे राज रेड्डी व कर्नाटकचे अप्पाराव या त्यांच्या चार सहकाऱ्यांसह हैद्राबाद येथे पहिला सत्याग्रह केला. स्वामीजींनी हैद्राबादेत दिगंबरराव बिंदू यांच्या मदतीने सत्याग्रह केंद्र स्थापन केले. सत्याग्रहाच्या नंतरच्या तुकडीचे नेतृत्वही स्वामी रामानंद तीर्थ यांनीच केले व २७ ऑक्टोबर १९३८ रोजी आपल्या सहकाऱ्यांसह हैद्राबादेत सत्याग्रह केला. नंतर हैद्राबाद व सिकंदराबाद शहरातल्या १६ तुकड्यांनी सत्याग्रह केला.

हैद्राबाद संस्थानात निरनिराळ्या प्रांतातून आर्यसमाजिस्ट, हिंदूमहासभा व काँग्रेस कार्यकर्ते सत्याग्रहासाठी येऊ लागले. सत्याग्रहात दिगंबरराव बिंदू, हनमंतराव लक्ष्मणराव, मोहन रेड्डी, रामचंद्र नांदापूरकर, कामटीकर, पत्की, काशीनाथराव वैद्य, गोपाळशास्त्री देव इत्यादींनी भाग घेतला. निझामाने जवळपास ६ हजार सत्याग्रहींना तुरुंगात टाकले. या सत्याग्रहात भाग घेणाऱ्या सत्याग्रहींना व अन्य संबंधित कार्यकर्त्यांना निजाम सरकारकडून जबर शिक्षा ठोठावण्यात आल्या. बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तम चपळगावकर यांना ६ महिन्यांची शिक्षा झाली. परभणी जिल्ह्यातील श्रीनिवास बोरीकर यांची वकिलीची सनद रद्द करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या बहुतेक सत्याग्रहींना हातात बेड्या घालून त्यांच्या गावातून फिरवले जायचे.

सेनापती बापट यांनी पुण्याहून ९ कलमी पत्रक प्रसिद्ध करून निजाम संस्थानातील अधिकाऱ्यांना हिंदू प्रजेवर जुलूम न करण्याचे आवाहन केले व निजाम सरकारने जबाबदार नागरी स्वातंत्र्याचे हक्क प्रजेला द्यावेत असे कळवले. लोकशाही पक्षाचे शि. ल. करंदीकर व श्री. गडकरी यांनी संस्थानातील परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी निझाम सरकारकडे मागणी केली, ती अर्थातच फेटाळण्यात आली. डॉ. आंबेडकर यांनी 'जनता' पत्रातून यावर भाष्य करताना लिहिले की, "हैद्राबाद संस्थानातील सत्याग्रहाची ही चळवळ अशीच पसरत गेली तर हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचा प्रयत्न निष्फळ ठरून हिंदवी स्वातंत्र्याची चळवळ मंदावल्याशिवाय रहाणार नाही. यासाठी हैद्राबाद येथील हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न प्रथम उभयपक्षांच्या तडजोडीने सोडविणे भाग आहे. (जनता, दि. १५-४-१९३९, पृ. ५) अखेर २४ डिसेंबर १९३८ रोजी काशीनाथराव वैद्य यांनी गांधीजींच्या आदेशानुसार शेवटचा १८ व्या तुकडीचा सत्याग्रह करून ही मोहीम थांबविण्यात आली.

गांधीजींनी सत्याग्रह थांबविण्याचे आदेश का दिले असावेत हा एक कुतुहलाचा विषय आहे. याबाबतीत असे सांगितले जाते की, सरोजिनी नायडू व त्यांची कन्या पद्मजा नायडू यांनी सत्याग्रहींमध्ये जातीयवादी व हिंदुत्ववादी लोकांचा भरणा असून, पैसे देऊन काही भाडोत्री सत्याग्रही स्टेट काँग्रेसने घुसविले आहेत अशा प्रकारची तक्रार केली होती, त्यावर विश्वास ठेवून गांधीजींनी सत्याग्रह थांबविण्याचे आदेश दिले असावेत. (भालेराव, १९८७, पृ. १२३-१२५) दुसरे एक मत असे आहे की, निझामचा पंतप्रधान अकबर हैदरी याने महात्मा गांधींची भेट घेऊन आपण निजामाचे मन वळवतो, आपण सत्याग्रह थांबवावा अशी गळ घातली व गांधीजींनी

हैदरीच्या शब्दावर विश्वास ठेवून सत्याग्रह मागे घेण्याची सूचना केली. (काळे भगवान,१९८६, पृ. ११) वास्तविक गांधीजींनी सत्याग्रह थांबविण्याचा आदेश दिला तेव्हा १५०० सत्याग्रहींची यादी केंद्राकडे शिल्लक होती. तरीही गांधीजींनी सत्याग्रह थांबविण्याचा दिलेला आदेश तर्कसंगत नसल्याची सर्वसाधारण समजूत होती. स्वामी रामानंद तीर्थ यांनी मात्र गांधीजींच्या आदेशाचा वेगळा अन्वयार्थ लावला होता. हैद्राबाद संस्थानाविरूद्ध त्यावेळी तिहेरी सत्याग्रह सुरू होते. स्टेट काँग्रेसचा नागरी स्वातंत्र्यासाठी सुरू केलेला सत्याग्रहाचा लढा, हिंदू नागरी स्वातंत्र्य संघाद्वारे चालू असलेला हिंदूंचा सत्याग्रह आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी चालवला गेलेला आर्य समाजाचा सत्याग्रह. या तिन्ही संघटनांच्या सत्याग्रहांमध्ये उद्दिष्टांची इतकी सरमिसळ झाली होती की, त्यातला सूक्ष्म भेद जनतेच्या लक्षात येऊ शकत नव्हता. या पार्श्वभूमीवर सत्याग्रह सुरू ठेवला असता तर काँग्रेसची पिछेहाट होण्याचा धोका ओळखून गांधीजींनी सत्याग्रह थांबविण्याचा निर्णय घेतला होता. सत्याग्रहाची चळवळ स्थगित केल्याने धार्मिक स्वातंत्र्य, विशिष्ट जातीकडून होणारी अधिकारांची मागणी आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी करावयाचा लढा यातला सूक्ष्म भेद स्पष्ट होण्यास व राजकीय वातावरण स्थिर होण्यास अवकाश मिळेल, अशी गांधीजींची धारणा असावी. रामानंद तीर्थ यांनी लावलेला हा अन्वयार्थ अधिक सयुक्तिक वाटतो. स्वामीजींनी स्वतः:च यासंदर्भात लिहिले आहे की,हैद्राबादची परिस्थिती इतकी गुंतागुंतीची होती की, स्टेट काँग्रेसने सत्याग्रह थांबविल्यानंतर निझाम शासनाशी वेळोवेळी केलेला सर्व पत्रव्यवहार सेवाग्रामला गांधीजींकडे पाठवून त्यांच्या मान्यतेनंतरच अग्रेषित करण्याचे धोरण ठेवले होते. "स्टेट काँग्रेसकडून सरकारकडे पाठविलेल्या पत्रातील प्रत्येक शब्द महात्माजींच्या लेखणीतून उतरला होता." (रामानंद तीर्थ, १९७६, पृ. १०५-१०७)

यानंतरच्या काळात निजाम सरकारने काँग्रेसचे प्रतिनिधी डॉ. अंत्रोळीकर व बद्रीनाथचे शंकराचार्य यांना निजामसंस्थानातील हिंदूंची स्थिती पाहण्यासाठी परवानगी दिली. (जनता, २७-५-१९३९, पृ. १) १९३९ साली ऑगस्ट महिन्यात राजकीय सुधारणांचीही घोषणा केली. मात्र या सुधारणा दिखाऊच होत्या; प्रत्यक्षात सत्तेची सर्व सूत्रे निजामाने आपल्याच हातात ठेवली होती. निजामाने जाहीर केलेल्या सुधारणांमध्ये कायदेमंडळात ८५ सभासदांपैकी ४२ सभासद हे लोकनियुक्त असतील व ४३ सभासद निजाम नेमेल अशी तरतूद होती. लोकनियुक्त सभासदांमध्ये २१ जागा हिंदूंसाठी व २१ जागा मुसलमानांसाठी असणार होत्या. म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात जागांची वर्गवारी पाहिल्यास ७० टक्के हिंदूंना २१ जागा आणि ११ टक्के मुसलमानांना २१ जागा अशी मुस्लीमधार्जिणी विभागणी होती. ह्या ४२ जागांच्या मतदारसंघांची रचनाही शेतकरी व मजूर वर्गापेक्षा श्रीमंत मालदार वर्गाला प्रतिनिधित्व देणारीच होती. मजूर वर्गास केवळ २ जागा व जमीन मालकांना ८ जागा दिल्या होत्या. ६ जागा नबाब, जहागीरदार, मनसबदार, जमीनदारांसाठी होत्या, २ जागा उद्योगपतींना, २ जागा व्यापाऱ्यांना, २ जागा डॉक्टर-हकिमांना, २ पदवीधरांना, २ जिल्हाबोर्डांना, २ नगरपालिकांना अशी विभागणी होती; शिवाय या अंतर्गत विभागणीतही प्रत्येक गटातून ५०% मुसलमान अपरिहार्य होते.

कायदेमंडळाच्या प्रमुखाची नेमणूक निजाम करणार होता. ७ मुसलमान मंत्री नामनियुक्त करणार होता. आणि ४३ सभासदही नेमणार होता. या ४३ पैकी ५ सभासद अस्पृश्य असतील असे म्हटले होते. थोडक्यात कायदेमंडळाची रचना मुस्लीमबहुल व सत्ता निजामकेंद्री राहील अशीच होती.

निझाम सरकारने ८ ऑगस्ट १९३९ रोजी जाहीर केलेल्या सुधारणांनंतर आर्यन लीगने, व हिंदू महासभेनेही सत्याग्रह बंद करण्याचे घोषित केले. स्वा. सावरकरांनी मात्र हैद्राबादेतील १० टक्के मुस्लीम प्रजा ९० टक्के बहुसंख्येच्या बरोबरीची मानण्याच्या निजाम सरकारच्या दृष्टिकोनावर टीका केली. अंजुमन इत्तेहादुल मुस्लिमीन या संघटनेस याही सुधारणा मान्य नव्हत्या; तेव्हा निझाम सरकारकडून इत्तेहादुल संघटनेचे अध्यक्ष नबाब बहादूर यार जंग यांना सुधारणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना मुस्लिमांच्या हितसंरक्षण करण्याचे गुप्त आश्वासन देण्यात आले होते. ४ ऑक्टोबर १९३९ रोजी मुख्य सचिवांच्या सहीने हा गुप्त करार नाबाब बहादूर यार जंग यांना कळविण्यात आला होता. [६]

हैद्राबाद स्टेट काँग्रेस व निजाम सरकार यांच्यात १९३९ च्या जाहीर झालेल्या सुधारणा व सत्याग्रह समाप्तीनंतरही वाटाघाटी सुरूच होत्या. निझाम सरकारकडून स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी संघटनेच्या नावातून 'काँग्रेस' शब्द हटविण्याचा आग्रह धरण्यात आला. गांधीजींच्या सल्ल्यावरून १२-१३ सप्टेंबर १९३९ रोजी मनमाडला स्टेट काँग्रेसची सभा आयोजित करण्यात आली. या सभेत सर्वानुमते नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्षपदी गोविंदराव नानल आणि सरचिटणीसपदी स्वामी रामानंद तीर्थ यांची निवड झाली. हैद्राबाद संस्थानात १४ शाखा स्थापन करून खादी ग्रामोद्योग, सूतकताई, अस्पृश्यता निवारण, साक्षरताप्रसार, ग्रामसफाईचे कार्यक्रम घेण्याचे ठरविण्यात आले. काँग्रेसने आपले नाव बदलून 'हैद्राबाद नॅशनल कॉन्फरन्स' असे नवे नामकरण करण्याचा प्रस्ताव निजामाला सादर केला. त्यावरही 'नॅशनल' शब्द दिशाभूल करणारा असल्याचे सांगून हा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

१९४० साली गांधीजींनी योजिलेल्या 'वैयक्तिक सत्याग्रहा'साठी हैद्राबाद संस्थानातून स्वामी रामानंद तीर्थ यांनी २१ सत्याग्रहींची यादी गांधीजींना पाठविली. गांधीजींनी या यादीतून स्वामी रामानंद तीर्थ, बीडचे सर्वोदयवादी कार्यकर्ते मोतीलाल मंत्री, मराठवाड्यात खादी ग्रामोद्यागाची सुरुवात करणारे बीडचे हिरालाल कोटेचा, खादी ग्रामोद्योगाच्याच चळवळीला वाहून घेतलेले उस्मानाबादचे देवरामजी चव्हाण, विनोबा भावेंचे निकटचे सहकारी औरंगाबादचे अच्युतभाई देशपांडे अशा एकूण पाच जणांची निवड केली. १२ सप्टेंबर १९४० रोजी स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रह केला, त्यांना अटक करून निजामाबाद तुरुंगात पाठविण्यात आले. इतर चार सत्याग्रहींना औरंगाबादेत अटक करण्यात आली. या सर्वांची १६ डिसेंबर १९४१ रोजी सुटका करण्यात आली.

या वैयक्तिक सत्याग्रहानंतर निझाम सरकारने काँग्रेस कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे व अटक करण्याचे सत्र चालूच ठेवले होते. १९४२ साली मार्च-एप्रिल महिन्यात औरंगाबादेत गोविंदभाई श्रॉफ, आनंदराव वाघमारे, डी. एल. पाठक, रतीलाल जरीवाला, व्ही. डी. देशपांडे, स. कृ.

वैशंपायन, सय्यद हबीबुद्दीन, डी. एच. देसाई इत्यादी कार्यकर्त्यांच्या घरांच्या झडत्या घेण्यात आल्या व त्यांना अटक करून निरनिराळ्या तुरुंगात ठेवण्यात आले.

## १९४२ च्या आंदोलनाचे पडसाद :

१९४२ च्या चलेजाव आंदोलनाचे पडसाद हैद्राबाद संस्थानातही उमटले. इत्तेहादुल संघटनेने मात्र निजामचे स्वतंत्र अस्तित्व कायम टिकवण्याच्या बाजूने पवित्रा घेऊन हिंदू प्रजाजनांचा विरोध केला. मुंबईस गांधीजींनी 'भारत छोडो' आंदोलनाचा नारा दिल्यानंतर लगेचच स्वामी रामानंद तीर्थ मुंबईहून सोलापूर मार्गे हैद्राबादेस निघाले असताना १६ ऑगस्ट १९४२ ला नामपल्ली स्टेशनवर त्यांना अटक करण्यात आली. त्याच वेळी मराठवाड्यातील बाबासाहेब परांजपे, नारायणराव जोशी (आंबाजोगाई), हिरालाल कोटेचा, मोतीलालजी मंत्री, (बीड), माणिकचंद पहाडे, तात्यासाहेब महाजन, अच्युत देशपांडे, अण्णासाहेब वाळुंजकर, नागोराव पाठक (औरंगाबाद), राघवेंद्र दिवाण, आर. डी. देशपांडे (लातूर), गोपाळशास्त्री देव, श्यामराव बोधनकर, विनायकराव डोईफोडे (नांदेड), अच्युतराव खोडवे (हिंगोली), माधव बक्षी (देऊळगाव राजा), देवराम चव्हाण, व्यं. बा. जोशी (उस्मानाबाद), विनायकराव चारठणकर (सेलू), भगवानराव खोडवे, वासुदेव रंगनाथ भुसारी (परभणी), कालिदास देशपांडे (अहमदपूर), विठ्ठल जोशी (जालना), रंगनाथ कुलकर्णी (बीदर) इत्यादींना अटक झाली.

हैद्राबादेत श्रीधर रंगनाथराव कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील कृतीसमितीने विद्यार्थ्यांची एक मोठी मिरवणुक हैद्राबाद शहरातून काढली. मिरवणूक निझाम कॉलेजजवळ येताच विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यात आला. यानंतर भूमिगत राहून श्रीधरराव सत्याग्रहाचे काम सांभाळत होते. गुप्त पत्रके वाटून त्यांनी मराठवाड्यातील कार्यकर्त्यांशी संपर्क साधला व सत्याग्रहाची केंद्रे कार्यान्वित केली. अच्युतराव पटवर्धनही श्रीधररावांच्या सोबत होते. जगन्नाथराव बर्दापूरकर, त्र्यंबक पिंगळे, वासुदेवराव गावसुतकर, नरहरराव तुंगार यांची फळी श्रीधर कुलकर्णींनी उभी केली होती. भूमिगत राहून संघटनात्मक काम करत असताना श्री. रं. कुलकर्णी पकडले गेले व त्यांच्यासह ४२ कार्यकर्त्यांना पुण्याच्या तुरुंगात दीड वर्षे डांबून ठेवण्यात आले. १५ डिसेंबर १९४३ ला स्वामी रामानंद तीर्थ व अन्य पुढाऱ्यांची तुरुंगातून सुटका झाली. कम्युनिस्टांनी मात्र भारत छोडो चळवळ चालू असताना लोकराज्याची घोषणा देऊन जबाबदार राज्यपद्धतीच्या ध्येयालाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. (रामानंद तीर्थ, १९७६, पृ.१६१)

## अ. भा. प्रजा परिषदेचे योगदान:

१९२६ साली स्थापन झालेल्या अ. भा. प्रजा परिषदेने संघटनात्मक कामासाठी संपूर्ण भारतात ९ विभाग स्थापन केले होते. त्यापैकी एक विभाग हैद्राबाद संस्थानाचा होता. १९३५ साली अ. भा. प्रजापरिषदेच्या स्थायी समितीवर हैद्राबादचे वामन नाईक, राघवेंद्र शर्मा आणि काशिनाथ वैद्य यांची नियुक्ती करण्यात आली होती. १९३७ साली मच्छलीपट्टण येथे 'निझाम स्टेट पीपल्स ऑफिस' अशी शाखाही उघडण्यात आली होती.१९३९ साली प्रजा परिषदेने

निझामच्या तथाकथित राजकीय सुधारणा ह्या प्रतिगामी असून त्याज्य असल्याचेही सुस्पष्टपणे कळविले होते. १९४२ च्या लढ्यानंतर देशातील संस्थानांच्या प्रश्नात प्रजापरिषदेचे तत्कालीन अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनी लक्ष घालायला सुरुवात केली. १९४५ साली नेहरूंनी श्रीनगरला घेतलेल्या बैठकीत स्वामी रामानंद तीर्थ व काशिनाथ वैद्य उपस्थित होते. याच काळात निजामाने ब्रिटिशांशी मित्रत्वाचा करार असल्याने जबाबदार राज्यपद्धती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याचा पवित्रा घेतला होता, त्याचेही खंडन काश्मिर बैठकीत करण्यात आले. अ. भा. प्रजा परिषदेच्या उदयपूर अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ यांना स्थायी समितीचे सभासदत्व प्रदान करण्यात आले. १९४६ साली प्रजा परिषदेने वतीने हैद्राबाद सरकारने कॉंग्रेस संघटनेवरची बंदी उठवली नाही, तर कायदेभंगाचे आंदोलन केले जाईल असा इशारा दिला. १३ जून १९४६ ला नेहरूंनी हैद्राबादच्या पंतप्रधानांना स्टेट कॉंग्रेसवरची बंदी विनाशर्त उठविण्याविषयी पत्र पाठविले. अ. भा. प्रजा परिषद हैद्राबाद संस्थानाच्या प्रश्नात असे सातत्याने लक्ष घालीत होती.

### बंदी उठल्यानंतर :

१९४२ च्या आंदोलनानंतर संपूर्ण भारतात बदललेली राजकीय परिस्थिती पाहून निझाम सरकारने स्टेट कॉंग्रेसवर १९३८ पासून सलग ८ वर्षे लावलेली बंदी ३ जुलै १९४६ रोजी उठविली. तत्पूर्वीच उदयपूर येथे झालेल्या अ. भा. संस्थानी प्रजापरिषदेच्या अधिवेशनात स्टेट कॉंग्रेसची हंगामी समिती स्थापन करण्याची जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर सोपविण्यात आली होती. स्वामीजींनी १६ व १७ ऑगस्ट १९४६ रोजी आपल्या अध्यक्षतेखाली हैद्राबाद येथे स्टेट कॉंग्रेसच्या स्थायी समितीची बैठक घेऊन १७ जणांचे कार्यकारी मंडळ नियुक्त केले. २४ व २५ ऑगस्टला कार्यकारी मंडळाच्या बैठकीत दीड लाख सभासदांची नोंदणी करून १ लाख वर्गणी जमा करावी असा कृतिसंकल्प सोडण्यात आला. तसेच बंदीच्या काळात पर्यायी व्यवस्था म्हणून कार्यरत असलेल्या आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र परिषदांच्या विलीनीकरणाचा ठराव संमत करण्यात आला. १९४६ च्या अखेरीस महाराष्ट्र परिषदही स्टेट कॉंग्रेसमध्ये विलीन करण्यात आली व ४० सभासदांची नवी स्थायी समिती संघटित करण्यात आली. १ जानेवारी १९४७ रोजी बीदर येथे नवनियुक्त स्थायी समितीची सभा झाली. या सभेत जबाबदार राज्यपद्धती आणण्याचा संकल्प घेऊन पुढील वाटचाल करण्याचा ठराव पारित करण्यात आला. या सभेत मतभेद होऊन फाटाफूटही झाली. कम्युनिस्ट विचारधारेच्या गटाने हैद्राबाद हे भारतीय संघराज्याचा घटक होण्याऐवजी स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रक म्हणून अस्तित्वात राहावे अशी भूमिका घेतली व तो गट संघटनेतून बाहेर पडला. कॉंग्रेसमधल्या मवाळ-जहाल, पुरोगामी-प्रतिगामी, साम्यवादी-समाजवादी असे वैचारिक मतभेद वरती आले व त्यातून स्थायी समितीच्या काही सभासदांनी राजीनामे दिले. मात्र स्वामी रामानंद तीर्थ यांनी या सर्वांना राजीनामे परत घेण्याचे आवाहन केले व पुन्हा एकदा ६ ते ८ फेब्रुवारी १९४७ असे तीन दिवस हैद्राबाद येथे स्थायी समितीची बैठक घेतली. आपल्या संघटनात्मक भूमिकेची सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी एक पुस्तिकाही सभासदांना देण्यात आली.

तरीही एकमत होत नाही, असे पाहून स्वामीजींनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन आपण नेमलेले १७ जणांचे कार्यकारी मंडळही विसर्जित केले. यामुळे निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी तेलंगणातील चंद्रमौलेश्वर राव यांनी स्वामीजींनी राजीनामा परत घेण्याचा ठराव मांडला व तो पारित झाला. नवी कार्यकारिणी जाहीर करण्याचे आश्वासन देऊन स्वामीजींनी राजीनामा परत घेतला. यानंतर कामांना वेग आला. जून १९४७ पर्यंत स्टेट काँग्रेसने ठरविलेल्या लक्ष्यापेक्षा जास्त म्हणजे २,२५,००० सभासदांची नोंदणी झाली. नव्या नोंदणीकृत सभासदांमधून निवडणुका झाल्या व पुन्हा एकदा स्वामी रामानंद तीर्थ अध्यक्षपदी निवडून आले. २९ जून ते १ जुलै १९४७ या काळात स्वामीजींनी सोलापूरात कार्यकारिणीची बैठक घेऊन पुढच्या लोकलढ्याची प्रदेशवार जबाबदारी विभागून दिली. तेलंगणची जबाबदारी एम. रामचंद्र राव यांच्याकडे, कर्नाटकची मुरलीधरराव कामतीकरांकडे, हैद्राबाद-सिकंदराबादची डॉ. मेलकोटेकडे व मराठवाड्याची जबाबदारी गोविंदभाई श्रॉफ यांच्याकडे सुपूर्त केली.

**लढ्याची सुरुवात :**

स्टेट काँग्रेसवरची बंदी उठल्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली १९४६ ते १९४८ या दोन वर्षात हैद्राबाद संस्थानातील जनतेने निझाम राजवटीविरुद्ध निर्णायक लढा उभा केला. ७ ऑगस्ट हा संघराज्यात सामील होण्याचा दिन प्रभातफेऱ्या काढून व तिरंगा फडकावून साजरा करण्याचे ठरविले. सरकारच्या सर्व कार्यक्रमांवर बहिष्कार, लेव्ही भरण्यास नकार, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींचे राजीनामे, बँकातल्या ठेवी काढून घेणे, शेतकऱ्यांनी लेव्ही नाकारणे अशी व्यूहरचना ठरविण्यात आली. ७ ऑगस्ट १९४७ रोजी ठरल्याप्रमाणे हैद्राबाद शहरात व संस्थानात सर्वत्र लोकांनी मिरवणुका काढून व तिरंगा ध्वज फडकावून प्रत्यक्ष लढ्याला सुरुवात केली. प्रत्येक जिल्ह्यातून लोकांच्या मागण्यांसंबंधी पत्रे व तारा पाठविण्याचा भडिमार झाला. मराठवाड्यात ११७ केंद्रांवर हा दिवस साजरा करण्यात आला. संपूर्ण संस्थानात १०४६ खेड्यात सामुदायिक झेंडावंदन झाले. ठिकठिकाणी ५५८८ सत्याग्रहींना अटक झाली. हैद्राबादेत स्वामीजींना व कृष्णाचार्य जोशींना, उदगीरला पुरुषोत्तम चपळगावकर, उमरग्याला देवीसिंह चौहान इत्यादी मराठवाड्यातील ४०० हून अधिक लोकांना अटक झाली. काँग्रेसच्या चळवळीची प्रतिक्रिया म्हणून इत्तेहादुल मुस्लिमीन या संघटनेने १५ ऑगस्ट हा हैद्राबाद दिन म्हणून साजरा करण्याचे फर्मान काढले. उस्मानिया विद्यापीठात लावलेल्या तिरंगा ध्वजाच्या काही मुसलमान विद्यार्थ्यांनी फाडून चिंध्या केल्या; परभणीला पोस्टाच्या इमारतीवर फडकावलेला तिरंगा काढून निजामाचा ध्वज लावण्याची प्रतिक्रिया उमटली. १३ ऑगस्ट १९४७ रोजी एका सरकारी हुकूमान्वये "कोणत्याही परराष्ट्राचा ध्वज सार्वजनिक स्थळी फडकाविण्यास मनाई" करण्यात आली.

स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांना अटक झाल्यावर विजयवाडा येथे दिगंबरराव बिंदू यांच्या अध्यक्षतेखाली कृतिसमितीची आणीबाणीची बैठक झाली. या बैठकीत आंदोलन पुढे चालू ठेवण्याचा निर्धार कायम ठेवून २ सप्टेंबर हा ध्वजदिन म्हणून पाळण्याचे घोषित करण्यात आले. विद्यार्थी संघानेही ८ सप्टेंबर हा दडपशाहीचा निषेध दिन म्हणून

पाळण्याचा आदेश दिला. त्याची विरोधी प्रतिक्रिया तत्काळ उमटली. १५ सप्टेंबर हा हैद्राबाद दिन म्हणून पाळण्याचे मुस्लीम संघटनांनी फर्मान काढले. सरकारने हैद्राबादेतील मुसलमान विद्यार्थ्यांना शस्त्रे देण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थी संघटनांनी ८ सप्टेंबरला हैद्राबाद-सिकंदराबाद, जालना, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी मिरवणुका काढून निषेध दिन पाळला. हैद्राबादच्या मिरवणुकीवर पोलिसांनी व रझाकारांनी लाठीहला केला, त्यात २४ विद्यार्थी जखमी झाले. राज्यभरात ७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर १९४७ या काळात ३६२१ लोकांना अटक करण्यात आली. त्यात मराठवाड्यातल्या १५१७ लोकांचा समावेश होता. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सर्व स्तरातील लोकांचा सक्रिय सहभाग होता. या लढ्याच्या काळात ४४०० विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालयांचा त्याग केला; २८७ वकिलांनी न्यायालयीन कामावर बहिष्कार टाकला, ७२३ पाटील पटवाऱ्यांनी राजीनामे दिले. २००० स्त्रिया व व्यापाऱ्यांनी हरताळ पाळला. १,२२,००० शिंदी, ताड व मोहाची झाडे तोडण्यात आली. २७० खेड्यांनी लेव्ही देण्यास नकार दिला. नांदेड जिल्ह्यातील टेळकी व डोर्ली येथील जंगल सत्याग्रहात अनुक्रमे ६ व ४ जण ठार झाले. परभणी जिल्ह्यातल्या कांडलीच्या जंगल सत्याग्रहात दहा हजार शेतकरी व १५०० स्त्रियांनी भाग घेतला. या सत्याग्रह चळवळीत ६० कार्यकर्ते शहीद झाले. (भालेराव, १९८७, पृ. ३५१-३५२)

१९४७ साली ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात या लढ्याने भूमिगत चळवळ सक्रिय केली. भूमिगत चळवळ चालविण्यासाठी संस्थानाबाहेर मराठवाड्यातील कारवाईचे सुकाणू केंद्र मनमाडला आ. कृ. वाघमारे व श्रीनिवास बोरीकर यांच्या नियंत्रणाखाली; तेलंगणसाठी विजयवाड्यास, कर्नाटकसाठी गदगला सुकाणू केंद्र स्थापन करण्यात आले. शिवाय जिल्हा केंद्रे स्थापून अंतर्गत व्यवस्थापनजाल (नेटवर्क) निर्माण करण्यात आले. शिरुभाऊ लिमये, उत्तमराव पाटील, बाबासाहेब परांजपे यांच्याकडून भूमिगतांना प्रशिक्षण देण्यात आले. [७] पुण्यात रामभाऊ देशमुख यांच्या जागेत बॉम्बचे शेल्स व त्यात भरावयाची स्फेटके यांचा कारखाना काढण्यात आला. सोलापूरात माणिक ऑईल मिलमध्ये बळवंत नागणे व व्यासाचार्य संदीकर यांच्या देखरेखीखाली बॉम्ब तयार होऊ लागले. नागपूर आणि पुण्याहून रिव्हॉल्वर्स पुरवले जाऊ लागले. मध्यप्रांत सरकारातील मुख्य सचिवांनी नागपूर व जबलपूरहून शस्त्रास्त्र पुरवठा केला. शस्त्रास्त्रांची ने-आण करण्यासाठी १००० गॅलन पेट्रोलचे कूपन दिले. नागपूरला सीताबर्डी किल्ल्यावर लष्करी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. इंदूरलाही एक पुरवठा केंद्र उघडण्यात आले.

रेल्वे रूळ उखडणे, तारा तोडणे, रस्ते, पूल यांची नासधूस करणे अशा मार्गांनी भूमिगत चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी सरकारी व्यवस्था विचलित करण्यावर भर दिला . सरकारी गुदामे लुटून तिथले धान्य जनतेत वाटून देण्यात आले. सरकारी कचेऱ्यातले दप्तर जाळण्यात आले. ७२३ पाटील-कुलकर्ण्यांचे राजीनामे घेऊन सरकारी यंत्रणा खिळखिळी करण्यात आली. डिसेंबर ४७ व जानेवारी १९४८ या दोन महिन्यात कस्टम नाक्यावर हल्ले, धान्य गुदामे लुटणे, सरकारी कार्यालयांवर हल्ले करणे असे एकामागून एक सरकारची कोंडी करण्याचे प्रयत्न झाले. पोलिस ठाण्यांवर हल्ले करून रायफली पळविण्यात आल्या. ३० जानेवारी १९४८ रोजी

उमरीची स्टेट बँक लुटली. आर्यसमाजी धनजीभाई पुरोहित, लष्कारातील सेवानिवृत्त सैनिक रघुनाथराव रांजणीकर यांनी बँक लुटण्यासाठी पद्धतशीर व्यूहरचना केली होती. अनंत भालेराव, आबासाहेब लहानकर, आ. साहेबराव बारडकर आणि नागनाथराव परांजपे यांच्या नेतृत्वाखाली चार तुकड्यांची योजना आखण्यात आली होती. मदतीला देविदास गिरगावकर, दिगंबरराव उत्तरवार, तोष्णीवाल, किशोर शहाणे, शंकरलाल शर्मा इत्यादींची कुमक होती. बँक लुटल्यावर सर्व रक्कम बैलगाडीतून उमरखेडला नेण्यात आली. २१,१७,२०० रुपयांची लुटीची रक्कम पुणेमार्गे सोलापूरला मुक्तिलढ्याच्या कार्यालयात नेऊन दिगंबरराव बिंदू व गोविंदभाई श्रॉफ यांच्या स्वाधीन करण्यात आली. शेवटच्या टप्प्यात फेब्रुवारी ते ऑगस्ट १९४८ या काळात थेट सशस्त्र लढ्याचा मार्ग पत्करून आक्रमक पवित्रा घेण्यात आला. मुखेड, धर्माबाद, उमरी, करखेली, नांदेड, लिंबगाव येथे रेल्वे रूळ उखडण्यात आले. परभणी-औरंगाबाद, मनमाड-सिकंदराबाद मार्गावर अनेक ठिकाणचे रेल्वे रूळ उखडण्यात आले. तारा तोडण्यात आल्या. मुदखेड, मुगुट, थेरबन ही रेल्वेस्टेशने जाळली. बीड शहरातल्या अधिकारी क्लबवर बॉम्ब टाकण्यात आला. हैद्राबादचे बडी चावडी पोलिस स्टेशन डायनामाइट लावून उडवून दिले. अबिद पोलिस स्टेशन उद्ध्वस्त केले. हैद्राबादेतल्या चार सिनेमागृहांना एकाच वेळी बॉम्बने उडविण्याचा प्रयत्न झाला, त्यात एक बॉम्ब तेवढा कामी आला नाही. इतकेच नाही तर खुद्द निझामवरही बॉम्ब टाकण्याचा प्रयत्न झाला. ४ डिसेंबर १९४७ रोजी रात्री ८ वाजता निझाम किंगकोठीतून आपल्या मोटारीने बाहेर पडताच ४ युवकांनी संगनमत करून मोटारीवर बॉम्ब फेकला. मात्र मोटारीच्या दाराला लागून तो बाहेर पडल्याने निझाम वाचला. बॉम्ब फेकणाऱ्यांपैकी नारायण पंढरीनाथ पवार व गंगाराम पालमकोल यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

१९४७ साली 'माऊंटबॅटन योजना' जाहीर झाल्यावर निजामने आपले संस्थान भारतात विलीन करण्याऐवजी स्वतंत्र ठेवण्याचा निर्धार केला. प्रसंगी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून संरक्षण व मान्यता मिळवू असा पवित्रा घेतला. स्टेट काँग्रेसने संघराज्याच्या सामीलनाम्यावर स्वाक्षरी करून भारतीय संघराज्याचे घटक होण्याचे आवाहन केले, पण निजामाने ते फेटाळले. जुनागड संस्थाननेही भारतात विलीन व्हावयास नकार दिला होता. तेव्हा त्या संस्थानांवर पोलिस कारवाई करून संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आले. या कारवाईत जुनागडच्या राजाला अपेक्षित असलेली लष्करी मदत पाकिस्तानकडून मिळाली नाही. हे पाहता निजामाने २९ नोव्हेंबर १९४७ रोजी एक वर्षासाठी "जैसे थे" स्थिती ठेवण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. त्यानुसार १४ एप्रिल १९४८ पर्यंत भारतीय फौजा बोलाराममधून काढून घेण्याचे मान्य झाले. २४ डिसेंबर १९४७ ला उमराव सालरजंग यांचे पुत्र मीर लायक अलीने आपले मंत्रिमंडळ स्थापन केले. मंत्रिमंडळात इत्तेहाद व निजाम सरकारला अनुकूल असलेल्यांना प्राधान्य मिळाले. या मंत्रिमंडळाने अधिकारग्रहण केल्यावर लगेचच 'जैसे थे' कराराचे उल्लंघन करण्यास प्रारंभ केला. एका वटहुकूमान्वये हैद्राबाद प्रांतात भारतीय चलन चालणार नाही, असे फर्मान जारी करण्यात आले. दुसऱ्या वटहुकूमान्वये हैद्राबाद संस्थानातून कोणतेही मौल्यवान धातू बाहेर नेण्यास बंदी घालण्यात आली. शिवाय पाकिस्तानला २७ कोटी

रुपयांचे कर्ज मंजूर केले. जगभर भारतविरोधी प्रचार करण्याची मोहीम सुरू केली. हिंदुस्थानने हैद्राबादवर हल्ला केला तर इराकचे लोक जिहाद पुकारतील अशी धमकी देणारे वार्तापत्र १६ जून १९४७ च्या बगदाच्या 'अखबारूल्कदर' या पत्राने प्रसिद्ध केले. १६ जून १९४७ च्या 'रहबर'मधील बातमीप्रमाणे कैरोच्या अरब युनियन पार्टीने भारत सरकारने हैद्राबादविरोधी कारवाई केल्यास इस्लामी जगतात हलकल्लोळ माजेल असा इशारा दिला व हैद्राबाद संस्थानला स्वतंत्र राहण्याचा अधिकार असल्याचे समर्थन केले.

हैद्राबाद संस्थानात १९२८ पासून क्रियाशील असलेल्या व निझाम सरकारच्या मर्जीतल्या इत्तेहादुल मुस्लिमीन ही धर्माधिष्ठित सांस्कृतिक राजकारण करणारी संघटना होती. या संघटनेने मोगलकाळापासून आम्ही राज्यकर्ते असून हैद्राबाद हेच खरे व ज्येष्ठ पाकिस्तान असल्याची भूमिका घेतली. या संघटनेने निझामासही निवेदन देऊन बादशहा आसफजाही वंशाचा असला पाहिजे, राज्यव्यवस्थेत बदल करायचा प्रसंग आला तरी राज्याचे धर्मखाते कायम ठेवण्यात यावे, कायदेमंडळात व स्वराज्यसंस्थांत मुसलमानांची बहुसंख्या असणारी रचना असावी, सरकारी नोकऱ्यांत लोकसंख्येच्या प्रमाणाचा निकष न लावता मुसलमानांनाच प्राधान्य देणारे नियम तयार करावेत, उर्दू हीच राजभाषा असावी अशा प्रकारच्या बंधनांचा आराखडा सादर केला होता. (भालेराव, १९८७, पृ. २६१)

इत्तेहाद मुस्लिमीन या संघटनेचा अध्यक्ष कासिम रझवी याने १९४० साली या संघटनेला शिस्तबद्ध रझाकार संघटनेची जोड देऊन आक्रमक रूप दिले. कार्यपद्धतीसाठी घटना तयार केली. रझाकारांचा श्रेष्ठ अधिकारी 'अफसरे अला' म्हणून सय्यद एहसान याची नेमणूक केली. हैद्राबाद संस्थानच्या प्रत्येक खेड्यात व हैद्राबाद शहराच्या प्रत्येक गल्लीत रझाकार संघटनेची शाखा, शाखेचे काम पाहण्यासाठी एक 'सालार' (शाखा प्रमुख), प्रत्येक शाखेत ३० रझाकार अशी लष्करी शिक्षण घेतलेल्या स्वयंसेवक दलाची उभारणी करण्यात आली. लष्करी शर्ट, खाकी पँट, काळी फेजटोपी असा रझाकाराचा गणवेश ठरविण्यात आला. प्रत्येक रझाकाराला तलवार,जांबिया, ६० रुपये वेतन व प्रवासभत्ता दिला जाई. इत्तेहादचा ध्वज हा रझाकार संघटनेचाही ध्वज असे. निझाम सरकारने दोन लाखांपर्यंत रझाकार सेना वाढविण्यासाठी मदत केली. रझाकारांनी संपूर्ण संस्थानात आपली दहशत निर्माण केली होती.

१९४७ साली नोव्हेंबर महिन्यात रझाकारांनी निरनिराळ्या वस्त्यात फिरून दहशत प्रस्थापित केली. हिंदू धनिकांची घरे जाळावीत, हिंदूंच्या शेतजमिनी व बँका ताब्यात घ्याव्यात, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची घरे जाळावीत, त्यांच्याकडून प्रतिकार झाल्यास काँग्रेसजनांना ठार करावे, काँग्रेसजनांच्या घरांवर पहारा ठेवून त्यांना घरातून पळून जाऊ देऊ नये, जिल्हा व शहरातील कचेऱ्या जाळाव्यात अशा सूचना रझाकारांना देण्यात आल्या होत्या. (भालेराव, १९८७, पृ. २६१-२६९) त्यानुसार रझाकारांनी फेब्रुवारी १९४८ ते मे १९४८ या काळात बिदर जिल्ह्यातील १२९ खेडी लुटली. १,००० घरे जाळली. १० मे १९४८ रोजी ३०० रझाकारांनी व पोलिसांनी मिळून गोरटे गावाला वेढा घातला, ४०० घरांना आगी लावल्या, २०० माणसे जाळून मारण्यात आली. उस्मानाबाद जिल्ह्यातील चिलवडी गावाने निझाम

सरकारला कधीच लेव्ही दिली नाही म्हणून सूडबुद्धीने उस्मानाबादचे कलेक्टर महंमद हैदरी यांच्या चिथावणीने एक हजार रझाकारांनी हे संपूर्ण गाव जाळून टाकले. चार दिवस गाव जळत होते. गावातली १७ माणसे व १ प्रसूत माता जळून खाक झाली. (भालेराव, १९८७, पृ. २८८-२८९; ३८१) हिंदूंची मालमत्ता लुटणे, जाळपोळ, स्त्रियांची अब्रू लुटण्याचे प्रकार सुरू झाले. बळजबरीने अस्पृश्यांना इस्लामची दीक्षा दिली जाऊ लागली. निजाम सरकारने १२,००० लोकांना तुरुंगात डांबले. रझाकारांनी केलेल्या अत्याचाराचा निषेध म्हणून श्री. रामाचारी यांनी ४० दिवसातच आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला

हैद्राबाद संस्थानच्या मुक्तिलढ्यात रझाकारांचा प्रतिकार करण्यात अस्पृश्यांचाही मोठा सहभाग होता. जांब (बु) येथील हणमंता साधु गायकवाड, लातूरचे कोंडीबा जयराम टेकाळे, औरंगाबादचे भाऊसाहेब मोरे, नांदेडचे कडकनाथ हटकर, हनुमंतराव मोरे, लोहा येथील माधवराव महाबळे, कुरुंदचे सुदाम, येरमाळचे कांबळे, भूमचे साठे, कळंबचे भगवानराव गायकवाड, आबासाहेब बनसोडे, शहाजी कदम, ज्ञानदेव कांबळे, सोपानराव बनसोडे इत्यादी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्यकर्ते हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सक्रिय होते. यातल्या बहुतेकांना निजामचा तुरुंगवास भोगावा लागला. (नरवडे,१९८८,पृ.५४-५५) हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्यांनी धर्मांतर करू नये, वाटल्यास भारतभूमीत येऊन आश्रय घ्यावा असे आवाहन डॉ. आंबेडकरांनी केले. त्यांनी म्हटले होते की, "धर्मांतराच्या बाबतीत माझ्या अस्पृश्य बांधवांना माझे असे निक्षून सांगणे आहे की, मुसलमानांच्या छळापासून आपला बचाव करण्यासाठी म्हणून सुखासुखी धर्मांतर करू नका. धर्मांतर करण्यापेक्षा त्यांनी मेलेले बरे. .. कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही संकटे ओढवली तरी निजामाला आणि इत्तेहादुल मुसलमीनला साथ देता कामा नये. .. निजाम हा स्वातंत्र्याचा शत्रू आहे. त्या स्वातंत्र्याच्या शत्रूबरोबर जर अस्पृश्यांनी संगनमत केले तर त्यांचा घात होईल. निजाम हा हिंदुस्थानचा, आपल्या मातृभूमीचा शत्रू आहे ही गोष्ट अस्पृश्यांनी लक्षात घेतली पाहिजे. .. इत्तेहादुल मुसलमानावर विश्वास टाकण्यापेक्षा हिंदूंचा विश्वास संपादन करण्यात त्याला जास्त सुरक्षितता आहे.. हिंदुस्थान हे आपले घर आहे, आपले वतन आहे, ही गोष्ट अस्पृश्यांनी विसरू नये." (नरवडे, १९८८, पृ. ५३-५४)

## पोलीस कारवाई :

२१ मार्च १९४८ रोजी माऊंटबॅटन भारत सोडून मायदेशी परत गेल्यावर राजगोपालाचारी भारताचे गव्हर्नर जनरल झाले. लष्करप्रमुख अचिनलेक यांची जागा जनरल करिअप्पा यांनी घेतली. भारत सरकारने हैद्राबादचे नाणे बेकायदेशीर ठरवले. २६ जुलै १९४८ रोही सोलापूर बार्शी रस्त्यावरील हैद्राबाद संस्थानातले नानज गाव भारत सरकारने ताब्यात घेतले. लढाई करण्यापेक्षा हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे न्यावा ही निजाम सरकारची विनंती भारत सरकारने फेटाळली. ७ सप्टेंबर १९४८ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हैद्राबाद संस्थान ताब्यात घेण्यासाठी लष्करी कारवाई करण्याचा निर्णय झाला. दरम्यान १० सप्टेंबरला हैद्राबाद संस्थानच्या परराष्ट्रमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पॅरिसला जाऊन प्रेसिडेंट ट्रूमन यांना भेटले व हैद्राबादचा प्रश्न युनोत चर्चेला घेण्याची विनंती करण्यात आली. ट्रुमन यांनी हा

भारताचा अंतर्गत प्रश्न असून त्यात आपण लक्ष घालू इच्छित नसल्याचे सांगितले. ११ सप्टेंबरला बॅ. जिना वारले; त्यामुळे हैद्राबादची कारवाई पुढे ढकलावी,असे जवाहरलाल नेहरूंचे मत होते. परंतु त्याआधीच लष्कराला आदेश दिले गेले होते व ठरल्याप्रमाणे १२ सप्टेंबरच्या उत्तररारात्री दीड वाजता भारतीय सैन्य चहुबाजूने हैद्राबाद संस्थानात घुसले. सोलापूर-नळदुर्ग, मनमाड-औरंगाबाद, वऱ्हाड-जालना, हिंगोली-चांदा, आदिलाबाद-बेजवाडा, वरंगल-नलगोंडा, रायपूर-होसपेट मार्गे सैन्याने हैद्राबाद संस्थानावर ताबा मिळवायला सुरूवात केली. हैद्राबादची सरहद्द २५८० मैलांची होती. १३ सप्टेंबर १९४८ रोजी लष्करी कारवाई सुरू झाली होती, तिचा शेवट १७ सप्टेंबर १९४८ रोजी संध्याकाळी ५ वाजता निजामच्या शरणागतीनंतर झाला. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले. १८ सप्टेंबरला लायक अली मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना स्थानबद्ध करण्यात आले. १९ सप्टेंबरला रझाकारी सेनेचे प्रमुख कासीम रजवी यांना अटक करण्यात आली. जे. एन. चौधरी यांनी लष्करी राज्यपाल म्हणून हैद्राबादची सूत्रे हाती घेतली. (नरवडे,१९८८, पृ. ५७-५८) या १०९ तासांच्या कारवाईत हैद्राबाद संस्थानचे सैनिक व रझाकार मिळून १२०० लोक ठार झाले. ४५० रझाकारांना अटक झाली. हिंदी लष्कराचेही १० जवान शहीद झाले. नंतरच्या काळातही १५६५४ रझाकार पकडले गेले. (भालेराव, १९८७, पृ. ४६३) लष्करी कारवाई संपताच स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. चौधरी यांच्या लष्करी प्रशासनाखेरीज नागरी प्रशासनाची व्यवस्था पाहण्याचे काम एम. के. वेलोडी हे पाहू लागले. चौधरींनी हैद्राबादेतील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी व मुसलमानांचा विश्वास संपादित करण्यासाठी सल्लागार मंडळाची पुनर्रचना करण्याचा सल्ला दिला. मात्र सरदार पटेलांनी हा सल्ला मानला नाही.

**हैद्राबाद संस्थानातले राजकीय प्रवाह :**

आतापर्यंतच्या विवेचनाचा सार काढायचा झाल्यास हैद्राबाद संस्थानातील राजकारणात स्थूलमानाने चार प्रवाह क्रियाशील होते :

१. मुस्लीम वर्चस्ववादाचा कडवा प्रतिकार करणारा आर्यसमाजवासीयांचा गट.

२. निझामशी कडवा विरोध न करता आपापले हितसंबंध जोपासणारा; आणि सत्तेसाठी राजकीय संघटनेचा वापर करवून घेणारा 'मवाळपंथीय' राजकारण्यांचा गट. पक्षीय अस्मितेची बांधिलकी बाजूला ठेवून स्टेट कॉंग्रेसचे नामांतर करण्याच्या निझामच्या प्रस्तावापुढे ह्या गटातले नेते झुकले होते. या गटाने इत्तेहादुल मुस्लिमीनशी समझोता करून आझाद हैद्राबादला पाठिंबा दिला होता. गांधीजींच्या वैयक्तिक सत्याग्रहात वा १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाशी या गटाची बांधिलकी नव्हती. काशिनाथराव वैद्य, विनायकराव विद्यालंकार, सिराजुल हसन तिरमिजी, एम. नरसिंगराव, इत्यादी नेते या गटात होते.

३. नागरी हक्कांच्या संरक्षणासाठी जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणारा, गांधीजींच्या मूल्याधिष्ठित नेतृत्वाला मानणारा जहाल राजकारण्यांचा गट. या गटाने हैद्राबाद संस्थानचे स्वतंत्र अस्तित्व न ठेवता भारतीय संघराज्यात विलीन करण्याच्या भूमिकेचा आग्रहाने

पुरस्कार केला होता. स्वामी रामानंद तीर्थ हे या गटाचे नेते होते. गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, श्रीनिवास बोरीकर, पुरुषोत्तमराव चपळगावकर, श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, पी. व्ही. नरसिंहराव, के. व्ही. नरसिंहराव, गोपाळशास्त्री देव, आनंदराव वाघमारे इत्यादींच्या सामूहिक नेतृत्वाने ह्या गटाने आपली राजकीय वाटचाल केली. कॉंग्रेसमधील बी. एस. महादेवसिंह, बसवराज, विजयेंद्र काब्रा, सीताराम पिसोळकर इत्यादी कार्यकर्त्यांचा समाजवादी गटही या जहाल गटाच्या विचारसरणीशी फटकून रहात नव्हता.

४. कम्युनिस्ट विचारसरणीशी बांधिलकी ठेवणारा, शेतकरी व कामगार वर्गाच्या हितसंबंधांसाठी संघर्ष करणारा गट. हैद्राबादला स्वतंत्र राष्ट्र म्हणून वेगळे ठेवण्याची व भारत-पाकिस्तान द्विराष्ट्रवादाचे समर्थन करण्याची भूमिका कम्युनिस्टांनी घेतली होती. कॉ. चंद्रगुप्त चौधरी, काशिनाथराव वैद्य, गोविंदराव नानल, रवि नारायण रेड्डी, बी. रामकृष्ण राव, कोंडे व्यंकट रंगारेड्डी , डॉ. सी. रामाराव हे या गटाचे नेतृत्व करीत होते.

## मुक्तिलढ्याचे लोकसांस्कृतिक पैलू :

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात जनजागृतीसाठी लोकांच्या मनोधारणा ज्या सांस्कृतिक परंपरांनी संस्कारित झालेल्या आहेत, अशा भजन-कीर्तन-पोवाड्यांच्या माध्यमांचा राजकीय वापर करण्यात आला. उस्मानाबाद जिल्ह्यातील येळवटचे जमीनदार श्यामराव पाटील यांनी साराबंदी आंदोलनाचे बीज शेतकऱ्यांच्या मनात पेरण्यासाठी सार्वजनिक लोकस्थळी निरंजन स्वामींच्या भजनांच्या गायनाचा उपक्रम आखला. गळ्यात वीणा, हातात चिपळ्या आणि मुखी भजनाचा अभंग घेऊन सार्वजनिक ठिकाणी एक मंत्रभारला पैस निर्माण करायचा, श्रवणसुखात रमलेल्या लोकांच्या मनावर मग हलकेच पोवाड्याची थाप मारून साराबंदीचे जागरण सुरू करायचे अशी क्लृप्ती योजिली होती. या सांस्कृतिक लोकाविष्काराच्या प्रभावामुळे लिंबाळा, हरेगाव, मंगळूर, लोहारा गावातील रयतेने सारा वसुलीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना गावठी शहाणपणाची व्यूहनीती वापरून गावातून पळवून लावण्याचा यशस्वी लढा दिला. अधिकारी गावात येण्यापूर्वीच पुरुष गाव सोडून जायचे; स्त्रियांनी मग गोवऱ्यांचा मारा करून अधिकाऱ्यांना पिटाळून लावायचे. शरीर जखमा करण्याचे दगडफेकीसारखे हिंसात्मक उपकरण न वापरता गोवऱ्यांचे स्त्रीवादी अहिंसक अस्त्र वापरण्याचे शहाणपण या महिलांनी दाखविले होते. एवढे झाल्यावर निझाम शासनाने श्यामराव पाटलांच्या पायात बेड्या ठोकून उमरगा, उस्मानाबाद, गुलबर्गा भागातून अनवाणी फिरवून आपले क्रौर्य सिद्ध केलेच! सरकारी जुलुमाचा अहिंसावादी पद्धतीने निषेध व्यक्त करण्याचे बरेच नमुने हैद्राबाद मुक्तिसंग्रामात पहायला मिळतात. उदाहरणार्थ, लेव्ही वसुलीला आलेल्या अधिकाऱ्यांसमोर किरगुळच्या शेतकऱ्यांनी आपले नाव पुकारताच हातात शस्त्र घेऊन अधिकाऱ्यासमोर जायचे, 'जयहिंद' म्हणायचे आणि वसुली न देताच निघून यायचे, असाही सत्याग्रह झाला होता. (भालेराव, १९८७, पृ. २८७)

लोकहितार्थ संघर्ष करताना बळी गेलेल्या व्यक्तीविषयी लोकांच्या सामूहिक नेणिवेत जे श्रद्धास्थान उदयाला येते त्यातून त्यांचे वीरगळांत म्हणजे लोकदैवतात रूपांतर होते. सामूहिक अभिचारातून ही दैवतिकरणाची प्रक्रिया कशी घडते याचा एक उत्तम नमुना हैद्राबाद

मुक्तिसंघर्षात बळी गेलेल्या गोविंदराव पानसरेंच्या स्मारकातून पहायला मिळतो. १४ ऑक्टोबर १९४६ रोजी कोंडलवाडीस गोविंदराव पानसरेंचे लोकजागरण करणारे प्रभावी भाषण झाले. निझाम सरकारने त्यांना अटक केली व २१ ऑक्टोबर १९४६ रोजी जामीनावर सुटका केली. तेथून गावी परत येत असताना अर्नापूर येथे रझाकारांच्या मुस्लीम टोळीने त्यांच्यावर तलवारीचे वार करून खून केला. लोकहितास्तव लढणाऱ्या पानसरेंच्या या अमानुष खूनाची संपूर्ण हैद्राबाद संस्थानात तीव्र प्रतिक्रिया उमटली. स्थानिक परिसरातील लोकांनी अर्नापूरला जेथे खून झाला त्या जागी एक दगडाचा चिरा ठेवला व त्याला शेंदूर फासून पानसरेंचे दैवी स्मारक उभे केले. सोमवारच्या दिवशी हा खून झाला होता, म्हणून दर सोमवारी पानसरेंचा आत्मा या ठिकाणी येऊन दर्शन देतो अशी लोकसमजूत परिसरात निर्माण झाली व तेव्हापासून दर सोमवारी अर्नापूरात या शेंदरी चिऱ्याजवळ लोकजत्रा भरू लागली. ह्या ठिकाणी पानसरेंची समाधी बांधली गेली. लोकमानसातली ही अंधश्रद्धा पुसली जावी व कार्यकर्त्यांच्या बलिदानाविषयी डोळस, वैचारिक आकलन रूजवावे या हेतूने ६ जानेवारी १९४७ रोजी काँग्रेसने समाधीस्थळी सभा घेतली. त्यावेळी निझामच्या पोलिसांनी जमावात व्हॅन घुसवल्याने संतप्त जमावाने पोलिसांना घेराव घातला. पोलिसांनी गोळीबार करून चार जणांचा जीव घेतला. नंतरही निझाम सरकारने हा ओटा पाडून टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु लोकमानसातले हे श्रद्धास्थान अढळ राहिले. पुढे हे स्थळ *'पानसरे मैदान'* या नावाने ओळखले जाऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने येथे हुतात्मा स्मारकाची इमारत बांधली; धर्माबादच्या हायस्कूलला आणि नांदेडच्या पीपल्स कॉलेजच्या ग्रंथालयाला पानसरेंचे नाव देऊन त्यांच्या बलिदानाचे डोळस स्मारकही लोकांनी उभे केले. थोडक्यात लोकहितास्तव बळी जाणाऱ्या व्यक्तीचे वीरगळात रूपांतर होण्याची प्रक्रिया आपल्याला गोविंदराव पानसरेंच्या स्मारकातून पहायला मिळते.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामातला स्त्रियांचा सहभाग ही फार मोठी जमेची बाजू होती. १९३७ च्या सेलूच्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर स्त्रियांनी सहभाग नोंदवला होता. स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्त्रियांच्या या उत्साहाची आणि सामिलकीची दखल घेऊन स्त्रियांकडून या आंदोलनात नेमके कोणते योगदान अपेक्षित आहे, याची चर्चा केली. स्वामीजींच्या मते भूमिगतांना व स्वातंत्र्यवीरांना संरक्षण देण्याची महत्त्वाची भूमिका स्त्रियांनी निभवावी. पुरुषांनी सत्याग्रह करावेत व त्यांना अटक झाल्यानंतर पिछाडी स्त्रियांनी सांभाळावी. या जाणीवजागृतीने भारलेल्या स्त्रियांनी रात्री-अपरात्री सत्याग्रहींना जेऊ घालणे, पोलिसांच्या धाडीपासून सत्याग्रहींचा बचाव करण्यासाठी माहिती लपविणे; शिपाई घराची झडती घेताना गलिच्छ भाषा वापरून मानभंग करीत, पण न डगमगता स्त्रियांनी ही पिछाडीची बाजू लढवली. प्रसंगी गोवऱ्यांचे अस्त्र घेऊन पोलिसांना पिटाळताना त्या कचरल्या नाहीत. सिल्लोड तालुक्यातल्या शेळकेबाईंनी भजने गाऊन राष्ट्रीय जागरणाची भूमिका निभावली. बीड जिल्ह्यातल्या पार्वतीबाई रामलिंग स्वामी, उस्मानाबादच्या सुशिलाबाई दिवाण, सेलूच्या शांताबाई चारठणकर, परभणीच्या शांता पेडगावकर, नांदेडच्या शकुंतलाबाई

साले, कावेरीबाई बोधनकर, ताराबाई परांजपे, औरंगाबादच्या आशाताई वाघमारे अशा कितीतरी महिलांनी हैद्राबाद मुक्तिसंग्रामात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी पुढाकार घेतला होता. (काळे भगवान,१९८६, पृ. २८२-२८४)

हैद्राबाद लढ्याला महाराष्ट्रातून जशी मुक्तहस्ते मदत मिळाली, तशी काहींनी खळखळही केली. मध्यप्रांत सरकारच्या तुलनेत मुंबई प्रांतातील खेर-मोरारजी यांच्या सरकारकडून या लढ्याला अपेक्षित मदत मिळाली नाही, उलट शस्त्रास्त्र प्रकरणी बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैशंपायन यांच्यावर पकड वॉरंटे काढण्यात आली. मुंबई पोलिसांनी अनंत भालेराव, शंकरराव पाटील, सदाशिव चौधरी यांना दीड महिना तुरुंगात डांबून ठेवले. मुंबई प्रांताच्या सरहद्दीवरील कॅम्प बंद करण्याच्या नोटीसा पाठविण्यात आल्या. कोल्हापूरच्या महाराजांनीही निजामला आपण भाऊ मानले असल्यामुळे व धर्म वेगळे असले तरी एकाच बोटीतले सहप्रवासी असल्याने निजामविरूद्ध मदत करण्यास असमर्थता दाखविली. (भालेराव, १९८७, पृ. ३६२-३६३) इतिहासाच्या वाटचालीत असे काही अंतर्विरोधाचेही अनुभव असतात; त्यामागे परिस्थितिजन्य कारणे किती आणि स्वभावधर्म किती हा एक वेगळ्या शोधाचा व चिकित्सेचा विषय होऊ शकतो.

## २.१९. इतिकथन :

ब्रिटिश अमदानीत खालसा मुलखातील प्रजाजनांपेक्षा संस्थानांतील प्रजेचे प्रश्न बरेच वेगळे होते. खालसा मुलुखातील प्रजेचे प्रश्न सोडविण्यासाठी कॉंग्रेसची प्रभावी संघटना होती. संस्थाने स्वायत्त असल्याने कॉंग्रेसने आपल्या कार्यक्षेत्राच्या परिघाबाहेरचे म्हणून सुरुवातीला संस्थानांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही. मात्र हे प्रश्न सोडविण्यासाठी न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन इत्यादी पुढाऱ्यांनी संस्थानी मुलुखात प्रजापरिषदा स्थापन करण्याची एकात्म चळवळ संघटित करून संस्थानी प्रजेला समग्र भारतीय स्वातंत्र्यचळवळीत जोडून घेण्याची महत्त्वाची भूमिका निभावली. दक्षिण महाराष्ट्रातील १८ संस्थानांपैकी कुरुंदवाड, सावनूर आणि वाडी जहागीर यांचा अपवाद वगळता इतर १५ संस्थानांत प्रजापरिषदेचे काम पोहचले होते. संस्थानांतील प्रजापरिषदेच्या चळवळींचा एकूण वृत्तांत पाहता संस्थानी मुलुखातील प्रजेच्या संघर्षाला मानवी हक्कांच्या लढ्याचे परिमाण प्राप्त झालेले होते. प्रजापरिषदांमुळे संस्थानातील प्रजेला आपली गाऱ्हाणी मांडण्याचे एक प्रभावी माध्यम उपलब्ध झाले. न. चिं. केळकर यांनी या लढ्याचे अचूक वर्णन केले आहे : " प्रजा आणि संस्थानिक यांमधील झगडा आर्थिक स्वरूपाचा नसून मनुष्याच्या नैसर्गिक हक्कांसंबंधीचा आहे. यात बोलशेविझम नसून स्वराज्याची पवित्र चळवळ आहे. संस्थानिक आणि प्रजा यांमध्ये हक्कांची योग्य वाटणी होणे हा त्यातील मुख्य हेतू आहे." (केळकर न. चिं. १९३२, पृ. २३६) या परिषदांमुळे संस्थानी मुलुखातील लोकांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ झाल्या. स्वातंत्र्य, समता, न्याय, हक्क, कर्तव्ये, बांधिलकी, सामिलकी, जबाबदार राज्यपद्धती या राजकीय संकल्पनांची ओळख रूजली. आपल्या न्याय हक्कांसाठी मोर्चा, हरताळ, सविनय कायदेभंग, सभा, शिष्टमंडळे इत्यादी अहिंसक स्वरूपाच्या

राजकीय दबावतंत्रांचा वापर करण्याची तंत्रे लोकांना शिकता आली. संस्थानिकांसमोर दबून राहणारी प्रजा राजकीय निर्भयतेचा मंत्र शिकली होती. त्यामुळेच औंध संस्थानात कोणत्याही नागरिकास थेट सरकारविरुद्ध दिवाणी खटला दाखल करता येण्याचा इतिहास घडला. ही या परिषदांची मोठी फलश्रुती म्हटली पाहिजे. (पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. १०१-११०) पारदर्शी प्रशासनाची मूल्यचौकट रूजविण्यासाठी या परिषदांमधून न्यायखाते आणि अंमलबजावणी खाते वेगळे करण्याची मागणी करण्यात आली. पारदर्शी कारभारासाठी प्रशासनिक व्यवस्थांच्या संरचनेतच तशा तरतूदी करण्याचे शहाणपण संस्थानातील जनतेकडून व्यक्त झालेले दिसते. राजा आणि प्रजा यांच्यात राज्यहिताच्या दृष्टीने अपेक्षित असलेली राजकीय सामिलकीची संस्कृती उदयाला येण्याच्या दृष्टीने जनतेची व संस्थानिकांची मानसिक तयारी या कालखंडात झाली. लहान संस्थानांना उत्पन्नाचे आर्थिक स्रोत कमी असल्यामुळे जबाबदार राज्यपद्धतीच्या कारभारासाठी अपेक्षित असणारा सर्वच खर्च परवडणार नाही ह्याचे वस्तुनिष्ठ भान निर्माण झाल्याने छोट्या संस्थानांनी एकत्र येऊन सामायिक न्यायालये स्थापन करावीत, उच्चविद्याविभूषित अभियंते, प्रशासक नेमण्यासाठी संस्थानांनी सामाईक प्रशासनव्यवस्थांचे नवे आकृतिबंध निर्माण करावेत व सहयोगी प्रशासनाचे व्याकरण रचून संस्थानांचे संघराज्य स्थापन करावे अशा निर्णयाप्रत ही वैचारिक प्रगती झालेली दिसते. प्रजापरिषदेच्या या लोकजागरणामुळे खालसा प्रदेशातील ब्रिटिशांविरुद्धच्या राष्ट्रीय आंदोलनात संस्थानातील प्रजाजन सक्रिय होण्यास प्रेरणा मिळाली. मुख्य म्हणजे संस्थानांचे संस्थानाबाहेरील बृहत भारतापासूनचे तुटलेपण संपुष्टात येण्यासाठी प्रजापरिषदांचा उपयोग झाला.

संस्थानात प्रजापरिषदेमार्फत काँग्रेस चळवळीची भूमिका पोचत असतानाच सांगली-सातारा भागात या नागरी चळवळीला समांतर अशी प्रतिसरकाची व भूमिगतांची चळवळ जोर धरत होती. नागरी चळवळ आणि क्रांतिकारी चळवळ या दोघांची कार्यपद्धती वेगवेगळी असली, तरी अंतिम ध्येय एकच होते, त्यामुळे त्या एकमेकांस पूरक राहिल्या. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 'आझाद हिंद सेनेत'ही सातारा जिल्ह्यातून अनेक सैनिक भरती झाले होते. या जिल्ह्यातील पांडुरंग कुंभार आझाद सेनेला रसद पुरवण्याचे काम करीत असे, कृष्णा लेंबे खजिना सांभाळत असे. शेख शफी इब्राहिम युद्ध साहित्य व रेशनिंग पोचवित असे. (पाटणे, १९९२,पृ.२९-३०) १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाला या दोन्ही चळवळींकडून सारखाच प्रतिसाद मिळाला. इतकेच नाही तर १९४६ साली मुंबई इलाख्यात झालेल्या प्रांतिक व लोकल बोर्डांच्या निवडणुकीतही या दोन्ही चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने भाग घेतला. चळवळीचे मार्ग वेगळे असले तरी लोककेंद्री राजकारणाची भूमी नांगरण्याचे काम या दोन्ही चळवळींनी केले, हे निर्विवादपणे मान्य करावे लागते. संस्थानातल्या शेतकऱ्यांची संघटना बांधण्यात व त्यांचे राजकीय शिक्षण करण्यात न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन, गणेश अभ्यंकर अशा उच्चविद्याविभूषित शहरी पांढरपेशा ब्राह्मणांनी पुढाकार घेतला होता; त्यात कुठेही ब्राह्मण-ब्राह्मणेतर भेदमूलकतेचा संबंध आला नाही ही प्रजापरिषदेच्या चळवळीची मोठी फलश्रुती म्हणायला हवी. लोकशाही मूल्यचौकटीतून चालणाऱ्या राज्यकारभारासाठी सामाजिक

सलोखा ही पूर्वअट असते, हे प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनी जाणले होते; त्यामुळेच ते सार्वजनिक चळवळ खेड्यातल्या निम्नवर्गापर्यंत पोहचविण्यात ते यशस्वी झाले.

## टिपा :

[१] १९२८ च्या कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेचा संस्थानातील जबाबदार राज्यपद्धतीविषयीचा ठराव: "This Congress urges on the ruling Princes of the Indian States to introduce responsible government, based on representative institutions in the States, and to issue immediately proclamations or enact laws – guaranteeing elementary and fundamental rights of association, free speech, free press and security of person and property.

This Congress further assures the people of the Indian States of its sympathy with and support to their legitimate and peaceful struggle for the attainment of full responsible government in the States."(पटवर्धन वि. अ. १९४०, पृ. १०३-१०४)

[२] भोर संस्थान प्रजापरिदेच्या अधिवेशनांचा तपशील अनुक्रमे अधिवेशन स्थळ, अधिवेशन वर्ष व अधिवेशनाचे अध्यक्ष या क्रमाने:

१. भोर : १९२२, न. चिं. केळकर
२. भोर : १९२३, न. चिं. केळकर
३. नसरापूर : १९२४, वामनराव पटवर्धन
४. द्योल्हे : १९२६, वामनराव पटवर्धन
५. उरवडे : १९२७, अण्णासाहेब ल. ब. भोपटकर
६. हिर्डोशी : १९२८, चिंतामणराव वैद्य
७. पाली : १९३०, गणपतराव र. अभ्यंकर
८. पाथरशेत : १९३१, विठ्ठल रामजी शिंदे
९. शिरवळ : १९३२, प्रि. टी. एस. कुलकर्णी
१०. पुणे : १९३५ , श्रीधर वझे
११. पुणे : १९३७, रा. ग. प्रधान
१२. भोर : १९३९ , श्रीधर वझे
१३. कुरुंजी : १९४०, बापुसाहेब गुप्ते
१४. आंबावणे : १९४१, माधवराव बागल
१५. पाली : १९४७, शंकरराव देव.

[३] लोकप्रतिनिधी सभेच्या पत्रास कोल्हापूर संस्थानाने पाठवविले उत्तर :

From Huzur Chitnis, Kolhapur.

To Mr. Vaman Baji Ruikar

Sir,

Your vernacular yadi dated 10th October 1906, signed as President of Lokasabha, was placed before His Highness the Maharajasaheb and I am directed to inform you that the Durbar does not recognise your so called assembly and that any further communication in the matter from you will receive no attention. J. O. 168. I have the honour to be, Sir,

Your obedient servant,

K.GAIKWAD

Huzur Chitnis

[४] 'मराठवाडा' या भूप्रदेशाच्या नावाचा उल्लेख 'तारिखे फेरिश्ता' या इ. स. १५७० ते १६१४ या कालखंडाच्या इतिहासाच्या पुस्तकात पुढीलप्रमाणे आला आहे : "मलिक नायबने.. जब इंतिजामकी तरफसे इतमिनान हो गया तो 'मरहटवाडी' को अमीरोंमें तकसीम किया. (पृ. ३९७) इस दर्मियान में बरसातका मोसम आया और कुतुबद्दिनने मजबूरन थोडे दिनोंमें देवगड में कियाम किया. बादशहाने अपने दौराने कियाम में 'मरहटवाडी'पर तमाम व कमाल फिर कब्जा किया." (पृ. ४१८) (भालेराव, १९८७, पृ. ६)

[५] "Flung almost completely across the Indian Peninsula, the great state of Hyderabad holds a strategic position and military points of view. In an emergency it could practically isolate the predominantly Hindu south from the north where Muslim influence and traditions of rule are at their strongest. Well governed, conscious of herself, her military strength developed, her prestige untarnished she might play in a federal India a part unworthy of the best traditions of Islam in India." (भालेराव, १९८७, पृ. ८)

[६] अंजुमने इत्तेहादुल मुस्लिमीन संस्था आणि निझाम सरकार यांच्यातला गुप्त समझोता (Confidential Note): "With reference to the representation made by Anjumane Ittehadul-Muslimeen on behalf of the Muslim Community, the Council (executive council) has made two recommendations viz.

First, that, as regards this claim that the Muslim representation in the Assembly as a whole, excluding the Council, should not be reduced to a minority. Provisions may be made in the 'Qannuncha' that the three representatives of the Sarfekhas Mubarak to be appointed by His Exalted Highness, will be Muslims.

Second, that as regards the necessary percentage which the candidate in any interest must secure of the votes as cast of his own

community, the 'Qannuncha' may also provide that it may be raised from 40 to 51.

Therefore, the Muslim community of Hyderabad as assured that when practical measures shall be taken in furtherance of the Reforms at its proper time due effect will be given to the above named resolution. By order of His Exalted Highness, I had over this confidential Note to Bahadur Yar Jang Bahadur who is the leader of Anjumane Ittehadul-Muslimeen. Dated 20th Shaban 1358 H. (signed) Kazim Yar Jung 4th October 1939."

[७] राजकीय प्रशिक्षणाचे विषय व मार्गदर्शक:

१. हैद्राबादचा राजकीय इतिहास : दिगंबरराव बिंदू
२. हैद्राबादचे सामाजिक-आर्थिक प्रश्न : एम. नरसिंगराव
३. हैद्राबाद संस्थानातील जनता चळवळी : बी. रामकृष्णराव
४. स्वयंनिर्णय : व्ही. डी. देशपांडे
५. संस्थानांचा प्रश्न : आर. जी. नांदापूरकर
६. भारतीय राष्ट्रीय आंदोलनाचा इतिहास : स. कृ. वैशंपायन
७. भारतीय राजकारणातील विविध विचार प्रवाह : बाबासाहेब परांजपे
८. संघटनेचे तंत्र : गोविंदभाई श्रॉफ
९. युद्ध आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती : गोविंदभाई श्रॉफ
१०. गांधीवाद : एच. बी. हेड्डा.
११. घटनात्मक सुधारणा : काशीनाथराव वैद्य
१२. अन्न समस्या : एन्. नरसिंहराव
१३. साम्यवाद : चंद्रगुप्त चौधरी
१४. आपली राजकीय उद्दिष्टे : स्वामी रामानंद तीर्थ.

(रामानंद तीर्थ, १९७६, पृ. १५०-१५१)

❑❑❑

# ३

# मराठी पत्रकारिता

## ३.१. पूर्वकथन :

१९५२ साली कोल्हापूर येथे झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या १२ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात पत्रकारितेचा आणि समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचा अनुबंध स्पष्ट करताना प्रभाकर पाध्ये म्हणाले होते की, "राष्ट्राचा चतुर्थाधार असे जे पत्रव्यवसायाचे परंपरागत वर्णन आहे ते जरी आता बरेचसे सांकेतिक बनले असले, तरी पत्रव्यवसाय हा आज प्रत्येक सुशिक्षित आणि सुसंस्कृत व्यक्तीच्या जीवनाचाच आधार बनला आहे हे कोणाला नाकारता येणार नाही. समाजाचे जीवन आज इतके व्यापक आणि गुंतागुंतीचे झाले आहे की वृत्तपत्रे नसतील तर ते चालूच शकणार नाही. प्रत्येक व्यक्तीला, तिचा स्वत:चा व्यवसाय पार पाडण्यासाठी जी बातमी, मते, विचारविनिमय लागतो त्यासाठी ती वृत्तपत्रावरच अवलंबून असते.. म्हणून वर्तमानपत्र ही आता केवळ एक बौद्धिक चैनीची गरज उरलेली नाही – ती एक जीवनावश्यक वस्तू बनली आहे. आणि म्हणून एखाद्या देशाच्या सांस्कृतिक प्रगतीचा अंदाज घेण्यास बसलेल्या संशोधकास 'तुमच्या देशात शाळा किती' या प्रश्नाबरोबरच 'तुमच्या देशात वृत्तपत्रे किती' हा प्रश्नही आवश्यक ठरला आहे. वृत्तपत्र हे राष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाचे साधन आणि गमक बनले आहे... वृत्तपत्रे म्हणजे नुसती माहितीपत्रे नव्हत.. समाजामध्ये जे अंत:प्रवाह सुरू असतात त्यांचे वृत्तपत्रे ही अग्रदूत असतात." प्रभाकर पाध्ये यांच्या भाषणातील हे सूत्र केंद्रवर्ती ठेवून विसाव्या शतकातील पहिल्या पन्नास वर्षातील मराठी पत्रकारितेचा येथे मागोवा घ्यावयाचा आहे. महाराष्ट्राच्या जीवनव्यवहारातील विविध अंत:प्रवाहांचे व सांस्कृतिक स्थित्यंतरांचे आकलन करून घेण्याच्या उद्देशाने हा तपास करावयाचा आहे.

विसाव्या शतकातील मराठी पत्रकारितेला इंग्रजी राजवटीतील वसाहतवादी राजनीतीच्या दहशतीखाली आपली वाटचाल करावी लागत होती. १९०३ साली गोपनीय कायद्यातील दुरुस्ती विधेयकामुळे वृत्तपत्रांवर सरकारी माहिती जमा करण्याच्या

संशयावरून अजामीनपत्र गुन्हा दाखल करण्याचे अधिकार नोकरशाहीला देण्यात आले होते. १९०७ साली राजद्रोहविषयक खटला भरण्यासाठी आगाऊ परवानगी घेण्याची तरतूद रद्द केल्याने स्थानिक राज्यप्रशासनाला मनमानी करण्याची संधी प्राप्त झाली होती. १९०८ साली वृत्तपत्रांनी खून वा इतर गुन्ह्यांना उत्तेजन देणारा किंवा बंडाळीला प्रोत्साहन देणारा किंवा दांडगाई, जबरदस्ती वा तत्सम साहसिक कर्मे करण्यास उद्युक्त करणारा मजकूर प्रसिद्ध केल्यास वृत्तपत्रांचे छापखाने जप्त करण्याचा व संपादकांना काळ्या पाण्याची शिक्षा देणारा कायदा करण्यात आला होता. या कायद्याचा फटका 'केसरी', 'काळ', 'वंदे मातरम्', 'अरुणोदय', 'हिंदुपंच', साताऱ्याचे 'प्रतोद', सोलापूरचे 'स्वराज्य' इत्यादी पत्रांना बसला, संपादकांवर खटले दाखल झाले, सरकारी दडपशाहीमुळे काही पत्रे बंद करणे भाग पडले. १९१० साली मुद्रणनिर्बंधाचा कायदा करून आक्षेपार्ह मजकूर छापणाऱ्या छापखान्यांवर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली. छापखान्याच्या मालकाकडून तसेच वर्तमानपत्रकर्त्यांकडून पाचशे रुपयांपासून पाच हजारापर्यंत जामिनाच्या रकमेसह छापखाना, वर्तमानपत्र व इतर मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार प्रशासनाला देण्यात आला होता. या कायद्यामुळे महाराष्ट्रातील ९ वृत्तपत्रे बंद पडली होती.१९११-१२ साली सरकारच्या बाजूने लेखन करणाऱ्या वृत्तपत्रांना प्रोत्साहन देण्यासाठीही वार्षिक अनुदान देण्याची योजना जाहीर करण्यात आली. केसरीने अशा वृत्तपत्रांचा उल्लेख 'निमसरकारी वर्तमानपत्रे' असा केला होता. (केसरी, ९ मे १९११) ना. गोखले यांनीही सरकारी मदतीच्या आशेने सरकारला द्रव्यार्थी माणसे मिळतील, परंतु त्यांच्यावर लोकांचा विश्वास बसणार नाही, असे शासनाच्या निदर्शनाला आणण्याचे कर्तव्य बजावले होते. कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांनी अशा प्रकारचे सरकारच्या मदतीने 'जगद्वृत्त' पत्र चालविले होते; सरकार १५०० ते २००० प्रती विकत घेऊन त्या सार्वजनिक संस्थांना मोफत वाटत असे. मात्र केळुस्करांनी सरकारी अनुदान स्वीकारण्यापूर्वी 'आपण या पत्रातून माझ्या देशाविरुद्ध काही लिहिणार नाही, देशहिताविरुद्ध काही छापू देणार नाही' असे सुस्पष्ट प्रतिज्ञापत्रच सरकारला सादर केले होते. एकूण मराठी वृत्तपत्रांनी राष्ट्रीय अस्मितेशी तडजोड न करता वृत्तपत्रस्वातंत्र्य जपण्याचे असिधाराव्रत पाळून आपले पत्रकारितेचे कर्तव्य पार पाडल्याचा इतिहास आहे. ज्या काळात वृत्तसंस्था अस्तित्वात नव्हत्या, गावोगावी मोबदला देऊन वार्ताहरांच्या नेमणुका करण्याची ऐपत वृत्तपत्रांकडे नव्हती, सरकारी धोरण वृत्तपत्रांकडे संशयी नजरेने पाहाणारे असल्याने शासकीय कचेऱ्यातून बातमी मिळविणे दुरापास्त होत होते अशा काळात या पत्रांनी आपापल्या परीने राजकीय-सामाजिक बांधिलकी असलेल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने पत्रे चालविली. बातमीपत्रांना मतपत्रांचे स्वरूप देऊन लोकमत घडविण्याचे काम केले. अशा काही निवडक पत्रांचा साररूप परिचय येथे करून

घ्यावयाचा आहे. महाराष्ट्राच्या समाजजीवनातील चर्चाविश्वाचे वारे कोणत्या दिशेने वहात होते, याचा अंदाज येण्याच्या दृष्टीने हा साररूप मागोवा घेण्याचे योजिले आहे. महाराष्ट्रातल्या पत्रकारितेचे स्थूलमानाने वसाहतवादी राजवटीच्या विरोधात लोकमत संघटित करणारी टिळकपंथीय, गांधीविचारधारेची व हिंदुत्ववादी विचारधारेची पत्रे; ब्राह्मणी अभिजनवादाचा मुकाबला करण्यासाठी संघटनाबांधणी करणारी ब्राह्मणेतर चळवळीची पत्रे आणि अस्पृश्यवर्गाच्या अस्मितजागरणाची चळवळ संघटित करणारी बहिष्कृत वर्गाची पत्रे, अशी स्थूल वर्गवारी करता येते. मराठी पत्रसृष्टीचा कालक्रमिक वाटचालीचा मागोवा घेताना या अंत:प्रवाहांचाही तपास येथे करावयाचा आहे.

**टिळकपंथीयांची पत्रे :**

टिळकांच्या राजकारणाच्या प्रभावातून महाराष्ट्रात अनेक लहानमोठी पत्रे या काळात सुरू झाली आणि सरकारी दडपणामुळे व आर्थिक पाठिंब्याच्या अभावामुळे अस्तंगतही झाली. अशा सर्वच पत्रांचा आढावा घेणे हा स्वतंत्र ग्रंथाचा विषय असल्याने प्रस्तुत प्रकल्पात त्यांची जमेल तशी नोंद घेण्यापुरताच हा आढावा सीमीत ठेवला आहे. अल्पकाळ टिकलेल्या काही पत्रांमध्ये ज्यांचा निर्देश केला पाहिजे, त्यात पुण्याहून १९१८ साली सीताराम केशव दामले आणि रामचंद्र विष्णू फडतरे यांच्या 'राजकारण' नामक पत्राचा उल्लेख केला पाहिजे. दीर्घ विवेचनात्मक लेख प्रसिद्ध करणारे पत्र अशी या पत्राची ओळख होती. मनोरंजनाच्या हेतूने १९१५ साली पुण्यात वा. रा. कोठारी यांनी 'सहस्त्रकर' नामक साप्ताहिक सुरू केले होते. मॉडर्न रिव्ह्यू, इंडियन रिव्ह्यू अशा लोकप्रिय इंग्रजी पत्रांतल्या लेखांचा साररूप मराठी अनुवाद वाचकांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने रामचंद्र विष्णू फडतरे यांनी १९१९ साली 'राष्ट्रहितैषी' नामक साप्ताहिक सुरू केले होते, ते जेमतेम सहा महिने चालले. प्रौढ तरुण विद्यार्थ्यांना पक्षभेदरहित राजकीय-सामाजिक प्रश्नांवर मते तयार करता यावीत यासाठी कुठल्याही एका पक्षाची बाजी न घेणारे सम्यक विचारांचे लेख प्रसिद्ध करण्याच्या हेतूने वा. गो. आपटे यांनी सुरू केलेले 'विचारधन' मासिकही असेच अल्पायुषी ठरले. निरनिराळ्या विषयांवर सर्वसंग्राहक वृत्तीने माहिती पुरविण्याच्या उद्देशाने दत्तात्रय हरी गोखले यांनी ३० मे १९२० पासून पुण्यात 'दुनिया' नामक साप्ताहिक सुरू केले होते. ब्राह्मण-ब्राहणेतरांतले वाद मिटावेत या ध्येयाने शंकर त्र्यंबक आवटे यांनी १९२० पासून 'शिवाजी' या नावाने साप्ताहिक सुरू केले होते. नाशिकहून विष्णू गणेश केळकर यांनी पक्षभेद बाजूला ठेवून लोकमताची मांडणी करण्याकरिता २५ डिसेंबर १९२५ पासून 'लोकसत्ता' हे साप्ताहिक सुरू केले, ते १९५९ पर्यंत चालू होते. अहमदनगरहून १९२२ साली शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ते निवारण्याचे उपाय या विषयांना केंद्रस्थानी ठेवून 'शेतकरी' नावाचे वृत्तपत्र रा. ब. चितळे यांनी सुरू केले होते. १९०७ साली धुळ्याहून ल. रा. पांगारकर यांनी १ फेब्रुवारी १९०७ पासून

काँग्रेसच्या धोरणांचा पुरस्कार करणारे 'मुमुक्षु' साप्ताहिक सुरू केले, १९१७ नंतर त्याचे मासिकात रूपांतर झाले. खानदेशातील पारोळ्याहून १९०७ साली तुळशीदास गोविंद व नाथ निफाडकर यांनी सुरू केलेले 'खानदेश समाचार' हे पाक्षिक, चोपड्याहून १९१७ साली सुरु झालेले 'डेली रिपोर्टर', जळगावहून १९२० साली सुरू झालेले वामन भीमराव काळकर यांचे 'प्रागतिक' साप्ताहिक ही जिल्ह्यातील वार्तापत्रे प्रसिद्ध करणारी नियतकालिके या काळात प्रसिद्ध होत होती.

**ब्राह्मणेतरांची पत्रे :**

ब्राह्मणेतर चळवळीची कमीअधिक काळ चालून बंद पडलेली इतरही अनेक पत्रे होती; त्या सर्वांचाच आढावा इथे घेणे शक्य नसले तरी काही ठराविक पत्रांची नोंद घ्यालाच हवी. अशा पत्रांमध्ये पुण्यातून प्रसिद्ध होणारी 'मुलुख मैदान', भवानी समशेर', 'मजूर', यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. १९२५ सालात सुरू झालेले 'मजूर' पत्र रामचंद्र नारायण लाड यांनी चालवले असले तरी दिनकरराव जवळकर यांचे पाठबळ त्यामागे होते; या पत्रातून शिवस्मारकाचा व म. फुले यांच्या पुतळ्याचा वाद, छत्रपति मेळे हे विषय चर्चिले गेले. 'मजूर' पत्रातील हल्ल्याला प्रतिउत्तर देण्यासाठी पुण्यातल्या टिळकपंथीय ग. म. नलावडे यांनी १९ सप्टेंबर १९२५ रोजी खास 'संग्राम' नावाचे पत्र सुरू केले; यावरून 'मजूर' पत्राची पुण्यातली लोकप्रियता लक्षात येते. 'संग्राम' पत्राने ब्राह्मणेतर पत्रांतले निवडक उतारे देऊन 'ब्रह्मद्वेषाचे मासले' नामक सदर सुरू केले होते. १९३१ पर्यंत 'संग्राम' पत्र सुरू होते. यापूर्वी सामाजिक स्थित्यंतरांचा मागोवा घेताना ब्राह्मणेतर चळवळीच्या वाटचालीचा वृत्तांत आलेला आहे; त्यात ब्राह्मणेतर चळवळीशी संबंधित काही वृत्तपत्रांच्या कामगिरीचीही नोंद घेण्यात आली आहे. येथे पुनरावृत्ती टाळून ब्राह्मणेतर पत्रांच्या वाटचालीची संक्षिप्त नोंद तेवढी घ्यावयाची आहे.

**बहिष्कृत समाजाची पत्रे :**

अस्पृश्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी अस्पृश्य वर्गातून पुढे आलेल्या पुढाऱ्यांना वृत्तपत्रीय माध्यमांचा यथायोग्य उपयोग होऊ शकतो याची जाणीव झाल्याने सर्वप्रथम १९ व्या शतकाच्या अखेरीस गोपालबुवा वलंगकर यांनी दीनबंधू, सुधारक इ. पत्रांतून लेख प्रसिद्ध केले. पाठोपाठ शिवराम जानबा कांबळे यांनी १९०८ साली 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक व 'आदि हिंदू' नावाचे पाक्षिक सुरू केले. हिंदुस्थानात अस्पृश्यांची संख्या मुसलमानांइतकीच असल्याने अस्पृश्यांनाही मुसलमानांच्या बरोबरीचे राजकीय हक्क असावेत, अशी भूमिका शिवराम कांबळे यांनी या नियतकालिकातून पुढे आणली. 'सोमवंशीय मित्र' ची भूमिका 'वंचितवर्गाचा मित्र' बनून अस्पृश्यांना ज्ञानोपासनेसाठी प्रवृत्त करणे, मृतमांसभक्षण करू नये अशा प्रकारचा उपदेश करण्याची होती. अस्पृश्य हे रणशूर योद्धे आहेत, त्यांना लष्करातून काढून टाकण्याची चूक

सरकारने दुरुस्त करावी व लष्करात अस्पृश्यांची स्वतंत्र पलटण स्थापन करावी, अशी भूमिका या पत्रातून मांडण्यात आली. (१फेब्रुवारी १९०९) 'सोमवंशीय मित्र' या पत्राने समकालीन राजकारणातल्या जहाल पक्षावर सतत टीका केली. जहाल पक्षाचा उल्लेख 'टवाळपक्ष' असा करण्यात येई. शिवराम कांबळे यांच्या मते जहाल पक्षाची गोरक्षणाची चळवळ, शिवजयंती, गणेशोत्सव हे हस्तीदंती उत्सव असून हिंदू-मुसलमानांतील दुही वाढविणारे आहेत (१ नोव्हेंबर १९०९); त्यामुळे जहाल पक्षाच्या राजकीय चळवळींवर 'सोमवंशीय मित्र' पत्रातून नीर्भीड टीका करण्यात येत असे.

विदर्भातील किसन फागूजी बनसोडे यांनी स्वत:चा छापखाना उभारून १९१० साली 'निराश्रित हिंद नागरिक', १९१३ साली 'विटाळ विध्वंसक', १९१८ साली 'मजूर पत्रिका' आणि १९३१ साली 'चोखा मेळा' अशी पत्रे काढून अस्पृश्य वर्गात समतेच्या न्याय्य हक्कांची जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न केला. टिळकांचे गुण त्यांच्या अनुयायात नाहीत अशी टीका बनसोडे करीत. राष्ट्रीय शाळा ह्या जातिमत्सर उत्पन्न करणाऱ्या शाळा आहेत, त्यापेक्षा सरकारी शाळा परवडल्या अशा प्रकारचे स्पष्ट मतप्रदर्शन बनसोडे यांनी आपल्या विचारपत्रांतून मांडले होते. १९१४ साली अमरावतीहून नीलकंठ सखाराम भांगले व गणेश आक्काजी उर्फ नानासाहेब गवई यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक चालविल्याचा उल्लेख आढळतो. मुंबईत २१ जुलै १९२६ पासून महादेव आबाजी कांबळे यांनी चांभार व ढोर जातीच्या उन्नतीसाठी 'नवा मनु' नावाचे पाक्षिक सुरू केले होते. वर्ध्याहून १९३५ साली केशवराव ढोले उर्फ पावनदास यांनी 'पतितपावन' नावाचे पत्र प्रसिद्ध चालविले होते. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे मुख्य साधन आहे या जाणिवेतून ही नियतकालिके प्रसिद्ध केली जात होती.

या सर्व नियतकालिकांचा मागोवा अनुक्रमे पुणे शहरातील पत्रे, मुंबईची पत्रे, वऱ्हाड-मध्यप्रांतातली पत्रे, संस्थानी मुलुखातली पत्रे असे वर्गीकरण करून व त्या त्या गटातील पत्रांची कालानुक्रमे नोंद करीत येथे घ्यावयाचा आहे. याशिवाय राजकारणनिरपेक्ष निखळ करमणुकप्रधान पत्रांचाही तपास करावयाचा आहे.

## ३.२.पुणे शहरातील पत्रकारिता

वि. वा. शिरवाडकर यांनी म्हटल्याप्रमाणे "सगळे रस्ते रोमला मिळतात असा इंग्रजी वाक्प्रचार आहे. महाराष्ट्रातले सगळे रस्ते त्या काळात पुण्याला जाऊन मिळत असत." मराठी पत्रकारितेचा उद्गम आणि विकास यांचा तपास त्यामुळे पुणे शहरापासून सुरु करावा लागतो.

### ज्ञानप्रकाश (१८४९-१९५०):

पुणे शहरातून कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी सुरु केलेले 'ज्ञानप्रकाश' पत्र १८४९

पासून १९५० पर्यंत प्रसिद्ध होत होते. १४ ऑगस्ट १९०४ पासून ते दैनिक स्वरूपात प्रकाशित होऊ लागले होते. १९०९ पासून ते ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेल्या भारत सेवक समाजाचे मुखपत्र झाले. १९०७ ते १९२० या काळात बा. मा. आंबेकर हे ज्ञानप्रकाशचे संपादक होते. न्या. रानडे व ना. गोखले याच्या विचारप्रणालीचा वारसा आंबेकरांनी चालवला. १ जून १९२६ ते २ जुलै १९४१ पर्यंत काकासाहेब लिमये संपादक होते; त्यांनी १ जून १९२९ पासून 'ज्ञानप्रकाश'ची मुंबई आवृत्तीही प्रकाशित करण्यास प्रारंभ केला होता. वि. धों. कुलकर्णी आणि रा. गो. कानडे यांनी मुंबई आवृत्तीच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली होती. वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा नसून धर्म आहे, या भूमिकेतून हे पत्र चालविण्यात येत होते. महाराष्ट्रातील नेमस्त राजकारणाचे मुखपत्र अशी 'ज्ञानप्रकाश'ने आपली ओळख निर्माण केली होती. म. गांधींच्या असहकार आंदोलनाचे, दांडीयात्रेचे व इतर सर्व राजकीय कार्यक्रमांचे तपशीलवार वृत्तांत 'ज्ञानप्रकाश'मधून प्रकाशित होत. राजकारणाखेरीज शेती, सहकार, स्त्री-प्रश्नांची चर्चा, खेड्यातील प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न, इतिहाससंशोधन, गांधीहत्येनंतर दंगलपीडितांच्या समस्या अशा विविध विषयांतली माहिती व लेख प्रसिद्ध करून 'ज्ञानप्रकाश'ने आपला स्वत:चा वाचकवर्ग निर्माण केला होता. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची नाटके लोकप्रिय होत असताना १९०४ साली त्यांच्या 'गुप्तमंजुष' नाटकावर गणेश सदाशिव मराठे यांनी 'नाट्यकलारुक्कुठारा' या मथळ्याखाली टीका करणारी लेखमाला लिहून परखड नाट्यपरीक्षणाचा नमुना पेश केला होता. (खानोलकर, १९६२, पृ. १८) 'ज्ञानप्रकाश'बंद झाले त्यावेळी संपादकत्व शंकरराव गोखले यांच्याकडे होते.

**केसरी (१८८१) :**

१८८७ पासून 'केसरी'च्या संपादकत्वाची जबाबदारी आगरकरांकडून टिळकांकडे आली होती. १८९७ ते १८९९ या काळात टिळकांना तुरुंगात जावे लागल्याने त्यांना संपादकपद सोडावे लागले होते. मात्र तुरुंगातून सुटका झाल्यावर २२ जुलै १८९९ पासून २८ जुलै १९०८ पर्यंत केसरीचे संपादकपद टिळकांकडेच होते. त्यानंतर ४ जानेवारी १९१० पर्यंत कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, पुढे १२ मार्च १९१८ पर्यंत न. चिं. केळकर आणि केळकर विलायतेला गेल्याने १९ मार्च १९१८ पासून २ जून १९२० पर्यंत पुन्हा खाडिलकर केसरीचे संपादक होते. २२ जून १९२० नंतर केळकरांनी पुन्हा 'केसरी'ची सूत्रे आपल्याकडे घेतली. १९०२ साली टिळकांनी 'केसरी'च्या स्वरूपात महत्त्वाचे बदल केले. ४ पानांच्या केसरीची पृष्ठसंख्या दुप्पट करण्यात आली. अग्रलेखाखेरीज आठवड्यातल्या घडामोडींची वार्तापत्रे, व्यापारी वृत्ते, पुस्तकांवरील अभिप्राय, विवेचक लेख व वर्तमानसार असे नवे रूप होते. लोकांना स्वातंत्र्याकांक्षी बनविण्यासाठी लोकजागर करणे, लोकांना स्वातंत्र्याचे व स्वार्थत्यागाचे शिक्षण देणे, या

ध्येयवादातून अंकातील लेखनाची मांडणी होत असे. कायद्याच्या मर्यादेत राहून लोकांचे राजकीय शिक्षण करणारे वर्तमानपत्र असा 'केसरी'चा लौकिक होता.

देशांतर्गत राजकारण, समाजकारण, राष्ट्रीय शिक्षण आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकजागरणाची भूमिका करणारे लेखन टिळकांनी केले. १९०१ साली कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण उद्भवले, त्यावेळी टिळकांनी २२ ऑक्टोबर १९०१ च्या अग्रलेखात या प्रकरणी लिहिले होते की, "वैदिक मंत्रांनी संस्कार झाले म्हणजे मराठे व ब्राह्मण एकजातीचे होतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर तीही निर्मूल आहे." (केसरी, २२ ऑक्टोबर १९०१) काँग्रेसचे ध्येयधोरण व राजकीय वाटचालीवर भाष्य करणारे लेखही त्यांनी वेळोवेळी लिहिले. 'वेळ तर हीच आहे' या लेखातून त्यांनी नेमस्तांनी काँग्रेसचे कामकाज ज्या पद्धतीने चालविले आहे, त्यात सुधारणा करण्याची कशी गरज आहे, हे सांगितले.' हा लेख टिळकांच्या संघटनात्मक कामासंबंधीच्या दूरदृष्टीचा प्रत्यय देणारा होता. केवळ ठराव, भाषणे आणि अर्जविनंत्या पुरेशा नसल्याची जाणीव काँग्रेसला करून देण्याचे कर्तव्य त्यांनी या लेखातून केले होते. (केसरी, २० डिसेंबर १९०४) स्वदेशीच्या चळवळीवरही 'हातघाईवर आले' ( २८ नोव्हें. १९०५ ), 'स्वदेशीवरील आक्षेप' (१२ डिसें. १९०५) असे वेळोवेळी लेख लिहून लोकजागृती केली. ब्रिटिश सत्तेच्या लोकहितविरोधी धोरणांचा खरपूस समाचार घेणारे लेख त्यांनी 'केसरी'तून लिहिले. १९०१ साली सरकारने शेतकऱ्यांचा जमीन विकण्याचा हक्क काढून घेणारे विधेयक आणले. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला आळा घालणे, हा या विधेयकाचा प्राथमिक हेतू असल्याचे सांगितले जात होते. 'केसरी'ने या विधेयकाला विरोध करण्याची भूमिका घेऊन जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडेच राहिली पाहिजे अशी आग्रही भूमिका घेणारे अग्रलेख लिहिले. 'बिलाचे तत्त्वच आम्हाला मान्य नाही', 'सावकार मेला आणि कुणबीही मेला", 'जमिनीची मालकी बुडाली', 'उठा अजून वेळ गेली नाही' अशा शीर्षकाचे लेख 'केसरी'तून प्रसिद्ध होऊ लागले. मात्र सरकारने जनमत लक्षात न घेता हे विधेयक पारित केले. त्यावर 'केसरी'त 'दुराग्रही सरकार व दुर्बल लोकमत', 'आमची कायदेकौन्सिले थट्टा आहेत काय?' असे लेख लिहून सरकारच्या मनमानी निर्णयांविरुद्ध जहाल प्रतिक्रिया दिली. कर्झनशाहीच्या जुलमी राजवटीवर हल्ला करणारे अनेक लेख त्यांनी 'केसरी'त लिहिले. १ जानेवारी १९०३ रोजी लॉर्ड कर्झन यांनी दिल्लीत राजदरबार भरवून साम्राज्यशाहीचा जो दिमाख दाखवला त्यावरही टिळकांनी कडवट टीका करणारा अग्रलेख लिहिला. 'नवरेपणा गाजवून जगास दाखविल्याने लग्नाच्या स्त्रीचेही प्रेम वाढत नाही. मग अशा दरबाराने पूर्वी स्वराज्याचा अनुभव घेतलेल्या प्रजेचे प्रेम वाढेल अशी आशा व्यर्थ होय."अशा शब्दात त्यांनी कर्झनच्या उठवळ दाखवेखोरीचा समाचार घेतला. रशियाचे एम. डी. प्लेहवे यांच्या खुनासंबंधीच्या लेखांतून 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी लॉर्ड

कर्झन यांच्यावर टीका केली होती, त्यावर 'टाइम्स'ने परांजप्यांवर खटला भरावा अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती; तेव्हा टिळकांनी परांजपेंचा पक्ष घेऊन सरकारच्या आणि सरकारधार्जिण्या पत्रांच्या धोरणाचा निषेध करून वृत्तपत्रस्वातंत्र्याचा मुद्दा ठोसपणे पुढे आणला होता. 'मराठी आणि इंग्रजी काळ' या अग्रलेखात त्यांनी लिहिले होते की,"सरकारच्या आवडीकरिता काही आम्ही पत्रे काढिली नाहीत; व सरकारने टीका केल्याने त्यांचा रोष आमच्यावर झाला, तर त्याची आम्हास पर्वा नाही. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जर टीका करावयाची नाही तर वर्तमानपत्र काढावे तरी कशाला?" (कालांतराने सरकारने वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर बंधने आणली तेव्हा टिळकांनी पुन्हा एकदा सांगितले होते की, "गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे हे वर्तमानपत्रकर्त्यांचे मुख्य कर्तव्य नव्हे."- केसरी, १३ मार्च १९१७) इतकेच नाही तर कर्झनशाही राजवटीला खणखणीत इशारा देताना त्यांनी लिहिले होते की, "कर्झनशाही आमच्या गळ्याभोवती गुलामगिरीचा पाश अधिकाधिक दृढ करीत चालली आहे; आणि हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचे हेच धोरण कायम राहिले तर ..ब्रिटिश साम्राज्यास ते अपायकारक झाल्यावाचून कधीही राहाणार नाही." (केसरी, १७ ऑक्टोबर १९०४) लॉर्ड कर्झन यांनी मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना केलेल्या उपदेशाच्या भाषणाचा समाचार घेताना औपरोधिक शैलीत त्यांनी इसापनीतीतील वैद्य होऊ पाहणाऱ्या बेडकाची गोष्ट सांगितली. बंगालच्या फाळणीच्या कर्झनच्या निर्णयाचाही त्यांनी 'केसरी'तून निषेध केलाच, पण त्यामुळे बंगालात जे बहिष्काराचे वारे वाहू लागले त्याचे कडवे समर्थन करणारे ('आणीबाणीची वेळ'- १५ ऑगस्ट १९०५, 'हातघाईवर आले' -२८ नोव्हेंबर १९०५, 'स्वदेशीवरील आक्षेप'-१२ डिसेंबर १९०५, इत्यादी) लेख लिहून त्यांनी महाराष्ट्रालही लोकमानसात राजकीय क्षोभ निर्माण व्हावा असे लेखन केले. 'वंदे मातरम्'वर बंदी आणल्यावर त्यांनी सरकारला सुनावले होते की, "विलायत सरकारने हे शाहिस्तेखानी जुलमाचे प्रकार लवकर बंद पाडले नाहीत तर लोकमताच्या दृष्टीने इंग्रजी राज्य व मोगलाई यामध्ये काहीच फरक न उरून या दोघांनाही या वाईट नियतीची दुःखे भोगावी लागतील." १९०८ साली झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर ह्या स्फोटांचे समर्थन करणारे ८ लेख 'केसरी'तून प्रसिद्ध झाले. या ८ लेखांपैकी 'दुहेरी इशारा', (१९ मे), बॉम्बगोळ्याचा खरा अर्थ (२६ मे), बॉम्बगोळ्याचे रहस्य (२ जून), हे उपाय टिकाऊ नाहीत (९जून), स्फूट सूचना (९ जून) हे पाच लेख खाडिलकरांनी लिहिले होते. या लेखांवरून टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व त्यांना ११ जुलै १९०८ रोजी अटक करण्यात आली. टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाली. (यासंबंधींचा वृत्तांत याच खंडात यापूर्वी आलेला आहे.) टिळकांच्या अनुपस्थितीत केसरी प्रसिद्ध करण्याची जबाबदारी कृ. प्र. खाडिलकर व न. चिं. केळकर

यांनी यथासांग पार पाडली.

युरोपात ३ ऑगस्ट १९१४ पासून पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर केसरीने 'युरोपच्या शांततेवर गंडांतर' असा लेख लिहून युद्धकाळात भारतीय जनतेने असलेले मतभेद बाजूला ठेवून सरकारला मदत करावी' असे लिहून सामंजस्याची भूमिका घेतली. तरुणांनी लष्कारात शिरावे असाही उपदेश केला. (केसरी, २७ फेब्रुवारी १९१७) देशात होमरूल चळवळ सुरू करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर टिळकांना जोर द्यावयाचा होता; त्यासाठी कॉंग्रेसमधील मवाळ आणि जहाल गटांचे मद्रास कॉंग्रेसच्या अधिवेशनात एकीकरण होणे अपेक्षितच होते. मात्र मवाळ पक्षाकडून त्याला प्रतिसाद मिळत नव्हता. या पार्श्वभूमीवर टिळकांनी 'केसरी'तून 'राष्ट्रीय सभा का मवाळांचा क्लबोत्सव' (५ जानेवारी १९१५) आणि 'चोराच्या उलट्या बोंबा' (९ फेब्रुवारी १९१५) हे अग्रलेख लिहून मवाळ पक्षाच्या धोरणाविषयी नापसंती व्यक्त केली. त्यात 'टिळक आणि गोखले दोघांच्या गोवऱ्या ओंकारेश्वरावर गेल्या आहेत' असे विधान करण्यात आले होते आणि त्यानंतर लगेचच १६ फेब्रुवारीस ना. गोखल्यांचे निधन झाले. त्यावर टिळकांनी केसरीतून लिहिले की, "शोक विसरून पूर्वाचार्यांनी देशाच्या अभ्युदयाचा जो मार्ग आखून दिला तोच पुढे उत्साहाने, उमेदीने, धैर्याने आणि नेटाने चालविण्यास सर्वांनी प्रवृत्त व्हावे, एवढेच अखेर या दु:खाच्या प्रसंगी आमचे सर्वांस सांगणे आहे." कट्टर विरोधकांचेही गुणसामर्थ्य पुढे आणणारे मृत्यूलेख हे टिळकांच्या अग्रलेखांचे फार वैभवशाली दालन होते. न्या. रानडे, स्वामी विवेकानंद, हर्बर्ट स्पेन्सर, व्हिक्टोरिया राणी, श्रीधर गणेश जिनसीवाले यांच्यावर लिहिलेल्या मृत्यूलेखांतून टिळकांच्या व्यक्तिमत्वाची व विचारप्रक्रियेची खरी ओळख होते. टिळकांच्या अग्रलेखांची शीर्षकेही फार बोलकी व मर्मग्राही असत. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', 'राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे', 'बादशहा ब्राह्मण झाले', 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', 'उजाडले, पण सूर्य कोठे आहे?', ही राष्ट्रीय सभा की मवाळांचा क्लबोत्सव?' 'मुंबईच्या टाइम्सचा बेशरमपणा' असे कितीतरी मथळे पाहिले म्हणजे वृत्तपत्र हे नुसते वार्तापत्र नसून मतपत्र असते व लोकमत जागृत करणे, राज्यकर्त्यांना जाब विचारणे आणि राष्ट्रीय विकासाचा दृष्टिकोन तयार करणे हे वृत्तपत्रांचे खरे कार्य असते, ह्याचा वस्तुपाठ टिळक आपल्या पत्रकारितेतून घालून देत होते, हे लक्षात येते.

टिळकांनंतर 'केसरी'चे संपादकत्व आणि राजकीय पुढारपणही न. चिं. केळकर यांच्याकडे आले. १९१० ते १९३७ या काळात मधले काही अपवाद वगळता केसरीची धुरा केळकरांनी सांभाळली. १९१८ ते १९२० या काळात विलायतेला गेल्यामुळे तेवढ्या काळापुरते संपादकत्व खाडिलकरांकडे होते. तसेच १९३१ साली ज. स. करंदीकर यांनी 'केसरीचे संपादकत्व स्वीकारले होते. १९१० सालीच वृत्तपत्र कायद्याने

वृत्तपत्रीय लेखनावर आणलेल्या बंधनांमुळे संपादकांचे स्वातंत्र्य कुंठित झाले होते. या दडपशाहीमुळे केळकरांना टिळकांप्रमाणे राजकीय विषयांवर खुलेपणाने मते व्यक्त करता येत नव्हती. त्यामुळे राजकारणाखेरीज संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन, आयर्लंड आणि हिंदुस्थान अशा वेगळ्या विषयांवर ज्ञानबोध करणारे लेख केळकरांनी लिहिले. १९२३ साली काँग्रेसांतर्गत स्थापन झालेल्या स्वराज्य पक्षात केळकर सामील झाले, त्यामुळे टिळकांचे 'प्रतियोगिता सहकारिते'चे धोरण कायम ठेवून १९३७ पर्यंत केसरीने काँग्रेसच्या धोरणांना मात्र विरोध केला. लोकशाही स्वराज्य पक्ष, हिंदुमहासभा यांच्या धोरणांची केळकरांनी पाठराखण केली. केळकरांनी आपल्या संपादकीय कारकिर्दीत हिंदू-मुसलमान दंग्यांवर भाष्य करताना नोकरशाहीच्या दुबळेपणावर टीका केली (केसरी, १६ फेब्रु. १९२६). कायदेमंडळात जातवार प्रतिनिधित्व देण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणावर टीका केली. ब्रिटिशांनी स्वराज्याची देणगी देताना जातवारीचे कुत्रे हिंदी लोकांवर सोडून दिले असून अशा स्वराज्यापेक्षा स्वराज्य नसलेले पत्करले, अशा तिखट शब्दांत त्यांनी आपली प्रतिक्रिया 'केसरी'तून नोंदवली. (केसरी, २२ मार्च १९२७) गांधीजींच्या १९३० च्या दांडीयात्रेची केसरीने उत्तम दखल घेतली. टिळकांप्रमाणे तात्यासाहेब केळकरांनी लिहिलेले मृत्यूलेखही संस्मरणीय राहिले. 'पंजाबचा सिंह गेला' हा लाला लजपतराय यांच्यावरचा लेख, शि. म. परांजपे यांच्या निधनानंतर व भगतसिंगाच्या अंतानंतर लिहिलेले मृत्यूलेख यांचा विशेषत्वाने उल्लेख करायला हवा. संयम आणि सौजन्य हे त्यांच्या लेखनाचे गुणविशेष होते. फार टोकाची भूमिका न घेता मध्यममार्ग स्वीकारून ते लेखन करीत.

न. चिं. केळकर यांच्यानंतर १९४६ पर्यंत 'केसरी'चे संपादन ज. स. करंदीकर यांनी केले. १९४६ ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत बाबुराव गोखले आणि त्यानंतर १९५० पर्यंत ग. वि. केतकर 'केसरी'चे संपादक होते. १९५० पासून पुढे जयंतराव टिळक यांनी संपादकत्व स्वीकारले. करंदीकर संपादक असताना दुसऱ्या महायुद्धाची वार्तापत्रे प्रसिद्ध होत, त्यामुळे केसरीचा वाचकवर्ग वाढला. स्वा. सावरकरांच्या हिंदुसभेचा करंदीकरांनी पुरस्कार केला. आर्थिक प्रश्नांवरचे व अर्थसंकल्पांवरचे लेख त्यांच्या व्यासंगाचा प्रत्यय देणारे होते. टिळक हयात असतानाच करंदीकर केसरीच्या संपादनप्रक्रियेत सहभागी झाले असल्याने त्यांच्या लेखन-संपादनशैलीवर टिळकांच्या प्रभाव होता. ग. वि. केतकर संपादक असताना त्यांनी सावरकरांच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा जोरदार पुरस्कार केला होता. भारताच्या फाळणीवर त्यांनी 'भग्नमूर्तीचे षोडशोपचार' हा लेख लिहून 'केसरी'ची भूमिका मांडली. १९४८ साली गांधीजींची हत्या झाल्यावर अतिशय जबाबदारीने त्यांनी केसरी पत्राचे संपादन केले. गांधीहत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली, त्यावेळी 'आधी फाशी मग चौकशी' अशी लेखमाला लिहून त्यांनी

संघाची बाजू मांडली.

**करमणूक (१८९०-१९१७):**

कादंबरीकार हरी नारायण आपटे यांनी 'कुलकर्णी आणि मंडळी' नामक कंपनी स्थापन करून १८९० साली 'करमणुक'हे साप्ताहिक पत्र सुरू केले होते. 'लहानांपासून थोरांपर्यंत सर्व स्त्रीपुरुषांचे मनोरंजन करून ज्ञान देणारे पत्र" अशी ह्या पत्राची ओळख पत्राच्या नावाखालीच पहिल्या अंकापासून छापली जात असे. मराठी वाचकांचे मनोरंजन करणे, त्यांना मनोरंजनाबरोबर व्यावहारिक व शास्त्रीय ज्ञान करून देणे हे या पत्राचे उद्दिष्ट होते. स्वत: हरिभाऊंनी पहिल्या अंकातच ही भूमिका स्पष्ट करताना सांगितले होते की, "जी गोष्ट जनसमुहाने अवश्य करावी म्हणून केसरी, सुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दांनी सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळी वाक्प्रतोदाचे तडाखे लगावणार, तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेने शासन करणार!" (लेले, १९८४, पृ. ४५५-४५६) विसावे शतक उजाडण्यापूर्वीच १८९९ साली गोविंदराव डुकले यांनी ते चालवावयास घेतले, ते १९१७ पर्यंत चालू राहिले.

**काळ (१८९८):**

इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे हा समज लोकांच्या मनातून दूर करावा आणि पारतंत्र्याची चीड जनमानसात निर्माण करावी या ध्येयाने शिवरामपंत परांजपे यांनी २५ मार्च १८९८ रोजी पुण्याहून 'काळ' पत्र सुरू केले. 'लोकात दृढमूल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठी काळाचा जन्म आहे' असे पहिल्याच अंकात जाहीर करण्यात आले होते. 'काळ' पत्राच्या जाहिरातीत कंसात 'टाइम्स' असेही छापले जात असे, त्यावरून इंग्रजीतील 'टाइम्स'पत्राप्रमाणे राजकीय मतपत्राचे स्वरूप परांजप्यांना अभिप्रेत असावे. 'काळ' या नावात कदाचित हे पत्र इंग्रजांच्या राज्याचा काळ ठरेल असेही त्यांना अभिप्रेत असावे, असे 'काळ'मधून प्रकाशित होत गेलेल्या लेखांवरून सूचित होते. याच उद्देशाने आयर्लंड, इटली, स्वित्झर्लंड या देशांच्या स्वातंत्र्यलढ्याची माहिती देणारे लेख 'काळ'मधून प्रकाशित होत. 'शिवाजीचे पुण्याहवाचन', 'शिवाजीची एक रात्र' यासारख्या लेखांतून देशी अस्मितेची चेतना जागविण्याचे काम साध्य होत असे. १८९७ च्या टिळकांच्या राजद्रोहाच्या खटल्यामुळे वृत्तपत्रांतून सरकारविरोधात लिहिणे धोक्याचे होते, म्हणून शिवरामपंतानी उपरोध, उपहास, अन्योक्ती, व्याजोक्ती, वक्रोक्ती, रूपके व पुराणकथांचा वापर करणारी, लेकी बोले सुने लागे पद्धतीची आडवळणाची ' लेखनशैली विकसित केली. राजकीय जनजागृतीसाठी मर्मावर घाव घालणारी व्याजोक्ती ही शिवरामपंत परांजप्यांनी मराठी साहित्याला दिलेली एक मोठी देणगी होती. उदाहरणार्थ, सतत कृतिशून्य बोलत राहाणाऱ्या नेमस्तांवर टीका करताना त्यांनी

'शरदऋतूतील मेघांनो, तुम्ही काय केले म्हणून एवढ्या गर्जना करिता?' असा टोमणा मारणाऱ्या शीर्षकाचा लेख प्रसिद्ध केला होता. अखेर १५ मे १९०८ च्या अंकातील लेख राजद्रोही ठरवून इंग्रज सरकारने परांजप्यांवर राजद्रोहाचा खटला दाखल केला व ११ जून १९०८ रोजी अटक केली. राजद्रोहाचा आरोप ठेवून वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या शासननीतीविषयी परांजप्यांनी लिहिले होते की, " एकीकडे मुद्रणस्वातंत्र्य दिले आहे, आणि दुसरीकडे राजद्रोहाची कलमे करून ठेविली आहेत. 'लिहा'ही म्हणावयाचे आणि 'लिहू नका' असेही म्हणावयाचे, अशा प्रकारची विलक्षण स्थिती निर्माण करून ठेवण्यात आली आहे." सत्यस्थितीचे वर्णन वर्तमानपत्रांनी न करावे तर कोणी करावे? असा प्रश्नही त्यांनी राज्यकर्त्यांना विचारला होता.

राजद्रोहाच्या खटल्यात आपली बाजू मांडताना शिवरामपंतांनी न्यायाधीशांना उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले होते की, "स्वदेशभक्ती हे पाप नाही. देशप्रीती हा गुन्हा नाही.. सरकारने जे चुकीचे धोरण अवलंबिले आहे त्याला उद्देशून मी सदर लेख लिहिले आहेत. आणि सरकारला योग्य मसलत देणे हे माझ्या मताने वर्तमानपत्राचे एक प्रमुख कर्तव्य होय.' किंबहुना 'सरकारला सल्ला देण्यासाठीच वर्तमानपत्रांचे अस्तित्व आहे'. सरकारच्या डोळ्यांत सरकारच्या दोषांचे अंजन घातले आहे, या अंजनाचा उपयोग जर अंजन घालणाऱ्यांना तुरुंगात घालून करावयाचा आहे तर मग सरकारने हिंदुस्थानला वायफळ मुद्रणस्वातंत्र्य कशाला दिले?" मी माझ्या देशाचे असंतोषी अंत:करण सरकारपुढे उकलून ठेवून त्यातील सुधारणेची गुप्त रहस्ये सरकारला कळविली आहेत आणि यासाठी तुम्ही मला राजद्रोही ठरविणार ? .. स्वदेशावर प्रेम करणे हा जर गुन्हा असेल तर तो मी केला आहे नि त्यासाठी जी शिक्षा मला मिळेल ती मी आनंदाने भोगायला तयार आहे." (लेले, १९८४, पृ. ४७९-४८१) परांजप्यांनी स्वदेशाभिमानाने प्रेरित होऊन लेख लिहिल्याचे सर्व ज्यूरींनी एकमताने सांगितले. मात्र तरीही शिक्षा होऊन १० जुलै ते ५ ऑक्टोबर १९०९ पर्यंत परांजप्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९१० च्या वृत्तपत्र कायद्याने 'काळ'मधील लेखनाचे दहा खंडही जप्त केले. त्यानंतर 'काळ' साप्ताहिक बंद पडले. पुढे टिळकांच्या मृत्यूनंतर १२ ऑगस्ट १९२० रोजी परांजप्यांनी 'स्वराज्य' नामक दुसरे साप्ताहिक सुरू केले, ते १९२७ पर्यंत सुरू होते. मात्र शिवरामपंतांची वक्रोक्ती या अंकातून हरवली होती. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाला अनुसरणारे लेखन या काळात परांजप्यांनी केले होते, पण 'काळ'मधला जोश ओसरला होता.

**भाला (१९०५-१९१०) :**

पुण्यात ५ एप्रिल ९०५ रोजी भास्कर बळवंत भोपटकर, लक्ष्मण बळवंत भोपटकर व दिनकर बळवंत भोपटकर या तिघा बंधूंनी 'भाला' नावाचे दर दहा दिवसांनी प्रसिद्ध होणारे पत्र सुरू केले. पण भा. ब. भोपटकर हेच 'भाला'कार भोपटकर म्हणून ओळखले

जाऊ लागले. 'भाल्याची फेक' या शीर्षकाखाली ते अग्रलेख लिहीत. "धर्मासाठी मरावे, मरोनी अवघ्यांस मारावे, मारता मारता घ्यावे, राज्य आपुले" हे रामदासांचे वचन उद्‌धृत करून पत्र सुरू करण्यामागची आपली भूमिका 'भाला'कारांनी स्पष्ट केली होती. त्या काळात 'केसरी' हे लोकप्रिय पत्र होते, त्या पार्श्वभूमीवर आपल्या पत्राची गरज काय, याचे उत्तर देतांना 'भाला'कारांनी लिहिले होते की, "मायदेशहितरूपी गडाच्या भोवती केसरीकाळरूपी प्रचंड गुहांनी बनलेल्या तटात भाला हा पाचरीचे काम करणार." धर्मकारणात सनातनी, पण राजकारणात स्वराज्यध्येयी अशी भालाकारांची भूमिका होती. 'राजकारणावर लिहायचा कंटाळा आला म्हणजे ते 'सांस्कृतिक' विषय हाती घेत. जेवणाच्या पंक्तीत द्रोण वापरावेत की वाट्या यावर त्यांनी कडाक्याचे वादंग केले होते.. चरखा, हिंदुमुस्लीम ऐक्य, अस्पृश्यतानिवारण इत्यादी विषयांवर त्यांचे कलमी आणि वाचिक प्रहार सतत चालू असत." (शिरवाडकर, २०१२, पृ. ४४) आपले पत्र 'वृत्तपत्र' असण्यापेक्षा 'मतपत्र' आहे, अशी त्यांची धारणा होती. त्याविषयी त्यांनी लिहिले होते की, "मवाळ पत्रांमधील बातम्याच फक्त वाचनीय असल्यामुळे अशा मवाल पत्रांना 'वृत्तपत्रे' हे नाव यथार्थपणे शोभते. पण राष्ट्रीय वृत्तपत्रांना 'वृत्तपत्रे' हे नाव देणे रास्त होणार नाही. राष्ट्रीय पत्रांचा सर्व कल स्वावलंबनादी मतांचा प्रसार करण्याकडे असतो. राष्ट्रीय पत्रात बातम्या असतात पण ते त्यांचे प्रधान अंग नाही. या कारणामुळे राष्ट्रीय पत्रांना वृत्तपत्रे (News paper) म्हणण्याऐवजी 'मतपत्रे' (Views paper) म्हणणे जास्त सयुक्तिक होय. कोणत्याही राष्ट्राची उन्नती होण्यास त्या राष्ट्रात मतपत्रांची संख्या वाढीस लागली पाहिजे. राष्ट्रे मरतात किंवा तरतात ती मतपत्रांच्या कमी-अधिक संख्येमुळे होय.. वर्तमानपत्राचे संपादक हे वर्गणीदारांनी बनलेल्या राष्ट्रभक्तांच्या टोळीचे कॅप्टन होत." (कर्वे, २००५, पृ. १०) नवीन चपखल शब्द तयार करण्यात भोपटकर पारंगत होते.त्यामुळे ब्रिटिशांचा रोषही भालाकारांनीही ओढून घेतला होता. श्रीकृष्ण या टोपणनावाने लिहिलेल्या 'नरकाचा दरबार' या लेखात त्यांनी इंग्रजांचे राज्य हे नरकाचे राज्य आहे, असे चित्र रेखाटले होते. हा लेख आक्षेपार्ह ठरविण्यात आला व त्यांना सहा महिन्यांची कैद व एक हजार रुपये दंडाची शिक्षा झाली. इतकेच नाही तर १९१० साली सरकारची वृत्तपत्रांकडे वक्रदृष्टी झाल्याने 'भाला' पत्र बंद करावे लागले.

पुढे टिळकांच्या मृत्यूनंतर 'भाला' नव्याने सुरू करण्यात आले व १९२५ ते १९३५ अशी दहा वर्षे ते सुरू राहिले. या काळात 'भाला'पत्रात "जहाल तितुका मिळवावा / लोकमान्य पंथ वाढवावा / याविषयी करिता थकवा / टिळक हासती//" असे टिळकसंप्रदायाची बांधिलकी घोषित करणारे कवन छापण्यात येत असे. हा काळ गांधीपर्वाचा असूनही भोपटकर मात्र टिळकपंथाचीच विचारधारा पुढे नेण्याचे काम करीत राहिले. गांधीवादी राजकारणाला ते 'गांधाळ', मागावरील कापड वापरणाऱ्यांना 'मागाळ'

असे संबोधत. 'हातात चर्खा का हाताला चरका', 'स्वदेशी की स्वाहादेशी', 'असहकारिता नव्हे असह्यकारिता', 'गचाळ व मवाळ' अशा शीर्षकाचे लेख ते लिहीत, त्यावरून त्यांच्या मनात गांधीजी व त्यांच्या अनुयायांविषयीची अनास्था दिसून येते.

**दीनमित्र (१९१०-१९४०):**

कृष्णराव भालेकर यांच्या प्रेरणेने १८८८ साली गणपतराव पाटील यांनी सुरू केलेले 'दीनमित्र' मासिक त्यांच्या मृत्यूमुळे १८९२ साली बंद पडले होते. १९१० साली मुकुंदराव गणपत पाटील यांनी 'दीनमित्र'चे पुनरुज्जीवन केले व १९४० पर्यंत हे पत्र चालवले. 'दीनमित्र'च्या मुखपृष्ठावर संपादकीय धोरण सूचित करणारा पुढील अभंग छापला जात असे :

'ज्यांसी दु:खाने गांजिले / तेचि सोयरे आपुले
ठेवी मुक्तीला गहाण / काढी तयाकरिता ऋण
ऐसा दीनांचा कैवारी / दीना मानी देवापरी
तोचि साधू सत्पात्र / म्हणा तया दीनमित्र"

नगर जिल्ह्यातल्या तरवडी खेड्यातून प्रसिद्ध होणाऱ्या या पत्राची वाटचाल वरील सूत्रवचनाला व सत्यशोधक चळवळीच्या ध्येयधोरणांना अनुसरणारी होती. मुकुंदराव पाटलांनी निर्भीडपणे आपली लेखणी चालवली. सोवळेपणाचा आव आणणारे ब्राह्मण, देवदेवसकीच्या नादी लागणारे ब्राह्मणेतर, आणि प्रजेच्या पैशाची उधळपट्टी करणारे मराठा संस्थानिक या सर्वांवर त्यांनी टीका केली. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराजही त्यातून सुटले नाही. महाराजांनी आपण सत्यशोधकीय नसल्याचे जाहीर केल्यावर, तसेच शंकराचार्यांचे क्षात्रजगद्गुरू पीठ निर्माण केल्यावर त्यांनी कठोरपणे त्यांच्यावर टीका केली. 'शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती व ती घालविण्याचे उपाय' ही त्यांची लेखमाला विशेष गाजली होती. नोकरशाही, भिक्षुशाही व भांडवलशाही हे या पत्रातले टीकेचे विषय असत. 'कुलकर्णी लीलामृत' हा त्यांच्या अशा परखड लेखनाचा उत्तम नमुना समजला जातो. शाहू महाराजांनी 'दीनमित्र'ला ५५०० रुपयांची मदत केली होती. शिवाय डॉ. कुर्तकोटींवर टीका करणारा लेख लिहिला म्हणून मुकुंदराव पाटील यांना कोल्हापूरात बोलावून पाचशे रुपयांचे बक्षीसही दिले होते.

**लोकसंग्रह (१९११-)**

पुण्याहून ११ जून १९११ रोजी रामकृष्ण दत्तात्रय पंतपराडकर यांनी 'लोकसंग्रह' दैनिक सुरु केले. लो. टिळकांच्या राजकारणाला पोषक राहील असे वृत्तपत्रीय धोरण ठेवून हे पत्र चालविले जात असे.

**जागरूक (१९१७-१९२२):**

पुण्यातील ब्राह्मणेतर पक्षाच्या विचारधारेचे वालचंद कोठारी यांनी १९ जुलै १९१७

रोजी 'जागरूक' पत्र सुरू केले, ते १९२२ पर्यंत चालविले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात ब्राह्मणांचा द्वेष करण्यापेक्षा त्यांच्याशी मिळूनमिसळून वागले पाहिजे अशी आपली भूमिका कोठारी या पत्रातून मांडत असत. ब्राह्मणेतरांनी नेमस्तांशी युती करावी असा राजकीय सल्लाही त्यांनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना या पत्राच्या माध्यमातून दिला होता. ब्राह्मणेतर जातींना आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क असावा अशी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना मान्य न होणारी भूमिका या पत्राने मांडली होती. अशा वेगळ्या भूमिका घेणाऱ्या कोठारींच्या 'जागरूक' पत्राविरुद्ध तत्कालीन 'विजयी मराठा' पत्राची वैचारिक लढाईही झाली होती. हा वाद इतका विकोपाला गेला की श्रीपतराव शिंदे यांनी कोठारींचा 'तृतीयपंथी ब्राह्मणेतर गृहस्थ', 'सरड्याप्रमाणे रंग बदलणारा' अशा शब्दात उपहास केला. (विजयी मराठा, १५ डिसेंबर १९२३, ३१ मार्च १९२४) 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांनी कोठारींच्या भूमिकेचे समर्थन करून श्रीपाद शिंदेंच्या युक्तिवादातल्या उणिवा दाखवून दिल्या होत्या. त्यांनी लिहिले होते की, "नेमस्तांशी सहकार्य करण्याच्या विरोधात 'विजयी मराठा' चे जे धोरण आहे ते गैर आहे. शिवाय 'विजयी मराठा'ने सत्यशोधक समाज तत्त्वांचा विपर्यास करण्याचे धोरण आरंभिले आहे. सत्यशोधक समाज सामान्यत: ब्राह्मण समाजाविरुद्ध आहे; पण ज्या ब्राह्मणांनी समाजाच्या तत्त्वांचा पुरस्कार कृतीने केला आहे, त्या ब्राह्मणांशी समाज सहकार्य करीत आला आहे. सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य असलेल्या 'विजयी मराठा'ने मराठ्यांचीच टिमकी पिटीत राहणे, मराठ्यांपुरताच स्वतंत्र जागा मागणे हे जात्याभिमानाच्या दृष्टीने सर्वस्वी योग्य असेल पण सत्यशोधक समाजाच्या दृष्टीने सर्वस्वी अयोग्य आहे." (दीनमित्र, १ सप्टेंबर १९२०) त्यामुळे 'जागरूक' विरुद्ध 'विजयी मराठा' हा वाद निरर्थक असून तो समाजाची दिशाभूल करणारा असल्याचे मत मुकुंदराव पाटील यांनी मांडले होते. शाहू महाराजांनीही याबाबतीत पत्र लिहून हा वाद थांबवावा असे कळविले होते; पुढे अर्थातच हा वाद मिटला.

### शिवाजी (१९२०) :

शंकर त्र्यंबक आवटे यांनी भागवतधर्मी राष्ट्रीय मराठ्यांचे पत्र म्हणून १९२० साली 'शिवाजी' पाक्षिक सुरू केले व पुढे त्याचे साप्ताहिकात रूपांतर केले. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा तंटा मिटवणे, मराठा, माळी समाजाची धार्मिक-औद्योगिक कर्तव्ये, गांधीजींचे विचार इत्यादी विषयांवर लोकप्रबोधन करण्याचे काम या पत्राने केले.

### प्रबोधन (१९२१-१९२६) :

केशव सीताराम ठाकरे यांनी १६ ऑक्टोबर १९२१ पासून 'प्रबोधन' पाक्षिक सुरू केले होते. वृत्तपत्रापेक्षा मतपत्र म्हणूनच ह्या पत्राने आपली कामगिरी बजावली. मात्र केवळ राजकीय पत्र म्हणून आपली ओळख निर्माण करण्याऐवजी 'हिंदू समाजाच्या सामाजिक,

धार्मिक व नैतिक पुनर्घटनेसाठी' या पत्राचा जन्म असल्याचे त्यांनी पहिल्याच अंकात जाहीर केले होते. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' हे वचन मुखपृष्ठावर छापले जात असे. कुठल्याही विशिष्ट धर्म- पंथ प्रवर्तकाची पूजा न बांधता शिलेदाराची भूमिका घेऊन निर्भीडपणे पत्र चालविण्याचा आपला मनोदय ठाकऱ्यांनी आपल्या लेखणीतून प्रत्यक्षात उतरविला होता. कोल्हापूरच्या अंबाबाईची काही मराठा तरुणांनी पुरोहिताच्या मध्यस्थीशिवाय पूजा केल्यावरून 'आंबाबाई विटाळली' म्हणून स्थानिक लोकांत एक बावटळ उठली होती; त्याची दखल घेऊन 'प्रबोधनकारां'नी या अंधविश्वास असणाऱ्या भक्तगणांची कानउघाडणी करणारा लेख लिहिला. "हिंदू म्हणविणाऱ्या प्रत्येक जातीला या देवतेची पूजा करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार ज्या देवळात मान्य केला जात नाही, तिथले देव-देवता या भिक्षुकी तुरुंगवासात खितपत पडल्या आहेत. असल्या या भिक्षुकी तुरुंगात पडलेल्या देव-देवतांना सडकेवरच्या मैलफर्लांगाच्या दगडधोंड्यापेक्षा फाजील महत्त्व कोणी देऊ नये." (प्रबोधन, १ नोव्हेंबर१९२१) पुण्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची कोनशिला विलायतेतून प्रिन्सच्या हस्ते बसविण्याच्या समारंभ झाला, त्यावेळी 'शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली' हा अग्रलेख लिहून आपली प्रतिक्रिया नोंदवली होती.

कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांवर टीका करतानाही 'प्रबोधन'कार कचरले नव्हते. छत्रपती शाहूंनी अखिल मराठा जमातीच्या उद्धारासाठी क्षात्रजगद्गुरूंचे पीठ निर्माण करून बेनाडीकर पाटील नावाच्या एका तरुण मराठ्याची त्यावर स्थापना केली होती. यावर १६ जानेवारी १९२२ च्या अंकातून टीका करताना प्रबोधनकारांनी लिहिले होते की, "ब्राह्मण जगद्गुरूचे दास्य नको म्हणून क्षात्र जगद्गुरूचे पीठ निर्माण करणे म्हणजे जुन्या गुलामगिरीच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी नव्या गुलामगिरीचे जोखड पत्करण्यासारखे आहे. .. गुलामगिरीचा नायनाट गुलामगिरीने होत नसतो. शिवाय, वर्णाश्रमवादी ब्राह्मण जगद्गुरूच्या मानसिक दास्यप्रवर्तक भिक्षुकशाहीला जमीनदोस्त करण्यासाठी थेट तसल्याच तत्त्वांवर उभारलेल्या क्षात्र जगद्गुरूच्या मठाला निर्माण करणे, म्हणजे जोखडासाठी देवाने आपल्याला मान दिलेली आहे, ही कल्पना दृढमूल झालेल्या बैलाने नाऱ्या तेल्याच्या छाप्याला रामराम ठोकून पिऱ्या तेल्याच्या गोंडस घाण्याला स्वत:स जुंपून घेण्यासारखे आहे. मठ आला की मठाधिपती आले; मठाधिपती आले की संप्रदाय सुरू झाला; संप्रदायाच्या मागोमाग सांप्रदायिक गुलामगिरी ठेवलेलीच." (लेले, १९८४, पृ. ६९०-६९१) निवडणुकीत जातीच्या आधारे मत मागणारे पुढारी पाहिल्यावर त्यांनी 'अस्पृश्यांनो, स्पृश्यांपासून सावध रहा' हा लेख लिहिला. (१६ डिसेंबर १९२४) १९२२ साली मुंबईत येणाऱ्या दाक्षिणात्यांच्या लोंढ्यामुळे मराठी माणसाची कुचंबणा होऊ लागल्यावर या समस्येलाही प्रथम प्रबोधनकारांनीच तोंड फोडले.

'प्रबोधन' पाक्षिकातून गोपाळराव देवधर, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे, नाना बेहेरे, तात्यासाहेब कोल्हटकर, गो. मा. चिपळूणकर इत्यादींचे वैचारिक व समाजप्रबोधनपर लेख प्रसिद्ध होत असत. गो. मा. चिपळूणकर यांचा 'विसाव्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारकांची कर्तव्ये' हा लेख याच पत्रातून प्रसिद्ध झाला होता. तीन हजार वर्गणीदार असलेले हे वाचकप्रिय पत्र होते; मात्र पुण्यातल्या जातिवादाला कंटाळून, 'विरोधकांशी बोकडी टकरा देण्यात जीवन खर्ची घालण्यापेक्षा' १९२६ साली 'प्रबोधन' पत्र बंद करण्याचा निर्णय ठाकऱ्यांनी घेतला आणि पुणे सोडले.

**पुणे समाचार (१९२७-१९२८)**

ज्ञानकोशाचे काम संपल्यावर १ जून १९२७ रोजी डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'पुणे समाचार' नावाचे केवळ पुणे शहरापुरतेच मर्यादित असे आगळेवेगळे दैनिक सुरू केले. अमेरिकेत अशी एकेका शहराची दैनिके चालविली जात असत. अशा शहरकेंद्री दैनिकातल्या बहुतेक बातम्या व गोष्टी त्या शहरासंबंधीच असतात. ह्याच पद्धतीने पुणे शहरातील सर्व असतील नसतील त्या गोष्टी, चर्चा, विचार, संस्थावृत्ते, चळवळी, उदीम, व्यापार इत्यादी एकूणएक बाजू मांडणारे दैनिक म्हणून 'पुणे समाचार' चालविण्याचा डॉ. केतकरांचा मनोदय होता. पहिल्याच अंकात त्यावेळी महाराष्ट्रात गाजलेल्या मालिनी पाणंदीकर व गुलाबखान बशिरुद्दिनखान यांच्या मिश्र विवाहाची खळबळजनक वार्ता छापल्याने हे दैनिक सुरुवातीला सर्व पुणेकरांमध्ये लोकप्रिय झाले. 'केसरी' विश्वस्त संस्थेतील अंतर्गत कलह, गुजरातेतील पूर, पुणे शहराची ऐतिहासिक पहाणी असा वाचनीय मजकूर देण्याचा प्रयत्न या पत्राने केला; मात्र पुढे दैनिकाचा खप अपेक्षेप्रमाणे होत नसल्याने ६४ अंकांनंतर त्याचे साप्ताहिक करण्यात आले. अखेर पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ८ एप्रिल १९२८ रोजी शेवटचा अंक प्रसिद्ध करून हे प्रकाशन थांबविण्यात आले.

**मजूर (१९२५) :**

पुण्यातून रामचंद्र लाड यांनी १९२५ साली सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचा पुरस्कार करणारे 'मजूर' पत्र सुरू केले होते. अंकाच्या मुखपृष्ठावर ब्राह्मणेतर चळवळीच्या ध्येयधोरणास अनुसरणारा श्लोक छापला जात असे :

'करुनि खिळखिळा भोंदू भिक्षुकाला / सत्याची जाणीव करितो सकळा
देव तोचि एक धरिला विश्वास / हेचि सत्य दावी मजूर जना"

दिनकरराव जवळकर प्रामुख्याने या पत्रातून लेखन करीत असत. 'देशाचे दुष्मन' हे जवळकरांचे पुस्तक लेखमालेच्या स्वरूपात याच पत्रातून प्रसिद्ध झाले होते. लो.टिळक, चिपळूणकर, नारायणराव गुंजाळ यांच्याविषयी निंदाव्यंजक भाषेत प्रसिद्ध प्रसिद्ध झालेले

लेखही जवळकरांनीच लिहिलेले होते. स्वत: रामचंद्र लाड यांचे 'मराठ्यांचे दासीपुत्र अर्थात पायपोस किंमतीचे पेशवे' ही लेखमाला क्रमश: या अंकातून प्रसिद्ध झाली होती. पुण्यातूनच प्रसिद्ध होणारे गणपतराव नलावडे यांचे 'संग्राम' पत्र 'मजूर' पत्रातल्या लेखांना सातत्याने 'ठोशास प्रतिठोसा' अशा रितीने टीका करणारे लेखन प्रसिद्ध करीत असे. त्यामुळे पुणे शहरात या दोन पत्रांतून सतत आरोप-प्रत्यारोपांची जुगलबंदी चालत असे. 'मजूर' पत्रातली भाषा बऱ्याचदा सभ्यतेच्या संकेतांना डावलणारी असल्याने त्यातले बरेच लेख वादग्रस्त ठरत. काही बाबतीत 'मजूर' पत्रावर खटले भरले गेल्याने माफी मागण्याचीही वेळ आली होती. सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष भाऊराव जाधव यांनी तर एकदा जाहीररित्या ह्या पत्रातल्या लेखनाचा आणि सत्यशोधक समाजाचा काहीही संबंध नसल्याचे घोषित केले होते.

**सकाळ (१९३२):**

अमेरिकेतून वृत्तपत्रविद्येचे उच्च शिक्षण व परदेशी वृत्तपत्रांतील 'स्पेशल कॉरस्पॉंडंट' चा दहा वर्षांचा कार्यानुभव घेऊन भारतात परतलेल्या नारायण भिकाजी परुळेकर (१८९८-१९७३) यांनी १ जानेवारी १९३२ रोजी पुण्याहून दैनिक 'सकाळ' पत्र सुरु केले. 'सकाळ' हे वृत्तपत्राचे नावही खुली स्पर्धा घेऊन लोकांच्या प्रतिसादातून ठरविण्याची अभिनव कल्पना परुळेकरांनी योजिली होती. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत ताज्या बातम्या देणारे लोकाभिमुख वृत्तपत्र असा लौकिक प्रस्थापित करणारे नियतकालिक ही ओळख 'सकाळ'ने निर्माण केली. त्यासाठी गावपातळीपर्यंत थेट जागेवरून बातमी मिळविणारा वार्ताहरांचा संच 'सकाळ'ने संघटित केला. राजकारण, समाजकारण, हवामान-पीकपाण्यासह शेतीव्यवसाय, व्यापार उद्योगांचे अर्थकारण, खेळ, व्यायाम, वाङ्मय, कला, भाजीमंडई, बालविश्व, गुन्हेगारी, कोर्टकचेऱ्यातले खटले, आरोग्य, सभा-संमेलनांचे अहवाल, वाचक-प्रतिसाद अशा सर्व क्षेत्रांतील घडामोडींचे यथातथ्य प्रतिबिंब आपल्या पत्रांतून वाचायला मिळेल अशा प्रकारे वृत्तसंकलनाची व्यवस्था निर्माण केली. मुंबईसारख्या ठिकाणी स्वतंत्र प्रतिनिधी नेमण्यात आले. लोकमान्य टिळकांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून लोकशिक्षणासाठी पत्र चालविण्याचा परुळेकरांचा ध्येयवाद हे 'सकाळ'च्या यशाचे रहस्य होते. 'सकाळ'च्या पहिल्या अंकात आपले वृत्तपत्रीय धोरण जाहीर करताना परुळेकरांनी लिहिले होते की, "रोजची बातमी गोळा करून स्वदेश व परदेश यांत एकाच वेळी काय चालले आहे याची कल्पना मराठी वाचकांस जितक्या पूर्णतेने देत येईल तितकी देऊन विचार करण्यास लागणारी सामग्री जनतेला पुरवावी अशी आमची योजना आहे. .. विद्यमान पक्ष, उपपक्ष, पंथ, परंपरा यांतील उखाळ्या पाखाळ्या 'मागील अंकावरून पुढे चालू' करण्याऐवजी त्यांची शक्य तितक्या लवकर इतिश्री व्हावी व विचारवंतांचा असा एकच एक पक्ष महाराष्ट्रात बलिष्ठ,

संघटित व कार्योन्मुख व्हावा व सर्व विचारांचे ओघ अखेर नद्यांप्रमाणे समाजहिताच्या समुद्रात विलीन व्हावेत असा आमचा प्रयत्न राहील. .. कोणत्याही एका विशिष्ट पक्षाचा अभिनिवेश न धरता, त्या त्या प्रसंगी योग्य दिसेल ते नि:पक्षपातीपणे आणि स्वतंत्रपणे लिहिण्याचे धोरण या पत्राचे राहील.. आपल्या मताला विरोधी असलेली बातमी न छापण्याची किंवा छापली तरी ती गाळून कापून किंवा फिरवून वा आपणास हवी तशी कुस्करून छापावयाची हे धोरण या पत्रास वर्ज्य राहील... हिंदुस्थानातच काय पण जगाच्या बाजारपेठेत आज जे जे चांगले पदार्थ मिळतात ते सर्व महाराष्ट्र वाचकांच्या ताटात आणून ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. ज्ञानाची विशेष भूक म्हणून इंग्रजी पत्रे वाचणाऱ्या मराठी वाचकांना .. महाराष्ट्राच्या अनुभवाने, ज्ञानाने व स्वसंपादित बुद्धिमार्गाने बनविलेला पाक मराठी वाचकांना या पत्राद्वारे मिळावा अशी आमची मनीषा आहे." (मराठी लोकांना इंग्रजी दैनिक चालवता येत नाही, ही समजूत मोडून काढण्यासाठी परुळेकरांचा 'न्यू एज' नावाचे इंग्रजी दैनिक काढण्याचा मानस होता, परंतु त्यांचे ते स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.) मराठमोळी भाषा, अपरिचित शब्दांऐवजी प्रचलित शब्दांचा प्रयोग करण्यावर कटाक्ष, सोपी अनलंकृत वाक्यरचना, मथळा, पोटमथळा देऊन मजकुरातल्या मुद्द्यांकडे लक्ष वेधणारा मुद्रणाविष्कार हे सकाळचे भाषिक धोरण होते. केवळ मतपत्र नव्हे तर बातमीपत्रावर भर देणारे वृत्तपत्र म्हणून सकाळ लोकांसमोर येत होता. आदल्या रात्री घडलेल्या घटनेची छायाचित्रासह बातमी 'सकाळ'मध्ये वाचकांना पहायला मिळत असे. 'चित्राने चित्त वेधते' ह्या दृष्टिकोनातून ते छायाचित्रांसह बातमी छापण्याला प्राधान्य देत. त्यासाठी परुळेकरांनी छायाचित्रांवरून छपाईसाठी तत्काळ ब्लॉक तयार करून मिळेल असे एक लाखांचे स्कॅनर मशिन घेतले होते.

सकाळ सुरू झाल्यानंतर मुंबईत झालेले हिंदुमुसलमान दंगे, १९३३ ची पुण्यातली प्लेगची साथ, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, गांधीजींचे येरवडा तुरुंगातील उपोषण, रं. धों. कर्वे यांच्यावरील खटला, जर्मन-अमेरिकेतल्या निवडणुका, ऑलिम्पिक सामने अशा सर्व प्रकारच्या बातम्यांचे अंतरंग छायाचित्रे, नकाशे यासह सकाळमधून वाचायला मिळत होते. टांगेवाल्यालाही 'सकाळ' आपला वाटायला हवा इतकी वाचकसन्मुखता ठेवून सकाळ संपादित केला जात होता. सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'सकाळ' कटिबद्ध असे. १९३६ साली पुण्यात सायकलींवर कर बसविण्यात आला होता. गरिबांच्या वाहनावर कर लावण्याच्या घटनेची दखल घेऊन सकाळने यासंबंधी लोकांच्या प्रतिक्रिया गोळा करून छापल्या, या निर्णयाविरुद्ध अग्रलेख लिहून कर अन्याय कसा आहे, हे सप्रमाण दाखवून दिले. वाचकांची सामिलकी वाढविण्यासाठी 'सकाळ' पत्राकडून निरनिराळे उपक्रम केले जात होते. भाजीपाला समिती, कीर्तनप्रचार सभा, नाट्यवाचन समिती, ग्रंथपुरस्कार अशा उपक्रमांची अभिनवता

हे सकाळचे वैशिष्ट्य होते. सुरुवातीला परुळेकरांचे हे नवे वळण पारंपरिक पत्रकारितेच्या सरावलेल्या नजरांना फारसे भावत नव्हते. कधी हे प्रयोग थट्टा आणि उपहासाचाही विषय होत असत. तत्कालीन पत्रव्यवसायातले सहयोगी वि. वा. शिरवाडकर यांनी याविषयीचा अनुभव नोंदवताना म्हटले आहे की, "सकाळ'च्या द्वारा अवतरलेल्या 'अमेरिकन जर्नालिझम'ची अगोदर मराठी साहित्यात आणि वृत्तपत्रात भरपूर चेष्टा होत होती. बायकांचे पान, मुलांचे पान, मंडईतील बाजारभाव, इत्यादी विषयांचे अब्राह्मण्य साहित्याच्या सरहद्दीवर वावरणाऱ्या आमच्या वृत्तपत्रांना रुचत नव्हते. शेवटी सारेजण हलके हलके त्याच रस्त्याने वाटचाल करू लागले. पण कोणत्याही प्रारंभकर्त्याला जो उपहास सहन करावा लागतो तो परुळेकरांच्याही वाट्याला आला." (शिरवाडकर, २०१२, पृ. ३३) अनंतराव पाटील या परुळेकरांच्या सहकाऱ्याने याविषयीचा अनुभव कथन करताना लिहिले आहे की, "पुण्यातले 'ज्ञानप्रकाश' पत्रही 'सकाळ' पत्राचा आणि परुळेकरांचा उपहास करण्यात पुढे असायचे. मात्र ज्ञानप्रकाशच्या पाठीशी 'भारत सेवक समाज' सारखी अखिल भारतीय स्वरूपाची नावाजलेली संस्था असूनही ज्ञानप्रकाशची कचेरी रात्री बंद व्हायची आणि 'सकाळ' पत्र दिवसाच्या आणि रात्रीच्या घटना देऊन वाचकांना नवीनवी माहिती द्यायचा." (बागूल,१९९७, पृ. १७)

मराठी वृत्तपत्रांच्या धेयधोरणात आणि मांडणीत झालेल्या स्थित्यंतरांचे बरेचसे श्रेय परुळेकरांकडे जाते. शिरवाडकरांनी त्याविषयी लिहिताना म्हटले होते की, वृत्तपत्र चालवणे म्हणजे 'मोहरमच्या वाघाप्रमाणे चहू बाजूंच्या हवेवर आपले कागदी पंजे आवेशाने मारणे ही कल्पना मनात घट्ट झालेली होती. (परंतु) वृत्तपत्र चालविण्याबाबत परुळेकरांची विशिष्ट भूमिका होती.. आपल्या पत्राचा बहुसंख्य वाचकवर्ग कोणता आहे, त्याच्या गरजा आणि आवडीनिवडी कोणत्या आहेत, याची निश्चित कल्पना संपादकाला हवी' असे त्यांचे मत होते. आपल्या वृत्तपत्रात दाखल झालेल्या नव्या वृत्तसंपादकांना ते तशी शिकवण देत." 'कोणी गुजराथी व्यापाऱ्याने 'गरम झरा' काढला आहे त्याची माहिती घेऊन या, स्टेडियमवर अमरसिंग आले आहेत त्यांचे जीवनचरित्र टिपून आणा, काळबादेवीला यात्रा आहे तिचा अहवाल सादर करा, त्या मराठी माणसाने भांड्यांचा कारखाना काढला आहे त्याची मुलाखत घेऊन या, अमक्याचे भाषांतर करा आणि तमक्याचा सारांश काढा.. प्रत्येक मथळा, पोटमथळा देखील विचारपूर्वक आणि आपला वाचक लक्षात घेऊन वेधक आणि वेचक शब्दांत द्यायला हवा." (शिरवाडकर, कित्ता, पृ. ४०-४१) अशा प्रकारे मराठी पत्रकारितेची नवी कार्यसंस्कृती घडविण्याचे काम परुळेकरांनी केले. घटनास्थळावर जाऊन बातमी मिळविण्याची तत्परता हा 'सकाळ' दैनिकाचा महत्त्वाचा गुणविशेष होता. १९३३ साली पुण्यात प्लेगची साथ आली तेव्हा बातमीदारांना घरोघर पाठवून साथीची लागण झालेली माणसे, रोगाला बळी पडलेल्या मृतांची संख्या यांच्या आकडेवारीसह

तपशीलवार आढावा १७ नोव्हेंबर १९३३ च्या अंकातून प्रसिद्ध केला. 'म्युनिसिपालिटीतील गोंधळ' या वृत्तमालेतून रोगराईमुळे दैनंदिन जीवनात निर्माण झालेले ताण, शासनाची भूमिका काय असावी इत्यादी बाबींवर भाष्यही करण्यात आले. घटनास्थळावरून ताजी बातमी मिळविण्यासाठी त्यांनी जिल्हावार बातमीदार नेमून आपले स्वत:चे बातमीदारांचे एक जाळे निर्माण केले. परदेशातूनही थेट ताजी बातमी मिळविण्यासाठी त्यांनी आपल्या विस्तारित मित्रपरिवारातून हक्काचे बातमीदार मिळवले. १९४७ ला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पंजाबात झालेल्या जातीय दंगलींची वार्तापत्रे, नेपाळमध्ये राजेशाही सरकारविरोधातील उठावाचे वार्तांकन, रामदास बोट बुडाली तेव्हा कोकणात जाऊन प्रत्यक्ष घडलेल्या घटनेची साद्यंत माहिती मिळविण्यासाठी अनंतराव पाटील यांना त्यांनी क्षेत्रीय वृत्तसंकलनासाठी पाठविले होते. महायुद्धाच्या काळात ज. पां. देशमुख यांना युरोपात पाठवून वृत्तवेध घेतला जाई. 'युद्धाचा गेला आठवडा' आणि 'आघाडीवरील विहंगमावलोकन' या शीर्षकाखाली रोजची युद्धस्थिती दाखविणाऱ्या नकाशांसह दर रविवारी युद्ध घटनांचे विश्लेषण प्रसिद्ध केले जात असे. नौखालीच्या दंगलीचीही अशी सविस्तर वार्तापत्रे सकाळने प्रसिद्ध केली होती. भारत स्वतंत्र होणे ही केवळ राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक घटना आहे हे लक्षात घेऊन 'सकाळ'ने स्वातंत्र्यप्राप्तीच्या बातमीपत्रांमध्ये पंतप्रधान नेहरूंचे १५ ऑगस्ट १९४७ चे संपूर्ण भाषण, स्वातंत्र्यप्राप्तीमुळे तुरुंगातून मुक्त केलेल्या कैद्यांची संख्या, जिल्हा परिषदा, म्युनिसिपालिट्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिलेले बोनस, हॉटेलमालकांनी वाटलेला फुकट चहा, सिनेमागृहांतून प्रत्येकाला दिला गेलेला पेढा आणि नारळ, फोटो स्टुडिओंनी दिलेल्या विशेष सवलती, विजयालक्ष्मी पंडित स्वतंत्र भारताच्या रशियातील पहिल्या वकील म्हणून रशियाला रवाना झाल्याचा फोटो, स्वातंत्र्याचा अर्थ आणि जबाबदारी याविषयीचे विश्लेषण करणारे संपादकीय, असा समग्र सोहळा 'सकाळ'मधून वाचकांपर्यंत पोहचविण्यात आला होता. (कर्वे,२००५, पृ. ९०-९१) वृत्तपत्रांची सांस्कृतिक प्रस्तुतता काय असते, याचा हा नमुना होता.

लोकभाषेचे वळण बाजूला ठेवून अभिजात शब्दप्रयोगांचा अकारण वापर करण्याची वृत्तसंपादकांची सवय मोडण्यासाठी ते सतत दक्ष असत. एकदा एका बातमीपत्रात 'दिलासा' शब्द उपयोजिलेला होता. परुळेकरांनी अनंतराव पाटील या आपल्या वृत्तसंपादकास सांगितले की, "दिलासा शब्दाचा अर्थ सदाशिव-नारायण पेठेतील उच्चभ्रू मंडळींना समजेल. सोमवार-मंगळवार पेठेतील वाचकांच्या अंगावरून जाईल. 'सकाळ'चा वाचकवर्ग पूर्व विभागातही आहे याचा विसर पडू देऊ नका. सोपे शब्द वापरा, सोपी सुलभ भाषा लिहा. रस्त्यावरचा मोची, सायकल दुरुस्तीवाला, हातगाडीवाला, पानपट्टीवाला, मंडईतला भाजीवाला विक्रेता सकाळ पत्र विकत घेऊन वाचीत असतो. त्याला तुमची

सदाशिवपेठी भाषा नकोय." (बागूल, १९९७, पृ. १८)

सकाळ पत्र सुरू झाले त्याच सुमारास १९३२ साली वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गदा आणणारी अधिसूचना सरकारने काढली होती. राजकीय चळवळीच्या मिरवणुका, सभा, कायदेभंगाच्या बातम्या प्रसिद्ध करण्यावर नियंत्रण आले होते. 'सकाळ'ला त्यामुळे सरकारी आदेशानुसार जामिनापोटी सात हजार रुपये भरावे लागले. सरकारच्या काळ्या यादीत नाव गेल्याने सरकारी जाहिराती नाकारल्या गेल्या. पुणे नगरपालिका, पुणे विद्यापीठ यांच्या कारभारातल्या उणीवा सकाळमधून पुढे आल्याने याही संस्थांनी आपल्या जाहिराती देण्याचे थांबविले. परिणामत: सकाळची आर्थिक कुचंबणा झाली; मात्र सकाळने आपली विश्वासर्हता आणि लोकप्रियता कायम टिकविल्याने याही संकटातून बाहेर पडता आले. छोट्या जाहिरातींच्या उपक्रमाने आर्थिक स्त्रोत निरंतर चालू ठेवण्याचा उपाय सकाळने शोधला. १९३२ साली दैनिक 'सकाळ'चा खप ३,२०,००० होता. आणि रविवार सकाळचा खप ३,२८,००० इतका होता. (कर्वे, २००५, पृ. ७६) 'तेज' नावाचे एक पाव आणा किंमतीचे दैनिकही परुळेकरांनी चालवून पाहिले. मुंबईत २१ मार्च १९३६ पासून 'स्वराज्य' हे दैनिक सुरू केले. मुंबईतून 'प्रभा' नावाचे साप्ताहिकही चालविले. (पुढे ते साप्ताहिक 'सकाळ' या नावाने सुरू राहिले) यामुळे सतत आर्थिक ताण अंगावर घेत सकाळची वाटचाल सुरू होती.

**त्रिकाळ (१९३३-१९३९) :**

लोकमान्य टिळकांचे अनुयायी व स्वा. सावरकरांच्या हिंदुमहासभेचे कार्यकर्ते शि. ल. करंदीकर यांनी १९३३ साली 'त्रिकाळ' नावाचे एक पैसा किंमतीचे पत्र सुरू केले होते. हिंदुमहासभेच्या राजकारणाचा पुरस्कार हेच या पत्राचे ध्येय होते. त्यामुळे सरकारवर प्रखर, खोचक व उपरोधपूर्ण टीका करण्यात हे पत्र अग्रेसर राहिले. त्यामुळे ते एकीकडे लोकप्रिय होत होते आणि दुसरीकडे सतत सरकारकडून जामीन मागितला जाऊन ह्या पत्राची कोंडी करण्याचा प्रयत्न होत असे. या सरकारी जाचाला त्रासून अखेर १९३९ साली हे पत्र बंद करण्याचा निर्णय करंदीकरांना घ्यावा लागला.

**अग्रणी (१९३९-१९४८):**

दामोदर नरहर शिखरे (१९०३-१९८०) यांनी 'केसरी' पत्रातली नोकरी सोडल्यावर १६ सप्टेंबर १९३९ पासून 'अग्रणी' नावाचे साप्ताहिक सुरु केले. आर्थिक स्वावलंबन नसल्याने गोवर्धन संस्थेकडून दरमहा २५० रु. ची आर्थिक मदत घेऊन बदल्यात त्या संस्थेसाठी एक पानाचा मजकूर देण्याचा करार करून शिखरे यांनी हे साप्ताहिक चालविले. आपल्या साप्ताहिकाची भूमिका कथन करताना शिखरे यांनी लिहिले होते की, "राष्ट्र स्वातंत्र्यासाठी व्रतबद्ध झालेल्या पक्षोपक्षांच्या विचारप्रवाहांची माहिती देण्यासाठी व स्वदेशातील व परदेशातील राजकारणाची दिशा दाखविण्यासाठी 'अग्रणी' अधिकाधिक

अवकाश व अवसर देईल." १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाचा प्रचार शिखरे यांनी या पत्रातून हिरीरीने केला. त्यासाठी १४ सप्टेंबर १९४२ पासून अग्रणी दैनिक स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येऊ लागले. मात्र दैनिकासाठी लागणारे पैशाचे पाठबळ नसल्याने १३ नोव्हेंबर १९४२ ला पत्र बंद करावे लागले. पुढे नथूराम गोडसे आणि नारायण आपटे यांनी शिखरे यांच्याकडून सावरकरांच्या अस्पृश्यतानिवारणासाठी हे पत्र ५०० रुपयात विकत घेतले व सावरकरांकडून आर्थिक मदत घेऊन मार्च १९४४ पासून दैनिक स्वरूपात सुरू केले. या पत्रातून गोडसे यांनी म. गांधी आणि काँग्रेसवर निंदाव्यंजक मजकूर छापायला सुरुवात केल्यावर शिखरे यांनी आक्षेप घेतला; त्यावर अग्रणी हे नाव बदलून 'हिंदुराष्ट्र' या नावाने गोडसे हे पत्र पुढे चालवू लागले. गांधीजींच्या हत्येनंतर ३१ जानेवारी १९४८ पासून हे पत्र बंद झाले. शिखरे यांनी 'महात्मा' नावाचे मासिक चालवून गांधीविचारांचा प्रसार चालू ठेवला.

### अर्थ (१९३५-१९७४):

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक असलेले व अर्थशास्त्रात ग्रंथलेखन करणारे अर्थतज्ज्ञ प्रा. वामन गोविंद काळे यांनी १९३५ साली केवळ आर्थिक-औद्योगिक विषयाला वाहिलेले 'अर्थ' साप्ताहिक सुरू केले. सर्वसामान्य मराठी माणसाची अर्थसाक्षरता वाढविणे आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी दिशादिग्दर्शन करणे हे या साप्ताहिकाचे ध्येय होते. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'तील 'अर्थमूलौ धर्मकामाविति' हे वचन या पत्राचे सूत्रवचन होते. मानवी जीवनातील धर्मकामाचे मूळ 'अर्थ'कारणात आहे, हे सूत्र नजरेसमोर ठेवून या अंकाचे संपादन केले जात असे. स्वत: काळे यांनी 'अर्थ' साप्ताहिकामागची भूमिका कथन करताना म्हटले होते की,"आमच्या समाजास साहित्य, संगीत, कला ह्यांची जशी आवश्यकता आहे तशीच उद्योगधंध्यांची व व्यापाराचीही आहे. .. तथापि महाराष्ट्रात अर्थविषयक प्रवृत्ती अत्यंत दुर्बळ असल्याने ह्यासंबंधाच्या कल्पनांचा व वाङ्मयाचा महाराष्ट्रात अभावच आहे असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही.. हा दोष नाहीसा करण्याचा एक मार्ग म्हणजे अर्थविषयक वाङ्मय निर्माण करून सामान्य जनतेसही त्याचा फायदा घेता यावा अशी सोय करणे हा होय. आर्थिक लोकजागृती आणि आर्थिक व्यवहारांचे लोकशिक्षण हाच आमच्या प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे." आर्थिक प्रश्न गुंतागुंतीचे व समजण्यास अवघड असतात. म्हणून सुलभ भाषेत आर्थिक घडामोडींचा परिचय करून देण्यावर या पत्राचा भर होता. १९४६ पर्यंत वा. गो. काळे 'अर्थ'चे संपादक होते, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव श्रीपाद वामन काळे यांनी १८ डिसेंबर १९७४ पर्यंत हे साप्ताहिक चालू ठेवले होते.

### साधना (१९४८) : साने गुरुजी

स्वातंत्र्यपूर्वकाळात साने गुरुजी खानदेशातून 'काँग्रेस' पत्र चालवित होते. म. गांधींची

हत्या झाल्यानंतर १ फेब्रुवारी १९४८ पासून साने गुरुजींनी उपोषण सुरू केले. उपोषणकाळात १० फेब्रुवारीपासून त्यांनी जातीय वृत्ती नष्ट करणे व लोकशाही समाजवाद आणणे ही ध्येये ठेवून मुंबईतून 'कर्तव्य' नावाचे सायंदैनिक सुरू केले. स्वत:चा छापखाना नसल्याने चार महिन्यांनतर ते बंद पडले. त्यामुळे दैनिकाऐवजी साप्ताहिक चालविणे योग्य राहील म्हणून त्यांनी १५ ऑगस्ट १९४८ पासून 'साधना' साप्ताहिक सुरू केले. भा. ल. मांजरेकर ह्या साने गुरुजींच्या अमळनेरच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने त्यांनी मुंबईत मुद्रणासाठी लागणारा टाइप खरेदी केला, चार पाने एकदम छापले जातील असे एक प्रिंटिंग मशीन भाडेतत्त्वावर घेतले, ४-५ कंपोझिटर्सच्ची नेमणूक करून 'साधने'च्या छपाईची पूर्वतयारी केली. पहिल्या पानावर छापण्यासाठी गांधीजींवर लेख लिहिला, चित्रकार ओके यांच्याकडून गांधीजींचे चित्र तयार करून घेतले आणि १५ ऑगस्ट १९४८ रोजी पहिला अंक प्रसिद्ध केला. अंकाच्या घड्या घालणे, पार्सले बांधणे या कामांसाठी रात्री सेवादलाचे सैनिक मदतीला येत. (श्रीरंग वरेरकर / प्रधान २००७ ग, पृ. ८-९)

समाजमानसातील वैरभाव व विषमता नष्ट करणे हे व्यापक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून हे साप्ताहिक सुरू करण्यात आले. लोकशाही समाजवादाच्या नवभारताचे स्वप्न पाहाणाऱ्या साने गुरुजींनी 'साधने'ची भूमिका स्पष्ट करताना लिहिले होते की, "वैरभाव नि विषमता नष्ट करण्याची थोर साधना'आपणास करावयाची आहे. हे 'साधना' साप्ताहिक या ध्येयाने जन्मत आहे. .. या साप्ताहिकाचे स्वरूप कसे असेल? निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकार येथे तुम्हाला दिसतील. भारतातील प्रांतबंधूंची येथे प्रेमाने ओळख करून देण्यात येईल. देशातील व जगातील नाना संस्कृतींचे रंग व गंध तुम्हाला दाखवण्यात येतील. नाना धर्मांतील सुंदरता, उदात्तता यांची येथे भेट होईल. शेतकरी, कामगार यांच्या जगातही आपण येथे वावरू. त्यांचे प्रश्न चर्चू. त्यांची स्थिती समीक्षू. शिक्षणाच्या क्षेत्रातही आपण जाऊ. मुलांच्या संगतीत रमू. ती आपल्याला गोष्टी सांगतील; आपण त्यांना सांगू. समाजात अनेक अज्ञात माणसे सेवा करून समाजवृक्षाला ओलावा देत असतात, त्यांच्या हकिकती येथे येत जातील. कधी येथे प्रश्नोत्तररूप महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा असेल. गंभीर विषयांवरचे निबंध येतील. कधी आपण साहित्याच्या मंदिरात दर्शनाला जाऊ, तर कधी विज्ञानाच्या पराक्रमी कथा ऐकू. कधी निर्मळ समाजाचे उपनिषद वाचू. मनात कितीतरी आहे. जेवढे जमेल तेवढे करीन" (प्रधान ग. प्र. २००७, पृ. १२-१३)

साने गुरुजींनी अल्पावधीत 'साधने'साठी नित्यनेमाने लेखन केले. भारतातील भाषा-भगिनींच्या ऐक्यातून परस्परांच्या अनुभवांनी जीवन कसे समृद्ध होईल याचे दिग्दर्शन करणारे लेखन केले. आंतरभारतीच्या संकल्पनेची मांडणी करणारा 'संयम आणि सहानुभूती' (२१ ऑगस्ट १९४८) हा अग्रलेख, भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करणारा

'संयुक्त महाराष्ट्र' (१६ ऑक्टोबर १९४८) गांधीजींच्या सत्याग्रहाचे मर्म त्यामागे असलेल्या शीलाच्या अधिष्ठानात आहे हे सांगणारा 'चारित्र्याचे सामर्थ्य' (१६ एप्रिल १९४९) हे अग्रलेख लिहिले. स्वामी विवेकानंद (२ जुलै १९४९), तुकाराम महाराज (४ मार्च १९५०), पुण्यश्लोक शिवछत्रपती (२२ एप्रिल १९५०) यांच्यावर अग्रलेख लिहिले. महाकवी गटे यांच्या दोनशेव्या जयंतीनिमित्त विशेष लेख लिहिला.

१५ ऑगस्ट १९४८ ते ११ जून १९५० असे पावणेदोन वर्षे साने गुरुजींनी 'साधने'चे संपादन केले. मात्र ११ जून १९५० रोजी अचानक साने गुरुजींनी आपली जीवनयात्रा संपविली. त्यानंतर आचार्य जावडेकर आणि रावसाहेब पटवर्धन यांनी साधनेचे संपादकत्व स्वीकारून या साप्ताहिकाचे प्रकाशन पुढे चालू ठेवण्याची व्यवस्था निर्माण केली व 'साधना' साप्ताहिकातून 'सत्याग्रही समाजवादा'च्या विचारांचे पोषण करण्याची जबाबदारी घेतली. 'आमच्या राजकारणाचे नैतिक अधिष्ठान' (१४ जानेवारी १९५०), 'महात्मा गांधींचा चतुर्वेध संदेश' (४ फेब्रुवारी १९५०), 'भारतीय समाजवाद आणि सत्याग्रह' (२३ डिसेंबर १९५०) हे जावडेकरांचे या काळातले अग्रलेख त्यांच्या वैचारिक बांधिलकीचे निदर्शक आहेत. 'साधना'च्या बालविभागात साने गुरुजींनी पुतणी सुधास लिहिलेली पत्रे, हुतात्मा कमलाकर दांडेकरच्या बलिदानाची हकिगत कथन करणारा 'सेवादलाच्या थोर वीर' हा लेख, 'मुलगा गुरू झाला' ही कथा प्रसिद्ध झाली. संस्कारप्रवण मजकुराबरोबर विविध प्रकारच्या उपक्रमांची माहिती मुलांना व्हावी असा दृष्टिकोण ठेवून मुलांसाठी मजकूर प्रसिद्ध केला जात असे.

पुणे शहरातून इतरही अनेक अल्पकाळ चाललेली पत्रे प्रसिद्ध होत होती, त्या सर्वांची तपशीलवार माहिती उपलब्ध नसल्याने काही पत्रांचे निर्देश तेवढे करणे शक्य आहे. अशा पत्रांमध्ये केवळ स्थानिक स्वराज्याच्या कारभाराची माहिती देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या लक्ष्मण जनार्दन आपटे यांच्या 'स्थानिक स्वराज्य' (१९२४) पत्राचा विशेष निर्देश करायला हवा. म्युनिसिपालिटीच्या कार्याची उद्दिष्टे काय याविषयीची चर्चा आणि कारभाराचे वृत्तांत देण्यावर ह्या पत्राचा भर होता. पुणे म्युनिसिपालिटीनेही 'स्थानिक स्वराज्य वृत्त' (१९२७) नावाचे पाक्षिक सुरू केले होते. पुण्याखेरीज इतरही म्युनिसिपालिट्यांचे वृत्त या पत्रातून प्रसिद्ध होत असे. शंकर त्र्यंबक आवटे यांनी भागवत धर्माचा व राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी 'राष्ट्रीय मराठा' (१९२६) साप्ताहिक सुरू केले होते. रामराव गोविंदराव शिंदे यांनी समतेच्या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी 'जरीपटका' (१९२६) पत्र चालविले होते. शैक्षणिक क्षेत्रात गो. ल. आपटे यांनी 'कॉलेज' (१९२७), वि. म. पटवर्धन यांनी 'सवाई कॉलेज' (१९२७) आणि के. एन. फडके यांनी 'कौमुदी' साप्ताहिक चालविले होते. शेतकरी-कामगार पक्षाचे मुखपत्र म्हणून २६ फेब्रुवारी १९४९ पासून शंकरराव मोरे यांनी 'जनसत्ता' साप्ताहिक सुरू केले होते; परंतु ते फार

काळ चालले नाही. सामाजिक जागृती आणि वाचनाभिरुची वाढविण्यासाठी ह्या पत्रांनी आपापल्या परीने प्रयत्न केले होते.

## ३.३. मुंबई शहरातील पत्रकारिता

### इंदुप्रकाश (१८६२-१९२४):

१८६२ साली मुंबईतून प्रकाशित होणारे 'इंदुप्रकाश' हे साप्ताहिक लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित यांच्या लेखनामुळे नावारूपाला आले होते. मात्र १८९९ साली ते बंद पडले होते. विसावे शतक उजाडताना हे पत्र चालविण्यासाठी न्या. रानडे व सर भालचंद्र भाटवडेकर यांनी बडोद्याचे दामोदर सावळाराम यंदे यांना पाचारण केले. यंदे यांनी 'इंदुविजय' कंपनी स्थापन करून मुंबईत ह्या पत्राचे पुनरुज्जीवन केले. त्यानंतर १९०२ पासून १९२४ पर्यंत हे पत्र 'दैनिक' पत्राच्या स्वरूपात चालू होते. नेमस्त विचारांचे पत्र अशी 'इंदुप्रकाश'ची ओळख होती. या पत्राच्या संपादनात त्र्यं. वि. पर्वते, न. र. फाटक, श्रीपाद अमृत डांगे इत्यादींचा सहभाग होता.

### अरुणोदय (१८६६-१९०८):

काशिनाथ विष्णू फडके यांनी १८६६ साली ठाण्याहून सुरू केलेले लो. टिळकांच्या जहाल विचारसरणीचा पुरस्कार करणारे होते. १९०८ साली टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला त्या वेळी ब्रिटिशांच्या दडपशाही धोरणातून 'अरुणोदय'वर खटला भरणात आला व त्याची परिणती हे पत्र बंद पडण्यात झाली.

### हिंदुपंच (१८७२-१९०९)

गोपाळ गोविंद दाबक यांनी १८७२ साली सुरू केलेले 'हिंदुपंच' हे मराठीतले पहिले व्यंगचित्रात्मक (कॉमिक) पत्र होते. १९०४ साली या पत्राचे संपादकत्व कृष्णाजी काशिनाथ फडके यांच्याकडे गेले. लोकमान्य टिळकांच्या जहाल राजकारणाचा पुरस्कार करणारे हे पत्र होते. स्वदेशी चळवळ, बहिष्कार, जहाल-मवाळ वाद, अभिनव भारत चळवळ, दारूबंदी,कर्झनने केलेली बंगालची फाळणी, बडोद्याच्या गायकवाड महाराजांना युरोपात भेटीला आलेल्या स्त्रिया, कैसर आणि झारची मैत्री इत्यादी विषयांवर व्यंगचित्रे छापली जात. 'हिंदुपंचा'त ना. गोखले, फिरोजशहा मेथा इत्यादींची व्यंगचित्रे प्रसिद्ध होत. त्यात गोखले कधी सुनबाईंच्या वेषात, कधी मरतुकड्या गाढवाच्या रूपात, तर कधी विलायतेला उडून जाणाऱ्या पोपटाच्या स्वरूपात दाखविले जात. हातात लाटणे घेतलेले मेथांचे व्यंगचित्र सासुबाईच्या अवतारात साकार केले जाई. या हास्यचित्रांतून कडवा उपरोध व्यक्त होत असे. कधी ग्राम्य व बीभत्स स्वरूपापर्यंत ह्या व्यंगचित्रांच्या शैलीचा अतिरेकही होत असे. १९०८ साली लो. टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात सहा वर्षांची शिक्षा झाली, त्यावेळी टिळकांच्या खटल्याला ना. गोखले कारणीभूत आहेत अशा

आशयाची टीका करणारे व्यंगचित्र या पत्रातून प्रसिद्ध झाल्यावर गोखल्यांनी 'हिंदुपंच'च्या संपादकांविरुद्ध कोर्टात दावा दाखल केला. १९०९ साली डिसेंबरात कोर्टाने निकाल दिला व संपादक फडके यांना पाच रुपये दंड व प्रतिवादीस दाव्याचा खर्च भरून देण्याची शिक्षा सुनावली. शिवाय सरकारने त्या काळात इतर वृत्तपत्रांप्रमाणे 'हिंदुपंच'चा छापखानाही जप्त केल्याने हे पत्र बंद पडले.

**सुबोधपत्रिका (१८७३):**

प्रार्थना समाजाचे मुखपत्र म्हणून १ मे १८७३ रोजी सुरू झालेले 'सुबोधपत्रिका' हे पत्र शंभर वर्षे चालले. राजकारण हा सुबोधपत्रिकेचा विषय नव्हता; धर्मकारण व समाजकारणाला वाहिलेले पत्र अशीच सुबोधपत्रिकेची अखेरपर्यंत ओळख कायम होती.

**देशसेवक (१८९१-१९१०) :**

मुंबईच्या 'विविधज्ञानविस्तार'चे संपादक हरी माधव पंडित यांनी १८९१ साली नागपूरातून 'देशसेवक' साप्ताहिक सुरू केले होते. नेमस्त विचारांचे पत्र अशी त्याची प्रारंभिक ओळख होती. मात्र विसाव्या शतकात १९०६ नंतर संपादक म्हणून टिळकभक्त दादासाहेब ओगले आणि अ. ब. कोल्हटकर यांच्याकडे या पत्राचे संपादकत्व आल्यावर ते टिळकसंप्रदायाच्या जहाल राजकीय विचारांचे मुखपत्रच झाले. श्री. म. माटे हे पुण्याहून बातमीपत्रे पाठवित, त्यामुळे विदर्भवासीयांचा या पत्रामार्फत पुण्याच्या राजकीय केंद्राशी संपर्क रहात असे. १९०७ साली नागपूरात राष्ट्रीय सभेचे अधिवेशन व्हायचे घाटत होते, तेव्हा टिळकांना कॉंग्रेसचे अध्यक्षपद मिळावे म्हणून नागपूरातील डॉ. बा. शि. मुंजे गटाची बाजू उचलून धरण्याचे काम 'देशसेवक'ने केले. मात्र हे प्रस्तावित अधिवेशन पक्षातील अंतर्गत वादामुळे नागपूरला न होता सुरतला झाले. या काळात ब्रिटिश शासनाने वृत्तपत्रांवर निर्बंध आणून राजद्रोहाचे खटले भरण्याचा सपाटा चालवला होता, त्याची झळ 'देशसेवक'लाही बसली. देशसेवक ज्या 'प्रबोध' छापखान्यात छापले जात असे त्याच छापखान्यातून अरविंद घोष यांच्या भाषणांचे पुस्तक छापून प्रसिद्ध करण्यात आले. त्यावर प्रकाशक म्हणून अ. ब. कोल्हटकर यांचे नाव छापले असल्याने कोल्हटकरांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व त्यांना अडीच वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यानंतर गोपाळराव ओगले यांनी 'देशसेवक'च्या संपादकपदाची सूत्रे हाती घेतली. ओगले यांनी अच्युतराव कोल्हटकरांच्या खटल्यासंबंधी १८ जानेवारी १९०९ रोजी लिहिलेला लेख आणि नागपूरच्या महाराज बागेतील राणीच्या पुतळ्यासंबंधी झालेल्या खटल्यावर लिहिलेला लेख आक्षेपार्ह ठरविण्यात आला व ओगल्यांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यानंतर शंभुराव गाडगीळ संपादक झाले. त्यांच्या 'पदव्यांचा पोकळपणा' हा लेख आक्षेपार्ह ठरवून त्यांनाही एक हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा झाली. अखेर १९१० साली

'देशसेवक' पत्र बंद पडले.

**नेटिव्ह ओपिनियन (१८८९-१९०८) :**

मामा परमानंद यांच्या संपादकत्वाखाली सुरू झालेले 'नेटिव्ह ओपिनियन' हे पत्र १८८९ पासून पाक्षिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. लोकमताचा विकास करणे, हे या पत्राचे ध्येय्य होते. १९०८ साली ब्रिटिश शासनाने वृत्तपत्रस्वातंत्र्यावर आणलेली दडपणे लक्षात घेऊन या पत्राचे प्रकाशन थांबविण्यात आले.

**मुंबई वैभव (१८९३- )**

१ सप्टेंबर १८९३ रोजी मुंबईत केशव पुरुषोत्तम मेहेंदळे संपादित 'मुंबई वैभव'नामक पत्र सुरू झाले. १९०५ पासून हे पत्र दुप्पट आकारात प्रसिद्ध होऊ लागले. केवळ स्थानिक वार्ता व इतर बातमीपत्रांसोबत राजकीय-सामाजिक विषयांवरचे निबंध, नाट्यप्रयोगांची परीक्षणे, हवामान, बाजारभाव इत्यादी मजकूर प्रसिद्ध केला जात असे.

**विहारी (१९०४-१९०८)**

मुंबईहून भास्कर विष्णू फडके यांनी २६ डिसेंबर १९०४ पासून 'विहारी' हे साप्ताहिक पत्र सुरू केले होते. टिळकांच्या राजकारणाचा प्रसार करणे हे या पत्राचे आद्य उद्दिष्ट होते. स्वदेशी चळवळ, नोकरशाहीच्या अतिरेकाची वृत्ते प्रसिद्ध करण्याला प्राधान्य दिले जात असे. कायद्याच्या अभ्यासासाठी वि. दा. सावरकर मुंबईत आले तेव्हा १९०६ पासून 'विहारी'तून अभिनवभारत चळवळीला स्थान दिले गेले. १९०८ साली 'मॅझिनीचे बोल' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या बंडूनाना पाटणकर यांच्या कविता ब्रिटिश सत्तेच्या रोषाचे कारण ठरल्या व संपादक फडके यांना अटक करण्यात आली. फडक्यांना अटक झाल्यावर रामभाऊ मंडलिक यांनी संपादकपदाची जबाबदारी घेतली, मात्र त्यांनाही ब्रिटिशांच्या दडपशाहीचा फटका बसला व छापखाना जप्त झाला, मंडलिकांनाही अटक झाली. स्वाभाविकच 'विहारी' पत्र बंद करणे भाग पडले.

**राष्ट्रमत (१९०८-१९१०):**

राष्ट्रीय पक्षाच्या मतप्रचारासाठी १९०८ साली लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने मुंबईत नॅशनल पब्लिशिंग कंपनी स्थापन करून 'राष्ट्रमत' नावाचे दैनिक सुरू करण्यात आले. कंपनीच्या संचालकमंडळात स्वत: लो. टिळक, चिंतामणराव वैद्य, वामन सखाराम खरे, डॉ. दिनकर साठ्ये इत्यादींचा समावेश होता. कवी केशवसुत यांचे बंधू सीताराम केशव दामले यांच्याकडे 'राष्ट्रमत'च्या संपादकपदाची व बेळगावचे गंगाधरराव देशपांडे यांच्याकडे व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविण्यात आली. पहिला अंक २९ जून १९०८ रोजी प्रसिद्ध झाला. समाजात उत्कट जागृती करण्यासाठी लोकांची खरी स्थिती व अधिकाऱ्यांचे स्वैर वर्तन तात्काल उघडकीस आणण्याचे संपादकीय धोरण सुरुवातीलाच

जाहीर करण्यात आले होते. राजकारणाखेरीज गिरणी कामगारांचे प्रश्न, अंत्यजोद्धार यासारख्या सामाजिक प्रश्नांतही 'राष्ट्रमत'ने लक्ष घातले. मात्र लो. टिळक यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात जावे लागल्याने पत्राचे छत्र हरपले; तशात जॅक्सनचा खून करणाऱ्या अनंत कान्हेरे यांच्या मदतीसाठी निधी संकलनाच्या कामात राष्ट्रमत"च्या संपादकवर्गाचा हात असल्याचे लक्षात आल्याने सरकारने वृत्तपत्रकायद्याखाली राष्ट्रमत पत्रास जमानतीची रक्कम भरण्याचा आदेश काढून अडचणीत आणण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर 'राष्ट्रमत'च्या व्यवस्थापक मंडळाने पत्र बंद करण्याचा निर्णय घेतला व २० मार्च १९१० रोजी ह्या अंकाने वाचकांचा निरोप घेतला.

**संदेश (१९१५-१९३०) :**

अ. ब. कोल्हटकर यांनी नागपूरच्या 'देशसेवक'चे संपादक असताना राजद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगवास भोगला होता. त्यानंतर त्यांनी मुंबईत १४ जानेवारी १९१५ रोजी संक्रांतीच्या मुहूर्तावर 'संदेश' दैनिक सुरू केले. मुंबईत त्यावेळी राष्ट्रीय पक्षाचे एकही मुखपत्र नव्हते, अशा वेळी लो. टिळकांच्या राजकारणाला पूरक असणारे वर्तमानपत्र कोल्हटकरांनी सुरू केले. तो काळ महायुद्धाचा असल्याने महायुद्धाची वार्तापत्रे प्रसिद्ध करून तसेच सभा-संमेलने-परिषदांचे वृत्तांत व राजकीय पक्षांच्या वृत्तांना स्थान देऊन मध्यमवर्गापासून कामगारवर्गापर्यंत समाजातल्या विविध घटकांतला वाचकवर्ग जोडण्याचे कामही कोल्हटकरांनी कौशल्याने साधले. लोकमान्य टिळकांच्या 'स्वराज्यसंघा'च्या दौऱ्यांच्या तपशीलवार वृत्तांतांबरोबरच सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाच्या बातम्यांनाही या पत्रातून यथायोग्य स्थान मिळत असे. 'संदेश' हा नफे कमावणाऱ्यांचा पेपर नसून स्वातंत्र्यभक्तांचा पेपर आहे, असे ते ठणकावून सांगत. 'संदेश'चे वृत्तपत्रीय धोरण स्पष्ट करताना अच्युतरावांनी लिहिले होते की, "संदेश हा मजुरांचा पेपर आहे. हा अस्पृश्यांचा कैवारी आहे, हा धर्मस्वातंत्र्याचा अभिमानी आहे, स्त्रियांच्या शिक्षणाच्या वादात ह्याने प्रबलमतविरोधालाही न जुमानता स्त्रियांचीच बाजू घेतलेली आहे. आमच्या भगिनीवर्गाला तर संदेश इतका प्रिय आहे की, संदेश बघितला की त्यांना कुणी तरी माहेरचाच आलेला आहे असे वाटते. संदेशचे हेच धोरण पुढे राहील आणि राजकीय स्वातंत्र्याच्या योगाने सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्याचा तो नेहमी यत्न करील." (संदेश, १४ सप्टेंबर १९२०) राजकारणाइतकेच नाटक, खेळ, व्याख्याने यांना 'वृत्त' म्हणून महत्त्व असते असे त्यांचे मत होते. त्यामुळे क्रिकेटपासून नाटकापर्यंत लोकानुरंजनाच्या सर्व आस्थाविषयांची दखल 'संदेश'पत्राने घेतली होती. स्त्रीसुलभ म्हणी-वाक्प्रचारांची पेरणी करीत सामाजिक-राजकीय प्रश्नांची चर्चा करणारे 'वत्सला वहिनींची पत्रे' हे सदर, 'चहा, चिवडा, चिरूट' इत्यादी सदरे लोकप्रिय होती. 'संदेश' मधून 'नाटकमंडळ्यांचे गॅझेट' या सदरातून नाटक कंपन्यांचे दौरे, नाट्यप्रयोगांचे तपशीलवार वृत्तांत प्रसिद्ध होत. नाटकाच्या पुस्तकात

दिल्या जाणाऱ्या रंगसूचनांप्रमाणे ते आपल्या बातमीपत्रांत कंसात 'हशा', 'टाळ्या' असे शब्द पेरून वृत्तघटनेची दृश्यात्मकता वाढवीत. चित्रे-व्यंगचित्रे यासह मजकूर प्रसिद्ध करण्याच्या शैलीमुळे हे पत्र अधिकाधिक वाचकप्रिय झाले. मात्र टिळकांच्यावर अपार निष्ठा असूनही त्यांनी काही वेळा 'टिळक बाळंतीण झाले' यासारख्या शीर्षकाचे टिळकांवर मर्यादा सोडून टीका करणारे लेख लिहिल्याने त्यांना वाचकांचा रोष ओढवून घ्यावा लागला होता. मात्र टिळकांच्या मृत्यूनंतर ५६ पानांचा लोकमान्य विशेषांक प्रसिद्ध करून त्यांनी टिळकांच्या कार्याचे यथायोग्य आकलन जनतेसमोर आणण्याचे कामही केले होते. गांधीजींच्या प्रभावाखाली महाराष्ट्रात राजकारणाचे वारे वाहू लागले तेव्हाही त्यांनी गांधीजींच्या कार्याचे वर्णन 'लोकमान्यांच्या यत्नरेषेचे दीर्घीकरण' असेच केले होते. अनेक चढउतारांनंतर १९३० मध्ये 'संदेश'चे अवतारकार्य संपले.

### कुलाबा समाचार (१९१९-)

रामभाऊ मंडलिक यांनी पेणहून 'कुलाबा समाचार' हे जिल्हा-पत्र २५ ऑक्टोबर १९१९ रोजी सुरू केले. टिळकांच्या राजकीय तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेल्या मंडलिकांनी या पत्राच्या माध्यमातून धारावाढीचा प्रश्न, कुळकायदा, खोती व कुळांचे प्रश्न, आ. नारायण नागो पाटील यांची चरी संपातील व बोर्डातील कामगिरी, कोकण एज्युकेशन सोसायटीचे कार्य, कापरेकर खून खटला, डॉ. आंबेडकरांचा महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह इत्यादी अनेक राजकीय-सामाजिक प्रश्नांची सत्य बाजू वाचकांसमोर आणण्याचे काम या पत्राने निर्भिडपणे केले.

### विजयी मराठा (१९१९-१९३१) :

पुण्यात ब्राह्मणांचा जसा 'केसरी' तसा ब्राह्मणेतरांचा 'विजयी मराठा' अशी ओळख असलेले हे पत्र श्रीपतराव शिंदे यांनी १९१९ साली सुरू केले होते. राजर्षी शाहू महाराजांचे या पत्राला आर्थिक पाठबळ होते. 'मराठा व विद्येत मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी राजकीय, सामाजिक, धार्मिक व शिक्षणादि विषयांवर निर्भीड, भारदस्त, मार्मिक व जोमदार असे लेख या अंकातून प्रसिद्ध करण्यात येतील' असे वचन आपल्या वाचकांना पहिल्याच अंकातून देण्यात आले होते. 'विजयी मराठा'ची दोन मुख्य धोरणे होती : राजकारणात ब्राह्मणेतर पक्ष बलवान होत जाण्यासाठी कटिबध राहाणे आणि धार्मिक-सामाजिक क्षेत्रात सत्यशोधक समाजाची प्रगती होण्यासाठी काम करणे. या अंकातून ब्राह्मणेतर परिषदांचे वृत्तांत प्रसिद्ध केले जात, तसे कायदे मंडळातील कामकाजाचेही वृत्तांत प्रसिद्ध केले जात. 'जगातील हालचाली' व 'वर्तमानसार' या सदरांतून देशविदेशांतील घडामोडींची नोंद घेतली जात असे. या पत्रातून दिनकरराव जवळकर यांची 'भवानी तलवार' व 'तलवारीचे वार' ही सदरे चालवीत. पंढरीनाथ पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, अ. कृ. केळुस्कर, शंकरराव मोरे, केशवराव बागडे हे ब्राह्मणेतर

चळवळीचे व सत्यशोधक विचारांचे पुरस्कर्ते या अंकातून लेखन करीत. या अंकातील 'शिवस्मारकात सैतानाचा शिरकाव' आणि 'शिवाजी मराठा सोसायटी आणि शिवाजी स्मारक' या लेखांतून ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारवर टीका करण्यात आली होती. तत्कालीन वादाच्या विषयांवर परखड लेखन प्रसिद्ध करणे यासाठी ह्या पत्राचा लौकिक होता.

**मूकनायक (१९२०-१९२३):**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१९ साली छत्रपती शाहू महाराजांकडे अस्पृश्योद्धाराच्या चळवळीसाठी वर्तमानपत्र काढण्याची कल्पना मांडल्यानंतर महाराजांनी प्रस्तावित उपक्रमासाठी अडीच हजार रुपयांचे अर्थसाहाय्य त्वरित उपलब्ध करून दिले. यानंतर डॉ. आंबेडकरांनी मुंबईतून ३१ जानेवारी १९२० रोजी 'मुकनायक' नामक पत्र सुरू केले. संपादक म्हणून वऱ्हाडातील पांडुरंग नंदुराम भटकर यांची नियुक्ती केली. डॉ. आंबेडकर इंग्लंडला बॅरिस्टरीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी गेल्यानंतर वाळव्याचे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांनी संपादकत्वाची जबाबदारी निभावली. डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' पत्राचे पत्राचे सूत्रवचन असल्यासारखा संत तुकोबारायांचा पुढील अभंग पहिल्या अंकात छापण्यात आला होता :

"काय करू आता धरूनिया भीड / नि:शंक हे तोंड वाजविले
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण / सार्थक लाजून नव्हे हित "

'मूकनायक'चे अग्रलेख डॉ. आंबेडकरांचे असत. पहिल्या अंकाच्या अग्रलेखात या अंकाची भूमिका विशद करताना डॉ. आंबेडकरांनी लिहिले होते की, "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायांवर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमी नाहीच." मुंबई इलाख्यातून प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रे विशिष्ट जातीचे हितसंबंध जपणारी व स्वहितसाधू असल्याने बहिष्कृतांना आपल्या न्याय हक्कांच्या समर्थनार्थ स्वतंत्र पत्राची गरज असल्याची भूमिका या पहिल्या अग्रलेखातून मांडण्यात आली होती. लो. टिळकांनी अस्पृश्यतानिवारक जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला, त्यावर टीका करणारे लेख 'मूकनायक'मधून प्रसिद्ध झाले. राजकीय सत्ता प्राप्त करून सामाजिक विषमतेचे दडपण कायम करू पाहण्याचा टिळकांचा कावा आहे, असे त्यांनी म्हटले होते. डॉ. आंबेडकरांच्या अनुपस्थितीत घोलप यांना 'मूकनायक'चे व्यवस्थापन हवे तसे सांभाळता न आल्याने अखेर ८ एप्रिल १९२३ रोजी अंकाची इतिश्री झाली.

**लोकमान्य (१९२१-१९५८ )**

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर ९ एप्रिल १९२१ पासून मुंबईतून 'लोकमान्य' दैनिक प्रकाशित होऊ लागले. टिळकांचे अनुयायी डॉ. भडकमकर, सोलापूरचे शंकर

बळवंत लिमये व रामभाऊ मंडलिक यांनी त्यासाठी कंपनी स्थापन करून भागभांडवल उभे केले व प्रस्तावित दैनिकासाठी छापखाना टाकून हे प्रकाशन सुरू केले होते. दैनिकाच्या संपादनाची जबाबदारी कृ. प्र. खाडिलकर यांच्यावर सोपविण्यात आली. पहिल्या अंकाच्या संपादकीयात खाडिलकरांनी अंकाची भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की, "गुरुस्थानी असलेल्या लोकमान्य टिळकांचे चरित्र डोळ्यांपुढे ठेवून, लोकांचा संसार नेटका व्हावा म्हणून त्यांनी सोसलेल्या कारागृहासारख्या तपश्चर्येने उद्दीप्त होणारी राष्ट्रभक्ती नीट जागी ठेवून, आणि त्यांच्या परिपक्व उपदेशातील समबुद्धीला आमचे पाऊल वाकडे न पडल्याबद्दल नमन करून, त्यांनी दाखविलेल्या स्वराज्याचा मार्ग त्यांच्या संप्रदायास शोभेल अशा रीतीने चोखाळण्यास त्यांच्याच नावाचे हे दैनिक पत्र कधीही कमी करणार नाही." (लेले,१९८४, पृ. ६४९) टिळकांच्या मृत्यूनंतरच्या राजकारणाचे पर्व सुरू झाले, त्यामुळे स्वाभाविकच टिळक आणि गांधी यांच्या राजकीय ध्येय्य-धोरणे व कार्यपद्धती यांच्यातली सांधेजोड करण्याचे काम या पत्राला करावी लागली. खाडिलकरांनी 'टिळक आणि कौन्सिलातील टक्कर' (२३ जुलै १९२१), 'टिळक आणि स्वावलंबन' (२४ जुलै १९२१), 'टिळक आणि तडजोड' (२५ जुलै १९२१), 'खुद्द टिळकांचे उद्गार' (२३ जुलै १९२२) असे लागोपाठ अग्रलेख लिहून टिळकपंथीयांना गांधीजींच्या नेतृत्वाशी समायोजित करण्याचा प्रयत्न केला. मात्र पुढे खाडिलकर सातत्याने गांधीजींच्या राजकारणाची बाजू उचलून धरणारे लेखन करीत. ते कंपनीच्या भागधारकांना व संचालकमंडळातल्या कट्टर टिळकभक्तांना मानवणारे नव्हते. यामुळे मतभेद झाल्याने अखेर खाडिलकरांनी १९२३ साली संपादकपदाचा त्याग केला व 'नवाकाळ' पत्राचे संपादकत्व स्वीकारले. खाडिलकरांच्या राजीनाम्यानंतर रामभाऊ मंडलिक यांनी दोन वर्षे 'लोकमान्य'चे संपादकत्व निभावले. त्यांच्यानंतर १९२५ पर्यंत बाळासाहेब खेर, ल. ब. भोपटकर यांनी संपादकपदाची धुरा सांभाळली. १९२५ साली 'लोकमान्य' पत्र बंद पडले.

'लोकमान्य' पत्र बंद पडल्यानंतर त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे काही प्रयत्न झाले. दत्तोपंत सावरकर यांनी १२ नोव्हेंबर १९३० रोजी 'श्रीलोकमान्य' या नावाने हे दैनिक नव्याने सुरू करून १९३४ पर्यंत चालवले; त्यानंतर आर्थिक स्थैर्य लाभत नसल्याने दैनिकाचे साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. बातम्या हुडकून काढणे आणि वाचकांना काय हवे आणि ते कोणत्या पद्धतीने दिले पाहिजे, याची जाणीव दत्तोपंत सावरकरांना होती. अव्वल दर्जाच्या बातमीचा खुसखुशीतपणा वाढविण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते. उदाहरणार्थ, एकदा शांता आपटे यांनी त्यांच्याविषयीचा बदनामीकारक मजकूर छापल्यामुळे संपादकाच्या कचेरीत जाऊन त्यास काठीचा प्रसाद दिला या घटनेचे वृत्त सावरकरांनी पहिल्या पानावर सात कॉलमी मथळा देऊन छापले. सोबत 'कुंकू'

बोलपटातील नायिका नीरा – म्हणजे खुद्द शांता आपटे – या कादंबरीतील आपल्या मुलाला छडीने मारीत आहे या देखाव्याचे छायाचित्रही ठळकपणे छापले होते. अशा रोचक सजावटीमुळे सावरकरांच्या कारकिर्दीत 'लोकमान्य'चा खप हजारांनी वाढला. (कर्णिक, १९५२, पृ. ९-१०) १९३९ साली दत्तोपंत सावरकर अमेरिकेत स्थायिक झाल्यानंतर ९ नोव्हेंबर १९४० पासून 'लोकमान्य' दैनिक पां. वा. गाडगीळ यांच्या संपादकत्वाखाली नियमितपणे सुरू झाले, ते ३१ मार्च १९५८ पर्यंत चालू होते. पां. वा. गाडगीळ समाजवादी विचारांचे होते, राजकीय प्रश्नांइतकेच अर्थकारणाचे महत्त्व ते नीट समजून होते; त्यामुळे गाडगीळांच्या 'लोकमान्य'मधील लेखनातून ग्रामीण विकास, शेती-उद्योगाला अधिक स्थान दिले जाऊ लागले.

**नवाकाळ (१९२३-):**

कृ. प्र. खाडिलकर यांचा 'नवाकाळ'चा पहिला अंक ७ मार्च १९२३ रोजी प्रसिद्ध झाला. म. गांधींच्या धोरणांना अनुसरणारे लेखन व काँग्रेस चळवळीची बातमीपत्रे छापण्यावर 'नवाकाळ'चा भर होता. गांधीजींची १९३० ची दांडीयात्रा, गांधी-आयर्विन करार अशा घटनांची सविस्तर वार्तापत्रे 'नवाकाळ'मधून प्रसिद्ध होत होती. मात्र केवळ राजकीय वृत्तपत्र अशी या पत्राची ओळख राहू नये याकडे खाडिलकरांनी लक्ष दिले होते. 'नवाकाळ'मधून शेती, व्यापार, औद्योगिक विश्व, खेळ, व्यायाम, पुस्तकांचे जग अशा चौफेर मजकूराची सदरे असत. जाहिरातीतला मजकूरही अभिरुचीहीन असेल तर त्या जाहिराती हे पत्र छापत नसे. वाचकसंवादी अग्रलेखांमुळे 'नवाकाळ'ची लोकप्रियता वाढली. अकारण वादविवाद व उखाळ्यापाखाळ्या काढणारा मजकूर प्रसिद्ध करणे कटाक्षाने टाळण्यात येत होते. इतके सारे असूनही सरकारी रोषापासून 'नवाकाळ' स्वतःला दूर ठेवू शकले नाही. १९२६ साली सोलापूरच्या हिंदुमुस्लीम दंग्याच्या बातमीपत्रांत पोलिस सुपरिडेन्टेडची प्रेयसी मुसलमान असून मुसलमानांची फूस असल्याने त्याचे वर्तन पक्षपाती आहे, अशा आशयाचे वृत्त प्रसिद्ध झाल्यामुळे अब्रुनुकसानीच्या दाव्याला सामोरे जावे लागले व ७५० रु. चा दंड भरावा लागला. त्यानंतर ९ फेब्रुवारी १९२९ च्या अंकात प्रसिद्ध झालेला 'मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल' हा अग्रलेख आक्षेपार्ह ठरविण्यात आला व खाडिलकरांना एक वर्षाची कैद व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा झाली. हा अग्रलेख प्रत्यक्षात संपादकमंडळातील न. र. फाटक यांनी लिहिला होता, परंतु संपादक या नात्याने खाडिलकरांनी ही जबाबदारी स्वतःकडे घेतली होती. खाडिलकरांना अटक झाल्याने त्यांच्या अनुपस्थितीत संपादनाची जबाबदारी त्यांचे चिरंजीव यशवंत कृष्ण खाडिलकर यांनी स्वीकारली व काकासाहेबांच्या सुटकेनंतरही य. कृ. खाडिलकर हेच 'नवाकाळ'चे संपादक राहिले. खाडिलकरांच्या अटकेवर म. गांधी यांनी भाष्य करताना 'हा खटला नसून छळ आहे' अशी प्रतिक्रिया नोंदवली होती.

स्पष्टवक्त्या पत्रकाराला असा छळ सोसावाच लागतो. पण लोकस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी पत्रकाराला सरकारचा विरोध करण्याची वेळ येते, तेव्हा अशा प्रसंगात सरकारी चौकटीत काम करणारी न्यायालयेही हतबल असतात, त्यामुळे त्यांच्यापासून जितके दूर राहता येईल तितके चांगले. (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ४०, पृ.२०३ / लेले १९८४, पृ. ६७१) १९६८ पर्यंत 'नवाकाळ'चे संपादकपद य. कृ. खाडिलकर यांच्याकडे होते. य. कृ. खाडिलकरांनी काँग्रेसनिष्ठा कायम ठेवली, पण आवश्यक तिथे काँग्रेसवर विधायक टीका करण्याचेही त्यांनी टाळले नाही.

**बलवंत (१९२३-१९५७):**

म. गांधींच्या असहकार चळवळीतून प्रेरणा घेऊन १९२३ साली रत्नागिरीहून काँग्रेस कार्यकर्ते गजानन विश्वनाथ पटवर्धन यांनी 'बलवंत' साप्ताहिक सुरू केले. त्यांना पटवर्धनांबरोबर असहकार आंदोलनात उतरलेले रत्नागिरीचेच मोरेश्वर दिनकर जोशी यांची भक्कम साथ होती. गजानन पटवर्धन यांनी पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून शिक्षण घेतलेले होते व त्यांच्यावर न. चिं. केळकर यांच्या पत्रकारितेची छाप होती. कौन्सिलप्रवेशाच्या मुद्दावरून फेर आणि नाफेरवादी असे राजकीय कार्यकर्त्यांत दोन तट पडले होते तेव्हा पटवर्धनांनी केळकरांच्या कौन्सिल प्रवेश करणाऱ्या फेरवादी भूमिकेचा पुरस्कार करून नाफेरवादी पक्षावर प्रखर टीका केली. १९२४ सालापासून रत्नागिरीत स्वा. सावरकरांना स्थानबद्ध करण्यात आल्यापासून 'बलवंत' पत्राने सावरकारांच्या विचारधारेचा पुरस्कार केला. त्यामुळे गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाचा व जंगलाचा कायदा तोडण्याचा कार्यक्रम याव अग्रलेख लिहून टीका केली होती. 'तवा तापविण्याचा मुर्ख उपाय' अशा शब्दात त्यांनी गांधीजींच्या या आंदोलनाची 'बलवंत'मधून संभावना केली होती. मात्र प्रत्यक्षात देशभरातून गांधीजींच्या आंदोलनाला मिळणारा प्रतिसाद पाहिल्यावर गजाननराव पटवर्धनांनी आपली भूमिका बदलली व स्वत: या सत्याग्रहात सक्रिय झाले. १९३२ सालापासून 'बलवंत'च्या संपादनाची जबाबदारी मोरोपंत जोशी यांच्याकडे सोपविण्यात आली व गजाननराव पटवर्धनांनी 'बलवंत'मधून निवृत्ती स्वीकारून मुंबईस प्रस्थान ठेवले. १९५६ पर्यंत मोरोपंत जोशी यांनी 'बलवंत'चे संपादन केले व काँग्रेसच्या विचारसरणीचा व कार्यक्रमांचा प्रसार केला. मोरोपंतांना सरकारी रोषामुळे 'बलवंत'साठी जामीन देण्याचा, अब्रुनुकसानीच्या दाव्याला तोंड देण्याचा प्रसंग आला; पण त्यांनी या विरोधाला तोंड देऊन 'बलवंत' सुरू ठेवले. १९४९ पासून मोरोपंत जोशींचा कल समाजवादी विचारसरणीकडे झुकू लागल्यावर 'बलवंत'चे अंतरंगही बदलू लागले. गजाननराव पटवर्धनांशी या मुद्द्यावरून मतभेद झाल्यावर १९५६ साली मोरोपंत जोशी 'बलवंत'च्या जबाबदारीतून मुक्त झाले. १५ जानेवारी १९५७ रोजी गजाननराव पटवर्धनांच्या मृत्यूनंतर हे पत्र बंद पडले.

**हिंद महिला (१९२३-१९२५):**

म. गांधींच्या चळवळीत सक्रिय असलेल्या अवंतिकाबाई गोखले यांनी फेब्रुवारी १९२३ पासून 'हिंद महिला' साप्ताहिक सुरू केले होते. केवळ स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्री-संपादकाने चालविलेले मराठीतील हे पहिले साप्ताहिक होते. १९१९ साली अवंतिकाबाई गोखले इचलकरंजी संस्थानच्या महाराणीबरोबर विलायतेला गेल्या होत्या, तिथे श्रीमंत स्त्रियांच्या समाजकार्याचा त्यांना जवळून परिचय झाला होता. विलायतेतून परत आल्यावर त्यांनी मुंबईत स्त्रियांच्या शिक्षण, आरोग्य व अपत्यसंगोपनाच्या प्रश्नात काम करण्यासाठी 'हिंद सेवा समाज' स्थापन केला; त्या कार्याचा भाग म्हणून हे पत्र त्यांनी दोन वर्षे चालवले होते.

**ताजी बातमी (१९२४) :**

गजानन भास्कर वैद्य यांनी मार्च १९२४ पासून एक पैसा किंमतीचे एक आगळेवेगळे दैनिक सुरू केले होते. मुंबईतल्या गिरणी कामगारांचे जगत हा या पत्राचा लक्ष्यगट होता, त्यामुळे अल्प किंमतीत कामगारवर्गात वाचले जावे असे दैनिक त्यांनी सुरू केले होते. चटकदार मथळ्यांसाठी हे दैनिक प्रसिद्ध होते. 'पुरुष बाळंत झाला', 'बायकोला अंडी झाली', 'आईने मुलास तळले' असे खुसखुशीत मथळे ओरडून पत्र विकण्याची प्रथा सुरू करणारे दैनिक हे या दैनिकाचे वेगळेपण होते.

**नवयुग (१९२५-१९३०) :**

सीताराम केशव उर्फ बाबासाहेब बोले यांनी बहुजनसमाजाच्या कल्याणाचे व्रत म्हणून १५ फेब्रुवारी १९२५ रोजी मुंबईतून 'नवयुग' साप्ताहिक सुरू केले. 'नवयुग'च्या अग्रलेखाच्या शिरोभागी 'नवयुग'च्या ध्येयवाक्य म्हणून पुढील श्लोक छापला जात असे :

"नवयुग नवकाली कामगारासी मित्र / म्हणुनि उदय पावे सान आज हे पत्र
जगति बहुत लाभो योग्यता / सतत सुरस गाजो उद्याचा नगारा "

'नवयुग'ची भूमिका मांडताना बोले यांनी लिहिले होते की, "भिक्षुकशाही, भांडवलशाही, खोतशाही ह्या सर्व शाह्या शेतकरी व मजूर वर्गाच्या रक्तावर जळूप्रमाणे पोसल्या जातात व त्यांचे रक्त आटवतात. त्यांचे जुलमी जू आपल्या मानेवरून फेकून देण्याचा प्रयत्न न्याय्य व रास्त आहे आणि त्यास मदत करणे हा नि:स्वार्थी व खऱ्या समाजसेवकाचा धर्म आहे" कामगारांचा मित्र व बहुजनसमाजाचा पाठिराखा अशी 'नवयुग'ची भूमिका होती. 'जनतेपुढे खरी परिस्थिती मांडणे, त्या परिस्थितीचे मंडण करणे व जनतेच्या मताला खऱ्या मार्गावर आणणे हेच वर्तमानपत्रकाराचे ध्येय असते" अशी त्यांची धारणा होती. (नवयुग, १३ एप्रिल १९३०) 'नवयुग' मधून मराठा-मराठेतर वाद, मुंबईच्या गिरणी कामगारांचे प्रश्न, खोतीविरोधी चळवळ, जोशी वतन विधेयक, भेसळीसंबंधीचे विधेयक, कोकण रेल्वेची आवश्यकता, उपासनी महाराजांची बुवाबाजी,

ब्राह्मणेतर पक्षातील दोष इत्यादी प्रश्नांवर विचारमंथनास प्रवृत्त करणारे लेख व वृत्तांत प्रसिद्ध होत असत. कुठल्याही प्रकारच्या व्यक्तिमाहात्म्याचा डांगोरा या पत्राने पिटला नाही; उलट जरूर तेथे दोषदिग्दर्शनाची भूमिका निभावली. 'नवयुग'चा आर्थिक भार पेलणारे सीताराम बोले यांचे बंधू विनायकराव यांचे १९३० साली निधन झाल्यावर आर्थिक बोजा पेलणे शक्य नसल्याने हे पत्र बंद करण्यात येत असल्याचे सीताराम बोले यांनी जाहीर केले.

**लोकहित (१९२६-१९३१):**

रामचंद्र काशिनाथ तटणीस यांनी ३० जून १९२६ पासून मुंबईत 'लोकहित' दैनिक सुरू केले. ढोंगी, लुच्च्या पुढाऱ्यांचा स्वार्थी कावा उघड करणे हे या दैनिकाचे वैशिष्ट्य होते. मो. ग. रांगणेकर हेही या अंकाच्या लेखन-संपादनात सहभागी होते. ३१ मार्च १९३१ पर्यंत हे दैनिक जेमतेम चालू राहिले.

**क्रांती (१९२७-१९३९):**

१ मे १९२७ रोजी कामगारदिनाच्या मुहूर्तावर 'क्रांति' हे 'कामकरी व शेतकरी पक्षा'चे मुखपत्र सुरू कारण्यात आले. कम्युनिस्ट विचारधारेचे नेते शां. सा. मिरजकर आणि केशव नीळकंठ जोगळेकर हे या पत्राचे संस्थापक संपादक होते.जगभरातील कामगार चळवळीची माहिती देणे हे या पत्राचे प्राथमिक ध्येय होते. मात्र सरकारने मिरजकरांवर राजद्रोहाचा खटला भरल्याने ऑक्टोबर १९२७ मध्ये हे पत्र बंद पडले. १९२८ साली जून महिन्यात कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी या पत्राचे पुनरुज्जीवन केले. १९२९ साली मार्च महिन्यात मिरतचा खटला झाल्याने डांगे यांना या पत्राच्या संपादकत्वाचे काम सोडणे भाग होते; मात्र त्यांच्या मागे कॉ. देशपांडे, खंडेराव देसाई यांनी १९३१ पर्यंत हे पत्र चालवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मात्र १९३७ पर्यंत हे पत्र प्रसिद्ध होऊ शकले नाही. १९३७ ते १९३९ या काळात कॉ. डांगे यांच्या संपादकत्वाखाली या पत्राचे 'चीन अंक', 'रशियन राज्यक्रांती विशेषांक', 'लेनिन विशेषांक' प्रसिद्ध झाले. जागतिक लढ्याचा अनुभव लक्षात घेऊन प्रागतिक लढ्याचे काम पुढे नेण्याच्या दृष्टीने या अंकातून लेखन प्रसिद्ध होत असे.

**बहिष्कृत भारत (१९२७-१९२९):**

चवदार तळ्याच्या सत्याग्रहानंतर ३ एप्रिल १९२७ पासून डॉ. आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. १९२४ साली स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभे'च्या 'शिका, संघटित व्हा आणि लढा' या सूत्रानुसार दास्यमुक्तीच्या संघर्षासाठी हे पत्र सुरू करण्यात आले होते. बहिष्कृतांमध्ये लढाऊ वृत्ती निर्माण करण्याच्या संकल्पाला अनुरूप अशी बिरुदावली म्हणून 'ज्ञानेश्वरी'तल्या पुढील ओळी पहिल्या अंकात छापण्यात आल्या होत्या :

"आता कोदंड घेऊनि हातीं / आरूढ पां इथें रथीं
देईं आलिंगन वीरवृत्ती / समाधाने
जगीं कीर्ति रुढवीं / स्वधर्माचा मानु वाढवीं
इया भारा पासोनि सोदवी / मेदिनी हे.
आता पार्था नि:शंकु होई / या संग्रामा चित्त देईं
एथ हें वांचुनि कांही / बोलों नये"

'मूकनायक' नंतर पुन्हा एकदा वृत्तपत्र सुरु केल्यावर पहिल्याच अंकात 'पुनश्च हरि ओम" अशा शीर्षकाचा अग्रलेख लिहून पत्राची भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. १९१९ साली ब्रिटिशांनी राजकीय सुधारणांचा कायदा आणल्यानंतरच्या घडामोडी लक्षात घेऊन भविष्यात बहिष्कृत वर्गाला संख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर संघटितपणे व जागरूक राहून प्रयत्न करायला हवेत, ही चळवळीची दिशा या अग्रलेखातून स्पष्ट करण्यात आली होती.

या पत्रातले 'आजकालचे प्रश्न', 'प्रासंगिक विचार' इत्यादी शीर्षकाखाली लिहिलेले बहुतांश लेख स्वत: आंबेडकरांनीच लिहिलेले असत. महाडचा सत्याग्रह, पुण्याचा पर्वती सत्याग्रह, महार वतनाचा प्रश्न, अस्पृश्योन्नतीचे प्रश्न , खोतीचे प्रश्न, गिरणी कामगारांचे प्रश्न इत्यादी विषयांवरचे लेख या अंकातून प्रसिद्ध झाले. अस्पृश्यतेच्या कलंकाने केवळ अस्पृश्यच कलंकित झाले नसून स्पृश्यही कलंकित झाले आहेत, कारण जे इतरांना कमी मानतात त्यांची नीती खालावलेली असल्याचे त्यातून दिसून येते. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतून अस्पृश्य वर्ग आपल्या बुद्धीने, उद्योगाने देशाच्या भरभराटीला कारणीभूत होतील; म्हणून ही चळवळ केवळ पतितोद्धाराची चळवळ नसून लोकसंग्रहाची चळवळ आहे, ही भूमिका त्यांनी या पत्राच्या माध्यमातून पुढे आणली. 'अस्पृश्यता व सत्याग्रहाची सिद्धी' या अग्रलेखातून त्यांनी आपल्याला अभिप्रेत असलेल्या 'सत्याग्रहा'ची संकल्पनाही स्पष्ट केली. त्यांच्या मते "ज्या कार्यापासून लोकसंग्रह होत आहे ते सत्कार्य आहे व त्यासाठी केलेला आग्रह त्यास सत्याग्रह म्हणावा.. जेथे समभाव आहे तेथे लोकसंग्रह आहे व जेथे लोकसंग्रह आहे तेथे सत्कार्य आहे आणि अशा कार्याविषयी जो आग्रह तो सत्याग्रह होय." (बहिष्कृत भारत, २५ नोव्हेंबर १९२७) डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लेखनात आपल्या समाजबांधवांना समजेल-उमजेल अशा भाषेत व सामाजिक जीवनाच्या संदर्भकोशात असलेले महाभारतादि ग्रंथातल्या कथांचे दृष्टांत देऊन ते आपला मुद्दा पटवून देत असत. नमुन्यादाखल 'बहिष्कृत भारता'त त्यांनी महाभारतातील दाखला देऊन अस्पृश्यांना समजावून सांगितलेला 'प्रत्कारयोगा'चा मुद्दा असा होता : "वनपर्वात धर्मराजाने भीमास सांगितले की स्वत:चे राज्य नष्ट झाले असता ते 'दे ग बाई जोगवा' म्हणून मिळत नसते. भिक्षा मागणे हा ब्राह्मणांचा धर्म आहे, क्षत्रियांचा नव्हे ! या

करिता भिक्षा मागणे सोडून दे, तेजाचा आश्रय कर." (बहिष्कृत भारत, २५ नोव्हेंबर १९२७)

आर्थिक अडचणी व वर्तमानपत्राच्या संपादन-व्यवस्थापनासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचा तुटवडा यामुळे अंक नियमितपणे प्रकाशित करणे शक्य होते नसे. दोन वर्षांत फक्त ३४ अंक प्रकाशित होऊ शकले. अखेर १५ नोव्हेंबर १९२९ रोजी शेवटचा अंक प्रकाशित करून डॉ. आंबेडकरांनी हे पत्र बंद करण्याचा निर्णय घेतला.

**समता / जनता (१९२८ / १९३०) :**

पंजाबातल्या जातपाततोडक मंडळाप्रमाणे महाराष्ट्रात समतेची चळवळ चालवावी या उद्देशाने १९२५ साली मुंबईत भा. र. कद्रेकर यांनी अनंतराव चित्रे, दि. वि. प्रधान, सुरेंद्रनाथ टिपणीस, वामनराव चोरघडे, डॉ. माधव प्रधान यांना सोबत घेऊन 'समाज-समता-संघा'ची स्थापना केली होती. या संघाचे 'समता' हे पाक्षिक प्रसिद्ध होई. २९ जून १९२८ ते १५ मार्च १९२९ या काळात हे साप्ताहिक प्रसिद्ध होत राहिले. देवराव विष्णू नाईक हे या पत्राचे संपादक होते. भा. र. कद्रेकर हे प्रामुख्याने यात लेखन करीत असत. समता-समाज संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संघाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली व तेव्हापासून तेही या चळवळीशी जोडले गेले. पुण्यात लो. टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत टिळक यांनी गायकवाडवाड्यात 'समाज समता संघा'ची स्थापना केली होती; मात्र त्यानंतर शुक्रवार दि. २५ मे १९२८ रोजी त्यांनी आत्महत्या केली. देवराव नाईक यांनी श्रीधरपंत टिळकांचे स्मरण जागविण्यासाठी 'समता' साप्ताहिक शुक्रवारी प्रकाशित करण्याचा प्रघात पाडला होता. १९२९ साली 'समता' पत्र बंद पडल्यावर डॉ. आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९३० रोजी देवराव नाईक यांच्याच संपादकत्वाखाली 'जनता' पत्र सुरू केले. १९ ऑक्टोबर १९३१ पासून ते साप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. १९३२ ते १९३९ या काळात भास्कर कद्रेकर व त्यांच्यानंतर ग. वि. सहस्त्रबुद्धे संपादक होते. १९५६ पर्यंत हे पत्र सुरू राहिले. समता आणि बहिष्कृत भारत या दोन्ही पत्रांच्या भूमिकांचा समन्वय साधून अस्पृश्य वर्गाच्या हितासाठी प्रसिद्ध होणारे विचारपत्र अशी या पत्राची भूमिका राहिली. जातीयता, ब्राह्मणवाद याविषयीचे लेखन या पत्रातून प्रसिद्ध होत असे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतराची भूमिका स्पष्ट करणारे लेख १९३५-३६ सालच्या 'जनता' पत्रातूनच प्रसिद्ध झाले होते. स्वतंत्र मजूर पक्षातर्फे डॉ. आंबेडकरांनी मुंबईतून कायदेमंडळाची निवडणूक लढवली, त्यावेळीही डॉ. आंबेडकरांची भूमिका स्पष्ट करणारे लेख 'जनता' पत्रातून प्रसिद्ध झाले होते.

**कैवारी ( १९२८-१९३०):**

पुण्यातून प्रकाशित होणारे 'तरुण मराठा' पत्र बंद पडल्यानंतर फेब्रुवारी १९२८ मध्ये

दिनकरराव जवळकर यांनी मुंबईतून 'कैवारी'नावाचे साप्ताहिक पत्र सुरू केले. या पत्राच्या निर्मितीमागची भूमिका सायमन कमिशनसमोर ब्राह्मणेतर पक्षाची भूमिका ठळकपणे मांडण्याची होती. ब्राह्मणेतर पक्षात शिस्त, संघटना निर्माण व्हावी असाही हे पत्र काढण्यामागचा उद्देश होता. पत्राच्या मुखपृष्ठवर ध्येयनिर्देशक श्लोक छापत :

"अपमानाला, परवशतेला, स्वधर्मपतनाला /
कारण झाली भिक्षुकशाही महाराष्ट्रीयाला
शिवरायांचे स्मरण करूनि लागा कार्याला /
स्वतंत्रता मिळवाया, हर हर महादेव बोला"

या अंकासाठी भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळ गठीत करण्यात आले होते, त्यात बाबूराव जेधे, केशवराव जेधे या बंधूंचा समावेश होता. 'कैवारी'पत्रातून विठ्ठल रामजी शिंदे, कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे, भाई निमकर यांच्याविषयी काही वादग्रस्त व विपर्यस्त मजकूर अधून मधून प्रसिद्ध होत राहिला. 'युनियनचा फंड घेऊन डांगे पळणार', 'कामगारांचे अन्न खाऊन भट पळणार' असल्या भडक मथळ्यांनी हे लेख प्रसिद्ध होत होते. त्यामुळे मराठा-मराठेतर वाद वाढत गेला,कामगारवर्गीय पुढाऱ्यांची मते कलुषित झाली. केशवराव जेधे यांनी या पत्रातून अंग काढून घेतले. पुढे जवळकर विलायतेला गेल्यावर काही काळ गणपतराव जाधव यांनी 'कैवारी' पत्राचे संपादन केले मात्र व त्यांनीच १९३० साली हे पत्र बंदही केले.

**प्रभात (१९२९-१९५०):**

२१ नोव्हेंबर १९२९ पासून मुंबईच्या 'मौज' छापखान्याचे मालक पांडुरंग महादेव भागवत यांनी 'प्रभात' नावाचे दैनिक सुरू केले. हिंदी राजकारणाबरोबरच परराष्ट्रीय राजकारण, शेती, व्यापार, कारखानदारी आणि मजूर यांच्याशी संबंधित घडामोडींची बातमीपत्रे छापण्याचे धोरण असल्याचे जाहीर करण्यात आले होते. विविध राष्ट्रीय चळवळींचे लोण समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचविण्याच्या बांधिलकीतून हे पत्र त्यांनी सुरु केले होते. त्यामुळे सर्वांना परवडेल असे एक पैशात पत्र देण्याचे धोरण त्यांनी ठरविले होते. सप्टेंबर १९३९ पासून ती दुप्पट म्हणजे दोन पैसे झाली व युद्धकाळात सरकारी आदेशानुसार मार्च १९४३ पासून एक आणा झाली. प्रभात परळ व लालबागच्या वाचकवर्गात हे पत्र लोकप्रिय झाल्यामुळे 'कामगारांचे पत्र' अशी एक वेगळी ओळख या पत्राने निर्माण केली होती. स्वत: भागवत लेखन-संपादनाचे प्रत्यक्ष काम करीत नसत, मात्र जाणकारांच्या मदतीने हे पत्र अधिकाधिक गुणवत्तेने प्रसिद्ध करण्याकडे त्यांनी विशेषत्वाने लक्ष घातले. 'प्रभात'च्या संपादनात भागवतांनी अच्युतराव कोल्हटकर, सीताराम विष्णू ललित, काशिनाथ नरसिंह केळकर, लालजी पेंडसे, श्रीपाद शंकर नवरे यांचे सहकार्य मिळविले. १ एप्रिल १९३४ पासून प्रामुख्याने नवरे 'प्रभात'ची संपादकीय जबाबदारी

सांभाळत होते. १९३७ साली प्रांतिक निवडणुकांत स्वराज्य पक्षाला मदत व्हावी म्हणून भागवतांनी 'प्रभात'ची पुणे आवृत्तीही सुरू केली होती. पुढे आर्थिक खोट आल्याने भागवतांनी पुणे आवृत्ती विकण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर पुण्याचे 'प्रभात' पत्र सत्यशोधक चळवळीत हत्यारी पत्रकार म्हणून नावाजलेले वालचंद कोठारी यांनी चालवायला घेतले. फटकळ लेखणीसाठी जसे ते प्रसिद्ध होते, तसे मराठीचे लेखन अविकृत आणि शुद्ध व्हावे यासाठी ते आग्रही असत. (शिरवाडकर, २०१२, पृ. ४६-४७) २५ सप्टेंबर १९३८ रोजी पांडुरंग भागवत यांचे निधन झाल्यावर 'प्रभात'चे संपादक म्हणून श्रीपाद शंकर नवरे यांचे अधिकृतपणे नाव छापले जाऊ लागले व २६ नोव्हेंबर १९५० ला हे पत्र बंद पडेपर्यंत त्यांनी संपादकीय जबाबदारी निभावली. त्याआधी केसरी, लोकमान्य, संदेश इत्यादी पत्रांतला लेखन-संपादनाचा अनुभव त्यांच्या गाठीला होता. कुठलीही पक्षनिष्ठा न ठेवता नि:पक्षपाती वृत्तीने त्यांनी 'प्रभात'चे संपादन केले. वकिलापेक्षा न्यायाधीशाच्या भूमिकेतून घटनेकडे पहाण्याचा दृष्टिकोन असल्याने त्यांचे लेखन कुठेही अभिनिवेशी झाले नाही. अनाग्रही व अनलंकृत साधी शैली हे नवऱ्यांच्या अग्रलेखांचे वैशिष्ट्य होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या भांडवलदारांनी वृत्तपत्रव्यवसायाचे व्यापारीकरण करून साखळी वृत्तपत्रे सुरू केल्याने निर्माण झालेल्या राक्षसी स्पर्धेला तोंड देणे शक्य नसल्याने १९५० पासून मुंबई 'प्रभात' बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला. २५ सप्टेंबर १९५० च्या शेवटच्या अंकात श्रीपाद शंकर नवरे यांनी सामाजिक बांधिलकीतून चालविल्या जाणाऱ्या पत्रांना भांडवली पत्रांच्या स्पर्धेमुळे आलेल्या अनुभवांचे जे कथन केले होते, ते समग्र मराठी पत्रसृष्टीत १९५० च्या सुमारास जे आमूलाग्र स्थित्यंतर घडत होते, त्यावर प्रकाश टाकणारे आहे. या गळेकापू स्पर्धेमुळे कधी 'प्रभात' पत्राचे छापले जाणारे सर्वच अंक पैदा करून नष्ट करून टाकायचे आणि 'प्रभात' निघालेच नाही किंवा बंद पडले आहे असा पुकार ग्राहकांमध्ये करावयाचा अशासारखे प्रयोगही भांडवलदारी हस्तकांनी केला. (गोखले ल. ना. १९७१, पृ. २६६) सर्व पत्रकारांनी मिळून एकत्रित येऊन या अवस्थेचा विचार करावा असाही प्रयत्न झाला, पण त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही अशा निष्कर्षाप्रत यावे लागले. ध्येयवादी मराठी पत्रकारितेचे पर्व संपत आल्याच्या या खुणा होत्या.

### तेज (१९३१-१९३२):

'कैवारी' पत्र बंद पडल्यावर दिनकरराव जवळकर यांनी ९ मे १९३१ रोजी मुंबईहून 'तेज' नावाचे साप्ताहिक सुरू केले. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे जातीय राजकारण करण्यापेक्षा समाजवादी धोरणानुसार व गांधीजींच्या चळवळीविषयी आस्था ठेवून पत्र चालविण्याची भूमिका या पत्राने घेतली. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची बाजू

मांडण्याकरिता हे पत्र सुरू करीत असल्याचे जवळकरांनी म्हटले होते. पहिल्याच अंकात त्यांनी 'शेतकरी आणि भावी स्वराज्य' या मथळ्याचा लेख लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत आपला गांधीजींना पाठिंबा राहील ही भूमिका स्पष्ट केली होती. या लेखात त्यांनी म्हटले होते की, "काँग्रेसमध्येदेखील व्यापारी भांडवलवाल्यांचे वर्चस्व असले तरी जोपर्यंत काँग्रेसच्या शिरावर महात्मा गांधींचा वरदहस्त स्थिर आहे तोपर्यंत शेतकऱ्यांचे हित होवो न होवो पण नुकसान मात्र होणार नाही, असा आमचा भरवसा आहे. यदाकदाचित सर्व हिंदी भांडवलवाले म. गांधींनाही फसविण्याचा प्रयत्न करतील, यासाठी सर्व शेतकरी संघटित होऊन एकदिलाने म. गांधींच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे."

मुंबईत दरवर्षी होणारी ३०-४० हजार जनावरांची कत्तल, दूध अपुरे पडल्याने गाई-म्हशींच्या वासरांचे होणारे मृत्यू याविषयी काळजी व्यक्त करून जनावरांची पैदास आणि संगोपन याकडे नीट लक्ष देण्याची गरज यावर 'जनावरांची सुधारणा' हा विशेष लेख 'तेज' पत्राने प्रसिद्ध केला होता. (तेज, १८ जुलै १९३१) संस्थानिकांच्या कारभारावर टीका करणारे लेख 'तेज'मधून प्रसिद्ध झाले. संस्थाने ही 'लोकशाहीच्या अरुणोदयावर पडलेला अंधार' असल्याचे त्यांनी म्हटले होते. (फडके, २०१३, पृ. २५३-२५७)ब्राह्मणी पत्रे ब्राह्मणी संस्थानिकाच्या दोषदिग्दर्शनासाठी जशी पुढे येतात तशी ब्राह्मणेतर पत्रे ब्राह्मणेतर संस्थानिकांबाबत स्पष्टपणे लिहीत नाहीत, यावरही त्यांनी टीका केली होती. कोल्हापूरच्या महाराजांचा शिकार, क्रिकेट, रेस आणि इतर रंजनाच्या छांदावरही त्यांनी उघड उघड टीका केली होती. (तेज, ११ जुलै १९३१) कोल्हापूरच्या प्रजाजनांनी भोर, औंध, सांगली, मिरज संस्थानातल्या प्रजेचे अनुकरण करून कोल्हापूरात प्रजापरिषद स्थापन करण्याचे आवाहनही त्यांनी 'तेज' पत्रातून केले होते. ३ मे १९३२ रोजी जवळकरांचे अकाली निधन झाल्याने हे पत्र बंद पडले.

**नवशक्ति (१९३४) :**

एस. सदानंद या दाक्षिणात्याने १९२७ साली स्थापन केलेल्या 'फ्री प्रेस ऑफ इंडिया न्यूज एजन्सी' या वृत्तसंस्थेने मुंबईत १९३४ साली 'नवशक्ति' हे मराठी दैनिक सुरू केले. गांधीवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर हे नवशक्तिचे पहिले संपादक; मात्र १९३४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत जेधे आणि गाडगीळ यांच्या विरोधात उभे राहिलेल्या वालचंद शेठ यांना पाठिंबा देण्यासाठी वृत्तपत्राच्या मालकाच्या मर्जीनुसार कुठलेही संपादकीय बदल करण्यास ठाम नकार देण्याच्या स्वभावामुळे ते जेमतेम वर्षभर संपादक राहिले. १९३५ साली द. ग. सावरकर यांची संपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्यानंतर का. म. ताम्हणकर संपादक झाले. मात्र 'नवशक्ति' खऱ्या अर्थाने नावारूपाला आला तो प्रभाकर पाध्ये यांनी संपादकत्व स्वीकारल्यानंतर ! ३० नोव्हेंबर १९४५ ला प्रभाकर पाध्यांनी नवशक्तिच्या

संपादकपदाची सूत्रे हाती घेतली व १९५३ पर्यंत ते संपादक म्हणून काम पहात होते. कम्युनिझमचे कट्टर विरोधक आणि समाजवादी विचारांचे पुरस्कर्ते अशी पाध्यांची ओळख होती. नवशक्तीत येण्यापूर्वी 'धनुर्धारी' साप्ताहिकाचे व्यासंगी संपादक म्हणून महाराष्ट्राला त्यांचा परिचय होता. भक्कम वैचारिक बैठक, तर्कसंगत युक्तिवाद, प्रतिपक्षावर अचूक प्रहार करणारी लेखनशैली यामुळे पाध्यांचे लेखन आवर्जुन वाचणारा वाचकवर्ग निर्माण झाला. पाध्यांनी दि. वि. गोखले, पु. रा. बेहेरे , भा. कृ. केळकर इत्यादी नामवंत सहकारी मिळवून नवशक्तिला आकार दिला.

**लोकशक्ती (१९३५-१९५७):**

काँग्रेस पक्षाचे अधिकृत मुखपत्र म्हणून १९३५ साली पुण्याहून 'लोकशक्ती' दैनिक सुरू करण्यात आले. त्यासाठी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ' ही संस्था स्थापन करण्यात आली. आचार्य शं. दा. जावडेकर यांच्याकडे संपादकपद देण्यात आले. बातमीपत्रापेक्षा मतपत्र अशीच या पत्राची वाटचाल होती. वैचारिक अधिष्ठान असलेले अग्रलेख व काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याला पोषक अशी चेतनादायी वार्तापत्रे प्रसिद्ध करणारे पत्र अशी या दैनिकाने आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. १९३७ साली मुंबई प्रांतात काँग्रेस सत्तेवर आल्याने पत्राला सरकारी जाहिरातीही मिळू लागल्या. मात्र १९४२ च्या चळवळीत 'लोकशक्ती' पत्राने सरकारी रोष ओढवून घेतला. १९४५ पर्यंत पत्र बंद राहिले. १९४५ साली पुन्हा एकदा आचार्य जावडेकरांच्या संपादनाखाली हे पत्र सुरू झाले.१९४७ पर्यंत ते संपादक होते. लोकशक्तीच्या संपादनात पां. वा. गाडगीळ, हरिभाऊ जोशी, शंकरराव देव यांचाही सहभाग होता. मधल्या मधल्या काळात मुख्य संपादकपदाची धुराही त्यांनी सांभाळली होती.

**संग्राम (१९४२-१९४६) :**

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारसरणीला अनुसरणाऱ्या महाराष्ट्रातल्या बुद्धिवाद्यांनी १३ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतून 'संग्राम' नावाचे दैनिक सुरू केले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रशिया युद्धात उतरल्यावर हे महायुद्ध आता 'लोकयुद्ध' बनले आहे, ही भूमिका जनसामान्यांना पटवून देण्यासाठी प्रचारपत्र म्हणून हे दैनिक सुरू करण्यात आले होते. द्वारकानाथ भगवंत कर्णिक हे या दैनिकाचे संपादक होते व त्यांच्यासोबत गोवर्धन पारीख, लक्ष्मणशास्त्री जोशी, व. भ. कर्णिक यांचे लेखनसाहाय्य होते. राजकीय घडामोडींचे वृत्तांतलेखन मा. पं. शिखरे करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठिंब्यामुळे या पत्राला अस्पृश्यवर्गातला मोठा वाचकवर्ग मिळाला होता.

**लोकयुद्ध (१९४२):**

१९४२ साली रशिया महायुद्धात उतरल्यावर भारतीय कम्युनिस्ट पक्षाने हे महायुद्ध साम्राज्यवादी असल्याची आधीची भूमिका बदलून हे 'लोकयुद्ध' असल्याचा नवा पवित्रा घेतला व या बदललेल्या भूमिकेचा प्रचार करण्यासाठी वृत्तपत्रीय माध्यमांचा उपयोग करायला सुरुवात केली. पी. सी. जोशी यांच्या संपादकत्वाखाली ५ जुलै १९४२ पासून सुरू झालेल्या 'लोकयुद्ध' साप्ताहिकामागे कम्युनिस्ट पक्षाची ही बदललेली नीती होती. जोशी यांनी पहिल्याच अंकातून आपली राजकीय भूमिका व संपादकीय दृष्टिकोण याविषयी निवेदन करताना लिहिले होते की, "मार्क्स व लेनिनच्या तत्त्वांशी इमानदार राहून क्रांतीच्या लाल बावट्याखाली आम्हा हिंदी कम्युनिस्टांना जनतेची सेवा करावयाची आहे, व आमच्या पुरातन देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडावयाचे आहे." (लेले, १९८४, पृ. १०६५)मात्र सुभाषचंद्र बोस, मुस्लीम लीग याबाबतचे या पत्राचे धोरण जनमताविरुद्ध असल्याने या पत्राचा जनमानसावर अपेक्षित परिणाम झाला नाही. महायुद्ध संपल्यावर या साप्ताहिकाचे २५ नोव्हेंबर १९४५ पासून 'लोकयुग' असे नामांतर करण्यात आले, मात्र कम्युनिस्टविरोधी भावनांचा लोकक्षोभ अनुभवायला आल्यावर ह्या पत्राचे प्रकाशन थांबविण्यात आले.

**विवेक (१९४७) :**

स्वातंत्र्योत्तर भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने लोकमत संस्कारित करण्याच्या हेतूने ९ नोव्हेंबर १९४७ रोजी साप्ताहिक 'विवेक' सुरू केले. 'विवेक'च्या पहिल्या अंकात साप्ताहिकाचे प्रयोजन स्पष्ट करताना म्हटले होते की, "साप्ताहिके ही केवळ वृत्तपत्रे नसतात, तर लोकमत व्यक्त करण्याची व बनविण्याची जबाबदारीही त्यांच्यावर असते. स्वतंत्र समाजातील नागरिकांच्या जीवनधारणेला आवश्यक अशा प्रकारचे विचार प्रसृत करण्याचे कार्य आम्हाला करावयाचे आहे."

**जनसत्ता (१९४९-१९५२):**

शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र असलेले 'जनसत्ता' हे वृत्तपत्र १९४९ साली शंकरराव मोरे यांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले. शेतकऱ्यांमध्ये डाव्या विचारसरणीचे विचार रुजविण्यासाठी, भांडवलशाहीचा प्रतिकार निर्माण करण्यासाठी जनजागरण करण्याकरिता आणि सरकारवर अभ्यासपूर्ण टीका करण्यासाठी हे पत्र सुरू करण्यात येत असल्याची संपादकांची भूमिका होती. या भूमिकेनुसार या पत्राने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला टीकेचे लक्ष्य करून १९४९ 'संघ, सरकार व जनता' या मथळ्याखाली पाच लेख लिहिले , पुण्याच्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या व्यापारी संस्थेत एकही ब्राह्मण असू नये याविषयी विषाद व्यक्त करणारा लेख लिहिला (२३ जुलै १९४८), एरंडगाव,

राजापूर, नाशिकच्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर हे सरकार फॅसिस्ट आहे का असा प्रश्न विचारणारा अग्रलेख लिहिला. इगतपुरीत १६ जानेवारी १९४९ रोजी भाताचे भाव वाढून मागण्यासाठी झालेल्या शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतमालाच्या भावाच्या प्रश्नाची चिकित्सा करणारा अग्रलेख लिहिला. पिकांवर होणारा खर्च आणि शेतमालाला मिळणारा भाव यांतली तफावत, महाराष्ट्रात आणि गुजरातेतल्या शेतमालाच्या भावातली तफावत दर्शविणाऱ्या आकडेवारीसह हा टीकालेख लिहिण्यात आला होता. १९४९ च्या राज्य सरकारच्या अंदाजपत्रकात शेतकरी कामगार वर्गातल्या मुलांच्या शिक्षणाला प्राधान्यक्रम न देणाऱ्या अर्थमंत्री वैकुंठभाई मेहता यांच्या अंदाजपत्रकावर कडक टीका करणारा 'मुंबई सरकारचे प्रतिगामी अंदाजपत्रक' हा अग्रलेख 'जनसत्ते'तून प्रसिद्ध झाला. सरकारवर टीका करण्याचे धोरण असल्यामुळे या पत्राला सरकारी जाहिरातींपासून वंचित रहावे लागत होते; आर्थिक चणचण ह्या पत्राच्या वाट्यालाही आली होती. १९५० नंतर कॉ. दत्ता देशमुख 'जनसत्ता'चे संपादक झाले. १९५२ पर्यंत हे पत्र सुरू होते.

मुंबई शहरांतून १९२१ पासून दैनिके, साप्ताहिके आणि पाक्षिके काढण्यासाठी अनेक लोक पुढे आलेत, मात्र दीर्घ काळ पत्र चालविणे हे सोपे नसल्याने अशी हौसी आणि ध्येयवादी पत्रे अल्पकाळातच अस्तंगत झाली. उपलब्ध माहितीनुसार अशा अल्पजीवी पत्रांमध्ये सत्यशोधक समाजाचे 'दीनबंधू' साप्ताहिक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मृत्यूनंतर १८८५ पासून वासुदेव बिर्जे , तनुबाई बिर्जे यांनी चालवले होते ते १९१३ साली बंद पडले. इतर बंद पडलेल्या पत्रांमध्ये टिळकसंप्रदायी व संतविचारांचे पुरस्कर्ते ज. र. आजगावकर आणि रामकृष्ण विठ्ठल मतकरी यांनी चालविलेले 'सुदर्शन' साप्ताहिक (१९२८); महात्मा गांधींच्या प्रेरणेने सुरू झालेल्या पत्रांमध्ये साप्ताहिक 'मराठी नवजीवन' (१९२१), वा. वि. दास्ताने यांचे पाक्षिक 'सत्याग्रही' (१९२२), अवंतिकाबाई गोखले यांचे 'हिंद महिला' (१९२३), दामोदर नारायण पटवर्धन यांचे 'अस्पृश्यतानिवारक' (१९२३); कम्युनिस्ट विचारसरणीचे व कामगार चळवळीतून प्रेरणा घेतलेली साप्ताहिकांमध्ये शांताराम मिरजकर यांचे 'पुढारी' (१९२४), लालजी पेंडसे यांचे 'नौबत' (१९२९), 'कामगार उदय', 'कामकरी' (१९२४), 'लाल बावटा', 'धुमधडाका', 'मुंबई कामगार', जीआयपी रेल्वे कामगार', बीसीसीआय रेल्वे कामगार', 'आव्हान', (१९३०), 'कामगार राज्य', 'कामगार पत्रिका', 'वर्तमानकाळ' (१९३२), 'तिरंदाज' (१९३३) इत्यादी साप्ताहिके सुरू झाली होती. या खेरीज करमणुकीवर भर देणारे 'प्रफुल्लता (१९२१), नरहर रामचंद्र जोशी यांचे 'सिनेमासमाचार' (१९३०) अशीही काही साप्ताहिके निघाली आणि अस्त पावली. दामोदर सावळाराम यंदे यांचे ऐक्य व संघशक्तीवर भर देणारे 'श्रीशिवाजी' (१९२५), चांभार आणि ढोर जातीच्या उन्नतीसाठी महादेव कांबळे यांनी चालविलेले पाक्षिक 'नवा मनु' (१९२६), नरहर रामचंद्र जोशी यांचे 'सुदर्शन' (१९२३),

मा. कृ. शिंदे यांचे 'शांति' (१९३३), स. बा. हुदलीकर यांचे 'बालकमंदिर' (१९३३), रघुनाथ राजाराम शिंदे यांचे 'मुंबई' (१९३६) मालतीबाई तेंडुलकरांचे 'प्रतोद' (१९३७), रघुनाथ गणेश ठाकूर यांचे 'प्रकाश' (१९३७), पौर्णिमा' (१९३९) इत्यादी वृत्तपत्रांनी मुंबईत पत्रकारितेचे अनेक प्रयोग झाले.

## मुंबईची स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे :

### लोकसत्ता (१९४८):

स्वातंत्र्योत्तर काळात उद्योगपती गोएंका यांच्या 'इंडियन एक्स्प्रेस' प्रकाशनाने १४ जानेवारी १९४८ रोजी 'लोकसत्ता' हे मराठी दैनिक सुरू केले. त्र्यंबक विष्णू पर्वते ह्यांची 'लोकसत्ता'चे पहिले संपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली. हे पत्र भांडवली उद्योग म्हणून सुरू झाले असल्याने स्थापनेपासूनच व्यापारी व्यवस्थापनशास्त्रानुसार या पत्राची कार्यसंस्कृती घडविण्यात आली. स्वतंत्र वार्ताहर नेमण्यात आले, संपादकीय कामकाजात वृत्तसंपादक, सहसंपादक, मुद्रितशोधक अशी कार्यविभागणी करण्याचे धोरण अमलात आले. संपादक मंडळात ह. रा. महाजनी यांना सहसंपादक, आय. ए. ईझिकेले यांना वृत्तसंपादक नेमण्यात आले. प्रेमा ओक, मालती पांडे, अंबिका बेहेरे या महिलांनाही संपादनव्यवस्थेत कामे वाटून देण्यात आली होती. जाहिरात आणि विपणनतंत्रावर विशेष भर देण्यात आला होता. खप वाढविण्यासाठी ताज्या बातम्या आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांतल्या बातम्या देण्यावर भर देण्यात आला; तसेच शब्दकोडी व लॉटरीप्रमाणे शब्दकोडी सोडणाऱ्यांना बक्षिसे, बक्षिसवितरण समारंभ, असे लोकानुनयी उपक्रम सुरू करण्यात आले. राजकीय सत्तेचे अप्रत्यक्ष पाठबळ राखण्यासाठी आवश्यक ते हितसंबंधही जोपासले जात होते. अशा सर्व व्यापारी तंत्रातून सुरू झालेल्या या पत्राचा अल्पावधीत खप वाढत गेला. मात्र सहा महिन्यातच त्र्यं. वि. पर्वते यांची संपादकपदावरून उचलबांगडी करण्यात आली. वृत्तसंपादक इझिकेल यांनी फाळणीच्या काळात पंजाबातल्या जातीय दंग्यांबाबत क्षेत्रीय भेटीतून मिळविलेल्या माहितीच्या आधारे लेखमाला सुरू केली होती; मात्र पहिला लेख प्रसिद्ध झाल्यानंतर गोएंका शेठ यांच्याकडून पुढचे लेख छापू नका असा आदेश आला. यामुळे संपादकीय पेच निर्माण झाला. पर्वते यांना लेखमाला थांबविणे पसंत नव्हते. मात्र गोएंका शेठ यांनी ईझिकेल यांना बडतर्फ करण्याची सूचना पर्वते यांना केली. ती पर्वतेंना मान्य न झाल्याने पर्वतेंनी राजीनामा द्यावा असे सांगण्यात आले व अकारण राजीनामा देण्यास नकार देणाऱ्या पर्वतेंनाही ईझिकेलप्रमाणे एक महिन्याचा पगार देऊन संपादकपदावरून हटविण्यात आले. पर्वतेंच्या जागी शंकर केशव पेंडसे यांची संपादकपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र वर्षभरातच त्यांचीही संपादकपदावरून गच्छंती झाली व ह. रा. महाजनी यांची संपादकपदी नियुक्ती

करण्यात आली. १७ वर्षे त्यांनी ही जबाबदारी निभावली. स्थापनेपासून १९५० पर्यंत दोन वर्षांत लोकसत्तेचे तीन संपादक नेमले गेले. भांडवलशाही उद्योगातली मनमानी वृत्तपत्रांच्या संपादकांच्या स्वातंत्र्यावर किती जबर नियंत्रण ठेवत असते, याचा हा नमुना होता.

**नवभारत (१९४८-१९५०):**

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात 'लोकसत्ते'नंतर पाठोपाठ ८ जुलै १९४८ रोजी हिंदुस्थान न्यूजपेपर्स लिमिटेड या कंपनीचे 'नवभारत' नावाचे मराठी दैनिक सुरू झाले. मुंबई काँग्रेसचे पुढारी स. का. पाटील हे या कंपनीचे अध्यक्ष होते. भा. रा. धुरंधर हे या दैनिकाचे संपादक होते. मात्र पुरेसे भांडवल असूनही हे पत्र या कंपनीला चालवता आले नाही, डिसेंबर १९५० मध्ये ते बंद पडले.

१९४७ साली आचार्य अत्रे यांनी मुंबईत भाऊसाहेब नेवाळकर यांना संपादक नेमून 'जयहिंद' नावाचे सायंदैनिक चालविले. पण आर्थिक फटका बसल्याने ते वर्षभरातच बंद करावे लागले. १९४९ साली मुंबईतून चिमणलाल शहा यांनी 'चित्रा' आणि 'सायंचित्रा' ही दैनिके सुरू केली. 'चित्रा'चे ग. य. चिटणीस हे संपादक होते, तर 'सायंचित्रा'चे वसंत प्रधान हे संपादक होते. 'सायंचित्रा'त गुन्हेगारी स्वरूपाच्या बातम्या असत.

**मुंबई इलाख्यातील जिल्हा पत्रे**

मुंबईबाहेर ठाणे जिल्ह्यातून टिळकपंथीय विचारांचे मोरेश्वर चिंतामण लेले यांचे साप्ताहिक 'राष्ट्रसेवक' (१९२२), शंकर लक्ष्मण गव्हाणकर यांचे 'वसई समाचार' (१९२४), 'कल्याण' (१९२४), दत्तात्रेय गोविंद काळे यांचे 'साष्टी समाचार' (१९२५-१९२८) व 'टणत्कार' (१९२६), धुंडिराज त्र्यंबक गद्रे यांचे 'प्रतियोगी', सखाराम हरी गोलतकर यांचे प्रतिनिधी' (१९२६) स. पां. जोशी यांचे 'सन्मित्र' (१९४९) इत्यादी पत्रे निघाली. कुलाबा जिल्ह्यातून काकासाहेब मनोहर यांचे 'कुलाबा वृत्त' (१९२१), रावजी हरी आठवले यांचे 'खरे स्वराज्य' (१९२०), दा. पां. आगाशे यांचे 'कुलाबा सद्‌वृत्त' (१९२५), सी. न. पटवर्धन संपादित कोकण पब्लिशिंग कंपनीचे 'कोकण', (१९२७-१९३२), ग. भा. पंडित यांचे 'राष्ट्रतेज' (१९३५), नारायण नागू पाटील यांचे 'कोकण कृषिवल' ही प्रामुख्याने काँग्रेसच्या प्रचारासाठी निघालेली पत्रे प्रसिद्ध होत होती. रत्नागिरी जिल्ह्यात रत्नागिरीहून 'यंग मुस्लिम' (१९२८), वेंगुर्ल्याहून अनंत वासुदेव मराठे यांचे 'किरात' (१९२३), मालवणहून 'मालवण समाचार' (१९२४), केवळ लहान मुलांसाठी चालविलेले पारुजी नारायण मिसाळ यांचे मालवणहून प्रसिद्ध होणारे 'बालसन्मित्र' (१९३५) या वृत्तपत्रांनी स्थानिक वाचनाभिरुची घडविण्यात आपले योगदान दिले होते.

पुण्याबाहेर नाशिक जिल्ह्यातून श्रीशंकराचार्य जगद्‌गुरू कुर्तकोटी यांचे 'स्वधर्म' (१९२१-१९२९) साप्ताहिक हिंदुधर्मांतर्गत धर्मप्रसारासाठी निघत होते. राष्ट्रीय पक्षाचे

'स्वातंत्र्य' (१९२२) नावाच्या साप्ताहिकाचे संपादन बाळकृष्ण जनार्दन मराठे हे करीत होते, तर गोविंद रामकृष्ण अत्रे वकील यांनी राष्ट्रीय पक्षाच्या विचारांशी सुसंगत विचारांच्या प्रसारासाठी 'नवा मनु' (१९२८) व चैतन्य' (१९३७) ही साप्ताहिके चालवली होती. ब्राह्मणेतर पक्षाचे समजले जाणारे 'तानाजी' (१९२८-२९) हे साप्ताहिकही नाशिकहूनच प्रकाशित होत होते. म. गांधींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी व स्वातंत्र्यलढ्याची वार्तापत्रे गावोगावी पोहचविण्यासाठी 'गावकरी' (१९३८) हे दैनिक दत्तात्रेय शंकर पोतनीस यांनी मालेगाव येथून सुरू केले व पुढे नाशिकला स्थलांतरित केले. अहमदनगरहून रा. ब. चितळे यांचे 'शेतकरी' (१९११), पारखे-हिवरगावकर यांचे 'नागरिक' (१९२३), माणिकचंद मुथा यांचे 'देशबंधू' (१९२८), विनायक भुस्कटे यांचे 'युगांतर' (१९३६)रावसाहेब पटवर्धन व भाऊसाहेब फिरोदिया संपादित जिल्हा काँग्रेसचे 'संघशक्ती' (१९३६), वसंतराव व गो. स. काणे बंधूंचे 'जनसेवा' (१९४४-१९५२), राम निसळ यांचे 'आझाद हिंद' (१९४७) इत्यादी पत्रे प्रसिद्ध होत होती.

खानदेशातील धुळे येथून लो. टिळकांचे अनुयायी केशव लक्ष्मण ओगले यांनी 'प्रबोध' (१९२१) पत्र सुरू केले होते. या पत्राचे संपादन पुढे दोन वर्षे बाळुभाई मेहता, त्यानंतर पुढे २० वर्षे विश्वनाथ गणेश जावडेकर व त्यांचे बंधू व्यंकटेश जावडेकर यांनी केले. उत्तमराव लक्ष्मण पाटील आणि शंकर सखाराम जाधव यांनीही काही काळ संपादकपदाची जबाबदारी निभावली. १९३५ पर्यंत या पत्राने काँग्रेसचा पुरस्कार केला, त्यानंतर मात्र हे पत्र हिंदुसभेच्या विचारांकडे झुकले. स्थानिक प्रश्नांना अधिक प्राधान्य देणे हे या पत्राचे धोरण कायम राहिले. फैजपूर काँग्रेसच्या वेळी धुळ्यातून 'भारत' साप्ताहिक सुरू झाले. १९३६ साली भारत मंडळ ट्रस्ट स्थापन करून ट्रस्टमार्फत हे पत्र चालवले जाऊ लागले. या पत्राच्या संपादनात विनायक नरहर उर्फ काकासाहेब बर्वे, गोपाळराव मदाने, विश्वनाथ उर्फ दादासाहेब टिळक , बाळुभाई मेहता यांनी संपादक म्हणून काम पाहिले. स्वातंत्र्योत्तर काळात ह्या पत्राचे 'स्वतंत्र भारत' असे नामांतर झाले व कांतिलाल गुजराती यांच्याकडे संपादकत्व गेले. १९४७ साली दत्तात्रेय बापू जोशी यांनी पक्षनिरपेक्ष भूमिकेतून 'वार्ता' साप्ताहिक सुरू केले. काँग्रेसच्या ध्येयधोरणांचा प्रचार करण्यासाठी ना. स. पाटील यांनी नवहिन्द' (१९४७) साप्ताहिक सुरू केले. जळगाव येथून सीताराम नाना चौधरी यांनी ब्राह्मणेतर पक्षाच्या विचारांना अनुसरणारे 'आत्मोद्धार' (१९२३) साप्ताहिक चालवले होते. जळगावातून सोनाळकर, आनंदीबाई शिर्के यांनी 'कलादर्श' (१९३३) साप्ताहिक चालविले होते, पण ते अल्पायुषी ठरले. वि. चां. नेहते यांनी 'बातमीदार' (१९३५) साप्ताहिक चालविले. देवकीनंदन नारायण यांनी 'जनसेवक' व 'राष्ट्रसेवक' ही साप्ताहिके सुरू केली होती. जळगावातून 'सेवक', 'हिंदभूमी', 'युद्धवार्ता', 'प्रागतिक', 'वार्ताविहार' अशी इतरही काही साप्ताहिके चलविली जात होती.

खानदेशातील अमळनेरहून वासुदेव भावे व नरहर हणमंत देशपांडे यांनी 'बालवसंत' (१९२७) हे मुलांसाठी पाक्षिक सुरू केले होते. साने गुरुजींनी मुलांसाठी हस्तलिखित स्वरूपात 'छात्रालय' दैनिक व मुद्रित स्वरूपात 'विद्यार्थी' साप्ताहिक चालविले होते. खानदेशातील गिरणी कामगारांच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर साने गुरुजींनी 'काँग्रेस' (१९३८-१९४०) साप्ताहिक सुरू केले. 'काँग्रेस मायबाप, जाळील सर्व ताप' हे या पत्राचे ब्रीदवाक्य होते. ६ एप्रिल १९३८ च्या पहिल्याच अंकात साने गुरुजींनी हे पत्र सुरू करण्यामागची भूमिका सांगताना म्हटले होते की, 'संयुक्त खानदेशमध्ये गेला महिना कामगारांचा झगडा चालला आहे, परंतु या झगड्याची वाच्यता इतर वर्तमानपत्रांत फारशी दिसत नसते.. कामगारांची बाजू तेजस्वीपणे मांडणे' ही या पत्राची भूमिका असेल. प्रत्येक जिल्ह्याला एक तरी राष्ट्रीय विचारांचे साप्ताहिक आहेच, खानदेशात काँग्रेसचा जयजयकार होण्यास या सप्ताहिकाची मदत होईल.' काँग्रेस' साप्ताहिकात ८ जानेवारी १९४० च्या अंकातून अमळनेर येथे झालेल्या मुंबई इलाखा विद्यार्थी परिषदेतील ज्योती बसू यांच्या अध्यक्षीय भाषणाचा सविस्तर वृत्तांत छापण्यात आला. २२ जानेवारी १९४० च्या अंकात साने गुरुजींच्या रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली दौऱ्याचा वृत्तांत प्रसिद्ध झाला. रेल्वे कामगार संघटनेचे सेक्रेटरी भाई टिळेकर यांच्या महागाईविरोधी सभेच्या प्रचाराचा वृत्तांत २९ जानेवारी १९४० च्या अंकात प्रसिद्ध झाला. ह्या तीनही वृत्तांतांवर सरकारने आक्षेप घेतला व जिल्हा न्यायाधिशांनी साने गुरुजींना प्रक्षोभक वृत्ते छापू नये अशी समज दिली व १५०० रुपयांचा जामीन मागितला. मात्र जामीन न भरता साने गुरुजींनी १८ मार्च १९४० रोजी अंक बंद केला.

साताऱ्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'ऐक्य' (१९२३) पत्राने बराच नावलौकिक संपादित केला होता. नरहर गंगाधर जोशी हे 'ऐक्य'चे पहिले संपादक होते, मात्र रा. ब. काळे हे पत्राचे मुख्य प्रवर्तक होते. वा. ना. देशपांडे हेही 'ऐक्य'च्या संपादनकार्यात सहभागी होते. बराच काळ चं. ह. पळणीटकर संपादक होते. आपल्या राजकीय बांधिलकीचे प्रतीक म्हणून या पत्रावर हिंदुस्थानच्या नकाशात न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले , लो. टिळक आणि म. गांधी यांची चित्रे छापली जात. सरकार असो की राष्ट्रीय पक्ष असो, स्वपक्षीय असो की परपक्ष असो सर्वांच्या गुणदोषांची दखल घेऊन दोषांवर विधायक टीका करण्याचे व्रत या अंकाने स्वीकारलेले होते. 'स्वतंत्र विचारांचे पत्र' हा लौकिक या पत्राने कायम टिकवला. साताऱ्याहून इतरही दैनिके व साप्ताहिके प्रकाशित होत असत. त्यात विनायक शंकर उर्फ बाबूराव वैद्य यांचे 'समर्थ' (१९२७), वेलणकरांचे 'हंस' (१९३३), तुकाराम भोसले शाईवाले यांचे 'लोकराज्य' (१९३५), रामचंद्र बाबाजीराव जाधव यांचे 'ग्रामोद्धार' (१९३५) इत्यादी पत्रांचा समावेश होता. सातारा जिल्ह्यातील कराडहून कृष्णराव मारुतिराव उर्फ भाऊसाहेब कळंबे यांचे ब्राह्मणेतर पक्षाचे 'कैवारी' (१९२४), स.

ब. पाटील यांचे 'शिक्षकांचा कैवारी' (१९२५), मुसलमानी वीरांच्या कथा सांगणारे, शुद्धिसंघटन, अस्पृश्योद्धार इ. विषय हाताळणारे खतीब यांचे 'मुसलमान' (१९२७) साप्ताहिक, सामाजिक-राजकीय प्रश्नांची नेमस्त विचारांतून चर्चा करणारे डॉ. ना. पां. कोल्हापुरे यांचे 'अभ्युदय' ही पत्रे प्रसिद्ध होत होती. सातारा जिल्ह्यातील कुपवाड येथून अस्पृश्योद्धाराच्या प्रेरणेतून चालविले जाणारे विरूपाक्ष हिरेमठ यांचे 'महाराष्ट्रवीर' (१९२६), इस्लामपूरहून प्रसिद्ध होणारे गो. म. जोशी यांचे 'भारत-वृत्त' (१९२७) पाक्षिक, वाळवे येथून प्रसिद्ध होणारे शुद्धिकार्याचा पुरस्कार करणारे 'शुद्धिसमाचार' (१९२७), तासगावहून प्रसिद्ध होणारे 'तासगाव समाचार' (१९३७), तासगाव वृत्त (१९३८) इत्यादी पत्रे सातारा जिल्ह्यातून प्रसिद्ध होत होती.

## ३.४. वऱ्हाड-मध्यप्रांतातील पत्रकारिता :

**महाराष्ट्र (१९१४-१९४३):**

नागपूरहून गोपाळ अनंत ओगले यांनी १९१४ साली लो. टिळकांच्या राजकीय विचारसरणीला अनुसरणारे 'महाराष्ट्र' पत्र सुरू केले होते. डॉ. मुंजे प्रभृती पुढारी या पत्राचे आधारस्तंभ होते. टिळकांच्या मृत्यूनंतर मात्र या पत्राने एकाच एक राजकीय पक्षाशी बांधिलकी न ठेवता साधकबाधक विचाराने योग्य ती बाजू उचलून धरण्याचे धोरण अंगीकारले. कॉंग्रेस असो की हिंदुमहासभा, सर्वांकडे समन्यायबुद्धीने पहाण्याची दृष्टी संपादकांनी स्वीकारली होती. अगदी टिळक हयात असतानाही १९१७ साली नागपूरच्या रिस्ले परिपत्रकावरून विद्यार्थ्यांनी केलेल्या बंडाविरुद्ध न. चिं. केळकर यांनी 'केसरी'तून लेखन केले असताना 'महाराष्ट्र' पत्राने मात्र विद्यार्थ्यांची बाजू लावून धरली होती. १९२८ साली मध्यप्रांतात राष्ट्रीय पक्षात फूट पाडून मंत्रिमंडळाची पुनर्घटना करणाऱ्या डॉ. राघवेंद्र राव यांची बाजू घेण्यास संपादक ओगले यांनी स्पष्ट नकार दिला होता. व्यक्तिगत टीका व निंदाव्यंजक लेखन करण्यापासून 'महाराष्ट्र'ने कायम स्वत:ला दूर ठेवले. १५ जानेवारी १९३१ च्या अंकात 'नोकरशाहीच्या आसुरी हक्काचे बळी' या लेखातील "लॉर्ड हार्डिंग्जच काय प्रत्यक्ष रामचंद्राला जरी हिंदुस्थानचा व्हाइसरॉय नेमिले, तरी त्यास हल्लीच्या परिस्थितीत मोठासा फरक घडवून आणिता यावयाचा नाही" ह्या वाक्यावरून गोपाळराव ओगले यांना अटक करण्यात आली होती. हा लेख संपादन साहाय्य करणारे ग. त्र्यं. माडखोलकर यांनी लिहिला होता, परंतु संपादकाची जबाबदारी म्हणून ओगले यांनी शिक्षा भोगली. १९२४ पासून १९४३ पर्यंत ग. त्र्यं. माडखोलकर या पत्राच्या संपादनकार्यात सहभागी झाल्यापासून साहित्यिक चर्चा, वाङ्मयीन परीक्षणे अंकातून प्रसिद्ध होऊ लागली होती. माडखोलकर आल्यापासून साध्या सुबोध भाषेबरोबर संस्कृतप्रचुर भाषेचेही वैभव 'महाराष्ट्र' पत्रातून झळकू लागले. १९३० नंतर 'महाराष्ट्र'

पत्राचे दैनिकातून पाक्षिकात रूपांतर झाले. १९४५ साली दादासाहेब ओगले यांच्या निधनानंतर पु. दि. ढवळे 'महाराष्ट्र'चे संपादक झाले व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसचे मुखपत्र म्हणून 'दैनिक' स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. १९७७ पर्यंत हे पत्र सुरू होते.

**स्वातंत्र्य (१९२४):**

लोकमान्य टिळकांप्रमाणेच स्वा. सावरकरांच्या विचारांनी प्रेरित झालेली पत्रे महाराष्ट्रात चालवली जात होती. नागपूरहून प्रसिद्ध होणारे 'स्वातंत्र्य' हे दैनिक त्यापैकीच होते. डॉ. हेडगेवार, डॉ. ना. भा. खरे, मनोहरपंत बोबडे, नारायण वैद्य, विश्वनाथराव केळकर यांनी 'स्वातंत्र्य प्रकाशन' ही कंपनी स्थापन करून जानेवारी १९२४ पासून हे दैनिक सुरू केले. संपादकत्वाची जबाबदारी सुरुवातील विश्वनाथराव केळकर यांच्याकडे सोपविण्यात आली व नंतर डॉ. हेडगेवार या पत्राचे संपादक झाले. स्वा. सावरकर रत्नागिरीला स्थानबद्ध असताना नागपूरच्या 'स्वातंत्र्य'मधून त्यांचे लेख प्रसिद्ध होत. विशेषत: १९२४ साली क्रमश: प्रसिद्ध झालेली 'काय अजूनही निजलात?' ही लेखमाला व तळमळणारा आत्मा या टोपणनावाने प्रसिद्ध होणारे लेख हे सावरकरांचे या पत्राला लाभलेले योगदान होते.

**ब्राह्मणेतर (१९२६):**

विदर्भातील वर्धा येथून व्यंकटराव राघोबा गोढे यांनी ४ जुलै १९२६ पासून 'ब्राह्मणेतर' साप्ताहिक सुरू केले होते. 'निर्भीड मतप्रदर्शन करणारे सामाजिक, धार्मिक व राजकीय जुलुमांचा प्रतिकार करून ब्राह्मणेतरांची सेवा करणारे साप्ताहिक' अशी या साप्ताहिकाने आपली भूमिका जाहीर केली होती. १९२६ च्या मध्यप्रांत वऱ्हाडच्या कायदेमंडळाच्या निवडणुकांच्या काळात हे साप्ताहिक सुरू झाले असल्यामुळे या साप्ताहिकातून ब्राह्मणेतर पक्षाचा निवडणुक जाहीरनामा, ब्राह्मणेतर पक्षाच्या उमेदवारांचा परिचय, ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या निवडणुक दौऱ्यांचे वृत्तांत छापून येत असत. ब्राह्मणेतरांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि कायदे कौन्सिलातल्या जागा पटकावून सत्तेचे भागीदार व्हावे यासाठी ब्राह्मणेतरांमध्ये राजकीय जागृती घडविण्यावर या पत्राने भर दिला. वर्ध्यात त्याकाळी 'केसरी' प्रमाणे 'उदय' पत्राचा बोलबाला होता. त्या पत्राच्या ब्राह्मणी वर्चस्वाचा मुकाबला करणारे पत्र म्हणून 'ब्राह्मणेतर' या पत्राने आपली प्रतिमा निर्माण केली होती. अर्थात ब्राह्मणापेक्षा 'ब्राह्मण्या'वर प्रहार करण्याची पत्राची भूमिका होती. म्हणूनच महाड सत्याग्रहात ब्राह्मण नको या जेधे-जवळकर यांच्या भूमिकेविषयी या पत्राने नापसंती व्यक्त केली होती. ब्राह्मणेतर चळवळ ही जातीय नसून राष्ट्रीय आहे हा विचार जनमानसात बिंबविण्यावर ह्या पत्राने भर दिला होता. ब्राह्मणेतर पत्रे ब्राह्मणेतर चळवळीला जातीय व अराष्ट्रीय विशेषणे लावून सामान्यजनांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे

ब्राह्मणेतर चळवळीने आपली चळवळ ही राष्ट्रीय चळवळ असल्याचे आवर्जुन सांगितले पाहिजे अशी पत्रकर्त्यांची भूमिका होती. या पत्राने यवतमाळ जिल्हा ब्राह्मणेतर परिषदेवर खास विशेषांक काढून अध्यक्ष सी. के. बोले यांच्या भाषणासह परिषदेने पारित केलेले ठराव व इतर माहितीचा समग्र वृत्तांत प्रसिद्ध केला होता. वर्धा तालुका शेतकरी परिषदेचे वृत्तांतही या पत्रातून छापले जात असत.

**तरुण भारत (१९२६):**

२० जानेवारी १९२६ रोजी डॉ. ना. भा. खरे संपादित 'तरुण भारत' हे साप्ताहिक नागपूरातून सुरू झाले. 'नरकेसरी' प्रकाशनाचे मोरोपंत अभ्यंकर हे या पत्राचे प्रवर्तक होते. पहिल्याच अंकात 'तरुण भारत'चे धोरण जाहीर करताना डॉ. खरे यांनी लिहिले होते की, "राष्ट्रीय सभा व स्वराज्य यांस पाठिंबा देऊन जनतेसमोर राष्ट्रविमोचनाचे मार्ग स्पष्टपणे मांडीत राहणे व शक्य त्या स्वावलंबनपूर्ण उपायांनी हिंदी जनतेचे सामर्थ्य, तेज व संघटना वाढवून तीत प्रतिकारशक्तीचा विकास करून हिंदी स्वराज्याचा झगडा अखंड सुरू ठेवण्याची खटपट करणे हे 'तरुण भारत'चे ध्येय राहील". व्यक्तिकेंद्री टीका करण्याऐवजी तत्त्वनिष्ठ टीकेला तरुणभारत प्राधान्य देईल असेही या संपादकीयात म्हटले होते. १९३० साली कायदेभंगाच्या चळवळीत डॉ. ना. भा. खरे यांना अटक झाल्याने काही काळ हे पत्र बंद पडले. बाबूराव सोहनी यांनी संपादकपदाची जबाबदारी घेऊन हे पत्र पुन्हा काही काळ सुरू ठेवले होते; मात्र मोरोपंत अभ्यंकरांच्या मृत्यूमुळे १९३४ साली हे पत्र बंद पडले.

१९४३ साली मोरोपंत अभ्यंकर यांच्या चाहत्यांनी त्यांच्या स्मरणार्थ नागपूरात 'नरकेसरी स्मारक मंडळ' नावाची विश्वस्त संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने भय्यासाहेब उधोजी यांनी 'तरुण भारत' पत्राची नव्याने नोंदणी करून१२ वर्षांच्या खंडानंतर २ जानेवारी १९४४ रोजी 'तरुण भारत' दैनिकाच्या रूपात प्रसिद्ध करायला सुरुवात केली. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनी संपादकपद स्वीकारले. पहिल्या अंकात 'तरुणभारत' दैनिकाचे धोरण घोषित करण्यात आले. हे पत्र कोणत्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र असणार नाही, हे जाहीर करण्यात आले. प्रत्येक पक्षाच्या धोरणातील व कार्यक्रमातील जेजे राष्ट्रहिताच्या दृष्टीने योग्य असेल त्याचा पुरस्कार करणाचे व लोकहिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांवर लोकमत जागृती करण्याचे पत्राचे धोरण राहिले. या धोरणास अनुसरून 'तरुण भारत'ने चिमूर-आष्टी अत्याचार, विणकरांचे सत्याग्रह, अस्पृश्यांचे प्रश्न यावर भाष्य करणारे लेखन प्रसिद्ध केले. जिल्हावार बातमीपत्रांबरोबरच महायुद्धाची वार्तापत्रेही प्रसिद्ध केली. माडखोलकरांचे प्रासंगिक प्रश्नांनाही तात्त्विक बैठकीतून उहापोह करणारे पल्लेदार अग्रलेख ही 'तरुण भारत'ची मोठी जमेची बाजू होती. १९४८ साली गांधीजींच्या हत्येनंतर महाराष्ट्रात निर्माण झालेल्या क्षोभाचा फटका

नागपूरच्या 'तरुण भारत'लाही बसला. २ ऑक्टोबर १९४८ च्या जाळपोळीत 'तरुण भारत'चे कार्यालय, छापखाना, संपादक माडखोलकर यांचे निवास उध्वस्त करण्यात आले. या आपत्तीनंतर बाळासाहेब देवरसांच्या पुढाकाराने १ ऑक्टोबर १९४९ रोजी 'नरकेसरी स्मारक मंडळ' 'नरकेसरी प्रकाशन लिमिटेड' या नव्या कंपनीत विलीन करून 'तरुण भारत'चे पुनरुज्जीवन करण्यात आले. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याकडेच संपादकत्वाची जबाबदारी कायम ठेवून हे पत्र पुन्हा क्रियाशील झाले.

**'मातृभूमी' (१९३१) :**

वऱ्हाडात बापूसाहेब अणे यांच्या जंगलसत्याग्रहाला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या मुहूर्तावर ९ जुलै १९३१ रोजी पु. ब. उर्फ दादासाहेब गोळे यांनी 'मातृभूमी' साप्ताहिक सुरू केले. काँग्रेसची ध्येयधोरणे जनमानसात रूजवावी यासाठी हे पत्र सुरू करण्यात आले. पत्र सुरू झाल्यावर ७ जानेवारी १९३२ च्या अंकात ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन करणारा अग्रलेख प्रसिद्ध केल्याच्या कारणावरून सरकारने आक्षेप घेतला व दोन हजारांचा जामीन मागितला. त्यामुळे हे पत्र तत्काळ बंद करण्यात आले. त्यानंतर २८ सप्टेंबर १९३३ रोजी ते पुन्हा सुरू करण्यात आले. त्यानंतर १९३७ पर्यंत चार वर्षांत तीन वेळा सरकारने जामीन मागितले; तिन्ही जामीन भरल्यानंतरही १९३७ साली पाच हजारांचा चौथा जामीन मागितल्यावर पत्र बंद करावे लागले. दादासाहेब गोळे यांनी संपादकपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ४ ऑगस्ट १९३८ रोजी प्रमिलाताई ओक यांनी जबाबदारी घेऊन हे पत्र पुन्हा सुरू केले. प्रमिलाताई ओक यांच्या मार्गदर्शनाखाली एक वर्ष संपादक म्हणून व्यंकटेश शंकर वकील यांनी काम पाहिले, १९३९ ते १९४२ या काळात स. खु. पांडे व यशवंत पिटके यांनी काम पाहिले व त्यानंतर स्वत: प्रमिलाताई ओक यांनीच संपादकत्व निभावले. १९४२ च्या आंदोलनात प्रमिलाताईंना अटक झाल्याने सहा महिने पत्र बंद पडले व १९४३ साली पुन्हा सुरू झाले. गणेश गद्रे, श्याम जहागिरदार यांचे संपादकीय सहकार्य लाभले. १९४८ साली प्रमिलाताई ओक यांच्या निधनानंतर काकासाहेब ओक यांनी पत्र पुढे चालू ठेवले.

**सावधान (१९३५) :**

स्वा. सावरकरांच्या प्रेरणेतून रामचंद्र बालाजी मावकर यांनी १९३५ साली नागपूरातून 'सावधान' साप्ताहिक सुरू केले. कडव्या हिंदुत्ववाद्यांचे पत्र म्हणून 'सावधान'ने विदर्भात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. या साप्ताहिकात लेखन करणारे वासुदेवराव फडणीस यांच्या 'अक्षर पुरुष बच्छराज ॲण्ड को' या लेखामुळे संतप्त झालेल्या जमनालाल बजाज यांनी 'सावधान' पत्रावर अब्रूनुकसानीचा दावा केला होता. 'सतीचे वाण' या लेखासाठी मध्यप्रांत सरकारनेही जामीन मागितला होता. मराठी

साहित्यिक पु. भा. भावे हे 'सावधान' पत्राचे लेखक होते, भाव्यांच्या लेखनामुळे हे पत्र वाचकप्रिय झाले होते. १९३५ साली पु. भा. भावे यांनी लिहिलेले 'मॉरिस कॉलेजात मुलींचे नृत्य' आणि 'अखेर पोरी नाचल्या' हे लेख नागपूरात चर्चेचे विषय झाले होते. पु. भा. भावे यांनी 'सावधान' पत्रातून 'वीरभद्र', 'इंद्र', विद्यापती' इत्यादी टोपणनावे धारण करूनही लेखन केले होते. द. ग. गोडसे यांच्या व्यंगचित्रांनीही 'सावधान'ची लोकप्रियता वाढवली होती. मध्यप्रांतात सत्तेवर आलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने 'सावधान'कडे जामीन मागितल्यावर मावकर यांनी ह्या पत्राचे प्रकाशन नागपूरऐवजी मुंबईतून करण्याचा निर्णय घेतला. अर्थात मुंबईतही सरकारने जामीन मागितलाच होता. मावकर यांचे स्वा. सावरकर यांना हार घालताना अपघाती निधन झाल्यावर ह्या पत्राचीही इतिश्री झाली.

**आदेश (१९४१):**

'सावधान' पत्र बंद पडल्यावर पु. भा. भावे यांनी हिंदुत्वनिष्ठेतून २८ मार्च १९४१ रोजी 'आदेश' साप्ताहिक सुरू केले. पहिल्याच अंकातील 'राजमस्तकाचा आदेश' हा त्यांचा लेख शि. म. परांजप्यांच्या काव्यात्म शैलीची आठवण करून देणारा होता. भाव्यांनी आपल्या पत्राची भूमिका स्पष्ट करताना लिहिले होते की, "हिंदुत्वनिष्ठ तत्त्वज्ञानाच्या प्रसाराची व पोलादी पक्षसंघटनेची हिंदू समाजाला आजच्याइतकी पूर्वी कधीही आवश्यकता नसता, ज्वलंत हिंदुत्वनिष्ठेचे ब्रीद बाळगणारी वृत्तपत्रे अवघ्या हिंदुस्थानात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीसुद्धा नाहीत ह्या प्रकाराची आम्हास राहून राहून खंत वाटते. .. वृत्तपत्रसृष्टीच्या आघाडीवर हिंदूंच्या वतीने झुंजण्यासाठी 'आदेश'चा अवतार आहे." (आदेश, १ नोव्हेंबर १९४१). आचार्य अत्र्यांनी स्वा. सावरकर यांच्यावर टीका केली होती, त्या लेखावर प्रतिक्रिया म्हणून पु. भा. भावे यांनी 'फाल्गुन' या टोपणनावाने लेख लिहून अत्र्यांवर टीकेची झोड उठवली होती; अत्र्यांनी त्याची प्रतिक्रिया म्हणून भाव्यांवर खटलाही दाखल केला होता, परंतु तो नंतर त्यांना मागे घ्यावा लागला होता. या प्रकरणामुळे 'आदेश' पत्राची लोकप्रियता आणखीच वाढली. हिंदुस्थानच्या फाळणीच्या निर्णयानंतर भाव्यांनी ५ जुलै १९४७ च्या अंकात अतिशय त्वेषपूर्ण लेख लिहिला होता. ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधींची हत्या झाल्यानंतर नागपूरात झालेल्या जाळपोळीची झळ 'आदेश' पत्रालाही बसली व ३१ जानेवारी १९४८ रोजी हे पत्र बंद पडले.

**विदर्भातील इतर नियतकालिके :**

विदर्भात नागपूरखेरीज वर्धा, अकोला, अमरावती इत्यादी ठिकाणांहून स्थानिक पातळीवर काही वृत्तपत्रे चालवली जात होती. वर्ध्याहून मनोहरपंत देशपांडे, डॉ. तु. ज. केदार यांनी चालविलेले 'सुमति' (१९२१) साप्ताहिक, वामनराव घोरपडे यांचे गांधीजींच्या

असहकार आंदोलनाने प्रेरित असलेले 'तरुण महाष्ट्र' ही ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार करणारी पत्रे चालविली जात असत. अकोला येथून ब्राह्मणेतर पक्षाचा पुरस्कार करणारे दामोदर देवमनस गुलालकर यांचे 'राजहंस' (१९२४), ब. सो. ताकवले संपादन करीत असलेले अन्याय विध्वंसक मंडळाचे 'किसान' (१९३७), म. रा. ठोसर यांचे 'सेवक' (१९४०); ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद लवकर मिटवावा अशी भूमिका घेणारे यवतमाळचे 'लोकसेवक' साप्ताहिक, ब्राह्मणेतर पक्षाचा पुरस्कार करणारी अमरावतीहून प्रकाशित होणारे वीर वामनराव जोशी यांचे 'स्वतंत्र हिंदुस्थान' (१९२३), काशीराव बापू देशमुख यांचे 'सुबोधमाला', कुरकुरे यांचे 'महाराष्ट्र केसरी'ही पत्रे; अंजनगाव सुरजीहून प्रसिद्ध होणारे 'आर्यावर्त', करजगावचे 'माळी पुढारी' ; खामगावहून प्रसिद्ध होणारे वि. ना. उदासी वकील यांचे 'समाजसेवक' व अच्युत देशपांडे यांचे 'नवभारत' (१९३६) इत्यादी अनेक छोटी व अल्पकाळ चाललेली पत्रे विदर्भातून प्रसिद्ध होत होती. डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनीही १ डिसेंबर १९४६ रोजी नागपूरातून 'इन्किलाब' साप्ताहिक सुरू केले होते. 'समाजवादी क्रांती करून समाजवादी समाजाची प्रतिष्ठापना करण्यास मदत करणे' हे या पत्राचे उद्दिष्ट होते. श्री. ना. बनहट्टी यांनी जानेवारी १९४८ मध्ये सुरू केलेले 'समाधान' साप्ताहिकही तीनचार वर्षे चालले.

## ३.५. संस्थानी मुलुखातली नियतकालिके :

### विद्याविलास (१८६६-१९४७):

कोल्हापूरातून शंकरशास्त्री गोखले यांनी १८६६ साली 'विद्याविलास' मासिक सुरू केले होते, १८८८ साली त्यांनी ते साप्ताहिकात व त्यानंतर हळू हळू दैनिकात रूपांतरित केले. कोल्हापूरत टेलिप्रिंटरवरून बातम्या घेणारे पहिले पत्र म्हणून 'विद्याविलास'चा लौकिक होता. १९३६ ते १९४७ या काळात कोल्हापूरातील राजकीय लढ्यात या पत्राची साथ राहिली होती. मात्र १९१८ साली शंकरशास्त्रींना राजद्रोहाच्या आरोपाखाली साडेचार वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती, तसेच १९३९ साली कोल्हापूरच्या पोलिसांच्या संपाची बातमी देऊन संपकऱ्यांना चिथावणी दिल्याच्या आरोपावरून तत्कालीन संपादक रघुनाथ गणेश उर्फ बाबूराव गोखले यांना सव्वा वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. १९४२ च्या आंदोलनात रघुनाथ गणेश यांना सव्वादोन वर्षांचा तुरुंगवास व १९४६ साली सरकारी नोकरांच्या संपाच्या वेळी सव्वा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. १९४८ साली गांधीहत्येनंतर महाराष्ट्रात झालेल्या जाळपोळीत 'विद्याविलास'चे कार्यालय जाळण्यात आले, त्यानंतर हे पत्र बंद करण्याचा निर्णय संपादकांनी घेतला.

### प्रतोद (१८८३-१९०९):

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूरहून रामचंद्र नारायण कशाळकर यांनी १७ नोव्हेंबर १८८३ रोजी 'प्रतोद' साप्ताहिक सुरू केले होते. १८९७ साली 'स्वतंत्र होण्याची तयारी' या लेखासाठी

संपादक कशाळकर यांना जन्मठेपेची व कृष्णाजी हरमळकर यांना ७ वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. कशाळकरांनंतर वासुदेव दामोदर मुंडले (१८८०-१९४७) यांनी लो. टिळकांच्या संमतीने व पुरस्काराने व्यापारी कंपनीतील नोकरी सोडून 'प्रतोद'चे संपादकत्व स्वीकारले. मुंडले यांनीही कशाळकरांप्रमाणे ब्रिटिश सत्तेविरोधात राष्ट्रीय बाण्याने लेखन करण्याची परंपरा पुढे चालवली. १९०८ साली टिळकांना अटक झाल्यावर 'प्रतोद'मधून राज्यकर्त्यांवर प्रखर टीका करण्यात येऊ लागली. 'वंगभंगाची चळवळ', 'भारताची दोन छलके करण्याचा डाव', 'मोर्ले मिंटो सुधारणा', 'स्वराज्याची मागणी म्हणजे आकाशातील चांदोबा' अशा लेखांतून सराकारच्या उद्दामपणाचा समाचार घेण्यात आला. 'प्रचंड मातला वडनावळ / प्राणी होती अती विव्हळ' असल्या भाषेचा वापर केला गेला. त्यामुळे सरकारने 'प्रतोद'च्या संपादकावर खटला भरला आणि वा. दा. मुंडले यांना १९०९ साली दीड वर्षांची सक्त मजुरी व ५०० रुपयांचा दंड झाला. परिणामत: १९०९ साली 'प्रतोद' बंद पडले. (लेले १९८४, पृ. ६२० / खानोलकर, १९६२, पृ. २१६-२१७)

## समर्थ (१८९८-१९०९)

कोल्हापूरहून विष्णु गोविंद विजापूरकर ६ जुलै १८९८ पासून 'समर्थ' साप्ताहिक चालवित होते. या पत्रातून राष्ट्रीय शिक्षण, कोल्हापूर दरबारचे राजकारण, वेदोक्त प्रकरण इत्यादी विषयांवर लेखन प्रसिद्ध होई. कोल्हापूर दरबारच्या राजकारणाची चर्चा या पत्रातून केली जात असल्याने हे पत्र भटांचे मुखपत्र म्हणून ओळखले जाई. कोल्हापूरातल्या 'शिवाजी क्लब' या क्रांतिकारी संघटनेशी या पत्राचे संबंध असल्याचा राज्यकर्त्यांना संशय होता. विजापूरकरांच्या 'विश्ववृत्त' मासिकात श्री. दा. सातवळेकर यांनी 'वैदिक प्रार्थनेची ओजस्विता' नावाच्या लेखात " जे क्षत्रिय शत्रूच्या सैन्याच्या व दुनियेतील गुलामीचा बीमोड करीत नाहीत त्यांच्या छत्रपतित्वाचा व समशेर बहाद्दरत्त्वाचा राष्ट्राला काय उपयोग आहे?" असा प्रश्न उपस्थित केला होता, त्यातील 'छत्रपति' शब्दाचा निर्देश कोल्हापूरच्या महाराजांना उद्देशून केला गेल्याचे स्पष्ट होत असल्याने या लेखावर आक्षेप घेण्यात आला. लेखक सातवळेकर, संपादक विजापूरकर आणि सहसंपादक वा. म. जोशी व विनायकराव यांना या राजद्रोहाखाली शिक्षा ठोठावण्यात आली. विजापूरकरांना ३ वर्षांची साधी कैद, वा. म. जोशी यांना ३ वर्षांची सक्त मजुरीची व विनायक जोशींना दीड वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली. यानंतर १९०९ साली वृत्तपत्र कायद्याखाली कोल्हापूर संस्थानने 'समर्थ' पत्राकडे जामीन मागितला होता, ही जामिनाची रक्कम भरण्यापेक्षा पत्र बंद करण्याचा निर्णय विजापूरकरांनी बंद केले. (लेले, १९८४, पृ. ६२९-६३०)

## मराठा दीनबंधू (१९०१) :

भास्करराव जाधव यांनी कोल्हापूरातून सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी १९०१ साली 'मराठा दीनबंधू' पत्र सुरू केले होते. १९०३ नंतर ज. र. अजगावकर यांनी या पत्राचे संपादकत्व स्वीकारले. अजगावकरांनी या पत्रातून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद टाळण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला; मात्र भिक्षूवृत्तीतून येणारा सामाजिक दंभ उघड करण्यात कचरले नाहीत.

अस्पृश्याने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर भटभिक्षुक धर्मांतरित अस्पृश्यास स्पृश्य मानू लागतात या दुटप्पीपणावर टीका करणारा शिवराम कांबळे यांचा लेख अजगावकरांनी 'मराठा दीनबंधू' मधून आवर्जुन छापला होता.

### प्रकाश (१९०६-१९३०) :

लो. टिळकांचे राजकीय अनुयायी भाऊसाहेब सोमण यांनी सातारा येथून ५ एप्रिल १९०६ साली 'प्रकाश' नामक वृत्तपत्र सुरू केले. या अंकात सावरकरांच्या 'मॅझिनी' पुस्तकाचे परीक्षण झाल्यामुळे सराकरमान्य संस्थांत 'प्रकाश' पत्र घेण्यास मनाई करणारा हुकूम जारी झाला होता. १९२५ नंतर भाऊसाहेब सोमण यांनी या पत्राची जबाबदारी बाबुराव भिडे यांच्याकडे सोपविली. १९३० पर्यंत हे पत्र त्यांनी चालविले.

### विश्वबंधू (१९११):

कोल्हापूरातून १९११ साली बळवंत कृष्ण पिसाळ यांनी टिळकविचारांना विरोध करण्याच्या हेतूने 'विश्वबंधू' हे पत्र सुरु केले. शाहू महाराजांनी या पत्राला पाठबळ पुरविले होते. ब्राह्मणेतरवादाचा कडवा पुरस्कार करणारे हे पत्र होते, प्रबोधनकार ठाकरे हे विधायक भूमिकेतून ब्राह्मणेतर चळवळीतले दोष दाखवून देत' परंतु पिसाळांनी १५ नोव्हेंबर १९२५ च्या अंकातून त्यांच्यावरही कठोर टीका केली होती. औंधच्या पंतप्रतिनिधींनी ब्रिटिश राजप्रतिनिधीकडे या पत्राविरुद्ध तक्रार केल्यामुळे शाहू महाराजांनी या पत्राचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे हे पत्र बंद पडले.

### जागृती (१९१७-१९४९):

बडोदे संस्थानातून २५ ऑक्टोबर १९१७ रोजी पाळेकर यांनी लोकाश्रयातून सत्यशोधक विचारांच्या बांधिलकीतून 'जागृती' नामक साप्ताहिक सुरु केले होते. ह्या पत्राच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती बडोदे संस्थानापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्र अशी व्यापक ठेवण्यात आली होती. सत्यशोधक व ब्राह्मणेतर परिषदांचे अहवाल व तत्संबंधीच्या घडामोडी अग्रक्रमाने छापण्यावर भर असायचा. सांगली, फलटण, अक्कलकोट, इंदूर इत्यादी संस्थानांतील नोकऱ्यांत ब्राह्मणांचे वर्चस्व असते व बहुजनांना डावलले जाते याकडे लक्ष वेधून घेणारे लेख छापून या संस्थांतील भेदभावनीतीवर त्यांनी परखड टीका केली. शेतकरी-कामगारांचे प्रश्न चव्हाट्यावर आणण्याचे काम केले. मात्र जातिविशिष्ट चळवळीला ऊत येई तेव्हा त्या त्या वेळी त्याविरोधात लेखणी चालवायलाही पाळेकर पुढे असत. पाळेकरांची ही सम्यक भूमिका ब्राह्मणेतर चळवळीतल्या जहाल गटाला पसंत पडत नसे. त्यामुळे पुण्यात जेधे मॅन्शनवर १९१७ साली दोन वेळा 'जागृती' पत्राची होळी करण्यात आली. या आक्रमकतेचा प्रतिवाद करताना पाळेकरांनीही 'विजयी मराठा'च्या गैरव्यवहारांविषयी उघडपणे टीका केली होती. ब्राह्मणेतर संस्थानिकांवरही सत्यान्वेषी टीका करण्यात पाळेकर संकोच करीत नसत. त्यामुळे १९२२ साली शाहू महाराजांनी पाळेकरांना पत्र लिहून कळविले की, "लोकसंग्रह, केसरी आदिकरून पत्रे कधीही ब्राह्मण संस्थानिकांविरुद्ध लिहित नाहीत. मग जागृती, विजयी मराठादि

पत्रांनी गायकवाड वा इतर मराठा संस्थानिकांविरुद्ध का लिहावे?.. केव्हाही आपल्या पक्षाच्या मालकाविरुद्ध लिहिणे चांगले नाही. बडोद्याचे महाराज किंवा आपल्या पक्षाच्या मंडळींची काही चूक झाल्यास त्यांना पत्राद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून त्यांची कानउघाडणी करावी, पण वर्तमानपत्रातून आपल्या मालकाची वा पक्षाची वाईट बाजू मांडून ती वैऱ्याच्या हाती देणे अतिशय निंद्य होईल असे मला वाटते." आश्रयदात्यांच्या अशाही काही अपेक्षा असतात, आणि सत्यान्वेषी पत्रकार त्याकडे दुर्लक्ष करून आपले व्रत कसे निभावतो हे पाळेकरांनी दाखवून दिले होते. बडोद्यासारख्या दूरस्थ ठिकाणी राहून महाराष्ट्रातल्या सत्यशोधक चळवळीला व ब्राह्मणेतर समाजाच्या लोकशिक्षणाला ह्या साप्ताहिकाने वाहून घेतले होते, ही त्यांची निष्ठा निश्चितच गौरवास्पद आहे.

### तरुण भारत (बेळगाव) (१९१९):

१९१९ साली बाबूराव ठाकूर यांनी 'तरुण भारत' मासिक सुरू केले. पुढे १९२८ साली ते साप्ताहिक स्वरूपात प्रकाशित होऊ लागले. बाबूराव ठाकूर हे काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते होते, त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस चळवळीचा अंगभूत भाग बनल्याप्रमाणे बेळगाव 'तरुण भारत'चे काम सुरू होते. कुठल्याही जुलुमाविरुद्ध आवाज उठवण्यात तरुण भारत अग्रेसर असे. १९४४ साली गडहिंग्लजला काशीबाई हणबर या महिलेवर पोलिसांनी केलेल्या अमानुष अत्याचाराचे प्रकरण तरुण भारतने लावून धरले. म. गांधींनी या प्रकरणावर खेद व्यक्त केला. काशीबाई हणभर साहाय्य निधी समिती स्थापन झाली. यामुळे तरुणभारत पत्र जनतेचे पत्र असल्याची लोकभावना दृढ झाली.

### तरुण मराठा (१९२०-१९२२)

ब्राह्मणेतर चळवळीचे नेते दिनकरराव जवळकर यांना कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी सखाराम पांडुरंग सावंत यांनी सुरू केलेल्या 'तरुण मराठा' पत्राच्या संपादनाची जबाबदारी सोपविली. लो. टिळक व नारायणराव गुंजाळ यासारख्या त्यांच्या अनुयायांवर टीका करण्यावर या पत्राचा भर होता. ही टीका अतिशय आक्रमक व प्रसंगी मर्यादा सोडून केली जात असे. नारायणराव गुंजाळ यांचा उल्लेख अक्करमाशे, लेकावळे अशा विशेषणांनी केला जात असे. औंधच्या पंतप्रतिनिधींवरही 'औंधकरांची पुंडाई' नामक लेखातून असेच प्रक्षोभक भाषेत टीका करणारे लेखन प्रसिद्ध झाल्यामुळे 'तरुण मराठा'विरुद्ध त्यांनी इंग्रज सरकारच्या रेसिडेंटकडे तक्रार केली, परिणामत: शाहू महाराजांनी जवळकरांना कोल्हापूर सोडून जाण्याचे फर्मावले. ४ जानेवारी १९२२ रोजी कोल्हापूरच्या 'तरुण मराठा' पत्राचे प्रकाशन थांबविण्यात आले. पुढे शाहू महाराजांच्या निधनानंतर १९२२ साली नोव्हेंबरात पुण्याहून पुन्हा एकदा 'तरुण मराठा' प्रसिद्ध होऊ लागले, मात्र थोड्याच दिवसात ते बंद पडले.

### राष्ट्रवीर (१९२१-१९६०):

ब्राह्मणेतर पक्षाचे मुखपत्र म्हणून श्यामराव भोसले व कृष्णाजी घाटगे यांनी बेळगावहून ९ मे १९२१ पासून 'राष्ट्रवीर' साप्ताहिक सुरू केले होते. १९२८ नंतर श्यामराव देसाई यांनी या

साप्ताहिकाचे संपादन केले. ब्राह्मणवर्गाला 'देशबंधू' असे संबोधून जातिभेद मोडण्यासाठी ब्राह्मणांनो पुढे या, असे आवाहन त्यांनी पहिल्याच अंकातून केले होते. 'ब्राह्मणविध्वंसन म्हणजे सत्तासंस्थापन' अशी या पत्रकर्त्यांची भूमिका होती. त्यामुळे लोकल बोर्डापासून कायदेमंडळाच्या निवडणुकांपर्यंत निवडणुकांच्या काळात राजकीय जनजागरण करण्याचे कार्य या साप्ताहिकाने केले. बहुजनसमाजाने नुसता नांगर हातात धरून चालणार नाही, तर तलवार, तराजू आणि लेखणी चालविण्याचेही कौशल्य आत्मसात करायला हवे हा विचार बिंबविण्याचे काम या पत्राने केले. 'मराठा-मराठेतर वाद' निर्माण करणाऱ्यांवरही या पत्रातून टीका करण्यात आली. हिंदुमहासभेच्या नावाखाली ब्राह्मणांनी आपल्या जातीचे वर्गवर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न चालविला आहे, अशी समकालीन राजकारणाची समीक्षाही या अंकातून प्रसिद्ध होत होती. देवदासीसारख्या समाजविघातक प्रथा कायद्याने बंद कराव्यात यासाठी लोकमत संस्कारित करण्याचे काम या पत्राने केले. या पत्रातून ब्राह्मणेतर पक्षाच्या परिषदा, मराठा शिक्षण परिषदांचे वृत्तांत छापण्यात येत. कायदेमंडळाच्या कामकाजाचे अंदाजपत्रकातील तरतूदींसह सविस्तर वृत्तांत छापण्यात येत. स्थानिक पातळीपासून जागतिक पातळीवरील महत्त्वाच्या घडामोडींचे वृत्तांत संकलित करणारी 'भारतवृत्त' आणि 'विदेशवार्ता' ही सदरे या पत्रातून प्रकाशित होत असत. भास्करराव जाधव, माधवराव बागल इत्यादी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे लेख या साप्ताहिकातून प्रसिद्ध होत असत. श्यामराव देसाई यांची 'करबंदी आधी की खंडबंदी' ह्या नावाची एक लेखमालाही या साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली होती. अंकाला शाहू महाराजांचे पाठबळ होते.

## कर्मयोगी (१९२४-१९३२):

१९२० साली सोलापूरला लोकमान्य टिळक यांच्या उपस्थितीत व न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक परिषद झाली; या परिषदेच्या निमित्ताने तयार झालेल्या राजकीय वातावरणातून सोलापूरात 'राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ' स्थापन झाले. या मंडळाने १६ नोव्हेंबर १९२४ पासून 'कर्मयोगी' हे आपले स्वत:चे वर्तमानपत्र सुरू केले. पत्राचे पहिले संपादक म्हणून प्र. बा. बर्वे वकील यांनी काम पाहिले. मात्र 'कर्मयोगी'चे संपादन करण्यासाठी रामचंद्र शंकर राजवाडे यांना पुण्यात 'केसरी' कार्यालयात संपादकीय कामांची माहिती करून घेण्यासाठी पाठविण्यात आले व पुढे त्यांच्याकडे ह्या पत्राचे संपदकत्व सोपविण्यात आले. सोलापूरच्या राजकीय चळवळीचे केंद्र म्हणून या पत्राने आपली कामगिरी निभावली. १९२५ साली सोलापूरातल्या जातीय दंगलीचे वार्तांकन, लोकलबोर्ड व नगरपालिकेशी संबंधित स्थानिक प्रश्न, १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत गांधीजींना अटक झाल्यावर सोलापूरात उमटलेले पडसाद, सोलापूरच्या जनतेने शिंदीची झाडे तोडून केलेल्या सत्याग्रहात पोलिस गोळीबारात शहीद झालेला शंकर शिवदरेचा प्रसंग व त्यातून उसळलेली दंगल इत्यादी घटनांचे प्रत्यक्षदर्शी वार्तांकन व निरपराधांचा बळी घेणाऱ्या सरकारविरुद्ध मतप्रदर्शन करणारे लेखन यामुळे 'कर्मयोगी' पत्र सोलापूरकरांचे प्रातिनिधिक पत्र बनले. 'कर्मवीर'ने पोलिसी अत्याचारांचे सविस्तर वृत्त प्रसिद्ध केल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांनी सोलापूरात मार्शल लॉ पुकारला, राजवाडे यांना अटक केली व त्यांना ७ वर्षांची सक्तमजुरी व १० हजार रुपयांचा दंडही

ठोठावला. राजवाड्यांच्या तुरुंगवासाच्या काळात काही काळ डॉ. जगदेवराव देशमुख यांनी हे पत्र पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. पण १९३१ साली सरकारने या पत्राकडे सहा हजारांचा जामीन मागून अडचण उभी केली. १९३२ साली वटहुकूमान्वये हे पत्र व 'कर्मयोगी'चा छापखाना जप्त करण्यात आला. अशा परिस्थितीत 'कर्मयोगी' पत्र बंद करावे लागले.

## वैनतेय (१९२४) :

पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून शिक्षण घेतलेले व 'केसरी' पत्रात वृत्तपत्रविद्येचा कार्यानुभव संपादित केलेले मेघश्याम दत्तात्रेय शिरोडकर यांनी सावंतवाडीहून १९२४ साली 'वैनतेय' साप्ताहिक सुरू केले. शिरोडकर स्वत: म. गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित झालेले होते; त्यात त्यांना शिरोड्याच्या शाळेत शिक्षक असलेले वि. स. खांडेकर यांची थेट साथ मिळाल्याने 'वैनतेय' साप्ताहिकाने सावंतवाडी संस्थानात अल्पावधित लोकप्रियता संपादित केली. भाऊसाहेब खांडेकर 'वैनतेय'साठी अग्रलेख, स्फुटे, पुस्तक परीक्षणे लिहीत. म. गांधींच्या खादी-ग्रामोद्योगाचा, अस्पृश्यतानिवारणाच्च्या व दारुबंदीच्या कार्यक्रमांचा 'वैनतेय'ने पुरस्कार केला. मेघश्याम शिरोडकरांनंतर 'वैनतेय'च्या संपादकपदाची धुरा जयानंद मठकर यांनी सांभाळली. सावंतवाडीहून बाप्पा धारणकर यांनी १९३९ साली 'सत्यप्रकाश' साप्ताहिक सुरू केले होते, तेही शिरोडकरांच्या 'वैनतेय'चाच आदर्श प्रमाण मानणारे होते.

## हंटर (१९२५-१९३०) :

कोल्हापूरातील हरिभाऊ चव्हाण व रामभाऊ जाधव यांनी १९ जून १९२५ रोजी माणुसकीच्या हक्कांसाठी, अज्ञजनांच्या सेवेसाठी ब्राह्मणेतर पक्षाचा पुरस्कार करणारे 'हंटर' पत्र सुरू केले. पहिल्याच अंकात हरिभाऊ जाधव यांनी साप्ताहिकाने धोरण जाहीर केले. ब्राह्मणेतर वर्गाचे सामाजिक, औद्योगिक व नैतिक हितसंरक्षण व हितसंवर्धन करणे, मागासलेल्या वर्गाच्या आड येणाऱ्यांचा निस्पृहपणे प्रतिकार करणे, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादामुळे समाजात निर्माण झालेला मत्सर व द्वेषभावनेचा नायनाट करण्यासाठी काम करणे अशा प्रकारची वचनबद्धता या अंकातून घोषित करण्यात आली. स्वत: हरिभाऊ जाधवांनी भगवान बुद्ध, संत तुकाराम, स्वामी विवेकानंद यांच्या सत्यशोधक विचारांचा परिचय करून देणारे लेख या अंकातून लिहिले. पुढे त्यांनी खंडेराव गोपाळराव बागल (१८७२-१९३१) यांच्याकडे संपादकाची कामगिरी सोपविली. खंडेराव बागल हे व्यवसायाने वकील व विचारांनी सत्यशोधक होते. त्यांनी 'हंटर' पत्राची भूमिका कथन करताना म्हटले होते की, "टिळक म्हणतात.. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविन आणि तसेच आम्ही म्हणतो 'समता आमचा जन्मसिद्ध हक्क आहे' आणि तो मिळेपर्यंत आम्ही उच्च म्हणणाऱ्या वर्गाला स्वस्थता मिळू देणार नाही." भिक्षुकशाही आणि नोकरशाही या दोघांवर परखड टीका करण्याची भूमिका 'हंटर' पत्राने स्वीकारली होती. जरी कोल्हापूरात छत्रपती शाहू महाराजांची राजवट होती, तरी कोल्हापूर दरबारच्या कारभारावरही टीका करणे त्यांनी सोडले नाही. म. गांधींच्या हिंदू-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, खादीचा प्रसार या कार्यक्रमांचा पुरस्कार करण्यावर 'हंटर'ने नेहमीच भर दिला. खंडेराव बागल यांनी या

पत्रातून पं. सातवळेकर, चित्रावशास्त्री, डॉ. केतकर या समकालीन विचारवंतांच्या धार्मिक मतांची समीक्षा करणारे लेख लिहिलेत. खंडेराव बागलांनतर 'हंटर'चे संपादकत्व त्यांचे चिरंजीव माधवराव बागल यांच्याकडे आले. माधवरावांनीही कोल्हापूर संस्थानातील सभाबंदीचा हुकूम बंद करावा, पार्कातील हरणांचा बंदोबस्त करावा, गिरणीचे तास कमी करावे, दारूचे उत्पन्न कमी करावे अशा लोकहिताच्या प्रश्नांवर 'हंटर'मधून वाचा फोडली. स्वाभाविकच राजदरबाराने सप्टेंबर १९३० मध्ये या पत्रावर अनुक्रमे पाच हजार व साडेचार हजारांचा जामीन भरण्याचे फर्मान काढले. माधवराव बागलांनी जामीन भरण्याऐवजी पत्र बंद करण्याचा निर्णय घेतला.

## सत्यवादी (१९२६-१९६०):

सातारा जिल्ह्यातील 'कुपवाड' गावातून बाळासाहेब पाटील यांनी २१ मे १९२६ रोजी 'सत्यवादी' पाक्षिक सुरू केले. पहिल्या अंकातून 'न हो पक्षपाती, बतावे सुमार्ग / डरे न किसीसे, कहे सत्यवाणी' अशा शब्दात सत्यवादीने आपले ब्रीद जाहीर केले . १९३० पासून 'सत्यवादी' कोल्हापूरातून साप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले व १ जून १९४७ पासून त्याचे दैनिकात रूपांतर झाले. 'सत्यवादी'ने सातत्याने महत्त्वाच्या व्यक्ती व सामाजिक विषयांवर विशेषांक काढण्याची परंपरा चालवली. 'सत्यवादी'ने काढलेल्या विशेषांकात आण्णासाहेब लठ्ठे (१९२६), राजर्षी शाहू, विनायकराव माईनकर (१९२८), महाराणी ताराबाई (१९३०), बुवाबाजी, सिनेमा (१९३४), दक्षिण संस्थाने (१९४०), स्त्रीशक्ती (१९४६), पं नेहरू (१९४९) ह्या विशेषांकांना वाचकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला होता. सिनेमापासून अनेकविध विषयांवर सदरे चालविण्यातही 'सत्यवादी' पत्राची खासियत होती. 'सत्यवादी'चे प्रारंभीचे धोरण ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार करण्याचे होते, पण या पक्षाच्या धोरणांमध्ये व कार्यकर्त्यांच्या कार्यपद्धतीत झालेल्या बदलांमुळे आपली मूळ भूमिका बदलून १९३५ पासून 'सत्यवादी'ने व्यापक राष्ट्रीय भूमिकेतून अंकाचे संपादन करण्याचे ठरविले. त्यामुळे या अंकाची विषयव्याप्तीही विस्तारत गेली. स्वतंत्र स्त्रीविभाग आणि त्यासाठी स्त्री-संपादकाची खास व्यवस्था हेही 'सत्यवादी' पत्राचे एक वेगळेपण होते.

## पुढारी (१९३७) :

कोल्हापूरातून प्रसिद्ध होणारे 'पुढारी' दैनिक प्रथम साप्ताहिक स्वरूपात १३ मे १९३७ रोजी प्रकाशित होऊ लागले व १ जानेवारी १९३९ पासून दैनिक स्वरूपात ते प्रसिद्ध होऊ लागले. २६ जानेवारी १९३९ पर्यंत व्ही. टी. पाटील ह्यांचे संपादक म्हणून नाव छापले जात होते व त्यानंतर गणपतराव गोविंद जाधव ह्यांचे नाव 'पुढारी'चे संपादक म्हणून छापले जाऊ लागले. ब्राह्मणेतर चळवळीशी बांधिलकी असलेले गणपतराव जाधव हे 'पुढारीच्या स्थापने पासूनच 'संपादनाचे काम पहात होते. तत्पूर्वी दिनकरराव जवळकर यांच्या 'कैवारी' व 'तेज' पत्राच्या लेखन-संपादनातही गणपतराव जाधवांचा सक्रिय सहभाग होता. जवळकरांच्या निधनानंतर कोल्हापूरच्या 'सत्यवादी' पत्रात त्यांनी काम केले; त्यानंतर १९३३ साली राजकवी भोसले यांच्या सहकार्याने 'सेवक' साप्ताहिक सुरू केले. 'सेवक' साप्ताहिकातून प्रबोधनकार

ठाकरे यांचे 'शनिवारचे फुटाणे' हे सदर, करवीर वृत्त, व इतर सदरांमुळे हे साप्ताहिकही वाचकप्रिय झाले होते. 'पुढारी' पत्रही गणपतराव जाधव यांनी अल्पावधीत लोकप्रिय केले.

वृत्तपत्रीय क्षेत्रात 'पुढारी' पत्राने गाजलेल्या चित्रकारांची चित्रे, प्रसंगानुरूप व्यंगचित्रे, साहित्य, सिनेमा इत्यादी क्षेत्राशी संबंधित सदरे, बालविभागाला खास जागा, अशा विविधतेतून आपली स्वत:ची एक प्रतिमा निर्माण केली. मामा वरेरकर, वि. स. खांडेकर अशा मान्यवर साहित्यिकांचे लेखन 'पुढारी'तून प्रसिद्ध होत असे. 'चव्हाट्यावरील चकाट्या' हे गणपतराव जाधवांचे सदरही वाचकप्रिय झाले होते. राजकीय-सामाजिक विषयांबाबतही 'पुढारी'ची भूमिका कायम सकारात्मक राहिली. 'दाद मागा, पण दादागिरीपासून सावध रहा' या अग्रलेखाच्या शीर्षकातूनच या पत्राचा दृष्टिकोण स्पष्ट होतो. (२६ नोव्हेंबर १९३८) जातीय व प्रांतिक द्वेषापासून दूर राहाणे 'पुढारी'कारांनी पसंत केले. मात्र लोककल्याणाच्या प्रश्नावर सतत जागरूक राहून पाठपुरावा करण्याचे काम या पत्राने केले. कुळकायद्यासारख्या संवेदनशील विषयावर मुंबई सरकारवर कडक टीका करण्यात या पत्राने हयगय केली नाही. (३ सप्टेंबर १९३८) प्रजापरिषदेचे नेते माधवराव बागल मराठ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या शाहू छत्रपतींच्या विरोधात बोलत ते 'पुढारी'ला मान्य नव्हते; त्यामुळे 'पुढारी' बागलांच्या भूमिकेचा प्रतिवाद करीत असे. बहुजन समाजाने काँग्रेसमध्ये सामील व्हावे यासाठीही त्यांनी आपल्या पत्राच्या माध्यमातून प्रयत्न केले. पण हे सारे करताना कुठेही संयम ढळू दिला नाही, हे 'पुढारी'चे वैशिष्ट्य होते.

परखड मतप्रतिपादन हा 'पुढारी'कारांच लौकिक होता. दारूबंदी हे गांधीजींचे अत्यंत प्रिय ध्येय होते आणि दारूच्या व्यसनाला आळा घालणे ही काँग्रेसच्या जाहीरनाम्यातली महत्त्वाची बाब होती. १९३८-३९ सालात मुंबई प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळाने दारूबंदीमुळे मिळणाऱ्या ३० लाखांच्या उत्पन्नावर पाणी सोडून अहमदाबाद शहर व कारवार जिल्ह्यात दारूबंदीचा प्रयोग करून पाहिला व आणखी १५० लाखांची खोट अंगावर घेऊन येणाऱ्या तीन वर्षांत दारूबंदीचा विस्तार करण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र हा महसूल कमी झाल्याने शिक्षणप्रसारासाठी होणाऱ्या खर्चात कपात करणे भाग पडते. यावर 'पुढारीकार' जाधवांनी आपल्या अग्रलेखात लिहिले होते की, "' शिक्षणप्रसार हा दारूबंदीपेक्षा अधिक महत्त्वाचा ठरत असून सरकारने काही काळ अबकारी उत्पन्न या कामी खर्च केले असते तर दारूबंदी न केल्याबद्दल सरकारला कोणीही दोष दिला नसता. तीन वर्षात संपूर्ण दारूबंदी करण्याचा सरकारने जो धडाडीचा निर्धार केला आहे त्याऐवजी ३ वर्षात निरक्षरता नष्ट करून नंतर दारूबंदीचा प्रश्न हाती घेतला असता तर ते अधिक इष्ट ठरले असते. पण .. दारूबंदी हे म. गांधींचे अत्यंत प्रिय असे ध्येय आहे आणि काँग्रेस मंत्रिमंडळाच्या यशस्वितेचे आजकाल ते एक गमक बनून राहिले आहे." (पुढारी, २४ फेब्रुवारी १९३९ /कुंभार, १९८९, पृ. २०)

चित्रपट माध्यमांतल्या सांस्कृतिक राजकारणाचीही पुढारीकारांनी वेळोवेळी दखल घेतली होती. कोल्हापूरच्या हंस पिक्चर्सने काढलेल्या अत्र्यांच्या 'ब्रँडीची बाटली' चित्रपटातील नायक बगाराम याच्या स्वप्नाच्या दृश्यांवर प्रा. श्री. मा. माटे इत्यादींनी हा भाग अश्लिल असल्याची हाकाटी पिटून सेन्सॉर बोर्डाला फिल्म कापून टाकण्याचा निर्णय घेण्यास भाग पाडले होते. यावर

सदाशिवपेठी संस्कृती रक्षकांचा भंडाफोड करण्याचे काम जाधवांनी केले होते. त्यांच्या मते खेड्यापाड्यात तमाशातील कृष्ण-गवळणींच्या रंगेल भागात रमणाऱ्या शेतकऱ्यांना या चित्रपटातील दृश्यांमळे कुठे पावित्र्यविडंबन झाल्याची भावना निर्माण होत नाही. त्यामुळे लोकांच्या निरागस करमणुकीवर उगाच बंधने घालू नयेत. (पुढारी,२३ जुलै १९३९ / कुंभार, १९८९, पृ. २३-२४) ग्रामीण आणि नागर संस्कृतीतून अभिरुचीच्या प्रश्नांची चिकित्सा जशी 'पुढारी'कारांनी केली, तशी ब्राह्मणी आणि ब्राह्मणेतर अस्मितेच्या धारणांतील भेदांवर बोट ठेवून चित्रपटकलेतले छुपे राजकीय डावपेच उघड करण्याचेही काम त्यांनी केले. पुण्याच्या सरस्वती सिनेटोनच्या 'भगवा झेंडा उर्फ संत रामदास' चित्रपटावर करवीर संस्थानने बंदी घातली, त्याचे समर्थन करणाऱ्या अग्रलेखात त्यांनी रामदासस्वामींना मारूनमुटकून राष्ट्रगुरू बनविण्याच्या अट्टाहासातून होणारा सत्यालाप बुद्धिपुरस्सर कसा केला जातो याची चर्चा केली होती. (पुढारी, २३ जुलै १९३९ आणि ३ ऑगस्ट १९३९ / कुंभार, १९८९, पृ. २३-२४)

वृत्तपत्रांमुळे समाजधारणा तयार व्हायला मदत होत असल्याने वृत्तपत्रस्वातंत्र्याचा निरंतर पुरस्कार केला पाहिजे असे गणपतराव जाधवांचे मत होते. सरकारने वृत्तपत्रांवर घातलेल्या निर्बंधांमुळे केवळ समाजाचेच नव्हे तर सरकारचेही नुकसान कसे होते ह्यासंबंधी एका अग्रलेखात त्यांनी लिहिले होते की, "सरकारने वृत्तपत्रांवर निर्बंध घालून ती बंद पडतील अशी परिस्थिती निर्माण करण्यापूर्वी लोकांत पसरणाऱ्या अफवांचा विचार केलेला दिसत नाही. वृत्तपत्र हेच विश्वसनीय बातम्या पुरविण्याचे साधन आहे. ते निरुपयोगी केल्यास लोकांत भरमसाट अफवा पसरतात व अज्ञानी लोकांना त्या पुष्कळदा खऱ्याही वाटतात. या अफवांवर लोकांनी विश्वास ठेवू नये असे सरकारला वाटत असेल तर वृत्तपत्रांना खऱ्या बातम्या छापण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे." (पुढारी,२३ ऑगस्ट १९४२ /कुंभार, कित्ता, पृ. ४०) भांडवलशाहीच्या आक्रमणामुळे स्वाभिमानी व स्वायत्त वृत्तपत्रांपुढे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा उहापोह २४ व २५ मार्च १९४५ च्या मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्ष ब्राबूराव गोखले यांनी केला होता. याविषयी 'पुढारी'ने २७ मार्च १९४५ च्या अग्रलेखात लिहिले होते की, "भांडवलशाहीचे पाश वृत्तपत्रांवर झपाट्याने पडत असून बिर्ला-वालचंद, हिराचंद-गोएंको प्रभृती भांडवलवाल्यांचे दास होण्याची पाळी नामवंत संपादकांवर आली आहे. वृत्तपत्रकारांनी या नवीन संकटाकडे वेळीच लक्ष न दिल्यास हिंदुस्थानात बाकीच्या स्वतंत्र वृत्तीच्या पत्राभोवतालचे पाश कडकडून आवळले जाण्यास मुळीच अवधी लागणार नाही." (कुंभार, कित्ता, पृ. ६४) वृत्तपत्रव्यवसायी हा नुसता लोकरंजन करणारा व सरकारचा खुशमस्कऱ्या असता कामा नये, असा गणपतराव जाधवांचा नवपत्रकारांना सल्ला असे. मात्र पत्रव्यवसायात एकांगी विचार करणारी, पक्षाभिनिवेशाने अंध बनलेली, खोडसाळ असत्य गोष्टींचा प्रसार करणारी, निंदायुक्त करमणुक करणारी, पैसेवाल्यांच्या पुढ्यातली मंडळी घुसल्याने वृत्तपत्रव्यवसायातली विश्वासार्हता धोक्यात आली आहे. धमकी देऊन किंवा तोंडसुख घेऊन पैसे उकळण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. जाहिरात दिली नाही तर खात्याचा अधिकारी किंवा थिएटर मालकाला कसे सतावले जाते याची उदाहरणे दिसू लागली होती. १९५० च्या दशकात मराठी पत्रसृष्टीत

शिरलेल्या या अपप्रवृत्तींविषयीची अपार खंत गणपतराव जाधव यांनी आपल्या अग्रलेखातून व्यक्त केली होती. (पुढारी, ७ ऑगस्ट १९४७) स्वातंत्र्योत्तर काळातही सरकारने प्रौढ शिक्षणाचा विस्तार करून जागरूक मतदार तयार होईल असे लोकशिक्षण करण्यास अग्रक्रम द्यावा, पिकसंवर्धनासाठी नवोपक्रम सुरू करावेत इत्यादी विधायक सूचना करण्याचे व्रत चालूच ठेवले होते.

## हैद्राबाद संस्थानातील वृत्तपत्रे :

### निजाम विजय (१९२०-)

हैद्राबाद संस्थानात मराठी वृत्तपत्र चालविण्यासाठी राजकीय पार्श्वभूमी अतिशय नकारात्मक असताना व हातात पुरेसे भांडवल नसताना लक्ष्मणराव फाटक यांनी आपल्या छोट्या हॅण्डसेटवर संपादकाची जबाबदारी दिगंबरराव बिंदू यांच्यावर सोपवून १२ डिसेंबर १९२० रोजी हैद्राबादहून 'निजाम विजय' नावाचे साप्ताहिक सुरू केले. पहिल्या अंकाच्या अग्रलेखातून साप्ताहिक काढण्यामागचे प्रयोजन विशद करताना राज्यकर्त्यांचा थेट रोष ओढून घेण्याचे टाळून काहीसे कौशल्याने व नम्रपणाने लिहिले होते की, " आमच्या प्रजाहितदक्ष अधिपतींनी कौन्सिलची स्थापना केल्यापासून आणि कायदे कौन्सिलला लोकनियुक्त स्वरूप देण्याचे ठरविल्यापासून तर एका नवीन मन्वंतराला सुरुवात झाली आहे.. अशा रीतीने राजपक्षाची लोकहितदक्षता स्पष्ट दिसत असूनही , लोकांनी मात्र त्याविषयी बेफिकिरीत आणि दुर्लक्षतेत असावे ही लाजिरवाणी गोष्ट आहे .. म्हणून जनतेची दुर्लक्षता नाहीशी व्हावी आणि सरकारबरोबरच एवढ्या महत्त्वपूर्ण संस्थानाच्या सुधारणेची धुरा त्यांनी आपल्या मानेवर घ्यावी, हा आमचा उद्देश आहे. सरकारने प्रजेच्या औद्योगिक आणि शैक्षणिक उन्नतीकरिता अविश्रांत श्रम चालविले आहेत. त्यांची माहिती आणि चर्चा जनतेपुढे मांडून त्यांना आपल्या हक्कांची आणि कर्तव्याची जाणीव द्यावी, हा आमचा हेतू आहे." (लेले,१९८४, पृ. ८२७) हिंदु-मुसलमानातला तिढा हा हैद्राबादच्या लोकजीवनातला आणि राजकारणातला मध्यवर्ती प्रश्न होता. याबाबतीत 'निजाम विजय'ने आपले मतप्रदर्शन करताना म्हटले होते की, "ऐक्य-ऐक्य म्हणून ओरडत सुटल्याने हिंदु-मुसलमानांचे ऐक्य होत नसते. अन्यायाने हल्ला झाल्यास तो यशस्वीपणे परतून लावण्याइतके आपण समर्थ होणे, हाच तो मार्ग." (९ जानेवारी १९२३) १९२९ साली निजाम सरकारने सर्व प्रकारच्या सभा व तत्सम आविष्कारांवर बंदी घातल्याने सहा महिने हे पत्र बंद करण्यात आले होते.

### नागरिक (१९२९-१९३१)

देविदासराव महाजन यांनी १० एप्रिल १९२९ 'नागरिक' पत्र सुरू केले. या पत्राचे संपादकत्व काही काळानंतर दिगंबरराव बिंदू यांच्याकडे आले. हैद्राबाद संस्थानातील जातीय राजकारणाला हैद्राबादेत राहाणारे वरिष्ठ इंग्रज अधिकारीच जबाबदर असल्याचे विधान एका अग्रलेखात केल्यामुळे 'नागरिक' पत्राने सरकारी रोष ओढवून घेतला ८ ऑगस्ट १९३१ रोजी हे पत्र बंद पडले.

## मराठवाडा (१९३८) :

निजाम राजवटीत हैद्राबाद संस्थानातून वृत्तपत्र चालविणे अवघड असल्याने आनंद कृष्ण वाघमारे यांनी १० फेब्रुवारी १९३८ रोजी 'मराठवाडा' साप्ताहिक पुण्यातून छापून घेऊन निरनिराळ्या मार्गांनी हैद्राबाद संस्थानात पाठविण्यास सुरुवात केली. वृत्तपत्र चालविण्यासाठी स्वत:कडे आर्थिक पुंजी नसतानाही मित्रपरिवाराच्या आर्थिक पाठिंब्यावर वाघमारे यांनी हे धाडस केले. पहिल्याच अग्रलेखातून वाघमारे यांनी निजामी सत्तेविरुद्ध लोकलढा तीव्र करण्याचे आवाहन केले होते. हैद्राबाद संस्थानातल्या प्रजेला नागरी स्वातंत्र्य मिळावे, उर्दू भाषेची सक्ती न करता मातृभाषेतून शिक्षणास परवानगी द्यावी या मुद्द्यांवर या साप्ताहिकातून भर दिला जात असे. 'मोराची पिसे लावलेला डोंबकावळा', 'हैद्राबाद सरकार व मराठी', 'तरुण वर्ग काय करणार' इत्यादी अग्रलेखातून निजाम राजवटीत मराठी अस्मिता जागविण्याचे काम या पत्राने केले. निजाम सरकारच्या विनंतीवरून हिंदुस्थान सरकारने प्रिन्सेस प्रोटेक्शन ॲक्टखाली या साप्ताहिकावर बंदी घातली. आनंदराव वाघमारे या बंदीनंतर साप्ताहिकाचे 'नागरिक', 'संग्राम', 'रणदुंदुभी', 'समरभूमी', 'हैद्राबाद स्वराज्य', 'मोगलाई', 'कायदेभंग', 'सत्याग्रह', 'कथाकल्प', 'संजीवनी' असे वेळोवेळी नामांतर करून, तसेच संपादकाच्या नावातही बदल करून अंक प्रकाशित करण्याचे काम निरंतर सुरू ठेवले. काही वेळा संपादकीय अग्रलेख न लिहिता अंक छापले. अखेर १९३९ साली निजाम सरकारने आनंदराव वाघमारे यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरून दीड वर्षे सक्त मजुरीची शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात टाकले. या प्रकारामुळे वाघमारे यांना 'मराठवाडा' साप्ताहिकाचा हा बहुरूपी अवतार संपवावा लागला. अर्थात १९४८ साली पोलीस कारवाईनंतर हैद्राबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाल्यानंतर १९४९ पासून 'मराठवाडा' पाक्षिक स्वरूपात पुन्हा प्रकाशित होऊ लागला.

## अखंड भारत (१९४३-१९५०) :

कोल्हापूरातून २८ डिसेंबर १९४३ पासून माधवराव बागल यांनी 'अखंड भारत' हे काँग्रेसच्या विचारधारेकडे झुकणारे राष्ट्रवादी साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाच्या संपादनात त्यांनी आचार्य जावडेकर, वि. स. खांडेकर आणि इमामोद्दिन शेख यांचे सहकार्य घेतले. प्रभाकरपंत कोरेगावकर यांनी अर्थसाहाय्य केले. जावडेकर-खांडेकरांनी या साप्ताहिकातून लेख लिहिले. माधवराव बागलांनी 'खादी' चे महत्त्व व उपयुक्तता याविषयी लेखन केले.(१२ एप्रिल १९४५) कोल्हापूर प्रजापरिषदेनिमित्त ६ फेब्रुवारी १९४५ ला प्रजापरिषद विशेषांक काढला. या साप्ताहिकातून मार्च ते जून १९४५ या कालावधीत अर्न्स्ट टोलर यांची तुरुंगातील ६० पत्रांचे भाषांतरही प्रसिद्ध झाले होते.

## संस्थानी मुलुखातील इतर पत्रे :

संस्थानांतील प्रजेच्या समस्या सोडविण्यासाठी स्थापन झालेल्या प्रजा परिषदेच्या चळवळीसाठी वामनराव पटवर्धन यांनी *'संस्थानी स्वराज्य'* (१९२१) हे साप्ताहिक चालविले होते. या साप्ताहिकाचा इंग्रजी विभाग गणेश रघुनाथ अभ्यंकर (१८७३-१९३६) संपादित करीत

असत. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, मिरज, जमखंडी, औंध, भोर इत्यादी संस्थानांच्या कार्यक्षेत्रातील प्रजेच्या मागण्यांचा पाठपुरावा करणे, प्रजापरिषदेच्या कार्यवृत्तांतांना प्रसिद्धी देणे हे या साप्ताहिकाचे प्रमुख अंग होते. कोल्हापूर संस्थानातून माधवराव बागल यांचे अल्पकाळ चाललेले *'अखंड भारत'* (१९४३) हे एक नावाजलेले साप्ताहिक प्रजापरिषदेच्या चळवळीला पोषक म्हणून प्रसिद्ध होत होते. या अंकाला वि. स. खांडेकर, आचार्य जावडेकर, त्र्यं. सी. कारखानीस यांचे लेखनसहकार्य मिळत असे. कोल्हापूरातूनच प्रजा परिषदेच्या समर्थनार्थ गणपतराव पाध्ये यांनी सुरू केलेले *'गर्जना'* साप्ताहिक ७ मे १९४३ पासून सुरू झाले होते, ते बरीच वर्षे चालले. संस्थान सरकारचा रोष ओढवून घेतल्यामुळे त्यांना शिक्षकी पेशाची नोकरीही सोडावी लागली होती. १९४८ च्या जाळपोळीत गणपतराव पाध्ये यांना बराच त्रास सहन करावा लागला होता.

संस्थानांतर्गत व संस्थानी भागानजीकच्या प्रदेशांतून प्रसिद्ध होणाऱ्या आणखी काही पत्रांची नोंद अशी : सांगलीहून संस्थानातील प्रजेमध्ये लोकशाही राज्यप्रणालीतील हक्क –कर्तव्यांची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने सांगली वृत्तप्रसारक मंडळीच्या वतीने *'दक्षिण महाराष्ट्र'* (१९३०) हे पत्र चालविले जात होते. हरी गोविंद टिळक हे पत्राचे संपादक होते. सांगली संस्थानातून ना. ल. जोग यांनी संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्यलढ्याला पोषक ठरेल या उद्देशाने *'दक्खन समाचार'* (१९३९) हे साप्ताहिक चालविले होते. सर्जेराव पाटील यांनी *'समाज'* (१९३९) साप्ताहिक सुरू केले होते. कोल्हापूर संस्थानातून आर्य समाजाचे आय. टी. निंबाळकर यांनी संपादित केलेले *'आर्य'* (१९२६) साप्ताहिक; अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी चालविण्यात येणारे दादासाहेब मल्हारराव शिर्के यांचे 'गरुड' पत्र, याखेरीज महादेव विठ्ठल काळे यांचे *'आत्मोद्धार'* (१९३१) व इतर काही पत्रे प्रसिद्ध होत होती. पंढरपूरातून दत्तात्रय त्रिंबक आराध्ये यांनी राष्ट्रीय पक्षाच्या प्रचारासाठी *'समर्थ'* (१९२२) पत्र चालवले होते. विष्णू विठ्ठल लिमये यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रसारासाठी *'वारकरी'* '(१९२९) पत्र चालविले होते. श्रीबसवेश्वरांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी कल्याण शेट्टी यांनी *'सुदर्शन'* (१९३३) साप्ताहिक चालविले होते. कायदेकौन्सिलच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाई बेके यांनी सोलापूरातून *'धनुर्धारी'* (१९२८) व कॉंग्रेसच्या प्रसारासाठी अ. के. भोसले यांनी *'जनसत्ता'* (१९३६) , तुळशीदास जाधव यांनी *'लोकसेवा'* (१९३७) साप्ताहिक सुरू केले होते.कवी कुंजविहारी यांनी सोलापूरातूनच *'सारथी'* (१९२७) पत्र सुरू केल होते. याखेरीज १८८५ पासून सुरु असलेल्या *'सोलापूर समाचार'*चे विठ्ठलराव जक्कल यांनी १९३० साली दैनिकात रूपांतर केले; पुण्यामुंबईबाहेरचे पहिले जिल्हादैनिक म्हणून या पत्राचा निर्देश केला जातो. सोलापूरातून कामगार चळवळीला वाहिलेले कॉ. गो. द. साने यांचे 'एकजूट' (१९३५), मुस्लीम प्रश्नांची चर्चा करणारे अमरूद्दिन काझी यांचे *'अनसार,'* वीरशैवांच्या विचारांचा पुरस्कार करणारे बार्शीहून प्रसिद्ध होणारे *'वीरशैव गर्जना'* ही पत्रे प्रसिद्ध होत होती. मध्य भारतातील देवासच्या धाकट्या पातीतूनही १९२५ ते १९३९ या काळात मराठी व हिंदी असे द्वैभाषिक *'मार्तंड'* नावाचे साप्ताहिक निघत असे. देवास संस्थानाचे (मोठी पाती) पत्र म्हणून *'श्रीशिवाजी'* साप्ताहिक २२ ऑक्टोबर १९२७ ते ३१ ऑक्टोबर १९३१ या काळात सुरू होते. कृष्णाजी गंगाधर कचाळे हे

या पत्राचे संपादक होते व याही पत्रात मराठी व हिंदी असे दोन भाग असत. समाजकारण, राजकारण, ललित साहित्य असा विविधांगी मजकूर प्रसिद्ध होत असे.

## ३.६. करमणुकप्रधान साप्ताहिके :

विसाव्या शतकातल्या महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात राजकीय व सामाजिक जागृतीसाठी प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांइतकीच वैचारिक व ललित साहित्य प्रकाशनाला अग्रक्रम देऊन मराठी माणसाची अभिरुची-संपन्नता वाढविणाऱ्या नियतकालिकांची समृद्ध परंपरा निर्माण झाल्याचे दिसून येते. या वाङ्मयीन नियतकालिकांनी कथनपर गद्याबरोबरच ललित निबंध, नाटक-चित्रपटादि ललितकलांची रसग्रहणे, समकालीन राजकीय-सामाजिक घटनांवर विनोद-विडंबनात्मक भाष्य करणारे लेख, गांधी, मार्क्स, फॉईड यांच्या विचारांचा परिचय करून देणारे लेख, जागतिक पातळीवरील युद्धे, आर्थिक घडामोडी आणि विविध सामाजिक चळवळी याविषयींचे विविधांगी लेखन प्रकाशित केले. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनाला नवे वळण लावणारे व करणूक आणि बौद्धिक चर्चांची सांगड घालून नवे दृष्टिकोण रूजविण्याचे काम या नियतकालिकांनी केले. मराठी भाषेचे आणि शैलीचे अनेक प्रयोग करण्याची संधी या नितकालिकांमुळे सर्जनशील लेखकांना मिळाली. अशा काही निवडक नियतकालिकांचा थोडक्यात मागोवा येथे घ्यावयाचा आहे.

### मौज (१९२२-१९६०) :

अनंत हरी गद्रे यांनी २९ मार्च १९२२ रोजी मुंबईतून 'मौज' साप्ताहिक सुरू केले. लोकरंजन हे या पत्राचे मुख्य धोरण होते; त्यामुळे इतर राजकारण-समाजकारणाची चर्चा करणाऱ्या साप्ताहिकांपेक्षा 'मौज'चा आविष्कार खास वेगळा होता. व्यंगचित्रे, छायाचित्रे, याबरोबरच सजावटीला बरेच महत्त्व देण्यात आले होते. हळदणकर, दीनानाथ दलाल, बेंद्रे यांची चित्रे छापली जात. सुरुवातीच्या काळात सजावटीला अतिरेकी महत्त्व दिले जात असल्याची प्रतिक्रिया जाणकारांकडून उमटलेली दिसून येते. दुसऱ्याच वर्षी १९२३ साली 'मौज'चा रंगीबेरंगी वसंत अंक प्रसिद्ध झाला तेव्हा 'संदेश'कार अ. ब. कोल्हटकर यांनी व्यक्त केलेला अभिप्राय या अंकाचे त्यावेळचे बाह्यरंग व अंतरंग कसे होते, याचे चित्र उभे करतो : "एक लेख किंवा एक विवेचन, किंवा एक ओळ त्यात अशी सापडणार नाही की, जी वाचकांच्या प्रगल्भतेकरिता लिहिलेली आहे.. इथे पहावे तो 'सुट्टी', तिथे पहावे तो 'मदनबुट्टी', इथे पहावे तो 'जर्दा', तिथे पहावे तो नटांचा खुर्दा; इथे पहावे तो वज्रांग-बिंदू, तिथे पाहावे तो एक हिजडा लड्डू; इथे पाहावे तो जांभळी शाई, तिथे पाहावे तो शांताबाई! पण दुर्दैवी मनुष्या, तू ह्यात कोठे आहेस?.. वाचकांची सेवा करायची म्हणजे प्रथम सुबक, सुबोध, सुविचारपूर्ण, सुमार्गदर्शक आणि सुरस असे लेख दिले पाहिजेत, आणि त्यांची ज्ञानक्षुधा प्रथम भरपूर शांत केली पाहिजे. इतर गोष्टी म्हणजे शाया, फोटो, चित्रे, अभिप्राय ही ज्ञानभोजनाची रुची वाढविणारी गौण साहित्ये आहेत, ती मुख्य भोजन नव्हेत." (लेले, १९८४, पृ. ९०६) मात्र हळूहळू 'मौज'चे स्वरूप बदलू लागले. देशी व परदेशी राजकारण, सामाजिक प्रश्नांची चर्चा, वाङ्मयीन घडामोडींचा परामर्श, नाटक, सिनेमा, खेळ आणि ललित कला अशा सर्वच विषयांना न्याय मिळेल या दृष्टीने

मजकूराची व्याप्ती विस्तारली. कामगारांच्या प्रश्नांवर अंकातून चर्चा होऊ लागली. 'धावते जग' नावाच्या सदरातून बातम्यांचा आढावा घेतला जायचा. 'रंगभूमीचा रागरंग' या सदरातून नाटक आणि रंगभूमीला यथोचित स्थान मिळाले. 'नाटककंपन्यांचे गॅझेट' म्हणून 'मौज' साप्ताहिकाचा उल्लेख होऊ लागला. नाटकाइतकीच तमाशाचीही दखल मौज घेत असे. सिनेमा-नट्यांची छायाचित्रे छापली जात. व्यंकटेश माडगूळकर यांचे 'माणदेशी माणसे', 'माणूस' या टोपणनावाने लिहिणाऱ्या अंबादास अग्निहोत्री यांची दर आठवड्याची नवी गोष्ट, गोपाळकृष्ण भोबे यांची तरुण गायकांवरची लेखमाला यामुळे अंक वाचनीय होत असे. 'मौज'मधून पु. ल. देशपांडे, वि. द. घाटे, काका कालेलकर, श्री. श. नवरे, न. र. फाटक, ज्ञानेश्वर नाडकर्णी, मामा वरेरकर, चिं. वि. जोशी, र. गो. सरदेसाई अशी नामवंत मंडळी लेखन करीत असल्याने वाङ्मयविश्वात 'मौज'ने आपला लौकिक निर्माण केला होता. अनंत हरी गद्रे यांच्यानंतर १९३४ पर्यंत द. ग. सारोळकर यांनी संपादन केले. सारोळकरांच्या निधनानंतर पांडुरंग महादेव भागवत संपादक झाले. १९३८ साली पांडुरंग भागवत यांचे निधन झाले. त्यानंतर १९४३ पर्यंत दत्तात्रय पुरुषोत्तम भागवत संपादक झाले; त्यांच्या निधनानंतर १९६० पर्यंत वि. पु. भागवतांकडे मौजेचे संपादकत्व होते. भागवतबंधूंनी संपादनात श्री. पु. भागवत, ग. रा. कामत इत्यादींच्या सक्रिय सहभागातून 'मौज'चा निर्मितिप्रपंच चालवला व आपले स्वतःचे साप्ताहिक विश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले. ३१ जुलै १९६० रोजी हे सप्ताहिक बंद झाले.

### विविधवृत्त (१९२५-१९६०):

जानेवारी १९२५ पासून रामचंद्र काशिनाथ तटणीस यांनी सुरू झालेल्या 'विविधवृत्त' या साप्ताहिकाचा भर प्रामुख्याने राजकीय विषयांवर होता. आपल्या अंकाची भूमिका विशद करताना पहिल्याच अंकात तटणीसांनी राजकीय विषयांची व्याप्ती पूर्वीपेक्षा आता कशी विस्तारली आहे, याविषयी लिहिले होते की, "सांप्रत वृत्तपत्रांतून राजकारणाचा खल केला जात असतो. चाळीस वर्षांमागे ज्या गोष्टी सामाजिक व औद्योगिक स्वरूपाच्या मानल्या जात होत्या, त्यांचाही राजकारणात अलीकडे समावेश होऊ लागल्याने या विषयाला नवे नवे फाटे फुटले असून तो जसा विस्तीर्ण तसा गुंतागुंतीचा झाला आहे. उदाहरणार्थ, हिंदुहिंदुतले जातिभेदाचे अथवा हिंदुमुसलमानांतले वैमनस्य घ्या. .. पूर्वी या प्रश्नाचे शुद्ध सामाजिक स्वरूप होते. आता जातवार प्रतिनिधी, जातवार नोकऱ्या वगैरे नवे प्रश्न उपस्थित झाल्यामुळे त्याला सामाजिक व राजकीय असे संकीर्ण स्वरूप आले आहे. स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देण्याचे कार्य व्यापारी अगर औद्योगिक परिषदांतून करण्याचा संप्रदाय होता. सध्या या कार्यानेही कॉंग्रेसच्या कार्यक्रमात जागा पटकावली आहे." (विविधवृत्त १४ डिसेंबर १९२४) या पार्श्वभूमीवर कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेता सम्यकपणे राजकीय प्रश्नांची चर्चा करण्याचे ब्रीद असल्याचे संपादकीयात स्पष्ट करण्यात आले होते. 'विविधवृत्त'ने प्रागतिक राजकारणाचा पुरस्कार केला; मात्र प्रागतिक पक्षातल्या दोषांवर निर्भीड टीकाही केली. कॉंग्रेस पक्षाच्या महात्मा गांधींपासून शंकरराव देवांपर्यंत सर्वांवर विधायक टीका करण्यास व प्रसंगी राजकारण-समाजकारणातल्या अनेक भानगडींना सप्रमाण पुढे आणून सार्वजनिक चर्चेचा विषय बनविण्यात 'विविधवृता'ने पुढाकार

घेतला. मुस्लीम लीगचे भडकावू राजकारण जेव्हा हिंदुद्वेषाने पछाडले होते तेव्हा कडव्या हिंदुत्वावाद्यांइतक्या त्वेषपूर्ण भाषेत 'विविधवृत्त'ने लेखन केले. सामाजिक दंभ, खोटारडेपणा यावर तुटून पडण्यात हे पत्र नेहमीच अग्रेसर राहिले. उपासनीबाबा, दादा महाराज, गजाननस्वामी बोरकर यांच्या बुवाबाजीची भिंगे फोडली. गांधीजींच्या आश्रमातील नीरा प्रकरण, वीर नरीमन प्रकरण, डॉ. खरे प्रकरण, 'बावला खून खटला', इत्यादी प्रकरणांवर विविधवृत्तने प्रकाश टाकला. वाङ्मयीन क्षेत्रातले 'विभावरी वाङ्मय प्रकरणातून उदभवलेल्या आचार्य अत्रे यांचे 'मुंगीमुंगळा' प्रकरणही असेच गाजले होते.

तटणीसांनी निरनिराळ्या लेखकांना स्तंभलेखनास प्रवृत्त केले. संपादकीय कामातही अनेकांना सहभागी करून घेतले. 'सांघिक संपादना'चा प्रयोग म्हणून 'विविधवृत्त'च्या संपादनाचे एक वेगळेपण होते. संध्याकाळी तटणीसांच्या कचेरीत हा संपादकीय दरबार भरे व दैनंदिन घडामोडींच्या चर्चा होऊन लेखनाचे विषय, मांडणी वगैरे निश्चित होत असे. या संपादक दरबारात मो. ग. रांगणेकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखे नाटककार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे वंचितांचे पुढारी, ना. म. जोशींसारखे कामगारांचे पुढारी, भारताचार्य चिंतामणराव वैद्य, न. र. फाटक यांच्यासारखे इतिहास-विश्लेषक, वा. म. जोशींसारखे तत्त्वज्ञ, काका कालेलकरांसारखे गांधीवादी आणि हिंदुत्ववादी विचारधारेचे डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी, असे विविध राजकीय-सामाजिक घटकांतले बुद्धिवादी असत; त्यामुळे या पत्राची विविधता आणि विदग्धता आपोआप वृद्धिंगत होत गेली. १९२४ पासून 'विविधवृत्त'चे सहसंपादक असलेले चंद्रकांत विष्णू बावडेकर 'झरोका' या सदरातून नियमितपणे स्फुटे लिहीत; ही स्फुटे भेदक व विखारी लेखनासाठी प्रसिद्ध होती. आप्पा पेंडसे यांचे 'घ्या थोडा चुना लावा' हे सदर चुरचुरीत लेखनासाठी गाजले होते. न. र. फाटक 'अंतर्भेदी' सदर चालवीत. अशा सदरलेखनाचाही एक नमुनादर्श या पत्राने घालून दिला. १९५२ साली तटणीसांच्या निधनानंतर चं. वि. बावडेकर यांच्या संपादकत्वाखाली हे पत्र चालू राहिले. १९६० साली हे पत्र बंद पडले.

### मो. ग. रांगणेकर यांची साप्ताहिके :

मराठी नियतकालिकांमध्ये करमणुकप्रधान व अभिरुचिसंपन्न साप्ताहिकांची परंपरा निर्माण करण्यात मो. ग. रांगणेकर यांचा मोठा वाटा आहे. 'तुतारी' (१९२८), 'वसुंधरा' (१९३१) आणि 'चित्रा' (१९३५) ही तीन साप्ताहिके रांगणेकरांनी चालविली. विद्यार्थीदशेतच त्यांनी 'अरुण' हे मासिक दोन वर्षे चालवून आपल्या संपादकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती.

## तुतारी (१९२८-१९३१):

मो. ग. रांगणेकर यांनी ५ एप्रिल १९२८ पासून 'तुतारी' नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. विलायतेतील 'टिट्-बिट्स'प्रमाणे महाराष्ट्रीय वाचकांचे मनोरंजन करणारे साप्ताहिक अशी या पत्राची जाहिरात रांगणेकरांनी केली होती. (विविधवृत्त १ जानेवारी १९२८) दीर्घ लेखनापेक्षा आटोपशीर शब्दांत चुटकेवजा माहिती आणि वाचकांचे रंजन करील असे हलकेफुलके, चुरचुरीत, विनोदी लेखन प्रसिद्ध करणाऱ्या टिट्-बिट्स,पियर्सन सारख्या इंग्रजी साप्ताहिकांचे

वळण मराठीत सर्वप्रथम रुजविण्याची सुरुवात रांगणेकरांनी केली. मामा वरेरकरांची 'धावता धोटा' ही कादंबरी 'तुतारी'तूनच क्रमश: प्रकाशित झाली.

### वसुंधरा (१९३१):

'तुतारी'च्या संपादनात पत्राचे चालक रामभाऊ तटणीस यांच्याशी मतभेद झाल्यानंतर रांगणेकर त्यातून बाहेर पडले व ३१ जानेवारी १९३१ पासून त्यांनी 'वसुंधरा' नामक नवे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकात रांगणेकरांनी राजकारणाचे क्षेत्र बाजूला ठेवले. केवळ मध्यमवर्गीय वाचकांचे मनोरंजन होईल अशाच विषय 'वसुंधरे'तून लेखन प्रसिद्ध करण्याचे त्यांनी ठरविले होते. या पत्राने वाचकांच्या लक्ष्यगटानुसार मजकूर देण्याचे धोरण ठेवले होते. कॉलेजातल्या विद्यार्थीवर्गासाठी 'आमचे प्रिन्सिपॉल' अशी लेखमाला सुरु करण्यात आली होती. क्रिकेटशौकिनांसाठी इंग्लंडमधल्या सामन्यांवर एस. आर. गोडांबे यांची प्रत्यक्षदर्शी अनुभवकथनांवर आधारलेली लेखमाला दिली जाई. संगीतप्रेमींसाठी केशवराव भोळे यांची 'आजचे प्रसिद्ध गायक' ही लेखमाला प्रसिद्ध होई. एकलव्य या टोपणनावाने भोळे ह्या मालेसाठी लेखन करीत. गावोगावच्या वाचकांची सामिलकी वाढविण्यासाठी 'आमच्या गावी तुम्ही काय पहाल' नावाची लेखमाला सुरू करण्यात आली होती; या मालेत डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांनी पुण्यावर, ना. सी. फडके यांनी कोल्हापूरवर, चिं. वि. जोशी यांनी बडोद्यावर, मामा वरेरकरांनी मालवणवर आणि ग.त्र्यं. माडखोलकर यांनी नागपूरवर लेख लिहिले होते. स्वत: रांगणेकर 'खाजगी टपाल' नावाचे सदर लिहीत. या अंकातून काल्पनिक पत्रे आणि त्यांना खुसखुशीत उत्तरे असेही एक सदर चालविले जात असे. काही प्रश्न देऊन त्यावर मान्यवरांची मते मागवून लेखरूपाने प्रसिद्ध करण्याची अभिनव कल्पना या साप्ताहिकातून राबविली गेली. उदाहरणार्थ, 'माझ्या वडिलांबद्दल मला काय वाटते' या प्रश्नावर र. धों. कर्वे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बॅ . जयकर, रँग्लर परांजपे, वा. म. जोशी इत्यादींनी आपापल्या वडिलांविषयीची मनोगते कथन केली होती. 'पुढल्या जन्मी तुम्हाला काय व्हावेसे वाटते' अशा अफलातून विषयावर सुभाषचंद्र बोस, सरहद्द गांधी खान अब्दुल गफार खान, सरोजिनी नायडू, हिराबाई बडोदेकर, विजय मर्चंट, बाबूराव पेंढारकर इत्यादींची मते संकलित करून प्रसिद्ध करण्यात आली होती. याखेरीज पुस्तक परीक्षणे, नाट्यपरीक्षणे, चित्रपट रसग्रहण असा विविधांगी मजकूर या अंकातून दिला जात असल्याने ह्या अंकाची वाचकप्रियता वाढली व निरनिराळ्या अभिरुचिगटातला वाचक या सप्ताहिकाशी जोडला गेला. मात्र जाहिरातदारांकडून वेळेवर वसुली न होणे इत्यादी कारणांनी आर्थिक ओढाताण व्हायला लागल्यावर ह्या साप्ताहिकाची मालकी रांगणेकरांनी सोडली व मौज प्रिंटिंग ब्युरोचे पांडोबा भागवत यांच्याकडे या पत्राचे चालकत्व गेले व रांगणेकर पगारी संपादक म्हणून काम पाहू लागले. हे पगारी संपादकत्व फार काळ रांगणेकरांच्या प्रकृतीला मानवले नाही, त्यामुळे ते बाहेर पडले. रांगणेकरांनी संपादकत्व सोडल्यावर भागवतांनी सुंदरराव मानकर यांना संपादक नेमले, पण त्यांना ही जबाबदारी झेपली नाही, पर्यायाने साप्ताहिक बंद पडले.

## चित्रा (१९३५):

'वसुंधरा' साप्ताहिकातून बाहेर पडल्यावर अनंत काणेकर यांनी प्रेरित केल्याने काणेकरांना सोबत घेऊन मो. ग. रांगणेकर यांनी १५ सप्टेंबर १९३५ पासून 'चित्रा' नावाचे नवे साप्ताहिक सुरू केले. अनंत काणेकरांच्या इच्छेमुळे हे साप्ताहिक निखळ करमणुकप्रधान ठेवण्याऐवजी राजकीय विषयांना स्थान देणारे व विशेषत: समाजवादी विचारांना अग्रस्थान देणारे साप्ताहिक म्हणून पुढे आले. साप्ताहिकातील राजकीय भाग आणि अग्रलेखाचा मजकूर अनंत काणेकरांनी बघायचा व इतर करमणुकप्रधान भागाचे संपादन रांगणेकरांनी करायचे अशी स्थूलमानाने कार्यविभागणी झाली होती. अनंत काणेकरांचे 'बोलका ढलपा' हे सदर आणि लघुनिबंधही या अंकातून प्रसिद्ध होत असत. दर अंकात काणेकरांच्या राजकीय लेखासोबत दीनानाथ दलाल यांची राजकीय टीकाचित्रे अर्थात व्यंगचित्रे छापली जात. उदाहरणार्थ, गांधीजींच्या शेजारी ऐटीत गुडघे टेकून उभी असलेली त्यांची बकरी असे एक राजकीय टीकाचित्र गांधीजींच्या तथाकथित राजकारणाचा उपहास करणाऱ्या लेखासोबत छापण्यात आले होते. बाळासाहेब ठाकरे यांचीही काही व्यंगचित्रे 'चित्रा'तून छापली जात असत. या साप्ताहिकातून प्रभाकर पाध्ये यांचे म. गांधी, स्टॅलिन, चर्चिल यांच्याविषयीचे लेखन प्रसिद्ध होत असे. दत्तू बांदेकर यांचे स्फुट लेखनही या पत्रातून प्रसिद्ध झाले आहे. प्रभाकर पाध्ये व बांदेकर हे संपादनाच्या कार्यातही सहभाग देत असत. शहरी मध्यमवर्गीय वाचकांची वाचनाभिरुची घडविण्यात 'चित्रा'चे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. प्रभाकर पाध्ये यांनी 'चित्रा'च्या स्वरूपाविषयी लिहिताना म्हटले होते की, "(चित्रा) साप्ताहिक म्हणजे एक अफलातून पत्र! साऱ्यांच्या कुतूहलाचा आणि कौतुकाचा विषय झालेले. खमंग खुसखुशीत विनोद आणि गंभीर राजकीय भाष्य यांचा अपूप संगम साधीत असलेले. त्यातच सिनेमा, संगीत, साहित्य, क्रिकेट यांचाही तिखटगोड परामर्श घेणारे. एखाद्या वस्तीत चावट –चुरचुरीत, खट्याळ, मिस्किल, चिटुकली, प्रत्येकाची टोपी उडवणारी आणि ती उडवता उडवता प्रत्येकाच्या डोक्याला भुंगा लावणारी पण अंतर्यामी स्वच्छ असणारी एखादी मुलगी असावी तशी 'चित्रा' तेव्हा मराठी पत्रसृष्टीत होती." (हंस, ऑगस्ट १९७६, पृ. ९/ लेले, १९८४, पृ. ९४०)

'चित्रा' साप्ताहिकाला आर्थिक स्थैर्य असावे म्हणून 'चित्रा' संस्थेचे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्यात आल्यावर रांगणेकर-काणेकर या संपादकद्वयींना एक वेगळाच व्यावहारिक झटका बसला. कंपनीत रणझोडदास लोटलावाला यांचे निम्मे शेअर्स होते, त्यामुळे त्यांच्या वर्चस्वाखाली या साप्ताहिकाला काम करणे भाग पडू लागले. 'चित्रा' साप्ताहिकाची लोकप्रियता वाढत जाऊन खप १८ हजारांच्यावर गेल्यावर दोन आणे किमतीतून मिळणारा महसूल खर्चाच्या तुलनेत पुरेसा नव्हता. कागदाच्या किंमती वाढल्या होत्या; त्यामुळे लोटलावाला यांनी खप कमी करण्याचा आग्रह धरला. संपादकद्वयींना हे पटणारे नव्हते; अखेर संपादकांचे पगार निम्मे करण्याचा प्रस्ताव लोटलावाला यांनी ठेवला. ह्या आर्थिक तडजोडींना कंटाळून रांगणेकर-काणेकर यांनी संपादकपदाचे राजीनामे दिले. लोटलावालांना अर्थातच रांगणेकर-काणेकरांची पोकळी भरून काढणे शक्य झाले नाही व १९४८ सालात हे पत्र बंद पडले.

**प्रगती (१९२९-१९३२) :**

सुशिक्षित वाचकांची बौद्धिक भूक भागविण्यासाठी आणि विशेषत: मध्यमवर्गीय तरुणांची वैचारिक मशागत करण्याच्या हेतूने त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी १९२९ साली 'प्रगती' नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. देशविदेशांतील समकालीन घटना घडामोडींची छोटेखानी टिपणे, आर्थिक क्षेत्रांतील व्यापारउदिमाची वृत्ते, शेअरमार्केटातल्या उलाढाली, महिलांच्या प्रश्नांची चर्चा आणि शब्दचित्रे, विनोदी कथांची ललितरम्य जोड देणारे साहित्य असे या अंकाचे सर्वसाधारण स्वरूप असे. या साप्ताहिकाचे नामकरण 'क्रांती' असे न करता 'प्रगती' असे करण्यामागचा संपादकाचा हेतू स्पष्ट करताना शेजवलकरांनी लिहिले होते की, "एकंदर क्रांती घडवून आणल्याने वाईटाबरोबर चांगल्या, पुन्हा उत्पन्न न करता येण्याजोग्या गोष्टीही नष्ट होतात व आमची इच्छा हजारो वर्षांपासून चालत आलेल्या व अनुभवाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेल्या चांगल्या गोष्टी नष्ट व्हाव्या अशी नाही. तसेच जुने ते सोने म्हणून सर्वच जुने राखण्याचा आमचा अट्टाहास नाही. सृष्टीत स्थिर काहीच नाही व जुनेही कालांतराने बदलतच असते. पण काल लोटल्याने बदलले जाणे वेगळे व सदसद्विवेकबुद्धीचा उपयोग करून, बरे वाईट ठरवून चांगला मार्ग क्रमणे वेगळे. आम्ही असा चांगला मार्गही जलदीने आक्रमण करावा असे इच्छितो. म्हणूनच 'प्रगती' हे सार्थ नाव निवडले." (लेले, १९८४, पृ. ९४२) शेजवलकरांचा हा दृष्टिकोन परंपरा आणि आधुनिकता यांचा दुवा सांधणारा होता. वाचकवर्गाला अभिनिवेशी किंवा एकारलेल्या भडक विचारांपासून दूर राहून सम्यक विचारांची सवय लावण्याचा पत्रकारितेचा धर्म निभावणारी ही भूमिका होती; आणि म्हणून हे साप्ताहिक अन्य करमणूकप्रधान वा राजकीय प्रचाराच्या भूमिकेतून निघालेल्या इतर साप्ताहिकांपेक्षा वेगळ्या वाटेने चालणारे होते. नीरक्षीरविवेक दृष्टीतून आजुबाजूला घडणाऱ्या घटनांकडे पाहावे, जे दिसते त्यावरचे पटल दूर सारून गाभाभूत आशयातले सत्त्व वेचून आपल्या वैचारिक धारणा घडविणारी वाचनाभिरुची जोपासण्याची संपादकाची जबादारी सूचित करणारे निवेदन म्हणून शेजवलकरांच्या या संपादकीयाकडे पाहिले पाहिजे. शेजवलकरांनी इतिहासातील घटिते आणि इतिहासपुरुषांच्या कर्तृत्वाचे वाचन करण्याचे एक पद्धतिशास्त्रच आपल्या संपादकीयातून मांडले होते. 'प्रगती' या नामकरणामागील हेतू विशद करताना प्रमाणादाखल उदाहरणे देऊन त्यांनी म्हटले होते की, "जर फिरोजशहांचा ज्ञातिनिष्ठरहित राष्ट्राभिमान, गोखल्यांची दीर्घ व सूक्ष्म अभ्यासाशिवाय न बोलण्याची रीत, गोखल्यांचे शिष्य महात्माजी ह्यांचे दया, क्षमा, शांती ह्यांवर उभारलेले अहिंसाव्रत, वाच्छांचे आकडेशास्त्रप्रेम, रानड्यांची सर्वांगीण उन्नतीची आशाआकांक्षा, आगरकरांची अन्यायाबद्दलची चीड ह्यांसारख्या गोष्टींबद्दल अभिमान वाटणे व त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून चालणे ह्या गोष्टी प्रागतिकत्वाच्या द्योतक असतील तर आम्हीही प्रागतिक आहो. कोणाचे एकांतिक भक्त होण्यासारखी मात्र आमची मनोरचना नाही." (कित्ता, पृ. ९४२) सुलभ देशभक्तीचे धडे देणाऱ्या आणि अनुयायी व भक्तांची साखळी वाढविण्यासाठी वृत्तपत्रीय प्रपंच थाटणाऱ्या पत्रकारांपेक्षा शेजवलकरांच्या पत्रकारितेची वाट निराळी होती. मात्र हे साप्ताहिक इतर करमणुकप्रधान साप्ताहिकांसारखे लोकप्रिय होऊ शकले नाही. सरकारी रोषामुळे जामीन

भरण्याची वेळ आली तेव्हा १९३२ साली हे पत्र बंद करण्याचा निर्णय पत्राच्या चालकांना घ्यावा लागला.

## संजीवनी (१९३३):

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे चिरंजीव प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणारे पत्र अशी एक वेगळी ओळख निर्माण करणारे 'संजीवनी' हे साप्ताहिक ऑक्टोबर १९३३ पासून सुरू केले होते. 'निर्भीड'च्या दिवाळी अंकातील (ऑक्टोबर १९३३) एका निवेदनातून या साप्ताहिकाचे वेगळेपण सांगताना संपादकांनी लिहिले होते की, "स्त्रियांच्या प्रश्नांवर सडेतोड आणि सोपपत्तिक चर्चा करणारे, स्त्री समाजाची आजची बिकट परिस्थिती समाजापुढे निर्भीडपणे मांडणारे महाराष्ट्रातील पहिलेच स्त्रियांचे साप्ताहिक. मुलींच्या लग्नाच्या बाबतीत पालकांची अक्षम्य अशी बेफिकीर वृत्ती, मुलींची सर्व बाजूंनी कशी कुचंबणा करिते, या विषयावर निर्भीड चर्चा संजीवनीमध्ये सुरू होणार असून ही चर्चा उद्बोधक झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच संततिनियमनाच्या विषयाचाही सांगोपांग ऊहापोह करण्यात येईल. सर्व विषयांची मांडणी चटकदार करण्यात येत असल्यामुळे हे साप्ताहिक अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे." ह्या निवेदनावरून या अंकाच्या स्वरूपाची कल्पना येते. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रा'चे काही भाग याच साप्ताहिकातून प्रकाशित झाले होते. 'पिकली पाने' या नावाने अनंत काणेकर यांचे लघुनिबंधांचे सदरही या या साप्ताहिकातून चालविले जात होते. स्वत: श्रीपाद कोल्हटकर 'आकाशवाणी' या संपादकीय सदरातून विनोदी स्फुटे लिहीत असत. कुसुमाग्रजांच्या कविताही या साप्ताहिकातून प्रसिद्ध होत असत. यावरून स्त्री समस्यांना प्राधान्य देण्याचे धोरण असले तरी तोचतोचपणा टाळून हे पत्र अधिकाधिक वाचनीय व रंजक करण्याचा संपादकांचा दृष्टिकोन होता.

## प्रतिभा (१९३३-१९३७) :

१९३३ साली ग. दे. खानोलकर, के. नारायण काळे, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. ह. कुलकर्णी, खं. सा. दौंडकर यांनी प्रत्येकी सहा हजार रुपये भांडवल गुंतवून 'प्रतिभा' हे निखळ वाङ्मयीन स्वरूपाचे पाक्षिक सुरू केले होते. ग. दे. खानोलकर, के. नारायण काळे व वि. ह. कुलकर्णी यांचे संपादक मंडळ होते; मात्र संपादनाचा मुख्य भार ग. दे. खानोलकरांवर होता. वाङ्मयीन निष्ठेतून व सामिलकीच्या भावनेतून उभा राहिलेला सहकारी भागभांडवलाचा प्रकल्प म्हणूनही 'प्रतिभा' पाक्षिकाने एक वेगळा मानदंड निर्माण केला.मात्र आर्थिक बोजा अंगावर घेऊन पाक्षिक चालवणे सोपे नसल्याचा अनुभवही या साहित्यिकांना आला. दीड वर्षानंतर ह. वि. मोटे यांनी २५०० रुपये देऊन व कर्जाचा बोजा अंगावर घेऊन जानेवारी १९३४ पासून ह्या पाक्षिकाचे संपादकत्व व चालकत्व स्वत:कडे घेऊन पुढची वाटचाल केली. त्यामुळे 'प्रतिभा' पाक्षिकाचे श्रेय बरेचसे हरिभाऊ मोटे यांच्या नावावर नोंदवले जाते.

ब्रिटनमधल्या 'जॉन-ओ लंडन्स विकली' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या धर्तीवर हे पाक्षिक चालविण्यात यावे अशी मूळ कल्पना ग. दे. खानोलकरांनी मांडली होती. या इंग्रजी

नियतकालिकांत निरनिराळ्या वाङ्मय मंडळांची माहिती, नवी पुस्तके, नवलेखकांचे लेखनप्रकल्प, लेखकांच्या मुलाखती व वाङ्मयीन चर्चावृत्तांचे संकलन प्रसिद्ध होत असे. ह्याच पद्धतीने 'वाङ्मयाचे विहंगमावलोकन', 'पुस्तकांची ओळख', 'हास-परिहास-उपहास' बोलपटांवरील फटकळ टीकेसाठी प्रसिद्ध पावलेले 'छाया-नाद' अशी विविध सदरे सुरू करून 'प्रतिभा' पाक्षिकाने वाङ्मयीन अभिरुचिसंवर्धनाचा उपक्रम सुरू केला. 'शारदेचा विश्रब्ध विहार' या शीर्षकाखाली वैशिष्ट्यपूर्ण पत्रे छापली जात होती. रामशास्त्री या टोपणनावाने वा. ना. देशपांडे यांचे वाङ्मयीन टीकेचे सदर तसेच वाङ्मय व कला क्षेत्रातील नीती-अनीती, नवमतवाद, केंद्रवाद इत्यादींच्या चर्चा या अंकातून प्रसिद्ध झाल्या. पाश्चात्य देशांतील वाङ्मयीन घडामोडींचा वेध घेणारे प्रभाकर पाध्ये यांचे 'पश्चिमेकडचे वारे' हे या पाक्षिकातले एक वैशिष्ट्यपूर्ण सदर होते. साहित्यिकांची मनोगते या अंकातून प्रसिद्ध होऊ लागली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे आत्मचरित्र क्रमश: याच अंकातून प्रसिद्ध झाले. नवीन समकालीन लेखकांपैकी वा. म. जोशी यांची 'इंदू काळे व सरला भोळे' ही पत्ररूप कादंबरी याच पाक्षिकातून क्रमश: प्रसिद्ध झाली. सावरकर, केतकर यांच्यावर विशेषांकही काढण्यात आले. द . ग. गोडसे यांची व्यक्तिचित्रावली, माधव काटदरे यांची रेखाचित्रे अशा कलाकृतींनाही या अंकात स्थान मिळाले. विश्राम बेडेकर, वामन चोरघडे, अनंत काणेकर, पु. ल. देशपांडे इत्यादी लेखकांचे नव्या जाणिवांचे साहित्य या पाक्षिकातून प्रसिद्ध झाले. १९३७ साली जुलै महिन्यात ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्यावरील विशेषांक प्रसिद्ध झाल्यानंतर हे पाक्षिक यापुढे अधिक आर्थिक तोटा सोसणे शक्य नसल्याने बंद केले.

## निर्भीड (१९३३-१९३५):

अनंत हरी गद्रे यांनी सार्वजनिक आखाड्यात उतरलेल्या व्यक्तींवर निर्भीड टीका करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध होऊन २४ ऑक्टोबर १९३३ पासून 'निर्भीड' हे नवे साप्ताहिक सुरू केले होते. गुणांची स्तुती आणि दोषांवर टीका हे सूत्र ठेवण्याची नीती ठरविण्यात आली होती. या पत्रातून अस्पृश्योद्धार, जातिभेदनिर्मूलन, झुणकाभाकर सहभोजने अशा सामाजिक विषयांवर लेखन प्रसिद्ध होत असे. नाटक-सिनेमांची रसग्रहणे, नाटक कंपन्यांचे वृत्तांत यांना अग्रक्रमाने स्थान मिळत असे. व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीकाटिपण्णी करण्यात येत असे.

## धनुर्धारी (१९३७) :

मुंबईत कृष्णाजी नारायण सापळे यांच्या 'रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस' मधून बरीच वृत्तपत्रे, मासिके छापली जात असत; आपणही केवळ सामान्य वाचकांसाठी म्हणून एखादे साप्ताहिक चालवावे अशा प्रेरणेतून सापळे यांनी २९ मे १९३७ पासून 'धनुर्धारी' साप्ताहिक सुरू केले. पहिले संपादक म्हणून श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांना नेमण्यात आले. टिकेकरांना वृत्तपत्रसृष्टीतल्या कामाचा दीर्घ अनुभव होता. 'केसरी'चे प्रतिनिधी या नात्याने पेशावर, कराची, बगदाद, तेहरानची भ्रमंती, गांधीजींच्या दांडीयात्रेचे वृत्तसंकलन असा क्षेत्रीय अनुभव पाठिशी असल्याने 'धनुर्धारी'ला स्वत:चा वेगळा आकार देण्यात टिकेकरांच्या या व्यासंगाचा उपयोग

झाला. १९४० पर्यंत टिकेकरांनी 'धनुर्धारी'चे संपादकपद सांभाळले; त्यानंतरची पाच वर्षे प्रभाकर पाध्ये या साप्ताहिकाचे संपादक होते. त्यांच्या कारकिर्दीत 'धनुर्धारी'च्या संपादक मंडळात प्र. श्री. कोल्हटकर, वि. वा. शिरवाडकर, रॉय किणीकर, द्वा. भ. कर्णिक अशा नामवंतांचा सहभाग होता. कोल्हटकर 'मोड आणि खुर्दा' हे सदर लिहीत; वि. वा. शिरवाडकर 'अनामिकाची पत्रे' हे सदर सांभाळीत. अर्जुन सीताराम केळुस्कर सिनेमा नाटकाविषयी, डॉ. अ. ना. भालेराव क्रिकेटविषयी लिहीत. पाध्यांनी पु. ल. देशपांडे, मंगेश पाडगावकर, दि. बा. मोकाशी, सदानंद रेगे, कुसुमावती देशपांडे यांचे पहिलेवहिले लेखन 'धनुर्धारी'तून छापले. पाध्यांच्या कारकिर्दीत या साप्ताहिकाने उच्च वाङ्मयाभिरुचीचे साप्ताहिक असा लौकिक निर्माण केला होता.

प्रभाकर पाध्ये यांनी संपादकपद सोडल्यावर अर्जुन सीताराम केळुस्कर (१९१२-१९८०) यांच्याकडे संपादकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्या जोडीला द. म. सुतार हे सहसंपादक म्हणून काम बघू लागले. साप्ताहिकाचे चालक कृ. ना. सापळे यांनी केळुस्कर-सुतार यांना आपले साप्ताहिक हे सामान्य जनतेचे मुखपत्र म्हणवून चालविले जावे, याची आठवण करून दिली. या संपादकद्वयांनी त्यानुसार या अंकाच्या लेखनात व मांडणीत काही बदल केले. सामान्य माणसांची गाऱ्हाणी आस्थापूर्वक या साप्ताहिकातून मांडली जाऊ लागली. धान्याचा काळाबाजार, दारूभट्ट्या, किनारपट्टीवरील बेकायदा मालाची उलाढाल, रेल्वे स्टेशनजवळील फेरीवाले, पोलिसांची अरेरावी अशा अनेक विषयांना 'धनुर्धारी'त स्थान दिले जाऊ लागले. स्वत: केळुस्कर 'जिवाची मुंबई' हे सदर लिहू लागले. या सदरातील जिवा हा मुंबईतल्या सामान्य वाचकांचा प्रतिनिधी होता. नाटक, सिनेमा, खेळ असे सर्व विषय या सदरातून हाताळण्यात येत. राशिभविष्य हा सामान्य वाचकांच्या आवडीचा विषय 'धनुर्धारी'ने हेरला होता; हे सदर चालविणारे वसंत लांडोबा म्हापणकर हे वाङ्मयीन संदर्भांची पेरणी करीत राशिभविष्य सांगत असल्याने हे सदर अधिकच वाचनीय होत असे. जून १९६९ पर्यंत हे साप्ताहिक सुरू होते; पुढे ते मासिक स्वरूपात प्रकाशित होऊ लागले.

### नवयुग (१९४०-१९६३):

आचार्य प्र. के. अत्रे यांनी २१ जानेवारी १९४० पासून पुणे शहरातून 'नवयुग' साप्ताहिक सुरू केले. पां. वा. गाडगीळ यांना सहसंपादक आणि व्यवस्थापनासाठी रमाकांत यशवंत वेलदे यांना अत्र्यांनी सोबत घेतले. मुंबईबाहेर प्रसिद्ध होणारे साप्ताहिक म्हणून 'नवयुग'चे चांगले स्वागत झाले. (मात्र वर्षाखेरीस अत्रे मुंबईत स्थलांतरित झाल्यामुळे या साप्ताहिकाचे प्रकाशन मुंबईतून होऊ लागले.) साहित्य, विनोद, टीका याबरोबरच राजकारणालाही या साप्ताहिकात स्थान देण्यात आले होते. पहिल्या अंकातच त्याविषयीचे संपादकीय निवेदन करताना अत्र्यांनी लिहिले होते की, "राजकारण, समाजकारण, साहित्य आणि कला ह्या क्षेत्रांमध्ये विवेचक पुरोगामित्वाच्या कल्पनांचा निर्भीडपणे प्रसार करण्यासाठी आणि प्रतिगामी स्वरूपाचे सनातनी आचार-विचार झोडपून काढून समाजजीवनाच्या प्रवाहातील अडथळे दूर करण्यासाठी 'नवयुग'चा अवतार आहे." अत्रे स्वत: काँग्रेसमध्ये असल्याने काँग्रेसच्या राजकारणाचा पुरस्कार

करणारे लेखन या पत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. 'लोकशाही समाजवादाचा आवाज' अशी या पत्राची एक प्रतिमा जनमानसात रूजली. पां. वा. गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, र. गो. सरदेसाई यांचे राजकीय लेखन 'नवयुग'मधून प्रसिद्ध होऊ लागले. आझाद हिंद फौजेचा इतिहास, १९४२ च्या आंदोलनातील भूमिगतांच्या चळवळीचे वृत्तांत 'नवयुग'मधून प्रसिद्ध होऊ लागले. कळीच्या प्रश्नावर आणि राजकीय-सामाजिक चिंतनाच्या विषयांवर विशेषांक प्रसिद्ध करण्याची परंपरा 'नवयुग'ने सुरू केली. नाना पाटील यांच्या पत्रीसरकार चळवळीवर १२ मे १९४६ रोजी 'सातारा प्रतिसरकार विशेषांक', मुस्लीम लीगच्या पाकिस्तानधार्जिण्या भूमिकेवर आघात करणारा 'पाकिस्तान विशेषांक', साने गुरुजींच्या पंढरपूर मंदिर प्रवेश सत्याग्रहावर 'मंदिर प्रवेश विशेषांक', द्विभाषिक मुंबई राज्याचा कायदा परित झाल्यावर 'मराठी-गुजराती भाई-भाई' विशेषांक प्रसिद्ध करण्यात आले. नाटककार माधवराव जोशी, समाजसुधारक महर्षी कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजींच्या निधनानंतर 'साने गुरुजी विशेषांक', 'ज्ञानप्रकाश'कार काकासाहेब लिमये विशेषांक, वारली आदिवासींच्या जीवनावर विशेषांक, असे अनेक विशेषांक या साप्ताहिकाने काढले. या अंकातून प्रसिद्ध झालेल्या काही लेखमालाही तेवढ्याच गाजल्या. त्यात माधवराव बागल यांचे 'बंधनात' हे आत्मकथन, 'डॉ. ग. य. चिटणीस यांच्या 'आठवणी', बेळगावकर केशवराव गोखले यांची 'जग कुणीकडे चालले आहे?' ही लेखमाला, केसरी' पत्रावर टीका करणारी श्रीमत् शंकराचार्य कुर्तकोटी यांची लेखमाला लक्षणीय ठरल्या.

'नवयुग' मधली सदरेही वाचकप्रिय बनली होती. त्यात स्वत: अत्रे 'अत्रे उवाच' ह्या सदरातून वाङ्मयीन, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर भाष्य करीत; दत्तू बांदेकर 'सख्या हरी' या सदरातून शृंगार आणि विनोदाची जोड देऊन वेश्या, गुंड अशा आधोलोकीच्या वंचित समाजगटातील जीवनाचे चित्रण करीत; रमाकांत वेलदे 'कु. शैलजा' या टोपणनावाने लैंगिक प्रश्नांवर लेखन करीत; श्री. के. क्षीरसागर 'द्रोणाचार्यांचे शरसंधान' हे टीकालेखांचे सदर चालवीत. स्वत: अत्रे निरनिराळ्या विषयांवर 'नवयुग'मधून लिहीत असत. 'दे दान सुटे गिऱ्हाण', 'ये स्वातंत्र्या ये', 'महात्मा गांधी अमर हो गये' असे अत्र्यांचे कितीतरी महत्त्वाचे लेख 'नवयुग'मधून प्रकाशित झाले. अत्र्यांच्या लेखनात स्तुती आणि निंदा ही दोन्ही टोके असत, त्यामुळे अनेकदा 'नवयुग'मधले लेखन वादग्रस्त ठरले. मध्यप्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. ना. भा. खरे यांच्याविषयी लिहिताना त्यांनी "दुसऱ्यांना जमालगोटा देण्यापलीकडे डॉ. खरे यांना वैद्यकीय व्यवसायाचे फारसे ज्ञान नसावे" अशी मल्लीनाथी केली होती, त्यावर डॉ. खरे यांनी अत्र्यांवर दावा दाखल केला. सावरकरांवरील टीकेमुळे पु. भा. भावे यांनीही अत्र्यांवर खटला दाखल केला होता. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनात गाजलेले 'अत्रे-माटे', 'अत्रे-फडके' हे वाद 'नवयुग'मधल्या लेखनांतूनच उद्भवले होते. ना. सी. फडके रत्नागिरीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी 'नवयुग'चा ५ मे १९४० चा अंक फडके विशेषांक म्हणून काढला होता आणि रत्नागिरीच्या भाषणानंतर फडक्यांवर टीकास्त्र सोडणारा लेखही 'नवयुग'मधून तत्काळ छापला होता. अशा खळबळजनक साप्ताहिकाचे अवतारकार्य १९६३ पासून संपुष्टात आले.

### झंकार (१९४०-१९५०) :

ना. सी. फडके यांनी ऑगस्ट १९४० पासून पुण्यातून 'झंकार' साप्ताहिक सुरू केले. मात्र संपादक म्हणून पु. रा. भिडे यांचे नाव छापले जाई व स्वतः फडके आपले नाव 'डायरेक्टर' म्हणून छापत. या साप्ताहिकाच्या निर्मितीचे प्रासंगिक कारण अत्रे-फडके वादात दडलेले होते. १९४० च्या रत्नागिरीच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून फडक्यांनी वृत्तपत्रातून चालणारी वैयक्तिक भांडणे, ग्राम्य भाषेतल्या कुचाळक्या यावर प्रखर टीका केली होती. आपल्या भाषणात ते म्हणाले होते : "प्रतिष्ठित आणि ग्राम्य यातल्या सरहद्दी पुसट होत चालल्या आहेत. विनोदाच्या नावाखाली बीभत्सपणा उजळ माथ्यानं वावरू लागला आहे. विडंबनात्मक काव्य प्रसवणाऱ्या कवींनी चार चरण जुळवून सभ्य माणसाला न शोभणारे आवाज काढण्याचा सपाटा चालवला आहे." (कुलकर्णी भीमराव, १९७१, पृ. ४६८-४७०) टीकेचा रोख प्र. के. अत्रे यांच्या 'नवयुग'वर होता. त्यामुळे अत्र्यांनी 'प्रो. फडके म्हातारे झाले' या मथळ्याचा लेख लिहून 'नवयुग'मधून फडक्यांच्या भाषणावर उलट प्रहार केला. 'नवयुग' आणि इतर समकालीन पत्रातून होणाऱ्या टीकेला उत्तर देण्यासाठी आपले स्वतःचे पत्र असावे या उद्देशातून 'झंकार'चा जन्म झाला. 'झंकार'च्या मुखपृष्ठावर अंकाचे बिरुद सांगणारा पुढील श्लोक छापला जात असे :

"संग्राम चालत जगांत नव्याजुन्यांचा / येई प्रकाश उदयास स्वतंत्रतेचा
'आले युगांतर उठा' सुचवी जनांना / 'झंकार' वाग्वधुकरी करि रुद्रवीणा"

स्वतंत्र राष्ट्रीय बाण्याचे व पुरोगामी विचारांचे साप्ताहिक अशी या पत्राची जाहिरात करण्यात येत असे. प्रत्यक्षात 'झंकार' पत्रही वैयक्तिक टीका आणि असभ्य भाषेपासून दूर राहिले नाही.

### स्वदेश :

मुंबई-पुण्याबाहेर चांगली साप्ताहिके निघू शकत नाहीत हा गैरसमज दूर करण्याच्या इराद्याने रमाकांत वेलदे यांनी नाशिकहून 'स्वदेश' साप्ताहिक सुरू केले. वि. वा. शिरवाडकर हे सहसंपादक होते. रविवारचा अंक आम महाराष्ट्रासाठी आणि बुधवारचा नाशिक जिल्ह्यासाठी याप्रमाणे आठवड्यातून दोन अंक निघायचे. रविवारच्या अंकाचे संपादन शिरवाडकरांनी करायचे आणि बुधवारच्या अंकाचे संपादन वेलद्यांनी करायचे, अशी कार्यविभागणी होती. रविवारच्या अंकाचे पुण्या-मुंबईतही चांगले स्वागत झाले, बुधवारचा अंक मात्र कोलमडू लागला. शेवटी आर्थिकदृष्ट्या न परवडणारा हा उद्योग लवकरच बंद करावा लागला.

## ३.७. मासिकांची परंपरा :

### वैदिक धर्म (१९००) :

उज्जयनीहून जानेवारी १९०० पासून बळवंतराव कमळाकर माकोडे (१८५५-१९००) यांनी 'वैदिक धर्म' नावाचे मासिक सुरू केले होते. या मासिकातून प्रसिद्ध झालेल्या माकोडे यांच्या स्पेन्सरच्या 'अज्ञेयवादा'वरचा खंडनमंडनपर लेखाची लो. टिळकांनीही प्रशंसा केली होती. या मासिकाचे जेमतेम पाच अंक प्रसिद्ध झाल्यावर माकोडे यांचे देहावसान झाले. त्यानंतर

इतर संपादकांनी ते पुढे चालविण्याचा प्रयत्न केला होता, पण १९०३ साली हे नियतकालिक बंद पडले. (खानोलकर, १९६२, पृ. ६८)

### ब्राह्मणपत्रिका (१९२५) :

कोल्हापूर संस्थानात वासुदेव दामोदर मुंडले यांनी ब्राह्मणवर्गाविरुद्ध सुरू झालेल्या राजकीय-सामाजिक चळवळीच्या पार्श्वभूमीवर ब्राह्मण समाजास प्रगमनशील करण्याच्या उद्देशाने 'ब्राह्मणपत्रिका' नावाचे मासिक सुरू केले होते. पहिल्या अंकाच्या संपादकीयात ही पत्रिका सुरू करण्यामागची आपली भूमिका कथन करताना मुंडले यांनी लिहिले होते की, "ब्राह्मणांची सुधारणा करून त्यांना राष्ट्रकार्यक्षम बनविणे हेच ह्या पत्रिकेचे मुख्य ध्येय आहे व हे ध्येय सिद्धीस नेणे असेल तर ब्राह्मण समाजाला इतर वर्गांशी फटकून अथवा तुसडेपणाने वागून चालणार नाही हे उघड आहे; परंतु आज जो ब्राह्मणेतरांचा वर्ग ब्राह्मणांची टवाळी करून त्यांची पायमल्ली करण्यास तयार झाला आहे, ही स्थिती ब्राह्मणांस खास भूषणावह नाही व ही स्थिती पालटल्यावाचून म्हणजे ब्राह्मणांविषयी इतर जातींच्या लोकांत खराखुरा आदरभाव उत्पन्न झाल्यावाचून त्यांचे व ब्राह्मणांचे ऐक्य होणे दुरापस्त आहे. ही दुरापास्त झालेली गोष्ट सुलभ कशी होईल ह्याकडेच ह्या पत्रिकेचे विशेष लक्ष राहील व त्याकरिता ब्राह्मण समाजास जी सुधारणा करणे जरूर व इष्ट दिसेल तिची सदैव घोषणा करण्यात येईल. एकंदर ब्राह्मणांना सावध, शुद्धाचरणी, संघटित व कर्तव्यदक्ष बनविणे व त्यांच्याविषयी इतर जातींच्या मनात आदर उत्पन्न करून त्यांच्याशी ऐक्यभाव जोडणे हेच मुख्यत: आमचे धोरण राहील." (खानोलकर, १९६२, पृ. २१६-२१७)

### भद्रायु (१९३१-१९३५) :

गणेश सदाशिव मराठे यांनी विमाव्यवसायिकांच्या मार्गदर्शनासाठी १९३१ साली 'भद्रायु' नावाचे मासिक सुरू केले व चार वर्षे पदरमोड करून ते चालविले. ग. स. मराठे यांना गणितात रुची होती आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी लंडनला ॲक्च्युरीची परीक्षा देऊन मुंबईत हिंदुस्थान को ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटीत रजिस्ट्रार पदावर काम केले होते. अर्थ-उद्योगावर मराठीत फारशी नियतकालिकांची परंपरा नसताना मराठे यांनी विमाव्यवसायावर पत्रिका चालवून एक नवे पाऊल उचलले होते, म्हणून त्यांच्या कार्याची दखल घ्यायला हवी.

### यशवंत

मुंबईतून प्रकाशित होणारे 'यशवंत' हे वाङ्मयीन मासिक इंग्लंडमधील 'स्ट्रँड' मासिकासारखे होते. मराठी कथालेखनातल्या नव्या परिवर्तनाची वळणे 'यशवंत' मासिकातून पहायला मिळतात. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, य. गो. जोशी या त्यावेळच्या आघाडीच्या कथाकारांच्या कथा 'यशवंत'मधून प्रकाशित होत. 'कोकण'च्या पार्श्वभूमीवर लिहिल्या जाणाऱ्या कथांचा प्रवास घाटमाथ्यावरील जीवनाकडे वळविण्याचे काम वि. स. खांडेकरांच्या कथांनी केले. समकालीन जीवनातील बदलते वास्तव, स्त्री-पुरुष संबंधातले बदल, ध्येयवाद, राजकारण, कौटुंबिक ऋणानुबंधातील परिवर्तने, मानसशास्त्र, समाजवाद

इत्यादी ज्ञानांनी संस्कारित झालेले मराठी माणसाचे नवे अनुभवविश्व या कथांतून साकार होत होते. मराठी वाचकाच्या वाचनाभिरुचीच्या कक्षा विस्तारण्याचे काम 'यशवंत'ने केले.

## ३.८. इतिकथन :

विसाव्या शतकाच्या प्रारंभी ध्येयवादाचा वसा घेऊन सामाजिक-राजकीय बांधिलकीची पत्रकारिता फुलून येत होती. महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक पुनर्घटनेच्या लढ्यांतली सामिलकी हे या पत्रांचे वैशिष्ट्य होते. मराठी माणसाची वैचारिक मशागत करण्याचे, मानवी हक्कांच्या जाणिवा व राष्ट्रीय अस्मिता जागविण्याचे काम या पत्रांनी केले. सामाजिक विषमतेचा, जातिभेद व स्पृश्यास्पृश्यभावाचा विखार शमविण्याचा प्रयत्न या पत्रांनी केला. वासाहतिक सत्तेला शह देण्याच्या क्रांतिपर्वाचे भागीदार म्हणून या पत्रांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यात यत्किंचितही कसूर केली नाही. महाराष्ट्राचा 'मराठी बाणा' घडविण्यातले वृत्तपत्रांचे योगदान ही या पत्रकारितेची सर्वांत मोठी जमेची बाजू असल्याचे या तपासातून दिसून आले. या कामात वृत्तपत्रकारांना महाराष्ट्रातून उदार मनाच्या आश्रयदात्यांची साथ मिळाली, म्हणून या उद्योगाला गती मिळू शकली, हे एक महत्त्वाचे वास्तव आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेतून वृत्तपत्रविद्येचे आधुनिक शिक्षण घेऊन आलेल्या 'सकाळ'च्या नानासाहेब परुळेकरांकडे वृत्तपत्र चालविण्यासाठी कुठलेच आर्थिक भांडवल नव्हते; परंतु त्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणाऱ्या टोपिवाले श्रीमंत नारायणराव देसाई यांनी, इचलकरंजीच्या बाबासाहेब घोरपडे यांनी प्रत्येकी तीन हजार रुपये दिले, बांधकाम उद्योजक बाबासाहेब घोरपडे यांनी एक हजार रुपये दिले आणि परुळेकरांना तत्काळ भांडवल उपलब्ध झाले. असे आश्रयदाते बहुतेक सर्वच पत्रांना मिळाले. बऱ्याच पत्रांना मध्यमवर्गीय अल्प उत्पन्न असणाऱ्या लोकांनी आपापल्या परीने आर्थिक हातभार लावला आणि छोटेमोठे भांडवल जमवून मराठी पत्रकारांनी ध्येयवादातून वृत्तपत्रव्यवसाय वाढविल्याची उदाहरणे आहेत. महाराष्ट्र संस्कृतीच्या वाटचालीत ह्या आश्रयदात्यांचे योगदान निश्चितच महत्त्वाचे राहिले आहे.

मराठी पत्रकारितेच्या वाटचालीत केसरी, सुधारक, सकाळ इत्यादी पत्रांनी पत्रकारितेचे काही मानदंड प्रस्थापित केले. पत्रकर्त्यांने सतत जागे राहून गस्त घालणाऱ्या पहारेकऱ्याची भूमिका घेऊन राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील घडामोडींवर लक्ष ठेवले पाहिजे हा कित्ता 'केसरी'कारांनी घालून दिला. बहुसंख्य लोकांना अप्रिय वाटले तरी लोकमताच्या अवकृपेची पर्वा न करता लोकमतातील दोषस्थळे दाखविण्याचे काम पत्रकर्त्यांनी केले पाहिजे हा मानदंड आगरकरांनी घालून दिला. बातमी जशीच्या तशी देणे हा वृत्तपत्राचा खरा आत्मा नसून समाजात खोलवर जाऊन त्याच्या दुःखाला वाचा फोडणे, ही सार्वजनिक दुःखे कमी व्हावीत म्हणून सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्था-संघटनांना जागे करण्याचे काम वृत्तपत्रांनी करावे हा नमुनादर्श 'सकाळ' पत्राच्या नानासाहेब परुळेकरांनी घालून दिला. विश्वासार्ह बातमी वाचकांपर्यंत पोहचविणे आणि बातमीची अर्थपूर्णता जोखण्याबाबत वाचकांना मार्गदर्शन करणे ही दुहेरी भूमिका पत्रकारांनी निभावणे आवश्यक आहे, हा मूल्यादर्श प्रभाकर पाध्ये यांनी घालून दिला. त्यासाठी भ्रष्ट आणि जुलमी प्रभावापासून स्वतःला दूर ठेवण्याची

खबरदारी पत्रकाराला घ्यावी लागते, पत्रकाराला स्वत:ची आचारसंहिता निर्माण करावी लागते. 'बातमी पवित्र असते आणि टिप्पणी मुक्त असते' हे पत्रकारितेचे सूत्र अमलात आणण्यासाठी पत्रकाराला भयमुक्त, निर्भीड आणि पक्षनिरपेक्ष रहाण्याची गरज असते, हे मराठी पत्रकारितेच्या अनुभवविश्वातून पुढे आलेले सत्य आहे.

मराठी पत्रकारितेने शहरी आणि ग्रामीण भागात आपला वाचकवर्ग निर्माण करून लोकमत घडविण्यात महत्त्वाची भूमिका निभावलेली असली, तरी एकूण पत्रकारितेने काही अपवाद वगळता पांढरपेशा मध्यमवर्गीयांच्या परिघाबाहेर जाऊन ग्रामीण व बहुजनांना केंद्रस्थानी ठेवून काही वेगळे प्रयोग केल्याचे आढळत नाही. वर्तमानपत्रात छापून येणारी नावे ब्राह्मण, प्रभु, सारस्वत किंवा अशाच पांढरपेशा वर्गातली असतात. याबाबत कर्णिकांनी लिहिले आहे की, "खरे पाहिले तर आपला बहुसंख्य वाचकवर्ग हा बहुजन समाजातीलच असतो, लब्धप्रतिष्ठित पांढरपेशा वर्ग मराठी वर्तमानपत्रांची बहुश: उपेक्षा करीत असतो. ज्या मामलेदाराच्या सत्काराची बातमी आपण छापतो तो मामलेदार मराठी वर्तमानपत्रांकडे नाके मुरडीत म्हणत असतो, की 'टाइम्स वाचल्याशिवाय आपलं समाधान होत नाही बुवा!' आणि गिरणीतील मजूर, कचेरीतील शिपाई, सलूनमधील नोकर, दाणेबाजारातील हमाल, पुण्यातील टांगेवाला, खेड्यातील जागरूक कार्यकर्ता आणि चार बुके शिकलेला शेतकरी हा मात्र गाडगीळ, पाध्ये, महाजनी यांच्या अग्रलेखांचे मर्म समजावून घेण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असतो. पण आमचा हा आधारस्तंभ असलेल्या बहुजनसमाजाचे सामाजिक जीवन आमच्या वर्तमानपत्रांतून कितीसे प्रकट होत असते?.. मराठी वर्तमानपत्रांच्या संपादकांना बहुजनसमाजाबद्दल अनास्था असते असे तर मुळीच नव्हे, फक्त एवढेच की, आमचा दृष्टिकोण अद्यापही पांढरपेशा राहिलेला आहे आणि तो बदलणे आवश्यक आहे. बहुजनसमाजातील पुढाऱ्यांना प्रसिद्धी देऊन आम्ही त्यांनाही पांढरपेशा वर्गात समाविष्ट करून घेतो एवढेच. बहुजनसमाज, त्याच्या हालचाली, त्या समाजातील उपेक्षित पण उपेक्षणीय नसलेल्या लोकांचे जीवन हे मात्र अद्यापही आमच्या प्रसिद्धीच्या कक्षेबाहेर राहिलेले आहे." (कर्णिक, १९५२, पृ. ३०)

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध संपताना एका जाणत्या पत्रकाराचे वरील निरीक्षण पाहता यापुढे भांडवली साखळी पत्रांच्या लाटेत मराठी पत्रकारितेचा ध्रुव कितपत बहुजनसमाजाकडे झुकतो, याविषयीचे एक मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते. १९५० च्या सुमारास पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठ्या भांडवली उद्योगांनी उडी घेतल्याने स्वतंत्र बाण्याच्या निर्भीड वृत्तपत्रांची आणि राष्ट्रीय अस्मिता व वैचारिक बांधिलकी मानणाऱ्या ध्येयवादी पत्रकारांची परंपरा धोक्यात आल्याचे चित्र पहायला मिळते. स्वत:च्या पदराला खार लावून मध्यमवर्गीय मराठी माणसांनी निर्माण केलेले पत्रकारितेचे स्वायत्त क्षेत्र बघता बघता ढासळताना दिसू लागले. स्वतंत्र बाण्याच्या पत्रकारांना मालकाच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या हुकमी ताबेदाराची भूमिका स्वीकारण्याची पाळी आली. एकीकडे साखळी वृत्तपत्रांमुळे वाचकवर्गाचा क्षेत्रीय पैस विस्तारला असला तरी भांडवली आस्थापनांच्या विपणनतंत्रांना पोषक अशाच बाबींना स्थान मिळू लागल्याने वैचारिक परिघ संकुचित होऊ लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महाराष्ट्राच्या अभिरुचिसंवर्धनात आणि वैचारिक धारणा

घडविण्यात ही नवी पत्रकारिता नेमका काय परिणाम करीत आहे हा स्वतंत्र तपासाचा विषय आहे.

या पन्नास वर्षांच्या कालप्रवाहात सुरू झालेली सर्वच नियतकालिके दीर्घकाल सुरू राहिली नाहीत; बरीच नियतकालिके अल्पायुषी ठरली. ही नियतकालिके बंद पडण्याची वेगवेगळी कारणे होती. कधी अपुऱ्या भांडवलामुळे, कधी संपादक-व्यवस्थापकांतील अंतर्गत भांडणांमुळे, कधी वृत्तसंकलन, छपाई आणि वितरणाच्या पूरक सुविधा उपलब्ध नसल्याने ही पत्रे बंद करावी लागली. राजकीय पत्रांना तर इतर पत्रांच्या तुलनेने बंद पडण्याचा शापच असतो. ब्रिटिश सरकारच्या वृत्तपत्रीय आविष्कारस्वातंत्र्यावर बंधने घालण्याच्या राजनीतीमुळे अनेक पत्रांवर ही पाळी आली होती. काही पत्रे त्यांच्या स्वभावत:च वादग्रस्त भूमिकेमुळे बंद पडली, तर काही पत्रांचे बंद पडणे हा केवळ एक अपघात होता. मात्र बरीच पत्रे ही संपादकांच्या करिष्म्यावर आणि संघटनात्मक चळवळीतल्या अनुयायांच्या जोरावर लोकप्रिय झाली आणि आपला स्वत:चा ठसा निर्माण करू शकली. मराठी पत्रकारितेने वाचकांची सामिलकी वाढविण्यासाठी वाचकप्रतिसादांना प्रसिद्धी देण्याचे, जनतेच्या समस्यांवर सर्वेक्षणात्मक वृत्तांत प्रसिद्ध करण्याचे व लोकाभिरुची संस्कारित करणाऱ्या माध्यमभाषेची प्रसरणक्षमता वाढविण्याचे अनेकविध प्रयोग केलेत. आपल्या निरुपणातील आवाहनक्षमता वाढविण्यासाठी संतवचने, धर्मसूक्ते, सुभाषिते, म्हणी, वाक्प्रयोग या भाषिक-सांस्कृतिक मुशींचा सर्जनशील वापर केला. परकीय सत्तेविरुद्ध लोकक्षोभ निर्माण व्हावा, सात्त्विक चीड निर्माण व्हावी यासाठी जहाल भाषाशैलीचा, उपरोध, उपहास, वक्रोक्ती या भाषिक आयुधांचा मुक्त वापर केला. वास्तवाचे प्रत्ययदर्शन घडविणारी छायाचित्रे, स्वभाववैचित्र्याच्या छटा आणि घटनाप्रसंगांवरचे प्रासंगिक भाष्य करण्यासाठी सूचक व्यंगचित्रे यांचा यथायोग्य वापर करून मराठी भाषेच्या आविष्कारशैलीचे अनेक प्रयोग या पत्रांनी केले. मराठी वाचनाभिरुची घडविण्यात, राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांविषयीची सामाजिक समजूत वाढविण्यात, आणि मराठी संवेदनस्वभाव घडविण्यात या पत्रांचे लक्षणीय योगदान राहिले आहे.

❑❑❑

# ४

# आर्थिक स्थित्यंतर

## ४.१. पूर्वकथन :

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील आर्थिक स्थित्यंतराचा तपास करण्यापूर्वी १९ व्या शतकातील आर्थिक स्थितीची पूर्वपीठिका थोडक्यात लक्षात घ्यायला हवी. १९ व्या शतकात ब्रिटिशांच्या वासाहतिक अर्थनीतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण सुरू झाली होती. इंग्लंडने वर्षानुवर्षे भारतातून कापूस, तेलबिया, तंबाखू, चहा इत्यादी कृषी-उत्पादने आणि लोखंड, मॅंगेनिज इत्यादी खनिज संपत्ती आपल्या देशात नेऊन हिंदुस्थानचे धननि:सारण चालवले होते. ब्रिटिशांच्या दृष्टीने हिंदुस्थान हा फक्त कच्चा माल आणि स्वस्त श्रमपुरवठा करणारा समृद्ध मळा होता. इंग्लंडमध्ये तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीची हक्काची बाजारपेठ म्हणून ब्रिटिशांनी भारताचे निरंतर अर्थशोषण केले होते. ब्रिटिशांच्या या शोषणनीतीवर प्रकाश टाकणारा एक मजकूर त्या काळात इंग्लंडमधील 'मॉर्निंग पोस्ट' मध्ये प्रसिद्ध झाला होता, तो वाचल्यावर या धननि:सारणामागील कुटील अर्थकारणाचा बोध होतो :

"इंग्लंड हे जगले पाहिजे. इंग्लंडला जगावयास उद्योग व व्यापाराशिवाय दुसरा मार्ग नाही. हिंदुस्थान ही चांगली बाजारपेठ आहे. ती आमची आहे. आम्ही त्याचे संरक्षण करितो, तेव्हा त्यांनी आमचा पक्का माल घेतलाच पाहिजे. हिंदुस्थान आम्ही सोडला तर लँकेशायरचे १२० लाख लोक उपाशी मरतील. तेव्हा हिंदुस्थानला पारतंत्र्यात ठेवण्यावाचून व भल्याबुऱ्या मार्गांनी त्यांच्या गळ्यांत आमचा पक्का माल बांधण्यावाचून दुसरे गत्यंतरच नाही."

*(चित्रमय जगत, १९३०)*

इंग्लंडकडून होणारे हे धननि:सारण मोठ्या खुबीने केले जात होते. इंग्लंडने भारतात पाटबंधारे, पोस्ट इत्यादी सुधारणा करण्यासाठी दिलेल्या कर्जावरचे व्याज, तिकडच्या

भांडवलदारांनी हिंदुस्थानात गुंतवणूक करण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, जहाजांच्या वाहतुकीचे पैसे, भारतातला कार्यकाळ संपल्यावर इंग्लंडमध्ये परतणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्यांचे निवृत्तिवेतन, हुंडणावळ, बँका व विमा कंपन्यांचे देणे, अशा नाना प्रकारच्या रकमा लादून हे धननि:सारण होत होते. ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपला तेव्हा त्यांनी हिंदुस्थान जिंकण्याकरिता व अफगणिस्तान आणि चीनशी केलेल्या युद्धाचा खर्च भारतवासीयांवरच लादला होता. १८३८ पर्यंत कंपनीने हिंदुस्थानातून १२००० कोटी रुपये नेऊनही हे कर्ज कायम होते. त्यानंतरच्या काळात १८५८ साली कंपनी सरकार जाऊन राणीचे सरकार आले तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीचे राष्ट्रीय कर्ज १०५ कोटींचे होते, १९२७ पर्यंत ते वाढत जाऊन ९७५ कोटी झाले आणि १९३५ अखेर ते १२१५ कोटींपर्यंत पोहचले. शिवाय सोनेरी चलनाविरूद्धच्या धोरणामुळेही हिंदवासीयांकडून इंग्लंडला वरकड पैसा मिळत होता. धननि:सारणाच्या या अर्थनीतीचा गोषवारा सांगायचा झाला तर 'होमचार्जेस'च्या नावाखाली प्रतिवर्षी सुमारे २२० कोटी रुपयांचा भुर्दंड भारतवासीयांना सोसावा लागत होता. हा सर्व भार एतद्देशीय करदात्यांवर पडत होता. एकेकाळी सोन्याचा धूर निघत असलेल्या या वैभवशाली देशाला दारिद्र्यात लोटण्याचे काम ब्रिटिशांच्या वसाहतवादी अर्थनीतीने केले होते. यापूर्वीच्या पहिल्या खंडात या धननि:सारणाची सर्वांगीण चर्चा करण्यात आली आहे. .

ब्रिटिशांच्या वसाहतवादी अर्थनीतीमुळे हिंदुस्थानच्या वाट्याला येणाऱ्या दारिद्र्याची मीमांसा करताना प्रामुख्याने दरडोई उत्पन्नाचा आधार घेतला जात असे. भारतवासीयांच्या या दरडोई उत्पनाच्या निर्देशांकाची निरनिराळ्या तज्ज्ञांकडून वेळोवेळी मोजदाद झाली आहे. त्याचा तौलनिक पट लक्षात घेतला तरी हिंदुस्थानच्या आर्थिक वाटचालीचे चित्र स्पष्ट होऊ लागते. १८७० साली सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी एतद्देशीयांच्या दरडोई उत्पन्नाची मोजदाद केली, तिथपासून उपलब्ध असलेली माहिती अशी :

| गणना वर्ष | अर्थतज्ज्ञ | लोकसंख्या | दरडोई वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|
| १८७० | दादाभाई नौरोजी | १७.५ कोटी | २०रुपये |
| १८८२ | सर बार्नर | १९.५ कोटी | २७ रुपये |
| १८९९ | डिग्बी साहेब | २२.५ कोटी | ३० रुपये |
| १९११ | सर फिंडले शिरास | | ५० रुपये |
| १९२१ | प्रो. शहा, प्रो. खंबाटा | | ५३ रुपये |

*(चित्रमय जगत, १९३०)*

लॉर्ड कर्झन यांनी १७ रु. ४ आणे दरडोई वार्षिक उत्पन्नाची नोंद केली आहे; तर

लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत ते २७ रुपये झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. जगातल्या अन्य देशांच्या तुलनेत हिंदुस्थानातल्या माणसाच्या दरडोई उत्पन्नाचा तौलनिक पट पाहिल्यास या दारिद्र्याची तीव्रता लक्षात येते. १९२१-२२ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार जगातल्या आठ देशांच्या दरडोई उत्पनाची स्थिती पुढीलप्रमाणे होती –

| १. इंग्लंड | २. अमेरिका | ३. जर्मनी | ४. फ्रान्स | ५. ऑस्ट्रेलिया | ६. कॅनडा | ७. इटली | ८. हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७५० रु | १०८० रु | ४५० रु | ५७० रु. | ८१० रु | ६०० रु. | ३४५ रु | ५३ रु. |

हिंदुस्थानवासीयांना ५३ रुपये वार्षिक उत्पन्नावर सरासरी १२.५० रुपये कर अदा करावा लागत असे. तो वजा केल्यास दर डोई उत्पन्न केवळ ४०.५० रुपये पडते. (चित्रमय जगत,१९३०;वाघ महादेव,१९३९,पृ. ७) सरासरी वार्षिक उत्पन्नातली ही तफावत पाहिल्यास इंग्रजी शोषणाची तीव्रता किती भयानक होती, हे लक्षात येते. जगातली सर्वात मोठी कृषिकेंद्री अर्थव्यवस्था असूनही भारताला दारिद्र्याच्या समस्येने ग्रासलेले होते; याचे कारण ब्रिटिशांची वासाहतिक अर्थनीती हेच होते. ही नकारात्मक पार्श्वभूमी लक्षात घेऊन विसाव्या शतकातील आर्थिक वाटचालीचा तपास करावयाचा आहे.

हिंदुस्थानातल्या आर्थिक मागासलेपणाची इतरही काही कारणे होती. जलसंपत्ती, खनिजसंपत्ती या नैसर्गिक साधनास्त्रोतांचा पुरेपूर वापर नसल्याने उत्पादनाची मात्रा वाढत नव्हती. पडीक जमिनी, उपयोगाविना पडून राहिलेली संसाधने यामुळे अर्थव्यवस्थेचा आलेख उंचावत नव्हता. मशागतीचे आधुनिक तंत्रज्ञान व अद्ययावत उपकरणांचा अभाव यामुळे जमिनीची उत्पादनक्षमता वाढत नव्हती. आधुनिक खते व बी-बियाणांचे अज्ञान यामुळे शेतमालाच्या उत्पन्नाचे प्रमाण आणि दर्जाही घसरत चालला होता. शेतमालाला बाजारात चांगली किंमत मिळत नसल्याने शेती करणे परवडत नव्हते. पर्यायाने शेतमजुरांना पुरेसे वेतन देता येत नव्हते. अपुऱ्या वेतनामुळे त्यांचे राहाणीमान निकृष्ट होते. याचा त्यांच्या शारीर-मानसिक वाढीवर प्रतिकूल परिणाम होत होता. दारिद्र्यामुळे माणूस न्यूनगंड, अंधश्रद्धा व अर्थशून्य रूढी-परंपरांच्या जाळ्यात सापडतो; प्रगमनशील विचारांपासून दुरावतो. त्याचा एकूण कामाच्या प्रतवारीवर आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. भारताच्या दारिद्र्याची आणि सामाजिक मागासलेपणाची ही मूलभूत कारणे होती.

सातत्याने दारिद्र्याची पातळी वाढत असताना, दुष्काळाचे अस्मानी सावट कायम डोक्यावर असताना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन समाजातील विषमता दूर करण्याचे आव्हान भारतापुढे होते. त्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्रीचा उत्पादनवाढीसाठी उपयोग करणे, देशातल्या देशात तयार होणाऱ्या कच्च्या मालाचा उपयोग करून कारखानदारी

वाढविणे, व देशी मालाची स्वदेशी व विदेशी बाजारपेठांमध्ये विक्रीव्यवस्था विकसित करणे गरजेचे होते. मात्र मुळातच आपल्याकडे व्यापार-उद्योगात गुंतविण्यासाठी भांडवलाचा तुटवडा होता. अल्प उत्पन्नामुळे बचत नाही आणि संपत्ती-संचय नसल्याने भांडवलनिर्मिती नाही, हे दुष्टचक्र कायम होते. टाकाऊ व खर्चिक उत्पादन पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठीय स्पर्धेत इथली उत्पादने तग धरत नव्हती. शास्त्रीय व अद्ययावत तंत्रज्ञानाची अनुपलब्धता असल्यामुळे देशातल्या देशात यंत्रसामुग्री तयार होत नव्हती. त्यासाठी विदेशातून महागडी यंत्रे आणि अवजारे आणणे क्रमप्राप्त होते. निरक्षरता व तांत्रिक अज्ञान यामुळे कुशल कामगारांचा अभाव होता. औद्योगिकीकरणाच्या अभावामुळे लोकांचे उत्पन्न कमी होते. दारिद्र्यामुळे क्रयशक्ती नव्हती; त्यामुळे जीवनमान उंचावण्याची संधी मिळत नव्हती.

पाश्चिमात्य देशांची औद्योगिक प्रगती सुरू असताना आपण मागे का पडतो, याचा तपास करताना आपल्याकडे असलेल्या उद्यमशीलतेचा अभाव हे सर्वात मोठे कारण 'केसरी'कारांनी नोंदविले आहे. पाश्चिमात्य देशातील स्त्रिया पुरुषांप्रमाणे उद्यमशील असल्याने त्यांचा उद्योगवाढीसाठी हातभार लागतो, तसे आपल्याकडे होत नाही. पुरुषांइतके शिक्षण स्त्रियांना दिले जात नाही, स्त्रियांनी पुरुषांच्या तुलनेने हलकी कामे करण्याचा समज यामुळे उद्योग वाढविण्याचा भार एकाच चाकावर पडतो. स्त्रियांसाठी उद्योगशाळा सुरू झाल्यास या क्षेत्रात बदल घडू शकतो, असे केसरीकारांनी सूचित केले होते. (केसरी २९ जाने.१८८४) १ ऑक्टोबर १९१६ रोजी पुण्याच्या माधवबागेत लो. टिळकांचे 'आमचा व्यापार व स्वदेशी' या विषयावर भाषण झाले होते. त्यात त्यांनी आपली औद्योगिक स्थिती हीन का झाली हे सांगताना येथील बांगडी उद्योगाचे उदाहरण दिले होते. तळेगावच्या काच कारखान्यात सुबक बांगड्या तयार करण्याचे कसब शिकून मि. अय्यर नामक गृहस्थ जपानला गेले. त्यांनी तेथे जाऊन बांगड्या तयार करून आणायच्या व येथे आपल्या देशात त्या विकण्याचा उद्योग सुरू केला. म्हणजे कारागीर, कसब आपलेच व तेथे जाऊन सुंदर जपानी माल म्हणून आपणच खरेदी करावयाचा. अशा रीतीने वर्षाला दहा-पंधरा लाख रुपये परदेशात जातात. आपले सौभाग्य अशा रीतीने परकीयांच्या हाती कसे गेले या घटनेचा वृत्तांत टिळकांनी या सभेत कथन केला होता.(केसरी ३ ऑक्टो. १९१६) यावर केसरीतल्या एका पत्रलेखकाने पुरविलेली माहिती पुढच्या तपासास उपयोगी पडणारी आहे, म्हणून येथे उद्धृत करीत आहे : देशी बांगड्यांचा धंदा पूर्वी मुंबईस शीव येथे, पुण्यात शिवापूर येथे, ठाणे जिल्ह्यात चिंचणी येथे चालत असे. चिंचणीस पूर्वी काचेचे रंगीबेरंगी गजरेही तयार करीत; परंतु प्लेगच्या साथीमुळे कच्चा माल पडून राहिला व हा धंदा बंद पडला. देशी मालासाठी गिऱ्हाईकांनी जोर धरल्यास हा धंदा पुन्हा उर्जितावस्थेस येऊ शकतो, असेही पत्रकर्त्याने म्हटले आहे.

(केसरी, १ नोव्हें. १९०४) यावरून एतद्देशीयांची उद्यमशीलता वाढली, स्त्री-पुरुषांना उद्योगाचे शिक्षण मिळाले आणि गिऱ्हाईकांनी देशी मालाचा आग्रह धरला तर येथील आर्थिक प्रगतीचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो, ही दिशा यातून सूचित होते.

महाराष्ट्रातल्या उद्योगवाढीतल्या अडथळ्यांच्या कारणांचा तपास करताना प्रामुख्याने पुढील गोष्टी लक्षात येतात : मराठी माणसाच्या स्वभावातच वाणिज्य वृत्ती नसल्याने व स्वभावातल्या अल्पसंतुष्टतेमुळे धनवृद्धीचे मार्ग शोधण्यात त्याला रस नव्हता. धडुयाकडुया गरिबीत समाधान मानण्याची वृत्ती असल्याने उद्यमशीलता नव्हती. भांडवलाचा अभाव, दूरदृष्टी व नियोजनाचा अभाव असल्यामुळे परिसरातल्या साधनस्त्रोतांचा यथायोग्य वापर करून संपत्तिनिर्माणासाठी धडपड केली जात नव्हती. उदाहरणार्थ, कोल्हापूर परिसरात बॉक्साईटचे साठे; पण त्यावर प्रक्रिया करून ॲल्यूमिनियमचे कारखाने काढण्यासाठी कुणी पुढाकार घेतला नाही. कोकण किनारपट्टीत समुद्रसंपत्तीचा लाभ घेण्यासाठी उत्तम नौकाबांधणीच्या कौशल्य संपादनाचा ध्यास घेऊन कुणी या उद्योगात पुढे आले नाही. शेती व उद्योगधंद्यांना वित्तसाहाय्य करणाऱ्या बँका, पतपेढ्या यांचा पद्धतशीर वापर होत नसल्यानेही मराठी माणूस आर्थिक विकासाच्या आघाडीवर पिछाडीला राहिला. राज्यशासनानेही औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदाने, करसवलती, जकातींचे संरक्षक कवच, तांत्रिक व व्यवस्थापनशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या व्यवस्था उभ्या करण्याची गरज असते; सरकारी व संघटनात्मक दोन्ही पातळीवर धोरण व कार्यपद्धतीत सुसुत्रता असावी लागते. परंतु ब्रिटिश वसाहतवादी नीतीत इंग्लंडला कच्चा माल पुरवणारा देश यापलीकडे हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासासाठी व आर्थिक स्वावलंबनासाठी शाश्वत विकासाचे धोरण नव्हते. आर्थिक मागासलेपणाची ही राजकीय व सामाजिक कारणे लक्षात घेऊन विसाव्या शतकातील आर्थिक स्थित्यंतरांचा तपास करावयाचा आहे.

## ४.२. आर्थिक पुनर्घटना : विविध अंत:प्रवाह

विसावे शतक हे आर्थिक संक्रमणावस्थेचे शतक आहे. हा काळ मध्ययुगीन आर्थिक संरचनांची जागा औद्योगिक संरचनांनी घेण्याचा आहे. भारतीयांच्या दृष्टीने ही संक्रमणावस्था कष्टदायक होती, अर्थव्यवस्था अस्थिर करणारी होती. देशातील नैसर्गिक साधनस्त्रोतांतून प्राप्त होणारा कच्चा माल, आधुनिक शिक्षणातून प्राप्त होणारी प्रेरक शक्ती, यांत्रिक उपकरणे व तंत्रकौशल्ये वापरण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचे राजकीय प्रशासनशास्त्र यामुळे ही संक्रमणावस्था दूर होऊन भारतीय अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था येण्याची चिन्हे दिसत होती. मात्र भारतीय बुद्धिमंतांमध्ये आणि राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पर्यायी अर्थनीतीविषयी एकवाक्यता नव्हती. आपण भौतिक कल्याणापेक्षा आध्यात्मिक व नैतिक परिपोषणाला महत्त्व दिले. धार्मिक व

कौटुंबिक सुधारणांवर भर दिला. आधुनिक अर्थव्यवस्थेत संपत्ती आणि सत्तेचे मूलबंध दडलेले आहेत, याचा फारसा गांभीर्याने विचार केला गेला नाही, किंवा त्यादृष्टीने आर्थिक विकासाचा रचनात्मक कार्यक्रम आखण्यावर व तो पुढे नेण्यासाठी राजकीय दबाव आणण्यावर पुरेसा भर दिला गेला नाही. अर्थात या विषयावर राजकीय व्यासपीठांवर विचारविनिमय झालाच नाही, असे नाही. हिंदुस्थानला औद्योगिक स्वराज्य मिळाल्याशिवाय राजकीय स्वराज्य मिळणार नाही, अशा आशयाचा ठराव संमत करून नागपूरच्या राष्ट्रीय काँग्रेसने भारताच्या अर्थकारणाची एक नवी दिशा सूचित केली होती. काँग्रेसमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरू यांचा एक गट औद्योगिक विकासाला महत्त्व द्यायला पाहिजे, यासाठी आग्रही होता. १९३८ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी हरिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात आपल्या देशातील दारिद्र्य, निरक्षरता, रोगराई या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाजवादी आर्थिक विचारांतून स्वतंत्र आर्थिक पुनर्रचनेचा नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याची दिशा स्पष्ट केली होती. शास्त्रीय पद्धतीने उत्पादनवाढ व समन्यायी पद्धतीने संपत्तीचे वाटप या मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवून हा आराखडा तयार केल्यास देश आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनेल, असा आशावाद सुभाषबाबूंनी व्यक्त केला होता. स्थानिक व सांस्कृतिक स्वायत्तता कायम ठेवून राष्ट्रीय एकात्मता वाढेल यादृष्टीने देशाचे अर्थनियोजन व्हावे; जमीनसुधारणा, सरंजामद्धतीचे उच्चाटन, शेतीचे आधुनिकीकरण, अल्पदराने वित्तपुरवठा, आणि कालबाह्य उत्पादनपद्धतीऐवजी आधुनिक औद्योगिक उत्पादनपद्धतींचा अवलंब, शक्य असेल तिथे हातमाग उद्योगासारख्या ग्रामोद्योगांना संरक्षण इत्यादी अंगांनी देशाच्या आर्थिक विकासाचे नियोजन व्हावे अशी अपेक्षा सुभाषबाबूंनी आपल्या अध्यक्षीय भाषणांतून व्यक्त केली होती. त्यानंतर लगेचच जवाहरलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली १५ जणांची नियोजन समिती संघटित करण्यात आली होती. त्यात उद्योगपती, संस्थानिकांचे सल्लागार, अर्थतज्ज्ञ आणि एक गांधीवादी विचारांचा प्रतिनिधी यांचा समावेश होता.

१९३८ च्या नियोजन समितीने मानवी कल्याणाच्या सर्व बाजूंचा साकल्याने विचार केला होता. दारिद्र्यनिर्मूलनाच्या अमूर्त कल्पनांपेक्षा शिक्षण, आरोग्य, निवारा, वस्त्रप्रावरणे इत्यादी भौतिक सुधारणांवर समितीने भर दिला होता. त्यासाठी नियोजन समितीने काही वस्तुनिष्ठ निकष ठरविले होते :

१. पोषण आहारात सुधारणा- प्रौढ कामगाराला २४०० ते २८०० उष्मांकांचा दैनंदिन आहार.

२. प्रत्येकाला पुरेसे वस्त्र – प्रतिवर्षी दरडोई १५ ते ३० यार्ड कापड.

३. निवारा - दर माणशी किमान १०० चौ. फुटांचे घर.

४. आयुर्मानात वाढ व वैद्यकीय सेवा - १००० लोकांसाठी एक दवाखाना
५. प्रत्येकाला रोजगार व दरडोई उत्पन्नात वाढ
६. साक्षरता
७. कृषि व औद्योगिक उत्पादनात वाढ

दारिद्र्यनिर्मूलनासाठी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली पाहिजे यावर नियोजन मंडळाचा मुख्य भर होता व औद्योगिकीकरणाच्या बाजूने मतप्रवाहांचे ध्रुवीकरण झाले होते. केवळ लघु-उद्योग व हस्तकौशल्यांवर आधारित उत्पादन करणाऱ्या उद्योजकांना पाठिंबा दिल्याने भारताला औद्योगिक स्वयत्तता प्राप्त करता येणार नाही, असे या गटाचे मत होते. या प्रकारच्या लघु-उद्योगांत कामगारांचे श्रममूल्य वाढते, त्यामुळे जागतिक बाजारपेठेत पूर्ण स्पर्धेत ते टिकाव धरतील याची खात्री नसते. याकरिता आधुनिक उद्योगक्षेत्र विकसित करण्याचा पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे, असे नियोजन मंडळाचे मत होते. अर्थात, अशा मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी पायाभूत अशा पोलादनिर्मितीसारख्या जड उद्योगांचा विकास करण्याला अग्रक्रम दिला पाहिजे, अशी या गटाची धारणा होती. राष्ट्राचा विकास करण्यासाठी ज्या क्षेत्रांत खाजगी उद्योजक पुढे यायला तयार नसतील, तेथे सार्वजनिक उद्योग सुरू करून ही उणीव भरून काढली पाहिजे, असेही या गटाचे म्हणणे होते. हे जड उद्योग सार्वजनिक मालकीचे ठेवल्याने संरक्षित राहतील व संपत्तीच्या पुनर्वाटपाचा प्रश्नही सोडवता येईल अशी त्यांची समजूत होती. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आर्थिक व्यवहारांना टाळता येणार नसले, तरी साम्राज्यवादाच्या भोवऱ्यात न फसता राष्ट्र स्वावलंबी व्हावे यादृष्टीने राष्ट्राचे आर्थिक नियोजन करण्यावर नेहरूंचा भर होता. (Bhagavati, 2013, p. 253) मात्र पक्षातल्या मतभिन्नतेमुळे ही चर्चा पुढे गेली नाही. स्वत: सुभाषबाबू पक्षातून बाहेर पडल्याने औद्योगिक विकासाच्या रणनीतीची चर्चा तिथेच विरून गेली.

गांधीजींचा आधुनिकीकरणाला आणि औद्योगिकीकरणाला विरोध होता. पाश्चिमात्यांच्या आधुनिकीकरणाची नक्कल केल्याने आपण आपले स्वत्व गमावून बसू असे त्यांना वाटत होते. औद्योगिकीकरणामुळे होणाऱ्या महा-उत्पादनामुळे संपत्ती व सत्तेचे केंद्रीकरण होते असे गांधीजींचे मत होते. म्हणून त्यांनी ग्रामवादाचा पुरस्कार केला होता. ग्रामीण भागातील आपल्या हस्तकौशल्यांचा दीर्घ वारसा पुढे नेला तर आपण आपल्या स्वबळावर दारिद्र्यावर मात करू शकू असा गांधीजींचा विश्वास होता. खादीची चळवळ हिंदुस्थानला आर्थिक स्वायत्तता देईल असा त्यांना भरवसा वाटत होता. गांधीजींची भूमिका ही माणसाच्या नैतिक उन्नयनावर भर देणाऱ्या धार्मिक समुपदेशकासारखी (Evangelicals) होती. सामाजिक विकास भौतिक साधनांपेक्षा नैतिक मूल्यसंवर्धनातून होत असतो, यावर गांधीजींचा भर होता. या भूमिकेला

अनुसरूनच नागरिकांमध्ये शिस्त, स्वार्थत्याग हे गुण अंगी उतरविण्यासाठी चरखा चालविण्याची व खादी वापरण्याची मोहिम राबवावी अशी योजना कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनात ठेवण्यात आली होती.

गांधीजींच्या ग्रामवादापेक्षा औद्योगिकीकरणाचा पक्ष घेणाऱ्या नेहरू-सुभाषचंद्र बोस यांची विचारधारा मात्र वेगळी होती. सामाजिक विकासाचा मार्ग भौतिक विकासातून प्रशस्त होतो अशी उपयुक्ततावादी (utilitarian) तत्त्वज्ञानाशी जवळ जाणारी त्यांची भूमिका होती. जातिसंस्था हा भारतीय उत्पादनव्यवस्थेतला मोठा अडसर असल्याचे या गटाचे म्हणणे होते. नेहरूंच्या मते औद्योगिकीकरणामुळे जातिव्यवस्थेचे बंध सैल व्हायला मदत होईल. गांधीजींचे मत मात्र वेगळे होते. समाजाचे नैतिक उन्नयन झाल्यानेच जातीय विषमता दूर होईल अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे जातिसंस्थेतल्या उतरंडीतला कर्मठपणा व मानखंडणा दूर करण्याला ते अधिक महत्त्व देत असत. आपल्या अंगवळणी पडलेल्या उत्पादनपद्धती आणि उपभोगाच्या जीवनशैलीतूनच विकासाचा मार्ग शोधावा अशी गांधीजींची अर्थनीती होती. भांडवलदार, जमीनदार, संस्थानिक यांनी विश्वस्ताच्या भूमिकेतून आपल्या संपत्तीचा विनियोग करावा, असा त्यांचा आग्रह होता. काँग्रेसमधल्या समाजवादी गटाला मात्र सोव्हिएत रशियाप्रमाणे उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याची कल्पना पुढे नेण्याची इच्छा होती. याउलट गांधीजींना राष्ट्रीयीकरण हे एका अर्थाने सरकारीकरणच असल्यामुळे राष्ट्रीयीकरणाची संकल्पनाच मान्य नव्हती. यांत्रिकीकरणाला विरोध करून स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देण्याच्या या गांधीवादी काँग्रेस नीतीचा महाराष्ट्राच्या आर्थिक पुनर्घटनेवर काय परिणाम झाला हा मुद्दा इथे विचारात घ्यावा लागणार आहे.

**जमेच्या बाजू :**

आर्थिक साधस्त्रोतांच्या दृष्टीने महाराष्ट्राची नैसर्गिक संपदा ही एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. भीमेचे खोरे सर्वात मोठे असून तिला १५ उपनद्या मिळतात. खानदेश व पश्चिम विदर्भातील तापीचे खोरे कापसाच्या लागवडीसाठी उत्तम समजले जाते. चांदा, भंडारा, अमरावती, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी जिल्ह्यात जंगलसंपत्ती विपूल आहे. भंडारा, चंद्रपूर, नागपूर जिल्ह्यात ४० इंचापेक्षा जास्त पाऊस पडतो, महाबळेश्वरला १५० इंच पाऊस पडतो. कोकणातही खूप पाऊस पडतो, परंतु तिथली जमीन सुपीक नसल्याने तांदुळाखेरीज इतर पिके फारशी येत नाहीत. कोकणात रत्नागिरी, सावंतवाडी, वेंगुर्ले भागात हलक्या प्रतीच्या मॅंगेनीझचा साठा आहे; बॉक्साईट, कच्चे लोखंड, क्रोमाइट व अभ्रक आहे. कोकणपट्टीत सिलिका वाळू व चिकण मातीही भरपूर आहे. विदर्भात नागपूर-भंडारा जिल्ह्यात व रामटेकच्या पश्चिमेस जंगल भागात मॅंगेनीझचे साठे आहेत. यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यात चुना आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या तुलनेत विसाव्या शतकात आर्थिक विकासाला पोषक असणारी भौतिक, तांत्रिक व बाजारपेठीय अनुकूलता होती, हेही लक्षात घ्यायला हवे. यांत्रिक मशिनरी, विजपुरवठा आणि सुधारित अवजारांच्या उपलब्धीमुळे शेती आणि औद्योगिक आस्थापनांची उत्पादनक्षमता वाढली होती. सुवेझ कालवा आणि वाफेच्या शक्तीचा शोध यामुळे हिंदुस्थानचा युरोपशी जलद व स्वस्त संपर्क शक्य झाल्याने व्यापारवाढीला बरकत आली होती. रेल्वेमुळे दूर अंतरावरच्या प्रदेशातून धान्य, बी-बियाणे, कापूस आणि इतर उत्पादनांच्या वाहतुकीची सोय उपलब्ध झाल्याने देशांतर्गत व्यापाराला चालना मिळाली होती. भांडवल बाजारामुळे उपलब्ध होणारा वित्तपुरवठा व्यापार व औद्योगिक उत्पादनवाढीला प्रेरक ठरत होता. निरनिराळ्या आधुनिक जलसिंचनप्रकल्पांमुळे बागायतीकरणाला प्रोत्साहन मिळत होते. कायदा, सुव्यवस्था व कार्यक्षम प्रशासन यामुळे राजकीय स्थैर्याचे वातावरण होते. लोकसंख्या प्रमाणाबाहेर फुगली नसल्याने लोकांच्या उत्पादनक्षमतेत आणि खरेदीक्षमतेत वाढ झाली होती. अर्थव्यवस्थेला असे पोषक वातावरण असल्यामुळेच विसाव्या शतकात भारताच्या लोकसंख्येत अतिरेकी वाढ झाली नाही, आणि लोकांचे जीवनमान सुधारले असा अभिप्राय भारताचे तत्कालीन जनगणना आयुक्त जे. ए. बेन्स यांनी नोंदवला आहे. ते म्हणतात,

".. that relatively to its means of subsistence, India is not over-peopled; that even in the favourable circumstances of the last ten years, the population has not increased in an undue proportion to those means, whilst the rates of increase, in its process of production and purchase, indicate a general rise in the well-being of the community at large." - J. A. Baines.

विसाव्या शतकातील आर्थिक स्थित्यंतराचा तपास करताना अनुक्रमे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था, औद्योगिक आणि नागरी अर्थव्यवस्था, शासनाचे राजकोषीय धोरण व महसूलव्यवस्था, चलनपद्धती, बँका, विमाव्यवसाय असे स्थूल वर्गीकरण करून तथ्यांची मांडणी व विश्लेषण करावयाचे आहे. सर्वप्रथम शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा परामर्श घेऊ या.

## ४.३. शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था :

महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा मागोवा घेताना कृषिकेंद्री अर्थकारणाला केंद्रस्थानी ठेवूनच पुढे जावे लागते. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या व उपजावू जमिनीवरील लोकसंख्येचा भार लक्षात घेता कृषिकेंद्री अर्थकारण हे महाराष्ट्राच्या अर्थकारणाच्या गाभास्थानी होते. १९४१ च्या जनगणनेनुसार मुंबई प्रांताची लोकसंख्या

२,९५,०६,९६८ होती. त्यापैकी ६८.९ टक्के लोक (२,४७,८५,९०१) शेतीव्यवसायावर अवलंबून होते. त्यातील १३.१ टक्के लोक (३२,५५,४६२) शेतमजुरी करणारे होते. मध्यप्रांत-वऱ्हाडची एकूण लोकसंख्या १,९१,३१,६१५ होती. त्यापैकी ८६.५ टक्के लोक (१,८३,७०,१९४) शेतीवर अवलंबून होते. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत युरोपप्रमाणे बिगरशेती भांडवली उद्योगांचे प्राबल्य नसल्यामुळे शेती कसणारे शेतकरी, तसेच ग्रामोद्योग व कुटिरोद्योग करणारे कारागीर यांच्याशी केंद्रित अर्थव्यवहार असल्याने या तपासास अग्रक्रम देणे क्रमप्राप्त आहे.

येथे 'शेतकरी म्हणजे स्वत: अथवा आपल्या कुळांमार्फत जमिनीची लागवड करून तिच्या उत्पन्नावर उपजीविका करणारा माणूस' अशी प्राथमिक व्याख्या गृहीत धरली आहे. तसेच शेतकऱ्यांचे चार वर्ग प्रमाण मानले आहेत :

१. जमीनदार : मोठ्या जमिनीची मालकी धारण करणारा संपन्न शेतकरी. मोलाने माणसे लावून आणि / किंवा कुळाने-खंडाने जमीन कसण्यास देऊन शेतीतून उत्पन्न काढणारा जमीनदार.
२. खंडकरी : दुसऱ्याची जमीन खंडाने घेऊन त्यावर उत्पन्न मिळवणारा शेतकरी.
३. कूळ : जमिनीचे छोटे तुकडे खंडाने घेऊन शेती कसणारा लहान शेतकरी. कूळवहिवाटीची शाश्वती नसल्याने शेतात भांडवली गुंतवणूक करीत नाहीत. घरची माणसे कूळवहिवाटीने घेतल्या जमिनीत कष्ट करून उत्पन्न काढतात व मालकाशी झालेल्या करारानुसार उत्पन्नाचा वाटा स्वीकारतात.
४. मिरासदार : स्वत:ची जमीन स्वत:च कसणारा शेतकरी.

शेतीचे "भांडवल" म्हणजे शेती कसण्यासाठी लागणारे अवजारे, बैल व इतर गुरे, बी-बियाणे, खते, पाणीपुरवठा, इंधन आणि शेतीत काम करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या मेहनतान्यासाठी द्यावे लागणारे मोल, असा गृहीत धरण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील कृषिक्षेत्र :**

महाराष्ट्राचा भूभाग लाव्हारसापासून तयार झालेला असून दऱ्याखोऱ्यांचा भूप्रदेश बराच आहे. नद्यांकाठच्या जमिनीची पाणी ग्रहणक्षमता जास्त असल्याने हा भाग सुपीक असतो; मात्र डोंगरउतारावरच्या जमिनीची पाणी ग्रहणक्षमता कमी असल्याने व जमीन मुरमाड असल्याने फारसे उत्पन्न काढता येत नाही. १९५० पर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीवरून पर्जन्यमान समुद्रकिनाऱ्यालगत १०० इंच, सह्याद्रीच्या शिखरांवर २५० इंच सह्याद्रीच्या रांगा ओलांडल्यावर १५ मैलांपर्यंत ५० इंच आणि त्यापुढे केवळ १५ इंच असे विषम होते. याचा पिकांवर परिणाम होतो.

<u>**कोकण**</u> : कोकणातल्या जमिनीला उतार फार असल्याने पाणी ग्रहणक्षमता कमी आहे. डोंगराळ जमीन असल्याने पोफळी, नारळ, आंबा, काजू व भातशेतीखेरीज इतर

पिकांसाठी फारशी अनुकूल नाही. कोकणातल्या जंगलातून करमळ, कोकम, कढीलिंब, जांभूळ, उंबर, कर्दळी, व रानसुरण इत्यादी कंदमुळांचे उत्पन्न मिळते. रत्नागिरी जिल्ह्यात ८५०० एकर जमिनीवर आंब्याच्या बागा, ४९०० एकर जमिनीत काजूच्या बागा आहेत. सुमारे २३,००० टन आंबे आणि ६७०० टन काजूचे उत्पादन होते. ठाणे जिल्ह्यात २७०० एकर केळीच्या बागा असून सुमारे ३६,००० टन केळींचे उत्पादन होते.

**पश्चिम महाराष्ट्र** : एकूण भूक्षेत्रापैकी ५७% लागवडीखालील जमीन २०,८८७ एकर; त्यापैकी बागायती क्षेत्र (६४%) १३२७ एकर आणि जंगल १६% भूक्षेत्रावर पसरले आहे. महाबळेश्वर, पाचगणी,मावळ भागात जमीन कडक दगडाची आहे. त्यामुळे तिथे विहीर बागायतीला फारसा वाव नाही. कृष्णा नदीच्या खोऱ्यात ४ लक्ष एकर जमिनीला पाटाचे पाणी दिले जाते. या खोऱ्यात १८७४ साली खडकवासला धरण झाले. त्यातून १६,६०० एकर जमीन ओलिताखाली आली. १९२८ साली भाटघर धरण झाले, या धरणामुळे १,७०,००० एकर जमीन ओलिताखाली आली. स्वातंत्र्योत्तर काळात कोयना धरणाखाली सातारा जिल्ह्यातील १,६१,००० एकर जमीन ओलिताखाली आली. भोगावती नदीवर राधानगरी धरणामुळे १५,००० एकर जमीन ओलिताखाली आली. पश्चिम महाराष्ट्रात ज्वारी, बाजरी, द्विदल धान्ये, तांदूळ, गहू, कापूस, भुईमुग, उसाचे पीक घेतले जाते. राज्यातल्या एकूण ऊसापैकी ९१% ऊस पश्चिम महाराष्ट्रात होतो. ज्वारीचे उत्पादन वार्षिक ११ लाख टनापर्यंत होते. महाराष्ट्रातल्या एकूण उत्पादनापैकी गव्हाचे ३४% उत्पादन, कापसाचे २२% उत्पादन आणि तंबाखूचे ८५% उत्पादन पश्चिम महाराष्ट्रात होते.

**खानदेश/ उत्तर महाराष्ट्र** : खानदेशात सातपुड्याच्या पर्वतरांगात जंगलाचा भाग आहे.या जंगलातून आवळा, हिरडा, चारोळी, गोरखचिंच, कवठ, बेल, साग इत्यादी वनस्पती आढळतात. पश्चिम महाराष्ट्राच्या खालोखाल खानदेशात कापूस व गव्हाचे उत्पादन होते. गिरणा-तापी-पांझरा या नद्यांच्या पाण्यावर व विहिरींवर बागायती पिके घेतली जातात. गोदावरीच्या खोऱ्यात नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात ऊस, द्राक्षे, डाळिंबाचे नगदी पिके घेतली जातात. याखेरीज उत्तर महाराष्ट्रात भात, बाजरी, गहू, भुईमुग, हरभरा पिकवण्यात येतो.

**विदर्भ** : विदर्भात ३०% भागात जंगल असून ५०% जमीन लागवडीखाली आहे. त्यापैकी बागायतीचे क्षेत्र ५.५% आहे. सरासरी ४१ इंच पाऊस पडतो. वऱ्हाडातल्या ८ जिल्ह्यातील जमीन काळी व सुपीक असून ज्वारी व कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. १८२५-२६ साली पेस्तनजी या पारशी सावकाराने वऱ्हाडचा कापूस बैलगाडीने मुंबईस पाठवला होता. त्यानंतर रेल्वेची सोय झाल्याने वऱ्हाडातले कापूस उत्पादन वाढले. १९०२ साली वऱ्हाडातल्या एकूण शेती उत्पादनात कापसाचा वाटा ३२

टक्के होता. १९०७-०८ सालात तो ४३ टक्क्यांपर्यंत वाढला.१९०६ साली बुलडाणा जिल्ह्यातून १,००,०७४ रुपयांचा कापूस निर्यात झाला; १९०७ साली अकोला जिल्ह्यातून २,४९,००००० रुपयांचा व अमरावती जिल्ह्यातून २,५९,००००० रुपयांचा कापूस निर्यात झाला. (वक्काणी २००३, पृ. २७२) १९०३ व १९०८ साली अकोल्यात दोन कापडगिरण्या उघडण्यात आल्या. १९२५ सालात अचलपूरला कापड गिरणी सुरू झाली. १९२५ पासून विदेशी कापडावरील चुंगीकर काढून टाकल्याने कापडगिरण्यांची आर्थिक स्थिती सुधारली, त्याचा अप्रत्यक्ष लाभ वऱ्हाडातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना झाला. याखेरीज कापसाच्या उत्पन्नावर आधारित ग्रामोद्योगही विर्भात चालत होते. अकोला जिल्ह्यातील अकोट व बाळापूर येथे सतरंज्या व पटके तयार होत. वाशीम व कारंजा येथे साड्या ब्लँकेट तयार होत. मेहकरला धोतरजोड्या व डोणगावला पगडी, पटके, ८ वारी पालळे (बांड) बनत. भंडारा जिल्ह्यात पवनी येथेही हातमागावर कापड विणले जात असे. १९११ साली अमरावती जिल्ह्यात २८८ लोकरीचे माग चालत. धनगर लोक मेंढ्यांच्या लोकरीचे स्वेटर व घोंगड्या विणीत. १९३० साली जागतिक मंदीमुळे विदर्भातला विणकरांच्या उद्योगाला फटका बसला. मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून पुन्हा एकदा हातमाग उद्योगाची आर्थिक स्थिती सुधारली. (वक्काणी, २००३, पृ. २५६) नागपूर व भंडारा जिल्ह्यातील जमीन काळी व रेताड असून चांद्याची जमीन तांबडी व रेताड आहे. भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यात भातशेती होते. राज्याच्या गव्हाच्या एकूण उत्पादनापैकी ४०% गहू व ५६% कापूस विदर्भात पिकवला जातो. विदर्भात ज्वारीचे वार्षिक उत्पादन सरासरी ९.५ लाख टन होते. नागपूरात २४,००० एकर जमिनीत संत्र्यांची लागवड असून वार्षिक उत्पादन १ लाख टनांपर्यंत होते. याखेरीज विदर्भात तेलबियांचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर केले जाते. त्यामुळे विदर्भात अनेक ठिकाणी बैलांद्वारे तेलघाणे चालविण्याचा ग्रामोद्योग विकसित झाला होता. शेंगदाणे, जवस, तीळ, करडईच्या बियांपासून तेल गाळण्यात येई. १९११ मध्ये अमरावती जिल्ह्यात ५५८ तेलघाणे होते. मेहकरला साबू कारखाना होता. (वक्काणी, २००३, पृ. २५९) अमरावती, चंद्रपूर आणि बुलढाण्यातील मलकापूर तालुका मिरची उत्पादनासाठी प्रसिद्ध होता.

विदर्भात जंगलसंपत्तीचा वाटा महत्त्वाचा मानला जातो. भारताच्या ६.७ टक्के वनभूमी विदर्भात आहे. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात ३३२५ चौ. मैलांचे क्षेत्र जंगलव्याप्त आहे. सागवान व बांबूचे उत्पादन देणारा हा प्रदेश आहे. १९०५-१९०६ साली जंगलापासून प्राप्त झालेल्या राजस्वाची खालील आकडेवारी नमुन्यादाखल लक्षात घेता येईल :

| | |
|---|---|
| भंडारा : ६२,००० रु. | चंद्रपूर : १,५३,००० रु. |
| नागपूर : ९२,००० रु. | वर्धा : ४०,०००रु. |

विदर्भात जंगलातून तेंदूपाने मिळत असल्याने नागपूर, भंडारा, तुमसर येथे बिडी उद्योग चालत असत. भंडारा जिल्ह्यात तसेच अमरावतीत तांब्या-पितळेची भांडी बनविण्याचे लघु-उद्योग होते. नागपूर व चंद्रपूरला चिनी-मातीची भांडी बनविली जात.

विदर्भात खनिज संपत्तीही बरीच आहे. चंद्रपूर जिल्ह्यात दहा हजार चौ. मैल क्षेत्रात दगडी कोळसा आहे. यवतमाळ जिल्ह्यात वणी तालुक्यात भूगर्भात २१०० मिलियन टन कोळशाची उपलब्धी आहे. नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातून महाराष्ट्राला ५०० कोटी टन कोळसा मिळतो. नागपूर व भंडारा जिल्ह्यात मँगनीझ उपलब्ध आहे. १९०५ साली भंडारा जिल्ह्यातले मँगनीझ उत्पादन ३५ हजार टनांपर्यंत गेले होते. १९०१ साली खाणींविषयी कायदा करण्यात आला होता. या कायद्यान्वये पुरेसा कृत्रिम प्रकाश असल्याशिवाय भूगर्भात खाणकाम करता येणार नाही असा निर्बंध लागू झाला. (वक्काणी, २००३, पृ. २६०-२६३)

विदर्भात दुष्काळाच्या काळात मात्र शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची बनत असे. १८९९-१९०० सालचा दुष्काळ भीषण होता. विसाव्या शतकात देखील अधून मधून दुष्काळाचे सावट येई. १९१६-१७ साली अतिवृष्टीने ओला दुष्काळ पडला होता. त्यावेळी शेतसारा स्थगित करावा यासाठी संघटनात्मक प्रयत्न झाले. 'यवतमाळ डिस्ट्रिक्ट आसोशिएशन'ने शेतकऱ्यांकडून पिकांचे तक्ते भरवून घेतले व त्या आधारे सरकारला शेतसारा स्थगित करण्यासंबंधी निवेदन सादर केले. शासनाने १६३ गावांचा संपूर्ण शेतसारा व २१९ गावांचा निम्मा शेतसारा स्थगित केला. मात्र वणी गावाचा शेतसारा मुळीच स्थगित केला नाही; या गावाने शेतसारा भरण्याचे नाकारून एकतर्फी दबाव निर्माण केला. त्यामुळे सारा भरेपर्यंत सरकारने या गावाला तगाई (कर्ज) दिली नाही. १९२०-२१ साली १८९९-१९०० इतकाच भीषण दुष्काळ पडला. त्याच वेळी शासनाविरुद्ध असहकाराची चळवळ जोरात होती; यावेळी शासनाने बुद्धिपुरस्कर यवतमाळ जिल्ह्याला दुष्काळग्रस्त प्रदेशातून वगळले. यवतमाळ डिस्ट्रिक्ट आसोशिएशनने सारास्थगितीसाठी जिल्हाधिकाऱ्यामार्फत सरकारला विनंती अर्ज करूनही उपयोग झाला नाही. तेव्हा जोपर्यंत शेतकऱ्यांच्या अर्जाचा विचार होत नाही तोपर्यंत शेतसारा न भरण्याचा संघटनेने निर्णय घेतला. अखेरीस शासनाने शेतसारा वसुली स्थगित करून तगाई देण्याचे मान्य केले. १९२३-२४ साली यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले, तेव्हाही या असोशिएशनने प्रयत्न करून शेतसाऱ्याला स्थगिती मिळवली. १९२५-२६ सालात पुन्हा यवतमाळ व अमरावती जिल्ह्याला अतिवृष्टीचा फटका बसला. कापसाचे भाव उतरले.

शेतसारा भरू न शकल्याने सरकारने शेतकऱ्यांना तुरुंगात टाकले. यावेळीही जनांदोलन झाले, पण त्याचा उपयोग झाला नाही.

१९३१-३२ साली एकीकडे जागतिक मंदीचा फटका बसला असतानाच अतिवृष्टीमुळे विदर्भातला शेतकरी हवालदिल झाला. यवतमाळ डिस्ट्रिक्ट आसोशिएशनने सरकारकडे शेतसारा माफ करावा, वनचराई मुक्त करावी व शेतकऱ्यांना तगाई द्यावी अशा तीन मागण्यांचे निवेदन दिले. या मागण्या धसास लावण्यासाठी १९ परगणा परिषदांचे संमेलन घेतले. ३१ डिसेंबर १९३१ रोजी बापूजी अणे यांना अटक करण्यात आली; तरीही शेतकऱ्यांनी परिषद भरवून आपला निर्धार व्यक्त केला. १९३८-३९ च्या अवकाळी पावसामुळे पिकांची नासाडी झाली. यवतमाळ जिल्ह्यातील कोठा येथे शेतकरी परिषद भरली व शेतसारा स्थगित करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे सरकार असूनही शेतसारा स्थगित होण्याची कारवाई होत नाही, हे पाहून कौन्सिल सदस्य अण्णासाहेब जतकर यांनी काँग्रेसच्या बैठकीत आंदोलन करण्याचा इशारा दिला. तेव्हा दीड लाखाचा शेतसारा स्थगित करण्यात आला. १९४२ च्या दुष्काळामुळे धान्याच्या किंमती भडकल्या. नागपूरचे कामगार पुढारी रामभाऊ रूईकर यांनी कामगारांसाठी स्वस्त धान्याची दुकाने उघडण्याची मागणी केली. एकूण विदर्भात नैसर्गिक संपत्ती अनुकूल असली तरी दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी अशा अस्मानी संकटांचे आवर्त सुरू राहिल्याने सतत शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.

**मराठवाडा :** मराठवाड्यात ३.२% जमिनीवर जंगल असून एकूण जमिनीच्या ७३.५ % म्हणजे ११,९८३ एकर जमीन लागवडीखाली होती. त्यापैकी बागायती क्षेत्र फक्त २.५ % आहे. बाकीची जमीन कोरडवाहू होती. चराऊ रानाचे क्षेत्र ४.३% होती. पर्जन्यमान सरासरी २७ ते ३३ इंच असून ज्वारी, गळिताची धान्ये व कापूस ही मुख्य पिके होत. ज्वारीचे उत्पादन वर्षाला सरासरी ७.५ लाख टन होते. राज्याच्या गव्हाच्या उत्पादनापैकी ३५% गहू आणि २३% कापूस मराठवाड्यात पिकवला जातो. उस्मानाबाद, नांदेड, परभणी व औरंगाबाद जिल्ह्यात तुरीचे व उस्मानाबाद, नांदेड जिल्ह्यात हरभऱ्याचे पीक घेण्यात येते.महाराष्ट्रातील भुईमुगाच्या ४०० हजार टन उत्पादनापैकी २८२ हजार टन भुईमुग मराठवाड्यात होतो. तिळाचे उत्पादन सुमारे ६ हजार टनापर्यंत होते.

शेतीव्यवसायाचे यशापयश हे मनुष्य आणि गुरांच्या श्रमशक्तीवर अवलंबून असते. एकोणिसाव्या शतकात दुष्काळात व साथीच्या रोगात होणारी मनुष्यहानी आणि गुराढोरांचे मृत्यू याचा सर्वात जास्त फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसला होता; विसाव्या शतकातही या अनुभवाची पुनरावृत्ती झालेली दिसते. इ. स. १८५४ पासून इ. स. १९०० पर्यंत दुष्काळामुळे हिंदुस्थानातले २,८८,२५,००० लोक मृत्यूमुखी पडले होते.

पैकी १८७५ च्या दुष्काळात एकट्या महाराष्ट्रात साठ लाख लोक मृत्यूमुखी पडले होते. १९१८ साली दुष्काळ आणि एन्फ्लुएंझाच्या साथीत मुंबई आणि वऱ्हाड-मध्यप्रांतात २० लाख माणसे मेली. १८९९-१९०० सालच्या दुष्काळात व पाठोपाठ आलेल्या प्लेगच्या साथीत मुंबई इलाख्यातील मनुष्यहानीचे प्रमाण दरहजारी ८१.३२ होते; त्यात मृत्यूमुखी पडलेल्या शेतमजूरांची संख्या १९,१२,००० होती. १९१८-१९ सालच्या दुष्काळात व पाठोपाठ आलेल्या कॉलऱ्याच्या साथीत मनुष्यहानीचे प्रमाण हजारी २९.७२ होते व त्यात शेतमजुरांची संख्या ७,०६,००० होती. १९१८-१९ च्या दुष्काळात कृषी-उपयोगी जनावरांच्या संख्येत विलक्षण घट झाली. पुणे जिल्ह्यात १९.५%, नाशिक जिल्ह्यात १८.९% अहमदनगर जिल्ह्यात १७.३%, पश्चिम खानदेशात १३.४% गुरांची संख्या कमी झाली. अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात ६४.५%, पारनेर तालुक्यात ४६%, श्रीगोंदा तालुक्यात ४०%; पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात ५२%, खेड तालुक्यात ३५%; आणि पश्चिम खानदेशातील नंदुरबार तालुक्यात ५९% गुरांची हानी झाली. (इंडियन फेमिन कमिशन,१९०१, खंड १, पृ. १८१; ब्रह्मा नंद, १९८९,पृ. ६५) हे नुकसान सहजासहजी भरून काढता येत नसे. अर्थात पाऊस कमी पडला तरी दुष्काळाच्या झळांची तीव्रता कमी होण्यासाठी पुरेसी दक्षता न घेतल्यानेही हा फटका अधिक बसला होता. दुष्काळ मनुष्यनिर्मितही असतो, तो या अर्थाने! वासाहतिक राजवटीत पडीत जमिनी उपजावू करण्याच्या शासकीय धोरणामुळे चराऊ कुरणांची व चाऱ्याच्या क्षेत्राची घट झाली, परिणामत: दुष्काळात प्राण्यांची उपासमार झाली. ज्या पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या त्या फारशा सुपीक नसल्याने व्यापारी पिकांसाठी उपयोगी नव्हत्या व इतर पिकांचाही उतारा फारसा नसल्याने उत्पादनातही फारशी भर पडली नाही. वासाहतिक राजवटीत शेतीचे उत्पन्न वाढविण्याला प्राधान्य देण्याचे धोरण जरूर होते; परंतु त्यासाठी स्थानिक पर्यावरणाचा आणि शेतीविकासाचा परस्परानुबंध फारसा लक्षात घेतला गेलेला दिसत नाही. उदाहरणार्थ, हिंदुस्थानात स्थूलमानाने काळी माती, लाल माती, गाळाची जमीन, जांभा दगडाची जमीन असे मातीचे प्रकार असले तरी स्थळविशेषानुसार मातीचे जैविक, भौतिक गुणधर्माचे परीक्षण होणे गरजेचे होते. अमेरिकेप्रमाणे हिंदुस्थानात व्यापक पातळीवर माती सर्वेक्षण झाले नसल्याने शास्त्रीय पद्धतीने पीक नियोजन करता येत नव्हते. पिकनियोजनाच्या अभावामुळे शेतीच्या उत्पन्नवाढीला मर्यादा आल्या होत्या. मुंबई इलाख्यात लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र २,७५,१०,००० एकर होते. त्यापैकी फक्त ९,३८,००० एकर बागायती क्षेत्र होते. म्हणजे एकूण लागवडीखालील जमिनीपैकी फक्त ३.२% क्षेत्र बागायती आणि उर्वरित ९६.८% शेती कोरडवाहू किंवा पावसाच्या पाण्यावर अवलंबून होते. त्यामुळे कोरडवाहू जमीन विकासाला प्राधान्य देणाऱ्या कृषी धोरणावर इथल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा

विकास अवलंबून होता, हेही लक्षात घ्यायला हवे. तशात ब्रिटिश अमदानीत १८५४ ते १९०० पर्यंत जवळपास लहानमोठे ४६ दुष्काळ पडले होते; त्यामुळे शेतीव्यवसायात अनिश्चिततेचे सावट किती होते, हे लक्षात येते.

दुष्काळ हे अस्मानी संकट की मनुष्यनिर्मित संकट अशी चर्चा विसाव्या शतकातही काही विचार होत होती, त्याची नोंद घेतली पाहिजे. १९१८ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शं. रा. भागवत लिहिताल, "खेडेगाव सुधारण्यासाठी व्याख्याने, सहकारी पतपेढ्या वगैरे जे अनेक उपाय आहेत त्या सर्वांच्या मागे एक मनुष्य पाहिजे. यासाठी सर्व्हंटस ऑफ इंडिया सारखी वजनदार संस्था स्थापिली पाहिजे, संस्थेतर्फे उत्तम शांतवृत्तीचा मनुष्य पाहिजे. तो पगारी व आजन्म सेवक असावा." [भागवत, कित्ता, पृ. २०] (हिंद सेवकांनी ग्रामपातळीवर केलेल्या अशा काही उपक्रमांचा आढावा राजकीय स्थित्यंतर या प्रकरणात स्वतंत्रपणे घेण्यात आला आहे, तोही पाहावा.)

शेतीचा विकास भौतिक आणि तांत्रिक या दोन्ही बाबींवर अवलंबून असतो. त्यामुळे या क्षेत्रातील स्थितीगतीचा तपास करताना नैसर्गिक घटिते, वासाहतिक राजवटीचे कृषी-धोरण, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या घडामोडी आणि कृषिसमाजाच्या सांस्कृतिक धारणा व परंपरांचा विचार लक्षात घ्यावा लागतो. १९०१ ते १९५० या कालखंडातील शेती व ग्रामोद्योगांच्या अर्थव्यवस्थेचा तपास करण्यासाठी पथदर्शक म्हणून अनुक्रमे १०२० साली सर विश्वेशरय्या यांनी तयार केलेला ग्रामीण पुनर्घटनेचा आराखडा, १९२३ साली हिंदुस्थान सरकारने शेती आणि ग्रामकेंद्री अर्थव्यवस्थेच्या संदर्भात नेमलेल्या रॉयल कमिशनचा अहवाल, आणि या पन्नास वर्षात राष्ट्रीय काँग्रेसने वेळोवेळी नेमलेल्या समित्यांचे अहवाल व ठराव हे पायाभूत आधार म्हणून लक्षात घेतले आहेत. या पथदर्शक संदर्भस्त्रोतांचा गोषवारा असा :

**सर विश्वेश्वरय्यांचा प्रस्ताव :**

१९२० साली सर विश्वेश्वरय्या यांनी "Restructuring India" नामक पुस्तकातून भारताच्या आर्थिक-सामाजिक पुनरुत्थानासाठी कृति-कार्यक्रम सुचविला होता. या पुस्तकात त्यांनी तत्कालीन भारतीय शेतीची जपान, रशिया, युरोप, अमेरिकेतील शेतीव्यवसायाशी तुलना करून यापुढे भारताला कृषिविकासासाठी कुठल्या प्रस्थानबिंदूपासून सुरुवात करायला हवी, याची चर्चा केली होती. जपानचे उदाहरण घेतल्यास त्यावेळची तिथली लोकसंख्या ५,६०,००००० होती आणि लागवडीखालचे क्षेत्र १,७०,००००० एकर होते. याचा अर्थ तिथे दरडोई शेतजमिनीचे प्रमाण १/३ एकर पडत होते. त्याच वेळी भारतात लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र दरडोई फक्त १/६ एकर पर्यंत मर्यादित होते. युद्धपूर्वकाळात हिंदुस्थानातील बागायती पिकांसकट एकरी उत्पन्न २५ रुपयांपेक्षा जास्त नव्हते; जपानात मात्र एकरी उत्पन्न १५० रुपयांपर्यंत मिळत होते.

हिंदुस्थानातील शेतीच्या उत्पादकतेला इथल्या नैसर्गिक परिस्थितीची मर्यादा होती; ती टाळता येणे शक्य नव्हते. पावसाची अनिश्चितता व आधुनिक पाटबंधाऱ्यांचा पुरेसा विकास न झाल्याने ओलिताखाली येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र मर्यादित होते. पावसाच्या पाण्याखेरीज सिंचनव्यवस्था विहिरी आणि तलावाच्या पारंपरिक स्त्रोतांवर अवलंबून होती. आणि मुख्य म्हणजे जपान, युरोप, रशियाच्या प्रगत शेतकऱ्यांकडे शेतीविषयक जे विज्ञान-तंत्रज्ञानाचे पाठबळ होते ते आपल्या शेतकऱ्यांकडे नव्हते. इथला शेतकरी सरधोपट मार्गांनी शेती करणारा होता. त्याची मानसिकता पारंपरिक वळणाची असल्याने संधींचा फायदा घेणे, विकासाच्या नव्या वाटा शोधणे, शेतीसाठी नित्य नव्या ज्ञानाचा ध्यास घेऊन प्रयोग करणे हे कौशल्य अंगी मुरलेले नव्हते. इतर प्रगत देशांप्रमाणे इथल्या शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचे ज्ञान पुरविण्यासाठी सरकारी यंत्रणेने मोहीम हाती घेतलेली नव्हती. शेती खात्याची प्रशासकीय यंत्रणा स्थानिक शेतकऱ्यांशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करून नवे ज्ञान देण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहचली नव्हती. शेतकी शाळा-कॉलेजांची संख्या पुरेशी नव्हती आणि असलेल्यांचाही शेतकऱ्यांशी थेट संपर्क नव्हता. संघटित व सुरचित बाजारव्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारपेठीय स्पर्धेचा लाभ मिळत नव्हता. शेतमालाच्या विक्रिसाठी त्यांना स्थानिक दलाल आणि नफेखोर सावकारांच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागत असे. विश्वेश्वरय्यांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी काही उपाय सुचविले होते. देशाच्या कृषि खात्याने आपल्या प्रशासनपद्धतीत बदल करून ती अधिकाधिक लोकाभिमुख करावी, शेतकऱ्यांना तातडीची गरज म्हणून हंगामी पतपुरवठा करण्याची योजना कार्यान्वित करावी, उत्तम बियाणे, आधुनिक खते, शेतीची आधुनिक अवजारे उपलब्ध करून द्यावीत. कृषिउपयोगी जनावरांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून द्यावा. सकस बीजधारणेसाठी रेतनकेंद्रे उभारण्याचीही सूचना त्यांनी केली होती. जपानामध्ये प्रत्येक गावाला शेतकरी सहकारी सोसायटी असून ११ हजाराहून अधिक शेतकरी सोसायट्या होत्या, तसे सहकारी सोसायट्यांचे व खरेदी-विक्री संघांचे जाळे हिंदुस्थानात निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी शिफारस केली होती. (Vishvesvarya,1920,p.173-176)

### रॉयल कमिशनचा अहवाल :

१९२२-२३ ही वर्षे शेतीसाठी अनुकूल नव्हती. या काळात अन्नधान्याच्या किंमती घसरल्या. कापसाच्या नगदी पिकांचेही भाव उतरले. शेतमालाच्या विक्रीतून पुरेसा पैसा हाती येत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला. या पार्श्वभूमीवर हिंदुस्थान सरकारने १९२३ साली देशातल्या शेतीसंवर्धनासाठी लॉर्ड लिन्‌लिथगो यांच्या अध्यक्षतेखाली रॉयल कमिशन नेमले होते. ग्रामीण लोकांचे जीवनमान सुधारावे, त्यांना स्वावलंबी होता

यावे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढावा या हेतूने काही रचनात्मक कार्यक्रम सुचवावा हा रॉयल कमिशन नेमण्यामागचा मुख्य हेतू होता. [१] संपूर्ण भारताच्या ग्रामीण जनजीवनाचे वास्तव लक्षात घेऊन या कमिशनने १४ एप्रिल १९२८ रोजी आपला अहवाल सादर केला होता. मुंबई इलाखा आणि संयुक्त प्रांतापुरता या अहवालातील नोंदी आणि शिफारशींचा गोषवारा आपल्याला लक्षात घ्यावयाचा आहे. कमिशनने शेतजमिनीची उत्पादकता वाढविणे, शेती किफायतशीर होणे, त्यासाठी सुधारित बियाणे, खते, यांत्रिक अवजारे, आधुनिक पाटबंधारे, विजेचा व दळणवळणाच्या साधनांचा वापर वाढविणे, खेड्यातील लोकांचे जीवनमान उंचावणे, खेड्यातील लोकांची पारंपरिक मानसिकता बदलण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक वातावरणात आमुलाग्र बदल घडवून आणणे, सामाजिक संघटनेच्या पातळीवर परस्पर सहयोगातून सहकार चळवळीचा पाया घालणे, शेती संशोधनासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे इत्यादी अंगानी आयोगाने विस्ताराने सूचना केल्या होत्या. आयोगाच्या या अहवालाचा व शिफारशींचा जरूर तेथे संदर्भ घेत पुढील विवेचन करावयाचे आहे.

**राष्ट्रीय काँग्रेसचे शेतीविषयक धोरण :**

काँग्रेसचे शेतीविषयक धोरणही पार्श्वभूमी म्हणून लक्षात घ्यावे लागेल. १९२१ सालापासून शेतकी व पाणीपुरवठा ही दोन्ही खाती प्रांतिक सरकारच्या कार्यकक्षेत आणण्यात आली होती व या खात्यांच्या सरकारी धोरणांवर लोकमताचा प्रभाव पडत होता. किंबहुना काँग्रेसच्या वेळोवेळीच्या सूचनांची दखल घेऊन मुंबई प्रांतात शेतीव्यवसायाशी संबधित कायदे करण्यात आले होते, म्हणून ही पार्श्वभूमी लक्षात घ्यावयाची आहे. विशेषत: १९३६ च्या फैजपूर काँग्रेसने केलेले ठराव महत्त्वाचे आहेत. - शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीस स्थगिती देऊन नंतर कर्ज माफ करावे, शेतसारा आणि पाणीपट्टीत कपात करावी, सहकारी तत्त्वावर शेतीचा प्रयोग करण्यास प्रोत्साहन द्यावे, शेतमजुरांना जगण्यापुरती मजुरी देण्याचे आश्वासन द्यावे इत्यादींचा या ठरावात समावेश होता. महात्मा गांधींनी १९३७ साली 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वाचा पुरस्कार केला होता, 'सब भूमी गोपालकी' या तत्त्वानुसार जमिनीवर लोकांच्या सामुदायिक मालकीचा हक्क असल्याचे तत्त्व पुरस्कारले होते. १९४५ साली जवाहरलाल नेहरूंनी जमीनदारांना थोडी नुकसानभरपाई देऊन का होईना, पण जमीनदारी संपविली पाहिजे अशी भूमिका मांडली होती. मोठ्या जमीनदारांकडच्या जमिनीचे पुनर्वाटप केल्याने ग्रामीण भागातील गरिबी दूर होईल या मताचा एक गट काँग्रेसमध्ये प्रभावी होता. १९४६ च्या काँग्रेसच्या जाहिरनाम्यात शेतकरी आणि सरकार यांच्यातील दलालांचे उच्चाटन करण्याचा वचननामा घोषित केला होता. १९४७ साली नोव्हेंबर महिन्यात जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसने शेतीसुधारणेसाठी शिफारशी करण्याकरिता समिती

नेमली होती. या समितीने कमाल जमीन धारणा कायदा, तुकडेबंदी व एकत्रीकरण कायदा करण्याची शिफारस केली होती.

**सिंचन-स्थित्यंतर :**

१९ व्या शतकात पाणीपुरवठ्याचा अभाव असल्याने सिंचनक्षेत्र वाढले नव्हते; मात्र विसाव्या शतकात हिंदुस्थानातील शेतीची पारंपरिक सिंचनव्यवस्थेकडून आधुनिक सिंचनव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली होती. १९२१ ते १९२५ या काळात देशातल्या एकूण सिंचनव्यवस्थेपैकी निम्मे सिंचन पाटबंधारे प्रकल्पातून होत होते. उर्वरित सिंचन हे विहिरी, तळी आणि पारंपरिक जलस्त्रोतांतून होत असल्याचे हिंदुस्थान सरकारने नेमलेल्या रॉयल आयोगाने नमूद केले आहे. मात्र पश्चिमघाट प्रदेशातल्या पर्जन्यमानाच्या प्रमाणात मुंबई इलाख्यात पाणी साठवण्याचे मोठे धरण प्रकल्प झाले नसल्याने फार मोठी वित्तीय हानी होत आहे, हे वास्तव रॉयल आयोगाने नमूद केले होते. १८७९ साली पुण्यापासून दहा मैलांवर मुठा नदीवर खडकवासला धरण बांधण्यात आले होते. त्याची पाणीसाठवणक्षमता ३०९१ दशलक्ष घनफूट होती. या धरणामुळे १६,६०० एकर क्षेत्र ओलिताखाली आले होते. शिवाय पिण्याच्या पाण्यासाठी या धरणाचा उपयोग केला जाता होता. त्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्याला पाणी पुरवता यावे यादृष्टीने भाटघर डॅमचे काम सुरू करण्यात आले होते. १९२० साली भाटघर येथील लॉईड धरण बांधून झाले. २४,१९८ दशलक्ष घनफूट पाणीसाठवणक्षमता असलेल्या या धरणामुळे १,७०,००० एकर जमीन ओलिताखाली आली. परंतु हे अपवाद वगळता पंजाबच्या सतलज व्हॅली प्रकल्पासारखे मोठे प्रकल्प मुंबई इलाख्यात झाले नव्हते. पंजाबात १८८७-८८ साली २.३ दशलक्ष एकर जमीन ओलिताखाली होती व १९२५-२६ पर्यंत १०.४ दशलक्ष हेक्टर कृषिक्षेत्र ओलिताखाली आले होते. महाराष्ट्रात हे होऊ शकले नाही. या संदर्भात रॉयल कमिशनने आपल्या अहवालात म्हटले होते की,

"The object of irrigation in Bombay proper is mainly protection against, famine and only about 450,000 acres are irrigated from government works. With a very few exceptions, there is a heavy annual loss in their working. This is the more unfortunate as the rainfall of the Western Ghats which they utilise is unfailing." (Abridged Report, p. 36)

धरणांच्या विकासाबरोबरच पाणीवाटपाच्या कृतिकार्यक्रमावर व सिंचनक्षमतेवर भर देण्याची गरज होती. तसे न झाल्याने कोणते दुष्परिणाम झाले याविषयीचे नमुने विठ्ठलराव विखे पाटील यांच्या चरित्रांत नोंदवलेले आहेत, ते यासंदर्भात विचारात घेतले पाहिजेत. १९०१ साली विल्सन धरणाच्या बांधकामाला प्रारंभ झाला होता, १९२२-२३ पासून या धरणातून नगर जिल्ह्यातील बेलापूर, ओझर, लोणी या भागातील शेतीला कालव्याने पाणी

पुरवठा होऊ लागला होता, मात्र पाण्याचे दर सामान्य शेतकऱ्याला परवडणारे नव्हते. त्यामुळे धनवान शेतकऱ्यांच्या ऊसमळ्यांना फक्त या पाण्याचा लाभ होत होता. इतकेच नाही तर पाणी वापराच्या हव्यासापायी गरजेपेक्षा जास्त पाणी ओढून घेतल्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी तुंबल्या व अशा चिखलात पेरणी शक्य न झाल्याने उपजावू जमिनीही भाकड ठरू लागल्या. भांडवलदार कारखानदारांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करून धरणाच्या पाण्याचा एकतर्फी वापर सुरू केला. भंडारा धरण १२८२ फूट उंच, १६०० फूट लांब व १२०९ कोटी घनफूट पाण्याची साठवणक्षमता असलेले होते. या धरणातून ८१ मैल लांबीचे कालवे काढलेले होते व ८२,५६० एकर सिंचनक्षमता होती; पण लाभार्थी मात्र फक्त मोठे बागायतदार होते. याचे कारण पाण्याचा दर ४ रुपये, व पाटकरी ६ ते ८ रुपये चिरीमिरी घेतल्याशिवाय पाणी सोडत नसत. ज्या छोट्या शेतकऱ्यांनी महागाचे पाणी लावून गूळ घेतला, त्यांना पाणीपट्टीची थकबाकी भरता येणे जमेना; त्यांच्या जमिनी लिलावात निघू लागल्या. (साधू,२०१४, पृ. ७३, ९३) धरणे बांधून पाण्याचे साधनस्त्रोत वाढविले गेले तरी पाणी वापरासाठी लागणारा आचारधर्म पाळला गेला नाही, तर काय हाती पडते, याचे हे उदाहरण आहे. त्यामुळे गांधीजी म्हणत त्याप्रमाणे नैतिक उन्नयनाची जोड मिळाली तरच विकासाच्या साधनांचे वाटप व उपभोग समन्यायाने होऊ शकेल. राष्ट्राच्या भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक आचारधर्मासाठी लागणारी मनाची मशागतही तेवढीच महत्त्वाची असल्याचे या उदाहरणांवरून लक्षात येते.

शास्त्रीय पद्धतीने व समन्यायी मूल्यदृष्टीतून पाणीवाटपाची व्यवस्था उभारण्याची तातडीची गरज असल्याचे सरकारी आयोगाने म्हटले होते. तसे झाले तर पाण्याचा काटकसरीने वापर होईल व जलसिंचनापासून वंचित भागालाही पाणीपुरवठा करण्याच्या संधी विस्तारतील असा आयोगाचा अभिप्राय होता. त्यासाठी आयोगाने 'पाणीपंचायती' स्थापन करण्याचा सल्ला दिला होता. "The group spirit which the *panchayat* would create might remove these difficulties and develop the mutual confidence necessary for the successful management of the larger distributaries." (p.38) महाराष्ट्रात साठोत्तरी कालखंडात विलासराव साळुंखे यांनी 'पाणी-पंचायत' स्थापण्याचा यशस्वी प्रयोग केला, दिंडोरीला पाणी सोसायट्या स्थापन झाल्या. या भविष्यकालीन योजनांची नांदीच जणू या अहवालातून ध्वनित झालेली आहे.

मुंबई इलाख्याच्या तुलनेने संयुक्त प्रांतात शेतीसाठी सिंचनव्यवस्था चांगली होती. या प्रांतात विहीर बागायतीचे क्षेत्र ४५ लक्ष एकर इतके होते. भारतात ट्युबवेलींचा फारसा प्रसार झालेला नव्हता; परंतु संयुक्त प्रांतात मात्र अशा प्रकारच्या नलिका विहिरींसाठी शासकीय अनुदान योजना राबविण्यात आली होती. जवळपास निम्मे खर्च शासनाच्या अनुदानातून भागत होता. जमीन सुधारणा कायद्यांतर्गत कर्जयोजनेचा भाग म्हणून अशा

प्रकारचे वित्त साहाय्य तिथे उपलब्ध करून दिले जात होते. मुंबई प्रांतातही नलिका विहीरींसाठी बोअरिंग व पंपिंगचा खर्च आणि तांत्रिक साहायकाचा मेहनताना यासाठी अनुदान द्यावे, असे आयोगाने सुचविले होते.

१८७६ ते १९०१ या काळात मुंबई इलाख्यातील सिंचनक्षेत्रात २२ हजार एकरांची वाढ झाली. विहीर-बागायतीचे क्षेत्र काही प्रमाणात विस्तारले; पण दुबार पिकांचे क्षेत्र फक्त ४ टक्क्याने वाढले. खालील तक्त्यावरून दुबार पिकांच्या जमिनीच्या क्षेत्रविस्तारातल्या चढ-उतारांची कल्पना येते :

दुबार पिकांच्या चढ-उतारांची टक्केवारी

| वर्ष > | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ |
|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | १.६३ | २.५२ | १.२३ | २.७८ | ३.२३ | ४.५५ |
| खानदेश | १.०७ | ०.९८ | १.०८ | १.६८ | ३.४६ | ३.४५ |
| नाशिक | १.९१ | ३.०१ | २.३३ | ३.५८ | २.७१ | ४.१२ |
| पुणे | ३.८२ | ४.५० | ३.३७ | १०. ७३ | ११.४९ | ४.९४ |
| सातारा | ६.५८ | ७.८३ | ७.७९ | ५.९८ | ६.५० | ३.७८ |
| सोलापूर | २.४९ | १.४८ | १.४५ | १.७२ | १.६४ | २.३३ |
| बेळगाव | १.८१ | १.७६ | १.८६ | १.७६ | २.०० | ३.३३ |
| विजापूर | ०.३६ | ०.२४ | ०.११ | ०.२० | १.११ | १.२० |
| धारवाड | १.५१ | १.३९ | ०.७५ | १.१४ | १.९१ | २.२० |

(माहितीस्रोत : Agricultural Statistics of British India, 1891-1951; Brahma Nanda, 1989, p.77)

१९१४ ते १९१७ ही वर्षे पीकपाण्याच्या दृष्टीने चांगली होती. एम. बी. मॅकअल्पिन यांच्या मते १८६० ते १९२० या काळात बागायती क्षेत्रात वाढ झाल्यामुळे, उत्तम बियाण्यांचा वापर वाढल्याने, दर एकरी मजुरीचे दर घटल्याने, वहातुकीच्या खर्चात बचत झाल्याने, शेतमालाला बाजारभाव चांगले मिळाल्यामुळे, धान्योत्पादनापेक्षा नगदी पिके घेण्याकडे कल वाढल्यामुळे आणि जमीन महसूलाचे दर वाजवी राहिल्यामुळे शेतीच्या धंद्यात बरकत आली. (McAlpin,1983, pp. 144-160) या काळात महाराष्ट्रात २० लाखाहून अधिक एकर जमीन लागवडीखाली आली. पुणे जिल्ह्यात ज्वारीची पिके १८.१% नी वाढली. कोपरगाव तालुक्यात पाटाच्या पाण्यावर ऊसाचे पीक उत्तम आले. कोकणचा अपवाद वगळता शेतीची स्थिती सुधारली होती. (नील चार्लसवर्थ, १९८५, पृ. २१०-२१४; य.दि. फडके,१९८९, पृ. २- ५) युद्धकाळात जपानने कापडाची निर्यात वाढविल्याने हिंदुस्थानातल्या कापसाची मागणी वाढली. त्यामुळे खानदेश, वऱ्हाड,

गुजरातेतील शेतकऱ्यांनी कापूस पिकवण्याला प्राधान्य दिले. १९२१ साली वऱ्हाडात एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी ४८ टक्के क्षेत्रात कापसाची लागवड करण्यात आली होती. (फडके, १९९१, पृ. २२) १९१४ ते १९१९ या काळात मुंबई इलाख्यात ज्वारीचे भाव १३२% नी आणि संयुक्त प्रांतात १०२ % नी वाढले. अन्नधान्यापेक्षा नगदी पिकांचे भाव वाढल्याने कापूस, ऊस, तंबाखू ही पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. १९२१ ते १९३० या दशकात १९२४, १९२६ आणि १९२७ या वर्षात विदर्भात अतिवृष्टी झाली, हा अपवाद वगळता पाऊसपाण्याची तक्रार नव्हती. विदर्भातल्या अतिवृष्टीमुळे पिके चांगली आली नाहीत. १९२७ साली यवतमाळ जिल्हा टंचाईग्रस्त असल्याचे घोषित करण्यात आले व सारावसुली थांबविण्यात आली; पण त्याच वर्षी उत्तरार्धात पाऊस पडल्याने परिस्थिती सुधारली.

कृष्णा खोऱ्यातले शेतकरी आणि गोदावरी खोऱ्यातील अहमदनगर जिल्ह्यातले शेतकरी उसाचे पीक घेण्यात आघाडीवर होते. मात्र अतिरिक्त पाणी शेताबाहेर काढण्याची ड्रेनेज योजना नसल्याने जमिनीचा पोत खराब व्हायला सुरुवात झाली. खारफुटीचे प्रश्न (alkali lands) निर्माण झाले. १९३० च्या नोंदीनुसार अशा प्रकारची ४३ हजार एकर जमीन खराब झाली होती. हजारो वर्षांची शेतीची पूर्वपरंपरा असताना जमिनीचा कस उतरण्याचा प्रश्न प्रथमच निर्माण झाला होता. जलसिंचनाच्या आधुनिक स्थित्यंतराचा हा दृश्य परिणाम होता. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर कॅलिफोर्निया, इजिप्त देशातही ह्या स्थित्यंतराचे परिणाम दिसू लागले होते. याबाबतीत एफ. एच. किंग यांचा अभिप्राय लक्षात घेण्याजोगा आहे :

"It is a noteworthy fact that excessive development of alkalises in India as well as in Egypt and California, are the result of irrigation practices modern in their origin and modes and instituted by people lacking in traditions of the ancient irrigators who had worked these same lands thousands of years before. The alkali lands today, in their intense form, are of modern origin, due to practices which are evidently inadmissible whom our modern civilization and which in all probability were known to be so by the people whom our modern civilization has supplanted." (King,1907, p. 289 )

पाटाच्या पाण्यावर केली जाणारी शेती आणि पावसाच्या पाण्यावर केली जाणारी शेती यात मूलभूत फरक आहे. पावसाच्या पाण्यातून हळू हळू मातीत मिसळणारा प्राणवायू (ऑक्सिजन) मातीला कुठलीच हानी पोहचवील नाही; उलट मातीचे पोषणमूल्य वाढवतो. याउलट पाटाच्या पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण अतिशय कमी असते, शिवाय

चारीतल्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर नांगरलेल्या शेतजमिनीचा पृष्ठस्तर खरवडला जात असल्याने जमिनीची धूप होते. पडत्या पावसाचे पाणी जसे जमिनीत हळू हळू भिजते, मुरते तसे पाटाच्या वाहत्या पाण्याचे होत नाही. उलट जमिनीच्या पृष्ठस्तरावरील मातीचा थर वाहून जातो. परिणामत: जमिनीचा पोत उतरतो. जमीन खारवते आणि कालांतराने पूर्णत: नापीक होते. पाटाच्या पाण्यापेक्षा पावसाच्या पाण्यावर घेतल्या जाणाऱ्या भाताच्या पिकाचा उतारा आणि पोषणमूल्य चांगले असते असा सर्वसाधारण अनुभव आहे. या रहस्याचा उलगडा करताना इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या १९२६ च्या मुंबई अधिवेशनात अल्बर्ट हॉवर्ड यांनी म्हटले होते की,

"In the Orient, perhaps the most remarkable is the cultivation of the rice which has been developed by the people in the deltas of great rivers to a high degree of perfection and carried up the slops of valleys by means of system of irrigated terraces. The care and skill which have enable the cultivator to grow a semi-aquatic crop like rice on the steep hillsides of India and Ceylon and fail to command and attention and respect."

मुंबई इलाख्यातील कोकण किनारपट्टीत पर्जन्यमान जास्त असूनही जमीन सुपीक नसल्याने शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. अहमदनगर-सोलापूर जिल्ह्याच्या दुष्काळी पट्ट्यातही शेतीवर गुजराण करण्यात गावकऱ्यांची दमछाक होत असे. त्यामुळे या भागातील लोक रोजगार शोधण्यासाठी मुंबईला स्थलांतरित होऊ लागले. उपलब्ध आकडेवारीनुसार १९११ साली मुंबईच्या कापडगिरण्यातल्या १,२०,००० कामगारांपैकी ५८,००० कामगार एकट्या रत्नागिरी जिल्ह्यातले होते. या स्थलांतरितांमध्ये मराठा, कुणबी व महार जातीच्या माणसांचा भरणा असे. (रवींद्रकुमार, १९८३, पृ. २२२-२२३; फडके य. दि., उनि. पृ. ७)

रॉयल आयोगाने यासंदर्भात असेही सूचित केले होते की, नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत वापरून जे शेतकरी आपली जमीन ओलिताखाली आणू इच्छितात त्यांना शासनाने तंत्रज्ञानात्मक साहाय्य पुरवावे, व स्वतंत्र एजन्सीकडे हे काम सोपवावे. तसेच एजन्सीने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीने केवळ सल्लागाराचे काम करू नये, तर शिक्षकाची भूमिका घेऊन उपलब्ध पाण्यापासून जास्तीत जास्त पीक घेता यावे यादृष्टीने शेतकऱ्यांना शास्त्रीय जलसिंचनाचे प्रशिक्षण द्यावे. काही अपवाद वगळता भारतात अद्याप विंधन विहिरींचा (ट्युबवेल) प्रसार झालेला नव्हता; मुंबई इलाखाही त्याला अपवाद नव्हता. त्यामुळे आयोगाने ट्युबवेली बसविण्याच्या खाजगी प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याची सूचना केली होती. तसेच विहिरी, तलाव, नालाबंडिंग अशा लघुसिंचन प्रकल्पांना प्रोत्साहन

देऊन जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणली पाहिजे, अशी आयोगाने शासनाला शिफारस केली होती. कृषि अभियांत्रिकी विभागाने स्वस्त व कार्यक्षम पंप पुरविण्यासाठी, तसेच पंप दुरुस्तीचे तंत्रज्ञान व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष लक्ष पुरवायला हवे, अशी अपेक्षाही व्यक्त केली होती. शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठी विजेचा वापर वाढविण्यावरही आयोगाने भर दिला होता. इतकेच नाही तर शेतकी अधिकारी आणि जलअभियंता यांच्यातला परस्परसंवाद वाढविण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावेत असेही आयोगाने सुचविले होते. केंद्रीय स्तरावर ज्याप्रमाणे जलसिंचन मंडळ स्थापन करण्यात आले आहे, तसे जलसिंचनाच्या माहितीचे संकलन व प्रेषण करणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी व जलसंवर्धन आणि पाणीवाटपाच्या प्रश्नाला अग्रस्थान द्यावे अशी शिफारस आयोगाने केली होती.

**पिकसंवर्धन :**

पिकांचा उतारा वाढविण्याचे ढोबळमानाने तीन मार्ग आहेत. योग्य बियाण्यांची निवड, संकरित जातींना प्राधान्य आणि हवामानाशी समायोजित करता येणाऱ्या जातींचा पुरस्कार. स्थानिक पर्यावरणानुसार पिकांच्या संकरित जाती शोधण्यासाठी संशोधन व प्रशिक्षण यंत्रणा अद्याप विकसित झाल्या नसल्याने या काळात संकरित बियाणांचा हवा तेवढा प्रसार होऊ शकला नाही. कापसाची कंबोडिया जात किंवा तत्सम संकरित जातींचा प्रयोग झाला होता; परंतु अशा नव्या जातींचा प्रयोग व चाचणी केल्याशिवाय सार्वत्रिक उपयोग करणे धोक्याचे असते. असे धोके टाळण्यासाठी सरकारी पातळीवर उदासीनताच होती. कृषी खात्याने जाणिवपूर्वक प्रायोगिक शेतीचे प्रकल्प हाती घेतल्याची उदाहरणे आढळत नाहीत. तसेच सुधारित बियाण्यांचे वितरण करणारी सक्षम यंत्रणाही अद्याप निर्माण झालेली नव्हती. फुले अणि भाजीपाल्याचे बियाणे खाजगी दुकानदारांकडून वितरित होत असे; पण इतर बियाण्यांसाठी युरोपातल्याप्रमाणे पद्धतशीर बियाणेविक्री केंद्रे सुरू करण्याची कल्पना प्रत्यक्षात आलेली नव्हती. कृषी खात्याने ना नफा ना तोटा या तत्त्वावर अशी सुधारित बियाणे विक्रीची व्यवस्था निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा असे रॉयल कमिशननेही आपल्या अहवालात नमूद केले होते. (कित्ता, पृ. १२) याखेरीज सहकारी तत्त्वावर सुधारित बियाणे वितरित करण्याची मोहीम घेण्याची गरज होती. परंतु अशी यंत्रणा नसल्याने महाराष्ट्रात अपवादानेच सुधारित बियाण्यांचा वापर झालेला दिसतो. उदाहरणार्थ, भुईमुगाच्या स्पॅनिश व जपानी जातीच्या बियाणांचा वापर १९०३ साली फक्त ५७,००० एकर जमिनीत आणि १९१३ साली केवळ १,८१,००० एकर जमिनीत करण्यात आला. १९२६ साली कापसाच्या सुधारित बियाण्यांचा फक्त २२.७% वापर झाला. ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ या पिकांसाठी तर पारंपरिक बियाणेच वापरले जात होते. (कृषी खात्याचा वार्षिक अहवाल, १९१३-१४, पृ.

३,ब्रह्मा नंद,१९८९, पृ. ७६) रॉयल कमिशनच्या अहवालानुसार हिंदुस्थानात स्थानपरत्वे शेतीच्या मशागतीच्या वेगवेगळ्या पद्धती अस्तित्वात होत्या. देशातल्या एकूण उपजावू जमिनीपैकी ८०० लक्ष एकर जमिनीत तांदूळ, २४० लक्ष एकर जमिनीत गहू, ३३० लक्ष एकर जमिनीत ज्वारी-बाजरी, १८० लक्ष एकर जमिनीत कापूस, १४० लक्ष एकर जमिनीत तेलबिया, आणि १४० लक्ष एकर जमिनीत डाळींचे उत्पादन होत असे. गहू, तांदूळ, भुईमुग, ताग या पिकांइतकेच बाजरी, डाळी आणि तेलबियांची वेगळी पिके घेतल्यास मिळणारा फायदा शेतकऱ्यांच्या लक्षात आणून देण्याची यंत्रणा उभी राहिलेली नव्हती; त्यामुळे या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत होता. कोकणात पानथळ जमिनीत भाताचे पिक चांगले येत नसे तेथे एका शेतकऱ्याने गुलाबाची शेती करण्याचा पर्याय निवडून उत्पन्न वाढवले; (कुंटे, १९८५, पृ.१२) पण अशा प्रयोगांविषयी देवघेव करण्याची माध्यमे त्या काळात उपलब्ध नसल्याने पर्यायी पिके घेण्याचे प्रयोग झाले नाहीत.

पिकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी खतांचा वापर कसा करावा याविषयी शेतकऱ्यांना पुरेसे शास्त्रीय ज्ञान व प्रशिक्षण नव्हते. कोणत्या पिकासाठी कोणते खत वापरणे फायदेशीर राहील याचे मार्गदर्शन करणारी शासकीय यंत्रणाही अस्तित्वात नव्हती. सामान्यत: स्थानिक परिसरातल्या गाई-बैल-मेंढ्यांचे शेणखत वापरण्यावर भर होता. परंतु जळणासाठी शेणाच्या गोवऱ्यांचा वापर करण्याची परंपरा असल्याने सहजगत्या उपलब्ध होणाऱ्या नत्रखताचा पुरेपूर फायदा घेतला जात नसे. शेणाच्या गोवऱ्यांऐवजी कोळसा किंवा इतर स्वस्त पर्यायी इंधन वापरण्यासाठी लोकमानस तयार झालेले नसल्याने खतासाठी शेण राखून ठेवण्याकरिता खास प्रयत्न केले जात नसत. कंपोस्ट किंवा सिंथेटिक खत वापरण्याकडे शेतकऱ्यांचा कल नव्हता. सोनखताचा तर मुळीच वापर केला जात नसे. तेलबियांची शेती बऱ्यापैकी होत असे; पण नत्रखतासाठी तेलबियांची पेंड वापरण्याची पद्धत रूळलेली नव्हती. कोळशापासून शेतीला उपयोगी पडणारे अमोनिया सल्फेटचे जोड उत्पादन घेणे शक्य असले, तरी ते परवडणारे नसल्याने हा प्रयोग दुर्लक्षित राहिला होता. हाडांचा चुरा किंवा माशांपासून नत्र आणि क्षाराचे खत मिळते; पण त्यासाठीच्या गिरण्या सुरू करता याव्यात यासाठी सरकारच्या कृषि खात्याकडून ठोस प्रयत्न होत नव्हते. उलट हिंदुस्थानातून हाडांची निर्यात केली जात असे. १९१४-१५ मध्ये ९०.४ हजार टन हाडांची निर्यात झाली होती; १९२६-२७ सालात हे प्रमाण १०० हजार टनांपर्यंत वाढलेले दिसते. (रॉयल कमिशन अहवाल, १९२८, पृ. ९२) थोडक्यात, मातीचा कस वाढविण्यासाठी कुठलेच ठोस उपाय या कालखंडात झालेले दिसत नाहीत.

किडी आणि रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी जेवढी दक्षता घ्यायला हवी

तेवढी घेतली जात नव्हती. शेतजमिनीचे वाळवीपासून संरक्षण करण्यासाठी उपाययोजना केली जात नसे. जवळपास प्रत्येक पिकावर कुठल्या ना कुठल्या रोगाचे सावट असायचे. जोंधळ्यावर कणी, बाजरीवर हिंगा, गव्हावर तांबेरा, कडधान्यांवर भुरी, कापसाच्या बोंडावर लाल ढेकण्या, बटाट्यावर बांगडी, संत्रीवर पतंग, नारळी-पोफळीवर भुंगेरे, आंब्यातला खोड किडा किंवा भिरुड, पानवेलींवर टिंबा अशा किडींचा उपद्रव होत असे. तो थांबविण्यासाठी देशी उपाय म्हणून शेणामुताची राबडी, लसूण वा तंबाखूची पेस्ट यांचा काही शेतकरी वापर करीत असले, तरी त्याविषयीचे शास्त्रीय शिक्षण नसल्याने या उपायांची परिणामकारकता दिसत नव्हती. योग्य ती आधुनिक किटकनाशके वापरली जात नव्हती. सरकारी कृषि खात्याने किटकनाशक द्रव्यांचा वापर करण्यासाठी व किडींचा उपद्रव टाळणाऱ्या धान्य साठवण्याच्या पद्धतींविषयी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला नसल्याने शेतीच्या उत्पन्नात होणारी घट थांबत नव्हती. उंदीरघुशी आणि वन्यप्राण्यांच्या नासधुशीपासून बचाव करण्याकरिता सरकारने काहीसे औदार्याचे धोरण ठेवून शेतकऱ्यांना बंदुकी वा तत्सम साधनांच्या वापराचे परवाने देण्याची आवश्यकता असल्याचेही रॉयल कमिशनने सुचविले होते. (रॉयल कमिशन अहवाल,पृ. १४)

**पशुसंवर्धन व अवजारांचा प्रश्न :**

हिंदुस्थानातली शेती गुरांवर अवलंबून होती. नांगरणी, पेरणी, मालवाहातूक संपूर्णत: बैलांवर अवलंबून असे. शेतकऱ्याजवळ बैल नसेल तर नांगरणी-पेरणीपासून सर्व कामे अडून रहात. अर्थात मुंबई प्रांतात गुराढोरांची कमतरता नव्हती;मात्र तुलनेने पुष्ट व कसरतीच्या बैलांचा तुटवडा होता. एका पाहणीनुसार शेतीसाठी उपलब्ध गुरांपैकी २०% गुरे निरुपयोगी होती; १०% गुरे शेतीसाठी जेमतेम उपयोगी पडतील अशी होती. हरियाणा, पंजाबातले बैल किंवा काठेवाडच्या गीर गाईसारखे पशुधन महाराष्ट्रात नव्हते. धड्याकड्या गुरांच्या पैदासीसाठी लागणाऱ्या चांगल्या वळूंची कमतरता होती. रेतस्खलनाचे प्रमाण अल्प आणि दर्जा हिणकस असल्याने धष्टपुष्ट पशूंच्या पैदाशीला मर्यादा होत्या. रोडावलेली, अर्धपोटी जनावरे शेतातल्या नांगरणी, पेरणीला उपयोगी पडत नव्हती. किंबहुना दुबळी जनावरे चाऱ्याचा बराच साठा फस्त करीत असल्याने कामाच्या गुरांच्या खुराकावर त्याचा विपरीत परिणाम होत असे. उन्हाळ्यात दोनतीन महिने गुरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसे. दुष्काळाच्या फेऱ्यात चारा न मिळाल्याने अनेक गुरे मृत्युमुखी पडत होती. गावपातळीवर सहकारी तत्त्वावर राखीव कुरणे जोपासण्याची यंत्रणा नव्हती. उपलब्ध कुरणातला वा जंगलातला चारा कापून नेण्यासंबंधी नियमसंहिता अस्तित्वात नव्हती. जंगलातला चारा शेतकऱ्यांना उपलब्ध होईल अशी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा योजनाबद्ध प्रयत्न झालेला नव्हता. चाऱ्याच्या पुरवठ्यातल्या या

अनियमिततेचा फटका पशुधनाला बसत होता. १९०० ते १९२० या काळातल्या दुष्काळाच्या फेऱ्यामुळे महाराष्ट्रातील बैलांची संख्या घटली. १८१८-१९ साली पुणे जिल्ह्यात १९.५ टक्के, नाशिक जिल्ह्यात १८.९ टक्के, अहमदनगर जिल्ह्यात १७.३ टक्के, पश्चिम खानदेशात १३.४ टक्के पशुधन घटले. काही भागात तर नांगरणीच्या बैलांच्या संख्येत लक्षणीय घट झाली. अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात ६४.५ टक्के, पारनेर तालुक्यात ४६ टक्के, श्रीगोंदा तालुक्यात ४० टक्के; पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यात ५२ टक्के, खेड तालुक्यात ३५ टक्के; खानदेशातील नंदुरबार तालुक्यात ५९ टक्के पशुधन घटले. (Report of Famine Relief in Bombay Presidency During 1918-19) पडीक जमिनी आणि चराऊ कुरणांचा अभाव दुष्काळात पशूंची हानी होण्याचे महत्त्वाचे कारण होते. शेतीसाठी कसलेले बैल लागतात, त्याची कमतरता होती. पशुवैद्यक आणि पशुसंवर्धक शिक्षणाचा विस्तार झालेला नव्हता. धष्टपुष्ट जनावरांच्या पैदाशीसाठी रेतनकेंद्रे विकसित करण्याची योजना अद्याप कार्यान्वित झालेली नव्हती. त्यामुळे शेतीउपयोगी गुरांच्या श्रमशक्तीचा यथोचित वापर करून घेण्याला मर्यादा पडल्या होत्या. उत्तम पशुधन उपलब्ध व्हावे या हेतूने १९२३ साली सक्षम गुरांच्या प्रजननासाठी 'बॉम्बे कॅटल कमिटी' स्थापन करण्यात आली होती. अशा प्रयत्नांचे सातत्य व व्याप्ती वाढविण्याची गरज होती.

धष्टपुष्ट जनावरांच्या कमतेरतेइतकाच कृषिकर्मासाठी आधुनिक अवजारांचा अभाव हाही येथील शेतीव्यवसायाच्या विकासातला मोठा अडसर होता. नांगर, वखर, पांभर, कुदळ, पावडे, टिकाव, विळा, उपणण्याचे चाहूर-सूप अशी पारंपरिक अवजारे प्रचलित होती. यांत्रिक अवजारांचा प्रचार झालेला नव्हता आणि अशी अवजारे वापरण्यासाठी लागणारी सामाजिक मानसिकताही तयार झालेली नव्हती. विसाव्या शतकात थोड्याफार प्रमाणात लाकडी नांगराच्या जागी लोखंडी नांगराचा वापर सुरू झाला होता; पण सर्वच शेतकऱ्यांकडे लोखंडी नांगर होते, असे नाही. दख्खन प्रांतात १९१५ पर्यंत लोखंडी नांगरांची संख्या जेमतेम ४०,००० पर्यंत पोहचली होती. नव्याने विकसित झालेल्या पाटस्थळ क्षेत्रात उसाची लागवड झाल्याने ७८ पॉवर क्रशिंग मिल्स सुरू झाल्या होत्या. (मुंबई प्रांताचा १९२९-३० चा वार्षिक अहवाल, पृ. २६) हे अपवाद वगळता शेती क्षेत्र यांत्रिक उपकरणांपासून दूरच होते. कदाचित स्वस्त शेतमजुरांची उपलब्धी असल्यानेही यांत्रिक अवजारे वापरण्याचा पर्याय स्वीकारण्याची गरज भासत नसावी.

**शेतकऱ्यांची दु:स्थिती : प्रत्यक्षदर्शी वृत्तांत :**

पिकसंवर्धन व पशुसंवर्धनाच्या वरील विवेचनाच्या पुष्ट्यर्थ सातारा जिल्ह्यातील 'कसबे कुडाळ' गावच्या शेतीव्यवसायाचा एक प्रत्यक्षदर्शी वृत्तांत उदाहरणादाखल इथे उद्धृत करीत आहोत. १९०७ साली अहमदाबादला शेतकी प्रदर्शन झाले, त्यानिमित्त

कॉंग्रेसने ३६ प्रश्नांची प्रश्नावली पाठवून क्षेत्रीय वास्तव जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. मागविलेल्या माहितीला प्रतिसाद म्हणून सातारा जिल्ह्यातील तासगावचे कॉंग्रेस कार्यकर्ते रामचंद्र विनायक कुलकर्णी व जावलीचे नरहरपंत जोशी खर्शीकर यांनी ही माहिती संकलित केली होती. त्यातील 'कसबे कुडाळ' गावाचा प्रत्यक्षदर्शी वृत्तांत असा:

**"कसबे कुडाळ"**

"पर्जन्य बरा पडून खरीब ८ आणे व रब्बी ८ आणे पीक झाले. पिकांचा पुरवठा कमी आहे. शेतीसाठी जनावरे अगदी कमी असल्यामुळे शेतात मेहनत व पेरणी वेळेवर होत नाही. घात संपल्यावरही वारंगुळ्याचे साहाय्याने पेरणी होते. यामुळे पीक चांगले होत नाही. गाव खालसा असून शेतसारा एकंदर ७५६७ रु; पैकी इनामदाराकडे ३२६४; बाकी निव्वळ सरकार जमा रु. ४३०३. पैकी इनामजुडी १६६४ व जमीनबाब २६३९ रुपये. क्षेत्र एकर २६९७ पैकी बागायत २३० (फॉरेस्ट १५६, पड ४४३) किरकोळ पड खेरीज लागवड होणारी जमीन २०५० एकर. लोकसंख्या १९००, घरे ३०७, बैल २४८ व एकंदर जनावरे ७१८.

अबकारीपैकी अफू गांजाचा मक्ता ३१५ रुपये, दारूचा मक्ता ३००. गेल्यासाली दारूचा मक्ता ५०० रुपये होता. यासाली मक्ता घेणार कोणी नव्हते म्हणून कमी झाला. सालात दारूचा खप २००० रुपये होतो. तगाई रु. २५००, बाळा रामा तांबोळी यास २० रु. इन्कमटॅक्स द्यावा लागतो. कर भरण्यास लायक नाही. कर सुटण्याबदल अपीले केली परंतु दाद नाही. लोकल फंड रु. ४७३.

गावात शाळा असून मुले १०२ व मुली ३ शिकत आहेत.

रु. ४०० पिंपळेश्वर देवाचे बिनव्याजी लोकांस दिले आहेत. दस्त ऐवज खरेदी गहाणाचे पुष्कळ होतात. तगाईबद्दल १ पोट कुळाची जमीन खालसा झाली असोन नव्या शर्तीने दुसऱ्या कुळास लागण. मोकळे असलेले फॉरेस्ट १० वर्षांपूर्वी कापीव रानात सामील केल्यामुळे चारणीस मोफत रान नाही. फॉरेस्टात १ नंबर पास फीचा आहे. परंतु त्यात गवत बिलकूल नसते. यामुळे जनावरास चारण्याची सोय बिलकूल नसल्यामुळे जनावरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. हत्यारा अभावामुळे डुकरे व कोल्ही ऊस, शाळू, भुईमुग वगैरे पिकांचे नुकसान दरसाल ५०० रुपये पर्यंत करतात. शेकडा ५ ते ७ एकरास भरपूर खत घालण्यास पुरते. गावात भुईमूग पुष्कळ पिकतो. परंतु शेंगदाणा होऊन बाहेर विकावयास जातो. यामुळे तेलाचा पुरवठा होत नाही, रॉकेल जाळावे लागते. जनावरास पेंड परठिकाणाहून आणावी लागते. काड्याच्या पेट्या जपान, स्वीडनच्या २ पैशास मिळतात. मुंबईच्याही येतात.

कोष्टी लोक धंदा सोडून शेतकरी होत आहेत. व्यापारी वर्गही शेतकील सुख मानीत आहे.

दर बुधवारी बाजार भरतो. धने ३०००, भुईमुग ५०००, बडी ३००, हळद २५००, गूळ १००० रुपयांचा बाहेर जातो. मराठे-कुणबी-सोनार वगैरे दारूबाज आहेत. कुस्त्या करणारे लोक आहेत.दिवाणी, फौजदारी, मुलकी दावे फार चालतात. लोकांस भिकारी व्हावे लागते."

(गोखले पुरुषोत्तम,१९६६, पृ.६१-६२)

**कर्जबाजारी शेतकरी :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून शेतकऱ्यांच्या कर्जबाजारूपणाची समस्या तीव्र होऊ लागली होती. त्याला इंग्रजांची महसूल आकारणीची पद्धती आणि सावकारांना संरक्षण देण्याची नीती कारणीभूत होती. ग्रामीण भागात बहुतांश व्यवहार रोकड पैशात न होता धान्याच्या रूपात होत असत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात रोकड पैसा नसायचा. मात्र कंपनी सरकारने शेतसारा धान्याच्या रूपात न घेता रोकड रकमेतच वसूल करण्याचा नियम केल्याने शेतकरी पैसा हाती राहील अशी रोकड पिके घेऊ लागला. शेतीच्या व्यापारीकरणाला येथून प्रारंभ झाला. व्यापारी आणि सावकारांचे महत्त्व वाढले. पुढे शेतकऱ्यांकडून कर्ज वसुली करण्यासाठी सावकारांना न्यायालयांची मदत घेण्याची व्यवस्था इंग्रज प्रशासनाने उपलब्ध करून दिल्याने सावकार शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर, घरांवर, गुराढोरांवर जप्ती आणू लागले. दुष्काळाच्या काळात कर्जफेड करू न शकल्याने अनेक शेतकऱ्यांची मालमत्ता सावकारांनी ताब्यात घेतली. १८८० च्या फेमिन कमिशनच्या अहवालानुसार ५६ ते ७८ टक्के शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडले होते. या स्थितीत विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात फारसा समाधानकारक बदल झालेला दिसत नाही. १९१६ साली सहकार चळवळीचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे कर्ज ३०० कोटी रुपयांपर्यंत पोहचले होते. १९२५ च्या दुष्काळामुळे हा आकडा ६०० कोटींवर गेला. १९३१ च्या बँकिंग एन्क्वायरी कमिटीच्या अहवालात कर्जाची रक्कम ९०० कोटींपर्यंत गेलेली दिसते. सार्वत्रिक मंदी आणि धान्याच्या भावाची घसरण यामुळे हा आकडा १२०० कोटींपर्यंत पोहचला असण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली होती. (केसरी-टिळक अंक-१९३४)

१९२९ च्या जागतिक मंदीचा फटका पाश्चिमात्य प्रगत औद्योगिक देशांइतकाच भारतासारख्या कृषिप्रधान व विकसनशील देशांनाही बसला. या जागतिक महामंदीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा कर्जाचा बोजा वाढला. १९३० साली मुंबई प्रांतिक काँग्रेसने शेतकऱ्यांच्या कर्जफेडीची चौकशी करण्याकरिता समिती नेमली होती. या अभ्यासगटाने शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करण्याकरिता नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील २९ व कळवण तालुक्यातील १३ खेड्यांना भेटी देऊन तिथल्या

परिस्थितीची क्षेत्रीय पाहणी केली. या समितीला ८१ कोटी रुपयांची कर्जफेड झाली नसल्याचे आढळून आले. ५ खातेदारांचा अपवाद वगळता सर्व खातेदारांवर कर्जाचा बोजा असल्याचे आढळून आले. प्रत्येक कुटुंबावर सरासरी ३२९ रुपयांचे कर्ज होते. खानदेशात प्रत्येक शेतकरी कुटुंबावर सरासरी ६८५ रुपयांचे कर्ज होते. महामंदीच्या काळात कर्जाचा हा बोजा दुप्पट झाल्याचे निरीक्षण मुंबई विधिमंडळाचे सदस्य वामनराव पाटील यांनी नोंदविले होते. (Phadke, 2000, p.145) शेतकऱ्यांना सावकारांकडून घेतलेल्या कर्जावर १२ टक्क्यांपासून ३६ टक्क्यांपर्यंत व्याज द्यावे लागे. बाजारपेठीय मंदी आणि कर्जामुळे ओढवलेल्या प्रसंगातून सावरण्यासाठी मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात आमदारांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न लावून धरला. १५ जानेवारी १९३१ रोजी रावबहादूर जी. आर. कोठारे यांनी शेतकऱ्यांना अल्प मुदतीची कर्जे देण्याकरिता दोन कोटी रुपयांची तरतूद करण्याचा ठराव मांडला; पण तो फेटाळला गेला. ऑगस्ट १९३१ मध्ये तुकारामपंत केदारांनी कर्जवसूली स्थगित करावी व दोन वर्षे त्यावरचे व्याज आकारू नये अशी सूचना केली, तीही फेटाळण्यात आली. शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याची मागणी जी. एस. माळवी, रामभाऊ कानिटकर यांनी केली. पण ती फेटाळण्यात आली. ऑगस्ट १९३२ मध्ये आमदार चंदनलाल यांनी सावकार आणि कर्जबाजारी शेतकरी यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी कर्ज समायोजन मंडळे नेमण्याची सूचना केली, ती सरकारने स्वीकारली. या मंडळांनी अकरा हजाराहून अधिक कर्जदार शेतकरी व धनको यांच्यात मध्यस्थी करून समेट घडवून आणले. मध्यप्रांताचे गव्हर्नर गोवॅन यांनी शेतकऱ्यांना सावकारी कर्जपाशातून मुक्त करण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजण्यास मान्यता दिली. कृषिमंत्री बाबासाहेब खापर्डे यांची सहकारी तत्त्वावर वऱ्हाडात दहा भूतारण बँका स्थापन करण्याची सूचना स्वीकारण्यात आली. कर्जाच्या व्याजावर मर्यादा आणणारे 'सावकारी नियंत्रण विधेयक' मंजूर करण्यात आले. मुंबई प्रांताच्या विधिमंडळात मात्र असे प्रयत्न झाले नाहीत. १९३४ साली याच धर्तीवर सय्यद मुनवर यांनी बिनसरकारी विधेयक मांडले, १९३६ मध्ये खानदेशातले आमदार वामनराव पाटील यांनी मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासंबंधी विधेयक मांडले, पण ही विधेयके फेटाळण्यात आली. (फडके,१९९३, पृ. ३३-३५)

डोईजड होणारा शेतसारा हे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे एक महत्त्वाचे कारण होते. दर तीस वर्षांनी शेतसारा वाढविण्याचा नियम केला असल्याने शेतसाऱ्याची निरंतर वाढ अटळ होती. १८३६ साली जमीनधारणा पद्धतीनुसार शेतसारा आकारणीचे सूत्र ठरविण्यात आले होते. त्यानंतर १८६६ साली दुसरी व १८९६ साली पुन्हा एकदा ३३% नी तिसरी सारावाढ झाली होती. १९२६ साली महायुद्धानंतर वाढलेल्या

शेतमालाचे बाजारभाव लक्षात घेऊन ३३.३३% सारावाढ करण्यात आली. शिवाय वाढलेल्या साऱ्यावर रुपयास २ आणे लोकलफंड बसविण्यात आला. त्यामुळे सरसकट ५०% सारावाढ झाली. १८९६ चा शेतसारा १९२६ पर्यंत दुप्पट झाला. मात्र दोन वर्षांनी मंदीची लाट आली, बाजारभाव घसरले. १८९१ चे भाव आणि १९२८-२९ चे भाव समतुल्य झाले. शेतसारा मात्र दुपटीने वाढला. दरवर्षी मुंबई प्रांतातले शेतकरी ३ कोटी २९ लक्ष रुपयांचा शेतसारा भरत असत. परिणामत: शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा अधिकच जड झाला. जागतिक मंदीमुळे शेतमालाच्या किंमतीत सुरू झालेली ही घसरण पुढेही कायम राहिली. १९३० साली १८ अंकांनी घसरण झाली, १९३१ साली ती ३२ अंकांवर पोहचली, १९३३ साली ती ३८ अंकांपर्यंत घसरली. १९३२ ते १९३८-३९ या काळात कापसाच्या किमतीत सरासरी १९.६ टक्क्यांची घसरण झाली. शेतमालाच्या निर्यातीतही ही घसरण अशीच चालू होती. १९२९-३० सालात ३६१ कोटींची निर्यात झाली, ती १९३०-३१ सालात २५७ कोटी आणि १९३१-३२ सालात १८१ कोटींपर्यंत खाली आली. वास्तविक १९३०-१९३३ या काळात पर्जन्यमान चांगले होते, गहू व इतर धान्यपिकांचा उताराही चांगला होता; पण बाजारभाव गडगडल्याने शेतकऱ्यांच्या हातात रोकड पैसा पुरेसा मिळत नव्हता. त्यामुळे जमीन महसूलार ५० टक्क्यांची सवलत द्यावी व अल्पभूधारकांना महसूलात संपूर्ण सूट देण्याची मागणी केली गेली. (Phadake, 2000, Pp.141-160)

अवाजवी शेतसाऱ्याचा बोजा कमी व्हावा यासाठी १९२३ साली स्वराज्य पक्षातर्फे निवडून आलेल्या भाऊसाहेब सोमण यांनी मुंबई सरकारला सारा आकारणी शेतकऱ्याच्या एकूण उत्पन्नावर न करता निव्वळ उत्पन्नावर करण्याचा तोडगा सुचविला होता. त्यांचा अभिप्राय असा होता की, "सारा हल्ली उत्पन्नाच्या १७ ते ५० टक्क्यापर्यंत पडतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबाचा खर्च व लागवडीचा खर्च हे दोन्हीही ठोकळ उत्पन्नातून वजा जाता राहील ते निव्वळ उत्पन्न मानावे." (गोखले पुरुषोत्तम,१९६६, पृ. ३२८) इन्कम टॅक्सच्या तत्त्वावर शेतीच्या निव्वळ उत्पन्नावर सारा आकारावा, ही या युक्तिवादामागची भूमिका होती. लहान लहान पाटबंधाऱ्याबाबत ओढे कोरडे पडले तरी पाण्याचा कर भरावा लागे. भाऊसाहेब सोमण यांनी याही प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले होते.

वऱ्हाडातही शेतसारा आकारणीच्या दरांबाबत काही समस्या होत्या. वऱ्हाडातल्या शेतसारा आकारणीचा फेर-आढावा घेण्यासाठी सरकारने १९२४-२५ साली जमाबंदी सर्वेक्षणाचे काम हाती घेतले होते. त्यावेळी वऱ्हाडात मलकापूर-खामगाव भागात पावसाची सरासरी आठ इंचांनी घटली होती, विहिरी कोरड्या पडल्या होत्या. १९२४ साली फक्त पाच हजार एकर जमीन ओलिताखाली होती. परंतु वऱ्हाडातल्या शेतकऱ्यांनी या

ओलिताखालच्या जमिनीतून कापसाचे चांगले पीक घेतले होते. त्यामुळे या शेतकऱ्यांचा सारा वाढवावा या हेतूने सरकारने अकोला, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, मलकापूर, खामगाव या भागात जमाबंदी सर्वेक्षणाचे काम सुरू केले. एच. सी. ग्रीनफील्ड या महसूल अधिकाऱ्याने सर्वेक्षणानंतर साऱ्यात ३८ टक्के वाढीची व दर २५ वर्षांनी जमाबंदी करण्याची शिफारस केली. १९२५ साली मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात त्यानुसार नवे विधेयक मांडण्यात आले. लोकनियुक्त आमदारांनी तालुक्यातील बिट्‌निहाय शेतसाऱ्यात १५ टक्क्याहून अधिक वाढ करू नये इत्यादी विधेयकाला सुचविलेल्या दुरुस्त्या फेटाळण्यात आल्या. १९२७ साली डिसेंबर महिन्यात हिंदुस्थान सरकारने या विधेयकाचे कायद्यात रूपांतर केले व १ नोव्हेंबर १९२८ पासून नवी महसूल संहिता लागू करण्यात आली. त्यामुळे वऱ्हाडातल्या शेतकऱ्यांचा कराचा बोजा वाढला. (फडके, उनि. पृ. २७)

कर्जापोटी भरावयाच्या व्याजावर आणि सरकारी कागदपत्रांवर व कोर्ट कचेऱ्यांवर शेतसाऱ्याच्या चौपट खर्च करावा लागत असे. सरकारला रजिस्ट्रेशन फी, महसूल मुद्रांक शुल्क, न्यायासनाने आकारलेले दंड इत्यादी मार्गांनी १ कोटी ७५ लक्ष रुपये मिळत. या सरकारी उत्पन्नावरून जनतेवर पडणाऱ्या आर्थिक बोजाची कल्पना येते. ९० % शेतकऱ्यांना कर्ज घेतल्याशिवाय शेती करणे शक्य नव्हते, त्यामुळे या खर्चाचे भागीदार प्रामुख्याने शेतकरी असत. त्या काळात सावकारांचे व सोसायट्यांचे व्याजाचे दर वर्षाला १२ ते १८ टक्क्यांपेक्षा कमी नव्हते. सावकारांची व्याजाच्या दरात आणि कर्जवसुलीच्या बाबतीत मनमानी चालत असे. दिढीदुपटीने कर्जाची रक्कम वसुल करणारे सावकार शेतकऱ्यांकडून कबजेगहाणाच्या स्वरूपात जमिनी ताब्यात घेत, जबर व्याजाच्या प्रॉमिसरी नोटा लिहून घेत, शेतकऱ्याला कोर्टकचेऱ्यांचे हेलपाटे घालायला लावीत, यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक आणि नैतिक शोषण होत असे. महादेव वाघ यांनी प्रांतिक काँग्रेसच्या सरकारला शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाचा कायदा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यासाठी लिहिलेल्या पुस्तकात याचे अत्यंत वास्तवदर्शी तपशील पुरवले आहेत; ते असे-

"शेतकऱ्यास दिलेल्या कर्जापैकी सुमारे ४/५ कर्ज त्याची जमीन, घर अगर जंगम माल यावरच प्राय: दिलेले असते. हे देताना त्याची वरील स्थावर मिळकत रजिस्टर दस्त करून तारणगहाण अगर कबजेहगहाण स्वरूपात घेतलेली असते. हे दस्त नोंदणीचे काम तालुक्याच्या ठिकाणी जाऊन रजिस्टर कचेरीत रजिस्ट्रार 'समोर' म्हणून करावयाचे असते. त्याकरिता कर्जदाराने आपल्या मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटचे उतारे काढणे, ओळखीसाठी गावाहून निघताना पाटील, तलाठी व इतर चारदोन मंडळी बरोबर घेऊन जाणे, त्यांचा भाडेखर्च, चहापाणी, पानसुपारी इत्यादी सर्व सढळ हाताने करणे, स्टँप विकत घेणे, रजिस्ट्रेशन फी भरणे, त्या कामी संबंध येणाऱ्या सरकारी कामगारांची

नाइलाज म्हणून गुप्त संभावना करणे, इत्यादी जरूर ते सर्व संस्कार करून मग रक्कम पदरांत घ्यावयाची असते! त्यातही दिढीदुणीच्या बोलीचे दस्तऐवज असले, म्हणजे घरी तयार करून घेतलेल्या विसारचिठ्या व लिहून ठेवलेली साठेखते पुढे करणे, हेही त्यास करावे लागते. कारण तो गरजू असतो. .. बरे, एवढे करूनही सरकारी शिक्कामोर्तब झालेला भरपाई दस्त पुन्हा खरा करून घेण्यासाठी सावकारास कोर्टात जाऊन न्यायाची याचना करावी लागते, ती निराळीच! .. अशा तऱ्हेने सनदशीर मार्गाने कर्ज काढायचे झाल्यास कर्जदार शेतकरी कुळास सुमारे शेकडा ५ रुपये तरी खर्च येतो. बरे, हे जबर व्याजाचे व भरमसाट घेतलेले कर्ज न फिटल्यास (बहुतेक उत्पन्नातून फिटत नाहीच) शेकडा ५० कुळांवर तरी कोर्टामार्फत दावे केले जातात. त्यावेळेस शेकडा ७.५० रुपये कोर्ट फीचा स्टॅम्प, पाच रुपये वकील फी, आठ आणे वकीलपत्र, साक्षीसमन्से, भत्ते, प्रोसेस, वारंटे इत्यादी खर्च, याशिवाय मोटार व रेल्वे भाडे, शहरातील हाटेले व गुत्ते या ठिकाणी उडणारा पैसा, खानावळीची बिले, साक्षीदारांची व मधल्या दलालांची पानसुपारी, वकिलांचा बयाणा व बक्षिसे, प्रतिपक्षाच्या साक्षीदाराला फितुरीचा कानमंत्र देताना खिशाला लागलेली सोनेरी कात्री इत्यादी अनेकविध मार्गांनी पाण्यासारखा पैसा खर्च होत असतो... कोर्टात दाखल केलेल्या दाव्याचा निकाल एका तारखेस झाला, असे कधीच घडून येत नाही. [२] चौकशीला नंबर पडला म्हणजे साक्षीदारांचे लटांबर बरोबर घेऊन कोर्टाच्या महायात्रा व प्रत्येक वेळचा स्पेशल खर्च किती करावा लागेल हे एक परमेश्वरालच माहीत! ( वाघ महादेव, १९३९, पृ. १४-१८)

कर्जाच्या ओझ्याबरोबर होणाऱ्या शेतकऱ्याच्या विटंबनेची ही स्थिती लक्षात घेता या प्रश्नाने ग्रामीण समाजाच्या आत्मविश्वासाला आणि कर्तृत्वशक्तीला कसा फटका बसत होता, याची कल्पना येते. पूर्वी शेतकऱ्यांना दुय्यम धंद्यांची जोड होती; परंतु ब्रिटिश अमदानीत स्थानिक जोडधंदे संपले. शेतीखेरीज उत्पन्नाचे दुसरे स्त्रोत संपल्याने शेतकरी अगतिक बनला होता. शेतकऱ्यांच्या या स्थितिगतीचा अभ्यास करणारे समकालीन तज्ज्ञ श्री महादेव दत्तात्रेय वाघ यांनी या सारावाढीचा व ब्रिटिश राजनीतीचा साधार आढावा घेऊन निष्कर्ष मांडला होता की, "खुल्या बाजाराचे व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि यंत्राधिष्ठित विलायती मालाची अनिर्बंध आयात यांच्या योगाने शेतकरी राज्याचा पायाच उखडला गेला. .. जो मराठा शेतकरी आपले राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य कायम टिकवून होता, तोच शेतकरी वर्ग आज दुकानदार, सावकार व जमीनमालक यांच्या आर्थिक दास्यात जाऊन परकीय साम्राज्यशाहीच्या व भांडवलशाहीच्या हस्तकांचा गुलाम बनला." (कित्ता, पृ. ११-१४)

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती हा विषय कोणत्या ना कोणत्या स्वरूपात कायम चर्चेत होता; पण ठोस उपाययोजना होत नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३८ साली

'सावकारी नियंत्रण विधेयका'चा मसुदा पुस्तिकेच्या स्वरूपात चर्चेसाठी खुला केला होता. त्यातील मुख्य शिफारशी अशा होत्या :

१. सावकारांनी परवाने घेऊन व्यवसाय करावा. परवान्याचे वार्षिक नूतनीकरण करण्यात यावे. सावकाराने गैरव्यवहार केल्यास परवाना रद्द करण्यात यावा.
२. कर्जाचे सर्व व्यवहार लेखी असावेत व सावकाराने कर्जदारास खाते पुस्तक देऊन कर्जाच्या प्रत्येक व्यवहाराची त्यात नोंद करावी.

या विधेयकाला अनुसरून २५ जानेवारी १९३८ रोजी गृहमंत्री मुन्शी यांनी विधेयक सादर केले. ते पुढे प्रवर समितीकडे गेले व २५ ऑक्टोबर १९३९ रोजी ८६ कलमे असलेले शेतकरी कर्ज निवारण विधेयक संमत करण्यात आले. विधानपरिषदेने मान्यता दिल्यानंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. या कायद्यातल्या ठळक बाबी अशा होत्या :

(१) १ जानेवारी १९३९ पूर्वी स्वत: शेती करणाऱ्या ज्या शेतकऱ्याचे कर्ज १०० रुपयांपेक्षा जास्त आणि १५ हजार रुपयांपेक्षा कमी असेल आणि जो एखाद्या सरकारमान्य सहकारी सोसायटीचा सदस्य असेल त्या ऋणको शेतकऱ्याच्या बाबतीत हा कायदा लागू असेल.
(२) शेतकऱ्याला फक्त शेतीसाठी कर्ज घेता येईल. लग्नकार्य वा गावजेवण घालण्यासाठी कर्ज घेण्यास प्रतिबंध करण्यात आला होता.
(३) कर्जाची रक्कम शेतकऱ्याच्या सर्व मालमत्तेच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर ८० टक्केच रक्कम फेडण्याची जबाबदारी राहील.
(४) उत्पन्नाची साधने लक्षात घेऊन समान २५ हप्त्यात कर्जफेड करण्याची संधी देण्यात येईल
(५) शेतकऱ्याचे उत्पन्न कर्ज फेडण्याइतके नसल्यास त्याला दिवाळखोर म्हणून जाहीर केले जाईल व त्याच्या मालकीची बागायती जमीन सहा एकरापेक्षा कमी असल्यास व १८ एकर ओलिताखाली नसल्यास त्यातील निम्मी जमीन विकून कर्जफेड करण्याची तरतूद करण्यात आली होती.

१९४४ साली हिंदुस्थान सरकारने शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी शिफारशी करण्याकरिता अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने ग्रामीण भागातील पतपुरवठा वाढविण्यासाठी कर्जावरील व्याजाचे दर ६ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची शिफारस केली. त्यासाठी एक स्वायत्त महामंडळ नेमण्याचीही सूचना केली. शिवाय शेतकऱ्यांचे सावकारांकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना सावकाराच्या हिशेबाच्या वह्या आकस्मिकरित्या तपासण्याचा अधिकार द्यावा, अशीही सूचना केली होती.

गाडगीळ समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन १९४७ साली मुंबई प्रांतात 'शेतकरी कर्ज निवारण कायदा' करण्यात आला. या कायद्यानुसार शेतकऱ्यांना कर्जमुक्त होईपर्यंत सवलती दिल्या जाऊ लागल्या. तसेच याच वर्षी 'सावकारी नियंत्रण कायदा' करून सावकारांना अवाजवी कर्जव्यहार करता येऊ नयेत यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. ग्रामीण भागातील पतपुरवठ्यासाठी रिझर्व्ह बँकेतही शेती-कर्जाचा विभाग उघडण्यात आला. जमीन खरेदी, विहिरी खोदणे इत्यादीसाठी लागणारे अल्प व दीर्घ मुदतीचे कर्ज मुंबई भूविकास बँक आणि विदर्भ भूविकास बँकेमार्फत देण्याची व्यवस्था करण्यात आली. या बँका कर्जरोखे विकून पैसा उभा करीत. या रकमेच्या परतफेडीची व व्याजाची हमी राज्य सरकारने घेतली होती.

**खोती पद्धत आणि खंडकरी :**

जमीनमालक आणि खंडाने जमीन कसणारी कुळे यांच्यातली तेढ हा या कालखंडातल्या कृषिसमाजजीवनातला महत्त्वाचा मुद्दा आहे. कोकण, खानदेश, वऱ्हाड सर्वच भागात हा प्रश्न होता. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील वणी व अकोला जिल्ह्यातील वाशिम तालुक्यातील सुमारे ५२० गावातील पडीत जमीन वहिवाटीसाठी ६४ इजादाऱ्यांना ३० वर्षांच्या कराराने देण्यात आली होती. इजादार हवा तो ठराव करून कुळांना जमीन कसण्यासाठी देत. इजादाराकडे या काळात पाटील-पटवाऱ्याचे काम पाहवयाचे अधिकार. असल्याने स्वाभाविकच गावाचे दंडप्रधान नेतृत्व हे इजादाराकडे आलेले होते. [ काळे यादव, १९२४, पृ. २६२ /कोरपे, पृ. ४०-४१] वऱ्हाडात २१८ गावे जहागिरीची होती, त्यापैकी बरीच शेती इनाम देवस्थानास दिलेली होती. (कोरपे, पृ. ४१) १९०२ ते १९१० या काळातील वऱ्हाडी शेतकऱ्याची आर्थिक स्थिती पाहता या काळात वऱ्हाडात पूर्वीपेक्षा सहापट किमतीत जमिनी विकण्यात आल्याची उदाहरणे आढळतात. १८९० पासून १९०९ पर्यंत हा फरक घडून आला. .. अर्थात, वऱ्हाडात रयतवारी शेती असल्याने सावकाराच्या ताब्यात फक्त कर्जदारांच्याच जमिनी जात; अन्य शेतमालक त्या सावकारी पाशातून बचावले आहेत. .. अनुभवाने वऱ्हाडचा शेतकरी हुशार होत चालला आहे. हंगामात रोकड पैसा त्याच्या हाती खेळू लागल्याने मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांपेक्षा विदर्भाचा शेतकरी अधिक संपन्न आणि उंच राहणीमाण असणारा आहे. (इथल्या) स्त्रिया सोन्या चांदीचे दागिने घालताना दिसतात... पूर्वी ४-५ पुरुषांच्या एका कुटुंबासाठी एक कोट शिवला की भागत असे. आळीपाळीने कुटुंबातील पुरुष तो वापरीत. पण आता प्रत्येकाला ४-५ कोट लागतात.. त्यामुळे खर्चिकपणा वाढला." [Fitzgerald S. V. & Nelson, A. E. Central Province District Gazetteers Amravati Distt. 1911, page 229 /कोरपे, पृ. ३८-३९] ही निरीक्षणे पाहता खंडाने वा कुळाने जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक

स्थिती अन्य शेतकऱ्यांच्या तुलनेने खालावलेली होती. जे लोक स्वत:च्या मालकीची शेती स्वत:च कसत, त्यांची आर्थिक स्थिती ठीक होती.

कोकणातही खोती पद्धती होती. तळकोकणात ब्राह्मण खोतांकडे जमिनीची मालकी होती, तर उत्तर कोकणात मुसलमान व काही आगरी खोतांकडे जमिनीची मालकी होती. खोतीची शेती कसणारी कुळे यांच्याकडून मिळणारा उत्पनातला हिस्सा व सारा हे खोतांचे उत्पन्न असे. कोकणात समुद्रालगतच्या खाजण जमिनी पिकत्या करण्याचे काम कुळे करीत. तसेच भरतीचे १२ ते १४ फूट उंचीचे पाणी शेतात येऊ नये म्हणून मातीचा बांध घालत. ह्या बांधाला *'बाहेरकाठा'* म्हणत. व हा बांध फुटू नये म्हणून बांधाची राखणही करीत. ह्या कामात कुशल असणाऱ्या राखणदाराला *'जोळ'* म्हणत. गटारातून आतील पाणी बाहेरच्या बाजूस टाकणारे दरवाजे भरतीच्या पाण्याचा दाब पडून आपोआप बंद होत. या दरवाजांना *'उघड्या'* म्हणत. अशा गुंतागुंतीच्या रचना असणाऱ्या खाजण (खार) जमिनी विकसित करण्याचे काम करणाऱ्या जाणत्या व्यक्तीस *'शिलोत्री'* म्हणत. या शिलोत्रीस दर एकरी एक मण भात देण्याची पद्धत होती. (कुंटे, १९८५, पृ. १०५-१०६) आगरी समाजातील खोत आणि कुळवाडी यांच्यातल्या संबंधात मात्र एक अलिखित समझोता चालत आलेला होता. कुळांचा उदरनिर्वाहाचा हक्क म्हणून जातपंचायतीच्या देखरेखीखाली त्यांचे जमीन कसण्याचे अग्रहक्कही संरक्षित ठेवले जात. खोताला जमीन विकायची असेल तर ती प्राधान्यक्रमाने कुळाला व कुळाचा नकार असला तर इतरांना विकायची. तिऱ्हाइताने जमीन विकत घेऊन ती कसायला द्यायची असेल तर पूर्वीच्या कुळालाच कसायला द्यावी लागे. (ठाकूर, २०१९, पृ. १९) खोत आणि कुळांतली ही पारंपरिक नैतिकता ब्रिटिश काळात खंडित झाली होती. खोतांकडून कुळांचे शोषण वाढू लागले होते.

दरम्यान पहिल्या महायुद्धाच्या काळात धान्याच्या किंमती वाढल्याने कुळांना धान्याच्या स्वरूपात खंड न देता रोख पैशात खंड देणे परवडणारे होते. परंतु जमीनमालकांना हा पर्याय मान्य नसल्याने जमीनमालक व खंडकरी यांच्यात तणाव निर्माण झाला. कोकणात पेण तालुक्यातील आग्री कुळवाड्यांनी जमिनी कसण्यास नकार देऊन जमीन मालकांविरुद्ध बहिष्काराचे अस्त्र उपसले. या बहिष्कारामुळे शेकडो एकर जमीन पडीत राहिली. १९२२ नंतर धान्याच्या किंमती घटल्यावर जमीनमालकांनी रोखीने खंड घेणे पसंत केले. खानदेशातही हीच रोखीची पद्धत सुरू झाली. युद्ध काळात धान्याच्या किमती वाढल्याने धान्याच्या स्वरूपात बलुते वा मजुरी देणे परवडत नसे. पण आता शेतमजुरी व बलुतेही धान्यरूपाने देण्याची पद्धत मागे पडून रोखीने व्यवहार करण्याला पसंती दिली जाऊ लागली.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जवळपास पन्नास वर्षे खंडकरी शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी करावयाच्या कूळकायद्याचा प्रश्न भिजत पडला होता. वास्तविक १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच कोकणातल्या खोतांच्या जमीनमालकीच्या व सारावसुलीच्या प्रश्नाने या विषयावर संुदोपसुंदी सुरू झाली होती. कोकणातल्या कुलाबा जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील शेतजमिनीपैकी ३४% जमीन आणि रत्नागिरी जिल्ह्यातील २३% शेतजमिनी खोतांच्या मालकीच्या होत्या. १८५१ साली सर विंगेटने खोतीऐवजी 'रयतवारी' पद्धती आणण्याचा प्रस्ताव पुढे केल्यावर या विषयावर चर्चा सुरू झाली. १८६६ साली खोतांनी आपल्या पूर्वापार हक्कांसाठी संघटित लढा देण्यासाठी 'खोत हितेच्छु सभा' स्थापन केली. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी 'नेटिव्ह ओपिनियन'मधून खोतांची बाजू लावून धरली. अखेर १८७४ साली या प्रश्नाच्या अभ्यासासाठी कमिशन नेमण्यात आले. १८८० साली सरकारने 'खोती वतन कायदा' केला. पण तरीही खंडकऱ्यांचा प्रश्न सुटला नाही. या कायद्याच्या माध्यमातून सरकारने फक्त सारा वाढविण्याचा आपला अधिकार आधोरेखित करून घेतला.

रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यात शेती कसणाऱ्या कुळांना खोती पद्धतीमुळे खंडाची रक्कम भरण्यात दमछाक होत असे. १९२१ ते १९३० या दशकात कुळांच्या तक्रारी मिटविण्यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न झाले. मुंबई विधिमंडळात आनंदराव सुर्वे आणि सी. के. बोले या ब्राह्मणेतर पक्षाच्या आमदारांनी हा प्रश्न लावून धरला. खोती सभेचे अध्यक्ष भास्करराव नानल यांनी कुळांच्या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी समिती नेमण्याची मागणी केली. शासनाने दक्षिण विभागाचे आयुक्त माउंटफर्ड यांना खोती प्रश्नाची शहानिशा करण्याची जबाबदारी सोपविली. १९२६ साली माउंटफर्ड यांनी आपला अहवाल सरकारला सादर केला. सरकारने खोती नष्ट करण्याचे आश्वासन दिले नाही; मात्र कुळांचे हक्क संरक्षित करणारे आदेश निर्गमित केले. त्यावर मुंबई सोशल लीगचे पु. गो. काणेकर यांनी पुढाकार घेऊन खोती नष्ट व्हावी यादृष्टीने वस्तुस्थिती तपासून पाहण्यासाठी रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यातल्या खेड्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा उपक्रम हाती घेतला. १९३२ ते १९३७ या काळात कुलाबा जिल्ह्यातल्या अलिबाग तालुक्यातले शेतकरी संपावर गेले. १९३४ साली १६ डिसेंबरला डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कुलाबा जिल्हा शेतकरी परिषदेत खोतीच्या प्रश्नावर जनमत संघटित करण्यात आले. मे १९३६ मध्ये मुंबईच्या प्रांतिक काँग्रेसने रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यातील खोती पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यासगट नियुक्त केला. १९३७ साली काँग्रेसने निवडणूक जाहिरनाम्यात खोती पद्धती संपविण्याचे आश्वासन दिले. खोतांच्या पाठिंब्यावर रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यातून लोकशाही स्वराज्य पक्षाच्या शि. ल. करंदीकर व रा. मंडलिक यांनी निवडणुका जिंकल्या. रत्नागिरी

कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष एस. एस. महाजन यांनी तर प्रांतिक कॉंग्रेसला खोती पद्धत नष्ट करू नये, असे थेट आवाहन केले. खोतांचा हा विरोध लक्षात घेऊन सरदार पटेल यांनी खोती पद्धत लागलीच बंद करण्याचा कॉंग्रेसचा इरादा नसल्याचे लेखी आश्वासन दिले. (Phadake, 2000, p. 146) वीस वर्षात खोती पद्धत निकालात काढण्याचे कॉंग्रेसचे धेय होते, मात्र स्वातंत्र्यापूर्वी हा विषय फक्त चर्चेत राहिला.

१५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली व पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातून खोती पद्धतीचे उच्चाटन करण्याचा आपला निर्धार असल्याचे जाहीर केले. खेर मंत्रिमंडळात मोरारजी देसाई महसूल मंत्री होते, त्यांनी डॉ. आंबेडकरांचे खोती उच्चाटनाचे विधेयक फेटाळून लावले. मात्र कूळकायद्यात कुळांना खोतांपासून संरक्षण देणाऱ्या काही तरतूदी लागू केल्या. (फडके, १९९१, पृ. २३) पुढे १९३९ साली अलिबाग तालुक्यातील भेंडखळमध्ये भिवंडीवाला नामक मुसलमान खोताने शेतसारा कमी केला नाही म्हणून शेतकऱ्यांनी शेती कसण्यास विरोध केला; सुमारे ५०० एकर जमीन नापीक राहिली.

**कूळकायदा :**

कूळवहिवाटीने जमीन कसणाऱ्या लहान शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न अतिशय किचकट असतात. पुरेशी जमीन नसल्याने आधीच उत्पन्न कमी; त्यात मालकाच्या वाट्याचा हिस्सा जाऊन पदरात पडणारी मिळकत अत्यल्प. घरातली सर्वच माणसे कूळवहिवाटीच्या जमिनीत राबत असल्याने उत्पनाची अन्य साधने वा रोजगारसंधी त्यांच्यासाठी नसल्यातच जमा असतात. या पार्श्वभूमीवर कुळांना संरक्षण देण्याचा कायदा करण्याची पर्यायी नीती आखण्याचे राजकीय प्रयत्नही या काळात अधूनमधून होत राहिलेले दिसतात. त्याचा थोडक्यात मागोवा घेऊ.

शासकीय पातळीवर शेतकऱ्यांच्या हितासाठी १८७९ साली डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलिफ ॲक्ट आल्याने कर्जापोटी शेतजमिनी सावकारांना हस्तांतरित करण्याच्या प्रथेला आळा बसला होता. मात्र कूळकायदा लागू करण्याच्या प्रस्तावाला सरकारची संमती मिळत नव्हती. १८९९ साली मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट याने कूळकायदा करण्यासाठी अनुकूलता दाखविली होती, परंतु महसूल अधिकाऱ्यांना हा प्रस्ताव पसंत नसल्याने कायदा करण्याची कल्पना बारगळली होती. विसाव्या शतकात १९२२, १९२५ आणि १९३१ साली सीताराम केशव बोले यांनी कुळांना संरक्षण द्यावे यासाठी बिनसरकारी प्रस्ताव मांडला होता; मात्र त्यावर कुठलाच निर्णय झाला नाही.

मे १९३६ साली मे महिन्यात प्रांतिक कॉंग्रेस समितीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीतही हा प्रश्न चर्चेला आला. समितीने कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यातील खोती पद्धत नष्ट करण्याची शिफारस केली. त्यानंतर १७ सप्टेंबर १९३७

रोजी स्वतंत्र मजूर पक्षाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही हा प्रश्न धसास लावण्यासाठी खोती वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले. मात्र हे विधेयक मंजूर झाले नाही. १९३७ साली म. गांधींनीही 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वाचा पुरस्कार केला होता. त्यानंतर १९३८ साली जुलै महिन्यात काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या सभेत कुळांना संरक्षण देणाऱ्या कूळकायद्याच्या प्रस्तावित विधेयकाचा मसुदा चर्चेला ठेवण्यात आला. या मसुद्यात कुळांच्या प्रश्नांची व खोतांच्या हक्कांची दखल घेऊन समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. प्रस्तावित कायद्याची व्याप्ती २०८४ इनामगावे, ५०० तालुकदारी गावे, आणि ६७७ खोतांच्या गावांना लागू होणार होती. या मसुद्यात एकूण ३१ कलमे होती. त्यातली प्रमुख कलमे अशी होती :

१. हा कायदा १५० रुपयांपेक्षा जास्त सारा भरणाऱ्या आणि ३३ एकर बागाईत किंवा १०० एकर वा त्याहून अधिक जिराईत जमीनमालकांच्या कुळांना संरक्षण देईल. १०० एकरापेक्षा जास्त जमीन धारण करणाऱ्या शेतमालकांनी आपल्या भूक्षेत्राची १०० एकरापेक्षा कमी भागात विभागणी केल्यास त्यांच्या कुळांना हा कायदा लागू होणार नाही.

२. कुळांचे 'संरक्षित कूळ' आणि 'सर्वसाधारण कूळ' अशा दोन गटात वर्गवारी करून 'संरक्षित कुळां'साठी प्रस्तावित कायदा लागू राहील असे स्पष्ट करण्यात आले. १ जानेवारी १९३८ पूर्वी कमीत कमी सहा वर्षे जमीन कसणाऱ्या कुळास 'संरक्षित कूळ' म्हणावे अशी संरक्षित कुळाची व्याख्या करण्यात आली. तसेच १ एप्रिल १९३७ पूर्वी सलग सहा वर्षे जमीन कसूनही जमीन मालकाने कुळास निष्कासित अथवा बेदखल केले असले तरी अशा कुळास 'संरक्षित कूळ' म्हणून मान्यता असेल.

३. संरक्षित कुळाने खोताच्या मालकीच्या जमिनीवर स्वखर्चाने घर अथवा झोपडी बांधली असल्यास त्यावरचा कुळाचा हक्क संरक्षित असेल. जमीन मालकास या घरातून कुळाची हकालपट्टी करता येणार नाही. तसेच कुळाने लावलेल्या झाडाची फळे व लाकूड यावर कुळाचा हक्क राहील.

४. जमिनीचा कस वाढविण्यासाठी कुळाने केलेल्या खर्चाची शेतमालकास भरपाई द्यावी लागेल.

५. ठरलेल्या खंडाखेरीज जमीनमालकास कुळाकडून इतर कुठलाही कर, उपकर वा सेवामूल्य घेता येणार नाही. घेतलेल्या खंडाबद्दल पावती देणे जमीनमालकास बंधनकारक असेल.

६. जमीन मालकाचा मृत्यू झाल्यास जमीन मालकाच्या वारसास चार महिन्यांची पूर्वसूचना देऊन कुळाला जमीन कसण्याचा आपला अधिकार कायम ठेवता येईल.

७. कुळाला कसायला दिलेली जमीन स्वत:च्या उपयोगासाठी एक वर्षाची पूर्वसूचना

देऊन मालकाला परत आपल्या ताब्यात घेता येईल.

या मसुद्यात कुळांना संरक्षण देण्याच्या तरतूदीबरोबरच जमीन मालकांना एक वर्षाच्या पूर्वसूचनेने जमीन ताब्यात घेण्याचा अधिकार देण्यात आल्यामुळे नानासाहेब कुंटे, भाऊसाहेब हिरे, एम. पी. पाटील, सिन्नरचे वसंतराव नाईक या आमदारांनी नापसंती दर्शवली, मात्र कूळकायदा पारित करण्यास त्यांचा पाठिंबा होता. महसूलमंत्री मोरारजी देसाई, अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठे, कर्नाटकातील गंगाधरराव देशपांडे यांचा विधेयकाला अंतर्गत विरोध होता. हे विधेयक लांबणीवर टाकण्यासाठी म. गांधींना पत्र लिहिण्याचाही मार्ग अनुसरण्यात आला. सरदार पटेलांनी हे विधेयक समर्पक असल्याचा अभिप्राय दिल्यानंतर हा विरोध मावळला. विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यात आले. तिथे ते मान्य झाले. ३ ऑक्टोबर १९३९ रोजी मुंबई प्रांताच्या विधानसभेने कूळकायदा पारित केला. मात्र गव्हर्नरने या कायद्याच्या अंमलबजावणीस मान्यता दिली नाही. १९४६ साली पुन्हा एकदा बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर या विधेयकात दुरुस्ती सुचविण्यात आली. वहिवाटीची शाश्वती आणि एकूण उत्पनाच्या एक तृतीयांश एवढाच खंड असेल या दुरुस्तीनंतर डिसेंबर १९४६ पासून मुंबई इलाख्यात कूळकायदा अमलात आला. या दुरुस्तीमुळे सहा वर्षांपेक्षा कमी काळ जमीन कसणाऱ्या कुळांनाही दहा वर्षांपर्यंत जमीन कसण्याची कालमर्यादा वाढवून देण्यात आली. १९४८ साली पुन्हा एकदा या कायद्यात दुरुस्ती होऊन ही दहा वर्षांची कालमर्यादा मागे घेऊन सर्वच कुळांना संरक्षण देण्यात आले. कुळाने पिकाचा अर्धा हिस्सा जमीन मालकाला देण्याची प्रथा होती; त्याऐवजी यापुढे एकषष्ठांश हिस्सा द्यावा असा नवा नियम करण्यात आला. १९४९ साली रत्नागिरी आणि कुलाबा जिल्ह्यातील खोती पद्धती नष्ट करण्याचा कायदा करण्यात आला.

**तुकडेबंदी कायदा :**

शेतीकडे एक उद्योगधंदा म्हणून पाहिल्यास शेतीत गुंतवले जाणारे भांडवल व श्रम यांच्या प्रमाणात मिळणारे उत्पन्न फायदेशीर असले, तरच शेतीधंदा किफायतशीर राहील. या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रातील आणि एकंदर हिंदुस्थानातील शेती किफायतशीर नसल्याचा सर्वसाधारण अनुभव होता. याचे एक महत्त्वाचे कारण लागवडीखाली येणाऱ्या जमिनीचे आकारमान तुकड्या तुकड्यात विभागले गेल्याने मोठ्या क्षेत्रफळाच्या सलग पट्ट्यात शेती करण्याची संधी इथल्या शेतकऱ्यास प्राप्त होत नाही. यांत्रिक व शास्त्रीय साधनांचा वापर करून शेती करायची झाल्यास त्यात गुंतवलेल्या भांडवलाचा पुरेसा परतावा मिळण्यासाठी जमिनीचे क्षेत्रफळ मोठे असले पाहिजे. अर्थशास्त्रीय परिभाषेत उतरत्या पैदाशीच्या नियमाप्रमाणे क्षेत्रफळ कमी असणाऱ्या लागवडीखालील जमिनीतून श्रमास व भांडवलास मिळणारा मोबदला कमी

असतो. स्वत: मालक मशागत करीत असलेल्या शेतीखेरीज खंडाने जमीन कसणाऱ्या कुळांच्या शेतीच्या बाबतीत हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होतो. शेतीचे लहान लहान तुकडे एकमेकांपासून दूर असल्याने मजूर व जनावरांच्या श्रमशक्तीचा बराच अपव्यय होतो. तुकडीकरणामुळे शेतीचा व्यवहार आतबट्ट्याचा होतो, ही महाराष्ट्रातल्या शेतीची एक मूलगामी समस्या होती.

महात्मा गांधी यांनाही या समस्येची कल्पना होती. आयर्लंडप्रमाणे शेतीसंघटनेच्या पायावर भारताच्या स्वतंत्र व स्वायत्त राज्याची इमारत बांधता येईल असे ते म्हणत. मात्र जमिनीचे लहान लहान तुकडे करण्याच्या पद्धतीमुळे, भारताचे दारिद्र्य हटविण्यास शेती फार तोकडी पडते; याकरिता त्यांनी चरख्याचा पर्याय सुचविला होता. चरख्याला वरुणराजाच्या लहरीची पर्वा करावी लागत नाही. त्यामुळे अनेक संकटांविरुद्धचा विमा म्हणजे चरखा, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. चरखा राष्ट्राला औद्योगिक प्रयत्न करण्यास उत्तेजन देतो, राष्ट्रीय पातळीवर सहकार्य करायला लावतो म्हणून खादीच्या चळवळीतून खेड्यात क्रांती घडवून आणण्याचा एक पर्याय गांधीजींनी सुचविला होता. (म. गांधींचे संकलित वाङ्मय, खंड २२, पृ. १८७-१८८) मात्र एवढ्याने शेतीची समस्या संपत नाही, हेही कठोर वास्तव होते.

कोकणात रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणे इतर सर्व भागात जमिनीच्या पोटविभागणीची आणि विखंडनाची एक महत्त्वाची समस्या होती. वंशपरंपरागत जमिनीची मालकी वारसाकडे संक्रमित होत असे. परंतु प्रत्येक पिढीत भावकीच्या जमिनीच्या वाटण्या होत व कसदार जमिनीचे हिस्से करून वाटण्या पडत. या पद्धतीमुळे हळू हळू जमिनीचे सलग भूखंड छोट्या छोट्या तुकड्यात विखंडीत होऊ लागले. बऱ्याच शेतकऱ्यांकडे एक एकराहून कमी आकाराचे शेत कसण्यासाठी उपलब्ध असायचे. १९२६ साली लॉर्ड लिन्‌लिथगो यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शेती आयोगाने रत्नागिरी जिल्ह्यात केवळ तीस यार्डाइतका छोटा भूखंड शेतकऱ्याच्या वाटणीस आल्याचे नोंदवले आहे. (हिंदुस्थान सरकार, रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर इन इंडिया; रिपोर्ट, १९२८, पृ. ४५५; फडके य. दि. १९९१, पृ. ३०) या तुकडेवारीने शेती कसण्यात येणाऱ्या मर्यादा दूर करण्याचा विषयही वर्षानुवर्षे चर्चेत होता. १९३६-३७ साली मुंबई प्रांतातल्या लागवडीखालील जमीनधारकांच्या क्षेत्राची पाहणी करण्यात आली होती; या पाहणी अहवालानुसार लागवडीखालील जमिनीच्या विखंडीकरणाचे प्रमाण काय होते ते लक्षात येते :

(१) ५ एकरापेक्षा कमी क्षेत्र धारण करणारे : ४९%

(२) ५ ते १५ एकर क्षेत्रधारक : २९%

(३) १५ ते २५ एकर क्षेत्रधारक : ११%

(४) २५ ते १०० एकर क्षेत्रधारक : १०%

(५) १०० एकराहून जास्त क्षेत्रधारक : ०१%

(पटेल जी. डी. १९५४, पृ. २२५)

महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार शेतजमिनीच्या तुकड्यांची विगतवारी उपलब्ध आहे, ती अशी :

| शेतजमिनीचे क्षेत्रफळ | जमिनीचे तुकडे |
|---|---|
| १ एकरापर्यंत | ६,२६,४३१ |
| १ ते ५ एकर | १४,१५,०५६ |
| ५ ते १० एकर | ८,५५,६१० |
| १० ते १५ एकर | ४,६८,०४३ |
| १५ ते २० एकर | २,८९,९६७ |
| २० ते ३० एकर | २,९८,९४६ |
| ३० ते ४० एकर | १,५३,८३३ |
| ४० ते ५० एकर | ८२,३८५ |
| ५० ते ७५ एकर | ८५,७४४ |
| ७५ ते १५० एकर | ४८,५३३ |
| १५० ते ३०० एकर | १०,०८० |
| ३०० ते १००० एकर | २,९२१ |
| १००० एकरापेक्षा जास्त | ३५४ |

(Source: Statistical Companion to the Maharashtra Agricultural Lands Bill 1961)

अन्य देशातील शेतजमिनीच्या आकारांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतजमिनीचे आकार यांची तुलना केल्यास या तुकडेवारीचा मुद्दा प्रकर्षाने लक्षात येईल :(आकार : एकरी)

| ऑस्ट्रेलिया | कॅनडा | न्यूझिलंड | यु. एस. ए. | इंग्लंड | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|
| ७७४.६ | २२३.९ | ४९३ | १६७.७ | ६२ | १२ |

(वैद्य चिं. ग, पृ. १२०)

शेतजमिनीचा कमीत कमी किती आकार हा मशागतीस व उत्पादन घेण्यासाठी परवडणारा असू शकतो, याविषयी विविध मतमतांतरे होती. मुंबई प्रांताच्या शेती खात्याचे प्रमुख कीटिंग यांनी ४० ते ५० एकराच्या सलग व चांगल्या उपजावू क्षेत्राची शिफारस केली होती. पुरेसे पाणी असलेली विहीर, शेतावरच राहण्याचे घर अशा पूरक सुविधा

आवश्यक असल्याचे कीटिंग यांचे म्हणणे होते. बडोदा आर्थिक समितीने ३० ते ५० बिघ्यांचे क्षेत्र योग्य असल्याचे मत दिले होते. स्टॅनले जीव्हन्स यांनी २० ते ३० एकर क्षेत्र आणि काँग्रेस कमिटीने १५ ते २० एकरांची शिफारस केली होती. नियोजन आयोगाने नेमलेल्या समितीच्या मते "ज्या जमिनीपासून वार्षिक १६०० रुपये ढोबळ उत्पन्न किंवा १२०० रुपये निव्वळ उत्पन्न मिळत असेल व जी जमीन पाच माणसांच्या एका कुटुंबाला दोन बैलांच्या साहाय्याने नांगरता येणाऱ्या जमिनीपेक्षा आकाराने कमी नसेल अशा जमिनीला Family Holding असे म्हणावे. जमिनीचे कमाल धारणा क्षेत्र पाच किंवा कमी माणसांच्या कुटुंबाला फॅमिली होल्डिंगच्या तिप्पट असावे आणि पाचपेक्षा जास्त माणसे असल्यास जास्त; परंतु कमाल धारणाक्षेत्र फॅमिली होल्डिंगच्या सहा पटीपेक्षा जास्त असू नये." (वैद्य, पृ. १२४)

वारसाहक्कामुळे दर पिढीगणिक कुटुंबातल्या सदस्यांत जमिनीची वाटणी होत असल्याने महाराष्ट्रातल्या शेत जमिनीचे सातत्याने तुकडे पडत होते. जमिनीच्या लहान तुकड्यांवर कुंपण घातल्याने काही जमीन फुकट जात असे. पाटाच्या पाण्याचे चाऱ्या करून सिंचन खर्चिक होत असे. लागवडीचा व मशागतीचाही खर्च जास्त होत असे. इतक्या लहान तुकड्यात शेतीसाठी यंत्राचा वापर करता येत नसे. एकूण तुकडेवारीची शेती न परवडणारी होती. या तुकडेवारीला आळा घालण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा यासाठी १९१६ साली रँग्लर परांजपे यांनी मुंबई सरकारला कायदा करण्याची विनंती केली होती, मात्र ती सरकारने फेटाळली. भविष्यकाळात लहान तुकडेवजा शेते अस्तित्वात येऊ नयेत यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून जमिनीच्या वाटणीवर निर्बंध घालावेत या हेतूने मुंबई सरकारने १९२७ साली भूखंड एकत्रीकरणाचे विधेयक मांडले होते. या विधेयकाचा मसुदा अभिप्रायार्थ प्रवर समितीकडे पाठविण्यात आला. प्रवर समितीचे एक सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपली भिन्न मतपत्रिका जोडली. या विधेयकामुळे अल्पभूधारक भूमिहीन होतील व धनदांडगे एकत्रीकरणाच्या नावाखाली जमिनी बळकावून बसतील अशी भीती डॉ. आंबेडकरांनी नमूद केली होती. मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारने मात्र १९२८ साली अल्पभूधारकांना एकत्रीकरणाचा लाभ घेता यावा यासाठी जमिनीच्या तुकडीकरणाला आळा घालणारा जमीन एकत्रीकरणाचा (Consolidation) कायदा पारित केला. अखेर मुंबई प्रांतातही १९४७ साली तुकडेबंदी आणि धारण जमीन एकत्रीकरण कायदा आणून हा प्रश्न सोडविण्यात आला. वाजवी नुकसानभरपाई स्वीकारून जमिनीच्या तुकड्याचे हस्तांतरण करण्याचा मार्ग मोकळा झाला. या कायद्यात किमान शेत जमिनीची व्याख्या करण्यात आली व किमान शेतजमिनीपेक्षा कमी आकाराचे तुकडे करण्यास बंदी घालण्यात आली. जमिनीच्या खरेदीविक्रीवरही निर्बंध घालण्यात आले. जमीन विकायची झाल्यास ती

शेजारच्या जमीनमालकासच विकावी व तो तयार नसेल तर सरकारने योग्य किंमत देऊन ती विकत घ्यावी व शेजारच्या जमीन मालकास लागवडीसाठी द्यावी. या प्रकारचे व्यवहार करणे सुलभ व्हावे म्हणून जमीन एकत्रीकरण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचीही तरतूद करण्यात आली.

तुकडेबंदीबरोबरच कमाल जमीन धारणा (Ceiling on Holding) कायदा करण्यात आला व कोणत्याही कुटुंबाला कमाल मर्यादेच्या दुप्पटीपेक्षा जास्त जमीन धारण करता येणार नाही, असा नियम करण्यात आला. कमाल जमीनधारणा विधेयकात कमाल जमीन धारणेच्या मर्यादांचा पुढील तपशील अंतर्भूत होता :

(१) १२ महिने भिजणारी बागाईत जमीन : १६ एकर

(२) ८ महिने भिजणारी बागाईत जमीन : २४ एकर

(३) ४ महिने भिजणारी बागाईत जमीन : ४८ एकर

(४) कोरडवाहू जमीन : ८४ ते १५६ एकर.

(कित्ता,पृ. १२५)

**सहकारी शेती :**

या काळात तुकड्यांच्या एकत्रीकरणाबरोबर सहकारी शेतीचा पर्याय चर्चेत आला. सहकारी शेतीमुळे पाणीपुरवठा, यंत्रसामुग्रीचा वापर, भांडवल, बियाणे, खते यांचा खर्च कमी होत असे. संयुक्त सहकारी शेती संस्थेत सदस्यांच्या मालकीची जमीन एकत्र करण्यात येते व या जमिनीवरचा सदस्याचा मालकी हक्क सुरक्षित रहातो. येणाऱ्या उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक उत्पन्न वेतनाच्या प्रमाणात वाटले जाते. सहकारी खंडकरी शेती संस्थेत सरकारकडून किंवा जमीनदाराकडून जमीन कसण्यासाठी घेतली जाते व तिचे तुकडे पाडून सदस्यांना भाड्याने कसण्यास दिली जाते. सामुदायिक शेती संस्थेत सर्व सदस्य एकत्र येऊन शेती करतात व प्रत्येकाने दिलेल्या योगदानाच्या प्रमाणात उत्पन्नाची वाटणी होते. महाराष्ट्रात २५४ संस्थातील ८१२४ सदस्यांनी सहकारी शेतीखाली ३३,२९५ एकर जमीन लागवडीखाली आणली होती.

सहकारी शेतीचा हा प्रयोग फारसा रूजला नाही. वि. म. दांडेकर यांच्या मते लहान शेतकऱ्यांच्या शेतीचे एकत्रीकरण करून सहकारी शेतीत त्याची पुनर्घटना करणे वाटते तितके सोपे नाही. त्याची कारणमीमांसा करताना त्यांनी मांडलेले मुद्दे लक्षणीय आहेत :

१. लहान शेतकऱ्यांची शेती इतस्तत: विखुरलेली असल्याने तिचे एकत्रीकरण करणे कठीण असते.
२. जरी अशा लहान शेतांचे एकत्रीकरण करून कायद्याने सहकारी शेतीत रूपांतर केले, तरी या शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने, सभासदाच्या घरच्या सर्व माणसांना काम देणे, व त्या सर्वांच्या किमान वेतनाची तरतूद करणे सहकारी

संस्थेच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे.

३. जमिनीची बांधबंदिस्ती, जमीन सुधारणा, जलसिंचन, रस्ते करणे अशी उत्पादनपोषक कामे शोधून द्यायची झाल्यास सर्वांना वाटा देऊन, सर्वांचे पोट भागेल इतक्या मोठ्या प्रमाणावर जमिनीचे एकत्रीकरण झाले पाहिजे; मात्र अशी उपाययोजना 'कम्युनिझम'च्या राजवटीखेरीज शक्य होणारी नाही. (दांडेकर, वि. म. १९७१, पृ. २५१-२५२)

सारांश, जमिनीचे सरसकट एकत्रीकरण वा सहकारीकरण शक्य न झाल्याने सहकारी शेतीचा महाराष्ट्रात विस्तार होऊ शकला नाही. [३]

**शेतीपूरक जोडधंदे :**

महाराष्ट्रातील सर्वच शेतकरी बारमाही शेती करतात असे नाही. पावसाळ्यातले चार महिने सोडल्यास उर्वरित आठ महिन्यात शेतीच्या कामात काहीशी स्वस्थता लाभते. पावसाळ्यात शेतमजुरी करणारे शेतकरी त्यानंतर आठनऊ महिने गावातच काही लहान सहान उद्योग करतात किंवा बाहेर शहरात जाऊन काम शोधतात. पूर्ण वेळ शेती करण्यासाठी लागणारी जमीनही बहुतांश शेतकऱ्यांना उपलब्ध नसते. इंग्लंड व वेल्स देशात दर माणशी २१ एकर शेती असते म्हणून ती त्यांना परवडते. आपल्याकडे ही परिस्थिती नसल्याने शेतीचा धंदा आतबट्ट्याचाच होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पूरक जोडधंदे केलेत तरच ते आपली आर्थिक स्थिती सुधारू शकतात, अशी समजूत या काळात दृढ होत होती. सर विश्वेशरया यांनीही ही सूचना केली होती.

शेतीला पूरक ठरतील असे कोणते जोडधंदे करता येतील याचीही चर्चा या काळात सुरू झाली होती. महात्मा गांधींच्या वर्धा योजनेतून सूतकताई आणि वस्त्रोद्योगाचा पर्याय पुढे आला होता. मात्र या पर्यायाविषयी मतभेद होते. या योजनेचा पुरस्कार करणारे पुण्याच्या खादीभांडाराचे चालक श्री, भोगीलाल जैन यांनी एका लेखात आकडेवारीसह या योजनेच्या लाभाची माहिती प्रसिद्ध केली होती. त्यानुसार भारतीय चरखासंघाने साडेतेरा हजार विणकरांना काम पुरवून ५ लाख ११ हजार रुपयांचा मेहनताना मिळवून दिला होता. १ लक्ष ७० हजार सूतकताई करणाऱ्यांना साडेचार लाख रुपयांचा मेहनताना मिळाला होता. तर एक हजाराहून अधिक बेकार तरुणांना खादीसेवकाचे काम देऊन पावणेतीन लाखांचा मोबदला दिला होता. ('महाराष्ट्र राष्ट्रसभा', डिसेंबर १९३६) मात्र या आकडेवारीचा बारकाईने विचार केल्यास खादीग्रामोद्योगाचा धंदा परवडणारा नव्हता हे लक्षात येते. उदाहरणार्थ, विणकऱ्यास वर्षाला ३८ रुपये, सूत कातणाऱ्याला वर्षाला २ रु. ६५ पैसे, व खादी सेवकास वर्षाला २७५ रुपये मेहनताना मिळाला होता. 'शेतकरी ऋणविमोचन' पुस्तकाचे लेखक श्री. महादेव वाघ यांनी या योजनेविषयी व्यक्त केलेला अभिप्राय यादृष्टीने बोलका आहे : "हा लाकडी चरखा किंवा टकळी रोज आठ तास सतत

कष्ट करूनही पोटाला सहा दिडक्या देण्यास समर्थ नाही.. जगातील कापडाच्या गिरण्यांच्या शर्यतीत हे साधन घेऊन उतरणे म्हणजे पांगुळगाडा घेऊन विमाने व मोटारी यांच्या शर्यती जिंकण्यासारखे आहे. .. इंग्लंडच्या आजच्या विशाल वैभवाचा पाया १८ व्या शतकातील सॅम्युएल क्रॉप्टनच्या सूतयंत्राने घातला... हिंदुस्थानात गेल्या दहा-वीस वर्षांच्या तीव्र राजकीय आणि सामाजिक व औद्योगिक चळवळींनी आणि जमविलेल्या कोट्यवधी रुपयांच्या फंडांनी एकही 'हिंदी क्रॉप्टन' उत्पन्न केला नाही,.. हिंदुस्थानची औद्योगिक प्रगती यच्चयावत जपान-जर्मनीच्या धर्तीवर झाल्याशिवाय स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपणास एक क्षणही जगता येणार नाही" (वाघ महादेव, १९३९, पृ. ३६-३८) यंत्रयुगात खादीचे अर्थशास्त्र टिकणार नव्हते. सरकी काढणे, गट्ठे बांधणे, सूत कातणे याबाबतीत पुढे आलेल्या यांत्रिक सुधारणा झुगारून देता येणार नव्हत्या. लोकांच्या मानसिकतेचा व बाजारपेठीय मागणी-पुरवठ्याचाही विचार तेवढाच महत्त्वाचा होता. खादीच्या चळवळीमुळे काही काळ बाजारात खादीच्या कापडाची मागणी वाढली होती. त्यामुळे गिरणीवाल्यांनी कमी खर्चाचे व जाड सुताचे स्वस्त कापड बाजारात आणले व ते खादी म्हणून विकण्यास सुरुवात केली. लोकांनीही हातमागावरील खादीपेक्षा 'गिरणीची खादी' स्वस्त म्हणून या कापडाची उत्साहाने खरेदी केली. (काळे, १९२९, पृ. ३२५) त्यामुळे यांत्रिक उपकरणांचा वापर करून जोडधंदे निर्माण करण्याचा पर्याय विचारात घेणे भाग होते.

श्री. महादेव वाघ यांनी स्वत:ही शेतीला पूरक जोडधंद्यांची एक सूची तयार करून प्रसिद्ध केली होती. उदाहरणार्थ, फुलबागा लावून त्यापासून सुवासिक अत्तरे, उटणी, गुलकंद तयार करणे; फळबागा लावून फळांचे मुरंबे करून पॅकबंद डब्यातून विकणे; औषधी वनस्पती लावून रसशाळेस पुरवणे, मलमे, चूर्णे, पावडरी, मेंथॉल, व्हॅसलीन तयार करणे; सेंट्रीफ्युगल यंत्राने ऊसाच्या रसापासून साखर तयार करणे; रेशीमकिड्यांची जोपासना करून रेशमी वस्त्रे विणणे; बांबू-वेतापासून चटया, टोपल्या, फर्निचर बनविणे; घायपात, आंबाडी, ताग, जवस यांच्यापासून यंत्राच्या सहाय्याने दोर वळणे, काथ्या तयार करणे; ऑस्ट्रीयन जातीच्या अंगोरा व अल्पाका जातीच्या मेंढ्या पाळून मऊ लोकर मिळविणे; लाकूडकामातून सतारी, तंबोरे, हार्मोनियम वाद्ये तयार करणे, यांत्रिक उपकरणे वापरून कमावलेल्या कातड्याच्या उपयुक्त वस्तू बनविणे; संकरित गाई पाळून दुग्धोत्पादन करणे, कोंबड्या पाळणे; उदबत्त्या, बुक्का, तपकीर, दांतवण तयार करणे; विड्या वळणे, मेणबत्त्या, साबण तयार करणे; पाव, बिस्किटे, पेपरमिंट, चॉकलेट तयार करणे; हिरड्यापासून रंग तयार करणे, करंज व एरंडाच्या बियांचे तेल गाळणे, हाडांची पूड करून खते बनविणे; वाळ्याचे पंखे-पडदे तयार करणे; गळित धान्यापासून तेल, पेंढ, दिव्याचे तेल तयार करणे इत्यादी जोडधंदे करण्याची कौशल्ये संपादित करून व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उर्जितावस्था नक्की येईल असा विश्वास त्यांनी

व्यक्त केला आहे. अर्थात त्यासाठी तालुकास्तरावर उद्योगशिक्षणाच्या शाळा काढल्या पाहिजेत, भांडवलपुरवठ्याची यंत्रणा उभी केली पाहिजे आणि तयार झालेल्या मालाची विक्रिव्यवस्था निर्माण केली पाहिजे.

भांडवल पुरवठ्यासाठी विमा कंपन्यांनी कर्जपुरवठा करण्याचा पर्यायही श्री. वाघ यांनी सुचविलेला आहे. विमा कंपन्यांकडे निधी कसा उपलब्ध आहे, याची आकडेवारीही त्यांनी दिली होती. १९३७ साली देशात १६० विमा कंपन्या होत्या व त्यांच्याकडे १७५ कोटी रुपयांचा निधी जमा झाला होता. ओरिएंटल, हिंदुस्थान,एम्पायर, नॅशनल आणि वेस्टर्न या पाच कंपन्यांनीच केवळ १०० कोटींचा धंदा केला होता. या कंपन्यांनी अल्प व्याजदराने या पूरक जोडधंद्यांना कर्जपुरवठा केल्यास भांडवलाचा प्रश्न सहज सुटू शकला असता. (वाघ महादेव, १९३९, पृ. ४२-४८)

**शेतीकेंद्री दळणवळण :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात रेल्वे मार्ग आणि सडका तयार झाल्या होत्या; रस्त्यावरून मोटारी धावू लागल्या होत्या. हिंदुस्थान सरकारने रस्ते विकास मंडळ स्थापन करून दळणवळणाच्या सेवांच्या विस्ताराचे जाळे पसरवण्यासाठी योग्य ती पाऊले उचलली होती. असे असले तरी अद्याप ग्रामीण भागातल्या रस्ते विकासाला प्राधान्य मिळालेले नव्हते. शेतकऱ्यांना मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या पूरक रस्त्यांची सुविधा मिळाली असती, तर त्यांच्या शेतमालाला थेट बाजारपेठेत न्यायची संधी मिळाली असती. शिवाय शहरांशी संबंध आल्याने त्यांच्या विचारविश्वात, साक्षरतेत आणि जीवनमान सुधारण्यात प्रगती होऊ शकली असती. त्यामुळे शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून रस्ते विकासाचा आराखडा तयार करण्याची रॉयल कमिशनने शिफारस केली होती. कमिशनने आपल्या अहवालात म्हटले होते की, "Roads should be designed to serve rather as feeders to railway than as competitors for traffic." "We would emphasise the importance of subsidiary communication which are of even greater concern to the cultivator. His village must be linked up with the main arterial roads if he is to get the advantage of good communication" (p. 42-43) रॉयल कमिशनने शेतमाल आणि शेतीशी संबंधित अवजारांच्या वहातुकीसाठी सवलतीचे दरपत्रक लागू करण्याचीही शिफारस केली होती.

१९१९ च्या कायद्यान्वये रस्त्यांचा विषय प्रांतिक सरकारकडे वर्ग करण्यात आला होता. मध्यवर्ती सरकार फक्त महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या विकासाची जबाबदारी घेणार होते. ग्रामीण भागातून शेतमाल बाजारपेठांमध्ये आणण्यासाठी ग्रामीण भागात रस्ते विकसित करण्याची निकड होती. प्रांतिक सरकारने याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित होते. यादृष्टीने १९२७ साली मु. रा. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते

विकासासाठी एक समिती नेमण्यात आली. समितीने रस्ते बांधणीचा आणि दुरुस्तीचा खर्च हा प्रांतिक सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना पेलवणारा नसल्याने केंद्रानेच रस्ते विकासाची जबाबदारी पूर्णत: स्वीकारावी अशी शिफारस केली. जरूर पडल्यास मध्यवर्ती सरकारने त्यासाठी पेट्रोलवर कर आकारावा, वाहन परवाना शुल्क आकारावे इत्यादी निधी संकलनाचे उपायही सुचविले होते. मध्यवर्ती सरकारने १९२९ साली अशा प्रकारची कर योजना सुरू करून 'केंद्रीय रस्ता निधी' स्थापन केला. या निधीतून रस्ते विकासासाठी, नवे पूल बांधण्यासाठी खर्च करण्यात येणार होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लष्करी साहित्याची वाहतूक, मालाची ने-आण व तत्सम इतरही वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली होती. बरेच रस्ते नादुरुस्त होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन १९३४ साली भारतातल्या सर्व प्रांतातल्या सरकारी अभियंत्यांची व संरक्षण खात्यातील अधिकाऱ्यांची नागपूरात बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुढील वीस वर्षांसाठी रस्ते विकासाची समग्र योजना तयार करण्यात आली. या नागपूर आराखड्यात रस्ते विकासासाठी काही पायाभूत सूत्रे नक्की करण्यात आली. सुपीक प्रदेशातील कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून ८ कि. मी.च्या आत असले पाहिजे, व नापीक भागातले कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून ३२ कि. मी.पेक्षा जास्त दूर नसले पाहिजे अशा पद्धतीने रस्त्यांचे आंतरजाल निर्माण करण्यात यावे. १०० कि. मी. क्षेत्रफळात १६ कि. मी. लांबीचे रस्ते हे सरासरी प्रमाण ठरविण्यात आले. ग्रामीण रस्ते, जिल्हा रस्ते, राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग असे रस्ते विकासाचे वर्गीकरण करण्यात आले. देशभरात ५, ३२, ७०० कि. मी. रस्ते तयार करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

मध्यवर्ती सरकार जितक्या गांभीर्याने रस्ते विकासाकडे लक्ष देत होते तितके मुंबई राज्यात वाहतुकीच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. वाहतुकीची उत्तम सोय झाल्यास राष्ट्राची आर्थिक उन्नती आणि सांस्कृतिक विकास होण्याचे माध्यम खुले होते, हे लक्षात घेण्याइतकी समज एतद्देशीय पुढाऱ्यांमध्ये अद्याप विकसित झालेली नव्हती, त्यामुळे प्रांतिक सरकारात असणारे देशी मंत्री या समस्येबाबत उदासीनच होते. काँग्रेसचे आमदार व मुंबईचे प्रधानमंत्री ना. बाळासाहेब खेर यांचे पार्लमेंटरी सचिव म्हणून काम पाहणाऱ्या नानासाहेब कुंटे यांनी याबाबतची त्यांची निरीक्षणे सुस्पष्टपणे नोंदवली आहेत. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, मुंबई राज्यातील वाहतूक समस्या समजून घेऊन त्याप्रमाणे पावले टाकणारा मंत्री मुंबई सरकारात आलाच नाही. मुख्यमंत्री खेरांनी रस्ते, पूल, वीज, धक्के इत्यादी कामांकरिता १९३७ ते १९३९ या काळात नेमलेले बांधकाम मंत्री महमद यासीन नूरी अजमेरचे राहाणार, अहमदाबादेतून निवडून आलेले, सपाट मैदानातील बॅरिस्टर; १९४६ साली मंत्री झालेले डॉ. गिल्डर यांनी मुंबईबाहेर पाऊलही टाकलेले नव्हते. त्यानंतर आलेल्या जीवराज मेहतांचे सर्व लक्ष

गुजरातकडे होते, नंतर आलेले निंबाळकर राजे फलटणसारख्या मैदानातील दुष्काळी संस्थानातून आलेले, त्यांना कोकणची प्रादेशिक स्थिती माहीत नव्हती, यामुळे कोकण आणि ग्रामीण भागातल्या रस्त्यांचा विकास व वाहतुक समस्या सोडविण्याचे दीर्घकालीन धोरणच अस्तित्वात नव्हते. बांधकाममंत्री नूरींना कोकणातली वाहतुक समस्या सोडविण्थासाठी राजापुरकरांनी अणस्कुरा घाट फोडण्याची विनंती केली होती, तेव्हा मंत्र्यांनी राजापुरकरांना प्रतिप्रश्न केला होता की, "आधी या प्रदेशात वस्ती का केलीत आणि आता घाट फोडा सांगतात, याला काय म्हणावे?" (कुंटे ,१९८२, पृ.८५-८६, १२८) महायुद्धाच्या तयारीचा भाग म्हणून मुंबई-पुणे काँक्रिटचा रस्ता, देहूरोड रेल्वेवरील पूल, मुंबई-गोवा रस्त्यारील पूल बांधले गेले; महायुद्ध सुरू झाल्यावर खारपाड्याचा पूल बांधला; पण ग्रामीण विकासासाठी रस्तेबांधणी झाली नाही.

कोकणात काही ठिकाणी खाड्यांतून गलबते, माचवे, होड्यांतून वाहतूक होई. पण सडका आणि चांगले रस्ते नसल्याने बऱ्याच ठिकाणी जवळच्या अंतरासाठी लांबपल्ल्याने प्रवास करावा लागे. कोकणात १०० ते १५० इंचापर्यंत पाऊस पडे, त्यामुळे रस्त्यांची धूप जास्त होत असे; मात्र देशावरच्या आणि कोकणातल्या रस्त्यांच्या डागडुजीसाठी दिला जाणारा निधी सारखाच असे. स्थानविशिष्टता लक्षात न घेता सब घोडे बारा टक्के न्यायाने निधीची तरतूद होत असे. कोकणात जलपर्यटनाचा पर्याय विकसित करण्याची गरज होती. उदाहरणार्थ, मुंबई –रत्नागिरी सरळ रेषेत अंतर १२० मैल, मात्र सडकेने २४० मैल होते; मुंबई-वेंगुर्ला २१० मैलांचे अंतर, पण रस्त्याने ४५० मैल होते. रेवस-रेडी रस्ता तयार केल्याने इंधन, वेळ वाचवता आले असते; पण सरकारकडून ते झाले नाही. विजयदुर्ग ते देवगड अंतर ९ मैल, पण रस्त्याने पूर्वेस ३५ मैल जाऊन महामार्गावर येऊन परत पश्चिमेकडे ३५ मैल असा खुष्कीचा मार्ग होता. असे असूनही कोकणात जलवाहतुकीसाठी धक्के बांधणे, बंदरविकासाच्या कामाकडे लक्ष दिले गेले नाही. ख्रिस्तपूर्वकाळापासून कोकणात चौल आणि नालासोपारा इथल्या बंदरांतून व्यापार चालत होता; वेंगुर्ला बंदराचे जकातीचे उत्पन्न एक कोटी रुपयांपर्यंत मिळत असे; पण मुंबई सरकारने मुंबई बंदराबाहेर ६०० मैल किनारपट्टी असलेल्या समुद्रातून जलवाहतुकीच्या विकासासाठी पुढाकार घेतला नाही. पाण्यातल्या बांधकामासाठी आवश्यक असणारा एकही 'मरीन इंजिनियर' नेमलेला नव्हता. ६० वर्षांपासून समुद्रमार्गे प्रवास करणाऱ्या उतारूंकडून १ रुपया व्हारफेज फी घेतली जाई, पण त्यातून बंदरावर धर्मशाळा, दिवाबत्ती, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी एकही रुपया खर्च करण्यात आला नव्हता. उलट डॉ. जीवराज मेहता यांनी व्हारफेज फी चौपट करण्याचे विधेयक आणले होते, तेव्हा नाना कुंटे यांनी हे वास्तव निदर्शनास आणून फी वाढीचे विधेयक रोखले होते. रत्नागिरीपासून २४ मैलांवर असलेल्या जयगडला समुद्र खोल असल्याने व

दक्षिणोत्तर टेकड्या असल्याने वाऱ्यापासून संरक्षण होते, त्यामुळे बोटी केव्हाही बंदरात येऊ शकतील म्हणून हे नवे बंदर बांधण्याचा प्रस्तावही सरकारने विचारात घेतला नाही. अलिबाग तालुक्यात मांडवा बंदर विकसित करण्याची मागणी १९४६ साली करण्यात आली, पण त्याकडेही सरकारने लक्ष दिले नाही. रत्नागिरी जिल्ह्यात १८ बंदरे होती, पण अनेक खाड्यांची तोंडे अरुंद होती, खाड्यांमध्ये गाळ साचलेला होता, त्यामुळे बंदरे तरती ठेवण्यासाठी गाळ काढणे, बोट किनाऱ्यापर्यंत पोहचावी म्हणून धक्के बांधणे, बंदरावरून अंतर्गत गावांत पोहचण्यासाठी रस्ते करणे असा बंदरसुधारणांचा मोठा खर्चिक कार्यक्रम सरकार अंगावर घेत नव्हते. (कुंटे ,१९८५,पृ. १२२-१२४) रस्ते वा जलमार्ग विकासाकडे असे दुर्लक्ष झाल्याने कोकण व ग्रामीण भागाच्या विकासाला हवी तशी गती प्राप्त होऊ शकली नाही.

**बाजारसमित्यांची संकल्पना :**

शेतकऱ्यांच्या मालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसे. उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मालाचा भाव ठरविण्याचा कुठलाच अधिकार नव्हता. यासंबंधीचा असंतोष तत्कालीन ब्राह्मणेतर चळवळीतील लेखकांनी वेळोवेळी व्यक्त केला आहे . श्यामराव गोविंदराव देसाई यांनी १९३१ साली 'राष्ट्रवीर' साप्ताहिकातील लेखमालेतून हा प्रश्न उपस्थित केल होता. त्यांनी म्हटले होते की, "वकील, डॉक्टर, अभियंते, हॉटेलवालेही आपले कसब, ज्ञान, चीजवस्तूंचे भाव आपण ठरवितात; पण शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचे भाव ठरविण्याची व्यवस्था येथे नाही. जेव्हा शेतकरी आपल्या उत्पादन केलेल्या मालाचा भाव ठरवील तेव्हा येथील पिढीजात दारिद्र्य संपेल. (गुंदेकर, २०१३, पृ. २८) मार्केट यार्डात शेतमालाच्या खरेदीचे व्यवहार कसे होत असत, याचे एक वास्तवचित्र बळीराम नागो कुंभार गुरुजी यांनी 'आकाश तर फाटले, ठिगळ कसे लावणार' या जळगावच्या 'बातमीदार' पत्रातील लेखमालेतून मांडले होते. मार्केट यार्डात शेतमालाचा भाव ठरवताना कुठलीही पारदर्शकता नव्हती. दलाल आणि व्यापारी हातात हात घालून वर उपरणे टाकून भाव ठरवतात. शेतकऱ्यांना भाव ठरवताना एका शब्दानेही विचारत नाहीत. शेतकऱ्यांकडे माल उत्पादन झाला की भाव गडगडतात आणि व्यापाऱ्यांकडे तो गोळा झाल्यावर भाव चढतात. पासंग पद्धतीने वजनापेक्षा जास्त माल घेतात. दलाई, तोलाई, हमाली शेतकऱ्यांवरच आकारली जाते. मालाचे पैसेही वेळेवर देत नाहीत."(गुंदेकर, २०१३, पृ. ३३१) देशातल्या शेतमालाच्या बाजारपेठेतल्या उलाढालींची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणारी पद्धतशीर यंत्रणा नसल्याने शेतकऱ्यांना बाजारपेठीय स्पर्धेचा लाभ घेता येत नसे. स्थानिक दलालांच्या मर्जीवर बाजारपेठेतले खरेदी-विक्री व्यवहार अवलंबून असत. या परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काही प्रयत्न या काळात झाले. विशेषत: वऱ्हाडात

विपणनव्यवहारांसाठी संविधानिक पातळीवर बाजार समित्या संघटित करण्याची तरतूद करण्यात आली होती. लोकांनी निवडून दिलेल्या सदस्यांची समिती बाजारपेठेच्या व्यवस्थापनाचे काम पाहत असे. मुंबई इलाख्यातही कापसाच्या बाजारपेठेची देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी अशा प्रकारची लोकनियुक्त समिती संघटित करण्यात आली होती; परंतु वऱ्हाडाप्रमाणे मुंबईत तिचे प्रत्यक्ष कामकाज सुरू व्हायला बराच उशीर झाला होता. पीक उत्पादकांचा सहभाग असलेल्या बाजारसमित्यांची संकल्पना अशा प्रकारे १९२१ ते १९३० या दशकात आकार घेऊ लागली होती. बाजारपेठेतील दलालांसाठी आचारसंहिता व नियमावली तयार करण्याची संधी अशा प्रकारच्या समित्यांना प्राप्त झाल्याने खरेदी-विक्रीचे व्यवहार अधिक पारदर्शी व्हायला मदत होणार होती.

**प्रतवारी आणि प्रमाणीकरण :**

बाजारपेठेत माल पाठवताना स्वच्छ करून, प्रतवारी लावून पाठविण्याची सवय शेतकऱ्यांना नसल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हिंदुस्थानातल्या मालाविषयी विश्वासार्हता निर्माण होत नव्हती, असे एक निरीक्षण रॉयल कमिशनने आपल्या अहवालात नमूद केले आहे. (पृ. ४५) आपल्याकडच्या कापसात भेसळ असायची, धूळ व कचरा असायचा. तुलनेने शेंगदाण्यांच्या बाबतीत तक्रार नसायची. यासाठी बाजारपेठेतील मालाची प्रतवारी ठरविणारी यंत्रणा निर्माण करण्याची गरज होती. बाजारसमित्यांना याही कामात लक्ष घालण्याची गरज होती. (साठोत्तरी कालखंडात कापसाच्या एकाधिकार खरेदी योजनेत ग्रेडर नेमून कापसाची प्रतवारी ठरविण्याची कल्पना प्रत्यक्षात आली होती. अर्थात ग्रेडरने काही ठिकाणी भ्रष्टाचार केल्याच्या घटनाही झाल्या होत्या, हे अलाहिदा.)

वजनमापांचे प्रमाणीकरण ही बाजारपेठेतली एक महत्त्वाची समस्या होती. याचा अर्थ वजनमापांची आपल्याकडे कुठलीच व्यवस्था नव्हती असे नाही. मोजमपाची देशी प्रमाणके आणि साधने अस्तित्वात होती. गावपातळीवरचे अगदी छोटे व्यवहार सुकर व्हावेत यासाठी छटाक, अतपाव (अर्धपाव),अच्छेर, शेर, चंपे (दोन शेर), पायली, मण, खंडी अशी मोजमापाची प्रणाली व मापे उपलब्ध होती. सोन्याचांदीच्या व्यवहारात गुंज, मासा, तोळा ही प्रणाली अस्तित्वात होती. मात्र वजनमापांची अचूकता तपासण्याची कुठलीही यंत्रणा नव्हती. त्यामुळे वजनभार करताना दांडी मारणे वगैरे प्रकार चालत. पसा आणि फडाच्या भाषेतल्या गणन प्रक्रियेत शेतकऱ्याकडून जास्तीचा माल पदरात पाडून घेण्याची चलाखी होत असे. उदाहरणार्थ, आंब्यांची खरेदी-विक्री शेकडेवारीने होत असे. पाच आंब्याचा एक फड असे वीस फड म्हणजे शंभर आंबे होत. परंतु स्थानपरत्वे ६ आंब्याचा फड गृहीत धरून शंभर आंब्यांच्या मोबदल्यात १२० आंबे विकत घेतले जात असत. त्यामुळे मोजमापाच्या प्रमाणिकरणाची संविधानिक व्यवस्था असण्याची गरज होती. १९१३ साली हिंदुस्थान सरकारने त्यासाठी एक समितीही नियुक्त केली होती;

परंतु या समितीच्या शिफारशींवर कुठलीच कार्यवाही झालेली नव्हती.

१९३७ साली मध्यवर्ती सरकारने शेतमालाची प्रतवारी व मार्किंगबाबत कायदा करून बाजारपेठेतील शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहारात पारदर्शता आणण्याची व्यवस्था निर्माण केली. या कायद्यानुसार शेतीमालाच्या वर्गवारीची चिन्हे (Agmark) देण्याचा अधिकार मार्केटिंग सल्लागारास देण्यात आला. १९३९ साली मुंबई सरकारने नियंत्रित बाजारपेठांचा कायदा केला. या कायद्यानुसार सरकारमान्य वजनमापेच वापरणे बंधनकारक करण्यात आले. कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीनेच बाजारपेठेतील खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्याचे नियम करण्यात आले. मार्केट कमिटी स्थापन करण्याची व बाजारपेठेच्या व्यवहारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम या कमिटीकडे सोपविण्यात आले. बाजारपेठेतील तंटे सोडविण्याचे काम लवादाकडे राहील असा नियम करण्यात आला. १९४७ साली मुंबई सरकारने नियंत्रित गुदामांचा कायदा पास करून शेतमालाच्या साठवणीबाबत नियम केले.

**सहकारी सोसायट्या :**

शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी, अवजारे खरेदी करण्यासाठी मोठ्या रकमांची गरज असते. खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन शेतकरी आपल्या गरजा भागवित असे. परंतु त्यासाठी सावकार जमिनीचे गहाणखत करून घेत असे. चक्रवाढ व्याजाने व वाढीव दराने घेतलेल्या कर्जाचे केवळ व्याज भरण्यातच शेतकरी हल्लख व्हायचा. बऱ्याचदा तारण ठेवलेल्या जमिनी सावकाराच्या मालकीच्या करून देण्याशिवाय पर्याय नसायचा. १९०९ पर्यंत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दयनीय होती. प्रत्येक शेतकऱ्यास वर्षातून एकदा पिकाच्या हंगामावरच काय ती आर्थिक प्राप्ती होत असे. बाकी वर्षभर पैसे मिळविण्याचा मार्ग नव्हता. त्यामुळे शेतकरी सावकाराकडून कर्ज घेई व व्याजापोटी कफल्लक बने. यावर सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या पतसंस्था सुरू करण्याचा एक उपाय होता. १९०१ च्या फेमिन कमिशनने सहकारी चळवळीचा पुरस्कार करण्याची योजना तयार केली होती. त्यानंतर १९०४ साली लॉर्ड कर्झनच्या कारकिर्दीत को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी कायदा पास झाला.

विदर्भात अकोला येथे १९०४ साली देवराव विनायक यांनी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी स्थापन केली व कमी व्याजदरात कर्ज देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. १३ नोव्हेंबर १९०४ रोजी अमरावती जिल्ह्यातील नांदगाव-पेठ येथे जिल्ह्यातील पहिली सहकारी पतसंस्था स्थापन झाली. १९०५ साली सोलापूर जवळील तळवडे येथे शेतकरी सहकारी पतपेढी स्थापन झाली. २० सप्टेंबर १९०७ रोजी नागपूरला 'नागपूर गव्हर्मेंट प्रेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन झाली. १९०९ च्या पुढे विदर्भात तालुका व जिल्ह्याच्या शहरांत सहकारी मध्यवर्ती बँका सुरू झाल्या. ५ फेब्रुवारी १९०९ रोजी

सहकारी कायद्यानुसार देवराव विनायक दिगंबर यांच्या पुढाकाराने 'अकोला सेंट्रल अर्बन बँक ' स्थापन झाली. पाठोपाठ १९११ साली नागपूरला सर माधवराव देशपांडे यांनी 'नागपूर सेंट्रल बँक ' स्थापन केली. मुंबईत गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मदतीने लल्लुभाई सामळदास मेहता आणि विठ्ठलदास ठाकरसी यांनी ११ ऑक्टोबर १९११ रोजी 'बॉम्बे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ' स्थापन केली. नंतरच्याच वर्षात या बँकेची बारामतीस शाखा निघाली. १९१७ साली वैकुंठराव मेहता अध्यक्ष असताना या बँकेचे 'दि बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक ' असे आणि त्यानंतर १९२३ साली 'बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक ' असे नामांतर झाले. दरम्यान १९१३ साली चंद्रपूर जिल्ह्यात सदाशिव यादवराव काकडे यांच्या पुढाकारातून 'वरोडा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक ' स्थापन झाली. १९२८ साली खानदेशात पाचोरे येथे जमिनीच्या तारणावर कर्ज देणारी सहकारी बँक स्थापन झाली. १९३५ साली अशाच पद्धतीने जमिनीवर तारण देणारी प्रांतिक पातळीवरची भूविकास बँक स्थापन झाली.

१९१२ साली सहकारी कायद्यात दुरुस्ती झाल्यानंतर जिल्ह्या जिल्ह्यातून सहकारी सोसायट्या व सहकारी बँका स्थापन झाल्या. लोकांमध्ये आर्थिक जागृती झाली, आत्मविश्वास वाढला. बँकेपासून पुढारी निर्माण झाले. सुरुवातीच्या काळात सहकारी चळवळ ही सरकारी- निमसरकारी चळवळ होती. याचे कारण सहकारी संस्था स्थापन करण्यात थेट गावकऱ्यांचा पुढाकार असण्यापेक्षा सरकारी अधिकारी व शहरातील सुशिक्षित पुढारी सहकारी सोसायट्या व बँका स्थापन करण्यात पुढाकार घेत होते, असे एक निरीक्षण आहे. "ज्यांच्या करिता सहकारी चळवळ होती तो ग्रामीण शेतकरी समाज अतिशय धर्मभोळा होता. उत्सव भंडारे इत्यादी धार्मिक समारंभ लोकवर्गणीतून पैसा व धान्य गोळा करून श्रमदानाने व सहकार्याने पार पाडीत. परंतु जीवनाच्या आर्थिक विकासात लक्षपूर्वक सहकार्य करण्याचे सहकारशास्त्र त्यांना माहीत नव्हते. .. आपला आर्थिक उद्धार आपणच करू शकतो हा आत्मविश्वास बहुजन समाजात ग्रामीण शेतकऱ्यांत जवळ जवळ नव्हताच. अशा या आरंभीचे काळात शहरातील सरकारी अधिकारी, काही व्यापार उद्योग करणारे आणि शेतकऱ्यांशी कोर्टात काम चालविण्याच्या निमित्ताने संबंध आलेले काही जन्मजात पांढरपेशातील वकील हे शेतकऱ्यांचा उद्धार करण्यासाठी सुरू केलेल्या चळवळीचे नेते होते." (कोरपे, १९७८, पृ. ६७)

१९१७ साली सहकार क्षेत्राला गती देणारी एक नवी घटना घडली. 'मुंबई प्रांतिक सहकारी सोसायटी परिषदे'त म. गांधी यांचे सहकारी चळवळीचे उद्दिष्ट आणि महत्त्व यावर प्रकाश टाकणारे भाषण झाले. त्यात त्यांनी म्हटले होते की, "किती सोसायट्या स्थापल्या यापेक्षा सहकारी सोसायट्यांच्या सभासदांचं नैतिक उन्नयन किती झालं, यावर खरं सहकारी चळवळीचं यशापयश मोजायला हवं. ही चळवळ समाजास प्रगल्भ करते आणि

राष्ट्रीय पुनरुज्जीवनाची प्रेरणा निर्माण करते, हे खरं महत्त्वाचं. त्यातून निर्माण व्हायला हवा आदर्श मानव, आदर्श समाज आणि आदर्श राष्ट्र. परस्परन्यायभावना, नैतिकता, बंधुभाव व मैत्रभाव निर्माण करणं, हे या चळवळीचं कार्य. त्यातून आपल्याला साकारायचं आहे ते सुखी नवजीवन. त्या जीवनात वर्गसंघर्ष, वैमनस्य आणि हिंसा यांना थारा नसेल." (साधू, २०१४, पृ. ८४-८५) सहकार चळवळ हे नवभारत निर्माणाचे माध्यम कशी बनू शकते याचे एक संकल्पचित्र गांधीजींच्या भाषणातून पुढे येताना दिसत होते. १९१७ साली महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची स्थापना हे या दृष्टीने एक भविष्यसूचक पुढचे पाऊल होते. ग्रामीण जीवनात आणि कृषि क्षेत्रात मन्वंतर घडवून आणण्याच्या नव्या पर्वाची ही नांदी होती.

१९१४ ते १९१८ च्या दरम्यान महायुद्धाने शेतमालाला चांगला भाव येऊ लागला. पतपेढीची कर्जाची वसुली चांगली होत होती. पण लढाईमुळे वाढलेले भाव १९२३-२४ पर्यंत टिकले, त्यानंतर मंदीची लाट आली. कापसाचा भाव २५० रु. खंडीवरून ३० रु. वर आला. शेतजमिनींचे भाव घसरले. यामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची वसुली होईना. १९३० च्या महामंदीच्या काळात या सहकारी बँकांचे अस्तित्व संकटात सापडले. बँकेच्या तगाद्यामुळे शेतकरी आपल्या शेतजमिनी बँकेच्या हवाली करू लागला. 'एक साठी सर्व आणि सर्वांसाठी एक' या सूत्रानुसार एकाच्या कर्जासाठी त्या पेढीच्या सर्वच सभासदांची मालमत्ता गहाण समजली जायची. त्यामुळे पतपेढीच्या कर्जाने गावेच्या गावे बरबाद होऊ लागली. (कोरपे,१९७८, पृ. ६९) या पार्श्वभूमीवर १९३१ साली सर माधवराव यांच्या प्रयत्नाने 'सी. पी. बेरार को-ऑपरेटिव्ह बँक ' स्थापन करण्यात आली व या बँकेमार्फत संपूर्ण प्रांतातील सहकारी बँकांच्या देवघेवीच्या व्यवहारात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच भूमिकेतून पुढे १९३३ साली दादासाहेब सोमण यांनी 'भूविकास अधिकोष' बँकेची स्थापना केली.

सहकारी बँकांमुळे शेतकऱ्यांना यापूर्वी आधार मिळाला होता; आता त्या बँकांमुळेच विदर्भातील शेतकरी अडचणीत आला. डॉ. पंजाबराव देशमुख शेतकरी संघाचे अध्यक्ष व मध्यप्रदेशात सहकार मंत्री होते. विदर्भातील सहकारी बँकांकडे गोळा झालेली जमीन स्वस्त भावात विकली जाऊ लागल्यावर १९३२ साली प्रांतिक सरकारपुढे शेतकऱ्यांच्या वतीने पुढील युक्तिवाद मांडला : "शेती हिरावून घेतल्याने बँकांचा प्रत्यक्षात पैसा तर वसूल झालाच नाही; उलट केवढे तरी राष्ट्रीय उत्पन्न घटले. सहकारी बँकांचा उद्देश इतर सावकारांप्रमाणे शेतकऱ्यांना पिळून काढण्याचा नाही. त्यांना संकटात हात देऊन उर्जितावस्थेस नेण्याचा आहे. कायद्याच्या पोलादी चौकटीत मानवता आणि सहकारिता गुदमरू देता कामा नये." या युक्तिवादामुळे सरकारने एक चौकशी समिती नेमण्याचा निर्णय घेतला.

बँकांच्या कर्जवसुलीचा प्रश्न कसा सोडवावा याचा विचार करण्यासाठी १९३२ साली रा. ब. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती संघटित करण्यात आली. या कमिटीत अमरावतीचे के. व्ही. ब्रह्मे, एम. आर. खरे, एम. एच. पांडे; अकोल्याचे एल. पी. अभ्यंकर, हिवरखेडचे जी. एस. कुलकर्णी; खामगावचे एम. के. चांदे वकील, मेहकरचे सोमण हे सभासद होते. या कमिटीने कर्जफेडीसाठी ठरविण्यात आलेले 'एक साठी सर्व आणि सर्वांसाठी एक' हे अमर्याद जबाबदारीचे तत्त्व काढून टाकण्याला विरोध केला. सहकारी बँकेतील कर्जदारांना कर्ज-लवाद कायद्याचे संरक्षण मिळू नये अशी शिफारस केली. तसेच सहकारी बँकातील ठेवीदारांच्या हितसंबंधास धक्का न लावता जितक्या सवलती देणे शक्य असेल तेवढ्याच द्याव्यात अशी शिफारस केली. यामुळे वऱ्हाडातील शेतकरी वळला. अमरावतीच्या वऱ्हाड को-ऑपरेटिव्ह बोर्डाच्या पुढाकाराने २९ व ३० ऑक्टोबर १९३३ रोजी अमरावतीस वऱ्हाडातील सेंट्रल बँकांच्या पदाधिकाऱ्यांची सभा झाली. या सभेत सद्यस्थितीत लोकांच्या जमिनी विकून त्यांना भूमिहीन करणे योग्य नसल्याबद्दल एकमत झाले. तसेच दुसऱ्याच्या कर्जवसुलीकरिता जामीन कर्जदार सभासदाची जमीन हर्रास करू नये, असे ठरविण्यात आले. कर्जफेडीचे हप्ते बांधून द्यावेत असेही मान्य झाले. मात्र १९३३-३४ सालात सहकारी कर्जवसुलीमुळे विदर्भातील सहकारी बँकांच्या ताब्यात हजारो एकर जमीन आली होती. १९३४ साली अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे १५,००० एकर जमीन गोळा झाली होती. तिचे पुढे काय करावे ही बँकेपुढे समस्या निर्माण झाली. (कोरपे,१९७८, पृ.७०)

मुंबई इलाख्यातही बँकांच्या कर्जवसुलीचा आणि एक कर्ज डोक्यावर असताना दुसरे कर्ज कसे द्यायचे याबाबतचे प्रश्न होतेच; ते सोडविण्याचा एक प्रयत्न विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकारातून झाला होता. शेतकऱ्यांना बँकेचा कर्जपुरवठा एकदाच व्हायचा. पुढच्या कर्जासाठी थकबाकीदार अपात्र ठरत असे. या धोरणाने ना बँकेचा फायदा होता ना शेतकऱ्यांचा. शेती कामात ज्या ज्या वेळी गरज पडते त्या त्या वेळी शेतकऱ्याला कर्ज मिळायला पाहिजे. त्यामुळे बँकेची धोरणं शेतकऱ्यांच्या गरजेनुसार ठरायला हवीत, अशी ही स्वाभाविक मागणी होती. त्यावर बँकेच्या कर्जाची वसुली झाली नाही तर बँका का चालवायच्या, हा प्रश्न होता. यावर विठ्ठलराव विखे पाटलांनी एक उत्तम तोडगा शोधून काढला. १९३६ साली राज्य सहकारी बँकेने आपल्या धोरणात बदल करून शेतकऱ्यांसाठी कॅश क्रेडिटची सोय केली. त्यामुळे नव्या पतपेढ्यांना जीवदान मिळाले, बंद पडायला आलेल्या पेढ्यांनी नव्याने उभारी धरली. शेतकऱ्यांमध्ये नगदी पिके घेण्याचा उत्साह वाढला. (साधू, २०१४, पृ.९१)

१९१७ साली गांधीजींनी सहकार चळवळीतून एक मूल्याधिष्ठित नवसमाज निर्माण होईल, असे स्वप्नचित्र रेखाटले होते. अर्थात त्यासाठी शेतकऱ्यांना आपला आचारधर्मही

काटेकोरपणे पाळण्याची सवय लावण्याची गरज होती. शेतकऱ्यांनी पतपेढीतून ज्या कामासाठी कर्ज घेतले त्याच कामासाठी ते खर्च करण्याचे बंधन स्वत:वर घालून घेण्याची गरज होती. लोणीच्या विठ्ठलराव विखे पाटलांनी हे ओळखून सहकारी सोसायट्या स्थापन करण्याच्या मोहिमेला जोडूनच शेतकऱ्यांची अर्थसाक्षरता वाढविण्याचीही मोहीम हाती घेतली. शेतकऱ्यांच्या सभा घेऊन कर्ज, खर्च, हिशेब कसा ठेवायचा हे शिकवले. कर्जदार शेतकऱ्यांसाठी एक आचारसंहिताच त्यांनी सुचविली होती. उदाहरणार्थ, "पाच एकरांत ऊस लावण्यासाठी सोसायटीचं कर्ज घेतलं, तर त्या वर्षी जेवढं उत्पन्न येईल तेवढ्यातच काटकसरीने राहून खर्च भागवायचा. पुढचे वर्षी चार एकरासाठी कर्ज घेऊन पाच एकरांत ऊस लावायचा. त्याच्या पुढील वर्षी तीन एकराचं कर्ज, पाच एकरांत ऊस..पुष्कळांनी त्यांच्या सांगण्याचं अनुकरण केलं आणि कर्जाच्या साखळीतून स्वत:ला सोडवून घेतलं" (साधू, २०१४, पृ. ७६) ज्यासाठी कर्ज काढलं त्याच कामासाठी ते खर्चलं पाहिजे. शेताकडे दुर्लक्ष करून ते चैनबाजी, दारू, लग्न, मयत यासाठी वापरलं की पुढचे कर्ज बंद होऊन गाळात गेलेच म्हणून समजा. (साधू, २०१४, पृ.८६)

विखे पाटलांनी सहकारी सोसायटींचे 'विविध कार्यकारी सहकारी सोसायटी'त रूपांतर करून शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी थेट मदतीचा हात देण्याची नवी संरचना कार्यान्वित केली. सभासदांना केवळ कर्ज देणे एवढेच सहकारी सोसायटीचे काम न राहता उत्तम बियाणांचा पुरवठा, शेतीची उपकरणे, वेळोवेळी लागणारी खते पुरवण्यापासून स्वस्त दरात कापड, अन्नधान्य पुरवणारे सहकारी भांडार काढून सहकारी सोसायट्यांची व्याप्ती वाढवली. आजही कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी हा आचारधर्म आणि गांधीजींची सहकारनीती एक नमुनादर्श म्हणून अनुसरण्यासारखी आहे.

### १९३४ चा कर्ज लवाद कायदा :

अर्थमंत्री ना. गोवन यांनी २५ ऑगस्ट १९३४ रोजी शेतकऱ्यांना कर्ज बाजारीपणापासून मुक्त करण्याकरिता मध्यप्रांत-वऱ्हाड' विधानसभेत 'कर्ज लवादा'चे बिल (Berar Money Landers Act) मांडले. या कायद्यानुसार लवाद मंडळास कर्जातून शक्य तेवढी सूट देऊन निवाडा करण्याचा, तसेच कर्जाची रक्कम ठरवून शेतकऱ्यांना कर्जफेडीसाठी हप्ते बांधून देण्याचा अधिकार मिळाला. सावकारास अपिल करता येणार नसल्याची तरतूद करण्यात आली. शक्यतो मूळ शेतमालकाला हप्तेबंदीने सवलतीनिशी शेत परत देणे, दीर्घ मुदतीच्या व अल्प व्याजाच्या किस्ती पाडण्यावर भर देण्याचा निर्णय करण्यात आला. त्यामुळे व्यक्तिगत सावकारी पाशातून त्या काळात शेतकऱ्यांची सुटका झाली. सावकाराच्या जप्तीपासून शेतकरी सुटला. शेतकऱ्यांना बँकेकडून मिळणाऱ्या सुविधा वाढल्या. १९३४ पासून १९४१ पर्यंत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी'अमरावती सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँके'चे अध्यक्ष असताना शेतकऱ्यांच्या

कल्याणासाठी बँकेमार्फत अनेक सेवासुविधा देऊन सहकार क्षेत्रात एक नवे विधायक पर्व सुरू केले. (वक्काणी, २००३, पृ. २७४-२७६) पुढे दुसऱ्या महायुद्धाने शेतमालाचे भाव वाढले व शेतकऱ्यास कर्जफेडीचे हप्ते भरणे सुकर झाले. (कोरपे, ७१)

मुंबई इलाख्यातही विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाअखेरीस सहकारी पतपेढ्या स्थापन होऊन गरजू शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज मिळणे सुलभ झाले होते. १९१० साली हडपसर येथे गोपाळराव देवधर यांनी ३० सभासद मिळवून सहकारी सोसायटी स्थापन केली. स्थापनेच्या वेळी सोसायटीकडे फक्त २०० रुपये होते; १९२६-२७ पर्यंत १४२ सभासद, दोन लाख रुपयांचे खेळते भांडवल, ९% व्याजदर अशी सोसायटीची प्रगती झाली. सत्यशोधक चळवळीतले ग्यानोबा ससाणे, सीताराम तारकुंडे, गोविंदराव काळे यांचा सोसायटीच्या विकासात पुढाकार होता. १९१२ साली सहकाराचा दुसरा कायदा पारित झाला. या दुसऱ्या कायद्यामुळे सहकाराची व्याप्ती विस्तारली व कर्जाच्या देवाणघेवाणीपलीकडे सहकारी तत्त्वाने अन्य कामे सुरू करण्याची तरतूद करण्यात आली. १९१७ ते १९१९ या तीन वर्षांत मुंबई इलाख्यात ४७०० सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या. (फडके य. दि. १९८९, पृ. ८)

मुंबई प्रांताने १९२५ साली आपला स्वतंत्र सहकारी कायदा केला. सहकार खात्याचे निबंधक ऑटो रॅथफेल्ड (कार्यकाळ १९२१-२३) यांनी या कायद्याचा मसुदा तयार केला होता. सहकाराच्या या नव्या कायद्यामुळे सहकारी चळवळीला प्रोत्साहन मिळाले. सहकारी सोसायट्या स्थापन करण्यासाठी लोकमत तयार करण्याकरिता मानद जिल्हा संघटक नेमण्यात आले. १९२६-२७ साली ब्रिटिश इंडियात (खालसा मुलुखात) ६७,००० शेतकरी सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या होत्या. सभासदसंख्या सव्वा बावीस लाख आणि सुमारे २५ कोटी रुपयांचे भागभांडवल उभे राहिले होते. (कित्ता, पृ. ५१) मात्र सहकारी सोसायट्या चालविण्यासाठी लागणाऱ्या प्रशिक्षणाचा अभाव होता. त्यामुळे सोसायटीच्या आर्थिक व्यवहारात मध्यस्थांचा सर्रास हस्तक्षेप होत असे. सहकारात कुठल्याही वेतन वा लाभाशिवाय स्वयंप्रेरणेने सहभागी झालेल्या व्यक्तींना आपल्या अन्य व्यावसायिक जबाबदाऱ्या असल्यामुळे ते सोसायटीच्या कारभारासाठी फारसा वेळ देऊ शकत नसत. हे लक्षात घेऊन मुंबईच्या प्रांतिक सरकारने शासनाच्या लेखापालन मंडळाच्या वतीने सहकारी सोसायट्यांच्या लेखापालनाचा शिक्षणक्रम सुरू केला. या परीक्षेत पास होणाऱ्यांना सहकारी सोसायट्यांच्या जमाखर्चाचे ऑडिट करण्यासाठी नेमले जाऊ लागले. सहकारी चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रांतिक सरकारने सहकारी सोसायट्यांना आयकर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क माफ केले. तसेच थेट निधी हस्तांतरण होण्याची सवलत जाहीर केली. १९२६ साली मुंबईला सहकार क्षेत्रातल्या रजिस्ट्रारांची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेने सहकारी

कायद्याच्या कक्षेतच भूतारण बँका स्थापन करण्याची शिफारस केली. अशा बँका स्थापन करण्यासाठी वेगळा कायदा करण्याची गरज नाही, अशी परिषदेची भूमिका होती. सहकारी चळवळीला पोषक असे वातावरण तयार होत होते. त्यामुळे सहकार चळवळीचा विस्तार सुलभ झाला. १९३० साली मुंबई प्रांतात सहकारी तत्त्वावर चालविली जाणारी विमासंस्था स्थापन झाली. १९३५ साली मुंबई प्रांतिक भूतारण बँकेची स्थापना झाली.

जागतिक मंदीमुळे १९२९ ते १९३९ या काळात सहकारी चळवळ मंदावली. १९३०-३१ साली मुंबई प्रांतात ५८९६ सहकारी सोसायट्या होत्या, १९३७-३८ पर्यंत ही संख्या घटून ५०९३ झाली होती. थकबाकीचे प्रमाण वाढले. काही सोसायट्यांनी दिवाळे काढले. सातारा जिल्ह्यात सहकारी संस्थांच्या सभासदांचे लोकसंख्येशी प्रमाण फक्त ४.३५ होते. १३५७ गावांपैकी ६०० गावांना एकही सहकारी पतपेढी नव्हती. (गोखले पुरुषोत्तम, १९६६, पृ. ३६२) वऱ्हाडात १९३८ साली शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या ४६ टक्के सोसायट्या दिवाळखोर ठरल्या. १९३६ साली सहकारी चळवळीचे शिक्षण देणाऱ्या मुंबई प्रांतातील तीन प्रशिक्षण शाळा बंद करण्यात आल्या. या पार्श्वभूमीवर हिंदुस्थान सरकारने १८ जानेवारी १९४५ रोजी आर. जी. सरैया यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी चळवळीचे मूल्यांकन करून शिफारशी करण्याकरिता समिती नेमली. या समितीने सहकारी चळवळीच्या पिछेहाटीची कारणमीमांसा केली. पंजाब व मद्रास प्रांताप्रमाणे फळफळावळ व भाजीपाला उत्पादन करणाऱ्या संस्था इतर प्रांतात स्थापन झाल्या नव्हत्या. मध्यप्रांत-वऱ्हाडात २० टक्क्याहून अधिक भाग जंगलाने व्यापलेला असूनही तिथे वनविकास सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या नव्हत्या. महाराष्ट्रात मोठ्या शहरात दूधपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था नव्हत्या. बंगाल, ओरिसा प्रमाणे मुंबई प्रांतात मासळी पुरवणाऱ्या सहकारी संस्था नव्हत्या. सहकारी गृहनिर्माण संस्था नव्हत्या. सरैया समितीने पतपुरवठ्याखेरीज बहू-उद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. यानंतर सहकाराचे चित्र बदलले. आता केवळ कर्ज घेण्यापुरता सोसायट्या स्थापन न होता बी-बियाण्यांची सोसायटी, गुरांच्या विम्याची सोसायटी व अशाच प्रकारच्या इतरही सहकारी सोसायट्या स्थापन होऊ लागल्या. २८ जून १९४५ रोजी मुंबईच्या मच्छिमारांनी प्रथमच 'अखिल कोळी समाज मासळी उत्पादक सहकारी संस्था' स्थापन केली. मुंबई प्रांतात हातमाग व्यावसायिकांनी ९ औद्योगिक सहकारी संघ स्थापन केले.

स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळ अधिकच वेगाने विस्तारू लागली. राज्यात १ राज्यस्तरीय माल विक्री संस्था, ९ जिल्हा स्तरीय माल विक्री संस्था, १७५ तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, २४ कापूस विक्री संस्था, २४ फळ विक्री संस्था, ६ कॉटन जिनिंग आणि प्रेसिंग संस्था स्थापन झाल्यात. मच्छिमारांच्या व आदिवासी जंगल

कामगार सहकारी सोसायट्या स्थापन झाल्यात. विदर्भातही १५ ऑगस्ट १९४८ रोजी विदर्भ को-ऑप. मार्केटिंग सोसायटी ही व्यापारी संस्था स्थापन झाली. या संस्थेचे मुख्यालय नागपूरला ठेवण्यात आले. शेतमालाची योग्य भावाने विक्री करणे, शेतीला लागणारी खते, बी-बियाणे, औजारे आदी वस्तू पुरविणे हे या मार्केटिंग सोसायटीचे प्रमुख हेतू होते.

मुंबई प्रांताच्या तुलनेत मध्यप्रांत-वऱ्हाडात व हैद्राबाद संस्थानात मोडणाऱ्या मराठवाड्यात सहकारी चळवळ फारशी फोफावली नाही. मात्र सन १९५० पासून शेतकऱ्यांसाठी निघालेल्या सहकारी बँका शेतकऱ्यांतून शिक्षण घेतलेल्या नव्या सुशिक्षितांच्या हाती आल्या. जिल्हा बँका च्या डायरेक्टर बोर्डावर बहुसंख्य ग्रामीण नेते निवडून येऊ लागले. हैद्राबात संस्थानात मात्र शेतकरी काबुली पठाणांकडून ७५ ते १०० टक्के व्याजाने कर्ज घेत असे. त्यामुळे तेथील शेतकरी कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडू शकला नाही.

**शेती शिक्षण :**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हजारो वर्षांच्या पारंपरिक वारशाने प्राप्त झालेले शेतीचे ज्ञान उत्तम होते. मात्र यंत्रयुगातल्या बदललेल्या परिप्रेक्षातून नवे कृषितंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी गावपातळीपर्यंत स्वतंत्र शिक्षण-प्रशिक्षण व्यवस्थेचे जाळे निर्माण करण्याची गरज होती. इंग्रज प्रशासन याबाबतीत उदासीनच होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात अमेरिकेत शेती शिक्षण घेतलेल्या पांडुरंग सदाशिव खानखोजे यांनी कॅलिफोर्नियात थेट शेतकऱ्यांच्या मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या शेती शिक्षणाच्या प्रायोगिक उपक्रमांचा वृत्तांत महाराष्ट्रातील आपल्या भाच्याला कळविला होता; त्यावरून या काळात महाराष्ट्रातही कृषि-शिक्षणाचा कोणत्या अंगाने प्रचार होण्याची गरज होती, हे लक्षात येते. खानखोजे आपल्या पत्रात लिहितात,

"सध्या मी 'Escuelas Libres de Agricultura' म्हणजे कृषिशिक्षणाच्या स्वतंत्र धर्तीवर नवीन पद्धतीच्या शाळा केवळ शेतकीवर उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांकरिता काढलेल्या आहेत. ह्या शाळा खाजगी आहेत. ह्यांत शिक्षण व्यावहारिक, उपयुक्त व शास्त्रीय पद्धतीने अगदी सोप्या मार्गाने शेतकरीवर्गास देण्यात येते. इतर शाळांत उष्ण कटिबंधातील शेतीचे सप्रयोग शिक्षण देण्यात येते. ह्या शाळा अगदी नवीन पद्धतीवर असल्यामुळे शिक्षणशास्त्रांत हा माझा नवीन प्रयोगच होय असे म्हटले पाहिजे. अर्थात् ह्या शाळांपासून माझी उपजीविका चालत नाही. मी ह्या सर्व शाळांत फुकट शिक्षण देत असतो, आणि उपजीविकेकरिता इतर कृषिकार्य करतो. अर्थातच असल्या लोककल्याणाच्या कामांत समय व्यतीत करून इतरत्र उपजीविकेचे संधान जोडणे म्हणजे सतत दारिद्र्यात राहणे होय."(मोटे, १९७२, पृ., १८६)

महाराष्ट्रात अशा प्रकारच्या शेती शिक्षणाचे नवे प्रयोग अद्याप सुरू झाले नव्हते, हा शेतीविकासातला एक महत्त्वाचा अडसर होता. बडोदे संस्थानात मात्र महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीला पूरक अशी तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये शिकविण्याची योजना कार्यान्वित केली होती. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीच्या हंगामाची चार महिने वगळता काही एक मोकळीक मिळत असते. त्या काळात त्यांना शेतीला जोड म्हणून काही लघु उद्योग करता यावेत यासाठी त्यांना लाकडावरील कोरीवकाम, खेळणी तयार करणे, गालीचे विणणे, शिवणकाम, विणकाम असे जोडधंदे करण्यासाठी लागणारे कौशल्यशिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेत प्रवेश करताना संक्रमणकाळात शेतीत काम करणाऱ्या कामगारांना औद्योगिक क्षेत्राकडे वळविण्यासाठी काही एक पूरक योजना असावी या दृष्टिकोनातून घरगुती जोडधंदे व लघूद्योगातून शिक्षण घेऊन जड उद्योगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करणारी 'Proto input-output model' च्या स्वरूपाची तंत्रशिक्षणाची योजना शेतकऱ्यांच्या मुलांसाठी अमलात आणली होती.(वरखेडे,२०१,पृ.१५) अहमदनगर जिल्ह्यातही लोणी येथे शेतकऱ्यांच्या मुलांना शेती शिक्षण देणाऱ्या शेतकी शाळेचा यशस्वी प्रयोग सुरू झाला होता; मात्र तो बडोद्याच्या शिक्षणप्रणालीप्रमाणे बहुउद्देशीय नव्हता. (शैक्षणिक स्थित्यंतरांच्या प्रकरणात कृषिशिक्षणाचा आढावा घेण्यात आला आहे, तो पाहावा.)

**शेतमजूरांचे प्रश्न :**

महाराष्ट्रात शेतमजुरी करणारा मोठा वर्ग आहे. रोजंदारीवर वा सालीना मजुरीवर शेतात काम करणारे मजूर; हंगामात कंत्राटी पद्धतीने काम करणारे शेतमजूर, शेतकऱ्यांची गुरे चरण्यास नेणारा व त्यांची देखभाल करणारे मजूर या वर्गात मोडतात. या शेतमजुरांच्या मजुरीच्या दरांचे प्रमाणिकरण करण्याची कुठलीही योजना नव्हती. काही ठिकाणी संपूर्ण मजुरी रोकड स्वरूपात, काही ठिकाणी अंशत: रोकड, अंशत: धान्याच्या रूपात, काही ठिकाणी जेवण-न्याहारीसह मजुरी असे प्रकार प्रचलीत होते. १९४८ साली किमान वेतन कायदा लागू झाला तरी त्याची गावपातळीपर्यंत थेट अंमलबजावणी झालीच असे नाही. दुष्काळी भागातले शेतमजूर साखर कारखान्याच्या गळीत हंगामात ऊस तोडणी व वाहतुकीच्या कामासाठी स्थलांतरित होत असत; त्यांना कारखान्याचे कामगार किंवा मजूर मानले जात नसल्याने अपेक्षित मोबदला मिळत नसे. १९५० साली सर्वोच्च न्यायालयाने 'ऊस तोडणी व वहातुक मजूर हे साखर कारखान्याचे कामगार आहेत' असा निवाडा दिल्यानंतर त्यांच्या मजुरीचे प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला होता. तरीही शेतमजूरांचे किमान वेतन ठरविण्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नव्हता.

**गावससमाजाची स्थिती-गती :**

विसाव्या शतकात दळणवळण व संचारसेवा वाढल्याने गावांचा शहरी भागाशी संपर्क वाढला. पण गावकऱ्यांचे जीवनमान सुधारले असे झाले नाही. मलेरिया, प्लेग, कॉलरा, काळा आजार असल्या रोगराईमुळे श्रमिक वर्गाची कार्यक्षमता दिवसेंदिवस कमी होऊ लागली होती. ग्रामीण जीवनात आहार, स्वच्छता व आरोग्याविषयी जागरूकता आलेली नव्हती. मलमूत्रविसर्जनाच्या स्वतंत्र व्यवस्था जवळपास नसल्यातच जमा होत्या. नदी वा तलावाच्या काठी मलमूत्रविसर्जन करण्याच्या पारंपरिक सवयींमुळे पाणवठे दूषित होत असत व स्वाभाविकच रोगराईचा प्रादुर्भाव वाढत असे. सार्वजनिक आरोग्यसेवा फारशा कार्यक्षम नव्हत्या. वास्तविक मोहोंजदरोच्या उत्खननातून पुढे आलेल्या माहितीप्रमाणे नगररचनेत दर घरामागे पेवाचे संडास आणि घरातील सांडपाणी मोठ्या नळास जोडून बाहेर सोडण्याची व्यवस्था असलेली पूर्वसांस्कृतिक परंपरा होती; परंतु आपल्याकडे ही परंपरा पुढे नेण्याचे काम झाले नाही. या काळात राज्यप्रशासनात थेट सहभागी असलेले नाना कुंटे यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, "ग्रामीण प्रश्नांचा पुरेसा अभ्यास व जाणीव राज्यकर्त्यांमध्ये आढळली नाही. पांढरपेशा वर्गातील प्रतिनिधींना ग्रामीण प्रश्नांबद्दल आस्था कमी. त्यांचा दृष्टिकोन इंग्रजांशी लढण्याचा. आपण विधिमंडळात आपल्या विभागाची उन्नती करून सेवा करण्याकरिता आलो याचे भान कमी असे. (मंत्रिमंडळात कोकणतर्फे बाळासाहेब खेर मंत्री होते, पण त्यांना कोकणचे प्रश्न अवगत नव्हते. कुलाबा जिल्ह्यातील खारेपाटण विभागाच्या अडचणींची कल्पना नव्हती.) उलट गुजरातमध्ये गांधीजींचा उदय झाल्यापासून निरनिराळी रचनात्मक कामे चाललेली असल्याने तेथील आमदारांमध्ये ग्रामीण विकास म्हणजे काय याची जाणीव होती. विधिमंडळातील कामकाजाचे नियम इंग्रजीत, प्रश्न विचारायचे ते इंग्रजीतून, भाषणे करावयाची ती इंग्रजीतून. हिंदी बोलण्याची सूट होती, पण हिंदी कोण शिकले होते? आम्हाला मराठीचा अभिमान. त्यामुळे या ग्रामीण प्रतिनिधींची एक प्रकारे कुचंबणा झाली." (कुंटे, १९८५, पृ. १२०)

मद्रास प्रांतात मात्र याबाबत अधिक सकारात्मक परिस्थिती होती. तिथे जिल्हा आरोग्य योजना कार्यान्वित झाली होती. या योजनेअंतर्गत २६ आरोग्य अधिकारी आणि २६ आरोग्य तपासणीस नियुक्त करण्यात आले होते. मुंबई प्रांताने मात्र गावपातळीवर आरोग्यसेवा पुरविण्याची जबाबदारी शाळामास्तरांवर सोपवली होती. त्यांच्याकडे प्रथमोपचाराची साधने तेवढी ठेवण्यात आली होती. स्वयंसेवी संस्थांचाही अद्याप म्हणावा तसा पुढाकार नव्हता. अपवादाने पुणे सेवा सदन सोसायटीने सार्वजनिक आरोग्यसेवा पुरविण्यात पुढाकार घेतला होता. एकंदर ग्रामीण समाजाल मानव आणि प्राणी यांना पोषक आहाराची गरज असते याविषयीचे भान अद्याप आलेले नव्हते. स्वच्छता आणि

सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन दैनंदिन सवयी बदलाव्यात, त्यासाठी कायमस्वरूपाच्या सोई-साधनांची निर्मिती करावी याविषयी जाणीव जागृती झालेली नव्हती. यामुळे शेतीचे उत्पादन वाढले, भौतिक सुधारणाही झाल्या पण जीवनमान उंचावले नाही. लोकांची क्रयशक्ती वाढल्यावर काही बदल जरूर होतील; पण शिक्षण, कार्यात्मक साक्षरता, अर्थसाक्षरता, आरोग्यसाक्षरता यांची रुजवात होत नाही, तोपर्यंत ग्रामीण जीवनमान सुधारणार नाही असे चित्र १९०१ ते १९३० या दशकापर्यंत दिसत होते. श्यामराव गोविंदराव देसाई या सत्यशोधक चळवळीतील पत्रकाराने गावपातळीवरील समाज बदलण्यासाठी एक मूलभूत मंत्र सुचविला होता. "शेतकऱ्यांनी नांगर, तागडी, तलवार आणि लेखणी यांचा प्रभावी उपयोग करावा; प्रत्येक गावात एक शिक्षक, एक दुकानदार आणि पुरोहित हे बहुजन समाजातील असावेत; व्यापार, उद्योग आणि छोट्या व्यवसायात बहुजन मंडळी पुढे आली तर गावसमाजाचे चित्र बदलेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला होता. (गुंदेकर, २०१३, पृ. २८)

या पार्श्वभूमीवर सामाजिक सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे जाळे विस्तारण्याची गरज होती. पूर्वी गावकरी सामुदायिक पातळीवर श्रमदान करून रस्ते, तलाव बांधण्याचे काम करीत. विहिरी-तलावांची स्वच्छता करण्याचे काम श्रमदानाने होत असे. विसाव्या शतकात ही परंपरा कमी होत चालल्याचे चित्र दिसत होते. सार्वजनिक श्रमसंस्काराने कामे करवून घेण्यासाठी लागणाऱ्या स्थानिक नेतृत्वाचीही उणीव भासू लागली होती. त्यामुळे समाजसेवेचे शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमांची निर्मिती करण्याची गरज पुढे येत होती.

## ४.४. महायुद्धांचा काळ :

विसाव्या शतकातील पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांचा भारताच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या अर्थकारणावर खोलवर परिणाम झाला होता. त्यामुळे आर्थिक स्थित्यंतरांचा तपास करताना युद्धकालीन आर्थिक घटनांचा वृत्तांत नोंदविणे आवश्यक आहे. २८ जुलै १९१४ रोजी पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले. ८ सप्टेंबर १९१४ रोजी कायदेमंडळाच्या सभेत तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांनी ब्रिटिश बादशहा पंचम जॉर्ज यांचे भारतीय संस्थानिक व प्रजाजनांना युद्धकाळात ब्रिटनला सहकार्य करण्याचे आवाहन करणारे पत्र वाचून दाखवले. भारतीयांच्या वतीने नागपूरचे कायदेमंडळातील सदस्य गंगाधर चिटणवीस यांनी 'इंग्लंड या आमच्या मातेसाठी ब्रिटिश सरकार युद्धकाळात सांगेल तो आर्थिक बोजाही स्वीकारेल' अशा आशयाचा ठराव मांडून सहकार्याचा देकार दिला .[४]

पहिल्या महायुद्धाच्या काळात भारताच्या अर्थमंत्रीपदाची जबाबदारी सर विल्यम मेयर यांच्याकडे होती. अशा प्रकारचे जागतिक महायुद्ध यापूर्वी कधीच झाले नसल्याने त्यांच्याकडे युद्धकाळातल्या अर्थकारणाचा पूर्वानुभव नव्हता. त्यामुळे ११ मार्च १९१५ रोजी विल्यम मेयर यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात या युद्धजन्य परिस्थितीच्या वेगळ्या खुणा दिसल्या नाहीत. नोव्हेंबर १९१८ पर्यंत म्हणजे साडेचार वर्षे हे युद्ध सुरू होते. या महायुद्धात १ कोटी ६५ लाख माणसांचा बळी गेला. अशा महाभयंकर युद्धकाळाचा भारताच्या अर्थकारणावर थेट प्रभाव दिसू लागला. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या. २ ऑगस्ट १९१४ रोजी १ रुपयात ११ पौंड साखर मिळत होती, तिचा भाव वाढून ६ ऑगस्टला १ रुपयात ७ पौंड साखर घ्यावी लागत होती. १९१४ ते १९१९ या काळात तांदूळ २६% नी व गहू ३८ % नी महाग झाला. मध्यप्रांतात तांदूळ ७३%नी व गहू १००% नी वाढला. ज्वारी-बाजरीचे भाव संयुक्त प्रांतात १०२%नी व मुंबई इलाख्यात १३२% नीं वाढले. जर्मन पाणबुड्यांनी घातलेल्या धुमाकुळामुळे जहाजांचा तुटवडा भासू लागला. परिणामत: मीठ, घासलेट, कापडाची आयात खोळंबली. रेल्वेने व्यापारी मालवाहतूकीऐवजी सैनिक व युद्धसामग्रीच्या ने-आणीला प्राधान्य दिल्याने देशांतर्गत व्यापार थंडावला. किंमत निर्देशांक वेगाने बदलत गेला. १९१३ साली किंमत निर्देशांक १४७ होता; तो १९१८ साली २२५, १९१९ साली २७६, आणि १९२० साली २८१ पर्यंत चढत गेला. (किंमत निर्देशांकाचे आधारवर्ष आधारवर्ष १८७३ गृहीत धरले आहे.) मुंबई इलाख्यात १९१७-१८ साली पिके नीट न आल्याने अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली; धान्याचे भाव भडकले व बाजार लुटण्याचे प्रकार घडले. धान्य मिळविण्यासाठी जमावाने ११५ धान्य दुकाने लुटली. तशात इन्फ्लुएंझाच्या साथीने पछाडल्याने कापड उद्योगावर परिणाम झाला, कामगार बेकार झाले. (Sarkar Sumit,1989, p.176)

**कररचनेतील बदल :**

युद्धामुळे अनेक वस्तूंची आयात करणे अवघड झाले. परिणामत: हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे भाग पडले. त्यामुळे मे १९१६ ला टी. एच. हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक आयोग नेमण्यात आला. (भारतीय सदस्य : पं. मदनमोहन मालवीय, दोराब टाटा.) भारताच्या अर्थमंत्र्यांनी १९१६-१७ सालापासून कररचनेत बदल करायला सुरुवात केली. १८८६ पासून कायम असलेले करदर वाढविण्यात आले. पाच हजार व त्यावरील उत्पन्नावर वर्धनशील पद्धतीने (Graduation of taxes) उत्पन्नाच्या वाढत्या टप्प्याबरहुकूम ६ टप्पे करून करदरात वाढ केली.१९१७-१८ साली मेयर यांनी 'सुपरटॅक्स' लागू केला. त्यामुळे युद्धकाळात नफेखोरी करून फायदा मिळविणाऱ्या व्यापाऱ्यांकडून अतिरिक्त कर जमा करण्याची युक्ती सरकारने शोधून

काढली. १९१८ साली अर्थमंत्र्यांनी प्राप्तिकर सुधारणा विधेयक आणून कररचनेत आमुलाग्र बदल केले. उत्पन्नाच्या स्त्रोताच्या प्रत्येक शीर्षकागणिक कर आकारणीची पद्धत मोडून सर्व उत्पन्नस्त्रोतांची बेरीज करून कर आकारणी करण्याची पद्धत सुरू करून छुपी करवाढ करण्यात आली. लष्करी अधिकारी, चहा कंपन्या, परदेशी जहाज कंपन्या यांना दिल्या जाणाऱ्या कर सवलती रद्द केल्या. अनिवासी करदात्यांचे भारतातील उत्पन्न करपात्र ठरविण्यात आले. आधीच्या वर्षातील प्रत्यक्ष उत्पन्नावर कर आकारणीची पद्धत सुरू केल्याने 'हिशेब वर्ष' (प्रीव्हियस इयर) आणि 'आकारणी वर्ष' (चालू साल) अशा संकल्पना पुढे आल्या. या सुधारित कररचनेमुळे आतापर्यंत करमुक्त असलेल्या शेतीचे उत्पन्नही करपात्र ठरविण्यात आले. दादासाहेब खापर्डे, पं. मदन मोहन मालवीय या सदस्यांनी त्यास विरोध केला. बंगाली जमीनदार सीतानाथ रॉय यांनी 'बिगरशेती उत्पन्नावरील शेतीचा दर ठरविताना शेती उत्पन्नाचा विचार केला जाऊ नये' असा ठराव मांडून विधेयकाला दुरुस्ती सुचविली. ही दुरुस्ती मान्य झाली. कंपन्यांना 'घसारा' (डेप्रिसिएशन) खर्चावर करातून वजावट देण्याची पद्धतही १९१८ च्या प्राप्तीकर कायद्यापासूनच सुरू झाली.

पहिले महायुद्ध संपल्यावर सर जेम्स मेस्टन यांनी अर्थमंत्रालयाचा पदभार स्वीकारला. भारतीयांनी युद्धात केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांनी महागाईने गांजलेल्या मध्यमवर्गीय करदात्यांची करमुक्त उत्पन्नाची वार्षिक मर्यादा एक हजारावरून दोन हजारावर नेली. त्यामुळे १,८१,००० करदात्यांची प्राप्तिकरापासून सुटका झाली. १९१९-२० च्या अर्थसंकल्पात गर्भश्रीमंतांसाठी 'इपीडी' नामक वेगळा कर लागू करण्यात आला. युद्धाच्या दोन वर्षे आधी व चार वर्षांनंतर झालेल्या नफ्याची सरासरी हा सामान्य नफा समजून त्याहून अधिकच्या नफ्यावर ५० टक्के 'इपीडी'कर भरावा लागत असे. नोव्हेंबर १९१९ मध्ये दृष्टिदोषामुळे अर्थमंत्री जेम्स मेस्टन यांनी आपला पदभार सोडला व त्यांची जागा माल्कम हेली यांनी घेतली. १९२१-२२ साली वित्तीय तूट भरून काढण्यासाठी माल्कम हेलीने प्राप्तीकर व सुपरटॅक्सचे दर वाढवले. लष्करी खर्चात ३८ टक्के वाढीची तरतूद केली. सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे खाजगी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांच्या पगारातून करकपात करण्याची सक्ती करण्यात आली. १९२३ ते १९२८ या काळात सर बासिल ब्लॅकेट हे अर्थमंत्री होते. त्यांच्या कारकिर्दीत रेल्वेचा वेगळा अर्थसंकल्प सादर करण्याची पद्धत सुरू झाली. भारतीय सुती कापडावरील उत्पादनशुल्क रद्द करण्यात आले. मात्र मिठावरील कर दुप्पट करण्यात आला. त्याचा सगळ्यात मोठा फटका गरिबांना बसला. १९२३ साली ब्रिटिश शासनाने नेमलेल्या राजकोषीय आयोगाच्या (रॉयल कमिशन) शिफारशींनुसार स्वत:च्या पायावर देशांतर्गत साधनसामुग्रीचा उपयोग करून परदेशी स्पर्धेत उतरण्याची तयारी दाखविणाऱ्या

उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण जाहीर केले. त्याचा लोखंड, पोलाद, सुती कापड, साखर, कागद, काड्यापेट्या, जड रसायने या उद्योगांना फायदा झाला व या क्षेत्रात ४६.८% रोजगार वाढले. कोळसा, सिमेंट, काच उद्योगांना मात्र या धोरणाचा लाभ झाला नाही. तसेच या काळात जकात आयोगाचीही स्थापना झाली, त्यांच्या शिफारशींचा ४५ उद्योगांना लाभ झाला. १९२३ ते १९३७ या काळात अर्थमंत्रीपद सांभाळणाऱ्या जॉर्ज शूस्टर यांनी १९३१-३२ पासून कररचनेत अधिभाराचा (सरचार्ज) समावेश करून करवाढीची छुपी वाट शोधून काढली. १९३९ साली जेम्स ग्रिग अर्थमंत्री असताना त्यांनी करचुकवेगिरी करणाऱ्यांच्या प्रवृत्तींवर नेमके बोट ठेवून करसुधारणा केल्या. मोठमोठ्या कौटुंबिक कंपन्या लाभांशावरचा नफा भागधारकांना थेट वाटून न देता स्वत:कडे ठेवत व त्यातून कर्जरोखे (डिबेंचर्स) वाटत. हे कर्जरोखे पुढे भागधारकांकडून स्वत: विकत घेऊन रोकड भागधारकांना देत. या प्रक्रियेत लाभधारकांची प्राप्तीकरापासून सुटका होत असे, त्यावर या नव्या विधेयकाने बंदी आणली. परदेशात गुंतवणूक करून कंपनी नोंदवून प्राप्तीकर चुकवणाऱ्या कंपन्या करयोजनेत आणण्याचे काम केले. (संगोराम, २०११, पृ. ८८-११५)

१९२९ ते १९३४ हा जागतिक मंदीचा कालखंड होता. या काळात जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी झाले. अन्नधान्याच्या किंमती घटू लागल्या. १९२९ साली वऱ्हाडात १ रुपयाला साडेनऊ शेर ज्वारी मिळायची ती १९३१ साली एक रुपयात वीस ते पंचवीस शेर मिळू लागली. १९२६-२७ चा किंमत निर्देशांक १०० गृहीत धरला तर १९३३-३४ सालात मुंबईत तांदळाचा किंमत निर्देशांक ५७, गव्हाचा ६२, ज्वारी-बाजरीचा ५६, हरभरा व तूर डाळीचा किंमत निर्देशांक ५७-५८ पर्यंत खाली आला होता. (ज्युडिथ ब्राऊन, १९७७, पृ. ३९५; फडके य. दि.,१९९३, पृ.२६) १९३४-३५ साली थंडीच्या लाटेमुळे नाशिक जिल्ह्यात पिकांचे अतोनात नुकसान झाले. १९३५-३६ मध्ये सोलापूर जिल्ह्यात थंडीची लाट आणि चिकटा रोग यामुळे ७५ % पिकांची हानी झाली. जागतिक मंदीमुळे शेतकऱ्यांना कर्जफेड करता येत नव्हती. १९३६ मध्ये जवळपास दुपटीचे कर्ज झाले होते.

**दुसऱ्या महायुद्धकाळातली स्थिती :**

१९३९ साली दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटल्यानंतर लष्कराला पाच लाख टन गहू आणि दीड लाख टन तांदूळ पुरविण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारने घेतली होती. युद्धामुळे ब्रह्मदेशातून होणारी तांदुळाची आयात पूर्णपणे थांबली होती. १९१० ते १९३८ या काळात आधीच भाताचे उत्पादन केवळ एक टक्क्याइतके नाममात्र वाढले होते आणि गव्हाचे उत्पादन वीस टक्क्यांनी घटले होते. या पार्श्वभूमीवर अन्नधान्याच्या भावात जबर भाववाढ झाली. १९३९ साली ठोक किंमतीचा निर्देशांक १०० होता तो १९४५ साली

२४४ पर्यंत वर गेला. गरिबांना धान्य मिळेनासे झाले. सरकारने लेव्ही पद्धतीद्वारे शेतकऱ्यांकडून सक्तीने धान्य वसूली सुरू केली. मुंबई प्रांतात साठ टक्के शिलकी धान्य सरकारने ताब्यात घेतले. ही पद्धत जर्मनीतील हिटलर राजवटीपेक्षा भयंकर असल्याचा अभिप्राय अमेरिकेतील शिष्टमंडळाचे नेते प्रा. टी. डब्लू. शूट्झ यांनी व्यक्त केला होता. १९४४ साली मुंबई प्रांतात शेतकऱ्यांना गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी या अन्नधान्याच्या पिकांसाठी विशिष्ट क्षेत्र राखून ठेवण्याचे बंधन घालण्यात आले. नगदी पिकांसाठी जास्त भूभाग वापरण्यास परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे कपाशीच्या लागवडीचे प्रमाण घटले. मुंबई शहरात प्रत्येकाला दररोज १६ औंस धान्य मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली. धान्याचे उत्पादन घटल्याने १९४५ साली युद्ध संपले तरी शिधावाटप पद्धत बंद करता येत नव्हती. स्वातंत्र्यानंतर व्यापारावरची नियंत्रणे उठविण्यात आली, मात्र भाववाढ होतच राहिली. नोव्हेंबर १९४७ ला किंमत निर्देशांक ३०२.२ झाला; जुलै १९४८ ला तो ३८९.६ झाला, आणि सप्टेंबर १९५० ला तो ४१२.५ पर्यंत वाढला. (फडके य. दि., १९९७, पृ.२८-३१) १९४७-४८ साली एका वर्षात किती भाववाढ झाली हे सातारा जिल्ह्यातील महागाईच्या पुढील नोंदीवरून लक्षात येईल-

(१९३९ साली महागाईचा दर १०० गृहीत धरून
१९४७ व १९४८ च्या भाववाढीतला फरक)

| पदार्थ | एप्रिल १९४७ | एप्रिल १९४८ | एक वर्षातील वाढ |
|---|---|---|---|
| १. खाद्य पदार्थ | २७९.९ | ३४८.८ | २४.६ % |
| २. औद्यो.कच्चा माल | ३५६.२ | ४१४.६ | १६.४ % |
| ३. अर्धवट पक्का माल | २४९.७ | २९९.८ | २०.१% |
| ४. पक्का माल | २७०.१ | ३२५.८ | २०.६% |
| ५. इतर माल | ४६७.६ | ४७८.५ | २.३% |
| ६. किरकोळ माल | २८९.६ | ३४८.०० | २०.२% |

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर आयात बंद झाल्यामुळे लोखंडी सामान, अवजारे, कापड, रासायनिक द्रव्ये, सिमेंट, कागद यासारखे अनेक उद्योगव्यवसाय वाढले. १९३९ ते १९४५ या काळात सुती कापडाचे उत्पादन ९ टक्के, पोलाद ३१ टक्के, रसायने ७१ टक्के, सिमेंट ४० टक्के, कागद ६२ टक्के इतकी उत्पादनवाढ झाली. शिवाय कापड उद्योगासाठी लागणारी पूरक सामग्री, विद्युत माल, रासायनिक द्रव्ये, प्लॅस्टिक, सायकल इत्यादी नव्या उद्योगांची वाढ झाली. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर, विशेषत: औद्योगिक जग आणि व्यापारी क्षेत्रावर महायुद्धकालीन चढ-उतारांचा मोठा परिणाम झाला. राजकीय व आर्थिक क्षेत्र ढवळून निघाले. १९३९ ते १९४५ या काळात भारताच्या अर्थखात्याची

जबाबदारी सांभाळणारे अर्थमंत्री सर जेरेमी रैमसन यांनी युद्धकाळात आपल्याकडची शिल्लक अतिशय काटकसरीने वापरली. प्राप्तीकर व सुपरटॅक्सवर अधिभार लादून करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची मात्रा वाढविली. १९४५ साली युद्ध संपल्यावर सर आर्चिबाल्ड रोलँडस् यांनी अर्थमंत्रीपद सांभाळले. महागाई रोखणे, उत्पादनक्षेत्रातली मरगळ झटकणे यादृष्टीने त्यांनी अतिरिक्त नफाकर रद्द केला, कराच्या उत्पनाच्या टप्प्यानुसार करकपात करून उद्योजकांना दिलासा देण्याचे काम केले.

१९४६ साली मध्यावधी निवडणुकांनंतर काँग्रेसचे सरकार आले. मुस्लीम लीगचे लियाकत अली खान यांच्याकडे अर्थखात्याची जबाबदारी सोपविण्यात आली. लियाकत अली यांनी मिठावरील कर रद्द केला. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा दोन हजारांवरून अडीच हजार केली. यामुळे मध्यमवर्ग सुखावला; पण व्यापाऱ्यांवर २५ टक्के दराने व्यावसायिक नफाकर लादून व्यापार-उद्योगाची कोंडी केली. कंपनी कराचे दर दुप्पट केले. भांडवली नफा हे नवे शीर्षक करयोजनेत आणून १,८१४ करदात्यांकडून करवसुली करण्यात आली. यामुळे उद्योगपती अडचणीत आले. स्वातंत्र्योत्तर भारतात २६ नोव्हेंबर १९४७ रोजी आर. के. षण्मुख चेट्टी यांनी स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी लियाकत अलींनी लावलेला बिझिनेस प्रॉफिट कर १६.५० टक्क्यांवरून १०.५० टक्क्यांपर्यंत खाली आणला. प्राप्तिकर व सुपरटॅक्सचे दर कमी केले. धर्मदाय संस्थांच्या देणग्यांवर कमाल २१ लाखांची वजावट देऊन सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहक पार्श्वभूमी निर्माण केली. (१९५० नंतर चिंतामणराव देशमुख अर्थमंत्री झाले, त्यांच्या कारकिर्दीतील आर्थिक बदलांचा मागोवा पुढील खंडात घेण्यात येईल.)

## ४.५. उद्योगधंदे व व्यापार :

इंग्रजी अमदानीनंतर महाराष्ट्रात औद्योगिक विकासाचे पर्व सुरू झाले. त्यापूर्वी खेड्यातील बलुतेदारी पद्धतीने गावाला अवजारे पुरविणारे सुतार, लोहार, चांभार, कुंभार, गवंडी, शिंपी इत्यादी कारागिरांचे व अन्य काही स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या कारागिरांचे ग्रामकेंद्री उद्योग असत. शहरात तांब्या-पितळीची भांडी करणारे, सोन्या-चांदीचे दागिने करणारे, नक्षीदार बांगड्या करणारे, रेशीम व तलम कापड विणणारे, पूजासाहित्य तयार करणारे कारागीर असत; गूळ तयार करणे, तेलाची घाणी चालविणे, पिठाची चक्की चालविणे, सायकल-मोटारी दुरुस्त करण्याचे लहान उद्योग चालत. औद्योगिक क्रांती व वसाहतवादी राजवटीमुळे महाराष्ट्रात औद्योगिक कारखाने आले. कापड गिरण्या, सरकी काढण्याचे व कापसाचे गठ्ठे बांधणारे कारखाने आले. साखर कारखाने, औषधे तयार करण्याचे, रंग तयार करण्याचे, रासायनिक पदार्थ तयार करण्याचे व अभियांत्रिकी तंत्रज्ञाचे अनेक लहान मोठे कारखाने सुरू झाले. विसाव्या शतकात पदार्पण करताना ह्या

औद्योगिक पर्वाचा पायाभरणीचा काळ संपून विस्ताराचा कालखंड सुरू झाला होता.

पहिल्या महायुद्धाच्या काळात साम्राज्याच्या गरजा भागविण्यासाठी औद्योगिकीकरणाचा विस्तार करण्याची गरज होती; त्यासाठी १९१६ साली औद्योगिक आयोग स्थापन करण्यात आला. १९१९ च्या कायद्यान्वये उद्योगधंदे हा विषय प्रांतिक सरकारांकडे सोपविण्यात आला. १९२३ साली भारतीय उद्योगांना संरक्षण देण्यासाठी राजकोषीय आयोग नेमण्यात आला. या औद्योगिक धोरणानुसार मुंबई प्रांतातील उद्योगजगतात कोणते बदल झाले ते येथे लक्षात घ्यावयाचे आहेत. १९२८ च्या सरकारी अहवालानुसार मुंबई इलाख्यात नोंदणीकृत कारखान्यांची संख्या १६६१ होती. त्यापैकी १४९८ कारखाने चालू होते. कारखान्यांतील मजुरांची संख्या ३,५६,०८३ होती; त्यापैकी कापसाच्या गिरण्यांत २,१९,४२८ मजूर व सरकी काढणे व गठ्ठे दाबण्याच्या कारखान्यांत ४९,००० मजूर काम करीत होते. मुंबई शहरातील गिरण्यांत स्त्री कामगारांची संख्या २८,१७३, लहान मुलांची कामगारसंख्या १२२ होती. मुंबई शहराखेरीज इलाख्यातील इतर भागात स्त्री कामगारांची संख्या ४६,९१९ व कामावरच्या मुलांची संख्या ५,०६१ होती. १९२८ साली कारखान्यांत घडलेल्या अपघातांची संख्या ४५१८ होती, त्यापैकी ३९ अपघातात प्राणहानी झाली होती. लेकुरवाळ्या बायकांसाठी मुंबईच्या कारखान्यांत १४ शिशुगृहे होती, अहमदाबादेस २२ व सोलापूरला २ शिशुगृहे होती. निम्म्याहून अधिक कामगार कर्जबाजारी होते व सरासरी दरसाल दर शेकडा २० रु. व्याजाने कर्ज घेत होते. मुंबईतील मजुरांत आतापर्यंत ६४ पतपेढ्या सुरू झाल्या होत्या. स्वस्त धान्य दुकाने सुरु झाली होती. मजुरांची निवासव्यवस्था मात्र फारशी समाधानकारक नव्हती.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली भारताचे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. त्यानुसार उद्योगक्षेत्र तीन गटात विभागण्यात आले :

१.सरकारी मक्तेदारीचे व्यवसाय : संरक्षण, रेल्वे, अणुशक्ती.

२.खाजगी क्षेत्रातील उद्योग : पोलाद, कोळसा, खनिज द्रव्ये, जहाजबांधणी, विमानबांधणी, टेलिफोन व तारायंत्रे.

३.उर्वरित क्षेत्र : खाजगी उद्योग; कुटीर उद्योग; सहकारी तत्त्वावरचे उद्योग; सरकारी नियंत्रणाखाली साखर, सिमेंट उद्योग इत्यादी.

सर्वांना काम मिळेल व सामाजिक न्यायाचे तत्त्व पाळून रोजगारवृद्धी व्हावी या दृष्टीने १९५० पासून उद्योगक्षेत्राकडे समाजवादी समाजरचना अस्तित्वात आणण्याचे माध्यम म्हणून पाहिले जाऊ लागले.

**सूतगिरण्या व कापड-उद्योग :**

महाराष्ट्रात सूतगिरण्या व कापडगिरण्यांचा मोठा उद्योग होता. विसाव्या शतकाच्या

पूर्वार्धाअखेर म्हणजे १९५० अखेर १९७.७ कोटी भांडवलापैकी ५० टक्के म्हणजे ९७.१ कोटी भांडवल कापड-उद्योगात गुंतलेले होते. महाराष्ट्रातल्या विभागनिहाय कापडगिरण्यांची पुढील आकडेवारी लक्षात घेतल्यास या उद्योगाच्या व्याप्तीची कल्पना येते :

| स्थळ | कापडगिरण्या | चात्या | माग | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ६५ | ३१,६८,३६८ | ६३,४०९ | २,४९,६०० |
| औरंगाबाद | ०६ | १,६१,७६० | ३,६२१ | ५,८५४ |
| नागपूर | ०९ | ३,१६,६२८ | ५,८५४ | -------- |
| पुणे | १६ | ४,२९,३६६ | ८,९४५ | -------- |
| खानदेश | ०१ | ४९,१४८ | १०,४०० | --------- |
| एकूण | ९७ | ४१,२५,५४० | ८२,८२९ | सुमारे३ लक्ष |

(स्रोत : वैद्य, पृ. २३-२४)

मुंबईबाहेर सोलापूर, धुळे, जळगाव, चाळीसगाव, भोर, मिरज, सांगली, नागपूर इत्यादी ठिकाणी सुताच्या व कापडाच्या गिरण्या सुरू होत्या. खानदेशात सरकी काढण्याचे व गड्डे बांधण्याचे १०४ कारखाने होते. शिवाय कापड गिरण्यांना पूरक असे खळ तयार करण्याचे, तारा, धोटे, चात्या, रिळे तयार करण्याचेही कारखाने महाराष्ट्रात निघाले होते. मध्यप्रांत-वऱ्हाडात कापड उद्योगाचा फारसा विस्तार झाला नव्हता. तिथे नागपूर-बऱ्हाणपूर, अकोला, एलिचपूर, पुलगाव, बडनेरा आणि हिंगणघाट अशा दहा कापडगिरण्या होत्या. नागपूरच्या एम्प्रेस मिलमध्ये १४००० कामगार होते, मॉडेल गिरणीत ४००० कामगार होते. याखेरीज हातमाग उद्योग मोठा होता. उमरेड हे धोतरांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते.

एकोणिसाव्या शतकापासून मुंबईला सूतगिरण्या आणि कापड-उद्योगाची वाढ सुरू झाली होती. सुताच्या व कापडाच्या निर्यातीमुळे आर्थिक उलाढालींना वेग प्राप्त झाला होता. १८९५ च्या सुमारास तयार होणाऱ्या सुतापैकी निम्मे सूत निर्यात होत असे. यातले बरेचसे सूत चीनला पाठविले जात असे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी मुंबईत हिंदुस्थानातल्या इतर भागांपेक्षा सर्वात जास्त सूताची आणि कापडाची निर्मिती होत असे. परंतु विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात चित्र पालटू लागले. १८९० च्या सुमारास जपानला सूतगिरण्या सुरू झाल्या; त्याचा फटका मुंबईच्या सुताच्या व्यापाराला बसला. इ. स. १९०० पासून जपानने चीनच्या बाजारपेठेतून सूत खरेदी करण्यास प्राधान्य दिल्याने जपानला होणारी सुताची निर्यात पूर्णपणे थांबली. त्याचवेळी चीनमध्येही सुताच्या गिरण्या निघू लागल्या, शिवाय विनिमय मूल्यात झालेल्या बदलामुळे भारतीय

रुपयाचे विनिमय मूल्य वाढले; परिणामत: चीनकडून होणारी सुताची मागणी घटली. भारतातल्या कापड उद्योगाने केवळ देशांतर्गत बाजारपेठेसाठी कापड बनविण्याला प्राधान्य दिले. पाठोपाठ १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले. परदेशी माल पाठविणे दुरापास्त होऊ लागले. परिणामत: सुताची निर्यात ३३ % पर्यंत खाली आली. उलट जपानहून दरवर्षी बरेचसे सूत आणि ३० ते ५० कोटी वार कापड आयात केले जाऊ लागले. त्यामुळे मुंबईच्या गिरणीमालकांनी जकात मंडळाकडे परदेशातून आयात होणाऱ्या सुतावर व कापडावर जकाती लावण्याची मागणी केली. हिंदुस्थान सरकारने ही मागणी मान्य केली व जपानहून येणाऱ्या सुताच्या व कापडाच्या आयातीवर जकात वाढवली.

मुंबईत सूतगिरण्यांखेरीज कापडगिरण्यांचेही उत्पादन मोठे होते. इराण, इराक, अरबस्तान, पूर्व आफ्रिका, मलाया, सिंहलद्वीपला कापडाची निर्यात होत असे. १८९५ नंतर कापसाचा पुरवठा करणाऱ्या अहमदाबाद, सोलापूर, कानपूर वगैरे भागात गिरण्या सुरू झाल्याने कापडाचे उत्पादन वाढू लागले. १८९५ मध्ये ३५ कोटी वार कापड तयार झाले होते; ते वाढत जाऊन १९१४ साली ११० कोटी वारापर्यंत पोहचले. महायुद्धापूर्वी हिंदुस्थानात ४८० कोटी वार कापड खपत असे; त्यापैकी निम्मे कापड स्वदेशात तयार होत असे व निम्मे कापड परदेशातून आयात होत असे. परंतु त्यानंतर इथल्या कापड उद्योगाला जपानच्या स्पर्धेशी तोंड द्यावे लागल्याने कापडाच्या निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम होऊ लागला. जपानहून ३० ते ३५ कोटी वार कापड दरवर्षी भारतात येऊ लागले.

हिंदुस्थानात लांब धाग्याचा कापूस निपजत नसल्याने इथे जाडेभरडे कापड तयार होत असे. जपानी कापडगिरण्यांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागल्याने आता इथल्या गिरणी मालकांनी सिंध आणि पंजाबखेरीज इजिप्त, केनिया इत्यादी देशांतून लांब धाग्याचा कापूस आयात करायला प्रारंभ केला व तलम कापड विणायला सुरुवात केली. महायुद्धापूर्वी आपल्या गिरण्यांतून कातले जाणारे सूत २० नंबराखालचे ७५ % व ३० नंबरावरील सूत जेमतेम ५ % असायचे. १९३०-३१ साली २० नंबराचे सूत ६० % पर्यंत कमी झाले, ३० नंबरापर्यंतचे सूत ३० % पर्यंत वाढले आणि ३० नंबरापेक्षा जास्त भारी सूत १० % पर्यंत तयार होऊ लागले. गिरणी मालकांचे प्रतिनिधी कस्तुरभाई लालभाई यांनी कायदेमंडळात कापसावरील अबकारी कर रद्द करण्याचा ठराव मंजूर करून घेतल्याने १ डिसेंबर १९२५ पासून सरकारने कापसावरील अबकारी कराची वसुली थांबविली. १९२७ साली मुंबईच्या गिरणी मालकांनी जपानी सुतावर व कापडावर संरक्षक जकाती लादण्याची मागणी केली. जकातमंडळाने त्यास मान्यता दिली व विदेशातून आयात होणाऱ्या कापडावरची जकात ११ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढविली. शिवाय ब्रिटनखेरीज जपान इत्यादी देशांतून आयात केलेल्या कापडावर ५ टक्के जादा कर

बसविला. यामुळे कापड उद्योग सावरू लागला. १९२१ साली सबंध देशात २५७ कापडगिरण्या होत्या, त्यात वाढ होऊ लागली. १९२७ साली देशातल्या कापडगिरण्या व मजुरांची वाढलेली संख्या अशी होती :

| स्थळ | गिरण्या | मजूर |
|---|---|---|
| **१. हिंदुस्थान देश** | ३२२ | ३,७४,०९१ |
| **२. मुंबई** | ८३ | १,५४,३९८ |
| **३. अहमदाबाद** | ७५ | ५६,३७८ |
| **४. कानपूर** | ९ | १७,१०१ |
| **५. सोलापूर** | ६ | १९,९४९ |
| **६. इंदूर** | ६ | ९,७०५ |
| **७. मद्रास** | ३ | ११,९३८ |
| **८. नागपूर** | २ | ९,६६० |

(गाडगीळ धनंजय, १९३२, पृ. ७२)

महायुद्ध व जपानच्या स्पर्धेमुळे हिंदुस्थानातला सुताचा व कापडाचा व्यापार अडचणीत आला. १९२३ साली लढाईमुळे वाढलेली मागणी संपली; त्यामुळे १९२४-२५ सालात मुंबईहून निर्यात होणाऱ्या सुताचे प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत खाली आले. १९२६ साली मुंबईतली गिरणी कामगारांची संख्या १,४८,२५४ होती, ती १९२६ सालात तीस हजारांनी घटून १,१८,३६८ झाली. (फडके य. दि.,१९९१, पृ.२) तरीही १९३० साली संपूर्ण हिंदुस्थानात २१ लाख पौंड सूत कातले गेले, त्यापैकी मुंबईत साडेसहा लाख पौंड सूत तयार झाले. संपूर्ण हिंदुस्थानात २४२ कोटी वार कापड विणले गेले, त्यापैकी ८९ कोटी वार मुंबईच्या गिरण्यांतून तयार झाले होते. ( गाडगीळ, उनि. पृ. ७२)

१९२३ पासून लढाई संपल्यामुळे उत्पादनात सुरू झालेली घसरण १९२९ च्या जागतिक मंदीमुळे सुरूच राहिली. तिथपासून १९३७ पर्यंत जवळपास १५ वर्षे कापडधंदा अडचणीतून मार्ग काढीत होता. अशा अडचणीच्या काळातही ठाण्याला विजयपत सिंघानिया यांनी रेमंड वुलन कंपनी स्थापन केली होती. १९३० साली गांधीजींच्या असहकार आंदोलनामुळे परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार करण्याची चळवळ सुरू झाल्याने कापडधंद्याला अप्रत्यक्षपणे संरक्षण मिळाले. शिवाय सरकारनेही १९३० ते १९३३ या काळात कापड उद्योगाला संरक्षण दिले. १९३३ साली जपानी मालावर संरक्षक कर लावण्यात आला. १९३३ साली भारतीय बाजारपेठेत इंग्लिश मालाला अन्य देशांच्या तुलनेत जास्त सवलती देणारा 'लीज-मोदी करार झाला.

या कारानुसार भारतीय कापसाला ब्रिटिश साम्राज्यांतल्या सर्व देशांत प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. भारताच्या दृष्टीने हा करार तसा फायद्याचा नव्हता. आपला कच्चा माल जास्त निर्यात होणार आणि तिकडचा पक्का माल मोठ्या प्रमाणावर आयात होणार. यामुळे देशी उत्पादनांना फटका बसला. मुंबईतल्या कापडगिरण्यांची संख्या घटली. १९३१ साली मुंबईत ७३ गिरण्या सुरू होत्या, १९३४ साली त्यापैकी फक्त ५५ गिरण्या चालू राहिल्या. कामगारांची संख्या ९६,००० इतकी कमी झाली. (Bombay Legislative Council Debets,Vol.40, August-September 1934, p.176) कामगारांचे मासिक वेतन ६० ते ८० रुपयांवरून २५ ते ३० रुपयांपर्यंत कमी करण्यात आले. कापडाला मागणी नसल्याने तयार झालेले कापड गुदामात पडून रहात होते. परदेशी कापड गिरण्यांशी स्पर्धा करता यावी म्हणून काही गिरणी मालकांनी नवी यंत्रसामुग्री मागवली. त्यामुळे जिथे १०० माग चालविण्यासाठी ९४ कामगार लागत, तिथे आता ६१ कामगारांवर भागत होते. परिणामत: कामगारांना वेतनकपात आणि नोकरकपातीच्या संकटाला सामोरे जावे लागले. (फडके, १९९३, पृ. २)

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. जपानला शत्रूराष्ट्र समजले गेल्याने दोस्त राष्ट्रांकडून भारतीय कापडाला मागणी वाढली. त्यामुळे कापडाच्या किंमती वाढल्या. सरकारने किमती नियंत्रित करण्यासाठी कापड व सुतावर नियंत्रणे लादली. १९४५ साली महायुद्ध संपले तरी कापड टंचाई मात्र कमी झाली नाही. १९४८ साली जानेवारी महिन्यात सरकारने कापडावरचे नियंत्रण काढले; पण तरीही परिस्थितीत फारसा फरक पडला नाही, त्यामुळे त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात पुन्हा एकदा कापडावर नियंत्रण बसविण्यात आले. १९५० पासून मात्र केंद्र व राज्य सरकारने निर्यातीस प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिल्याने कापड उद्योगात सकारात्मक बदलांना सुरुवात झाली.

**कारखान्यांतील मजुरांची स्थिती:**

मुंबई इलाख्यातील कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांच्या स्थितीबद्दलचा एक सरकारी अहवाल १९२८ साली प्रसिद्ध करण्यात आला होता. या अहवालानुसार १९२८ अखेर मुंबई इलाख्यात नोंदणीकृत कारखान्यांची संख्या १६६१ असली तरी प्रत्यक्षात १४९८ कारखानेच चालू होते. त्यापैकी ७१५ कारखाने नियमित होते व ७८३ कारखाने हंगामी स्वरूपाचे होते. एकूण कामगारसंख्या ३,५६,०८३ होती; त्यात स्त्री कामगार ७५०९२ (मुंबईत २८,१७३ व मुंबईबाहेर ४६,९१९), बालकामगार मुंबईत १२२ व मुंबईबाहेर ५,०६१ इतके होती. बहुतांश कामगार कर्जबाजारी होते. कारखान्यांतील अपघातांची संख्या ४५१८ इतकी होती, त्यापैकी ३९ अपघात प्राणघातक होते. सर्वात जास्त अपघात रेल्वे कारखान्यात होत असत. कारखान्यात शिशुगृहांची संख्या मुंबईत १४, अहमदाबादेस २२ व सोलापुरास २ अशी होती.

अहमदाबाद व सोलापूर येथील कारखानदारांनी शाळा व दवाखाने काढले होते.

**कामगारांचे संप :**

पहिल्या महायुद्धाला तोंड फुटल्यावर मुंबईतल्या कामगारवर्गात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. मुंबई शहर सोडून जाण्याकडे कल झुकू लागला. अन्नधान्याच्या किंमती ८० ते १०० टक्क्यांनी वाढल्या. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती भडकल्याने वेतनवाढीच्या मागण्या सुरू झाल्या. असंतुष्ट कामगार स्वयंप्रेरणेने संघटित होऊन आपल्या मागण्यांसाठी संप करू लागले. मुंबईत एकापाठोपाठ गिरण्यांतले कामगार संपावर जाऊ लागले. मुंबईत १९१७ साली ४७ संप झाले; १९१८ साली ६१, १९१९ साली १८, १९२० साली ६३ संप झाले. (फडके य. दि.,१९८९, पृ. १७) जानेवारी १९१९ मध्ये मुंबईतले दीड लाख कामगार एकाचवेळी संपावर होते. या बृहत संपाला प्रारंभ सेंचुरी मिल्सच्या कामगारांपासून झाला. २५ टक्के पगारवाढ आणि एक महिन्याचा बोनस मिळावा अशी कामगारांची मागणी होती. मिलमालकांना १९१८ सालात साडेबावीस लाख नफा मिळाला होता. त्यामुळे आपल्या मागण्या पूर्ण करण्यात मिल मालकांना आर्थिक अडचण नाही, अशी कामगारांची भावना होती. मात्र मिलचे संचालक सी. एन. वाडिया आणि व्यवस्थापक जे. जी. ॲण्डरसन यांनी मागण्या मान्य केल्या नाहीत. तांत्रिक व कारकून वर्गातल्या कामगारांना वेतनवाढ दिली पण अवजड व श्रमाची कामे करणाऱ्या मजुरांना मात्र वेतनवाढ नाकारली. मालकवर्गाच्या या दुटप्पी व्यवहारामुळे ३१ डिसेंबर १९१८ रोजी सेंचुरी मिलचे २५०० कामगार स्वयंप्रेरणेने संपावर गेले. संपाला इतर गिरण्यातील कामगारांनीही पाठिंबा दिला. गोदीकामगार व रेल्वेकामगारही संपात उतरले. मुंबईच्या होमरूल लीग चळवळीच्या कार्यकर्त्यांनीही संपाला पाठिंबा दिला. जमनादास द्वारकादास, डॉ. दि. धों. साठ्ये, डॉ. मोतिराम वेलकर या होमरूल चळवळीच्या पुढाऱ्यांची कामगारांसमोर भाषणे होऊ लागली. गिरणी कामगारांचा महामोर्चा निघाला. पोलिसांच्या गोळीबारात दोन कामगार ठार झाले, कित्येक जण जखमी झाले. दगडफेक होऊन संपाला हिंसक वळण लागले. कामगारांचे शिष्टमंडळ गव्हर्नर जॉर्ज लॉयड यांना भेटले. अखेर मुंबईचे पोलीस आयुक्त व्हिन्सेंट यांनी कामगार व गिरणी मालक यांच्यात यशस्वी मध्यस्थी केली. गिरणी मालकांनी १५ ते ३५ टक्के महागाईभत्ता, एक महिन्यास वीस रुपये याप्रमाणे बोनस देण्याची मागणी मान्य केल्यावर २५ जानेवारी १९१९ रोजी संप मागे घेण्यात आला. कामगारांनी व्हिन्सेंट साहेबाचा जयघोष करीत विजय मिरवणूक काढली.

मुंबईच्या कापडगिरण्यांतले संपाचे हे लोण पुढे पसरतच गेले. जेकब ससून गिरणीसकट २५ गिरण्यातले कामगार १ जानेवारी १९२० रोजी संपात उतरले. त्याच वर्षी ऑगस्ट ते ऑक्टोबर १९२० या काळात मुंबईचे रेल्वे, ट्राम, गॅस कंपनी, तेलकंपनी,

महानगरपालिकेचे सफाई कामगार संपावर गेले. मुंबईबाहेर पुणे, सोलापूर, बार्शी, हिंगणघाट, नागपूर येथेही कापडगिरण्यांतल्या कामगारांनी संप केले. इतकेच नाही तर कलकत्ता, अहमदाबाद, कराची, कानपूर, अलाहाबाद, झाशी, गोध्रा इत्यादी ठिकाणीही एकापाठोपाठ संप झाले. त्यामुळे लंडनहून भारतमंत्र्यांनी व्हाइसरॉयला तार करून या सार्वत्रिक संपामागे राष्ट्रीय काँग्रेसचा हात आहे का, अशी विचारणा केली. अर्थात संपाची कारणे राजकीय नसल्याचे व्हाइसरायकडून कळविण्यात आले.

मुंबईच्या कापडगिरण्यातल्या संपाच्या पार्श्वभूमीवर सफाईकामगारांच्या संपाच्या वेगळेपणाची विशेष नोंद करायला हवी. २४ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांनी संप सुरु केला. मासिक वेतन वीस रुपयांवरून २६ रुपये करावे, रविवार व सणाच्या दिवशी सुटी आणि वर्षातून १५ दिवसांची रजा या मागण्या होत्या. महापालिका आयुक्त एच. बी. क्लेटन यांनी संपकऱ्यांच्या मागण्यांना प्रतिसाद न देता हंगामी कामगार नेमले. संपावर गेलेल्या कामगारांवर खटले भरले. संपकऱ्यांत एकमुखी नेतृत्व नव्हते. या पार्श्वभूमीवर पुण्याहून सेनापती बापट मुंबईला आले, त्यांनी सफाई कामगार मित्रमंडळ स्थापन केले, संपावरील कामगारांच्या मदतीसाठी निधीसंकलनाचे काम सुरु केले. संपकऱ्यांच्या समर्थनार्थ जाहीर सभा घेतल्या. सफाई कामगारांसाठी तुरुंगात जायची तयारी असल्याचे जाहीर केले. अखेर ३ सप्टेंबर १९२० रोजी मुंबई महापालिकेने सफाई कामगारांचा मासिक पगार २४ रुपये केल्याचे, तसेच रविवारी व सणाच्या दिवशी सुटी देण्याचे मान्य केल्यावर संप मागे घेण्यात आला.

आतापर्यंत कामगार चळवळ ना. म. जोशी आणि नेमस्त पुढाऱ्यांच्या 'सोशल लीग सर्व्हिस'च्या नेतृत्वाखाली चालत होती. मात्र १९२० साली लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर बॅ. बॅप्टिस्टा या टिळकपंथीय पुढाऱ्याने पोस्टाचा संप घडवून आणला. पण हा संप यशस्वी झाला नाही. त्याचा कामगार चळवळीला फटका बसला. कामगारांमध्ये चळवळीविषयी नैराश्य निर्माण झाले होते. १९२१-२२ च्या जागतिक मंदीचाही कामगार संघटनांवर परिणाम झाला होता. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी १९२३ साली 'किसान-कामगार' पक्षाची स्थापना केली. १९२४ साली कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी बोनसच्या प्रश्नावरून मुंबईत कामगारांचा मोठा संप घडवून आणला, आणि पुन्हा एकदा कामगार चळवळीत नवे चैतन्य आले. या संपामागे डांगे यांच्या कम्युनिझमचे वैचारिक अधिष्ठान होते. त्यामुळे या संपापासून कामगारचळवळ ही वर्गविग्रहाच्या लढ्याचे माध्यम बनली. १७ जानेवारी १९२४ रोजी मुंबईच्या स्टँडर्ड मिलमधील कामगारांनी वार्षिक बोनस मिळावा म्हणून संप पुकारला. ३१ जानेवारीपर्यंत ७३ गिरण्यातले कामगार संपावर गेले. १६ फेब्रुवारीला डांग्यांना अटक करून कानपूरला नेण्यात आले. १८ फेब्रुवारीला

मालकांनी टाळेबंदी जाहीर केली. गव्हर्नरने संपात मध्यस्थी करावी म्हणून ना. म. जोशी, झाबवाला, सहस्त्रबुद्धे, गिरणी कामगार महामंडळाचे दत्ताराम भाटवडेकर व दत्तात्रेय मयेकर यांनी प्रयत्न केले. गव्हर्नरने मध्यस्थी करण्यास नकार दिला. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य समिती नेमली. या समितीत कामगारांचा प्रतिनिधी नव्हता. समितीने मालक-मजूर करारात बोनस देण्याची तरतूद नसल्याने मालकांनी योग्य तो निर्णय घ्यावा असा निवाडा दिला. त्यानंतर कामगारात संतोष वाढला व दंगलीला तोंड फुटले. पोलीस गोळीबारात दोन कामगारांचा मृत्यू झाला. १२ मार्चला कामगारांनी प्रेसिडेन्सी मिलला आग लावली. अखेर २४ मार्चला गिरण्या पुन्हा सुरू झाल्या.

मँचेस्टरच्या कापडव्यापाऱ्यांच्या दबावापोटी हिंदुस्थान सरकारने एतद्देशीय गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडावर जकात बसवली. परिणामत: १९२५ साली मुंबईच्या गिरणीमालकांनी १ सप्टेंबरपासून कामगारांच्या महागाईभत्त्यात २० टक्के कपात करण्याची योजना जाहीर केली. त्यामुळे कामगार संपावर गेले. गिरणी कामगार महामंडळात फूट पडली होती, कामगार हितवर्धक सभेचे कामही सुस्तावले होते. या दुफळीचा मालकवर्गाने फायदा घेतला. संप मिटण्याची चिन्हे दिसत नसल्याने बरेच कामगार मुंबई सोडून जाऊ लागले. ना. म. जोशी व त्यांच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बोटीची, रेल्वेची वा बसची तिकिटे काढून देण्याची व्यवस्था केली. मुंबईतच राहणाऱ्या कामगारांना धान्य पुरवले. दरम्यान १ डिसेंबर १९२५ रोजी सरकारने कापडावरील अबकारी कराची वसुली स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याने गिरणीमालकांनीही वेतनकपातीचा आपला निर्णय मागे घेतला व त्यामुळे संप मिटला.

१९२७ साली ऑगस्ट महिन्यात अपोलो आणि मँचेस्टर या गिरणीमालकांनी उत्पादनखर्च कमी करण्यासाठी विणकरांनी दोनऐवजी तीन माग चालविल्यास २० टक्के वेतनवाढ देण्याचे कामगारांना आमिष दाखविले, व आडमार्गाने कामगार कपातीचा डाव आखला होता. मात्र कामगारांनी त्यास नकार दिला व ते संपावर गेले. जोगळेकरांनी कामगारांची बाजू मालकांपुढे मांडली. सप्टेंबर महिन्यात मालकांनी आपला प्रस्ताव मागे घेतल्यावरच कामगार कामावर रूजू झाले.

१९२८ साली काही गिरणीमालकांनी गुदामातल्या कापडाची विक्री होईपर्यंत उत्पादन बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. काहींनी पाचच दिवस गिरणी चालू ठेवण्याचा पर्याय ठेवला. कामगारांच्या कामाचे प्रमाण ठरविण्याच्या दृष्टीने गिरणीमालक व्यूहरचना आखीत होते. कामगारांचा कामाचा बोजा वाढण्याचा व कामगार कपातीचा संभाव्य धोका ओळखून २८ मार्चला टेक्स्टाईल मिल व कस्तुरचंद मिलमधील कामगार संपावर गेले. कस्तुरचंद गटाच्या गिरण्यांनी एप्रिल महिन्यात उग्र निदर्शने केली; त्यामुळे वरळी

भागातल्या १० गिरण्या बंद पडल्या. २३ एप्रिलला काळाचौकी भागात पोलिसांनी कामगारांच्या जमावर गोळीबार केला, त्यात एक कामगार ठार झाला. परिणामत: संध्याकाळपर्यंत ५१ गिरण्यांत संप सुरू झाला. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली हा संप ऑक्टोबरपर्यंत म्हणजे सहा महिने सुरू होता. आतापर्यंतच्या संपातला हा सर्वात मोठा संप होता आणि कामगारांनी कुठल्याही मदतीची अपेक्षा न ठेवता तो हिकमतीने टिकवून ठेवला होता. १९२८ साली ठिकठिकाणी झालेल्या संपामुळे सुमारे तीन कोटी साडे तेरा लक्ष कामगार दिवस फुकट गेले होते. (तुळपुळे, १९६३, पृ. २०) अखेर हिंदुस्थान सरकारने ऑक्टोबर १९२८ मध्ये गिरणी मालकांच्या कामाच्या स्टँडर्डायझेशनची योजना तपासून पाहण्यासाठी व त्यामुळे कामगारांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी उपाय सुचविण्याकरिता फॅसेट कमिशन नेमले. त्यानंतर हा संप मागे घेण्यात आला. संपकाळात स्थापन झालेल्या समितीचे रूपांतर 'गिरणी कामगार युनियन' या साम्यवाद्यांच्या कामगारसंघटनेत करण्यात आले.

१९२८ च्या संपात भाग घेतल्यावरून गिरणीमालकांनी युनियनच्या कार्यकर्त्यांना त्रास द्यायला सुरुवात केली. काही कार्यकर्त्यांना कुरापती काढून कामावरून काढून टाकले. काही गिरणी मालकांनी युनियनची वर्गणी वसूल करण्यात अडथळे आणले. या पार्श्वभूमीवर कम्युनिस्टांच्या लाल बावट्याच्या पुढाकारातून ३० एप्रिल १९२९ रोजी ६१ गिरण्यात संप सुरू झाला. मात्र मिरत कट खटल्यात अनुभवी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना अटक झाल्याने संपकाळात भक्कम नेतृत्वाचा अभाव जाणवत होता. या संपाला ना. म. जोशी, गिरणी कामगार महामंडळ वा झाबावालांची युनियन यांनी पाठिंबा दिला नाही. मुस्लिम व बहिष्कृत वर्गातल्या कामगारांनीही संपात उतरण्यास नकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही संपाला पाठिंबा न देण्याची भूमिका घेतली. कामगार चळवळीला कम्युनिझमच्या चळवळीशी जोडण्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. कम्युनिस्ट नेत्यांच्या गटबाजीमुळेही परस्परविरोधी निवेदने व पत्रके काढली जात होती. काँग्रेसच्या कायदेभंगाच्या चळवळीबरोबर जावे किंवा जाऊ नये यावरून त्यांच्यात मतभेद होते. उषाताई डांगे आणि वासुदेव जोशी यांनी शं. वा. देशपांडे मास्तर, कांदळकर, तावडे या आपल्याच सहकाऱ्यांवर निधीचा गैरवापर केल्याचा आरोप केला. १ जून १९३० ला कम्युनिस्टांच्या गिरणी कामगार युनियनच्या सभेत या मतभेदांमुळे अध्यक्षांची निवड होऊ शकली नाही. कामगार संघटनेतल्या या मतभेदांचा फायदा उठवून गिरणी मालकांनी ताठर भूमिका घेतली. दोन महिने चाललेला हा संप कुठलीही तडजोड न होता अयशस्वी झाला. संपाच्या अपयशाला संयुक्त संप समितीचे प्रतिनिधी लालजी पेंडसे यांना जबाबदार धरून रणदिवे-देशपांडे व उषाताई डांगे यांनी ठराव करून गिरणी कामगार युनियनमधून त्यांना काढून टाकले. पुढे युनियनच्या नेत्यांनी दिलेले

हिशेब तपासल्यावाचून मंजूर करू नयेत अशी पत्रके वाटल्यावरून रणदिवे-देशपांडे युतीने उषाताई डांगे व वासुदेव जोशी यांची युनियनमधून हकालपट्टी केली. (फडके य. दि, १९९१, पृ. २०) यानंतर ४ जुलै १९२९ रोजी कामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी हिंदुस्थान सरकारने व्हिटले यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांचा स्वतंत्र आयोग नेमला. त्यात ना. म. जोशी आणि दिवाण चमनलाल हे मजुरांचे प्रतिनिधी आणि घनश्याम बिर्ला व व्हिक्टर ससून या उद्योगपतींचा समावेश होता. व्हिटले कमिशनने देशभरातील कामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करून मार्च १९३१ मध्ये आपला अहवाल सादर केला.[५]

१९३० साली दोन कामगारांना काढून टाकल्यामुळे जी. आय. पी. रेल्वे कर्मचाऱ्यांनी संप केला. रुईकरांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा निघाला. मात्र रेल्वे प्रशासनाने संपाची दखल घेतली नाही. त्यानंतर १९३३ साली पगार कपातीच्या विरोधात मुंबईच्या गिरण्यांमध्ये १७ संप झाले. हे सर्व संप अयशस्वी ठरले. १९३४ साली २३ एप्रिलला मुंबईत पुन्हा संप सुरू झाला. ६० हजार कामगार संपावर गेले. अंतर्गत मतभेदांमुळे १५ गिरण्या चालू राहिल्या. देशपांडे, रणदिवे, रॉयवादी गटांचा संपाला पाठिंबा होता. २३ मे १९३४ ला संपाला एक महिना पूर्ण झाला म्हणून कामगारांनी काढलेल्या मिरवणुकीवर पोलिसांनी लाठीहल्ला व गोळीबार केला. उषाताई डांगे, भय्याजी जोशी, गंगाधर अधिकारी या कार्यकर्त्यांना अटक केली. सरकारने संप बेकायदा ठरविला. एकूण २२७ कामगारांना अटक करण्यात आली; त्यापैकी ८९ जणांना खटल्यानंतर तुरुंगवासाची शिक्षा झाली. दोन महिन्यानंतर संप बिनशर्त मागे घ्यावा लागला. सरकारने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल १९३४ साली जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध झाला; त्यात गिरणीमालकांच्या पगारकपातीचे समर्थन करण्यात आले. त्यामुळे संतापलेल्या कामगारांनी कम्युनिस्ट पुढाऱ्यांवर त्याचा राग काढला. केशवराव जोगळेकर, दि. के. बेडेकर, वसंतराव कर्णिक, डॉ. एम. आर. शेट्टी, वामनराव कुलकर्णी यांना जबरदस्त मारहाण करण्यात आली. वामनराव कुलकर्णी सात दिवस बेशुद्ध होते. या संपातही कामगार पुढाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव होता. ना. म. जोशी, रघुनाथराव बखले इत्यादी नेमस्तांना विश्वासात न घेताच संप पुकारण्यात आला. तडजोडीसाठी नेमलेल्या संपसमितीचा अहवाल येण्यापूर्वीच संप पुकारण्याची घाई झाली होती. मंदीचा काळ संपाला प्रतिकूल असतानाही कम्युनिस्टांनी अतिजहाल धोरण स्वीकारून संप केला होता. वामनराव कुलकर्णी यांनी स्वत:च आपल्या आत्मकथनात हे मान्य केले आहे. (कुलकर्णी वामनराव, १९८९, पृ. ७६-८०) कम्युनिस्टांच्या या जहाल चळवळींना प्रतिबंध करण्यासाठी कायदा करावा अशी सूचना त्यावेळचे गव्हर्नर ब्रेबर्न यांनी भारतमंत्र्यांना २८ जून १९३४ रोजी पत्र पाठवून केली होती. अर्थात मध्यवर्ती

सरकारने या मताचा स्वीकार केला नाही. (फडके य. दि., १९९३,पृ. ११-१२)

१९३३-३४ या दोन वर्षांत मुंबईबाहेरही संपाचे वातावरण होते. १९३३ साली एप्रिल महिन्यात धुळ्याच्या कामगारांनी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्या दोन पुढाऱ्यांना अटक करण्यात आल्याने संघटना स्थापन होऊ शकली नाही. त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात अमळनेरला गिरणी कामगार संघटना बांधू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना गाव सोडून जायला भाग पाडले. १५ फेब्रुवारी१९३४ पासून सोलापूरचे गिरणी कामगार संपावर गेले. दोन महिन्यांहून अधिक काळ संप चालला. रघुनाथराव कऱ्हाडकर, भाई बेके, शिरुभाऊ लिमये या कार्यकर्त्यांनी संप चालू ठेवण्यासाठी पुढाकार घेतला. २६ एप्रिल १९३४ रोजी सोलापुरात पाच बॉम्बस्फोट झाले. ९३ व्यक्तींना अटक झाली. मध्यप्रांतात १९३७ च्या नागपूरच्या मॉडेलमिलच्या संपाचा अपवाद वगळता कामगार चळवळ फारशी प्रभावी नव्हती. नागपूरच्या कामगार चळवळीचे नेतृत्व नेताजी सुभाषचंद्र बोस व रामभाऊ रुईकर यांचेकडे होते. १९४० साली नागपूरच्या कामगारांनी महागाईभत्त्यात वाढ करण्याची मागणी केली. न्या. एम. एन. क्लार्क यांची चौकशी समिती नेमण्यात आली. २८ मार्च १९४० रोजी न्यायमूर्तींनी आपल्या अहवालात कामगारांना महागाई भत्ता देण्याची गरज नसल्याची शिफारस केली. त्यामुळे रामभाऊ रुईकर यांनी संपाचा आदेश दिला. एम्प्रेस मिल, मॉडेल गिरणीचे कामगार संपावर गेले. २५ एप्रिलला संप मागे घेतल्यावर १ मे १९४० रोजी प्रशांतचंद्र महालनोबीस यांच्या अध्यक्षतेखाली एम्प्रेस मिलचे व्यवस्थापक बाटलीवाला आणि रामभाऊ रुईकर यांची समिती नेमण्यात आली. समितीने युद्ध सुरू झाल्यापासून नागपूरच्या रहाणीखर्चात ६ टक्के वाढ झाली असल्याने दररोज ६ पैसे या दराने कामगारांना महागाई भत्ता देण्याची शिफारस केली व दर तीन महिन्यांनी महागाई एक अंकाने वाढल्यास १ पै या दराने महागाई भत्त्यात वाढ करण्याची शिफारस केली. गिरणी मालकांनी या शिफारशी स्वीकारल्या. १९४७ साली रुईकरांनी सूतगिरण्यांतील कामगारांना किमान वेतन व महागाई भत्त्यात वाढ करावी या मागण्या पुढे आणल्या. सरकारने न्या. के.टी.मंगलमूर्ती यांचा लवाद नेमला. लवादाच्या निर्णयानुसार सूतगिरणीतील अकुशल कामगारांना दरमहा २६ रुपये किमान वेतन मिळू लागले. रुईकरांनी १९४७ साली खाण कामगारांचीही संघटना बांधली. विणकर, गुमास्ते, हातमाग कामगार,मुद्रण कामगारांचे प्रश्न विधानसभेत मांडले. हातमाग व्यवसायाचे प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने १९४३ साली पाहणी समिती व १९४५ साली एक हातमाग मंडळ नेमून हातमाग व्यवसायाचे प्रश्न मार्गी लावले.

१९३७ साली मुंबई इलाख्यात ८८ औद्योगिक तंट्यांत १ लाख १० हजार कामगार व १९३८ साली १११ तंट्यात ६२ हजार कामगारांना त्रास सहन करावा लागला होता.

कॉ. डांगे यांनी त्यांच्या 'क्रांती' साप्ताहिकाच्या ८ जानेवारी १९३८ च्या अंकातून प्रत्येक कापडगिरणीत संपसमिती स्थापन करण्याची सूचना केली. १५ जानेवारीच्या अंकातून त्यांनी गिरणी कामगारांना १३ जानेवारी १९३८ पर्यंत वेतनवाढ दिली नाही, तर सार्वत्रिक संप करण्याची सूचना केली. दरम्यान खेर मंत्रिमंडळाने जयरामदास दौलतराव यांच्या अध्यक्षतेखाली वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, सय्यद अब्दुल्ला ब्रेलवी यांची कापड उद्योगातील कामगारांच्या वेतननिश्चितीसाठी समिती नेमली. समितीनेसमितीने फेब्रुवारी १९३८ मध्ये सादर केलेल्या अहवालात मुंबईच्या कामगारांच्या वेतनात ११.९ टक्के आणि सोलापूरच्या कामगारांसाठी १४.३ टक्के वेतनवाढीची शिफारस केली. मुंबईत कामगाराच्या नवरा-बायको-२ मुले अशा चौकोनी कुटुंबाला दरमहा किमान ५० ते ५५ रुपये लागतात असा समितीचा निष्कर्ष होता. त्यानुसार मुंबईच्या गिरणीमालकांनी कामगारांना पगारवाढ दिली. (फडके य. दि., कित्ता, पृ. १६-१८)

मुंबई सरकारने औद्योगिक कलहात समेट घडवून आणण्याची तरतूद असलेले विधेयक २ सप्टेंबर १९३८ रोजी विधानसभेत सादर केले. त्यात कामगारांनी संप करण्यापूर्वी आणि मालकांनी टाळेबंदी जाहीर करण्यापूर्वी समेटाचे प्रयत्न करण्याचे बंधन व सरकारतर्फे रजिस्ट्रारची नेमणूक करण्याची तरतूद करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक लवाद नेमण्याची तरतूद होती. आणि कायदा अमलात आणल्यानंतर वर्षभर संपास बंदी होती. विधेयकावर चर्चा चालू असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे १७ ऑक्टोबर १९३८ रोजी एक दिवसाचा सार्वत्रिक संप करण्याचे आवाहन केले. मात्र प्रत्यक्षात ७ नोव्हेंबरला संप झाला. कम्युनिस्टांनीही संपात भाग घेतला. लाठीहल्ला, गोळीबार झाला. दोघांचा मृत्यू व ६३३ जण जखमी झाले. धुळे, अमळनेरच्या गिरण्यातही संप झाला. गोळीबाराची चौकशी करण्याकरिता खेर मंत्रिमंडळाने न्या. कनिया, न्या. विकाजी तारापोरवाला व बॅ. छागला यांची समिती नेमली. त्यात कामगारांचा प्रतिनिधी नसल्याने संघटनांच्या एकाही प्रतिनिधीने साक्ष दिली नाही. याच काळात धुळ्याला गिरणी मालकाने टाळेबंदी जाहीर केल्यामुळे साने गुरुजी यांनी १९ सप्टेंबर १९३८ रोजी जाहीर सभेत तीनचार दिवसात गिरणी सुरू केली नाही तर तापी नदीत जलसमाधी घेण्याची घोषणा केली. त्यामुळे १४ सप्टेंबरला मालकाने टाळेबंदी मागे घेतली. खानदेश मजूर फेडरेशनचे अध्यक्ष नथुभाऊ पारोळेकर यांनी औद्योगिक कलह विधेयकालाही विरोध केला.

१९३०-३१ च्या जागतिक मंदीच्या काळात वाढलेली महागाई व पगार कपात यांचा कामगारवर्गाला फटका बसला होता. सप्टेंबर १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ही परिस्थिती अधिकच बिघडली. त्यामुळे मुंबईच्या गिरणी कामगारांनी महागाई भत्त्यात

वाढ करण्याची मागणी करून गिरणीमालकांविरुद्ध लढा सुरू केला. १९३९ च्या जुलै महिन्यात ४ गिरण्या बंद पडल्या. १८ हजार कामगार बेकार झाले. ११ एप्रिल १९३९ रोजी मुंबईच्या फिनिक्स गिरणीतल्या पाचशे कामगारांनी गिरणीमालकाला घेराव घालून संपाला सुरुवात केली. कॉ. डांगे यांनी संपाचे नेतृत्व केले. संप ७ महिने चालला. कामावरून काढलेल्या कामगारांना परत कामावर घेतल्यानंतर १ नोव्हेंबर १९३९ ला संप मागे घेण्यात आला. १९४० साली वेतनवाढीच्या मुद्यावरून संपाचा घाट घातला जात होता; परंतु टाटा, व्हिक्टोरिया व सेंच्युरी गिरण्यातील कामगारांना कम्युनिस्ट नेत्यांनी संपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. अर्थात युद्ध साहित्याच्या उत्पादनात अडथळा येऊ नये म्हणून इंग्रज सरकारनेही संपावर बंदी घातली होती. त्यामुळे कामगारांना संप करता येत नव्हता. तरीही ३ मार्च १९४० रोजी १४ गिरण्यांतले कामगार संपावर गेले, पाठोपाठ ४ मार्चला ६४ पैकी ६० गिरण्यांतले कामगार संपात सामील झाले. रेशीम व लोकरी कापड तयार करणारे गिरणी कामगारही संपात उतरले. ४ मार्चपासून अमळनेरचे गिरणी कामगार आणि २४ मार्चपासून सोलापूरच्या हातमाग मजूर संपात उतरले. ११ मार्चला डांगे, रणदिवे, मिरजकर या नेत्यांना अटक करून येरवडा तुरुंगात पाठवण्यात आले. २९ मार्चला मुंबईत पोलीसांनी दगडफेक करणाऱ्या कामगारांवर गोळीबार केला व देशपांडे मास्तर, शामराव परुळेकर , गोदावरी गोखले, एस. आर. तावडे, ना. वा. फडके, आर. एम. जांभेकर एस. जी. पाटकर इत्यादी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. युद्धकाळातील भाववाढ लक्षात घेऊन कामगारांना दैनंदिन तीन आणे पगारवाढ हवी होती; आणि गिरणी मालक दोन आण्यांपेक्षा अधिक वाढ द्यायला राजी नव्हते. कामगारांची मागणीही रास्त होती आणि गिरणीमालकांना नफाही भरपूर मिळत होता; त्यामुळे कामगारांनी संपावर जाण्यापेक्षा त्यांना महागाईभत्ता वाढवून देणे मालकवर्गालाही अशक्य नव्हते. संप न होता लवादाने प्रश्न सोडविता आला असता. मात्र लवादाच्या मध्यस्थीने तडजोड स्वीकारायची कामगारांची तयारी नव्हती. अखेर कुठलीच तडजोड न झाल्याने १२ एप्रिल १९४० रोजी संप मागे घेण्याचा निर्णय झाला. संप फसल्यावर काही कम्युनिस्ट नेते भूमिगत झाले; उषाताई डांगे, खंडेराव सुळे, केशवराव जोगळेकर, निंबकर या कार्यकर्त्यांना १३ जून १९४१ रोजी अटक करण्यात आली.

१९४२ साली मंदीचे वातावरण दूर झाले. मुंबईच्या कापडगिरण्या नफ्यात चालू लागल्या. गिरणीमालकांना १९४२ साली २० कोटी. १९४३ साली ३८ कोटी, १९४४ साली ३० कोटी, १९४५ साली २१ कोटी, १९४६ साली १३ कोटी नफा झाला. मात्र तरीही मुंबईच्या गिरणी मालकांनी कामगारांना बोनस दिला नाही. करवाढ, कापडावरील नियंत्रण, सरकारी आदेशावरून कामाचे तास ९ ऐवजी ८ झाल्याने कापडाचे उत्पादन

११ टक्क्यांनी घटले, असा गिरणीमालकांचा युक्तिवाद होता. मात्र १९४५ साली महायुद्धात दोस्त राष्ट्रांचा विजय झाला म्हणून गिरणीमालकांनी कामगारांना १ महिन्याचा पगार बोनस म्हणून दिला. तसेच १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणून कामगारांना बोनस देऊन आनंद साजरा केला. यामुळे कापड गिरणी कामगारांना संपाचे कारण उरले नाही.

बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखालील मुंबई सरकारने ८ नोव्हेंबर १९४६ रोजी टी. ई. वॉटरफील्ड या आय. सी. एस. अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली कापड उद्योगाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करण्यासाठी चौकशी समिती नेमली. समितीने अमळनेर व मुंबईच्या कारखान्यांचा अभ्यास करून काही शिफारशी केल्या. रोज ९ तासाचे काम करण्याची तरतूद पुढे चालू ठेवावी; मात्र रात्री साडेबारा ते सात वाजेपर्यंत रात्रपाळी सुरू करण्याची सूचना केली. त्यात अर्धा तास विश्रांती द्यावी व सहा तासांचे कार्यमूल्य आठ तासांइतके मानण्यात यावे अशी शिफारस केली. १९४६ साली मुंबई सरकारने औद्योगिक संबंधांचा कायदा मंजूर केला. या कायद्याने लवाद यंत्रणेचे व औद्योगिक न्यायालयांचे महत्त्व वाढविले. प्रातिनिधिक संघटनेची मान्यता कामगारांच्या गुप्त मतदानाने ठरविण्याची तरतूद करण्यात आली.

१९४६ साली रेल्वे कामगारांची रेल्वेबोर्डाशी तडजोड झाल्याने संप टळला होता. मात्र ११ जुलै १९४६ पासून टपाल व तारखात्याच्या कर्मचाऱ्यांनी तीन आठवडे संप केला. संपाचे लोण भारताच्या इतर प्रांतातही पोहचले. मुंबई सरकारच्या वतीने बाळासाहेब खेर व मंगळदास पक्वासा यांच्या मध्यस्थीने ३ ऑगस्ट १९४६ रोजी संप मागे घेण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या १६ पैकी १२ मागण्या मान्य झाल्या. अमळनेरला लाल बावटा युनियनने २४ जुलै १९४६ रोजी संपाची नोटीस दिली. गिरणी मालकाने यंत्र बिघडल्याचे कारण सांगून टाळेबंदी जाहीर केली. दोन हजार कामगार बेकार झाले. कामगारांनी १४४ कलम मोडून मिरवणूक काढली व सभा घेतली. पोलिसांनी एका कामगारास मंचावरून खेचून थोबाडीत मारली. युनियनचे सेक्रेटरी श्रीपत पाटील यांना गोळ्या झाडून ठार मारले. गोळीबारात सहा जणांचा मृत्यू झाला. आणखी तिघांचा इस्पितळात मृत्यू झाला. ७० कामगार जखमी झाले. मजूरमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी गोळीबाराचे समर्थन केले. कॉ. डांगे यांनी विधानसभेत अमळनेरच्या गोळीबाराची चौकशी करण्याची मागणी केली. (डांगे, १९७६, पृ. ५६)

१९५० साली मुंबईचे गिरणी कामगार बोनसच्या मागणीसाठी अडीच महिने संपावर गेले होते. या संपकाळात कामगारसंघटनांचे प्रतिनिधित्व 'इंटक'ने करावे की 'हिंद मजदूर सभे'ने करावे यावरून वाद झाला. सरकारने व गिरणी मालकांनी हिंद मजदूर सभेचा युक्तिवाद नाकारला. संपकाळात जमावबंदीसाठी १४४ कलम लागू करण्यात आले,

लाठीहल्ला व गोळीबारही झाला. काही लोक मारले गेले. पण कुठल्याही तडजोडीविना संप बिनशर्त मागे घेण्यात आला.

## ४.६. कामगार संघटनांचा उदय :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबई, कलकत्ता येथे यंत्रावर चालणारे कारखाने निघू लागल्यानंतर भारतात एक नवा 'औद्योगिक कामगार'वर्ग तयार होऊ लागला होता. त्याआधी आपल्याकडे कामगार संघटना नव्हत्या. औद्योगिक आस्थापनात आयुष्यभर पगारी नोकरी करणारा कामगारवर्ग यापूर्वी आपल्याकडे नव्हता. त्यामुळे प्रामुख्याने मुंबईत व अंशत: अन्य शहरात कारखाने निघू लागल्यावर खेड्यातून काम मिळविण्यासाठी स्थलांतरित झालेल्या लोकांतून हळू हळू शहरातला कामगारवर्ग तयार होऊ लागला होता. या कामगारांची सांस्कृतिक मुळे खेड्यातल्या ग्रामजीवनाशी घट्ट जुळलेली असल्याने त्यांचे शहरातले वास्तव्य तसे उपरे असल्यासारखेच असायचे. स्वाभाविकच औद्योगिक कामगारवर्गात ज्या वर्गीय जाणिवा रूजलेल्या असतात, त्यांचा या लोकांत अभाव होता. कोकणातून वा देशावरून मुंबईत आलेल्या मजुरांना हक्कांविषयी व सामाजिक न्यायाविषयी वेगळ्या जाणिवा तयार झाल्या नसल्याने अन्नदात्या मालकवर्गाच्या दयेवर अवलंबून राहण्याची मानसिकता होती. त्यामुळे इंग्लंडमधल्या कामगारवर्गासारखा संघटित कामगारवर्ग इथे अद्याप तयार झालेला नव्हता. इंग्लंडच्या कामगार संघटनेच्या व्याख्येप्रमाणे आपले कामगारसंघ संरचित होऊ शकत नव्हते. [६] उलट इंग्लंडमधूनच १८८८ साली मँचेस्टरच्या चेंबर ऑफ कॉमर्सने हिंदुस्थानातील कामगारांना कारखानदारांकडून चांगली वागणूक मिळण्यासाठी कायदे केले पाहिजेत, फॅक्टरी ॲक्ट लागू केला पाहिजे अशी वसाहतवादी सरकारकडे मागणी करण्यात आली. त्यानंतर प्रथमच १८८१ साली भारतात फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आला. १८९१ व १९११ मध्ये या कायद्याच्या सुधारित संहिता लागू करण्यात आल्या.(तुळपुळे,१९६३,पृ.८) मात्र स्पर्धा टाळण्यासाठी ब्रिटिश भांडवलदारांनी मतलबी भूमिकेतून एतद्देशीय कामगारांविषयी खोटा कळवळा दाखविला असल्याची समजूत कारखानदारांमध्ये निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात १८९० साली मुंबईस नारायण मेघजी लोखंडे यांनी सर्वप्रथम 'बॉम्बे मिलहॅण्डस् असोशिएशन' अर्थात 'मुंबई गिरणी कामगार संघा'ची स्थापना केली. लोखंडे हे स्वत: कामगार होते आणि गिरणी कामगार संघाची स्थापना करण्यापूर्वी त्यांनी १८८४ साली गिरणी कामगारांच्या मागण्या घोषित करण्यासाठी दोन जाहीर सभा घेतल्या होत्या. लोखंडे यांनी १८८९ साली १७ हजार कामगारांच्या सह्यांनिशी गव्हर्नर जनरलकडे कामगारांच्या मागण्यांचे निवेदन पाठविले होते. आठवड्याची एक दिवस सुटी, दुपारी जेवणाची अर्धा तास सुटी, १५ तारखेच्या आत पगार, कामावर इजा झालेल्या

कामगारास बरा होऊन परत कामावर रुजू होईपर्यंतचा पूर्ण पगार व कामावर मृत्यू आल्यास कामगाराच्या कुटुंबास पेन्शन अशा मागण्या या निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आल्या होत्या. पैकी रविवार हा कामगारांच्या जोतिबा-खंडोबा देवतांचा असून त्यांच्या प्रार्थनेसाठी सोयीस्कर म्हणून रविवारची सुटी मिळवण्यात लोखंडे यांच्या प्रयत्नांना यश लाभले होते. फॅक्टरी ॲक्ट १८८१ मध्ये दुरुस्ती व्हावी यासाठी लोखंडे प्रयत्नशील होते. १८९० साली त्यांनी 'बॉम्बे मिल हँडस् असोशिएशन' स्थापन केली. या संघाची तशी रितसर घटना नव्हती, किंवा सभासद नोंदणी करणे वगैरे संघटना बांधणीचे प्रकारही नव्हते. मात्र सरकार दरबारी अर्ज विनंत्या करून कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम केले जात होते. (Sarkar Sumit, 1989, p. 61)१८७७ साली नागपूरच्या एम्प्रेस मिलच्या कामगारांनीही वेतनवाढीसाठी संप केला होता. अर्थात कामगार संघटनांचा खरा उदय व विकास विसाव्या शतकातच झाला. आर्थिक क्षेत्रातील औद्योगिक वाटचालीचा मागोवा कामगारांचे प्रश्न आणि कामगार संघटनांच्या चळवळी लक्षात घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही; म्हणून विसाव्या शतकातील कामगार संघटनांच्या उदयाची वाटचाल कशी झाली याचा येथे साररूप आढावा घायवयाचा आहे.

**१.विदर्भातील कामगारसंघटना :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी विदर्भातल्या कोळसा खाणींच्या कामगारांच्या समस्या चंद्रपूरचे शेठ खुशालजी यांच्या मध्यस्थीने या समस्या सोडविल्या जात. त्यानंतर कोळसा मजुरांनी संघटना स्थापन केल्या. जिन-प्रेस, कापड गिरण्या निर्माण झाल्यावर त्याही क्षेत्रात कामगार संघटनांचा उदय झाला. २६ एप्रिल १९०८ रोजी नागपूरात विदर्भातील मजूर आंदोलनाचे जनक धुंडिराजपंत ठेंगडी यांच्या नेतृत्वाखाली मिल मजुरांची सभा बोलावण्यात आली होती. या सभेला डॉ. मुंजे, स्वामी शंकरानंद हे अन्य राजकीय नेतेही उपस्थित होते. कामगारांनी दारूचे व्यसन सोडावे, पैसा फंडात पैसे गुंतवावे इत्यादी उद्बोधनपर व्याख्याने झाली. धुंडिराजपंत ठेंगडी यांच्यानंतर विदर्भातील कामगारांचे पुढारी म्हणून रामभाऊ रुईकर यांचे नाव घ्यावे लागते. १९२० पासून रामभाऊ रुईकर यांनी कामगार संघटनांना काँग्रेस चळवळीच्या माध्यमातून राष्ट्रीय राजकारणाच्या प्रवाहाला जोडण्याचे काम केले. १९२७ साली त्यांनी मिल मजदूर संघाची स्थापना केली. १९२३ चा वर्कमेन्स कॉंपेन्सेशन कायदा, १९२५ चा कॉटन जिनिंग – प्रेसिंग कायदा यांचा आधार घेऊन कामगारांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी ते प्रयत्नशील असत. मिलसमोर लाल निशाण लावून ते कामगारांना मारगदर्शन करीत असले तरी रशियन अथवा चीनी कम्युनिस्ट पंथीय कामगार संघटनेच्या तत्त्वज्ञानाशी त्यांचा कुठलाच अनुबंध नव्हता. १९२८ साली हिंदुस्थान सरकारने मजुरांच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी व्हिटले कमिशन नेमले होते, तेव्हा

काँग्रेसने या कमिशनवर बहिष्कार टाकावा, अशा आशयाचे पत्र त्यांनी जवाहरलाल नेहरू यांना पाठविले होते. मात्र नेहरूंना ही बहिष्काराची कल्पना मान्य झाली नाही. या व्हिटले कमिशनवर शासनाने 'मध्यप्रांत-वऱ्हाड' साठी असिस्टंट कमिशनर या नात्याने अनुसयाबाई काळे यांची नियुक्ती केली होती. अनुसयाबाई काळे यांनी व्हिटले यांना नागपूर व अकोला येथील कामगारवर्गाच्या परिस्थितीचे दर्शन घडविले. महिला सभासदांना भेटून कामगारवस्तीत नेले. किसन फागुजी बनसोडे या वंचितांच्या पुढाऱ्यानेही व्हिटले कमिशनला दलित वंचित वर्गातल्या मजुरांच्या समस्यांबाबत निवेदन दिले व त्यांच्या मागण्या सादर केल्या.

१९३२ ते १९३५ या काळात रुईकर अ. भा. ट्रेड युनियनचे अध्यक्ष होते. १९३९ ते १९४६ या काळात ते विदर्भ फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे अध्यक्ष होते. १९४८ साली ते हिंद मजूर सभेचे अध्यक्ष होते. रुईकरांप्रमाणे नरकेसरी अभ्यंकर यांनीही काँग्रेसच्या माध्यमातून विदर्भातील मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. १९३४ साली नागपूर मिलच्या मजुरांनी हरताळ सुरू केला होता. मजूर पुढाऱ्यांना तुरुंगात टाकण्यात आले. त्यावेळी नरकेसरी अभ्यंकर यांनी विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीसमोर हा प्रश्न चर्चेला आणला व मजुरांना आर्थिक व इतर साहाय्य करण्याचा ठराव पारित केला. १९३७ साली कौन्सिलच्या निवडणुका झाल्या, त्यात मजुरांचे प्रतिनिधी म्हणून भाऊजी पागे निवडून आले. १६ जानेवारी १९४६ रोजी नागपूरच्या दोन्ही मिलच्या कामगारांनी हरताळ पाळला. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे पुढारी ठवरे यांनी आपल्या अनुयायांनी या हरताळात सहभागी होऊ नये, असा फतवा काढला. त्यामुळे मजुरांत स्पृश्य-अस्पृश्य अशी फूट पडली. त्यांच्यात मारामारी झाली व तीन लोक ठार झाले. नागपूरात संचारबंदी लावण्यात आली. त्यानंतर १९४७ साली 'दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार इंडस्ट्रियल डिस्प्युट ॲक्ट' हा कामगारहिताचा कायदा करण्यात आला.

### २.कामगार हितवर्धक सभा :

स्थापना १९०९. शिवाजी रामजी नरे, सीताराम केशव बोले व बॅ. हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर हे संस्थापक. लढाऊ कामगार संघटनेपेक्षा कल्याणकारी कामगारसंघटना म्हणून काम करणारी संघटना असा ह्या संघटनेचा लौकिक होता. कामगारांना शिक्षण, कायदेशीर सल्ला, मालकांबरोबरच्या तंट्यात मदत आणि मद्यपानाच्या व्यसनांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे हे संघटनेचे उद्देश होते. महायुद्ध सुरु झाल्यावर कामगारांमध्ये घबराट निर्माण होऊन ते मुंबई सोडून जाऊ लागले तेव्हा कामगार हितवर्धक सभेने ठिकठिकाणी सभा घेऊन कामगारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण केले. बोले, तालचेरकर हे सूत्रधार कामगारवर्गातले नव्हते; मात्र भंडारी व गोमंतक मराठा जातीतून आलेले होते. २९ ऑक्टोबर १९२० रोजी वॉशिंग्टनला भरणाऱ्या कामगारांच्या

आंतरराष्ट्रीय परिषदेत बॅ. तालचेरकर यांचे नाव बोल्यांनी सुचवले होते. लोकमान्य टिळक व मद्रासचे बी. पी. वाडिया यांना या परिषदेला पाठवावे अशी मागणी केली जात होती, तेव्हा हितवर्धक सभेने त्यास विरोध केला होता. ना. म. जोशी यांची निवड झाली तेव्हाही भांडवलशाहीच्या ब्राह्मण कैवाऱ्याची निवड केल्याबद्दल हितवर्धक सभेने नाराजी व्यक्त केली होती. अर्थात स्वत: जोशी यांच्या कार्यात कुठेही ब्राह्मणी काव्याने जातीय हितसंबंध जोपासल्याच्या कृती घडलेल्या नव्हत्या. तरीही ते केवळ ब्राह्मण जातीतून आलेले पुढारी म्हणून ब्राह्मणेतरांनी हरकत घेतली होती. माणसाच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करण्यासाठी त्याच्या एकंदर कर्तृत्वाच्या मूल्यांकनापेक्षा जातीची फूटपट्टी लावण्याची मराठी लोकांची मानसिकता तेव्हाही वरचढ होत होती, हे या अनुभवावरून लक्षात येते.

**३.सोशल लीग सर्व्हिस :**

स्थापना ११ मार्च १९११. नारायण मल्हार जोशी, गोपाळ कृष्ण देवधर, नटेश अप्पाजी द्रविड यांचा संस्था स्थापनेत पुढाकार होता. ना. म. जोशी संघटनेचे अनेक वर्षे सरचिटणीस होते. त्यांनी कामगारांच्या शिक्षणासाठी करिमभॉय इब्राहिम व दोराब टाटा यांना शाळा काढण्यास प्रवृत्त केले. पहिल्या महायुद्धाच्या काळात मुंबईतल्या संपकऱ्यांची बाजू मांडण्यासाठी आकडेवारीसह वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या. सरकारच्या सहकार्याने मालक-मजूर तंटे सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे ऑक्टोबर १९१९ साली वॉशिंग्टनला झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सरकारने हिंदुस्थानातील कामगारांचे प्रतिनिधी म्हणून ना. म. जोशी यांची निवड केली.

ना. म. जोशी हे १९२१ ते १९४४ असे प्रदीर्घ काळ मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी कामगार कायद्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. कामगारांनी संप केल्यास ते शिक्षेस पात्र समजले जात, हा अडथळा दूर करण्यासाठी १९२१ साली त्यांनी 'ट्रेड युनियन संस्था नोंदणी कायदा' करण्याचा ठराव कायदेमंडळात मांडून मंजूर करून घेतला. त्यामुळे नोंदणीकृत कामगार संघटनांना कायद्याचे संरक्षण मिळाले. १९२४ चा कामगारांच्या नुकसानभरपाईचा कायदा, १९२६ चा कामगार संघटनांविषयीचा कायदा (Indian Trade Unions Act) ना. म. जोशींच्या पुढाकारानेच पारित झाला. या कायद्यामुळे नोंदणीकृत कामगार संघटनांना शासकीय संरक्षण प्राप्त झाले. १९३६ साली 'Paymen of Wages Act' आणि १९३८ साली 'Employment of Children's Act' हे कायदे मंजूर करून घेण्यातही जोशींनी खटपट केली होती. मात्र स्त्री कामगारांना बाळंतपणाची पगारी रजा मिळवून देण्याचे त्यांचे विधेयक मालकवर्गाच्या प्रभावाखाली फेटाळले गेले होते.

कामगार संघटनामुळे हिंदुस्थानातील जातिसंस्थेतला दुरावा कमी होऊ शकेल का याविषयी जोशींना खात्री वाटत नव्हती, मात्र औद्योगिकरणामुळे हा दुरावा कमी होईल

असा आशावाद त्यांना वाटत होता. मिस्टर ली या ब्रिटिश अधिकाऱ्याला २५ ऑगस्ट १९२६ रोजी लिहिलेल्या पत्रात जोशींनी हा दृष्टिकोण मांडला होता. त्या पत्रात ते म्हणतात, "It is not trade unionism that is breaking caste but it is industrialism which had some effect in that direction by bringing together people of various castes including touchables and untouchables in the same workshops." (मोटे, १९७२,पृ. ४५६) पुढील काळातही कामगार संघटना जातिवादापासून दूर राहिल्याचे दिसते. इतकेच नाही तर १९२५ साली अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसने एका ठरावान्वये कामगारसंघटनेत जातिवाद आणण्यास विरोध केला होता. यावरून ना. म. जोशी यांच्या भविष्यवाणीतला द्रष्टेपणा लक्षात येतो.

### ४.ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) :

जानेवारी १९२० च्या मुंबईच्या कापडगिरण्यांतील दीड लाख कामगारांच्या संपामुळे १० जानेवारीस ना. म. जोशी यांच्या पुढाकाराने मवाळ पक्षाचे नेते न्या. नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई कामगार समिती' नावाची संघटना स्थापन करण्यात आली. लोकमान्य टिळकांचे सहकारी जोसेफ बॅप्टिस्टा हे उपाध्यक्ष होते. सॉलिसिटर जिनवाला, बॅ. व्ही. एम. पवार, बॅ. तालचेरकर, सीतारामपंत बोले, काशीनाथ कोरेगावकर चिटणीस होते. ११ जानेवारील समितीने कामगारांच्या मागण्यांचा नेमका तपशील ठरवला. पगारात ५०% वाढ, कामाचे तास कमी करावेत, दररोज दुपारी अर्धा तासाची सुटी, पगार दर महिन्याच्या १५ तारखेला, अपघात झाल्यास भरपाई, संपकाळातले वेतन द्यावे इत्यादी मागण्यांचा मसुदा तयार करण्यात आला. मालकांनी मागण्या मान्य न केल्यावर समितीने गव्हर्नरकडे दाद मागितली. गव्हर्नरच्या मध्यस्थीनंतर मालकांनी कामाचे तास बारा ऐवजी दहा करण्यास, अपघाताबद्दल नुकसान भरपाई व वैद्यकीय मदत देण्यास, बोनस देण्यास व ३५ टक्क्यांवरून ५५ टक्के महागाई भत्ता वाढविण्यास संमती दिली. २ फेब्रुवारीपासून सर्व कापडगिरण्यांतील काम सुरळीत सुरू झाले.

७ जुलै १९२० रोजी ट्रेड युनियनचे पहिले अधिवेशन लाला लजपतरायांच्या अध्यक्षतेखाली भरविण्याचा ठराव पारित झाला. ३१ ऑक्टोबर १९२० रोजी भरलेल्या पहिल्या अधिवेशनात लाला लजपतराय यांच्याखेरीज मोतीलाल नेहरू, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, महमद अली जिना, हंसराज ठाकरसी, लक्ष्मीदास तेरसी, बी. पी. वाडिया हे मान्यवर हजर होते. इंग्लंडमधील मजूर पक्षाचे नेते कर्नल वेजवुड, नागूताई जोशी व अवंतिकाबाई गोखले या स्त्रियांचाही सहभाग होता. लाला लजपतरायांनी रशियन क्रांतीचा दाखला देऊन कामगार व भांडवलदार या दोन वर्गातील संघर्षाचे विश्लेषण केले.

हिंदुस्थानातल्या कामगारांमध्ये वर्ग-जाणीव निर्माण करण्यावर भर द्यावा, त्यासाठी कामगारांना शिक्षण द्यावे, अशी भूमिका मांडून "संघटित व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा' हा संदेश दिला. 'मी सरकारला पाठिंबा देणार नाही तसेच त्याला विरोधही करणार नाही' ही लाला लजपतरायांची घोषणा तरुणांना विशेष पसंत पडली नाही. या परिषदेत कामगारांना विधानपरिषदेत प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली. पहिल्या अधिवेशनात १०७ कमगार संघ सामील झाले होते; त्यापैकी ६४ कामगार संघटनांना संलग्न करून घेण्यात आले. त्यांची सभासदसंख्या १,४०,८५४ होती. १९२८ साली अ. भा. ट्रेड युनियन कॉंग्रेसमध्ये राष्ट्रवादी व साम्यवादी विचारधारेच्या गटात फूट पडली. साम्यवादी गटाने ट्रेड युनियनवर कब्जा मिळवला; मात्र फक्त २१ संघ ट्रेड युनियन कॉंग्रेसबरोबर राहिले.

### ५. गिरणी कामगार युनियन :

१९२८ साली सहा महिने चाललेला मुंबईचा मोठा संप कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने सुरू झाला होता. मात्र जागतिक मंदी आणि मिरत खटल्यात अनुभवी साम्यवादी नेते अडकल्याने हा संप फसला. सरकारने गिरणीमालक व कामगार या दोन्ही पक्षाची बाजू लक्षात घेऊन उपाय सुचविण्यासाठी फॅसेट कमिशन नेमल्यावर हा संप ऑक्टोबर १९२८ ला मागे घेण्यात आला. संप संपल्यावर संपकाळात स्थापन झालेल्या समितीचे रूपांतर 'गिरणी कामगार युनियन' नामक संघटनेत करण्यात आले. लाल बावटा गिरणी कामगार युनियन म्हणून या संघटनेचा निर्देश केला जात असे. कापड गिरणी कामगारांची ही सर्वात मोठी संघटना होती. सुमारे ४० हजार कामगार या संघटनेचे सदस्य होते. १९२९ साली जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या अधिवेशनात या युनियनला 'आयटक'ची संलग्नता प्रदान करण्यात आली.

### ६. गिरणी कामगार महामंडळ :

१९२४ साली दत्ताराम आत्माराम भाटवडेकर आणि दत्तात्रेय रामचंद्र मयेकर यांनी गिरणीकामगार महामंडळ ही संघटना स्थापन केली. संघटनेचे सरकारशी सलोख्याचे संबंध होते. मात्र १९२४ च्या मोठ्या संपात गिरणी महामंडळाने गव्हर्नरने संपात मध्यस्थी करण्याची सूचना मान्य केली नाही. १९२५ च्या वेतनकपातीच्या मुद्यावरून झालेल्या संपातही गिरणी कामगार महामंडळाला प्रभावी भूमिका निभावता आली नाही. उलट भाटवडेकर व मयेकर यांच्यातील मतभेदांमुळे महामंडळात फूट पडली. १९२७ साली जोगळेकरांनी गिरणी कामगार महामंडळ व बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन या दोन संघटनांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्याला मयेकरांनी विरोध केला. अखेर मयेकरांवर पैसे खाल्ल्याचा ठपका ठेवून २४ मार्च १९२८ रोजी त्यांना संघटनेतून काढून

टाकण्यात आले.

### ७. बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन :

१९२४ व १९२५ साली झालेल्या संपात कामगारांमध्ये एकजूट नसल्याने मालकवर्ग कामगारांना कसा जेरीस आणतो याचा अनुभव आला होता. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या संघटनांनी मालकांबरोबर वाटाघाटी करण्यापेक्षा सगळ्यांसाठी एकाच प्रातिनिधिक संघटनेने वाटाघाटी केल्या तर लवकर तोडगा निघू शकेल हा विचार बळावला. त्यातून २३ जानेवारी १९२६ रोजी 'बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन' ही नवी संघटना स्थापन झाली. संघटनेच्या अध्यक्षपदी जुने जाणते कामगार पुढारी ना. म. जोशी यांची निवड झाली. सरचिटणीसपदाची धुरा रघुनाथराव बखले यांच्याकडे आली. कामगार हितवर्धक सभेचे सीताराम केशव बोले, आसवले, झाबवाला आणि जिनवाला यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. वर्षभरात दहा हजाराहून अधिक कामगार लेबर युनियनचे सभासद झाले. गिरणी कामगार महामंडळाचा मयेकर गट मात्र या नव्या युनियनपासून अलिप्त राहिला.

### ८. इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन :

१ डिसेंबर १९२९ रोजी आयटक (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस) ह्या कामगारसंघटनेत फूट पडून व्ही. व्ही. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन नावाची नवी कामगार संघटना स्थापन झाली. कामगारांच्या प्रश्नांच्या अभ्यासासाठी सरकारने रॉयल कमिशन नेमले होते, त्यावर बहिष्कार घालण्याच्या मुद्द्यावरून कामगार संघटनेत मतभेद झाले होते. कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी बहिष्काराचा घाट घातला होता. रेल्वे कर्मचारी डी. बी. कुलकर्णी व देशपांडे मास्तरांचा त्यात पुढाकार होता. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर १९२९ या काळात नागपूरला जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या आयटकचे दहावे वार्षिक अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात बऱ्याच वादविवादांनंतर मुंबई कम्युनिस्टांच्या गिरणी कामगार युनियनला आयटकची संलग्नता देण्यात आली. मात्र गिरणी कामगार युनियनच्या देशपांडे मास्तरांनी बादशाही आयोगावर बहिष्कार घालण्याचा आणि ना. म. जोशी व दिवाण चमनलाल यांनी आयोगाचे सदस्यत्व स्वीकारले म्हणून त्यांच्या निषेधाचा असे दोन ठराव मांडले. तेव्हा १ डिसेंबरला ना. म. जोशी, रघुनाथराव बखले, एस. सी. जोशी, व्ही. व्ही. गिरी या नेमस्त पुढाऱ्यांनी वेगळी सभा घेऊन 'इंडियन ट्रेड युनियन' नावाची नवी कामगार संघटना स्थापन केली. व्ही. व्ही. गिरी यांची नव्या संघटनेचे अध्यक्ष व रघुनाथराव बखले ह्यांची सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली. या फेडरेशनमध्ये भारतातल्या ३० कामगारसंघटना सामील झाल्या व सभासद संख्या ९५ हजारापर्यंत गेली. १९३८ साली 'इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन' अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये विलीन झाली. ना. म.

जोशी यांच्याकडे नव्याने सरचिटणीसपद सोपविण्यात आले.

### ९. 'लाल ट्रेड युनियन काँग्रेस' :

१९३० साली म. गांधींच्या सत्याग्रहाच्या आंदोलनाला पाठिंबा देऊ नये अशी आंतरराष्ट्रीय साम्यवादी विचार मंचाने भूमिका घेतल्याने अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी कलकत्त्याला अधिवेशन बोलावले. या अधिवेशनात सत्याग्रहविरोधी भूमिका घेतलेला कम्युनिस्ट गट अल्पमतात गेल्याने त्यांनी १८ जुलै १९३१ रोजी बाहेर पडून 'लाल ट्रेड युनियन काँग्रेस' स्थापन केली. या नव्या संघटनेबरोबर जोडून घ्यायला इतर कामगार संघटना फारशा तयार झाल्या नाहीत.

### १०. 'राष्ट्रीय ट्रेड युनियन काँग्रेस :

स्थापना : १९३३. 'इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन', 'रेल्वे कामगार संघटना' व अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसशी संलग्न नसलेल्या इतर काही संघटना यांनी एकत्र येऊन ही नवी संस्था स्थापन केली. या नव्या संस्थेचे ४७ कामगारसंघटनांनी संलग्नत्व स्वीकारले. संस्थेचे एकूण १,३५,००० नोंदणीकृत सभासद होते.

### ११. इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (इंटक) :

१९४७ साली भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीला झालेल्या परिषदेत राष्ट्रीय श्रमिक काँग्रेस अर्थात 'आयटक' या संघटनेची स्थापना करण्याचा निर्णय झाला. ३ मे १९४७ रोजी अधिकृतपणे संघटना स्थापन झाली. सुरेशचंद्र बॅनर्जी यांची पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाली. अ. भा. ट्रेड युनियनशी आता राष्ट्रीय काँग्रेसचा संबंध संपला. सरकारी पाठिंब्यामुळे इंटकचा राष्ट्रीय पातळीवर विस्तार झाला. महाराष्ट्रातील कापडगिरण्या, साखर कारखान्यातल्या कामगारांनी इंटकचा पुरस्कार केला.

### १२. हिंद मजदूर सभा :

काँग्रेसवाद्यांनी स्वतंत्र 'इंटक' संघटना स्थापन केल्यानंतर १९४८ साली समाजवाद्यांनी 'हिंद मजदूर सभा' नावाची संघटना स्थापन केली. रॉयवाद्यांची "भारतीय श्रमिक फेडरेशन' संस्थाही या नव्या संस्थेत विलीन झाली. श्री. रामभाऊ नाईक हे हिंद मजदूर सभेचे पहिले अध्यक्ष झाले आणि पहिले सरचिटणीस म्हणून मुंबईचे श्री. अशोक मेहता यांनी जबाबदारी स्वीकारली. कार्यकारी मंडळात जयप्रकाश नारायण, अरुणा असफअल्ली, व. भ. कर्णिक. दिनकर देसाई, मणिबेन कारा इत्यादींचा समावेश होता. पक्षनिरपेक्ष भूमिकेतून संघटना चालविण्यावर हिंद मजदूर सभेचा भर होता. आपल्या जाहीरनाम्यात त्यांनी कामगार चळवळीत नवे नेतृत्व तयार करण्यासाठी कामगार शिक्षणाची मोहीम चालविण्याचा निर्धार केला.

**१३. संयुक्त ट्रेड युनियन काँग्रेस :**

आयटक, इंटक व हिंद मजदूर सभेत सहभागी न झालेल्या गटांनी एकत्र येऊन 'संयुक्त ट्रेड युनियन काँग्रेस' ही चौथी संघटना स्थापन केली. त्यात क्रांतिकारी समाजवादी पक्ष, भारतीय बोल्शेव्हिक पक्ष व इतर काही लहान राजकीय गट यांचा सहभाग होता. महाराष्ट्रातले पुढारी या संघटनेत जवळपास नव्हते. मृणालकांती घोष, जतीन चक्रवर्ती, श्रीकंठन नायर हे पुढारी या संघटनेच्या स्थापनेत अग्रभागी होते.

**१४. राष्ट्रीय गिरणी कामगार संघ :**

मुंबई इलाख्यातील काँग्रेसचे नेते शंकरराव देव यांनी अहमदाबादच्या मजूर महाजन संस्थेत चार पदवीधर तरुणांना कामगारांच्या संघटनात्मक कार्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठविले. गंगाधर आंबेकर, गोवर्धन मपारा, शं. गो. आठवले आणि कृष्णा खाडिलकर यांचा त्यात समावेश होता. या तरुणांनी १९३८ अखेर मुंबईत कामगार सेवक संघ स्थापन केला, व १९४० पासून या संघाचे नामांतर करण्यात येऊन 'राष्ट्रीय गिरणी कामगार संघ' ही नवी संघटना उदयाला आली. आंबेकर, आठवले या पुढाऱ्यांचा भर कामगारांचे प्रश्न संपापेक्षा लवादामार्फत सोडवण्यावर होता. आंबेकर यांनी कामगारांच्या बोनसचा प्रश्न औद्योगिक न्यायालयात दाखल केला. न्यायालयाने १९४६ साली अडीच महिन्यांच्या पगाराइतका म्हणजे २१.५ टक्के बोनस देण्याचा निर्णय दिला. १९४७ साली या रकमेत १ टक्क्याने वाढ करण्यात आली.

**१५. राष्ट्रीय मिल मजदूर संघ:**

मुंबईत १९४० साली शंकरराव देव यांच्या प्रेरणेने 'राष्ट्रीय गिरणी कामगार संघटना' स्थापन झाली होती. परंतु १९४५ साली मुंबई प्रांतिक काँग्रेसचे नेते स. का. पाटील यांनी 'बॉम्बे मिल मजदूर युनियन' ही स्वतंत्र संघटना स्थापन केली. एकाच शहरात काँग्रेसप्रणीत दोन संघटना नकोत म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांनी या दोन्ही संघटनांना एकत्र आणले व १९४७ साली दसऱ्याच्या मुहर्तावर 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ही संघटना स्थापन करण्यात आली.

**कामगार चळवळ आणि राजकारण :**

अर्थकारण आणि राजकारण यांचा अन्योन्य संबंध आहे. त्यामुळे ब्रिटन, जपान इत्यादी प्रगत औद्योगिक देशातील कामगार चळवळी राजकीय पक्षांशी जोडल्या गेल्या होत्या, असे दिसून येते. आपल्याकडे विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत कामगार संघटनाच अस्तित्वात नसल्याने हा प्रश्न उपस्थित झाला नव्हता. मात्र विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाअखेर कामगार चळवळ आणि राजकीय चळवळ यांचा परस्परसांधा जोडण्याचा प्रयत्न झाला. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये यासंदर्भात दोन प्रवाह होते. चित्तरंजन दास हे कामगार चळवळ आणि राजकीय चळवळ यांचा परस्परसंबंध घट्ट

करावा या विचाराचे होते. कामगार चळवळीचे नेतृत्व करणारे मद्रासचे श्री. बी. पी. वाडिया यांनीही याच मताचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते "कामगार चळवळ हा राष्ट्रीय चळवळीचा एक सलग भाग आहे. जर देशातील कामगारवर्गाला संघटित होण्याची व आपले अधिकार प्रस्थापित करून घेण्याची संधी दिली गेली नाही, तर राष्ट्रीय चळवळ लोकशाहीच्या रास्त मार्गाने पुढे जाऊ शकणार नाही. शेत-मजूर, मळ्यांतील कामगार, खाण कामगार, कारखान्यांतील कामगार वगैरे सर्व वर्गांच्या कामगारांच्या बाबतीत असे घडले नाही तर प्रत्यक्षात मॉंटेग्यू सुधारणांमुळेही परकी नोकरशाहीकडून देशी नोकरशाहीकडे सत्तेचे हस्तांतर होण्यापलीकडे काही होणार नाही. असे हस्तांतर म्हणजे काही लोकशाही नव्हे." (तुळपुळे, १९६३, पृ. १६)

लोकमान्य टिळक यांनी 'स्वदेशी'च्या मुद्यावरून कामगारांना राष्ट्रीय चळवळीशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. १९०७ च्या डिसेंबरात आणि १९०८ च्या जून महिन्यात त्यांनी मुंबईच्या चिंचपोकळी भागात औद्योगिक कामगारांच्या सभा घेऊन ही भूमिका विशद केली होती. परदेशी मालावर व दारूवर बहिष्कार घातल्यास देशी मालाची मागणी वाढेल; पर्यायाने एतद्देशीय कारखान्यातले काम वाढेल व त्याचा कामगारांना फायदा होईल, ही त्यांची भूमिका होती. मुंबईच्या गिरण्यांत मराठी माणसांचा टक्का वाढला पाहिजे, यावर टिळकांचा भर होता. मुंबईत कामगारभरती करणारे जॉबर्स हे पारशी किंवा गोरे इंग्रज होते, व ते कामगारभरती करताना मराठी माणसांच्या बाबतीत पक्षपात करतात, यावर टिळकांचा आक्षेप होता. हे जॉबर्स मराठी कामगारांना सापत्न भावाने वागवतात, त्यांच्या तक्रारींची हाताळणी मराठी कामगारांचे शोषण करणारी असते, इत्यादी मुद्यांवर टिळकांनी भर दिला होता. टिळकांना १९०८ साली जुलै महिन्यात अटक झाल्यावर मुंबईचे गिरणीकामगार रस्त्यावर उतरले होते. जॉबर्स आणि पोलीस अधिकारी हे कामगारांच्या नजरेत शत्रूपक्षात होते. टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ संप करणाऱ्या कामगारांना पोलिसांनी अमानुष वागणूक दिली. २२ जुलै १९०८ ला मुळजी जेठा मार्केटच्या कामगारांनी सहा दिवसांचा हरताळ पाळला. त्यांच्या पाठोपाठ मुंबईच्या ८५ पैकी ७८ गिरण्यातले कामगार संपात उतरले. सरकारने लष्कराला पाचारण केले, त्यात १६ जण ठार व ४३ जखमी झाले. थोडक्यात टिळकांमुळे कामगारसंघटना ह्या 'स्वदेशी' राजकारणाशी जोडल्या गेल्या. (Sarkar Sumit, 1989, p. 133 -134)

महात्मा गांधींची भूमिका मात्र टिळकांपेक्षा वेगळी होती. त्यांच्या मते कामगार व राजकारण ही दोन्ही क्षेत्रे भिन्न असून कामगार चळवळीला राजकारणापासून दूर ठेवले पाहिजे. अहमदाबादच्या 'मजूर-महाजन' या कामगारसंघाला राजकारणापासून अलिप्त ठेवण्याचा नमुनादर्श स्वत: गांधीजी घालून देऊ पाहत होते. रस्त्यावर येऊन प्रश्न सोडवण्यापेक्षा लवादाच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्याचा मार्ग अनुसरण्याचा त्यांनी सल्ला

दिला होता. असे असले तरी १९१९ च्या काँग्रेसच्या अमृतसर अधिवेशनात देशभर कामगार संघ स्थापन स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्याचे घोषित करण्यात आले होते. त्यानुसार लाला लजपतराय, चित्तरंजनदास व अनुसयाबेन साराभाई यांनी कामगार संघटना बांधणीला चालना द्यायला सुरुवात केली होती. व्ही. व्ही. गिरी. शिवराव, जोशी या कामगारांसाठी काम करणाऱ्या नेमस्त पुढाऱ्यांनाही कामगार चळवळीला राजकीय चळवळीशी जोडू नये असे वाटत होते. रशियन राज्यक्रांतीमुळे कम्युनिस्ट विचारसरणीने भारावलेले तरुण मात्र कामगार संघटना आणि राजकारण यांचा परस्पर अनुबंध असायलाच हवा अशी भूमिका घेऊ लागले होते. यात काँग्रेस चळवळीत सक्रिय असलेले तरुण श्रीपाद अमृत डांगे आघाडीवर होते. १९२१ साली एप्रिल महिन्यात डांगे यांनी 'गांधी व्हर्सेस लेनीन' नावाची पुस्तिका प्रसिद्ध करून या चर्चेला तोंड फोडले. ब्रिटिश शासनाच्या नाड्या आवळायच्या असतील तर संपाचे हत्यार उपसून औद्योगिक कामगारांना राजकीय चळवळीत ओढले पाहिजे, असा युक्तिवाद या पुस्तिकेतून पुढे आला. गांधीवाद आणि लेनीनवाद यातला फरक स्पष्ट करून डांगे यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करताना म्हटले होते की, "... the totality of Gandhi, with its obscurantist outlook on socio-economic matters, was not acceptable to us, though its revolutionary slogan of destroying the satanic British government inspired us... While our group decided to participate in all the mass revolutionary programmes of Mahatma Gandhi, we wanted to push the thing further through working class actions in Bombay, which alone could be the logical conclusion of our leaning towards Bolshevism and the lesson of Russian revolution." (Kalahari, 1971, p. 310) गांधीजींच्या चळवळीने साम्राज्यवाद्यांची वसाहतवादी सत्ता संपेलही, पण त्याजागी स्वकीय भांडवलदारांची सत्ता प्रस्थापित होण्याचा धोका आहे, अशी डांगे यांची धारणा होती. त्यामुळे कामगारांची व शेतकऱ्यांची सत्ता आणण्यासाठी झटले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

१७ ऑक्टोबर १९२० रोजी ताश्कंदला भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करणारे व जर्मनीत कम्युनिस्ट विचारसरणीच्या प्रचारासाठी गेलेले मानवेंद्रनाथ रॉय यांनी डांगे यांची 'गांधी व्हर्सेस लेनीन' ही पुस्तिका वाचली व 'व्हँगार्ड' साप्ताहिकातून तिचे परीक्षण लिहिले, सोशॅलिस्ट साप्ताहिकाचेही स्वागत केले. त्यावेळी हिंदुस्थानात काँग्रेसबरोबरच अन्य विचारधारांचेही गट कार्यरत होते. या स्थितीचा फायदा घेऊन समविचारी लोकांची परिषद भरवून साम्यवादी चळवळीचा गट संघटित करावा अशी रॉय यांनी डांगे यांना सूचना केली. [७] मात्र डांग्यांनी त्यावेळी रॉय यांच्या कम्युनिस्ट पक्षाचे

अनुयायी न होता राष्ट्रीय काँग्रेसच्या छत्राखालीच काम करण्याची भूमिका घेतली. डांग्यांना या भूमिकेला पाठबळ देणारे लालजी पेंडसे, त्र्यं. वि. पर्वते, शांताराम सावळाराम मिरजकर, वासुदेव हरी जोशी, सच्चिदानंद घाटे यांच्यासारखे सहकारी प्राप्त झाले. डांग्यांसकट हे सर्व सहकारी मुंबई प्रांतिक काँग्रेसचे सदस्य म्हणून निवडून आले होते.

५ ऑगस्ट १९२२ रोजी डांग्यांनी मुंबईच्या रणछोडदास लोटवाला या गुजराती धनिकाकडून अर्थसाह्य मिळवून "दि सोशॅलिस्ट' नावाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. या अंकाच्या माध्यमातून त्यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा प्रचार करायला सुरुवात केली. भांडवलशाहीचा अस्त करून धनोत्पादनाची साधने सार्वत्रिक मालकीची करणे या समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केल्याशिवाय आपले दारिद्र्य नष्ट होणार नाही, हा विचार बिंबविण्यावर या साप्ताहिकाचा भर होता. तसेच रशियन राज्यक्रांतीच्या अनुषंगाने लेनिनवाद आणि कामगारचळवळ यांचा परस्परानुबंध स्पष्ट करण्याचेही काम या साप्ताहिकातून साध्य होत होते. लेनिनवाद हे मार्क्सवादाचे विकसित रूप असून लेनिनवादातून कामगारक्रांतीचा सिद्धांत, कामगारांच्या हुकूमशाहीचे डावपेच अशा प्रकारची कामगार चळवळीला पोषक असणाऱ्या राजकीय विचारांची मांडणी केली जाऊ लागली होती. (स्टालिन, १९४४, पृ.३) १९२३ साली डांग्यानी व केशवराव जोगळेकर यांनी 'हिंदुस्थान लेबर सोशॅलिस्ट पार्टी' नावाचा पक्ष स्थापन केला. १९२४ साली हिंदुस्थान सरकारने कम्युनिस्ट चळवळीच्या सूत्रधारांच्या हालचालींवर पाळत ठेवून २७ फेब्रुवारी १९२४ रोजी कानपूर न्यायालयात डांग्यांसकट आठ कम्युनिस्ट कार्यकर्त्यांवर खटला भरला. १० नोव्हेंबरला खटल्याचा निकाल लागल्यावर डांगे, नलिनी गुप्ता व इतर कार्यकर्त्यांना चार वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यानंतरच्या काळात ग्रेट ब्रिटनच्या कम्युनिस्ट पक्षाने डोनाल्ड कॅम्पबेल व फिलिप स्प्रॅट यांना भारतात पाठवून कम्युनिस्टांची संघटना बांधण्याचे काम सोपविले.

दरम्यान कानपूरच्या चमनलाल उर्फ सत्यभक्त यांनी १२ ऑक्टोबर १९२५ रोजी 'पहिली भारतीय कम्युनिस्ट परिषद' नामक पुस्तिका प्रकाशित केली व डिसेंबरअखेर होणाऱ्या परिषदेत पक्ष स्थापन करण्याची योजना जाहीर केली. डिसेंबर १९२५ मध्ये कानपूरच्या काँग्रेस अधिवेशनात सिंगारवेलू यांच्या अध्यक्षतेखाली काही तरुणांची परिषद झाली. मात्र सिंगारवेलू यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कम्युनिस्ट पक्षाचे अनुयायी होण्याची कल्पना धुडकावून लावली. सत्यभक्त व जोगळेकर, घाटे, निंबकर यांनी मात्र कम्युनिस्ट पक्ष स्थापनेची बाजू धरली. कानपूर परिषदेतील या गोंधळानंतर एम. एन. रॉय यांनी १९२६ साली गुप्त रूपाने काम करणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रकट रूप म्हणून 'कामगार-शेतकरी पक्ष' स्थापन करण्याची योजना सुचविली. ब्रिटनहून आलेल्या फिलिप स्प्रॅट यांनी डांगे यांचे सहकारी सच्चिदानंद विष्णु घाटे यांच्याशी संधान साधून ८

फेब्रुवारी १९२७ रोजी मुंबईत 'कामकरी शेतकरी पक्ष' (Workers' and Peasants' Party) नावाची संघटना स्थापन केली. पक्षाचे प्रवक्ते म्हणून जोगळेकरांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

२४ मे १९२७ ला डांगे यांची तुरुंगातून सुटका झाली. स्प्रॅटने डांग्यांना पत्रे पाठवून लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखालील अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसपासून कामगार चळवळीला दूर नेण्यासाठी व्यूहरचना सुचविली. लाला लजपतराय यांना चमनलाल उर्फ सत्यभक्त यांचा अंतर्गत विरोध होता. तेव्हा मुंबईच्या कामगार पुढाऱ्यांनी चमनलाल यांची पाठराखण करावी, असा सल्ला स्प्रॅटने डांगे यांना दिला. (स्प्रॅट यांचे पत्र दि. १४-७-१९२७; मोटे, १९७२, पृ. ४४८) अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस काबीज करण्याचा साम्यवादांचा प्रयत्न होता. त्यानुसार कामकरी शेतकरी पक्षाचे प्रवक्ते जोगळेकर यांनी काँग्रेसने धनिकांच्या वर्चस्वातून सुटका करून जनमुक्ती आंदोलनाचा पुरस्कार करावा अशा आशयाचा ठराव अ. भा. काँग्रेस समितीला सादर केला. प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या स्वराज्यस्थापनेसाठी सविनय कायदेभंगाचा मार्ग अनुसरावा असेही ठरावात म्हटले होते. हा ठराव १९२७ च्या मद्रास अधिवेशनात विषय नियामक समितीसमोर जोगळेकरांनी मांडला व नेहरूंनी त्यास अनुमोदन दिले व खुल्या अधिवेशनातही हा ठराव मांडला.

कम्युनिस्ट विचारसरणीचा काँग्रेसच्या मंचावर अशा रितीने शिरकाव झाला.कम्युनिस्ट विचारसरणीच्या मुंबईच्या गिरणी कामगार युनियनला 'आयटक' या अखिल भारतीय कामगार संघटनेची संलग्नता देऊ नये अशा मताचा नेमस्तांचा एक गट होता. परंतु नेताजी सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू वगैरेंना कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीविषयी आत्मियता असल्याने १९२९ साली नागपूरला 'आयटक'च्या दहाव्या वार्षिक अधिवेशनात गिरणी कामगार युनियनला व जी. आय. पी. रेल्वेमेन्स युनियनला संलग्नता देण्यात आली.

मात्र साम्यवादी विचारधारेच्या कार्यकर्त्यांना 'आयटक'वर कब्जा मिळवायचा होता. 'आयटक'च्या याच अधिवेशनात 'राष्ट्रवादी' आणि 'साम्यवादी' विचारांच्या सदस्यांमध्ये टोकाचे मतभेद झाले व त्याची परिणती अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस दुभंगण्यात झाली. अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसने सरकारने 'पॅनपॅसिफिक ट्रेड युनियन सेक्रेटेरिएट' (साम्यवादी विचारधारेची कामगार संघटना) व 'लीग अगेन्स्ट इम्पिरिअलिस्ट्स्' (साम्राज्यवाद विरोधी संघ) या संघटनांशी संलग्न व्हावे; ब्रिटनमध्ये आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी लंडनच्या कामगार कल्याण संघाशी (वर्कर्स वेल्फेअर लीग) जोडून घ्यावे आणि सरकारने नेमलेल्या कामगारविषयक रॉयल कमिशनवर बहिष्कार घालावा असे प्रस्ताव पुढे केल्याने 'आयटक'च्या वार्षिक सभेत खडाजंगी झाली. ना. म. जोशी, व्ही.

व्ही. गिरी, दिवाण चमनलाल, शिवराव , जीनवाला या नेमस्तांनी साम्यवाद्यांच्या ठरावाला विरोध केला. नेमस्तांचा गट अल्पमतात गेल्याने त्यांनी 'इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन' नावाची स्वतंत्र संघटना स्थापन केली. कामगार चळवळीत पक्षीय राजकारण घुसल्याने सुरू झालेली फाटाफूट पुढच्या काळातही सुरूच राहिली.

१९३० साली म. गांधींच्या सत्याग्रह आंदोलनाला आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेच्या आदेशावरून अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसमधून विरोध सुरू झाला. महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू हे साम्राज्यवादाचे छुपे हस्तक असून साम्यवादी क्रांतीचे शत्रू असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे काँग्रेसमधील राष्ट्रवादी विचारधारेच्या सभासदांनी ट्रेड युनियनवाल्यांशी आपले संबंध तोडायला सुरुवात केली. मुंबईच्या गिरणी कामगार युनियनची सभासद संख्या इतक्या वेगाने घटली की वर्षभरात ती ५५ हजारांवरून ८०० वर येऊन थांबली. अखेर अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी१८ जुलै १९३१ रोजी कलकत्त्याला ट्रेड युनियनचे खास अधिवेशन घेऊन मास्को अथवा ॲमस्टरडॅमच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचे हुकूम भारतीय कामगारांनी पाळण्याचे कारण नाही, असे घोषित गेले. अखेर अल्पमतात गेलेले साम्यवादी संघटनेतून बाहेर पडले व त्यांनी 'लाल ट्रेड युनियन काँग्रेस' नावाची स्वतंत्र संघटना स्थापन केली. त्यांच्याबरोबर काही नाममात्र अपवाद सोडले तर इतर कोणतेही संघ संलग्न झाले नाहीत.

दरम्यान स्टॅलिनबरोबर मतभेद झाल्यामुळे १५ वर्षांपासून भारताबाहेर असलेले मानवेंद्रनाथ रॉय भारतात परत आले व डॉ. मेहमूद या नावाने मुंबईत कामगार संघटनांच्या बांधणीचे काम करू लागले. १९३१ साली मार्च महिन्यात सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनातही ते सहभागी झाले. मात्र गुप्तचरांना मिळालेल्या माहितीवरून रॉय यांना अटक होऊन कानपूर न्यायालयात त्यांच्यावर खटला भरण्यात आला. रॉय यांना शिक्षा ठोठावण्यात आल्यावर उषाताई डांगे, गणपत कांदळकर यांनी देशपांडे गटाच्या कारवायांमुळे रॉय पकडले गेल्याचा जाहीर आरोप केला. देशपांडे मास्तरांनी 'लढाऊ कामगार संघ' नावाची वेगळी संघटना स्थापन केली.

१९३१ साली जमनादास मेहता यांनी कामगार संघटनांनी एकत्र यावे यासाठी मुंबईत कामगार कार्यकर्त्यांची परिषद घेऊन एक ऐक्य समिती स्थापन केली. मानवेंद्रनाथ रॉय यांनीही एकीकरणाला पाठिंबा देण्यासाठी सैद्धांतिक मांडणी केली. १९३३ साली मतभेद विसरून कामगार संघटनांचे ऐक्य करण्याचा जोरदार प्रयत्न केला गेला. या प्रयत्नांतून व्ही. व्ही. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेली 'इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन', 'रेल्वे कामगार संघटना' व अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसशी संलग्न नसलेल्या

इतर काही संघटना यांनी एकत्र येऊन 'राष्ट्रीय ट्रेड युनियन फेडरेशन' नावाची नवी संस्था स्थापन केली.

अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसच्या कानपूर अधिवेशनात देश पातळीवरचा कामगार पक्ष स्थापन करण्याची कल्पना पुढे आली. ही कल्पना मूर्त करण्याची जबाबदारी महाराष्ट्रातल्या रामभाऊ रुईकर यांच्यावर सोपविण्यात आली होती. रुईकरांनी १९३४ साली जबलपूरला एक परिषद भरवून हा विषय पुढे नेण्याचा प्रयत्न केला; पण त्यात पुढे काहीच प्रगती झाली नाही. देशातले राजकीय वातावरण वर्गसंघर्षापेक्षा राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीने भारलेले असल्यामुळे कामगारांचा राजकीय पक्ष या कल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही. उलट याच काळात जयप्रकाश नारायण यांच्या काँग्रेस समाजवादी पक्षाने ट्रेड युनियन काँग्रेसबरोबर परस्पर सहकार्याचा करार करून कामगार चळवळीला बळ देण्याचा प्रयत्न केला. एम. एन. रॉय यांनी मात्र महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर युद्धकार्यात सरकारला मदत करण्याची भूमिका घेऊन १९४१ साली अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसचा त्याग केला व लाहोर येथे परिषद घेऊन 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या संघटनेची स्थापना केली. या भारतीय श्रमिक फेडरेशनला मध्यवर्ती सरकारकडून १३ हजार रुपयांचे मासिक अनुदानही मंजूर करण्यात आले. अर्थात रॉय यांच्या या भूमिकेला सर्वसाधारण कामगारवर्गाचा पाठिंबा मिळाला नाही; उलट त्यांची हेटाळणीच झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ साली फेब्रुवारी महिन्यात लंडनला दोस्त राष्ट्रांच्या कामगार संघटनांची परिषद झाली. या परिषदेत जागतिक ट्रेड युनियन फेडरेशन नावाची नवीन आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाली. त्यावेळी हिंदुस्थानातील राष्ट्रवादी व साम्यवादी विचारधारेच्या दोन्ही संघटना (अ. भा. ट्रेड युनियन व भारतीय श्रमिक फेडरेशन) वैचारिक मतभिन्नता बाजूला ठेवून आंतरराष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न झाल्या.

बेचाळीसच्या स्वातंत्र्यलढ्यानंतर राष्ट्रीय काँग्रेसने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली 'हिंदुस्थान मजदूर सेवक संघ' नावाची नवीन संघटना स्थापन केली. त्याच्या पुढच्या टप्प्यात १९४७ साली एप्रिल महिन्यात दिल्ली येथे सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस अर्थात 'इंटक' ही संस्था स्थापन झाली. सर्वोदयाचे वैचारिक अधिष्ठान, वर्गसंघर्षाऐवजी वर्गसहकार्यावर विश्वास, तंटे सोडविण्यासाठी स्वेच्छेच्या अथवा सक्तीच्या लवाद पद्धतीवर भर, अपरिहार्य असेल तरच संपाचा मार्ग आणि शासनाशी परस्पर सहकार्याची भूमिका हे इंटकचे धोरण ठरविण्यात आले. कापडउद्योग, खाणउद्योग, वाहतूक वगैरे सर्व क्षेत्रातल्या कामगारांना सामावून घेणारी एकजिनसी संघटना अशी या संघटनेची भूमिका होती.

साम्यवाद्यांच्या हट्टीपणामुळे 'आयटक' ही देशातली सर्वसमावेशक समजली जाणारी संघटना फुटली. राष्ट्रीय काँग्रेसवादी, समाजवादी,साम्यवादी आणि इतर विचारधारेचे

असे चार गट तयार झाले व प्रत्येक गटाची वेगळी संघटना तयार झाली. ना. म. जोशींसारख्या नेमस्त कार्यकर्त्यांनेही १९४८ साली 'आयटक'चा राजीनामा देणे पसंत केले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात या चार गटातील कामगारसंघटनांचे बलाबल पुढीलप्रमाणे होते :

| वर्ष | इंटक | हिंद-मजदूर सभा | अ. भा. ट्रेड युनियन | युनायटेड ट्रे. यु. काँ. |
|---|---|---|---|---|
| **१९४७ संघ** | २२७ | ----- | ६०१ | ----- |
| **सभासद** | ४,१२,१९३ | ----- | ७,९६,१७४ | ----- |
| **१९४८ संघ** | ४९८ | ----- | उपलब्ध नाहीत | ----- |
| **सभासद** | १०,३३,६१४ | ----- | | ----- |
| **१९४९ संघ** | ८४७ | ४१९ | ७५४ | २५४ |
| **सभासद** | १०,२८,११७ | ६,७९,२८७ | ७,४१,०३५ | ३,३१,९९१ |
| **१९५० संघ** | १०४३ | ४६० | ७२२ | ३०६ |
| **सभासद** | १४,३१,८७८ | ६,९८,७२० | ७,३०,६३६ | ३,६६,४०१ |

(स्त्रोत :तुळपुळे, १९६३, पृ. ६७) कामगार संघटनांचे यशापयश :

पाश्चिमात्य देशांतल्यासारख्या एकजिनसी कामगारसंघटना आपल्याकडे उभ्या राहू शकल्या नाहीत. याचे कारण आपल्या सांस्कृतिक परंपरेत कधीही व्यावसायिक संघटना स्थापन करण्याची पूर्वपरंपरा नव्हती. पाश्चिमात्य देशांत कारखानदारी सुरू होण्यापूर्वीसुद्धा सुतार, लोहार, चांभार या कारागिरांच्या व्यावसायिक संघटना होत्या. आपल्याकडे जातपंचायती होत्या; मात्र कारागिरांच्या व्यावसायिक प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या व्यवसाय-संघटना नव्हत्या. आपल्याकडे कारखानदारी सुरू झाल्यावर विसाव्या शतकात कामगार संघटनांचा उदय झाला, हे खरे असले तरी या संघटनांनी आपली कार्यसंस्कृती घडविण्यासाठी पुरेशी मेहनत घेतल्याचे दिसत नाही. कामगार संघटनांनी आपली आचारसंहिता, मालकवर्गाशी वाटाघाटी करण्याचे पद्धतिशास्त्र विकसित करण्यावर भर दिला नाही. टाळेबंदीसारख्या प्रसंगात कामगारांना आर्थिक साह्य करण्यासाठी स्थायी स्वरूपाची पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा दूरदर्शीपणा संघटनांनी दाखविला नाही. कामगार कल्याणासाठी शिक्षण, आरोग्य, विमा इत्यादी कल्याणकारी योजना राबविण्यावर पाहिजे तेवढा भर दिला नाही. सामुहिक निर्णयप्रक्रियेऐवजी पुढाऱ्यांच्या एकतर्फी आदेशांना प्रमाण मानण्याची पद्धती रूढ होत गेली. प्रत्यक्ष कामगार नसलेल्यांची लुडबूड व राजकीय पक्षांची विषयपत्रिका घेऊन कामगारसंघटनांचा साधनमूलक उपयोग करण्याच्या प्रवृत्ती यामुळेही कामगारसंघटनांची टिकाऊ कार्यसंस्कृती निर्माण होऊ शकली नाही. उदाहरणार्थ, १९४९ साली मे

महिन्यात मुंबईला अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसचे २३ वे अधिवेशन झाले, त्यात पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचेवर फॅसिस्ट, साम्राज्यवाद्यांचे हस्तक व कामगारांचे शत्रू असल्याची टीका करण्यात आली. अशा पक्षीय अभिनिवेशामुळे कामगार संघटनांचा नैतिक दरारा संपुष्टात आला. तसेच एकत्रित काम करण्यासाठी लागणारी कार्यसंस्कृती विकसित न झाल्याने भिन्न भिन्न व्यवसाय क्षेत्रांच्या शहर, प्रांत, पक्षनिरपेक्ष अशा फुटकळ कामगारसंघटना वाढल्या. एकजिनसी संघटनांची वाढ होऊ शकली नाही.

श्री. बगाराम तुळपुळे यांनी आपल्याकडे देशव्यापी एकजिनसी कामगारसंघटनांची बांधणी न होण्याची कारणमीमांसा करताना भाषिक अडसर हा मुख्य अडथळा असल्याचे म्हटले होते. त्यांनी म्हटले आहे की, "आपल्या देशात शिक्षणाच्या अभावापेक्षा भाषिक अडचण ही अधिक जाचक समजली पाहिजे. देशाचे शासन, सामाजिक व राजकीय प्रश्नांची चर्चा; कायदे, कोर्ट कचेऱ्यांचे कामकाज, सारेच एका भाषेतून आजवर चालत आले आहे की जिचा कामगारांना गंधही नसतो. त्यामुळे स्वत:च्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी त्यांना इंग्रजी जाणणाऱ्या लोकांची मदत घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. असे मदतनीस प्रत्यक्षात पुढारी बनणे हेही स्वाभाविकच होते. भाषेच्या अडचणीमुळे बुद्धिमान व साक्षर कामगारालाही प्रचलित प्रश्नांचा व विशेषत: कामगारविषयक प्रश्नांचा स्वत: अधिक अभ्यास करण्याच्या वाटा बंद होत्या. आपली गाऱ्हाणी मालकापुढे, सरकारपुढे प्रभावीपणे मांडणे, त्यावर पत्रव्यवहार करणे या गोष्टीही त्याला स्वत: करणे शक्य नव्हते."(तुळपुळे, १९६३, पृ. ३४) या परावलंबीत्वामुळे कामगारांचे नेतृत्व करायला बाहेरचे लोक पुढे आले व त्यांनी आपापल्या ध्येय-उद्देशांसाठी कामगार संघटनांचा साधनमूलक उपयोग करून घेतला.

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक उत्पादनातले सातत्य खंडित होऊ नये यावर सरकारचा भर होता. त्यामुळे सरकारचे सर्वसाधारण धोरण संपविरोधी राहिले. १९४७ साली डिसेंबर महिन्यात शासन, मालक व कामगारांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय परिषद घेऊन शासनाने 'औद्योगिक युद्धविरामा'ची घोषणा केली. यापुढे संप न करता परस्पर संवादातून व लवादामार्फत प्रश्न सोडवावेत अशी भूमिका घेण्यात आली. त्यादृष्टीने औद्योगिक विवाद कायद्यात कायदेशीर तरतूदी करण्यात आल्या. लवादाचे काम चालू असताना संप किंवा टाळेबंदी झाल्यास ती बेकायदेशीर ठरविण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली. शिवाय कारखान्यांनी कामगारांची हजेरी, रजा, शिस्त यासंबधी नियमावली करून त्यानुसार नोंदी ठेवणे बंधनकारक करण्यात आले. प्रत्येक कारखान्यात मालक व कामगार प्रतिनिधींचे तक्रारनिवारण मंडळ स्थापण्याची सूचना करण्यात आली. कामगारांच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी १९४९ साली लेबर अपिलेट ट्रायब्यूनल स्थापन करण्यात आले. त्यामुळे संपाचे प्रमाण कमी झाले. कामगार

संघटनांनाही श्रमिकांच्या शक्तिप्रदर्शनापेक्षा कायदेशीर बाजू तपासण्याला अधिक महत्त्व देणे क्रमप्राप्त झाले. या कायद्याच्या चौकटीमुळेही कामगार चळवळीचा लढाऊ बाणा कमकुवत होत गेला.

**कामगार कायदे :**

औद्योगिक कामगारांसाठी स्वतंत्र कायदे करण्याचा विचार १८७५ सालापासून सुरू झाला होता. १८८१ साली गिरणी कामगारांसाठी देशपातळीवर प्रथमच कायदा करण्यात आला. त्यात १८९१ व १९११ साली दुरुस्त्या झाल्या. या कायद्यामुळे यांत्रिक शक्तीवर चालणाऱ्या व ५० पेक्षा अधिक कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्यांसाठी कामगार कायद्याची संहिता लागू झाली. ९ वर्षांच्या खालील मुलांस कारखान्यात कामावर ठेवू नये, ९ ते १४ वर्षे वयोगटातल्या मुलांना सात तासापेक्षा अधिक काम देऊ नये आणि बायकांना ११ तासाहून अधिक काम देऊ नये असे नियम लागू झाले. १९०५ नंतर मुंबईच्या गिरण्यांत विजेचे दिवे आल्याने दिवस आणि रात्रपाळीचे काम सुरू झाले. त्यामुळे कामाचे तास व कामाच्या ठिकाणच्या सोयी-सुविधांविषयी कामगारांच्या तक्रारी सुरू झाल्या. १९०८ साली मध्यवर्ती सरकारने कमिशन नेमून कारखान्यातील कामगारांच्या स्थितीचा अभ्यास केला. कमिशनच्या शिफारशी लक्षात घेऊन १९१२ साली कामगार कायदा करण्यात आला. या कायद्यातल्या ठळक बाबी अशा होत्या -

१. मुलांच्या कामाच्या वेळा ६ तासापेक्षा अधिक असू नयेत.

२. प्रौढ माणसांचे कामाचे तास १२ तासांपेक्षा अधिक असू नयेत.

३. अपघातापासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधक योजना.

४. हवा, उजेड व स्वच्छतेची नियमावली.

५. कायद्याची अंमलबजावणी पाहण्यासाठी सरकारी तपासनीसाची नियुक्ती

पहिल्या महायुद्धानंतर वॉशिंग्टन येथे आंतरराष्ट्रीय कामगार परिषद झाली. या परिषदेने पारित केलेल्या ठरावांना अनुलक्षून १९२१ साली हिंदुस्थान सरकारने नवी कामगार संहिता लागू केली. हा नवा कायदा १९२२ पासून लागू झाला. २० पेक्षा अधिक मजूर असणाऱ्या यांत्रिक शक्तीचा वापर असणाऱ्या कारखान्यांना हा कायदा लागू करून कामगार कायद्याखाली येणाऱ्या कारखान्यांची व्याप्ती वाढविण्यात आली. यांत्रिक शक्तीचा वापर नसलेल्या व दहा माणसे काम करीत असलेल्या कारखान्यांनाही हा कायदा लागू करण्याचा हक्क सरकरने आपल्याकडे राखून ठेवला. नव्या कायद्यातल्या प्रमुख तरतूदी अशा होत्या-

(१) कारखान्यात कामावर ठेवायच्या मुलाची वयोमर्यादा: १२ वर्षे. मुलाच्या वयाच्या दाखल्याबद्दलचे नियम करण्यात आले व दाखल्याची तपासणी करण्याचे विशेषाधिकार तपासणी अधिकाऱ्यास देण्यात आले.

(२) १२ ते १५ वर्षे वयाच्या मुलांच्या कामाच्या वेळा: अर्ध वेळ. सहा तासापेक्षा अधिक वेळ व एकसारखे चार तासांहून अधिक काळ राबविणे बेकायदेशीर ठरविण्यात आले.

(३) प्रौढांच्या कामाच्या वेळा: दिवसाला कमाल ११ तास व आठवड्याला ६० तास. प्रांतिक सरकारने विशिष्ट धंद्यात आठवड्याचे ६० तासाहून अधिक काम करण्यास अनुमती दिल्यास वाढीव तासांबद्दल सव्वापट वेतन देण्यात यावे.

(४) बायका आणि पुरुषांच्या कामाच्या वेळेत तफावत असणार नाही.

(५) विश्रांतीची वेळ १ तास व सलग पाच तासाहून अधिक वेळ काम देऊ नये.

(६) इमारतीची सुरक्षितता, हवेतला कृत्रिम दमटपणाचा मजुरांना अपाय होणार नाही याची जबाबदारी कारखान्याच्या आस्थापनावर राहील.

(७) मजुरांच्या कार्यस्थळीच्या सेवा सुविधा तपासण्यासाठी तपासणीसांचा संच.

(८) कायदा मोडल्याबद्दल ५०० रुपयांपर्यंत दंडाची तरतूद. दंडाच्या जमा रकमेतून जरूर तेथे कामगारास नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था.

कामावर असताना झालेला अपघात मजूराच्या हलगर्जीपणामुळे झालेला नसल्यास मजुरास अगर त्याच्या नातेवाईकास नुकसानभरपाई देण्याचा स्वतंत्र कायदा १९२३ साली करण्यात आला. १९२३ साली खाणीतील कामगारांसाठीही वेगळा कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये १३ वर्षाखालील मुलास खाणीत काम करण्यास मनाई करण्यात आली. खाणीत जमिनीखाली काम करणाऱ्या प्रौढास आठवड्याचे ५४ तास आणि खाणीच्या वर काम करणाऱ्या प्रौढास आठवड्याचे ६० तास काम करण्याची मर्यादा घालण्यात आली. बायकांना जमिनीखालचे काम देता येणार नाही. कामावर असताना मजुरास इजा झाल्यास नुकसानभरपाई देण्याचा नियम करण्यात आला. मुंबई व मध्यप्रांताच्या प्रांतिक सरकारांनी काम करणाऱ्या महिलांना बाळंतपणाची पगारी सुटी मंजूर करण्याची तरतूद केली. १९२६ साली मध्यवर्ती सरकारने कामगार संघटना नोंदणीचाही कायदा केला. या कायद्यामुळे कामगारसंघांना कायदेशीर मान्यता प्राप्त झाली.

१९२९ साली पुन्हा एकदा नवे कमिशन नियुक्त करण्यात आले. कमिशनच्या पाहणीत कामगारांच्या दु:स्थितीच्या काही गोष्टी प्रकर्षाने नजरेत आल्या. लहान मुलांना न झेपणारे अवघड काम लादणे, प्रौढ मजुरांना विश्रांती न देता सलग १५ तासांपर्यंत कामाला लावणे, कामाच्या जागी घाण, अस्वच्छता असणे इत्यादी. ह्या परिस्थितीत बदल करण्यासाठी कमिशनने काही सूचना केल्या. कमिशनच्या सूचनेवरून सरकारने नव्या कायद्यात प्रौढांचे कामाचे तास दिवसाला ११ तासांवरून १० तास व आठवड्याला ६० तासांवरून ५४ तास करण्याचे बंधन घातले. शिवाय कारखान्याच्या आवारात शौचकूप, पाणी व खेळती हवा असण्याची अट घालण्यात यावी अशी सूचना केली. कामगारांना स्थानिक स्वराज्य संस्थांत व कायदेमंडळात प्रतिनिधित्व देण्याचीही आयोगाने शिफारस

केली होती. तसेच कामगार, मालक व शासन यांचे प्रातिनिधिक औद्योगिक मंडळ स्थापण्याचीही शिफारस होती. (Royal Commission on labour – Report, 1931, pp. 456-468)

१९२९ साली मध्यवर्ती सरकारने 'औद्योगिक विवाद कायदा' आणून सार्वजनिक उद्योगधंद्यात कोणतीही पूर्वसूचना न देता संप करण्यास वा मालकांना टाळेबंदी करण्यास मनाई केली. तसे झाल्यास तो गुन्हा ठरविण्याची तरतूद करण्यात आली. कामगार आणि मालक यांच्यातले तंटे सोडविण्यासाठी सरकारी हस्तक्षेपासही कायद्याने मान्यता देण्यात आली. १९३० साली भारतीय रेल्वे कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. १९३२ साली इतर भागातून मळ्यात कामासाठी आणलेल्या मजुरांविषयीचा कायदा झाला. १९३५ साली प्रांतिक स्वयत्ततेच्या तत्त्वावर प्रांतवार विधानसभा अस्तित्वात आल्या तेव्हा कामगारविषयक रॉयल कमिशनच्या शिफारशीनुसार विधानसभांत कामगारांना प्रतिनिधित्व देण्यात आले. मुंबई प्रांतात अहमदाबादच्या 'मजूर-महाजन' संघटनेत काम केलेले गुलझारीलाल नंदा यांच्याकडे मजूरखाते सोपविण्यात आले. १९३८ साली त्यांनी मुंबई प्रांतासाठी 'औद्योगिक विवाद कायदा' (बॉम्बे इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स् ॲक्ट) मंजूर करून घेतला. या कायद्यान्वये औद्योगिक न्यायालय स्थापन करण्यात आले. एकूण कामगारांच्या २५ टक्के सभासद असणाऱ्या कामगारसंघटनेला कायदेशीर दर्जा देण्याची तरतूद करण्यात आली. लवादामार्फत तंटा सोडविण्याची पद्धत, लेखी सूचनेशिवाय संपावर जाता येणार नाही किंवा मालकांना टाळेबंदी जाहीर करता येणार नाही, इत्यादी कामगार हिताच्या बाबी या नव्या कायद्यात अंतर्भूत होत्या. १९४६ साली मजूरमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी 'बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्ट १९४६' हा नवा कायदा लागू केला. मध्यप्रांत व संयुक्त प्रांतातही याच धर्तीवर कामगार कायदे पारित झाले. भारत सरकारनेही १९४७ साली औद्योगिक विवाद कायदा करून संपावर निर्बंध घातले व कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्तीच्या लवादाचा मार्ग चोखाळण्याची तरतूद केली.

**वेतन मंडळ :**

१९४६ साली मध्यवर्ती सरकारने 'वेतन मंडळ' (पे कमिशन) स्थापन केले. कामगारांचे प्रतिनिधी म्हणून ना. म. जोशी यांना वेतन मंडळाचे सभासदत्व देण्यात आले. वेतन मंडळाच्या शिफारशीनुसार सरकारी नोकरांचे किमान वेतन दरमहा रु. ३० ठरविण्यात आले. किमतीच्या प्रमाणात महागाई भत्त्याची शिफारस मात्र सरकारने मान्य केली नाही. १९४८ साली कारखान्यांसाठी 'किमान वेतन कायदा' आणि 'कामगार राज्य विमा कायदा' हे दोन कायदे करण्यात आले. विम्याच्या कायद्यामुळे कामगारांना आजारपण, अपघाताच्या प्रसंगात आर्थिक मदत मिळण्याचा कायदेशीर मार्ग प्रशस्त झाला. गोदी कामगारांसाठीही 'गोदी कामगार सेवा नियमन कायदा' लागू करण्यात

आला.१९४८ सालीच सरकारने अनुक्रमे यथायोग्य वेतन (फेअर वेज) आणि नफ्यात भागिदारी या प्रश्नांविषयी शिफारशी करण्याकरिता दोन समित्या नेमल्या. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने अवलंबिलेल्या या सकारात्मक नीतीचा परिणाम होऊन कामगारांच्या संघटनात्मक चळवळींची आक्रमकता कमी होत गेली.

## ४.७. साखर उद्योग :

भारतात १९३० पर्यंत साखर उद्योगाला चालना मिळालेली नव्हती. मॉरिशसहून 'मोरस' साखर आयात केली जात असे. शेतकरी ऊसापासून गूळ तयार करीत; पण गूळ करणे शेतकऱ्यांना परवडत नसे. गूळ ही लवकर नष्ट होणारी वस्तू असल्याने ती फार काळ साठवून ठेवता येत नसे. साठवलेला गूळ सडला तर होणारे नुकसान शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारे असे. त्यामुळे गुऱ्हाळातला गूळ लगेच बाजारात मिळेल त्या भावाला विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल असे. १९२९ साली तर २५ शेराच्या भेलीला एक आणाही मिळेना. व्यापारी गूळ घेईना. शेतातला उभा ऊस जळाला. (साधू, २०१४, पृ. १०३) हे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्रात साखर कारखाने सुरू करण्याची गरज होती. १९३० सालापर्यंत संपूर्ण भारतातही साखरेचे केवळ ३० कारखाने होते. मुंबई इलाख्यात १९१९ साली युरोपियन लोकांनी अहमदनगर जिल्ह्यात हरेगाव-बेलापूर (श्रीरामपूर) येथे 'ब्रॅण्डी' अर्थात 'दि बेलापूर शुगर ॲण्ड अलाइड इंडस्ट्रीज' हा पहिला साखर कारखाना स्थापन केला होता. या कारखान्याने ९९ वर्षांच्या कराराने भाड्याने जमीन संपादित केली होती. एकरी ४५ रुपये पाणी-पट्टी भरावी लागत असे. अर्थात पहिली दहा वर्षे या कारखान्यातून फारसे उत्पादन झाले नाही. ४० लाखांच्या भांडवल गुंतवणूकीपैकी २० लाख बुडीत खात्यात गेल्याने कारखान्याला उर्जितावस्था प्राप्त झाली नाही. याच सुमाराला १९१८ साली आर. एन. हिरेमठ आणि जी. एन. सहस्त्रबुद्धे यांनी पुणे जिल्ह्यात बारामतीस 'दि निरा व्हॅली को. ऑ. शुगर फॅक्टरी' स्थापन केली होती, मात्र १९२४ साली ती बंद पडली.

१९३२ साली बा. सी. कामत यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने साखर उद्योग विकसित करण्याची शिफारस केली होती. त्याच वर्षी साखर उद्योगाला १५ वर्षे संरक्षण देणारे विधेयक मंजूर झाले. त्यामुळे साखर उद्योगाला चालना मिळाली. १९३५ पर्यंत संपूर्ण भारतात १३० साखर कारखाने निघाले व १० लक्ष टनांहून अधिक साखरेचे उत्पादन झाले. ऊसाच्या लागवडीचे क्षेत्र ३४ लाख एकरावरून ४६ लाखापर्यंत विस्तारले. मुंबई इलाख्यात फलटण, कोल्हापूर, रावळगाव, बेलवंडी,वालचंदनगर, टिळकनगर, माळीनगर इत्यादी ठिकाणी १२ साखर कारखाने सुरू झाले. माळीनगर जि. सोलापूर येथील हणमंतराव गिरमे, हरिभाऊ गिरमे, नारायणराव बोरावके, मारुतीराव पांढरे, शंकरराव कुडाळे इत्यादी माळी समाजातील प्रगतीशील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन

१७ नोव्हेंबर १९३२ रोजी 'दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.' ही कंपनी स्थापन करून साखर कारखाना सुरू केला. लंडनहून साडेतीन लाखांची यंत्रसामुग्री मागविली. भागीदार शेतकऱ्यांच्या जमिनीवर ऊस लागवड केली, शासनाकडून भाड्याने पाणी पुरवठा मिळवला व प्रारंभकाळातच दररोज २५० मे. टन साखरेचे गाळप सुरू केले.१९५० पर्यंत या साखरेची गाळपक्षमता एक हजार टनापर्यंत पोहचली. ऑक्टोबर १९३२ मध्ये कोल्हापूरला 'दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.' हा खाजगी साखर कारखाना सुरू झाला. १९३३ साली वालचंद हिराचंद दोशी यांनी नाशिक जिल्ह्यात 'रावळगाव शुगर फॉर्म लि.' हा साखर व गोळ्या तयार करण्याचा कारखाना काढला. १९३३ साली लोकमान्य टिळकांचे अनुयायी बाबासाहेब तथा महादेव डहाणूकर यांनी 'दि महाराष्ट्र शुगर मिल्स लि.' नावाने पुणे जिल्ह्यात टिळकनगर येथे साखर कारखाना काढला. १९३४ साली सोलापूर जिल्ह्यातील श्रीपूर येथे 'दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.' हा साखर कारखाना सुरू झाला. त्यानंतर पाठोपाठ १९३५ साली पुणे जिल्ह्यात वालचंद हिराचंद यांनी 'वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.' हा साखर कारखाना सुरू केला. गांधीजींच्या 'स्वदेशी' व 'सत्याग्रहा'च्या चळवळीने भारावलेले अहमदनगर जिल्ह्यातील साखरेचे व्यापारी के. जे. सोमय्या यांनी साखरेच्या व्यापारात नफा कमावल्यानंतर स्वत:च साखर निर्मिती करण्याचे ठरविले. त्यानुसार स्वित्झर्लंडहून यंत्रसामुग्री मागवून त्यांनी १९३९ साली साखरवाडीला 'दि गोदावरी शुगर मिल्स लि.' आणि १९४१ साली लक्ष्मीवाडीला 'सोमय्या शुगर फॅक्टरी' असे दोन साखर कारखाने काढले. गोदावरी साखर कारखान्याने पहिल्याच वर्षी दररोज ४०० टन साखर गाळप करण्याचा विक्रम केला.

१९३७ साली मे महिन्यात एका आंतरराष्ट्रीय करारान्वये भारताने ब्रह्मदेशाखेरीज अन्य कोणत्याही देशाला साखर निर्यात न करण्याचे धोरण ठरविले. त्यामुळे साखरेच्या किंमती उतरल्या व साखर उद्योगाला झळ बसली. या पार्श्वभूमीवर 'शुगर सिंडिकेट' स्थापन करून साखर उद्योग सावरण्यात आला. सरकारने कारखानदारांना साखरसंघाचे सभासदत्व सक्तीचे केले. बाजारात साखर किती आणायची ते सरकार ठरवू लागले. १९४२ सालीही महायुद्धामुळे साखर उद्योगावर नियंत्रण घालण्यात आले. त्यामुळे उत्पादन घटले. १९४७ साली डिसेंबर महिन्यात नियंत्रण उठवण्यात आले; साखरसंघाने नफा मिळवण्यासाठी साखरेचे भाव वाढविले. या भाववाढीमुळे साखर ग्राहकांची ओरड सुरू झाली. सरकारने १९४९ साली सप्टेंबर महिन्यात पुन्हा साखरेवर नियंत्रण आणले. साखर कारखान्यांना ऊस पुरविण्यापेक्षा गूळ व खांडसरी साखरेचे उत्पादन वाढविण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. याच वेळी मुंबई राज्यात दारूबंदी जाहीर झाल्याने बेकायदा दारू करणाऱ्यांची गुळाला मागणी वाढली. १९५० साली सरकारने गुळावरही नियंत्रण आणले. मात्र तरीही साखरेचे उत्पादन वाढले नाही. १९५० नंतर मात्र

साखर उद्योग असंरक्षित ठेवण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. (वैद्य, पृ. २७-२९)

१९५० पर्यंत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या भांडवलातून एकही सहकारी साखर कारखाना सुरू झाला नव्हता. यापूर्वी नगर जिल्ह्यात हरेगाव येथे सुरू झालेल्या 'ब्रॅण्डी' या विदेशी कंपनीच्या खाजगी साखर कारखान्यासाठी १९३० पासून १९५० पर्यंतच्या २० वर्षांत नगर, नाशिक, पुणे, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील ८५ हजार एकर जमीन पाटपाण्याच्या हक्कासह या उद्योगसमूहाच्या हवाली करण्यात आली होती. शेतकऱ्यांची या उद्योगसमूहाकडून होणारी नागवणूक लक्षात घेऊन १९४५ साली बेलापूरच्या बागायतादर परिषदेत विठ्ठलराव विखे पाटील यांनी धनंजयराव गाडगीळ यांच्यासमोर शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना असावा अशी नवी संकल्पना मांडली. धनंजयराव गाडगीळ यांनी ही कल्पना उचलून धरली व विखे पाटलांना शेतकऱ्यांकडून भागभांडवल उभे करण्याची जबाबदारी सोपविली. विखे पाटलांना शेतकऱ्यांकडून भांडवल गोळा करताना बराच त्रास झाला, तरी त्यांनी दोन लाखांचे भाग भांडवल जमा केले. दरम्यान २८ ऑगस्ट १९४७ रोजी भारत सरकारच्या वतीने मुंबई राज्यासाठी दोन नवे साखर कारखाने देण्यात येणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. विठ्ठलराव विखे पाटलांनी विहित नमुन्यात साखर कारखाना मिळावा म्हणून अर्ज केला. १४ डिसेंबर १९४८ रोजी भारत सरकारने लोणी सोसायटीचा सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी केलेला अर्ज स्वीकारला. २७ एप्रिल १९४९ रोजी धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली व विठ्ठलराव विखे पाटील उपाध्यक्ष असलेले बोर्ड सरकारने जाहीर केले. लोणीजवळ भुताचा माळ म्हणून ओळखली जाणारी ३७ एकर ४ गुंठे जमीन एकरी २५० रु. भावाने खरेदी करण्यात आली. २ ऑक्टोबर १९४९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी साखर कारखान्याचे राष्ट्रीय महत्त्व शेतकरी सभासदांना समजावून सांगितले. ५०० रु. समभावाने २५ लाखांचे शेअरभांडवल उभे करण्याचे आव्हान कसे पेलायचे यावर चर्चा झाली. सुरुवातीला ५०० टन गाळपक्षमता असणारी यंत्रसामुग्री घेण्याचे ठरविण्यात आले. सप्टेंबर १९५० ही कारखाना सुरू करण्याची मुदत होती. मात्र तोपर्यंत केवळ ७,६०,००० रु. इतकेच भांडवल जमा झाले होते व ते जुनी मशिनरी घेण्यासही पुरणारे नव्हते. अखेर गाडगीळांनी इंडस्ट्रीयल फायनान्स कार्पोरेशनशी बोलणी करून वीस लाखांचे कर्ज मंजूर करवून घेतले व नवी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली. २६ नोव्हेंबर १९५० रोजी बॉयलर पेटला व ३१ डिसेंबर १९५० रोजी पहाटे प्रत्यक्ष साखर उत्पादन सुरू झाले. अर्धा ते एक एकरवाल्या शेतकऱ्याच्या समभागाने सुरु झालेला भारतातला पहिला सहकारी साखर कारखाना मूर्त स्वरूपात साकार झाला व येथून पुढे महाराष्ट्रातल्या सहकारी साखर उद्योगाला नवी चालना मिळाली. (साधू अरुण, २०१४, पृ. १५०-१९२).

## ४.८. उद्योगसमुहांची कामगिरी :

विसाव्या शतकात वसाहतवादी राजवटीचा प्रतिवाद करणाऱ्या राजकीय चळवळीइतकाच भारताच्या आर्थिक पुनर्घटनेसाठी विचारमंथन घडवून आणण्यात पुढाकार घेणाऱ्या उद्योगपतींचा एक गट क्रियाशील होता. या उद्योगपतींनी राष्ट्रीय विकासाची नीती ठरविण्यासाठी देशाच्या भविष्यकालीन आर्थिक विकासाचे पथदर्शक आराखडेही तयार केले होते. त्यात 'बॉम्बे प्लॅन' या नावाने ओळखला जाणारा एक आराखडा आणि सर मोक्षगुंडम् विश्वेशरय्या या तंत्रज्ञाचा दुसरा आराखडा यांचा समावेश होतो. 'बॉम्बे प्लॅन' हा आराखडा तयार करण्यात जे. आर. डी. टाटा, घनश्याम बिर्ला, पुरुषोत्तमदास ठाकुरदास, सर श्री राम आणि कस्तुरभाई लल्लुभाई यांचा पुढाकार होता. 'A Plan of Economic Development for India' असे या आराखड्याचे शीर्षक होते. मुंबई-अहमदाबादच्या कापड उद्योगांचा तसेच ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांचा या दोन शहरांबाहेर विस्तार करण्याची योजना या आराखड्यात सुचविण्यात आली होती. हे उद्योगधंदे वाढविण्यासाठी शासनाने औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या भौतिक साधनस्त्रोतांची उपलब्धी करून द्यावी, भारतीय उद्योगांमध्ये परदेशी भांडवलाची गुंतवणूक वाढविण्यासाठी लागणाऱ्या वैधानिक सवलती द्याव्यात व पोलाद-प्रकल्पासारख्या बहुभांडवली उद्योगांमध्ये शासनाने भांडवल गुंतवावे अशी अपेक्षा होती. अर्थात यासाठी शासनावर प्रभाव टाकण्याची कामगिरी काँग्रेसने उचलावी असेही सुचविण्यात आले होते. दारिद्र्याच्या समस्येवर मात करण्यासाठी औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असा या उद्योगपतींनी काँग्रेसला सल्ला दिला होता.

दुसरा विकास आराखडा सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरया या अभियंत्याने तयार केला होता. शेती व ग्रामोद्योगांच्या संदर्भात यापूर्वी त्याचा उल्लेख झाला आहे. नियोजनबद्ध आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाच्या संकल्पनेवर विश्वेश्वरयांचा भर होता. व्यापार आणि उद्योगधंदे हे आपोआप विकसित होत नसतात, त्यासाठी शासन आणि खाजगी उद्योजक यांच्यातल्या भिंती दूर सारून त्यांची परस्परांशी सांगड जमली पाहिजे, असे विश्वेश्वरयांना सुचवायचे होते. अर्थात त्यासाठी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा आराखडा तयार असला पाहिजे व तो करण्यासाठी अर्थतज्ज्ञ, उद्योजक, शासकीय व राजकीय प्रतिनिधींनी एकत्र येऊन काम केले पाहिजे असा व्यवहारवादी दृष्टिकोण त्यांनी या आराखड्यातून मांडला होता. पहिल्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थान सरकारला औद्योगिक विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलण्याची गरज भासल्याने १९१६ साली औद्योगिक आयोग स्थापन करण्यात आला. पाठोपाठ १९२१ साली वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. भारतीय उद्योगांना संरक्षण पुरविणारे धोरण पुरस्कृत करण्यात आले.

आपल्या देशातल्या उद्योगपतींनी राष्ट्रीय विकासाची बांधिलकी पत्करून तयार केलेल्या आराखड्यावर आणि इंग्रज सरकारच्या औद्योगिक धोरणावर प्रत्यक्षात काँग्रेस व अन्य राजकीय नेत्यांनी किती गांभीर्याने विचार केला हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे; मात्र या उद्योगपतींनी राष्ट्रीय बांधिलकीतून भारताच्या आर्थिक जीवनात स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न केले त्याचा आता मागोवा घ्यावयाचा आहे .

### १. टाटा उद्योगसमूह :

मुंबईची उत्पादकशक्ती विकसित करण्यासाठी जलविद्युतशक्तीचा वापर करण्याची कल्पना जमशेठजी टाटा यांच्या मनात होती. त्यापूर्वी १८७५ साली नागपूरची एम्प्रेस मिल स्थापन करताना तिथे नर्मदा नदीच्या धबधब्यातून जलविद्युत तयार करून वापर करता येईल का, याची शक्यता त्यांनी अजमावून पाहिली होती; परंतु त्यावेळी ती कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. जगातल्या जलविद्युत प्रकल्पांची त्यांनी माहिती घेतली होती. गोव्याच्या दूधसागर धबधब्यातून जलविद्युत निर्माण करून मुंबई इलाख्यात वापरण्याचीही त्यांची कल्पना होती. परंतु पोर्तुगीज सरकारमुळे ती प्रत्यक्षात येऊ शकली नाही. पुढे जमशेटजींनी पश्चिमघाट वीज प्रकल्पाचा आराखडा तयार केला. लोणावळ्याला भरपूर पाऊस पडत असल्याने पाण्याचे स्त्रोत उपलब्ध होते. तिथे धरण बांधून पाणीसाठा करायचा. ते पाणी मोठमोठ्या पाईपातून वाहून नेऊन १८०० फूट खोल दरीत कोसळेल असा कृत्रिम धबधबा बांधायचा व खोपोली येथे विजनिर्मितीसंच बसवायचा अशी ती योजना होती. १० मे १९०१ रोजी जमशेटजी टाटा यांनी रिचमंड रिची यांना पत्र लिहून या योजनेचा तपशील कळवला. टाटांनी पत्रात लिहिले होते की, "मला असे वाटते की,या प्रकल्पातील विजेवर मुंबईतील ट्राम्स चालविता येतील, मुंबईत हवे तेवढे विजेचे दिवे उजळतील आणि तरीही उरलेली वीज काही कापडगिरण्या व स्थानिक छोटे उद्योग यांना पुरेशी होईल." (लाला,२००७, पृ. १६४) २४ डिसेंबर १९०२ रोजी भारतमंत्री हॅमिल्टन यांनाही त्यांनी असेच तपशीलवार टिपण पाठविले. त्यात त्यांनी या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज ५९ हजार अश्वशक्तीपर्यंत निर्माण होऊ शकते असा विश्वास व्यक्त केला होता.

१९०४ साली जमशेटजी टाटांच्या निधनानंतर दोराबजी टाटा यांनी जलविद्युतनिर्मिती प्रकल्प विकसित करण्याची योजना पुढे नेली. त्यानुसार १९१० साली त्यांनी हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी स्थापन केली. सार्वजनिक बांधकाम खात्यातले निवृत्त अभियंता आर. बी. जॉयनर यांनी धरणे व जलवाहिन्या (डक्ट) यांचे आरेखन केले. १९११ साली फेब्रुवारी महिन्यात लोणावळ्यास मंबईचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम यांच्या हस्ते वळवण धरणाची पायाभरणी करण्यात आली. जर्मनीहून आणलेल्या पाइपलाइन्स, स्वित्सर्झलंडहून आणलेली जलचक्रे, अमेरिकन विद्युतजनित्रे,

इंग्लंडहून आणलेल्या केबल्स यांचा वापर करण्यात आला. कुठलीही गळती होणार नाही याची दक्षता घेऊन ७ फूट व्यासाचे प्रचंड पाईप खडकाळ जागेवर बसविण्यात आले. १९१३ साली लोणावळा व वळवण ही धरणे बांधून झाली. १९१५ साली मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्ते मुंबईस वीजपुरवठा करण्याचा समारंभ पार पडला. बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय व ट्रामवेज (बेस्ट) कंपनी आणि मुंबईच्या ३५ टक्के गिरण्यांत वीजपुरवठा सुरू झाला.

त्यानंतर लगेच १९१६ साली दोराबजी टाटांनी लोणावळ्याच्या उत्तरेस आंदर खोऱ्यात जलविद्युत निर्मिती करण्यासाठी 'आंदर व्हॅली सप्लाय कंपनी' स्थापन केली. १९१९ साली मुळशी धरणाची योजना आखली. धरणातील पाणी कुलाबा जिल्ह्यातील माणगाव तालुक्याच्या बिरवाडी वीज केंद्रात नेण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना होती. दरम्यान १९१६ साली हिंदुस्थान सरकारने टी. एच्. हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली 'औद्योगिक आयोग' स्थापन केला. पं. मदनमोहन मालवीय व दोराबजी टाटा हे आयोगाचे सदस्य होते. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी ऊर्जानिर्मितीची गरज असल्याने जलविद्युत प्रकल्प उभारण्याची आयोगाने शिफारस केली. १९१८ साली भारतीय पातळीवर जलविद्युत सर्वेक्षण करण्यात आले व १९२१ साली या सर्वेक्षणाचा त्रिखंडीय अहवाल प्रसिद्ध झाला. टाटांना जलविद्युत प्रकल्प उभारणीसाठी शासनाच्या या सकारात्मक धोरणाचा लाभ झाला. टाटांच्या दोन्ही प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या.

**मुळशी प्रकल्प :**

तिसरा जलविद्युत प्रकल्प पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यातील निळा व मुळा नद्यांच्या संगमावर धरण बांधण्याचा होता. धरणातील पाणी मोठ्या नळांवाटे बिरवाडी वीजकेंद्रात नेण्याची योजना होती. या प्रकल्पामुळे मुळशी पेट्यातील ५४ गावांच्या जमिनी बुडणार होत्या. १९१९ च्या जूनमध्ये सरकारने भूसंपादन कायद्याखाली मुळशी पेट्यातील मावळ्यांना (शेतकऱ्यांना) नोटिसा बजावल्या. मात्र मावळ्यांनी सरकारला जमिनी देण्याचे नाकारले. धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या जाहीर सभा झाल्या, त्यांनी संघटित होऊन आपले मंडळ स्थापन केले. मंडळाचे चिटणीस धनाढ्य सावकार अप्पासाहेब गद्रे व गुप्ते यांनी खेडला जाऊन पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. मात्र धरणग्रस्तांना पर्यायी जागा देण्यास सरकारचा विरोध होता.

१५ डिसेंबर १९२० ला केसरीचे संपादक तात्यासाहेब न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मुळशीला जाहीर सभा झाली. केळकरांनी डिसेंबर अखेर नागपूरला भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनातही हा प्रश्न उपस्थित केला. केळकरांचा ठराव कॉंग्रेसने मंजूर केला. त्यानंतर मुळशी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले गेले. आवळस गावातले शाळामास्तर

गोखले, दत्तू साठे, शंकर रानडे यांनी मावळ्यांनी सत्याग्रहास प्रवृत्त व्हावे म्हणून जनजागरण केले. केसरी व मराठा वृत्तपत्रांनी टाटांच्या प्रकल्पावर जोरदार टीका केली. टाटांनी या टीकेला उत्तर देताना प्रकल्पाचे समर्थन केले. धरणाच्या पाण्याखाली फक्त साठ चौरस मैल क्षेत्र येणार असून त्यातल्या ७५ टक्के जमिनी सावकारांकडे गहाण आहेत, असा युक्तिवाद केला. जिल्हाधिकाऱ्यांनी पाण्याखाली बुडणाऱ्या जमिनींच्या बदली शक्य तिथे पर्यायी जमिनी दिल्या जातील वा नुकसानभरपाई दिली जाईल असे आश्वासन दिले. टाटांनी धरणाचे काम सुरू केल्यावर जमिनीचे भाडेही द्यायला सुरुवात केली. सरकार ठरवेल त्यापेक्षा एक टक्का जास्त नुकसानभरपाई देण्याचे टाटांनी कायदेमंडळाला आश्वासन दिले. परंतु नुकसानभरपाई दिली तरी घ्यावयाची नाही व जमीन वाचविण्याकरिता सत्याग्रह करायचा शेतकऱ्यांनी निर्धार केला. विनायकराव भुस्कुटे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. डोंगरवाटा तुडवीत त्यांनी मावळच्या शेतकऱ्यांशी संपर्क साधला. सावकारांकडे किती जमिनी आहेत याचा तपशील मिळवला व सत्याग्रहासाठी जनजागृती केली. १२ एप्रिल १९२१ ला सत्याग्रहाची नोटीस देण्यात आली. शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न धसास लावण्यासाठी सेनापती बापट मुंबईतल्या ज्ञानकोश कार्यालयातील नोकरीचा राजीनामा देऊन १५ एप्रिल १९२१ रोजी मुळशीला दाखल झाले. १६ एप्रिल १९२१ ला रामनवमीच्या मुहूर्तावर सत्याग्रहाला सुरुवात झाली.धरणाचे काम बंद पाडण्यात सत्याग्रही यशस्वी झाले. कॅमेरॉन नावाच्या टाटा कंपनीच्या अधिकाऱ्याबरोबर २८ एप्रिलला करार करण्यात येऊन ७ नोव्हेंबरपर्यंत धरणाचे काम स्थगित ठेवण्यात आले. मुळशीपासून ५ मैलांवरच्या शेरे गावच्या रस्त्यावर टाटा कंपनीचे मजूर रेल्वेचे रूळ टाकू लागताच सेनापती बापटांनी १९ मे रोजी सत्याग्रह करण्याची नोटीस दिली. (भुस्कुटे, १९९९, पृ. तेवीस) मुळशी सत्याग्रहाच्या टप्प्याटप्प्याने चार फेऱ्या झाल्या. बारा दिवसांच्या सत्याग्रहाची पहिली फेरी १६ एप्रिल १९२१ला झाली. दुसरी फेरी १ मे १९२२ रोजी, तिसरी फेरी २ सप्टेंबर १९२२ पासून आणि चौथी फेरी १ एप्रिल १९२३ पासून सुरू झाली. ६ डिसेंबर १९२४ ला सत्याग्रहाच्या चळवळीची सांगता झाली.

महाराष्ट्राच्या आर्थिक-राजकीय इतिहासात मुळशी सत्याग्रहाने सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाची व कार्यपद्धतीची मूलभूत चर्चा झाली. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न सरकार आणि कंपनीने कसे हाताळावेत याचे अनेक पैलू या सत्याग्रहातून पुढे आले -

(१) जमशेटजी टाटांकडे दीर्घकालीन विकासाचा वास्तवदर्शी आराखडा करण्यासाठी लागणारी भविषवेधी दृष्टी होती; राज्याच्या सक्रिय पाठिंब्याशिवाय असे दीर्घकालीन प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत याचे भान होते. त्यादृष्टीने पश्चिमघाट जलविद्युतप्रकल्पाची संकल्पना मांडून त्यांनी सरकारचा पाठिंबा मिळवला होता.

दोराबजी टाटांनीही त्याच बांधिलकीतून प्रकल्प पुढे नेला. मात्र मुळशी प्रकल्पात त्यांना शेतकऱ्यांच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. राज्याच्या आर्थिक विकासासाठी अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची उपयुक्तता कालांतराने सिद्ध झाली असली, तरी प्रत्यक्ष प्रकल्प सुरू करताना समाजात सकारात्मक वातावरण तयार करणे, लोकांच्या मानसिकतेत वृत्तीबदल घडवून आणणे याकरिता अशा योजनांचे महत्त्व पटवून देणारी मोहीम चालविण्याची गरज होती. लोकांच्या मनातील नव्या योजनेविषयीचे संशयाचे पटल दूर सारण्यासाठी लोकजागृतीची चळवळ चालविणे हेही तितकेच महत्त्वाचे असते; त्याशिवाय इष्ट ते स्वीकारून पुढे जाण्याची मानसिकता समाजात तयार होत नाही; अन्यथा महत्त्वाकांक्षी प्रकल्प रखडतात, याचा अनुभव या प्रकल्पातून आधोरेखित झाला.

(२) नव्या प्रकल्पांविषयी लोकशिक्षणाची भूमिका जबाबदारीने पार पाडण्याऐवजी अहिंसक मार्गाने सत्याग्रह करणाऱ्या सत्याग्रहींच्या विरोधात सरकार आणि मालकवर्गाकडून सरळ सरळ हिंसात्मक मार्ग अवलंबिले गेले, त्यामुळे सत्याग्रह चिघळत गेला. सरकारने कंपनीची एकतर्फी पाठराखण केली. कंपनीचे गोरे रखवालदार शेतकऱ्यांना शेतात जायला मना करीत. दमदाटी, मारहाण करीत. गोळी घालून ठार करण्याची धमकी देत. स्वयंसेवकांनी पायासाठी खणलेल्या चरात बैठक मारली, तेव्हा त्यांच्यावर गरम पाण्याचे फवारे मारण्यात आले. सत्याग्रही स्त्रियांसमोर टाटा कंपनीचे नोकर नागवे होऊन नाचले, त्यांचे केस ओढले, पदर ओढले. मारहाणीमुळे सत्याग्रही बेशुद्ध पडले, पण सरकारी अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केला नाही. १०८०७ एकर जमिनीपैकी पाच हजार एकर जमीन कुठलीही जबरदस्ती न करता कंपनीने संपादित केल्याचे शासनाकडून समर्थन करण्यात आले. पर्यायी जमिनी पुणे जिल्ह्यात उपलब्ध नसल्याचे सांगून नशिक जिल्ह्यात दिंडोरी भागातल्या जमिनी देऊ हा शेतकऱ्यांना न मानवणारा पर्याय पुढे करण्यात आला. नुकसानभरपाईचे दर बाजारभावापेक्षा कितीतरी कमी दराने ठरविण्यात आले.

(३) टाटांच्या मजुरांनी सत्याग्रहींची दिशाभूल करण्यासाठी शाहू महाराज, सत्यशोधक चळवळ या बहुजन समाजाच्या चळवळींच्या नावाचा दुरुपयोग करून मावळ्यांचा बुद्धिभेद केला. शाहू महाराजांच्या नावाचा जयजयकार करीत त्यांनी सत्याग्रहींना मारहाण केली. सत्यशोधकी तमाशाच्या माध्यमाचा उपयोग करून सत्याग्रही नेत्यांच्या ब्राह्मणी काव्याला न भुलता नुकसानभरपाईची रक्कम किंवा पर्यायी जमिनी स्वीकारा असा भ्रममूलक संदेश पोचविला. या प्रचाराला बळी पडून काही शेतकऱ्यांनी नुकसानभरपाई स्वीकारली व सत्याग्रहींच्या एकजुटीला छेद दिला.

(४) कंपनीने शेतकऱ्यांना सरकार किंवा न्यायालय ठरवेल त्यापेक्षा एक टक्का वाढीव नुकसानभरपाई द्यायची तयारी दाखविली. आंबेमोहर तांदूळ पिकविणाऱ्या

शेतमालकांना १५%, साळीचे पीक घेणाऱ्यांना २०% व घरासारखी मालमत्ता पाण्याखाली जात असेल तर २५% बोनस देण्याचे जाहीर केले. नुकसानभरपाई देऊन मोठ्या प्रकल्पाचे काम पुढे नेण्याची टाटांची मानसिकता होती, असे त्यावरून दिसते.

(५) सत्याग्रहाची म. गांधींची संकल्पना आणि सेनापती बापट यांची संकल्पना यात खूप मोठे अंतर होते. शेतकरी आपखुशीने जमिनी देत नाहीत तोपर्यंत टाटांनी जमिनी ताब्यात घेऊ नयेत असे गांधीजींचे मत होते. तसेच 'अहिंसात्मक सत्याग्रह' ही गांधीजींची संकल्पना होती. बापटांनी सत्याग्रहाचे तीन प्रकार सांगितले :

(अ ) समसत्याग्रह: गांधीजींना अभिप्रेत असलेला सत्याग्रह

(आ) शुद्ध सत्याग्रह: श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे समसत्याग्रहास दाद न दिल्यास देहदंड किंवा मालमत्तेचे नुकसान करणे.

(इ ) प्रागतिक शुद्ध सत्याग्रह: प्रतिपक्षाच्या माणसांना देहान्त दंड देणे.

अहिंसा आग्रहाचा अतिरेक अधर्मरूप आहे, अशी सेनापती बापटांची धारणा होती. त्यामुळे महाराष्ट्रातील दहा हजार माणसे तुरुंगात जाईपर्यंत अथवा सरकारकडून शंभर माणसे मारली जाईपर्यंत सत्याग्रह सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी केला व सत्याग्रहात प्राणाहुती देण्यास तयार असलेल्या ३६ जणांच्या सह्यांचे निवेदन प्रसिद्ध केले. ११ जून १९२२ रोजी मुळशी प्रश्नावर विचार करण्यासाठी डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत मुंज्यांनी बापटांच्या भूमिकेचे समर्थन करताना म्हटले की, "टाटा कंपनीचे साह्यार्थ सरकार स्वत:चे सशस्त्र लष्कर व पोलिस यासमवेत रणांगणात येऊन ठाकेपर्यंत महाराष्ट्रीयनांनी हा सामना अव्याहत चालू ठेवला पाहिजे. ख्रिस्ताप्रमाणे सनातनी हिंदूंच्या किंवा मुसलमानांच्या धर्मशास्त्रांत एका गालावर थप्पड मारल्यास दुसरा गाल पुढे करावा असे बंधन घातलेले नाही. न्याय्य संरक्षणासाठी केलेला अत्याचार आमचे धर्मशास्त्र त्याज्य ठरवित नाही. उलटपक्षी हक्क, सत्य आणि न्याय यांच्या संरक्षणार्थ प्रयत्न करणारा जो अत्याचार पाहून परावृत्त होतो त्याला धर्मशास्त्राप्रमाणे दंड सांगितला आहे." (फडके य. दि.,१९९१, पृ. ७८-८२)

(६) सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नावर स्थानिक लोकांच्या सत्याग्रही मंडळाला जनमताचा पाठिंबा लागतो. वृत्तपत्रांनी लोकमत जागृती आणि सरकारला सत्य पक्षाची बाजू पटविण्यासाठी पुढाकार घेतल्यास समस्येची प्रातिनिधिक मांडणी व्हायला मदत होते. 'केसरी' व 'मराठा' पत्रांनी याबाबतीत वृत्तपत्राच्या सामाजिक बांधिलकीची भूमिका यथार्थपणे पार पाडली. रँग्लर परांजप्यांनी मुंबईच्या कायदेमंडळात बिनसरकारी ठराव मांडून शेतकऱ्यांना टाटा कंपनीचे भागधारक करून घेण्याचा प्रस्ताव ठेवला. अर्थात तो फेटाळण्यात आला असला तरी न्यायाचे पर्याय पुढे आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचा तो एक नमुना होता. १९२० साली जुन्नर व सोलापूर येथे

भरलेल्या मुंबई प्रांताच्या परिषदेत मावळ्यांना पाठिंबा देणारे ठराव पारित झाले. सार्वजनिक व्यासपीठांनी जनतेच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी सतर्कता दाखविण्याचा हा उत्तम नमुना होता.

सत्याग्रह काळात धरण अर्धेअधिक बांधून झाले होते, १२०० मावळ्यांनी नुकसानभरपाई घेतली होती, त्यामुळे ध्येय, तत्त्व बाजूला ठेवून सत्याग्रह मागे घेण्याचा गांधीजींना सल्ला दिला व त्यानुसार २४ एप्रिल १९२४ रोजी सत्याग्रह मंडळ बरखास्त करण्यात आले. सेनापती बापट वर्षभराचा तुरुंगवास भोगून बाहेर आल्यावर ६ डिसेंबर १९२४ रोजी 'मुळशीचा पूर्णविराम' या नावाचे पत्रक प्रसिद्ध करून हा विषय संपल्याचे जाहीर केले. मुळशी धरण पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला.

**२. वालचंद उद्योगसमूह :**

आर्थिक स्वातंत्र्य ही राजकीय स्वातंत्र्याची पहिली पायरी आहे, या विचारसरणीचे पुरस्कर्ते असलेले सोलापूरचे वालचंद हिराचंद आणि त्यांचे बंधू गुलाबचंद, रतनचंद आणि लालचंद यांनी 'वालचंद उद्योगसमूह' स्थापन करून विमाने, मोटारी, जहाजे या वहातुकीच्या साधनांचे निर्मिती प्रकल्प उभारले. वास्तविक अशा प्रकारच्या उच्च यांत्रिक कौशल्यांच्या उत्पादनांची कुठलीच पूर्वपरंपरा वालचंद शेठ यांच्या घराण्यात नव्हती. आजोबा नेमचंद दोशी यांचा फलटणला पिढिजाद सराफीचा व्यवसाय होता. वडिल हिराचंद सोलापूरच्या कापडगिरणीत अडत्याचे काम करीत. कुटुंबातले दोन थोरले बंधू प्लेगच्या साथीत वारल्याने वालचंद शेठ यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर फाटक या मित्रासोबत कंत्राटी कामे मिळवून व्यवसायात पदार्पण केले. १९०५ ते १९२२ या काळात 'फाटक-वालचंद कंपनी'ने रेल्वेरूळ टाकण्याचे व बांधकामाची अनेक कंत्राटे मिळवली. १९०४ साली 'बार्शी रेल्वे लाईन' व १९०५ साली मुंबईत बोरीबंदर, कुर्ला, ठाणे, कल्याण इथे रेल्वे-रूळ टाकले. दरम्यान १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले. या युद्धजन्य परिस्थितीत १९२० पर्यंत नवी कामे निघत होती. वालचंद शेठनी लष्कराची कामे मिळवली. देवळाली, अरणगाव, बेळगाव, खडकी या ठिकाणची कंत्राटे मिळवली. सैनिकांसाठी बराकी बांधल्या, खडकीला दारूगोळ्याचे कोठार बांधले. बांधकामासाठी लागणारे ओतकामसुद्धा आपणच करावे, या हेतूने त्यांनी १,६०,०७० रुपयांस मुंबईची 'नेपियर फाउंड्री' ही ओतशाला विकत घेतली.तसेच मुंबई महानगरपालिका, पोर्ट ट्रस्टची बांधकामे करून गुणवत्तेची प्रतीती देऊन व्यवसायात नावलौकिक मिळवला. त्यानंतर भांडवल बाजारात समभागांची विक्री करून त्यांनी व्यवसायाचा विस्तार केला.

१९१६ साली ब्रिटिश सरकारने आर्थिक, औद्योगिक क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्यासाठी एक 'औद्योगिक समिती' नेमली होती. १९१८ साली या समितीचा अहवाल

आला. या अहवालातील शिफारशींनुसार मुंबईत समुद्र हटवून नव्या इमारती बांधण्याची व मुंबई शहराची पुनर्रचना करण्याची योजना १९२० साली मुंबईच्या कौन्सिलपुढे मांडण्यात आली. ह्या योजनेला अनुलक्षून पाच सहयोगी कंपन्यांचा उद्योगसमूह असलेली 'टाटा कन्स्ट्रक्शन कंपनी' स्थापन झाली. 'वालचंद कन्स्ट्रक्शन कंपनी'ही त्यात वर्ग करण्यात आली. वालचंद शेठ या कंपनीचे संचालक झाले. १९२१ ते १९२९ या काळात त्यांनी या कंपनीसाठी अनेक महत्त्वाची कामे मिळवली व ती यशस्वीपणे पूर्ण केली. तानसा ते मुंबई ५५ मैल लांबीची नळयोजना, बोरघाटातील रेल्वेमार्गाच्या विस्ताराचे काम या कंपन्यांनी केले व जवळपास ३०,००० कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला. १९३५ च्या क्वेट्ट्याच्या धरणीकंपानंतर १९३६ साली सरकारी इमारती बांधण्याचे कंत्राट मिळवून त्यांनी आपल्या कंपनीचा उत्तम काम करण्याचा वकूब सिद्ध केला. मध्य भारतात जबलपूरजवळ मोहपाणी येथे त्यांनी कोळसा उद्योगात गुंतवणूक केली. तिथे आधी रेल्वेची कोळसा खाण होती; पण या खाणीवर काम करायला मजूर मिळत नव्हते. वालचंदशेठनी त्यामागची कारणे जाणून घेतली. या खाणीच्या परिसरात पिठाची चक्की व जळणासाठी लाकूडफाटा उपलब्ध नव्हता. त्यामुळे तिथे येऊन राहायला कोणी तयार नसे. वालचंद शेठनी या परिसरात दोन पिठगिरण्या काढल्या, आणि शेजारच्या दानिया संस्थानातून जळणाची व्यवस्था करून दिली. त्यामुळे खाणीत कामाला माणसे मिळू लागली व खाण-उद्योग भरभराटीला आला.

१९२५ साली वालचंदभाईंनी जमशेटपूरला ह्यूम पाईपचा कारखाना काढला. १९३१ साली रतनचंद हिराचंद यांना या कंपनीचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक नेमून त्यांच्याकडे कंपनीच्या विस्ताराची जबाबदारी सोपवली. रतनभाईंनी भारताबाहेर ब्रह्मदेश, सिलोन, लिबिया या देशांमध्ये इंडियन ह्यूम पाईपचे कारखाने काढून हा उद्योग सीमापार नेला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४१ साली हिटलरच्या सैन्याने ग्रीस काबीज करून आफ्रिकेच्या ट्रिपोली बंदरात प्रवेश केला तेव्हा जनरल वॅव्हेल याने हिंदुस्थान सरकारमार्फत आफ्रिकेत ३०० मैल लांबीची तेलपुरवठा करणारी नळावली घालण्यासाठी तातडीने नळ तयार करून मिळतील काय म्हणून चौकशी केली होती. ह्यूम पाइपला चालून आलेली ही संधी वालचंद शेठने सोडली नाही. अभियंत्यांनी वर्ष-सव्वा वर्षात नळमागणी पूर्ण करता येईल असे सांगितले तेव्हा, वालचंद शेठ अभियंत्यास म्हणाले, " हिटलर तुमच्याकरता तोपर्यंत थांबणार आहे का? चार महिन्यात नळ तयार करून देऊ, सरकारला फार तर सहा महिन्यांची मुदत सांगा." वालचंद शेठनी रोज अडीच मैल लांबीचा नळमार्ग तयार करण्यास पुरे होतील इतके नळ तयार करण्याची योजना यशस्वीपणे कार्यान्वित केली व ह्यूम कंपनीचा नफा वाढविला. (खानोलकर गं. दे. १९६५, पृ. ५५७) १९५४ पर्यंत ह्यूम कंपनीचे ५४ कारखाने होते आणि त्यात १६५

अभियंते काम करीत होते. तिरुपती देवस्थान, नागपूरची पाणी योजना, म्हैसूरचा गिरसप्पा धबधबा इथे ह्यूम कंपनीचेच पाईप वापरण्यात आले. (रतनचंद हिराचंद, १९९०, पृ. १३०-१३१) सिमेंट-कॉंक्रिटच्या पाइपाबरोबरच १९३१ नंतर पोलादी पाईप, १९३८ पासून दाबनळ (पेनस्टॉक) तयार केले जाऊ लागले. कोयना, शरावती, जोग, मोयार या वीज निर्मिती केंद्रांना पेनस्टॉकचा पुरवठा करण्यात आला. मोठ्या शहरातल्या पाणीपुरवठ्यासाठी प्रिस्ट्रेड कॉंक्रिटचे पाईप तयार करणारा कारखाना सुरू केला. नळांबरोबरच विजेच्या तारांचे दळणवळण वाढविण्यासाठी लागणारे लोखंडी पाईप, चौक्या, दिव्याचे खांब, तारेचे खांब, सेप्टिक टँक वगैरे पूरक वस्तूंचेही उत्पादन करून देशी मालाची बाजारपेठ विस्तारित केली.

१९२६ साली व्यावसायिक गरज लक्षात घेऊन वालचंद शेठ यांनी भारत, ब्रह्मदेश व सिलोन येथील कामांसाठी 'हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन' आणि सिंध व वायव्य सरहद्देकडील कामांसाठी 'ऑल इंडिया कन्स्ट्रक्शन' अशा दोन पूरक कंपन्या काढल्या. नर्मदा, इरावती, मेघना, कृष्णा व गोदावरी नद्यांवरील मोठमोठे पूल, वैतरणा नदीवरील धरण अशी यांत्रिक कौशल्याची बांधकामे करून, तसेच क्वेट्टा भागातील भूकंपानंतरच्या पुनर्वसनाचे साडेआठ कोटी रुपयांचे काम तीन वर्षांत पूर्ण करून त्यांनी आपला लौकिक वाढवला.

कृषिकेंद्री अर्थव्यवस्थेला औद्योगिकीकरणाची जोड देऊन महाराष्ट्राची उत्पादनक्षमता वाढविण्याचा पद्धतशीर प्रयोग वालचंद उद्योगसमुहाने केला. न्या. रानडे यांनी म्हटले होते की, 'औद्योगिक कंपनीचे सुपरिणाम जर सर्व राष्ट्रावर प्रकर्षाने व्हावयास पाहिजे असतील तर प्रथम शेतीच्या धंद्यात पुनर्घटना व सुधारणा व्हावयास पाहिजे." (खानोलकर, १९६५, पृ.१३०) न्या. रानडे यांच्या या विचारांना अनुसरून वालचंद शेठनी शेतीचे औद्योगिकीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेतला. १९२० साली प्रांतिक सरकारे अस्तित्वात आली होती. १९२१ साली मुंबई इलाख्याचे कृषी मंत्री सर चुनीलाल यांचे इंडियन मर्चंटस चेंबर्समध्ये व्याख्यान झाले. त्यात व्यापारी वर्गाने शेतीव्यवसायासाठी काम करण्याकरिता पुढे आले पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले होते. वालचंद शेठनी हे सूत्र पकडून शेतीव्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी नव्या योजना अमलात आणण्याचा ध्यास घेतला. आधुनिक तंत्राने शेती करण्यासाठी जमिनीचा मोठा सलग गट मिळविण्याचा शोध सुरू झाला. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील रावळगाव येथे २४० एकर सरकारी जमीन विकत घेण्याचे ठरविले. दहा रुपये दराने ही जमीन संपादित केली. शिवाय भोवतालच्या ९ गावातील ४० वर्षांपासून पडीत असलेली ३०० एकर सावकारांकडे गहाण पडलेली जमीन विकत अथवा भाडे पट्ट्याने घेतली. पाच ट्रॅक्टर खरेदी करून शेती करायला सुरुवात केली. दरम्यान १९२६ साली सरकारने नेमलेल्या शेती आयोगाचा अहवाल १९२८ साली प्रसिद्ध झाला व

त्यातील शिफारशीनुसार १९२९ साली शेती संशोधन संस्था स्थापन झाली. ब्रिटिश सरकारने १९२९ साली वालचंद शेठ यांची शेती संशोधन संस्थेच्या प्रशासकीय मंडळावर नेमणूक करून त्यांच्या शेतीकेंद्री उद्योजकतेचा सन्मान केला. यावेळी वालचंद शेठना १९०३ साली टिळकांनी केसरीत लिहिलेल्या एका लेखाचे स्मरण झाले. टिळकांनी जावा, मॉरिशसच्या साखरेवर आपण का अवलंबून रहावे असा प्रश्न उपस्थित केला होता. वालचंद शेठनी मग शेतकी संशोधन संस्थेच्या बैठकीत साखर उद्योगाच्या चौकशीसाठी एक समिती नेमून घेतली. १९३२ साली साखर उद्योगाला संरक्षण देणारा कायदा संमत झाला. या पूर्वतयारीनंतर त्यांनी रावळगाव येथे ६०७ हेक्टर व इंदापूर तालुक्यात कळंब येथे ३६ हेक्टर जमिनीत ऊसाची लागवड केली. ऑस्ट्रेलियात क्वीन्सलँड येथे साखर कारखाने पाहून येण्यासाठी मगनलाल शहा या अभियंत्यास पाठविले व "रावळगाव शुगर फार्म लिमिटेड' व 'वालचंदनगर साखर कारखाना' सुरू केला. १९४० च्या सुमारास रावळगावला साखर कारखान्याच्या जोडीने खडीसाखर, चॉकलेट-गोळ्यांचे उत्पादन सुरू केले. इंदापूर तालुक्यात वालचंदनगरला साखरेच्या मळीपासून मेण व अल्कोहल, ऊसाच्या चिपाडापासून कार्डबोर्ड व कागद असे दुय्यम उद्योग सुरू केले. शिवाय गुलाबचंद हिराचंद यांनी तेथे वनस्पती तूप व साबण तयार करण्याचा कारखाना काढला. रावळगावला शेती अवजारे बनविण्यासाठी एक पूरक असा छोटा कारखानाही काढला. या कारखान्यात तयार होणारे 'कोंगल्या औत' त्या काळात विशेष प्रसिद्ध होते. १९३६ साली महाराष्ट्रातील साखर-उद्योगाच्या प्रगतीसाठी त्यांनी 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्टस् असोशिएशन' स्थापन केली. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वत: वालचंद शेठच होते. ऊसाचे एकरी उत्पादन वाढविण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पीक स्पर्धा घेण्याचा उपक्रम सुरू केला. जगातला उच्चांक एकरी १२९ टनांचा होता; भारतात ८०-८५ टन उत्पादन होई. या स्पर्धेत कळंबच्या स्पर्धकाने एकरी १०४ टन ऊस घेऊन पहिला क्रमांक पटकावला. महाराष्ट्रात ऊसाचे एकरी उत्पादन वाढविण्यासाठी या स्पर्धेचा फार मोठा उपयोग झाला. साखर कारखान्यांची गाळपक्षमता वाढविण्यासाठीही अशी स्पर्धा घेण्याचा उपक्रम सुरू केला. शेतापासून कारखान्यापर्यंत ऊस वाहून नेण्यासाठी रावळगाव आणि वालचंदनगरला रेल्वेलाईनचे जाळे पसरवून शेतीच्या आधुनिकीकरणातला एक अनोखा प्रयोगही वालचंद उद्योगसमूहाने केला. ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांना शेती उद्योगातला लाभांश वाढविण्यासाठी वालचंदशेठ नित्य नवे पथदर्शक प्रयोग करीत. रताळ्यापासून खळ तयार करता येईल असे वाटल्याने कळंब येथे रताळ्याची लागवड केली. १९४१ साली डॉ. बर्न्स यांचा सोयाबीनवरचा लेख वाचनात आल्यावर लष्करी जवानांसाठी पोषक आहारात सोयाबीनचा वापर करता येईल या कल्पनेने त्यांनी पाच हजार एकर क्षेत्रात सोयाबीनची लागवड करून त्यापासून तयार

केलेले खाद्यपदार्थ लष्कराला पुरवण्याची तयारी दाखविली होती; परंतु ब्रिटिश शासनाने ही योजना नाकारल्याने त्यात पुढे जाता आले नाही. मुंबई शहराला दूध, फळे, भाजीपाल्याचा पुरवठा करण्यासाठी सरकारला योजना सादर करून कल्याण-बदलापूर परिसरात ७५० एकर जमिनीत भाजीपाल्याची लागवड केली. अहमदाबादहून ५०० म्हशी आणून दुग्धशाळा सुरू केली. काही काळानंतर सरकार व मुंबई नगरपरिषदेकडून हवे ते सहकार्य मिळू न शकल्याने हे प्रकल्प बंद करावे लागले. विकासाचे मार्ग शोधणाऱ्या प्रतिभावान उद्योजकाला सरकारी पाठबळ नसेल तर कशी माघार घ्यावी लागते, याचा अनुभव वालचंद शेठ यांच्याही वाट्याला अधूनमधून येत राहिला.

संधी आणि लक्ष्मी याकडे कधीही पाठ फिरवू नये, हे तत्त्व वालचंदभाईंनी आपल्या उद्योग-व्यवसायाची वाढ करताना कायम लक्षात ठेवले होते. पहिल्या महायुद्धात हॉस्पिटल म्हणून वापरात असलेले 'लॉयल्टी' नामक जहाज विक्रीला निघाल्यावर वालचंदभाईंनी ते पंचवीस लाखाला विकत घेतले; त्यावर दहा लाखांचा खर्च करून त्याचे प्रवासी जहाजात रूपांतर केले. हिंदुस्थानात आतापर्यंत मक्तेदारी असलेल्या जर्मन, ब्रिटिश जहाज कंपन्यांना मागे सारून भारतीय मालकीची यशस्वी प्रवासी जहाज कंपनी म्हणून आपली नाममुद्रा प्रस्थापित केली. २७ मार्च १९१९ रोजी नरोत्तम मोरारजी यांच्या सहकार्याने 'सिंदिया स्टिम नॅव्हिगेशन कंपनी' स्थापन केली. त्यानंतर लगोलग ५ एप्रिल १९१९ रोजी लॉयल्टीने मुंबई बंदर सोडले व या भारतीय जहाजाने भारत-इंग्लंड दरम्यान दळणवळण सुरू करण्याचा पहिला मान पटकावला. (रतन हिराचंद, १९९०, पृ. ७०-७१) १९२६ साली बडोदे संस्थानाने बांधलेल्या ओखा या नव्या बंदराचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन झाले; त्या बंदरात प्रवेश करणारी पहिली मोठी आगबोट सिंदिया कंपनीची होती. १९२७ पासून सिंदिया कंपनीने आपल्या बोटींवर हिंदी युवकांना प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित केली. १९२९ च्या नोव्हेंबरात नरोत्तम मोरारजी यांचे खंडाळा येथे अपघातात निधन झाले. या आपत्तीनंतर सिंदियाचे अध्यक्षपद वालचंद शेठ यांच्याकडे आले. आतापर्यंत जहाज उद्योगात ब्रिटिशांची मक्तेदारी होती. देशी उद्योजकांसाठी हे क्षेत्र अद्याप परिचयाचे नव्हते. वालचंद शेठ यांनी हॉलंडला जाऊन जहाजबांधणी कारखान्यांचा अभ्यास केला. १९३० साली भारतीय जहाजव्यापाऱ्यांची संघटना स्थापन केली आणि वेळोवेळी सरकारशी वाटाघाटी करून देशी जहाज उद्योगवाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले. भांडवलशाहीच्या जिवघेण्या स्पर्धेत मोडीत निघू पाहणाऱ्या देशी आगबोट कंपन्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छोट्या कंपन्यांना किनाऱ्यावर ठराविक मालाची वहातूक करण्यासाठी ८५ टक्के भाग मिळावा म्हणून झालेला 'भोर निवाडा' हा वालचंद शेठ यांच्या प्रयत्नातून झाला होता. मक्का-मदिना यात्रेची मक्तेदारी 'मोगललाइन' या ब्रिटिश कंपनीकडे होती; वालचंद शेठ

यांनी हज यात्रेकरूंची वाहतुक सिंदिया कंपनीकरवी सुरू करण्यात यश मिळवले व १९३७ च्या डिसेंबरात कलकत्त्याहून 'इंग्लिस्तान' बोट व जानेवारी १९३८ मध्ये मुंबईहून 'अल मदिना' बोट हाज यात्रेसाठी रवाना झाल्या. मोगल लाइनने तिकिटाचा दर त्या दिवशी १७२ रुपयांवरून २० रुपयांवर आणला. बॅ. जिना यांनी या वहतुकदराच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हाज वाहतुकीसाठी मुसलमानांच्या सहयोगातून स्वतंत्र आगबोट कंपनी सुरू करण्याची सूचना केली. मोगल लाइनच्या या गैरप्रकाराची दखल घेऊन सरदार पटेल सिंदिया कंपनीच्या मागे उभे राहिले. सरकारी हस्तक्षेपाने ११५ रुपये दर ठरवून घेऊन सिंदिया कंपनीने त्यातून मार्ग काढला. १९३५ च्या घटनात्मक तरतूदीनुसार देशी-विदेशी कंपन्यांत भेदभाव न करण्याचे धोरण जाहीर झाले होते. ब्रिटिश कंपन्यांनी मात्र चलाखी करून काही हिंदी उद्योगपतींना संचालक मंडळात स्थान देऊन आपल्या नावापुढे 'इंडिया लिमिटेड' असे शब्द जोडून पोटकंपन्या काढल्या व या देशी कंपन्या असल्याचा आभास निर्माण केला. वेगवेगळ्या सवलतींचा फायदा अप्रत्यक्षपणे ब्रिटिश कंपन्यांनीच लाटायला सुरुवात केली. वालचंद शेठनी वर्ध्याला म. गांधींची भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्यापुढे मांडला. ज्याचे नियंत्रण, संचालन, व्यवस्थापन पूर्णत: हिंदी अधिकाऱ्याकडे आहे, तीच कंपनी स्वदेशी मानावी असा आपला अभिप्राय गांधीजींनी दिला. त्यानुसार काँग्रेसने ठराव केला. महादेवभाई देसाई यांनी 'हरिजन'मध्ये लेख लिहून ही बाजू मांडली व गांधीजींच्या व्याख्येनुसार केवळ आठ जहाज कंपन्या स्वदेशी ठरतात, ही गोष्ट सरकारच्या व जनतेच्या निदर्शनास आणली. अखेर या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी लवाद मंडळ नेमण्याचा प्रस्ताव पुढे आला. मात्र त्यातही विदेशी कंपन्यांचे बहुमत असणार हे लक्षात घेऊन वालचंद शेठने हे दर-युद्ध थांबविण्यासाठी 'बॉम्बे स्टीम'च्या हिंदी भागधारकांना त्यांचे शेअर्स सिंदिया कंपनीस विकण्याचा सल्ला दिला व १९३९ साली बॉम्बे स्टीमची मॅनेजिंग एजन्सी सिंदिया कंपनी राहील असा ठराव मंजूर होऊन कोकण किनाऱ्यावरच्या या दर युद्धाला विराम मिळाला. १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत नौका बांधणी उद्योगात अग्रेसर असलेल्या भारतात ब्रिटिशांनी जहाज बांधणी उद्योग संपुष्टात आणला याचे शल्य वालचंद शेठना बोचत होते. अखेर २१ जून १९४१ रोजी विशाखापट्टण येथे नौकाबांधणी उद्योग सुरू करून वालचंद शेठनी जहाज उद्योगात आणखी एका नव्या पर्वाची मुहर्तमेढ रोवली. कारखान्याचे आवार व कामगार वस्तीला 'गांधीग्राम' असे नाव देण्यात आले. हा प्रकल्प म्हणजे देशाच्या आर्थिक स्वातंत्र्याचा व पुनरुज्जीवनाचा पाया असल्याचा अभिप्राय राजेंद्र प्रसाद यांनी उद्घाटनाच्या भाषणात दिला, तो सर्वार्थाने वालचंद शेठ यांच्या योगदानाचा सारांश होता. मात्र १९४२ साली एक ब्रिटिश जहाज जपानच्या टेहळणी विमानापासून बचाव करण्याच्या उद्देशाने विशाखापट्टणच्या खाडीत विमान घुसले; जपानी विमानांनी तिथे जोरदार बॉंब वर्षाव

केला. त्यामुळे सरकारने या जहाज उद्योगाची सर्व यंत्रसामुग्री व मनुष्यबळ मुंबईस हलविण्याचा आदेश काढला. मुंबईच्या माझगाव गोदीत हे स्थलांतर झाले. तिथे आवार बांधून तीन महिन्यात जहाज दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. बोटी बांधण्याचे काम मात्र त्यामुळे लांबणीवर पडले. दुसरे महायुद्ध संपल्यावर १९४६ साली पुन्हा एकदा विशाखापट्टणम येथे बोटी बांधण्याचे काम सुरू करण्यात आले. १४ मार्च १९४८ रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते पहिली 'जलउषा' नामक बोट पाण्यात सोडण्यात आली. जहाज बांधणी उद्योगात सरकारने सहभागी व्हावे, अशी सूचना वालचंदभाईंनी केली व त्यानुसार 'जहाज बांधणी व्यवसाय विकास समिती' नेमली गेली व १९५२ पासून विशाखापट्टणम्चा जहाज बांधणी उद्योग 'हिंदुस्थान शिपयार्ड लि.' कंपनीच्या स्वाधीन करण्यात आला.

२२ डिसेंबर १९४० रोजी वालचंद शेठ यांनी बंगळूरला 'हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट कंपनी' मार्फत पूर्णत: भारतीय अभियंत्यांच्या कौशल्यावर व निखळ देशी साहित्याचा वापर करून विमानांचा कारखाना काढला. १९४१ साली कंपनीचे पहिले हार्लो ट्रेनर विमान तयार झाले. त्यानंतर लष्कराच्या गरजेनुसार विमाने तयार करायला प्रारंभ झाला. १९४१ च्या अखेरीस जपानने पर्लहार्बरवर हल्ला केल्यामुळे अमेरिका युद्धात उतरली. सिंगापूर जिंकून जपानची विमाने भारतीय शहरांच्या दिशेने झेपावू लागली. ब्रिटिशांच्या धोरणामुळे १९४२ साली ही कंपनी हिंदुस्थान सरकारने ताब्यात घेतली. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर अनेक देशांनी आपले युद्धसाहित्य विक्रीला काढले. वालचंदशेठनी अमेरिकेकडून १० डाकोटा व २ छोटी विमाने खरेदी केली. एका इंग्लिश कंपनीकडे आणखी पाच विमानांची नोंदणी केली व नवी हवाई वहातूक कंपनी सुरू केली. २ मे १९४६ रोजी मुंबई राज्याचे तत्कालीन गृहमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते मुंबई-जामनगर-भूज मार्गावर पहिली वाहतूक सेवा सुरू झाली. १९४७ पर्यंत कंपनीकडे १९ विमानांचा ताफा जमला व देशात १६ मार्गांवर विमान वहातूक सुरू झाली.

**स्वदेशीची प्रेरणा**

वालचंद उद्योगसमूहाच्या यशोगाथेचे रहस्य त्यांच्या ध्येयवादात आणि कार्यसंस्कृतीत दडलेले होते. वालचंद शेठ हे लोकमान्य टिळकांच्या 'स्वदेशी' चळवळीने भारावलेले व्यक्तिमत्व होते. १९०६ च्या कलकत्ता येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनालाही त्यांनी हजेरी लावली होती. त्यांच्या उद्योग-व्यवसायाला या ध्येयवादाची व राष्ट्रीय बांधिलकीची पार्श्वभूमी होती. साखर-उद्योगामागे टिळकांचीच प्रेरणा होती. भारतीयांनी परदेशी उत्पादनांवर अवलंबून न रहाता स्वदेशी उद्योगधंदे वाढवून देशातल्या देशात आधुनिक पद्धतीने उत्पादन काढावे याचा त्यांनी मराठी उद्योजकांना नमुनादर्श घालून दिला. उद्योगक्षेत्रात देश स्वावलंबी व्हावा या ध्यासातून त्यांनी साखर

कारखान्याखेरीज घड्याळे, बांधकामविषयक यंत्रसामुग्री, सिमेंट संयंत्रे, अणुभट्ट्या, अवकाशयाने, खते व रसायने यांच्या प्रकल्पांसाठी लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने काढले. देशाच्या तिनही बाजूला समुद्रकिनारे असूनही आपल्याला मिठाची आयात करावी लागत होती. ब्रिटिशांचे धोरण देशी उद्योगांना प्रोत्साहन न देण्याचे असल्याने या क्षेत्रात कुणी पुढे आले नव्हते. अपवाद बडोदे संस्थानचा होता. तिथे ओखा बंदर सुरू झाल्यापासून कारखानदारीला वाव मिळू लागला होता. १९२६ साली कपिलराम वकील या तंत्रज्ञाला प्रोत्साहन देऊन वालचंद शेठ यांनी 'ओखा सॉल्ट वर्क्स' कंपनी सुरू करून शुद्ध पांढरे मीठ तयार करण्याचा कारखाना सुरू केला. १९२७-२८ सालात तीन हजार टन मीठ उत्पादित झाले, १९३४-३५ पर्यंत ही उत्पादनक्षमता ६३,००० पौंडांपर्यंत वाढली. वाहतूक व्यवसाय हा देशाच्या आर्थिक प्रगतीचा पाया आहे, याची जाणीव ठेवून त्यांनी रस्ते, पूल, बोगदे तयार करण्याच्या उद्योगात लक्ष घातले. काँक्रिट व पोलादी नळांच्या देशी उत्पादनामुळे परदेशातून आयात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांची बचत झाली.

'स्वदेशी'ची प्रेरणा मूलस्थानी असल्यामुळे स्वदेशी तंत्रज्ञ व कारागीर तयार करण्यावर त्यांचा भर असायचा. बार्शी-लाइट रेल्वेच्या नोकरीत असलेल्या शिवचंद्र बॅनर्जी यांना आपल्या कंपनीत आणून त्यांच्या नेतृत्वाखाली बांधकामविभागाची मोठमोठी कामे मार्गी लावली. सावत्र बंधू गुलाबचंद आणि रतनचंद यांना वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षापासून आपल्या सोबत घेतले व त्यांच्यावर एकेक जबाबदारी सोपवीत जाऊन उद्योग-व्यवसायासाठी लागणारे नेतृत्वाचे गुण संवर्धित केले. १० रुपये रोज आणि जेवणा-राहाण्याची सोय या रसोडा तत्त्वावर कामावर घेतलेल्या मल्हारराव माडगे या मजुराला निरनिराळ्या जबाबदाऱ्या सोपवून सात हजार मजुरांकडून काम करवून घेण्याच्या जबाबदाऱ्या पेलण्याइतके त्यास सक्षम बनविले. (भावे सविता, १९८५, पृ. २०-२१) आपल्या होतकरू अभियंत्यांना अनुभव घेण्यासाठी परदेशी पाठविण्याची त्यांची पद्धत होती. ह्यूम पाइप कंपनीसाठी मेसवानी आणि पटेल या दोन नव्या दमाच्या अभियंत्यांना ऑस्ट्रेलियात प्रशिक्षणाला पाठवून त्यांनी आपल्या नळ उद्योगाची गुणवत्ता वाढवली. पुढे पोलादी नळ तयार करण्याच्या योजनेसाठी १९३६-३७ साली त्यांनी महाराष्ट्रातील पाच तरुण अभियंत्यांची तुकडी ऑस्ट्रेलियात प्रशिक्षणासाठी पाठविली. त्यांनी स्वत:ही लंडनच्या ४० फूट खोलीवरून जाणाऱ्या सांडपाण्याच्या नळयोजनेचे काम पाहून आपली अभिज्ञता वाढवली होती.

देशी कारागीर,तंत्रज्ञ आणि हिंदी अधिकाऱ्यांवर विश्वास टाकून आपले उद्योग भरभराटीला आणण्याची कार्यसंस्कृती वालचंदशेठनी घडविली. अर्थात त्यातही कर्मठपणा न ठेवता लवचीक धोरण ठेवून कंपनीचे व राष्ट्राचे हित सांभाळायचा

व्यावहारिकपणा त्यांच्याकडे होता. १९२० साली टाटा कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक असताना त्यांनी युरोपीयन नोकरांना काढून टाकले व त्यांच्या जागी हिंदी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. मात्र अलेक्झांडर बर्न्स लॉसन या मुख्य अभियंत्याची नेमणूक कायम ठेवली. हा अपवाद करण्यामागची त्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले होते, "माझा स्वदेशीचा अभिमान आंधळा नाही. उद्या जर मी एक लाख रुपये घेऊन जंगलातून जात असेल व संरक्षणासाठी देशी बंदूक उपलब्ध नसेल तर परदेशी बंदूक अवश्य जवळ बाळगीन. लाख रुपये लुटले गेले तरी पत्करले पण परदेशी बंदूक वापरणार नाही असला वेडेपणा मला चालणार नाही. माझ्या कंत्राटाच्या व्यवसायासाठी मला काम मिळवणं जरूर आहे. सगळीकडे काम देणारे अधिकारी युरोपीयन आहेत. त्यांच्याशी बोलणी करण्यासाठी एखादा युरोपीयन माणूस पाठविला तर सोईचे होते. पण असे इंजिनीयर मी ठेवतो ते नोकर म्हणून! सांगितल्या कामापलिकडे त्यांना सत्ता नसते." (भावे सविता, १९८५, पृ. २२) तीस वर्षे वालचंदांच्या बांधकाम कंपनीत काम करणारा हा अभियंता या कंपनीचा आधारस्तंभ बनला होता. बोरघाटातले बोगद्यांचे काम करण्यासाठी भारतात तज्ज्ञ अभियंता नव्हता, तेव्हा आफ्रिकेतल्या नैरोबीहून जे. पोलाक यास तारेने बोलावून घेऊन त्यांनी बोरघाटाच्या कामाला गती दिली. ह्यूम पाइप कंपनीच्या कामासाठी १९२३ साली त्यांनी खुद्द ह्यूम यांनाच ऑस्ट्रेलियातून आमंत्रित केले होते.

टिळकांइतकेच गांधीजींच्या स्वावलंबनाच्या व विश्वस्त संकल्पनेने वालचंद शेठ भारावलेले होते. १९४३ साली सोलापूरच्या देना बँकेच्या शाखेचे उद्‌घाटन करताना त्यांनी आपले मनोगत व्यक्त केल होते, ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्यप्रेरणेचे मध्यवर्ती सूत्र होते :

"ज्या वेळी आपणास लागणाऱ्या हजारो वस्तूंची निर्मिती देशातच होऊ लागेल तेव्हा उपाशीपोटी जगणारा किंवा भिक्षा मागत फिरणारा एकही माणूस येथे आढळणार नाही. दारिद्र्य ही एक भूतकाळातील गोष्ट उरेल, आणि सर्वत्र सुख व समृद्धी नांदत असलेली दिसून येईल." (भावे सविता, १९८५, पृ. २०३) कामगारवर्गात आपल्या उद्योगाविषयी आदर व आपुलकीची भावना निर्माण होण्याकरिता कल्याणकारी योजना राबविण्यात ते अग्रेसर होते. गांधीजींनी 'सेवाग्राम' उभे केले, तसे वालचंदशेठनी रावळगाव आणि वालचंदनगर येथे कामगारांसाठी शाळा, दवाखाने, क्लब, जिमखाना, नाट्यगृह, ग्रंथालय, उद्याने, मंदिरे उभारून औद्योगिक नंदनवन उभे केले. वालचंद शेठच्या या कल्याणकारी भूमिकेमुळे त्यांच्या औद्योगिक आस्थापनांत एवढा मोठा कामगार वर्ग असताना कधीही औद्योगिक तंटा उभा राहिला नाही. अपवाद फक्त १९४६-४७ साली वालचंदनगरला कामगारांनी संप केला होता. पण संचालकांनी अकारण संप करणाऱ्यांविरुद्ध कडक भूमिका घेतल्यावर चार दिवसात कामगारांनी संप मागे घेतला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या

वेळी मुदतीत काम पूर्ण करण्याचे आव्हान स्वीकारून कामगारांनी उद्योगसमूहाचा लौकिक वाढविण्यात हातभार लावला होता. कंपनीला भरपूर नफा झाला. इंग्रज सरकारच्या वसाहतवादी नजरेतून हा नफा सुटला नाही. सरकारने कंपनीला मिळालेल्या जादा नफ्यावर पहिल्या वर्षी ५० टक्के व दुसऱ्या वर्षी ७० टक्के 'Excess profit tax' आकारण्याचा निर्णय घोषित केला. हे समजताच वालचंद शेठने ज्या कामगारांनी जादा काम केले होते त्यांना हा नफा वाटून टाकला. (खानोलकर, १९६५, पृ. ५६१)'नोकर सुखी तर धनी सुखी' ही नीती त्यांनी आपल्या व्यवसायात जपल्यानेच त्यांच्या उद्योगसमूहाला कामगार-संघटनांचा उपसर्ग पोहचला नाही आणि उद्योगाची भरभराट झाली.

ब्रिटिश राजवटीत इंग्रज अधिकाऱ्यांनी वालचंद उद्योग समूहाला सहजासहजी मोकळा हात दिला असे नाही. गोऱ्या अधिकाऱ्यांनी नाना प्रकारचे अडथळे उभे करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश बनावटीचेच सिमेंट वापरले पाहिजे अशी अट घातली, तेव्हा ही अट चुकीची कशी आहे, यासाठी वालचंद शेठना हिरिरीने प्रतिवाद करावा लागला. देशी कारखानदारांकडून कमी किंमतीत सिमेंट मिळवल्यामुळे झालेला नफा गैरवाजवी असल्याचे खुसपट हिशेब तपासनीसाने काढून त्रास देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश कंपन्यांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी प्रसंगी वालचंद शेठने घट सोसून कमी दराचे टेंडर भरले तर रेल्वेने त्यावरही प्रश्न उपस्थित केला. आपल्याजवळ हवी ती साधनसामुग्री आहे, तांत्रिक ज्ञान आहे आणि किती दराने टेंडर भरायचे हा आमचा प्रश्न आहे, असा रोखठोक प्रतिवाद करून स्पर्धेतल्या ब्रिटिश कंपन्यांच्या मक्तेदारीला त्यांनी शह दिला. १९३५ पासून भारतात मोटार-उद्योग सुरू करण्याचे प्रयत्न त्यांनी चालवले होते. परंतु भारत सरकारने त्यास प्रतिसाद दिला नाही. दरम्यान मुंबई इलाख्यात खेर मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यावर त्यांनी या प्रस्तावास मान्यता दिली; अमेरिकेतील हेन्री फोर्डबरोबर चर्चा केली, परंतु फोर्ड कार कंपनीच्या कॅनेडियन कंपनीचा अध्यक्ष कॅम्पबेलने खोडा घालून या प्रयत्नात अडथळा आणला. यावर दुसऱ्या क्रायस्लर कंपनीशी वाटाघाटी करून पर्याय शोधण्याचा यशस्वी प्रयत्न केला व जुलै १९४० मध्ये त्या कंपनीबरोबर १० वर्षांचा परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला. साताऱ्याला १९३२ पासून धनजीशाह कूपर यांनी डिझेल इंजिन तयार करण्याचा कारखाना सुरू केला होता. मोटारीसाठी लागणारी अंतर्ज्वलन इंजिने तयार करण्यासाठी कूपर यांचेकडून २२ मे १९४० रोजी ही कंपनी खरेदी करण्यात आली. परंतु कॉंग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिल्याने मुंबईत पुन्हा गव्हर्नरची एकमुखी सत्ता आली आणि ब्रिटिश प्रशासनाकडून हा प्रकल्प पुढे नेण्याविषयी नकारघंटा वाजवण्यात आली. एवढे अडथळे येऊनही १९४४ साली सव्वादोन कोटींचे भांडवल उभारण्यास सरकारची परवानगी मिळवून 'प्रिमियर

ऑटोमोबॉईल लिमिटेड कंपनी' स्थापन करून १९४७ सालात मोटारी आणि ट्रक तयार करण्याचा कारखाना मुंबईत सुरू झाला. सतत १२ वर्षे पाठपुरावा करून अखेर वालचंद शेठनी आपला संकल्प सिद्धीस नेला. १९५१ साली 'फियाट' ही छोटी गाडी त्यांनी रस्त्यावर आणली व भारतात मोटार उद्योगाचे नवे पर्व सुरू झाले. तरीही सरकारी अडथळ्यांची शर्यत संपली नव्हती. टॅरिफ कमिशनच्या शिफारशीनुसार मोटारींच्या किमतीत वाढ करण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे राखून ठेवला होता. परिणामत: वेगवेगळ्या मोटारींच्या मान्य किमतीतल्या तफावतीमुळे 'फियाट'ला तोटा सहन करावा लागला. नाइलाजाने कंपनीला कोर्टात दाद मागावी लागली व न्याय्य किंमत मिळवावी लागली.

मुदतीत काम पूर्ण करण्याची बांधिलकी, काळकामवेगाचे गणित सांभाळण्यासाठी सुयोग्य नियोजन, रोजच्या रोज कामगारांचे कार्यअहवाल तपासण्याची शिस्त, ही वालचंद उद्योग समूहाच्या यशाची रहस्ये होती. भागीदारीत काम करताना सर्वांचे हित सांभाळण्याची नैतिकता त्यांनी जपली. त्यामुळेच व्यवसायात प्रत्येक भागीदाराची जबाबदारी मर्यादित राहावी या हेतूने त्यांनी १९१५ साली खाजगी कंपनीचे 'लिमिटेड कंपनी'त रूपांतर केले. जोखीम पत्करून महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्याची धाडसी वृत्ती हे वालचंद शेठ यांचे खास वैशिष्ट्य होते. खडकीच्या दारूगोळ्याच्या कोठाराचे बांधकाम करायला कुणी उद्योजक पुढे येत नव्हता. या बांधकामासाठी सुरुंग लावावे लागणार होते आणि त्यामुळे जवळच्या दारूगोळा कारखान्याला धक्का पोहचू शकत होता; जी जोखीम स्वीकारायला कुणी तयार नव्हते. वालचंद शेठनी ही जोखीम पत्करली, अर्थात त्याबदल्यात पाच पट दर मागून घेण्याचे व्यवहारचातुर्यही त्यांनी दाखविले.

महाराष्ट्रातल्या उद्योजकांनी एकत्र येऊन विचारविनिमय करावा, नव्या योजनांची चर्चा करावी, राज्याला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी पाठपुरावा करावा या हेतूने त्यांनी १९२७ साली 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'ची स्थापना केली. १९३२-३३ साली अ. भा. वाणिज्य मंडळाचे अध्यक्षस्थान व १९३४ ते १९३६ या काळात ते आंतरराष्ट्रीय वाणिज्य मंडळाचेही उपाध्यक्ष होते. १९३६ ते १९३९ या काळात बँक ऑफ बडोदाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्यभार सांभाळला होता. १९३२ च्या पुणे कराराच्या वेळी गांधीजींनी केलेले प्राणांतिक उपोषण सुटण्यात वालचंद शेठचे प्रयत्न होते. १९३६ च्या फैजपूर काँग्रेससाठी एक लाखाची देणगी देऊन त्यांनी आपली राष्ट्रीय कर्तव्यनिष्ठा बजावली होती. १९३८ साली काँग्रेसने जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या 'नॅशनल प्लॅनिंग कमिटी'चेही ते सदस्य होते. या नियोजन समितीच्या १७ बैठकांना उपस्थित राहून त्यांनी आपले योगदान दिले. १९४३ साली बडोदा सरकारच्या सहकार्याने त्यांनी 'न्यू ग्रेट' ही विमा कंपनी स्थापन केली. १९४६ साली जपानने रेयॉन

कापडाच्या धंद्यातून भारतातून कोट्यवधी रुपयांची कमाई केली होती. भारतातला पैसा भारतातच रहावा म्हणून वालचंद शेठनी दहा कोटी भांडवलाची 'नॅशनल रेयॉन कंपनी' स्थापन केली. मात्र पक्षाघाताच्या आजाराने प्रकृती ढासळत गेल्याने १९४९ मध्ये त्यांनी बहुतेक सर्व कंपन्यातून निवृत्ती घेतली. १९५३ साली त्यांचे निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांनी पुण्यात जैन बोर्डिंग व त्यांच्या पत्नीच्या नावे 'कस्तुरबाई सॅनिटोरियम' स्थापन करून वालचंद शेठ यांचे स्मारक उभे केले. (भावे सविता, कित्ता, पृ. २०१)

**३. किर्लोस्कर उद्योगसमूह :**

तात्यासाहेब न. चिं. केळकर यांनी ज्यांचा 'महाराष्ट्राचे हेन्रीफोर्ड' म्हणून गौरव केला होता ते लक्ष्मणराव किर्लोस्कर हे किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक. त्यांनी आपली मुले शंतनुराव, राजारमपंत व रवी किर्लोस्कर यांच्या सहभागातून लोखंडी नांगर, डिझेल इंजिन, पाणी उपसण्याचे पंप इत्यादी उत्पादने सुरू करून महाराष्ट्राच्या उद्योगविश्वात अनेक सर्जनशील प्रयोग केले. लक्ष्मणराव किर्लोस्कर १८८५ साली धारवाड सोडून मुंबईला आले व जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये प्रवेश घेऊन प्रि. ग्रिफिथ, गणपत केदारी या ध्येयवादी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चित्रकला व आरेखनविद्येचा अभ्यास सुरू केला. चित्रकलेपेक्षा यांत्रिक विद्येकडे कल असल्याने मुंबईस त्यांनी भवानीशंकर या मित्राच्या भांडी तयार करण्याच्या कारखान्यात उमेदवारी केली. १८८७ साली व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्युट स्थापन झाली, तेथे ड्रॉइंग टिचर म्हणून नोकरी मिळवली व याच इन्स्टिट्यूटमध्ये काम करता करता लेथ्स, ड्रिलिंग मशिन्स, शेपिंग मशिन्स, इत्यादी नानाविध यंत्रांचे तांत्रिक ज्ञान संपादन केले. १८८२ साली मुंबईत एक छापखाना उभा करण्याचे काम अंगावर घेऊन नवा यांत्रिक व्यवसाय उभा करण्याचा अनुभव घेतला. त्यावेळी नव्यानेच मुंबईकरांना सायकलींचा परिचय झाला होता. लक्ष्मणरावांनी १८८८ साली इंग्लंडहून सायकली मागवून विकण्याचा उद्योग सुरू केला. १९०३ साली सायकलीचे दुकान विकून मिळालेल्या पैशातून त्यांनी बेळगावजवळ ठळकवाडीला शेतकऱ्यांसाठी 'लोखंडी नांगर' तयार करण्याची योजना आखली. आतापर्यंत भारतीय शेतकरी लाकडी नांगर वापरत असे. हे अवजड औत चालवायला धुरीचे मोठे बैल लागत. नांगरणीत राहाणारे फटे व वरंबे मोडण्यासाठी एकदा आडवा आणि एकदा उभा असे दोनदा नांगर फिरवावे लागत असे. शेतकऱ्यांचे हे दगदगीचे व बैलांनाही कष्टदायक असणारे काम हलके करावे या कल्पनेतून लक्ष्मणरावांनी लोखंडी नांगराची संकल्पना साकार केली. बिडाच्या भट्टीतून लोखंडी नांगर करताना फाळाचा कोन, पाटीचा बाक, हाळीसाची लांबी हे नांगराच्या रचनेचे शास्त्र तंतोतंत पाळून प्रत्येक नांगराची काटेकोर परीक्षा घेतल्यावरच तो बाहेर पाठविण्याची दक्षता घेतली. निर्मितिप्रक्रियेतच गुणवत्ता संवर्धनाची काळजी घेणारे उद्योगव्यवस्थापनशास्त्र त्यांनी

स्वत:च विकसित केले. त्यामुळे विलायती नांगरापेक्षाही किर्लोस्करांच्या नांगराची प्रतवारी सरस ठरली. औंधचे संस्थानिक श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी संस्थानाच्या ओसाड माळरानावर दिलेल्या ३६ एकर क्षेत्रात त्यांनी सुरुवातीला १२ लाखांच्या भागभांडवलातून 'किर्लोस्कर ब्रदर्स लि.' ही कंपनी स्थापन केली. किर्लोस्करवाडीत त्यांनी क्रमक्रमाने नाना प्रकारची यांत्रिक उत्पादने सुरू केली. कुठल्याही कारखान्यात, रेल्वेत, बांधकामात खूप मोठ्या प्रमाणात नट-बोल्ट लागतात हे लक्षात घेऊन त्यांनी प्रथम नट-बोल्ट तयार करायला सुरुवात केली. इस्पितळांसाठी लागणारे लोखंडी फर्निचर, बसेसच्या चॅसीस, अमेरिकन पद्धतीचे हातपंप बनवले. शेतकऱ्यांच्या उपयोगाचे 'कल्याण शेंगायंत्र' काढले. या यंत्रात शेंगा चोळून फोडण्याची योजना असल्याने शेंगदाण्यांतली फूट जवळपास होत नसे. कापड विणण्यासाठी 'किर्लोस्कर माग' तयार केले. शिवाय 'राधा मिल' नावाचा पातळांचा कारखानाही काढला. १९२६ साली विहिरीतून पाणी उपसण्यासाठी ऑईल व गॅस इंजिन तयार केले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तोफ गोळ्यांसाठी लागणारे शेल टर्निंग लेथ, प्लेनिंग मशिन्स, हँड ग्रेन्डसाठी लागणाऱ्या लक्षावधी स्प्रिंगा, ऑइल इंजिन्स. इलेक्ट्रिक मोटर्स, ५० हजार लोखंडी खाटा पुरविण्याचे कंत्राट मिळवून ही सामग्री आपल्या कारखान्यात तयार केली. या कारखान्यात ६०० कामगारांना काम मिळाले. १९४१ साली म्हैसूर संस्थानात हरिहर येथे ५ लक्ष रुपयांचे प्रारंभिक भांडवल गुंतवून यांत्रिक उपकरणे तयार करण्याचा कारखाना काढला. ९ फेब्रुवारी १९४२ ला त्याचे उद्घाटन झाले. या कारखान्यात १४०० कामगारांना काम मिळाले. १९४६ साली बंगलोरला किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी सुरू केली. तिथे २५० हॉर्स पॉवर्सच्या इलेक्ट्रिक मोटर्स, ३००० केव्हीएपर्यंतचे ट्रान्सफार्मर्स बनवले जाऊ लागले. तिथे एक हजार कामगारांना काम मिळाले. पुण्याला खडकी येथे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी स्थापन केली. तिथे ५,१०,२०,४० हॉर्सपॉवर्सची महिन्याला ८०० इंजिने तयार होत. इथेही २००० कामगारांना काम मिळाले. हडपसरला 'किर्लोस्कर न्युमॅटिक्स कं.' सुरू केली. अशा प्रकारे किर्लोस्कर उद्योगसमूहाने औद्योगिक उत्पादनात आघाडी घेतली.

किर्लोस्करांनी १ जानेवारी १९२० ला 'फोर्ड टाइम्स' प्रमाणे 'किर्लोस्कर खबर' पत्र सुरू केले. त्यासाठी छापखाना काढला. यातूनच पुढे 'किर्लोस्कर', 'स्त्री' ही मासिके व 'मनोहर' साप्ताहिक सुरू झाले. १९२२ साली बाबूराव पेंटर यांनी कोल्हापूरला चित्रपट उद्योग सुरू केला, तेव्हा किर्लोस्करांनी आपल्या कारखान्यावर माहितीपट तयार करवून घेतला. कारखान्यात नांगर, चरक कसे तयार होतात, साच्यात लोखंडी रस कसा ओतला जातो, तयार झालेला नांगर शेतात कसा काम करतो अशा प्रकारची दृश्ये या माहितीपटातून दाखविली जात. १९२७ साली बंगलोरच्या औद्योगिक प्रदर्शनात हा

माहितीपट पाहिल्यावर म्हैसूर संस्थानचे दिवाण सर मिर्झा इस्माइल यांनी किर्लोस्करांना म्हैसूरला उद्योग स्थापन करण्याचे आमंत्रण दिले. त्यानंतर पुढे १९४२ साली म्हैसूर किर्लोस्कर लि. ही कंपनी स्थापन करण्यात आली.

कारखाने ही केवळ नित्योपयोगी वस्तू तयार करण्याची केंद्रे नसतात; ती नव्या विचारांची, उद्यमशीलतेची व सामाजिक ऊर्जेचीही केंद्रे असतात, हे भान किर्लोस्कर उद्योग समुहाने जागवले. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी औंध संस्थानात नुसता कारखानाच काढला असे नाही, त्यांनी संस्थानाच्या दिवाणपदाचीही जबाबदारी निभावली. तिथल्या शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे शिक्षण दिले. बंधारा बांधून जिरायत शेती बागायती करण्याचा उपक्रम केला. पिऱ्या मांग, तुका रामोशी, बाळा रामोशी या गुन्हेगार कैद्यांना आपल्या कारखान्यात रखवालदार ठेवून त्यांचे पुनर्वसन केले. चिमुटभर मीठ आणि बेलभंडाऱ्याची शपथ देऊन त्यांची दारू व गुन्हेगारीपासून मुक्ती केली. आपला उद्योग वाढवताना अनेकांना नवे उद्योग सुरू करण्यासाठी प्रेरणा दिली व हातभारही लावला. १९१४ साली किर्लोस्कर कंपनीत काम करणाऱ्या गुरुनाथराव उर्फ नागूदादाचा भाऊ तळेगाव काचशाळेत शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर किर्लोस्करांनी त्यांना ओगलेवाडीला काच कारखाना काढायला प्रवृत्त केले. या कारखान्यातून 'प्रभाकर कंदिल', सेफ्टी स्टोव्ह, एनॅमलच्या पट्ट्या अशी कल्पक उत्पादने पुढे आली. १९३२ साली किर्लोस्कर कारखान्यात फिटरचे काम करण्यासाठी आलेल्या विठोबा सुताराने १९४५ साली संकेश्वरला 'भारत मेटल वर्क्स' नावाचा कारखाना काढला. शंकरराव कोठावळे यांनी कोल्हापूरला ऑईल इंजिन्सचा 'पॅको' कारखाना काढला. विश्रामबागच्या दादू कुडचीकर याने नांगर, पंप व इंजिनचे सुटे भाग करणारा 'न्यू विजय इंडस्ट्रीज' नावाचा कारखाना काढला. तिथे ४५ माणसांना रोजगार मिळाला. वटवृक्षाला पारंब्या फुटाव्या तसे किर्लोस्करांच्या तालमीत नवे उद्योजक तयार झाले व महाराष्ट्रात तीस-पस्तीस छोटे कारखाने निघाले. महाराष्ट्राच्या औद्योगिक संस्कृतीच्या जडणघडणीत किर्लोस्करांचे हे योगदान मोठे आहे.

### ४. नवलमल फिरोदिया :

पुण्यात फर्ग्युसन कॉलेजात १९०६ ते १९०८ या काळात शिक्षण घेतलेल्या अहमदनगरच्या नवलमल कुंदनमल फिरोदया यांनी 'आम्ही व्यापारी वृत्तीची माणसं. चिंध्या फाडून कमवू; पण कमवू" असे म्हणत वकिली व्यवसाय सोडून उद्योजक बनण्याचा निर्धार केला. महाविद्यालयीन जीवनात त्यांच्यावर टिळकांच्या स्वदेशीवादाचा प्रभाव होता. नगरला स्वदेशी मालाचे प्रदर्शन व विक्रीकेंद्र सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. नंतरच्या काळात ते गांधीवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. १९४६ साली फिरोदियांनी 'जयहिंद

इंडस्ट्रीज' नावाची कंपनी सुरू केली. इटलीला सामान वाहण्यासाठी रिक्षांचा वापर होई; त्याच धर्तीवर मध्यमवर्गीयांना परवडेल अशा किंमतीत शहरातल्या शहरात माणसांच्या अंतर्गत वाहतुकीसाठी चालणारी रिक्षा तयार करण्याचा संकल्प त्यांनी केला. अमेरिका व इटलीतून सुटे यंत्रभाग आणून भारतात जोडण्याचा यशस्वी उद्योग सुरू केला. १९४८ साली मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात जवाहरलाल नेहरूंना हे रिक्षाचे मॉडेल दाखविण्यात आले होते. आज 'ऑटो रिक्षा' ह्या छोट्या-मोठ्या शहरात अंतर्गत प्रवासाचा अनिवार्य भाग बनल्या आहेत.

**५. गरवारे उद्योगसमूह :**

सांगलीजवळच्या तासगावला १९०३ साली जन्माला आलेल्या भालचंद्र दिगंबर उर्फ आबासाहेब गरवारे यांची आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती. उद्योग-व्यवसायाचा कुठलाही वारसा पाठीशी नव्हता. १९२० साली पोटापाण्याचा उद्योग शोधण्यासाठी त्यांनी गाव सोडले आणि मुंबई गाठली. एका ठेकेदाराकडे नोकरी केली. मात्र नोकरीत समाधान मानून स्वस्थ न बसता त्यांनी सूर्यकांत देसाई या मित्राबरोबर भागीदारी करून जुन्या मोटारी विकत घेऊन दुरुस्त करून विकण्याचा धंदा सुरू केला. उद्यमशीलता आणि कल्पकता या गुणांना सतत आव्हान देत नव्या वाटा शोधण्याचा स्वभावधर्म असल्याने मोटार दुरुस्तीच्या धंद्यातही त्यांना नवे उद्योग दिसू लागले. मोटारीचे पार्टस विकण्याचे डोक्यात घेऊन त्यांनी फायरस्टोन टायर कंपनीची एजन्सी घेतली.

१९३३ साली एका इंग्रज अधिकाऱ्याने गरवारेंच्या वर्कशॉपमधून जुनी गाडी विकत घेताना 'सेकंडहॅंड गाड्यांच्या एवढ्या चढ्या किंमती काय लावता' असा प्रश्न विचारला आणि इंग्लंडला जुन्या गाडया कशा स्वस्त मिळतात हे ऐकवले. गरवारे इंग्लंडला गेले. तिथे ४० पौंडात एका लॅंड लेडीची कार विकत घेतली आणि ब्रिटिश शोफर नेमून लंडनच्या बाजारपेठेत फिरू लागले. एका ठिकाणी त्यांनी "भारतीयांना व कुत्र्यांना प्रवेशबंदी" अशी पाटी वाचली. गरवारेंनी पडेल ती किंमत देऊन इंग्लंडच्या 'प्रिन्स ऑफ वेल्सची' 'बर्नेस्टी मलाइन' गाडी विकत घेऊन भारतीय बाणा दाखविण्याचा निश्चय केला. त्यांनी खरोखरच ती गाडी विकत घेतली व 'गरवारे मोटर्स' कंपनी स्थापन करून आपल्या शोरूममध्ये ठेवली. प्रिन्सची गाडी पहायला लोक गरवारेंच्या शोरूमला भेट देऊ लागले. त्यानंतर १९३५ साली अमेरिकेत हेन्री फोर्डशी चर्चा करून भारतात मोटारींचे उत्पादन करता येईल का याचा अंदाज घेतला. मात्र भारतातील इंग्रज सरकारने परवानगी नाकारली. त्यानंतर १९३६ साली त्यांनी 'बॉम्बे निऑन्स साइन्स" कंपनी सुरू केली. दुसऱ्या महायुद्धानंतर प्लॅस्टिक युग सुरु झाले. काळाची पाऊले ओळखून त्यांनी प्लॅस्टिक उद्योग सुरु केला. बर्मिंगहॅमला जाऊन थर्मोप्लॅस्टिकची माहिती घेऊन या उद्योगाचा विस्तार केला. यातूनच पुढे' नॉयलॉन बिटल्स' करण्याचा उद्योग सुरू केला.

नौदलासाठी प्लॅस्टिक बटने, फिशिंग नेट, पॉलिस्टर रोप्स तयार करण्याच्या उद्योगात गरवारे अग्रेसर राहिले.

### ६. गोदरेज उद्योगसमूह :

महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या उद्योगसमूहांनी आर्थिक वाटचालीत महत्त्वाचे योगदान दिले, त्यात 'गोदरेज' कंपनीची कामगिरी लक्षात गेणे आवश्यक आहे. आर्देशीर गोदरेज हे लो. टिळक, म. गांधी यांच्या राष्ट्रीय विचारांनी भारलेले उद्योजक होते. परदेशी मालाच्या आयातीला प्रतिबंध घालण्यासाठी त्या तोडीचा देशी माल तयार करण्याचा पर्याय पुढे आणण्याच्या दृष्टीने ते आपल्या उद्योगाची पायाभरणी करीत होते. १९ व्या व २० व्या शतकाच्या संधिकाळात १८९७ साली गोदरेज उद्योगाने आपल्या कार्याचा शुभारंभ केला. आर्देशीर गोदरेज यांनी सुरुवातीला मुंबईत लालबागला कुलूप बनविण्याची छोटीशी यंत्रशाळा सुरू केली. त्यापाठोपाठ 'अग्नीसुरक्षक सेफ' हे नाविन्यपूर्ण उत्पादन सुरू केले. १९४४ मध्ये मुंबईच्या गोदीत लागलेल्या महाभयंकर आगीत गोदरेजच्या अग्नीसुरक्षक कपाटातील सर्व वस्तू आणि कागदपत्रे सुरक्षित राहिली होती. साबणाचे उत्पादन सुरू केले तेव्हा गोदरेजने प्राण्यांची चरबी न वापरता तेलबियांचा वापर करण्याचा यशस्वी प्रयोग केला. १९४२ साली गोदरेज उद्योगाने परदेशी मदत न घेता निखळ स्वदेशी बनावटीचे 'मशिन टूल'चे उत्पादन सुरू केले. औद्योगिक विश्वातली 'मदर इंडस्ट्री' असे या मशिन टूल उत्पादनाचे वर्णन केले जाते. पुढे अर्देशीर यांचे बंधू फिरोजशहा गोदरेज यांनी मुंबईला विक्रोळीच्या डोंगराळ प्रदेशात सुमारे वीस हजार लोकवस्तीची 'फिरोजशहानगर' ही हिरवीगार औद्योगिक वसाहत निर्माण केली. औद्योगिक प्रगतीबरोबर राष्ट्रीय बांधिलकीलाही त्यांनी तेवढाच अग्रक्रम दिला होता. इंग्रज राजवटीकडून त्याचा फटका त्यांना सोसावा लागला होता. आर्देशीर गोदरेज यांनी गांधीजींच्या हरिजन फंडास लाखो रुपयांचे अर्थसाहाय्य केले म्हणून सरकारने गोदरेज माल खरेदी करू नये असे फर्मान काढले होते. (देशपांडे सुषमा, १९९१, पृ. ११६-१२०) [१९५० नंतर गोदरेजने शेतकऱ्यांपासून मध्यमवर्गीय सामान्य ग्राहकांना लागणाऱ्या नानाविध वस्तूंचे उत्पादन करून भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान दिले; त्याची नोंद पुढच्या खंडात येईल.]

### ७. डहाणूकर उद्योगसमूह :

डहाणूला लाकडाचा व्यवसाय करणाऱ्या बाबासाहेब डहाणूकरांनी लो. टिळकांकडून प्रेरणा घेऊन १९३३ साली 'महाराष्ट्र शुगर मिल्स' नामक साखर कारखाना सुरू केल्याचा उल्लेख यापूर्वी येऊन गेला आहे. या डहाणूकर कुटुंबाने पुढे खाद्यतेल व वनस्पती तुपाचे उत्पादन करणारी अमृत ऑईल मिल व वरळी केमिल वर्क्स स्थापन केले. शिवाय 'हिंद रेझर ब्लेड' नावाचा कारखाना सुरू केला. १९४१ साली 'शुद्ध

रिफाईंड साखर' बनविणारा भारतातला पहिला प्रयोग केला. १९४७ साली साखरेला जोडधंदा म्हणून अल्कोहोल बनवायला सुरुवात केली. १९५० पर्यंत डहाणूकर उद्योगसमूहाने महाराष्ट्राच्या उद्योगजगतात आपले स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले होते.

## ८. इतर उद्योग :

मुंबई हे भारतातले सर्वात मोठे उद्योगकेंद्र असल्याने इथे नाना प्रकारच्या उद्योजकांना नवनवीन उद्योगांची सुरुवात करण्याला आश्वासक ठिकाण प्राप्त झाले होते. १९१५ साली वर्ध्याला बच्छराज बजाज हे कॉटन जिनिंग फॅक्टरी चालवत होते; पण बजाज कंपनीचा खरा उत्कर्ष १९२६ साली जमनालाल बजाज यांच्या पुढाकारातून मुंबईत स्थापन झालेल्या बजाज ग्रुप्सपासूनच झाली. पुढे बजाज ग्रुपने १९३० साली डेक्कन आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. ही कंपनी स्थापन केली, १९४१ नंतर या कंपनीचे 'बजाज कन्झुमर केअर लि.' असे नामांतर झाले. १९३१ साली हिंदुस्थान शुगर मिल्स लि.; १९३४ साली हिंदुस्थान हौसिंग कं. लि.; १९३३ साली बटाला इंजिनिअरिंग कं. लि.; १९३७ साली मुकुंद आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स कंपनी, १९३८ साली रेडिओ लॅम्प कंपनी, १९४१ साली बजाज इंटरनॅशनल प्रा. लि. व बडोदा इंडस्ट्रीयल प्रा. लि. अशी या उद्योगसमुहाची भरभराट झाली. १९२० साली मुंबईत परळला गुडलास नेरोलॅक पेंटस कंपनी स्थापन झाली, चिपळूणलाही त्याचा एक विभाग सुरू करण्यात आला. लाला करमचंद थापर यांनी १९३७ साली ट्रॉन्स्फॉर्मर, पंप आणि इतर इलेक्ट्रिक उत्पादनात अग्रेसर असणारी क्रॉम्प्टन ग्रीव्हज् कंपनी स्थापन केली. १९४५ साली चंपकलाल चोकसी, चिमणालाल चोकसी, सूर्यकांत दाणी आणि अरविंद वकिल यांनी मुंबईच्या गिरगावात गायवाडीच्या गॅरेजमध्ये एशियन पेंटस हा उद्योग सुरू केला. १९५० साली आर. के. लक्ष्मण यांनी रंगाच्या बादलीत कुंचला बुडवलेल्या खोडकर मुलाचे बोधचित्र काढून या कंपनीची एक दृश्य ओळख संपूर्ण भारतात निर्माण केली.

मोठ्या उद्योगांखेरीज छोटे लघुद्योगही या कालखंडात महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात सुरू होऊ लागले होते. खानदेशात अमळनेरला १९४५ साली मोहमद प्रेमजी यांनी 'विप्रो' अर्थात 'वेस्टर्न इंडिया पाम रिफाईंड ऑईल' कंपनी स्थापन करून वनस्पती तेल गाळण्याचा उद्योग सुरू केला. 'किसान', 'सन फ्लॉवर', 'कॅमल' या ब्रँड नावांनी हे तेल बाजारात ग्राहकप्रिय झाले. नाशिक जिल्ह्यात सिन्नर-येवला भागात बिडी उद्योग सुरू झाले. इ. स. १९०० पर्यंत बिडी फक्त दक्षिण गुजरातेत व मुंबईला पानठेल्यांवर मिळत असे. मुंबईच्या पानठेल्यांवर विकल्या जाणाऱ्या बिड्यांची माहिती घेऊन १९०६ साली सिन्नरजवळ डुबरे गावी बाळाजी गणपत वाजे यांनी बिडी व्यवसाय सुरू केला. हजार बिडी वळणाऱ्यास सहा आणे मजुरी दिली जात असल्याने बरेच लोक बिडी वळण्याचे

काम करू लागले. शिवाजी बिडी या नावाने ही बिडीबंडले विकली जात. १९१० साली येवल्याच्या सावजी समाजातील भिकुसा यमासा क्षत्रिय यांनी आणि १९२२ साली बस्तीराम नारायणदास सारडा यांनी मोठ्या प्रमाणात बिडी उद्योगाला चालना दिली. सारडांची लाल दोऱ्याची उंट बिडी आणि भिकुसा छाप पिवळ्या दोऱ्याची बिडी ५० विड्यांचे बंडल करून विकली जाऊ लागली.(सुधीर मुतालिक,misalpav.com) बस्तीराम सारडा यांनी लष्करासाठी एक कोटी बिडींचे टेंडर मिळवले, तेव्हापासून या धंद्यात बरीच प्रगती झाली. १९४२ साली म. गांधींनी बिडी कामगारांना दिवसाला किमान आठ आणे वेतन द्यावे असा निर्णय दिल्यापासून मजुरीचे दर वाढविण्यात आले. सोलापूरलाही संभाजी बिडी तयार होऊ लागली. निपाणीला देवचंद शहा यांनी तंबाखूचा व विड्या वळण्याचा मोठा व्यापार सुरू केला. एका पहाणीनुसार सोलापूरात दररोज चार कोटी विड्या वळल्या जात असत, पावणेदोन कोटींची उलाढाल होत असे. ७० हजार कामगारांना काम मिळत असे. (लोकसत्ता, २८ मे २०१६) नागपूरला मनोहरभाई पटेल यांची २७ नंबर बिडी प्रसिद्ध होती. लष्कराचे विमान भाड्याने घेऊन जपानपर्यंत बिडी पोहचविण्याची मजल त्यांनी गाठली होती. नाशिकला चांडक बंधूंनी १९३९ साली आगकाडीचा कारखाना आणि कोंबडा छाप बिडी सुरू केली होती. भिवंडीला उत्तर भारतातून आलेल्या हाजी-अल-समद् ह्याने 'सोना बेचो और लोहा खरिदो' अशा सुभाषितवजा लोकोक्तीतून मुंबईच्या वस्त्रोद्योगाला भिवंडीच्या पॉवरलूम उद्योगाकडे वळविण्याची मोहीम चालविली होती. त्यात त्याला यश आले आणि मुंबईला समांतर असे वस्त्रोद्यागाचे एक नवे व्यापार केंद्र विकसित झाले.

१९११ साली टाटांच्या पुढाकारने 'दि न्यू इंडिया' विमा कंपनी स्थापन करण्यात आली व या कंपनीमार्फत आयुर्विमा, अपघाताचा विमा, नोकरीतल्या सचोटीचा विमा इत्यादी विम्यांचे प्रकार प्रचलित झाले.साताऱ्याचे अण्णासाहेब चिरमुले यांनी अमेरिकेतील विमा व्यवसायाचा अभ्यास करून १९१३ साली साताऱ्यात 'वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स कंपनी' स्थापन केली. विमा व्यवसायाचा विस्तार करण्यात त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनात त्यांना 'विमामहर्षी' म्हणून ओळखले जाऊ लागले. १९३५ साली मराठा चेंबरने विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले यांच्या अध्यक्षतेखाली परिषद घेऊन विमा क्षेत्राची अर्थसाक्षरता वाढविण्याच्या प्रयत्नांना गती दिली. १९३६ साली चिरमुल्यांनी युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना केली. १९४२ साली रामराव विजयकर यांनी 'विश्वभारती' नामक विमा कंपनी स्थापन केली. आयुर्विम्याखेरीज अन्य क्षेत्रांतील विमाव्यवसाय वाढीवर या कंपनीने भर दिला. १९४६ साली पुण्यात भागवत वकिलांच्या पुढाकारातून मोटारींचे विमे उतरवणारी 'मोटार ट्रान्सपोर्ट म्युच्युअल' कंपनी सुरू झाली. पाठोपाठ 'वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झिक्युटर कंपनी; 'विमामुद्रक

व प्रकाशक कंपनी' स्थापन होऊन विमा व्यवसाय वाढत गेला. गावोगावी विमा विक्री करणाऱ्यांची एक साखळी निर्माण झाली.

कोकणातल्या मध्यमवर्गीय मराठी माणूस मुंबईत येऊन चाकरमाने म्हणून काम करतो आणि मनिऑर्डरने कोकणात पैसे पाठवतो, हे आपल्याला परिचित आहे; पण कल्पकता, परिश्रम आणि सचोटीच्या जोरावर उद्योजक म्हणून आपला वेगळा ठसा उमटविण्यातही कोकणी माणूस मागे राहिला नाही, याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'बेडेकर उद्योग'! राजापूरजवळच्या देवाचे गोठणे येथील परशुरामपंत दादा बेडेकर यांनी गावातल्या किराणा दुकानाची उधारी गोळा करण्यात श्रम वाया घालविण्यापेक्षा मुंबईत किराणा दुकान थाटण्याचा निर्णय घेतला व १९१० साली भागीदारीत दुकान टाकले. दादांचा मुलगा वासुदेव १९१४ पासून दुकानात मदतीला आला. मुंबईत एन्फ्लुएन्झाची साथ आली तेव्हा वासुदेव अण्णा बेडेकर यांनी बाह्य उपचारासाठी अळशी व मोहरीची दाळ कुटून पीठ विकले. या अनुभवाच्या जोरावर दादा बेडेकरांच्या मागे वासुदेवराव बेडेकर यांनी लोणचे, मसाला, मेतकूट, पापड बनवून विकण्याचा व्यवसाय सुरू केला. १९२५ च्या सुमारास सुरू केलेल्या या उद्योगाची ख्याती इतकी पसरली की १९३५ साली बेडेकरांची मुंबईत पाचवी शाखा उघडली. हळू हळू संपूर्ण महाराष्ट्राच्या बाजारपेठेत बेडेकर उत्पादनाने आपला नावलौकिक कमावला.

कोकणातल्याच केळशी गावच्या राममंदिराचे पुजारी असलेल्या दांडेकर कुटुंबातील दिगंबर दांडेकर यांनी १९३१ साली मुंबईतल्या राहत्या चाळीत ज्या उद्योगाला यंत्रसामुग्रीची गरज लागत नाही असा 'शाई' तयार करण्याचा गृह-उद्योग सुरू केला. शाईच्या पुड्यांना 'घोडा' हे बोधचिन्ह आणि बाटलीतल्या शाईला 'कॅमल' हे बोधचिन्ह देऊन शाई विकणारी 'दांडेकर आणि कंपनी' सुरू केली. पुढे या उद्योगाला जोडून स्टॅम्प पॅडची शाई, डिंक, लाख इत्यादींचे उत्पादन सुरू केले. १९३९ साली माहीममध्ये या उद्योगाचे कारखान्यात रूपांतरण केले. १९४६ साली 'कॅम्लीन लिमिटेड' असे प्रायव्हेट कंपनीत या उद्योगाचे रूपांतर झाले. कारखान्यातील हस्तोद्योगाचे यांत्रिकीकरण झाले. यंत्रावर बाटल्या भरल्या जाऊ लागल्या. १९५० पर्यंत मध्यमवर्गीय कोकणी माणसाच्या घरात सुरू झालेल्या गृह-उद्योगाचे औद्योगिक स्वरूप पुढे आले.

कोकणातल्या देवगड तालुक्यातल्या वानिवडे गावचे रहिवासी असलेले हरिभाऊ केळकर व सदाशिव केळकर यांनी सांगलीला अत्तरविक्रीचा व्यवसाय करता करताच स्वत: अत्तर तयार करण्याच्या उद्योग सुरू केला. 'सरस्वती केमिकल्स वर्क्स' नावाची कंपनी स्थापन केली. पुढे १९२२ साली मुंबईच्या गिरणगावात हा उद्योग स्थलांतरित करण्यात आला व 'केळकर आणि कंपनी' स्थापन केली. केळकर कुटुंबही लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीने प्रभावित होऊन हा उद्योग करीत होते. अत्तरे आणि

सौंदर्यप्रसाधने बनविणाऱ्या या उद्योगसमूहाने व्ही. शांताराम यांच्या राजकमल स्टुडिओलाही अर्थसाहाय्य करून शांताराम यांना पहिल्या तीन चित्रपटांच्या निर्मितीसाठी आर्थिक पाठबळ दिले होते. (केळकर गोविंद, २००२, पृ. ४)

रत्नागिरीच्या रघुनाथभाऊ देसाई यांनी १९३३ साली पुण्याच्या मंडईत शनिपाराजवळ हापूस आंबा हा 'कापायचा आंबा' म्हणून प्रथमच विकायला सुरुवात करून 'देसाई बंधू आंबेवाले' ही आंबाविक्रीची फर्म प्रस्थापित केली. १९३९ साली दूध व्यवसायात उतरलेले भास्कर गणेश चितळे यांनी १९४५ साली भिलवडी येथे डेअरी व्यवसायाचा विस्तार करण्यास सुरुवात केली व 'चितळे बंधू मिठाईवाले' म्हणून दुग्ध उद्योजक म्हणून पुण्यात मान्यता मिळवली. मुंबईसारख्या शहरात निवास-भोजनव्यवस्था पुरविण्याच्या उद्योगात विसुभाऊ साळवेकर यांनी १८९८ साली 'पथिक निवासा'ची स्थापना करून नावलौकिक मिळवला. १९१२ साली त्यांनी त्यावेळच्या क्रॉफर्ड मार्केटजवळ 'सरदारगृह' ही पाच मजली इमारत बांधली. मुंबईत आल्यावर शाहू छत्रपती महाराज, लो. टिळक या सरदारगृहातच रहात. म. गांधी, लाला लजपतराय, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वा. सावरकर यांच्या भेटीगाठीचे हे ठिकाण बनले. बाळासाहेब खेर यांची मुख्यमंत्रीपदी निवड करण्याचा निर्णय सरदारगृहातच झाला. स्वातंत्र्य आंदोलनातल्या खलबतांचे ठिकाण म्हणून या पथिक निवासाची ऐतिहासिक नोंद झाली. (भट,१९७९, पृ.२०) ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासातून व्यापाऱ्यांना तेजी-मंदीच्या काळात फलादेश सांगण्याचा उद्योगही परशुराम उपाध्ये (१८६१-१९३७) यांनी मुंबईत सुरू केला होता. त्यांच्या मृत्यूनंतर धनिक व्यापाऱ्यांनी परशुरमभाऊंच्या स्मरणार्थ 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रॉलॉजी ॲण्ड सामुद्रिक' नावाची संस्था स्थापन केली, अशीही एक वेगळी यशोगाथा पहायला मिळते. कुठलाही व्यवसाय कमी महत्त्वाचा नसतो याची जाणीव ठेवून उद्यमशील मराठी माणसाने आपली कामगिरी या कालखंडात दाखवायला सुरुवात केली होती. (अशा कितीतरी मराठी उद्योजकांच्या उद्यमशीलतेच्या चरित्र कहाण्या एकत्रित केल्या तर स्वतंत्र पुस्तकच व्हायचे; त्यामुळे सगळ्यांची इथे दखल घेता आली नाही. केवळ प्रातिनिधिक उद्योजकांच्या योगदानाची नोंद केली आहे.)

## ४.९. संस्कृती-उद्योग :

शहरांमध्ये औद्योगिक उत्पादनांचे नवे पर्व सुरू झाले असले तरी ग्रामीण अर्थव्यवस्था हा महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनातला एक महत्त्वाचा पैलू होता व आहे. पारंपरिक वारशाने प्राप्त होणारी कलाकौशल्ये व कारागिरीची तंत्रे यांच्या जोरावर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अनुसरणाऱ्या गावगाड्यातल्या सुतार, लोहार, चांभार, कुंभार, मांग ह्या जातीतल्या उद्योगपरंपरा हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा होता. गावकऱ्यांच्या दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तूंचे उत्पादन व सेवा देणारे हे पारंपरिक उद्योग विसाव्या शतकातही

निरंतर सुरू होते. दैनंदिन गरजेच्या वस्तूनिर्मितीबरोबरच हे कारागीर सण उत्सवांत उपयोजिल्या जाणाऱ्या मिथकीय, कलात्मक व लोकरंजनाच्या वस्तू तयार करीत. तसेच सण, जत्रा, मेळ्यांमध्ये लोकरंजनाच्या सेवाही देत असत. कोकणात बोवा पेंडसे हे खास दिवाळीकरिता 'सुगंधी पेट्या' विकायचे. कनोजहून अत्तराचे बुधले मागवायचे, अत्तराच्या कुप्या भरायच्या आणि हिना गुलाब, ही अत्तरे, केसांना लावायचे सुगंधी तेल, उटण, कुंकू एवढे साहित्य या पेटीत असे. मंतरलेले गंडे विकण्याचाही धंदा ते करीत. (पेंडसे, १९७४, पृ. ४) अशा उद्योगांचे स्वरूप भांडवली उद्योगव्यवसायांपेक्षा वेगळे असल्याने त्यांचे 'संस्कृती उद्योग' असे नामकरण करणे योग्य राहील. बारशापासून दशक्रियेपर्यंत, घरभरणीपासून व्रतवैकल्यात पूजापाठ सांगणारे, कीर्तन-प्रवचन करणारे ब्राह्मणी उद्योगही ह्या संस्कृती उद्योगात मोडतात. आठवडे बाजार, नाशिकचा कुंभमेळा, पंढरपूरची आषाढी-कार्तिकी वारी, कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी, तुळजापूरची भवानी, जेजुरीचा खंडोबा इत्यादी धार्मिक स्थळी भरणाऱ्या जत्रा; मोहरम, नाताळसणातील आर्थिक उलाढाली; जत्रा-उत्सवांच्या प्रसंगी भरणारे सांस्कृतिक बाजार, फिरते विक्रेते आणि धार्मिक सेवा उद्योग यांचे क्षेत्रीय अभ्यास वा अशा आर्थिक उलाढालींची तपशीलवार माहिती मुद्रित स्वरूपात उपलब्ध होत नाही. मात्र महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा समग्र पैस नजरेसमोर यावा म्हणून अशा उद्योगांची नोंद तेवढी येथे घेतली आहे.

गावोगाव फिरणारे कल्हईवाले; सुई,दाभण व भिलावे विकणाऱ्या स्त्रिया; घरोघर जाऊन बांगड्या विकणारे कासार; बर्फगोळे आणि बुढीके बाल विकणारे गाडीवाले; जाते, पाटे, वरवंटे घडवून विकणारे पाथरवट हे फिरते विक्रेते ग्रामीण अर्थकारणातले महत्त्वाचे घटक होते. "फळांचा व्यापार, दलाली हे मुसलमानांचे धंदे. दारावर संत्रे, मोसंबी, द्राक्षे, आंबे तेच घेऊन येत. फळांवर लाल, हिरवे कागद घालून टोपली सजवीत. 'चलो आजाव, संतरा मोसंबी सस्ता लगाया. लुटो' असे ओरडत येत. जनावरांच्या बाजारात दलालीचे काम त्यांचेच. गोड बोलून सौदा जमविण्यात ते पटाईत असत." (भोळे केशवराव, १९७८, पृ. २७) आठवडे बाजारात 'उचले' असायचे. (म्हणजे हल्लीचे पाटीवाले) धान्यधुन्य, कडधान्य, म्हशीला सरकी याच दिवशी विकत घ्यायची रीत असे. त्यामुळे हे मोठाले बोजे उचलायला हे जबरदस्त 'उचले' लागत असत. ते कमरेला एक उपरणेवजा फडके घट्ट लपेटून बांधत, म्हणजे उचलल्यावर ते पेलायला हा कमरेचा आधार पट्ट्यामुळे बळकट होत असे. 'बाजार भरला नाही तोच उचल्यांनी कमरा बांधल्या' ही म्हण या उचल्यांच्या उतावीळपणामुळे पडली होती. . अंधार पडू लागला की राहिलेली भाजी झटकन 'ओपून' भाजीवाले आपल्या खेडेगावाकडे परतायला उतावीळ होत असत. मग भावाची घासाघीस ते फारशी करीत नसत. (भोळे केशवराव, कित्ता, पृ. १२)

कुठल्याही शासकीय नियंत्रणाखाली न येणाऱ्या (Unaregulated) या स्वायत्त

लोकोद्योगांमध्ये कमालीची विविधता आढळून येते. सुतार नांगरापासून बैलगाडीपर्यंत शेतीची अवजारे; घरबांधणीसाठी खांब –वाश्यांपासून दारे-खिडक्यांपर्यंत सर्व लाकूडकाम करतो. परंतु त्याखेरीज मुलांसाठी पांगुळगाडे, भोवरे, भिंगऱ्या, चोखण्या, डुलणारे घोडे, गौर-ठकी, इत्यादी सांस्कृतिक खेळणी आणि फण्या-करंडे इत्यादी माजघरातल्या वस्तूही तयार करतो. सावंतवाडीचा लाकडाची खेळणी तयार करण्याचा गृह-उद्योग यासाठी विशेष प्रसिद्ध होता व आजही आहे. मडकी घडविणारे आणि विटा तयार करणारे कुंभार अक्षयतृतीयेला लागणारे घट, दिवाळसणाला लागणाऱ्या पणत्या, उन्हाळ्यात लोणची घालण्यासाठी लागणारे सट, चिनीमातीच्या बरण्या, पोळ्याला पूजेसाठी लागणारे बैल अशा नगदी उत्पन्न देणाऱ्या वस्तू तयार करतो. गणेशोत्सवात कोकणात आणि महाराष्ट्रातल्या इतर भागातही शाडूच्या गणपतीच्या मूर्ती बनविण्याचा उद्योग करणाऱ्या कलाकारांची घराणी चालत आली आहेत. पेणचे गणपती महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. नागपूरची चितारओळ ही अशा कलात्मक संस्कृती-उद्योगासाठी प्रसिद्ध होती. सोन्या-चांदीचे कलात्मक दागिने घडविणारा सराफा बाजार बहुतेक शहरात असायचा. तांब्या-पितळेची भांडी तयार करणाऱ्या कारखानदारीसाठी नाशिक, चप्पल उद्योगासाठी कोल्हापूर, पैठणी आणि शालू तयार करण्यासाठी येवला व पैठण; हातमागावरच्या कापडासाठी इचलकरंजी, मालेगाव, भिवंडी, नागपूर, नांदेड; सुताच्या चादरींसाठी सोलापूर, तंतूवाद्ये, तंबोरे आणि इतर सांगीतिक वाद्ये तयार करण्यासाठी मिरज; घोडे बाजारासाठी खानदेशातले सारंगखेडे अशी काही गावांची ख्याती होती. पुण्याजवळचे नारायणगाव हे तमाशा कलावंत तयार करून गावोगावी जत्रेला आपले फड पाठविणारे स्थान होते. अमळनेरला सनई-चौघडा वाजविणारे कलावंत खानदेश-बागलाणात गावोगावी लग्नकार्यात वाजंत्री वाजवून कमाई करीत असत. तालुक्याच्या गावी आडतदुकानदारांचा एक वर्ग असायचा. शेतकऱ्यांच्या मालाचा लिलाव झाल्यानंतर माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याच्या वतीने विक्रीची रक्कम स्वतःची आडत (कमिशन), धर्मदाय, पांजरपोळ, नगरपालिकेचे कर, गुदामाचे भाडे वजा करून शेतकऱ्यांना देण्याचे काम हे पेढीवाले करत.

जत्रा उत्सवात तमाशाचे फड, पाळणे, सर्कस, जादूचे प्रयोग, इत्यादी करमणुकीचे व कसरतीचे खेळ करणारे उद्योजक होते. लग्नकार्यात सनई वाजवणारे गुरव आणि बँडची पथके होती, मोहरमला ताबूत तयार करणारे कारागीर होते, नाताळसणाला मेणबत्त्या तयार करण्याचा उद्योग चालत असे. दिवाळसणाला आकाशकंदील आणि संक्रांतीला पतंग तयार करणाऱ्या कारागीरांचीही परंपरा चालत आली आहे. सणावाराला आणि लग्नकार्याला जेवणावळ्या घातल्या जात, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपासाचे व मेजवानीचे पदार्थ तयार करणारे आचारी किंवा महाराज यांचा वर्ग असे. धार्मिक

विधींसाठी लागणाऱ्या पूजासाहित्याकरिता गंध, कुंकू, बुक्का, तुळशीमाळा, रुद्राक्षमाळा, कापसाच्या वाती, कापूर, ऊद, अगरबत्त्या, मेणबत्त्या, पणत्या, अत्तर, ताईत, गंडे, करदोडे, बत्तासे, साखरफुटाणे, शेव-रेवड्या तयार करणारे स्थानिक उद्योग होते; तसेच मेणे, पालख्या, टाळ, मृदुंग, तंबोरे, मोहरमचे ताबूत बनविणारे मोठे उद्योग हे महाराष्ट्राच्या संस्कृतिक अर्थकारणाचे अविभाज्य घटक होते. धार्मिक स्थळी आणि जत्रा-उत्सवात हरिपाठ, मनाचे श्लोक, आरत्या यांचे पॉकेट बुक्स, स्थानमहात्म्य सांगणाऱ्या दंतकथांची पुस्तके, संतांच्या चरित्रकथा, व्रतवैकल्यांच्या कहाण्यांची पुस्तके, नागपंचमीला भिंतीवर डकवण्यासाठी नागनरसोबाची चित्रे, सिनेमांच्या गाण्यांच्या पुस्तिका, दिवाळीला पंचांग, जमाखर्चाच्या वह्या विकणारे दुकानदार, असे कितीतरी संस्कृती-उद्योजक महाराष्ट्राच्या सर्व भागात आढळून येतात. महाराष्ट्रात १९०९ सालापासून दिवाळी अंक छापण्याची परंपरा सुरू झाली होती. अमेरिकेतल्या नाताळ अंकाप्रमाणे का. र. मित्र यांनी 'मासिक मनोरंजन' चा पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध करून या उद्योगाची पायाभरणी केली. त्यानंतर किर्लोस्कर, दीपावली, हंस, मौज, धनुर्धारी, नवयुग, सत्यकथा इत्यादी अनेक दिवाळी अंक निघू लागले. दसऱ्यापासूनच दिवाळी अंकांची बाजारपेठ बहरू लागायची. दिवाळी अंकांच्या अर्थव्यवहारात साहित्यिकांबरोबरच ज्योतिषविशारद, चित्रकार, जाहिरातदार, मुद्रक, वृत्तपत्रविक्रेते अशा अनेकांचा अंतर्भाव असायचा. मुद्रणक्रांतीमुळे विकसित झालेला हा संस्कृती उद्योग ही या कालखंडातली नोंदवण्याजोगी घटना म्हणावी लागेल.

मुंबईसारख्या महानगरात गिरणीकामगारांचा मोठा वर्ग होता; परंतु त्याचबरोबर आपल्या हस्तकौशल्यांवर व पारंपरिक वारशाने चालत आलेले उद्योग करणारा फिरत्या विक्रेत्यांचाही एक मोठा वर्ग होता. बत्तासे विकणारे मारवाडी, पांढरी लुंगी आणि लाल जाकीट परिधान करून नारळाच्या वड्या विकणारी मलबारीण, नाश्त्यासाठी मालपुवा आणि जिलेबी विकणारे काठेवाडी, धोतर-टोपी परिधान करून 'बाजरी-गहू' विकणारा देशी माणूस, वेताच्या टोपलीतून मासे विकणारी कोळीण, तूप आणि पीठ घेऊन ब्रेड तयार करून देणारे बलुची, अलबुखार विकणारा अफगाण पठाण, कुपींच्या पेटीतून अत्तर विकणारे दखणी मुसलमान, नागीलचे पानविडे विकणारे तांबोळी, हातगाडीवरून झारी-कल्हईचे सामान घेऊन घरगुती सेवा देणारे फिरस्ते कारागीर, संध्याकाळी मशिदीसमोर किंवा चौकात बसून तेल मॉलीश करून देणारे व घरगुती औषधोपचार करणारे हकीम, रमझानच्या दिवसात हातागाडीवरून फालुदा विकणारे हलवाई अशी वस्त्यावस्त्यांतून खरेदी-विक्रीचे व्यवहार करणारी दैनंदिन तरंगती ग्राहकपेठ या शहरात अस्तित्वात होती. (Edwards, 1912, P.6-20) मुंबईला हिंदूंची मुंबादेवीची जत्रा, ख्रिश्चनांच्या मेरीची जत्रा किंवा मुसलमानांच्या मोहरम-ऊरुसांच्या धार्मिक जत्रा-उत्सवांच्या निमित्ताने मोठी आर्थिक उलाढाल होत असे. हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन अशा सर्व धर्मीय ग्राहक- विक्रेत्यांची

सामिलकी (religious inclusiveness) हे या सांस्कृतिक बाजाराचे वैशिष्ट्य असे. या सण-उत्सवाच्या निमित्ताने मिळणाऱ्या सवडीच्या काळात गिरणी कामगार आणि कष्टकरी वर्गाला ताणमुक्त व निर्भरशील आनंदात घालविता येण्याची संधी प्राप्त होत असे. त्यामुळे पिराचा ऊरुस असला तरी त्यात मुसलमानांखेरीज अन्य धर्मीय लोकही तेवढ्याच उत्साहाने सहभागी होत असत. कोकणी मुसलमानांचा शेख मग्दुम ऊरूस, माहीमची मगदुमशाह पीराची जत्रा यात वर्षभरात ७० हजारांपासून २ लाखांपर्यंत लोकांचा सहभाग असे.(Nile, 2011,p.70) १९१५ पासून या जत्रांमध्ये तंबूत किंवा जलसागृहांतून संगीत व नाचगाण्याचे आणि सिनेमा दाखविण्याचेही कार्यक्रम होत असत. या कार्यक्रमस्थळी निरनिराळ्या वस्तूंच्या विक्रीची छोटी दुकाने थाटली जात. त्यात पतंग-फुगे आणि खेळणी विकणारे, सोरट आणि जादूचे खेळ करणारे, डफ-तुणतुणे आणि इतर लोकवाद्यांवर गाणी म्हणणारे भाट किंवा शाहीर, मेवा मिठाईची दुकाने असत. इंग्लंडमधल्या औद्योगिक कामगारांच्या करमणुकीतला लाकडी घोड्यांच्या फिरत्या चक्रांचाही प्रकार आता इथल्या जत्रेत दिसू लागला होता. या जत्रेतून धार्मिक इमारती, धर्मस्थळी काम करणारे सेवक व इतर धर्मसेवेसाठी लागणारा निधी जमा केला जात असे. माहीमच्या 'मकदुमशाह पिरा'च्या जत्रेच्या एका वृत्तांतात ह्या धार्मिक बाजाराच्या स्वरूपाचे फार उत्तम सारचित्र आले आहे :

> "Mahim is a small fishing village to the north-west of Bombay Island. In it is situated the tomb of a Muslim saint, or 'pir, called 'Makhdum Shah' in whose honour a fair is held annually. On such an occasion a very gay sight is witnessed. Booths are erected on either side of the long village street, where the vendors of every imaginable species of ware ply a busy trade, and the proprietors of various 'shows' and the promoters of the worship of many Hindu gods, with the help of stentorian lungs and deafening 'music' do their best to attract visitors. Here you may see articles of native make, by the side of Sheffield knives, Wolverhampton locks, and Birmingham toys and brassware as well as German goods. The clothing of everybody is of the brightest possible hue, and the combinations of colour and material would surely baffle the skill of the cleverest plate artist." (Nile, 2017, p. 69)

थोडक्यात चाकू-सुऱ्या, कुलुपे अशा वस्तूंपासून कपडे, पितळेची भांडी अशा

कितीतरी उत्पादनांची विक्री या जत्रा-उत्सवांतून होत असे. देशी व विदेशी वस्तूंची खुली स्पर्धा या मुक्त बाजारपेठेत पहायला मिळते. देशी लघु उद्योगांना, हस्तकलाकौशल्यांना व लोककलावंतांना वाव देणाऱ्या ह्या सांस्कृतिक बाजारांनी देशी अर्थकारणात एक वेगळा आर्थिक आकृतिबंध प्रस्थापित केला होता. अशा तरंगत्या ग्राहकपेठा मुंबईखेरीज इतरही शहरात अस्तित्वात होत्या. स्थानपरत्वे त्यात थोडेफार वेगळेपण मात्र जरूर असायचे. कल्याणच्या डोंगरावर मुसलमानांचा हाजी मलंग शाह बाबांचा दर्गा आणि नाथयोगी मच्छिंद्रबाबाची समाधी व गढीवर दुर्गाडी देवीचे मंदिर असल्याने मुंबईच्या हिंदू आणि मुसलमान कामगारांना ह्या जत्रा मनोविश्रांती आणि हर्ष-उल्हासासाठी आकर्षक वाटायच्या. भिवंडीलाही गावाबाहेर दिवाणशहाच्या जत्रेला कोकणी मुस्लीम आणि ग्रामीण भागातील हिंदू मराठे गर्दी करत. मुंबईपासून तासाभराच्या अंतरावर असलेल्या व रेल्वेने जोडल्या गेलेल्या भिवंडी-कल्याणसारख्या ठिकाणी भरणाऱ्या या जत्रा-उत्सवांना मुंबईकर सहलीला जावे तसे यात्रेला जात असत.

आजही इ-चौपाल, पुण्याचा तुळशीबाग बाजार, ग्राहकपेठा, प्रदर्शनांच्या माध्यमांतून या सांस्कृतिक बाजारपेठांचे नवे नागरी आयाम पहायला मिळतात; पण पारंपरिक सांस्कृतिक बाजारपेठांपेक्षा या नव्या खुल्या बाजारांच्या प्रेरणा आणि आकृतिबंध वेगळे आहेत; त्यांचा ग्राहकवर्गही वेगळा आहे.

## ४.१०. मराठी माणसाचे आर्थिक वर्तन :

विसाव्या शतकातील शेती, व्यापार व औद्योगिक क्षेत्रातील विविध घडामोडींचा मागोवा घेतल्यानंतर सर्वसामान्य मराठी माणसाच्या आर्थिक वर्तनव्यवहारात काही परिवर्तन झाले का याचाही तपास येथे करावयाचा आहे. पैकी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या कारणांचा तपास करताना शेतीक्षेत्रातील आर्थिक वर्तनव्यवहारांचा तपशील आपण यापूर्वी नोंदवला आहे. ग्रामीण समाजातील सामाजिक प्रथा-परंपरामुळे येणारे आर्थिक ताण, भाऊबंदकी, जमिनीच्या बांधावरून व वाटणी-हिस्स्याच्या वादातून चालणाऱ्या कोर्टकचेऱ्या; कचेऱ्यातील भ्रष्टाचाराची उदाहरणे आपण यापूर्वी पाहिली आहेत. व्यसने, सट्टेबाजी यामुळेही आर्थिक फटके खाण्याची वेळ शेतकऱ्यांवर वारंवार येत असे. शहरी मध्यमवर्गीयांना वर्तमानपत्रांतून कोडी, साखळ्या, आंकडे यांच्या माध्यमांतून जुगाराच्या सवयी लागत; लॉटरीची तिकिटे घेऊन कष्टाविना पैसा मिळविण्याची लालसा वाढविणारी उद्दिपके समाजात उपलब्ध होती; शहरात घोड्याच्या शर्यतीवर लोक पैसे लावीत, जत्रेत आणि आठवडे बाजारातही जुगाराचे खेळ चालत, त्याकडे तरुणांचा ओढा असे. मराठी माणसाच्या ह्या कष्टाविना फुकटचा पैसा मिळविण्याच्या प्रवृत्तीविषयी व त्याला सार्वजनिक जीवनातही मिळणाऱ्या प्रोत्साहक वातावरणाविषयीचे एक तत्कालीन निरीक्षण इथे नमुन्यादाखल उद्धृत करीत आहोत :

"कापसाचे सट्टेबाजीने मनुष्य लक्षाधीश होतो, या कल्पनेने तेजीमंदीचे आंकडे लावणारे लोक मुंबईत निदान ८० टक्के व पुण्यांत कॉलेजचे विद्यार्थी शे. ५० टक्के तरी खास आढळतील! राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी, किंवा जगांतील बातम्या कळण्यासाठी लोक वर्तमानपत्रे वाचीत नसून 'आज आंकडा कोणता आला' हे पाहण्यासाठीच सकाळी 'पेपर' चाळताना आढळतात!.. एक रुपयाला नऊ रुपये मिळविण्याचा हा विनासायासाचा मार्ग मोकळा असताना, लोकांनी श्रम काय म्हणून करावेत? जमीनसुद्धा इतक्या पटींनी पिकत नाही; कोणतीही बँक इतके उत्पन्न देत नाही. महाराष्ट्रातील यशस्वी कारखानदार किर्लोस्करसुद्धा घातलेल्या रकमेवर इतके समाधानकारक डिव्हिडंड देऊ शकणार नाहीत! तेव्हा इतके भरमसाठ पीक देणारे 'बागाईत' करण्याचा मोह मजुरापासून तो श्रीमंत माणसापर्यंत सर्वांना पडावा यात आश्चर्य ते कोणते? अशा रीतीने दरएक जुगारी 'लखपती' कुबेर होण्याचा संभव असता तो कोण लाथाडील? अहमदाबादेपासून भुसावळपर्यंत व खाली बेळगावपर्यंत आंकडे कळण्यासाठी मुंबईशी रोज तारा व पत्रव्यवहार होत असतो. अनेक बैरागी, साधु, ज्योतिषी यांना 'अंतर्ज्ञान' होऊन त्यामुळे शेकडो लोक धुळीस मिळाले तर आश्चर्य कोणते? सरकार याला कडक उपाय योजित नाही. 'तेजीमंदीच्या आंकड्याचे बील' कौन्सिलांत आले असता गेल्या साली ते बहुमताने फेटाळले गेले व 'हा व्यवहार बंद केला तर शहरांत चोऱ्या जास्त होतील' असे मत पोलीस कमिशनर यांनी व्यक्त केले यांत काही नवल नाही. या बिलाचे वेळी 'लोकांत व्यसनांचा फैलाव न करिता त्यांना आळा घालण्याकडे सरकारी प्रवृत्ती असावी, ते बाजूला राहून उलट व्यसनांचा फैलाव करण्यांत सरकार गुंतले आहे, हे ठीक नाही' असे सर रफीउद्दीन अहमद यांनी सरकारला बजाविले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही." (वाघ, १९३९, पृ. २५-२६)

दारूबंदीचे उच्चाटन करून मराठी माणसाच्या कर्तृत्वशक्तीच्या अपव्ययाला थोपवण्याचा प्रयत्न गांधीजींच्या पुढाकाराने कॉंग्रेस करीत होती; पण सरकारात मात्र सट्टे पद्धती,लॉटऱ्या, रेसेस बंद करण्याची कुठलीच कारवाई होत नव्हती. त्यामुळे सार्वजनिक जीवनातली कर्तृत्वशक्ती आटते व त्याचा महाराष्ट्राच्या उत्पादक श्रमांत घट होते, याचा गांभीर्याने विचार राजकीय अर्थनीती घडविणाऱ्या कारभाऱ्यांनी केला नाही, हे मात्र खरे.

सार्वजनिक बांधिलकी न मानता व्यक्तिगत फायद्यासाठी आयकर, विक्रीकर इत्यादींची करचुकवेगिरी करण्यात मराठी माणसाला संकोच वाटत नसल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. मुंबई राज्यात दरसाल ८० कोटी कर चुकविला जातो अशी नोंद इन्कमटॅक्स इन्वेस्टिगेशन कमिशनच्या अहवालात आढळते. (बॉम्बे क्रॉनिकल, १८ सप्टेंबर १९४९) बरेच व्यापारी आपले सर्व उत्पन्न जमाखर्चाच्या वह्यात दाखवत नाहीत. सरकारने नफेखोरीच्या प्रवृत्तीतून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी केलेल्या संरक्षक

यंत्रणाही भ्रष्ट झाल्याची उदाहरणे आहेत. साखर कारखान्यांनी नफा मिळवण्यासाठी बेसुमार भाववाढ करू नये म्हणून सरकारने १९३७ साली साखरकारखानदार संघ स्थापन केला. या संघाने साखरवितरणासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावेत अशी योजना केली असल्यामुळे भाववाढ नियंत्रणाची समस्या सोडविण्यात सरकारला बऱ्याचदा यश मिळाले. परंतु साखरकारखानदार संघाने सरकारचे बंधन झुगारून भाववाढ केल्याची, देशाबाहेर साखर पाठवून कृत्रिम टंचाई निर्माण केल्याची काही प्रकरणेही झाली. संघाचे सभासद व अधिकाऱ्यांनी मिळून भ्रष्टाचार करण्याच्या प्रवृत्तीमुळे सरकारी नियंत्रणाची योजना कागदावरच राहिली. (सोवनी, नवभारत, सप्टेंबर,१९५०) औषधांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटवर सोपविण्यात आली. तिथेही १९४९ साली ३४० औषधांपैकी १६८ औषधांत भेसळ आढळली, १९५० साली ३९ टक्के औषधे हीन दर्जाची होती. ही सर्व औषधे बाजारात अस्सल प्रमाणित औषधे म्हणून विकली जात होती.

१९३४ साली बडोद्याच्या कलाभवनच्या वार्षिक पारितोषिक वितरणाच्या भाषणात सयाजीराव गायकवाड यांनी मराठी माणूस आर्थिक क्षेत्रात पिछाडीवर का राहिला याची मीमांसा करताना म्हटले होते की, "हिंदी उद्योगधंदे लुळे-पांगळे होण्याचे एक बहुतांशी प्रमुख कारण असेल तर ते सहकार्य व विश्वास यांचा अभाव हेच होय. कोणताही धंदा काय किंवा संस्था काय नीट, बिनबोभाट व सर्वत्रांच्या हितार्थ चालविणे असेल तर त्यासाठी एकमेकांवर विश्वास ठेवणे व एकमेकांशी मिळतेजुळते घेणे या दोन गोष्टी, गाडीला जसे वंगण तशा, अत्यंत आवश्यक गोष्टी आहेत. परंतु एकमेकांचे नुसते दोष काढीत बसण्याची जी खोड कधीची आपल्या लोकांना लागली आहे तिच्यामुळे संस्था, धंदा वगैरे सामुदायिक कार्याचा आपल्या हातून हटकून बोजवाराच उडत असतो, (वरखेडे, संपा.२; २०१४ पृ. १३८)

अर्थात या कालखंडात मराठी माणसांनी अर्थ-उद्योगाच्या क्षेत्रात काही चांगले नमुनादर्शही घालून दिलेत. शहरी भागात औद्योगिक कामगारांनाही अल्प वेतन, महागाईचे चटके बसल्याने दैनंदिन जीवनात अत्यंत काटकसरीने दिवस कंठावे लागण्याचे प्रसंग या काळात आले. अशा प्रसंगी कामगारांना कर्जमुक्त करण्यासाठी ना. म. जोशी यांच्या 'सोशल लीग सर्व्हिस'ने काढलेल्या 'ऋणविमोचन सोसायट्या' किंवा कामगार संघटनांनी मालकांचे सहकार्य घेऊन 'कामगार कल्याण केंद्रे' काढून कामगारांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न ही या कालखंडातील सार्वजनिक जीवनातली सर्वात महत्त्वाची फलश्रुती म्हणायला हवी.

शहरातल्या औद्योगिक कामगारांच्या तुलनेत ग्रामीण कारागिरांच्या कामांमध्ये वा जीवनमान सुधारण्यात या काळात कुठलेही रचनात्मक वा गुणात्मक बदल झालेले दिसत

नाहीत. यांत्रिक बदलांचा या ग्रामीण कारागिरांच्या कामावर फारसा परिणाम अद्याप झालेला नव्हता. ब्रिटिशांनी कारकून तयार करणाऱ्या शिक्षणावर जितका भर दिला तितका तांत्रिक शिक्षणावर दिला नाही. त्यामुळे ग्रामपातळीपर्यंत उद्योगधंद्यात आधुनिक तंत्रविज्ञानाचा विस्तार अद्याप झालेला नव्हता. त्यामुळे ग्रामोद्योगांचे आधुनिकीकरण कुंठिवास्थेतच राहिले होते. मात्र दळणवळणाच्या सोयीसुविधांचा जसजसा विस्तार होत गेला तसतसे ग्रामीण कारागिरांचे शहरांकडे स्थलांतर सुरू झाले. ज्या ग्रामोद्योगांना वतने होती व ग्रामव्यवस्थेत वर्षभर पुरणारे काम होते असे कारागीर सोडल्यास इतरांनी शहरात जाणे पसंत केले. लोहार आणि सुतार, धोबी, चर्मकार यांचे स्थलांतर तुलनेने अधिक होते.

**अर्थसाक्षरता :**

आर्थिक क्षेत्रातील नव्या बदलांकडे डोळसपणे पाहण्यासाठी लागणारी 'अर्थसाक्षरता' मराठी माणसाकडे नव्हती. ही गरज लक्षात घेऊन वृत्तपत्रांनी मराठी भाषकांची अर्थसाक्षरता वाढविण्याचे प्रयत्न जाणिवपूर्वक केलेले दिसतात. अशा प्रकारच्या लेखनाचा सर्वांगीण परामर्श घेणे या प्रकल्पाच्या व्याप्तीत बसणारे नसले, तरी प्रातिनिधिक स्वरूपात त्यावेळच्या 'केसरी'तून न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या लेखांचा निर्देश करता येईल. राज्याच्या आर्थिक विकासात बँका आणि विमा कंपन्याचा वाटा मोठा वाटा असतो. विसाव्या शतकात सरकारच्या इंम्पिरिअल बँकेखेरीज लोकसहभागातून सहकारी बँका स्थापन होऊ लागल्या होत्या. एकट्या पुण्यात 'पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक ', 'कॉसमॉस अर्बन बँक ', 'मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक ', 'डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँके' ह्या सहकारी बँकांचे जाळे उदयाला आले होते. या पार्श्वभूमीवर केळकरांनी 'आमच्या स्वदेशी पेढ्या', स्वदेशी पेढ्यांची धांदल', 'पतपेढ्या व स्वावलंबन', 'रिझर्व्ह बँक अथवा गंगाजळी' असे लेख लिहिले. स्वत: केळकर हे सहकारी परिषदेचे अध्यक्षही होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने सहकारी चळवळ कशी फलदायी आहे याविषयी जनमत जागृती करणारे लेखन केले. सहकारी पेढ्या स्वावलंबी होण्यासाठी सहकारी पेढ्यांना भांडवल पुरवठा कसा करता येईल याविषयीचे दिग्दर्शन त्यांनी केले.

१९२७ साली कायदेमंडळात 'रिझर्व्ह बँक ' स्थापन करण्यासंबंधीचे विधेयक मांडण्यात आले, त्यावेळी कायदेमंडळातील भाषणाखेरीज केळकरांनी या बँकेचे स्वरूप व कार्य याची माहिती करून देण्याच्या उद्देशाने 'रिझर्व्ह बँक अथवा गंगाजळी', 'रिझर्व्ह बँक बिलाचे भांडण' असे लेख लिहून लोकांची अर्थसाक्षरता वाढविण्याचे प्रयत्न केले. रिझर्व्ह बँक म्हणजे 'पेढीवाल्यांची पेढी' (Bankers' Bank) असा नेमका मराठी प्रतिशब्द सुचविला. या बँकेच्या कामाची व्याप्ती स्पष्ट करताना बँकांना हुंड्या वटवून रोकड पुरविणे, नव्या नोटा छापून चलनात आणणे, चलनाच्या संदर्भातले सर्व व्यवहार करणे ही रिझर्व्ह

बँकेची कामे त्यांनी लक्षात आणून दिली. रिझर्व्ह बँकेच्या गंगाजळीचा उगम कसा होतो हे समजावून सांगताना ते 'पेपर करन्सी रिझर्व्ह' आणि 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व' या अपरिचित संकल्पनांचा सुलभ भाषेत परिचय करून देतात. त्यासाठी योग्य पर्यायी मराठी पारिभाषिक संज्ञाही सुचवितात. उदाहरणार्थ, पेपर करन्सी रिझर्व्हसाठी 'चलनी नोटांबाबतची गंगाजळी' व व 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' साठी 'सुवर्णमापनाची गंगाजळी' या मराठी संज्ञा सुचवितात. या नव्या संकल्पना त्यांनी अतिशय सुबोधपणे समजावून सांगितल्या आहेत. पेपर करन्सी रिझर्व्ह : सरकार ज्या नोटा काढते, त्या नोटा सरकारी खजिन्यात केव्हाही परत नेऊन दिल्यास, त्या नोटांवर लिहिलेल्या रकमेचे रुपये देण्यास सरकार बांधलेले असते; व म्हणून अशा रकमा केव्हाही मागणी आल्यास रोख चांदीच्या रुपयांत देण्यासाठी म्हणून सरकार काही एका विवक्षित प्रमाणांत चांदीचे रुपये गंगाजळीच्या रूपाने ठेवते, ह्या काढून ठेवलेल्या रकमेस 'पेपर करन्सी रिझर्व्ह' म्हणतात. गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह : हिंदुस्थानांतील चांदीच्या रुपयांशी सोन्याच्या किंमतीचे जे प्रमाण कायदेशीर रीतीने बसविले आहे, त्यात सोन्याचांदीच्या भावाच्या चढ-उतारामुळे जर रुपयाची किंमत कमी झाली तर त्यावेळी ती तूट भरून येण्यासाठी म्हणून एक स्वतंत्र निधी सरकारने उत्पन्न केला आहे, त्यास गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' म्हणतात.

अशा प्रकारच्या अर्थसाक्षरतेबरोबरच सामान्य माणसाला अर्थकारणामागचे वसाहतवादी राजकारण कळावे म्हणून या संकल्पनांच्या मागच्या मतलबी अर्थव्यवहारही ते उलगडून सांगतात. उदाहरणार्थ, चलनी नोटांची गंगाजळी आणि सुवर्णमापनाची गंगाजळी यासाठी राखून ठेवलेला निधी भारतात न ठेवता लंडनला ठेवण्यात येतो. या निधीचा उपयोग हिंदी व्यापाऱ्यांना न देता इंग्रजी व्यापाऱ्यांना व्यापारी प्रोत्साहन म्हणून अल्प व्याजाने कर्जाऊ रकमा देण्यासाठी केला जातो. ब्रिटिश ही मखलाशी हुंडावळणीचे दर ठरवितानाही कशी करतात, हेही केळकर आपल्या वाचकांना 'हुंडणावळीचा घोटाळा' या लेखातून समजावून सांगतात. हिंदुस्थानात रुप्याच्या नाण्याचे चलन असते, तर विलायतेत सोन्याच्या नाण्याचे चलन असते. विदेशात माल खरेदी करण्यासाठी रक्कम भारतीय चलनात देऊन चालत नाही, ती पौंडात द्यावी लागते. सोन्या-रुप्याची किंमत नित्य बदलत असते, या चढ-उताराचा व्यापारी फायदा देशवासीयांना मिळण्याऐवजी विलायतेतील व्यापाऱ्यांना मिळतो. कारण रुप्याच्या किंमतीत कृत्रिम चढ-उतार करून वा हुंडणावळीच्या दरातील चढ-उतारांच्या माध्यमातून वसाहतवादी कपटनीतीने इंग्रज लोक भारतीयांचे आर्थिक शोषण करीत रहातात. (केळकर वाढदिवस मंडळ, १९३२, पृ. २०८-२१०) अशा प्रकारे केवळ संकल्पनात्मक पातळीवरची अर्थसाक्षरता नाही, तर अर्थकारणातली राजकीय बाजू लक्षात घेऊन लोकांची आर्थिक समज वाढविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न या काळात झालेले दिसतात.

या कालखंडात महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी प्रसंगोपात्त दिलेल्या भाषणातून समाजाची अर्थसाक्षरता वाढविण्याचे काम निष्ठापूर्वक केलेले दिसून येते. विकासासाठी आधुनिक ज्ञानविज्ञानाचा लोककेंद्री वापर वाढविणारा राजा म्हणून गायकवाड महाराजांच्या विचारांचे वेगळे महत्त्व आहे. राष्ट्राची सांपत्तिक वाढ करण्याविषयी या काळात झालेल्या चिंतनचर्चेत वेगेवेगळे मतप्रवाह चर्चेत होते. फिजिओक्रॅट पंथीय अर्थशास्त्रज्ञांच्या मते राष्ट्रीय संपत्ती ही शेतीच्या उत्पादनातूनच प्रामुख्याने निर्माण होत असते. परंतु शेतीची परिस्थिती दुष्काळ, सिंचनसुविधांचा अभाव व निसर्गाच्या लहरीमुळे इतकी बेभरवशाची आहे की, तीवर भीस्त ठेवून राष्ट्रीय संपत्ती वाढीचे स्वप्न पहाणे शहाणपणाचे होणार नाही, असे म्हणणाराही एक वर्ग होता.'मर्कन्टालिस्ट' पंथियांच्या मते देशांतर्गत व विदेशी व्यापारातूनच खरी संपत्ती निर्माण होत असते, त्यामुळे व्यापारवृद्धीवर भर दिला पाहिजे. 'क्लासिकल' अर्थशास्त्रज्ञांच्या मते श्रमाने मूल्याची निर्मिती होत असते, त्यामुळे अर्थोत्पादनाविषयी किंवा राष्ट्राच्या संपत्तीवाढीच्या विचारात मानवी श्रमांना केंद्रवर्ती स्थान दिले पाहिजे. महाराजा सयाजीराव गायकवाड ह्या तिन्ही विचारांचा त्रिवेणी संगम साधणारा व्यवहारवादी दृष्टिकोन मांडत असत. अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडणाऱ्या शेतीक्षेत्रात पाटबंधारे, विहीरी, कालवे अशी शाश्वत विकासाची कामे सुरू करण्यावर त्यांचा भर होता. इरिगेशनचे दुष्परिणाम टाळण्यासाठी ड्रेनेजपद्धती, अतिपाण्याने होणारा उपद्रव टाळण्यासाठी कृत्रिम खतांचा उपयोग, पडीक जमिनीत गुरांसाठी पोषक चाऱ्याची लागवड, हाडांपासून खत तयार करण्याचे उपाय ते सुचवतात. जंगलसंपत्तीचे संवर्धन, भूमिगत खनिजांचा शोध यावर भर देऊन नैसर्गिक संपत्ती निर्माणाची क्षेत्रव्याप्ती वाढविणाचे उपाय ते सुचवितात. कृषी आणि उद्योग क्षेत्रांत सांगड घालण्यासाठी बीट, ऊस, कपाशी या नगदी पिकांची लागवड आणि शेतकऱ्यांना पूरक औद्योगिक-तांत्रिक कौशल्यशिक्षणाची जोड इत्यादी उपाय ते सुचवतात. दळणवळणाच्या मार्गांचे जाळे विस्तारण्यावर, बँका आणि पतपेढ्यांची व्याप्ती वाढविण्यावर, निर्यातीवरील कर समूळ नष्ट करण्यावर भर दिला तर राष्ट्राच्या संपत्ती वाढीचा वेग वाढेल अशा प्रकारचे विचार आपल्या भाषणातून सातत्याने मांडून गायकवाड महाराजांनी अर्थसाक्षरतेचे कर्तव्य निभावले होते. १९०६ साली कलकत्त्याच्या औद्योगिक परिषदेत त्यांनी केलेले भाषण आर्थिक अवगुंठणाची मीमांसा करणारे आणि भविष्यकालीन आर्थिक विकासाचे संकल्पचित्र रेखाटणारे आहे.औद्योगिक साधने वाढविण्याइतकेच संघशक्ती, परस्परविश्वास आणि नि:स्वार्थीपणा ह्या गुणांची वाढ ही आर्थिक विकासासाठी पायाभूत असल्याचे मत त्यांनी या भाषणात मांडले होते. (वरखेडे, संपा. २; २०१४, पृ. १०२-१३६)

## ४.११. स्वातंत्र्योतर अर्थकारणाची दिशा :

स्वातंत्र्योत्तर भारताच्या व महाराष्ट्राच्या अर्थकारणाची दिशा ठरविण्याचे काम स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच १९४४ साली मध्यवर्ती सरकारने स्थापन केलेल्या 'योजना व विकास खात्या'ने सुरू केले होते. १९४६ साली या खात्याला पूरक असे नियोजन सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले. या नियोजन सल्लागार मंडळाच्या विचारमंथनातूनच स्वातंत्र्योत्तर भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण आकाराला आले. १९४८ साली स्वतंत्र भारताचे औद्योगिक धोरण जाहीर झाले. सामाजिक न्यायाला केंद्रस्थानी ठेवून अर्थोत्पादन व रोजगारवाढीला चालना देणारे धोरण जाहीर करण्यात आले. या नव्या औद्योगिक धोरणानुसार शासकीय उद्योगांची स्थिती पूर्वीप्रमाणेच पुढे कायम राहील, पायाभूत उद्योगांचा अपवाद वगळता खाजगीउद्योगांचे राष्ट्रीयीकरण न करता त्यांच्या वाढीला पोषक वातावरण राहील असे ठरविण्यात आले. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यक तेवढे नियंत्रण ठेवून खाजगी उद्योगांना पूर्ण स्वातंत्र्य देण्याची अर्थनीती ठरविण्यात आली. किमान दहा वर्षे तरी खाजगी उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार करू नये हे स्पष्ट करण्यात आले. १९४८-४९ साली एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सरकारी उद्योगांचा वाटा केवळ २.८ टक्के होता. १९२३ च्या पहिल्या राजकोषीय आयोगाच्या शिफारशींनुसार चालणाऱ्या आर्थिक धोरणाचा पुनर्विचार व्हावा यासाठी १९४९ साली दुसरा राजकोषीय आयोग नेमण्यात आला. या दुसऱ्या आयोगाच्या शिफारशींचा प्रभाव १९५० नंतरच्या अर्थकारणावर कसा पडला ह्याची चर्चा तिसऱ्या खंडात येईल.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिवशी जवाहरलाल नेहरू यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात 'लोकशाहीचे राजकारण' आणि 'दारिद्र्यनिर्मूलनाचे अर्थकारण' या दोन ध्येयांचा उल्लेख केला होता :

"The future beckons to us. Wither do we go and shall be our endeavour? To bring freedom and opportunity to common man, to the peasant and workers of India; to fight and end poverty and ignorance and disease; to build up a prosperous, democratic and progressive nation; and to create social, economic and political institutions which will ensure justice and fullness of life to every man and woman." (Nehru, 1950, p. 3)

शेवटी लोकशाहीचे मूल्य केवळ साधनात्मक मोजपट्टीने जोखायचे नसते; तर आर्थिक संसाधनातून (Hard power) प्राप्त होणाऱ्या अंतिम श्रेयसातून (Soft power) लक्षात घ्यावयाचे असते. शेती, व्यापार आणि सावकारी या त्रिमितीत फिरणाऱ्या भारतीय अर्थव्यस्थेला औद्योगिक अर्थकारणाचे व संपत्तीच्या समन्यायी पुनर्वाटपाचे नवे परिमाण

देणारे स्थित्यंतर घडवून आणण्याच्या दिशेने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय अर्थकारणाची वाटचाल सुरू झाली होती, असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येतो.

## ४.१२. इतिकथन :

१. विसाव्या शतकात महाराष्ट्राने अर्थव्यवहारात अनेक चढ-उतार पाहिले. युद्धकाळात जपानने कापसाची खरेदी वाढवल्यावर खानदेश-वऱ्हाडच्या शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला, जमिनीच्या किंमती वाढल्या. पाटाचे पाणी उपलब्ध झाल्याने ऊसाचे नगदी पीक घेऊन पैसा कमावता आला, साखरकारखानदारीचा उद्योग विस्तारायला त्यामुळे मदत झाली. सहकारी कर्जसोसायट्या स्थापन झाल्याने शेतकऱ्यांना बी-बियाणे व खतांसाठी अल्प व्याजाने पैसे मिळू लागले; शेतीच्या उत्पन्नावर त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले. कूळकायदा व भूनियंत्रण कायदा यामुळे जमिनीचे पुनर्वाटप करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होऊन खंडकरी शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. दुसरीकडे दुष्काळाचे फेरे अधून मधून सतत वाट्याला आल्याने ग्रामीण भागातील लोकांपुढे गंभीर प्रश्नही निर्माण होत होते. मात्र मुंबई शहराची औद्योगिक वाढ झाल्याने अहमदनगर-सोलापूरच्या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांना व कोकणातील गरीब लोकांना रोजगारासाठी स्थालंतरित होऊन उपजीविकेचा एक पर्याय खुला होता.

२. विसाव्या शतकात औद्योगिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचा मुंबईबाहेर विस्तार होऊ लागला ही या कालखंडातली एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी, वालचंदनगर, कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी, सोलापूर, बेळगाव येथे; उत्तर महाराष्ट्रात कोपरगाव, रावळगाव, श्रीरामपूर इत्यादी ठिकाणी साडेचारशेहून अधिक कारखाने सुरू झाले. त्यामुळे ग्रामीण भागातील हजारो लोकांना रोजगार मिळाला.

औद्योगिक क्रांतीपूर्वीची आर्थिक भरभराट ही प्रामुख्याने व्यापारातून झाली होती. पण ज्ञानक्षेत्रातील क्रांतीमुळे साधनस्रोतांत आणि तंत्रात ज्या आमुलाग्र सुधारणा झाल्या त्याची फळे विसाव्या शतकातील आर्थिक वृद्धीत चाखायला मिळाली. व्यापार-उद्योगात यंत्रसामुग्री, गुदामे, कारखाने इत्यादी भौतिक-तांत्रिक संपदेचा वापर या कालखंडात वाढला आणि त्यामुळे अर्थोत्पादनाचे क्षितिज विस्तारले. अर्थोत्पादनासाठी पैसा आणि भौतिक वा रूपांतरित साधनसामुग्रीखेरीज मानवी भांडवल महत्त्वाचे असते. ह्या साधनसंपदेचा सर्जक वापर करणारी बौद्धिक व कारक कौशल्यक्षमता ही पायाभूत संपत्ती असते हे विसाव्या शतकातील या उद्योजकांच्या यशोगाथांवरून स्पष्ट होते. दोराबजी टाटा, लक्ष्मणराव किर्लोस्कर, वालचंद हिराचंद, सोमय्या शेठ, या औद्योगिक घराण्यांचे यादृष्टीने महत्त्वाचे योगदान राहिले आहे. कालबाह्य झालेल्या कौशल्यांच्या जागी नवी कौशल्ये आत्मसात करण्याची प्रवृत्ती या सांस्कृतिक वारशातून येत असते. हा

सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होतो, हे या कालखंडात उद्योगविश्वातील टाटा, किर्लोस्कर आणि सोमय्या घराण्यांनी सिद्ध केले. कष्ट, विश्वासार्हता, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि ज्ञानात्मक कौशल्य संपादनाची तृष्णा हे गुण या घराण्यांमध्ये प्रत्येक पिढीत संक्रमित होत गेलेले आहेत. या उद्यमशील घराण्यांनी मानवी भांडवल विकसित करण्याला महत्त्व दिल्यानेच हे उद्योग यशस्वी झालेले आहेत.

'चेंबर ऑफ कॉमर्स'सारख्या संस्था स्थापन करून व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी केलेल्या संघटनात्मक प्रयत्नांचाही यात महत्त्वाचा वाटा होता. काँग्रेसनेही औद्योगिक व शेतीविषयक प्रदर्शने भरवून काही प्रमाणात प्रेरणादायी वातावरण तयार केले होते. शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या उत्पादनाचे प्रदर्शन हा एक सार्वजनिक शिक्षणाचा मार्ग आहे, असे समजून ही प्रदर्शने भरविली जात होती. १९०६ साली सातारा जिल्ह्यात कऱ्हाड येथे असे प्रदर्शन भरवून लोकशिक्षणाचा यशस्वी प्रयोग करण्यात आल्याची नोंद आढळते.(गोखले पुरुषोत्तम,१९६६, पृ. ६२) बडोदे संस्थान तर शेती व औद्योगिक क्षेत्रातील प्रदर्शने भरविण्यात बरेच पुढे होते.

३. विसाव्या शतकात गांधीजींनी ग्रामकेंद्री अर्थव्यवस्थेला चालना देण्याची भूमिका घेतली होती, हे खरे असले तरी खेड्यापाड्यात उद्योजकता वाढीला लागल्याचे चित्र दिसत नाही. चर्मोद्योग, दोरखंड वळणे, कुंभारकाम, सुतारकाम, मधमाशापालन ह्या उद्योगांना स्वतःच्या पंचक्रोशीबाहेर जाऊन बाजारपेठ मिळवता येईल अशा व्यवस्था निर्माण झाल्या नसल्याने ग्रामोद्योग अजूनही कुंठितावस्थेत होते. खेड्यांत वीज पोहचली नसल्याने ग्रामोद्योगात यांत्रिक उपकरणांचा वापर वाढविण्याला मर्यादा होत्या. त्यामुळे महाराष्ट्रात जपानसारखी लघुद्योगांच्या विकासाला गती मिळाली नव्हती. ब्रिटिश सरकारने उद्योजकांना अनुदाने , परितोषिके, करसवलती, तांत्रिक सल्ला वा प्रशिक्षण सेवा पुरविण्यासाठी पुढाकार घेतला नसल्यानेही ही स्थिती निर्माण झाली होती. विदर्भ-मराठवाड्यात आधुनिक उद्योगधंदे सुरू करण्यासाठी उद्योजक पुढे सरसावताना दिसत नव्हते. सरकारी क्षेत्रातील सार्वजनिक उद्योगही या भागात फारसे सुरू झाले नाहीत, त्यामुळे विदर्भ-मराठवाड्याचा आर्थिक अनुषेष कायम राहिला. वीज, कोळसा, पोलाद, पेट्रोलियम पदार्थ, विद्युतनिर्मिती ही औद्योगिक विकासाला चालना देणारी पायाभूत संसाधने उपलब्ध होण्यासाठी जोपर्यंत अग्रक्रमाने गुंतवणूक होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा आलेख जलद गतीने वर जाणार नाही, हे दिसत होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील ही स्थिती स्वातंत्र्योत्तर काळातील पंचवार्षिक नियोजनामुळे कितपत बदलली हा स्वतंत्र मुद्दा आहे; त्याची चर्चा प्रस्तुत कालमर्यादेतील विवेचनात अभिप्रेत नाही.

४. ब्रिटिश राजवटीत भारताचे धननि:सारण झाले ही बाजू जितकी खरी आहे, तितकेच त्यांनी वसाहतवादी स्थैर्यासाठी योजलेल्या प्रशासकीय तंत्रांमुळे इथल्या अर्थव्यवस्थेला काही आनुषंगिक फायदेही मिळाले. ब्रिटिशांनी संपूर्ण भारतासाठी एक चलन आणले, संपूर्ण भारताला जोडणारी दळणवळण यंत्रणा निर्माण केली, संपूर्ण देशासाठी समान कायदे, समान न्यायाची परिभाषा रुजवली. त्याचा काही अंशी स्थानिक उद्योजकांना फायदा मिळाला. अर्थात असे असले तरी भारताचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे, संपत्तीच्या समन्यायी वाटपासाठी व्यवस्था निर्माण करणे हे विषय ब्रिटिशांच्या उद्देशपत्रिकेत अग्रक्रमाने कधी आले नाहीत. उलट थेट करवसुलीतून उत्पन्न मिळविण्याची व तैनाती फौजा लादून संस्थानिकांकडून एकरकमी खंडणी वसूल करण्याची आर्थिक शोषणाची क्लृप्ती त्यांनी शोधून काढली. भारतीय चलन आणि ब्रिटिश चलनातील विनिमयमूल्यांच्या तफावतीचे धोरण राबवून पद्धतशीरपणे धन लुटले. ह्या वसाहतवादी राजवटीचा अंकुश दूर सारण्यातच आपल्या स्वदेशी चळवळीची सर्व शक्ती खर्च झाली, त्यामुळे वसाहतवादी अर्थनीतीला शह देणारी पर्यायी अर्थनीती घडविण्यासाठी लागणारा मुक्त अवकाश आणि सवड आपल्याला लाभली नाही. त्यामुळे जपान, जर्मनी, चीन, रशिया इत्यादी देशांमध्ये ज्या प्रकारचे समग्र आर्थिक स्थित्यंतर या काळात झाले, तसे भारतात होऊ शकले नाही. उद्योगपतींच्या पायाभूत उत्पादन प्रकल्पांचे काही प्रयोग मात्र अर्थव्यवस्थेतील दीर्घकालीन परिवर्तनासाठी पथदर्शक ठरले, ही त्यातल्या त्यात जमेची बाजू म्हटली पाहिजे.

५. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आर्थिक विचारांमध्ये नैतिक आणि भौतिक मूल्यांच्या अग्रक्रमावरून सरळ सरळ द्विध्रुवात्मक विभागणी झालेली आढळते. गांधीजी हे नैतिक अर्थकारणाचे पुरस्कर्ते होते, तर जवाहरलाल नेहरू हे भौतिक व उपयुक्ततावादी अर्थकारणाचा पुरस्कार करणारे नेते होते. विनोबा भावे यांची भूदानयज्ञाची संकल्पना, जयप्रकाश नारायण यांचा सर्वोदयवाद यांची वाटचाल गांधीजींच्या नैतिक अर्थकारणातून झालेली दिसते; तर भारताच्या पंचवार्षिक नियोजनाची संकल्पना नेहरूंच्या भौतिक व उपयुक्ततावादी अर्थकारणातून विकसित झालेली दिसते. या दोन्ही अर्थविचारांचा समतोल साधण्याची कसरत भारताच्या राजकीय अर्थकारणात वारंवार झालेली आढळून येते. कृषिकेंद्री अर्थव्यवस्था आणि भांडवलवादी अर्थव्यवस्था यांच्यातले पेच या कालखंडात वारंवार डोके वर काढताना दिसतात. गांधीजींच्या ग्रामवादात आर्थिक व सांस्कृतिक मूल्यांचा समतोल (कारू-नारू संस्कृती) साधण्यावर भर होता; नेहरू-सुभाषचंद्र बोस यांच्या अर्थविचारात यंत्र-अवजारे व मानवी श्रम यांना उत्पादक मूल्य म्हणून महत्त्व होते व मानवी श्रमाकडे भांडवली मूल्य म्हणून पाहिले जात होते. डांगे, रॉयवाद्यांच्या अर्थविचारात शहरकेंद्री कारखानदारी व मालक-मजूर वर्गविग्रहाला व

जमीनदारांच्या मिळकतीचे सामाजिक विभाजन याला महत्त्व प्राप्त झाले होते. बेकारी आणि महागाई हे त्यांना अर्थकारणातले सगळ्यात मोठे प्रश्न वाटत होते. सरकारी हस्तक्षेपाने हे प्रश्न सोडवण्यावर त्यांचा कटाक्ष होता. याउलट उत्पादन वाढले तर महागाई घटते असे मानणाऱ्या पक्षाला उद्योगधंद्यात गुंतवणूक वाढेल अशी अर्थनीती घडविण्यावर भर द्यावा असे वाटत असे. स्थूलमानाने विसाव्या शतकातल्या पन्नास वर्षांत अर्थविचारात पुढे आलेले मुद्दे असे :

- कर कमी करावेत; त्यामुळे उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. ('सप्लाय साईड इकॉनॉमिक्स')
- बाजारपेठ मुक्त स्पर्धेच्या नियमावर चालते या ॲडम स्मिथच्या तत्त्वाचा प्रत्यय भारतीय अर्थव्यवस्थेच्या या पन्नास वर्षांच्या कालखंडात फारसा पाहायला मिळत नाही. उलट सातत्याने जकात संरक्षण, आयात-निर्यातीची बंधने, संप-टाळेबंदीचे कायदे, व्याजदर नियंत्रण अशा सरकारी हस्तक्षेपाशिवाय अर्थव्यवहार पुढे गेलेला दिसत नाही. चलनपद्धती व विनिमयदरांच्या राजनैतिक अर्थकारणाचाही फटका बसला होता.
- आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उभय देशांचा फायदा होतो (विन -विन थिअरी) ही समजुतही भारतीय संदर्भात फोल ठरते. भारतातून निर्यात होणाऱ्या कच्च्या मालामुळे लंडनला व्यापारी फायदा मिळाला आणि भारताचे आर्थिक शोषण झाले.

## टिपा :

[१] रॉयल कमिशनची उद्देशपत्रिका:

Whereas We have deemed it expedient that a Commission should forthwith issue generally to examine and report on the present conditions of agricultural and rural economy in British India, and to make recommendations for the improvement of agriculture and to promote the welfare and prosperity of the rural population; in particular, to investigate :-

(a) the measures now being taken for the promotion of agricultural and veterinary research, experiment, demonstration and education; for the compilation of agricultural statistics ; for introduction of new or better crops and for improvement in agricultural practice, dairy farming and breeding of stock;

(b) the existing methods of transport and marketing of agricultural produce and stock;

(c) the methods by which agricultural operations are financed and credit afforded to agriculturists;

(d) the main factors affecting the rural prosperity and welfare of the agricultural population; and to make recommendations subject to the limitations that it will not be within the scope of the Commission; duties to make recommendations regarding the existing systems of land ownership and tenancy or of assessment of land revenue and irrigation charges, or the existing division of functions between the Government of India and local Governments; but the Commission shall be at liberty to suggest means whereby the activities of the Governments in India may best be co-ordinated and to indicate directions in which the Government of India may usefully supplement the activities of the local Governments."

रॉयल कमिशनचे नामनियुक्त सदस्य :

Victor Alexander John Marquess of Linlithgow (Chairman);

Sir Henry Staveley Lawrence; Sir Thomas Middleton; Sir Lala. Ganga Ram: Sir James McKenna; Hubert Calvert; Raja Sri Krishna Chandra Gajapathi Narayana DeoGam; Nagendra Nath Ganguli; Lodhi Karim Hyder and Balkrishna Sitaram Kamat.

[२] १९३६-३७ च्या मुंबई इलाख्यातील न्यायदानाच्या सरकारी अहवालातील माहिती:

"मुंबई इलाख्यातील दिवाणी कोर्टांतून अहवालाच्या साली एकंदर ४,७३,०९,७४९ रुपयांचे १,५२,७८५ दावे दाखल झाले. आदल्या वर्षापेक्षा ही संख्या ५,९५५ ने अधिक आहे. त्यापैकी सर्वात जास्त १६,०६० दावे एकट्या पुणे जिल्ह्यातील कोर्टात दाखल झाले. अहवालच्या सालात एकंदर २,३०,४८० दावे फैलावर असून, त्यातील १,५७,३४५ दावे निकालात काढले. त्यापैकी १८,४३६ म्हणजे शे.११.०८ दावे चौकशीशिवाय व ३२,०७७ म्हणजे शे. २०.०४ दावे एकतर्फी निकालात निघाले. ३८,०७५ म्हणजे शे. २४.२ दाव्यांत तडजोड करण्यात आली व ४७,७३६ म्हणजे शे. ३०.३ दाव्यांची पूर्ण चौकशी होऊन निकाल करण्यात आला. या निकालात ४३,०२० म्हणजे शे. ९०.१ दाव्यांचा निकाल वादीच्या तर्फेने व ४७१६ म्हणजे शे. ९.८ दाव्यांचा निकाल प्रतिवादीच्या तर्फेने करण्यात आला. अहवालाच्या वर्षी कोर्टातील दाव्यांची रक्कम ६,९६,०९,९८० रुपये असून त्याच्या आदल्या वर्षी सदर रक्कम

६,९७,९१,१९० रुपये होती. अहवालाच्या साली मुंबई हायकोर्टात कनिष्ट दिवाणी कोर्टाच्या निकालाविरुद्ध एकंदर ४३११ अपिले करण्यात आली." ब्रिटिश न्याय कितीही काटेतोल असला तरी तो फार खर्चाळ आहे, सोपा नाही असे काका कालेलकर यांनी 'हिंडलग्याचा प्रसाद' या पुस्तकातील 'कोर्टबाजी' या प्रकरणात म्हटले होते त्याचा प्रत्यय इथे येतो. (वाघ महादेव, १९३९, पृ. २१-२२)

[३] सहकारी शेती : पहिल्या पंचवार्षिक योजनेत सहकारी शेती करणाऱ्यांना तांत्रिक व आर्थिक मदत देण्यासाठी अग्रक्रम देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. भूमिहीन मजूरांना सहकारी शेतीत सदस्य करून घेण्यास प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. महाराष्ट्रात ३० जून १९५९ रोजी ६३ संयुक्त शेती संस्था, ४५ खंडकरी संस्था आणि १४६ सामुदायिक शेती संस्था होत्या.

[४] गंगाधरपंत चिटणवीस यांनी ८ सप्टेंबर १९१४ रोजी कायदेमंडळात पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांना भारतीयांचे सहकार्य राहील असे आश्वासन देणाऱ्या भाषणातला उतारा :

"The British empire is as one great family under one beneficent Crown. Within its doors it might have its difficulties and its differences of opinion. But let not the world mistake us, should any outside danger threaten us we stand shoulder to shoulder round our mighty mother, England, and her enemies will find us arrayed in solid phalanx by her side, ready to meet any danger and render any sacrifices for the sake of the great and glories Empire of which we are proud to call ourselves citizens." (संगोराम,२००१, पृ. ९०)

[५] व्हिटले कमिशनच्या शिफारशी :

१. कामाचे तास : दिवसाला १० तास काम आणि आठवड्याला ५४ तासांची मर्यादा. या मर्यादेपलिकडे काम सोपविले गेल्यास ओव्हरटाईम (जादा दराने वेतन) द्यावा.

२. कामगार भरती : कारखान्यातली कामगार भरती मध्यस्थांमार्फत किंवा जॉबर मार्फत न करता कारखानदारांनी त्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

३. आरोग्य व कल्याण : कामगारांचे आरोग्य टिकविण्यासाठी कारखान्यातील हवा, प्रकाश, धूळ, दमटपणा, उष्णता यांचे नियंत्रण करणारी व्यवस्था असावी. ज्या कारखान्यांत स्त्री कामगार जास्त असतील तेथे पाळणाघराची/ शिशुगृहाची सोय असली पाहिजे.

कमिशनने रेल्वे, खाणी, मळे इत्यादी ठिकाणच्या कामाच्या स्वरूपानुसार इतरही तपशीलवार सूचना केल्या होता.

[६] ट्रेड युनियनची पाश्चिमात्य व्याख्या: "A trade union, as we understand the term, is a continuous association of wage earners for the purpose of maintaining or improving the conditions of their working lives." - Sidney and Beatrice Webb, (The History of Trade Unionism, 1920, p.1.)

[७] एम. एन. रॉय यांनी बर्लिनहून १९-१२-१९२२ रोजी श्रीपाद अमृत डांगे यांना लिहिलेल्या पत्रातील अंश - "The Communist International thinks that the time has come for the organisation of our party in India. We expected to begin the work taking the delegation to the Fourth Congress as the basis... We must have the conference as soon as possible in order that the situation created by the break-up of the deadlock in the Congress can be utilised. We have to work both in legal and illegal way. A revolutionary mass party has to be organised as a part of the Congress, but this party must be under the control and direction of our own party (communist party) which cannot but be illegal." (मोटे, १९७२, पृ. ४४२-४४३)

❑❑❑

# ५

# शैक्षणिक स्थित्यंतर

## ५.१. पूर्वकथन :

एकोणिसावे शतक हे भारतातील आधुनिक शिक्षणाच्या पूर्वतयारीचे अथवा पायाभरणीचे शतक होते. आधुनिक शिक्षणपद्धतीचे प्रारूप आणि प्रवर्तनाची साधने तयार करणारे शतक होते. ब्रिटिश अमदानीपूर्वी भारतात हिंदू पंडितांच्या पाठशाळा व गुरुकुलपद्धतीचे शिक्षण होते. वेद-उपनिषदांचा अभ्यास, पुराणकथा, तर्कशास्त्र, व्याकरण, तत्त्वज्ञान, खगोलविद्या यांचा अभ्यासक्रमात समावेश असायचा. मुसलमान समाजात मौलवींचे मदरसे ही शिक्षण केंद्रे होती. त्यातून इलाही (परमार्थज्ञान) आणि रिआझी (गणित, गायन, इतिहास, भूगोल, यंत्रशास्त्र,) असे दोन प्रकारचे अभ्यास शिकविले जात. अंजुमन - ए-इस्लामच्या उद्देशपत्रिकेत मुसलमानांच्या प्रगतीसाठी (अपनी आवामकी तरक्की) कला आणि विज्ञानाचे (इलम और ऑनर) शिक्षण द्यावे अशी भूमिका घेण्यात आली होती. 'दर्स -ए- निझामी या अरेबिक मदरसाच्या शाळा आणि देवबंद मदरसा नेटवर्कच्या माध्यमातून कुराणपठण, ऊर्दू-पर्शियनच्या जोडीला काही ठिकाणी इंग्रजीही शिकविले जाई. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या पाठशाळा होत्या. त्यात कॅथॉलिकांचा भर धार्मिक विधिकर्मकांडातून मोक्षाची वाट दाखविणारे शिक्षण देण्यावर होता; प्रॉटेस्टंट व युनिटेरियन चर्चमधून भक्तिमार्गाचे, श्रद्धा संस्कारांचे व मन:शुद्धीचे शिक्षण दिले जात असे. ब्रिटिश अमानीत सुरुवातीला सरकारी शाळा नव्हत्या. आर्थिक व प्रशासकीय कारणे पुढे करून एतद्देशीयांच्या शिक्षणाची जबाबदारी टाळण्याकडे ब्रिटिश प्रशासनाचा कल होता. मिशनऱ्यांच्या ख्रिस्तीकरणाच्या उद्योगाने येथील लोक बिथरले तर आपल्या व्यापारवृद्धीला अडसर निर्माण होऊ शकेल या भीतीने ईस्ट इंडिया कंपनी सरकारने सुरुवातीला मिशनऱ्यांच्या शाळांनाही विरोध केला होता. मात्र १८१३ ला इंग्लंडच्या सरकारने ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे नूतनीकरण करताना भारतीयांच्या शिक्षणासाठी

कंपनीने विशेष तरतूद करावी अशी अट घातली, तेव्हापासून कंपनी सरकारच्या उद्देशपत्रिकेत शिक्षणाचा विषय अंतर्भूत झाला. त्यानंतर हळू हळू भारतात वसाहतवादी शिक्षणनीतीचा हस्तक्षेप सुरू झाला. एकोणिसाव्या शतकात प्रामुख्याने ख्रिस्ती मिशनच्या आणि प्रार्थना समाजाच्या शाळांतून स्त्रिया व वंचित गटांना शिक्षणाच्या मध्यवर्ती प्रवाहात आणण्याचे प्रयत्न झाले. मुलींच्या शिक्षणासाठी प्रथमच सार्वजनिक शाळांचे दरवाजे खुले झाले.

महाराष्ट्रात १८१८ ला मराठ्यांचा पाडाव झाल्यानंतर मुंबई प्रांताचा गव्हर्नर एलफिन्स्टन याच्या कारकिर्दीत सार्वत्रिक शिक्षणाचा विषय अग्रक्रमाने हाताळला गेला. तोपर्यंत शिक्षणात संस्कृत, अरेबिक या अभिजात भाषांचे स्थान, देशी मातृभाषांचे स्थान, आणि इंग्रजी भाषेचे स्थान काय याबाबत निश्चित धोरण नव्हते; शिक्षणाचा आशय पौर्वात्य ज्ञानावर भर देणारा असावा की पाश्चिमात्य ज्ञानावर याबाबतही मतमतांतरे होती. शिक्षणाच्या प्रवाहात प्रथम वरच्या वर्गातील लोकांना आणावे व नंतर पाझर पद्धतीच्या तत्त्वावर हळू हळू ते निम्न वर्गीयांकडे आपोआप संक्रांत होईल अशी समजूत होती. एल्फिन्स्टनने नवी शिक्षणनीती आणली. सुरुवातीला पुण्यात संस्कृत पाठशाळेच्या माध्यमातून देशी ज्ञानपरंपरेनुसार शिक्षण देणाऱ्या व्यवस्थेला संस्थात्मक अधिष्ठान दिले गेले. त्यानंतर देशी सांस्कृतिक सत्तास्थानांना हळू हळू बाजूला सारत पाश्चिमात्य शैक्षणिक दृष्टिकोनातून महाराष्ट्रात शैक्षणिक स्थित्यंतर घडवून आणले. संस्कृत भाषेतील अभिजात वाङ्मय, व्याकरण व अध्यात्मशास्त्रावर भर देणारी हिंदूंची पारंपरिक शिक्षणव्यवस्था किंवा अरेबिक, पर्शियन भाषेतून धार्मिक शिक्षण देणारी मुस्लिमांची पारंपरिक शिक्षणव्यवस्था मागे पडली. येथून पुढे देशी भाषेतून वैज्ञानिक विषय, व्यावहारिक ज्ञान व कौशल्यांवर भर देणारे सार्वजनिक शिक्षणाचे आधुनिक पर्व सुरू झाले. देशी भाषातून शिक्षण देण्यासाठी मराठीचे शब्दकोश, लेखनविषयक नियमावली, पाठ्यपुस्तकांचे संपादन या प्रक्रियेला प्रारंभ झाला. मात्र त्यानंतर मेकॉलेच्या कारकिर्दीत इंग्रजी भाषेतून व पाश्चिमात्य ज्ञानावर भर देणाऱ्या वसाहतवादी शिक्षणनीतीचा ठामपणे पुरस्कार करण्यात आला. मेकॉलेच्या टिपणात म्हटल्याप्रमाणे हे शिक्षण रक्ताने भारतीय पण अभिरूची, बुद्धिमत्ता, नैतिकता आणि मूल्यधारणांनी आंग्ल प्रवृत्तीच्या नवशिक्षितांचा वर्ग निर्माण करण्याचे साधन बनले. तसेच पाठोपाठ पौर्वात्य विद्येची पाठ्यपुस्तके छापणे बंद झाले. पौर्वात्य विद्यांचे शिक्षण देणाऱ्या संस्थांचे सरकारी अनुदान व शिष्यवृत्त्या रद्द झाल्या. १८५४ च्या वुडच्या खलित्यातून इंग्रज सरकारला प्रशासनासाठी लागणारे मनुष्यबळ तयार करण्याची योजना साकार झाली. ब्रिटिशांच्या या नव्या शिक्षणनीतीमुळे सर्व जातिधर्माच्या लोकांना शिक्षणाचे दरवाजे खुले झाले व शिक्षण क्षेत्रातील विशिष्ट वर्गाची मक्तेदारी संपली. १८५७ च्या विद्यापीठ कायद्याने भारतात कलकत्ता, मुंबई,

मद्रास, लाहोर, अलाहाबाद अशी पाच विद्यापीठे स्थापन होऊन पाश्चात्य विद्यांचे अधिष्ठान असलेल्या आधुनिक उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ झाली.

१८८२ साली लॉर्ड रिपन यांनी हंटर कमिशन नेमून भारतातील शैक्षणिक स्थितीचा समग्र आढावा घेतला. म. फुले, दादाभाई नौरोजी यांनी सार्वत्रिक शिक्षणाची मागणी केली. हंटर कमिशनने प्राथमिक शिक्षणाचे जाळे विस्तारण्याची शिफारस केली. तसेच प्राथमिक शाळा चालविण्याची जबाबदारी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करावी; क्रमश: माध्यमिक व उच्च शिक्षणही खाजगी संस्थांकडे सोपवावे व सरकारने शैक्षणिक प्रवर्तनाच्या जबाबदारीतून मुक्त व्हावे, अशीही शिफारस केली. स्थानिक गरजांनुसार मातृभाषांना शिक्षणात स्थान द्यावे. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर उच्च शिक्षणाकडे वळणाऱ्यांसाठी प्रवेश परीक्षा घेऊन विद्यापीठीय शिक्षणक्रमासाठी प्रवेश द्यावा; या हंटर कमिशनच्या शिफारशी स्वीकारल्या गेल्या. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढला. (१९ व्या शतकातील या शैक्षणिक स्थित्यंतरांचा समग्र आढावा यापूर्वीच्या पहिल्या खंडात विस्ताराने आला आहे, जिज्ञासूंनी तो मूळातून पहावा.)

एकोणिसाव्या शतकातून विसाव्या शतकात पदार्पण करताना भारतीय शिक्षणाची परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. देशातल्या पांचपैकी चार खेड्यांत शाळा नव्हत्या, मुंबई इलाख्यात सुमारे पाच मैलास एक शाळा होती. शिवाय खेड्यांत मुलगा पाच-सहा वर्षांचा होताच त्याला आई-बापाबरोबर कामावर जावे लागत असे, यामुळे खेड्यांतील शाळांत मुले जात नसत. यामुळे चारापैकी तीन मुलांना शिक्षण मिळत नव्हते, चाळीसपैकी केवळ एक मुलगी शाळेत जाऊ शकत होती. १९०१ च्या जनगणना अहवालानुसार मुंबई इलाख्यातील शिक्षणाची स्थिती बंगाल आणि मद्रास इलाख्याच्या तुलनेने बरीच खालावलेली होती. पुढील आकडेवारी त्यावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे :

| शाळा | हिंदुस्थान | मुंबई | बंगाल | मद्रास |
|---|---|---|---|---|
| सरकारी | १०४७४३ | ९६१७ | ५२०६६ | २१२१५ |
| खाजगी | ४२३४३ | २५१५ | १००७६ | ५७११ |
| एकंदर | १४७०८६ | १२१३२ | ६२१४२ | २६९२६ |
| खर्च दर १००० माणशी | | | | |
| सरकारी | २६रु. | १०७ रु. | ११ रु. | २५ रु. |
| खाजगी | १८७२रु. | ३८३९रु. | ६६७ रु. | १५२६रु. |

या आकड्यांवरून विसाव्या शतकाच्या प्रारंभी खाजगी शाळांचे प्रमाण किती कमी होते आणि खाजगी संस्थांना मिळणारी सरकारी मदत किती मर्यादित होती, हे लक्षात

येते. तसेच बंगाल व मद्रास इलाख्यांच्या तुलनेत मुंबई इलाखा शिक्षणाच्या बाबतीत किती मागे होता हेही लक्षात येते. बंगाल इलाख्यात दर मुलामागे सरासरी ११ आणे खर्च येत असे, तोच मुंबई इलाख्यात सुमारे पावणेचार रुपये येत होता; म्हणजे मुंबई इलाख्यापेक्षा बंगाल्यात शिक्षण सुमारे पाच पटींनी स्वस्त होते. याचे कारण बंगाल्यात ग्रँट-इन-एड पद्धतीमुळे सरकारास थोड्या खर्चात पुष्कळ विद्यार्थ्यांस शिक्षण देता येत होते; याउलट मुंबई इलाख्यात शिक्षण बहुतेक सरकारी व्यवस्थेखाली असल्यामुळे, बंगाल्यात जेवढ्या खर्चात सहा मुलांचे शिक्षण होत होते, तेवढा खर्च मुंबईत एकाच्याच शिक्षणास लागत असे. (पटवर्धन वा. ब., २०१४, पृ. १७)

एकूण मुंबई इलाख्यात शिक्षण महागले होते. या काळातले बहुतांश शिक्षण पठडीबद्ध व पुस्तकी झाले होते. त्याचे वर्णन करण्यासाठी वा. ब. पटवर्धन यांनी *"कवायती ठरीवपणा"* हा अचूक शब्दप्रयोग योजला आहे. "अमकी पुस्तके वाचावयाची, अमुक शिकवायचे, इतके शिकवायचे, इतक्या वेळात शिकवायचे आणि अमुक तऱ्हेनेच शिकवावयाचे हे सरकारने ठरवून टाकलेलेच असते आणि त्याबाहेर रेसभरही जाऊ न देण्याची खबरदारी घेण्यात येते. याबाबतीत इतर देशांत, शिक्षकांस व शाळांचे चालकांस बरीच स्वतंत्रता असते. ... इंग्लंडात क्रमिक पुस्तकांच्या निरनिराळ्या कंपन्यांनी काढिलेल्या माला पाहिल्या आणि त्यातले गुणावगुण पाहिले म्हणजे अशा कामात खुली चढाओढ सुरू ठेवण्यात केवढे हित आहे हे कळण्यासारखे आहे."

शिक्षणाच्या उपयुक्ततेविषयी व गुणवत्तेविषयी वा. ब. पटवर्धन यांनी नोंदविलेली निरीक्षणे विसाव्या शतकारंभी आपल्या शिक्षणाची स्थिती काय होती यावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहेत. पटवर्धन लिहितात, "हिंदुस्थानवर इंग्रजांचे साम्राज्य झाल्यापासून हिंदुस्थानची अंतर्बाह्य स्थिती अगदी पालटली आहे... दुसऱ्याच्या पायांनी चालावे, दुसऱ्याच्या हातांनी जेवावे, दुसऱ्याच्या डोळ्यांनी पाहावे, दुसऱ्याच्या कानांनी ऐकावे, सुखदु:खाचे ज्ञानही दुसऱ्याच्या मेंदूकरवी घ्यावे आणि दुसऱ्याच्या डोक्याने विचार करावे, असे झाले म्हणजे त्या मुलाच्या शारीरिक-मानसिक शक्तींची जी व्यवस्था होते तशी हिंदुस्थानच्या शारीरिक-मानसिक सामर्थ्याची आज झाली आहे... त्यामुळे तो स्वत: सावयव असूनही लुळा, पांगळा व थोटा झाला आहे आणि सेंद्रिय असून मुका, आंधळा व बहिरा झाला आहे. ... दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय आम्हांस किती झाली आहे याची साक्ष प्रत्यही आमच्या सामाजिक, राजकीय, औद्योगिक चळवळीत येत आहे. आमची बुद्धी परतंत्र, आमची वृत्ती परतंत्र आणि आमची इच्छाही परतंत्र झाली आहे." (पटवर्धन, कित्ता, पृ. ७) या काळातल्या शिक्षणपद्धतीत परीक्षांचे स्तोम अवास्तव माजले होते आणि मुख्य म्हणजे इंग्रजी भाषेच्या नावाने मातृभाषांकडे दुर्लक्ष होत होते. लष्करातले शिपाई किंवा रेल्वेतला तिकिट तपासणीस यांच्यापेक्षा शिक्षकांचे पगार कमी

होते. सात रुपयात महिनाभर काम करावे लागत होते आणि इतर उत्पन्न मिळविण्याची सोय नव्हती. त्यामुळे शिक्षकांची कुचंबणा होत असे.

सारांश, १९ व्या शतकात पाश्चिमात्य नमुनादर्शांनुसार आपल्याकडे आधुनिक शिक्षणाची मुहर्तमेढ झाली असली तरी विसाव्या शतकात पदार्पण करेपर्यंत ह्या आधुनिक शिक्षणाच्या आकृतिबंधात स्थिरता आली नव्हती व शिक्षणाची गुणवत्ता व विस्तार याबाबतीतले असमाधान कायम होते. विसाव्या शतकातील सरकारची शैक्षणिक धोरणे आणि आपले राजकीय पक्ष, समाजसुधारक व विचारवंत यांच्यामध्ये त्याविषयी कोणत्या प्रतिक्रिया उमटत होत्या; सरकारी प्रयत्नांखेरीज स्वयंसेवी संस्थांनी शिक्षणाच्या विकासासाठी काय प्रयत्न केले याचा तपास येथे करावयाचा आहे. भारताबाहेर युरोप-अमेरिकेत सुरू असलेल्या कोणकोणत्या शैक्षणिक प्रयोगांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव आपल्या शिक्षणावर पडला याचाही माग काढावयाचा आहे. विसाव्या शतकातील शैक्षणिक स्थित्यंतरांचा स्थूल नकाशा पुढे यावा ही या तपासामागची भूमिका असणार आहे.

## ५.२. वसाहतवादी शिक्षणनीती:

विसाव्या शतकाच्या प्रारंभी १८९९ ते १९०५ या काळात लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय होते. १९०१ साली त्यांनी सिमला येथे शिक्षणतज्ज्ञ व शिक्षणाधिकाऱ्यांची परिषद घेऊन यापूर्वीच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला. भारतातील तत्कालीन शिक्षणव्यवस्थेविषयी लॉर्ड कर्झन संतुष्ट नव्हते. त्यांना हिंदुस्थानातील शिक्षणात ज्या त्रुटी आढळून आल्या, त्याचा गोषवारा त्यांच्या पुढील अभिप्रायातून लक्षात येतो:

"मी हिंदुस्थानातून आलो आणि सगळीकडे दृष्टिक्षेप केला तो मला सगळ्या खात्यातून घाण दिसली. शिक्षणाचा विचार केला तो असे दिसून आले की, सगळीकडे घोटाळा माजला आहे. खात्याखात्यांत संबंध राहिलेला नाही. तत्त्वासंबंधी निश्चितता नाही, शिक्षणाची उंची खालावली आहे. कोठेही उत्साह अगर जिवंतपणा असा दिसत नाही. .. शाळेतील शिक्षक अशिक्षित आणि नालायक आहेत. त्यांच्या शिक्षणात जिवंतपणा आढळून येत नाही. मुलांच्या मागे परीक्षेचा जांच असल्याने त्यांची शारीरिक आणि मानसिक शक्ती निस्तेज झाली आहे. असल्या या नादान शिक्षणाचा कॉलेजच्या शिक्षणावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. मातृभाषा हा पुढील शिक्षणाचा पाया आहे, तिकडे आज दुर्लक्ष केले जात आहे. आणि सर्व लोक इंग्रजीच्या पाठीमागे लागलेले आहेत. सर्व शिक्षणाला बाजारी भाव आला आहे. .. ही शिक्षणप्रणाली त्वरित सुधारली पाहिजे, नाहीतर पुढील पिढीचे नुकसान करण्याच्या पातकाचे आपण धनी होऊ. .. हल्लीच्या शिक्षणाने काही जणांना व्यावहारिक लाभ होत असेल; पण ज्याला खरे जीवन म्हणतात,

विद्येचा विकास म्हणतात, शील म्हणतात किंवा आत्म्याची उन्नती म्हणतात, यांचा एक तरी किरण हल्लीच्या विद्यार्थ्यांना प्राप्त होतो की नाही याची शंकाच आहे." (आपटे, १९५८, पृ. ६)

लॉर्ड कर्झन यांच्या मते "देशातील बुद्धिमत्ता खर्ची घालून कारकून किंवा मुन्शी किंवा वकील निर्माण करण्यात काही अर्थ नाही. घोकंपट्टीच्या संस्कृतीने कोणत्याही देशातील लोकांच्या बुद्धिमत्तेचा स्तर उंचावता येत नाही. स्मरणशक्ती म्हणजे मन नव्हे, तो मनाचा फक्त एक पैलू आहे. आणि तरीही आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला धार लावत बसलो आहोत, निव्वळ स्मरणशक्तीवर भर देणाऱ्या परीक्षा त्यांना द्यावयास लावत आहोत, भूमिती (जॉमेट्री) आणि पदार्थविज्ञान (फिजिक्स) आणि बीजगणित (अल्जिब्रा) आणि तर्कशास्त्र (लॉजिक) यांचे मंत्रतंत्र त्यांच्या मेंदूत गच्च भरून त्यांच्यापैकी शेकडो, नव्हे हजारो जणांच्या मेंदूला आपण नेस्तनाबूत करतो आहोत. आणि या सततच्या परीक्षांतून जर कोणी वाचलेच तर त्यांना बी. ए. च्या पदवीच्या स्वर्गीय प्रांगणात आणून सोडतो आहोत. ही मूलभूत चूक करताना विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही वाहवत जात आहेत. त्यांच्याकडे आलेल्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि नैतिक विकासाचा विचार करण्याऐवजी ते टक्केवारीत, पास-नापासांमध्ये आणि निकालाच्या तक्त्यामधे बुडून गेले आहेत." (टिकेकर, २००७, पृ. ७७)

शिक्षणाच्या अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर २७ जानेवारी १९०२ रोजी लॉर्ड कर्झनने थॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश इंडियातील विद्यापीठीय शिक्षणाची स्थितिगती काय आहे व अध्ययन अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याविषयी सूचना करण्यासाठी सहा सदस्यांचे कमिशन कमिशन नेमले. त्यात मुंबई विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सलर रे. मॅककिन व कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. गुरुदास बॅनर्जी यांचा समावेश होता.(Government of India,1902,p.1) या कमिशनने तत्कालीन शिक्षणातील त्रूटींचा बारकाईने अभ्यास केला व हे शिक्षण केवळ सरकारी नोकर तयार करण्यावर भर देणारे असल्याचा निष्कर्ष काढला. अभ्यास व व्यासंगापेक्षा स्मरणशक्तीवर भर देणारे, परीक्षाकेंद्री शिक्षण, तंत्रशिक्षण वा कौशल्याधिष्ठित शिक्षणापेक्षा वाङ्मयीन अभ्यासक्रमावर अतिरिक्त भर, देशी भाषांना शिक्षणक्रमात स्थान नाही, असे काही महत्त्वाचे निष्कर्ष या अहवालातून पुढे आले. कमिशनने शालेय पातळीपासून विद्यापीठ पातळीपर्यंत अभ्यासक्रमात पुढील सुधारणा करण्याची शिफारस केली :

१. प्राथमिक शिक्षणाकडे सरकारने अधिक लक्ष द्यावे व या शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी अधिकाधिक निधीची तरतूद करावी.
२. माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळांच्या मान्यतेचे निकष, अनुदान

संहिता यांचे काटेकोर नियम तयार करावेत. शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची तरतूद करण्यात यावी.

३. शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत सर्व अभ्यासक्रमांत व परीक्षापद्धतीत सुधारणा कराव्यात.

४. औद्योगिक व व्यापारी जगताच्या गरजा लक्षात घेऊन व्यावसायिक, तांत्रिक व वाणिज्य क्षेत्रातील अभ्यासक्रम सुरू करावेत. कृषि शिक्षणाचा विस्तार करावा.

५. विद्यापीठाचे स्वरूप परीक्षा घेणाऱ्या मंडळासारखे न ठेवता 'टिचिंग युनिव्हर्सिटी' म्हणून असावे; अद्ययावत ग्रंथालय व प्रयोगशाळांच्या सुविधा विद्यापीठांनी विकसित कराव्यात. विद्यापीठांच्या सिनेटची सदस्यसंख्या आटोपशीर असावी, तसेच संलग्न महाविद्यालयांना सिनेटमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व दिले जावे.

६. संलग्न महाविद्यालयांवर विद्यापीठाचे काटेकोर नियंत्रण असावे. महाविद्यालयांना मान्यता देताना, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, इमारत व उपकरणांची पूर्तता, शिक्षक व सेवकांची निवास व्यवस्था, शिक्षणशुल्काविषयी वस्तुनिष्ठ धोरण व संस्था चालविण्यासाठी लागणारा पुरेसा निधी यांची पूर्तता असेल तरच महाविद्यालयांना मान्यता द्यावी.

कमिशनच्या या सर्व सूचना लक्षात घेऊन १९०४ साली लॉर्ड कर्झनचे नवे शैक्षणिक धोरण जाहीर झाले. नव्या धोरणानुसार प्राथमिक शिक्षण ही राज्याची जबाबदारी असल्याचे मान्य करण्यात आले. शालेय शिक्षणात मातृभाषेच्या शिक्षणात किमान गुणवत्ता संपादित केल्यानंतरच इंग्रजी शिक्षण द्यावे व वयाच्या १३ व्या वर्षापर्यंत इंग्रजीला माध्यमभाषा म्हणून लादण्याची घाई करू नये असेही सुचविण्यात आले. (Chauhan C.P.S. 2004)

१९०४ च्या शैक्षणिक धोरणानंतर विद्यापीठीय शिक्षणात महत्त्वाचे बदल झाले. विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यांची व्याप्ती वाढविण्यात आली. सिनेटमधील सदस्यांची संख्या घटवून शासकीय नियंत्रण वाढविण्यात आले. महाविद्यालयांच्या संलग्नतेचे नियम व पद्धती अधिक जाचक करण्यात आली. संलग्न महाविद्यालयांना कायमची मान्यता देण्याऐवजी वारंवार महाविद्यालयांच्या गुणवत्तेची तपासणी करून संलग्नता पुढे चालू ठेवावी की नाही, याविषयी निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आला. त्यामुळे अनेक संस्थांची सरकारी मान्यता धोक्यात आली. शैक्षणिक संस्थांचे अभ्यासक्रम निर्मितीचे स्वातंत्र्य व शैक्षणिक प्रवर्तनाची स्वायत्तता संपली. स्वाभाविकच कर्झनच्या शैक्षणिक सुधारणांच्या प्रकल्पाविषयी सुशिक्षित वर्गात असंतोष निर्माण झाला. लॉर्ड कर्झन विद्यापीठांचे रूपांतर सरकारी खात्यात करू पहात असल्याचा आरोप होऊ लागला. सर फेरोजशहा मेथा यांनी 'आम्ही भाकरी मागितली असता आपण धोंडा पुढे

ठेवीत आहा'अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. न. चिं. केळकर यांनी २३ फेब्रुवारी १९०४ च्या 'केसरी'त *'जुन्या विद्यापीठांची आरती'* अशा शीर्षकाचा लेख लिहून कर्झनच्या युनिव्हर्सिटी बिलावर जोरदार टीका केली. 'एखाद्या देशांत परकीय सरकारचे हातात शिक्षण जाणे म्हणजे देशांतील राष्ट्रीयत्वाचा नाश होणे' असा शिक्षणविषयक सिद्धांत मांडून त्यांनी वसाहतवादी शिक्षणनीतीचा निषेध केला. सरकारी शिक्षणसंस्था केवळ नोकर बनविण्याचे हमालखाने झाले असल्याची वस्तुस्थिती परखडपणाने मांडली. शिक्षणाचे माध्यम मातृभाषेऐवजी इंग्रजी ठेवणे हे शिक्षणपद्धतीतील वैगुण्याचे लक्षण असल्याचे त्यांचे प्रतिपादन होते. १९१६ साली एका लेखातून त्यांनी निदान परीक्षा तरी देशी भाषांतून घ्या असे शासनाला आवाहन केले होते. (केळकर वाढदिवस मंडळ, १९३२, पृ. १६३) न्या. चंदावरकर, ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनीही कर्झनच्या शिक्षणविधेयकाचा प्रतिवाद केला होता. या असंतोषातूनच देशात व पर्यायाने महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाचा आशय व आकृतिबंध विकसित करावा याविषयी एक नवे विचारमंथन सुरू झाले. स्वराज्यसाधनेच्या कामासाठी तरुण पिढी घडविण्याकरिता स्वदेशी शिक्षण, स्वधर्मशिक्षण, धंदे शिक्षण व स्वाभिमानप्रेरक शिक्षण देण्यासंबंधी चर्चा सुरू झाल्या. हिंदू लोकांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी झाली तर शिक्षणातली परभृतता संपेल व एतद्देशीयांना सरकारी नोकरी मिळाली नाही तरी आपल्या विद्यापीठांतून पदवी घेतल्याचा रास्त अभिमानही वाटेल, अशा प्रकारचा मतप्रवाह पुढे येऊ लागला. न. चिं. केळकर यांनी सरकारी नोकरीच्या आमिषाने इंग्रजी वळणाच्या *शिक्षणाची* प्रशंसा करणाऱ्यांना उत्तर देताना म्हटले होते की,

"आज हिंदुस्थानात विलायतेतून तरणीबांड तिशीच्या आंतील युरोपियन मुले सिव्हिल सर्व्हिस परीक्षा देऊन कारभार करतात हे पाहून आपण मोठे कौतुक करतो; परंतु मराठेशाहीत जेव्हा मोठा कारभार करण्यास वाव होता, तेव्हा लहान वयाच्या मुलांनीच मोठमोठी कामे केलेली आढळून येतील. जेथे वावच नाही तेथे केस पिकले तरी नालायकीच वाट्याला यायची!" (केळकर वाढदिवस मंडळ, पुणे, १९३२, पृ. १८५)

शिक्षणाच्या आशयासंबंधीही या काळात नवे विचारमंथन सुरू झाले. रँग्लर परांजपे यांनी मे १९०४ च्या 'ईस्ट अँण्ड वेस्ट' च्या अंकात हिंदुस्थानात धार्मिक शिक्षणाची खरोखर आवश्यकता आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशातही धर्मशिक्षणाची सक्ती असताना रँग्लर परांजपेंच्या नकारात्मक मांडणीतली वैयर्थता विशद करणारा लेख न. चिं. केळकरांनी लिहिला. मुंबईतल्या सरकारी अनुदानावर चालणाऱ्या विल्सन किंवा झेव्हियर कॉलेजात बायबलच्या शिक्षणाची सक्ती होते, तर मग इतर शिक्षण संस्थांना का मनाई; असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. *'शील सुधारणारे शिक्षण'* या लेखातून केळकरांनी धर्मशिक्षणाची उपयुक्तता विशद केली. अशा

प्रकारच्या सुशिक्षणातून अस्पृश्यतेचा दोष नष्ट होण्यास मदत होऊ शकते, असा युक्तिवादही त्यांनी *'हीन जाती व शिक्षण'* या लेखातून केला होता. 'धर्मशिक्षण द्यावयाचे म्हणजे प्रत्यक्ष आचारधर्म शिकवायचा नाही, किंवा विशिष्ट धर्माचे विधी शाळांतून व कॉलेजांतून मुलांकडून करवून घ्यावयाचे नाहीत, तर तात्त्विकरित्या धर्माचे शिक्षण द्यावयाचे इतकाच अर्थ कोणीही समजावा" अशी धर्मशिक्षणाविषयीची आपली समजूत केळकरांनी १९२९ साली जून महिन्यात रत्नाकर मासिकातून स्पष्ट केली होती. विद्यापीठीय शिक्षणात तात्त्विक धर्मशिक्षणाला मज्जाव नसावा व तुलनात्मक पद्धतीच्या धर्मविचाराला तर मज्जाव नसावाच नसावा, असा विचार या लेखातून त्यांनी आग्रहाने मांडला आहे. (केळकर वाढदिवस मडळ, पुणे, १९३२, पृ. १२७)

**१९१३ चे शैक्षणिक धोरण :**

यानंतरच्या काळात गोपाळ कृष्ण गोखले यांनी राष्ट्राचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी आणि लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रत्येकाला लेखन, वाचन आणि गणिताचे प्राथमिक ज्ञान आवश्यक असल्याचा मुद्दा घेऊन भारतात ब्रिटिशांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करावा म्हणून १९१० साली प्रस्ताव दाखल केला. ब्रिटिश सरकारने पुरेशा निधीच्या अभावाचे कारण दाखवून १९१२ साली हे विधेयक फेटाळून लावले. मात्र २१ फेब्रुवारी १९१३ च्या ठरावान्वये देशात प्राथमिक शाळांचा विस्तार करण्यास मान्यता देण्यात आली. प्राथमिक शाळांमधल्या सोयी-सुविधा वाढविणे, प्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणुका करणे, शालेय शिक्षणाची गुणवत्ता टिकविण्यासाठी देखरेख व मूल्यमापन करणाऱ्या पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करणे, मुस्लीम मदरशांना व हिंदू पाठशाळांना अनुदान व मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. १९१३ च्या शैक्षणिक धोरणात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे अभ्यासक्रम अधिकाधिक व्यवहारोपयोगी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या. उच्च शिक्षणासाठी भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात जावे लागू नये यासाठी देशांतर्गत विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सेवा सुविधा वाढविण्याची दिशा ठरविण्यात आली. शिक्षणक्षेत्रात संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर लक्ष केंद्रित व्हावे यासाठी नव्या शिक्षणसंस्था उघडण्यापेक्षा आहे त्याच संस्थांचा दर्जा वाढविण्यात यावा, असे धोरण ठरविण्यात आले. १९१३ च्या ह्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी मात्र १९१४ चे महायुद्ध सुरू झाल्याने होऊ शकली नाही. (Biswas & Agarwal,1994, p.41)

सरदार पटेल यांचे बंधू विठ्ठलभाई पटेल यांनी ६ डिसेंबर १९१६ रोजी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचे विधेयक मांडले. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९१० साली मांडलेल्या विधेयकाचा, बडोदे संस्थानातील सक्तीच्या

व मोफत शिक्षणाच्या प्रयोगाचा पूर्वसंदर्भ देऊन, तसेच तसेच लॉर्ड विलिंग्डन यांच्या कलकत्ता विद्यापीठातील भाषणाचा हवाला देऊन त्यांनी या विधेयकाची प्रस्तुतता पटवून दिली. विठ्ठलभाई पटेल यांनी मांडलेल्या विधेयकाला चुनीलाल मेहता, फिरोजशहा सेठना तसेच मुस्लीम नेते इब्राहिम हसन जाफर, गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांनीही पाठिंबा देणारी भाषणे करून समर्थन दिले. थोड्या दुरुस्त्यांसह हे विधेयक पारित झाले. ब्रिटिश राजवटीत प्रांतिक विधिमंडळात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचे पारित झालेले हे पहिलेच विधेयक होते. (Patel G. I.1950, p.102)

१९१९ साली मॉटेंग्यू-चेम्स्फर्ड सुधारणा या नावाने ओळखला जाणारा द्विदल राज्यपद्धीचा नवा 'भारत सरकार कायदा १९१९' अस्तित्वात आला. या कायद्यामुळे राज्यप्रशासनाची *'राखीव'* (reserved) व *'सोपीव'* (transferred) अशी वर्गवारी करण्यात आली. राखीव खात्यांचे काम ब्रिटिश कौन्सिलर व सोपीव खात्यांचे काम भारतीय मंत्री पाहतील अशी कार्यविभागणी झाली. कायदा आणि सुव्यवस्था, पोलीस प्रशासन, जमीन महसूल,जलसिंचन ही महत्त्वाची खाती 'राखीव' गटात आणि शिक्षण, स्थानिक लोकप्रशासन, सार्वजनिक आरोग्य, शेती व सार्वजनिक बांधकाम या खात्यांचे व्यवस्थापन 'सोपीव' गटातील एतद्देशीय मंत्र्यांनी पहावे अशी योजना अस्तित्वात आली. या द्विदल राज्यपद्धतीत ब्रिटिश कौन्सिलर्सना जसे वित्तीय अधिकार होते, तसे सोपीव खात्याच्या मंत्र्यांना नव्हते. (यासंबंधीचा सविस्तर तपशील 'राजकीय स्थित्यंतर' या प्रकरणात आलेला आहे,तो पहावा.) परिणामत: प्रांतिक सरकारांना शैक्षणिक विस्ताराच्या वा गुणवत्ता संवर्धनाच्या कोणत्याच ठोस योजना कार्यान्वित करता आल्या नाहीत. १९०२ पासून दिली जाणारी सरकारी अनुदानेही बंद झाली, त्यामुळे लोकवर्गणी व धर्मादाय देणग्यांतून जेवढे शक्य होईल तेवढे काम करण्याची मर्यादा आली. १९१९ साली प्रांतिक सरकारला शैक्षणिक योजना व कृतिकार्यक्रमांसंबंधी सल्ला देण्याकरिता भारत सरकारच्या शिक्षणसंचालकांच्या अध्यक्षतेखाली विविध प्रांतातील शिक्षणतज्ज्ञ व अधिकाऱ्यांचा समावेश असलेले एक केंद्रीय सल्लागार मंडळ (Central Advisory Board of Education) स्थापन करण्यात आले होते. मात्र निधीच्या अभावी हे सल्लागार मंडळही १९२३ साली बरखास्त करण्यात आले. शिक्षणखाते आरोग्य व महसूल खात्याला जोडण्यात आले. मध्यवर्ती सरकारच्या या उदासीनतेमुळे शैक्षणिक विकास खुंटला. १९२१ पर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर सरकारी नोकऱ्या मिळत असत; त्यामुळे शिक्षणाकडे रोजगार मिळविण्याचे साधन इतक्या मर्यादित अर्थाने पाहिले जात असे. यामुळे ज्ञानसाधनेपेक्षा परीक्षार्थी होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला होता. १९२१ नंतर सुशिक्षित बेकारांची संख्या वाढू लागली होती. कार्यात्मक कौशल्यांचे शिक्षण देऊन प्रशिक्षित कार्मिकांची पिढी तयार होऊ शकली नाही.

१९२९ साली सर फिलिप हार्टोग यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती सरकारने नेमलेल्या समितीने शिक्षणासारखा महत्त्वाचा विषय पूर्णत: प्रांतिक सरकारांकडे सोपविणे योग्य नसल्याचा अभिप्राय दिला. तसेच प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी केवळ स्थानिक लोकप्रशासनाकडे देणेही हितकारक नसल्याचे मत व्यक्त केले. शिक्षणक्षेत्रात संख्यात्मक वाढ झाली, पण गुणवत्ता ढासळली असे निरीक्षण या समितीने आपल्या अहवालात नोंदविले होते. या अहवालात तत्कालीन शिक्षणव्यवस्थेसंबंधी आपला अभिप्राय नोंदवताना समितीने Wastage (गळती) आणि Stagnation (स्थगिती) या दोन परवलीच्या शब्दांचा वारंवार वापर केला होता. १९३५ चा नवा भारत सरकार कायदा पारित होऊन प्रांतिक स्वयत्तता मिळेपर्यंत शिक्षणक्षेत्राकडे वसाहतवादी सरकारने दुर्लक्षच केले असा सर्वसाधारण निष्कर्ष निघतो.

प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यानंतर मुंबई राज्यात शिक्षणाच्या स्थितीत काही बदल झाला का याचा तपास करताना १४ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधिमंडळात प्राथमिक शिक्षणासंबंधी आमदार सरदार खानबहादूर रईस यांनी मांडलेल्या ठरावावर झालेल्या चर्चेचा संदर्भ इथे लक्षात घ्यावयाचा आहे. या चर्चेत वित्त मंत्र्यांनी प्राथमिक शिक्षणावर होणारा खर्च फुकट जातो असे विधान केले होते. त्यांच्या मते प्रशिक्षित शिक्षक आपल्या कामाकडे दुर्लक्ष करतात, आणि इतर शिक्षक आपल्या कामास लायक नाहीत. त्यामुळे शिक्षणावरचा खर्च फुकट जाणार नाही याबाबत उपाय केल्याखेरीज शिक्षण सक्तीचे करण्याबाबत विचार करता येणार नाही. वित्त मंत्र्यांच्या या अभिप्रायावर वसईचे आमदार भाईसाहेब दत्तात्रेय वामन राऊत यांनी आक्षेप घेतला. १९२३ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी लोकल बोर्डांकडे सोपविल्यानंतर झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी विधिमंडळासमोर सादर केला. त्यात त्यांनी म्हटले होते की, सरकारने नियमानुसार स्थानिक पातळीवर वित्तीय साहाय्य न पुरविल्यामुळेच शिक्षण क्षेत्रात सुधारणा होऊ शकल्या नाहीत. १९२५-२६ आणि १९३५-३६ या दोन वर्षातील विद्यार्थीसंख्येची आकडेवारी देऊन त्यांनी विद्यार्थ्यांच्या गळती-स्थगितीविषयी आपला युक्तिवाद केला होता. १९२५-२६ साली सातवीपर्यंत शिकणाऱ्या मुलांची संख्या ९,१९,०६८ होती ती १९३५-३६ साली १२,४७,९६५ झाली. म्हणजे १० वर्षात ३,३५,००० नी विद्यार्थीसंख्येत वाढ झाली. मात्र सरकारी अनुदानाची रक्कम १९२५-२६ सालात १ कोटी रुपयांवरून (दर डोई १०.८८रु.) १९३५-३६ सालात फक्त १ कोटी १० लाखांपर्यंतच वाढली. याचा अर्थ मुलांची संख्या साडेतीन लाखांनी वाढली, अनुदानाची रक्कम मात्र फक्त १० लाखांनी वाढविण्यात आली. (त्यामुळे १९२५-२६ सालात दरडोई १०.८८रु. अनुदान दिले जाई ते १९३५-३६ सालात ८.८१रु. झाले.) अनुदानातली ही घसरण आणि वाढलेल्या विद्यार्थीसंख्येमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा

वाढलेला खर्च यांचा मेळ घालता न आल्याने स्थानिक संस्थांपुढे आर्थिक पेच निर्माण झाल्याचे आमदार राऊत यांनी वित्त मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. (ठाकूर,१९९१, पृ.५८-६२ ) शासनव्यवहारात शिक्षणाला महत्त्व दिले जात नसल्याबद्दल चर्चा करताना आमदार राऊत यांनी शिक्षकाला दिल्या जाणाऱ्या वेतनाची अन्य समकक्ष नोकऱ्यांची तुलनात्मक आकडेवारी सादर केली. फर्स्ट इअर शिक्षकाला २५ रुपये वेतन; मात्र कारकूनाला ५० रुपये, बेलिफचे शिक्षण व्ह. फायनलपेक्षा कमी असूनही त्यास ५० रुपये पगार मिळतो. सरकारने मुंबई इलाख्यातील एका कुटुंबाचा चरितार्थाचा खर्च (Living Wage) ३० रुपये ठरविला आहे; परंतु शिक्षकांना मात्र २० किंवा २५ रुपयांत आपला चरितार्थ भागविण्यास सरकार सांगते हे योग्य नसल्याचे आ. राऊत यांनी लक्षात आणून दिले. ब्रिटिश शासन येऊन १५० वर्षात फक्त ९% लोक साक्षर झाले, ९१% लोक अक्षरशत्रू आहेत. त्यामुळे १ एप्रिल १९३८ पासून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाले पाहिजे असे निवेदन करून आमदार राऊत यांनी खान बहादूर रईस यांच्या ठरावास पाठिंबा दिला. विधिमंडळातील या चर्चेत शालेय शिक्षणातील गळतीचीही चर्चा झाली. खेड्यात जूनमध्ये शाळा सुरू झाल्यानंतर सप्टेंबरपर्यंत खरा अभ्यास सुरू होत नाही. पावसाळ्यात शेतीचा हंगाम असल्याने मुले शाळेत जातात किंवा नाही याकडे पालकांचे लक्ष नसते; काही शेतकरी शेती कामासाठी मुलांची मदत घेत असल्याने ती मुले शाळेपासून वंचित राहातात. त्यामुळे ऑक्टोबर ते जानेवारी महिन्यात घेतल्या जाणाऱ्या परीक्षांत मुले नापास होतात. हे लक्षात घेता खेड्यातील शाळांच्या परीक्षांची मुदत फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान केल्यास मुलांची गळती कमी होईल, याकडेही शासनकर्त्यांचे लक्ष वेधून घेण्यात आले. (ठाकूर, १९९१, पृ. ५९-६०) थोडक्यात, प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यानंतरही शिक्षणाच्या बाबतीत सरकारची उदासीनता कायम राहिली व सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सुटला नाही .

## द्वितीय महायुद्धोतर शिक्षणाचा बृहत आराखडा:

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे शैक्षणिक विकासाचा विषय पूर्णपणे दुर्लक्षित होता. महायुद्ध संपल्यानंतर मात्र सर जोगेंद्र सिंघ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असणाऱ्या केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने १९४४ ते १९८४ या चाळीस वर्षांसाठी शिक्षणाचा एक बृहत आराखडा तयार केला. केंद्रीय शिक्षण मंडळात सदस्य व सरकारी सल्लागार जॉन सार्जंट यांच्या नावाने 'सार्जंट प्लॅन' म्हणून या आराखड्याचा निर्देश केला जातो. ह्या सार्जंट समितीने देशातील तत्कालीन शैक्षणिक वास्तवाचे समग्र चित्र लक्षात घेतले होते. इंग्लंडमध्ये १९३९ साली अस्तित्वात असलेली शिक्षणपद्धती भारतात टप्प्याटप्प्याने १९८४ पर्यंत आणावी हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. तसेच

स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनी सुचविलेल्या 'वर्धा शिक्षण योजने'ची दखल घेऊन हा मसुदा तयार करण्यात आला होता. सार्जंट प्लॅनमधील मुख्य शिफारशी अशा होत्या :

- ३ ते ६ वयोगटासाठी पूर्व प्राथमिक शिक्षणाची योजना.
- ६ ते ११ वयोगटातील सर्वांसाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद.
- ११ ते १७ वयोगटातील निवडक विद्यार्थ्यांना काटेकोर निवडीच्या तत्त्वावर माध्यमिक शिक्षण. इंग्लंडमधील प्रघातानुसार प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रत्येक पाच मुलांपैकी फक्त एकास माध्यमिक शिक्षणासाठी निवडावे असे निवडीचे तत्त्व सूचित करण्यात आले होते. माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात बौद्धिक ज्ञानसाधना (academic) व तांत्रिक-व्यावसायिक कौशल्य संपादन (technical-vocational) असे दोन पर्याय देण्यात येतील, त्यापैकी एका पर्यायाची विद्यार्थ्याने निवड करावी.
- माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या १५ पैकी एकास उच्च शिक्षणाची संधी दिली जाईल. त्यापैकी काही विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण दिले जाईल. तांत्रिक, व्यावसायिक व कला शिक्षणाचे वेगळे शिक्षणक्रम असतील; इतर अंतरिम शिक्षणक्रम बंद केले जातील.

२० वर्षांत संपूर्ण साक्षरतेचे ध्येय गाठण्यासाठी प्रौढ शिक्षण योजनेवर भर देण्याचाही प्रस्ताव या योजनेत नोंदविण्यात आला होता. शिक्षक-प्रशिक्षण, शारीरिक शिक्षण, शारीर व मानसिक विकलांगांसाठी शिक्षण यावर भर देण्याचे योजिले होते.

दुसऱ्या महायुद्धापाठोपाठ स्वातंत्र्य लढ्याचा जोर वाढत गेल्याने सार्जंट कमिटीच्या शिफारशींकडे दुर्लक्ष झाले. हा चाळीस वर्षांसाठी तयार करण्यात आलेला बृहत आराखडा एक ऐतिहासिक दस्त म्हणून केवळ शिल्लक राहिला. (Chauhan, 2004: 37-38) १९८४ पर्यंत भारतात सुव्यवस्थित शिक्षणपद्धती आणण्याच्या या सार्जंट आराखड्यात भविष्यातली लोकसंख्यावाढ लक्षात घेतली नव्हती. तसेच दरवर्षी दोनशे कोटी शिक्षणावर खर्च करण्याचे सरधोपट धोरणही वास्तववादी नव्हते. (नाईक, २००८, पृ.२२८) ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणातील हे चढ-उतार पाहता त्यांनी भारतीयांना उपयुक्त अशी नवी शिक्षणप्रणाली विकसित करण्यासाठी काही भरीव काम केले होते, असे दिसत नाही. शिक्षणाचा रचनात्मक ढाचा बदलण्यापलीकडे संपूर्ण सामाजिक रचनेवर प्रभाव टाकणारा विचार क्वचितच झालेला दिसतो. सामाजिक-सांस्कृतिक बदलांचे माध्यम म्हणून शिक्षणप्रणालीत मूलभूत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न वसाहतवादी शासनाकडून झाले नाहीत. औद्योगिक व व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन काही प्रमाणात कौशल्य शिक्षणाचा विचार जरूर झाला; मात्र औद्योगिक प्रगतीनंतर बदललेल्या समाजाच्या सांस्कृतिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणाची समग्र पुनर्घटना करण्याकडे लक्ष दिले गेले नाही.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हाच्या शैक्षणिक प्रगतीची स्थिती-गती फारशी समाधानकारक असल्याचे दिसून येत नाही. साक्षरतेचे प्रमाण केवळ १४ टक्के होते. प्राथमिक शिक्षणात स्थगिती-गळतीचे प्रमाण लक्षणीय होते. ३ ते ११ वयोगटातील ३ पैकी १ मूल वरच्या गटातील शिक्षणासाठी प्रवेश घेत असे. ११ ते १४ वयोगातील ११ पैकी केवळ १ मुलगा उच्च शिक्षणाकडे वळत असे. (नाईक, २००८, पृ.१९२) या पार्श्वभूमीवर भारत सरकारने १९४८ साली उच्च शिक्षण आयोग स्थापन करून शैक्षणिक पुनर्घटनेच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. १९४९ साली तांत्रिक मनुष्यशक्ती समिती स्थापन केली. १९५० साली देशाने नियोजनबद्ध विकासाचे तत्त्व स्वीकारले. यामुळे शिक्षणक्षेत्रात खरोखर कोणते स्थित्यंतर घडून आले, याचा वृत्तांत आपण यानंतरच्या तिसऱ्या खंडात विस्ताराने पहाणार आहोत.

## ५.३. राष्ट्रीय शिक्षणाची विचारधारा :

वसाहतवादी शिक्षणव्यवस्थेत ब्रिटिश सत्तेचे सच्च्चे अनुयायी तयार करण्यावर भर दिला जात असे. स्वामी रामानंद तीर्थ यांनी सोलापूरच्या नॉर्थकोट या सरकारी शाळेत शिक्षण घेत असताना आलेले अनुभव नोंदवून ठेवले आहेत. त्यांच्या आठवणींनुसार सरकारी शाळांत 'गॉड सेव्ह द किंग' अर्थात 'राजा चिरायु होवो" हे प्रार्थनागीत दररोज म्हणावे लागे. शाळेत गांधी टोपी घालणे हा राजद्रोह समजला जाई. बादशहा पंचम जॉर्जच्या राज्यारोहण समारंभाच्या वेळी 'युनियन जॅक'चा झेंडा दिला जायचा, तो विद्यार्थ्यांनी खिशाला लावणे सक्तीचे होते. झेंडा फेकून देणाऱ्यास छड्यांचा मार दिला जात असे. पहिल्या महायुद्धाच्या काळात काढलेले कर्जरोखे विद्यार्थ्यांना सक्तीने विकत घ्यावे लागत. थोडक्यात, सरकारी शाळेतून दिले जाणारे वसाहतवादी शिक्षण हे शिक्षणाचे पावित्र्य जोपासण्यापेक्षा परभ्रुत माणसे तयार करण्याकडे अधिक लक्ष पुरवित होते.(तीर्थ,१९७६,पृ.५-६) या परभ्रुततेपासून नव्या पिढीची सोडवणूक करणारे, बौद्धिक व आत्मिक शुद्धतेचे संस्कार घडविणारे शिक्षण देणे हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय होते. वसाहतवादी शिक्षणपद्धतीत इंग्रजी विद्या शिकलेल्या नवशिक्षितांना भारतीय भाषा व संस्कृतीचा तिरस्कार वाटू लागला व त्यातून स्वत:पुरता पहाणारी, सामाजिक बांधिलकीचा अभाव असलेली सुशिक्षितांची एक नवी जात निर्माण झाली होती. या नवसुशिक्षितांपैकी बरेचसे लोक सरकारी नोकरीत शिरले, काही सरकारी आश्रयाने चाललेल्या वकिली वा डॉक्टरी व्यवसायात ऐषआरामाचे जीवन व्यतीत करू लागले. विदर्भातील एका चरित्रलेखकाने या आंग्लशिक्षित पिढीविषयीचे निरीक्षण नोंदवून ठेवले आहे, ते असे:

"वकिलीसाठी मॅट्रिक पास होऊन मुंबई हायकोर्टातर्फे होणाऱ्या परीक्षांना खासगी अभ्यास करून बसता येई. त्याचा लाभ वऱ्हाडातील शहरांतील मध्यम श्रीमंत ब्राह्मण

लोकांनी घेतला. पुणे, मुंबई, खानदेश, सातारा या भागातीलही बरेच नवीन हायकोर्ट वकील वऱ्हाडात तालुक्याचे गावी वकिली करण्यास येऊन बसले. दारव्हा येथेही त्याच सुमारास असे सात वकील बाहेरून येऊन राहिले. त्यात ग्रॅज्युएट कोणीही नव्हते. त्यांना ॲटर्णी म्हणून ७/८ वर्ग शिकलेले स्थानिक पांढरपेशा वर्गातील लोक मिळाले. आता तालुक्याचे गावी तहसील कचेरी व दिवाणी कचेरी हीच महत्त्वाची धंद्याची केंद्रे बनली. 'इंडियन पिनल कोड', 'सिव्हिल प्रोसीजर कोड' व इतर तत्सम कायदे हे ह्या केंद्राभोवती वावरणाऱ्या लोकांना अत्यंत परिचित होऊन प्रत्येक लहानमोठ्या गावी वकिलांना आपले गावांतून नवे काम उत्पन्न करून ते आणून देणारांचा व त्यावर वकिली, ॲटर्णी, कोर्टाचे सरकारी दुकान यांचा लाभ करून आपले स्वत:चे कमिशन परस्पर काढून घेऊन आपणांस 'हुशार' समजणाऱ्या गावगुंडांचा नवा तांडा तयार झाला. कोणी एखादा बरासा आसामी मृत्यू पावताच त्यांच्या एकुलत्या एक श्रीमंत अजाण मुलास नादी लावून त्याची इस्टेट गारद करणे, एकमेकांविरुद्ध चिथाऊन भाऊबंदकी माजविणे व त्यापायी फौजदाऱ्या उभे करणे ह्या गोष्टी नित्याच्या होऊन बसल्या. १९०० सालापासून वऱ्हाडात कापसाचा पेरा अधिक वाढला, कापसाला भावही खूप येऊ लागला. हे हाती आलेले रोख रुपये कोर्टकचेऱ्यांत बरबाद होऊ लागले. ही इंग्रजी राज्याची देणगी होती. इ. स. १९०० नंतरच्या काळातील वकील हे इंग्रजी संस्कृतीचा छाप पडलेले दिसतात व स्वत:वर काही नैतिक जबाबदारी असते ह्याची फार क्वचित जाणीव त्यांच्यात दृष्टीस पडते. वऱ्हाडात ही अवनती १९०० ते १९२० च्या दरम्यान मोठ्या प्रमाणात झाली. [दाणी,१९६२,पृ. ६३-६४] या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते.

ब्रिटिशांच्या वसाहतवादी शिक्षणनीतीची प्रतिक्रिया राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून व स्वदेशी चळवळीतून वेळोवेळी उमटलेली दिसते. कर्झनच्या नव्या शिक्षणनीतीच्या पार्श्वभूमीवर डिसेंबर १९०६ ला कलकत्त्याच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात प्रथमच राष्ट्रीय शिक्षणासंबंधीचा ठराव पास झाला. या ठरावात म्हटले होते की,

"In the opinion of this congress the time has arrived for the people all over the country earnestly to take up the question of National Education for both boys and girls and organise a system of Education – Literary, Scientific and Technical- suited to the requirements of the country, on national lines and under national control"

काँग्रेसच्या ठरावात आपल्या देशातील मुला-मुलींसाठी राष्ट्रीय शिक्षण देणारी बृहत व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला होता. या प्रस्तावित शिक्षणव्यवस्थेत राष्ट्रीय गरजांना केंद्रस्थानी ठेवून वाङ्मय, विज्ञान व तंत्रज्ञानात्मक शिक्षणाचा आशय

ठरविण्यात यावा; तसेच शिक्षणपद्धतीचे प्रवर्तन व नियंत्रण हेही राष्ट्रीय मूल्यविचारांवर आधारलेले असावे, असे एक पथदर्शक सूत्र सूचविण्यात आले होते. या ठरावावर ज्या वक्त्यांची भाषणे झाली त्यात बाबू हिरेंद्रनाथ यांनी ब्रिटिशांनी आणलेल्या शिक्षणनीतीतून देशभक्त निर्माण होण्याऐवजी फक्त कारकून तयार केले जातात, अशा अर्थाची टिपण्णी केली होती. हेच सूत्र पकडून शिक्षणाचे उद्दिष्ट सरकारच्या चतकोर भाकरीपासून दूर राहूनच गाठायला हवे व त्यासाठी कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनी आपापल्या प्रांतात राष्ट्रीय शाळा सुरू केल्या पाहिजेत, असा विचार शंकर नायर यांनी मांडला. महाराष्ट्रातून अधिवेशनाला उपस्थित असलेले चिं. वि. वैद्य यांनी सध्याची शिक्षणपद्धती कुचकामी असून आपल्या देशातील तरुणांची वीरवृत्ती जागविणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणाची प्रस्तुतता विशद केली. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातले प्रोफेसर विष्णू गोविंद विजापूरकर यांनी 'राष्ट्रीय शिक्षणा'च्या संकल्पनेवर भाष्य करणारे विस्तृत भाषण केले. त्याचा गोषवारा असा :

१. सरकारी व्यवस्थेवर असंतोष आहे, म्हणूनच शिक्षणाच्या बाबतीत सरकारच्या प्रयत्नांहून स्वतंत्र असा प्रयत्न देशबांधवांनी करण्याची गरज आहे.
२. सरकारी नोकरीला सवंग रीतीने दास्यशृंखला म्हणण्याचे कारण नाही; आपल्या लोकांचे सरकारी नोकरीत प्रमाण जरूर वाढले पाहिजे. पण त्याखेरीज आपले स्वत:चे काही वेगळे कर्तव्य आहे. आपल्या देशात अगदी लहानसा वर्ग देशकार्यात गुंतलेला आहे; तोसुद्धा पूर्णपणे देशकार्यालाच वाहून घेतलेला असा नाही. त्यामुळे पूर्णपणे समाजाला वाहून घेणारे लोक निर्माण करणे हे आपल्यापुढचे आव्हान आहे.
३. निरनिराळ्या व्यवसाय-उद्योगांत व चरितार्थाच्या उपक्रमांत नेतृत्व करणारे, जीवनाच्या प्रत्येक शाखेतील नेते आपल्याला हवे आहेत. यासाठी राष्ट्रीय शिक्षणाची गरज आहे. (देशपांडे, मु. गो. १९६०, नवभारत, पृ. ५८-५९)

थोडक्यात, राष्ट्रीय अस्मितेच्या प्रेरणेतून वसाहतवादी शिक्षणपद्धतीला पर्याय शोधण्याचा प्रयत्न ही नवसुशिक्षित मंडळी करीत होती. पाश्चिमात्य संस्कृतीच्या झगमगाटाने दिपून जाण्याचे पहिले पर्व ओसरू लागले होते. परभृततेऐवजी स्वसंस्कृतीतील सत्वगुणांच्या पायावर आधुनिक शिक्षणाचा विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली होती. कारकून निर्माण करणाऱ्या वसाहतवादी शिक्षणनीतीतल्या उणिवा अधोरेखित केल्या जाऊन स्वदेशी चळवळीचे प्रधान अंग म्हणून शिक्षणाचा विचार होऊ लागला. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रकल्प उभारण्यासाठी नवनवीन पर्याय पुढे येऊ लागले. तसे पाहिले तर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी १८८० साली स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलपासूनच राष्ट्रीय शिक्षणाच्या संकल्पनेचा पाया रचला गेला होता. या शाळेच्या उभारणीत चिपळूणकरांच्या जोडीला लोकमान्य टिळक, आगरकर, वा. शि.

आपटे, नामजोशी अशी ध्येयवादी शिक्षकांची फळी उभी होती. सरकारी नियंत्रणापासून दूर राहून, अल्प खर्चात शिक्षणसेवा देणाऱ्या या संस्थेने आपली तरुण पिढी देशाभिमानी व्हावी, शीलसंपन्न व बलसंपन्न व्हावी व राष्ट्राचा अभ्युदय करणारी व्हावी या प्रेरणेतून शाळा सुरू केली होती. यातूनच पुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली व राष्ट्रीय शिक्षणाच्या विस्ताराला सुरुवात झाली. टिळकांच्या जहाल विचारसरणीच्या अनुयायांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीइतकेच राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीलाही महत्त्व दिले.

या राष्ट्रीय अस्मितेच्या प्रेरणेतूनच ॲनी बेझंट यांनी हिंदूंसाठी हिंदू विश्वविद्यालय स्थापन करण्याची भूमिका पुढे आणली. ॲनी बेझंट यांनी 'राष्ट्रीय शिक्षण म्हणजे, भारतीयांनी आकाराला आणलेले, भारतीयांच्या नियंत्रणाखाली असलेले, निष्ठा, सेवाभाव, ज्ञान, नीतिमत्ता इत्यादींविषयीच्या आशयाचे शिक्षण' अशी कल्पना मांडली होती. (भोळे,२००४,पृ.१२५) पं. मदनमोहन मालवीय यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या संकल्पनेतूनच बनारस हिंदू विश्वविद्यालय स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. सर सय्यद अहमद यांनी अलीगढला मुस्लीम विद्यापीठाची स्थापना केली. धोंडो केशव कर्वे यांनी इ. स. १९०० ला पुण्याजवळ हिंगणे येथे स्त्रियांच्या शिक्षणासाठी आश्रम स्थापन केला व स्त्री-पुरुष समाज सेवकांचा वर्ग निर्माण केला. (कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याविषयी याच प्रकरणात पुढे विस्ताराने परामर्श घेणार आहोत.) १९०९ साली गोपाळ कृष्ण गोखले यांनी पुणे येथे 'सेवासदन' ही संस्था स्थापन करून स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठी स्त्री-शिक्षिकांचा वर्ग सुरू केला. बंगालमध्ये १९०१ साली रवींद्रनाथ टागोरांचे शांतिनिकेतन स्थापन झाले. पंजाबात दयानंद सरस्वती यांनी १९०२ साली कांगडी येथे 'गुरुकुल' स्थापन करून राष्ट्रभावनेतून धार्मिक शिक्षण देण्याचा प्रयोग केला. कोल्हापूरात आणि त्यानंतर तळेगावात विजापूरकरांनी राष्ट्रीय शिक्षणासाठी समर्थ विद्यालय स्थापन केले. १९०९-१० साली बडोदे संस्थानात बॅ. केशवराव देशपांडे यांनी समर्थ विद्यालयाच्या धर्तीवर गंगनाथ विद्यालय काढले. अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात भारतीय इतिहास व संस्कृतीचा वारसा संक्रमित करणारी, जाज्ज्वल्य राष्ट्राभिमान जागविणारी, व्यावसायिक व औद्योगिक कौशल्यांचे शिक्षण देणारी, उद्यमशीलता व नेतृत्वगुणांचा विकास करणारी, शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेला अग्रस्थान देणारी राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना आकार घेऊ लागली होती.

भारतीय गरजांचे समाराधन करणारे शिक्षण कसे देता येईल हा विसाव्या शतकातील मुख्य प्रश्न होता. इंग्लंडच्या परभृत शिक्षणापेक्षा भारतीय शिक्षणाच्या गरजा वेगळ्या होत्या. पण या परकीय सरकारास येथील सामाजिक स्थिती, समाजरचना, लोकांची मानसिकता, लोकांचे उद्योग-व्यवसाय वगैरे गोष्टी कळत नसल्यामुळे येथील

शिक्षणात एक प्रकारचा कृत्रिमपणा आला असल्याची तक्रार पटवर्धनांनी केली आहे. (पटवर्धन, पृ.१३) हिंदुस्थानच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक स्थितीचा विचार करून, ती सुधारण्याकरिता ज्या ज्या शारीरिक व मानसिक शक्तींचा विकास होणे आवश्यक आहे, त्या त्या शक्तींचा विकास करणारी शिक्षणप्रणाली आणणे ही मुख्य गरज होती. या गरजेतूनच 'राष्ट्रीय शिक्षणाची' संकल्पना पुढे आली. स्वत: पटवर्धनांनीही राष्ट्रीय शिक्षणाचा हा संबोध मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेतून स्पष्ट केला होता. "शिक्षण म्हणजे मनुष्याच्या शारीरिक व मानसिक शक्तींच्या उद्भव-विकास-परिपोष-परिपाकांचे मानवी उपाय आणि त्यांचा बुद्धिपुरस्सर अवलंब" ही तात्पुरती व्याख्या करून आमची परभृतवृत्ती ज्या योगे जाईल असले शिक्षण आम्हांस हवे आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. "देशहित साधणारे, खरा देशाभिमान करणारे, देशोन्नतीचा पाया घालणारे, आमच्या देशाचा व्यापार वाढविणारे, स्वदेशी कपड्यांचा खप करणारे, देशी माल उत्पन्न करणारे आणि उद्योगधंद्यास उर्जित करणारे साधन 'शिक्षण' आहे, हे राष्ट्रीय शिक्षणातून साध्य व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. "आमचे शिक्षण राष्ट्रीय पाहिजे, जातीजातीतील हेवेदावे व भेद, जमातीजमातीतील अलग भाव जेणेकरून दृष्टीआड होईल; धर्माचा, समजुतीचा, इतिहासाचा, परंपरेचा, चालीरीतींचा निराळेपणा जेणेकरून क्षुल्लक वाटू लागेल. 'भाई भाई भेद नाही' अशी वृत्ती आमच्या अंत:करणाच्या हिंदुस्थानपुरती सवयीची होईल अशी तजवीज आमच्या शिक्षणात झाली पाहिजे" (पटवर्धन, कित्ता, पृ. ९). राष्ट्रीय शिक्षणाचा हा विषय यापूर्वी मुसलमानी किंवा मराठा रियासतीत आला नव्हता, परंतु आता तो राष्ट्राचा प्रश्न म्हणून पुढे आला आहे. इंग्रज सरकार मात्र त्याकडे गांभीर्याने पहात नाही. सरकारने शिक्षणाची जबाबदारी केवळ स्वत:कडे न घेता शिक्षणप्रसारात खाजगी संस्थांचाही सहयोग मिळवायला हवा, त्यासाठी संस्थांना प्रोत्साहन अनुदानाची तरतूद करायला हवी, अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत. इतकेच नाही तर, पूर्वीच्या काळी जसे दरगावचे बारा बलुते होते, तसा गुरुजी हा एक बलुत्या ठरवून त्याने गावातील लोकांनी दिलेल्या डाळ-तांदुळावर निर्वाह करून त्यांच्या मुलांस शिकविण्याचे काम करावे आणि त्याकरिता सरकारातून त्याला काही ठरावीक नेमणूक मिळावी, (पटवर्धन, कित्ता,पृ.१९) अशीही एक अभिनव शिफारस त्यांनी केली होती.

साररूपाने सांगायचे झाल्यास राष्ट्रीय शिक्षण म्हणजे साक्षरतेचा प्रसार इतका मर्यादित अर्थ या प्रणालीचा पुरस्कार करणाऱ्यांच्या मनात नव्हता. प्रचलित शिक्षणव्यवस्थेला होणारा विरोध आणि त्यापेक्षा वेगळी शिक्षणव्यवस्था आणण्याची मागणी यामागे देशीवादी प्रेरणांचे बल होते. मातृभूमीवरून परकी सत्तेला हद्दपार करण्यासाठी त्यांनी लादलेल्या सर्व सांस्कृतिक आकृतिबंधांना नकार आणि

पुनरुज्जीवनवादी दृष्टिकोणातून एतद्देशीय समाजात नवा सुधारणावादी विचार रुजविणे ही राष्ट्रीय शिक्षणाची प्रेरणा होती. वसाहतवादी शिक्षणनीतीमुळे होणारे हिंदी लोकांचे अ-राष्ट्रीयीकरण (डी-नॅशनलायझेशन) थांबवावे हा विचार राष्ट्रीय शिक्षणाच्या केंद्रस्थानी होता. पाश्चिमात्य शिक्षणामुळे येणारी सांस्कृतिक परभृतता रोखण्यासाठी देशी परंपरा व मूल्यांचा आदर करणारे, स्व-संस्कृती, स्व-इतिहास, स्व-धर्माचे राष्ट्राभिमान निर्माण करणारे शिक्षण देण्यावर या चळवळीचा भर होता. "राष्ट्राच्या अभ्युदयासाठी राष्ट्रहितवर्धक दृष्टिकोनातून निर्भयपणे आणि स्वतंत्र रीतीने दिलेले शिक्षण" अशी राष्ट्रीय शिक्षणाची यथार्थ व्याख्या दत्तो वामन पोतदार यांनी केली होती. (आपटे, १९५८, पृ. ५) देशाला स्वायत्त व समृद्ध करण्यासाठी तरुणांमध्ये वैचारिक प्रेरणा जागविणे आणि त्याला कार्मिक कुशलतेची भक्कम जोड देणे ही राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पनात्मक मांडणी पुढे येते होती.

**राष्ट्रीय शिक्षणाची वाटचाल :**

न. चिं. केळकर यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या वाटचालीचे सूत्र सांगितले होते. "युनिव्हर्सिटीच्यामागे असलेले सरकारचे स्तोम मोडण्याच्या कल्पनेची प्रगती म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास" या सूत्रानुसार राष्ट्रीय शिक्षणाच्या वाटचालीचा प्रारंभ पुण्यातल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल'पासून होतो. सरकारी शिक्षणाशी स्पर्धा करण्याकरिताच राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम होता. शिक्षणाचा हा किल्ला सरकारच्या हाती होता, तो स्वकीयांनी सर केला म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सुटल्यासारखा आहे, असे केळकर म्हणत. (केळकर,१९२५, पृ. ३७६-३७७) राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास आणि स्वराज्यप्राप्तीची चळवळ या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक होत्या व त्यांची वाटचाल सोबतच होत होती. १९०५ साली वंग-भंगाच्या चळवळीपासून महाराष्ट्रात टिळकांनी 'स्वदेशी' आणि 'बहिष्कारा'ची चळवळ सुरू केली. या चळवळीतून वसाहतवादी शिक्षणाला पर्याय म्हणून देशी शिक्षणाची समांतर व्यवस्था निर्माण करण्याच्या विचाराला चालना मिळाली. १९०५ साली बनारसला राष्ट्रीय सभेसाठी एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांची महाराष्ट्रातील लेखक विष्णू मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यात पंडित मदन मोहन मालवीय यांनी 'हिंदू युनिव्हर्सिटी' स्थापन करण्याची कल्पना मांडली. लोकमान्य टिळकांनी व सुरेंद्र बॅनर्जी यांनी या प्रस्तावाला भक्कम पाठिंबा दिला. टिळकांनी स्वत:ची तीन वर्षे या विद्यापीठाला देण्याची व महाराष्ट्रातून हे काम पुढे नेण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली. प्रो. विजापूरकर व प्रो. भानू यांनी युनिव्हर्सिटीच्या कामासाठी वेळ देण्याचे अभिवचन दिले. साताऱ्याच्या करंदीकरांनी विजापूरकरांच्या तीन वर्षांच्या खर्चाची हमी घेतली. (केसरी २ जानेवारी १९०६) यानंतरच्या चार वर्षात पं. मदनमोहन मालवीय व

दरभंग्याचे महाराज यांनी एक कोटी रुपयांचा फंड जमा केला व कौन्सिलात विद्यापीठ कायदा संमत होऊन बनारसला हिंदू विश्वविद्यालय सुरू झाले. या विद्यापीठातून संस्कृत, धर्मशिक्षण, नीतिशिक्षण, गुरुशिष्यपरंपरा या भारतीय शिक्षणपरंपरांचे पुनरुज्जीवन झाले;त्याचबरोबर पाश्चात्य ज्ञानालाही शिक्षणक्रमात यथायोग्य स्थान देण्यात आले. ज्ञानाला देश, धर्म, जाती किंवा भाषा यांचा विटाळ होऊ शकत नाही. किंबहुना खरे विश्वबंधुत्व शुद्ध ज्ञानाच्या पायावरच रचले जाईल,अशा शब्दांत राष्ट्रीय शिक्षणाच्या भूमिकेचे समर्थन 'केसरी'तून न. चिं. केळकर यांनी केले होते. (केळकर, १९२५, पृ. २७) भारतातील तक्षशीला, नालंदा या विद्यापीठांच्या पूर्वपरंपरेला यानिमित्ताने नव्याने उजाळा मिळाला. अमेरिकेत १८७१ ते १९०१ या ३० वर्षांत खाजगी युनिव्हर्सिट्या काढण्यासाठी ६० कोटींचा लोकनिधी संकलित झाला होता, इंग्लंडातही साडेसात कोटींच्या लोकनिधीतून विद्यापीठे सुरू होती. बनारस विद्यापीठाच्या निमित्ताने भारतातही अशा प्रकारच्या लोकफंडातून देशी शिक्षणसंस्थांची रुजवात करण्याची परंपरा सुरू झाली होती. जमशेटजी टाटा यांनी शास्त्रीय शोधांच्या इन्स्टिट्यूटसाठी ३२ लक्ष रुपये देऊन ही परंपरा पुढे नेण्याचा नमुनार्श घालून दिला. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा हा पूर्वरंग होता.

१९०६ साली राष्ट्रीय सभेत तरुण मुलांना शिक्षण देण्याकरिता राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन कराव्यात, असा ठराव पारित झाला. येथून पुढे राष्ट्रीय शिक्षणाच्या दुसऱ्या पर्वाला प्रारंभ झाला. त्या काळात सरकार खाजगी शिक्षणसंस्थेला २५ टक्क्के अनुदान देत असे, परंतु शिक्षणसंस्थेचे स्वातंत्र्य हरण करीत असे. या सरकारी धोरणाला लोकमान्य टिळक *'चतकोर भाकरीची गुलामगिरी'* म्हणत. टिळकांच्या स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळी सुरू झाल्यावर सरकारने सर्व शाळांना परिपत्रक पाठवून सरकारमान्य शाळांतील विद्यार्थ्यांनी सरकार विरोधी सभांना उपस्थित राहू नये असे आदेशवजा फर्मान काढले. रिस्ले साहेबांच्या सहीने हे परिपत्रक निघाले होते, म्हणून त्याचा उल्लेख *'रिस्ले सर्क्युलर'* असा केला जातो. या परिपत्रकामुळे स्वदेशी चळवळीत सहभागी झालेल्या वीर सावरकरांना फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्यांनी दहा रुपये दंड देऊन वसतिगृहातून काढून टाकले. डेक्कन कॉलेजचे प्राचार्य सेल्बीसाहेब यांनी टिळकांसारख्या पुढाऱ्यांची भाषणे ऐकून विद्यार्थी राजकीय चळवळीत भाग घेतात व शाळेची शिस्त मोडतात म्हणून आक्षेप घेतला. तेव्हा "शिष्याचे राष्ट्रहित पाहत नाही तो त्याचा गुरू नव्हे" अशा शब्दात टिळकांनी केसरीत लेख लिहून सेल्बीसाहेबांना उत्तर दिले होते.

कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनापूर्वी कोल्हापूर संस्थानात विष्णू गोविंद विजापूरकर (१८६३–१९२६) यांनी 'राष्ट्रीय शिक्षणा'ची संकल्पना मांडली होती. विजापूरकर यांनी १८९३ मध्ये संस्कृत विषयात एम. ए. पदवी संपादन केली होती व

१८८६–१८८८ या काळात पुण्याच्या डेक्कन कॉलेजात, १८८८–१८९४ या काळात अहमदाबाद विद्यालयात आणि १८९४–१९०४ या काळात कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून काम केले होते. १९०५ साली राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परदेशी कागदाच्या उत्तरपत्रिका देण्यात आल्या होत्या. विजापूरकरांनी त्या बदलून स्वदेशी कागदाच्या पर्यायी उत्तरपत्रिका दिल्या. यावरून ब्रिटिश सरकारने विजापूरकरांविषयी शाहू महाराजांकडे नापसंती व्यक्त केली. संस्थानच्या दिवाणाकडून २३ सप्टेंबर १९०५ रोजी विजापूरकरांना नोकरीवरून काढून टाकण्याचा हुकूम बजावण्यात आला. यातूनच पुढे राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ चालविण्याचा विचार विजापूरकर करू लागले. देशातील तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागविण्यासाठी त्यांनी 'समर्थ विद्यालय' स्थापन केले. टिळकांनी दौरा काढून विजापूरकरांसाठी वीस हजारांची रक्कम उभी केली. केसरीतून राष्ट्रीय शिक्षणावर लेख लिहिले.

कोल्हापूर संस्थानात १८८५ -८६ साली 'कोल्हापूर लोकसभा' नामक जनमंच स्थापन झाला होता. या लोकसभेचे तिसरे अधिवेशन २ ऑक्टोबर १९०६ रोजी कोल्हापूरात वामन दाजी रूईकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. अधिवेशनात प्रामुख्याने तीन विषयांवर चर्चा झाली. कोल्हापूर नगरपरिषद बरखास्त करण्यात आली होती, तिचे जनहितार्थ पुनरुजीवन करावे; कोल्हापूर संस्थानात नवे उद्योग सुरू करण्यासाठी चालना द्यावी आणि संस्थानात शिक्षण प्रसारासाठी ठोस उपाय योजावेत. या तीन विषयांपैकी शिक्षणाचा ठराव विष्णू गोविंद विजापूरकर यांनी मांडला होता. हा ठराव मांडताना विजापूरकरांनी शिक्षण आणि लोकोद्धार यांच्या परस्परसंबंधांवर भर दिला होता. आपल्या भाषणात ते म्हणाले होते, "इंग्रज सरकारला लष्करी खर्च आहे. तो महाराजांना नाही. त्यामुळे शिक्षणावर खर्च करणे हे महाराजास अवघड होऊ नये. सर्व नोकरांनी वाचावयास व सहीपुरते तरी लिहावयास शिकले पाहिजे, असा सक्तीचा नियम महाराजांनी करावा आणि त्यासाठी रात्रीच्या मोफत शाळांतून साक्षरतेचे शिक्षण लोकांनी घेतले पाहिजे, अशी मागणी मी सरकारकडे चार वर्षांपूर्वी केली होती. पण ती मान्य झाली नाही. उलट रात्रीच्या शाळा पुष्कळ होत्या, त्या शाहू महाराजांनी बंद केल्या. आता सरकारने निदान पूर्वीच्या बंद केलेल्या रात्रीच्या मोफत शाळा पुन्हा सुरु कराव्यात असे माझे मागणे आहे." विजापूरकरांच्या या प्रस्तावाचे समर्थन करताना अप्पाजी विष्णु कुलकर्णी यांनी बडोद्याप्रमाणे कोल्हापूरातही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे अशी मागणी केली. प्राथमिक शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षणासाठीही पावले उचली पाहिजेत असेही त्यांनी आवाहन केले. "जन्मभूमीचा व धर्माचा अभिमान उत्पन्न करील अशा प्रकारचे तेजस्वी महाराष्ट्रीय शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारने केली पाहिजे. हे

पूर्णपणे करणे सरकारला अशक्य झाल्यास राष्ट्रीय शिक्षणाच्या खासगी शाळांना उदारपणे मदत करणे हे सरकारचे कर्तव्य आहे." अशी भूमिका अप्पाजी कुलकर्णी यांनी मांडली. (देशपांडे मु. गो., १९६३, पृ.४) राष्ट्रीय शिक्षणाच्या संकल्पाची ही मुहुर्तमेढ होती.

१ जून १९०६ रोजी विजापूरकरांनी कोल्हापूरात राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या 'समर्थ विद्यालया'ची स्थापना केली. ज. स. करंदीकर, वामन मल्हार जोशी हे शिक्षक सहकारी त्यांना लाभले. स्थापनेच्या वेळी विद्यालयात १८ विद्यार्थी होते, ती संख्या ७५ पर्यंत गेली. त्यानंतर 'महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ' स्थापन केले. त्यात विजापूरकरांना लोकमान्य टिळक, डॉ. नानासाहेब देशमुख, मुंबईचे वकील दाजी आबाजी खरे आणि इतिहासतज्ज्ञ चिंतामणराव वैद्य यांनी साथ दिली. संस्थेच्या उद्देशपत्रिकेत पुढील मुद्द्यांचा समावेश होता :

१. शैक्षणिक स्वातंत्र्यासाठी संस्थेला सरकारी नियंत्रणापासून स्वतंत्र ठेवणे.
२. मातृभाषेतून शिक्षण.
३. स्वधर्म, स्वसंस्कृती व आचारधर्माचे राष्ट्रीय अस्मितेचे शिक्षण; ऐतिहासिक, धार्मिक स्थळांना भेटी देणाऱ्या सहलींचे आयोजन
४. सरकारी नोकरीवर भिस्त न ठेवता स्वावलंबनाला महत्त्व देणाऱ्या हस्तकौशल्यांची व औद्योगिक शिक्षणाची जोड
५. शारीर सबलीकरणासाठी व्यायाम व सकस आहार
६. घोकंपट्टीला फाटा देणाऱ्या परीक्षा पद्धतीत बदल
७. संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र पाठ्यपुस्तकांची निर्मिती.
८. गुरुकुलाप्रमाणे गुरुसान्निध्यात शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृहांची सोय.

राष्ट्राच्या समकालीन व भविष्यकालीन गरजांना अनुरूप असलेले अभ्यासक्रम शिकविण्यासाठी समर्थ विद्यालयाने आपली स्वत:ची शिक्षणपद्धती विकसित केली होती. शक्य तितके मूर्त वस्तूंद्वारे व निरनिराळी उदाहरणे देऊन स्पष्ट करणारी ज्ञानदानाची योजना, शास्त्रीय विषयांच्या शिक्षणात विद्यार्थ्यांना स्वत: प्रयोग करण्याची संधी, कामकाजात बिनचूकपणा व कल्पनाशक्तीचा वापर करण्याची सवय वाढावी यासाठी हातकामाला प्राधान्य, देशोदेशीच्या भूगोलाचे अध्यापन करताना त्या देशांच्या इतिहासाची जोड, अशी आगळी वेगळी शिक्षणपद्धती स्वीकारण्यात आली होती. (केळकर, १९२५, पृ. ३०)

१९०७ साली कोल्हापूरचे समर्थ विद्यालय ब्रिटिश मुलुखातील तळेगाव दाभाडे येथे हलविण्यात आले. तेथे त्यांनी आपटे यांच्याकडून ६४ एकर जमीन घेतली व तात्पुरत्या झोपड्या बांधून नोव्हेंबर १९०७ पासून निवासी विद्यालय सुरू केले. शंभर विद्यार्थी मिळाले. मात्र विजापूरकरांची समर्थ विद्यालयाची शैक्षणिक चळवळ बंद पाडण्यासाठी

ब्रिटिश सरकारने संस्थेस उपद्रव देणे सुरू केले. १९०९ साली एका हुकुमान्वये समर्थ विद्यालयातील विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही सरकारी शाळेत प्रवेश दिला जाणार नसल्याचे फर्मान काढण्यात आले. अर्थात या हुकुमाचा विद्यार्थ्यांवर कुठलाच परिणाम झाला नाही. १० जून १९१० रोजी सरकारने समर्थ विद्यालयापासून समाजाच्या शांतता व सुव्यवस्थेस धोका पोहचू शकतो असे कारण देऊन ही 'बेकायदेशीर संस्था' असल्याचे जाहीर केले व संस्था बंद पाडली. समर्थ विद्यालयातील विद्यार्थ्यांचा अर्धवट राहिलेला अभ्यास तात्यासाहेब करंदीकर यांनी पुढल्या पाच वर्षांत खाजगी शिकवणी घेऊन पूर्ण केला. बेकायदेशीर संस्थेतील कोणत्याही दोन माणसांना एकत्र काम करता येणार नाही, या सरकारी अटीमुळे पुढे पर्यायी शिक्षणसंस्था उभी करण्यासाठी या शिक्षकांना काही करता आले नाही. पैकी नानासाहेब ओक यांनी'लोकशिक्षण' मासिक चालविले, करंदीकर 'केसरी'चे संपादक झाले. विद्यालयाचे विद्यार्थी दिवेकर आणि कानडे यांनी वाईस 'प्राज्ञ पाठशाळे'त काम केले. केसरी-मराठा संस्थेने वृत्तपत्रविद्येचे शिक्षण देणारी शाखा उघडली. समर्थ विद्यालयाखेरीज पुण्यास भालाकार भोपटकर व त्यांचे बंधू ल. ब. भोपटकर यांनी एक राष्ट्रीय शाळा चालविली होती. मात्र १९१० ला सरकारने समर्थ विद्यालय बंद पाडले.

लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीतून राष्ट्रीय शिक्षणाच्या संकल्पनेचा विस्तार झाला होता. १९१४ पर्यंत लो. टिळक सहा वर्षे तुरुंगात होते, त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीला खीळ बसली. २० ऑगस्ट १९१७ ला हप्त्या हप्त्याने स्वराज्य देण्याचे सरकारने जाहीर केल्याने व महायुद्ध सुरू झाल्यामुळे स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या चळवळी मंदावल्या होत्या. मात्र पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर असहकारितेच्या चळचळीने पुन्हा जोर धरला. १९२०-२१ साली असहकारितेच्या चळवळीमुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचेही पुनरुत्थान झाले. टिळकांचे निधन झाल्यानंतर सूत्रे गांधीजींच्या हाती गेली. असहकारितेच्या चळवळीसाठी गांधीजींनी एक कोटी रुपयांचा 'टिळक स्वराज्य फंड' उभा करण्यासाठी दौरा काढला. गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीत विद्यार्थ्यांनी सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार टाकल्याने शिक्षणाची पर्यायी व्यवस्था उभी करणे भाग होते. यातूनच राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचे पुनरुज्जीवन झाले. ६ जानेवारी १९२१ ला मुंबईत पहिली मराठी माध्यमातली राष्ट्रीय शाळा सुरू झाली. १९२१-२२ साली महाराष्ट्रात ५०० राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या. मुंबईतल्या डॉ. भडकमकर, दि. धों. साठ्ये यांच्या पुढाकारातून नॅशनल मेडिकल कॉलेज सुरू झाले. टिळक स्वराज्य फंडातून राष्ट्रीय शिक्षण संस्थास प्रारंभी मदत मिळाली. ठिकठिकाणी देशभक्त वकील, डॉक्टर, पत्रकार यांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीच्या कामात लक्ष घातले. मुंबईतली 'यंग नॅशनॅलिस्ट

लीग' ही युवक संघटनाही राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत सहभागी झाली.

टिळकांच्या निधनानंतर टिळकांच्या चाहत्यांनी पुण्यात 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' स्थापन केले. वाङ्मय, व्यापार, स्थापत्य व आयुर्वेदाचे शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. पुणे, वाई, येवला, नागपूर, सासवणे इत्यादी ठिकाणी राष्ट्रीय शिक्षण परिषदा भरविल्या. येवल्याच्या शिक्षणपरिषदेत पास झालेल्या ठरावातून राष्ट्रीय शिक्षणाची पुढील सूत्रप्रणाली नक्की झाली.

१. राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यास सेवादलाच्या पद्धतीप्रमाणे स्वयंसेवकास उपयुक्त असे शिक्षण द्यावे.
२. स्वराज्य संपादनार्थ लागणाऱ्या चळवळीचे सामर्थ्य व त्यास लागणारे शील, धैर्य व त्यागवृत्ती उत्पन्न होईल अशी दृष्टी तयार करणारे शिक्षण द्यावे.
३. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी स्वदेशी तत्त्वाचा पुरस्कार करावा, खादीचाच पोशाख करावा.

१९२० च्या असहकारितेच्या चळवळीने राष्ट्रीय शिक्षणविद्येचे पुनरुज्जीवन झाले. बडोदे संस्थानातील गंगनाथ राष्ट्रीय विद्यालय सरकारने बंद पाडल्यानंतर १९२१ साली बॅ. केशवराव देशपांडे यांनी संस्थानात 'साधकाश्रम' सुरू केला. साधकाश्रमात गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा व आचारपद्धतीचा प्रभाव होता. सकाळ-संध्याकाळची प्रार्थना, शौचकुपापासून आश्रमाची सर्व साफसफाई, चरख्यावर सुतकताई व विणकाम, स्वत:च्या हाताने पीठ दळणे, स्वयंपाक करणे,राष्ट्रीय ग्रंथांचे वाचन, खेडोपाडी जाऊन प्रचार-प्रबोधनाचे उपक्रम अशी सर्वसाधारण आश्रमाची दिनचर्या असे. केशवराव देशपांड्यांच्या मदतीला पुंडलीकजी कातगडे हे सच्चे अनुयायी असल्याने आश्रमाला एक स्वयंशिस्त लागली होती.

१९२१ नंतर राष्ट्रीय शिक्षणात सुरुवातीला समर्थ विद्यालयाने तयार केलेली पुस्तके उपयोगात आणली गेली. अभ्यासक्रमात काही समान सूत्र असावे म्हणून मातृभाषेचे अध्ययन, मराठ्यांचा इतिहास, मराठी माध्यमातून गणित व शास्त्रांचे शिक्षण, राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचे शिक्षण, शारीरिक शिक्षण, धर्मशिक्षण व धंदेशिक्षण असा आकृतिबंध विकसित झाला. गीतापठण, सूर्य नमस्कार, रामायण-महाभारत, ज्ञानदेव-तुकारामांची भजने, रामदासांच्या दासबोधातील समास, गोविंदाग्रजांची राष्ट्रीय गीते यांचा शिक्षणात समावेश केला गेला. धर्मशिक्षण की नीतिशिक्षण असा पेच अधून मधून निर्माण होई; परंतु त्यातली भेदरेषा नक्की करता येईना. सरकारी शाळेत युरोपियन शिक्षक क्रिकेटसारख्या खेळांवर भर देत. राष्ट्रीय शाळांत मात्र आट्यापाट्या, खो खो, अशा देशी खेळांवर भर असे. शारीरिक शिक्षणात प्रो. माणिकरावांचा संघव्यायामाचा कार्यक्रम स्वीकारला गेला, नमस्काराला कवायतीचे स्वरूप दिले गेले. औद्योगिक वा

धंदेशिक्षणाच्या बाबतीत स्वाभाविक मर्यादा होत्या. यंत्रशिक्षणासाठी लागणारे भांडवल नव्हते. शिवाय काँग्रेसच्या तत्त्वानुसार खादीनेच स्वराज्य मिळेल या मंत्राने भारलेली मंडळी खादीकेंद्री शिक्षणावर भर देत होती.

राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा चालविण्यासाठी नित्य नेमाने फंड जमा करण्याचे काम जिकिरीचे होते. लोक बिल्डिंग फंडाला, गोशाळेला पैसे देत, पण शाळा चालवायला पैसे देण्यासाठी खळखळ करीत. पाच रुपयांपासून फार तर दहा रुपयांपर्यंत फंड द्यायला लोक तयार असत. बऱ्याचदा भावाला विचारावे लागेल, नंतर बघूया, अशा सबबी सांगून कार्यकर्त्याला टाळले जात असे. 'भिक्षेकरी' म्हणून टोमणे मारले जात. मुष्टि फंड, मेळे, धर्मार्थ खेळ अशा मार्गांनीही फंड उभा करण्याचे प्रयत्न झाले. पण एकंदरित लोकांकडून पैसा काढणे हे दुर्घट काम होते. काँग्रेस कमिट्यांकडेही पैसा नव्हता. त्यामुळे ही चळवळ फोफावली नाही. (आपटे, १९५८, पृ. ७५) पालकांचा ओढा आपल्या पाल्यांना सरकारी मान्यतेच्या शाळेत घालण्याकडे असल्याने राष्ट्रीय शाळेतल्या विद्यार्थीसंख्येत वाढ झाली नाही. १९३२ साली सरकारने राष्ट्रीय शाळांवर बंदी घातल्यावर जेमतेम ८/१० शाळा टिकल्या होत्या.

मात्र असे असले तरी राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावनेचे बीज पद्धतशीरपणे पेरले जात होते. गावातली कोणतीही सभा असो, राष्ट्रीय शाळांतील शिक्षक-विद्यार्थ्यांचा त्यात पुढाकार असायचा. १९२१ ते १९२३ या काळात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली लढा सुरू होता, त्यावेळी चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेने या सत्याग्रहाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली होती. सत्याग्रहासाठी गेलेले ब्राह्मण-मुसलमान-मराठे अशा विविध जातीतील मुलांनी एकत्र भाकरी खाऊन जातिभेदाच्या रूढ कर्मकांडाला मुठमाती दिली होती. गांधीजींच्या दांडीयात्रेच्या वेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी गावोगावी जाऊन प्रभातफेऱ्या काढल्या, पोवाडे म्हटले. शिरोड्याच्या सत्याग्रहात विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या.

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ :**

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर २५ नोव्हेंबर १९२० रोजी लोकमान्यांचे स्मारक म्हणून राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा संकल्प सोडण्यात आला होता. त्यानंतर ६ मे १९२१ रोजी वसईस शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेत टिळकांच्या नावाने राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. २० जून १९२१ रोजी पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात सभा होऊन डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाचे पहिले नियामक मंडळ संघटित करण्यात आले व विद्यापीठाची घटना ठरविण्यात आली. पहिल्या कार्यकारी मंडळात शि. म. परांजपे, सीताराम केशव दामले, वि. गो. विजापूरकर, ज. स. करंदीकर, श्री. व्यं.

केतकर, दत्तो वामन पोतदार, श्री. म. माटे, वा. गो. आपटे, शं. दा. पेंडसे इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. ११ फेब्रुवारी १९२२ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या सभेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे उद्देश ठरविण्यात आले, ते असे:

- सरकारी मदत न घेता शिक्षणकार्य चालविणे.
- विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना उत्पन्न होऊन ते स्वावलंबी व राष्ट्रकार्यक्षम होतील असा शिक्षणक्रम ठरविणे.
- वरील उद्देशपूर्तीसाठी आदर्शभूत शिक्षणसंस्था स्थापन करणे व चालविणे.
- या शिक्षणसंस्थांमार्फत परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्या अगर शिफारसपत्रे देणे.
- उच्च दर्जाचे अध्यापन, संशोधन व तत्सम कामे करणे.

'विद्यापीठ हा राष्ट्रकार्याचा मठ' असल्याची भूमिका विद्यापीठाचे कुलपती शंकराचार्य यांनी स्पष्ट केली होती. पुढे विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभातही विद्यार्थ्यांना '*देशकार्यकर्ते व्हा*' असा उपदेश केला जात असे. (केसरी, ४ सप्टें. १९२३) विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर पहिले कुलगुरू म्हणून चिंतामण विनायक वैद्य यांची निवड करण्यात आली. वाङ्मय विद्याशाखेचे प्रमुख म्हणून न. चिं. केळकर, शास्त्र शाखेचे प्रमुख म्हणून डॉ. रामकृष्ण भडकमकर व वैद्यकशास्त्र विद्याशाखेचे प्रमुख म्हणून डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख यांची निवड करण्यात आली.

टिळक विद्यापीठ अस्तित्वात येण्याआधी पुण्यात टिळक महाविद्यालय चालविले जात होते. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली या महाविद्यालयासाठी बांधलेल्या नव्या इमारतीचा प्रवेश समारंभ झाला. विद्यार्थ्यांनी या इमारतीच्या बांधकामासाठी श्रमदान केले होते. १२ जून १९२२ पासून टिळक महाविद्यालयाचे वर्ग सुरू झाले. बौद्धिक व व्यावहारिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण या महाविद्यालयातून दिले जात होते. न. चिं. केळकर, शि. म. परांजपे, चिंतामणराव वैद्य यांनी विनावेतन शिकविण्याची जबाबदारी घेतली होती. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'विद्यार्थी शासित संघ' स्थापून विद्वानांची व्याख्याने, वादविवाद मंडळ, स्वदेशी भांडार इत्यादी उपक्रम चालविले. आयुर्वेद शाखेने त्रैमासिक चालविले, रुग्णसेवा देण्याचा उपक्रम सुरू केला. वाङ्मय शाखेने 'राष्ट्रसंघटनाशास्त्रा'चे तात्त्विक व प्रात्यक्षिक शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण केली. जातेगावला ग्रामसेवाश्रम सुरू केला. मिठाच्या सत्याग्रहासाठी टिळक महाविद्यालयाची तुकडी पाठविण्यात आली. २२ ऑगस्ट ते २२ नोव्हेंबर या कालावधीत सत्याग्रहात सहभागी होता यावे म्हणून महाविद्यालय बंद ठेवण्यात आले होते. कायदेभंगाच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर १९३२ साली सरकारने हे महाविद्यालय बेकायदेशीर ठरवून बंद पाडले. पण या महाविद्यालयाशी संबंधित शिक्षक, कार्यकर्ते टिळक विद्यापीठाच्या कामात सहभागी झाले. मुंबईस नॅशनल मेडिकल कॉलेज

सुरुवातीला दोन वर्षे टिळक विद्यापीठाला संलग्न होते. १९२६ पर्यंत व्यापारी महाविद्यालय व १९२७ पर्यंत कॉलेज ऑफ फाइन आर्टस संलग्न होते. १९३५-३६ साली सुरू झालेले अमरावतीचे आयुर्वेद महाविद्यालयही दोन वर्षे टिळक विद्यापीठाशी संलग्न होते.

सरकारने टिळक महाविद्यालय बंद पाडल्यानंतर आयुर्वेद शाखेचा शिक्षणक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी २६ जून १९३३ रोजी पुण्यात आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातले हे पहिलेच आयुर्वेद महाविद्यालय होते. वैद्य नानलशास्त्री हे या महाविद्यालयाचे अधिपती होते. पहिल्या वर्षी ६५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. २१ जानेवारी १९३४ रोजी वैद्यकीय अभ्यासासाठी बांधलेल्या शवविच्छेदनगृहाचे नाशिकच्या वैद्य कृष्णशास्त्री देवधर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.१९२५ साली विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी राष्ट्रीय शिक्षण मंडळाने सुरू केलेले ताराचंद रामनाथ धर्मार्थ रुग्णालय उपलब्ध झाले. १९३७ साली बाह्य रुग्ण विभाग व सुतिकागृहासाठी स्वतंत्र इमारती बांधून झाल्या. २० नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई राज्याचे प्रधान मंत्री बाळासाहेब खेर यांच्या हस्ते आयुर्वेद महाविद्यालयाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन झाले. मुंबई सरकारने कायदा करून आयुर्वेद शिक्षणाला मान्यता अनुदानही द्यायला सुरुवात केली. १९४४ पर्यंत आयुर्वेद विद्याशाखेच्या परीक्षा घेण्याचे व पदवीदानाचे काम टिळक विद्यापीठ करीत होते. मात्र १९४४ पासून मुंबई राज्य सरकारने वैद्यकीय परीक्षांसाठी स्थापन केलेल्या बोर्डामार्फत परीक्षा घेतल्या जाऊ लागल्या. १९४६ साली आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाची इमारत बांधण्यात आली. १९४९ साली पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर आयुर्वेद महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्न झाले.

टिळक विद्यापीठाने मराठीतून उत्तम ग्रंथमाला प्रकाशित केली. त्यात नगररचनाशास्त्र, रसायनशास्त्र, कौटिलीय अर्थशास्त्र, सिद्धौषिधिशास्त्र, अध्यात्मविद्या, भारताचे प्राचीन वैभव, रशियन राज्यक्रांतीचा इतिहास इत्यादी ग्रंथ प्रकाशित केले. विद्यापीठाने मराठी परिभाषानिर्मितीचा प्रकल्प पूर्ण केला. संस्कृत भाषा प्राविण्य व संगीत विशारद परीक्षा घेतल्या. १९३८ साली मुंबई सरकारने टिळक विद्यापीठाच्या परीक्षांना मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांची समकक्षता दिली. टिळक विद्यापीठाने राष्ट्रबांधणीसाठी सातारा, पुणे व नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी जनता शिक्षणाचे व ग्रामीण शिक्षणाचे वर्ग घेतले. या वर्गातून ग्रामसफाई, आर्थिक पहाणी, प्रौढांसाठी रात्रीचे साक्षरतावर्ग, सूतकताई, औषधी मदत इत्यादी उपक्रम केले जात. १९३७ साली गांधीजींची 'वर्धा शिक्षण योजना' आल्यानंतर विद्यापीठाने मूलोद्योग शिक्षणाचा उपक्रम सुरू केला. सासवड विभागात ४ शाळा काढल्या. सर्वोदय विद्यालय स्थापन केले. १९५० नंतर मूलोद्योग शिक्षणाचा उपक्रम बंद पडला. टिळक विद्यापीठाच्या वाटचालीत कुलपती म्हणून डॉ. कुर्तकोटी

(१९२१ ते १९३४), चिं. ग. वैद्य (१९३४ ते १९३८), लोकनायक अणे (१९३८ ते १९४२),बाळासाहेब खेर (१९४२ ते १९५०), दत्तो वामन पोतदार (१९५० पासून) यांनी जबाबदारी सांभाळली.

टिळक विद्यापीठाला राज्यातील पुणे, अहमदनगर, नाशिक, जळगाव, भुसावळ, शेगाव, अकोला, अमरावती, खामगाव, अकोट, नागपूर, हिंगणघाट, भंडारा, चंद्रपूर, सोलापूर, सातारा, बेळगाव, दापोली, रत्नागिरी, मालवण, वेंगुर्ला, पालघर इत्यादी ठिकाणच्या बऱ्याच माध्यमिक शाळा जोडलेल्या होत्या. अहमदनगरला विनायक बळवंत चौकर वकील, जयसुखलाल मेहता, कुंदनमल फिरोदिया इत्यादींच्या पुढाकाराने १९२१ साली स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय शिक्षण मंडळा"मंडळातर्फे राष्ट्रीय पाठशाळा चालविली जाई. पाठशाळेत बौद्धिक शिक्षणाखेरीज प्रेसमनशिप, कंपोझिंग, बाइंडिंगची कौशल्ये शिकविली जात. देशी व इंग्रजी जमाखर्च, व्यापारी कायदा व पत्रव्यवहार, बागकाम, सुतारकाम शिकविले जाई. पाठशाळेला जोडून मोहनमुद्रा नामक मुद्रणशाळा होती, त्या छापखान्याच्या उत्पन्नातून शाळेला आर्थिक मदत मिळत असे. खादी प्रदर्शन, खादी विक्रीचे उपक्रम चालविले जात. १९३२ साली सरकारने ही शाळा बेकायदेशीर ठरवून शाळेचे सामान जप्त केले. त्यानंतर या शाळेचे पुनरुज्जीवन होऊ शकले नाही.

स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य आणि राष्ट्रीय शिक्षण या टिळकांच्या चतु:सूत्रीने प्रभावित झालेले नागनाथ घाणेकर यांनी साताऱ्याला 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली व १ फेब्रुवारी १९१२ पासून स्वत: शिक्षकाची जागा स्वीकारली. पुढे होमरूल लीग चळवळीत भाग घेण्यासाठी फेब्रुवारी १९२० ला त्यांनी शाळा सोडली. त्यानंतर नागपूरच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या ठरावाला प्रतिसाद देऊन १ मार्च १९२१ रोजी साताऱ्याला 'टिळक राष्ट्रीय विद्यालया'ची स्थापना केली. न्यू इंग्लिश स्कूल सोडलेल्या १२ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शाळेत प्रवेश घेतला. सुरुवातीला देवळाच्या आवारात शाळा भरत असे. या शाळेत दांडपट्टा, भालाफेक अशा मर्दानी खेळांना प्राधान्य दिले जाई. हिंदी बरोबर गुजरातीही शिकविली जात असे. गावातल्या मेंढपाळांकडून लोकरीचे सूत कातून आणून गरम कोटाचे कापड विणले जाई. शाळेच्या सुतारकामाच्या शाखेतून टेबल, खुर्च्या, स्टुले, बाके तयार करण्याचे शिक्षण दिले जात असे. आगपेट्या तयार करणे, गंजीफ्रॉक विण्याचेही उपक्रम चालवले जात. संगीतात ऐतिहासिक पोवाडे गायला शिकविले जाई. विद्यार्थी साताऱ्यात भरणाऱ्या सभांच्यासाठी स्वयंसेवक म्हणून कामे करीत. गणेशोत्सवातील मेळ्यातून शाळेसाठी निधी संकलीत केला जाई. १९२४ च्या बेळगाव काँग्रेस अधिवेशनासाठी स्वयंसेवक म्हणून पाच शिक्षकांनी सहभाग दिला होता. १९३० च्या चळवळीत तर ही शाळा सर्व सातारा जिल्ह्याचे केंद्र बनली होती. ८ जानेवारी १९३२ रोजी सरकारने वटहुकूम काढून ही शाळा ताब्यात घेतली.

असहकाराची चळवळ शांत झाल्यावर २२ मार्च १९३५ रोजी पोलिसांनी शाळेची इमारत नाथ घाणेकरांच्या ताब्यात दिली. मात्र पुन्हा शाळा सुरू झाली नाही. १५ ऑगस्ट १९४८ रोजी ही शाळा साताऱ्याच्या कन्या शाळेत वर्ग करण्यात आली.

साताऱ्याजवळ वाईला प्राज्ञ पाठशाळेनेही टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा सहा वर्षांचा माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम चालविला होता. सुमारे १०० विद्यार्थ्यांची वसतिगृहात सोय करण्यात आली होती. वाईला राष्ट्रीय शिक्षण परिषद भरविण्यातही या संस्थेचा पुढाकार होता. लक्ष्मणशास्त्री जोशी, वि. गो. आपटे, श्री. शं. नवरे यांनी अल्प वेतनावर या शाळेत शिकविण्याचे काम केले. खानदेशात अमळनेर येथे १९१४ पासून 'खानदेश शिक्षण मंडळ' काम करीत होते. १९२० च्या नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनासाठी गेलेले शिक्षक श्री. ज. ग. गुणे उर्फ स्वामी कुवलयानंद व श्री. मोहनी यांनी खानदेश शिक्षण मंडळाचे राष्ट्रीय शिक्षणसंस्थेत परिवर्तन करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे अमळनेरात राष्ट्रीय शिक्षणाची सुरुवात झाली. सुरुवातीला समर्थ विद्यालयाप्रमाणे अभ्यासक्रमांची आखणी झाली. अमळनेर हे राष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र व्हावे या भूमिकेतून शिक्षणाचा दर्जा उच्च राहील याची काळजी घेण्यात आली. टिळक विद्यापीठाला हे केंद्र जोडण्यात आले नाही. गांधीवादी कार्यकर्ते शंकर विनायक ठकार यांच्या राष्ट्रसेवेचा प्रारंभ अमळनेरच्या राष्ट्रीय शाळेपासूनच झाला. या शाळेतून शिक्षण घेतलेले स्वामी रामानंद तीर्थ यांनी लिहिलेल्या आठवणीतून अमळनेरच्या शैक्षणिक वातावरणाची कल्पना येते. शाळेचे प्राचार्य गुणे हे ब्रह्मचारी, झोपडीत राहणारे. त्यांच्या सहवासात ब्रह्मचर्याचा अर्थ अंत:करणाचे पावित्र्य, मनाची शुद्धी असा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रूजत होता. आत्मपरीक्षणाची सवय लागण्यासाठी विद्यार्थ्यांनी दररोज दैनंदिनी लिहायची पद्धत असे. दैनंदिनीतून पापनिवेदन करण्याची संधी घ्यायची कल्पना होती. प्रामाणिकपणे व स्पष्टपणे केलेल्या पापोच्चारणाने व पश्चातापाने मानसिक शुद्धता लाभते हा संस्कार दृढ होत असे. नित्य नियमाने व्यायाम, लष्करी शिक्षण, तसेच महिन्यातून काही दिवस उपास करून शारीर शुद्धीचाही उपक्रम चालत असे. प्राचार्य बाळासाहेब गुणे उर्फ स्वामी कुवलयानंद हे बडोद्यास प्रो. माणिकराव यांच्याकडे मल्लविद्या व शस्त्रविद्या शिकून तयार झालेले असल्याने त्यांचा शारीरिक शिक्षणावर विशेष भर असायचा. दैनंदिनीप्रमाणे वादविवाद-मंडळात बोलण्याचा परिपाठ असे. वैचारिक सुसंबद्धता व अभिव्यक्तीतल्या स्पष्टपणासाठी हा सराव उपयोगी पडायचा. खादीचे व्रत असायचेच. चरख्यावर सूत कातताना अंत:करणातील गुंतागुंत उलगडण्याचाही स्वाध्याय चालत असे. गीतापठण व बीजग्रंथांचे वाचन ह्यांची जोड असल्याने वैचारिक धारणा तयार व्हायला मदत व्हायची. राष्ट्रीय चळवळीचा अनुबंध कायम ठेवून ही शैक्षणिक साधना चालत असे. गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीत अमळनेरच्या राष्ट्रीय विद्यालयातले विद्यार्थी सहभागी झाले

होते. या विद्यार्थ्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेण्यासाठी वर्षभर संस्था बंद ठेवण्याचा अर्ज प्राचार्यांकडे केला होता. अर्थात त्यांच्या प्राचार्यांनाही कायदेभंग चळवळीत सहभागी व्हायचेच होते. थोडक्यात, राष्ट्रीय शिक्षणातून स्वावलंबनाचा आणि स्वत:चा मानसिक घाट घडविण्याचा संस्कार रूजत होता. देशभक्तीला आध्यात्मिकतेची डूब मिळत असल्याने प्रेम, सत्य आणि शुचिता या मूल्यांचे पोषण होऊन जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन घेऊनच ही मुले बाहेर पडत होती. (रामानंद तीर्थ, १९७६, पृ. २०-२८)

१९२१ साली खानदेश शिक्षण मंडळाने राष्ट्रीय महाविद्यालय सुरू करून राष्ट्रीय शिक्षणाचा विस्तार करण्याचा संकल्प केला होता; मात्र सरकारी अंमलदारांनी व विशेषत: प्रांत ऑफिसर तांबे यांनी संस्थाचालकात फूट पाडली व संस्थेला राष्ट्रीय शिक्षणापासून दूर नेण्यात यश मिळवले. या मुद्द्यावरून १९२३ साली संस्थेच्या काही आजीव सेवकांनी राजीनामे दिले व राष्ट्रीय शिक्षणाचा अमळनेरातील हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प बारगळला. त्यामुळे अमळनेरच्या शाळेत आध्यात्मिक व मानसिक घाट तयार झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ यांना पुढील अभ्यासक्रमासाठी पुण्याच्या टिळक विद्यापीठात प्रवेश घ्यावा लागला. टिळक विद्यापीठात इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्राचा अभ्यास करताना एडमंड बर्कचे 'फ्रान्सच्या राज्यक्रांतीवरील विचारविमर्श', जॉन स्टूअर्ट मिलचे 'स्वातंत्र्या'वरचे पुस्तक, रुसो, हॉब्ज, लॉक यांचे बीजग्रंथ अभ्यासायला मिळाल्याने स्वामीजींचा विचार व्यासंग वाढला. विद्यापीठात देशभक्तांची व राष्ट्रीय पुढाऱ्यांची भाषणे व्हायची. त्यातून देशसेवेचे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर रुजत असे. स्वामी रामानंदांनी टिपलेला एक अनुभव या दृष्टीने उद्धृत करण्याजोगा आहे : विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी म. गांधी आले होते. कार्यक्रमात आधीच्या वक्त्यांनी गांधीजींची व लोकमान्यांची तुलना केली होती. गांधीजींनी अतिशय भाववेगाने टिळकांविषयीचा आदर व्यक्त करून टिळकांची आणि आपली तुलना होऊच शकत नाही, मी त्यांचा नम्र पाईक आहे, असे उद्गार काढले आणि त्यांच्या डोळ्यांना धारा लागल्या. समोरच्या सर्व श्रोतृसमाज गांधीजींच्या ह्या भावदर्शनाने गहिवरला आणि त्यांच्याही अश्रूधारा सुरू झाल्या. अंतरात्मा जागृत करणारे असे अनुभव राष्ट्रीय शाळेतून विद्यार्थी वेचून घेत असल्याने राष्ट्रबांधणीसाठी नवी बांधिलकी घेऊन तयार होणारी पिढी बाहेर पडत होती. (रामानंद तीर्थ, १९७६, पृ. २९-३१) शिक्षण पूर्ण झाल्यावर १९२९ साली स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्यातील (त्यावेळचे हैद्राबाद संस्थान) हिप्परगे येथील राष्ट्रीय शाळेचे मुख्याध्यापकपद स्वीकारले. व्यंकटराव व अनंतराव या बंधूंनी आपल्या मालमत्तेतला बहुतांश भाग देणगी देऊन ही शाळा चालविली होती. गुरुकूल पद्धतीच्या या निवासी शाळेत झोपड्यांमध्येच रहात. दर रविवारी विद्यार्थी शेण गोळा

करून झोपड्या सारवत. घोंगड्या पसरून मुले अभ्यासासाठी बसले की त्या जागेचे वर्गात रूपांतर होई. खादीचा सदरा हाच गणवेश असायचा. पहाटे साडेचारला उठणे, त्यानंतर ५ वाजता सामुदायिक प्रार्थना, ८ वाजता दूध भाकरीची न्याहारी, सकाळ-दुपार वर्ग, संध्याकाळी ५ पासून व्यायाम, ७ वाजता प्रार्थना, रात्रीच्या भोजनानंतर ९ वाजता झोपणे असा दिनक्रम असे. केवळ बौद्धिक शिक्षणावर भर न देता जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणारे जीवनशिक्षण हे शाळेचे ध्येय होते. बौद्धिक, शारीरिक, मानसिक अशा सर्व अंगांनी परिपूर्ण शिक्षणाचा हा आकृतिबंध विद्यार्थ्यांच्या शुद्ध अंत:करणाच्या घडणीवर भर देत असे. अंत:करणाच्या तारा छेडल्याशिवाय विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होत नाही, ही भूमिका या शिक्षणविचारामागे होती. विद्यार्थ्यांना सुश्रुषा करता यावी व चांगले परिचारक बनता यावे या दृष्टीने शिक्षण दिले जाई. जनसेवा हे शाळेचे ब्रिदवाक्य होते. पददलित बहुजनसमाजाला मुक्त करणारी नवी सेना तयार करणे हे शाळेचे ध्येय होते. त्यामुळे शालेय शिक्षणाबरोबर खेडुतांकरिता रात्रशाळाही चलविली जात असे. ग्रामसुधारणांच्या कामात मुलांना थेट कार्यानुभव मिळायचा. महिन्याच्या शेवटच्या रविवारी कॉंग्रेसचा ध्वजवंदनाचा कार्यक्रम होत असे. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या चरित्रांचे वाचन, स्वातंत्र्य आंदोलनाचे इतिहास, वीरगीते व पोवाड्यांचे गायन अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या मनतत राष्ट्रीय बांधिलकी निर्माण करणारा संस्कार पेरला जायचा. राष्ट्रीय शिक्षणाची शाळा चालविण्यासाठी स्वामीजींसारखे ध्येयवादी शिक्षक लाभले असल्याने हा शैक्षणिक प्रयोग यशस्वीपणे चालविला जात होता. (तीर्थ रामानंद,१९७६,पृ. ४३-४९)

नागपूरच्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ठरावानंतर राष्ट्रीय शाळा सुरू करण्याचा उत्साह सर्वच भागात वाढला होता. या प्रेरणेतूनच जळगावात एप्रिल १९२१ मध्ये 'टिळक राष्ट्रीय विद्यालय' स्थापन करण्यात आले. खानदेशातील प्रसिद्ध कवी व वकील केशवराव सोनाळकरांच्या मुलांनी राष्ट्रीय विद्यालयात प्रवेश घेतल्याने इतरही मुलांचे उत्साहाने प्रवेश सुरू झाले. सात शिक्षकांनी वर्षभर विनावेतन काम केले. शाळेने खादी भांडार, चर्मालयही चालवले. विनोबांच्या संपर्कात आल्यानंतर काही मुले वर्ध्याला विनोबांच्या अश्रमात दाखल झाली. १९२४ पासून विद्यार्थी संख्या कमी होऊ लागली. १९२५ साली फक्त ३० विद्यार्थी उरले; त्यामुळे शाळेची बौद्धिक शाखा बंद करण्यात आली. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीतल्या सहभागामुळे सरकारने संस्था बेकायदेशीर ठरवून जप्त केली. नाशिक येथे १९०६ सालीच बाबासाहेब खरे यांनी मुष्टिफंड जमा करून राष्ट्रीय शाळा काढली होती; पण सरकारी दडपशाहीमुळे ती बंद पडली.

१९२१ साली नाशिकमध्ये डॉ. नारायणराव सावरकर यांनी राष्ट्रीय शाळा स्थापन

करण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात डॉ. कूर्तकोटी नाशिक येथे स्थायिक झाल्याने त्यांचीही या शाळेला मदत झाली. पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांनी संगीताचा कार्यक्रम करून ७६० रुपयांची देणगी संस्थेला दिली. या राष्ट्रीय शाळेत साबण, मुलामा, मेंथाल, पेपरमिट, गुंड्या इत्यादी वस्तू तयार करण्याचे शिक्षण दिले जाई. शि. रा. कळवणकर यांनी या संस्थेच्या उभारणीत लक्ष घातले होते. मात्र शिक्षकांच्या स्वभावदोषामुळे ही संस्था बंद पडली. (आपटे, १९५८,पृ. २१०) नाशिक जिल्ह्यात येवले येथे २२ मे १९२१ रोजी लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ 'टिळक विद्यालय' स्थापन करण्यात आले. शेठ भागचंद रंगीलदास यांनी शाळेला वीस हजारांची देणगी दिली. संस्थेत साधारणत: २००/२५० विद्यार्थी शिक्षण घेत असत. मुष्टिफंडातून शाळेचा दैनंदिन खर्च भागविला जात असे. इथे नोकरी करण्याकरिता विद्यार्थी तयार केले जात नसून स्वराज्य संपादन करण्याकरिता सैनिक तयार केले जातात, असे अभिमानाने सांगितले जाई.

कोकणात १९२१ च्या सुमारास वेंगुर्ले, मालवण, रत्नागिरी, दापोली येथे राष्ट्रीय शाळा निघाल्या. या सर्व शाळा जेमतेम १९२६ पर्यंत चालू होत्या. रत्नागिरीची शाळा चालविण्यात अप्पासाहेब पटवर्धनांचा पुढाकार होता. दापोलीच्या शाळेला मुंबईचे सोन्याचे व्यापारी हरिभाऊ गोखले यांचा आधार होता. मालवणच्या शाळेला मुंबईच्या स. का. पाटलांचा आधार होता. कुलाबा जिल्ह्यात सासवणे येथे वैश्य विद्याश्रमाने गांधीजींच्या शिकवणीला अनुसरणारे १० वर्षांचे शिक्षण देण्याचा उपक्रम केला. गांधीजींच्या स्वावलंबनाच्या आदेशाला १४०० वार खादी विणून आश्रमाने प्रतिसाद दिला होता. कुलाबा जिल्ह्यातील खादी प्रदर्शनांची जबाबदारी याच आश्रमाने स्वीकारली होती. गांधीजींच्या १९३० च्या असहकार आंदोलनात आश्रमातील ४६ जणांचा सहभाग होता. १९३२ साली सरकारने सावणेच्या वैश्य विद्याश्रमालाही बेकायदेशीर ठरविले गेले. आचार्य ढवणे यांनी १९३४ साली आश्रमबंदी उठल्यावर पुन्हा राष्ट्रीय शिक्षणाचे नवे पर्व सुरू केले. १९४२ च्या लढ्यात पुन्हा आश्रमवासीयांनी भाग घेतला. आश्रमातील दयाबाईंना स्वातंत्र्यलढ्यात ७ वेळा तुरुंगवास भोगावा लागला होता. गांधीजींच्या हत्येनंतर भाई ढवण यांनी जातीयतेचा नायनाट व्हावा या हेतूने वैश्य ज्ञातिफंडातून स्थापन झालेला आपला आश्रम विसर्जित करण्याचा निर्णय घेतला. राज्याचे प्रधानमंत्री बाळासाहेब खेर यांची भेट घेऊन वैश्य-विद्याश्रम ही संस्था स्थावरजंगम मालमत्तेसह सरकारच्या स्वाधीन करण्याची इच्छा प्रदर्शित केली. सरकारने ही विनंती स्वीकारून ६ मार्च १९४९ रोजी संस्था ताब्यात घेतली. कोकणस्थ वैश्य समाजाने जातीयता निर्मूलनासाठी संस्था विसर्जित करून एक उत्तम नमुनादर्श घालून दिला.

महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सरहद्दीवरील निपाणी येथे १९२१ साली 'विद्याप्रसारक मंडळा'ची स्थापना झाली व टिळकांच्या नावाने राष्ट्रीय पाठशाळा सुरू

करण्यात आली. या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी अस्पृश्यांना पाणवठा खुला करावा यासाठी चळवळ केली. खादीप्रचार व प्रभातफेऱ्या काढून राष्ट्रीय अस्मिता जागरणाचे काम केले. या शाळेतील शिक्षक हनुमंतराव जोशी यांनी पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजात यंत्रशास्त्र शिकून आल्यानंतर विजेवर चालणाऱ्या घड्याळांचा कारखाना काढला. (आपटे, १९५८)

**विदर्भातील शिक्षणप्रसार :**

नागपूरला विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी खूप जुनी होती. १८८२ पासून नागपूरला विद्यापीठ व्हावे अशी मागणी केली जात होती. नागपूर विधिमंडळाची स्थापना झाल्यानंतर १९१३ पासून या मागणीचा जोर वाढला होता. नागपूरात १९१४ साली आयुर्विज्ञान शिक्षणकेंद्राची पुन:स्थापना झाली होती. दरम्यान १९१८ साली बनारस व पटणा येथे नवी विद्यापीठे स्थापन झाली. या पार्श्वभूमीवर श्री डी. बी शुक्ल यांनी नागपूर विधानसभेत शिक्षणाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात ४ कोटींची तरतूद करण्यात आली तर नागपूरच्या विद्यापीठ स्थापनेचा मार्ग सुकर होईल असा प्रस्ताव ठेवला. नागपूरात ७ महाविद्यालये व अनेक माध्यमिक शाळा असल्यामुळे तेथून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्यांना उच्च शिक्षणासाठी नागपूरात विद्यापीठ नसल्याने या विद्यार्थ्यांची कोंडी होते, असे श्री शुक्ल यांनी आपल्या प्रस्तावाचे समर्थन केले. सर गंगाधरराव चिटणवीस यांनी शुक्ल यांच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. तरी नागपूर विद्यापीठ स्थापनेसाठी त्यानंतर पाच वर्षे थांबावे लागले. १९२३ साली नागपूर विद्यापीठाची विधिवत स्थापना झाली.

२३ नोव्हेंबर १९१८ रोजी महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचे नागपूरात 'स्त्री शिक्षण' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. मॉरिस कॉलेज व भिडे गर्ल्स स्कूलच्या विद्यार्थिनींसमोर आणि व्यंकटेश थिएटरमध्ये जनतेसाठी त्यांची स्त्री शिक्षणावर व्याख्याने झाली. नागपूरच्या शैक्षणिक विश्वात या व्याख्यानांचा सकारात्मक परिणाम झाला. स्त्रिया व वंचित वर्गाच्या शिक्षणासाठी शाळा व वसतिगृहांच्या स्थापनेत नागपूर अग्रेसर होते. ३० मे १९२० रोजी कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित संमेलन झाले. याच वर्षी सी. पी. बेरार दलित वर्ग शिक्षण संस्था स्थापन झाली. १९२२ साली संस्थेचे कार्यकारी मंडळ आर. जी. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली अस्तित्वात आले. नागपूरातले सर्व जातीतले मान्यवर या मंडळाचे सदस्य होते. एम. जी. चिटणवीस उपाध्यक्षपदी, टी. जे. गजभिये, एस. बी. कोसारे हे सचिव आणि जी. एम. ठवरे हे अधिक्षक म्हणून काम पहात होते. या संस्थेने १९२१ साली नागपूरच्या सदर भागात कन्याशाळा सुरू केली, १९२३ साली नागपूरच्या भालदारपुरा भागात नागपूरबाहेर तुमसर येथे मुलांची शाळा सुरू केली. १९२४ साली नागपूरातील इंदोरा चौकी येथे कन्या पाठशाळा सुरू केली. श्री ठवरे यांनी अथक प्रयत्नांनी ही शिक्षणसंस्था नावारूपाला आणली. पुढे 'युगांतर शिक्षण संस्था' असे या शिक्षणसंस्थेचे नामांतर झाले.

(व्यास, २००१, पृ. ११८)

१९२० च्या डिसेंबर महिन्यात नागपूरला राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव पारित झाल्यानंतर नागपूरचे तरुण विद्यार्थी सरकारी शाळेतून बाहेर पडू लागले. परीक्षा २/३ महिन्यांवर आलेल्या असतानाही विद्यार्थी शाळा सोडत होते. अशा वेळी त्यांच्या शिक्षणाची तजवीज करण्यासाठी नागपूरचे पुढारी सुंदरलाल भगवानदीन यांनी ३ जानेवारी १९२१ ला नागपुरात 'टिळक विद्यालय' नावाचे एक राष्ट्रीय विद्यालय स्थापन केले. ५० शिक्षकांची निर्वाहवेतनावर नेमणूक केली. मुख्याध्यापकपदाची जबाबदारी व्ही. आर. कोतवाल या विज्ञान शिक्षकाकडे सोपविण्यात आली. दादा धर्माधिकाऱ्यांसारखे उत्तम शिक्षक संस्थेला लाभले. या शाळेत सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. पुढे संस्थेच्या ४ शाखा निघाल्या. शाळेत बौद्धिक शिक्षणाबरोबर सुतारकाम, शिवणकाम, चित्रकला शिक्षणाची सोय करण्यात आली. काँग्रेसचे पुढारी म. गांधी, वल्लभभाई पटेल, मोतीलाल नेहरू नागपूरला आल्यावर या शाळेतच उतरत. इंग्लंडचे राजपुत्र नागपूरला आले तेव्हा या शाळेतील १२०० विद्यार्थी व ५० शिक्षकांनी स्वागत समारंभावर बहिष्कार घालून प्रचंड आंदोलन केले. १९२२ च्या मुळशी सत्याग्रहात व १९२३ च्या नागपूरच्या झेंडा सत्याग्रहातही या राष्ट्रीय शाळेचा सहभाग होता. १९२२ च्या असहकारिता आंदोलनानंतर राष्ट्रीय चळवळीला ओहोटी लागली; ब्रेच विद्यार्थी व शिक्षक शाळा सोडून गेल्यामुळे तीन शाखा बंद करण्यात आल्या. पुढे १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात शाळेतील २२ विद्यार्थी व ८ शिक्षकांनी तुरुंगवास भोगला. १९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीतला शाळेतला सहभाग लक्षात घेऊन सरकारने ही शाळा बेकायदेशीर ठरवली. संस्थेची मालमत्ता ताब्यात घेऊन इमारतीवर पहारा बसवला. १९३६-३७ साली काँग्रेस मंत्रिमंडळ सत्तेत आल्यावर परिस्थिती बदलेल असे वाटले; परंतु संस्थेचे एक प्रवर्तक डॉ. खरे यांच्यावर काँग्रेस कार्यकारिणीने शिस्तभंगाचा आरोप ठेवून काँग्रेसमधून काढून टाकल्याने संस्थेचे विघटन झाले.

असहकार आंदोलनात सरकारी कॉलेज सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फार मोठे होते. हिस्लॉप कॉलेज ३२.५ टक्के, मॉरिस कॉलेज २७.५ टक्के, मेडिकल कॉलेज २७.२ टक्के, इंजीनिअरिंग कॉलेज २४.६ टक्के, शेतकी कॉलेज ४.३ टक्के, पटवर्धन हायस्कूल २५ टक्के, नील सिटी हायस्कूल ७२ टक्के. सरकारी कॉलेज आणि शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण मध्य प्रांतात राष्ट्रीय शिक्षणाची सोय करण्याकरिता 'नागपूर नॅशनल एज्युकेशन बोर्ड' अर्थात राष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना झाली. निळकंठराव उधोजी हे मंडळाचे अध्यक्ष होते व नियामक मंडळात डॉ. बा. शि. मुंजे, नियोगी, डॉ. परांजपे, ठेंगडी इत्यादी मान्यवर सभासद होते. या राष्ट्रीय शिक्षण

मंडळाच्या वतीने 'राष्ट्रीय शिक्षण', 'राष्ट्रीय चळवळीची दिशा', 'राजकीय शिक्षणाचे महत्त्व', 'शिक्षणविषयक असहकारिता', 'विद्यार्थ्यांचे कर्तव्य' या विषयांवर व्याख्यानमाला चालविली जात असे. इतकेच नाही तर विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय काम कसे करावे, स्वराज्याची संकल्पना खेडोपाडी कशा रीतीने प्रचारात आणावी याचे शिक्षण देण्याकरिता 'नॉन कोऑपरेशन प्रोपोगण्डा क्लास' अर्थात असहकारिता प्रचारवर्ग सुरू करण्यात आला होता. (हरदास, १९८१, पृ. १८-२०)

१९०२ ते १९१० या काळात विदर्भात शहरी भागातून शिक्षण प्रसार पुष्कळच झाला होता. जिल्हा-तालुका बोर्डाद्वारा खेडेगावात लोअर प्राथमिक शाळा (३ री पर्यंत) पुष्कळ निघाल्या होत्या. मात्र स्वदेशी व बहिष्काराच्या आंदोलनाच्या प्रेरणेतून लोकमान्य टिळकांच्या अनुयायांनी विदर्भात समर्थ विद्यालयाच्या धर्तीवर राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा सुरू केल्या. १० सप्टेंबर १९०५ रोजी अमरावतीच्या ब्रह्म विद्यामंदिरात तपस्वी बाळासाहेब परांजप्यांच्या प्रेरणेने "श्री शिवाजी विद्यालय" ही राष्ट्रीय शाळा सुरू करण्यात आली. सदाशिव हणमंत बल्लाळ, वामन गोपाळ जोशी, शामराव प्रल्हाद देशपांडे हे ध्येयवादी शिक्षक ही शाळा चालवीत. देशप्रेमाने प्रेरित झालेले विद्यार्थी सरकारी शाळेतून नाव काढून या विद्यालयात आले. त्यानंतर बाळासाहेब परांजपे यांनी टिळकांना यवतमाळला नेले व 'यवतमाळ विद्यागृह' नावाची शाळा काढली. तिथे चित्रलेखन, कला, विणकाम, सुतारकाम, कातकाम, बुक बाइंडींग, कुसरकाम, टीनकाम इ. प्रकारचे कला व धंदे शिक्षण दिले जाऊ लागले.

लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने १९१९ मध्ये साताऱ्याकडून आलेल्या काशीनाथ विठ्ठल सहस्त्रबुद्धे, अण्णासाहेब शिवनामे, पुरुषोत्तम धोंडो उर्फ आबासाहेब कुलकर्णी, दादासाहेब पंडित व सबनीस या पाच देशप्रेमी शिक्षकांनी अकोला येथे समर्थ विद्यालयाच्या धर्तीवर राजेश्वर मंदिरात 'सरस्वती मंदिर' नावाची राष्ट्रीय शाळा सुरू केली. १० फेब्रुवारी १९२१ रोजी 'टिळक राष्ट्रीय शिक्षण मंडळ' नावाची संस्था स्थापन करून हे विद्यालय सरस्वती मंदिरापासून वेगळे करण्यात आले. मात्र सरस्वती मंदिराचे शिक्षक व चालक यांच्या सहकार्यानेच हे राष्ट्रीय विद्यालय चालवले जाई. ना. अ. सोहनी हे पहिले मुख्याध्यापक होते, त्यांनी १९२७ पर्यंत काम पाहिले. त्यानंतर एल. एल. बी. झाल्यावर ते वकिली व्यवसायाकडे वळले. १९३७ पर्यंत रघुनाथ गणेश पंडित मुख्याध्यापक होते. पुढे ते पूर्ण वेळ कॉंग्रेसच्या कामाला देऊ लागले. १९२९ साली उमरी खेड्याजवळच्या शेतावरच ही राष्ट्रीय शाळा भरविली जाऊ लागली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच सुतारकाम, चित्रकला, गायन-वादन, सुतकताईपासून कापड विण्यापर्यंत शिक्षण दिले जाई. राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषा शिकविली जाई. संस्थेचा आर्थिक भार दरमहा ५० रुपये देणाऱ्या काही सावकारांनी व अकोल्याचा कॉटन मार्केट धर्मादाय फंड

व जिन प्रेसने उचलला होता, त्यामुळे आर्थिक चणचण भासत नसे. पुढे १९३० च्या गांधीजींच्या असहकार आंदोलनात वऱ्हाडातील चळवळीचे संचालन या शाळेतील शिक्षकांनी केले. पोलिसांनी या काळात संस्थेच्या कागदपत्रांची व मालमत्तेची नासधूस केली. त्यामुळे स्वतंत्रपणे राष्ट्रीय शाळा चालविण्याऐवजी सरस्वती मंदिरातच ती वर्ग करण्यात आली. या राष्ट्रीय शाळेचे प्रवर्तक का. वि. सहस्त्रबुद्धे हे राजकीय जागृतीसाठी प्रचारकांचा संघ तयार करावा या विचाराने प्रेरित झाले होते. असहकार चळवळीत त्यांचा मोठा सहभाग होता. पुरुषोत्तम कुलकर्णी हे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून गणित विषय घेऊन बी. ए. झाले होते. विदर्भ प्रांतिक काँग्रेसचे ते सक्रिय सभासद होते. १९४०/४२ च्या आंदोलनात त्यांनी कारावास सोसला. 'वऱ्हाडची स्वातंत्र्यसेवा' नावाचा ग्रंथही त्यांनी लिहिला. अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेत ते स्वत: शिकविण्याचे काम करीत. दादासाहेब पंडित यांनीही १९३०/३२/४०/४२ च्या आंदोलनात भाग घेतल्याने त्या त्या वेळी कारावास भोगला. अस्पृश्यता निवारण व भूदान चळवळीत त्यांना विशेष आस्था होती. न. कृ. आचार्य यांनी राष्ट्रीय शाळेवर आपला आर्थिक भार पडू नये म्हणून टांगा हाकून आपली कमाई केली. अनंत हरी क्षीरसागर यांनी स्वराज्य मिळेपर्यंत लग्न न करण्याची प्रतिज्ञा घेतली होती. लक्ष्मण रामचंद्र पिंपळे यांना संस्थेने बडोद्याला माणिकरावांच्या आखाड्यात पाठवून व्यायाम विशारद केले होते. नानासाहेब देशपांडे हे १९३१ च्या आंदोलनात वऱ्हाड प्रांतिक युद्धमंडळाचे मंत्री होते. अशा ध्येयवादी मंडळींनी अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेला आपले योगदान दिले होते.

महात्मा गांधी यांच्या असहार चळवळीने प्रेरित होऊन १९२१-२२ मध्ये वऱ्हाडात खामगाव येथे डॉ. भाऊसाहेब पारसनीस यांनी शेठ मोहनलालजी पुरवार व इतर स्थानिक व्यापाऱ्यांच्या मदतीने राष्ट्रीय शाळा सुरू केली. सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शाळांत प्रवेश घेतला. ला. रा. पुरवार गुरुजींनी २५ वर्षे शाळाप्रमुखाची जबाबदारी निभावली. सुरुवातीला संस्थेकडे इमारत नव्हती, त्यामुळे शेठ पुरणमलजी यांच्या धर्मशाळेत वर्ग भरत. त्यानंतर गावाबाहेर शेतजमीन विकत घेऊन टीनच्या झोपड्या उभारण्यात आल्या व तेथे शाळा सुरू झाली. पुढे कालांतराने व्यायामशाळा, कलाभवन, चरखागृह, विद्यार्थी-भवन, विज्ञानभवन अशा इमारती बांधण्यात आल्या. या संस्थेत बौद्धिक शिक्षणाबरोबरच सुतकताई, विणकाम, शिवणकाम, कृषिशिक्षण दिले जाई. शाळेतले पंधे गुरुजी चित्रकला, मूर्तिकला, खेळणी तयार करण्याचे शिक्षण देत. सर्वोदय शिक्षणाचाही अभ्यासक्रम संस्थेने चालविला. १९३६ साली फैजपूर काँग्रेसच्या वेळी काँग्रेस नगरीच्या सजावटीसाठी या शाळेला निमंत्रित करण्यात आले होते. फैजपूर काँग्रेसच्या सेवादलाच्या सफाई पथकातही ही संस्था सहभागी होती. (आपटे, १९५८,पृ. १९५) महात्मा गांधींच्या दांडी यात्रेत पुसद,

वडाळा, दहिहंडा येथील सत्याग्रहात शाळेतल्या विद्यार्थी व शिक्षकांनी भाग घेतला. १९४०-४२ च्या सत्याग्रहाच्या चळवळीत या शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला, मिठाचा व जंगल सत्याग्रह केला. (कोरपे, पृ. ८५)

विदर्भात तुमसर येथेही राष्ट्रीय विद्यालय सुरू करण्यात आले होते. या विद्यालयाने 'वस्त्रस्वावलंबना'चा प्रयोग केला होता. शाळेत तयार होणाऱ्या खादीच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यातून एका शिक्षकाचा पगार निघत असे. विद्यार्थी बागकामातून फुले व भाजीपाला पिकवत, त्याच्या विक्रीतून शाळेला उत्पन्न मिळे. शेठ जमनालाल बजाज यांच्या हस्ते शाळेची कोनशिला बसविण्यात आली तेव्हा त्यांनी संस्थेला आर्थिक मदतीचा हातभार लावला. प्रवासातून शिक्षण असाही एक नावीन्यपूर्ण उपक्रम या शाळेने चालविला होता. (आपटे, १९५८, पृ. २०१-२०२)

शिक्षणातून राष्ट्रीय अस्मितेची भावना तरुण पिढीत वाढीला लागली याची काही उदाहरणे विदर्भातल्या शाळांतून दिसून येतात. १९११ साली दिल्ली येथे सम्राट पंचम जॉर्ज यांचा राज्यारोहण समारंभ साजरा झाला. भारताच्या चक्रवर्ती राजाची आठवण खेड्यापाड्यात बिंबविण्यासाठी शाळेतील प्रत्येक मुलाला राजाराणी शिक्क्याची पदके देण्यात आली. मेवामिठाई वाटण्यात आली. मात्र त्यानंतर याच वऱ्हाडात इंग्रजी सत्तेविरुद्ध वातावरण तापले. अकोल्यातील बोरगावमंजू येथे १२ डिसेंबर १९३० रोजी राज्यारोहण समारंभानिमित्त गावातून पंचम जॉर्जच्या फोटोची मिरवणुक निघाली होती. राजाभाऊ साहेबराव देशमुख या विद्यार्थ्यास गुलामीचे हे प्रदर्शन सहन झाले नाही. त्याने पंचम जॉर्जच्या फोटोला जोड्याने बडविले. परिणामत: राजाभाऊला सहा महिन्यांची शिक्षा झाली. पारतंत्र्याची चीड तरुणांमध्ये अशी भिनली होती.

**लष्करी शिक्षण :**

लष्करी शिक्षणाशिवाय राष्ट्रीय शिक्षण पूर्ण होऊ शकणार नाही, असे लोकमान्य टिळक यांचे मत होते. भारतीयांना लष्करी शिक्षण मिळाले तर स्वराज्यप्राप्ती जवळ येईल, अशी त्यापाठीमागची धारणा होती. १९१५ साली पुणे येथे एका सभेत त्यांनी ही भूमिका मांडली होती. जेव्हा स्वराज्यप्राप्ती होईल तेव्हा स्वराज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यालाच निभवावी लागेल, त्यासाठी प्रत्येकाने लष्करी शिक्षण घेतले पाहिजे आणि पहिल्या महायुद्धाने रणांगणावर पराक्रम गाजविण्याची संधी दिली आहे, तिचा लाभ घेतला पाहिजे, असे आवाहन टिळकांनी केले होते. ब्रिटिशांनी मात्र पहिल्या महायुद्धापर्यंत भारतीयांना लष्करी शिक्षणाची संधी देण्याचे टाळले होते. पहिल्या महायुद्धात भारतीय सेनेने जगाच्या निरनिराळ्या रणक्षेत्रांत अपूर्व कामगिरी दाखविली. ३६,००० भारतीय सैनिकांनी प्राणाहुती दिली. भारतीय सैनिकांना महायुद्धातील कामगिरीबद्दल १६ व्हिक्टोरिया क्रॉस, ९९ मिलिटरी क्रॉस व सुमारे ४५० इतर सन्मान पदके मिळाली. या

पार्श्वभूमीवर १९२१ साली केंद्रीय कायदेमंडळात पी. एस. शिवस्वामी अय्यर यांनी १५ कलमी ठराव मांडून भारतीयांना सैन्यात अधिकारी होण्याची संधी दिली पाहिजे, असा प्रस्ताव मांडला. त्यावर २१ मार्च १९२१ ला सर तेजबहादूर सप्रू यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने इंग्लंडच्या सँडर्स्ट्ट प्रबोधिनीच्या धर्तीवर भारतात लष्करी महाविद्यालय स्थापन करण्याची शिफारस केली. १९२८ पर्यंत त्यावर काहीच कार्यवाही झाली नाही, तेव्हा पं. हृदयनाथ कुंझरू, डॉ. बा. शि. मुंजे, पं. मदनमोहन मालवीय व डॉ. बाबासाहेब जयकर यांनी कायदेमंडळात हा प्रश्न पुन्हा उपस्थित केला. परिणामतः जे. एच्. थॉमस यांच्या अध्यक्षतेखाली श्रीनिवासशास्त्री, तेजबहादूर सप्रे, डॉ. मुंजे, डॉ. बाबासाहेब जयकर यांची समिती स्थापन झाली. या समितीने दिलेल्या योजनेप्रमाणे डेहराडून येथे १० फेब्रुवारी १९३२ रोजी लष्करी प्रबोधिनी स्थापन झाली.(मेजर कुलकर्णी /वरखेडे, २००४, पृ. १९३-१९४)

मार्च १९२५ ला मुंबई विधानसभेत डॉ. मुंजे यांनी सक्तीच्या सैनिकी शिक्षणाचा प्रस्ताव मांडला. मात्र हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो या सबबीखाली ह्या प्रस्तावाचा विचार होऊ शकला नाही. त्यानंतर १९३५ साली त्यांनी लष्करी शिक्षणासाठी 'दि सेंट्रल हिंदु मिलिटरी एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. अमळनेरचे मोतीलाल माणिकचंद उर्फ प्रताप शेठ हे संस्थेचे अध्यक्ष होते; त्यांनी या कार्यासाठी एक लाखाची देणगीही दिली. डॉ. मुंजे यांनी सरचिटणीसपदाची जबाबदारी स्वीकारली होती. याखेरीज संस्थेच्या नियामक मंडळात पुण्याचे बॅ. जयकर, न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, मुंबईचे शेठ मथुराम खिमजी, ठाण्याचे गोविंदराव प्रधान, बडोद्याचे जनरल नानासाहेब शिंदे, विदर्भातले डॉ. हेडगेवार, दादासाहेब खापर्डे, बॅ.रामराव देशमुख, केशवराव बुटी, मा. श्री. अणे, ग्वाल्हेरचे सरदार चंद्रोजीराव आंग्रे यांचा सहभाग होता. हिंदू तरुणांना लष्करी जीवनात पदार्पण करण्यासाठी लागणारी पूर्वतयारी करवून घेणे हा या संस्थेचा प्राथमिक हेतू होता. विमानदल, लष्कर, आरमार व पोलिस खात्यात भरती होण्यासाठी आवश्यक असणारे शारीरिक, लष्करी व स्वसंरक्षणाचे शिक्षण; संघटित कार्य करण्यासाठी नेतृत्वगुण व सर्व जातीत बंधुभाव निर्माण होईल असे सामाजिक समरसतेचे शिक्षण देण्याचे ध्येय ठेवून या संस्थेची उभारणी करण्याचे ठरविण्यात आले. डॉ. मुंजे यांनी देशभर दौरा करून तीन लाखांचा निधी संकलित केला. टिळक ज्युबिली स्वराज्य फंड, औंधचे राजे, शेठ बिर्ला यांचा या निधीत सहयोग होता. डॉ. मुंजे यांनी गव्हर्नर लॉर्ड बॅबोर्न यांच्याकडे संस्थेसाठी जमीन मागितली, परंतु लष्करी शिक्षणासाठी जमीन देण्याचे त्यांनी नाकारले. उद्या या शाळेत शिकलेली दहा हजार प्रौढ मुले काँग्रेसने सुरू केलेल्या एखाद्या क्रांतिकारी चळवळीत सामील झाली तर सरकारपुढे केवढा भयंकर प्रसंग निर्माण होईल, अशी भीतीही त्यांनी बोलून दाखविली. १६ मार्च

१९३६ रोजी डॉ. मुंजे यांनी या कामासाठी व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांचीही भेट घेतली. त्यांनी शाळेला २५० रु. ची देणगी देऊन शुभेच्छा दिल्या. सेनापती सर फिलिप चेटवूड यांनीही सेवानिवृत्त होण्यापूर्वी शंभर रुपयांची देणगी देऊन या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. नाशिकजवळ आनंदवल्ली शिवारात १२५ एकर जमीन घेऊन १९३७ साली रामनवमीच्या मुहर्तावर भूमिपूजन करून व १५ जूनला शिवराज्याभिषेकाच्या मुहर्तावर या लष्करी विद्यालयाचे उद्घाटन केले. विद्यालयास 'भोसला लष्करी विद्यालय' हे राजे शिवछत्रपती यांचे नाव देण्यात आले; शाळेच्या सव्वाशे एकर परिसराला 'रामभूमी' आणि शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना 'रामदंडी' असे संबोधण्यात येऊ लागले. जातिभेद न पाळता सर्व विद्यार्थ्यांचा वर्ण क्षत्रिय समजला जाई. शाळेच्या नावात 'हिंदू' हा शब्द जातिवाचक नसून सर्वसामान्यत्व दर्शविणारा असल्याचे डॉ. मुंजे यांनी स्पष्ट केले होते. सँढर्स्ट व वेलिंग्टन पब्लिक स्कूलचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून डॉ. मुंजे यांनी या शाळेची आखणी केली होती. वेलिंग्टन पब्लिक स्कूलमध्ये शाळेच्या चर्चमध्ये कल्याणकारी प्रार्थना झाल्यानंतर विद्यार्थ्यांना न्याहरी दिली जात असे; भोसला विद्यालयातही याच पद्धतीने हिंदुस्थानच्या इतिहासातील वीरपुरुष व विरांगनांचे पुण्यस्मरण करणारी प्रार्थना घेतली जात असे. १९३८ साली सरकारने भोसला शाळेला निशाणबाजीच्या सरावाकरिता परवाना दिला. ब्रिटिश राजवटीत हिंदी शाळेला शस्त्रे वापरण्याचा परवाना मिळालेली ही पहिली शाळा होती.

भोसला विद्यालयात देशी व पाश्चिमात्य पद्धतीचे शारीरिक शिक्षण, सूर्य नमस्कार, कुस्ती, लाठी, तरवार, मुष्टियुद्ध, जिजुत्सु, पोहणे, बुडत्याला वाचविणे, घोड्यावर बसणे इत्यादींचे शिक्षण दिले जाई. सैनिकी शिक्षणात निशाणबाजी, फायरिंग ऑर्डर्स, लष्करी कवायत, आक्रमण, बचाव, लष्करी नकाशांचे वाचन, छावणी लावणे, पर्वतारोहण आणि मॅट्रिकच्या अभ्यासक्रमाप्रमाणे बौद्धिक शिक्षणाचा समावेश करण्यात आला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर १९४१ साली गनिमी काव्याच्या लढाईचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी तीन महिन्यांचे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले होते. (हरदास, १९८१, पृ. ३०२-३१७) लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेली 'लष्करी शिक्षणा'च्या स्वतंत्र अध्ययन शाखेची कल्पना अशा रीतीने भोसला विद्यालयाच्या माध्यमातून साकार झाली.

डॉ. मुंजे यांनी प्रत्येक प्रांतात लष्करी शिक्षणाच्या शाळा काढून राष्ट्रीय सैन्य तयार करण्याची योजना मांडली होती. अ. भा. प्रागतिक परिषद, हिंदुमहासभा, हिंदू युवक परिषद यांनी तसे ठराव केले होते. लष्करात नेपाळातील गुरख्यांची व पंजाबातील मुसलमानांचीच भरती करण्याचे सरकारचे धोरण होते. अशा धोरणातून 'धर्मभेदाने व प्रांतभेदाने ग्रासलेल्या हिंदुस्थानच्या एखाद्या जातीच्या अथवा प्रांताच्या हाती लष्करी सत्ता जाऊ देणे हे घातक होईल' म्हणून प्रत्येक प्रांतात हिंदी तरुणांसाठी लष्करी

शिक्षणाच्या शाळा काढण्याच्या प्रस्तावाचे त्यांनी समर्थन केले होते. (पुढारी, २ जाने वारी १९३९)

**औद्योगिक शिक्षण :**

'अधिभौतिक शक्ती ज्यांचे ताब्यात तेच जगाचे साम्राज्य करण्यास लायक' असे म्हटले जाते. या वचनाच्या अनुषंगाने विसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या उद्योजकतेचा तपास करावयाचा आहे. प्रतिकूल परिस्थितीत असूनही महाराष्ट्रात पारशी, बोहरी, खोजे, भाटे, कच्छी, सिंधी जातीतील लोक कोट्यधीश होतात; मग मराठी माणूस तेव्हढा मागे का पडतो, याचे उत्तर औद्योगिक शिक्षणाच्या संधींच्या अभावात आहे की, सुताराचे अथवा लोहाराचे काम करण्यात कमीपणा मानण्याच्या मराठी माणसांच्या लोकसमजुतीत आहे, या दृष्टीने हा तपास करावयाचा आहे. मुंबईच्या औद्योगिक परिषदेत अध्यक्षीय भाषण करताना सर दोरोबजी टाटा म्हणाले होते की, " ज्या अमेरिकन मॅनेजरला मी हिंदुस्थानच्या व्हाईसरॉय इतका दरमहा पगार देतो, तो आरंभी बंबात कोळसे टाकण्याचे काम करीत होता. अंगमेहनत व बुद्धीच्या जोरावर तो इतक्या योग्यतेस चढला आहे की, तो माझे कारखान्यास कोट्यवधि रुपये मिळवून देत आहे." (संत, १९३३, पृ. ४५) कोळशाने हात काळे होतील म्हणून काम करण्यास पुढे येण्यास कचरणारा माणूस औद्योगिक स्पर्धेच्या जगात उद्योगपतीचे स्थान कसे घेऊ शकेल हा खरा प्रश्न होता. धंदेशिक्षणासाठी मुळात उद्यमशीलता अंगी असावी लागते. मराठी माणसात तिचा फारसा प्रादुर्भाव आढळत नाही. यासंदर्भात औद्योगिक परिषदेचे कार्यकर्ते माधव संत यांनी नोंदवलेली एक आठवण लक्षात घेण्याजोगी आहे. किर्लोस्करांच्या कारखान्याला भेट दिली तेव्हा त्यांना रात्री पुराण सांगणारा शास्त्री दिवसा यंत्रे घासताना दिसला. ते पाहून त्यांनी लिहून ठेवले आहे की, "आपल्या देशात कमीत कमी ५ किंवा ६ लाख बैरागी किंवा साधू आहेत. ज्यांच्या हातून काहीच देशकार्य होत नाही, त्यांना जर कायद्याने भीक मागण्याचे बंद करून उद्यमगृहासारख्या (Work House) संस्था काढून काम करावयास लावले तर देशाची सांपत्तिक स्थिती पुष्कळ सुधारेल." (संत,१९३३, पृ. ४४) औद्योगिक शिक्षणाची वृद्धी न होण्यास मराठी माणसाच्या स्वभावाची घडणच कारणीभूत असल्याचे यावरून लक्षात येते.

विसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात हिंदुस्थानाबाहेर औद्योगिक शिक्षणाची काय परिस्थिती होती याचे एक धावते चित्र डोळ्यांसमोर असले तर आपल्याकडच्या औद्योगिक शिक्षणाच्या स्थिती-गतीविषयीचे वास्तव आकलन व्हायला मदत होईल. जर्मनीत प्राथमिक शिक्षण संपल्याबरोबर शास्त्रीय शिक्षण द्यायला सुरुवात होत असे. तिथे औद्योगिक शिक्षण, खाणीचे शिक्षण, जंगल संवर्धन, कृषी-शिक्षण व व्यापारी शिक्षण देणारी महाविद्यालये होती. तुलनेने फ्रान्समध्ये आपल्याप्रमाणेच कारागिरीचे व व्यापारधंद्याचे

शिक्षण हलके समजले जात असे. मात्र तरीही त्यांनी हस्तकौशल्याची अभिरुची उत्पन्न होईल असे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. इंग्लंड आणि अमेरिका हे देश मात्र औद्योगिक शिक्षणात अग्रेसर होते. १८२५ साली जॉर्ज बर्कन याने मेकॅनिकल इन्स्टिट्यूट स्थापन केली होती. १८७९ मध्ये साऊथ लंडन स्कूलमध्ये क्ले मॉडेलिंग, डिझायनिंग, चायना पेंटिंग, लाकडावर नक्षीकाम असे ५० विषय शिकवले जात. १८८३ साली फिन्सबरी टेक्निकल कॉलेजात सकाळी १५ ते १७ वयोगटातल्या विद्यार्थ्यांसाठी आणि रात्री कामगारांच्या मुलांसाठी कारागिरीचे वर्ग चालत. विशिष्ट कारखान्यात वा वर्कशॉपमध्ये कारागिरीची प्रात्यक्षिके करवून घेतली जात. पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट सुरु करणे हे खर्चाचे काम असे. सुमारे दोन कोटींचे भांडवल लागत असे. पण अशी गुंतवणूक करण्याची इंग्रज माणसाची तयारी होती. अमेरिका तर औद्योगिक व व्यापारी शिक्षणात सर्वांच्या पुढे होती. १८८० साली सेंट लुईसच्या वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीने 'मॅन्युअल ट्रेनिंग' ही हस्तोद्योग शिक्षणाची शाळा सुरू केली होती. किंडर गार्टन शाळांच्या माध्यमांतून बालपणापासूनच क्ले मॉडेलिंग, चाकूची कामे, पुस्तक बांधणी, विणकाम असे हस्तकौशल्याचे शिक्षण दिले जात असे. दोन कोटी लोकसंख्येच्या जपानमध्ये १९०३ साली ८४६ धंदेशिक्षणाच्या शाळांतून ५७,००० विद्यार्थी कारागिरीचे शिक्षण घेत होते, यावरून धंदे शिक्षणात हा छोटासा देश किती अग्रेसर होता हे लक्षात येते. या पार्श्वभूमीवर भारतात मात्र धंदे शिक्षणाकडे पूर्ण दुर्लक्ष झालेले दिसते.

हिंदुस्थानात लोखंड, मॅग्निजचे साठे विपूल प्रमात आहेत; मात्र एक सुई देखील आपल्याकडे तयार होत नव्हती. सर्व काही परदेशातून आयात केले जाई. ३१ मार्च १९२८ पर्यंत हिंदुस्थानात १०२,६९२ मोटारी व टॅक्सी,२३,१६४ मोटर सायकली, १९,००८ लॉरी अशा एकूण १४४८६४ यांत्रिक वस्तूंची आयात करण्यात आली. दोन चाकी सायकलींची तर गणतीच नाही. दरसाल लोखंडी व पोलादी यंत्रे मिळून २१ कोटी रुपये, रेल्वे सामान ९ कोटी रुपये, मोटारी व सायकली मिळून ६ कोटी रुपये, मुलांच्या खेळण्यांसाठी अर्धा कोटी रुपयांची आयात होत असे. आपल्याकडचे संस्थानिक हौसेसाठी एकेका मोटारीवर ५०-६० हजार रुपये सहज खर्च करत; मात्र आपल्या देशात उद्योग स्थापन करण्यात त्यांचा पुढाकार नव्हता. (संत, १९३३, पृ. ४७) भारतात औद्योगिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळेच हे चित्र दिसते.

ब्रिटिश राजवटीत १९ व्या शतकापासूनच शिक्षणाचा आशय काय असावा याविषयी चर्चा सुरू होती. या चर्चेत बौद्धिक आणि व्यवहारोपयोगी शिक्षणाच्या स्थानाबाबत मुद्दे उपस्थित झालेले होते. अगदी १८५४ च्या कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या खलित्यातही भारतीयांना स्वबळावर शास्त्रीय व बौद्धिक शिक्षण मिळवता येणे शक्य नसल्याने शासनकर्ते म्हणून शिक्षणाची काही व्यवस्था निर्माण करायला हवी, असे एक धोरण पुढे

येत होते. या खलित्यात म्हटले होते की, "The Government of India should consider how useful and practical knowledge suited to every station in life might be best conveyed to the great mass of people who in our opinion, are utterly incapable of obtaining any education worthy of the name by their own unaided efforts." १८८० साली दुष्काळ निवारणाच्या प्रश्नाच्या संदर्भात नेमलेल्या 'फेमिन कमिशन'नेही दुष्काळ प्रतिबंधाकरिता जनतेला औद्योगिक, शास्त्रीय व यांत्रिक शिक्षण दिले पाहिजे, असा अभिप्राय दिला होता. १८८४ च्या शिक्षणविषयक कमिशनने विद्यापीठीय परीक्षांना बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक अभ्यासक्रम आणि इतर विद्यार्थ्यांसाठी व्यावहारिक शिक्षण अशी द्विस्तरीय योजना सुचविली होती. १८८६ साली ए. पी. मॅक्डोनाल्ड यांच्या खलित्यात धंदेशिक्षणाला महत्त्व देण्याचे सूचित करण्यात आले होते; ते लक्षात घेऊन पुणे येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा इंग्रज सरकारने निर्णय घेतला होता. सर्वजनांना उपयुक्त व व्यवहारोपयोगी ज्ञानाचा आशय काय असावा, ह्या चर्चेला मेकॉलेच्या शैक्षणिक धोरणाने एक विराम दिला. इंग्रजी भाषेतून पाश्चात्य कला आणि अधिभौतिक शास्त्रांचे शिक्षण देण्याची शिक्षणनीती ठरविण्यात आली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी १९०१ साली सर ई. सी. बक याने हिंदुस्थानात उद्योगशाळा व धंदेशिक्षणाचा शिक्षणक्रम सदोष असल्याचे आढळून आल्याने प्रत्येक इलाख्यात शास्त्रे व कला शिक्षणावर देखरेख करणारा अधिकारी नेमण्याची शिफारस केली होती. याच ई. सी. बक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने १९०३ साली देशात लहान लहान धंदेशाळा उघडण्यात याव्यात अशी शिफारस केली होती. १९०५ साली रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांच्या देखरेखीखाली भारतीय औद्योगिक परिषद कार्यरत झाल्यावर पुन्हा एकदा धंदेशिक्षणाच्या प्रश्नाला चालना मिळाली. औद्योगिक परिषदेचे सहसचिव माधव बापाजी संत यांनी लोकांमध्ये उद्योगप्रवणता निर्माण व्हावी व त्यांनी धंदेशिक्षणाकडे वळावे यासाठी प्रबोधन करण्याची मोहीम चालवली होती. त्यांच्या मते ललित वाङ्मयाच्या वावटळीत व बौद्धिक शिक्षणाच्या अंधपरंपरेत औद्योगिक शिक्षणाकडे आपले फार दुर्लक्ष झाले आहे. "धंदे शिक्षणाची व्याप्ती इतकी मोठी आहे की, एडिसनसारखे कल्पक, कार्नेजीसारखे कुबेर व फोर्ड सारखे कारागीर, सर दोराब टाटा, वाडिया, सर दामोदरदास ठाकरसी यांचे सारखे कोट्यधीश या शिक्षणाने आपले देशात उत्पन्न होतील" (संत, १९३३, पृ. ३) मराठी माणसाची प्रकृती अध्यात्मप्रवण असल्याने औद्योगिक क्षेत्रात तो उडी घेत नसावा, असे एक प्रमेय न. चिं. केळकर यांनी मांडले होते. त्यांनी म्हटले होते की, १९ व्या व २० व्या शतकांत झालेले "शास्त्रीय शोधासंबंधी आपले गाढ अज्ञान कबूल करण्याचे ऐवजी वेळी अवेळी अध्यात्मज्ञानाची श्रेष्ठता पुढे आणून प्रौढी

मिरविण्याची सवय आपलेकडील पुष्कळ विद्वानांत दिसून येते. यामुळे आपले लोकांत भौतिक शास्त्रे आत्मसात करण्याची बुद्धीच होत नाही. भौतिक शास्त्राचा सर्व फायदा जीवितास व सुखसोईला घेऊन वरती विज्ञान हे तुच्छ बुद्धीने लेखणे ही कृतघ्नतेची परमावधी होय." (केळकर वाढदिवस मंडळ, १९३२, पृ. १२५) भौतिक शास्त्राचे ज्ञान हे अध्यात्मज्ञानाइतकेच श्रेष्ठ व उपयुक्त आहे, त्यामुळे 'सृष्टिज्ञान'सारखे मराठीतून विज्ञानविषयक लेखन प्रसिद्ध व्हावे, महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन होऊन मराठीतून हे ज्ञानदान व्हावे असे केळकरांनी म्हटले होते. निजामाने उस्मानिया विद्यापीठास इंग्रजीतील पायाभूत पुस्तकांचे ऊर्दूत भाषांतर करण्याच्या प्रकल्पास वार्षिक एक लाखांचे अनुदान देऊन १५० महत्त्वाची पुस्तके भाषांतरित करवून घेतली. भौतिक शास्त्रांचे भांडार मराठीत आणण्यासाठी अशा प्रकारचे प्रयत्न व्हावेत यासाठी 'महाराष्ट्र विद्यापीठ' स्थापन करण्याची चर्चा या काळात सुरू होती. आपल्याकडे कारखाने वाढावेत व सांपत्तिक वृद्धी व्हावी या उद्देशाने विदर्भातील मॅंगनीझ खाणींचे मालक डी. लक्ष्मीनारायण यांनी नागपूर विद्यापीठाला उपयोजित विज्ञाने आणि रसायनशास्त्रातील शिक्षणासाठी ४० लाखांची देणगी दिली होती.

भारतीय उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी औद्योगिक शिक्षणाची आवश्यकता असल्याने युवा पिढीला व्यापार व उद्योगातील कौशल्य, उद्योगधंद्यातील बारकावे, दर्जानियंत्रण, वितरणप्रक्रिया याविषयीचे ज्ञान दिले पाहिजे. तसेच भांडवल,वस्तूंचे उत्पादन व कामगार यांच्यात मेळ घालता येणारी कौशल्ये व स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी आवश्यक असणारे वैचारिक आणि व्यावहारिक ज्ञान देणारा अभ्यासक्रम अंतर्भूत करायला हवा असा विचार त्या काळात मांडला जाऊ लागला होता. (मेहता, १९२२, पृ. ३६२) औद्योगिक परिषदेचे सचिव माधव बाबाजी संत यांनी धंदेशिक्षणाची सुटसुटीत व्याख्या केली होती : "जे शिक्षण समाजातील स्त्री-पुरुषांना विक्रीस योग्य अशा वस्तूंची उत्पत्ती व वाटणी करण्यास शिकविते, तसेच उत्पादक धंद्याच्या कोणत्याही शाखेत काम करण्यास लायक बनविणे, किंवा धनोत्पत्तीचे कामी लागणाऱ्या निरनिराळ्या पद्धतीचे ज्ञान ज्याचे योगे होते ते औद्योगिक शिक्षण." (संत, १९३३, पृ. १०) 'औद्योगिक ही संज्ञा त्यांनी 'Polytechnic' या अर्थाने योजिली होती. जगातील औद्योगिक विश्वविद्यालयांतून कोणकोणते विषय शिकविले जातात याचा मागोवा घेऊन भारतात कोणते विषय शिकविले पाहिजेत अशा विषयांची एक सूचीही त्यांनी दिली होती :

- कृषिशास्त्र: धान्ये, फळफळावळांची पैदास. दुधदुभते व जनावरांची जोपासना. साखर तयार करणे.
- रसायनशास्त्र : व्यापारी जिनसांचे पृथक्करण करणे, कृत्रिम रीतीने निरनिराळे व्यापारी जिन्नस तयार करणे, रसायन शास्त्रात उपयुक्त शोध लावणे.

- विद्युतशास्त्र : वीज तयार करून तिचा अनेक कामात उपयोग वाढविणे. विद्युत्शक्तीसंबंधी नवीन शोध लावणे.
- वास्तुशास्त्र किंवा स्थापत्यशास्त्र : घरे, इमारती, पूल वगैरे बांधणे.
- यंत्रशास्त्र : विविध यंत्रांची रचना, ती चालविण्याच्या व दुरुस्तीच्या रीती, यंत्राच्या सहाय्याने निरनिराळे औद्योगिक पदार्थ उत्पन्न करणे, तसेच नवीन यंत्रे बनविणे.
- नौकानयनशास्त्र :जहाजे बनविणे व ती दर्यात चालविणे.
- भूगर्भशास्त्र : पृथ्वीच्या गर्भातील पदार्थांच्या रचना व धातू-उपधातूंची परीक्षा करणे.
- खाणींचे काम : पृथ्वीच्या पोटातील धातू व इतर पदार्थ खणून बाहेर काढणे व त्यांचे संशोधन करणे.
- कपडे विणणे : कापूस, लोकर, रेशीम व इतर तंतूंपासून कपडे व इतर उपयुक्त जिन्नस विणून तयार करण्याची विद्या.
- औषधे तयार करणे : औषधी वनस्पतीपासून अर्क व कषाय तयार करणे व खनिज पदार्थ, आम्ले यांच्या औषधी उपयोगासंबंधाने शोध लावणे वगैरे.
- व्यापार: आंतरराष्ट्रीय व्यापारांच्या पद्धती, निरनिराळ्या देशांतील औद्योगिक स्थिती, व्यापारी उन्नती व अवनतीची कारणे समजावून घेणे; व्यापारी शिक्षणाच्या शाळा व कॉलेजे काढणे. (संत, १९३३, पृ. ११-१२)

औद्योगिक शिक्षणासाठी रासायनिक प्रयोगशाळा, वस्तुसंग्रहालये, कारखाने यांची उपलब्धी वाढविणे आवश्यक होते. मात्र महाराष्ट्रात फार थोड्या ठिकाणी औद्योगिक शिक्षणाच्या सोई उपलब्ध होत्या. मुंबईला व्हिक्टोरिया जुबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट (VJTI)मध्ये यांत्रिक शिक्षण, विद्युतशास्त्र, रसायनशास्त्र आणि विणकामाचे शिक्षण दिले जात असे. पुणे इंजिनिअरिंग कॉलेजात पूल, कालवे, इमारत बांधणीसाठी लागणारे वास्तुविद्याशास्त्र अर्थात सिव्हिल इंजिनिअरिंगचे व ओव्हरसियर्स तयार करण्यासाठीचे शिक्षण दिले जाई. १९०१ साली स्थापन झालेला 'हिंदु एज्युकेशन फंड' आणि १९०५ साली अंताजी दामोदर काळे यांच्या कल्पनेतून साकार झालेल्या पैसा फंडातून औद्योगिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जात. पैसा फंडातूनच पुण्याजवळ तळेगावला काचशाळा सुरू करण्यात आली होती. तिथे ब्लोइंग, भट्टी बांधणे इत्यादी कौशल्याची कामे शिकविली जात. १९ व्या शतकात म. गो. रानडे यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय औद्योगिक परिषदेचेही काम १९२० पर्यंत व्यवस्थित सुरू होते. १९०० साली परिषदेने पहिले औद्योगिक प्रदर्शन भरविले. १९०५ साली काशी येथे रोमेशचंद्र दत्त यांच्या अध्यक्षतेखाली पहिली औद्योगिक परिषद झाली. परिषदेने ५० औद्योगिक विषयांवर ३०० निबंध प्रसिद्ध केले होते. औद्योगिक परिषदेची ही चळवळ पुढे थंडावली व औद्योगिक शिक्षणाबाबत अपेक्षित प्रयत्नही नंतरच्या काळात झालेले दिसत नाहीत.

**कृषी शिक्षण :**

शेती शिक्षणाच्या बाबतीत मात्र ब्रिटिश राजवटीत व्हावी तशी प्रगती झाली नाही. औद्योगिक उत्पादनांतून मिळणाऱ्या लाभांशाचे प्रमाण अधिक असल्याने औद्योगिक शिक्षणाच्या तुलनेत शेती शिक्षणाला दुय्यम स्थान दिले गेले असावे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात मुंबई इलाख्यात शेतीपासून दरसाल सुमारे ३५ कोटींचे उत्पन्न मिळत असे. शेतसारा मात्र ६ कोटी रुपये जमा केला जात असे. यातून शेतीशिक्षणासाठी खर्च होणारी रक्कम नगण्यच असे. शेतसाऱ्याच्या एक टक्का इतकी रक्कमसुद्धा शेतीशिक्षणावर खर्च होत नसे. १९१० पर्यंत मुंबई इलाख्यात शेतीशाळाही नव्हत्या. फक्त १८९० साली पुणे येथे स्थापन झालेल्या कृषी केंद्राचे १९०७ साली शेतकी कॉलेजात रूपांतर करण्यात आले होते. कृषी शास्त्रातला पदवी अभ्यासक्रम (बी. एजी.) या महाविद्यालयातून सुरू करण्यात आला. सरकार या महाविद्यालयावर दरसाल ५० हजार रुपये खर्च करी. या कॉलेजात शेतीशिक्षणाकडे लक्ष देणारे प्रो. मॅनसारखे प्राध्यापक होते. सर जॉन मूर मॅकेन्झींच्या मेहनतीमुळे पुण्याचे शेतकी कॉलेज नावारूपाला आले होते. त्यांनी शेती क्षेत्रात करावयाच्या प्रयोगांकरिता काही शेतीवाड्या स्थापन केल्या होत्या. शेतकी कॉलेजसाठी त्यांनी भव्य इमारतही बांधून घेतली होती. (केळकर, १९२५, पृ. १९३-१९५) राष्ट्रीय पातळीवर बिहारात १९०५ साली 'पुसा' येथे शेती संशोधनासाठी 'इम्पिरिअल ॲग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट स्थापन झाली, व अमेरिकेतील हेन्री फिप्स यांनी दिलेल्या ३० हजार डॉलर्सच्या देणगीतून कृषी, पशुपालन, फलोत्पादन व कीटकशास्त्रात संशोधन करण्यासाठी 'फिप्स लॅबॅरेटरी' स्थापन करण्यात आली होती. या काळात महाराष्ट्रात शेतकऱ्यांना शेतीची उपकरणे, बियाणे, खते यांची अद्ययावत माहिती मिळावी यासाठी शेती प्रदर्शने भरविली जाऊ लागली; उच्च शिक्षित शेतकी अधिकाऱ्यांबरोबर शेतकऱ्यांच्या परिषदांचेही आयोजन केले जात होते. शेती शिक्षणाविषयी मराठी मुलांना हौस नव्हती आणि शेती शिक्षण घेऊन त्याचा उपयोग स्वत:ची शेती सुधारण्यासाठी करावा अशी प्रेरणा अद्याप निर्माण झाली नव्हती, त्यामुळेही कदाचित शेती शिक्षणाचे क्षेत्र विस्तारले नसावे. (केळकर, कित्ता,पृ. २००)

१९४७ साली भारतात अन्नधान्य पिकवा मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर १९४८ साली डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोग नेमला गेला. या आयोगाने भविष्यकाळातील अन्नधान्याची गरज, फलोत्पादन, पशूपालन व मत्स्योत्पादनाच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक राज्यात एक कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस केली. मात्र या शिफारशीची अंमलबजावणी व्हायला १९६१ साल उजाडले. देशातले पहिले कृषी विद्यापीठ १९६१ साली पंतनगर येथे स्थापन झाले. महाराष्ट्रात १९६९ ते १९७२ या काळात राहुरी, अकोला, परभणी आणि दापोली येथे

चार कृषी विद्यापीठे स्थापन झाली. तोपर्यंत महाराष्ट्रात कृषी शिक्षण दुर्लक्षित राहिले.

**भाषा शिक्षण :**

विसाव्या शतकाच्या उदयकाळी देशी भाषांचे शिक्षणक्रमातील स्थान हा महाराष्ट्रातल्या विचारविश्वातला एक महत्त्वाचा मुद्दा होता. १९०२ साली 'विविधज्ञानविस्तार' मासिकात प्रसिद्ध झालेल्या निबंधातला पुढील परिच्छेद या चर्चाविश्वाच्या मध्यवर्ती आशयसूत्रावर प्रकाश टाकणारा आहे : "देशभाषांना विद्याक्रमांतून पूर्णपणे काढून टाकिले आहे.. आम्हांस प्रत्येक विषय इंग्रजीतून शिकावा लागतो. ॲंग्लोव्हरन्याकुलर चौथ्या इयत्तेच्या आरंभी शेरा लिहिलेला आहे की, 'येथून पुढे सर्व विषय इंग्रजीत शिकले पाहिजेत'. . इंग्रजीसारख्या परक्या भाषेत अगदी आरंभापासून विषय शिकावे लागल्यामुळे वेळेचा अपव्यय तर होतोच; पण आमची प्रजा उत्तरोत्तर अशक्त होत जाणे व विद्वान मंडळी अल्पायुषी होणे, या गोष्टींना हा विलक्षण शिक्षणक्रम खचित कारणीभूत होत असला पाहिजे.. मॅट्रिक्युलेशन व स्कूल फायनल परीक्षांसाठी जे देशभाषा घेतात, त्यांना देखील त्या भाषा इंग्रजीतून शिकाव्या लागतात." (विविधज्ञानविस्तार, मार्च १९०२, पृ. ६५-६६) या शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतु इंग्रज लोकांविषयी, इंग्लिश संस्कृतीविषयी व इंग्लिश आचारविचारांविषयी उमेदवारांच्या मनात पूज्यबुद्धी उत्पन्न करण्याचा आहे, असे वि. का. राजवाडे यांनीही त्यांच्या 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील अनुभव' या निबंधात म्हटले होते.

प्रारंभीच्या बालवर्गात मातृभाषेचे शिक्षण देतानाही स्थानिक भाषाशिक्षणाच्या पद्धती डावलून पाश्चिमात्य अनुदेशनप्रणालीचा पुरस्कार आग्रहाने केला जात असे. वर्णमाला शिकवताना भाषेचे स्वरूप शब्दात्मक आहे, या समजुतीतून आपल्याकडे वर्णमालेची व भाषेची तोंडओळख करून दिली जात असे. मात्र सरकारी मंडळीचे म्हणणे वेगळे होते. मुलांना वर्णोच्चर शिकविणे हे शाळांचे काम नाही, शाळांनी वर्णांची चिन्हे शिकविली पाहिजेत. सरळ रेषा, वक्र रेषा, काटकोन, वर्तूळ, लंबवर्तूळ या वर्णांच्या घटकावयांचे शिक्षण द्यावे. वर्णांच्या चिन्हांचे अवयव निरनिराळे दाखवून नंतर घटकावयवांनी सिद्ध झालेली अवघड अक्षरे क्रमाक्रमाने शिकवावी, अशी अनुदेशनपद्धती इंग्रजांना अभिप्रेत होती. मराठीत विरामचिन्हे नव्हती, ती आणण्याचे काम मेजर कँडी यांनी केले, असे काही सकारात्मक बदलही होऊ लागले होते.

भाषा शिक्षणाबाबत विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत काय स्थिती होती आणि त्यासंबंधी काय विचारमंथन होत होते याचा तपास करताना आत्मचरित्रांतल्या प्रत्यक्ष अनुभवांची बरीच मदत होते. वि. द. घाटे यांनी त्यांच्या 'दिवस असे होते' या आत्मकथनात त्यांच्या शालेय जीवनातल्या भाषाशिक्षणाच्या स्मृती नोंदवल्या आहेत; त्यात ते लिहितात, "माझ्या शाळेने इंग्रजीला देव्हाऱ्यात बसवले होते. . आमच्या शाळेत

मराठी ही सावत्र मुलगी होती आणि संस्कृत जारिणीची पोर. दोन्ही भाषांची हेळसांड झाली. मराठी क्रमिक पुस्तके गचाळ होती. त्यांना वाङ्मयाचा स्पर्श झाला नव्हता. . आम्ही संस्कृत शिकलो म्हणजे नुसती भांडारकरांची पुस्तके शिकलो, व्याकरण शिकलो. संस्कृत वाङ्मयाचा आम्हाला परिचय झाला नाही.. खालच्या इयत्तात सारे विषय मराठीतून शिकविण्यात येत; चौथीपासून पुढे मात्र इंग्रजी हेच माध्यम होते. संस्कृतसुद्धा इंग्रजीतून शिकावे लागे." (घाटे, १९६१, पृ. ९२-९३) १९ व्या शतकातील मेकॉलेप्रणीत शिक्षणनीतीचा परिणाम म्हणून इंग्रजी शिक्षणाचे हे प्रभुत्वस्थान अजून कायम होते. त्यामुळे चौथीच्या वर्गात ग्रिमच्या लोककथा, पाचवीत 'यंगड्यूक' कादंबरी, सहावी-सातवीत स्कॉटची 'मेरीक्विन ऑफ स्कॉटस्' ही कादंबरी पुरवणी वाचनात लावलेली असे.

असे असले तरी देशी भाषांतून शिक्षण द्यावे किंवा नाही याविषयी या काळात विचारमंथन सुरू होते. देशी भाषांतून शिक्षण दिल्यास हिंदुस्थानचे पाऊल मागे पडेल असा युक्तिवाद करणारा एक वर्ग होता. त्यांच्या युक्तिवादात प्रामुख्याने पुढील मुद्दे असत :

१. राज्यकर्त्यांची भाषा म्हणून इंग्रजी आवश्यक आहे.
२. प्रांताप्रांतातील दळणवळणास रेल्वे, तारायंत्रांप्रमाणे इंग्रजी भाषा आवश्यक आहे.
३. देशी भाषांतून शिक्षण देणे आज सोईचे नाही, कारण त्या भाषा जितक्या ग्रंथसमृद्ध असाव्या तितक्या अद्याप झाल्या नाहीत.
४. देशी भाषांचा शिक्षणात विशेष उपयोग होऊ लागल्यास विद्यार्थ्यांचे आधीच कमकुवत असलेले इंग्रजीचे ज्ञान आणखी कमकुवत होत जाईल.
५. इंग्रजी इतिहास, इंग्रजी नीतिशास्त्र, इंग्रजी अधिभौतिकशास्त्रांच्या अभ्यासाखेरीज देशोन्नती होणे अशक्य आहे. (केसरी, २३ जानेवारी १९१७)

याउलट मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया आहे, या भूमिकेतून राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत देशी भाषेतून शिक्षण देण्याचे समर्थन केले जात असे. या दृष्टीने भाषाशिक्षणाचे काही प्रयोगही या काळात जाणीवपूर्वक केले गेले. १९३८ साली माध्यमिक वर्गांना मराठीतून सकस शिक्षण देणाऱ्या 'लोकशाळां'चा प्रयोग करण्यात आला होता. या लोकशाळांत इंग्रजी शिकविले जात नव्हते. इंग्रजीचे जे तास वाचले ते हस्तव्यवसायाला, कलांना आणि मराठीच्या व इतर विषयांच्या उच्च शिक्षणाला देण्यात आले होते. लोकशाळेतील अभ्यासक्रमांचा दर्जा त्यावेळच्या इंटरमिजिएटएवढा ठेवण्यात आला होता. मात्र हा प्रयोग मुंबई सरकारला मानवला नाही, शासनाने हा प्रयोग बंद करायला भाग पाडले. (घाटे, १९६१, पृ. ९४-९५)

## ५.४. बालशिक्षणाच्या नव्या वाटा :

बालशिक्षणाच्या क्षेत्रात आपल्याकडे कोणकोणते प्रयोग झाले याचा तपास आता करावयाचा आहे. इटली येथे १९०७ च्या सुमारास डॉ. मॉण्टेसरींनी सुरू केलेला बालशिक्षणाचा प्रयोग, अमेरिकेतील हेलन पार्कहर्स्ट्‌ची डाल्टन योजना, फ्रॉबेलचे देणग्यांचे ('गिफ्टस्') शैक्षणिक तत्त्वज्ञान, गांधीजींचे शैक्षणिक प्रयोग, महर्षी कर्वेंचे मुलींच्या शिक्षणाचे प्रयोग इत्यादींचा कमीअधिक प्रभाव बालशिक्षणाच्या प्रयोगांवर होत होता.

प्रार्थना समाजाच्या संस्कारातून तयार झालेल्या ताराबाई मोडक यांनी १९१६ पासून शिक्षणक्षेत्रात सेवा द्यायला सुरुवात केली होती. पदवीधर झाल्यानंतर अमरावती येथील मुलींच्या सरकारी हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षिकेची नोकरी स्वीकारली; मात्र बढतीच्या जागेवर त्यांना डावलून केवळ मॅट्रिक उत्तीर्ण असलेल्या मिस पास्कल या ॲंग्लो--इंडियन बाईची नेमणूक झाली. ॲंग्लो--इंडियन लोकांसाठी व एतद्देशीयांसाठी नेमणुकीचे वेगवेगळे नियम ही ब्रिटिशांची पक्षपाती नीती ताराबाईंनी अनुभवली. ताराबाईंनी आपला स्वाभिमान कायम ठेवून नोकरीचा राजीनामा दिला व अमरावतीत स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढली. नावाप्रमाणेच ही 'नमुनेदार शाळा' होती. शिवणकाम-हस्तव्यवसायाचे पूरक शिक्षणही या शाळेत दिले जात होते. पुढे वयाच्या २९ व्या वर्षी राजकोटला बार्टल फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपल म्हणून त्या रूजू झाल्या. तिथे किंडरगार्टन पद्धती व फ्रोबेलच्या देणग्यांच्या शिक्षणपद्धतींचा त्यांनी अभ्यास केला.

जर्मनीतील फेडरिक फ्रोबेल (१७८२-१८५२) याने १८३७ साली प्रथमच बालकेंद्री शिक्षणाची संकल्पना घेऊन 'बालोद्यानपद्धती' अर्थात 'किंडरगार्टन' पद्धती पुढे आणली होती. [१] शाळेत जाण्यापूर्वी बालकांची जी निसर्गदत्त खेळण्याची प्रवृत्ती असते, ती लक्षात घेऊन 'खेळता खेळता शिक्षण' देण्याची संकल्पना बालोद्यानपद्धतीत अभिप्रेत आहे. बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात रूजविण्यासाठी ह्या पद्धतीचा यशस्वी प्रयोग करण्यात आला होता. बालोद्यानात शाळा हे उद्यान आणि तेथील शिक्षक हे माळी (Kinder + garten) अशी फ्रोबेलची कल्पना होती. पूर्वप्राथमिक शिक्षणाचा शास्त्रीय दृष्टीने विचार करणारा हा पहिला शिक्षणतज्ज्ञ होता. मुलांच्या नैसर्गिक प्रेरणा विचारात घेऊन शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावर त्याचा भर होता. मुले एकत्र खेळतात तेव्हा ते विविध साधनांचा सामाईक वापर करतात, त्यातून सामाजिकतेचे उत्तम अभिसरण होते, अशी त्याची समजूत होती. फ्रोबेलने पंचेंद्रियांच्या अनुभवांतून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाला बालशिक्षणात प्राधान्य दिले. त्याने तयार केलेल्या शैक्षणिक साधनांना तो 'गिफ्ट्स' अर्थात 'देणग्या' म्हणत असे. अशा बारा देणग्या त्याने विकसित केल्या होत्या. चेंडू आणि दोरीने मोठा होणारा गोल ह्या त्यापैकी दोन महत्त्वाच्या देणग्या. मुलांनाही तो गोलाकारात बसवत असे. शून्यातून शून्याकडे जाण्याचे गूढ तत्त्व यामागे

होते. मुलांच्या रचनात्मक प्रवृत्तीचा विकास व्हावा म्हणून त्याने हस्तकौशल्यांना बालशिक्षणात प्राधान्य दिले. मुलांनी अभिरुचिसंपन्न बनावे व त्यांचा कल्पनाविकास व्हावा या दृष्टीने त्याने गाणी, गोष्टी, परिकथा, अभिनयगीते, खेळ यांना शिक्षणक्रमात अग्रक्रम दिला होता. शैक्षणिक साधनांचा उपयोग कसा करावा हे सूचित करण्यासाठी त्याने गाणी रचली होती. शाळेचे वातावरण सौंदर्यासक्त असावे, याची तो काळजी घेत असे. (फाटक पद्‌मजा, १९९५, पृ. १८३) एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी गुजरातेत बडोदे संस्थानात अशा पद्धतीच्या किंडरगार्टन शाळा चालविल्या जात होत्या. खालसा मुलुखात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी तुरळकपणे किंडरगार्टन पद्धतीच्या पूर्वप्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या. मुंबई राज्यात सोलापूर येथे इ. स. १९०० च्या सुमारास पहिले किंडरगार्टन प्रशिक्षण विद्यालय स्थापन झाले होते.

१९०७ साली डॉ. मॉंटेसरी यांनी मुलांचा शारीरिक व मानसिक विकास आपापल्या गतीने होत असतो, हे पायाभूत तत्त्व मानून बालशिक्षणपद्धतीत नवे प्रयोग केले. 'मॉण्टेसरी शिक्षणपद्धती'वर त्यांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तके १९१२ साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर ही शिक्षणपद्धती अनेक देशांत उपयोजिली गेली. १९१४ साली ॲनी बेझंट बाईंच्या प्रयत्नाने सर्वप्रथम मद्रास प्रांतातील अड्यार येथे मॉण्टेसरी पद्धतीचे बालमंदिर सुरू झाले. त्यानंतर गुजरातेत गिजुभाई बधेका यांनी मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला. फ्रोबेलच्या किंडरगार्टन शिक्षणपद्धतीत समूहशिक्षणावर भर होता; मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचा वैयक्तिक शिक्षणावर भर होता. फ्रोबेलच्या शिक्षणपद्धतीतील कृत्रिम खेळ, हस्तव्यवसाय, अभिनय, गाणी, परीकथा यांना किंडरगार्टन पद्धतीत स्थान नव्हते. काय शिकायचे हे मुलांनीच ठरवावे, यावर मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचा अधिक विश्वास होता. मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी स्वत:च्या गरजा स्वत:च भागविण्याच्या पद्धती ते कशा आत्मसात करतील यावर त्यांचा भर असे. स्वत:ची चूक शोधत, सुधारत मुले अप्रत्यक्षपणे स्वत:च नव्या गोष्टी शिकत जातात. सूक्ष्मावलोकनातून पदार्थांचे गुणधर्म ओळखणे, संवेदनांतील साम्यभेद ओळखणे, त्यानुसार वर्गीकरण करणे, स्नायुसंचलनातून कर्मेंद्रियांवर ताबा ठेवणे या गोष्टी मुले शिकत जातात. अनुभवांची विविधता, पुनरावर्तन, उजळणी यातून मुलांची प्रयोगशीलता वाढीला लागते. विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळी मॉंटेसरीच्या ह्या नव्या शिक्षणपद्धतीचा भारतीयांना प्रथमच परिचय होत होता. पुढे १९३९ च्या सुमारास स्वत: मॉण्टेसरी बाई भारतात आल्या व दहा वर्षे वास्तव्य करून त्यांनी ही शिक्षणप्रणाली भारतात रूजविण्यासाठी योगदान दिले.

त्यावेळच्या मुंबई इलाख्यात बालशिक्षणाचा पाया घालण्यात ताराबाई मोडक (१८९२-१९७३) यांचा महत्त्वाचा वाटा आहे. १९२२ साली गुजरातेतील शिक्षणतज्ज्ञ गिजुभाई बधेका यांच्या संपर्कात त्या आल्या. भावनगरच्या टेकडीवर गिजुभाईंची

'दक्षिणामूर्ति संस्था' मुलांसाठी 'बालमंदिर' चालवित होती. या संस्थेची रचना डाल्टन प्लॅनवर करण्यात आली होती. अमेरिकेतील हेलन पार्कहर्स्ट या स्त्रीने ८ ते १८ वर्षांच्या मुलांसाठी १९१९ मध्ये डाल्टन येथे ही शिक्षण-योजना तयार केली होती. या योजनेचा विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय शिक्षणावर व चारित्र्यघडणीवर भर होता. वर्गशिक्षणापेक्षा प्रयोगशाळेतील व्यक्तिशिक्षणाला या प्रणालीत अधिक महत्त्व दिले गेले होते. व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच स्वयंशिस्त महत्त्वाची मानली जात असे. शिक्षकाची भूमिका केवळ मार्गदर्शकाची असून विद्यार्थी स्वयंशिक्षणपद्धतीने स्वत:च शिकेल अशी श्रद्धा बाळगणारी ही शिक्षण पद्धती होती. विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षणाची कालमर्यादा आणि वेळापत्रक ठरविण्याचे स्वातंत्र्य होते. गिजुभाई बधेकांच्या 'बालमंदिरा'त डाल्टन प्लॅनबरोबर स्वातंत्र्य व स्वयंस्फूर्ती या तत्त्वांवर भर देणाऱ्या मॉंटेसरी शिक्षणपद्धतीची तत्त्वेही पाळली जात होती. बालकांचे स्वतंत्र व्यक्तित्व, त्याच्या कृतींच्या मुळाशी असलेली स्वयंप्रेरणा, ती पूर्ण होण्यासाठी कल्पकतेने बनविलेली शैक्षणिक साधने, बालकाला स्वयंशिक्षण घेण्यासाठी देण्यात येणारी संधी, शिक्षकाची मार्गदर्शकाची किंवा उत्प्रेरकाची भूमिका या सर्वच कल्पना त्या वेळी भारतातच काय पाश्चिमात्य शिक्षणातही नव्या आणि क्रांतिकारक होत्या. बालविकासाच्या या कल्पनांचा प्रारंभ गिजुभाई बधेका आणि त्यांना अनुसरणाऱ्या ताराबाई मोडक यांनी महाराष्ट्रात प्रथमच केला. गिजुभाईप्रमाणेच ताराबाईही गांधीजींच्या विचारसरणीने प्रभावित झाल्या होत्या. त्यांनी गांधीजींचे अनुयायीत्व स्वीकारले होते. खादी परिधान करणे, सुतकताई करणे हे नित्यकर्महो त्यांनी अंगिकारिले होते. १९२३ ते १९३२ या काळात ताराबाईंनी मॉंटेसरी पद्धतीचा प्रयोग आपल्या देशातील राष्ट्रीय सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार योग्य ते फेरफार करून उपयोगात आणायला सुरुवात केली. १९३० पासून गिजुभाईंनी बालशिक्षणाच्या प्रसाराचे काम ताराबाईंकडे सोपविले होते. इंग्रजी राजवटीतले पठडीबद्ध शिक्षण बाजूला ठेवून त्यांनी किंडरगार्टन, मॉण्टेसरी व गांधीजींच्या जीवनशिक्षणपद्धतीचा मेळ घालून नवी देशी बालशिक्षणपद्धती घडविली. भारतीय संस्कृतीशी सुसंगत अशी लोकगीतांतील बाळगाणी, शास्त्रीय संगीताची जोड देऊन गायन-वादनकलेचा शिक्षणात सर्जनशील उपयोग, महाराष्ट्र संस्कृतीतील रांगोळी कला, भरतकाम-विणकामाची कौशल्ये, बागकाम, अंगमेहनत, प्रवास यांना बालशिक्षणात महत्त्व देऊन त्यांनी आपली देशी बालशिक्षणपद्धती विकसित केली. अमरावती येथे हमालपुऱ्यात, चपासी पुऱ्यात व हरिजनपुऱ्यात त्यांनी 'बालवाड्या' सुरू केल्या. १९३२ साली अमरावतीहून 'शिक्षणपत्रिका' हे मराठी मासिक सुरु केले. १९३६ साली ताराबाईंनी मुंबईत दादरच्या हिंदू कॉलनीत *'बालमंदिर'* सुरू केले. 'मुलांच्या चतुरस्त्र वाढीला पोषक व पूरक वातावरण उपलब्ध करून देते ते बालमंदिर', अशी या प्रयोगाची त्यांनी सुटसुटीत व्याख्या केली.

'खेळता खेळता शिक्षण' ही सहजज्ञानप्राप्तीची नवी संकल्पना या प्रयोगातून रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. चिठ्ठीवाचनाच्या खेळातून अनुक्रमे मूकवाचन, मग कृती व शेवटी तोंडी वाचन असे खेळ त्यांनी तयार केले. मातीकामातून मुलांच्या स्नायूंना बळकटी येण्याबरोबरच त्यांची कल्पनाशक्ती चेतवण्याचेही कार्य साध्य होईल असे हस्तकौशल्याचे खेळ खेळायला मुलांना प्रवृत्त केले जाई. मण्यांच्या खेळांतून बेरीज-वजाबाकी-भागाकार या संकल्पना सहजगत्या मुलांच्या अंगवळणी पडत. लेखनविद्येतही अक्षरांच्या जोड्या करणे, शब्दासारखा शब्द जुळवणे असल्या खेळांतून श्रुतलेखन, गतिलेखन, सुलेखन, शुद्धलेखन ही कौशल्ये मुले सहजगत्या आत्मसात करीत. बालशिक्षणाच्या या नव्या पद्धतिशास्त्राचा प्रसार करण्यासाठी ताराबाई मोडकांनी शिक्षणपत्रिकेतून लेख लिहिले, पालकसभा घेतल्या आणि १९३९ साली 'बालअध्यापनमंदिर' स्थापन करून 'नूतन बालशिक्षकां'ची नवी पिढी घडविण्याचे प्रयत्न केले. सर्वांगीण बालविकासाची भूमिका घेऊन मुलांचा स्नायुविकास, बुद्धिविकास, ज्ञानेंद्रियशिक्षण, भाषाविकास, भावनाविकास, सामाजिक विकास, लेखन, वाचन, गणित, विज्ञान यांची प्राथमिक तयारी अशी सम्यक शिक्षणपद्धती राबविण्याचा प्रयोग प्रथमच झाला.

१९४४ साली कोडाईकॅनाल येथे मॉंटेसरी बाईंनी महिनाभराचा पहिला प्रगत 'मॉंटेसरी अभ्यासक्रम' घेतला, त्यात ताराबाई सहभागी झाल्या होत्या. ताराबाईंनी मुंबईत 'बालशिक्षणनगर' भरवले होते, त्याचे उद्घाटन मॉंटेसरी बाईंनी केले होते व त्यावेळी सहा व्याख्यानेही दिली होती. ताराबाईंनी भारतीय संस्कृती व स्थानिक शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन मॉंटेसरी शिक्षणपद्धतीत जरूर ते बदल करून नूतन बालशिक्षणपद्धतीचे रूप साकारले. या नव्या शिक्षणपद्धतीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी *'नूतन बालशिक्षण संघा'ची* स्थापना केली. १९४० पासून नूतन बालशिक्षण संघाशी संलग्न ३३ बालमंदिरे चालविली जात होती. महाराष्ट्रात अनुताई वाघ, सरलाताई देवधर, नवलेभाऊ असे नूतन बालशिक्षणपद्धतीचे अनुयायी त्यांनी घडविले. ताराबाई मोडक १९४६ ते १९५१ या काळात त्या महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्या होत्या. या काळात त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचा प्रश्न विधिमंडळाच्या चर्चेत आणला. मुंबई राज्याच्या पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळावर तसेच बेसिक एज्युकेशन कमिटीवर काम करून त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाला नवी दिशा देण्याचे काम केले. दोन वेळा त्या अखिल भारतीय बालशिक्षण विभागाच्या अध्यक्षा होत्या. राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण परिषदेतही त्या सक्रिय होत्या. १९४९ साली इटलीला मॉंटेसरी संमेलनात त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. पाश्चिमात्य देशांतील प्रयोगशील बालशिक्षण व भारतीय संस्कृतीतील देशी शिक्षणाच्या जाणिवा व गरजा यांचा मेळ घालून महाराष्ट्रात बालशिक्षणाच्या क्षेत्रांत नवे मन्वंतर घडवून आणण्याचे प्रयत्न त्यांनी केले. *'भारताच्या मादाम मॉण्टेसरी'* अशी ताराबाई मोडक यांच्या कार्याची नोंद

केली जाते. १९३० च्या गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहात थेट सामील होण्याऐवजी ताराबाईंनी 'अक्षरज्ञानपुस्तिका' तयार करून समांतरपणे खेड्यापाड्यांतून प्रौढशिक्षणाचा प्रसार करण्याचीही मोहीम काढली होती. (फाटक पद्मजा, कित्ता, पृ. १११)

**शालेय शिक्षण :**

महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शालेय शिक्षणाचा विस्तार झाला असला तरी ग्रामीण भागात शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकडे दुर्लक्षच झालेले दिसते. कोकणात आणि छोट्या गावांत अर्ध्याअधिक शाळा एकशिक्षकीच असत. वळणदार अक्षर, शुद्ध उच्चारणाचे वाचन आणि बिनचूक प्राथमिक गणित यावर तेवढा भर असे. अस्पृश्यांसाठी 'लो कास्टस् स्कूल्स' (एलसी स्कूल्स) असत. या शाळा गावकुसाबाहेरच्या वस्तीत भरत. कुठलाही शाळा तपासणीस या शाळांना थेट भेटीसाठी जात नसे. माध्यमिक शिक्षण घेणारे विद्यार्थी थोडेच असत. अभ्यासक्रमांत वर्षानुवर्षे बदल होत नसे; दोनतीन पिढ्यांतील विद्यार्थी तेच विषय, तीच पाठ्यपुस्तके शिकत. शिक्षक प्रशिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नसल्याने शाळांत ट्रेंड शिक्षकांची कमतरता असे. अध्यापनपद्धतीत घोकंपट्टीला महत्त्व असे. वर्गात बहुतेक विषयांच्या पाळ्या असत. इंग्रजी शब्द, मराठी कविता, इतिहासातील सनावळ्या, भूगोलातील देश, पर्वत, राजधान्या या साऱ्यांच्या पाळ्या असत. पाळी आली म्हणजे गुण मिळत, चुकली की छडी असा सर्व मामला असे. काही शाळांमध्ये स्वावलंबनावर भर असलेले 'बालवीर' प्रशिक्षण असे. १९२७ साली मुंबईत बालवीरांची अखिल भारतीय पातळीवरची 'जांबोरी'ही झाली होती. (घाटे, १९६१, पृ. ९०. ३८५) शालेय शिक्षणात काही ज्ञान व्यवसायातून, काही समाजाच्या व निसर्गाच्या संपर्कातून द्यावे हा विचार गांधीजींच्या मूलोद्योग शिक्षणाच्या / वर्धा शिक्षण पद्धतीतून राष्ट्रीय पातळीवर पुढे आला होता, त्याचा स्वतंत्र आढावा याच प्रकरणात पुढे घेतला आहे.

शिक्षण मोफत असले तरी नुसती फीची माफी असे; इतर प्रगत देशांप्रमाणे पाठ्यपुस्तके, वह्या, दुपारचे भोजन, अशक्त मुलांना दूध किंवा क्वाडलिव्हर ऑईल देण्याची पद्धत नव्हती. १९२० च्या सुमारास मुंबई सरकारने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुढारलेला, मध्यम आणि मागासलेला असे ३ वर्ग केले होते. मध्यम वर्गात मराठा आणि तत्सम शंभर-सव्वाशे जातीतील विद्यार्थ्यांसाठी सरकारने काही शिष्यवृत्त्यांची व सरकारी शिक्षणसंस्थांत काही राखीव जागांची तरतूद केली होती. मात्र बाळासाहेब खेर मुंबई प्रांताचे प्रधानमंत्री असताना त्यांनी शिक्षणक्षेत्रात जातीय तत्त्वावर समाजाचे वर्गीकरण करू नये, अशी भूमिका घेतली. त्रिस्तरीय वर्गीकरणातील मध्यमवर्गाला पुढारलेल्या वर्गात ढकलून पुढारलेले व मागासलेले असे दोनच वर्ग ठेवायचे धोरण त्यांनी आणले. त्याचा फटका ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना बसला. त्यावेळी दिनकरराव देसाई

शिक्षणमंत्री होते आणि वि. द. घाटे विधानसभेचे सदस्य होते. घाट्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर या धोरणामुळे होणारा अन्याय सरकारच्या निदर्शनास आणून दिल्यावर जातीच्या तत्त्वावर वर्गीकरण नको ही भूमिका कायम ठेवून प्रादेशिक निकषावर वर्गीकरणाचा पर्याय स्वीकारण्यात आला. त्यानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी २/३ शिष्यवृत्त्या आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी १/३ शिष्यवृत्त्या अशी वाटणी करण्याचा निर्णय झाला. शिक्षणाची वाटचाल कशी बिकट होती हे यावरून लक्षात येते.

## ५.५. स्त्री शिक्षणाची वाटचाल :

एकोणिसाव्या शतकात मुलींच्या शिक्षणाबाबत सरकारचे धोरण तटस्थपणाचे होते. बालविवाहाच्या रूढीमुळे मुलींना शाळेत पाठविण्याची समाजाची मानसिकता नव्हती. मात्र १८४५ साली मुंबईत स्थापन झालेल्या 'स्टुडंट लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी'ने सर्वप्रथम मुलींची शाळा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला व मुलींसाठी स्वतंत्र शालेय पुस्तकेही संपादित केली. मुंबईत मुलींच्या ९ शाळा सुरू झाल्या होत्या. पुण्यातही महात्मा फुले यांनी मुलींची शाळा सुरू केली होती. हे अपवाद वगळता महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणासाठी १९ व्या शतकात फारसे काही घडले नव्हते.

### हुजूरपागा शाळा :

१८८२ साली पंडिता रमाबाईंच्या आर्य महिला समाजाने पुण्यात मुलींचे हायस्कूल स्थापन करण्यासाठी प्रयत्न केला होता. या प्रयत्नातूनच पुढे १८८४ साली शंकर पांडुरंग दीक्षित, विल्यम वेडरबर्न, न्या. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर, विश्राम रामजी घोले इत्यादींच्या पुढाकारातून महाराष्ट्र फिमेल एज्युकेशन सोसायटीचे 'हायस्कूल फॉर नेटिव्ह गर्ल्स' अर्थात हुजूरपागा शाळा सुरू झाली. पुण्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनातली ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. इंदूरचे शिवाजीराव महाराज व त्यानंतर बडोद्याचे सयाजीराव गायकवाड हे सोसायटीचे अध्यक्ष होते. विसाव्या शतकातील स्त्रीशिक्षणाची वाटचाल कशी झाली हे पाहण्यापूर्वी हुजूरपागा हायस्कूलचे स्वागत सनातनी पुणेकरांनी कसे केले, त्याची पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. लो. टिळकांनी 'केसरी'तून लिहिले की, इंग्रजी शिकून सीता, अहिल्याबाई यांच्याऐवजी ग्रेस डार्लिंग व एलिझाबेथ यांच्या गोष्टी सांगणाऱ्या मुलींची आज समाजाला गरज नाही. "सासरी किंवा माहेरी रोजचे थोडेबहुत घरचे काम करून मधल्या वेळांत दोन तीन तास स्त्रीधर्मास व हिंदु धर्मास उचित असे स्त्रियांस शिक्षण देण्याचे कोणी मनात आणिले तर ती गोष्ट साध्य आहे. पण जेथे सर्व धर्मांच्या मुली एकत्र करून त्यांस पुरुषांप्रमाणे ११ ते ५ वाजेपर्यंत इंग्रजी बाई आंग्लभौम शिक्षण देणार, ती शाळा अति श्रीमंतांच्या किंवा अनाथ झाल्यामुळे काही तरी धंदा करण्याची ज्यास जरूर आली आहे, अशा स्त्रियांच्या मात्र उपयोगी पडणार. मध्यम स्थितीच्या गृहस्थांस त्या शाळेपासून काही एक उपयोग होणार नाही." (केसरी, ४

ऑक्टोबर १८८७) या हायस्कूलात मुलींना धर्मशिक्षण मिळत नाही, अशीही कुरकुर होती. (विविधज्ञानविस्तार, जाने. १९०५, पृ. १-७) 'तरुणी शिक्षण नाटिका' हे नाटक लिहून ना. वा. कानिटकर यांनी हुजूरपागा शाळेवर टीकास्त्र सोडले होते. मुलींच्या शिक्षणाविषयी अशी सामाजिक उदासीनता असताना ही शाळा सुरू झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका ख्रिश्चन असत, त्यामुळेही या शाळेकडे परक्या लोकांच्या अधिपत्याखाली चालणारी शाळा म्हणून बघण्याचा दृष्टिकोन तयार झाला होता. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गायकवाडांची नात राजपौत्री निर्मला राजेसाहेब गायकवाड, मिरज (मोठी पाती) संस्थानच्या युवराज्ञी श्रीमंत सौ. लक्ष्मीबाईसाहेब, विशाळगड व भोर संस्थानच्या युवराज्ञी, कुरुंदवाड (मोठी पाती) संस्थानच्या राणीसाहेब, इचलकरंजी संस्थानच्या युवराज्ञी श्रीमंत अनुबाई घोरपडे या हुजूरपागा शाळेत शिकल्या. त्यामुळे श्रीमंतांच्या, संस्थानिकांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या मुलींची शाळा म्हणून पुण्यात या शाळेची एक सर्वसाधारण ओळख निर्माण झाली होती. सरस्वतीबाई अकलूजकर यांनी त्यांच्या हुजूरपागा शाळेतल्या आठवणी सांगताना शाळेत येणाऱ्या संस्थानिकांच्या मुलींविषयी लिहिले होते की, "शाळेत भोरकर, विंचूरकर, अक्कलकोटकर अशा काही छोट्या संस्थानिकांच्या मुलीही शिकायला होत्या. त्यांना सगळेजण 'प्रिन्सेस' म्हणून ओळखायचे. त्या त्यांच्या सुंदर, ऐटबाज बग्यांतून यायच्या. त्यांच्या बग्गीच्या पायट्यांवर दोन्ही बाजूंना त्यांचे खास पांढऱ्या पोशाखातले, लाल पगडीवाले शिपाई उभे असत. शाळेच्या दरवाजाशी येताच हे शिपाई वह्या-पुस्तकांचं दप्तर राजकन्यांच्या हातात देत आणि मागे परत वळत. .. यापैकी एका राजकन्येचं लग्न वर्षाच्या मध्येच झालं. त्यानंतर ती शाळेत परत येऊ लागली, तेव्हा तिच्या बग्गीवरचे शिपाई दोनाऐवजी चार झाले होते!" (अकलूजकर,२०००,पृ.१०१-१०२) संस्थानिकांच्या मुलींखेरीज इतर मुलीही ब्राह्मणी वळणाच्या, नऊवारी नेसणाऱ्या; काही थोड्या पाचवारी नेसणाऱ्या ज्यू, अँग्लोइंडियन मुली असायच्या. इंग्लिश व अँग्लोइंडियन शिक्षिका गुडघ्याच्या खालपर्यंत पोहचणारे लांब फ्रॉक आणि उंच टाचेचे बूट घालायच्या. बाकीच्या मराठी शिक्षिका नऊवारीतच असायच्या. रोज प्रार्थनेच्या वेळी 'गॉड सेव्ह द किंग' ही प्रार्थना म्हटली जाई. असे काहीसे इंग्रजाळलेले वातावरण असायचे. त्यामुळे सेवासदन किंवा नूतन मराठी स्कूलपेक्षा या शाळेकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन काहीसा परकेपणाचा असायचा.

श्रीमंत कुटुंबातल्या मुलींची ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत मात्र महाराष्ट्रात अव्वल होती. हुजूरपागा शाळा ही प्रामुख्याने 'बोर्डिंग स्कूल'म्हणून प्रसिद्ध होती. कडक शिस्तीसाठीही तिची ख्याती होती. बोर्डिंगमधल्या मुलींना घरून आलेली पत्रे आधी मुख्याध्यापिकेच्या कचेरीत जात. तेथे पत्रे वाचली जात व मगच मुलींना दिली जात. मुलींनी घरी लिहिलेली पत्रेही आधी वाचून नंतर पोस्टात टाकली जात. पुण्यात

'सेवासदन' ही दुसरी शाळा होती, पण अभ्यासाच्या दृष्टीने तिला फारशी प्रतिष्ठा नव्हती. त्यामुळे हुजूरपागेत प्रवेश मिळाला नाही तर नाइलाजाने सेवासदनमध्ये प्रवेश घ्यायची पुणेकरांची मानसिकता तयार झाली होती. (करंदीकर सुमा, २००२, पृ. १३-१४)

शाळेच्या स्थापनेपासून इ. स. १९०० पर्यंत मिस हर्फर्ड या लेडी सुपरिटेंडेट यांनी हुजूरपागा शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी भरपूर मेहनत घेतली. आर्य महिला समाजाच्या रमाबाई रानडे व इतर भगिनींनी त्यांचे नाव सुचविले होते. मिस हर्फर्ड यांनी शिस्त आणि संस्कार यांचा सुयोग्य संगम साधून शाळेला नावारूपाला आणले. १८८५-८६ साली ५८ मुलींनी प्रवेश घेतला होता, इ.स. १९००साली हायस्कूलमध्ये ५६ व प्रॅक्टिसिंग स्कूलमध्ये १४३ मुली शिकत होत्या. इ. स. १९०० पर्यंत १० मुली मॅट्रिक झाल्या होत्या. इ. स. १९०० साली डॉ. जे. पी. वाडिया, ना. गोपाळ कृष्ण गोखले व हरी नारायण आपटे हे सोसायटीचे सभासद झाले. मिस हर्फर्ड यांच्यासोबत फर्स्ट असिस्टंट म्हणून काम पाहणाऱ्या मिस सोराबजी यांनी १९०७ पर्यंत लेडी सुपरिटेंडेट पदाची जबाबदारी सांभाळली. मुलींच्या ज्ञानवर्धनासाठी त्यांनी बऱ्याच योजना सुरु केल्या. दर रविवारी त्यांची धर्मप्रवचने होत. युरोपियन शिक्षकीणींकडून मुलींना स्वीडीश ड्रीलचे शिक्षण दिले जाऊ लागले. चित्रकला व संगीताचे शिक्षण दिले जाऊ लागले. १९०६ पासून फ्रेंच शिकवले जाऊ लागले. महिन्यातून एकदा इंग्लिश कविता म्हणण्याची स्पर्धा घेतली जाऊ लागली. मुलींना खेळण्यासाठी टेनिस कोर्ट व बॅडमिंटन कोर्ट तयार करण्यात आले. हुतुतू, खोखो हे देशी खेळही मुली खेळत असत. मिस रुबेन या शिक्षिकेने मुलींसाठी *'बालिकादर्श'* मासिक सुरू केले. मिस बर्न यांनी बोर्डिंगमधल्या मुलींना गृहव्यवस्थेचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. १९१३ पासून हायस्कूलमधल्या मुलींची संख्या वाढू लागली. १९१३ साली २५३ व १९१७ साली ३२५ मुली शाळेत शिकत होत्या. १९१९ साली हायस्कूलमधील ३६९ मुलींपैकी ३३६ अविवाहित, १२ विवाहित व २१ विधवा असल्याची नोंद आढळते. १९१३ सालापासून हायस्कूलमध्ये प्रथमोपचाराचे शिक्षण दिले जाऊ लागले. १९१४ साली महायुद्ध सुरू झाले तेव्हा मिस वाडिया यांनी मुलींना महायुद्धाची माहिती करून दिली. युद्धाकडे मुलींचे लक्ष असावे म्हणून मिस बर्न यांनी वेळापत्रकात दर आठवड्याला 'वॉर लेक्चर' म्हणून एक तास ठेवला. युद्धावर गेलेल्या शिपायांसाठी मुलींनी खाकी शर्ट शिवून दिले. १९१५ साली मुलींनी तयार केलेल्या वस्तूंचे 'फॅन्सी फेअर' भरवून त्याचे उत्पन्न युद्धफंडास मदत म्हणून लेडी वुइलिंग्डन यांच्याकडे पाठविण्यात आले. सरकारी फतव्यानुसार १० जुलै १९१६ हा दिवस 'चिल्ड्रन्स डे' म्हणून साजरा करण्यात आला व शाळेतल्या मुलींनी मनोरंजनाचे कार्यक्रम करून जमवलेला निधी बेल्जममधील आपद्ग्रस्त मुलांना पाठविण्यात आला. शाळेच्या बाल सेवासंघातल्या मुली दरवर्षी मुंबईतल्या 'इन्फंट

वेल्फेअर सेंटर'साठी लहान मुलांचे कपडे शिवून पाठवित. १९१७ साली मनोरंजक गोष्टींच्या माध्यमातून नीतिपाठाचे शिक्षण सुरू झाले. इंग्रजी भाषा समजून घेण्यात पुष्कळ वेळ जात असल्याने इतिहास, भूगोल हे विषय सखोल अभ्यासण्यात अडसर निर्माण होतो हे लक्षात घेऊन १९१५ पासून इंग्रजी पाचवीपर्यंतच्या शिक्षणाचे माध्यम मराठी करण्यात आले; फक्त शास्त्र विषयाचे शिक्षण इंग्रजीतून दिले जाऊ लागले. मुली इंग्लिश भाषेत प्रवीण व्हाव्यात यासाठी मिस रुबेन यंनी 'लिटरेचर सोसायटी' स्थापन करून आठवड्यातून एक तास शाळा सुटल्यावर लिटरेचर क्लास सुरू केला. तळेगावचा काच कारखाना, मुंढव्याची कागदाची गिरणी, मांजरीचा ऊसाचा फार्म इत्यादी ठिकाणी मुलींच्या शैक्षणिक सहली आयोजित केल्या जाऊ लागल्या. मुलींना सृष्टिज्ञान (Nature Study) या विषयाचे पद्धतशीर ज्ञान दिले जावे यासाठी १९२४ साली हुजूरपागा शाळेतील दोन शिक्षकांना मुद्दाम मुंबईच्या शेतकी कॉलेजात सुरू असलेल्या '*नेचर स्टडी क्लब*'मध्ये पाठविण्यात आले होते.१९२४-२५ पासून शाळेत सर बेडन पॉवेल यांच्या संकल्पनेतील '*गर्ल्स-गाईड*' संघ स्थापन करण्यात आला. मिसेस सेराबाई सॅम्युअल व मिस पाणंदीकर (मिसेस खान) यांनी प्रशिक्षित होऊन पथकाचे कॅप्टनपद सांभाळले. दरवर्षी दहा दिवसांचा गर्ल-गाइडसचा पुण्याबाहेर कॅम्प घेतला जात असे. १९३१ साली सहकारी तत्त्वावर काम करण्याचा अनुभव मिळावा म्हणून 'बालिकावस्तुभांडार' सुरु करण्यात आले. दररोज सुटीच्या वेळेत व शाळा सुटल्यावर एका तासात मुलींना त्यांना हव्या असलेल्या वस्तू भांडारातून विकत घेता येत असत. (पानसे, १९३४)

हुजूरपागा ही मुलींची शाळा असल्याने तिथे 'होम सायन्स' हा खास विषय सुरु करण्यात आला होता. त्यात बाळाची निगा, बाळाची आंघोळ, थोडासा स्वैपाक असे विषय असत. परीक्षेसाठी कचकड्याच्या भावल्याला चोळूनमोळून, पायांवर पालथे घालून आंघोळ घालायला लागे. परीक्षेत स्वैपाकाची शेगडी पेटवण्यापासून भाकरी-भाजी करता येण्यापर्यंत प्रात्यक्षिक करून दाखवावे लागे. (करंदीकर सुमा,२००२, पृ. १५)

हुजूरपागा शाळेतून शिकून पुढे आलेल्या मुलींनी डॉक्टर, लेखिका, शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडिता, देशसेविका इत्यादी कार्यक्षेत्रात नावलौकिक संपादित करून महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात मौलिक भर घातली. लहानपणी वैधव्य आलेल्या काशीबाई देवधर यांनी १९०४ मध्ये मॅट्रिक झाल्यावर मद्रास विश्वविद्यालयातून बी. ए. पदवीचे शिक्षण घेतले व महर्षी कर्वे यांच्या आश्रमात आजन्मसेविका म्हणून सहयोग दिला. अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या सुंदराबाई कीर्तने यांनी वयाच्या १६-१७व्या वर्षी हुजूरपागा शाळेत शिक्षण घ्यायला सुरुवात केली व मुंबईच्या मेडिकल कॉलेजात वैद्यकीय शिक्षण घेऊन पुण्यात स्वतंत्रपणे वैद्यकीय व्यवसाय केला. डॉ. आनंदीबाई जोशी यांची पुतणी सीताबाई हिनेही मॅट्रिकच्या परीक्षेत दळवी शिष्यवृत्ती मिळवून फर्ग्युसन कॉलेजात बी. ए.

ला प्रवेश घेतला व फर्ग्युसनचे प्राचार्य रँग्लर परांजपे यांच्याशी विवाह केला. पुण्याचा स्त्रीशिक्षणसंस्थांच्या कामात त्यांनी सहभाग दिला. त्यांची कन्या कु. शकुंतला परांजपे यांनी मिस मॅनिंग प्राइज व कर्कहॅम प्राइज मिळवले, विलायतेत केंब्रिज विश्वविद्यालयातून बी. ए. पदवी मिळवली व जिन्हिवाला लीग ऑफ नेशन्सच्या सेक्रेटरिएटमध्ये अधिकारी म्हणून काम करू लागली. स्नेहलबाई पगार हुजूरपागा शाळेतून मॅट्रिक झाल्यावर अमेरिकेत एम. ए. झाल्या व बडोद्यास महिला प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य झाल्या. एलिझाबेथ शॅलोम, मिसेस जुबेदा सय्यद, हॅना शिंदे, द्वारकाबाई भट, गंगूताई पटवर्धन, वेणूबाई मोडक यांनी अध्यापन पदविका घेऊन शिक्षिकेचा व्यवसाय पत्करला. डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी प्राग येथील जर्मन विद्यापीठाची पीएच्. डी पदवी घेऊन मुंबईच्या एस. एन. डी. टी. विद्यापीठात संस्कृतच्या प्राध्यापिका म्हणून काम केले. विदर्भ महिला परिषदेचे अध्यक्षपद व पुण्याच्या वुमेन्स कौन्सिलचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले. हुजूरपागा शाळेतून मॅट्रिक झाल्यानंतर काशीबाई नवरंगे पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र विषय घेऊन दक्षिणी हिंदु स्त्रियांमध्ये बी. ए. पदवी मिळविणाऱ्या पहिल्या विद्यार्थिनी ठरल्या. त्यानंतर १९०५ साली एल. एम्. अँण्ड एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काशीबाईंनी स्वतंत्रपणे वैद्यकीय व्यवसायात काम केले. रमाबाई रानडे यांनी स्थापन केलेल्या आर्य महिला समाजाच्या अध्यक्ष, मुंबई प्रार्थना समाजाच्या अध्यक्ष, मुंबई विद्यापीठाच्या 'फेलो', मुंबई म्युनिसिपल स्कूल कमिटीच्या पहिल्या स्त्री-सभासद, मुंबई शहराच्या जे. पी. (Justice of Peace), बिहार भूकंपात आपत्तीग्रस्तांच्या मदतपथकाचे नेतृत्त्व अशा कितीतरी क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. १९०७ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ. जिराड यांनी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजातून वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेतले व वर्गात पहिल्या आल्या. त्यानंतर विलायतेत जाऊन एम. डी. पदवी संपादित करून मुंबईच्या कामा हॉस्पिटलात नामांकित सर्जन म्हणून त्यांनी आपल्या ज्ञानाचा ठसा उलटविला. वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या डॉ. इंदुमती भट, सुलोचनाबाई श्रीखंडे, शांताबाई सातवळेकर, नर्सिंग व आरोग्य सेवेत काम केलेल्या सरस्वतीबाई फाटक, शारदाबाई नायडू; विदेशात कृषिविज्ञानाचे उच्च शिक्षण घेतलेल्या राजुबाई शहा, सुप्रसिद्ध वकिल चंद्राबाई पोंक्षे, कर्नाटक प्रांतिक कॉंग्रेसच्या सदस्य व विजापूर लोकल बोर्डाच्या पहिल्या महिला सदस्य राहिलेल्या व १९२१ च्या असहकारिता आंदोलनातून राजकीय क्षेत्रात उतरलेल्या शांताबाई जोशी (येसूबाई बापट) या हुजूरपागा शाळेच्याच विद्यार्थिनी होत्या. (पानसे, १९३४)

१९१३ साली हुजूरपागा शाळेतून मॅट्रिक झालेल्या अनुसयाबाई काळे यांनी मध्यप्रांत-वऱ्हाड विधिमंडळाच्या उपसभापती, १९३० च्या प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्ष, आणि स्वातंत्र्यानंतर लोकसभेच्या खासदार म्हणून आपला ठसा उमटविला. धर्मानंद

कोसंबी यांची कन्या १९१८ साली मॅट्रिक झाली व त्यानंतर अमेरिकेत हार्वर्ड विद्यापीठातून पदवी संपादित केली. या शाळेच्या पहिल्या मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थिनी द्वारकाबाई कमलाकर केळकर लेडी डफरीन फंडातून शिष्यवृत्ती मिळवून विलायतेत वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर झाल्या. वऱ्हाडात त्यांनी समाजकार्य केले आणि बनारसला डफरिन हॉस्पिटलात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. द्वारकाबाईच्या भगिनी कृष्णाबाई केळकर याही १९२० साली विलायतेत जाऊन डॉक्टर झाल्या व कोल्हापूर संस्थानात त्यांनी २४ वर्षे लेडी डॉक्टर म्हणून काम केले. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना 'कैसर-इ-हिंद'पदक देऊन गौरविण्यात आले. १९२१ साली सुलभा पाणंदीकर यांनी मॅट्रिकच्या परीक्षेत पहिली जगन्नाथ शंकर शेठ शिष्यवृत्ती मिळवली. इंग्लंडला जाऊन एम्. लिट्. पदवी मिळवली व मुंबईच्या अध्यापक महाविद्यालयात रूजू झाल्या. याच वर्षी मॅट्रिक झालेल्या कुसुमावती जयवंत (देशपांडे) ऑक्स्फर्ड विद्यापीठातून इंग्रजी साहित्याच्या पदवीधर होऊन मराठीतल्या प्रसिद्ध लेखिका म्हणून त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. कु. इरावती करमरकर (कर्वे) यांना १९२२ साली दळवी शिष्यवृत्ती मिळाली. १९२६ साली 'चितपावन कोकणस्थ ब्राह्मण' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी समाजशास्त्रात एम. ए. पदवी संपादित केली, त्यानंतर फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक दि. धों. कर्वे यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. नंतर जर्मनीत बर्लिन विद्यापीठातून मानव्यविज्ञानात पीएच्. डी पदवी संपादित केली. पुढे मराठी साहित्यात लेखिका म्हणून त्यांनी स्वत:चा एक वेगळा ठसा निर्माण केला. १९२४ साली कमलाबाई उकिडवे (टिळक) यांनीही जगन्नाथ शंकर शेठ शिष्यवृत्ती पटकावली. कमलाबाई टिळक नंतर बनारस विद्यापीठात प्राध्यापक झाल्या व त्यांनी मराठीत कथालेखिका म्हणून आपले स्थान निर्माण केले. कमलाबाई टिळक यांच्याप्रमाणेच हुजूरपागा शाळेत शिकलेल्या शांताबाई नाशिककर, कमलाबाई बंबवाले, मुक्ताबाई लेले, इंदिराबाई सहस्त्रबुद्धे, लक्ष्मीबाई प्रधान, विमलाबाई देशपांडे, यमुनाबाई केळकर, दुर्गाबाई गांधी यांनी कथा-कादंबरी-चरित्र इत्यादी वाङ्मयप्रकारात लेखन करून मराठी साहित्यात भर घातली. (पानसे,१९३४) १९२६ साली कु. वेणूबाई अभ्यंकर मुंबईच्या मॅट्रिक परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आल्या व अध्यापन क्षेत्रात त्यांनी योगदान दिले. गव्हर्नरच्या बायकोच्या हस्ते सोन्याचे लॉकेट भेट देऊन तिचा सत्कार करण्यात आला. पुढे मैत्रेयी विनोद या नावाने एक विद्वान स्त्री म्हणून तिला विशेष प्रसिद्धी मिळाली. (अकलूजकर, २०००,पृ. १०२) हुजूरपागा शाळेत शिकलेल्या अशा कितीतरी कर्तृत्वान महिलांनी महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकीय व बौद्धिक जीवनात तसेच वैद्यकीय व आरोग्यसेवेच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले. महाराष्ट्रातून विलायतेत उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलींमध्ये ह्या शाळेचाच अग्रक्रम होता. या शाळेची मध्यमवर्गीय

मराठी समाजाला गरज नाही व ती केवळ उच्चभ्रू लोकांच्या मुलींसाठी उघडण्यात आलेली शाळा आहे, ह्या समजूती अप्रस्तूत होत्या, हे पुढील काळातल्या विद्यार्थिनींनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले.

**महर्षी कर्वेंचे योगदान :**

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १४ जून १८९६ रोजी पुणे येथे स्त्रीशिक्षणासाठी *'अनाथबालिकाश्रम'* नावाची संस्था स्थापना केली. आश्रमात प्रामुख्याने विधवांच्या व त्यासोबत काही अविधवा विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय करावी हा प्राथमिक हेतू होता. यापूर्वी पंडिता रमाबाईंच्या 'शारदासदन'च्या माध्यमातून विधवाशिक्षणाच्या कार्याला प्रारंभ झाला होता. अण्णासाहेब कर्वे यांची पत्नी या शारदाश्रमाची पहिली विद्यार्थिनी होती. अनाथ बालिकाश्रम स्थापण्यामागे 'शारदासदना'ची अप्रत्यक्ष प्रेरणा होती. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे अनाथबालिकाश्रम संस्थेचे पहिले अध्यक्ष होते व महर्षी कर्वे चिटणीसपदाची धुरा सांभाळत होते. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सामान्य मध्यमवर्गीयांकडून गावोगावी जाऊन वर्गणी गोळा करण्याचे काम महर्षी कर्व्यांनी सुरू केले होते. १८९८ साली रा. ब. ग. गो. गोखले यांच्याकडून पुण्याजवळ हिंगण्याच्या माळावर आश्रमासाठी जागा मिळाली. त्या जागेवर इ.स. १९०० मध्ये अनाथबालिकाश्रमाची दगड-विटांची झोपडीवजा मुख्य इमारत बांधण्यात आली. तत्पूर्वी १ जानेवारी १८९९ रोजी पुण्याच्या सदाशिव पेठेतील गोरे वाड्यात आश्रमाच्या कार्याला सुरुवात झाली होती. त्यावेळी फक्त एक विधवा आश्रमात दाखल झाली होती. इ. स. १९०० साली आश्रमात शिक्षणासाठी दाखल झालेल्या विद्यार्थिनींची संख्या १० झाली; त्यातील ८ विधवा आणि २ अविधवा होत्या. या विद्यार्थिनी संस्थेच्या खर्चाने फीमेल हायस्कूल व फीमेल ट्रेनिंग कॉलेजात शिकत होत्या. मुलींना शाळेत पोहचविण्यासाठी बैलाचा छकडा ठेवला होता. अण्णासाहेब कर्वे त्यावेळी फर्गसन कॉलेजात शिकवत होते; तेथले काम आटोपून संध्याकाळी ते आश्रमाचे काम बघत. संध्याकाळी व पहाटे आश्रमातील विद्यार्थिनींना शिकविण्याचेही काम ते करीत. १९०२ साली ट्रेनिंग कॉलेजातून प्रशिक्षित झालेल्या पार्वतीबाई आठवले आश्रमात रूजू झाल्या व त्यांनी महिला पर्यवेक्षकाची जबाबदारी स्वीकारली. १९०४ साली वेणूबाई नामजोशी व काशीबाई देवधर आश्रमात रूजू झाल्या. काशीबाई देवधर या मद्रास विद्यापीठाच्या बी. ए. पदवीधारक होत्या. वेणूबाई शारदासदनातून आलेल्या होत्या, त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कॉलेजचा अभ्यास सुरू केला होता. त्यांचे आतेभाऊ गोपाळ गणेश आगरकर यांच्या सहवासातून त्यांना शिक्षणाविषयी विशेष दृष्टी प्राप्त झाली होती. मुंबई विद्यापीठाची एम. ए. पदवी धारण केलेल्या श्रीमती कृष्णाबाई फाळके, बनूताई देशपांडे, आनंदीबाई मराठे, दुर्गाबाई किर्लोस्कर या महिलांनी आश्रमाचे काम पुढे नेले.

१९१४ साली वयाच्या ११ व्या वर्षी कृष्णाबाई खरे (विवाहानंतर मोटे) आणि १९१७ साली वयाच्या १२ व्या वर्षी बाळूताई खरे (विवाहानंतर मालतीबाई बेडेकर) आण्णासाहेब कर्व्यांच्या हिंगणे शिक्षण संस्थेत शिकण्यासाठी गेल्या. बाळूताई खरे (उर्फ विभावरी शिरूरकर) यांनी हिंगणे आश्रमातील आठवणी नोंदवल्या आहेत. त्यात त्यांनी लिहिले आहे की, "त्या काळात स्त्री-सुधारणेचा वेग मुंगीच्या पावलानेच होत होता. १९२१ मध्ये साऱ्या हिंदुस्थानात दुय्यम शाळेत बारा-साडेबारा हजार मुली होत्या. यावरून पुण्याला दुय्यम शिक्षण घेणाऱ्या मुली किती थोड्या होत्या, हे लक्षात येईल.. कन्या शाळेत इंग्रजी पहिलीत ७० मुली असल्या तर जेमतेम ३-४ मुली मॅट्रिकपर्यंत पोहोचत. त्यात प्रौढ विधवाच जास्त. बाकी कुमारिका मुली १२-१३ व्या वर्षी शाळा सोडण्याच्या मार्गावर असत..कन्याशाळेल ज्या मुली शिक्षण घेत होत्या, त्यापैकी बऱ्याच चातुर्मासात, व्रते-वैकेल्ये म्हणून आणि एरवी घरची अडचण म्हणून शाळा चुकवीत.. मुलगी वयात येण्याआधीच लग्ने ठरविण्याची घाई असे.. मुलीची अब्रू म्हणजे काचेचे भांडे. हे भांडे जास्तीत जास्त बंदोबस्तात ठेवले जाई. फिरायला जाणे, मन मानेल तो पोशाख करणे, उडता पदर, छाती आणि पाठ दाखवीत असलेला ब्लाउझ कल्पनेतही कुणी आणला नव्हता. घरातील कामाधामाचे, सोशिकपणाचे, अबोल सेवेचे सारे शिक्षण देऊन मुलीला गृहकृत्यदक्ष केले जाई. शाळेत न जाणाऱ्या मुली किंवा स्त्रिया वाचू शकत; पण त्यांनी वाचायचे ते पोथीपुराणे, कहाण्या हे धर्मग्रंथ. खऱ्या धर्माची ओळख स्त्रीजातीला होण्याचा संभव नसे." (शिरूरकर, १९७६, पृ. दहा-अकरा) १९३० पर्यंत पुणे, नाशिक, नगरसारख्या शहरात मुलींच्या सरकारी शाळा निघाल्या होत्या; मात्र वऱ्हाडात अमरावतीलाच तेवढे एक मुलींचे हायस्कूल होते. १९३० नंतरच्या काळात हे चित्र बदलायला अंशतः सुरुवात झाली होती. तरीही संबंध हिंदुस्थानात माध्यमिक शिक्षण पूर्ण करून महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींची संख्या ९००-९२० एवढीच होती. पदवीधर शिक्षिकाही मिळत नसत. ग्रामीण भागात ८वी-९वी पर्यंत शिकलेल्या मुलींची लग्ने करून देण्याकडे प्रवृत्ती होती. शहरातही कॉलेजात जाऊन शिकणाऱ्या मुलींची संख्या नाममात्र असे. पुण्यात फर्ग्युसन कॉलेजात श्रीमंतांच्या व इंग्रज सरकारातील बड्या नोकरदारांच्या मुली कॉलेजात प्रवेश घेत. बाहेरगावच्या मुली वसतिगृहात राहात. पुण्यातल्या पुण्यात कॉलेज शिक्षणाची सोय असल्याने काही मध्यमवर्गीयांच्या मुलीही कॉलेजात जात असत. पालकांच्या गरिबीमुळे बऱ्याच मुलींना शिक्षण संपल्यावर नोकरी करून बाबांच्या संसाराला हातभार लावावा लागत असे. शिक्षणापूर्वी विधवा सासरी-माहेरी आश्रितासारखी राहात असे, ती मिळवती झाल्यावरही तिने तसेच राहावे अशी अपेक्षा असे. (कित्ता, पृ. चौदा-पंधरा)

**महिला विद्यालय :**

अण्णासाहेब कर्वे यांनी ४ मार्च १९०७ रोजी पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लकडी पुलाजवळील जुन्या वाड्यात महिला विद्यालय सुरू केले. स्थापनेच्या वेळी या विद्यालयात फक्त सहा विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला होता. "गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ज्याच्या योगाने मनावर पूर्णपणे ठसतील, व ज्याच्या योगे समाजविषयक कर्तव्यांची चांगली ओळख होऊ शकेल, असे शिक्षण देऊन आपल्या समाजात काही सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा यत्न करणे" हा महिला विद्यालय स्थापन करण्यामागचा मुख्य हेतू होता. (कर्वे,१९२८, पृ.४७५) या महिला विद्यालयाच्या स्थापनेचे हेतू स्पष्ट करणारा एक लेखही कर्व्यांनी ६ मार्च १९०७ च्या दै. 'ज्ञानप्रकाश'मध्ये प्रसिद्ध केला होता, त्याचा गोषवारा असा-

१. आश्रमाच्या धर्तीवर चालविलेल्या शाळेत बेताच्या खर्चाने मुलींचे शिक्षण होत असेल तर बरेच पालक आपल्या अविवाहित अथवा विवाहित मुलीस शिक्षण द्यावयास तयार होतील, त्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात येणाऱ्या महिलांची संख्या वाढेल. या उद्देशाने आधी सुरू असलेल्या अनाथ बालिकाश्रमाची कर्तव्यमर्यादा विस्तृत करून महिला विद्यालयाची सुरुवात करण्यात आली.
२. या महिला विद्यालयात शिक्षणाची सोय झाल्याने मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वीस वर्षांवर येण्याचे ध्येय साध्य व्हायला मदत होईल.
३. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना गृहिणीपदाची कर्तव्ये आणि सामाजिक कर्तव्यांची चांगली ओळख होईल.
४. साधे राहाणीमान, उच्च विचार व भिन्न जातिधर्माविषयी उदार मनोवृत्तीच्या धारणा निर्माण करणारा शिक्षणक्रम या महाविद्यालयातून शिकविला जाईल. उदार हिंदुधर्माचे शिक्षण देणे हेही या महाविद्यालयाचे एक महत्त्वाचे प्रयोजन असेल.

त्यानंतर कुमारिकांना चांगले शिक्षण मिळून त्यांचे त्यांचे प्रौढ वयात विवाह झाल्याची उदाहरणे समाजापुढे यावीत या हेतूने अण्णासाहेब कर्व्यांनी ब्रह्मचर्यफंडाची कल्पना आणली.

**महिला विद्यापीठाची स्थापना :**

महिला विद्यापीठ स्थापन करण्याची प्रेरणा अण्णासाहेब कर्व्यांना जपानच्या महिला विद्यापीठांपासून मिळाली होती. जपान आणि हिंदुस्थानाची सामाजिक व शैक्षणिक स्थिती एके काळी सारखीच होती. पण पाश्चिमात्यांच्या संपर्कात आल्यावर जपानने युरोप-अमेरिकेत विद्यार्थी पाठवून पाश्चिमात्य विद्या, कला, शास्त्रे, वाङ्‌मय जपानी भाषेत आणले, नवी विद्यापीठे स्थापन केली. या ज्ञानसंवर्धनाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या तुलनेत

महिला मागे राहू नयेत म्हणून इ. स. १९०० साली महिला विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रयोग केला. स्त्रीदास्यविमोचन किंवा पुरुषांच्या विद्यापीठांतील अभ्यासक्रमांशी स्पर्धा करणे हे जपानी महिला विद्यापीठाचे ध्येय नव्हते. स्त्रियांना आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाची जाणीव व्हावी, गृहिणी व माता म्हणून त्यांच्या कामाचे राष्ट्रीय मूल्य लक्षात घेऊन सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता त्यांना संपादित करता यावी, आपल्या प्रापंचिक जीवनाचा राष्ट्रोन्नतीशी असलेला थेट अनुबंध त्यांना समजावा या हेतूने या वेगळ्या महिला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती. स्त्रियांची विशिष्ट शरीररचना, स्त्रियांमध्ये सापेक्षतेने अधिक असलेले आनुकंपिक तंतुजालाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठीय शिक्षणात महिलांसाठी खास वेगळे अभ्यासक्रम तयार करण्यात आले होते. १९१५ साली कर्व्यांना या जपानी महिला विद्यापीठाची माहिती मिळाली. आपल्याही देशातील महिलांना पुरुषांच्या बरोबरीने राष्ट्रोन्नतीच्या पर्वात सहयोग देता यावा, राष्ट्राच्या स्थैर्याला व प्रगतीला आवश्यक असा स्त्रियांचा वर्ग निर्माण करता यावा या हेतूने एका नव्या भारतीय महिला विद्यापीठाच्या स्थापनेचा संकल्प त्यांनी सोडला. १३ फेब्रुवारी १९१६ रोजी "भारतवर्षीय महिला विद्यापीठ' स्थापन झाले. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे पहिले कुलपती, डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे पहिले कुलगुरू होते. सिनेटच्या सभासदांत वा. म. जोशी, वा. गो. मायदेव, ना.के. बेहेरे, न. चिं. केळकर, गो. चिं. भाटे, दि. धों. कर्वे, मुकुंद जयकर, ग. ह. केळकर, य. रा. दाते अशी प्रथितयश मंडळी होती. दरसाल दहा रुपये देऊन म. गांधीही विद्यापीठाचे मतदार बनले होते.

महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची खरोखरच आवश्यकता आहे का याविषयी त्या काळात बरेच उलटसुलट विचारमंथन झाले. विश्वविद्यालयीन शिक्षणव्यवस्थेत स्त्री-पुरुषांचे सहशिक्षण हे तत्त्वत: निर्दोष असताना महिलांसाठी वेगळे विद्यापीठ काढणे हे कितपत योग्य आहे? एकीकडे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करून देण्याची चळवळ चालू असताना महिलांसाठी वेगळे विद्यापीठ स्थापन करणे, हे एक पाऊल मागे घेण्यासारखेच नाही काय? असे प्रश्न उपस्थित करून 'इंडियन सोशल रिफॉर्मर' या पत्रातून विद्यापीठाच्या प्रस्तुततेविषयी प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. स्त्री-पुरुषांसाठी वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची गरज नाही, हा त्यातला एक महत्त्वाचा मुद्दा होता. मात्र केवळ स्वावलंबी बनवणे अथवा आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणे हा नव्वद टक्के मुलींच्या शिक्षणाचा हेतू नसतो, हे लक्षात घेऊन स्त्रियांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम काय असावा याविषयी विविध बाजूंनी विचार करण्याला अण्णासाहेब कर्व्यांनी प्राधान्य दिले होते. स्त्रियांच्या अंगी बहुश्रुतपणा येण्याच्या दृष्टीने कोणते शिक्षण अधिक परिणाकारक होईल?, कुटुंबाच्या व समाजाच्या उपयोगी पडण्याची पात्रता कोणत्या शिक्षणाने अधिक येईल?, मातृभाषेतून शिकलेले प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र व

शिशुमानसविकासशास्त्र हे विषय कितपत उपयोगी पडतील?, महिलांना शिक्षण घेऊन आपल्या पायावर उभे राहता येईल का? कोणत्या शिक्षणाने स्त्रियांच्या शरीरावर वाईट परिणाम होण्याची भीती अधिक आहे? या प्रश्नांचा विचार करण्यात आला. (कर्वे, १९२८, पृ. ५८८) मुंबई विद्यापीठातून बाहेर पडलेल्या पदवीधर स्त्रियांना सरकारी वा खाजगी नोकरी मिळणे कठीण होऊ लागले होते. हे लक्षात घेऊन ह्यापुढे शिकलेल्या स्त्रियांमध्ये बेकारी उत्पन्न होऊ शकते हेही कर्व्यांनी लक्षात घेतले होते. राजमान्य विद्यापीठापेक्षा आपल्या विद्यापीठाची वेगळी वाट ठरविताना त्यांनी जो विचार केला होता, त्याविषयीचे मनोगत त्यांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद करून ठेवले आहे. त्यात म्हटले आहे की :

"राष्ट्राच्या प्रगतीचे विचार जसे पुरुषांच्या तसेच स्त्रियांच्याही अंत:करणात घोळत असले पाहिजेत. हे विचार उत्पन्न होऊन त्यांचा परिपोष होण्यास इंग्रजीसहित अथवा इंग्रजीविरहित माध्यमिक शिक्षण तरी मिळाले पाहिजे. ह्या शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर करण्याचे ध्येय स्त्रियांच्या विद्यापीठांनी ठेवले पाहिजे. ह्या शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या शाळांसाठी शिक्षकिणी पाहिजेत, त्या ह्या विद्यापीठांनी चालविलेल्या कॉलेजांत शिक्षण घेऊन तयार झाल्या पाहिजेत. आयुर्वेदाच्या (पाश्चात्य व पौर्वात्य ज्ञानाच्या मिलाफाने झालेल्या) शिक्षणाचा प्रसार आपल्या स्त्रीवर्गात होणे अत्यंत जरूर आहे व महिला विद्यापीठांत वाङ्मयात्मक विद्याशाखेप्रमाणे आयुर्वेदिक विद्याशाखेचाही समावेश झाला पाहिजे." (कर्वे,१९२८, पृ. ६१६-६१७) गणित व शास्त्रीय विषय हे दोन ऐच्छिक विषय घेऊन महिला विद्यापीठाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनींना वैद्यकीय स्कूलात प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली. प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र व समाजशास्त्र हे विषय सर्व परीक्षांस आवश्यक ठेवण्यात आले. गायन-वादन-चित्रकला यांचा अभ्यासक्रमांत समावेश करण्यात आला. वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीररचनाशास्त्र, इंदियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र, मुलांच्या मनोव्यापाराची मीमांसा या विषयांची मूलतत्त्वे शिकविली जाऊ लागली. मातृभाषेतून शिक्षण देण्याची नीती ठरविण्यात आली. भारतीय पातळीवर विद्यापीठाची कार्यकक्षा असल्याने मराठीबरोबरच गुजराती, हिंदी, बंगाली, सिंधी, उर्दू यांना बोधभाषा म्हणून मान्यता देण्यात आली. विद्यापीठात सर्व जाती-धर्मांच्या लोकांना प्रवेश दिला जात असे. बी. ए. पदवी संपादित करणाऱ्या स्त्रियांना 'गृहिलगामा' पदवीने संबोधित केले जाऊ लागले.

बनारसच्या हिंदू विद्यापीठाप्रमाणे महिला विद्यापीठाच्या उद्देशपत्रिकेत धर्मशिक्षणाचा स्पष्ट उल्लेख नसल्याबद्दल न. चिं. केळकर यांनी टीका केली होती. विशेषत: स्त्रियांच्या शिक्षणात धर्मशिक्षणाची उपेक्षा करता येणार नाही, असा केळकरांचा मुद्दा होता. हे विद्यापीठ सरकारच्या ताब्यात जाऊ नये यासाठी विद्यापीठाचे नियामकत्व सर्वस्वी लोकांच्या ताब्यात राहील असाही एक कायमचा नियम असायला हवा अशी तात्यासाहेब

केळकरांची सूचना होती; अन्यथा सरकारी अनुदानांच्या मिषाने अशा विद्यापीठांचे सरकारीकरण होण्याचा धोका असतो, असा इशारा त्यांनी दिला होता. (केळकर, १९२५, पृ. ४६)

महिला विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर पहिल्या पाच वर्षांत पदवी घेऊन बाहेर पडलेल्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर नजर टाकल्यास या विद्यापीठाच्या यशाची व वेगळेपणाची कल्पना येते. १९१९ साली वारुबाई शेवडे ही पहिली पदवीधर स्त्री हिंगण्याच्या महिला आश्रमाच्या वसतिगृहात पर्यवेक्षकपदी रूजू झाली. १९२० साली पदवीधर झालेल्या कमलाबाई देशपांडे यांनी साताऱ्याला कन्याशाळा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला व तेथेच त्या शाळेच्या पर्यवेक्षक म्हणून काम करू लागल्या. जिल्हा बोर्डाच्या स्कूल कमिटीच्या सदस्य म्हणूनही त्यांनी योगदान दिले. गंगूबाई पटवर्धन यांनी पदवी संपादन केल्यानंतर मिस मॉंटेसरी यांच्याकडून शिक्षण घेण्यासाठी लंडनला प्रयाण केले; तेथे मारिया ग्रे कॉलेजात त्यांनी शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. १९२१ साली पदवीधर झालेल्या गोदावरी केतकर साताऱ्याच्या कन्या शाळेत सुपरिटेंडेंट म्हणून रूजू झाल्या. त्यांनी नंतर 'भारतीय नाट्यशास्त्रा'वर प्रबंध लिहून याच विद्यापीठाची 'प्रदेशगामा' ही पदव्युत्तर पदवी संपादित केली. १९२२ साली पदवीधर झालेल्या आनंदीबाई जोशी यांनी रत्नागिरीला कन्या शाळा सुरू केली. दुर्गाबाई जोशींनी अकोल्याच्या भगिनी मंडळाचे नेतृत्व केले. शांताबाई भाटवडेकर नागपूरच्या भिडे कन्याशाळेत पर्यवेक्षक झाल्या. दिल्लीच्या अ. भा. शिक्षणपरिषदेतही त्यांनी नागपूरचे प्रतिनिधित्व केले. १९२३ साली पदवीधर झालेल्या बाळूताई खरे पुण्याच्या नाथीबाई ठाकरसी कन्या शाळेच्या पर्यवेक्षकपदी रूजू झाल्या; त्यानंतर त्यांनी याच विद्यापीठात 'अलंकारशास्त्र' या विषयात प्रबंध लिहून 'प्रदेशगामा' ही पदव्युत्तर पदवी संपादित केली. बाळूताई खरे यांनी विवाहानंतर विभावरी शिरूरकर व मालतीबाई बेडेकर या नावाने कथा-कादंबरी-नाट्यलेखन करून नावलौकिक मिळवला. १९२३ सालीच पदवीधर झालेल्या बनूबाई आहो यांनी बेळगावला महिला विद्यालय स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. सुशिलाबाई धनेश्वर व यमुनाबाई राजवाडे या १९२६ च्या पदवीधर महिलाही बेळगावच्या शाळेत रूजू झाल्या. मुंबई विद्यापीठातून पदवीधर झालेल्या बऱ्याच स्त्रिया सरकारी शाळांत काम करीत होत्या; कर्व्यांच्या महिला विद्यापीठातील पदवीधर स्त्रिया मात्र खाजगी शाळांत स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर काम करीत होत्या. नव्याने स्थापन झालेले हे महिला विद्यापीठ नवशिक्षित स्त्रियांना राष्ट्रकार्यासाठी कसे प्रेरित करीत होते, याची ही उदाहरणे आहेत.

अण्णासाहेब कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी जे संस्थात्मक पातळीवर काम उभे केले, त्याचे सामाजिक-सांस्कृतिक पैलू लक्षात घेण्याजोगे आहेत. गावोगावी व्याख्याने देऊन

त्यांनी लक्षावधी मध्यमवर्गीयांच्या मनात महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व जागवले. लोकवर्गणीतून निधी संपादित करून अनाथ बालिकाश्रमापासून महिला विद्यापीठापर्यंत स्थायी स्वरूपाची संस्थात्मक यंत्रणा उभी केली. स्त्रियांचे जसे देवाला फुलांची लाखोली वाहायचे किंवा लक्ष प्रदक्षिणा घालण्याचे व्रत असते, तसे कर्व्यांनी एक लक्ष देणगीदारांपर्यंत पोहचण्यासाठी भारतभ्रमण करण्याचा संकल्प सोडला होता आणि त्यासाठी महाराष्ट्राखेरीज पंजाब, बिहार, बंगाल, ओरिसा इत्यादी प्रांतातून जवळपास अकरा वर्षे भटकंती केली होती. महिला विद्यापीठाच्या उभारणीसाठी त्यांनी १९२१ ते १९२७ या सात वर्षांत १८७३ दिवस प्रवास केला व १९१२६ लोकांकडून वर्गण्या मिळवल्या. त्यात पाच रुपयांपर्यंत वर्गणी देणारे १४२९९ दाते होते आणि पाच रुपयांपेक्षा अधिक वर्गणी देणारे ४८२७ दाते होते. अशा प्रकारे सात वर्षात १९१२६ लोकांना समक्ष भेटून कर्व्यांनी निधी संकलित केला. मुंबई, पुणे, अमळनेर, नागपूर, वर्धा, अमरावती, अहमदाबाद, सुरत, पोरबंदर, बनारस, कराची, हैद्राबाद, इत्यादी ठिकाणच्या मध्यमवर्गीयांनी उदारहस्ते देणग्या देऊन या उपक्रमाचे स्वागत केले. (कर्वे, १९२८, पृ. ६०७) या मध्यमवर्गीय वर्गणीदारांखेरीज काही श्रीमंतांनीही उदारहस्ते अर्थसाहाय्य केले. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी १,८६००० रुपये बिनव्याजी कर्ज दिले. शेठ मूळराज खटाव यांनी महिला विद्यापीठात वसतिगृह बांधण्याकरिता एक लाखांहून अधिक रकमेची देणगी दिली. नागपूरच्या विठ्ठल राघोबा लांडे यांनी ४०,००० रुपयांची देणगी दिली. सर रतन टाटा ट्रस्ट, एन. एम. वाडिया ट्रस्ट यांनी प्रत्येकी चार हजारांची देणगी दिली. सर विल्यम वेडरबर्न यांनी लंडनला स्थापन केलेल्या 'इंडिया बेनिफिट फंडा'तून आश्रमाला दीडशे पौंड व विद्यापीठाला शंभर पौंड देणगी पाठविली. अमेरिकेतील आना एन. डेव्हिस बाईंनी विद्यापीठास मोटारबस भेट दिली. मराठी संस्थानिकांनीही या कामासाठी आपापल्या परीने अर्थसाहाय्य करून उत्तरदायित्व निभावले. त्यात ग्वाल्हेर दरबार (६ हजार रुपये), इचलकरंजी (४,००० रुपये), सांगली, म्हैसूर, पोरबंदर संस्थान (प्रत्येकी २,००० रुपये), भरतपूर, वासदा, भावनगर, भोर, किशनगड, कुरुंदवाड, म्हैसूर, वढवाण, खंबायत, धरमपूर, लिंबडी या संस्थानांचा (प्रत्येकी एक हजार रुपये) समावेश होता. शिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या बडोदा संस्थानाने आपल्या संस्थानातून महिला विद्यापीठाचे वर्ग सुरू करण्यास संमती दिली. श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांनी स्वत: महर्षी कर्वे यांचे विद्यापीठाच्या संकल्पनेविषयीचे व्याख्यान ऐकून त्यांचा 'हिंदुस्थाचे बुकर वॉशिंग्टन' अशा शब्दांत गौरव केला. मात्र थेट आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्याऐवजी "सर विठ्ठलदास ह्या बडोदे संस्थानच्या प्रजाजनांकडून मिळणारी मदत किंवा बडोद्याच्या हायस्कूल व कॉलेजातून स्त्रियांच्या विश्वविद्यालयासाठी एकेक वर्ग सुरू केले आहेत; या विद्यापीठासाठी आम्ही आणखी मदत ती काय करायची?" असे पत्र पाठवून

रोख देणगी देण्याचे प्रयोजन नसल्याचे कळविले. (कर्वे, १९२, पृ. ६१४)

**स्त्री-शिक्षणविषयक विचार :**

पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाचा आशय वेगळा असावा का याविषयी या काळात निरनिराळ्या नियतकालिकांतून व सभा संमेलनातून चर्चा होत असत. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या शिक्षणाचे उद्देश भिन्न आहेत त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचे अभ्यासक्रमही वेगळे असावेत असे मानणारा एक वर्ग होता. पुरुषांच्या शिक्षणात त्याला कर्तव्यपरायण बनविणारा, व्यवहारचातुर्य शिकविणारा, संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य निर्माण करणारा आणि कुटुंबाच्या संरक्षणासाठी समर्थ बनविणारा अभ्यास शिकविला जायला हवा. तर स्त्रियांना मर्यादाशील वर्तनव्यवहार, बालसंगोपन व गृहकर्तव्यात कुशल बनविणारा अभ्यासक्रम शिकवायला हवा, असे या गटातील लोकांचे म्हणणे होते. (खरे, १९१६, पृ. ५३८) स्त्रियांना प्रेम, दया, श्रद्धा, सेवा, स्वार्थत्याग, जननीत्वाचे शिक्षण द्यावे व पुरुषांना धैर्य, चिकाटी, साहस, प्रयत्न आणि जनकत्वाचे शिक्षण द्यावे अशी स्त्री-पुरुष शिक्षणातली भेदरेषा मानणाऱ्यांपैकी काही लोक स्त्रीत्वाच्या भावनेबरोबरच नागरिकत्वाची भावना निर्माण करणारे सर्वांग परिपूर्ण शिक्षण दिले पाहिजे, अशा मताचे होते. (चिपळूणकर, गो. मा. १९१६) स्वातंत्र्य, समतेचा पुरस्कार करणाऱ्या पाश्चिमात्य देशातल्या स्त्रियांचा नमुनादर्श भारतीय स्त्रियांच्या बाबतीत अनुसरता कामा नये, असेही म्हणणारे लोक होते. स्त्रियांच्या बंधमुक्तीच्या चळवळीतील पाश्चिमात्य स्त्रिया सुखवस्तू घरातल्या असून आत्मप्रतिष्ठा व प्रसिद्धीसाठी त्यांनी प्रेम, दया, मार्दव या स्त्रियांच्या निसर्गदत्त गुणांना दाबून टाकून लिंगकलह मांडला आहे, असे या लोकांचे आकलन होते. भारतातल्या कुटुंबसंस्थेला धक्का पोहचू नये म्हणून या स्त्रीचळवळीच्या विचारांपासून आपले शिक्षण लांबच रहायला हवे, अशा आशयाची चर्चा या काळात पहायला मिळते. (दीक्षित, १९४१, पृ. १५५)

महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या वाटचालीत नेमके काय बदल झाले, याची कल्पना यावी म्हणून काही आकडेवारी लक्षात घ्यायला हवी. १८८१ साली स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ०.२ टक्के होते. १९२१ साली हे प्रमाण १.८ टक्क्यांवर पोहचले. १९२१ साली १२ लाख विद्यार्थिनी शिक्षणाच्या प्रवाहात आल्या होत्या. मात्र प्राथमिक शिक्षणाचा टप्पा ओलांडून माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या केवळ २६ हजार होती. महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या तर हजाराच्या जवळपासच होती. १९२१ साली मॉन्टफर्ड सुधारणा आल्यानंतर प्रांतांचे शिक्षणखाते हे भारतीय मंत्र्यांच्या हाती सोपविण्याल आले. ब्रिटिश अमदानीतील स्त्री शिक्षणाच्या मंद वाटचालीला यामुळे काही गती प्राप्त होईल अशी आशा निर्माण झाली. १९३७ साली लोकनियुक्त

मंत्रिमंडळाचा कारभार सुरू झाल्यावर स्त्रीशिक्षणाला गती मिळाली. परिणामत: १९४६-४७ साली स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ६ टक्क्यांपर्यंत वाढले. शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या मुलींची संख्या ४१ लाखांपर्यंत गेली. त्यापैकी सुमारे ६ लाख विद्यार्थिनी माध्यमिक शाळांत व २३ हजार विद्यार्थिनी महाविद्यालयापर्यंत पोहचल्या होत्या. (कामत, १९८०, पृ. ७९) स्त्री-पुरुष समतेचे मूल्य रूजवायचे असेल तर शिक्षणाचा आशय ठरविताना लिंगभेदात्मक दृष्टिकोन ठेवायला नको; मात्र १९४९ साली नेमलेल्या राधाकृष्ण आयोगाच्या अहवालात स्त्रियांनी पुरुषांचे अनुकरण न करता स्त्रियांना अनुरूप असेच शिक्षण घ्यावे अशा प्रकारचा विचार मांडला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्रीशिक्षणाचे धोरण व शिक्षणाचा आशय काय राहील याविषयी अद्याप सुस्पष्टता आलेली नव्हती.

## ५.६. मराठा शिक्षण परिषदेचे कार्य :

स्त्री शिक्षणाप्रमाणे बहुजन समाजात शिक्षण प्रसार व्हावा यासाठीही विसाव्या शतकात महत्त्वाचे कार्य झाले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मराठा समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देशाने धारवाडकर मराठा समाजाने 'मराठा विद्याप्रसारक फंड' स्थापन केला; त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाजात शैक्षणिक जाणीव जागृतीच्या कामाने वेग घेतला. १९०७ साली बडोद्याचे खासेराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली धारवाड येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून खासेराव जाधव यांनी परिषदेची उद्दिष्टे स्पष्ट करून भविष्यात करावयाच्या कृतिकार्यक्रमांची रूपरेषा सादर केली. समाजातील बाह्य शत्रूंशी झगडून आपले हक्क मिळविताना स्वत:बद्दलचा दुराभिमान गळला पाहिजे; विचारांची कसोटी हाच आपल्या वर्तनाचा आधार असला पाहिजे; मी म्हणजे समाज, देश, अखिल विश्व, अशी व्यापक भावना उत्पन्न झाली पाहिजे; ती निर्माण करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. 'मनुष्यास उन्नतावस्थेस पोहचविणारे ज्ञान संपादन करणे म्हणजे शिक्षण' अशी शिक्षणाची सुटसुटीत व्याख्या करून खासेरावांनी बौद्धिक, शारीरिक, औद्योगिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय उन्नतीसाठी शिक्षणाची कास धरणे हाच एक मार्ग असल्याचे सांगितले. सामाजिक सुधारणेसाठी व्यक्तीच्या अंगी दृढ निश्चय, उद्योगशीलता, विद्याव्यासंग, कर्तव्यनिष्ठा, धर्मबुद्धी, स्वार्थत्याग या गुणांची आवश्यकता असल्याने आपण शिक्षणाची कास धरली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. १९०८ साली मुंबईत झालेल्या परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात खासेराव जाधवांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून ही भूमिका अधिक स्पष्ट केली :"आमची शोचनीय स्थिती जावी आणि आमच्या मृतप्राय समाजात सजीवता यावी, आम्ही अत्यंत हलक्या मजुराच्या स्थितीतून डोके वर काढून

अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर शेतीची लागवड करावी, मोठमोठे कारखाने चालवावेत, नवीन शोध लावून मानव जातीच्या सुखात भर टाकणारे सत्पुरुष आमच्यात निपजावेत, सर्वसामान्य पत्रकार, वक्ते, इतिहासकार, कायदेपंडित, डॉक्टर माणसे आढळावीत. आमची उत्तम नागरिकांत गणना व्हावी व आपले उदाहरण इतरांनी घ्यावे अशी स्थिती आम्हांस यावी हीच आमची महत्त्वाकांक्षा, हेच आमचे अंतिम साध्य, हेच आमचे ध्येय आहे." (इंगवले,२०१६, पृ. १५) विश्वात्मक विचार करण्याची सवय अंगी बाणवून व्यापक राष्ट्रहिताच्या दृष्टीने उद्योजकता वाढविणे, आर्थिक-सामाजिक श्रेणी उंचावण्यासाठी ज्ञानाची कास धरणे यासाठी मराठा शिक्षण परिषदेने जनचळवळ चालवावी, ही भूमिका खासेराव जाधवांना अभिप्रेत होती.

मराठा शिक्षण परिषदेच्या माध्यमातून प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा काढणे, शालेय शिक्षणाला धंदेशिक्षणाची जोड देणे, गावोगावी शिक्षण समुपदेशक पाठवून शिक्षणाची महती पटवून देणे, शिक्षण फंड गोळा करणे अशी एक कार्यक्रमपत्रिकाही खासेराव जाधवांनी पहिल्याच परिषदेत लोकांना दिली. दुसऱ्या परिषदेत जिल्हानिहाय महत्त्वाच्या शहरात शाळा काढण्याचा ठराव पारित झाला. तसेच यांत्रिक, शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाचा पुरस्कार करण्याचे धोरण ठरविण्यात आले. सरकारच्या जाळ्यात शेतकरी अडकू नये म्हणून शेतकऱ्यांना शेतीचे शास्त्रीय शिक्षण द्यावे, ही भूमिका तिसऱ्या अधिवेशनातून पुढे आली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शेती-उद्योगधंद्याचे प्रगत शिक्षण घेण्यासाठी बहुजन समजातील विद्यार्थ्यांना परदेशी पाठविण्याचे महत्त्व सांगितले. चौथ्या अधिवेशनात शिक्षणप्रसारासाठी 'जनरल फंड' स्थापन करण्याची कल्पना पुढे आली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सव्वा लाख रुपये, बंगलोरचे बी. व्यंकटराव यांनी ४० हजार, बडोद्याचे दिवाण धामणस्कर यांनी पत्नीच्या स्मृतिप्रित्यर्थ ७५ हजार रुपये, सरदार शंभूसिंह राजे यांनी १००० रु रोख व ५०००रु. ची पॉलिसी अशा देणग्या देऊन फंडात भर घातली. (इंगवले, २०१६, पृ. ३, १३, १७ ) १९०७ ते १९५० या कालावधीत अ. भा. मराठा शिक्षण परिषदेची २८ अधिवेशने झाली. [२]

मराठा शिक्षण परिषद ही बहुजन समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आली असली तरी परिषदेची भूमिका जातिकेंद्री नव्हती. परिषदेच्या अधिवेशनात कुणालाही सहभागी होता येत असे. उदाहरणार्थ, पुण्याच्या १९१४ च्या परिषदेला रँग्लर परांजपे, ना. वा. टिळक, डॉ. भांडारकर. न. चिं. केळकर उपस्थित होते. रँगलर परांजपे यांनी तर 'मराठा' म्हणविण्यास आम्हाला सार्थ अभिमान वाटतो, असे प्रतिपादन केले. लक्ष्मीबाई टिळक यांनी परिषदेत स्त्री-शिक्षणावर निबंध वाचला. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सूचनेनुसार मराठ्यांच्या शिक्षणसंस्थेत अस्पृश्यांना प्रवेश देण्याचा ठराव करण्यात आला होता.

विदर्भात बहुजन समाजात शिक्षणाची प्रेरणा जागविण्यात मराठा शिक्षण परिषदेचा वाटा मोठा होता. १९०९ साली अमरावतीला अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अधिवेशन झाले. त्यातून प्रेरणा घेऊन वऱ्हाडातील बहुजन समाज जागृत झाला व शिक्षण घेऊ लागला. पुढे वऱ्हाडात ही परिषद वाढीस लागली. १९१४ साली शिक्षण परिषदेने सक्तीचे व फुकट शिक्षण देण्याचा ठराव केला. १९१५ साली नगर येथे अ. भा. मराठा शिक्षण परिषद झाली, तिला वऱ्हाडातील पुढारी हजर होते. जिल्हा शिक्षण फंड, खेड्यापाड्यातील शाळांसाठी क्रमिक पुस्तके, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे झाली पाहिजेत, हे विचार पुढे आले. गोदावरीबाई काळे यांनी स्त्री शिक्षणावर लिहिलेला निबंध वाचून दाखविला. सामाजिक पुर्घटनेत मराठा समाजातील स्त्रियांचा वैचारिक सहभाग वाढू लागला होता,याचे हे उदाहरण होते.

१९१७ साली खामगाव येथे श्री. छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली मराठा शिक्षण परिषद झाली. त्यात माधवराव देशमुख, यशवंत रायभान वाटाणे, खामगावकर देशमुख व यवतमाळ जिल्ह्यातील नारायण बालाजी पाटील यांचा पुढाकार होता. छत्रपती शाहू महाराजांनी या प्रसंगी अमरावतीच्या श्रीशिवाजी मराठा हायस्कूलला आठ हजारांची देणगी दिली. १९१९ साली नेर येथे बडोद्याचे शिक्षणमंत्री सरदार खासेराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली यवतमाळ जिल्हा बहुजनसमाज परिषद झाली.ना. बा. पाटील स्वागताध्यक्ष होते. या परिषदेत शिक्षण सर्वांना व्यापकपणे मिळण्याची मागणी करण्यात आली. पुढची परिषद उमरखेडला पुण्याच्या वालचंद कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली भरली. १९१९ साली ॲड. श्रीधर गोविंद सपकाळ व बॅ. रामराव देशमुख यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली बेरार मराठा एज्युकेशन सोसायटी व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटीने ग्रामीण भागात शिक्षणाच्या बाबतीत मोलाचे काम केले. १९३०-३१ साली बेरार मराठा एज्युकेशन सोसायटीने अमरावती येथे श्री. शिवाजी मराठा बोर्डिंग स्थापन केले.

## ५.७. अल्पसंख्यांकांचे शिक्षण :

महाराष्ट्रात इंग्रजी अमदानीत बहुजन समाज, आदिवासी, मागासवर्गीय जाती-जमाती, स्त्रिया हा मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित होता. १९ व्या शतकात युरोपियन व अँग्लो इंडियन अल्पसंख्यांक वर्गासाठी १८१५ साली 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' तेवढी स्थापन झाली होती. या संस्थेवर इंग्रज प्रशासनाची मेहरनजर असल्याने लाडक्या अपत्यासारखी (blue-eyed-son) या संस्थेला शासनाकडून मदतीची खैरात केली जात असे. १९२१-२२ पर्यंत महाराष्ट्रात सरकारची मेहरनजर असलेल्या अशा ४० शाळा होत्या. ४५८९ विद्यार्थी या शाळांचे लाभार्थी होते. १९४७ पर्यंत या युरोपियन शाळा

सरकारी अनुदानावर चालत होत्या. इतरेजनांच्या शिक्षणाची मात्र अशी जबाबदारी इंग्रज सरकारने आपल्यावर ओढून घेतली नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात या युरोपियनांच्या शाळांवर मेहरनजर करण्याचे नव्या सरकारने सोडून दिले व या शाळा सर्वांसाठी खुल्या करण्यात आल्या. अर्थात युरोपियन व अँग्लो इंडियन विद्यार्थ्यांना फी सवलती, प्रवेशात प्राधान्य देणे अशा गोष्टी सुरू राहिल्या.

मुस्लीम अल्पसंख्यांकांसाठी १९ व्या शतकात पर्शियन व अरेबिक भाषांतून शिक्षण देणाऱ्या बऱ्याच शाळा अस्तित्वात होत्या. मात्र या शाळांतून मुसलमान मुलींना प्रवेश दिला जात नसे. ज्या मुलींना शिकण्याची गोडी असेल त्यांना घरच्या घरी शिकावे लागत असे. मुस्लीम अल्पसंख्यांकांच्या शाळांना विशेष सवलती देण्याचे धोरण इंग्रज सरारने अंगीकारले होते. उर्दू माध्यमाच्या शाळा व शिक्षणसंस्थांना आर्थिक साहाय्य, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, शिक्षक-प्रशिक्षणाच्या सोयी, व स्वतंत्र शाळा निरीक्षक नेमण्याच्या सवलती दिल्या जात होत्या. शासनाच्या या उदार धोरणाचा लाभ बऱ्याच मुसलमानांना मिळाला. स्वातंत्र्यानंतर मात्र मुसलमान समाजाने इतर समाजबांधवांशी मिळून मिसळून राहावे, वेगळा सुभा कल्पू नये या राष्ट्रीय एकात्मतेच्या भूमिकेतून मुस्लीम शाळांचा विशेष दर्जा रद्द केला.

ख्रिश्चन व मुसलमानांखेरीज हिंदू मागासवर्गीय जाती, जमाती, भटके विमुक्त, आदिवासी व इतर मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी १९ व्या शतकात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पुढाकार घेतला होता. तो नमुनादर्श समोर ठेवून म. फुले यांनी १८५२ साली सर्वप्रथम मागासवर्गीय वंचित समुहासाठी पुण्यात शाळा सुरू केली होती. इंग्रज सरकारने मात्र हिंदूंच्या धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत अशी भूमिका घेऊन मागासवर्गीयांसाठी वेगळे शैक्षणिक औदार्य दाखविले नाही. १८५८ साली मात्र एका अध्यादेशातून सरकारी शाळांतून मागासवर्गीयांना खुला प्रवेश दिला जाईल असे धोरण जाहीर करण्यात आले. असे असले तरी १८८१-८२ पर्यंत अस्पृश्य मुले शिक्षणापासून वंचित राहिली होती. वंचित समूहातील केवळ ३,६६९ विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले होते. आदिवासींसाठी डोंगराळ भागात अल्प प्रमाणात काही शाळा सुरू झाल्या होत्या तरी शिकणाऱ्या मुलांची संख्या नगण्यच होती. धार्मिक पूर्वग्रहांमुळे मागासवर्गीयांना शिक्षणाच्या संधी नाकारल्या जातात, हे वास्तव लक्षात घेऊन १८८१-८२ साली ब्रिटिश प्रशासनाने काही खास शाळा (स्पेशल स्कूल्स) सुरू केल्या. मागासवर्गीयांतून शिक्षक नेमण्याची व्यवस्था केली. तरीही वंचित समूहातल्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नाममात्रच होता. १८८१-८२ साली फक्त १६ आदिवासी विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. १९२१-२२ पर्यंत ह्या प्रवेश संख्येत हळू हळू सुधारणा होत गेली व प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५१५, तर माध्यमिक शाळेत

शिकणाऱ्यांची संख्या २५२ आणि महाविद्यालयात शिक्षण घेणारा एकमेव विद्यार्थी अशी स्थिती होती. (वानखेडे/ भागवत, १९७७, पृ. ३३४)

अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न १८८२ साली हंटर कमिशनसमोर म. फुले यांनी उपस्थित केला होता. अस्पृश्यांची वस्ती असणाऱ्या भागात त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा काढण्याची मागणी त्यांनी केली होती. पुण्यात स्वत: फुल्यांनीच अस्पृश्यांसाठी शाळा काढली होती. मात्र इतरत्र हा प्रयोग करण्यास कुणी पुढे येत नव्हते. अपवाद बडोदे संस्थानचा होता. तिथे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८८३ पासूनच अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या होत्या. या शाळांत शिकवायला हिंदू शिक्षक मिळत नव्हते, त्यावर उपाय म्हणून मुसलमान शिक्षकांची नेमणूक करून महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणातला अडसर दूर केला होता. बडोदे संस्थानात अस्पृश्यांची संख्या १० टक्के होती; तिथे १९३३-३४ पर्यंत अस्पृश्यांसाठी ७८ शाळा होत्या. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनीही १८९४ साली गादीवर आल्यानंतर अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. १९१२ पर्यंत कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यांसाठी २७ शाळा होत्या. १९१९ साली महाराजांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळांचा निर्णय रद्द करून इतर अठरापगड जातीच्या मुलांसोबत अस्पृश्यांची मुले शिकतील असा धाडसी निर्णय घेतला व तशी राजाज्ञा प्रसिद्ध केली. १९२३ साली इंग्रज सरकारने कायदा करून सरकारी शाळांत अस्पृश्य मुलांना प्रवेश देण्याचा आदेश जारी केला होता. मात्र सर्वत्र या आदेशाचे पालन होत नव्हते.

सरकारी प्रयत्नांखेरीज लोकसेवकांनी शिक्षणप्रसारासाठी केलेल्या चळवळीमुळे वंचित समूहातले विद्यार्थी शिक्षणाच्या मध्यवर्ती प्रवाहात यायला बरीच मदत झाली. १९०६ साली विठ्ठल रामजी शिंदे यांनी *'डिप्रेस्ड क्लास मिशन'* नावाची संस्था स्थापन केली व मागासवर्गीयांच्या मुलांसाठी प्रथम परळला व नंतर इतरत्र शाळा काढल्या. या प्रयत्नाला यश मिळून बरीच मागासवर्गीय मुले शिकू लागली. अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न जरठ सामाजिक समजुतींमुळे किती किचकट होता याचा अनुभव विठ्ठल रामजी शिंदे यांना आला होता. अस्पृश्य जातीतील अंतर्गत अस्पृश्यतेमुळे आपली मुले या नव्या शाळांमध्ये घालायला ते तयार नसत. महर्षी शिंदे यांनी यासंदर्भातला आपला अनुभव नोंदवला आहे, त्यावरून तत्कालीन सामाजिक धारणा आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यांच्यातला गुंता लक्षात येतो :

"महार, चांभार आणि मांग या तीन मानवी अस्पृश्य जाती एकमेकांस अगदी पाण्यात पाहात असतात... आम्ही जेव्हा भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीच्या शाळा उघडल्यात तेव्हा अगदी प्रथम त्यात तर कोणीच येईचना; कारण तेव्हा शाळेत नियमितपणे जाण्याची सवय ह्या लोकांमध्ये अगदी क्वचित होती. पण पुढे लवकरच महार

अगोदर येऊ लागले. पण तेवढ्याच कारणावरून आमचे हे मिशन महार, मांग, चांभार ह्यांचा सबगोलंकार करणारे असेल अशा संशयावरून चांभार येईनासे झाले."(Keer, p. 36)

बॅ. वि. दा. सावरकर यांनी १९२५ साली रत्नागिरी जिल्ह्यात अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांसोबत सरमिसळ बसविण्याची चळवळ चालविली होती. त्यावेळी शाळांमध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणाची काय स्थिती होती, याविषयीचे निरीक्षण नोंदविताना त्यांनी लिहिले आहे : " साऱ्या जिल्ह्यात शाळाशाळांतून अस्पृश्य मुले कुठे गडग्याच्या, कुंपणाच्या भिंतीपाशी, उघड्यावर, तर कुठे बाहेरच्या ओट्यावर किंवा पडवीच्या कोपऱ्यात दडपलेली. त्यांच्या पाट्यापेन्सिलीस मास्तरही शिवत नसत. काही मास्तर त्या मुलांना मारावयाचे तरी छडी फेकून मारीत!.. स्वत: रत्नागिरीत व मालवणला एकही शाळा सरमिसळ नसे." (सावरकर,१९६४,पृ.९६) सावरकरांनी रत्नागिरी हिंदू सभेच्या माध्यमातून स्पृश्यास्पृश्य मुलांच्या सरमिसळ शाळेची चळवळ हाती घेऊन दापोली, खेड, चिपळूण, कणकवली, फोंडा अशा साठ-सत्तर गावात फिरून लोकमत संस्कारित करण्याचे प्रयत्न केले. १९२३ चा सरकारी कायदा लागू करण्याचा निर्णय जिल्हा लोकल बोर्डाने घेतला नव्हता. हा कायदा लागू करण्यासाठी त्यांनी लोकल बोर्डाचे अध्यक्ष जनुभाऊ लिमये यांना पटवून १९२८ साली लोकल बोर्डाच्या शाळांतून अस्पृश्यता न पाळण्याचा आदेश काढायला लावला. अस्पृश्य मुलांना शाळेत नेण्यासाठी पोलीस संरक्षणाची मागणी केली. पूर्वास्पृश्यांना भेदभावाने वागविणाऱ्या शाळांचे अनुदान बंद करण्याची मागणीही सावरकरांनी केली. अशा सर्व प्रयत्नांतून रत्नागिरी जिल्ह्यातील २०० पैकी १२० शाळांतून मुले सरमिसळ बसविण्यात यश मिळाले. (मोरे, २०१५, पृ. १२६) अस्पृश्यांच्या शाळा प्रवेशाबाबत सावरकरांनी आपले अनुभव नोंदवले आहेत; त्यापैकी एका अनुभवाच्या नोंदीत ते म्हणतात, " ज्यांच्या मुलांसाठी ही धडपड, ते अस्पृश्यच मुले धाडण्यास सिद्ध नसत.. कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्वच कळेना. आईबापांस तीन तीन रुपये पगार देऊन, पाट्या पेन्सिली फुकट देऊन, कपडे देऊन महार, चांभार, भंगी मुले शाळांतून बळेबळे बसवावी लागत. पावसाळ्यात त्यांनी म्हणावे, 'छत्र्या द्या, शाळेत मुले धाडतो.' त्याप्रमाणे सभेने छत्र्या द्याव्या; त्या हातात पडल्या की, लगेच त्या अस्पृश्य मुलांनी गुंगारा द्यावा." (सावरकर, १९६४/२,पृ.५९७) अस्पृश्यांच्या शिक्षणाची मोहीम चालवताना स्पृश्यास्पृश्यतेविषयीच्या पारंपरिक समाजधारणा आणि वंचित समाजाला मुळातच शिक्षणाचे महत्त्व न वाटणे अशा दुहेरी पेचातून मार्ग काढावा लागत होता.

साताऱ्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली, तिलाही उत्तम प्रतिसाद मिळाला. शिक्षणप्रसाराच्या सामाजिक कार्याची प्रेरणा त्यांना

स्वानुभवातूनच प्राप्त झाली होती. भाऊराव पाटलांचे शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलात व छत्रपती शाहू महाराजांच्या प्रोत्साहनातून सुरू झालेल्या जैन बोर्डिंगमध्ये राहून झाले होते; जैन वसतिगृहातला मुकटे नेसून जेवण्याचा कर्मठपणा त्यांना मानवला नव्हता. छत्रपती शाहूंनी १९०८ साली कोल्हापुरातील रविवार पेठेत अस्पृश्यांसाठी वसतिगृह काढले, त्याच्या उद्घाटन समारंभातील महाराजांच्या जातिनिरपेक्ष भूमिकेचा संस्कार त्यांच्या मनावर उमटला. या प्रेरणेतून १९०८ साली वाळवे तालुक्यातील दुधगाव या लहानशा गावात त्यांनी विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी आश्रम' नामक अभ्यासिका सुरू केली व १९१० साली तिथेच वसतिगृह काढून ग्रामीण भागातील वंचित मुलांच्या शिक्षणासाठी काम करायला सुरुवात केली. (जाधव रमेश, २०१०, पृ. ४९). २५ सप्टेंबर १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काले येथे सत्यशोधक समाजाच्या परिषदेत त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी 'रयत शिक्षण संस्था' स्थापन करण्याचा ठराव मांडला. त्या ठरावाप्रमाणे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर 'रयत शिक्षण संस्था स्थापन होऊन सर्व जातीय मुलांसाठी काले येथे वसतिगृह सुरू करण्यात आले. त्याच वर्षी कालेगावच्याजवळ धोंडेवाडीत रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा आणि प्रौढांसाठी रात्रशाळा सुरू करण्यात आली. त्यानंतर ७ ऑक्टोबर १९२४ रोजी भाऊरावांनी साताऱ्याला सोमवार पेठेतील स्वत:च्या घरातच महार मुलाला प्रवेश देऊन वसतिगृह सुरू केले. किर्लोस्कर कंपनीतल्या सेवेतली बचत व पत्नीचे स्त्रीधन मोडून वसतिगृह चालविले जात होते. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी म. गांधींनी या वसतिगृहास भेट दिली व त्याचे नामकरण "श्री छत्रपति शाहू बोर्डिंग हाऊस' असे करण्यात आले. या समारंभात संस्कृतात पहिल्या आलेल्या लक्ष्मण बाबाजी भिंगारदेवे या मांग विद्यार्थ्यास महात्मा गांधींनी आपल्या गळ्यातील पुष्पहार घालून भाऊराव अण्णांच्या प्रयोगाला शुभेच्छा दिल्या. सर्व जातीतली मुले एकत्र राहून शिक्षण घेतात याचे गांधीजींनी तोंड भरून कौतुक केले. (जाधव रमेश, २०१०, पृ. ११७) पुढल्या वीस वर्षांत त्यांनी अनेक ठिकाणी वसतिगृहे काढली. या वसतिगृहांत महार, मराठा, मांग, मराठेतर जातीतील मुले एकत्र राहू लागली. ज्या काळात स्पृश्य-अस्पृश्यांची सरमिसळ शाळेत चालवून घेतली जात नव्हती, त्या काळात ही सर्वजातीय मुले शिक्षणासाठी वसतिगृहात एकत्र राहू लागली, सहभोजन करू लागली, ही अपूर्व घटना होती. भाऊराव पाटलांची 'कमवा आणि शिका' योजना ही महाराष्ट्रातील शिक्षणप्रसाराला स्वावलंबनाचे मूल्यभान देणारी एक अभिनव कल्पना होती. विद्यार्थ्यांनी शारीरिक कष्ट करून आपल्या शिक्षणासाठी होणारा खर्च आपणच मिळवावा अशी ही योजना होती. या योजनेतून भाऊरावांनी पडीक जमिनी घेऊन तिला उपजावू बनविण्यात विद्यार्थ्यांची श्रमशक्ती उपयोगात आणली. शेतकऱ्यांच्या मुलांनी स्वावलंबनातून आर्थिक विकास कसा करावा याचा हा वस्तुपाठ

होता. भाऊराव पाटलांनी आग्र्याजवळच्या दयाळबागला ग्रामोद्योग आणि कुटिरोद्योगाच्या उत्पन्नातून चालविल्या जाणाऱ्या शाळेचा प्रयोग व रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनातला स्वावलंबी शिक्षणाचा श्रेयनिकेतनचा प्रयोग यांचा अभ्यास करून तसे प्रयोग रयत शिक्षण संस्थेत राबविले. श्रमाच्या मोबदल्यात मोफत शिक्षण देण्याच्या या प्रयोगास बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांनी १९३७ साली ४,००० रुपयांची देणगी देऊन गौरविले होते. वसतिगृहांच्या यशस्वी प्रयोगाबरोबरच त्यांनी सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात शंभर-दोनशे उंबऱ्याच्या गावातही प्राथमिक शाळा उघडण्यास सुरुवात केली. गावकऱ्यांनी शिक्षकांना जीवनावश्यक वस्तू पुरवाव्यात आणि शिक्षकांनी बदल्यात मुलांना शिकवायची जबाबदारी घ्यायची अशी पारंपरिक संस्कृतीत रूळलेली पद्धत भाऊराव पाटलांनी पुनरुज्जीवीत केली. सुमारे ५०० शाळांपर्यंत ही संख्या गेली. रयतेने रयतेसाठी चालविलेली शिक्षणसंस्था या भूमिकेतून भाऊराव पाटलांनी ह्या संस्थेची कार्यसंस्कृती घडविली. शाळेत स्पृश्य-अस्पृश्य सर्व जातीतले शिक्षक नेमण्याची काळजी घेतली. पुण्याला भाऊराव पाटलांनी सुरू केलेल्या 'युनियन बोर्डिंग हाऊस'मधील अनुभव नोंदवताना शंकरराव खरात यांनी लिहून ठेवले आहे की, "या आमच्या वसतिगृहात महार, मराठा, न्हावी, धनगर, कोष्टी, मुसलमान असे विविध जातिधर्मातील विद्यार्थी एकदिलाने एकत्र जीवन जगत होते. राहात होते. आम्ही एकाच कुटुंबातील माणसांप्रमाणे एकत्र जीवन जगत होतो. .. आम्ही सर्व जण जातपात विसरलेलो होतो. एका ताटात बसून आम्ही जेवत होतो. एकाच्या तळहातातील भाकरी आम्ही एकेक तुकडा मोडून खात होतो. या बोर्डिंगात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जात-पात नष्ट करणारी, अस्पृश्यता नष्ट करणारी खरी मूलभूत क्रांतीच घडवून आणली होती." (खरात, १९८१, पृ. ३२-३३) या शिक्षण संस्थेची शासकीय नोंदणी करण्यासाठी रावबहादूर काळे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन रयत शिक्षण संस्थेची घटना तयार करण्यात आली व २५ एप्रिल १९३५ रोजी शासकीय नोंदणी करण्यात आली. १९३५ साली भाऊराव पाटील यांनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'सिल्वर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेज' सुरू केले.

१९३८ साली मुंबई सरकारने वि. द. घाटे यांच्या देखरेखीखाली ज्या गावात शाळा नाही, तेथे कुणाही व्यक्ती अथवा संस्थेने शाळा सुरू केल्यास अर्थसाहाय्य देण्याची 'रयत साक्षरता चळवळ' सुरू केली. ते लक्षात घेऊन भाऊराव पाटलांनी 'गाव तेथे शाळा' हा आपला स्वयंसेवी शाळांचा प्रस्ताव मुंबई सरकारला सादर केला. ज्या गावात शाळा नाही तेथे शाळा सुरू करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचा पगारी शिक्षक जाईल; २ वर्षे या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकाला संस्थेच्या खर्चाने प्रशिक्षणासाठी पाठवविले जाईल, शाळेस सुरुवातीला पाट्या, पेन्सिली, शालेय स्टेशनरी व फर्निचरसाठी ८० रुपयांची तरतूद केली जाईल; गावाने शाळेला जागा व शिक्षकाच्या राहाण्या-जेवणाची व्यवस्था

करायची अशी ही योजना होती. २५ ऑगस्ट १९३९ रोजी शासनाने ही योजना मंजूर केली. या योजनेतून ६१ स्वयंसेवी शाळा सुरू झाल्या, २१६९ विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला. १९४९-५० पर्यंत स्वयंसेवी शाळांची संख्या ५७८ व विद्यार्थीसंख्या २५,००० पर्यंत गेली. (जाधव,२०१०,पृ.१४६-१४८) रयत शिक्षण संस्थेने शिक्षक प्रशिक्षणासाठी अध्यापक विद्यालये काढली. बालगुन्हेगारांसाठी 'सुधार शाळा' काढल्या. १९४७ साली साताऱ्यास छत्रपती शिवाजी महाविद्यालय स्थापन केले. अनेक शिक्षकांना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवविले व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा समाजातील तळागाळापर्यंत प्रसार करण्यासाठी एक नमुनादर्श घालून दिला.

महात्मा गांधींच्या हरिजन सेवक संघानेही पुढाकार घेऊन मागासवर्गीयांच्या शिक्षणाची अशी मोहीम चालविली होती. १९३०-३१ साली शासनाने मागासवर्गीयांच्या शिक्षणाची व्याप्ती वाढविण्यासाठी वेगळा शिक्षण विभाग सुरू केला. या सर्व प्रयत्नांमुळे १९२१-२२ साली शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या ५५,८०३ होती, ती १९३६-३७ सालात १,४४,६८४ पर्यंत पोहचली. (वानखेडे/भागवत, १९७७, पृ. ३३४) वंचित गटातल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी असे सर्वांगीण प्रयत्न सुरू झाल्यावर शासनाने केवळ मागासवर्गीयांसाठी सुरू केलेल्या विशेष शाळा बंद केल्या. महाराष्ट्रात मेळघाट, चांदा, कुलाबा, नाशिक, खानदेशात सुमारे २४ लाख आदिवासी रहातात. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ही संख्या ६.०६ टक्के इतकी आहे. त्यामुळे भिल्ल, कोरकू, वारली, कातकरी इत्यादी आदिवासींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्नांची गरज होती. यानंतरच्या काळात आचार्य भिसे आणि अमृतलाल ठक्कर यांनी आदिवासी भागात शाळा सुरू केल्या. नाशिकच्या दादासाहेब बीडकर यांनी डांग सेवा मंडळाच्या माध्यमातून डांग भागातील आदिवासींसाठी आश्रम शाळा सुरु केल्या. डॉ. आंबेडकरांनी मुंबईस सिद्धार्थ महाविद्यालय व औरंगाबादेस मिलिंद महाविद्यालय स्थापन करून वंचित गटातल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी खुल्या केल्या. स्वातंत्र्योत्तर काळातही 'आश्रमशाळा' व 'संस्कारकेंद्रां'च्या माध्यमांतून वंचित गटांच्या दारापर्यंत शिक्षण नेण्याचा कसोशीने प्रयत्न सुरू झाला.

## ५.८. गांधीजींची 'बुनियादी तालीम' :

गांधीजींना अभिप्रेत असलेल्या 'बुनियादी शिक्षणा'ची संकल्पना 'वर्धा शिक्षण योजना' किंवा 'नई तालीम' या नावानेही ओळखली जाते. १९२१ साली विनोबा भावे यांना गांधीजींनी साबरमतीहून वर्ध्याला 'सत्याग्रहाश्रमा'चे संचालक म्हणून पाठविले होते. जमनालाल बजाज यांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या या आश्रमात विनोबांनी 'मूलोद्योग शिक्षणा'चा प्रयोग सुरू केला. शारीरिक श्रम हा आश्रमातील शिक्षणपद्धतीचा पाया होता.

विणकाम, सुतारकाम, शेती, गोसेवा हे या शिक्षणाचे अंगभूत घटक होते. केवळ अक्षरज्ञानावर भर देणारे शिक्षण विनोबांना अभिप्रेत नव्हते. बडोद्याला असताना विनोबांनी विजापूरकरांची राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना व समर्थ विद्यालयातील उद्योग शिक्षणाचा प्रयोग यांची माहिती घेतली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्याला शिक्षणाची प्रयोगशाळा बनविले होते. कलाभवनात औद्योगिक शिक्षणावर आणि प्राथमिक शिक्षणात ग्रामोद्योग व कृतिशिक्षणावर महाराजांचा भर होता. विनोबांचे वडील नरहर शंभुराव भावे बडोद्याच्या कलाभवनमध्ये कापड उद्योगासाठी लागणारे रंगविद्येचे शिक्षण घ्यायला आले होते. विनोबांनी १९१३ ते १९१५ या काळात आपल्या बडोद्याच्या वास्तव्यात विद्यार्थी मंडळात स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा याविषयी वाचन, विचारमंथन व संघटन या मुद्द्यांवर भर दिला होता. लोकांचे दळण दळून, कपडे धुवून, भाजी विकून पैसे उभे करून त्यांनी वाचनालय सुरू केले होते. १९१६ साली काशीला बनारस विद्यापीठात झालेल्या महात्मा गांधींच्या भाषणाने विनोबा प्रेरित झाले. त्यानंतर लगेचच ते गांधीजींच्या कोचरब आश्रमात दाखल झाले. पुढे गांधीजींनी वर्ध्याच्या आश्रमाची जबाबदारी सोपविल्यावर विनोबांनी तिथे मूलोद्योगी शिक्षणाचा प्रयोग सुरू केला. साक्षरतेपेक्षा सार्थकतेवर भर देणाऱ्या या शिक्षणपद्धतीविषयी स्वत: विनोबांनीच एका पत्रात म्हटले आहे की, "केवळ निर्बुद्धाला धंदेशिक्षण द्यावे अशी माझी दृष्टी नाही. अल्प अथवा विशाल बुद्धीच्या सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण स्वावलंबनशक्ती, नैतिक वळण आणि सेवावृत्ती निर्माण होईपर्यंत एखाद्या तासापलीकडे अक्षरशिक्षण देऊच नये. त्यानंतर हवे असेल त्याला केवळ अक्षरशिक्षणच नव्हे पण अक्षरद्वारा बौद्धिक शिक्षण भरपूर द्यावे, अशी माझी पद्धत आहे. या पद्धतीमुळे भाराभर विद्यार्थ्यांवर केला जाणारा निरर्थक परिश्रम टळतो. काही विद्यार्थ्यांचा आजीवन संबंध जडतो, राष्ट्राला स्वावलंबी सेवक लाभतो. आणि जिव्हाळ्याचा – ज्याला उपमा देता येत नाही असा गुरु-शिष्य संबंध निर्माण होतो. काही मुले अथवा त्यांचे आईबाप ह्या प्रारंभिक चार-दोन वर्षांच्या तपस्येला कंटाळतात आणि संगती सोडतात. पण मी ती इष्टापत्ती समजतो. ह्या पद्धतीमुळे चारदोन मुले निराशही झाली आहेत. पण एकंदरीत माझ्या श्रमाचा अपव्यय न होता समर्थ साहायक व सेवक मला आणि राष्ट्राला पाच-पंचवीस मिळाले आहेत. ह्या प्रत्यक्ष फलितामुळे माझे हे शिक्षणविषयक विचार जे मुळातच दीर्घ चिंतनावर उभे राहिले आहेत ते प्रत्यक्षानेही दृढ होतात." (बापट,२००२, पृ.७८) विनोबांनी वर्ध्याला मूलोद्योग शिक्षणाचे जे प्रयोग व संशोधन चालवले होते, त्यातूनच गांधीजींच्या 'बुनियादी तालीम' या शिक्षणपद्धतीचा पाया रचला जात होता. गांधीजींच्या उत्स्फूर्त प्रयोगांना व चिंतनाला तात्त्विक अधिष्ठान देण्याचे काम विनोबा करीत असत. आचार्य स. ज. भागवत यांनी म्हटल्याप्रमाणे गांधीजी दृष्टी देत, विनोबा ज्ञानाचे अधिष्ठान निर्माण करीत. (भागवत,पृ. २२७-२२८) म्हणून

गांधीजींचा शिक्षणविचार समजून घेण्यासाठी विनोबांचे शैक्षणिक प्रयोग आधी लक्षात घ्यावे लागतात.

'कौटुंबिक शाळा' ही आणखी एक संकल्पना विनोबांच्या शैक्षणिक प्रयोगातून साकार होत होती. माणसाच्या वैचारिक धारणांची जडणघडण करणाऱ्या जीवनशिक्षणावर विनोबांचा भर होता. विनोबांच्या मते "विचाराची प्रत्यक्ष जीवनापासून फारकत झाल्याने विचार निर्जीव बनतो, आणि जीवन विचारशून्य बनते. मनुष्य घरात जगतो आणि शाळेत विचार शिकतो. त्यामुळे जीवन आणि विचार ह्यांचा मेळ बसत नाही. ह्याला उपाय म्हणजे एका बाजूने घरात शाळा शिरली पाहिजे आणि दुसऱ्या बाजूने शाळेत घर शिरले पाहिजे. समाजशास्त्राने शालीन कुटुंबे निर्माण केली पाहिजेत आणि शिक्षणशास्त्राने कौटुंबिक शाळा स्थापन केल्या पाहिजेत. छात्रालय किंवा शिक्षकाचे घर हा शिक्षणाचा पाया समजून त्यावर शिक्षणाची इमारत रचणारी शाळा म्हणजे कौटुंबिक शाळा." (विनोबा,१९९५, पृ. ८७) चार भिंतीतल्या चौकटबद्ध शालेय शिक्षणापेक्षा समग्र जीवन-शिक्षणाचा विचार इथे अभिप्रेत होता. लोकांच्या सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक जीवनाचा आणि शाळेचा संबंध तुटू नये ही या शिक्षणविचारामागची मुख्य भूमिका होती. शेतीच्या आणि उद्योगधंद्यांच्या विकासात शिक्षणाचा उपयोग व्हावा ही मूलोद्योग शिक्षणाची पायाभूत संकल्पना होती.

१९३७ साली काँग्रेस मंत्रिमंडळांनी अधिकारग्रहण केल्यावर आपल्याकडे सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रश्नाला चालना मिळाली. शिक्षणाचा खर्च आतापर्यंत दारूपासून मिळणाऱ्या कराच्या उत्पन्नातून केला जात असे. महात्मा गांधींनी व्यापक देशहिताचा मुद्दा म्हणून देशभरात दारूबंदी करण्याच्या प्रश्नाला अग्रक्रम दिला होता. त्यामुळे शिक्षणाचा प्रश्न बाजूला पडून दारूबंदीच्या प्रश्नाला चालना मिळाली होती. या दारूबंदीमुळे शिक्षणासाठी लागणारा उत्पन्नाचा स्त्रोत आटेल, ही भीती नव्या मंत्रिमंडळांना जाणवत होती. उत्पनाचे स्त्रोत नाहीत म्हणून शिक्षणसुधारणांचे काम हाती घेता येत नाही हा विचार गांधीजींच्या विचारपद्धतीत बसणारा नव्हता. त्यांनी 'स्वावलंबी शिक्षणा'चा नवा पर्याय पुढे आणला. गांधीजींनी आफ्रिकेत टॉलस्टॉय फार्ममध्ये सुतकताई व कातडी कमावण्याच्या स्वावलंबी शिक्षणाचा प्रयोग यापूर्वी केलेला होता. या अनुभवातून ३१ जुलै १९३७ च्या 'हरिजन'च्या अंकात त्यांनी 'स्वावलंबी शिक्षणा'ची आपली संकल्पना प्रथम मांडली. 'वर्धा-योजना', 'मूलोद्योगी राष्ट्रीय शिक्षण', किंवा 'ग्रामोद्योगी राष्ट्रीय शिक्षण' या नावांनी ही योजना ओळखली जाते. या योजनेतले प्रमुख मुद्दे असे होते :

१. पैशावरच अवलंबून राहिल्यास शिक्षणाचा प्रश्न आपणांस हाताळता येणार नाही व देशाचे ऋण आपणास फेडता येणार नाही; यासाठी शिक्षण स्वावलंबी असावे.
२. बालकांची शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अशी सर्वांगीण वाढ म्हणजे शिक्षण.
३. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, ते शिक्षणाचे साधन मात्र आहे.

४. शिक्षणाचा आरंभ एखाद्या उपयोगी हस्तव्यवसायाने केल्यास बालकांस उत्पादनास समर्थ बनविता येईल. हस्तव्यवसाय शास्त्रीय दृष्टीने शिकवला गेला पाहिजे.
५. प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे असून प्रत्येक इसमाला इंग्रजी वजा करून मॅट्रिकच्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे ही प्राथमिक शिक्षणाची व्याप्ती मानावी.

११ सप्टेंबर १९३७ व १८ सप्टेंबर १९३७ च्या 'हरिजन'च्या अंकांतून 'स्वावलंबी शिक्षणा'ची संकल्पना अधिक विस्ताराने विशद करण्यात आली. त्यात हस्तव्यवसाय अर्थात् शारीर श्रम हे शिक्षणाचे माध्यम असेल व कृतिद्वारा शिक्षण ही अध्ययन-अध्यापनपद्धती असेल हे स्पष्ट करण्यात आले. हस्तव्यवसायातूनच बौद्धिक शिक्षण दिले जावे, हा त्यातला क्रांतिकारक मुद्दा होता. हात हे ज्ञानाचे-विचारांचे-इंद्रिय आहे, ते बुद्धी आणि भावना जागृत करणारे साधन आहे, अशी गांधीजींची धारणा होती. तसेच मुलांनी हस्तव्यवसायातून तयार केलेल्या वस्तू दैनंदिन जीवनव्यवहारात वापरात येतील अशा तयार व्हाव्यात व त्या शाळेच्या संग्रहालयात न ठेवता विक्रीला ठेवाव्यात आणि त्यातून येणारे उत्पन्न शाळेच्या उत्पन्नात जमा करावे, अशी योजना गांधीजींनी सुचविली. थोडक्यात मूलोद्योगाद्वारे शिक्षण, उद्योगाच्या अनुषंगाने बौद्धिक शिक्षण आणि मूलोद्योगातून निर्माण झालेल्या वस्तूंचा शाळेला स्वावलंबी बनविण्यासाठी वापर हे गांधीजींच्या शिक्षणप्रणालीचे तीन मुख्य घटक होते.

यानंतर २२ व २३ ऑक्टोबर १९३७ रोजी वर्धा येथे महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय शैक्षणिक परिषद घेण्यात आली. या परिषदेस अचार्य विनोबा भावे, काका कालेलकर, नरेंद्र देव, महादेवभाई देसाई, श्रीमती आशादेवी, डॉ. झाकीर हुसेन, बाळासाहेब खेर, मध्यप्रांताचे शिक्षणमंत्री रवींद्र शुक्ल, ओरिसा प्रांताचे सेक्रेटरी विश्वनाथ दास, मद्रास प्रांताचे शिक्षणमंत्री डॉ. सुबरायन, संयुक्त प्रांताचे शिक्षणमंत्री प्यारेलाल शर्मा, बिहारचे शिक्षणमंत्री डॉ सैयद महमद, दिल्लीचे प्रो. एन. आर. मलकानी, पुण्याच्या टिळक विद्यालयाचे प्राचार्य प्रो. के. टी. शहा इत्यादी शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. या सभेत गांधीजींनी 'स्वावलंबी शिक्षणा'च्या आपल्या प्रस्तावित योजनेचा हेतू व कार्यपद्धतीविषयी निवेदन केले. त्याचा सारांश असा :

१. सध्याचे प्राथमिक शिक्षण निरर्थक आहे. कोणत्याही प्रकारचा पिढीजात धंदा करण्यास या शिक्षणाचा उपयोग होत नाही. किंबहुना मुलांना या शिक्षणप्रक्रियेतून निरनिराळ्या वाईट सवयी जडतात, त्यांच्या मनात शहरी वारे संचारतात व त्यांचा ग्रामीण जीवनाशी अनुबंध रहात नाही. त्यामुळे धंदेशिक्षणाद्वारे शिक्षण देणे हा पर्याय आपण पुढे आणला पाहिजे.
२. धंदेशिक्षण हे बौद्धिक शिक्षणाच्या जोडीला म्हणून द्यावयाचे नसून सर्व बौद्धिक शिक्षण धंदेशिक्षणाभोवती गुंफले जावे. व्यवसायाद्वारे बौद्धिक वाढ साधली जाईल असा

शिक्षणक्रम विकसित करण्यात यावा. टकळीच्या उपयोगाचे उदाहरण घेऊन व्यावसायिक शिक्षणातून बौद्धिक शिक्षण कसे साध्य करता येईल हेही गांधीजींनी समजावून सांगितले.

३. उत्पादक शारीरिक श्रमांद्वारा बौद्धिक शिक्षण देतांना प्राथमिक शिक्षणात आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र, आहार, श्रमनिष्ठा, शारीरिक शिक्षण, पालकांशी सहमती यांना स्थान देण्यात यावे.
४. स्वावलंबनातूनच धार्मिक शिक्षण द्यावे; वेगळे धार्मिक शिक्षण देण्याची गरज नाही.
५. विद्यार्थ्यांच्या शारीरिक श्रमांतून मिळणाऱ्या उत्पनाची मात्रा शिक्षकांचा वेतनखर्च भागेल इतकी असावी.
६. प्राथमिक शिक्षणाची कालमर्यादा सात वर्षांची असावी.

दोन दिवसांच्या परिषदेतील व्यापक चर्चेनंतर चार ठराव मंजूर करण्यात आले :

१. वयाच्या सात वर्षेपर्यंत राष्ट्रव्यापी मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे.
२. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.
३. उत्पादक शरीरश्रम अर्थात 'मूलोद्योग' हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असेल. इतर आनुषंगिक शिक्षण हे भोवतालच्या परिस्थितीशी स्वाभाविक व संलग्न असले पाहिजे.
४. 'स्वावलंबी शिक्षण' ही शिक्षणपद्धती हळू हळू शिक्षकांच्या पगाराइतके उत्पन्न मिळविण्यास समर्थ होईल,अशा प्रकारे राबविण्यात यावी. दैनंदिन शिक्षणातून अर्थोत्पादन करणारे उपक्रम चालविण्याची संकल्पना येथे अभिप्रेत होती.

या परिषदेत खेड्यांतल्या मुलांच्या शिक्षणासाठी 'बुनियादी तालीम योजना' तयार करण्यात आली. या शैक्षणिक पद्धतीचा आकृतिबंध विकसित करण्याकरिता डॉ. झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली दहा जणांची समिती नेमण्यात आली. आचार्य विनोबा भावे, काका कालेलकर, प्रा. के. टी. शहा हे महाराष्ट्रातले मान्यवर या समितीचे सदस्य होते. समितीने आपला अहवाल २ डिसेंबर १९३७ रोजी महात्मा गांधींना सादर केला. अहवालात शिक्षणपद्धतीची उद्दिष्टे, अभ्यासक्रमाचा आराखडा, परीक्षा पद्धती, शिक्षक-प्रशिक्षण योजना इत्यादींचा समावेश होता. यानंतर २८ जानेवारी १९३८ रोजी हिंदुस्थान सरकारच्या मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळीची सभा झाली व या सभेने मुंबई राज्याचे पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली धंदेशिक्षणविषयक धोरण ठरविण्यासाठी समिती नेमली. ३ डिसेंबर १९३८ रोजी या समितीने आपला अहवाल सादर केल्यावर पुन्हा फेरविचारासाठी बाळासाहेब खेर यांच्याच अध्यक्षतेखाली दुसरी समिती नेमण्यात आली. १९ जानेवारी १९४४ रोजी या समितीचा अखेरचा अहवाल जाहीर करण्यात आला. दरम्यान फेब्रुवारी १९३८ मध्ये हरिपुरा येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात १९३७ च्या झाकिर हुसेन कमिटीच्या अहवालानुसार हिंदुस्थानात

बुनियादी शिक्षणपद्धती आणण्याचा ठराव पारित झाला. तसेच एप्रिल १९३८ मध्ये 'हिंदुस्थानी तालिमी संघ' या नावाचे अखिल भारतीय शिक्षण मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाच्या देखरेखीखाली १९३८ साली वर्धा येथे मूलोद्योगी शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली व १९३८-३९ पासून मुंबई, मध्य प्रांत, संयुक्त प्रांत, बिहार व ओरिसा प्रांतात मूलोद्योगी शिक्षणाचा प्रयोग कार्यान्वित झाला. गुजरात विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, जामिया-मिलिया-इस्लामिया, आंध्र जातीय कलाशाळा, काश्मीर संस्थान येथेही ह्या शैक्षणिक प्रयोगाची सुरुवात झाली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने १९३९ साली सासवड विभागात वर्धा शिक्षणाचा प्रयोग सुरू केला. २९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर १९३९ असे चार दिवस पुण्यात हिंदुस्थानी तालिमी संघातर्फे 'वर्धा राष्ट्रीय शिक्षण परिषदे'चे अधिवेशन झाले. १९४४ पर्यंत दोन हजारांवर शाळा आणि चौदा अध्यापनकेंद्रात या शिक्षणक्रमाचे काम सुरू झाले. सप्टेंबर १९३९ पासून 'वर्धा-शिक्षण' नावाची मासिक पत्रिका सुरू करण्यात आली. हिंदुस्थानी तालिमी संघाने 'नई तालीम' नावाची मासिक पत्रिका सुरू केली. एप्रिल १९४१ मध्ये जामियानगर दिल्ली येथे पुन्हा वर्धा-शिक्षण परिषद घेण्यात आली. अर्थात १९३९ साली काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिल्यानंतर ह्या प्रयोगावर त्याचा थोडाफार परिणाम होणे स्वाभाविक होते, त्यामुळे या उपक्रमांना थोडीफार शिथिलताही आली. (सेवलेकर-चौधरी, १९४८, पृ. ७-२३)

१९४० सालापासून ताराबाई मोडक यांच्या देखरेखीखाली मुंबईत मागास भंगी वस्तीत तीन वर्षे बुनियादी शिक्षणपद्धतीचा प्रयोग करण्यात आला. गांधीजींच्या बुनियादी तालीम शिक्षणयोजनेत सात वर्षांच्या खालील मुलांचा समावेश नव्हता. १९४३ साली कस्तुरबा गांधींच्या मृत्यूनंतर कस्तुरबा ट्रस्टच्या वतीने नूतन बाल शिक्षण संघाच्या माध्यमातून ताराबाईंनी सात वर्षाखालील मुलांच्या शिक्षणासाठी शिबीरे घेतली. अनुताई वाघ या शिबीरातूनच बालशिक्षणाशी जोडल्या गेल्या. गांधीजींनी ताराबाईंच्या बालशिक्षणपद्धतीची प्रात्यक्षिके पाहिली व या नूतन बालशिक्षण संघाच्या शिक्षणपद्धतीला बुनियादी तालीम पद्धतीत सामावून घेण्यास मान्यता दिली. गांधीजींच्या सूचनेवरून या शिक्षणपद्धतीत शैक्षणिक साधने तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल स्थानिक वस्तूंतूनच घ्यायचे तत्त्व मान्य करण्यात आले. पुढे ताराबाईंच्या मार्गदर्शनाखाली बोर्डी येथे बुनियादी तालिम व मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचा सहयोग असणाऱ्या नूतन बालशिक्षण पद्धतीचे कायमस्वरूपी केंद्र उभारण्यात आले. (फाटक, १९९५, पृ. २२१-२२३)

**जीवन-शिक्षणाचे तत्त्वज्ञान :**

गांधीजींच्या आधी महाराष्ट्रात म. फुले यांनी शिक्षणव्यवस्थेतील ब्राह्मणी वर्चस्वावर टीका केली होती. जातीय उतरंडीत स्त्री-शूद्रांना शिक्षणाचा हक्क नाकारला गेल्याने वंचित

समाजाच्या वाट्याला गुलामगिरी आली होती. 'अवघे अनर्थ एका अविद्येने केले' अशा शब्दांत स्त्री-शूद्रांच्या मागासलेपणाची मीमांसा फुल्यांनी केली होती. वंचितांना उर्ध्वस्थानी येण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याचे व्रत त्यांनी घेतले होते. पारंपरिक जातिसंस्थेमुळे पुस्तकी व पंडिती वळणाच्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले व त्यामुळे समाजातल्या कारू-नारू वर्गातल्या श्रमजीवी कारागिरांच्या कार्मिक कौशल्यांचे शैक्षणिक मूल्य नाकारले गेले. अभिजन आणि बहुजन हे सामाजिक अपसरण व्हायला शिक्षणाची मक्तेदारी कारणीभूत झाली हा विचार फुलेकेंद्री शिक्षणविचारातून पुढे आला होता. म. गांधींचा शिक्षणविचार हा म. फुल्यांच्या विचारांशी जुळणारा होता. गांधीजींनी उत्पादक श्रम आणि बौद्धिक विकास यातले द्वंद्व संपुष्टात आणण्यासाठी श्रमाला व हस्तकौशल्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणले. मूलोद्योगी शिक्षणामागचा आपला विचारव्यूह मांडताना त्यांनी म्हटले होते :

"My plan to impart Primary Education through the medium of village-handicrafts like Spinning and Carding etc., is thus conceived as the spear-head of a silent social revolution fraught with the most far-reaching consequences. It will provide a healthy and moral basis of relationship between the city and village and thus go a long way towards eradicating some of the worst evils of the present social insecurity and poisoned relationship between the classes. It will check the progressive decay of our villages and lay the foundation of a jester social order in which there is no unnatural division between 'haves' and 'have-notes' and everybody is assured of a living wage and the right to freedom" (भागवत, १९४५, पृ. २७)

मूलोद्योगी शिक्षण ही या अर्थाने आर्थिक, सामाजिक व बौद्धिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त करणारी शिक्षणनीती होती. सहकार्याच्या तत्त्वावर अधिष्ठित जातिवर्गविरहित समाज गाधीजींना अभिप्रेत होता. क्षुद्र कामे करणाऱ्या श्रमिक वर्गाला जातीच्या उतरंडीत निम्न स्थानावर ढकलणारी विषमता गांधीजींना मान्य नव्हती. शारीरिक श्रमाचे कोणतेही काम हीन अथवा अपमानास्पद असत नाही, किंबहुना सर्व तऱ्हेचे काम सारख्याच प्रतिष्ठेचे आहे, हा मूल्यविचार गांधीजींना समाजात रुजवायचा होता. श्रममूल्याला केंद्रस्थानी आणणारी त्यांची शिक्षणनीती ही या अर्थाने सामाजिक समता विचार रुजविण्याची उपचारपद्धती होती. दारिद्र्य व बेकारीवर कायमचा तोडगा म्हणून हस्तोद्योगांचे पुनरुजीवन करण्याचा मार्ग म्हणूनही ते या शिक्षणपद्धतीचा आग्रह धरू पहात होते. गांधीजींच्या योजनेनुसार बौद्धिक कार्यकर्ता असला तरी त्यानेही शारीरिक श्रम केलेच पाहिजेत. 'नई तालीम' मधल्या एका लेखात रवींद्रनाथ टागोरांनी म्हटले होते की,

"शरीराच्या शिक्षणाशी मनाच्या शिक्षणाचा आणि शरीराच्या कार्यप्रवणतेशी मनाच्या कार्यप्रवणतेचा गाढ संबंध आहे. या दोहोंमध्ये चांगला मेळ राहिला नाही तर आपल्या जीवनाचा छंद देखील तुटून जातो." (भागवत स. ज., १९४५, पृ.११).

विनोबा भावेंनी वर्धा शिक्षणपद्धतीला 'समवाय पद्धती" असे नाव दिले होते. यात उद्योग आणि शिक्षण ह्या दोहोंचा समवाय गृहीत धरलेला होता. विनोबांनी पारंपरिक अर्थाचे 'उद्योग शिक्षण', 'पुस्तकी शिक्षण' आणि प्रस्तावित 'मूलोद्योगी शिक्षण' यातला भेद स्पष्ट व्हावा यादृष्टीने 'समवाय पद्धत' हा नवा पर्यायी शब्द सुचवला होता. काहींनी त्यासाठी 'अनुबंध पद्धती' (co-relation) असाही शब्दप्रयोग केलेला आहे. प्रत्येक वस्तूचा दुसऱ्या वस्तूंबरोबर काही ना काही संबंध असतोच, या संबंधालाच 'अनुबंध' म्हणतात. तंतुवाद्यामध्ये वरच्या तारा व तरफांच्या तारा असे दोन प्रकार असतात. वरच्या तारा नाद निर्माण करतात व तरफांच्या तारांतून निनाद निघत असतो. नाद व निनाद यांच्या मिलाफातून एकरूप सुरेल संगीत (harmony) निर्माण होते, तीच गोष्ट समवाय शिक्षणात गांधीजींना अभिप्रेत होती. शास्त्रीय अध्ययनपद्धतीत विषय, प्रयोजन, अधिकारी आणि संबंध हे चार अनुबंध येतात. हे सर्व विषय एकमेकांपासून स्वतंत्र नसतात. भाषा शिकत असतानाच शास्त्राचा उलगडा होत जातो, शास्त्र शिकत असताना गणित पक्के होत जाते, ह्याला अनुबंध शिक्षण पद्धती म्हणतात. किंबहुना जीवन आणि शिक्षण यांत अनुबंध किंवा समवाय घडवून आणणे हे गांधीजींच्या शिक्षणविचाराचे ध्येय होते. शिक्षणातून जीवनाच्या अंगप्रत्यंगाचे दर्शन घडले पाहिजे. ज्याप्रमाणे मन आणि शरीर यांचे व्यापार समांतर रेषेत न चालता ते परस्परावलंबी व परस्परपोषक असतात, त्याचप्रमाणे शिक्षणात संपूर्ण जीवनदर्शन आले पाहिजे ही गांधीजींच्या जीवन शिक्षणाची संकल्पना होती. विनोबांच्या मते "औद्योगिक शिक्षणात केवळ 'उद्योग' शिकवला जायचा तो मातीचा ढीग. पुस्तकी शिक्षण वेगळे. त्यात केवळ 'ज्ञान' दिले जायचे. ते मडक्याचे चित्र पाहून घ्यायचे. पाणी भरायचे कामच नाही. केवळ उद्योग किंवा केवळ ज्ञान देणाऱ्या पद्धतीला आपण 'केवळ पद्धती' म्हणू. काही वेळ उद्योग आणि काही वेळ शिक्षण याला आपण 'समुच्चय पद्धती' म्हणू. ही तर उद्योग आणि शिक्षण ह्यांची नुसती बेरीज आहे. माती + पाणी म्हणजे मडके नव्हे. दोन्ही एकत्र मिसळून त्यात कुंभाराची कला ओतून मडके तयार होत असते. .. समवाय पद्धतीत कोणता तरी एक जीवनव्यापी आणि विविध अंगे असलेला मूळ उद्योग शिक्षणाचे द्वार म्हणून स्वीकारलेला असतो. सदर उद्योगाच्या द्वारे मुलाच्या सर्व शक्ती विकसित करणे, मुलाला जीवनोपयोगी ज्ञान देणे, आणि आजीविकेचे समर्थ साधन पुरविणे, असा तिहेरी उद्देश असतो." (भागवत, १९४५, पृ. १२-१३)

गांधीजींची मूलोद्योग शिक्षणपद्धती ही सर्वोदय तत्त्वज्ञावर आधारलेली होती. 'ज्ञानाची संस्कृती' निर्माण करण्याचा तो एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. भौतिक सुखवादापेक्षा

नैतिक विकासाला महत्त्व देणारी मूल्यदृष्टी हा त्यांच्या शिक्षणप्रणालीचा मूलाधार होता. क्रिया आणि ज्ञान यांच्या रचनात्मक संयोगातून व्यक्तीला आपला विकास साधता येतो, हे मूलोद्योग शिक्षणपद्धतीचे वैशिष्ट्य होते. मूलोद्योग शिक्षणाने तयार झालेली प्रजा शुद्ध लोकशाहीची कास धरेल, ग्रामोद्योग वाढीला चालना मिळून खेडी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होतील, त्यामुळे जनतेचा आत्मविश्वास जागवला जाईल व ग्रामसंजीवनाला गती लाभेल. या दृष्टिकोनातूनच झाकीर हुसेन कमिटीने आपल्या अभ्यासक्रमात शेती, कातण-विणकाम, लाकूडकाम, कार्ड-बोर्ड कामास अभ्यासक्रमांत अग्रस्थान दिले. मधमाशा पालन, कागद बनवणे, चामड्याचे काम, मातीची भांडे तयार करणे यांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला. सारांश, नव-संस्कृती घडविणारे ज्ञान आणि सुख व चारित्र्य निर्माण करणारे कृतियुक्त स्वावलंबी शिक्षण हा मूलोद्योगी शिक्षणाचा गाभा होता.

मूलोद्योग शिक्षणाचा अभ्यासक्रम व अध्यापनपद्धती याविषयी या काळात बरेच विचारमंथन होऊन अध्ययन-अध्यापनाच्या पद्धती विकसित करण्यात आल्या. शिक्षक-मार्गदर्शिका, वाचनपाठ, कार्यपुस्तिका तयार करण्यात आल्या. सूतकामाच्या माध्यमांतून काय काय शिकवता येईल याविषयी चर्चा-प्रात्यक्षिके झाली. भाषेमध्ये क्रियेला प्राधान्य असते, त्यामुळे सूतकामातून स्वभाषा कशी शिकवता येईल याची अनेक नमुना उदाहरणे पुढे आली. उदाहरणार्थ, सूतकामाच्या शिक्षणात येणारे कापूस, रोप, पान, बोंड, रू, सरकी ही पदार्थ-नामे; वेचणे, निवडणे, साफ करणे, पिंजणे, टकळी फिरवणे, पीळ भरणे, गुंडाळणे, तुटणे ही क्रियापदे; तसेच या प्रक्रियेत वारंवार उपयोजिल्या जाणाऱ्या सळी, फळी, टकळी ही उपकरणे; सरकट, सुतळी, पिंजण, दोरा, सूत, धागा, तार, लटी, गुंडी, पेळू, पेळूपाट अशी सुतकताईच्या प्रक्रियेतून उत्क्रांत होणारी कापसाची रूपांतरे ; तराजू, काटा, दांडा, पारडे ही मोजमापाची साधने; तोळा, छटाक, रत्तल, शेर ही मोजमापाची प्रमाणे इत्यादी शब्दांची 'तकली बालबोधिनी' करून मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्यावर भर दिला जात असे. व्याकरणविषयक माहिती देतांना सूत-कामातील विविध पदार्थांचा व क्रियांचा उपयोग केला जाई. सूतकामातून समाजाचे, इतिहासाचे, अर्थशास्त्राचेही ज्ञान दिले जाई. निरनिराळ्या समाजातील पोशाख करण्याच्या विविध पद्धती, सणवार व विधी-उत्सवातील पोशाखाचे सांस्कृतिक संकेत, व्यापारामधील कापडाचे स्थान, कापडाची आयात-निर्यात, कापूस-उद्योगाच्या संदर्भातील हिंदुस्थानातील आर्थिक व राजकीय घडामोडी, हातमाग व कापड गिरण्यांतील कापडाचे अर्थशास्त्र, कापड-उद्योगातल्या जागतिक बाजारपेठेतील घडामोडी असा जीवन-शिक्षणाचा अनेकांगी बृहत आशय काम करता करता शिकवला जात असे.

वर्धा शिक्षणपद्धतीच्या यशापयशाविषयी बरीच मतभिन्नता आढळते. मूलोद्योग शिक्षणपद्धतीपूर्वीचे शैक्षणिक प्रयोग आणि मूलोद्योग शिक्षणपद्धतीच्या वाटचालीतले

खाचगळगे यांचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले वि. द. घाटे यांच्या मते मूलोद्योग शिक्षणाची गांधीजींची योजना मूलत: आर्थिक होती, शैक्षणिक नव्हती. हा प्रयोग 'एज्युकेशन ॲण्ड क्राफ्ट' या स्वरूपाचा होता, 'एज्युकेशन थ्रू क्राफ्ट' असा नव्हता. कृतिशीलता ही नुसती हातापायांची नसते, मनसुद्धा मूलत: आणि तत्त्वत: कृतिशील असते. हे मनाचे सामर्थ्य शिक्षणाने वाढविले पाहिजे; मनाला उत्तरोत्तर अधिक जटिल व कठीण प्रश्नांशी मुकाबला करण्यास शिकवले पाहिजे, ही गोष्ट या पद्धतीत मागे पडली. उत्पादनातून शिक्षण स्वावलंबी बनवावे, निदान शिक्षणावरचा बराचसा खर्च मुलांच्या हस्तोद्योगातून भागवावा यावर प्रामुख्याने भर दिला गेला. शिवाय 'चरखा' हे त्यावेळच्या स्वातंत्र्ययुद्धातल्या धडपडीचे प्रतीक व गांधीजींचे श्रद्धास्थान असल्याने सूतकताई आणि विणकाम हाच विषय मूलोद्यागात सर्वत्र स्वीकारला गेला. झाकिर हुसेन समितीने "ज्या प्रदेशात जो उद्योग परिचित व रूढ आहे त्यालाच मूलोद्योग म्हणून निवडावे' असे स्पष्ट केलेले असूनही सूतकताईखेरीज अन्य उद्योग निवडले गेले नाहीत. शेती हा उद्योग सर्वत्र रूढ असूनही तो निवडला गेला नाही. ८२ टक्के शाळांनी सूतकताईचीच निवड केली होती. शिवाय शाळांतून काढलेल्या या सूताला गिऱ्हाईक मिळाले नाही, त्यामुळे शिक्षणाचा खर्च मूलोद्योगातून भागवता आला नाही. वि. द. घाटे यांनी यासंदर्भात १९२१-२२ च्या प्राचार्य डॉ. मॅन यांच्या शेतकी शाळांच्या प्रयोगाचा उल्लेख केला आहे. अंकगणित, भूगोल, विज्ञानाचा अभ्यास शेतीशी समन्वित करून शेतकऱ्यांचे अंकगणित, शेतीप्रधान भूगोल, विज्ञान आणि शेतकीशास्त्र असे विषय त्यांनी अभ्यासक्रमात आणले होते. शेतीला लागणाऱ्या वस्तू तयार करणे व त्यांची दुरुस्ती करण्याची कौशल्ये शिकविली जायची. मुलांनी तयार केलेले नाडे, शिखे, दोर, भाजीपाला, फळे यांची उत्तम विक्री व्हायची. गांधीजींच्या मूलोद्योग शिक्षणाचा मूळ हेतू लक्षात न घेता सर्वदूर फारच ढोबळ पद्धतीने ही योजना राबविली गेल्याचे निरीक्षण घाटे यांनी नोंदवले आहे. (घाटे, १९६१, पृ. ४३६-४४८)

बुनियादी शिक्षणाने बेकारीचे प्रमाण खरोखर कमी होईल का याविषयीही काही शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या. धर्मशिक्षणाला या शिक्षणक्रमात स्थान दिले गेले नाही, अशा प्रकारचे आक्षेपही नोंदवले गेले. मात्र गांधीजींचा शिक्षणविचार हा वसाहतवादी व भांडवलशाही समाजातील शिक्षणपद्धतीला पर्याय शोधण्याचा प्रयत्न होता. वसाहतवादी नीतीला शह देऊन शिक्षण मुक्तिदायी कसे होईल यादृष्टीने करण्यात आलेला हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. वसाहतवादी शिक्षणात शारीरिक व आध्यात्मिक विकासाला फारसा वाव नव्हता, सामाजिक जबाबदारीचे भान जागवण्यात या शिक्षणात अग्रस्थान दिले गेले नव्हते, पारंपरिक पुस्तकी व कृतिहीन शिक्षणामुळे विद्यार्थ्याला स्वावलंबनाची प्रेरणा मिळण्याऐवजी त्याच्या वाट्याला विफलता आणि परात्मतेचाच अनुभव अधिक येत

असे. शारीरिक श्रमाची उपेक्षा होऊन विलासाची लालसा वाढायला हे शिक्षण अधिक पोषक होते. वसाहतवादी शिक्षणामुळे आपल्या जीवनशैलीत आणि संस्कृती-विचारात शिरलेल्या सर्व अपप्रवृत्तींना दूर सारणारी निखळ देशी शिक्षणनीती म्हणून मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग केला जात होता. त्यामुळे मूलोद्योगी शिक्षणाचे मूल्यमापन केवळ शैक्षणिक दृष्टीतून न करता सामाजिक, आर्थिक व राष्ट्रीय दृष्टीने करावे लागते. या शिक्षणप्रणालीने भारतीय शिक्षणविचारात एक मन्वंतर घडवून आणले, असे म्हणता येईल. वसाहतकाळात आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून व उत्पादनाच्या यांत्रिकीकरणामुळे अनेक पारंपरिक व्यवसाय अस्तंगत झाले होते. हे पारंपरिक व्यवसाय अस्तास गेल्याने स्त्री-शूद्रांचे सीमांतीकरण झाले होते. पारंपरिक व्यवसायांवर अधिष्ठित ग्रामव्यवस्था अडचणीत सापडली होती. या पार्श्वभूमीवर गांधीजींना खेड्यातील पारंपरिक व्यवसायांना मूलोद्योग मानून, त्यांना वर्णजातिव्यवस्थेने नाकारलेली प्रतिष्ठा द्यावयाची होती, त्यांच्या उद्योगांना शास्त्रीय विचारांची जोड द्यावयाची होती, व यातून खेड्यांतील उत्पादन-साधनांची फेरमांडणी साधून खेड्यांच्या पुनर्रचनेचा प्रकल्प पुढे न्यावयाचा होता. ही गोष्ट वर्धा शिक्षणयोजनेतून साकार व्हायला मदत झाली, हे या शिक्षणप्रणालीचे मोठे यश म्हणायला हवे. (सुमंत यशवंत, २०१७, पृ. १८-२०) उद्यमशील लोकशाही समाजाच्या पुनर्घटनेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणून या शिक्षणप्रणालीकडे पहायला हवे. मानवधर्माची निर्मिती हे वर्धा शिक्षण योजनेचे अंतिम ध्येय होते. त्यामुळे धंदेशिक्षणाच्या जोडीने सहकार, सहजीवन, सहिष्णुत्व या गुणांची वाढ होण्याच्या दृष्टीने या शिक्षणक्रमाची आखणी करण्यात आली होती, जे लक्षात घेतल्यास वर्धा शिक्षणपद्धतीचे 'जीवन शिक्षण' असेच नामकरण पुढे रूढ झाले, ते किती यथार्थ होते, हे लक्षात येते.

## ५.९. उच्च शिक्षणाची वाटचाल :

१८५७ सालात मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. मात्र १९ व्या शतकाअखेर या विद्यापीठात थेट विद्यादानाचे वर्ग सुरू झाले नाहीत; परीक्षा घेणाऱ्या मंडळासारखेच विद्यापीठाचे काम सुरू होते. चांगले अद्ययावत ग्रंथालय वा अधुनिक साधनांनी युक्त अशी प्रयोगशाळाही त्यांच्याकडे नव्हती. १९०२ साली लॉर्ड कर्झनने स्थापन केलेल्या विद्यापीठ आयोगाच्या शिफारशीतून १९०४ चा 'भारतीय विद्यापीठ कायदा' संमत झाला. या कायद्यामुळे मुंबई विद्यापीठापुढे परीक्षा घेणाऱ्या विद्यापीठाऐवजी शिक्षणदायी विद्यापीठ म्हणून नवी पुनर्घटना करण्याचे आव्हान उभे राहिले. परंतु पुरेशा निधीअभावी १९१२ पर्यंत ह्या पुनर्घटनेबाबत कुठलीच पावले उचलली गेली नाहीत. १९१२ साली विद्यापीठ सिनेटने युरोपियन व अमेरिकन विद्यापीठांतील शिक्षणपद्धतीचा अभ्यास असणाऱ्या पूर्ण वेळ तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार लंडनच्या इंडिया हाऊसच्या

सल्ल्याने व हिंदुस्थान सरकारच्या संमतीने मँचेस्टरच्या व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटीचे व्हाईसचॅन्सलर राहिलेले सर आल्फ्रेड हॉपकिन्स यांची नेमणूक करण्यात आली. सर हॉपकिन्सने संलग्न महाविद्यालयांना भेटी देऊन मुंबई विद्यापीठाच्या पुनर्घटनेच्या दृष्टीने शिफारस करणारा अहवाल १९१४ साली सेनेटला सादर केला. त्यांनी आपल्या अहवालात पुढील शिफारशी केल्या:

१. 'ओरिएन्टलिया' नावाखाली एकत्र केलेल्या शिक्षण व संशोधनासाठी तीन प्रोफेसर नेमावेत.
२. कॉलेजांना एम. ए. साठी व्याख्याने देण्यास व संशोधन कार्य करण्यास प्रोत्साहन द्यावे.
३. मॅट्रिकची परीक्षा व विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र मंडळ नेमावे.
४. विद्यापीठाच्या संशोधन-अभ्यासासाठी प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमशी परस्पर सहकार्याचा करार करावा.
६. विद्यापीठ ग्रंथालयाची पुनर्रचना करावी
७. विद्यापीठ प्रशासन व सभा-बैठकांसाठी पुरेशा जागेची तरतूद करावी. (टिकेकर २००७, पृ. १०१)

यानंतरही १९१९ पर्यंत विद्यापीठात थेट विद्यादानाचे काम सुरू होऊ शकले नाही. पुरेशा प्रशिक्षित प्राध्यापकांच्या अनुपलब्धीमुळे विद्यापीठाला अर्थशास्त्र व समाजशास्त्र यासारख्या विषयांत संशोधनाचे प्रकल्प हाती घेता आले नाहीत. या पार्श्वभूमीवर काही बुद्धिवान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठविण्याची योजना पुढे आली. त्यानुसार १९१९ साली अर्थशास्त्रातील संशोधनासाठी विल्सन कॉलेजातील प्राध्यापक सी. एन. वकील यांना व १९२० साली समाजशास्त्रातील संशोधनासाठी प्रोफेसर घुर्ये यांना युनिव्हर्सिटी स्कॉलर म्हणून परदेशात पाठविण्यात आले. दरम्यान २२ नोव्हेंबर १९१९ रोजी प्रोफेसर पॅट्रिक गेडिस यांनी समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून पहिल्यांदा पदभार स्वीकारला. १९२१ साली सप्टेंबर महिन्यात के. टी. शहा यांची अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. १९२५ साली बीएससी पदवीसाठी रॉयल इन्स्टिट्यूट विद्यापीठाशी संलग्न झाली. तंत्रज्ञान विभाग सुरू व्हायला १९३४ पर्यंत वाट पहावी लागली. (टिकेकर, कित्ता, पृ. १६०-१६२) १९१७ साली विज्ञान विद्याशाखा सुरू झाली होती, त्यातून अभियांत्रिकी व कृषि हे विषय वेगळे काढून १९३३ साली तंत्रज्ञान विद्याशाखा स्थापन करण्यात आली. त्यानंतर १९४३ साली लष्करीविद्या विभाग सुरू झाला तो १९४८ साली बंद करण्यात आला. १९४८ साली संख्याशास्त्र आणि राज्यशास्त्र व नागरिकशास्त्र या विषयांचे विभाग सुरू करण्यात आले. १९४९ साली वाणिज्य विद्याशाखेची स्थापना झाली.

मुंबई विद्यापीठाने काळानुरूप शैक्षणिक बदल घडवून आणण्यासाठी पुरेसे प्रयत्न

केले नाहीत, याची दखल घेऊन तत्कालीन समाजधुरिणांनी व प्रसारमाध्यमांनी विद्यापीठाच्या कार्यपद्धतीवर जाहीर टीकाही केली होती. १९२४ साली 'टाइम्स ऑफ इंडिया'तून सेंट झेवियर्स कॉलेजचे प्राचार्य रे. फादर ई बटलर यांनी पाच लेखांची मालिका लिहिली, त्यात त्यांनी लिहिले होते की, "आता बॉम्बे युनिव्हर्सिटीला जनमानसामध्ये फारसे महत्त्व उरले नसल्याचे जाणवते आहे. शहरातल्या एखाद्या कापड गिरणीपेक्षा अधिक किंमत तिला उरली नाही. पदवीधर निर्माण करण्याची फॅक्टरी होण्यापलीकडे या युनिव्हर्सिटीला काही उद्दिष्ट नाही. एकाच छापाच्या चित्रांबद्दल जसे कौतुक वा अश्चर्य वाटत नाही, तसा या पदवीधरांबद्दलही दरारा वा आदर वाटत नाही. नागरी जीवनाशी आणि जनमताशी जवळीक साधावयाची तर युनिव्हर्सिटीने आम लोकांच्या जीवनाला अधिक थेटपणे, तत्परतेने, जाऊन भिडले पाहिजे... मुंबईचे जीवन विविधांगी व समृद्ध आहे; (मुंबईकरांना) व्यापक आणि वैश्विक बाबींचा ओढा आहे. या अशा जीवनवृत्तीचे प्रतिबिंब युनिव्हर्सिटीच्या आरशात दिसणार नाही का?" (टिकेकर,२००७, पृ. १६३-१६४) मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे प्रतिनिधी म्हणून नाना कुंटे यांची मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर नियुक्ती झाली होती, त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात सिनेटच्या कामकाजाविषयीचा अनुभव नोंदवताना म्हटले होते की,"सिनेटच्या बैठकीच्या वेळी शिक्षणविषयक काम होण्याऐवजी अधिक करून कारवाया तसेच नेमणुकांविषयक देवाणघेवाण अधिक चालते असे आढळून आले, व खेद वाटला. मनात आले ग्रामपंचायत बरी." (कुंटे १९८५, पृ. ५४)

मुंबई विद्यापीठाकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षांचे समाधान देश स्वतंत्र होईपर्यंत झालेले दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई सरकारने ४ एप्रिल १९५० रोजी तत्कालीन कुलगुरू न्या. एन. एच. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई विद्यापीठाच्या पुनर्घटनेसाठी नेमलेल्या समितीने मुंबईचे औद्योगिक आणि तांत्रिक वातावरण लक्षात घेऊन विद्यापीठाने नवे अभ्यासक्रम सुरू करण्याची शिफारस केली होती. देशाच्या विविध गरजा पुरविण्यासाठी सागरी अभियांत्रिकी, विमानविद्या, वस्त्र-रसानशास्त्र, वैद्यकशास्त्र, बँकिंग, व्यापारी कायदे, लोकप्रशासन अशा विषयांचे अभ्यासक्रम विकसित केले पाहिजेत. समितीने म्हटले होते की, "औद्योगिक संघटना, परदेशी भाषा संस्था, कामगार, बँकिंग, व्यापार, तांत्रिक शिक्षण, लोकप्रशासन, वैद्यकीय आणि वैज्ञानिक संशोधन या साऱ्यांकडे उच्च शिक्षणात योग्य भूमिका निभावण्यासाठी युनिव्हर्सिटीने भविष्यकाळात लक्ष दिले पाहिजे.." (टिकेकर,२००७, पृ. १९०)

विद्यापीठाची स्वाययत्तता आणि सरकारी हस्तक्षेप या मुद्द्यावरून मुंबई विद्यापीठात बऱ्याचदा पेचप्रसंग निर्माण झालेले दिसतात. १९२४ साली चिमणलाल सेटलवाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या विद्यापीठ सुधारणा समितीच्या मते विद्यापीठाचे प्रशासन केवळ

शिक्षक-प्राध्यापकांच्या हातात न ठेवता म्युनिसिपालीटी, लोकल बोर्ड अशा सार्वजनिक जीवनातील व उद्योग क्षेत्रांतील प्रतिनिधींच्या सहयोगाने चालवावे. या शिफारशीला अनुसरून मुंबई इलाख्याचे तत्कालीन शिक्षणमंत्री हरिलाल देसाई यांनी मुंबईच्या कायदेमंडळात विद्यापीठाचे सुधारित विधेयक मांडले. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटने त्याचा निषेध केला. विशेषत: विधेयकातील पाचव्या कलमात विद्यापीठाच्या सभांना उपस्थित राहण्याचा व्हाइसरॉयना दिलेला अधिकार सिनेट सदस्यांना विद्यापीठाच्या स्वयत्ततेवर आक्रमण करणारा वाटत होता. कुलगुरू चिमणलाल सेटलवाड यांनीही सिनेट सदस्यांच्या या मताचा आदर करून चान्सलर सर लेस्ली विल्सन यांना पत्र लिहून याबाबतीत तोडगा काढण्याची विनंती केली. अखेर हिंदुस्थान सरकारने व्हाइसराय यांच्याऐवजी चान्सलर विद्यापीठ सभांना उपस्थित राहतील अशी दुरुस्ती स्वीकारून वादावर पडदा टाकला. अनुदान संहितेबाबतही सरकार दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाचे समग्र तपशील मागू लागल्यावर सरकारने विद्यापीठ प्रशासनावर विश्वास टाकला पाहिजे व त्यांची स्वायत्तता जपली पाहिजे,अशा आशयाची पत्रे कुलगुरु चिमणलाल सेटलवाड यांना पाठवावी लागत होती.(टिकेकर,२००७, पृ. १६८) १९१९ च्या कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशनच्या अहवालातही सरकारी हस्तक्षेपात कपात करण्याची शिफारस करण्यात आली होती. यावरून शिक्षणक्षेत्राची स्वायत्तता आणि सरकारी हस्तक्षेप हे किती जुने दुखणे होते हे लक्षात येते.

१९१० साली हिंदुस्थान सरकारने स्वतंत्र शिक्षणखात्याची निर्मिती केली. या शिक्षणखात्याने १९१३ साली प्रत्येक राज्यात एक निवासी व एक अध्यापक विद्यापीठ स्थापन करण्याचा संकल्प सोडला होता; महाराष्ट्रात मात्र असे कोणतेही नवे विद्यापीठ सुरू झाले नाही. १९२७ साली सायमन कमिशनच्या उपसमितीने 'इंटर युनिव्हर्सिटी बोर्ड' स्थापन करण्याची शिफारस केली होती, मात्र त्यावर काही कार्यवाही झाली नाही. १९४४ साली सार्जंट कमिटीने शैक्षणिक पुनर्रचनेच्या आराखड्यात 'विद्यापीठ अनुदान आयोग' स्थापन करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार स्वातंत्र्योत्तर भारतात उच्च शिक्षणाची सुकाणू संस्था म्हणून विद्यापीठ अनुदान योगाचे काम सुरू झाले. १९५० साली देशाच्या औद्योगिक विकासासाठी अभियांत्रिकी शिक्षणासाठी 'आय. आय. टी' संस्था स्थापन करण्याचा निर्णय होऊन एक नवे महत्त्वाकांक्षी पाऊल टाकण्यात आले.

### निरंतर शिक्षणाकडे दुर्लक्ष :

निरनिराळ्या व्यावसायिकांना आपापल्या उद्योगव्यवसायात प्रगती साधण्यासाठी सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान व नवनवीन कौशल्ये शिकण्याची गरज असते. त्यासाठी औपचारिक शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाल्यानंतरही निरंतर शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्याची गरज असते. अशा व्यवस्थांच्या माध्यमांतून आपल्या व्यवसायक्षेत्रात

जगभरात सुरू असलेल्या नव्या संशोधनाची, प्रयोगांची व उपक्रमांची अद्ययावत माहिती मिळण्याची सोय जिज्ञासूंना उपलब्ध होत असते. युरोप-अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीत अशा प्रकारच्या उजळणी वर्गांची व लहान लहान पूरक शिक्षणवर्गांची व्यवस्था असते. भारतीय शिक्षणव्यवस्थेत अशा निरंतर शिक्षणाची सोय नसल्याने येणारी स्थितिशीलता एतद्देशीय सुशिक्षितांना जाणवत होती. १९४३ साली नाशिक तुरुंगात बंदिवान असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांमध्ये काही डॉक्टरही होते; त्यांच्या चर्चेतून व्यक्त झालेली खंत लक्षात घेण्याजोगी आहे. डॉ. अष्टपुत्रे यांनी त्यांच्या तुरुंगातील डायरीत ह्या नोंदी लिहिल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात सेवा देणाऱ्या डॉक्टरांचे वैद्यकक्षेत्रातील ज्ञान ताजे राहाण्यासाठी आपल्याकडेही युरोपप्रमाणे निरंतर शिक्षणाच्या व्यवस्था निर्माण करणे कसे जरूरीचे आहे याचा डॉ. भास्कर पटेल यांनी उहापोह केला होता. बरेच डॉक्टर वैद्यकीय विषयाची नियतकालिके मागवून किंवा औषध कंपन्यांनी छापलेल्या माहितीपत्रकांवरून ही गरज भागविण्याचा प्रयत्न करतात. मात्र प्रथमावस्थेतील निदान आणि ताबडतोब औषधयोजना हे वैद्यकीय व्यवसायातील मुख्य सूत्र असल्याने कुठे काही नवीन आढळले तर नित्यनूतन ज्ञानाची गरज असते; त्यासाठी डॉक्टरांच्या संघटनांनी अशा निरंतर शिक्षणाच्या स्थायी व्यवस्था निर्माण करायला हव्यात असेही त्यांनी सुचविले होते. (अष्टपुत्रे, १९४३, पृ. १९-२०)

मराठीत खगोलशास्त्रासारख्या विषयांचे समग्रलक्ष्यी शिक्षण देण्याकडे झालेले दुर्लक्ष हाही या तुरुंगवासीयांच्या चर्चेतला महत्त्वाचा मुद्दा होता. सौरपरिवारावर मराठीत पुस्तके नसल्याचीही खंत होती. मराठी वाचकवर्गाला या विषयाची आवड नाही असे समजायचे की या विषयाचा खोल अभ्यास करणारे लेखक मराठीत नाहीत, असा प्रश्न त्यांना पडला होता. आपल्याकडे नक्षत्रांची माहिती असते, पण तारकामंडळांची माहिती फारशी नसते. दुर्बिणीतून ग्रहताऱ्यांचे निरीक्षण करण्याच्या व्यवस्था नसतात; त्यामुळे खगोलविद्यांच्या अध्ययन-अध्यापनाचे क्षेत्र उपेक्षित राहिले आहे. पूर्वी मॅट्रिकच्या अभ्यासक्रमात ह्या विषयाला काही अंशी स्थान होते; तथापि खगोलशास्त्र हा स्वतंत्र विषय दुय्यम व उच्च शिक्षणात आणावा, सर्व शिक्षणसंस्थांतून चांगल्या दूरदर्शकाची व्यवस्था करावी, असे मत या तुरुंगवासीयांनी व्यक्त केले होते. नक्षत्रे, तारे, त्यांचे आकार, तेज, गती, परास्पराकर्षण, उत्पत्ती, तेजोमेघ इत्यादींची माहिती अशा अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांना मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. (अष्टपुत्रे, १९४३, पृ. ३५) भूगोलविद्येतही आपली ज्ञानतृष्णा कमी पडत असल्याची खंत या तुरुंगवासीयांनी व्यक्त केली आहे. भारतात दूरवर पसरलेल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देणाऱ्या यात्रेकरूंची संख्या काही कमी नाही, परंतु त्यांनी ह्युएनत्संग, मार्को पोलो यांच्यासारखी स्थळवर्णने वा प्रवासवर्णने लिहून ठेवलेली नाहीत; कोलंबस, कॅप्टन कूक यांच्यासारख्या दर्यावर्दींच्या

अनुभवकथनांचीही आपल्याकडे उणीव आहे. भारतीयांना प्रवासवृत्तांत लिहून ठेवण्याची सवय नसावी, हे जसे यामागचे एक कारण आहे, तसे शिक्षणपद्धतीत यासंबंधीची अभिज्ञा जागवणाऱ्या अध्यापननीतीचा अभाव असावा हेही एक कारण दिसते.

**प्रादेशिक विद्यापीठाची मागणी :**

मुंबई विद्यापीठाखेरीज महाराष्ट्राला वेगळे प्रादेशिक विद्यापीठ असले पाहिजे अशी मागणी विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाअखेर पुढे आली होती. १९१७ साली सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिक्षण परिषदेत भाषावार प्रांतागणिक विद्यापीठाची संकल्पना चर्चिली गेली होती. यापूर्वी कलकत्त्याच्या सॅडलर कमिशनच्या अहवालातूनही तशी कल्पना मांडण्यात आली होती. १९२४ साली मुंबई विद्यापीठाच्या पुनर्घटनेसाठी नेमलेल्या चिमणलाल सेटलवाड समितीच्या अहवालात पुण्यात प्रादेशिक विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. उच्च शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आणि स्थानिक भाषा, साहित्य, इतिहास व संस्कृतीच्या अभ्यास-संशोधनासाठी अशा प्रादेशिक विद्यापीठाची गरज असल्याचा युक्तिवाद करण्यात आला होता. १९२६ साली मुंबईत भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातही मराठी भाषा व साहित्याच्या अभ्यासासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा ठराव पारित झाला होता. पाठोपाठ १९२८ साली मुंबई सोडून उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी लावून धरण्यासाठी बॅ. जयकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विद्यापीठ संघटना स्थापन झाली. जनतेच्या या मागणीला प्रतिसाद देऊन १९३७ साली मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात डॉ. जी. एस. महाजनी यांनी मुंबई प्रांतात आणखी एक विद्यापीठ स्थापन करावे, अशा आशयाचा प्रस्ताव सादर केला. या अनुषंगाने १९३८ साली मुंबई प्रांताचे तत्कालीन अर्थमंत्री ए. बी. लठ्ठे यांनी महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक अशी तीन प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करता येतील असे घोषित केले. मात्र स्वतंत्र प्रादेशिक विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घ्यायला सरकारने बराच वेळ घेतला. अखेर ७ फेब्रुवारी १९४२ रोजी मुकुंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटी' स्थापन झाली. या समितीने ६ ऑगस्ट १९४६ रोजी सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्राचे प्रादेशिक विद्यापीठ म्हणून 'पुणे विद्यापीठ' स्थापन करण्याची शिफारस केली. या शिफारशीनुसार १० फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे विद्यापीठाची स्थापना झाली. पहिले कुलगुरू म्हणून बॅ. मुकुंदराव जयकर यांची नियुक्ती झाली. १९४८ अखेर मुंबई विद्यापीठाशी ८३ महाविद्यालये संलग्न होती व ४२,२७२ विद्यार्थी विद्यापीठीय शिक्षण घेत होते. मुंबईबाहेर पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यावर पुणे क्षेत्राच्या कक्षेतली महाविद्यालये व विद्यार्थी पुणे विद्यापीठाकडे परस्पर वर्ग करण्यात आली. याच वर्षी यापूर्वी महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या नाथीबाई दामोदर ठाकरसी

महिला विद्यापीठाला राज्य सरकारने मान्यता दिली.१९४९ साली ग्रामीण, निवासी व हिंदी भाषेतून शिक्षण देणारे बडोद्याला 'महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ' स्थापन झाले. १ मार्च १९५० रोजी अण्णासाहेब लठ्ठे यांनी केलेल्या घोषणेप्रमाणे कर्नाटक विद्यापीठाची स्थापना झाली. अशा प्रकारे विसाव्या शतकाचा पूर्वार्ध संपताना तत्कालीन मुंबई प्रांतात विद्यापीठीय शिक्षणाच्या विस्ताराचा प्रारंभ झाला.

## ५.१०. आचार्यकुलाचे व संशोधन संस्थांचे योगदान :

महाराष्ट्रात शिक्षण आणि ज्ञाननिर्मितीच्या क्षेत्रात शाळा-महाविद्यालयांखेरीज ध्येयवादाने प्रेरित झालेल्या संस्था व व्यक्तींनी या काळात फार महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. संस्कृत पाठशाळांची व गुरुकुलपद्धतीच्या अनौचारिक शिक्षणाची परंपरा इंग्रजी राजवटीतही चालू होती. वाईला १९०४ साली नारायणशास्त्री मराठे उर्फ केवलानंद सरस्वती यांनी प्रज्ञानंदसरस्वती यांच्या स्मरणार्थ 'प्राज्ञपाठशाळा' स्थापन केली होती. शास्त्री-पंडितांनी आधुनिक परिस्थितीप्रमाणे समाजाला मार्गदर्शन करावे या व्यापक भूमिकेतून ही पाठशाळा सुरु करण्यात आली होती. विनोबा भावे, दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, पुंडलिकजी कातगडे, माधवशास्त्री वाटवे अशी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची फळी या संस्थेने घडविली. १९१७ साली विनोबा भावे यांनी प्राज्ञ पाठशाळेत 'शांकर तत्त्वज्ञाना'चे अध्ययन केले. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नारायणशास्त्री मराठे यांच्याकडून षडदर्शनांचे शिक्षण घेतले. विद्यार्थ्यांची बौद्धिक मशागत करून त्यास सकस प्रज्ञावान बनविणारी अध्ययन-अध्यापनप्रक्रिया हे पारंपरिक संस्कृत पाठशाळांचे वैशिष्ट्य होते. गुरुजींकडून पाठ ऐकल्यानंतर सहाध्यायी विद्यार्थ्यांची आपापसात 'चिंतनिका' सुरू होत असे. पाठग्रहणातल्या संदिग्धता वा आकलनातले घोटाळे दूर होण्यासाठी चिंतनिकेतल्या उजळणी-संवादसत्राचा उपयोग होत असे. त्यानंतर विषयाची पूर्वापार संगती लावण्यासाठी 'ग्रंथ लावण्या'चा उपक्रम चालत असे. या पूर्वोत्तर पक्ष पद्धतीमुळे विषय अधिक तोलून, मोजमापून तपासण्याची सवय लागत असे. विषयातील अस्पष्टता, विसंगती दूर होऊन स्वच्छ, सम्यक आकलनाच्या दिशा खुल्या होत असत. तिसऱ्या टप्प्यात गुरुजींच्या अध्यक्षतेखाली 'विद्वतसभा' भरविली जाई; त्यात विद्यार्थ्यांचे वादविवाद होत असत. ह्या प्रक्रियेतून तर्क, व्याकरण यांचे नियम पाळून युक्तिवाद करण्याची सवय लागत असे. या बौद्धिक शिस्तीतून तयार होणारे प्रज्ञावान विद्यार्थी अभिनिवेश वा पूर्वग्रह न बाळगता, शब्दप्रामाण्यापेक्षा सारासारविचाराला महत्त्व देऊन कुठल्याही प्रश्नाचा गुंता सोडविण्यासाठी समर्थ बनत असत. प्राज्ञपाठशाळेत म्हणूनच भारतीय दर्शनशास्त्रातील वेदांत व चार्वाकाच्या नास्तिविचारांना, तसेच जडवादी मार्क्सवादी नवमतवादालाही ज्ञानार्जनाच्या प्रक्रियेत सारख्याच आस्थेने स्थान मिळत

असे. प्राज्ञपाठशाळामंडळाने ज्ञाननिर्मितीच्या क्षेत्रात महत्त्वाचे प्रकल्प या काळात हाती घेतले. १९२५ साली नारायणशास्त्री मराठे यांनी 'धर्मकोशा'चा प्रकल्प हाती घेतला. १९३३ पासून लक्ष्मणशात्री जोशी यांनी धर्मकोशाच्या संपादनाची जबाबदारी घेतली. उपनिषदकांड, व्यवहारकांड, संस्कारकांड, राजनीतीकांड हे खंड प्रकाशित झाले. अजुनही हे काम सुरू आहे. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', 'हिंदुधर्मसमीक्षा', 'चार्वाक समीक्षा', 'जडवाद' इत्यादी विषयांवर वैचारिक चिकित्सा करणारे ग्रंथ लिहिलेत. महादेवशास्त्री दिवेकर यांनी 'हिंदू समाज समर्थ कसा होईल', धर्मभ्रष्टाचे शुद्धीकरण आणि शुद्धी-संस्कार', 'ब्रह्मज्ञान आणि बुवाशाही', 'ब्राह्मणातील पोटजातींचे एकीकरण', 'अस्पृश्योद्धारविचार' इत्यादी विषयांवर पुस्तके लिहून समकालीन धार्मिक प्रश्नांवर समाजाला दिशा दर्शविणारे विचार प्रसृत केलेत. वाईच्या प्राज्ञपाठशाळेतून शिक्षण घेतलेले विनोबा भावे (१८८५-१९८२)यांनी पवनारला आश्रम स्थापन केला. १९३२ साली धुळ्याच्या तुरुंगात गीताप्रवचने दिली. गांधीजींच्या विचारांना तात्त्विक अधिष्ठान देणाऱ्या सर्वोदयाचे दर्शनशास्त्र रचले. 'लोकनीती' हे राज्यव्यहारनीतीची सूत्रे सांगणारे पुस्तक लिहिले.

वाई येथील प्रज्ञानंद सरस्वतींकडे वेदान्ताचे अध्ययन केलेल्या विष्णुशास्त्री बापट (१८७१-१९३०) यांनी पुण्याला 'आचार्यकुल' स्थापन केले. या आचार्यकुलातून कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर यांनी तीन वर्षे राहून (शांकर)वेदान्ताचा अभ्यास केला. विष्णुशास्त्री बापट यांनी लोकमान्य टिळकांच्या गीता रहस्यातील कर्मयोगसिद्धान्त हा शांकरमतास सोडून असल्याने त्या ग्रंथाचे खंडन केले. शंकराचार्यप्रणीत अद्वैत सिद्धान्ताचे समर्थन करणाऱ्या ग्रंथांचे लेखन केले. बापटशास्त्री यांनी वेदान्त शब्दकोशाचे काम हाती घेतले होते, ते रंगनाथ दत्तात्रेय वाडेकर ह्यांनी पूर्ण केले आणि १९३३ साली वेदान्तपरिभाषा व वेदान्तशब्दकोश हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. १९१२ पासून 'ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला' हे मासिक चालवून त्याद्वारे त्यांनी याज्ञवल्क्यस्मृती, मनुस्मृती , हरिवंश, भविष्यपुराण, आनंदरामायण, शंकराचार्यांची स्तोत्रे यांची भाषांतरे प्रकाशित केली.१९१४ पासून 'दर्शनमाला' नियतकालिकातून चार्वाक, बौद्ध, जैन, न्याय आणि सांख्य दर्शनग्रंथांचा परिचय करून दिला. अकरा उपनिषदांचे, योगवासिष्ठाचे, श्रीमद्भगवद्गीतेवरील शांकरभाष्याचे स्पष्टीकरणासह मराठी भाषांतर; महाभारताचे आठ खंड व कथासरित्सागराचे चार खंडांत भाषांतर इत्यादी ग्रंथ सिद्ध करून त्यांनी मराठीच्या ज्ञानक्षेत्रात महत्त्वाची भर टाकली.

पुण्याला १९२४ ते १९३२ अशी आठ वर्षे विष्णुशास्त्री बापट यांच्या आचार्यकुलातून शिक्षण घेतलेले यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांनी मराठवाड्यात नांदेडला १९३७ साली संस्कृत पाठशाळेची स्थापना केली. स्वत: यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांनी

नाशिकला कुर्तकोटी शंकराचार्यांच्या मठात पंचमहाकाव्यांचा अभ्यास केला होता. लक्ष्मणशास्त्री निरगुडकर यांच्याकडे सिद्धांतकौमुदी, व्याकरण व मीमांसाशास्त्राचे शिक्षण घेतले होते. श्रीपादशास्त्री वाडीकर यांच्याकडे वेदांतशास्त्र शिकले होते. यज्ञेश्वरशास्त्रींच्या नांदेडच्या पाठशाळेतूनही प्राच्यविद्यांचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतांची एक पिढी पुढे आली. शंकर महाराज कंधारकर, अनंत महाराज टाकळीकर, एकनाथ महाराज खडकीकर, राम शेवाळकर, नरहर कुरुंदकर, सुरेंद्र बारलिंगे इत्यादींनी या संस्थेतून भारतीय दर्शनशास्त्राचा आणि आधुनिक जडवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. नांदेडला रजाकारांच्या काळात ही पाठशाळा त्यांनी बसर, जिंतूर, धुळे इत्यादी ठिकाणी हलवून काम चालू ठेवले होते. पुढे सावरगाव (जि. जालना) येथे चारही वेदांचे शिक्षण देणारी 'चतुर्वेदेश्वर' संस्थेची त्यांनी स्थापना केली. 'शंकराचार्यांचा मायावाद', वाचस्पती मिश्रांच्या 'भामती' ग्रंथावरील भाष्यग्रंथ, तर्कशास्त्र, साहित्यशास्त्रातील रस संकल्पना इत्यादी ग्रंथ लिहिले. विद्यापीठाबाहेर चाललेल्या अशा पाठशाळातूनच महाराष्ट्राच्या बौद्धिक संस्कृतीचा विकास होत होता. मराठवाड्यात भालचंद्र महाराज कहाळेकर यांच्या प्रभावळीतूनही एक पिढी तयार झाली.

१९१५ साली पुण्याला डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'ज्ञानकोशमंडळ' संस्था स्थापन करून १२ वर्षात २१ खंडांचा 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' संपादित केला. जे काम महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठासारख्या संस्थेकडून झाले नाही ते काम या संस्थेने हाती घेतले. महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्याचा प्रयत्न म्हणून या कोशाच्या प्रकल्पाकडे डॉ. केतकर पहात असत. पाश्चात्य संस्कृती व परंपरागत भारतीय संस्कृती यांचे एकत्रीकरण करण्याचे, समाजाचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी ज्ञानात्मक हातभार लावण्याचे काम या कोशाच्या माध्यमातून झाले. केतकरांच्या ज्ञानकोशमंडळातून निवृत्त झाल्यावर पुण्याला यशवंत रामकृष्ण दाते (१८९१-१९७३) यांनी १९३२ साली 'महाराष्ट्र कोश मंडळ' स्थापन करून चिं. ग. कर्वे यांच्या सहकार्याने ७ खंडात 'महाराष्ट्र शब्दकोश' (१९३२-१९३८); दोन खंडात 'महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश' (१९४२, १९४७), 'शास्त्रीय परिभाषा कोश' (१९४८) सहा भागात सुलभ विश्वकोश (१९४९-१९५१) प्रसिद्ध केले. मराठी ग्रंथ व नियतकालिकांतील लेखांची 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूची' प्रसिद्ध केली.

डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या गौरवार्थ १९१७ साली पुण्यात 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरा'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेने १९१९ साली महाभारताची चिकित्सक आवृत्ती संपादित करण्याचा प्रकल्प हाती घेतला. वि. सी. सुखठणकर यांनी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. १९६५ पर्यंत हे काम पूर्ण झाले. संस्कृत व प्राच्यविद्याक्षेत्रातील विद्वानांच्या परिषदा भरवून ज्ञानात्मक देवघेवीचे क्षेत्र विस्तारण्याचे

काम या संस्थेने केले. १९१९ साली संस्थेने स्वत:ची संशोधनपत्रिका सुरू केली. पां. वा. काणे यांचा पाच खंडातला धर्मशास्त्राचा इतिहास, सर्वदर्शनसंग्रह, न्यायकोश , भागवत पुराणांची संदर्भसूची, प्राकृत कोशाचे आठ खंड इत्यादी ग्रंथांची मौलिक प्रकाशने या संस्थेमार्फत महाराष्ट्राच्या ज्ञानभांडारात उपलब्ध झाली.

१९१० साली पुण्यात वि. का. राजवाडे व सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांनी 'भारत इतिहास संशोधन मंडळ' ही संस्था स्थापन केली. राजवाड्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने जमा करणाचा प्रकल्प हाती घेतला होता. त्यांच्या इतिहासमीमांसेने महाराष्ट्रात इतिहासाच्या अभ्यासाच्या पद्धतिशास्त्राचा पाया घातला गेला. या संस्थेतून चिं. वि. वैद्य, दत्तो वामन पोतदार, ग. ह. खरे, वा. सी. बेंद्रे यांनी इतिहाससंशोधनात मौलिक भर घातली. या संस्थेने १६ खंडात शिवचरित्र साहित्य, ६ खंडात ऐतिहासिक फारसी साहित्य, ३ खंडात शिवकालीन पत्रसंग्रह, २ खंडात ऐतिहासिक पोवाडे इत्यादी ग्रंथसंपदा प्रसिद्ध केली. शिवाय इतिहास संशोधन पत्रिका चालवून ऐतिहासिक संशोधन क्षेत्रातील नव्या कामांना नित्यनेमाने प्रसिद्ध करण्याचे माध्यम उपलब्ध करून दिले. भारत इतिहास संशोधन मंडळात मतभेद झाल्यावर राजवाडे २६ वर्षे धुळ्यात राहिले. १९२६ साली त्यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ धुळ्यात त्यांच्या नावाने 'राजवाडे संशोधन मंडळ ' स्थापन करण्यात आले. या संस्थेने इतिहासग्रंथ व कागदपत्रांच्या संग्रहाबरोबरच इतिहास संशोधन पत्रिका चालविली. १९३५ साली धुळ्यात शंकर श्रीकृष्ण देव यांनी सत्कार्योत्तेजक सभा ही संस्था स्थापन करून 'समर्थ वाग्देवता मंदिर' ही संशोधनसंस्था सुरु केली. अनेक प्राचीन हस्तलिखिते व ग्रंथांचा संग्रह, रामदासी साहित्याचे व 'रामदास आणि रामदासी' ह्या मासिक पत्रिकेचे प्रकाशन असे उपक्रम चालवून या संस्थेने महाराष्ट्र धर्माच्या सांस्कृतिक ठेव्यांचे जतन-संवर्धन केले. १९४२ ला विनोबा भावे यांचे बंधू शिवाजीराव भावे यांनी धुळ्याला महात्मा गांधी तत्त्वज्ञान मंदिर ही संस्था स्थापून गांधीवादी विचारसरणीला पूरक अशा ज्ञानप्रवर्तनाचे व संशोधनाचे काम केले.१९१६ साली अमळनेरला प्रताप तत्त्वज्ञान मंदिर संस्था स्थापन झाली. साने गुरुजींना या केंद्रातूनच तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. जी. आर. मलकानी हे या केंद्राचे पहिले संचालक होते. आत्मारामशास्त्री जेरे या केंद्रात वैदिक तत्त्वज्ञान शिकवित. केंद्राने भारतीय पातळीवर तत्त्वज्ञान परिषदा घेऊन तत्त्वज्ञानाच्या विविध अभ्यासप्रवाहांना व अभ्यासपद्धतींना गती देण्याचे काम केले.

१९३४ साली नागपूरला वा. वि. मिराशी यांच्या पुढाकारातून मध्यप्रांत संशोधन मंडळ (पुढे 'विदर्भ संशोधन मंडळ' असे नामांतर) स्थापन झाले. या मंडळाने संशोधन वार्षिक प्रसिद्ध करण्याची परंपरा सुरू करून विदर्भात संशोधकांची पिढी तयार केली. १९४८ साली अ. का. प्रियोळकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई मराठी संशोधन मंडळ

स्थापन झाले. विद्यापीठीय संशोधन-अभ्यासापेक्षा अशा स्वायत्त संशोधन संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्रात ऐतिहासिक, समाजाशास्त्रीय व वाङ्मयीन संशोधनाचा विकास या कालखंडात झालेला पहायला मिळतो.

## ५.११. संस्थानांतील शिक्षण :

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या शिक्षणविचाराच्या प्रेरणा आणि परंपरांचा तपास करताना खालसा मुलुखातील शैक्षणिक प्रवाहांपेक्षा संस्थानिकांच्या प्रदेशातील शिक्षणाचे प्रवाह वेगळे होते, की त्यांच्यात काही समान प्रेरणा होत्या यांचा तपास आपल्याला करावयाचा आहे.

**सांगली संस्थानातील शिक्षण :**

सांगली संस्थानात कॅ. बर्क यांनी १९०८ साली संस्थानातील ७ ते १० वर्षांच्या मुलांसाठी व ७ ते १० वर्षांच्या मुलींसाठी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. सक्तीच्या शिक्षणाची ही माहिती प्रत्येक गावात दवंडी देऊन लोकांपर्यंत पोहचविण्याचे आदेश काढण्यात आले. (Order No. 2592/ 17-07-1908) ना. गोपाळकृष्ण गोखले यांनी मांडलेल्या विधेयकापूर्वीच सांगलीत सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण आणण्यात कॅ. बर्क यांनी पुढाकार घेतला, म्हणून या घटनेला ऐतिहासिक महत्त्व आहे. देवळात, धर्मशाळेत किंवा गावकऱ्यांनी उपलब्ध करून दिलेल्या कुठल्याही जागेत प्राथमिक शाळा सुरु करून हा प्रयोग राबविला गेला. ९०० पेक्षा जास्त लोकवस्तीच्या गावांसाठी सरासरी ४५ विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी असेल तर सरकार शाळेची इमारत बांधून देईल अशी योजना जाहीर करण्यात आली. निम्नवर्गीय समाजगटातील मुलां-मुलींना शालेय शिक्षणाकडे वळविण्यासाठी महिन्याला २० दिवस हजर असण्याच्या अटीवर प्रतिदिन २ आणे प्रोत्साहन भत्ता दिला जात असे. महिन्यात सलग ५ दिवस किंवा पूर्वपरवानगीशिवाय १० दिवस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास २ आणे दंड आकारला जाई. शालेय वर्तनव्यवहाराचे मूल्य जोपासण्यासाठी शिक्षक-पालक व गावकरी यांच्यासाठी आचारसंहिताही लागू करण्यात आली होती. तसेच शिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी तालुकानिहाय मामलेदारांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय शिक्षण मंडळांची स्थापना करण्यात आली. त्यात मामलेदारांखेरीज दरबाराने नियुक्त केलेले ३ सदस्य व तालुक्याच्या रयतसभेने नियुक्त केलेले ३ सदस्य असत. शिक्षणव्यवस्थेची देखभाल, परीक्षा घेणे ही कामे या मंडळाकडे सोपविण्यात आली होती. शिवाय शाळा निरीक्षणासाठी साहायक उपशिक्षणाधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यात आले होते. (Sangali Gazette, 28-10-1908)

**कोल्हापूर संस्थानातील शिक्षण :**

कोल्हापूर संस्थानात श्रीशाहू छत्रपतींनी सामाजिक पुनर्घटनेचा प्रकल्प म्हणूनच त्यांनी शिक्षणप्रसाराच्या विषयातही जाणीवपूर्वक लक्ष घातले होते. आपल्या भाषणांतून वेळोवेळी मांडलेल्या विचारांतून त्यांनी शिक्षणविषयक त्यांचा दृष्टिकोन व्यक्त केला आहे; साररूपाने त्यातले ठळक मुद्दे असे होते :

१. प्रचलित जातिप्रधान समाजरचनेत ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशी सामाजिक फूट पडली असून हा सामाजिक दुरावा ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने निर्माण झालेला आहे. शासकीय नोकऱ्यांत, राजकीय व सामाजिक सत्तास्थानांवर ब्राह्मणांचीच वर्णी लागत असल्याने ब्राह्मणेतरांना कायम वंचित स्थानी रहावे लागले आहे. ब्राह्मणांची ही 'रिलिजिअस ब्यूरॉक्रसी' तुटून पडल्याशिवाय देशोद्धार होणार नाही, अशी महाराजांची समजूत होती. ब्राह्मणेतर वर्गास शिक्षणाच्या मध्यवर्ती प्रवाहात आणले तरच हा सामाजिक असमतोल दूर होईल म्हणून महाराजांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी आपल्या संस्थानात अनेक प्रोत्साहनपर योजना राबविल्या.

२. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक समता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा विचार श्रीशाहू छत्रपतींच्या शिक्षणप्रकल्पांचा मूलाधार होता. इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती विद्यासंपन्न अशा अल्पसंख्यांक ब्राह्मणवर्गाच्या हाती देणे त्यांना बिलकूल पसंत नव्हते. आपल्या भाषणांतून हा विचार मांडताना ते म्हणाले होते, "बहुजन समाजाचा शिक्षणाबाबतीतला दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अंशत: तरी तो आल्याशिवाय सुधारणेच्या दिशेने माझ्या संस्थानच्या राज्यकारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालणेस मी धजणार नाही. .. मतदारास आपले हक्क समजून उपभोग घेण्याची पात्रता थोड्याबहुत अंशाने तरी त्यांच्या अंगी येण्यापूर्वी लहानसहान जातीसदेखील विद्येची गोडी लागण्यापूर्वी स्वराज्य देणे मला सुरक्षित वाटत नाही.." (जाधव भगवानराव, २००९, पृ. ५९, ६२-६३)

३. शिक्षण हे सामाजिक सुधारणांचे माध्यम आहे. समाजाची बौद्धिक व नैतिक पात्रता वाढविण्यासाठी लागणारी मानसिक मशागत शिक्षणाच्या माध्यमातून होऊ शकते, यावर महाराजांची श्रद्धा होती. आपल्या संस्थानातील राजाराम कॉलेज, राजाराम हायस्कूल, गुरुकुल, अनाथालय, सरदार बोर्डिंग वगैरे सर्व संस्थांची सूत्रे आर्य समाजाच्या हाती देण्यामागे त्यांचा हा दृष्टिकोन होता. आर्य समाजाने स्पर्शास्पर्शतेचे काल्पनिक बंड मोडण्याचे काम केले होते, प्रेमाने सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यावर त्यांचा भर होता. संयुक्त प्रांतातील आर्य समाजी संस्थेकडे राजाराम कॉलेज देण्याचा ठराव करताना महाराजांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती : "या

सभेचे सभासद सामाजिक सुधारणेस अनुकूल असून त्यांच्या हाती कॉलेज भरभराटीस येईल असे वाटते. ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाचे हे कॉलेज एक केंद्र बनेल असेही मला वाटते. ब्राह्मणांनी चालविलेल्या संस्थांत त्यांना उत्तेजन मिळत नाही व साहजिकच तेथे ब्राह्मणेतरांचा फायदा होत नाही." (लट्ठे, २००८, पृ. ३६४) या विचाराला अनुसरून १९१९ च्या जूनपासून राजाराम कॉलेज आर्य प्रतिनिधी सभेच्या ताब्यात दिले आणि हायस्कूल व कॉलेजच्या खर्चासाठी वार्षिक २० हजारांची तरतूद केली.

४. २५ सप्टेंबर १९०१ रोजी कर्नल सिली यांनी मराठा वसतिगृहाच्या नव्या इमारतीचा पायाभरणीचा दगड बसविला. कर्नल सिली यांनी आपल्या भाषणातून महाराजांना आपल्या शिक्षणप्रसाराची दिशा केवळ मराठा जातीपुरता मर्यादित ठेवू नका, असाही सल्ला दिला होता. ते म्हणाले होते की, "कोल्हापूर संस्थानात फक्त मराठेच राहतात असे नाही, ही गोष्ट तुम्ही विसरता कामा नये. मराठा जातीच्या हितसंबंधाला चालना देण्यासाठी तुम्ही शक्य ते प्रयत्न करीत असताना राष्ट्रपुरुषाचे याखेरीज इतर अवयव आहेत, ही गोष्ट तुम्ही विसरता कामा नये...कोल्हापूरला ज्ञानार्जनासाठी जे मराठे विद्यार्थी येतात त्यांची खाण्यापिण्याची कमी खर्चात सोय करूनच न थांबता, कमेटीने विद्यार्थ्यांच्या नैतिक (कदाचित धार्मिकही म्हणता येईल) अभ्युदयाकडेही लक्ष दिले पाहिजे. .. बौद्धिक शिक्षणाला जर नैतिक शिक्षणाची जोड मिळाली नाही तर चांगले नागरिक कधीही निपजणार नाहीत."(लट्ठे अण्णासाहेब, २००८, पृ.११४, ११८-११९) महाराजांच्या शिक्षणविचारांना दिशा देणारेच हे प्रेरणास्त्रोत होते.

**मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस :**

कोल्हापूर संस्थानचे वर्णन स्वत: श्रीशाहू महाराजांनीच 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' असे केले होते. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिकला श्री उदोजी मराठा बोर्डिंगच्या पायाभरणी समारंभाच्या भाषणात बोलताना महाराज म्हणाले होते की, "ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंटस' असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात, त्याप्रमाणे कोल्हापूरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ यश मिळाले आहे." (जाधव भगवानराव,२००९, पृ.६१) इ. स. १९०० साली महाराजांनी सर्वप्रथम आपल्या राजवाड्यातच मराठा विद्यार्थ्यांची सोय लावली. मराठा समाजात शिक्षणाचे मूल्य रूजविण्यासाठी विद्यार्थ्यांची विशेष बडदास्त ठेवण्यावर त्यांनी भर दिला. या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी बैलगाड्यांऐवजी टांगे देण्यात आले. परंतु या विशेष बडदास्तीतून ही मुले शिक्षणापेक्षा सरदारी थाटच अधिक शिकत असल्याचे ध्यानात आल्यावर महाराजांनी या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याची योजना आखली. १८ एप्रिल १९०१ रोजी महाराणी व्हिक्टोरिया राणीच्या

नावाने मराठा वसतिगृह काढण्यात आले. वसतिगृहाच्या इमारतीसाठी भरीव देणगी दिली व दैनंदिन खर्च भागविण्यासाठी २००० रुपयांचे वर्षासन, ५०० रुपयांची देणगी आणि वसतिगृहाच्या फंडावर सरकारी खजिन्यातून ८ टक्के व्याज देण्याची तरतूद केली.

अर्थात, कोल्हापूर संस्थानातून छत्रपती शाहू महाराजांनी केवळ एकाच जातीच्या अभ्युदयाचा विचार न करता सर्व ब्राह्मणेतर जातींच्या मुलांच्या शिक्षणासाठी हातभार लावला. १९०१ साली एप्रिल महिन्यात जैन वसतिगृहाची स्थापना झाली होती. १९०४ साली महाराजांनी दरबारी लोकांचा विरोध डावलून या जैन वसतिगृहासाठी मराठा वसतिगृहासमोरची जागा बक्षिस दिली. मुंबईच्या शेठ माणिकचंद हिराचंद यांनी इमारत बांधणीसाठी देणगी दिली. छत्रपती शाहू महाराजांनीही इमारत बांधकामासाठी निधी पुरवला, शिवाय ३५० रुपयांची वार्षिक देणगी व संस्थानच्या विद्यालयात मराठा विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती जैन विद्यार्थ्यांनाही दिल्या. त्यानंतर १९०७ साली लिंगायत वसतिगृह अस्तित्वात आले. मराठा वसतिगृहात १० मुसलमान विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची तरतूद केली. शिवाय ५० मुसलमान विद्यार्थ्यांची सोय होईल असे स्वतंत्र वसतिगृह व्हावे म्हणून इमारतीसाठी जागा व इमारत फंडाकरिता ५५०० रुपयांची देणगी दिली. शिवाय वार्षिक ५० रुपयांचे अनुदानही मंजूर केले. शिंपी समाजाच्या ३० विद्यार्थ्यांची सोय होईल असे 'नामदेव वसतिगृह' स्थापन केले. प्रभू लोकांसाठी ३० विद्यार्थ्यांची सोय होईल अशी वसतिगृहाची इमारत बांधण्यात आली. या इमारतीसाठी महाराजांनी १५००० रुपयांची देणगी दिली. ब्राह्मणवर्गाकडून ज्यांच्या ब्राह्मणत्वाविषयी शंका उपस्थित केली जात असे अशा सारस्वत अथवा शेणवी लोकांच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी सरस्वतीबाई लाटकर यांनी दिलेल्या इमारत निधीत महाराजांनी १६०० रुपयांची भर घातली. या वसतिगृहात ३० विद्यार्थ्यांची सोय झाली. याखेरीज प्रभू लोकांच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी १५००० रुपयांची देणगी दिली; याही वसतिगृहात ३० विद्यार्थ्यांची सोय झाली. १९०८ साली काही सुशिक्षित ब्राह्मणेतरांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन केली. या संस्थेच्या मिस क्लार्क वसतिगृहाची जागा व इमारत बांधकामाचा निम्मा खर्च महाराजांनीच केला. १९१४ साली ही इमारत बांधून झाली. या वसतिगृहात २२ विद्यार्थी रहात होते. मराठा सेनेच्या घोड्यांकरिता जिने तयार करणाऱ्या औद्योगिक कौशल्ये असणाऱ्या ब्राह्मणेतर जिनगर जातीच्या लोकांसाठी कोल्हापूरात वसतिगृहाची इमारत बांधून दिली. या इमारतीसाठी सुमारे ३०,००० रुपयांची तरतूद केली, शिवाय वसतिगृहाच्या नित्य खर्चासाठी वर्षासनही घालून दिले. कोल्हापूरात १९२१ साली मराठा विद्यार्थ्यांसाठी सुरू झालेल्या प्रिन्स शिवाजी विद्यार्थिगृहासही सात हजार रुपयांची देणगी दिली.(लड्डे आण्णासाहेब,२००८,पृ.११२-१२८) कोल्हापूर संस्थानाबाहेरही महाराजांनी नाशिकला उदोजी मराठा बोर्डिंगच्या

इमारतीसाठी १५ हजार,पुण्याला ताराबाई विद्यार्थिगृहाला १५ हजार व मराठा हायस्कूल स्थापन करण्यासाठी १५ हजार रुपयांची देणगी दिली.

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यात आला होता. त्यामागची आपली भूमिका विशद करताना महाराज म्हणाले होते की, "रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते थोड्या लोकांच्या हाती पडणार व एक स्वदेशी ब्यूरॉक्रसी तयार होणार. या सुशिक्षित ब्यूरॉक्रसीचा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला, मराठ्यांचा इतिहासच पहा. शाहू महाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकावण्यास संधी मिळाली याचा परिणाम छत्रपतींचा कारागृहवास हा झाला. जातिभेद तीव्र झाले, जातिमत्सर वाढला व अस्पृश्यांस तर गळ्यात गाडगे व कंबरेस फेसाटी बांधून फिरावे लागे. हा प्रसंग कोठेही पुन्हा येणे चांगले नाही. याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे." इतकेच नाही तर "माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती" ( जाधव भगवानराव, २००९, पृ. ६४) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामागे बहुजनसमाजातील शिक्षणाचा हा फार मोठा अनुशेष भरून काढण्याचे आव्हान श्री शाहू छत्रपतींनी मनावर घेतले होते.

अर्थात, शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, तर राजकीय, सामाजिक समज असणारा मनुष्य घडविणे हे महाराजांना अभिप्रेत होते. त्यामुळेच राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी महाराजांनी ४० वर्षांखालील अप्रशिक्षित शिक्षकांसाठी १९११ साली 'शिक्षक प्रशिक्षणा'ची योजना तयार केली. अशा प्रशिक्षणार्थी शिक्षकांना सहा महिन्यांची निमपगारी रजा देण्याचीही सवलत देण्यात आली. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, १४ ऑक्टोबर १९११) १६ डिसेंबर १९११ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील डिप्रेस्ड क्लासेसच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यात येईल, असे घोषित केले. (पवार जयसिंगराव, २०१८, पृ. ५०) प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी महाराजांनी १९१२ साली वतनदार शिक्षक नेमण्याची योजना आणली. शिक्षकांना पगारासाठी वतनी जमिनी द्याव्या अशी ही योजना होती. (मात्र पुढे १९१७ नंतर महाराजांनी ही योजना रद्द केली.) या उपाययोजनांमुळे १९१२ साली कोल्हापूर संस्थानातून १३५ विद्यार्थी व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास झाले; त्यात मराठे, जैन, लिंगायत, मुसलमान, गुरव, सोनार अस्पृश्य अशा मागासवर्गीय

विद्यार्थ्यांचाही समावेश होता. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, मार्च १९१३) सप्टेंबर १९१६ मध्ये कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हुकूम काढण्यात आला व कायद्याची संहिता २९ सप्टेंबर १९१७ च्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आली. प्राथमिक शिक्षणासाठी एक लक्ष रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली. निरनिराळ्या खेड्यांत मिळून ९६ नव्या शाळा उघडल्या. या शाळांतून ४६३१ विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. (लड्डे, २००८, पृ. ३६०-३६१) १९१८ साली मोफत व सक्तीचे शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराजांनी थेट स्वत:च्या देखरेखीखाली काम करणारे स्वतंत्र खाते निर्माण केले. प्रो. रघुनाथ नारायण आपटे यांची या खात्याचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, २६ जानेवारी १९१८) पहिल्या महायुद्धामुळे महागाई वाढलेली असल्यामुळे शिक्षणावर पाहिजे तेवढा खर्च करणे शक्य होत नसल्याने प्राथमिक शिक्षणाकरिता घरटी एक रुपया जादा कर (कोल्हापूरच्या भाषेत 'फाळा') आकारला जाऊ लागला. घरातील सर्व मुलांस शिक्षण मिळून त्याबद्दल वर्षास एक रुपया कर तसा फार नाही, असेही या जाहीरनाम्यात म्हटले होते. (२८ फेब्रुवारी १९१८ चा जाहीरनामा, करवीर गॅझेट, भाग १, २ मार्च १९१८) प्राथमिक शिक्षणाकडे सर्व सामर्थ्य खर्च करावे यासाठी एप्रिल १९१८ मध्ये राजाराम कॉलेज बंद करण्याचाही ते विचार करु लागले होते. (अर्थात नंतर त्यांनी ते आर्य समाजाच्या संस्थेकडे चालवायला दिले.) जुलै १९१८ नंतर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनासाठी पन्हाळा, हातकणंगले, गडहिंग्लज व करवीर शहर असे चार भाग करण्यात आले व प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र व्यवस्थापक नेमण्यात आले. (करवीर गॅझेट, भाग१,१३ जुलै १९१८) सर्वच गावांत प्राथमिक शाळेच्या इमारती नव्हत्या, त्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून गावातील देवळात, धर्मशाळेत अथवा चावडीत व्यवस्था करण्याचा हुकूम काढण्यात आला. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, ३० नोव्हेंबर १९१८)

हुशार मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून करवीर सरकारने शाहू महाराजांची राजकन्या श्रीराधाबाई उर्फ अक्कासाहेब महाराज व भावनगरच्या महाराणी नंदकुवर यांच्या नावाने चौथ्या इयत्तेतील विद्यार्थिनींसाठी शिष्यवृत्त्या देण्याची योजना जाहीर केली होती. या योजनेनुसार प्रत्येकी वार्षिक ४० रुपयांप्रमाणे पाच मुलींना स्कॉलरशिप दिली जात असे. शिवाय उत्तम वर्तनासाठी श्रीराधाबाई अक्कासाहेब महाराज यांच्या नावाने ४० रुपये किंमतीचे बक्षीसही दिले जात असे. (करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, ५ एप्रिल १९१३)

**शाळांतून अस्पश्यता निर्मूलन :**

शालेय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये स्पृश्यास्पृश्यभेदाची जाणीव निर्माण होऊ नये

यासाठी महाराजांनी २२ ऑगस्ट १९१९ रोजी विद्याखात्यात अस्पृश्यता न पाळण्याचा हुकूम काढला. या हुकूमात म्हटले होते की, "हुजुरांच्या असे पाहण्यात आले की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात निरनिराळ्या तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्यांच्या इमारतीच्या कंपाऊंडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खासगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून, अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षण संस्था गरीब लोकांकरिता असून, गरिबातील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रितीने का वागवावे? हुजुरांची अंत:करणपूर्वक इच्छा आहे की शाळा खात्यातील ज्या खासगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट किंवा इमारती किंवा प्लेग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते, त्यांनी स्पृश्य वर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात; परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. जर अस्पृश्यांना समतेने वागविले नाही, तर मग तो प्रिन्सिपॉल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल आणि खासगी संस्थांना जी मदत मिळते, ती काढून घेण्यात येईल. .. शाळा खात्यातील कोणा इसमाची असे करण्यास हरकत असेल, तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्यांचे आत आपला राजीनामा पाठवावा; अर्थात त्याला पेन्शन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेची हरकत असेल, तर त्यांचीही ग्रँट किंवा इतर मदत दरबार बंद करील." (पवार जयसिंगराव, २०१८, पृ. ११०-१११)

**हैद्राबाद संस्थानातील शिक्षण :**

हैद्राबाद संस्थानात मुस्लीम राजवटीत हिंदूंच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात होते. राजभाषा उर्दू असल्याने शिक्षणाचे माध्यमही उर्दूच होते. खाजगी शाळा काढण्यासाठी निजाम सरकार अनुकूल नव्हते. सरकारी अभ्यासक्रमाखेरीज इतर अभ्यासक्रम शिकविण्यास मनाई होती. १० टक्के प्रजा शिक्षित असावी असे सर्वसाधारण धोरण होते. १९१८ साली उस्मानिया विद्यापीठ स्थापन झाले तेही मुसलमानांच्या शिक्षणासाठी. या विद्यापीठातून धर्मनिष्ठ व जात्यंध मुसलमानांची पिढी घडविण्यात आली. विद्यापीठात मुसलमानी पोशाखाची सक्ती होती. हैद्राबाद संस्थानात १९१६ साली सर्वप्रथम परभणीला 'नूतन प्राथमिक विद्यालय' आणि औरंगाबादला 'सरस्वतीभुवन' ह्या शाळा स्थापन झाल्या. १९१७ साली औरंगाबादेत दिगंबरदास चौधरी वकिलांच्या पुढाकाराने मुलींसाठी 'शारदामंदिर' नामक प्राथमिक शाळा सुरू झाली. १९२१ साली उस्मानाबाद जिल्ह्यात हिप्परगे येथे औशाचे अनंतराव कुलकर्णी व व्यंकटराव देशमुख यांनी निवासी माध्यमिक शाळा स्थापन केली. १९२७ साली गुंजोटीला श्रीकृष्ण विद्यालय, १९३५ ला

आंबाजोगाईस योगेश्वरी शिक्षण संस्थेचे हायस्कूल, १९३७ साली उदगीरला शामलाल स्मारक विद्यालय, १९३८ ला सेलूला नूतन विद्यालय व लातूर येथे ज्युबिली प्राथमिक शाळा स्थापन झाल्या. लातूरला १९४० साली राजस्थान हायस्कूल, १९४१ साली उमरगा येथे भारत विद्यालय, १९४२ साली बीडला चंपावती हायस्कूल, १९४६ ला उमरी येथे नूतन विद्यालय, नांदेडला प्रतिभा निकेतन व औरंगाबादला मराठा हायस्कूल सुरू झाले. रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे यांच्या प्रेरणेतून ह्या शाळा निघाल्या. मुलींच्या शिक्षणासाठी मात्र इतक्या मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेतला गेला नाही. १९४२ साली लातूरला सुशीलाबाई दिवाण यांची खाजगी शाळा सुरू होती, तिचे १९४६ साली गोदावरी कन्या शाळेत रूपांतर झाले.

१९३४ साली बीडचे वकील बलभीमराव कदम व बापूसाहेब एळंबकर यांनी पुढाकार घेऊन बहुजन समाजाच्या ४० पोटजातींचा समावेश असलेल्या 'हैद्राबाद संस्थान मराठा शिक्षण प्रसारक मंडळा'ची स्थापना केली. परभणीचे श्रीरंगराव कुपटेकर वकील हे अध्यक्ष होते. बहुजन व मागास जातीतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन करणे, हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे, प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू करणे अशी सर्वसाधारण उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. १९४१ साली बीडला नारायणराव चव्हाण वकील यांच्या अध्यक्षतेखाली सप्तवार्षिक उत्सव साजरा करण्यात आला व त्यानंतर या मराठा शिक्षण परिषदेची औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, तुळजापूर इत्यादी ठिकाणी वार्षिक अधिवेशने होऊ लागली. १९४२ साली बीडला पहिले अधिवेशन अण्णासाहेब गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. नांदेडच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान पंजाबराव देशमुख यांनी तर तुळजापूरच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान व्यंकटराव जाधव यांनी भूषविले होते. मराठा परिषदेच्या वतीने हैद्राबादेत 'मराठा वसतिगृह' स्थापन करण्यात आल्याने बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय झाली. बहुजन समाजात शिक्षणप्रसार व्हावा या ध्येयाने प्रेरित झालेल्या पंढरीनाथ पाटील ढाकेफळकर यांनीही औरंगाबाद येथे १९४१ साली छत्रपती शिवाजी मराठा बोर्डिंग व १९४६ साली मराठा विद्यालय स्थापन केले. अशा प्रकारे हैद्राबाद संस्थानात अल्प प्रमाणात का होईना शैक्षणिक जागृतीचे पर्व सुरू झाले होते. (गाडे, १९४६)

**शिक्षण परिषदांचे कार्य :**

हैद्राबाद संस्थानात स्त्री शिक्षणाचा विषय उपेक्षितच होता. १९२३ साली हैद्राबादला श्रीमती सरलाबाई चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सामाजिक परिषदेत अहिल्याबाई मल्लाण्णा यांनी पुण्याच्या भारतीय महिला विद्यापीठाच्या धर्तीवर कन्या विद्यालय स्थापन करण्याचा ठराव मांडला होता व त्या ठरावास पार्वतीबाई आठवले आणि काशीबाई किर्लोस्कर यांनी अनुमोदन दिले होते. याच अधिवेशनात सक्तीच्या व

मोफत प्राथमिक शिक्षणाचाही ठराव पारित झाला होता. १ मार्च १९१५ ला दारुल उलम या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पुढाकार घेऊन 'हैद्राबाद शिक्षण परिषद" (Hyderabad Educational Conference) स्थापन केली. पौर्वात्य शिक्षणाला पाश्चिमात्य विज्ञान, तंत्रज्ञान व धंदेशिक्षणाची जोड द्यावी यावर परिषदेचा भर होता. १९१५ ते १९२० या काळात या परिषदेची हैद्राबाद, औरंगाबाद, लातूर , परभणी येथे एकूण सहा अधिवेशने झाली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे अशी मागणी परिषदेतून पुढे आली व उर्दूच्या सक्तीला विरोध होऊ लागला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याची मागणी झाली. मुसलमानांसाठी धार्मिक शिक्षण दिले जाते, तशी हिंदूसाठीही धार्मिक शिक्षणाची सुविधा असावी अशा आशयाचे ठराव पारित होऊ लागले. उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेचे श्रेयही या परिषदेचे संस्थापक चिटणीस मौलवी महंमद मुर्तुझा यांना देण्यात येते. पुढे या परिषदेच्या माध्यमातून हिंदू व मुसलमान एकत्र येत आहेत, हे लक्षात आल्यावर निजाम सरकारने परिषदेवर बंधने आणली. परिषदेचा अध्यक्ष व स्वागताध्यक्ष सरकारनियुक्त असेल असा दंडक घालण्यात आला. या सरकारी नियंत्रणानंतर लोक परिषदेतून बाहेर पडू लागले व या शिक्षण परिषदेची इतिश्री झाली.

यानंतर २१ ऑक्टोबर १९२८ रोजी केशवराव कोरटकर यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबादेत 'जनता शिक्षण परिषद' स्थापन करण्यात आली. १९२९ सालापासून जनता शिक्षण परिषदेची अधिवेशने होऊ लागली. केशवराव भोपटकर, विनायकराव विद्यालंकार, काशिनाथराव वैद्य, गोविंदराव नानल, बी. रामकृष्ण राव यांचा शिक्षण परिषदा भरविण्यात पुढाकार होता. पहिली शैक्षणिक परिषद २५-२६ ऑक्टोबर १९२९ ला हैद्राबाद येथे झाली. भारत सेवक समाजाचे पं.हृदयनाथ कुंझरू हे पहिल्या परिषदेचे अध्यक्ष होते. राजा धनराज गिरजी यांनी स्वागताध्यक्षाची व एम. हनुमंतराव यांनी चिटणीसपदाची जबाबदारी निभावली होती. ५ ऑगस्ट १९३० ला हैद्राबादेतच दुसरे अधिवेशन डॉ. राम प्रसाद त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी वामनराव नाईक यांनी व चिटणीसपदाची जबाबदारी काशिनाथराव वैद्य यांनी निभावली. मात्र या अधिवेशनासाठी निजाम सरकारने जामीन मागितला व संस्थानाबाहेरचा अध्यक्ष नेमता कामा नये, अशी अट घातली. तिसरे अधिवेशन काशिनाथराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबादला १९३० च्या मे महिन्यात झाले. स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी राय गणपत लाल व चिटणीसपदाची जबाबदारी लक्ष्मणराव गानू यांनी निभावली. या तिसऱ्या अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ यांनी मेकॅन्झी यांनी तयार केलेल्या शिक्षणयोजनेवर हल्ला चढवला होता, त्यामुळे हे अधिवेशन संस्मरणीय राहिले. चौथे अधिवेशन १९४२ साली परभणीला विनायकराव विद्यालंकार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. गोविंदराव नानल

हे स्वागताध्यक्ष होते. या अधिवेशनाला 'वंदे मातरम्' सत्याग्रहात भाग घेतलेले बरेच विद्यार्थी हजर होते. पाचवे अधिवेशन हैद्राबादला २७ ते २९ नोव्हेंबर १९४४ या काळात लक्ष्मणराव गानू यांच्या अध्यक्षतेखाली झाले. बी. रामकृष्णराव स्वागताध्यक्ष होते. या पाचही परिषदांमध्ये चर्चिले गेलेले विषय स्थूलमानाने असे होते :

- पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम समित्यांवर हिंदूंना प्रतिनिधित्व द्यावे.
- अभ्यासक्रमांत धार्मिक पक्षपात नसावा व शिक्षणसंस्थांनी जातीयवादाचे निराकरण करावे.
- उर्दू भाषा व माध्यम याची सक्ती कमी करावी.
- खाजगी शाळा उघडण्यास परवानगी द्यावी.

जनता शिक्षण परिषदेच्या रेट्यामुळे काही ठिकाणी खाजगी शाळा काढण्यास परवानगी मिळाली. मात्र उर्दूची सक्ती मागे घेतली गेली नाही. धार्मिक पक्षपाताचा शिक्षणक्षेत्रावरील प्रभावही कमी झाला नाही. (भालेराव १९८७, पृ. ४०-४२) सरकारी शाळांतून फक्त सुन्नी पंथाचेच शिक्षण दिले जावे असे फर्मानही काढण्यात आले होते. उस्मानिया विद्यापीठातही मुस्लिमेतर विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर निर्बंध लादण्यात आले होते. शाळा-कॉलेजातून मुस्लीम पेहरावाची सक्ती केली जात होती.

**आर्य समाजाची वाचनालये व व्यायामशाळा :**

आर्य समाज हैद्राबाद संस्थानात व विशेषेकरून मराठवाड्यात वाचानालये, साक्षरतावर्ग, व्यायामशाळा स्थापन करण्यात अग्रेसर होता. १९०१ साली परभणीला स्थापन झालेले 'गणेश वाचनालय' हे सर्वात जुने वाचनालय. हिंगोलीसही 'गणेश वाचनालय' सुरू करण्यात आले होते. औरंगाबादचे बलवंत मोफत वाचनालय (१९२०) व नळदुर्गचे लोकमान्य वाचनालय (१९२६) हे टिळकांचे स्मारक म्हणूनच स्थापन करण्यात आले होते. याखेरीज जिल्ह्यात कळमनुरी (१९२२), वसमतला बोधानंद वाचनालय (१९२५), चारठाणला गोकुळेश्वर वाचनालय (१९२९), लातूरचे बलभीम वाचनालय (१९३०), जांब समर्थ येथे 'समर्थ सार्वजनिक वाचनालय' (१९३२), परतूरचे 'आनंद वाचनालय' (१९३२),जेवळीचे सुबोध वाचनालय (१९३४), कुरुंदा येथील 'शारदा वाचनालय' (१९३५), परांडाचे 'हंस वाचनालय' (१९३८), जिंतूरचे 'समर्थ वाचनालय' (१९३९), लातूरचे मारवाडी वाचनालय (१९३९),वैजापूरचे वैजनाथ वाचनालय (१९३९), कंधारचे शारदा वाचनालय (१९४१), उदगीरचे 'संग्राम वाचनालय' (१९४२), हिंगोलीचे 'साहित्य मंदिर वाचनालय' (१९४५), शिरुर अनंतपाळचे 'प्रभात वाचनालय' (१९४५), आंबाजोगाईचे साहित्य निकेतन वाचनालय (१९४५), तुळजापूरचे विजय वाचनालय (१९४७) इत्यादी वाचनालयातून मराठी वृत्तपत्रे, राष्ट्रभावना

जागवणारे वाङ्मय (जसे हरिभाऊ आपट्यांचे 'उष:काल', सावरकरांचे 'माझी जन्मठेप', बकिमचंद्रांची 'आनंदमठ', तुळजापूरकरांची 'माझे रामायण') वाचकांपर्यंत पोहचविले जाई.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात स्वयंसेवकांची फळी उभी करण्यात आर्य समाजाने बलोपासनेसाठी ठिकठिकाणी उघडलेल्या व्यायामशाळांचे योगदान मोठे आहे. एकट्या लातूरमध्येच आर्य समाज व्यायामशाळा, बलभीम व्यायामशाळा, रामलिंगेश्वर व्यायामशाळा, जैन मंदिर व्यायामशाळा (१९३४) अशा चार व्यायामशाळा होत्या. याखेरीज चाकूर (१९३५), अहमदपूर (१९४२), अंधोरी (१९४५), येलदरी-अहमदपूर (१९४६), येथील व्यायामशाळा; तसेच उदगीरची संग्राम व्यायामशाळा, परभणीची हनुमान व्यायामशाळा, बीड, धारूर, माजलगाव, पिंपळनेर, परळी, आंबाजोगाई, मानवत इत्यादी ठिकाणच्या व्यायामशाळांतून तलवार, दांडपट्टा, बंदूक चालविण्याचे शिक्षण दिले जात असे. अमरावतीच्या हनुमान व्यायामशाळेत प्रशिक्षण घेऊन आलेले शिक्षक हे स्थानिक व्यायामशाळांतून व्यायाम शिकवीत. या संघटनेमार्फत व्यायाम परिषदाही घेतल्या जात. एका व्यायाम परिषदेचे अध्यक्षस्थान मुंबई प्रांताचे पंतप्रधान बाळासाहेब खेर यांनी भुषविले होते. (भालेराव, १९८७, पृ. ५४-५५)

**पीपल्स एज्युकेशन सोसायटी :**

१९४५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईस 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त मंडळाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्ष होते व हैद्राबाद संस्थानातले जे. एच. सुबय्या व आर. आर. भोळे; मद्रास प्रांतातले एन. शिवराज, मुंबई प्रांतातले सीतारामपंत बोले, म. वा. दोंदे, एस. सी. जोशी, एच. के. पटेल, बॅ. समर्थ व व्ही. जी. राव हे सदस्य होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या उद्देशपत्रिकेत संस्था स्थापनेची भूमिका पुढील शब्दांत मांडण्यात आली होती- "The People's Education Society's objective is not merely to give education, but to give education in such a manner as to promote intellectual, moral and social democracy. This is what modern India needs and this is what well-wishers of India must promote." १९४६ साली या सोसायटीने मुंबईत सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय आणि सिद्धार्थ विधी महाविद्यालय सुरू केले. नंतर हैद्राबाद प्रांतात मोडणाऱ्या औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. हैद्राबादच्या निजामाने मुंबईच्या सिद्धार्थ महाविद्यालयास पाच लाख रुपयांची देणगी दिली होती व औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयासाठी एक कोटी रुपयांच्या शेड्यूल्ड कास्टस् ट्रस्टफंडमार्फत १२ लाख रुपये बिनव्याजी कर्ज दिले होते. वार्षिक ५० हजार रुपयांनी कर्जाची परतफेड अपेक्षित होती. या रकमेतून ९ लाख रुपये मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीसाठी व ३ लाख रुपये उपकरणे व फर्निचरसाठी खर्च

करण्यात आले होते.१९५० साली मुंबई प्रांतात ९० महाविद्यालये होती, हैद्राबाद संस्थानात मात्र केवळ १७ महाविद्यालये होती. हैद्राबाद संस्थानातला हा शैक्षणिक मागासलेपणा लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी नव्या महाविद्यालयासाठी औरंगाबादची निवड केली होती. १९ जून १९५० पासून महाविद्यालय सुरू झाले तेव्हा मिलिंद महाविद्यालयातली एकूण विद्यार्थी संख्या १४० होती. मुले-मुली यांचे सहशिक्षण व अस्पृश्यांसह सर्व जातीधर्मांच्या मुलांना प्रवेश हे या महाविद्यालयाचे वैशिष्ट्य होते. (नरवडे, १९८८, पृ. ६२-६६)

**बडोदे संस्थानातील शिक्षण :**

बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड हे प्रागतिक विचारसरणीचे राजे होते. भारतीय समाजातील रूढी-परंपरेतून आलेली गतानुगतिकता, दास्यवृत्ती आणि शोषणाचे आकृतिबंध पुसून टाकायचे असतील तर त्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या प्रजाजनांची वैचारिक मुस घडविली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या लेखी शिक्षण याचा अर्थ उच्चवर्गीय जनतेबरोबर सामान्य जनतेलाही योग्य रीतीने कार्यक्षम व सुसज्ज करणे असा होता. त्यामुळे गरीब-श्रीमंत असा भेद न करता सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे हे त्यांनी आपले राजकर्तव्य मानले. आपल्या संस्थानात हा ज्ञानोदय घडवून आणण्यासाठी त्यांनी १९ व्या शतकाच्या अखेरच्या पर्वात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा कायदा केला होता. १८७९ साली १२८ खेड्यात शाळा सुरू केल्या होत्या. बडोदे संस्थानात शिक्षणासाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी ७५ % खर्च प्राथमिक शिक्षणावर केला जात असे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे बडोदे संस्थानातील भिल्ल, वाघरी, दुबळे , कोळी या मागासवर्गीय जातीतही साक्षरतेचे प्रमाण भारतातल्या इतर आदिवासींच्या तुलनेत अधिक होते. सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केल्यानंतर अंत्यजांच्या शाळांची संख्या २४७ पर्यंत आणि विद्यार्थीसंख्या ९,२६९ पर्यंत नेण्याची कामगिरी त्यांनी पार पाडली होती. राज्यकारभारात सुशिक्षित अंत्यज तरुणांना थेट संधी देण्याच्या भूमिकेतून १९१३ साली त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिष्यवृत्ती देऊन कोलंबिया विद्यापीठात पीएच्.डी करण्यासाठी पाठविले.

शिक्षण म्हणजे केवळ नवी माहिती संपादित करणे नसून शिक्षणातून शिष्टाचारसंपन्नता, शीलनिर्मिती आणि हुशारीबरोबर शहाणपणाची वाढ झाली पाहिजे यादृष्टीने आपल्या संस्थानातील शिक्षणाचा आशय ठरविण्याकडे त्यांनी जातीने लक्ष दिले. शिक्षणाने आणि ग्रंथवाचनाने मनाची कवाडे खुली होतात, परमतसहिष्णुतेचा गुण रुजतो, चित्ताची समता आणि विचारांची सुसंस्कृतता अंगी बाणते म्हणून त्यांनी ग्रंथप्रसारासाठी गावोगावी वाचनालये स्थापन केली. आपल्या प्रजाजनांना यांत्रिक-औद्योगिक संस्कृतीची

फळे चाखता यावीत म्हणून त्यांनी शालेय शिक्षणापासूनच हस्तकौशल्यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण केली. कोवळ्या वयातच यंत्रे व हत्यारे हलक्या हाताने वापरण्याचे कौशल्य कमावता येईल हे लक्षात घेऊन चित्रकला, प्रतिमालेखन, सुतारकाम, लोहारकाम शिकवण्यावर भर दिला. फिरत्या औद्योगिक प्रदर्शनांच्या माध्यमातून लोकाभिरुची घडविण्यारा लोकशिक्षणाचा अभिनव मार्ग निवडला. पूर्वपरंपरांतून आलेल्या देशी कार्मिक कौशल्यांना औद्योगिक समाजातील यांत्रिक कौशल्यांची जोड देणाऱ्या कर्मशाळा सुरू केल्या. यंत्रविद्येचे व लोकोपयोगी कारागिरीचे कौशल्यशिक्षण देणारे बडोद्याचे 'कलाभवन' (स्थापना १८९०) या संस्थेतून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रंगकाम, विणकाम, सुतारकाम, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेली नवी तंत्रकुशल पिढी तयार झाली. तंत्रशिक्षणाचा भारतातला हा एक अभिनव प्रयोग होता. समानतेवर आधारित नागरिकतेचा विकास साधायचा असेल तर लोकांची आर्थिक पत वाढली पाहिजे हे महाराजांनी ओळखले होते. क्रयमूल्याधिष्ठित समानता आणण्यासाठी समाज तंत्रविद्याकुशल झाला पाहिजे हे सूत्र मनाशी ठेवून त्यांनी तंत्रशिक्षणाचा अभ्यासक्रम गावपातळीपर्यंत नेला. तंत्रविद्यात्मक संस्कृती ही एक प्रकारची 'नेटवर्क संस्कृती' असते, तिच्यातून परस्परसहयोगाचे मूल्य रचले जाते, ही गोष्ट नवी सामाजिक पुनर्घटना करताना सयाजीराव गायकवाड यांनी लक्षात घेतली होती. तंत्रविद्या हे एक परमोच्च सांस्कृतिक मूल्य झालेले आपण आज पहातो-अनुभवतो आहोत; पण ही काळाची पावले वेळीच ओळखून विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकातच सयाजीरावांनी आपल्या संस्थानात तंत्रशिक्षणाचा पाया घातला. 'इंजिनिअर' या शब्दासाठी महाराजांनी 'शिल्पी' अशी अर्थपूर्ण संज्ञा सुचविली होती. त्यात सर्व प्रकारचे कारागीर, मजूर, यांत्रिक कामकरी यांचा समावेश होता. शिल्पी तुकड्या तुकड्याने काम संपविणारा एकांडा कारागीर नसतो, तो भावी काळासाठी वास्तुनिर्माणाचे काम करीत असतो. म्हणून सयाजीरावांनी शिल्पी हे व्यक्तिशः आणि संघशः साम्राज्यनिर्मातेच असतात, अशा शब्दांत 'कलाभवना'त यंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव केला होता. (बडोदे, १५ जानेवारी १९३४चे भाषण).

बडोदे संस्थान स्त्रीशिक्षणाच्या बाबतीतही अग्रेसर होते. १८८५ सालीच महाराजांनी स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात हुजूरहुकूम जारी केला होता. त्यात म्हटले होते की, "युवकांना नैतिक शिक्षण देण्याची जशी आवश्यकता आहे, त्याहून अधिक निकड मुलींना शिक्षण देण्याची आहे. भावी पिढीच्या सर्वोतोपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवर आहे. त्या शिकल्या नाहीत तर उत्तम नागरिक कसे निर्माण होतील. शिकलेली आईच मुलांवर उत्तम संस्कार करू शकते. एवढेच नाही तर शिकलेली स्त्री समाजातील अनिष्ट चाली, रूढी दूर करण्याचे कामही करील. शिकलेली गृहिणी सहचरीचे नाते यथार्थ करून दाखविते.



(शा.म.मु.) एन ४०६१-४५ (११००--१२-२०२२)

याबरोबर मुलींना शारीरिक शिक्षणाचे शिक्षणही देण्यात यावे. यातून तिची हिंमत वाढेल, याकरिता शाळा व व्यायामाळा सुरू करीत आहे." (हुजूरहुकूम २० ऑग्स्ट १८८५) बडोद्यात मुलींना कवायतीचे शिक्षण, हॉकीचे खेळ शिकवले जात. पुरुषांप्राणे स्त्रियांचे व्यायामाचे आखाडेही काढण्यात आले होते. मुलींनी १२ वर्षापर्यंत आणि पाचव्या इयत्तेपर्यंत अभ्यास पुरा केलाच पाहिजे असा नियम २८ मार्च १९१३ पासून बडोदे संस्थानात लागू करण्यात आला. १९३५ पर्यंत संस्थानात चारशेहून अधिक कन्याशाळा सुरू झाल्या होत्या व ९० हजारांहून अधिक मुली शिक्षणाच्या प्रवाहात आल्या होत्या. भारतीय महिलांनी प्रगत देशातील महिलांप्रमाणे गृहविज्ञानाचे आधुनिक शिक्षण घ्यावे यासाठी १९३३ साली त्यांनी अमेरिकेतील मिसेस स्ट्रॉंग या तज्ज्ञ शिक्षिकेला बोलावून बडोद्यात गृहशिक्षणाचे वर्ग सुरू केले. महिलांना पाकक्रिया, घरगुती अर्थशास्त्र, शिशुसंगोपन, संगीत, कला यांच्या जोडीने रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि धंदेशिक्षण देण्यावर भर दिला जात होता. स्त्रियांच्या अंगी राजकीय नेतृत्व, समाजसेविका, परिचारिका या कामासाठी लागणारे गुण असावेत या दृष्टीने अभ्यासक्रमांची आखणी करण्यात आली होती. स्त्री-शिक्षणाचा अभ्यासक्रम आपल्या देशकालपरिस्थितीस अनुसरूनच ठेवण्यात यावा यावर महाराजांचा कटाक्ष होता. (वरखेडे, २०१७, पृ. ६४-६९)

## ५.१२. विद्यार्थी जीवनातील बदल :

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात शालेय व महाविद्यालयीन शिक्षणातल्या अध्ययन-अध्यापनपद्धतीत पायाभूत शिक्षणावर भर होता. गोखल्यांचे अंकगणित, बसूचा अलजिब्रा, हॉल आणि स्टीव्हनसच्या जॉमेस्ट्रीचे सहा भाग तोंडपाठ असणारे व हातात पुस्तक न घेता गणित शिकवणारे शिक्षक; इंग्रजीचे उच्चार साहेबी थाटाचे, पण लहान लहान वाक्ये, अर्थानुसार बोलण्यातल्या स्वरांतले चढउतार, तर्खडकरांची तीन भाषांतरे, मॅकमॉर्डी आणि रेनचे कांपोझिशनचे पुस्तक यांचा वाक्यरचना, म्हणी, शैली शिकवताना उपयोग करणारे इंग्रजीचे शिक्षक यामुळे इंग्रजीचे पायाशुद्ध शिक्षण मिळायचे. मराठी, संस्कृत शिकवताना पाठांतरावर भर असे. पाठांतरामुळे वाणी शुद्ध होत होती. ऱ्हस्वदीर्घ, विरामचिन्हे यांचा दाट परिचय व्हायचा. मोरोपंत, वामनपंडित, रघुनाथ पंडितांचे काव्य पाठ करण्याची सक्ती होती. कॉलेजात संस्कृतच्या अभ्यासात शाकुंतल, वेणीसंहार ही नाटके, रघुवंशाचे सर्ग, दशकुमारचरित्र शिकवले जायचे. अमरकोश, विश्वकोशाचा वापर करण्याचा सराव होई. संहितेच्या खालची टीका, पाणिनीची सूत्रे शिकवली जायची. (३८-३९) मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजातली रसायनशास्त्रातली प्रयोगशाळा आणि डॉ. राव हे जंतुशास्त्रज्ञ प्रसिद्ध होते. त्यांनी पुष्कळ रोगजंतूंचा शोध लावून त्यावर लस तयार केली होती. प्रयोगशाळेत प्रयोग करण्यासाठी ससे, पांढरे उंदीर, माकडे उपलब्ध असत.

एक्स्पेरिमेंटल फिजियॉलॉजीत शरीरातील सर्व पेशींचे पातळ तुकडे काढून ते सूक्ष्मदर्शक यंत्राखाली पाहून त्याचे चित्रण करावे लागे, केमिकल फिजिऑलॉजीत लघ्वी, रक्त तपासणे, मटेरिया मेडिकामध्ये सर्व रोगांवरील औषधांचा अभ्यास असे. वनस्पतीपासून औषधे तयार करण्याच्या रीती शिकवीत. जडापासून जीवाची उत्पत्ती कशी झाली, जंतूपासून मानवी देहापर्यंत विकास कसा झाला हा सर्व उत्क्रांतिवाद बिनचूकपणे शिकता यायचा. (भोळे, १९७४, पृ. ३८-४५)

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक विकासावर आणि व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर शैक्षणिक परंपरा, शिक्षणसंस्थांचा ध्येयवाद, शिक्षकांचा विद्याव्यासंग आणि अध्यापनातली निष्ठा, विद्यार्थ्यांमधली ज्ञानतृष्णा व सहयोगी अध्ययनार्थिंबरोबरचा सौहार्दपूर्ण मैत्रभाव, पालकांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी व शिक्षणाविषयीची जागरूकता इत्यादी घटकांचा संकलित परिणाम होत असतो. प्राचीन गुरुकुलांतले शैक्षणिक पावित्र्य आधुनिक महाराष्ट्रातील ध्येयवादी शिक्षणसंस्थांनी जपण्याचा प्रयत्न निश्चितच केला होता. मुंबईचे एलफिन्स्टन कॉलेज, विल्सन कॉलेज; पुण्यातले डेक्कन, फर्गसन, स. प. महाविद्यालय, कोल्हापूरचे राजाराम महाविद्यालय, सांगलीचे विलिंग्डन कॉलेज, अमळनेरचे प्रताप महाविद्यालय, नागपूरचे मॉरिस कॉलेज, मुंबईचे ग्रँट मेडिकल कॉलेज इत्यादी संस्थांमधले शैक्षणिक वातावरण ज्ञानाच्या अभिवृद्धीला पोषक होते. मात्र शिक्षणसंस्थांचे हे तेजोवलय उत्तरपर्वात झाकोळू लागले होते. विशेषत: महाविद्यालयीन शिक्षणाच्या वातावरणात या बदलाच्या खुणा प्रकर्षाने जाणवू लागल्या होत्या. पोशाखातले बदल हे समकालीन अभिवृत्तीच्या खुणा मिरवणारे असतात. पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातले प्राध्यापक श्री. म. माटे यांनी या बदलाच्या खुणा फार बारकाईने टिपल्या आहेत. पुण्यातले महाविद्यालयीन विद्यार्थी एके काळी कोट-टोपी घालून येत, फॅशन करणारे विद्यार्थी तलम मोहक पोशाख करून मोरासारखे नटत; इटालियन कॅप्स किंवा वेलबुट्टी काढलेल्या टोप्या वापरीत असत. परंतु नंतरच्या काळात या पोशाखांत बदल होत गेले. विशेषत: बंगालच्या फाळणीनंतर स्वदेशी चळवळीने जोर पकडला तसा विद्यार्थ्यांचा राजकीय सहभागही वाढला आणि खादीचा सदरा व मद्रास चेकचा एक जाडाभरडा कोट परिधान करण्याची लाट आली. बुटाऐवजी साधे पायताण आले. युद्धकालीन महागाईचा फटका हेही या पोशाखबदलामागचे एक आर्थिक कारण नक्कीच होते. पोशाखातल्या या बदलात मराठी माणसाची अभिरुची आणि गुजराती माणसांची अभिरुची यातला एक लक्षणीय फरक माटे यांनी नोंदवला आहे. गुजराती विद्यार्थीही खादीचा पोशाख करू लागले होते, पण परवडणारी वस्त्रे म्हणून त्याकडे न पाहता सौंदर्य खुलवणारा पोशाख म्हणून त्याकडे ते पहात असत. खादीच्या मळखाऊ पोशाखात वावरणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांमध्ये जाणवणारा बेडौलपणा गुजराती विद्यार्थ्यांच्या

पोशाखात दिसत नसे; तिथे खादीचा पोशाख सौंदर्यवर्धनाचे मूल्य घेऊन अवतरत असे. कदाचित मराठी मुलांना गुजराती मुलांप्रमाणे वारंवार परटाकडे कपडे देणे परवडणार नसणार, हेही कारण असू शकेल; पण हा वृत्तीभेद नजरेआड करता येणारा नव्हता, हेही तितकेच खरे. महाविद्यालयात शिकणाऱ्या मराठी मुलींच्या पोशाखात, केशभूषेत मात्र आधुनिक काळात विलक्षण स्थित्यंतर झालेले दिसून येत होते. 'तीन पेडांचे चाक रद्द होऊन केसांचा आंबाडा आला, होता होता सगळे पेड एकमेकांपासून मोकळे सुटले आणि पाठीवर रूळू लागले, त्याचे आणखीही काही पर्याय आले.. वनगाईची केसांची गंगावणे मागे पडून माणसांच्या केसांची अमलात आली.. वेणीवरचा गजरा अंबाड्यावर आला, तेथून तो मानेवरील केसांपर्यंत आला, आणि शेपटाच्या टोकाला गोंडाही रुळू लागला . . क्वचित कोठे उंच टाचांच्या वहाणा डोकाऊ लागल्या आहेत. मुलींच्या हातातल्या बांगड्या बहुतेक लोपल्या आहेत. एखादी बांगडी काचेची किंवा सोन्याची घालण्याची प्रवृत्तीही बळावली आहे." (माटे, १९५०, पृ. २८)

विद्यार्थ्यांच्या कलाभिरुचीचा पैसही या काळात विस्तारताना दिसतो. ड्रिलमास्तर क्रिकेट, फुटबॉल, हॉक, कवाईत सर्व खेळ करवून घेत. त्या काळात हजारे, विजय मर्चंट, देवधर, कनकय्या नायडू यांचे वेस्ट इंडिज सामने गाजत. वृत्तपत्रांतून त्यांची वर्णने प्रसिद्ध होत. त्यामुळे खेळाविषयी मुलांची आस्था वाढली होती. फोनोग्राफ, रेडिओ या आधुनिक साधनांमुळे पूर्वीपेक्षा दसपट संगीत नव्या पिढीच्या कानांवर पडू लागले. चित्रकला, गाणे, अभिनयाच्या संधींचे क्षितिज विस्तारू लागल्याने त्यांचे कलेचे ज्ञान वाढले, अभिरुचिसंपन्नता आणि वागण्याबोलण्यातला खुलेपणा वाढला. कोल्हटकर-गडकऱ्यांच्या नाटकातील विनोदाच्या लोकप्रियतेमुळे विद्यार्थीवर्गातही शाब्दिक कोट्या व अतिशयोक्त विनोद करण्याचे प्रमाण वाढले. कधी कधी ही विनोदबुद्धी ग्राम्य व अश्लील व्यंजना निर्माण करणाऱ्या कोट्या करण्याकडे झुकू लागल्याचेही दिसून येत होते. खेळ, व्यायाम याबाबतीत मात्र काहीसे नकारात्मक बदल होत होते. एकेकाळी पुणे शहरात पेठापेठांतून आखाडे असत आणि प्रत्येक आखाड्यात शेपाऊणशे मुले मेहनत करीत असत. आता ह्या तालमी बुडाल्या आणि मुले क्रिकेट आणि हुतूतूच्या मैदानावर जाणे पसंत करू लागली. मुलींच्या जीवनातले झिम्मा, फुगडी, कोंबडा हे खेळ नाहीसे झाले; अपवादाने काही मुली बॅडमिंटन, टेबल टेनिस खेळाकडे वळलेल्या दिसत होत्या. खेळ आणि व्यायामाला लागलेल्या या ओहोटीमुळे कॉलेजातल्या मुलांमध्ये स्वाभाविक तेज किंवा रग दिसत नसे किंवा मुलींमध्येही रसरशीतपणा कमी झालेला जाणवत असे.

कॉलेजात जाऊ लागल्यापासून मुलींमध्ये मोठा वृत्तीबदल होत असल्याचे माटे यांचे निरीक्षण आहे. आधीच्या पिढीतील विद्यार्थिनींच्या वर्तनव्यवहारात विनयशीलता होती, आता नव्या पिढीतल्या मुलींमध्ये आत्मविश्वास जागा झाला असून स्पर्धात्मकतेची प्रेरणा

बलवत्तर झाली होती. पूर्वीच्या मुलींचे जीवन कोंडल्यासारखे होते, त्यांच्यात वागण्याबोलण्यात एक प्रकारचा कुढेपणा असे, विनयाच्या नावाखाली विचारांचा आणि भावनांचा मुक्त आविष्कार करण्याला अंगभूत मर्यादा त्या घालून घेत असत. त्यामुळे शिक्षणातून प्राप्त होणाऱ्या दास्यविमोचनावर त्या संतुष्ट असत. आता हा कुढेपणा गेला आहे, मोकळेपणाने हसणे, बोलणे, शंका विचारणे, संभाषणात सहभागी होणे यामुळे त्यांच्या बुद्धिगुणांचा आणि मनोगुणांचा विकास व्हायला अधिक खुला अवकाश प्राप्त झाला होता. आता स्पर्धा हे शिकणाऱ्या स्त्रीमनाचे मुख्य लक्षण बनले असून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कब्जा मिळवण्याचे ध्येय ठेवून त्या शिक्षणाच्या प्रवाहात उतरलेल्या दिसतात, हे या काळातले फार महत्त्वाचे शैक्षणिक स्थित्यंतर आहे. (माटे, १९५०, पृ. ५६-५७)

पूर्वीपेक्षा आता विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता आटत चालली असल्याची एक समजूत या काळात प्रचलित होती. श्री. म. माटे यांनी याचे मूळकारण शोधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, या मुलांच्या पिंडात बुद्धीचा कमीपणाचा दोष नसून त्यांच्या परिस्थितीचा दोष आहे. त्या काळात गरिबाघरची बरीच मुले उच्च शिक्षण घेऊ लागली होती; त्यांच्या आर्थिक व कौटुंबिक परिस्थितीचा या विद्यार्थ्यांच्या विद्याव्यासंगावर स्वाभाविकच विपरित परिणाम होत होता.. पांढरपेशा समाजातील आर्थिक दु:स्थिती असणारी मुले माधुकरी किंवा भिक्षा मागून शिक्षण घेत होते. या मुलांना घरात अभ्यासाला जागा नसते, रात्रीच्या वेळी तेल जाळण्याची ऐपत नसते, पुस्तके घ्यायला पैसे नसतात, पुढारलेल्या विद्यार्थ्यांची घरे दूर असतात त्यामुळे त्यांच्या मैत्रीचा फायदा घेता येत नाही, अशा अनेक कारणांमुळे बौद्धिक प्रगतीत अडथळे निर्माण होत होते. पण शिक्षणाची क्षितिजे विस्तारत होती, हेही तितकेच महत्त्वाचे होते.

शिक्षकांच्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात पूर्वीसारखा आदर आता उरला नाही, अशीही एक समजूत जनमानसात या काळात स्थिरावली होती. या समजूतीत जरूर तथ्य होते; मात्र श्री. म. माटे म्हणतात तसे आधीच्या दोन पिढ्यांत समाजात सरसकट विद्वान व आदरणीय लोकांची संख्या कमी होती, त्यामुळे शिक्षकांसंबंधीचा आदरभाव त्या पिढ्यांमधे अधिक आढळून येत होता. आता विद्वत्ता, देशाभिमान, कर्तबगारी याबाबत समाज उत्तरोत्तर समृद्ध होत चालला असल्याने या संख्यात्मक वाढीचा परिणाम आदरबुद्धीवर होणे क्रमप्राप्तच म्हटले पाहिजे. अर्थात तोटक्या, चालचलाऊ ज्ञानावर आपला व्यवसाय करणाऱ्या शिक्षकांची संख्याही अधिक असल्याने विद्यार्थ्यांच्या मनातला शिक्षकांविषयीचा आदरभाव उणावण्याचे तेही एक कारण नाकारता येत नाही. (माटे, १९५०, पृ. १५-२०)

**शिक्षकांच्या जीवनातील बदल :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक अशी ध्येयवादी शिक्षकांची पिढी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात आणि सामाजिक जीवनात एक नवे युगप्रवर्तन घडविण्याचे काम करीत होती. विसाव्या शतकाच्या पहिल्या काही दशकांत ह्या ध्येयवादाने भारलेली शिक्षकमंडळी हे ज्ञानोदयाचे पर्व हिरिरीने पुढे नेत होती.देशोद्धारासाठी बालकांचे शिक्षण हा विषय अग्रक्रमाने हाती घेतला पाहिजे असे म्हणणारे वासुदेव गोविंद आपटे यांनी अध्यापनाचे काम करीत असताना मुलांसाठी 'आनंद' मासिक चालविले. मुलांची वाचनाभिरुची समृद्ध करण्यासाठी त्यांनी इतिहास, पुराणे व विविध ज्ञानशाखांतील पायाभूत ज्ञानाचा मुलांना परिचय करून देणारी पुस्तके लिहिली. बालरामायण, बालभागवत, बालगीता अशी सुबोध पुस्तके लिहून महाकाव्यांच्या परंपरेचा बालबोध शैलीत मुलांना परिचय करून दिला. महाराष्ट्राचा बालबोध इतिहास पुस्तकरूपाने मुलांना शिकवला. ज्ञानवृद्धीसाठी भाषिक आयुधे सज्ज असली पाहिजेत या भूमिकेतून त्यांनी मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी' (१९१०),'लेखनकला आणि लेखनव्यवसाय' (१९२५), 'मराठी शब्दरत्नाकर' (१९२२), 'मराठी शब्दार्थचंद्रिका' (१९२२), आणि 'मराठी-बंगाली शिक्षक' (१९२५) ही भाषाभ्यास विषयक पुस्तके प्रसिद्ध केली. गडकरी मास्तरांनी ( राम गणेश गडकरी) मुलांसाठी 'चिमुकली इसापनीती' सांगणारे पुस्तक लिहिले. का. न. केळकर यांनी गडकरी मास्तरांविषयीची आठवण सांगताना लिहिले आहे की, "चंद्राभोवती जसे तारांगण तसे त्यांच्याभोवती विद्यार्थ्यांचे कडे असे. आपण शिक्षक, ही मुले हा भेदच त्यांच्यापाशी नसे; इतके मुलांशी थट्टा-विनोद करताना ते समरस होऊन जात." या पिढीतल्या शाळा-कॉलेजातील शिक्षकांविषयी का. न. केळकर यांनी नोंदविलेला अभिप्राय प्रातिनिधिक स्वरूपाचा असल्याने तो येथे उद्धृत करीत आहे: ".. तरुण पिढीवर आपण प्रेमच केले पाहिजे ही भावना ज्या अध्यापकांच्या हृदयांत वागत होती अशी कित्येक उदारचरित माणसे मला शाळा-कॉलेजच्या आवारांत भेटली. कीर्ती, संपत्ती किंवा प्रसिद्धी यापैकी काही एक लाभण्यासारखे नसताना केवळ कर्तव्यबुद्धीने या शिक्षकांनी काम केले.. अनेक शिक्षकांनी एखादे शेत नांगरावे त्याप्रमाणे कसरत करून आम्हां विद्यार्थ्यांची मनोभूमी उलथी पालथी करून ती सुपीक केली." (केळकर का. ना. १९६३, पृ. १०-१२) विद्याव्यासंगी शिक्षक-प्राध्यापकांची पिढी या कालखंडात अग्रेसर होती. पुण्याच्या फर्गसन कॉलेजात महर्षी कर्वे, रँगलर परांजपे, गुरुदेव रानडे, माधवराव पटवर्धन, आप्पासाहेब पटवर्धन यासारखे नामवंत प्राध्यापक शिकवत असल्याने या महाविद्यालयातून विद्यानिष्णांताची एक मोठी पिढी तयार झाली. कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात ना. सी. फडके, विनायक कृष्ण गोकाक, माधवराव पटवर्धन, बॅ.

बाळासाहेब खर्डेकर , वि. गो. विजापूरकर यांच्यासारखे शिक्षक होते. तीच गोष्ट मुंबईच्या एलफिन्स्टन किंवा विल्सन कॉलेजची. या महाविद्यालयांतून शिकलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी तत्त्वज्ञ, साहित्यिक, इतिहासलेखक, शास्त्रज्ञ, खेळाडू, राजकीय नेते म्हणून भारताच्या इतिहासात मानाचे स्थान मिळविले आहे; याचे कारण तिथेले व्यासंगी व निष्ठावान शिक्षक !

विसाव्या शतकातल्या पन्नास वर्षांच्या वाटचालीत कालांतराने शिक्षकांचे सामाजिक स्थान, पत व त्यांच्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनातला आदरभाव क्रमश: घसरू लागल्याचे दिसत होते. प्राचीन गुरुकुलातील विद्यार्थी आपल्या ज्ञानदात्याचे नाव चालवीत; परंतु आता "आज जाड्याचा की रड्याचा रे तास" असे एकेरी शब्दप्रयोग कानावर पडू लागले होते. शिक्षकही पोटार्थी बनू लागले होते, त्यांना स्वत:चा विद्याव्यासंग राहिला नव्हता. शिक्षणसंस्थातले पावित्र्य हरपू लागले होते. शिक्षकांच्या व शिक्षणसंस्थांच्या मूल्यात्मक उतरणीच्या प्रवासाबाबत काळजी व्यक्त करताना वि. पां. बोकील यांनी यासंदर्भात स्वामी रामतीर्थांच्या वचनाचा दाखला दिला होता. स्वामी रामतीर्थ म्हणत की, "पावित्र्यावाचून शौर्य नाही, पावित्र्यावाचून ऐक्य नाही, पावित्र्यावाचून सौख्य नाही." आधुनिक मराठी माणूस पावित्र्याचे हे महत्त्व विसरला आहे. गांधीजींनी अहिंसा, सत्य आणि प्रेमाची शिकवण देण्याचा प्रयत्न केला, पण समाजाला व शासनकर्त्यांना ती पचवता आली नाही. शैक्षणिक संस्थांतल्या पावित्र्याचे पर्यावरण हरपले आहे, हा आजच्या शैक्षणिक मूल्यऱ्हासाचे खरे कारण आहे, असे निरीक्षण बोकीलांनी मांडले होते. लोकशाही राज्य स्थापन करण्याची मजल आपण गाठली, पण लोकशाही राखण्यासाठी आवश्यक असणारे लोकमूल्यांचे शिक्षण आपल्याला रुजवता आले नाही. स्वातंत्र्य म्हणजे हवे तसे वागण्याची मोकळीक असा समज दृढ झाला आहे. त्यामुळे कुठलीच बंधने नकोत अशी अलीकडच्या मुलांची प्रकृती बनत चालली आहे. शिक्षण हे माझे धार्मिक कर्तव्य आहे, ही गुरुकुलातल्या विद्यार्थ्यांची व शिक्षकांची धारणा आता राहिलेली नाही. नोकरी मिळण्यासाठी परीक्षेत पास होणे एवढाच शिक्षणाचा अर्थ राहिला आहे. विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी शिकत नाहीत, आणि शिक्षक ज्ञानसंपन्न समाज घडविण्याच्या बांधिलकीतून 'गुरु'त्वाची जबाबदारी अंगावर घेत नाही. (बोकील, १९४९, पृ. ४२-४६)

शिक्षकांची सामाजिक बांधिलकी उतरणीला लागण्याची आणखीही काही कारणे होती. औद्योगिक क्रांतीनंतर कामगारसंघटनांनी संप, टाळेबंदीचे मार्ग अनुसरून कमीअधिक प्रमाणात वेतनवाढ,भत्ते व अन्य पूरक मागण्या पदरात पाडून घेतल्या होत्या. शिक्षकांच्याही संघटना स्थापन झाल्या होत्या, मात्र त्यांनी अद्याप आपल्या मागण्यांसाठी कामगारसंघटनांचा मार्ग अनुसरला नव्हता. मुंबई प्रांतात प्राथमिक शिक्षकांचे पगार १५ रुपये महिना व महागाई भत्त्यासह ३० ते ३५ रुपयांइतके कमी होते. १ रुपया इतकी

नाममात्र वार्षिक पगारवाढ दिली जात असे. युद्धकाळात महागाईला तोंड देताना सामान्य शिक्षकांची कुचंबणा होत असे. आर्थिक कोंडमाऱ्यामुळे सातारा जिल्ह्यात पांडुरंग गुरुजींच्या आत्महत्येची घटना घडली होती. त्यामुळे महागाई भत्त्यासाठी सत्याग्रह करण्याकरिता शिक्षक आता विचार करू लागले होते. या पार्श्वभूमीवर १९४४ साली प्राथमिक शिक्षकांची संघटना स्थापन झाली. महागाई भत्ता, पेन्शन, वेतनवाढ या प्रश्नांना घेऊन आचार्य दोंदे यांच्या नेतृत्वाखाली १ मार्च १९४६ ते २४ एप्रिल १९४६ असा ५५ दिवसांचा शिक्षकांचा पहिला संप मुंबई राज्यात झाला. ४५ हजार प्राथमिक शिक्षक या संपात सहभागी झाले होते. महाराष्ट्राच्या शैक्षणिक जगतातील हे एक महत्त्वपूर्ण वळण होते. एकीकडे राज्यात बुनियादी शिक्षणप्रणाली आणून शैक्षणिक पुनर्घटनेचे प्रयोगकरण्यात येत होते; मात्र प्रत्यक्षात शिक्षणक्षेत्रात बरीच मूल्यात्मक पडझड सुरू होती. या मूल्यसंक्रमणाचा प्रातिनिधिक वृत्तांत वा. शि. आपटे यांनी १९४८ साली प्रसिद्ध केलेल्या *'एका शिक्षकाची दैनंदिनी'* या पुस्तकातून नोंदवला गेला आहे. त्यातले प्रमुख मुद्दे असे आहेत :

- शिक्षणसंस्थांमधला ध्येयवाद आटला आहे. शिक्षणाचे बाजारीकरण सुरू झाले आहे. कित्येक शाळाचालक शाळा म्हणजे दुकान म्हणून चालवित असतात. वशिलेबाजी व पैशाचा खोटा व्यवहार अधिकतर कुठे असेल तर अशा शाळांतून. आजीव सभासद, मॅनेजिंग कौन्सिल, डायरेक्टर बोर्ड अशा अनेक नावांनी धनिक मंडळी शिक्षणतज्ज्ञ म्हणून यात घुसतात आणि संस्थेचे संस्थान बनवतात. टिळक-आगरकरांच्या जमान्यात खाजगी शाळा काढून परक्या सरकारशी आपण झगडलो, पुढच्या काळात शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालून आपण राष्ट्रीय शिक्षणाचा फैलाव केला. पण आता सरकार आपले झाल्यानंतर सारे शिक्षण स्वतःच्या मालकीचे करून हा धंदा इतर सर्व धंद्यांच्या आधी राष्ट्रीय करण्याची वेळ आली आहे. पूर्वीचे गुरूकुलाचे दिवस आता गेले आहेत. या खडूच्या सरदारकीला आता किंमत राहिलेली नाही. खाजगी शाळात स्केलपेक्षा कमी पगारावर शिक्षक राबत असतो. ५० वर सही करून ३० रुपये हातात घेत असतो. शिक्षकांची स्थिती सर्व बाबतीत अनुकंपनीय आहे. कारखानदार आणि दुकानदारांवर बंधने घालून नोकरवर्गाला संरक्षण देण्यात आले आहे, तेवढ्या प्रमाणात बिचाऱ्या शिक्षकाला ग्रँट इन कोडाने किंवा अन्य सरकारी कायद्याने संरक्षण दिलेले नाही. (आपटे, १९४८, पृ. २२-२४)
- शिक्षणक्षेत्रात धार्मिक आणि राजकीय सत्ताकारण करणाऱ्यांची ढवढवळ वाढत चालली आहे. टिळकांसारख्या राष्ट्रीय शिक्षणाचा उद्घोष करणाऱ्या शाळा संस्थापकांनीही धार्मिक शिक्षणाचा अट्टाहास बाळगला नाही; उलट अलिगड, उस्मानिया किंवा बनारस युनिव्हर्सिटी निघाल्यानंतर शिक्षणक्षेत्राला राजकीय रंग

मिळू लागला. आता मुंबईसारख्या हिंदु बहुसंख्य प्रांतातही मुस्लीम बोर्ड ऑफ एज्युकेशन करावे किंवा उर्दू युनिव्हर्सिटी असावी अशी सूचना विधिमंडळात येऊ लागली आहे. असे झाले तर उद्या लिंगायत बोर्ड ऑफ एज्युकेशन करा, परवा जैन बोर्ड करा अशा मागण्या येतील. जातवार शिक्षण देण्याने समाजातील तेढ आणखी वाढेल, अशी भीती या रोजनिशीत व्यक्त करण्यात आली आहे.

- शिक्षणखाते एका विशिष्ट राज्ययंत्रासाठी वापरले जाण्याचा धोकाही लेखकाने सूचित केला आहे. यासंदर्भात त्यांनी लिहिले आहे की, "आज काँग्रेस सरकार आहे म्हणून शाळा-शाळांत तिरंगी झेंडे, गांधी-नेहरूंचे फोटो, त्यांच्या जयंत्यांच्या सुट्या, त्यांच्या विशिष्ट तत्त्वज्ञानावर आखलेल्या शिक्षणयोजनांची सक्तीने अंमलबजावणी चालू आहे. उद्या सोशॅलिस्टांचे किंवा कम्युनिस्टांचे राज्य आले तर शाळांवर लाल झेंडे, मार्क्स-लेनिनचे उत्सव आणि नवे शिक्षण असे प्रकार चालू झाले तर अनवस्था ओढवेल."(आपटे, कित्ता, पृ. ३७-३८)
- जगाच्या धावेबरोबर शाळेचे अभ्यासक्रम बदलत नाहीत. १९२०/२५ साली जे गणितशास्त्र आणि इंग्रजी शिकविले जात होते, तेच आज शिकविले जात आहे. त्यावर एक महायुद्ध होऊन गेले, जीवन हरतऱ्हेने बदलले. पण या २० वर्षांत जितक्या प्रमाणात जीवन बदलले तितक्या प्रमाणात व तितक्या झपाट्याने अभ्यासक्रम बदलले नाहीत.
- समाजामध्ये शिक्षकाला पूर्वीचा दर्जा राहिलेला नाही. शिक्षकाच्या धंद्यात मर्यादित बुद्धीची माणसे येतात व चिकटून राहतात. असामान्य बुद्धीची माणसे आली तरी टिकत नाहीत. शाळेचे क्षेत्र सोडून आपल्याला योग्य क्षेत्र लवकरच शोधतात. त्याचे मुख्य कारण शिक्षकाची आर्थिक दैन्यावस्था. .. स्वार्थत्याग, समाजसेवा वगैरे अफूच्या गोळ्या देऊन समाजाने शिक्षकाला भ्रष्ट केला आहे. नवी पिढी घडविण्याचे काम शिक्षकाने करावे अशी अपेक्षा; पण पगार मात्र तुटपुंजा! फंड, पेन्शन, विमा कसलेच आर्थिक संरक्षण नाही. शिक्षक हा समाजाचा दिवा आहे, तो जळण्यासाठीच जन्माला आला आहे, पण महागाईच्या प्रदोषकाळात जगण्यासाठी त्याचे आर्थिक स्वावलंबित्वही तेवढेच महत्त्वाचे आहे. शिक्षकाने आपली बौद्धिक पातळी वाढविण्यासाठी विद्याव्यासंग करण्याची अपेक्षा असते. पण सरकार जसे युद्धकाळात प्रचार पुस्तिका वाटण्यात खर्च करते, तसे शिक्षकांसाठी आदर्श साप्ताहिक चालवून ते त्यांना फुकट वाटण्याचे काम करीत नाही.

वा. शि. आपटे यांचा हा प्रातिनिधिक वृत्तांत पाहता आपली शैक्षणिक वाटचाल राष्ट्रीय ध्येयवादाकडून बाजारू व्यवहारवादाकडे व मूल्यऱ्हासाच्या दिशेने सुरू होती. समाजातील सर्वच क्षेत्रातील नैतिक मूल्ये घसरली आहेत. त्यामुळे जोवर बाहेरचे पक्ष व

लोक जातीयतेचे राजकारण खेळत आहेत, तोवर एकटा शिक्षक लोकशाहीच्या उदात्त व सत्यन्यायनीतीच्या पवित्र ग्रंथांची कितीही पारायणे विद्यार्थ्यांपुढे करत बसला तरी ते सारे निष्फळच होणार, अशी स्थिती आज निर्माण झाली आहे. अशा मूल्यऱ्हासाच्या उंबरठ्यावर उभे असताना स्वातंत्र्योत्तर नवभारतनिर्माणासाठी शिक्षणाची नव्याने पुनर्घटना करण्याचे आव्हान अजूनही कायम आहे. १९४९ साली भारत सरकारने डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोग स्थापन केला. शैक्षणिक पुनर्घटनेची तयारी म्हणून या आयोगाच्या स्थापनेचे महत्त्व आहे. या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पदार्पण करताना ही एक आशादायी घटना घडली होती, त्याची नेमकी फलश्रुती काय याचा तपास पुढच्या खंडातल्या निरुपणात आपण करणार आहोत.

## ५.१३. इतिकथन :

१९ व्या शतकात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाजातील सुधारकांनी, इंग्रजी विद्या शिकून तयार झालेल्या उच्च विद्याविभूषितांनी शिक्षणप्रसाराची मुहर्तमेढ रोवली. ब्रिटिशांचे आणि एतद्देशीय सुधारकांचे शिक्षणप्रसाराचे काम प्रामुख्याने नागरी भागात केंद्रीत झाले होते. ब्रिटिश शिक्षणनीतीतील 'पाझर सिद्धांता'नुसार उच्चस्तरांतील लोक शिकले की ते निम्नवर्गातील शिक्षणाची जबाबदारी स्वत:कडे घेतील व आपोआप शिक्षणाचा प्रवाह हळू हळू ग्रामीण भागात व निम्नवर्गीयांत पोहचेल या धारणेतून शिक्षणविस्ताराकडे पाहिले जात होते. त्यामुळे वरिष्ठ व मध्यमवर्गीयांना शिक्षणाचे लाभ मिळत गेले, गरीब लोक शिक्षणापासून दूर राहिले. शिक्षणविस्ताराचा हा ध्रुव हळू हळू नागर अभिजनांकडून ग्रामीण व निम्नस्तरीय बहुजनांच्या शिक्षणाकडे वळविण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यादृष्टीने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासाठी कायदा करण्याचे प्रयत्न मुंबई राज्यात आणि अन्य मराठी भाषक संस्थानात झाले. शिक्षणाचा परिघ विस्तारण्यात महाराजा सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज, सांगलीचे पटवर्धन इत्यादी संस्थानिकांचे योगदान तर लाभलेच, परंतु त्याबरोबरच ब्राह्मणेतर चळवळीतील नेते पंजाबराव देशमुख, भाऊराव पाटील, रावसाहेब थोरात इत्यादी ग्रामीण भागातून पुढे आलेल्या नेतृत्वाचाही सक्रिय पुढाकार राहिला. मराठा शिक्षण परिषद, रयत शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, पीपल्स एज्युकेशन सोसायटी यासारख्या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागात शाळा उघडल्या. यामुळे सर्ववर्गीय जाती-जमातीतील मुला-मुलींना शिक्षणाच्या मध्यवर्ती प्रवाहात दाखल होण्याची संधी वाढत गेली. स्त्रीशिक्षणाचे महत्त्वाचे प्रयोग या कालखंडात झाले. महाराजा सयाजीराव गायकवाड व महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचे या क्षेत्रातील योगदान लक्षणीय राहिले. समाजसुधारणेच्या चळवळींना मिळालेल्या गतीमुळे मुलींच्या

लग्नाचे वय वाढले, मुलींचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरते मर्यादित असल्याची समजूत दूर झाली.

राजकीय चळवळी आणि शिक्षणाचा थेट अनुबंध जोडण्याचा प्रयत्नही या काळात झाला. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून मुंबई राज्य, वऱ्हाड व मध्य प्रांतात राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा स्थापन करण्याचा स्थानिक पुढाऱ्यांनी प्रयत्न केला. सरकारची गैरमर्जी स्वीकारून व कुठल्याही अनुदानाशिवाय केवळ लोकवर्गणीतून हे शैक्षणिक उपक्रम चालविताना या नेतृत्वाला मोठी कसरत करावी लागत होती. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या बऱ्याच शाळा ब्रिटिश प्रशासनाने सक्तीने बंद करायला भाग पाडल्यात. राष्ट्रीय शिक्षणाची भूमिका स्वावलंबी व उद्यमशील राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न पाहणारी होती; त्यामुळे राष्ट्रीय अस्मितेच्या जाणिवांचे पोषण करण्याइतकेच धंदेशिक्षण देण्याचे प्रयत्न या चळवळीने केले. पुढे ग्रामीण अर्थव्यवस्थेला उर्जितावस्थेत आणण्यासाठी गांधीजींनी बुनियादी शिक्षण अर्थात मूलोद्योगी शिक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक कौशल्य संपादन केलेली नवी पिढी घडविण्याचा अभिनव प्रयोग केला. स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक नियोजनाला स्वातंत्र्यपूर्व काळातील या शैक्षणिक प्रयोगांचे अधिष्ठान होते. १९५० साली भारतीय राज्यघटनेने पुढल्या दहा वर्षांत ६ ते १४ वयोगटातल्या मुलांसाठी सक्तीच्या मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करण्याचे सूत्र घालून दिले. घटनेने स्त्री-पुरुष समानतेचाही दंडक घालून दिला असल्याने स्त्रीशिक्षणाचाही परिघ विस्तारेल अशी आशा करायला हरकत नाही.

वैचारिक कस असणारे समाजधुरिण या काळातल्या शिक्षणसंस्थांतून व पाठशाळांतून तयार झाले. 'भगवद्गीते' सारख्या ग्रंथावरील टीकाभाष्यांच्या माध्यमांतून लोकमान्य टिळक, म. गांधी, विनोबा भावे यांनी आपले राजकीय तत्त्वज्ञान विकसित केले. अनेक पंडित, प्रवचनकार, कीर्तनकारांनी या ग्रंथावरील टीकाभाष्यांच्या माध्यमातून राष्ट्रभान जागविण्याचे काम केले. राष्ट्रनिर्माणात ग्रंथांचे व गुरुपरंपरेचे स्थान महाराष्ट्रातल्या अभिजनांनी ओळखले होते; व त्यातूनच महाराष्ट्राचा बौद्धिक पिंड घडण्याला मदत झाली. या बुद्धिवाद्यांची फळी जसजशी कमी होऊ लागली तसतशी महाराष्ट्रातल्या वैचारिक मुशीही भुसभुसशीत होण्याची चिन्हे या कालखंडाच्या अखेरीस जाणवू लागलेली आहेत.

## टिपा :

[१] राष्ट्रीय शिक्षणाचा भारतातील विचार हा जर्मनीतील राष्ट्रीय शिक्षणापेक्षा वेगळा होता. जर्मनीमध्ये सर्व प्राथमिक शिक्षण सरकारच्या ताब्यात होते. इतर स्तरांवरील सर्व खाजगी शिक्षणसंस्थांवर सरकारचा अंकुश होता. तेथे व्यक्तिगत विकास, व्यक्तिमत्त्व विकास ही जरी शिक्षणाची उद्दिष्टे मानलेली असली तरी त्यांचा अंतिम हेतू जनकेंद्री

अस्मितेपेक्षा सत्ताधाऱ्यांना अभिप्रेत असणाऱ्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी निगडित होता;

[२] अ. भा. मराठा शिक्षण परिषदेची अधिवेशने :

- १९०७ : धारवाड : अध्यक्ष - खासेराव जाधव (बडोदे),
- १९०८ : मुंबई : अध्यक्ष - खासेराव जाधव (बडोदे),
- १९०९ : अमरावती : अध्यक्ष - श्रीमंत संपतराव गायकवाड (बडोदे)
- १९१० : बडोदे : अध्यक्ष - श्रीमंत शंभुसिंह अमरसिंह जाधव (माळेगाव)
- १९११ :नागपूर :अध्यक्ष- श्रीमंत रामराव अमृतराव डफळे (जत)
- १९१२ : धुळे : अध्यक्ष - श्रीमंत तुकोजीराव पवार (देवास, मोठी पाती)
- १९१३ : नाशिक : अध्यक्ष - श्रीमंत उदाजीराव पवार (धार)
- १९१४ : पुणे : अध्यक्ष - श्रीमंत बाबासाहेब पवार (देवास, धाकटी पाती)
- १९१५ : अहमदनगर : अध्यक्ष - श्रीमंत भुजंगराव घोरपडे (गजेंद्रगड)
- १९१६ : सातारा : अध्यक्ष - श्रीमंत सदाशिवराव पवार (देवास, धाकटी पाती)
- १९१७ : खामगाव : अध्यक्ष - श्रीमंत छत्रपती शाहू महाराज (कोल्हापूर)
- १९१९ : धार : अध्यक्ष - श्रीमंत माधवराव शिंदे (ग्वाल्हेर)
- १९२१: ग्वाल्हेर : अध्यक्ष - श्रीमंत उदाजीराव पवार (धार)
- १९२२ मे : कल्याण : अध्यक्ष - श्रीमंत मालोजीराव शितोळे
- १९२२ डिसें.: रत्नागिरी: अध्यक्ष - श्रीमंत तुकोजीराव पवार (देवास,थोरली पाती)
- १९२३ : बेळगाव : अध्यक्ष - श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज (कोल्हापूर)
- १९२५ : कोरेगाव : अध्यक्ष - श्रीमंत मालोजीराव घोरपडे (मुधोळ)
- १९२६ एप्रिल : कारगाव : अध्यक्ष - श्रीमंत जगदेवराव पवार
- १९२६ डिसें. : देवास : अध्यक्ष - श्री. पांडुरंग चिमणाजी पाटील
- १९२८ : सोलापूर : अध्यक्ष - ना. भास्करराव जाधव
- १९२९ : जळगाव : अध्यक्ष - श्रीमंत तुकोजीराव पवार (देवास, थोरली पाती)
- १९३३ : मलकापूर : अध्यक्ष - श्रीमंत तुकोजीराव पवार (देवास, थोरली पाती)
- १९३६ : महाड : अध्यक्ष - श्रीमंत विजयसिंहराव उर्फ बाबासाहेब डफळे (जत)
- १९३८ : पुणे : अध्यक्ष - श्री. बाळकृष्णराव पिराजीराव जगताप.
- १९३९ : अमरावती : अध्यक्ष – श्री. विठ्ठलराव तुबे
- १९४१ : नागपूर : अध्यक्ष - श्रीमंत यशवंतराव घोरपडे (सोंडूर)
- १९४३ : मुंबई : अध्यक्ष - श्रीमंत यशवंतराव घोरपडे (सोंडूर)
- १९४८ : नाशिक : अध्यक्ष - श्रीमंत जयसिंगराव घाटगे (कागल)

❑❑❑

# लेखक परिचय



## रमेश नारायण वरखेडे

या बृहत् प्रकल्पाचे समन्वयक व लेखक रमेश नारायण वरखेडे हे आंतर्विद्याशाखीय पद्धतिशास्त्रातून लेखन-संशोधन करणारे व्यासंगी अभ्यासक म्हणून परिचित आहेत. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रांचे विद्याशाखा संचालक म्हणून दोन दशकात त्यांनी अनेक नवे आंतर्विद्याशाखीय अभ्यासक्रम व कसदार पाठ्यपुस्तके संपादित केली. 'अनुष्टुभ्' द्वैमासिकाचे संस्थापक संपादक, 'ज्ञानगंगोत्री' व 'क्रिटिकल एन्क्वायरी' या नियतकालिकांच्या संपादनात सहयोग, धुळ्याच्या मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे संस्थापक संचालक म्हणून काम करताना त्यांनी अनेक नव्या विषयांवर सर्जनशील व वैचारिक लेखन करवून घेतले. संशोधनाचे पद्धतिशास्त्र, सायबर संस्कृती, साहित्यविमर्श, समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. याखेरीज भाषांतरविद्या, संज्ञापनविद्या आणि ललितकला, मराठी पत्रकारिता : विविध पैलू, मराठी लोकगीते : संस्कृतीची साधने, लोकसाहित्य संशोधन पद्धती, लोकसाहित्य व लोकपरंपरा, भाषावार प्रांतरचना आणि मराठी भाषा, कुसुमाग्रज साहित्य विमर्श, महाराष्ट्राची शैक्षणिक वाटचाल, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे - खंड १ व २, इत्यादी विषयांवर पुस्तके संपादित केली आहेत. पुणे विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यासाठी मराठी, जनसंज्ञापनविद्या, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी विविध विषयांवर पाठ्यपुस्तकांचे लेखन-संपादन केले आहे. 'सायबर-संस्कृती' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा विज्ञान तंत्रज्ञानातील महात्मा फुले राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाचा २०२१ चा डॉ. अशोक रा. केळकर, मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार प्राप्त. महाराष्ट्र शासनाची भाषा सल्लागार समिती, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमीच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून सहयोग.

# लेखक परिचय



## नीतीन रिंढे

मुंबईच्या चेतना महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक. लेखक व समीक्षक. 'पंचवीस कविता', 'लोकनेते पंजाबराव देशमुख', 'लीळा पुस्तकांच्या', 'पासोडी', 'मराठी कादंबरी : पैस आणि परीघ' ही पुस्तके प्रकाशित. 'मराठी नवकादंबरी' या पीएच. डी. प्रबंधास मुंबई विद्यापीठाचे अ. का. प्रियोळकर पारितोषिक. 'लीळा पुस्तकांच्या' या पुस्तकाला महाराष्ट्र फाउण्डेशनसह इतर तीन पुरस्कार. 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, खंड १'चे सहलेखक. कादंबरीचे साहित्यशास्त्र, संस्कृती-अभ्यास, ग्रंथ-इतिहास व वाचन-संस्कृती या विषयांत विशेष रुची. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शरद पवार इन्स्पायर फेलोशिपचे प्रमुख मार्गदर्शक.

प्रस्तुत खंडासाठी पुढील प्रकरणांचे लेखन – प्रकरण ८ : वाङ्मयीन संस्कृतीतील स्थित्यंतरे, प्रकरण ९ : नाट्यकलेतील स्थित्यंतरे, प्रकरण १० : संगीतविश्वातील स्थित्यंतरे, प्रकरण ११ : चित्रकलेतील स्थित्यंतरे.